लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१), शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४), उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.६) व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८)

एकोणीसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक एप्रिल २०१७ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
मार्च/एप्रिल, २०१७

लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१), शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४), उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.६) व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८)

एकोणीसावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१५-२०१६

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

*(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

***(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२४अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.
(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(४) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.
(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.
(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.
(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

***भास्कर जाधव, वि.स.स., दिनांक २२ मार्च २०१७ पासून ते दिनांक ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत निलंबन.**

****श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

*****श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी उप सभापती, विधानपरिषद या पदावर निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१), शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४), उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.६) व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८) यावर विचार करून लोकलेखा समितीचा एकोणीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २७ व २८ जानेवारी, २०१६, दिनांक १० फेब्रुवारी, २०१६, दिनांक १ व ३ मार्च, २०१६, दिनांक २७ एप्रिल, २०१६, दिनांक ३, ११ व ३१ मे, २०१६, दिनांक १, ७, ८, १४ व १५ जून, २०१६ तसेच दिनांक १० व २४ ऑगस्ट, २०१६ रोजी अपर मुख्य सचिव, गृह व वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग व प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, गृह, नगरविकास, उच्च व तंत्र शिक्षण, गृहनिर्माण व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट ' अ ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट ' ब ' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १ व ९ मार्च, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : १५ मार्च २०१७.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

अनुक्रमणिका

अ.क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना	
(१)	**महिला व बालविकास विभाग**	**१**
	(परिच्छेद क्र. १.१)	
(२)	**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**	**९१**
	(परिच्छेद क्र. २.१)	
(३)	**नगरविकास विभाग**	**१६०**
	(परिच्छेद क्र. ३.१)	
(४)	**गृह विभाग**	**२२१**
	(परिच्छेद क्र. ४.१)	
(५)	**वैद्यकीय शिक्षण आणि औषधिद्रव्ये विभाग**	**२६६**
	(परिच्छेद क्र. ५.१)	
(६)	**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**	**२७१**
	(परिच्छेद क्र. ६.१)	
(७)	**गृहनिर्माण विभाग**	**२८४**
	(परिच्छेद क्र. ७.१)	
(८)	**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**	**२८९**
	(परिच्छेद क्र. ८.१)	

महिला व बालविकास विभाग

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र (नागरी) अहवालामधील परिच्छेद क्र २.१ " बालिकांच्या कल्याण व संरक्षणासाठीचे अधिनियम व योजनांची अंमलबजावणी " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केलेले आहेत.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग:

विविध कायद्यांतर्गत बालकांना मिळणाऱ्या हक्काचे संरक्षण व त्यासंबंधी त्यांची तपासणी करण्याकरीता तसेच त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारसी करणे, बाल संरक्षणाचे उल्लंघन होत असल्यास त्याची चौकशी करणे व कायदेशीर कारवाईकरीता शिफारस करणे यासाठी MSCPCR ची स्थापना जुलै, २००७ मध्ये झाली.

लेखापरीक्षेत असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासनाने केवळ डिसेंबर, २००८ व जानेवारी, २००९ मध्ये तीन वर्षांसाठी अनुक्रमे अध्यक्ष व सहा सदस्य यांना नामनिर्देशित केले. तीन वर्षांच्या सत्राच्या अखेरीस, डिसेंबर, २०११ मध्ये प्रधान सचिव, W & CD यांना आयोगाच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त भार देण्यात आला होता, परंतु, एकही नवीन सदस्यास नामनिर्देशित करण्यात आले नव्हते (नोव्हेंबर, २०१४). (i) राज्य शासनाने गठीत करावयाच्या त्रिसदस्यीय निवड समितीव्दारे MSCPCR च्या अध्याक्षांची निवड करणे आवश्यक होते, जी पद्धत या प्रकरणांत अवलंबण्यात आली नव्हती आणि (ii) ज्यांच्याकडे बालकांच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी होती, तेच प्रधान सचिव (W & CD), बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कायद्यांचे संनियंत्रण करणे, कायदयांतर्गत आदेश जारी करणे किंवा शिफारसी करणे या त्यांच्या भूमिकेला न्याय देऊ शकले नसते, ही कारणे लक्षात घेता प्रधान सचिव (W & CD) यांना MSCPCR चे अध्यक्ष म्हणून नेमणे नियमाधीन नव्हते.

तसेच, आयोग गठीत झाल्यापासून नोव्हेंबर, २०१४ पर्यंत MSCPCR ला विधी सल्लागारांची सेवा पुरविण्यात आली नव्हती, तसेच, आयोगामधील सदस्य सचिवाची नियमित तत्त्वावर अखेर मार्च, २०११ मध्ये नेमणूक करण्यात आली होती. MSCPCR ने नमूद केले (डिसेंबर, २०१४) की, विधी सल्लागाराच्या रिक्त पदाविषयी महाराष्ट्र शासनाच्या विधी विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर अध्यक्ष व ६ सदस्य यांची नियुक्ती शासन अधिसूचना दिनांक २ डिसेंबर २००९ नुसार करण्यात आली होती. सदर आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची मुदत दिनांक १ डिसेंबर २०११ रोजी संपुष्टात येणार असल्याने आयुक्तालयाने पत्र क्र. ४८२९, दिनांक ५ नोव्हेंबर २०११ अन्वये जाहिरात देऊन अध्यक्ष व सदस्य यांच्या नेमणुकीसाठी नामांकने मागविण्यात आली होती. शासन पत्र क्र. बाहआ-२०११/प्र. क्र. ११५/का-९, दिनांक २१ सप्टेंबर २०१२ नुसार बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या निवडीसाठी प्राप्त झालेल्या नामांकनानुसार संबंधितांच्या वैयक्तिक माहितीसह संबंधित उमेदवारांची त्रिसदस्य समितीकडून दिनांक २५ सप्टेंबर २०१२ व २६ सप्टेंबर २०१२ रोजी मुलाखती घेण्यात आल्या होत्या.

तथापी मुलाखतीला बराच कालावधी लोटला असल्याने नव्याने तात्काळ जाहिरात देऊन अर्ज मागवावे असे नमुद केले. सदर अधिनियमातील कलम १७ व १८ मधील तरतूदीनुसार अध्यक्ष व सदस्य यांची निवड करण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रामधून जाहिरात देऊन योग्य व अर्हता प्राप्त उमेदवारांची नामांकन शासनास तात्काळ सादर करणेबाबत शासन पत्र क्र. बाहआ. २०११/प्र.क्र. ११५/का-९, दिनांक २३ फेब्रुवारी २०१५ पत्रान्वये सूचित केले होते. त्यानुसार आयुक्तालयाचे पत्र क्र. ३२, दिनांक २ जून २०१५ चे मा. महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय मुंबई-३२ यांना जाहिरातीचा व अर्जाचा नमुना देऊन जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत कळविण्यात आले होते.

सदरची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर पुणे जिल्ह्यातून दोन सदस्यांची नामांकन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था

सर्व लहान मुलांपर्यंत, विशेषत:हलाखीच्या परिस्थितीतील मुलांपर्यंत योजनेचे फायदे पोहचावे यासाठी केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने सन २००९ मध्ये एकात्मिक बाल संरक्षण योजन (ICPS) नावाच्या एका केंद्र शासन पुरस्कृत योजनेखाली त्यांच्या विद्यमान सर्व बाल संरक्षण योजना एकत्रित केल्या. केंद्र शासनाबरोबर केलेल्या (ऑगस्ट, २०१०) सामंजस्य करारानुसार (MoU) महाराष्ट्र शासनाने MoU वर सही झाल्यानंतर (नोंव्हेबर, २०१०) तीन महिन्यात आत राज्य बाल हक्क संस्था, राज्य दत्तक स्त्रोत संस्था (SARA)आणि जिल्ह्यांमध्ये विशेष बालगुन्हेगार पोलिस दल (SJPU) गठीत करावयाचे होते तसेच सहा महिन्यात म्हणजेच फेब्रुबारी, २०११ पर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) आणि विशेष दत्तक संस्था (SAA) स्थापन करायच्या होत्या. या संस्थंचे गठन, त्यांची व्यापक उद्दीष्टे आणि लेखापरीक्षा निष्पत्ती. तक्ता २.१.१ मध्ये दिल्या आहेत :

तक्ता २.१.१ : विविध संस्थांची व्यापक कार्ये, त्यांचे गठन आणि लेखापरीक्षा निष्पत्ती

संस्थेचे नांव	गठन करावयाची निर्धारित तिथी	या तारखेस गठन करण्यास आले	मुख्य उद्दीष्टे	लेखापरीक्षा निष्पत्ती
(१)	(२)	(३)	(४)	(५)
महाराष्ट्र राज्य संरक्षण संस्था (MSCPS)	नोव्हेंबर, २०१०	एप्रिल, २०१२	* राज्य बाल संरक्षण आराखडा तयार करणे. * राज्य स्तरावर ICPS आणि इतर सर्व बाल संरक्षण योजना/कार्यक्रम यांची अंमलबजावणी, पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे. * संस्थात्मक संगोपन केंद्रे आणि घरगुती संस्थेतर संगोपन केंद्रे यातील मुलांचा राज्य स्तरीय माहिती संच तयार करणे.	१७ महिन्यांच्या विलंबानंतर MSCPS ची स्थापना करण्यात आली. एप्रिल, २०१२ मध्ये प्रस्थापनेनंतर वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ चे राज्य बाल संरक्षण MSCPS ने तयार केले नव्हते. जिल्हास्तरावर मनुष्यबळाची गंभीर कमतरता असल्याने MSCPS व ICPS इतर बाल संरक्षण योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी, पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे शक्य झाले नाही. निवड केलेल्या आठ जिल्हांमध्ये, प्रत्येक जिल्हा बाल संरक्षण केंद्रासाठी (DCPU) मंजूर केलेल्या १४४ पदांपैकी फक्त एक ते सात पदे भरली होती. यामुळे फक्त जिल्हा स्तरावर योजनांच्या अंमलबजावणीवरच परिणाम झाला असे नाही तर जिल्ह्याकडून राज्य स्तरावर (संस्था) प्रतिसाद/ माहितीचे संक्रमण होण्यास प्रतिबंध झाला, ज्यामुळे, नियोजन आणि निर्णय क्षमतेस अडथळा निर्माण झाला. संस्थात्मक संगोपन केंद्रे व घरगुती संस्थेतर संगोपन केंद्रांतील मुलांचा राज्यस्तरीय माहितीसंच देखिल संस्थेने तयार केला नव्हता.
जिल्हा बाल संरक्षण केंद्र (DCPU)	फेब्रुवारी, २०११	फेब्रुवारी, ते मे, २०१३ दरम्यान	* ICPS व इतर सर्व बाल संरक्षण कार्यांच्या अंमलबजावणीचे समन्वय व पर्यवेक्षण, बालगृहे/दत्तक संस्था यांचे संनियत्रण व पर्यवेक्षण वार्षिक आराखडे तयार करणे, जिल्हास्तरावर बालकांशी संबंधित सेवांचा साधनस्त्रोत माहितीकोष तयार करणे. * जिल्हा, गट व गांव पातळीवर ICPS च्या अंमलबजावणीवर संनियत्रण करण्यासाठी या पातळयांवर बाल संरक्षण समित्या गठीत करणे.	फेब्रुवारी, व मे, २०१३ दरम्यान सर्व जिल्ह्यांमध्ये DCPUs गठीत करण्यात आल्या. परंतू जिल्हा, गट व गाव पातळीवर बाल संरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या नव्हत्या. DCPUs नी फक्त जिल्ह्यामध्ये अंमलबजावणी करावयाच्या कार्यक्रमांचा समावेश असलेले वार्षिक कृती आराखडेच तयार केले होते. परंतु, भौतिक व आर्थिक उद्दीष्टे, मनुष्यबळाची आवश्यकता व आर्थिक स्त्रोत दर्शविणारे वार्षिक जिल्हा बाल संरक्षण आराखडे DCPUS ने तयार केले नव्हते. कार्यक्रम व्यवस्थापक, MSCPS यांनी मान्य केले (डिसेंबर, २०१४) की जिल्हास्तरावर मोठ्या संख्येत पदे रिक्त असल्यामुळे DCPUs ना जिल्हा बाल संरक्षण आराखडे तयार करणे शक्य झाले नव्हते.
विशेष बाल गुन्हेगार पोलिस केंद्र (SJPU)	नोंव्हेबर, २०१०	जून, २०१२	* बेकायदेशीर कृती केलेल्या मुलांना SJPU च्या नियंत्रणाखाली ठेवण्यात येते, त्यानंतर SJPU ने त्यांना पुढील कारवाईसाठी बालगुन्हेगार न्याय मंडळासमोर हजर करावयाचे असते.	जिल्ह्यांमध्ये SJPUs स्थापन करण्यात विलंब झाला होता.

(१)	(२)	(३)	(४)	(५)
राज्य दत्तक स्त्रोत संस्था (SARA)	नोंव्हेबर २०१०.	जुलै २०१२.	दत्तक योग्य मुलांचा व मुल दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या पालकांचा मध्यवर्ती माहितीसंच तयार करणे.	२० महिन्यानंतर SARA ची स्थापना करण्यात आली व मध्यवर्ती माहितीसंच ठेवण्यात येत नव्हता.
विशेष दत्तक संस्था (SAA)	फेब्रुवारी २०११.	. .	• दत्तक देणे किंवा दत्तकपूर्व संगोपन केंद्रात बालकाला दाखल करणे सुलभ करणे. • SAA मध्ये दाखल झालेल्या प्रत्येक बालकाच्या पुनर्वसनाचा आराखडा SAA ला सादर करणे.	फेब्रुवारी २०११ पुर्वी २७ जिल्ह्यांमध्ये दत्तक संस्था अगोदरच अस्तित्त्वात होत्या ज्यांना MSCPS अंतर्गत SAAs म्हणुन घोषित करण्यात आले होते. उर्वरित आठ [५] जिल्ह्यांमध्ये, प्रशिक्षित कर्मचारी, पायाभूत सुविधा इत्यादीच्या कमतरेमुळे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत देखिल SAAs स्थापन करण्यात आल्या नव्हत्या. वर्ष २०१२-१४ दरम्यान राज्यातील दत्तक केंद्रात उपलब्ध असलेल्या एकूण २,२३२ मुलांपैकी (मुले:१,२३२ व मुली : १,४७३), १,६७३ मुले (६२ टक्के) दत्तक योग्य मुलांचा मध्यवर्ती माहितीसंच जर ठेवण्यात आला असता तर आंतर-जिल्हा समन्वयाने मुले दत्तक घेण्याचे प्रमाण वाढले असते.

स्त्रोत: ICPS मार्गदर्शक तत्त्वे, MSCPS व DCPUs ने सादर केलेल्या दस्तऐवजांच्या व माहितीच्या छाननीतून. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, संरक्षण अधिकारी, विधी तथा परिविक्षा अधिकारी, समुपदेशक, लेखापाल, माहिती विश्लेषक, सहायक माहिती विश्लेषक, सामाजिक कार्यकर्ते (२) दुर्गम भागातील कार्यकर्ते (२) व सेवाभाव समाजसेवक (३) गडचिरोली, नंदूरबार, सिंधुदुर्ग, यवतमाळ, गोंदिया, उस्मानाबाद व वाशिम.

MSCPS ने असे सांगितले (डिसेंबर २०१४) की, राज्य तसेच जिल्हा स्तरावर मोठया संख्येत पदे रिक्त असल्यामुळे २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षासाठी जिल्हा व राज्य बाल संरक्षण आराखडा तयार करता येऊ शकला नव्हता. MSCPS ने पुढे असे सांगितले की, रिक्त पदे भरण्याची तसेच प्रशिक्षणाच्या माध्यमातून DCPUs ची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया सुरू होती, ज्यामुळे २०१४-१५ साठी जिल्हा व राज्य बाल संरक्षण आराखडे तयार करण्यास मदत होईल. अंतिम बैठकीत, प्रधान सचिव,W&CD ने असे सांगितले (नोव्हेंबर २०१४) की एका विशेष कार्य अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे व लवकरात लवकर रिक्त पदांवर भरती करण्यासाठी विशेष मोहीम निश्चित करण्यात आली आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

केंद्र सरकार पुरस्कृत एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वर्ष २०१२-,२०१३-१४ मध्ये राज्यामध्ये १३५ इतके कर्मचारी कार्यरत होते. लेखापरिक्षणासाठी निवड केलेल्या आठ जिल्ह्यांमध्ये प्रत्येक जिल्हा बाल संरक्षण केंद्रासाठी DCPU १४ मंजूर पदांपैकी ३ अथवा ४ पदे फक्त भरण्यात आली होती त्यामुळे जिल्हा व राज्यस्तरावर योजनेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी अडचणी येत होत्या.

सबब, जिल्ह्यातील माहितीसंच तयार करण्यात येत असून राज्यस्तरीय माहिती संच बनविण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत २०१४ मध्ये सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांची नियुक्ती मंत्रालय स्तरावरून करण्यात आली आहे. तसेच याच दरम्यान संरक्षण अधिकारी संस्थात्मक आणि संस्थाबाह्य यांचीही निवड झालेली आहे. रिक्त पदांसाठी भरती होणे यासाठीची कार्यवाही सुरू असून नजीकच्या काळात सर्व पद भरती होणेसाठी व आवश्यक पदांची भरती प्रक्रिया होण्यासाठी मा.अध्यक्षांच्या मान्यतेनंतर प्रक्रिया करण्यात येईल.

२. जिल्हास्तरावर बाल संरक्षण समित्या तयार करणे तसेच बाल न्याय अधिनियम, २०००(२००६)च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच बाल संरक्षणाच्या यंत्रणाचे समन्वय साधून दत्तक संस्था यांचे संनियंत्रण /बालगृहे व वार्षिक जिल्हा बाल संरक्षण आराखडे, पर्यवेक्षण तयार करणे, जिल्हास्तरावर बालकांशी संबंधित सेवांचा साधनस्त्रोत, माहितीकोष तयार करणे याकरिता मनुष्य,भौतिक व आर्थिक उद्दिष्टे, बळाची

आवश्यकता व आर्थिक स्त्रोत दर्शिविणारे वार्षिक जिल्हा बाल संरक्षण आराखडे DCPUs ने तयार करण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना २०१५-१६ मध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्राम बाल संरक्षण समित्यांची स्थापना करण्यात आली असून सद्:स्थितीमध्ये १८५६५ एवढी संख्या आहे. जिल्हानिहाय माहिती सोबत जोडली आहे. शिवाय योजनेच्या जोडलेली उद्दिष्टापूर्तीसाठी राज्य कार्यालय नियोजन करण्यात येत आहे.

३. जून २०१२ पर्यंत जिल्ह्यांमध्ये SJPUs स्थापना करण्यात विलंब झाला होता परंतु ऑगस्ट २०१४ मध्ये जिल्ह्यांमध्ये स्थापित झालेल्या SJPUs यांना प्रशिक्षण देण्यात आले होते.

४. २०१३ पर्यंत SARA कडून मध्यवर्ती माहितीसंच ठेवण्यात आला नाही.परंतु केंद्रिय दत्तक संसाधन,(कारा) नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर सद्:स्थितीत संपूर्ण माहिती उपलब्ध करण्यात आली आहे.

५. सर्व दत्तक संस्थाची मध्यवर्ती माहिती दत्तक संसाधन प्राधिकरण,नवी दिल्ली(कारा) यांनी तयार केलेल्या in.nic.cara.www या संकेतस्थळावर CARING वर दत्तक देणे किंवा दत्तकपूर्व संगोपन केंद्रात बालकाला दाखल करणे सुलभ करण्यात आले असून SAA मध्ये दाखल झालेल्या प्रत्येक बालकाच्या पुर्नवसनाचा आराखडा CARING वर उपलब्ध आहे.

जून २०१२ पर्यंत जिल्ह्यांमध्ये SJPUs स्थापना करण्यात विलंब झाला होता. परंतु ऑगस्ट २०१४ मध्ये स्थापित झालेल्या SJPUs यांना प्रशिक्षण देण्यात आले होते.

२०१३ पर्यंत SARA कडून मध्यवर्ती माहितीसंच ठेवण्यात आला नाही परंतु केंद्रिय दत्तक संसाधन(कारा) नवी दिल्ली यांच्या संकेत स्थळावर सद्य:स्थितीत संपूर्ण माहिती उपलब्ध करण्यात आली आहे.

सर्व दत्तक संस्थांची मध्यवर्ती माहिती दत्तक संसाधन प्राधिकरण,नवी दिल्ली(कारा) यांनी तयार केलेल्या in.nic.cara.www या संकेत स्थळावर CARINGS वर दत्तक देणे किंवा दत्तकपूर्व संगोपन केंद्रात बालकाला दाखल करणे सुलभ करण्यात आले असून SSA मध्ये दाखल झालेल्या प्रत्येक बालकाच्या पुर्नवसनाचा अराखडा CARING वर उपलब्ध आहे.

" महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था "

सर्व लहान मुलांपर्यंत, विशेषत: हलाखीच्या परिस्थितीत मुलांपर्यंत योजनेचे फायदे पोहचावे यासाठी केंद्र शासनाच्या महिला व बाल मंत्रालयाने सन २००९ मध्ये एकात्मिक बाल संरक्षण योजना (ICPS) नावाच्या एका केंद्र पुरस्कृत योजनेखाली त्यांच्या विद्यमान सर्व बाल संरक्षण योजना एकत्रित केल्या. केंद्र शासनाबरोबर केलेल्या (ऑगस्ट, २०१०) सामंजस्य करारानुसार (MOU) महाराष्ट्र शासनाने (MOU) वर सही झाल्यानंतर (नोव्हेंबर, २०१०) तीन महिन्याच्या आत राज्य बाल हक्क संस्था, राज्य दत्तक स्त्रोत संस्था (SARA) गठीत करावयाचे होते असेच सहा महिन्यात म्हणजेच फेब्रुवारी, २०११ पर्यंत सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) आणि विशेष दत्तक संस्था (SAA) स्थापन करायच्या होत्या. त्या संस्थांचे गठन, त्यांची व्यापक उद्दिष्टे आणि लेखापरीक्षा निष्पत्ती तक्ता २.१.१ मध्ये दिल्या आहेत.

तक्ता क्र.२.१.१ :- विविध संस्थांची व्यापक कार्ये, त्यांचे गठन आणि लेखापरिक्षा निष्पत्ती.

संस्थेचे नाव	गठन करावयाची निर्धारित तिथी	या तारखेस गठन करण्यात आले	मुख्य उद्दिष्टे	लेखापरीक्षा निष्पत्ती	विभागाचा अभिप्राय
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था (MSCPS)	नोव्हेंबर, २०१०	एप्रिल, २०१२	▪ राज्य बाल संरक्षण आराखडा तयार करणे. ▪ राज्य स्तरावर ICPS आणि इतर सर्व बाल संरक्षण योजना/ कार्यक्रम यांची अंमलबजावणी, पर्यवेक्षण व संनियंत्रण	१७ महिन्याच्या विलंबानंतर MSCPS ची स्थापना करण्यात आली. एप्रिल, २०१२ मध्ये प्रस्थापनेनंतर वर्ष २०१२-१३ व २०१३-	केंद्र सरकार पुरस्कृत एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये राज्यामध्ये १३५ इतके कर्मचारी कार्यरत होते. लेखापरीक्षणासाठी निवड केलेल्या आठ जिल्ह्यामध्ये प्रत्येक जिल्हा बाल संरक्षण केंद्रासाठी (DCPU) मंजूर १४ पदांपैकी

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			करणे. संस्थात्मक संगोपन केंद्रे आणि घरगुती संस्थेतर संगोपन केंद्रे यातील मुलांचा राज्यस्तरीय माहिती संच तयार करणे.	१४ चे राज्य बाल संरक्षण आराखडे. MSCPS ने तयार केले नव्हते. जिल्हा-स्तरावर मनुष्यबळाची गंभरत कमतरता असल्याने MSCPS ला ICPS व इतर बाल संरक्षण योजनांची प्रभावीपणे अंमल-बजावणी, पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे शक्य झाले नाही. निवड केलेल्या आठ जिल्ह्यांमध्ये प्रत्येक जिल्हा बाल संरक्षण केंद्रासाठी (DCPU) मंजूर १४ पदांपैकी फक्त जिल्हा स्तरावर योजनांच्या अंमल-बजावणीवरच परिणाम झाला असे नाही तर जिल्ह्याकडून राज्य स्तरावर (संस्था) प्रतिसाद /माहितीचे संक्रमण होण्यास प्रतिबंध आला, ज्यामुळे नियोजन आणि निर्णय क्षमतेस अडथळा निर्माण झाला. संस्थात्मक संगोपन केंद्रे व घरगुती संस्थेतर संगोपन केंद्रातील मुलांचा राज्यस्तरीय माहिती संच देखिल संस्थेने तयार केला नव्हता.	३ अथवा चारच पदे फक्त भरण्यात आली होती. त्यामुळे जिल्हा व राज्य स्तरावर योजनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी अडचणी येत होत्या. सबब, जिल्ह्यातील माहितीसंच तयार करण्यात येत असून राज्य स्तरीय माहिती संच बनविण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत २०१४ मध्ये सर्व ३६ जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांची नियुक्ती मंत्रालय स्तरावरून करण्यात आली आहे. तसेच याच दरम्यान संरक्षण अधिकारी संस्थात्मक आणि संस्थाबाह्य यांची ही निवड झालेली आहे. रिक्त पदांसाठी भरती होणे यासाठीची कार्यवाही सुरू असून नजीकच्या काळात सर्व पद भरती होणेसाठी या आवश्यक पदांची भरती प्रक्रिया होण्यासाठी मा.अध्यक्षांच्या मान्यतेनंतर प्रक्रिया करण्यात येईल. तरी जिल्ह्यातील व राज्यातील रिक्त पदांचा तपशील सोबत जोडला आहे.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, संरक्षण अधिकारी, विधी तथा परीविक्षा अधिकारी, समुपदेशक, लेखापाल, माहिती विश्लेषक, सहाय्यक माहिती विश्लेषक, सामाजिक कार्येकर्ते (२) दुर्गम भागातील, कार्यकर्ते (२) व सेवाभावी समाजसेवक (३) दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल क्र.४ (सा.सा.क्षे.)

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
जिल्हा बालसंरक्षण केंद्र (DCPU)	फेब्रुवारी, २०११	फेब्रुवारी ते मे, २०१३ दरम्यान	ICPS व इतर सर्व बाल संरक्षण कार्याच्या अंमलबजावणीचे समन्वय व पर्यवेक्षण, बालगृहे/ दत्तक संस्था यांचे संनियंत्रण व पर्यवेक्षण, वार्षिक जिल्हा बाल संरक्षण आराखडे तयार करणे, जिल्हा स्तरावर बालकांशी संबंधित सेवांचा साधनस्त्रोत माहितीकोष तयार करणे. जिल्हा गट व गाव पातळीवर ICPS च्या अंमलबजावणीवर संनियंत्रण करण्यासाठी या पातळ्यावर बाल संरक्षण समित्या गठित करणे.	फेब्रुवारी व मे, २०१३ दरम्यान सर्व जिल्ह्यांमध्ये DCPUs गठीत करण्यात आल्या. परंतु जिल्हा गट व गाव पातळीवर बाल संरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या नव्हत्या. DCPUs नी फक्त जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करावऱ्याच्या कार्यक्रमांचा समावेश असलेले वार्षिक कृती आराखडेच तयार केले होते. परंतु, भौतिक व आर्थिक उद्दिष्टे, मनुष्यबळाची आवश्यकता व आर्थिक स्त्रोत दर्शवणारे वार्षिक जिल्हा बाल संरक्षण आराखडे DCPUs ने तयार केले नव्हते. कार्यक्रम व्यवस्थापक, MSCPS यांनी मान्य केले (डिसेंबर, २०१४) की, जिल्हा स्तरावर मोठ्या संख्येत पदे रिक्त असल्यामुळे DCPUs ना जिल्हा बाल संरक्षण आराखडे तयार करणे शक्य झाले नव्हते.	जिल्हास्तरावर बाल संरक्षण समित्या तयार करणे तसेच बाल न्याय अधिनियम, २००० (२००६) च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच बाल संरक्षणाच्या यंत्रनाचे समन्वय साधून बालगृहे/दत्तक संस्था यांचे संनियंत्रण व पर्यवेक्षण, वार्षिक जिल्हा बाल संरक्षण आराखडे तयार करणे, जिल्हा स्तरावर बालकांशी संबंधित सेवांचा साधनस्त्रोत माहितीकोप तयार करणे याकरिता भौतिक व आर्थिक उद्दीष्टे, मनुष्य बळाची आवश्यकता व आर्थिक स्त्रोत दर्शवणारे वार्षिक जिल्हा बाल संरक्षण आराखडे DCPUs ने तयार करण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना २०१५-१६ मध्ये प्रशिक्षण देण्यात आले असून ग्राम बाल संरक्षण समित्यांची स्थापना करण्यात आली असून सद्यःस्थितीमध्ये १८५६५ एवढी असून त्यांची सद्यःस्थिती जिल्हानिहाय माहिती सोबत जोडलेली आहे. शिवाय योजनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी राज्य कार्यालय नियोजन करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत अहवाल सोबत जोडला आहे.
विशेष बाल गुन्हेगार पोलीस केंद्र (SJPU)	नोव्हेंबर, २०१०.	जून, २०१२	बेकायदेशिर कृती केलेल्या मुलांना SJPU च्या नियंत्रणा-खाली ठेवण्यात येते त्यानंतर SJPU त्यांना पुढील कारवायीसाठी बाल गुन्हेगार न्याय मंडळासमोर हजर	जिल्ह्यामध्ये SJPU स्थापना करण्यात विलंब झाला होता.	जून, २०१२ पर्यंत जिल्ह्यांमध्ये SJPUs स्थापना करण्यात विलंब झाला होता. परंतु ऑगस्ट, २०१४ मध्ये स्थापित झालेल्या SJPUs यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यांचे उपस्थिती पत्रक सोबत जोडलेले आहे.

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
राज्य दत्तक स्त्रोत संस्था (SARA)	नोव्हेंबर, २०१०	जुलै २०१२	० दत्तक कार्यक्रमाचे समन्वयन, संनियंत्रण व विकास करणे, दत्तक योग्य मुलांचा व मूल दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या पालकांचा मध्यवर्ती माहितीसंच तयार करणे.	१९ महिन्यानंतर SARA ची स्थापना करण्यात आली व मध्यवर्ती माहितीसंच ठेवण्यात येत नव्हता.	२०१३ पर्यंत SARA कडून मध्यवर्ती माहितीसंच ठेवण्यात आला नाही. परंतु केंद्रीय दत्तक संसाधन (कारा), नवी दिल्ली यांच्या संकेत स्थळावर सद्यःस्थितीत संपूर्ण माहिती उपलब्ध करण्यात आलेली आहे.
विशेष दत्तक संस्था (SAA)	फेब्रुवारी, २०११	...	० दत्तक देणे किंवा दत्तकपूर्व संगोपन केंद्रात बालकाला दाखल करणे सुलभ करणे. ० SAA मध्ये दाखल झालेल्या प्रत्येक बालकाच्या पुनर्वसनाचा आराखडा SARA ला सादर करणे.	फेब्रुवारी, २०११ पूर्वी २७ जिल्ह्यामध्ये दत्तक संस्था अगोदरच अस्तित्त्वात होत्या ज्यांना MSCPS अंतर्गत SAAs म्हणून घोषित करण्यात आले होते. उर्वरीत आठ जिल्ह्यामध्ये प्रशिक्षित कर्मचारी, पायाभूत सुविधा इत्यादीच्या कमतरतेमुळे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत देखील SAAs स्थापन करण्यात आल्या नव्हत्या. वर्ष २०१२-१४ दरम्यान राज्यातील दत्तक केंद्रात उपलब्ध असलेल्या एकूण २,७०५ मुलांपैकी (मुले: १२३२ व मुली : १४७३) १,६७३ मुले (६२ टक्के) दत्तक घेण्यात आली. मुले :७४४ व मुली ९२९) दत्तक योग्य मुलांना मध्यवर्ती माहितीसंच जर ठेवण्यात आला असता तर आंतर-जिल्हा समन्वयाने मुले दत्तक घेण्याचे प्रमाण वाढले असते.	सर्व दत्तक संस्थांची मध्यवर्ती माहिती दत्तक संसाधन प्राधिकरण (कारा) नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या www.care.nic.in या संकेतस्थळावर CARINGS वर दत्तक देणे किंवा दत्तकपूर्व संगोपन केंद्रात बालकाला दाखल करणे सुलभ करण्यात आले असून SAA मध्ये दाखल झालेल्या प्रत्येक बालकाच्या पुनर्वसनाचा आराखडा CARRINGS वर उपलब्ध आहे.

स्त्रोत:- ICPS मार्गदर्शक तत्त्वे, MSCPS व DCPUs ने सादर केलेल्या दस्तऐवजांच्या व माहितीच्या छाननीतून

अर्थसंकल्प तयार करणे :

महिलांना समान हक्क मिळण्यास चालना देण्यासाठी व त्यांचे सबलीकरण करण्यासाठी लिंगभेदावर आधारित अर्थसंकल्पाचा एक साधन म्हणून वापर केला जातो.परंतु, महाराष्ट्रात लिंग भेदावर आधारित अर्थसंकल्प तयार करण्यात येत नाही. अशा अर्थसंकल्पाच्या अभावी, संगोपन व संरक्षणाची आवश्यकता असणाऱ्या मुलींची एकूण संख्या विचारात घेवून एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी केवळ मुलींसाठी किती आर्थिक तरतूद राखीव ठेवली होती याची लेखापरीक्षकांना पडताळणी करता आली नाही.

अंतिम बैठकीत, W&CD च्या प्रधान सचिवांनी असे सांगितले की, प्रस्तावित महिला धोरणामध्ये लिंगभेदावर आधारित अर्थसंकल्प तयार करण्याचा पाठपुरावा करण्यासाठी व विभागांकडून आढावा घेण्यासाठी विधानमंडळामध्ये महिला व बालकांच्या एका समितीस प्राधिकृत केले जाईल.

कायदे व योजनांची अंमलबजावणी :

स्त्रीभृणहत्या, बालविवाह, मुलींची उपेक्षा यामधून समाजामध्ये मुलींबद्दल असणारा सर्वसाधारण पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन उघडपणे व्यक्त होतो, ज्याची परिणीती अखेर बालकांमधील लिंग गुणोत्तरात घट, विद्यालयात मुलींना दाखल करण्याचे अत्यल्प प्रमाण, मुलींची कुपोषित स्थिती यामध्ये होते. बालिकांचे जीवनसातत्य, संरक्षण आणि विकास यांच्याशी संबंधित वेगवेगळे कायदे/योजना यांच्या अंमलबजावणीवरील लेखापरीक्षा निष्पत्ती खाली दिला आहेत :

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने महिला विषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय महिला विषयक अर्थसंकल्प सहनियंत्रण समिती शासन निर्णय क्र. जेंडर-२०१२/प्र. क्र. २५३/क. १४१७, दिनांक १० सप्टेंबर २०१३ अन्वये गठीत केली असून समितीचे अध्यक्ष हे सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई हे आहेत व सदस्य सचिव हे उप सचिव, महिला व बाल विकास विभाग मंत्रालय, मुंबई हे आहेत.

बालकांचे जीवन सातत्य :

(१) जन्म घेणे व जिवंत राहणे हा प्रत्येक बालकाचा अनन्यसंक्राम्य अधिकार आहे. वर्ष २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत लेखा परीक्षकांना वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील बालकांमधील लिंग गुणोत्तरात (CSR) घट झाल्याचे आढळून आले. स्त्रीभृणहत्या व मुलींच्या आरोग्य, पोषण व सुरक्षेकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात असल्यामुळे CSR मध्ये घट होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तक्ता २.१.२ मध्ये १९९१, २००१ व २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील व महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर (SR) व CSR ची तुलनात्मक स्थिती दर्शविली आहे.

तक्ता :– २.१.२ महाराष्ट्र व भारतातील लिंग गुणोत्तर व बालकांमधील लिंग गुणोत्तर यांची तुलनात्मक आकडेवारी

तपशिल	एकंदर लिंग गुणोत्तर (प्रत्येक हजार पुरुषांप्रती स्त्रियांची संख्या)			बालकांमधील लिंग गुणोत्तर (शून्य ते सहा वर्ष वयोगटातील प्रत्येक हजार मुलांप्रती मुलींची संख्या)		
(१)	(२)			(३)		
	१९९१	२००१	२०११	१९९१	२००१	२०११
भारत	९२७	९३३	९४०	९४६	९२७	९१४
महाराष्ट्र	९३४	९२२	९२९	९४६	९१३	८९४
जिल्हे	१२०५-७९१	११३५-७७४	११२३-८३८	९८०-९२४	९६६-८३९	९५६-८०१

स्त्रोत :–संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचा वर्ष २०१३ चा अहवाल ही आकडेवारी महाराष्ट्रातील जिल्ह्यातील सुमार आणि उत्कृष्ट गुणोत्तरांचे प्रमाण दर्शविते.

तक्ता २.१.२ असे दर्शवितो की, राज्यातील एकंदर CSR मध्ये घट होऊन २००१ मधील ९१३ वरुन २०११ मध्ये तो ८९४ झाला. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील शहरी भागातील CSR ९०२ होता व ग्रामीण भागातील CSR ९१९ होता. त्याच वेळी महाराष्ट्रातील ग्रामीण

भागातील ८९० इतक्या CSR च्या तुलनेत शहरी भागातील CSR ८९९ होता. पुढे CSR च्या जिल्हा निहाय विश्लेषणात पुढील गोष्टी आढळून आल्या.

चार जिल्ह्यांमध्ये (चंद्रपूर, कोल्हापूर, सांगली आणि सातारा) २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये CSR मध्ये वाढ झाली होती तर उर्वरीत ३१ जिल्ह्यांमध्ये त्याच कालावधीत CSR मध्ये घट दिसून आली.

२००१ च्या तुलनेत २०११ मध्ये बीड जिल्ह्यातील CSR ८०७ होता. जो सर्वात कमी होता.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याचे (०-६ वर्षाखालील) बालिकांचे प्रमाण २००१ च्या जनगणनेनुसार १९ अंकांनी कमी झालेले आहे. कुटूंबांमध्ये मुलास प्राधान्य देणे, स्त्रीयांचा दुय्यम दर्जा आणि तंत्रांचा वापर करून प्रसुतीपूर्व लिंग निदान करून स्त्री भृण हत्या करणे, लिंग गुणोत्तर प्रमाण कमी होण्याची मुख्य कारणे आहेत.

बीड जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण सर्वात जास्त, म्हणजेच ८७ अंकांनी घसरले असून गोंदिया जिल्ह्यामध्ये सर्वात कमी, म्हणजेच २ अंकांनी घसरले आहे. राज्यातील फक्त ४ जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण काही अंकांनी वाढले आहे. ते जिल्हे सातारा (१७ अंक), कोल्हापूर (२४ अंक), सांगली (१६ अंक) व चंद्रपूर (१४ अंक) असे आहेत. इतर जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण कमी झाले आहे. म्हणून राज्यामध्ये गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नागरी नोंदणी अहवालानुसार जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर प्रमाणामध्ये सन २०१० मध्ये ८५४ ते सन २०१४ मध्ये ९१९ अशी वाढ झालेली आहे.

अ. क्र.	वर्ष	स्त्री	पुरुष	एकूण	जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर
१	२०१०	८९२८४७	१०४४८८२	१९३७७२९	८५४
२	२०११	८९०७९७	१०३४४०७	१९२५२०४	८६१
३	२०१२	९२३३७०	१०३२९१६	१९५६२८६	८९४
४	२०१३	९५०४२८	१०५५११०	२००५५३८	९०१
५	२०१४	९२०८११	१००१८४६	१९२२६५७	९१९

(२) पीसीपीएनडीटी कायदाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षात केलेली कार्यवाही.

सन २००१ च्या तुलनेत २०११ या वर्षातील जन्मदराचे गुणोत्तर कमी झालेल्या जिल्ह्यांमध्ये विशेषत: बीड जिल्ह्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या माहितीचा समावेश लोकलेखा समितीस पाठवावयाच्या ज्ञापनात करावा. तसेच सन २०१० आणि २०१४ या वर्षातील बीड जिल्ह्यातील जन्म दराच्या प्रमाणाची आकडेवारी त्यात समाविष्ट करावी.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

गर्भधाराणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र जन्मदर गुणोत्तर कमी असलेल्या जिल्ह्यांसाठी तसेच बीड जिल्ह्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

* सल्लागार समितीच्या नियमित बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

* जिल्ह्यातील सर्व सोनोग्राफी केंद्राची तीन महिन्यातून एकदा नियमित तपासणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर या जिल्ह्यांमध्ये सोनोग्राफी केंद्राची तपासणी करण्यासाठी विशेष मोहिम घेण्यात आली होती.

* समुचित अधिकाऱ्यांनी बनावट केसेसच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून लिंग निवड चाचणी करणाऱ्या सोनोग्राफी केंद्रातील डॉक्टरांना शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

* लिंग निवड करीत असणाऱ्या केंद्राची माहिती देण्यात येणाऱ्या नागरिकांना कृती आराखड्यातील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे बक्षिस देण्यात आले आहे.

* मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे.

* न्यालयातील सर्व केसेसचा नियमितपणे पाठपुरावा करण्यात येत आहे.

* सदर कायद्याबाबत जनतेस माहिती मिळावी यासाठी पोस्टर्स, होर्डींग, दूरदर्शन स्लॉट्स, पदयात्रा, रेडिओ कार्यक्रम इत्यादी माध्यमांचा उपयोग करण्यात आला आहे.

नागरी नोंदणी पद्धतीनुसार जन्माच्या वेळी मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर बीड जिल्ह्यामध्ये दर हजार मुलांमागे सन २०१० मध्ये ७८३ पासून २०१४ मध्ये ९२५ पर्यंत म्हणजेच १४२ अंकांनी वाढले आहे. वर्षनिहाय जन्माच्या वेळचे बीड जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा तपशील खालीलप्रमाणे :–

अ. क्र.	वर्ष	जन्माच्या वेळी १००० जन्माच्या मागे मुलींचे प्रमाण
१	२०१०	७८६
२	२०११	८०२
३	२०१२	८५५
४	२०१३	८८१
५	२०१४	९२५

गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ ची अंमलबजावणी :—

गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ (PCPNDT) हे एक महत्त्वपूर्ण कायदेशीर पाऊल/हस्तक्षेप आहे, जे प्रभावीपणे लागू केल्यास CSR मध्ये होणारी घट टाळण्यास सहाय्यभूत ठरु शकते. PCPNDT मध्ये गर्भधारणापूर्व किंवा गर्भधारणेनंतर लिंग निवडीस प्रतिबंध करण्याची व ज्या प्रसूतीपूर्व निदान तंत्राच्या गैरवापरामुळे स्त्रीभृणहत्या घडतात त्या तंत्राचे नियमन करण्याची तरतूद आहे. PCPNDT मध्ये जनुकीय समुपदेशन केंद्रे, जनुकीय प्रयोगशाळा व जनुकीय चिकित्सा केंद्रे यांची नोंदणी, कायद्यांतर्गत नोंदणी न झालेल्या व्यक्ती अथवा प्रयोगशाळांना अल्ट्रासाऊंड यंत्रे विकण्यास प्रतिबंध करणे अशा आवश्यकता नमूद केल्या आहेत.

PCPNDT नुसार प्रत्येक जनुकीय चिकित्साकेंद्राने, जनुकीय प्रयोगशाळेने, जनुकीय समुपदेशन केंद्राने, अल्ट्रासाऊंड केंद्राने व क्ष-किरण केंद्राने त्यांच्याकडे ज्या गरोदर महिलांवर अल्ट्रा सोनोग्राफी करण्यात आली आहे, त्याची प्रपत्र ' फ ' मध्ये नोंद करून त्यांचे, अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंबकल्याण विभाग, पुणे यांच्याकडून संनियंत्रण होण्यासाठी त्याची माहिती ऑनलाईन प्रणालीत प्रविष्टीत करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षा तपासणीत खालील बाबी आढळून आल्या :–

जुलै, २०१३ पर्यंत राज्यात कार्यरत असलेल्या एकूण ६,०१२ सोनोग्राफी केंद्रापैकी २,४२० केंद्रे (४० टक्के) प्रपत्र ' फ ' ऑनलाईन पद्धतीने दाखल करत नव्हती. तसेच निवड केलेल्या आठ जिल्ह्यांमध्ये १,९८८ सोनोग्राफी केंद्रांपैकी ९१२ (४६ टक्के) केंद्रे ऑनलाईन पद्धतीने प्रपत्र ' फ ' दाखल करत नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्याच्या माहिती तंत्रज्ञान खात्याच्या मदतीने एक नवीन सॉफ्टवेअर ' ए ' फॉर्मसाठी आणि ऑनलाईन ' एफ ' फॉर्मसाठी www.pcpndt.mahaonline.gov.in हे वेबसाईट विकसित करण्यात आलेली आहे. दिनांक १० एप्रिल २०१२ ते दिनांक १६ एप्रिल २०१२ आणि २९ जुलै २०१३ रोजी डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि विधी समुपदेशक यांना ऑनलाईन एफ फॉर्म भरण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यावेळी काही जिल्हा आणि महानगरपालिका यांनी ऑनलाईन एफ फॉर्म भरण्याबाबत प्रशिक्षण त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये पूर्ण केले नव्हते. पीसीपीएनडीटी कायद्याच्या कलम २०(१) अंतर्गत जे ऑनलाईन ' एफ ' फॉर्म भरणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबतचे दिनांक १ नोव्हेंबर २०१३ रोजी पत्र पाठविण्यात आलेले आहे.

मा.आयुक्त (कुक)/अतिरिक्त संचालक यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या विविध आढावा सभेमध्ये/व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे जिल्हा शल्य चिकित्सक व वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मनपा ऑनलाईन ' एफ ' फॉर्म भरण्याबाबततचे तसेच जे सोनोग्राफी ऑनलाईन ' एफ ' फॉर्म भरणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते.

पीसीपीएनडीटी कायद्यानुसार ऑनलाईन एफ फॉर्म भरणे बंधनकारक नाही. तथापि, संबंधित सोनोग्राफी केंद्रामध्ये हार्डकॉपीद्वारे एफ फॉर्म भरणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र राज्याने पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता ऑनलाईन एफ फॉर्म भरणे हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे.

ऑनलाईन एफ फॉर्म भरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे :—

ऑनलाईन एफ फॉर्म सुरू झाल्यापासून	संदर्भ
प्रशिक्षण दिनांक	१० एप्रिल २०१२ ते १६ एप्रिल २०१२ आणि २९ जुलै २०१३
पाठपुरावा केलेली पत्र	
(१) ऑनलाईन एफ फॉर्म भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना	दिनांक १५ एप्रिल २०१३
(२) महाऑनलाईन संकेतस्थळावर ऑनलाईन एफ फॉर्म भरणेबाबत	दिनांक १ नोव्हेंबर २०१३
(३) महाऑनलाईन संकेतस्थळावर ऑनलाईन एफ फॉर्म भरणेबाबत	दिनांक १८ जानेवारी २०१४
(४) महाऑनलाईन संकेतस्थळावर ऑनलाईन एफ फॉर्म भरणेबाबत	दिनांक ३ मार्च २०१४
(५) महाऑनलाईन संकेतस्थळावर माहे नोव्हेंबर, २०१४ चा एफ फॉर्म भरणेबाबतचा मासिक अहवालाची टक्केवारी फार कमी आहे.	दिनांक २३ डिसेंबर २०१४

ऑनलाईन एफ फॉर्म नियिमत भरण्याबाबत या कार्यालयाने विविध मार्गदर्शक सूचना/परिपत्रक/सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

१३ डिसेंबर २०१५ पर्यंत राज्यात कार्यरत असलेल्या एकूण ७०३२ सोनोग्राफी केंद्रे आणि २३४४ इमॅजिंग केंद्रे नोंदणीकृत आहेत फक्त ४०७८ केंद्रांनी म्हणजेच ४३ टक्के केंद्रांनी एफ फॉर्म भरलेले आहेत.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकूण ७०३२ सोनोग्राफी केंद्रांपैकी २३४४ इमॅजिंग केंद्रांची नोंदणी झालेली आहेत. पीसीपीएनडीटी कायद्यानुसार गर्भवती महिलेचा एफ फॉर्म भरणे बंधनकारक आहे. इतर रुग्णांना तो भरणे आवश्यक नाही. २३४४ इमॅजिंग केंद्रे (उदा. कार्डीओलॉजी, युरोलॉजी इत्यादी) पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत नोंदणीकृत आहेत. या केंद्रांना एफ फॉर्म भरणेची गरज नाही. उर्वरीत केंद्रे (ज्या केंद्रांमध्ये एफ फॉर्म भरला जातो) ७०३२ - २३४४=४६८८ यापैकी ४०७८ सोनोग्राफी केंद्रांनी ऑनलाईन एफ फॉर्म भरलेला आहे. म्हणजेच दिनांक १३ डिसेंबर २०१५ रोजी ८७ टक्के केंद्रांनी ऑनलाईन एफ फॉर्म भरलेला आहे.

२. जिल्ह्यातील योग्य प्राधिकाऱ्यांनी (AA) वर्षातून चार वेळा प्रत्येक कार्यरत व अकार्यरत सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करायची होती. २०११-१४ दरम्यान AA नी केलेल्या तपासण्यांची स्थिती तक्ता २.१.३ मध्ये दिली आहे.

तक्ता २.१.३.— राज्यातील कार्यरत व अकार्यरत सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यातील तूट :—

वर्ष	सोनोग्राफी केंद्रांची संख्या	करावयाच्या एकूण तपासण्या	केलेल्या एकूण तपासण्या	तूट	तुटीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२०११-१२	८१६१	३२६४४	१८७२५	१३९१९	४३
२०१२-१३	८५७९	३४३१६	२४४९६	९८२०	२९
२०१३-१४	९०१५	३६०६०	१६२७३	१९७८७	५५

स्त्रोत :— अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे यांनी सादर केलेली माहिती २००९-११ या वर्षाची माहिती लेखापरीक्षेस सादर करण्यात आली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११ ते २०१३ मध्ये सोनोग्राफी त्रैमासिक तपासणीबाबत पीसीपीएनडीटी कायद्यामध्ये तरतूद नव्हती. मा.आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे स्वाक्षरीने संबंधित जिल्हा समुचित प्राधिकारी यांना नियिमतपणे सोनोग्राफी केंद्राची तपासणी करण्याबाबत अर्धशासकीय पत्र देण्यात आलेले आहे. समुचित प्राधिकारी यांच्या कामाची व्याप्ती जास्त असल्यामुळे त्रैमासिक तपासणी वेळेत पूर्ण करू शकले नाहीत.

दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ पासून सोनोग्राफी केंद्राची त्रैमासिक तपासणी करणे पीसीपीएनडीटी आचारसंहितेनुसार बंधनकारक केलेले आहे. पीसीपीएनडीटी आचारसंहितेनुसार सर्व सोनोग्राफी केंद्राची तपासणी तीन महिन्यांतून एकदा करणे आवश्यक आहे. दिनांक १५ नोव्हेंबर २०१४ रोजी अतिरिक्त संचालक यांनी सर्व जिल्हा समुचित प्राधिकारी यांची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे त्रैमासिक तपासणी करणेबाबत आढावा सभा घेण्यात आली व सोनोग्राफी केंद्र तपासणीमध्ये सुधारणा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. दिनांक २० नोव्हेंबर २०१४ रोजी सोनोग्राफी केंद्राची नियमित तपासणी करण्याबाबत संबंधित समुचित प्राधिकारी यांना पत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

त्रैमासिक तपासणीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा आढळून आलेल्या आहेत :—

महाराष्ट्र राज्य (१)	जानेवारी ते मार्च, २०१५ (२)	एप्रिल ते जून, २०१५ (३)	जुलै ते सप्टेंबर, २०१५ (४)
तपासणी करावयाची सोनोग्राफी केंद्रे	७००९	७१४१	७२१२
तपासलेली सोनोग्राफी केंद्रे	६४८२	६८२७	६८८३
टक्केवारी	९२.४८%	९५.६०%	९५.४०%

त्रैमासिक तपासणी सुधारणा करणेबाबत केलेली कार्यवाही

अ.क्र.	कार्यशाळेचे नाव/समुचित प्राधिकारीचे प्रशिक्षण	कालावधी
१	उपजिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	१२ ऑगस्ट २०१४
२	उपजिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	१३ ऑगस्ट २०१४
३	उपजिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	१२ सप्टेंबर २०१४
४	उपजिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	२० सप्टेंबर २०१४
५	उपजिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	२२ सप्टेंबर २०१४
६	उपजिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	१४ नोव्हेंबर २०१४
७	उपजिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	०५ डिसेंबर २०१४
८	जिल्हा समुचित प्राधिकारी यांचे प्रशिक्षण	२९ डिसेंबर २०१४
	पाठपुरावा केलेली पत्र	
१	एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ या कालावधीत सोनोग्राफी केंद्राची तपासणीचे काम अत्यंत कमी असल्याबाबत	२६ एप्रिल २०१३
२	पीसीपीएनडीटी अंतर्गत नियमित तपासणी केली नसल्याबाबत	२० नोव्हेंबर २०१४

३. अमरावती जिल्ह्यातील तपासणीमधील ५४ टक्के तूट ही सर्वाधिक होती. निवड केलेल्या आठ जिल्ह्यांमध्ये २०११-१४ या वर्षामध्ये सोलापूर मधील ४७ टक्के तूट ही सर्वाधिक होती. लेखापरीक्षेस पुढे असे आढळून आले की, सोलापूर जिल्ह्यांमध्ये २०१२-१४ मध्ये नोंदणी झालेल्या एकूण २८८ सोनोग्राफी केंद्रांपैकी, फक्त १९२ कार्यरत सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यात आली आहे.

नियमित तपासण्यांबरोबर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्व जिल्ह्यांमध्ये सोनोग्राफी केंद्रांची असुचित तपासणी केली. असुचित तपासणी करणाऱ्या गटामध्ये पोलिस, महसूल व आरोग्य अधिकारी यांचा समावेश होता. २०११-१४ दरम्यान सोनोग्राफी केंद्रांच्या असुचित तपासणी मधील तूट तक्ता २.१.४ मध्ये दिली आहे.

तक्ता २.१.४.— सोनोग्राफी केंद्रांच्या असुचित तपासणीतील तूट :—

तपासणीची प्रत्यक्ष तारीख	एकूण सोनोग्राफी केंद्रे	तपासणी झालेली	तपासणी न झालेली	तुटीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१५ जून-३० सप्टेंबर २०११	८१६१	७८४१	३२०	४
४ जून-३० जून २०१२	८५७९	६८४३	१७३६	२०
१ जून-३० जून २०१२	९०१५	७०१३	२००२	२२

स्त्रोत : अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे यांनी सादर केलेली माहिती.

निवड केलेल्या आठ जिल्ह्यांत २०११-१४ दरम्यान नंदूरबार येथे असुचित तपासणी करण्यात आली नव्हती.

AA नी केलेल्या तपासणीत व असुचित तपासणीत असे आढळून आले की, ३६ केंद्रांमध्ये अर्भकाची लिंग चिकित्सा केली गेली होती, नऊ केंद्रांनी त्यांच्याकडे गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व लिंग निवड चाचणीची सुविधा असल्याविषयी जाहिरात दिली होती व ३७८ केंद्रांनी पीसीपीएनडीटी कायदा अस्तित्त्वात आल्यापासून अभिलेखे ठेवले नव्हते. या तपासणी अधिकाऱ्यांनी ४५७ कसूरदार केंद्रांची नोंदणीही रद्द केली होती. नियमितपणे तपासण्या करण्यासाठी सर्व AA ना सूचना देण्यात आल्या आहेत असे अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे यांनी नमूद केले आहे. (डिसेंबर, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महाराष्ट्र राज्यामध्ये पीसीपीएनडीटी कायद्याचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता विविध पद्धतीचा अवलंब केलेला आहे. समुचित प्राधिकारी यांना सोनोग्राफी केंद्र तपासणीचे काम देण्यात आलेले होते. राज्य समुचित प्राधिकारी यांनी जिल्हा स्तरावर, महसूल, पोलिस आणि आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांची संयुक्त पथके स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. संयुक्त पथकाकडून तपासणी करणे पीसीपीएनडीटी कायद्यानुसार बंधनकारक नाही. परंतु पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता धडक मोहिम राबविण्याबाबत अतिरिक्त प्रयत्न करण्यात आलेले आहे.

सोनोग्राफी केंद्रांची तपासणी कमी असण्याचे कारणे खालीलप्रमाणे आहे. सोनोग्राफी केंद्रांची तपासणी तीनही विभागाकडून करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला होता. परंतु समुचित अधिकारी त्यांच्या विभागातील कामाच्या व्याप्तीमुळे संबंधित विभागाकडून वेळेनुसार उपलब्ध झालेले नाही. अमरावती आणि सोलापूर जिल्ह्यांमध्येही सारखीच परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पोलीस आणि महसूल विभागाकडून मनुष्यबळ उपलब्ध न झाल्यामुळे सर्व सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यात आली नाही.

नंदूरबार जिल्ह्यांमध्ये खालीलप्रमाणे सोनोग्राफी केंद्र तपासणी करण्यात आलेले आहेत :—

तपासणीची प्रत्यक्ष तारीख	एकूण नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रे	कार्यान्वित सोनोग्राफी केंद्रे	तपासणी करण्यात आलेली सोनोग्राफी केंद्रे	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१५ जून-३० सप्टेंबर २०११	२८	२८	२८	५ केंद्राची पुनर्तपासणी करण्यात आलेली आहे.
४ जून-३० जून २०१२	२८	२८	२८	–
१ जून-३० जून २०१३	२८	२८	२८	–

जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत केंद्रे हे कार्यरत नाहीत. समुचित प्राधिकारी यांनी कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे सोनोग्राफी केंद्र सील केलेली आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर झाल्यामुळे तसेच पोर्टेबल मशीनवर बंदी आल्यामुळे एकूण नोंदणीकृत केंद्रांपैकी काही

सोनोग्राफी केंद्रे कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली आहेत. संयुक्त पथकाने खालीलप्रमाणे कार्यरत आणि तात्पुरते बंद सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यात आलेली आहे.

तपासणीची प्रत्यक्ष तारीख	एकूण नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रे	कार्यान्वित सोनोग्राफी केंद्रे	तपासणी करण्यात आलेली सोनोग्राफी केंद्रे
(१)	(२)	(३)	(४)
१५ जून-३० सप्टेंबर २०११	८१६१	७२८४	७८४१
४ जून-३० जून २०१२	८५७९	५९४४	६८४३
१ जून-३० जून २०१३	९०१५	५८७९	७०१३

मार्च, २०१२ मध्ये गठीत करण्यात आलेल्या राज्य दक्षता पथक व औरंगाबाद, नागपूर व नाशिक येथील तीन प्रादेशिक दक्षता पथकांनी २०१३-१४ दरम्यान ३२७ सोनोग्राफी केंद्रांच्या केलेल्या आकस्मिक तपासण्यांमध्ये, सोनोग्राफीच्या नोंदवह्या ठेवण्यात आल्या नव्हत्या. गरोदर महिलांचे पत्ते व संपर्क क्रमांक, त्यांना संदर्भित करण्याच्या डॉक्टरांचे पत्ते, केलेल्या सोनोग्राफीचा निष्कर्ष, वैद्यकीय कारणास्तव केलेल्या गर्भपातची तारीख (एमटीपी), डॉक्टरांचे अनुभव प्रमाणपत्र, सोनोग्राफी करण्याची कारणे इत्यादी महत्त्वपूर्ण माहितीची नोंद न घेतल्यामुळे किंवा अपूर्ण माहिती नोंदल्यामुळे प्रपत्र फ अपूर्ण होते असे आढळून आले.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

राज्य आणि विभागीय दक्षता पथकामध्ये आरोग्य, पोलीस, विधि व न्याय विभागातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला होता. राज्यात तक्रार नोंदविण्यासाठी *www.amchimulgi.gov.in* संकेतस्थळ आणि १८००२३३४४७५ टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक दिनांक ११ जुलै २०११ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. *www.amchimulgi.gov.in* संकेतस्थळ आणि १८००२३३४४७५ टोल फ्री हेल्पलाईन क्रमांकावर प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार तसेच इतर सोनोग्राफी केंद्रांना अचानक भेटी देण्यात आलेल्या आहेत. सदर भेटी दरम्यान सोनोग्राफीच्या नोंदवह्या ठेवण्यात आल्या नव्हत्या, फॉर्म एफ अपूर्ण होते असे आढळून आले. दक्षता पथक हे समुचित प्राधिकारी यांना मदत करण्यासाठी तयार करण्यात आलेले होते. त्यांना कायद्याचे उल्लंघन केलेल्या सोनोग्राफी केंद्रांवर कार्यवाही करण्याचे कायदेशीर अधिकार नव्हते. तथापि दक्षता पथकांना आढळलेल्या त्रुटी संबंधित जिल्हा समुचित प्राधिकारी यांना कळवून संबंधित केंद्रांविरुद्ध कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. सदर माहितीचा उपयोग करून संबंधित सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करून पीसीपीएनडीटी कायद्यानुसार कार्यवाही करण्याबाबत सदरची माहिती उपयोगी ठरलेली आहे.

जानेवारी २०१५ ते सप्टेंबर २०१५ या कालावधीमध्ये सर्व सोनोग्राफी केंद्रांची तपासणी झालेली नाही. सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करणे बंधनकारक असताना सर्व सोनोग्राफी केद्रांची तपासणी का करण्यात आलेली नाही.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ पासून सर्व सोनोग्राफी केंद्रांची त्रैमासिक तपासणी करणे पीसीपीएनडीटी आचारसंहितेनुसार (Code of Conduct) करणे बंधनकारक आहे. दर तीन महिन्यातून कमीत कमी एकदा सोनोग्राफी केद्रांची तपासणी करणे आवश्यक आहे. समुचित प्राधिकारी यांना इतर कामाचा व्याप असल्यामुळे सर्व सोनोग्राफी केंद्रांची वेळेत तपासणी करता आली नाही. सर्व सोनोग्राफी केंद्रांची तपासणी पूर्ण करण्यासाठी नियमितपणे आढावा घेण्यात येतो.

मुलींचे संरक्षण :

बालकांचे इतर सर्व हक्क त्यांना प्राप्त करून देण्यासाठी निर्धोक, सुरक्षित व संरक्षक वातावरण असणे ही एक पूर्वअट आहे. राज्यात २०१० ते २०१३ दरम्यान मुलींवर झालेल्या अत्याचाराचा संदर्भात नोंदण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या घटनांची रुपरेषा तक्ता २.१.५ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता २.१.५.— २०१० ते २०१३ दरम्यान राज्यात मुलींवरील अत्याचाराविरुद्ध नोंदविलेले गुन्हे

अ. क्र.	कायद्याचे नाव	वर्षभरात नोंदण्यात आलेल्या एकूण घटना			
	लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ (बलात्काराच्या घटना).	७४७	८१८	९१७	१५४६
	अनैतिक तस्करी (प्रतिबंध) कायदा, १९५६	५४	४२	५७	५६
	बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६	४	१९	६	१६
	बाल मजूरी (प्रतिबंध व नियमन) कायदा, १९८६	२	२	४	६

स्त्रोत.— महाराष्ट्रातील गुन्हे २०१०-१३ (महाराष्ट्र शासनाच्या गुन्हे अन्वेषण विभागाने तयार केलेली) आणि महाराष्ट्र शासनाच्या कामगार आयुक्तांनी सादर केलेली माहिती.

राज्यात वेगवेगळ्या कायद्यांच्या अंमलबजावणीविषयी केलेल्या लेखापरिक्षा तपासणीत खालील बाबी आढळून आल्या.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रस्तावना असल्याने अभिप्राय नाहीत.

लैगिंक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ ची अंमलबजावणी :—

केंद्र शासनाचे लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण व अश्लिल वर्तन यापासून १८ वर्षाखालील बालकांचे रक्षण करण्यासाठी तसेच अशा गुन्ह्यासंबंधी आणि गुन्ह्यांशी निगडीत बाबींवर सुनावणी घेण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ अंमलात आणला. (जून, २०१२). कायद्यातील तरतूदीप्रमाणे राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात विशेष न्यायालयाची निवड करणे व विशेष सरकारी अभियोक्ता नियुक्त करणे आवश्यक होते. कायद्यात अशी तरतूद होती की, बालहक्क कायदा आयोग, २००५ किंवा इतर कोणत्याही कायद्याअंतर्गत यासारख्या प्रयोजनासाठी पदनिर्देशित केलेल्या एखाद्या विशेष न्यायालयाच्या अंतर्गत एखाद्या सत्र न्यायालयाला जर बाल न्यायालय म्हणून अधिसूचित केले असेल तर असे न्यायालय POCSO अंतर्गत विशेष न्यायालय म्हणून गणले जाईल.

२०१०-१३ दरम्यान नोंद झालेल्या राज्यातील बलात्कार पिडीतांची वयानुसार विभागणी तक्ता २.१.६ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता २.१.६ : २०१०-१३ दरम्यान महाराष्ट्रातील बलात्कार पिडीतांची आकडेवारी

वर्ष	बलात्कार पिडीतांची संख्या				
	१० वर्षाखालील	१० ते १८ वर्षे	१८ वर्षापर्यंतच्या बलात्कार पिडीत मुली	एकूण पिडीत (सर्व वयोगट)	एकूण पिडीतांपैकी १८ वर्षापर्यंतच्या मुलींची टक्केवारी
२०१०	१०८	६४९	७५७	१६१०	४७
२०११	१३६	७०९	८४५	१७४५	४८
२०१२	१२७	७९७	९२४	१८४५	५०
२०१३	२४२	१३२२	१५४६	३०३६	५०

स्त्रोत :- महाराष्ट्रातील गुन्हे :- २०१२ (महाराष्ट्र शासनाच्या गुन्हे अन्वेषण विभागाने तयार केलेली) व भारतातील गुन्हे :- २०१३ (केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयातील राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभाग यांनी तयार केलेली).

२०१० मध्ये बलात्काराच्या १६१० घटना घडल्या होत्या त्यामध्ये वाढ होऊन २०१३ मध्ये ३०६३ घटनांची नोंद झाली होती, परंतु या कालावधीत त्यापैकी सिद्ध झालेल्या गुन्ह्यांचे प्रमाण १३.९ ते २०.३ टक्के होते. आठपैकी निवड झालेल्या चार

११ जिल्ह्यांमध्ये बलात्काराच्या घटना चढत्या कलाने झाल्याचे दिसून आले. कारण २०१० मध्ये ५३ घटना घडल्या होत्या व २०१३ मध्ये १२८ घटनांची नोंद झाली होती. लेखापरिक्षेत असे आढळून आले की, POCSO अंतर्गत प्रकरणांची सुनावणी घेण्यासाठी बाल हक्क संरक्षण कायदा आयोग, २००५ अंतर्गत गठीत केलेल्या बाल न्यायालयाला राज्य शासनाने पदनिर्देशित केले होते. (ऑक्टोबर २००८) तसेच POCSO जून २०१२ मध्ये लागू होऊनही विशेष न्यायालयात सुरू प्रकरणांची सुनावणी घेण्यासाठी सर्व सरकारी अभियोक्ता/अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांना विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून घोषित करणारा आदेश मात्र महाराष्ट्र शासनाने मार्च, २०१३ मध्ये जारी केला होता. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट, २०१४ मध्ये विशेष न्यायालयाचे कामकाज करण्यासाठी सर्व सत्र न्ययाधिश, अतिरिक्त सत्र न्यायाधिश व तदर्थ अतिरिक्त सत्र न्यायाधिश यांच्या नेमणूका करण्यासाठी आदेश जारी केले. अशाप्रकारे, कायद्याअंतर्गत न्यायाधिश व विशेष सरकारी अभियोक्त्यांची नेमणूक करण्यात लक्षणीय विलंब झाला होता.

कायद्यांतर्गत MSCPCR ने POCSO, च्या तरतूदींच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण करायचे होते. (कलम ४४). साक्षीच्या टप्प्यावर बालकाला सहाय्य करण्यासाठी अशासकीय संस्था(NGO), मानसशास्त्र, सामाजिक सेवा, बालकांचे शारिरिक आणि मानसिक आरोग्य आणि बाल विकास याविषयी ज्ञान असलेल्या व्यावसायिक व तज्ञ व्यक्तींसाठी मार्गदर्शक सूचनोदेखिल महाराष्ट्र शासनाने तयार करावयाच्या होत्या. (कलम ३९). लेखापरीक्षेत असे आढळून आले की, MSCPCR ने अखेर नोव्हेंबर, २०१३ मध्ये महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकाना (DGP), POCSO अंतर्गत नोंदविलेल्या प्रकरणांचा जिल्हानिहाय तपशिल सादर करण्याची विनंती केली होती, परंतु नोव्हेंबर, २०१४ पर्यंत

DGP नी एकत्रित माहिती सादर केली नव्हती. तसेच नोव्हेंबर, २०१४ पर्यंत महाराष्ट्र शासनाने बालकाला साक्षीपूर्व व साक्षीच्या टप्प्यावर सहाय्य करण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली नव्हती.

W & CD च्या प्रधान सचिवांनी अंतिम बैठकीत असे सांगितले की, मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे काम जवळपास पूर्ण झाले असून लवकरच ती जारी केली जातील. वर दर्शविलेल्या कमतरता/त्रुटींवरुन स्पष्टपणे दिसून येते की, POCSO च्या तरतूदींची अंमलबजावणी अतिशय असमाधानकारक होती.

ज्ञापन :—

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. POCSO अंतर्गत कलम ३९ नुसार मार्गदर्शक सूचनांचा मसूदाबाबत विधी व न्याय विभागाने मसुद्यातील तरतूदी बाल हक्क आयोगाने तपासून योग्य ते बइल करून पाठविण्यात आले.

आयोगाकडे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडून त्यांचे पत्र क्र.पोमंस/२४/३४/लैंगिक शोषण बालक गुन्हे/सीआयडी/६९१/१३, दिनांक २२/११/२०१३ अन्वये नोव्हेंबर, २०१२ ते जून, २०१३ पर्यंतची माहिती खालीलप्रमाणे प्राप्त झाली होती.

अ.क्र.	अधिनियम अस्तित्त्वात आल्यापासून सन २०१२-१३ पासून ऑक्टोबर, २०१३ (नोव्हेंबर, २०१३ पासून ऑक्टोबर, २०१३ पर्यंत) या अधिनियमांतर्गत राज्यामध्ये एकूण किती गुन्हे दाखल झाले	दाखल्या झालेल्या गुन्ह्यांपैकी किती गुन्ह्यांवर आरोपपत्र दाखल झाले	किती प्रकरणात आरोपींना शिक्षा करण्यात आली. निर्दोष सुटलेले गुन्हे	अशी किती प्रकरणे न्यायालयात यापुढे प्रलंबित आहेत
१	नोव्हेंबर, २०१२ ते जून, २०१६- ९२६ गुन्हे	६७५	५१४	६५७

आयोगाचे पत्र क्र. Bha २०१३/CR२४६/२०१३-१४/१८५ दिनांक १ मार्च २०१४ अन्वये पोलिस महासंचालक यांना दर महिन्यास सर्व जिल्ह्यांची एकत्रित माहिती पाठविणेबाबत कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे POCSO अंतर्गत रजिस्ट्रार, निरीक्षण १, हायकोर्ट, मुंबई यांचेकडून दिनांक ३१/३/२०१५ अन्वये माहिती मागविण्यात आली.

बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६ ची अंमलबजावणी :

विधीपूर्वक बालविवाह करण्यावर आणि त्यांच्याशी निगडीत किंवा परीणामस्वरुप घडणाऱ्या घडामोंडीवर प्रतिबंध घालण्यासाठी केंद्र शासनाने बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ अंमलात आणला (जानेवारी, २००७). कायद्याच्या कलम १६ नुसार, महाराष्ट्र शासनाने प्रत्येक निश्चित क्षेत्रासाठी एक किंवा अधिक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी (CMPOs) नेमावयाचे होते,ज्यांनी बालविवाह रोखणे, जनजागृती करणे, समुपदेशन करणे, सल्ला देणे, लोकांना सचेत करणे, खटल्यासंबंधी मदत करणे आणि राज्य शासनाने निर्देशित केलेली नियतकालीक विवरणे व आकडेवारी सादर करणे इत्यादी कामे करावयाची होती. राज्यात या कायद्याची अंमलबजावणी करताना खालील गोष्टी आढळल्या :—

१. हा कायदा जरी जानेवारी, २००७ मध्ये लागू करण्यात आला होता तरी या कायद्याच्या अंतर्गत नियम महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर, २००८ मध्ये अधिसूचित केले होते.

२. ग्रामीण भागाकरिता CMPOs च्या नियुक्तीसाठी सहा वर्षापेक्षा जास्त विलंबानंतर महाराष्ट्र शासनाने अधिसूचना जारी केली. (जून २०१३) परंतु राज्यात एकूण लोकसंख्येच्या ४५.२० टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करत असूनही नोव्हेंबर, २०१४ पर्यंत शहरी भागासाठी एकही CMPOs ची नेमणूक करण्यात आली नव्हती.

३. कायद्याच्या कलम १६ अन्वये अधिनियमात विनिर्दीष्ट केल्यानुसार CMPOs ना पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना जारी करावयाची होती. परंतु सप्टेंबर, २०१४ पर्यंत महाराष्ट्र शासनाने अशी कोणतीही अधिसूचना जारी केली नव्हती.

४. W&CD ने CMPOs करीता कोणतेही नियतकालीक अहवाल किंवा विवरणे विहित केली नसल्याने कायद्याच्या तरतूदींच्या अनुपालनावर लक्ष ठेवण्यासाठी कोणतेही कार्यतंत्र उपलब्ध नाही.

अतिरिक्त संचालक, राज्य कुटूंब कल्याण विभाग, पुणे यांनी सादर केलेल्या माहितीमधून असे आढळून आले की, २०१२, १३ व २०१३-१४ दरम्यान केंद्र शासनाच्या किशोरवयीन प्रजनन व लैंगिक आरोग्य (ARSH) कार्यक्रमांतर्गत नोंदणी झालेल्या १० ते १४ वर्षे वयोगटातील

अनुक्रमे ३७८ व ६२७ मुली विवाहित होत्या. त्याचप्रमाणे, या केंद्र शासनाच्या कार्यक्रमांतर्गत नोंदणी झालेल्या १५ ते १९ वर्षे वयोगटातील अनुक्रमे ११,३८९ व ११,८३९ मुली विवाहित होत्या. परंतु, त्याचवेळी महाराष्ट्र शासनाने मात्र २०१० ते २०१३ दरम्यान बालविवाहाची केवळ ४५ प्रकरणे घडल्याचा अहवाल दिला होता, जे वरील तक्ता २.१.५ मध्ये दर्शविले आहे. यावरुन हे स्पष्टपणे दिसून येते की, शासनाकडून राज्यातील बालविवाहाची प्रकरणे कमी प्रमाणात दर्शविली जात होती.

ज्ञापन :—

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, १९२९ अंतर्गत राज्य शासनाने अधिसूचना दिनांक १९ सप्टेंबर, २००३ नुसार बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम १९२९ मधील कलम १३ अन्वये राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये ग्राम सेवकांना त्यांच्या ग्राम पंचायतीच्या क्षेत्रात बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त केलेले होते.

त्यानंतर बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ (२००७) च्या कलम १६ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन (१) उक्त कलम १६ च्या पोटनियम पोट कलम (१) अन्वये ग्राम सेवक यांना त्यांच्या ग्राम पंचायतीच्या क्षेत्रामध्ये उक्त अधिनियमातील शक्तीचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्य पार पाडण्यासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त केली आहे. २) उक्त कलम १६ च्या पोट कलम (२) अन्वये संबंधित ग्राम पंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेवीका बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांना सहाय्य करतील असे अधिसूचना राज्य शासनाने दिनांक ३ जून, २०१३ रोजी निर्गमित केलेली आहे. राज्य शासनाने दिनांक १९ सप्टेंबर, २००३ नुसार बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून ग्रामसेवक यांना नियुक्त केलेले होते, त्यानुसार अंमलबजावणी चालू होती.

बाल विवाह प्रतिबंधक अधिनियमांतर्गत बाल विवाहाबाबत झालेल्या तक्रारी व दाखल झालेल्या गुन्ह्यांची माहिती ही बाल विवाह अधीकारी आणि पोलीस विभाग हे महिला व बाल विकास विभागास माहिती सादर करीत नसून सदरची माहिती मा. न्यायालयात सादर करतात. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाकडे स्वतंत्र कर्मचारी वर्ग नाही.

अनैतिक तस्करी (प्रतिबंध) कायदा, १९५६ ची अंमलबजावणी :

अनैतिक तस्करी (प्रतिबंध) कायदा, १९५६ हा बालिकांसह महिलांच्या बाबतीत घडणाऱ्या अधोरी गुन्ह्यांपैकी अशा गुन्ह्यांशी संबंधित आहे. ज्यामुळे महिलांचे जीवन उध्वस्त होते. त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येते आणि सामाजिक प्रतिष्ठा नष्ट होते. महाराष्ट्रात व्यापारी प्रयोजनासाठी १३ ते १८ वर्षे वयोगटातील महिला व मुलांची लैंगिक शोषणासाठी आंतरजिल्हा, आंतरराज्य आणि देशाबाहेर तस्करी होत असल्याचे दिसून येते. सन २००९-२०१३ दरम्यान या कायद्यांतर्गत नोंद झालेले गुन्हे व त्यातील सिद्ध झालेल्या गुन्ह्यांचे प्रमाण तक्ता २.१.७ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता २.१.७ :- सन २००९-२०१३ दरम्यान नोंद झालेल्या व त्यापैकी सिद्ध झालेल्या गुन्ह्यांची स्थिती :–

वर्ष	IPTA अंतर्गत नोंद झालेले गुन्हे	राज्यात IPTA अंतर्गत नोंद झालेल्या गुन्ह्यांची राष्ट्रीय आकडेवारीच्या तुलनेत टक्केवारी	सिद्ध झालेल्या गुन्ह्यांची टक्केवारी (राष्ट्रीय सरासरी)
(१)	(२)	(३)	(४)
२००९	२७१	११.००	३१.०० (५५.४०)
२०१०	३०६	१२.२०	४१.१० (५५.००)
२०११	३९०	१६.००	४६.६० (४६.००)
२०१२	३६६	१४.२८	३६.४० (४१.१०)
२०१३	२८९	११.२१	२८.०० (४१.२०)

स्त्रोत :- राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाचे अहवाल २००९ ते २०१३ वरील तक्ता २.१.७ वरुन असे दिसून येते की, सन २०११ हे वर्ष वगळता सिद्ध झालेल्या प्रकरणांचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूपच कमी होते.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने पुणे येथे गुन्हे अन्वेषण विभागाच्या अंतर्गत मानवी तस्करी विरोध कक्ष मार्च २००८ मध्ये स्थापन केला, ज्याची वेगवेगळ्या शहात १२ केंद्रे होती. वर्ष २०१० ते २०१३ मध्ये घातलेल्या धाडीची, सुटका करण्यात आलेल्या महिला/मुलींची अटक केलेल्या व्यक्तींची आणि बंद करण्यात आलेल्या कुंटणखान्यांची एकूण संख्या तक्ता २.१.८ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता २.१.८ वर्षे २०१०-१३ दरम्यान मानवी तस्करी विरोधी कक्षाच्या कार्याची स्थिती

वर्ष	धाडी	सुटका केलेल्या एकूण मुली/महिला		अटक केलेल्या अशा तस्कऱ्यांची संख्या	बंद केलेले कुंटणखाने
		महिला	मुली		
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२०१०	३०२	७०२	१२२	७५४	४२
२०११	४०७	१५२५	११९	११३९	३६
२०१२	३७७	१८२२	१३७	१३९८	३१
२०१३	४४७	१६५८	२१९	१२५१	२८
एकूण	१५३३	५७०७	५९९	४५४२	१३७

स्त्रोत :- विशेष पोलीस महानिरीक्षक व मानवी तस्करी विरोधी मोहिमेचे नोडल अधिकारी CID पुणे यांनी सादर केलेली माहिती.

तक्ता २.१ वरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र शासनाच्या मानवी तस्करी विरोधी कक्षाने २०१०-१३ दरम्यान १५३३ धाडी घातल्या होत्या आणि ५७०७ महिलांची व ५९९ मुलींची सुटका केली होती. लेखा परीक्षेत असे आढळून आले की, २०१०-१३ दरम्यान AHTC ने सुटका केलेल्या ५९९ मुलींपैकी ५३७ मुलींना W&CD च्याा नियंत्रणाखालील विविध बालगृहांमध्ये दाखल करण्यात आले होते. परंतु पुणे येथे W&CD च्या उप आयुक्तांनी असे कळविले की, (डिसेंबर, २०१४) की त्यांच्याकडे या मुलीच्या पुनर्वसनाविषयी किंवा या मुलींना त्यांच्या कुटूंबाकडे सुपूर्द केले असल्याविषयीचा कोणताही तपशिल उपलब्ध नाही. यावरुन स्पष्टपणे दिसून येते की, सुटका करण्यात आलेल्या मुलींच्या पुनर्वसनावर संनियंत्रण व पाठपुरावा करण्यासाठी कार्यतंत्र सदोष/त्रुटीपूर्ण होते.

पुढे नोव्हेंबर, २०१३ मध्ये कृती दलाच्या १२ बैठकीच्या कार्यवृत्ताच्या तपासणीत असे आढळून आले की, ना हरकत प्रमाणपत्र, परदेशी नागरिक नोंदणी कार्यालयाकडून संमती पत्रे, प्रवास व्यवस्था इ. मधील अडचणीमुळे सुटका करण्यात आलेल्या मुलींच्या प्रामुख्याने बांगला देशातील मुलींच्या प्रत्यार्वनात W&CD ला अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. W&CD असे नमूद केले (डिसेंबर, २०१४) की, मानवी तस्करीच्या बळीची सुटका, पुनर्वसन, सुखरुप पाठवणी व कुटूंबाबरोबर पुनर्मिलन याबाबत सहयोग प्राप्त होण्यासाठी पश्चिम बंगाल मधील तत्सम विभागांबरोबर एक सामंज्यस्य करार करण्यात आलेला आहे. (मे, २०१४) विशेष पोलीस महानिरीक्षक व नोडल अधिकारी, मानवी तस्करी विरोधी कक्ष, CID पुणे यांनी असे सांगितले की, (डिसेंबर, २०१४), धाडी व सुटकेची कारवाई करणेसाठी कर्मचाऱ्यांची ने-आण व प्रशिक्षणासाठी निधी उपलब्ध नसणे या कायद्याच्या अंमलबजावणीतील मुख्य अडचणी होत्या.

ज्ञापन :—

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

पोलीस विभागामार्फत अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ अंतर्गत पिडीत महिलांची सुटका करून त्यांना राज्यातील विविध संरक्षणगृहात किंवा उज्जवला होममध्ये दाखल करण्यात येते व १८ वर्षाखालील मुलींना मुलींचे विशेष पुनर्वसनगृह देवनार, मुंबई येथे तसेच राज्यातील विविध बालगृहात दाखल करण्यात येते.

मुलींच्या काळजी व संरक्षणाची जबाबदारी बाल कल्याण समितीकडे असल्याने पोलीस विभागामार्फत धाडी टाकून सूटका करण्यात आलेल्या मुलींना बाल कल्याण समितीपुढे सादर केले जाते व बाल कल्याण समिती त्यांची काळजी व संरक्षणासाठी बालगृहात दाखल करण्याचे आदेश देते. तसेच सदर मुलीच्या पालकांचा शोध घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या परिविक्षा अधिकारी यांना गृह चौकशी करण्याचे आदेश देते व या कायद्यांतर्गत परिविक्षा अधिकाऱ्याचा गृहचौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालाविषयीची शहनिशा करून बाल कल्याण समिती त्या मुलींना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे आदेश देते. पिडीत मुलींच्या होममधील वास्तव्याच्या दरम्यानच्या काळात सदर मुलींना आधुनिक प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने देण्यात येते.

अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ अंतर्गत १८ वर्षाखालील मुलींना दाखल करण्यासाठी मुलीचे विशेष पुनर्वसनगृह देवनार, मुंबई हे एकमेव गृह उपलब्ध आहे. मुलींचे विशेष पुनर्वसनगृह, देवनार, मुंबई या संस्थेत सन २०१०-२०१३ या कालावधीमध्ये दाखल झालेल्या व बाल कल्याण समितीच्या आदेशाने मायदेशी रवानगी केलेल्या आणि पालकांच्या ताब्यात दिलेल्या मुलींची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:—

सन	दाखल प्रवेशितांची संख्या	पालकांच्या ताब्यात दिलेल्यांची संख्या	मायदेशी रवाना केलेल्यांची संख्या
२०१०	१३२	८९	८८
२०११	१७२	८६	७१
२०१२	५३	३१	५३
२०१३	१०४	१३	७
एकूण	४६१	२१९	२१९

तसेच उर्वरित महाराष्ट्रातील सन २०१०-१३ मध्ये सुटका करण्यात आलेल्या ५१९ मुलींपैकी ५३७ मुलींना बालगृहात दाखल करण्यात आल्यानंतर त्यांना पुनर्वसन किंवा पालकांच्या ताब्यात दिल्यासंदर्भाची माहिती जिल्हास्तरावर उपलब्ध असून आयुक्तालयीन स्तरावर संपूर्ण माहिती एकत्रित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

महिला व बालविकास विभागांतर्गत बांगलादेशी महिलांना त्यांच्या मायदेशी रवानगी करण्यासाठी महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि बांगलादेश सरकार यांच्यामध्ये पीडित महिलांचे हस्तांतरण करण्यासाठी सन २००९ मध्ये कृती दलाची स्थापना करण्यात आलेली आहे. महिला व बालविकास विभागामार्फत स्थापन करण्यात आलेल्या कृती दलाने बांगलादेशी महिलांना त्यांच्या मायदेशी पाठविण्यासाठी सुसुत्र अशी कार्यप्रणाली तयार केलेली आहे. ती खालीलप्रमाणे :—

आर आर आर आय प्रक्रिया

सुटका → ओळख → निवारागृहात प्रवेश → बालकल्याण समिती/दंडाधिकारी राष्ट्रीयत्त्व सिद्ध करणे → गृह तपास प्रत्यार्पणाचे आदेश → विदेश मंत्रालयाचे आदेश → प्रवास → परवाना एफ आर → मुलींचे प्रत्यार्पण पिडित मुलींना बांगलादेश शासनाकडे सोपविणे → मुलींना समाजात सामावून घेणे → बांगलादेशी महिलांचे प्रत्यपर्ण कार्यवाही जलद गतीने होण्यासाठी काय काय कार्यवाही शक्य आहे याची छाननी करण्यात येत आहे.

१.३ बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अंतर्गत १४ वर्षाखालील मुलांना धोकादायक व्यवसायामध्ये नोकरीसाठी ठेवणे प्रतिबंधित करण्यात आले आहे. तसेच त्याद्वारे इतर काही व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या कामकाजाच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवले जाते.

महाराष्ट्रात, निर्धारित केलेल्या धोकादाय व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या १४ वर्षाखालील मुलांची सुटका कामगार विभागाने करून १६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल मजूर प्रकल्पाद्वारे (NCLP) आणि उर्वरित १९ जिल्ह्यांमध्ये कामगार विभागामार्फत त्यांचे पुनर्वसन करावयाचे होते. NCPL मध्ये बालमजूरांना प्रशिक्षण दिले जाते जेणेकरून त्यांना मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेता येईल. पोलिसांच्या सहकार्याने कामगार विभागाने सुटका केलेल्या बालमजूरांना जिल्ह्यातील बालकल्याण समिती (CWC) कडे नेण्यात येते. अशा मुलांना W&CD कडे सुपूर्द करते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

राज्य संनियंत्रण समितीच्या दिनांक १८ जुलै २०१० च्या बैठकीत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेस बाल कामगारांची जबाबदारी देण्यात आली. यशदामार्फत राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प कार्यान्वित नसलेल्या १९ जिल्ह्यात बालकामगारांचे सर्वेक्षण करण्यात आले. यशदामार्फत सर्वेक्षणाची प्रत १९ जिल्ह्यांच्या संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आलेली आहे. यशदामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना सर्वेक्षणाची प्रत दिलेल्या तारखा खालीलप्रमाणे आहेत :—

जिल्ह्याचे नाव	यशदामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आलेल्या पत्राचा दिनांक
अकोला	११.०६.२०१२
सातारा	२८.०५.२०१२

जिल्ह्याचे नाव	यशदामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आलेल्या पत्राचा दिनांक
सिंधुदुर्ग	२८.०५.२०१२
लातूर	३१.०५.२०१२
वाशिम	३१-०५-२०१२
हिंगोली	१४-०६-२०१२
चंद्रपूर	३१-०५-२०१२
भंडारा	०५-०६-२०१२
गडचिरोली	०४-०६-२०१२
रत्नागिरी	३१-०५-२०१०
उस्मानाबाद	०७-०६-२०१२
रायगड	०८-०६-२०१२
वर्धा	१२-०६-२०१२
अहमदनगर	१२-०६-२०१२
पुणे	२२-०६-२०१२
बुलढाणा	२१-०५-२०१२
नागपूर	१६-०६-२०१२
मुंबई उपनगर	१८-०६-२०१२
कोल्हापूर	

यशदामार्फत जिल्ह्याच्या केलेल्या सर्वेक्षणाची प्रत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्या अहवालावर पुढील कार्यवाही केलेली आहे. यशदामार्फत केलेल्या सर्वेक्षणात शाळाबाह्य मुले आढळली होती. तसेच सदर सर्वेक्षणामध्ये धोकादायक व अधोकादायक व्यवसाय व प्रक्रिया असे वर्गीकरण करण्यात आलेले नव्हते. त्याबाबत यशदाकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले होते व त्यामुळे सदर सर्वेक्षणाबाबत प्रभावीरीत्या कार्यवाही होऊ शकली नाही.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ३५ जिल्ह्यात जिल्हा कृती दल गठित करण्यात आलेले आहे. कामगार विभागाचे अधिकारी सदर कृतीदलाचे सदस्य सचिव आहेत व कृतीदलामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता कामगार विभागाकडून सर्वेक्षणाच्या अहवालावर कोणतीही कार्यवाही केली नाही, हे म्हणणे बरोबर नाही.

शासनाचे अभिप्राय :

विभागीय आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

अभ्यास/सर्वेक्षण अहवालावर कामगार विभागाकडून कोणतीही कारवाई न होणे.

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाच्या विनंतीवरून यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA), पुणे यांनी राज्यातील ज्या १९ जिल्ह्यात MCPL योजना लागू करण्यात आली नव्हती तेथे बालमजूरांविषयी एक सर्वेक्षण केले व मार्च २०१२ मध्ये त्याचा अभ्यास अहवाल सादर केला. अभ्यास अहवालानुसार राज्यात ३३,६४५ बाल मजूर आढळून आले ज्यापैकी ८,७८० (२६ टक्के) मुली होत्या व हे बालमजूर प्रामुख्याने वीट भट्ट्या, उपाहारगृहे यामध्ये, तसेच उत्पादनाची विक्री, उसतोडणी इत्यादी कामे करत होते. ८,७८० स्त्री मजूरांपैकी, १,६३८ मुली (१९ टक्के) पाच ते आठ वर्षे वयोगटातील होत्या व त्याच वयोगटातील मुलांची संख्या २,२३१ (नऊ टक्के) होती. परंतु, YASHADA च्या पाहणीत आढळून झालेल्या या बालमजूरांची सुटका व पुनवर्सन याविषयी करण्यात आलेल्या कारवाईचे कामगार विभाग स्पष्टीकरण देऊ शकला नाही (डिसेंबर २०१४).

महाराष्ट्र शासनाच्या कामगार आयुक्तांनी वर्ष २००९-१४ दरम्यान संपूर्ण राज्यात धाडी घातल्या व ३४ मुलींसह १,४५० बालमजूरांची सुटका केली. परंतु एका NGO १४ ने केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार (फेब्रुवारी २०१४) एकटया मुंबई उपनगर क्षेत्रात शाळा बाह्य ५३३ मुलांसह १,४०८ बालमजूर होते. NGO ने शोधलेल्या १,४०८ बालमजूरांपैकी फक्त १३७ बालकांची कामगार विभागाने सुटका केली होती.

लेखापरीक्षेत पुढे असे आढळून आले की, कामगार विभाग व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्यात समन्वय नसल्यामुळे, सुटका करण्यात आलेल्या ज्या मुलांना मुख्य प्रवाहातील शिक्षणात सामिल करता येऊ शकेल अशा मुलांच्या एकूण संख्येविषयी शिक्षण विभाग अनभिज्ञ होता (नोव्हेंबर, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

एकदा सर्वेक्षणाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास सोपविण्यात आली की, त्यानंतर पुढील कार्य जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते जसे शिक्षण विभागाला सुचित करणे, इ. लेखापरीक्षकामार्फत नमूद केलेले आक्षेप सर्वेक्षणाबाबत शिक्षण विभाग अनभिज्ञ होता ही बाब चुकीची आहे. कारण, जिल्हाधिकारी स्तरावरून शिक्षण विभागास संपर्क केला आहे. तसेच शिक्षण विभाग हे कृती दलाचे सदस्य आहेत. वर्ष २००९-२०१४ दरम्यान जिल्हा कृतीदलामार्फत राज्यात १४०० धाडसत्रांतर्गत १४५० बालमजुरांची सुटका केलेली आहे.

मुंबई उपनगर येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या आध्यक्षेतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प कार्यान्वित आहे. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रथम या स्वयंसेवी संस्थेची सर्वेक्षणाकरिता नियुक्ती करण्यात आली होती व सर्वेक्षणाचा अहवाल त्यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सादर केलेले आहे. सदर सर्वेक्षणाच्या अहवालनुसार NGO यांनी केलेले सर्वेक्षण हे फक्त मुंबई उपनगर पुरतेच मर्यादित होते. पुढे असे नमूद करण्यात येते की,राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, मुंबई उपनगराची सुरूवात सन २००५ मध्ये जिल्हाधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, मुंबई उपनगर यांनी प्रथम नावाच्या स्वयंसेवी संस्थेस मुंबई उपनगरात सर्वेक्षण करण्याबाबत आदेश दिले. सदर सर्वेक्षणात ५३३ बालकामगार आढळले व १०४७ शाळा बाह्य मुले आढळली. सदर सर्वेक्षणाच्या अहवालानुसार वेळोवेळी जिल्हा कृती दलाने १७ धाडसत्रे आयोजित करून १३७ बाल कामगारांची सुटका केली गेली आहे. सदर सर्व धाडसत्रांमध्ये प्रथम या स्वयंसेवी संस्थेचा सक्रिय सहभाग होता. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, मुंबई उपनगर अंतर्गत ४० विशेष प्रशिक्षण केंद्र सुरू आहेत. ज्यामध्ये १५०० मुले विशेष प्राशिक्षण केंद्रात दाखल आहेत व २००५ मुलांना सन २०१३-१४ मध्ये शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल केंद्रात दाखल आहेत व २००५ मुलांना सन २०१३-१४ मध्ये शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल केले गेले. राष्ट्रीय बालकामगारसुद्धा विशेष प्रशिक्षण केंद्रात दाखल केली गेले.

अवैधरीत्या लहान मुलांना कामावर ठेवणाऱ्या मालकांकडून नुकसान भरपाईची प्रलंबित वसुली:

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार (डिसेंबर, १९९६) महाराष्ट्र शासनाने, अवैधरीत्या लहान मुलांना कामावर ठेवणाऱ्या मालकांकडून प्रत्येकी मुलांसाठी रु. २०,००० इतका दंड आकारून एक कल्याण निधी स्थापित करणे आवश्यक होत. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, मार्च २०१४ च्या अखेरीस महाराष्ट्र शासनाकडे रु. ४०.५५ लाख इतकी अखेरची शिल्लक होती. तथापि, नोव्हेंबर, २०१४ अखेरीस, २००९-१४ या कालावधीशी संबंधित रु. ७४.४६ लाख एवढी प्रचंड रक्कम प्रलंबित होती जी अशा गुन्हेगारांकडून वसुल करण्यास कामगार विभाग अपयशी ठरला होत.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अंतर्गत कलम ३ अन्वये १४ वर्षाखालील मुलांना अनुसूची-अ मध्ये नमूद केलेले १८ व्यवसाय व अनुसूची-ब मध्ये नमूद केलेल्या ६५ प्रक्रियांमध्ये काम करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. कलम ३ चे उल्लंघन केल्यास दोषी मालकांविरुद्ध प्रथम दंडधिकरी न्यायालयात खटला दाखल केला जातो. कलम ३ चे उल्लंघन झाल्यास स्वतंत्र खटला दाखल केला जातो. मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.४६५/१९६६ एम.सी मेहता विरुद्ध तामिळनाडू राज्य या प्रकरणात दिनांक १० डिसेंबर १९९६ रोजी दिलेल्या निकालात दोषी मालकांकडून प्रत्येक बाल मजूरामागे रू.२०,००० इतकी रक्कम वसुली करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचे इंटरप्रिटेशन मा. गुजरात उच्च न्यायालयाने स्पेशल सिव्हिल अप्लीकेशन क्र. ॲ ६९१० of १९९७ या प्रकरणांत दिली.

मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय खालीलप्रमाणे आहे.

A Person would be offender if he held guilty by Competent Court वर्षे २००९-२०१४ या कालावधीत रु. ७४.४६ लाख एवढी रक्कम गुन्हेगारांकडून वसुली करण्यासाठी प्रलंबित असल्याचे मुख्य कारण आहे की, संबंधित न्यायालयाने मालकांना अद्याप दोषी ठरविलेले नाही. न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत निर्णयानंतर दोषी मालकांकडून दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल.

निकृष्ट संनियंत्रणः

डिसेंबर २०११ च्या शासन निर्णयानुसार, बालकामगारांची शाळेच्या मुख्य प्रवाहात नावनोंदणी होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी कामगार आयुक्तांची होती. या कारणाकरिता, सुटका करून शाळेत आणि विशेष प्रशिक्षण केंद्रात नावनोंदणी केल्याचा मासिक अहवाल जिल्हा कामगार अधिकाऱ्यांकडून कामगार आयुक्तांच्या कार्यालयात एकत्रिकरणासाठी सादर करावयाचा होता. हा एकत्रित अहवाल पुढे प्रधान सचिव, कामगार विभाग यांचेकडे पाठावायचा होता. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, जिल्हा कामगार अधिकारी असे कुठलेही अहवाल कामगार आयुक्तांच्या कार्यालयाला पाठवित नव्हते. लेखापरीक्षेच्या असेही लक्षात आले की, १६ NCLP जिल्ह्यांचे कामगार उप आयुक्त संनियंत्रण करीत नव्हते, ज्यावर त्यांनी ही जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची आहे असा युक्तिवाद केला होता.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

भारत सरकार यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प एक नोंदणीकृत संस्था आहे. सदर संस्थेचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाला केंद्र शासनाकडून आर्थिक सहाय्य थेट केंद्रे शासनामार्फत सोसायटीच्या खात्यात थेट बँकेत जमा केले जाते व त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्ह्यास राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पामार्फत थेट केंद्र शासनास पाठविले जातात. सदर संस्थेच्या सदस्यांची नियुक्तीसुद्धा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते.

केंद्र शासनाने राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पामार्फत मार्गदर्शक सुचनांमध्ये कामगार आयुक्त कार्यालयास कोणतीही जबाबदारी देण्यात आलेली नाही. याकरिता लेखापरीक्षकांस असे सादर करण्यात आले की, राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील जिल्हा कार्यालयात प्राप्त करून घ्यावी. यापुढे असे सादर करण्यात येते की, कामगार आयुक्त कार्यालयामार्फत राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाबाबत कुठलेही अहवाल केंद्र शासनास सादर केले जात नाहीत. तरी, लेखापरीक्षकांनी मागणी केल्यावर संबंधित जिल्ह्यास राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाचे APR व QPR लेखा परीक्षकास पाठविले आहेत. लेखा परीक्षकांनी संबंधित राष्ट्रीयबालकामगार प्रकल्प संस्थेकडून लेखा परीक्षकांना सखोल माहिती प्राप्त झाली असती.

वरील परिच्छेदाबाबत दिलेल्या माहितीची दखल घेवून लेखापरीक्षकांमार्फत उपस्थित केलेले आक्षेप कृपया वगळण्यात यावे, ही विनंती.

१.४ एकात्मिक बालविकास सेवा योजनची अंमलंबजावणी :

एकात्मिक बाल विकास सेवा ICDS योजना ही W&CD कडून ०-६ वर्ष वयोगटातील मुलांचे पोषण आणि आरोग्य सुधारण्यासाठी, मृत्यूदर, अनारोग्य, कुपोषण आणि शाळांमधील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी अमलबजावणी करीत असलेली एक वैशिष्टयेपूर्ण योजना आहे. ICDS ची उद्दिष्टेपूरक पोषण, लसीकरण, आरोग्य तपासणी इ.सेवा देऊन साध्य करायची होती २००९-२०१४ दरम्यान राज्यात ICDS च्या अंमलबजावणीसाठी रु. ४७३०५७ कोटी दिले होते त्यापैकी रु. ४२३६३१ कोटी खर्च झाले होते. मार्च २०१४ ला राज्यात ५५३ योजनाव्दारे ९७१५५अंगणवाडी केंद्रात १५ (AWC) सहा वर्षेपर्यतच्या वयोगटातील ८२.०१ लाख मुले होती, ज्यात ३९.१० लाख मुलींचा समावेश होता.

कुपोषण :

जागतिक आरोग्य संघटनेच्या सुधारित मानकांनुसार (२०१०-११) कमी वजनाच्या बालकांना दोन श्रेणीमध्ये दर्शिवितात जसे मध्यम कमी वजनाचे आणि अति कमी वजन असणारे वर्ष २०१०-१४ दरम्यान राज्यात मुलींच्या कुपोषणाची स्थिती तक्ता २.१.१० मध्ये दर्शिविली आहे.—

वर्ष	प्रत्येक महिन्यात वजन घेण्यात आलेल्या मुलींची सरासरी संख्या (लाखात)	मध्यम कमी वजन असलेल्या मुलींची सरासरी संख्या (लाखात)	अति कमी वजन असलेल्या मुलींची सरासरी संख्या (लाखात)	वजन केलेल्या एकुण मुलींच्या तुलनेत मध्यम कमी वजन असलेल्या मुलींची टक्केवारी	वजन करण्यात आलेल्या एकुण मुलींच्या तुलनेत अति कमी वजन असलेल्या मुलींची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२०१०-११	२९.६५	५.९६	१.१३	२०.१०	३.८१
२०११-१२	२९.८५	४.३३	०.५८	१४.५१	१.९४
२०१२-१३	२९.७६	३.४३	०.४९	११.५३	१.६५
२०१३-१४	२८.६९	२.८०	०.४५	९.७६	१.६०
२०१०-१४ दरम्यान सरासरी	२९.४९	४.१३	०.६७	१४.०१	२.२६

स्त्रोत: ICDS मासिक प्रगती अहवालावरुन संकलित केलेली Online माहिती

तक्ता २.१.१० वरुन २०१०-१४ दरम्यान मध्यम कमी वजनाच्या अति कमी वजनाच्या मुलींची संख्या कमी दिसुन येत.२०१० -१४ दरम्यान निवड केलेल्या आठ जिल्ह्यांतील मध्यम कमी वजनाच्या /अति कमी वजनाच्या मुलींची स्थिती आणि कुपोषणामुळे मृत पावलेल्या मुलींची संख्या तक्ता २.१.११ मध्ये दिली आहे.

तक्ता : २.१.११:- निवड केलेल्या जिल्ह्यांमधील वर्ष २०१०-१४ दरम्यान मध्यम कमी वजनाच्या / अती कमी वजनाच्या मुलींची स्थिती आणि मृत मुलींची संख्या

जिल्हे	वजन केलेल्या एकूण मुलीच्यातुलनेत मध्यम कमी वजन असलेल्या मुलींची टक्केवारी	वजन केलेल्या एकुण मुलींच्यातुलनेत अती कमी वजन असलेल्या मुलींची टक्केवारी	मृत पावलेल्या मुलींची संख्या (०-६ वर्ष)	कुपोषणामुळे मृत पावलेल्या मुलींची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
ठाणे	१७.०७	२.५०	२०१५	१२९१(६४)
नंदुरबार	२७.१९	६.७९	२२८१	१७९३(७९)
मुंबइ	२१.६६	२.८७	३५५	१३९(३९)
बुलढाणा	१४.६२	२.५३	१४१२	९५६(६८)
गडचिरोली	२१.८७	५.१५	१६४१	११७५(७२)
बीड	१३.७४	१.७४	१०४३	५३०(५१)
नांदेड	११.६५	१.७९	१३८५	८८७(६४)
सोलापुर	११.२४	१.५६	१९६५	१२४०(६३)
एकुण			**१२०९७**	**८०११(६६)**

स्त्रोत: ICDS मासिक प्रगती अहवालावरून संकलित केलेली Online माहिती

तक्ता २.१.११ असे दर्शवित की २०१०-१४ दरम्यान राज्यात सरासरी १६.२७ टक्केवारीशी तुलना करता नंदुरबार आणि गडचिरोली या आदिवासी जिल्ह्यांतील मध्येम /अति कमी वजनाच्या मुलींची टक्केवारी अनुक्रमे ३३.९८ टक्के आणि २७.०२ टक्के होती तसेच राज्यात मृत पावलेल्या मुलींमध्ये (४२६४७) कुपोषणामुळे मृत पावलेल्या मुली (२६८६९) ६३ टक्के होत्या तसेच निवड झालेल्या जिल्ह्यांमध्ये मृत पावलेल्या मुलींपैकी ६६ टक्के मुली कुपोषित होत्या. मध्यम / अती कमी वजनाच्या मुलींची लक्षणीय संख्या आणि नंदुरबार जिल्ह्यातील मृत पावलेल्या सर्वाधिक मुली यासंबधी अंतिम बैठक आयुक्त ICDS नी असे नमुद केले की कुपोषण आणि कुपोषणामुळे मृत पावलेल्या बालकांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एक विशेष मोहिम घेतली आहे.

पुरक पोषण आहार कार्यक्रम :

समाजातील सगळ्या कुटुबांचा त्यांच्या आर्थिक स्तराचा विचार न करता अंगणवाडी केंद्रांकडुन सहा वर्षाखालील बालकांचे आणि गरोदर आणि स्तनदायी मातांचे, त्यांना एका वर्षात ३०० दिवस (महिन्यात २५ दिवस) पुरक पोषण आहार पुरवीण्यासाठी एक सवेक्षण केले जाते सहा महिने ते तीन वर्ष वयोगटांच्या मुलांना घरपोच शिधा (THR) दिला जातो आणि तीन वर्ष ते सहा वर्ष वयोगटातील मुलांना गरम शिजवलेले अन्न किंवा (THR) दिला जाते याशिवाय, अति कमी वजनाच्या बालकाना विशेष पुरक आहार दिला जातो आणि त्यांना वैद्यकीय सेवा घेण्यास पाठविले जाते.

अंगणवाडी केंद्रात नाव नोदणी केलेल्या एकुण बालिकांच्या (सहा महिने ते सहा वर्ष माहितीचे विश्लेषण आणि २००९-१४ दरम्यान पुरविलेला पुरक पोषक आहार तक्ता २.१.१२ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता २.१.१२ अंगणवाडी केंद्रामध्ये नावनोंदणी केलेल्या बालिकांना २००९-१४ दरम्यान पुरविलेल्या पुरक पोषण आहाराची स्थिती

	मुलींची सरासरी संख्या (लाखात)			
वर्ष	सर्वेक्षण केलेल्या	AWCs मध्ये नाव नोंदणी केलेल्या	२५ दिवसापेक्षा कमी दिवस पूरक पोषण आहार दिलेल्या	२५ दिवसांपेक्षा कमी दिवस पुरक पोषण आहार दिलेल्या मुलींची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२००९-१० (जुन पासून)	३६.४६	२६.०२	१२.९०	४९.५९
२०१०-११	३६.३५	३४.५५	१४.७६	४२.७३
२०११-१२	३५.८३	३४.७३	८.५६	२४.६६
२०१२-१३	३५.२५	३३.७१	२.७२	८.०८
२०१३-१४	३५.५९	३३.८३	४.८८	१४.४३
२००९-१४ दरम्यानची सरासरी	**३५.९०**	**३२.५७**	**८.७७**	**२९.९२**

स्त्रोत: ICDS मासिक प्रगती अहवालावरुन संकलित केलेली Online माहिती

तक्ता २.१.१२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे २००९-१० च्या तुलनेत २०१३-१४ मध्ये सहा महिने ते सहा वर्ष या वयोगटातील बालिकांना पुरक पोषण आहार पुरवठा करण्यात वाढ झाली होती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंमलबजावणी :

केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, महिला व बाल विकास विभागाचे अधिपत्याखाली नागरी, ग्रामीण, आदिवासी भागात राबविण्यात येते. ही योजना मुख्यत्त्वे करून बालकांच्या पोषण व आहारविषयक दर्जात सुधारणा करण्यासाठी तसेच बालमृत्युचे व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने सन १९७५-७६ वर्षापासून टप्प्याटप्प्याने वाढ करून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

सद्या महाराष्ट्र राज्यामध्ये ५५३ प्रकल्प कार्यान्वित आहेत. सदर प्रकल्पांपैकी ३६४ ग्रामीण प्रकल्प, ८५ आदिवासी प्रकल्प, १०४ नागरी प्रकल्प आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत ९७४७५ अंगणवाडया व १११७५ मिनी अंगणवाडया मंजूर आहेत. मासिक प्रगती अहवालानुसार ९७१८३ अंगणवाडया व १०८२२ मिनी अंगणवाडया कार्यान्वित आहेत. सदर अंगणवाडयांमध्ये ० ते ६ वर्षे वयोगटाचे ७९८६९३३ लाभार्थी व १२४९९३८ गरोदर व स्तनदा माता एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंशी नोंदणीकृत आहेत. त्यापैकी ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील ३०३५२४५ लाभार्थी (मुले+मुली), ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील २९२७७३९ लाभार्थी (मुले+मुली) व गरोदर स्तनदा माता ११३१४०० एवढे लाभार्थी लाभ घेत आहेत.

तक्ता २.१.१० वर्षे २०१०-१४ दरम्यान राज्यातील कमी वजनाच्या मुलींची स्थिती दर्शविण्यात आलेली आहे. त्यानुसार मध्यम कमी वजनाच्या आणि अति कमी वजनाच्या मुलींची संख्या कमी झाल्याचे दिसून येते.

२०१०-१४ दरम्यान निवड केलेल्या आठ जिल्ह्यातील मध्यम कमी वजनाच्या /अति कमी वजनाच्या मुलींची स्थिती आणि कुपोषणामुळे मृत पावलेल्या मुलींची संख्या तक्ता २.१.११ मध्ये दिली आहे. त्यानुसार अवलोकन केले असता कुपोषणामुळे मृत पावलेल्या मुलींची संख्या नंदुरबार व गडचिरोली मध्ये इतर प्रकल्पांच्या तुलनेत थोड्याफार प्रमाणात जास्त आहे.

बालमृत्यु व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता शासनाने गांभिर्याने दखल घेतली असून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहे. कुपोषणामुळे बालमृत्यु होत नाहीत कुपोषित बालके वेगवेगळ्या आजारांना सहजपणे बळी पडत असल्यामुळे त्या आजारांमुळे त्यांचे

मृत्यू होतात. आयुक्तालय, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत कुपोषण निर्मुलणासाठी खालील प्रमाणे नाविन्य पुर्ण उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत.

कुपोषणाची सद्यस्थिती (MPR नुसार)

अ.क्र.	प्रकार	वजन घेतलेली मुले	सर्वसाधारण मुले	मध्यम कमी वजनाची मुले	तीव्र कमी वजनाची मुले	कुपोषण %
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	ग्रामीण	४३४०८४८	४०१३६१६	२७८९५७	४८२७५	१.११
२	आदिवासी	९०४०७१	७२८८३०	१४०६८१	३४५६०	३.८२
३	नागरी	१०६९५७६	८९१९५०	१६४५२२	१३१०४	१.२३
	एकुण	**६३१४४९५**	५६३४३९६	५८४१६०	९५९३९	१.५२

अ.क्र	प्रकार	बाल मुत्यू		
		जिवत जन्म	०.१ मृत्यु	१.५ मृत्यु
१	ग्रामीण	५८६१६	११७९	३०४
२	आदिवासी	११८९६	२५६	१३०
३	नागरी	१२३८९	१४५	३१
		८२९०१	५८०	४६५

२०१४ पुर्वीची कुपोषणाची आकडेवारी व २०१४-१५ ची आकडेवारी लक्षात घेता कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्याचे आढळते.

(२) ग्रामीण आदिवासीसाठी व नागरी प्रकल्पांमधील ज्या प्रकल्पांत कुपोषणाचे प्रमाण जास्त अशा जास्तीतजास्त साठ लक्ष देवून कुपोषणाचे प्रमाण कमी करणेबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. (उदा- मेळघाट क्षेत्र, नंदुरबार आदिवासी मुंबई मधील मानखुर्द, गोवंडी, शिवाजीनगर,माहिम, धारावी)

(३) सन २०१४-१५ आर्थिक अंगणवाडीत देणाऱ्या आहाराव्यतिरिक्त खालील खाद्यपदार्थ घेण्यात आले.

(अ) मायक्रोन्युट्रीयन्ट चिक्की- एबाविसेयो बळकटीकरण व पुर्नसंरचने अंतर्गत २० जिल्ह्यातील ३१७ प्रकल्पांमधील ५९७३० अंगणवाडयांमधील ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील १७३५९२१ गर्भवती स्तनदा) ६८५३७५ असे एकुण २४२१२९६ लाभार्थ्यांना वाटप केले.

(ब) राजगिरा चिक्की एबाविसेयो बळकटीकरण व पुर्नसंरचने अंतर्गत २० जिल्ह्यातील ३१७ प्रकल्पांमधील ५९७३० मधील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील १८४९३४७ लाभार्थ्यांना वाटप केले.

(क) आयुर्वेदिक पौष्टिक बिस्किट:-एबाविसेयो बळकटीकरण पुर्नसंरचने अंतर्गत ४ जिल्ह्यातील ६२ प्रकल्पांमधील १४२५१ अंगणवाड्यांमधील ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील ३८१५४३ व गर्भवती स्तनदा १६४६५० असे एकुण ५४६१९३ लाभार्थ्यांना वाटप केले.

(ड) अंडी केळी खरेदीचा नाविन्यपुर्ण उपक्रम (Piloti project) अंगणवाडी सेविकांमार्फत आडवड्यातून २ दिवसांसाठी प्रतिदिन मांसाहारी मुलांसाठी १ अंडे व शाकाहारी मुलांसाठी दोन केळी खरेदी करून वाटप करण्यात येत आहे.

(ई) टॉनिक्स : टोनेक्स, मल्टीविटॅमिन २ सिरप, स्पिंकल्स, प्रोटीन पावडर, हिमा टॅब्लेट कॅल्शियम टॅब्लेट ORS, टॉनसिकॉन टॅब्लेट, वांतातक सिरप, फुटीन सिरप, पितांतक सिरप, मायक्रोन्युट्रीयन्ट सप्लीमेंट अस पुरविण्यात आले आहे.

(फ) अंगणवाडीचा, गुणात्मक दर्जा उंचावणेसाठी वॉटर, फिल्टर, EPGM मशीन यामुळे बालकांचे, तंतोतंत वजन होईल. लाभार्थी कोणत्य श्रेणीत आहे ते समजुन त्यांचे वर जास्त लक्ष देणेत येईल.

(ज) विशेष उपक्रम :— भागातील नंदुरबार जिल्ह्यामध्ये MNT Cup (Nutrition Therapy Cup) वाटप करण्यात आले यामध्ये सोया व शेंगदाणा यांचे पासून तयार केलेले कप कुपोषित बालकांना सायन हॉस्पीटल व NGO यांचे मदतीने देण्यात आले.

सन २०१५-१६ या चालू आर्थिक वर्षात कुपोषण निर्मुलणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

(१) THR मध्ये २ पाककृतीऐवजी ४ पाककृती तयार करण्यात येत असून THR चे सर्व उत्पादन केंद्र शासन व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार Full Automatic व Extrusion TEChnology पद्धतीने तयार येणार आहेत.

(२) गरम आहारामध्ये कम्युनिटी किचनची संकल्पना आणलेली आहे. एकर्‍ा किचन तयार करण्यात येणार आहे. व पारंपारिक पद्धतीच्या पाककृती नव्याने भाजी चपाती, इडली भाजी, वरण भात इ. पाककृती तयार येणार आहेत.

(३) RUTF:-तीव्र कमी वजनाच्या बालकांसाठी Ready to use Therapeutic Food खरेदी विचाराधीन आहे.

(४) अंडी व केळी, यांची लाभार्थ्यांकडून उपयुक्तता चालू वर्षी सुद्धा अंगणवाडी सेविकांमार्फत अंडी/केळीचे वाटप करण्याचे विचाराधीन आहे. खरेदी करणे विचाराधीन आहे.

(५) खजुर खरेदी करणे विचाराधीन आदे. खजुर मध्ये कॅल्शियम, आयर्न, व इतर मुलद्रव्ये मुबलकप्रमाणावर असल्याने कुपोषणावर मात होणेस मदत होईल.

(६) सोयामिल्क : अंगणवाडी स्तरावर सोयामिल्क करणेबाबत अंगणवाडी सेविकेला विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे त्यामुळे लाभार्थ्यांची प्रथिनांची कमतरता भरुन निघेल.

वरील उपक्रमांमुळे अंगमवाडीतील लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे. तसेच मुलींच्या कुपोषणाचे प्रमाण कमी होऊन मुलींच्या कुपोषणाचे प्रमाण कमी होऊन मुलींच्या मृत्युत घट होण्यास मदत होत आहे.

अंगणवाडी केंद्रामध्ये पायाभुत सुविधांची कमतरता

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या मार्च २०१२ रोजी (२०१३ चा क्रमांक ३) संपणाऱ्या सर्वसाधारण आणि सामाजिक क्षेत्रांच्या अहवालातील परिच्छेद ४.१ मध्ये AWCs मधील पायाभुत सुविधांच्या कमतरतेबाबत उल्लेख केला होता. मार्च २०१२ व मार्च २०१४ दरम्यान कार्यरत असलेल्या AWCs तुलनात्मक स्थिती तक्ता २.१.१३ मध्ये दिली आहे.

तक्ता २.१.१३: मार्च २०१२ आणि मार्च २०१४ दरम्यान कार्यरत असलेल्या AWCs ची तुलनात्मक स्थितीची

ची स्थिती	एकुण कार्यरत AWCs	येथे कार्यरत असलेल्या AWCs ची स्थिती				स्वतःच्या मालकीच्या इमारती व्यतिरिक्त इतर जागांवर कार्यरत असलेल्या AWCs ची टक्केवारी
		स्वतःच्या मालकीच्या जागेत	भाड्याच्या जागेत	दान केलेल्या जागेत	मोकळ्या जागेत	
मार्च २०१२	९५३३५	४३५०१	२१७८६	२२३९०	७६५८	५१८३४(५४%)
मार्च २०१४	९७१५५	५१८३०	२१५७१	१९१८७	४५६७	४५३२५ (४७%)

स्त्रोतः ICDS मासिक प्रगती अहवालावरुन संकलित केलेली Online माहिती

तक्ता २.१.१३ वरुन असे दिसून येते की, अंगणवाडी केंद्रांची संख्या वाढलेली आहे व स्वतःच्या जागेत कार्यरत असलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या मार्च २०१२ पेक्षा मार्च २०१४ मध्ये वाढ दर्शविते. तथापि, मार्च २०१४ मध्ये ९७१५५ अंगणवाडी केंद्रांपैकी (५३%) ५१८९७ अंगणवाडी केंद्रांमध्ये शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती तर ८२०५५ अंगणवाडी केंद्रांना ८४% विजेचा पुरवठा नव्हता शिवाय मार्च २०१२ च्या तुलनेत बालविकास प्रकल्प अधिकारी आणि पर्यवेक्षकांची अनुक्रमे १९% आणि १६% रिक्त असलेली पदे मार्च २०१४ ला अनुक्रमे ४५%आणि १३% रिक्त होती.

अंतिम बैठकीत प्रधान सचिवांनी सांगितले की, सुरूवातीला केंद्र शासनाकडून निधी मिळत नव्हता आणि तो जिल्हापरिषदेकडून प्राप्त होत होता प्रधान सचिवांनी पुढे सांगितले की, अंगणवाडी केंद्रामध्ये अंगणवाडी कर्मचारी व सहायक यांची दोन पदे होती. तसेच छोट्या अंगणवाड्यांमध्ये १६ अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे केवळ एकच पद होते. छोट्या अंगणवाडी केंद्रामध्ये कामाचा व्याप अधिक असल्याने छोट्या अंगणवाडी केंद्रांमध्ये अंगणवाडी सहाय्यकाचे एक अतिरिक्त पद निर्माण केले जाईल. प्रधान सचिवांना पुढे असे नमूद केले आय सी डी एस मध्ये जमीन खरेदी करण्याची तरतूद नाही. जुन्या भाडयाने घेतलेल्या इमारतीमध्ये शौचालये नव्हती परंतु त्यांनी आश्वासित केले की, लेखापरिक्षेने दर्शविलेल्या समस्यांची नवीन अंगणवाडी केंद्र बांधताना काळजी घेतली जाईल.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :–

राज्य शासनाने नव्यानेच मंजूर केलेल्या अंगणवाडी इमारतीच्या आराखडयामध्ये शौचालय पिण्याचे पाणी व विद्युत व्यवस्था करण्याचे प्रावधान केलेले आहे. यापुढे नव्याने बांधण्यात येणाऱ्या अंगणवाडी केंद्राच्या इमारतीमध्ये या सुविधाचा समावेश करण्यात आला आहे. सदर योजना केंद्रपुरस्कृत असून अंगणवाडी / मिनी अंगणवाडी केंद्राकरिता नियुक्त करावयाच्या मानधनी पदाचे निकष केंद्र शासनाकडून निर्धारीत केलेले आहेत. त्याचे तंतोतंत पालन करण्यात येते.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे ग्रामिण पातळीवर अंगणवाडी केंद्र कार्यरत असते व तसेच छोटया वाडी वस्तीवरील लाभार्थींना या योजनेचा लाभ घेणे शक्य व्हावे यासाठी मिनी अंगणवाडी केंद्र मंजूर करण्यात येते. या मिनी अंगणवाडी केंद्रावर एकच पद (मिनी अंगणवाडी सेविका) मंजूर आहे. कालांतराने लाभार्थ्यांची संख्या वाढल्यानंतर या मिनी अंगणवाडी केंद्राचे रूपांतर अंगणवाडी केंद्रात करण्यात येते व या ठिकाणी अंगणवाडी सेविका व मदतनीस अशी दोन मंजूर पदे भरण्यात येतात.

जुन्या भाडयाने घेतलेल्या इमारतीमध्ये शौचालय व तत्सम सुविधा उपलब्ध असलेली इमारत भाडयाने घेण्याबाबत सर्व स्तरावर सूचना देण्यात आलेल्या आहेत. राज्य शासनाच्या जलस्वराज्य विभागाकडून समाजमंदीर, दान केलेल्या इमारतीमध्ये शौचालयाची सुविधा उपलब्ध करून घेण्यात येत आहे.

किशोरवयीन मुलींच्या सबलीकरणासाठी असलेल्या राजीव गांधी योजनेची अंमलबजावणी :

किशोरवयीन मुलींच्या सबलीकरणासाठी केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने, सप्टेंबर २०१० मध्ये किशोरवयीन मुलीच्या सबलीकरणासाठी राजीव गांधी (SABLA) केंद्र पुरस्कृत योजना सुरू केली होती. ११ ते १८ वर्षाच्या किशोरवयीन मुलींचे पोषण आणि आरोग्याचा स्तर सुधारुन गृह आणि व्यावसायिक कुशलतांचा दर्जा वाढवून अशा मुलींना सबल करणे हो SABLA चा हेतू होता.

ICDS योजनेच व्यासपीठ वापरुन या योजनेची अंमलबजावणी करावयाची होती. अंगणवाडी केंद्रे सेवा देण्याचा केंद्रबिंदू होते. या योजनेचे दोन घटक होते, पोषण आणि पोषणेतर घटक केंद्र शासनाने पोषण या घटकाव्यतिरिक्त इतर सर्व घटकांसाठी राज्यांना १०० टक्के आर्थिक सहाय्य द्यावयाचे होते. पोषणासाठीचा खर्च केंद्र आणि राज्य शासनाने ५०:५० असा भागीदारात करायचा होता. या योजनेची राज्यात W&CD कडून जून २०११ पासून मुंबई उपनगरे, नांदेड, बीड, बुलढाणा, गडचिरोली, कोल्हापुर, सातारा, नाशिक, अमरावती, नागपूर आणि गोंदीया या ११ जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यात आली होती.

पोषण आहाराचे घटक :

पोषण घटकांतर्गत प्रत्येक किशोरवयीन मुलींना प्रति दिवशी ६०० कॅलरीज, १८ ते २० ग्रॅम प्रथिने आणि सुक्ष्मपोषणे असलेला पूरक पोषण आहार एक वर्षात ३०० दिवस, लगेच वापरण्यास योग्य असा घरपोच शिधा (THR) स्वरुपात द्यावयाचा होता. W&CD ने डिसेंबर २०१० मध्येअंगणवाडी कार्यकर्त्यांव्दारे केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणानुसार, ११ जिल्ह्यांमध्ये ९.५० लाख किशोरवयीन मुली होत्या.

तथापि, आयुक्त, W&CD पुणे यांनी केंद्र शासनाला सादर केलेल्या वर्ष २०११-१४ च्या खर्चाच्या वार्षिक विवरणपत्रावरुन असे आढळून आले की, या योजनेचा लाभ मार्च २०१२ पर्यंत ७.९३ लाख, मार्च २०१३ पर्यंत ७.५३ लाख, आणि मार्च २०१४ पर्यंत ७.७१ लाख लाभार्थ्यापर्यंतच पोहोचला होता.म्हणजेच, ९.५० लाख मुलीपर्यंत जो लाभ पोहोचायला हवा होता त्याऐवजी वर्ष २०११-१४ दरम्यान सरासरी तो फक्त ७.७२ लाख लाभार्थ्यांपर्यतच पोहोचला होता.

लेखापरीक्षेला असेही आढळून आले की, ज्या ठिकाणी या योजनेची अंमलबजावणी W&CD व्दारे केली गेली होती तेथे अंगणवाडी केंद्राच्या संख्येतही विसंगती आढळून आली. सह आयुक्त, W&CD पुणे यांनी केंद्र शासनास सादर केलेल्या त्रैमासिक खर्च विवरणपत्रात (डिसेंबर २०१३), ११ जिल्ह्यातील ४४,८८१ अंगणवाडी केंद्रापैकी ३९,२७९ अंगणवाडी केंद्रामध्ये योजना कार्यान्वित झाल्याचे दर्शविले होते. तथापि, मार्च २०१४ मधील त्रैमासिक अहवालात मात्र ४१,१४३ अंगणवाडी केद्रापैकी ४०,७८३ अंगणवाडी केंद्रामध्ये योजना कार्यान्वित झाल्याचे दर्शविले होते.अशा प्रकारे जर ५,६०२ अंगणवाडी केद्राचा या योजनेव्दारे डिसेंबर २०१३ च्या त्रैमासिक अहवालानुसार समावेश नव्हता तर सह आयुक्त W&CD यांनी केंद्र शासनाला जानेवारी २०१२ पासून डिसेंबर २०१३ पर्यंत पाठविलेल्या त्रैमासिक खर्चाच्या विवरणपत्रानुसार ४४,८८१ अस्तित्त्वात होत्या हे सत्य विचारात घेता, डिसेंबर २०१३ मध्ये असलेल्या AWCs ४४,८८१ वरुन कमी होऊन मार्च २०१४ मध्ये ४१,१४३ झाल्या, हे अनाकलनीय आहे.

आयुक्त W&CD पुणे यांनी ११ जिल्ह्यांना, प्रचलित पुरवठादारांकडून THR ची खरेदी बंद करून महिला मंडळे/महिला बचत गटांकडून THR किंवा गरम शिजविलेले अन्न खरेदी करण्याचे निर्देश दिले होते (डिसेंबर २०१२). लेखा परिक्षेला असे आढळून आले की, ११ पैकी आठ

अमरावती, बीड, बुलढाणा, गडचिरोली, कोल्हापूर, नागपूर, नांदेड आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये जानेवारी २०१४ पर्यंत THR किंवा गरम शिजविलेले अन्न कंत्राटदारानेही पुरविले नाही किंवा महिला मंडळे/महिला बचत गटांनीही पुरविले नाही. अशा प्रकारे ५.७२ लाख किशोरवयीन मुली योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या.

केंद्र शासनाने जारी केलेल्या (डिसेंबर २०१०) SABLA मार्गदर्शक तत्त्वांनुसार, AWCs ना प्रत्येक किशोरवयीन मुलीचे तिच्या आयुष्यातील महत्त्वाच्या तपशीलांच्या नोदीचे (उंच, वजन, लसीकरणाचा तपशिल, लोह आणि फॉलिक ॲसीडचे पुरक पोषण पुरवठा इत्यादी) एक किशोरी पत्रक (आरोग्य पत्रक) ठेवणे आवश्यक होते. लेखा परीक्षेने निवड केलेल्या पाच जिल्ह्यांमधील बुलढाणा (चार), गडचिरोली (एक), मुंबई उपनगर (आठ), नांदेड (एक), आणि सोलापूर (चार) १८ AWCs ना दिलेल्या भेटीत असे आढळून आले की, AWCs ने किशोरवयीन मुलींचे आरोग्य पत्रक ठेवले नव्हते.

पोषणेतर घटकः

केंद्र शासनाने २०११-१४ दरम्यान या योजनेखाली पोषणेतर घटकांसाठी रु. १७.४९ कोटी मुक्त केले होते ज्यातुन W&CD ने SABLA संच खरेदीपोटी आणि किशोरवयीन मुलींच्या प्रशिक्षणावर रु. १४.७० कोटी खर्च केले होते. रु. २.७९ कोटी इतक्या एकुण बचतीपैकी सर्वाधीक बचत वर्ष २०१२-१३ मध्ये (रु. २.६३ कोटी) झाली होती जी किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण न दिल्यामुळे झाली होती.

उप-आयुक्त W&CD पुणे यांनी सांगीतले (सप्टेंबर २०१४) की, बाल विकास प्रकल्प अधिकारी (क्ख्प्) (ग्रामीण) व CDPO (नागरी) यासाठी नियोजित अर्थसंकल्पीय तरतूदीची चुकून अदलाबदल झाल्यामुळे जिल्ह्यांना निधी वितरीत करता आला नाही. परिणामी निधीचे प्रत्यार्पण झाले.

पोषणेतर घटकाच्या अनेक भागांपैकी एक भाग म्हणजे जीवन कौशल्य आणि सार्वजनिक सेवांचा लाभ घेणे हा होता ज्याचा मुळ उद्देश किशोरवयीन मुलींमध्ये स्वतः बद्दलची जाणीव आणि स्वाभिमान, आत्मविश्वास वाढविणे, निर्णय क्षमता, सर्वसमावेशक विचार करण्याची क्षमता, जीवन कौशल्ये प्रशिक्षण इत्यादीचा विकास करणे हा होता. लेखापरीक्षेला असे आढळून आले की जरी SABLA योजनेची सुरूवात जून २०११ पासून ११ जिल्ह्यांमध्ये करण्यात आली होती तरी, सार्वजनिक सेवांचा लाभ घेण्याचे जीवन कौशल्य प्रशिक्षण हे मार्च २०१२ पर्यंत ११ पैकी फक्त दोन मुंबई आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये देण्यात आले होते. तद्नंतर २०१२-१४ दरम्यान ४७,४६० किशोरवयीन मुलींना लक्ष्य करून फक्त दोन प्रशिक्षणे दिली गेली, त्यापैकी फक्त २२,२६३ किशोरवयीन मुली (४७ टक्के) प्रशिक्षित झाल्या होत्या.

केंद्र शासनाने जारी केलेल्या (डिसेंबर २०१०) SABLA मार्गदर्शक तत्त्वां नुसार, १६ वर्षावरील किशोरवयीन मुलींना किमान एका उद्योगाशी संबंधीत कुशलतेच व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देणे गरजेचे होते जेणेकरून त्यांना रोजगार अथवा स्वयंरोजगार मिळेल अथवा इतर भागीदारांकडून लघु उदयोग निर्माण करणे शक्य होईल. लेखा परिक्षेला असे आढळून आले की, SABLA योजना राज्यात सुरू झाल्यापासून (जुन २०११) नोव्हेंबर २०१४ पर्यंत १६ वर्षावरील किशोरवयीन मुलींना कोणतेही व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले नव्हते.

अंतिम बैठकीत, मा. प्रधान सचिवांनी सांगीतले की, पायाभूत सुविधांच्या अभावामुळे SABLA योजनेखाली किशोरवयीन मुलींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले जाऊ शकले नव्हते.

ज्ञापन :—

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभ्रिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :—

किशोरवयीन मुलींच्या सबलीकरणासाठी असलेल्या राजीव गांधी योजनेची अंमलबजावणी

शासन निर्णय क्र.एबावि-२००९/प्र.क्र.१८५/का-५,दिनांक ३० एप्रिल २०११ अन्वये सबला (राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण) या केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत ११ ते १८ या वयोगटातील शाळेतून गळती झालेल्या सर्व मुलींना THR आहार द्यावा व १५ ते १८ वर्षे वयोगटातील शाळेत जाणाऱ्या मुलींना THR आहार पुरवठा करणेबाबत मार्गदर्शन देण्यात आलेले आहे. त्यानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ज्या तीन महिला संस्थांमार्फत सद्यःस्थितीत THR आहार पुरवठा सुरू आहे त्याच तीन महिला संस्थांमार्फत सबला योजनेअंतर्गत THR आहार पुरवठा करण्यांत यावा असे शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार सबला योजनेंतर्गत THR आहार सुरू होता.

(१) डिसेंबर २०१० मध्ये अंगणवाडी कार्यकर्त्यांद्वारे केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणानुसार ११ जिल्ह्यांमध्ये ९.५० लाख किशोरवयीन मुलींची नोंद घेण्यात आली होती. केंद्र शासनास सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रामध्ये या योजनेचा लाभ मार्च २०१२ पर्यत ७.९३ लाख, मार्च २०१३ पर्यत ७.५३ लाख आणि मार्च २०१४ पर्यत ७.७१ लाख लाभार्थ्यांपर्यत पोहचला आहे. अंगणवाडी कार्यकर्त्यांकडून झालेल्या प्राथमिक सर्वेक्षणानुसार ११ जिल्ह्यांमध्ये ९.५० लाख किशोरवयीन मुलींची नोंद घेण्यात आली होती हे खरे असले तरी सर्वेक्षण केलेल्या सर्वच किशोरवयीन

मुली ह्या योजनेचा लाभ घेण्यासाठी अंगणवाडीत येण्यास उत्सुक असतातच असे नाही, तसेच दररोज अंगणवाडीत येऊन आहार घेण्यासाठी येऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा परिस्थितीत जरी सर्वेक्षणात मुलींची संख्या जास्त दिसत असली तरी आहाराचा लाभ घेण्यासाठी शहरी भागात किशोरवयीन मुलींची संख्या ग्रामीण भागापेक्षा कमी आहे. परंतु ह्याच योजनेंतर्गत Soft Skill development अंतर्गत असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमासाठी जाणिव जागृती प्रशिक्षणासाठी सर्व नोंदीकृत मुली या लाभार्थी असल्याने त्या वेळोवेळी अंगणवाडी केंद्रांतर्गत/बीट अंतर्गत आयोजीत करण्यात येत असलेल्या प्रशिक्षणात सहभागी होतात.

(२) केंद्र शासनास सादर केलेल्या त्रैमासिक अहवालात ११ जिल्ह्यातील ४४८८१ अंगणवाडी केंद्रामध्ये मिनी अंगणवाडी केंद्राचा समावेश करून अहवाल सादर करण्यात आलेला होता. त्यापैकी ३९२७९ अंगणवाडी केंद्रामध्ये सदर योजना राबविण्यात आली होती. मार्च २०१४ मधील त्रैमासिक अहवालात नजरचुकीने मिनी अंगणवाडीचा समावेश न केल्याने फक्त अंगणवाडी केंद्र ४११४३ समावेश करण्यात आला होता. परंतु ४०७८३ अंगणवाडी केंद्रामध्ये सदर योजना राबविण्यात आली होती. वरील बाबीचा विचार केल्यास डिसेंबर २०१३ च्या अहवालानुसार कार्यरत ३९२७९ अंगणवाडी केंद्र व मार्च २०१४ मधील त्रैमासिक अहवालानुसार कार्यरत ४०७८३ अंगणवाडी केंद्राचा अहवाल सादर केलेला आहे. दोन्ही अहवालांची तुलना करता योजना राबविण्याच्या अंगणवाडी केंद्रात मार्च २०१४ मधील त्रैमासिक अहवालात १५०४ अंगणवाडी केंद्रात वाढ झाल्याचा अहवाल सादर केलेला आहे.

(३) शासनाचे अ.शा. पत्र क्र. एबावि -२०१२/प्र.क्र.४४३/का-५ दिनांक ३ डिसेंबर,२०१२ अन्वये सबला योजनेअंतर्गत ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींना ३ महिला संस्थांमार्फत पुरविण्यात येत असलेला प्रतिदिन प्रति लाभार्थी ६०० कॅलरीज व १८ ते २० ग्रॅम प्रोटीन आणि सुक्ष्म पोषण तत्त्व युक्त (मायक्रोन्युट्रीयन्ट) आहार बंद करण्यात येऊन त्याऐवजी बचत गटांमार्फत THR / गरम ताजा आहार देणेबाबत शासनाकडून सुचना प्राप्त झाल्यानुसार ११ जिल्ह्यातील किशोरवयीन मुली आहारापासून वंचित राहू नये यासाठी स्थानिक स्तरावरुन THR /गरम ताजा आहार सुरू करणेबाबत संबधित उप मुकाअ /बाविप्रअ यांना आयुक्तालयामार्फत कळविण्यात आले आहे.

सन २०१२ ते २०१४ दरम्यान दोन्ही आर्थिक वर्षात सबला योजनेंतर्गत नोंदणीकृत मुलींसाठी प्रशिक्षण जीवनकौशल्य मुल्यवृद्धी प्रशिक्षणाकरीता निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर परंतु स्थानिक स्तरावरुन ६०० कॅलरीज व १८ ते २० ग्रॅम प्रोटीन आणि सुक्ष्म पोषण तत्त्व युक्त आहार बचत गट पुरविण्यास तयार नसल्याचे कळविण्यात आले होते. तसेच बुलढाणा, अमरावती, गडचिरोली, नागपुर, चंद्रपुर, नाशिक, बीड, कोल्हापुर यांनी सबला योजनेअंतर्गत किशोरवयीन मुली गरम ताजा आहार घेण्यास दररोज अंगणवाडीत येत नाहीत ज्या ठिकाणी बचत गट/ महिला मंडळ गरम ताजा आहार /THR पुरवठा करण्यास तयार नव्हते, त्याठिकाणी काही जिल्हा परिषदांनी विनंती केल्यानुसार तसेच त्यांचेकडून प्राप्त झालेल्या महिला मंडळ/ बचत गटांच्या शिफारशीनुसार आयुक्तालया मार्फत संबंधित जिल्ह्यांना त्यांचे स्तरावरुन रुपये ५ या दरात बसतील असे कच्चा धान्य पुरवठा करून घेणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. सबला योजनेंतर्गत लाभार्थी आहारापासून वंचित राहणार नाही यासाठी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करण्यात आली होती.

सदर योजनेमध्ये २०१२-१३ या आर्थीक वर्षात सबला कार्ड मुलींना देण्यात आलेले होते. तद्नंतर योजनेंतर्गत किशोरी कार्ड वाटप करण्यात आलेले नसून सद्यस्थितीत ते मुलींकडे दिसून आले नाही. परंतु आरोग्य विभागाने केलेल्या आरोग्य तपासणीचे सर्व नोंदी आरोग्य विभागाकडे असण्याची शक्यता आहे.

उपआयुक्त W&CD पुणे यांनी सांगीतले (सप्टेंबर २०१४) की, बाल विकास प्रकल्प अधिकारी (CDPO) (ग्रामीण) व क्क्ष्र (नागरी) यासाठी नियोजित अर्थसंकल्पीय तरतूदीची चुकून अदलाबदल झाल्यामुळे जिल्ह्यांना निधी वितरीत करणे शक्य नसल्याने त्याबाबत निधी पुनर्विनियोजित करून मिळणेबाबत शासनास विनंती करण्यात आली होती. परंतु सदर निधी पुनर्विनियोजित करून न आल्याने परिणामी निधीचे प्रत्यार्पण झाले. सदर योजनेंतर्गत जरी मार्च २०१२ पर्यंत व तद्नंतर सन २०१४ पर्यंत ४७,४६० मुलींना लक्ष्य केले असले तरी विविध कारणांनी अंगणवाडी कार्यक्षेत्रातील मुली या मार्च व एप्रिल या दोन महिन्याच्या काळात प्रशिक्षणांना पुर्ण वेळ उपस्थित राहू शकत नसल्याने अंगणवाडी केंद्र व बिट अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी व ग्रामीण यांनी त्या भागातील मुलींच्या सोईनुसार पुढील कालावधीत प्रशिक्षण पुर्ण केलेले आहेत. व सदरचा अहवाल त्यांच्या स्तरावर ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल होत असल्याचे दिसून येते. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण देणेबाबत पायाभूत सुविधांच्या अभावामुळे SABLA योजनेखाली किशोरवयीन मुलीना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले जाऊ शकले नाही अशा परिस्थितीत योजनेंतर्गत विविध व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची जिल्हानिहाय यादी प्रत्येक जिल्ह्याला कळविण्यात आलेली असून सदर जिल्ह्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अंगणवाडयामार्फत तांत्रिक शिक्षण आवश्यक असणाऱ्या मुलींची यादी त्या जिल्हातील उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत विविध संस्थांना पाठविणेबाबत व योजनेंतर्गत किशोरवयीन मुली तांत्रिक शिक्षणापासून वंचित राहू नये याबाबत दक्षता घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

तद्नंतर आयुक्तालयाचे पत्र क्र. ३६९ दिनांक २४/५/२०१३ अन्वये नवीन ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांचे मार्फत THR आहार पुरवठा करणेसाठी सर्व जिल्ह्यातील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांना जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या आहार समिती मार्फत प्रक्रिया पुर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. निवड झालेल्या बचत गटांमार्फत सबला योजनेंतर्गत THR आहार सुरू करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार काही जिल्ह्यांमध्ये निवड झालेल्या बचत गट/महिला मंडळांमार्फत THR सुरू करण्यात आला आहे. शासनाने दिलेल्या सुचनांनुसार माहे डिसेंबर २०१२ ? पासून प्रचलित पुरवठादारांकडून THR खरेदी बंद केली असली तरी आयुक्तालयामार्फत किशोरवयीन मुली आहारापासून वंचित राहू नये यासाठी वेळोवेळी गरम ताजा आहार/ THR / अन्न धान्य पुरवठा करण्यास स्थानिक बचत गट/ महिला मंडळ/ महिला संस्था यांना मान्यता देऊन आहार सुरू ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे जानेवारी २०१४ पर्यत ५.७२ लाख किशोरवयीन मुली योजनेच्या आहारापासून वंचित राहिलेल्या नाहीत.

"लोह आणि फोलिक ॲसिड पुरक पोषण कार्यक्रमाची साप्ताहिक अंमलबजावणी" :– शाळेत जाणाऱ्या किशोरवयीन मुलींमधील आणि मुलांमधील आणि राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाने साप्ताहिक लोह आणि फोलीक ॲसिड पूरक पोषण कार्यक्रम (WIFS) सुरू केला होता. (२०१२-१३) महाराष्ट्रात WIFS ची अंमलबजावणी सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे (PHD) केली जात आहे शासकीय, शासकीय अनुदानि, नगरपरिषदेच्या शाळा आणि अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील किशोरवयीन मुलांसाठी साप्ताहिक लोह आणि फोलिक ॲसिडचे पूरक पोषण देण्याचे (IFA) WIFS चे उद्दिष्ट होते २०१२-१३ दरम्यान राज्यात WIFS अंतर्गत एकुण ८९.९२ किशोरवयीन मुले असल्याचे आढळूनआले. अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे यांचे कडील दस्तऐवज तपासणीत खालील गोष्टी आढळून आल्या. अ) IFA गोळयांच्या खरेदीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून निविदा अंतिम करण्यात उशीर झाल्यामुळे, राज्यात जानेवारी २०१३ पासुन योजनेची विलंबाने सुरूवात झाली होती. परिणामी डिसेंबर २०१२ पर्यंत ८९.३२ लाख लाभार्थ्यांपैकी कुणालाही IFA पुरविले जाऊ शकले नव्हते. ज्ञापन : महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागागे दिलेल्या सष्टीकरणात्मक ज्ञापनात खालील प्रमाणे नमूद केले आहे. अ) विकली आयर्न फॅालिक ॲसिड सप्लीमेंटशन कार्यक्रम (WIFS) या कार्यक्रमाची अंमलबजावणी महाराष्ट्रमध्ये सन २०१३ पासुन सुरू आहे. आरोग्य व कुटुंबकल्याण, मंत्रालय नवी दिल्ली यांचे कडुन संदेश प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी केंद्र शासनाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणासाठी संचालक प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, आयुक्त महिला व बाल विकास कार्यक्रम व प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपुर हे दिनांक १६ ऑगस्ट २०१२ ते १७ ऑगस्ट २०१२ रोजी सहभागी झाले होते.त्यानंतर राज्य स्तरावर तीन विभागातील अधिकारी उदा. जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बाल विकास आणि जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्या करीता दिनांक १७ सप्टेंबर २०१२ रोजी बैठक/प्रशिक्षण आयोजित करण्यात आली होती. तसेच सर्व जिल्हा परिषद यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विकली आयर्न फॅालिक ऑगस्ट सप्लिमेंटेशन कार्यक्रमाची जिल्हा सल्लागार समिती स्थापन करण्यासाठी दि १७ ऑक्टोबर २०१२ रोजी पत्र पाठविण्यात आले होते. विकली आयर्न फॅालिक ॲसिड सप्लिमेंटेशन कार्यक्रम अंमलबजावणी मार्गदर्शक तत्त्वे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविण्यात आली होती राज्य स्तरावर मा. अतिरिक्त मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ ऑक्टोबर २०१२ ला आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला तिन्ही विभागाचे प्रतिनिधी सहभागी होते. याबैठकीत संपुर्ण राज्यात विकली आयर्न फॅालिक ॲसिड सप्लिमेंटेशन योजना प्रभावीपणे कशी राबविली जाईल याची सविस्तर चर्चा झाली.

सर्व प्राचार्य आरोग्य कुटुंबकल्याण प्रशिक्षण केंद्र व सर्व जिल्ह्यांचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिनांक १५ डिसेंबर २०१२ आणि दिनांक ०३.०१.२०१३ रोजी विकली आयर्न ॲन्ड फॅालिक सिड कार्यक्रमाबाबतचे प्रशिक्षण आयोजित करून पुर्ण करण्याबाबतचे पत्र व प्रशिक्षण अंमलबजावणी मार्गदर्शक सुचना पाठविण्यात आल्या. मा.अतिरिक्त मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी पुन्हा दिनांक ०४ जानेवारी २०१३ रोजी अंमलबजावणी बाबत आढावा घेतला. ई-निविदा प्रकाशित झालेनंतर मे. हिंदुस्थान लॅबोरेटरिज यांना १८,०४,६८,४६५ आय.एफ.ए गोळयांचा पुरवठा करण्यासाठी दिनांक ०३ जानेवारी २०१३ रोजी आदेश देण्यात आले होते याबाबत सविस्तर अंमलबजावणी सुचना सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिनांक २० मार्च २०१३ रोजी पाठविण्यात आल्या,त्यानंतर जुन २०१३ पासुन लाभार्थ्यांना आयर्न फॉलिक ॲसिडच्या गोळया देण्याची कार्यवाही करण्यात आली.

ब) २०१३-१४ दरम्यान ३७.९५ लक्ष पैकी १५ ते ८१ टक्के किशोरवयीन मुलींना IFA गोळया दिल्या गेल्या होत्या निवड केलेल्या पाच पैकी चार जिल्ह्यात फक्त ४.६६ ते ८७.५३ टक्के किशोरवयीन मुलींना IFA गोळया दिल्या गेल्या होत्या.

ज्ञापन : महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालील प्रमाणे नमूद केले आहे. ब) प्रथमत: जुन २०१३ मध्ये योजना कार्यान्वित करतांना अपेक्षित लाभार्थ्यांची संख्या एकुण लोकसंख्येतून ग्राह्य धरण्यात

आली होती. त्यामुळे जुन २०१३ मध्ये अपेक्षित लाभार्थ्यांची संख्या ५०,६८,०७० इतकी होती. ऑगस्ट २०१३ पासून विकली आयर्न फॉलिक असिडॅ सप्लिमेंटेशनच्या तक्त्यामध्ये केंद्र शासनाद्वारे बदल करण्यात आला आणि अपेक्षित लाभार्थ्यांची संख्या शालाबाहय, अंगणवाडी केंद्रातून घेण्यात आली. त्यामुळे ऑगस्ट २०१३ चे किशोरवयीन मुला-मुलींचे लक्ष कमी होऊन ते ३७,९४,८१३ इतके झाले.

किशोरवयीन मुलींसाठी विकली आयर्न फॉलिक ॲसिड गोळयांच्या पुरवठयाचे प्रमाण सुरूवातीच्या १८.१७ टक्के पासुन मार्च २०१४ टक्के पर्यंत गाठण्यात आले. याबाबतचा मासिक तपशील (२०१३-१४) खालीलप्रमाणे आहे.

महिना	शाळेतील मुली	शालाबाह्य मुली	एकुण	अपेक्षित	टक्के
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
जुन १३	७२८९९०	१९१८४९	९२०८३९	५०६८०७०	१८.१७
जुलै १२	१५७३३४३	६०४२९०	२१७७६३३	५०६८०७०	४२.९७
ऑगस्ट १२	२०९९२९५	४६८८६७	२५६८१६२	३७९४८१३	६७.६८
सप्टें १३	२१४१८१२	३२५३०५	२४६११७	३७९४८१३	६५.०१
ऑटो १३	१८०१८८४	३४८५३०	२१५०४१४	३७९४८१३	५६.६७
नोव्हे १३	१८६१५९७	३३६५५०	२१९८१४७	३७९४८१३	५७.९३
डिसें १३	२७८९६२८	२९८५५१	३०८८१७९	३७९४८१३	८१.३८
जाने १४	१९७४६४१	२४६७२७	२२२१३६८	३७९४८१३	५८.५४
फेब्रु १४	२१४११५३	३०४६२८	२४४५७८१	३७९४८१३	६४.४५
मार्च १४	३१२८०६२	३८६६२९	३५१४६९१	३७९४८१३	९२.६२
एकुण	२०२४०४०५	३५११९२६	२३७५२३३१	३७९४८१३	

२.१.१०.५ :- शिक्षणाचा अधिकार :-

१.५ शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ (RTE) च्या कलम ३ नुसार, सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला त्याच्या घराजवळील शाळेत त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. तसेच RTE च्या कलम ४ नुसार, ज्या मुलाचे वय सहा वर्षाच्या वर आहे आणि ज्याने कुठल्याही शाळेत प्रवेश घेतला नाही किंवा प्रवेश घेऊनही प्राथमिक शिक्षण पूर्ण केले नाही अशा बालक किंवा बालीकेला त्याच्या वयानुरुप वर्गात प्रवेश द्यावा. आयुक्त, W & CD, पुणे यांचेकडील ICDS च्या ऑनलाईन माहितीची छाननी केली असता असे आढळून आले की, मार्च, २०१४ ला राज्यात ११ ते १४ वयोगटातील २.३० लाख शाळाबाह्य मुली होत्या. तर दुसऱ्या बाजूला शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने मार्च, २०१४ ला सर्व शिक्षा अभियानांतर्गत (SSA) प्रशिक्षण देण्यासाठी फक्त १९,७१३ शाळाबाह्य मुलींना शोधून काढले होते.

अंतिम बैठकीत, प्रधान सचिव, W & CD यांनी सांगितले की, शाळाबाह्य मुलांची (ICDS आणि SSA) दोन्ही आकडेवारी तपासली जाईल आणि आकडेवारीची पडताळणी करण्यासाठी UNICEF आणि इतर NGOs ची काही जिल्ह्यामध्ये सर्वेक्षण करण्यासाठी मदत घेतली जाईल. दोन विभागांनी निश्चित केलेल्या शाळाबाह्य मुलींच्या (११ ते १४ वर्षे) संख्येतील मोठी तफावत अशा मुलींना शोधण्याच्या पद्धतीतील गंभीर अपर्याप्ता दर्शविते. तसेच RTE खाली बऱ्याच मुलींना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार संरक्षित केला नव्हता/हे सत्य अधोरेखित करते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत २०१३-१४ असे एकूण ८६८५६ शाळाबाह्य मुले शाळा व्यवस्थापन समितीव्दारे शोधून सदर मुले SDP मध्ये दाखविण्यात आलेली आहेत. या मुलांना वयानुरुप समकक्ष वर्गात प्रवेश देऊन मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यात आले आहे. या एकूण ८६८५६ मुलांपैकी ११ ते १४ या वयोगटातील २३९०३ एवढ्या शाळाबाह्य मुली आढळून आलेल्या आहेत.

ICDS च्या ऑनलाईन माहितीनुसार २.३० लाख शाळाबाह्य मुलींना पूरक आहार दिला गेला. सदर पूरक आहार शाळेत गेलेल्या मुलींना दिला जातो किंवा कसे त्याचप्रमाणे सदरची आकडेवारी इ.बाबत महिला व बालविकास विभाग स्पष्टीकरण देऊ शकेल अशी धारणा आहे. तथापि,

शिक्षण व इतर विभाग (ICDS) यांच्याकडील आकडेवारीतील तफावत इ.संदर्भात शालेय शिक्षण विभागामार्फत सन २०१५-१६ मध्ये शाळाबाह्य मुलांचे व्यापक सर्वेक्षण करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे व त्यानुसार शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

शाळाबाह्य बालकांमध्ये कधीही शाळेत न आलेल्या, मध्येच शाळा सोडलेल्या स्थलांतरीत पालकांची बालके, शहरी भागातील वंचित बालके, तसेच विशेष गरजाधिष्ठित बालकांचा समावेश होता. या सर्व बालकांचा अचूक शोध घेऊन त्यांना नियमित शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याकरिता राज्य शासनाने दिनांक २० मे, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करून दिनांक ०४ जुलै, २०१५ रोजी एकाच दिवशी शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण करण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार संपूर्ण राज्यात सर्वेक्षण करण्यात आले. तदनंतर पुनश्च दिनांक २७ जुलै २०१५ ते ३१ जुलै २०१५ या दरम्यान सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाव्दारा आढळून आलेल्या शाळाबाह्य बालकांना नजिकच्या नियमित शाळेत प्रवेश देण्यात येत आहेत. तदनंतर शासन, स्थानिक प्राधिकरण व स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे काम करून शाळाबाहेरील बालकांना शाळेत आणणे व शाळेत टिकवून ठेवणे या दृष्टीने कार्यवाही करण्यासाठी व्यापक स्वरुपात योजना/आराखडा आयुकत, शिक्षण, शिक्षण संचालक, (प्राथमिक) यांच्या स्तरावर आखण्यात आला असून या अनुषंगाने जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्राचार्य डायट, शिक्षणाधिकारी (निरंतर), स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी, जिल्हा स्तरावरील NSS Co-ordinator तसेच जिल्ह्यातील इतर अधिकारी व अशासकीय संस्था यांचा समावेश असलेली समिती त्याचप्रमाणे तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विस्तार अधिकारी, अन्य तालुक्यातील अधिकारी, NSS प्रतिनिधी व अशासकीय संस्था यांचा समावेश असलेली समिती शासन पत्र दिनांक ०७ डिसेंबर २०१५ अन्वये गठीत करण्यात आली असून शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याचे नियोजन विविध बैठका घेऊन करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन त्यांच्या दिनांक २९ डिसेंबर २०१५ च्या पत्रानुसार सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), सर्व प्रशासन अधिकारी (म.न.पा./न.पा.), शिक्षण निरीक्षक, मुंबई यांना जिल्हा व तालुका स्तरावर बैठका घेऊन सर्वेक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी NSS यांच्या मदतीने रुपरेषा आखण्यासाठी नियोजन करण्यात आलेले आहे. अशाप्रकारे वर्षभरात वारंवार सर्वेक्षण करण्यात येणार असून त्यांना त्यातील नंबरही प्रदान केला जाणार आहे.

शासन परिपत्रक दिनांक ११ डिसेंबर २०१५ नुसार सन २०१६-१७ या वर्षासाठीच्या सर्व शिक्षा अभियान AWP & B संदर्भात नियोजन करण्यात येणार असून सदर नियोजनानुसार (१) १०० टक्के मुले पटावर आणणे, (२) १०० टक्के मुलांची नियमित हजेरी टिकविणे, (३) १०० टक्के मुलांची ठराविक संपादणूक क्षमता प्राप्त करून घेणे. या अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे. म्हणजेच सन २०१६-१७ पासून सर्व प्रकारची ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुले नियमित शाळेत दाखल होणार आहे. त्याचप्रमाणे स्थलांतरीत पालकांच्या मुलांना शिक्षण हमी कार्ड देऊन रितसर नोंद केली जाणार आहे.

वयानुरुप समकक्ष वर्गात ३० दिवसांपेक्षा सतत गैरहजर असणाऱ्या मुलांसाठी ३ महिन्यांचे व कधीही शाळेत न गेलेल्या मुलांसाठी ६ महिन्यांचे विशेष प्रशिक्षण देण्यात येते.

मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण :—

केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण आणि सर्व शिक्षा अभियानाचे यश या सांविधानिक जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) चा प्रारंभ मार्च, २००९ मध्ये केला होता. ही योजना राज्य शासनाबरोबर भागीदारीत राबविली जात आहे. RMSA योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना, प्रामुख्याने मुलींना मुलींसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे अंतर्भूत आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने (MPSP) केंद्र शासनाकडे २०१२-१३ दरम्यान नवव्या आणि १० व्या वर्गातील शासकीय आणि स्थानिक संस्थांच्या शाळातील ९९,०३६ मुलींसाठी एकूण रु. ४.९५ कोटी खर्चाचा स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा एक प्रस्ताव सादर केला होता. केंद्र शासनाने जुलै, २०१३ मध्ये प्रस्तावास पुनः वैधता मंजूरी दिली होती आणि रु. ३.७१ कोटी म्हणजे त्यांच्या हिश्श्याचे ७५ टक्के मंजूर केले होते. MPSP ने २०१३-१४ दरम्यान या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ३५ जिल्ह्यांपैकी ३४ जिल्ह्यातील ९६,०८१ मुलींला प्रशिक्षित करण्यासाठी रु. ४.३२ कोटी (केंद्र शासनाचा हिस्सा धरुन) मुक्त (नोव्हेंबर २०१३) केले होते. उर्वरीत रु. ०.६३ कोटी रक्कम ही कार्यक्रमाच्या मूल्यमापनासाठी राखून ठेवली होती.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, २०१३-१४ दरम्यान ९६,०८१ मुलींपैकी मार्च, २०१४ पर्यंत २४ जिल्ह्यातील फक्त ४४,३९७ (४६ टक्के) मुलींना प्रशिक्षण दिले गेले होते तर उर्वरीत १० जिल्ह्यात प्रशिक्षण दिले गेले नव्हते. अशाप्रकारे ३५,२६८ मुलींना कार्यक्रमाच्या लाभापासून वंचित ठेवले गेले होते. आठ निवड केलेल्या जिल्ह्यांपैकी दोन जिल्ह्यांमध्ये (नंदूरबार आणि ठाणे) ९,३२७ शोधलेल्या मुलींपैकी फक्त ६,२११ मुलींना (६७ टक्के) प्रशिक्षण दिले गेले होते. निवड केलेल्या उर्वरीत सहा जिल्ह्यात २५,५१८ मुलींना प्रशिक्षण दिले गेले नव्हते. नोव्हेंबर, २०१४ ला MPSP ला MPSP कडे रु. २.२९ कोटी अखर्चित रक्कम होती. या व्यतिरिक्त कार्यक्रम मुल्यमापनाची रु. ०.६३ कोटी रक्कम होती जिचा उपयोग केला गेला नव्हता.

उपसंचालक, MPSP नी असे सांगितले की, (सप्टेंबर, २०१४) मार्च, २०१४ पासून निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यामुळे १० जिल्ह्यांमध्ये या कार्यक्रमाची अंमलबजावणी होऊ शकली नव्हती. हे उत्तर स्विकारणीय नाही कारण, प्रशिक्षणाचे वेळापत्रक डिसेंबर, २०१३ पासून जानेवारी, २०१४ पर्यंत तयार केलेले होते.

ज्ञापन :

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये वार्षिक आराखडा व अंदाजपत्रकानुसार राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान योजनेकरिता रु. २७५९.९१ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी दिली होती. त्या अंतर्गत RMSA अंतर्गत Girls Oriented Activities या लेखाशिर्षाअंतर्गत Kishori Utkarsh Manch आणि Self Defence या उपक्रमाकरिता मान्यता देण्यात आली होती. परंतु सन २०१३-१४ मध्ये केवळ Kishori Utkarsh Manch या उपक्रमाकरिता १४८५ शाळांकरिता रु. १०,०००/- प्रमाणे रु. १४८.५० लक्ष इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली. सन २०१३-१४ मध्ये Self Defence या उपक्रमाकरिता रु. ४३२.३६ लक्ष निधी उपलब्ध होता.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे शासन निर्णय क्र.आरएमएसए १८१३/(८५/१३)/ माशि-७, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये प्रत्येक विद्यार्थीनीकरिता रु. ४५०/- प्रमाणे ९६०८१ विद्यार्थीनींकरिता रु. ४३२.३६ लक्ष इतका निधी जिल्ह्यांना वितरित करावा असे आदेश देण्यात आले. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्र.रामशिअ/स्व-संरक्षण /(८५/१३)/ २०१३/१२०५, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१३ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येऊन ९६०८१ विद्यार्थीनींना रु. ४५०/- प्रमाणे जिल्ह्यांना रु. ४३२.३६ लक्ष इतका निधी पत्र क्र.रामाशिअ/ RMSA/ २०१२/ लेखा/(४७/१२)/२०१३, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ अन्वये ECS व्दारे वितरित करण्यात आला.

दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयात मुद्दा क्र. ४ अन्वये समितीची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीचे अध्यक्ष पद जिल्हाधिकारी व उपाध्यक्ष पद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आले होते. तसेच महापालिका स्तरावर आयुक्त, महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. संबधित जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरचा उपक्रम राबविण्याबाबत आवश्यक कार्यवाही शासन निर्णयाप्रमाणे करणे अपेक्षित होते.

दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ अन्वये रामाशिअ कार्यालयातर्फे सर्व ३५ जिल्ह्यांना निधी वितरित केला होता. रामाशिअ ही योजना केवळ सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांपुरती मर्यादित असल्याने रत्नागिरी वगळता (या जिल्ह्यात एकही सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांचे माध्यमिक विद्यालय नाही) अन्य जिल्ह्यांना निधी वितरित करण्यात आला. राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. तथापि, बीड, जालना, नाशिक, परभणी, सोलापूर आणि वाशिम या जिल्ह्यांनी न राबविल्यामुळे निधी संबधित जिल्ह्यांकडेच अखर्चित राहिला.

काही जिल्ह्यांमध्ये निवडणूक आचारसंहिता तसेच काही ठिकाणी मा.आयुक्त महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीची बैठक न झाल्याने सदरची रक्कम अखर्चित राहिली.

मुलींसाठी PACE-IIT योजनेच्या अंमलबजावणीबाबत :–

महाराष्ट्र शासनाकडे II Tian PACE या खाजगी प्रशिक्षण संस्थेकडून IIT ची परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना १० इयत्ता उत्तीर्ण झालेल्या गुणवंत मुलींसाठी ज्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. एका लाखापेक्षा कमी आहे त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी एक स्वयंस्फुर्त प्रस्ताव प्राप्त झाला होता (जुलै, २०११). या प्रस्तावानुसार महाराष्ट्र शासनाने राज्यातील ५० मुलींसाठी दोन वर्षाकरिता रु. ७,५००/- प्रति महिना प्रदान करायचे होते. संस्थेला या मुलींना दोन वर्षासाठी मोफत उच्च माध्यमिक शिक्षण द्यायचे होते. बरोबरच IIT प्रवेश परीक्षेसाठी प्रशिक्षण द्यायचे होते. त्यानुसार W & CD ने जुलै, २०११ मध्ये रु. एक कोटीचे एक अंदाजपत्रक तयार करून महाराष्ट्र शासनाच्या नियोजन आणि वित्त विभागाला सादर केले होते. तथापि, विभागांकडून दोन वर्षांनी म्हणजे जुलै, २०१३ ला प्रस्तावास मंजूरी मिळाली परिणामी W & CD ला या योजनेची सुरूवात जुलै, २०१३ पासूनच करता येऊ शकली.

दस्तऐवजांच्या तपासणीवरुन असे आढळून आले की, आयुक्त W & CD पुणे यांनी १० वी इयत्ता उत्तीर्ण झालेल्या मुलींच्या निवडीसाठी सप्टेंबर, २०१३ मध्ये प्रवेश परीक्षा घेण्यासाठी ऑगस्ट, २०१३ मध्ये जाहिरात दिली होती. तथापि, २०१३-१४ (जून, २०१३ ते मे २०१४) या शैक्षणिक वर्षाची सुरूवात झाली असल्यामुळे या योजनेस प्रतिसाद मिळाला नव्हता. अखेर शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून पहिल्या तुकडीची सुरूवात झाली ज्यासाठी या संस्थेत दाखल झालेल्या ४९ मुलींची निवड करण्यात आली होती. अशाप्रकारे, योजनेला दोन वर्षे (२०१२-१३ व २०१३-१४) विलंबाने दिलेल्या मंजूरीमुळे गरीब कुटूंबातील १०० गुणवंत मुलींना या योजनेच्या लाभाचा फायदा मिळू शकला नाही.

अंतिम बैठकीत प्रधान सचिव W & CD यांनी वस्तुस्थिती मान्य केली.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे

शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०११ प्र.क्र.२१३/का-३, दिनांक ९.७.२०१३ पासून राज्यातील मुलींच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा होण्याच्या दृष्टीने इयत्ता ११ वी मध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या IIT/JEE इंटरनॅशनल ऑलम्पियाड इत्यादी अशा स्पर्धात्मक परिक्षांच्या पूर्व तयारीसाठी

मोफत मार्गदर्शन देण्याबाबत IIT ians PACE या संस्थेमार्फत देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला त्यानुसार सन २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षामध्ये अनुक्रमे ४९ व ५० मुलींची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेली आहे व प्रशिक्षण नियमितपणे सुरू आहे.

मुलींच्या माध्यमिक शिक्षणासाठी प्रोत्साहन योजनेच्या अंमलबजावणीस विलंब :—

केंद्र शासनाने मुलींना माध्यमिक शिक्षणासाठी प्रोत्साहन या नावाने केंद्र पुरस्कृत योजना मंजूर केली होती. (जुलै, २००८) या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार रु. ३००० ची राशी प्रत्येक पात्र मुलीच्या नावाने जमा करायची आहे. जी राशी ती मुलगी १८ वर्षाची झाल्यावर काढू शकते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ती मुलगी नवव्या इयत्तेत असताना अविवाहित आणि १६ वर्षाखालील (प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला) असायला हवी. ही योजना राज्य सरकारच्या शासन अनुदानित किंवा स्थानिक संस्थांमधील सगळ्या एससी/एसटी मुली ज्या आठवी इयत्ता उत्तीर्ण झाल्या आहेत आणि नवव्या वर्गात दाखल झाल्या आहेत अशा सगळ्या मुलींना शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून लागू आहे. राज्याला या योजने अंतर्गतचा एकत्रित प्रस्ताव केंद्र शासनास शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून तीन महिन्याच्या आत पाठवावयाचा होता.

शिक्षण संचालनालय (माध्यमिक आणि उच्च माध्यमिक) पुणे यांच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की केंद्र शासनाला सादर करण्याची माहिती जिल्ह्यांकडून विलंबाने प्राप्त झाल्यामुळे राज्यात या योजनेची पहिली तीन वर्ष (२००८-०९, २००९-१० व २०१०-११) अंमलबजावणी होऊ शकली नव्हती परिणामी या योजनेंतर्गत २००८-२०११ दरम्यान १.५८ लाख लाभार्थी मुली लाभापासून वंचित राहिल्या होत्या. २०११-१२ (१६.७१ कोटी) आणि २०१२-१३ रुपये १५.२८ कोटी अनुक्रमे ५५,७०४ आणि ५०९३५ लाभार्थी मुलींसाठी केंद्र शासनाने पाठविलेली अनुदाने लाभार्थ्यांच्या खात्यात बँक खाते उघडण्यातील अडचणीमुळे होऊ शकली नव्हती. (ऑक्टोंबर, २०१४).

तसेच राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांपैकी महाराष्ट्र शासनाने २०११-१२ दरम्यान २५ जिल्यांची वर्ष २०१२-१३ दरम्यान २८ जिल्ह्यांची आणि २०१३-१४ दरम्यान २४ जिल्ह्यांचीच माहिती केंद्र शासनास पाठविली होती अशा प्रकारे उर्वरीत २५ जिल्ह्यातील संभाव्य लाभार्थी २०११-१४ या दरम्यान योजनेपासून पूर्णपणे वगळले गेले होते. महाराष्ट्र शासनाने २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठी पाठविलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी ऑक्टोबर, २०१४ पर्यंत मिळाली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

माध्यमिक शाळेतील मुलींना राष्ट्रीय योजनेतून रु. ३०००/- प्रोत्साहनपर भत्ता योजना

माध्यमिक शाळेतील इ.९ वी मध्ये शिकत असलेल्या अुन.जाती/जमातीच्या मुली व कस्तुरबा गांधी बालीका विद्यालयातील सर्व मुलींना राष्ट्रीय योजनेतून रु. ३०००/- प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी सदर योजना केंद्र शासनाने सन २००८-०९ पासून सुरू केली. सदर योजना अविवाहित मुलींनाच लागू आहे. पात्र विद्यार्थीनींना शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच सदर योजनेचा लाभ देण्यात येतो.

पात्र विद्यार्थीनीचा बँक खाते क्रमांक नमूद करूनच केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात येतो. या योजनेअंतर्गत राज्याचा एकत्रित प्रस्ताव शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून तीन महिन्यापर्यंत पाठविणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थीनी शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पास/नापास विद्यार्थ्यांची माहिती केंद्र शासनास सादर करण्यात येते. तद्नंतर शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीनींच्या बँक खात्यात प्रोत्साहनपर भत्याची रक्कम जमा करण्यात येते.

सन २००८-०९ व २००९-१० :—

संचालनालयाचे पत्र एम.आयएससी/२००९/जीएससी/१५ क (०९) दिनांक ३/६/२०१० अन्वये २८ जिल्ह्यांची मुंबई-उत्तर, पश्चिम व दक्षिण, रायगड, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, भंडारा, वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ या जिल्ह्यांची माहिती (७०८१३ लाभार्थी) केंद्र शासनास सादर केली आहे. त्यानंतर संचालनालयाचे पत्र क्र.एमआयएससी/ २००९/जीएससी/१५ क (०९) दिनांक २०/११/२०१० अन्वये उपरोक्त ७०८१३ व्यतिरिक्त नांदेड या एका जिल्ह्याच्या १३२ लाभार्थ्यांचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला आहे.

सन २००८-०९ व २००९-१० मध्ये केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ.नं.७-१/२०११ एसएस दिनांक २७/६/२०११ अन्वये सन २००८-०९ व २००९-१० या वर्षातील सदर योजनेचे प्रस्ताव पात्र विद्यार्थीनींना अनुदान मंजूर करण्याकरिता राज्य शासनाकडून प्राप्त झालेले आहेत तसेच वार्षिक अंदाजपत्रकाच्या तरतूदीतील आर्थिक अडचणीनुसार तसेच सन २००८-०९ व २००९-१० मधील मुली ह्या इ.११ वी व इ.१२ वी मध्ये गेल्यामुळे सन २००८-०९ व २००९-१० या आर्थिक वर्षातील सदर योजनेचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत असा निर्णय योग्य सक्षम प्राधिकारांच्या संमतीनुसार घेतला असल्याचे कळविले आहे.

सन २०१०-११ :–

संचालनालयाचे पत्र क्र.अमाशा/२०११-१२/४५८४१/जी/१५ क (०९) दिनांक २०/०३/२०१२ व दिनांक १७/४/२०१३ अन्वये २८ जिल्ह्यांचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. (मुंबई-उत्तर, पश्चिम व दक्षिण, रायगड, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग, बीड, परभणी, लातूर, हिंगोली, उस्मानाबाद, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, अकोला व यवतमाळ).

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाचे पत्र क्र.७-१/२०११-एसएस दिनांक १४/५/२०१२ अन्वये वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये असलेल्या आर्थिक अडचणींमुळे योग्य प्राधिकारांच्या संमतीने सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नसल्याचे कळविले आहे.

सन २०११-१२ :–

संचालनालयाचे पत्र दिनांक २/५/२०१२ व दिनांक १७/८/२०१२ अन्वये २९ जिल्ह्यांची माहिती केंद्र शासनास सादर करण्यात आलेली आहे. जिल्हे पुढीलप्रमाणे (शिक्षण निरीक्षक (उत्तर), मुंबई, शिक्षण निरीक्षक, (पश्चिम), मुंबई, रायगड, धुळे जळगाव, नाशिक, पुणे अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी, सिधुदुर्ग, औरंगाबाद, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, अमरावती, वर्धा, नंदूरबार)

माहिती अप्राप्त असणारे जिल्हे :- ठाणे, सोलापूर, जालना, नांदेड, नागपूर, वाशिम, शिक्षण निरीक्षक (दक्षिण)

या योजनेअंतर्गत सन २०११-१२ साठी निधी मंजूर झालेला असून सदर वर्षातील लाभार्थ्यांना Maturity Payment करण्यासाठी १३ जिल्ह्यांकडून प्राप्त २१,८६० मुलींची यादी केंद्र शासनास संचालनालयाच्या दिनांक २३/०४/२०१४ च्या पत्रान्वये सादर केली आहे. उर्वरीत जिल्ह्यांकडून माहिती Maturity Payment करण्यासाठी १४ जिल्ह्यांकडून प्राप्त १५,९३४ मुलींची यादी केंद्र शासनास दिनांक २३/९/२०१५ च्या पत्रान्वये सादर केली आहे.

सन २०१२-१३ :–

सदर योजनेबाबत सन २०१२-१३ या वर्षात संचालनालयाच्या दिनांक २४/०७/२०१२ च्या पत्रान्वये २८ जिल्ह्यांची [मुंबई (उत्तर), मुंबई (पश्चिम), मुंबई (दक्षिण), रायगड, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, भंडारा, परभणी, लातूर, उस्मानाबाद, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, यवतमाळ, अकोला, जळगांव, बुलढाणा, बीड, सांगली, अमरावती, पुणे, जालना, अहमदनगर] व दिनांक ५/८/२०१३ च्या पत्रान्वये २ जिल्ह्यांची (गडचिरोली, औरंगाबाद व बीड (अतिरिक्त माहिती) अशी एकूण ३० जिल्ह्यांची माहिती संचालनालयाच्या स्तरावरुन उप सचिव, मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यात आलेली आहे. ३० जिल्ह्यातील एकूण लाभार्थ्यांची संख्या ५०९३५ इतकी सादर केलेली आहे.

सदर योजनेन्वये सन २०१२-१३ साठी निधी मंजूर झालेला असून सदर वर्षातील लाभार्थ्यांना Maturity Payment करण्यासाठी १४ कॉलममध्ये लाभार्थ्यांची माहिती पाठविणेबाबत केंद्र शासनाच्या एफ न.७-१६/२०१२ दिनांक ३१/०७/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्या अनुषंगाने दिनांक २७/१०/२०१५, २१/०१/२०१६ च्या पत्रान्वये १४ कॉलममध्ये माहिती पाठविणेबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविण्यात आलेले आहे. शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीनींची माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सन २०१३-१४ :–

सदर या योजनेबाबत संचालनालयाच्या स्तरावरुन सन २०१३-१४ साठी २४ जिल्ह्यांकडून प्राप्त ३४,१०० मुलींची यादी केंद्र शासनास संचालनालयाच्या दिनांक २३/०४/२०१४ च्या पत्रान्वये सादर केली आहे. सन २०१३-१४ बाबत केंद्र शासनाचे मंजूरीचे आदेश प्रतिक्षाधीन आहे.

सन २०१४-१५ :–

या योजनेबाबत संचालनालयाच्या स्तरावरुन सन २०१४-१५ साठी ३२ जिल्ह्यांकडून प्राप्त ५१,७४४ मुलींची यादी केंद्र शासनास संचालनालयाच्या दिनांक १९/०९/२०१५ च्या पत्रान्वये सादर केली आहे. सन २०१४-१५ बाबत केंद्र शासनाचे मंजूरीचे आदेश प्रतिक्षाधीन आहे.

सदर माहिती वेळेत केंद्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. माहिती वेळेत संचालनालयास प्राप्त होत नाही. त्यामुळे केंद्र शासनास माहिती सादर करण्यास विलंब होतो. पात्र विद्यार्थ्यांची माहिती शाळेच्या मुख्याध्यापकांकडून तालुकास्तरावर व तालुकास्तरावरुन जिल्हास्तरावर सादर करण्यात येते. तालुक्यांची माहिती एकत्रित करून ती जिल्ह्यांना संचालनालयास सादर करावी लागते. तसेच काही वेळेला संचालनालयास सादर केलेल्या माहितीमध्ये त्रुटी असतात. त्रुटीची पुर्तता पुन्हा त्या क्रमाने संचालनालयात येते. सदर योजनेची माहिती लाभार्थ्यांचे खाते उघडून संचालनालयास प्राप्त होत असल्यामुळे माहिती विलंबाने संचालनालयास प्राप्त होते. त्यानंतर ती माहिती केंद्र शासनास सादर केली जाते. सदर

प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यासाठी विलंब होतो. योजनेबाबत अनेकवेळा सभेमध्ये शिक्षणाधिकारी यांना सूचनाही दिलेल्या आहेत. शाळा, तालुका, जिल्हास्तरावर माहितीचे संकलन असल्याने व या योजनेच्या बाबतीत पात्र मुलीचा प्रस्ताव व दोन वर्षानंतर उत्तीर्ण मुलीची माहिती संकलन असल्याने प्रस्तावित विद्यार्थीनीपैकी उत्तीर्ण विद्यार्थीनीचीच माहिती पुन्हा संकलित करावी लागत असल्याने माहितीस अधिकचा कालावधी लागतो.

केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यास विलंब होत असल्याने सन २०१५-१६ पासून केंद्र शासनाने सदर शिष्यवृत्तीसाठी National Scholarship Portal (*www.scholarship.com*) नावाचे पोर्टल तयार केले आहे. ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरण्यासाठी शाळांना/ शिक्षणाधिकाऱ्यांना लॉगिन देण्यात आलेले आहे. शाळांकडून व जिल्ह्यांकडून ऑनलाईन माहिती घेऊन केंद्र शासनास विहित वेळेत ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव विहित वेळेत सादर करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

१.६ बायोमेट्रिक हजेरी प्रणालींची अंमलबजावणी न केल्यामुळे बालगृहांना वाढीव दराने देखभाल अनुदानाचे प्रदान झाले नाही :–

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्यता विभागाने (SJSA), मे. एस. ब्रेन सिस्टिम (पुरवठादार) पुणे यांचेकडे NGOs आणि W&CD कडून चालविल्या जाणाऱ्या ९६९ बालगृहासाठी रु २.५९ कोटी किंमतीच्या ९६९ बायोमेट्रिक हजेरी प्रणालींचा (BMAS) पुरवठा करण्याचा आदेश दिला (एप्रिल २०११). BMAS ने मुलांची बोगस आकडेवारी सादर होण्यास आळा घालून प्रत्यक्ष हजर असलेल्या मुलांच्या संख्येची नोंद घेणे अपेक्षित होते आणि त्याव्दारे बालगृहांकडून अनुदानाची खरी मागणी (अन्न व कपडयांसाठी) केली जाईल याची खात्री करणे आवश्यक होते. पुरवठादाराने सर्व कर्मचारी/मुलांची माहिती बोटांच्या ठश्यांव्दारे घेऊन ती सर्व माहिती SIM कार्डमध्ये साठवून ठेवण्याच्या कामाचा करारात अंतर्भाव होता. त्या नंतर SIM कार्डवरील माहिती मध्यवर्ती सर्व्हरमध्ये अपलोड करणे आवश्यक होते.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, SJSA ने पुरवठादाराला दिलेल्या पुरवठा आदेशात BMAS कार्यरत होण्यासाठी SIM कार्डचा पुरवठा करण्याची तरतूद नव्हती निर्धारीत जुलै २०११ तारखे ऐवजी आगस्ट २०१४ पर्यंत ९६९ BMAS पैकी फक्त ८१६ BMAS चा पुरवठा केला केला गेला होता. तथापि SIM कार्डस उपलब्ध नसल्यामुळे ८१६ BMAS पैकी एकही BMAS कार्यरत होऊ शकली नव्हती. तसेच करारानुसार मध्यवर्ती सर्व्हरला सर्व माहिती अपलोड केल्यानंतर आणि त्याच्या २४ दिवसांच्या समाधानकारक कार्यानंतरच पुरवठादार ९० टक्के रक्कम मिळण्यास पात्र होणार होता. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, मध्यवर्ती सर्व्हरला माहिती जरी अपलोड केली नव्हती तरी नोव्हेंबर २०११ आणि जून २०१३ दरम्यान SJSA ८१६ BMAS संबंधि ९० टक्के म्हणजेच रु. १.९७ कोटी पुरवठादाराला प्रदान केले होते.

NGOs आणि W&CD व्दारे चालविण्यात येणाऱ्या सर्व बालगृहांना मुलांच्या अन्न आणि वस्त्राच्या खर्चापोटी रु ६३५ प्रति माह बालक एवढे देखभाल अनुदान W&CD कडून देण्यात येत होते. देखभाल अनुदानाच्या राशीचे पुनर्विलोकन करण्यासाठी मे २०१० मध्ये एक सचिव स्तरीय समिती गठीत करण्यात आली होती, जिने देखभाल अनुदानाची राशि रु. ६३५ वरुन वाढवून रु. ९०० प्रति बालक करण्याची शिफारस केली होती. तथापि, W&CD ने यासाठी सप्टेंबर २०१३ मध्ये एक शासन निर्णय (GR) जारी केला होता ज्यातील विहित अटींनुसार ज्या बालगृहांमध्ये BMAS कार्यरत आहेत आणि ट्रॅक चाइल्ड संकेतस्थळावर२८ मुलांसंबंधीची सगळी माहिती अपलोड केली आहे फक्त हीच बालगृहे वाढीव दराने देखभाल अनुदानास पात्र होती. तथापि, ८३,६७१ बालके, (यात २२,६४५ मुली होत्या) असलेल्या सर्व ९६९ बाल गृहांमध्ये BMAS ची अंमलबजावणी न झाल्यामुळे वाढी व देखभाल अनुदानापासून ही बालगृहे वंचित राहिली.

अशाप्रकारे, बालगृहातील बालकांच्या बनावट नोंदींना प्रतिबंध केला जात असल्याची खात्री देऊ शकेल आणि त्याव्दारे बालगृहात भरती करण्यात झालेल्या बालकांच्या नोंदीच्या आधारावर त्यांना वितरीत करण्यात येणाऱ्या शासकीय निधिच्या गळतीस आळा घालू शकेल अशी एक महत्त्वपूर्ण तांत्रिक व्यवस्था मागील तीन वर्षांपासून कार्यान्वीत होऊ शकली नव्हती. परिणामी, बालगृहांना वाढीव दराने देखभाल अनुदान प्राप्त होऊ शकले नाही.

अंतिम बैठकीत, प्रधान सचिव W&CD यांनी सांगितले की हे प्रकरण सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे संदर्भित केले जाईल.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१०/प्र.क्र.१८/मावक-४, दिनांक ३०.३.२०११ अन्वये सामाजिक न्याय विभागाअर्तगत कार्यरत शासकीय व अनुदानित वसतीगृहे/आश्रमशाळा/अपंगशाळा तसेच, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग विभागाअतर्गत कार्यरत अनुदानित आश्रमशाळा व महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत असलेले शासकीय व अनुदानित बालगृहे निरीक्षणगृहे अनुरक्षणगृहे या ठिकाणी बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली लागू करण्यास शासनानी मान्यता देण्यात आलेली आहे.

यंत्र पुरवठयाबाबत माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दर करारानुसार ९६९ बालगृहांसाठी रु २६,८००/- प्रमाणे रु. २,५९,६९,२००/- इतकी रक्कम संबंधीत यंत्रणेस शासनाने मंजूर केलेली आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णयात नमूद केल्यानुसार संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी दिनांक ६/४/२०११ अन्वये महिला व बाल विकास विभागांतर्गत ९६९ संस्थांसाठी संयंत्राचा पुरवठा करणेसाठी कार्य आरंभ आदेश (Work Order) निर्गमित केलेले आहेत. शासनाने मान्यता दिलेल्या ९६९ संस्थांसाठी सिमकार्ड बसविणेसाठी रु. ७२८/- प्रमाणे लागणारी रक्कम रु. ७,०५,४३२/- चे कार्य आरंभ आदेश (Work Order) क्र. २३५१, दिनांक ३०-०३-२०१३ अन्वये काढण्यात आलेले आहेत. त्यानुसार मान्यता दिलेल्या ९६९ संस्थांपैकी आतापर्यंत ८६९ एवढे यंत्र पुरवठा करून बसविण्यात आलेले आहेत. त्यासाठी आतापर्यंत ७४ कार्यशाळा झाल्याचे कळविले आहे. उर्वरित १३६ संस्थामध्ये बायोमेट्रीक संयंत्र बसविणे बाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.उर्वरीत यंत्र बसविणे व ते कार्यान्वीत करणेबाबत संबंधीत अेसब्रेन सिस्टिम अॅन्ड सॉफ्टवेअर प्रा.लि.पुणे यांना आयुक्तालयाचे पत्र क्र. ४००३ दिनांक १७-०७-२०१५ अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच संस्थामध्ये संयत्र बसवून घेणे व बंद असल्यास ते कार्यान्वीत करण्याची जबाबदारी ही संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची राहील याबाबत सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना आयुक्तालयाचे पत्र क्र. ४००३, दिनांक १७.७.२०१५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

१.७ बाल / निरीक्षण गृहांची संयुक्त प्रत्यक्ष तपासणी :—

निवड केलेल्या आठ जिल्ह्यांतील १४ बाल / निरीक्षण गृहांच्या W&CD प्रतिनिधीसह केलेल्या संयुक्त प्रत्यक्ष तपासणीत खाली तक्ता २.१.१५ मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे प्राथमिक सुविधांचा अभाव आढळून आला.

तक्ता २.१.१५: बाल/निरीक्षण गृहांच्या संयुक्त प्रत्यक्ष तपासणीचे निष्कर्ष

अ.क्र	जिल्ह्याचे नाव	बालगृहे/निरीक्षण गृहाचे नाव (लेखापरिक्षेकडून प्रत्यक्ष तपासणी केल्याची तारीख)	लेखापरीक्षा निरीक्षणे
१	२	३	४
१	नंदूरबार	इंदिरा महिला सेवा संस्थेचे मुलींचे (०९ मे २०१४)	बालगृहाला संरक्षक भींत नव्हती आणि स्नानगृहे, शौचालये अस्वस्छ व मोडकळीस आलेली होती आणि दारे मोडलेली होती. मुलींची नियतकालीक वैद्यकीय तपासणी केली नव्हती. जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी (DWCDO), नंदूरबार यांनी निरीक्षण मान्य (जून २०१४) केली आणि सांगितले की, या कमतरता लवकरच सुधारल्या जातील.
२	ठाणे	जिल्हा परिविक्षा व परीविक्षा पश्चात संगोपन संघटना, ठाणे निरीक्षण गृह, मुले आणि मुलींसाठी बालगृह, भिवंडी, ठाणे (१७ जून २०१४)	येथे मंजूर सहा काळजीवाहक/आयांच्या पदांऐवजी फक्त दोनच काळजीवाहक आया होत्या. व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्याची जरी आवश्यकता होती तरी निदेशक/शिक्षक नसल्यामुळे ते दिले गेले नव्हते. शौचालय आणि स्वच्छतागृहे दरवाज्यांविना होती आणि तिथे सुरक्षारक्षक नव्हता. तसेच काळजी आणि सुरक्षा आवश्यक असणाऱ्या मुलांना व विधि संघर्षातील मुलांना वेगळे ठेवण्याची व्यवस्था न करता बरोबरच ठेवले होते. पर्यवेक्षक, बालगृह, भिवंडी यांनी निरीक्षण मान्य (जुलै २०१४) केली.
३	ठाणे	शासकीय मुलींचे निरीक्षण गृह/विशेष गृह, उल्हासनगर, ठाणे (१८ जून २०१४).	हे निरीक्षण गृह एप्रिल २००३ पासून रिकामे आहे. या निरीक्षणगृहाला संरक्षक भिंत, विद्यूत जोडणी, खिडक्या आणि जाळया नव्हत्या. तसेच भिंतीना असंख्य तडे गेलेले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाला (PWD) २००९ पर्यंत दुरुस्तीसाठी रु. ६१.५८ लाख मंजूर केले होते. त्यानंतर (DWCDO), ठाणे यांनी अनेकदा स्मरणपत्रे देऊनही PWD ने सुधारीत अंदाजपत्रक दिले नव्हते.

(१)	(२)	(३)	(४)
४	नांदेड	मुलींसाठी सुमन बालगृह नांदेड (१९ मे २०१४).	या बालगृहाची क्षमता ५० मुलांची होती आणि भेटीच्या दिवशी या ठिकाणी ३१ मुली होत्या. असे आढळून आले की, जिल्ह्यात मुलींसाठी वेगळे निरीक्षण गृह नसल्यामुळे, विधी संघर्षातील मुलींही याच मुलींबरोबर राहात होत्या. एक मुलगी १ मे २०१४ पासून हरवलेली होती तरी त्याबाबत प्राथमिक माहिती अहवाल न नोंदविता फक्त पोलीस तक्रारच करण्यात आली होती. यावरुन मुलींची सुरक्षितता फार गंभीरपणे घेतली जात नव्हती असे दिसून येते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

नंदूरबार इंदिरा महिला सेवा संस्थेचे मुलींचे बालगृह बंदीस्त असून संरक्षण दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच स्नानगृहे, शौचालये यांची दुरुस्ती करण्यात आलेली असून स्नानगृहे, शौचालये यांना दरवाजे बसविण्यात आलेले आहेत. स्नानगृहे, शौचालये यांची नियमितपणे स्वच्छता केली जाते. बालगृहातील मुलींची नियमकालीक वैदयकीय तपासणी नियमित केली जाते.

त्याबाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, नंदुरबार मार्फत सदर त्रुटी पुर्तते बाबत पाठ पुरावा करून संस्थेने वरील प्रमाणे नमुद सर्व त्रुटी पुर्तता केलेली आहे. ठाणे सद्यस्थितीत निरीक्षणगृह मुलांचे/ मुलींचे भिवंडी जिल्हा ठाणे या संस्थेत काळजीवाहक / आया सात पदे भरलेली आहेत. तर ३ पदे रिक्त आहेत. तसेच स्नानगहे व स्वच्छतागृहे संरक्षित करण्यात आलेली असून काळजी व संरक्षणाची गरज असलेले व विधी संघर्षग्रस्त बालके स्वतंत्र ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे.

ठाणे शासकिय मुलींचे निरीक्षणगृह / विशेषगृह उल्हासनगर ठाणे या संस्थेतील संरक्षण भिंतीची ऊंची वाढवणे दुरुस्त करणे दरवाजे खिडक्यांची दुरुस्तीं, ग्रील बसवणे,पाण्याची टाकी बांधणे,पंप रूम,लादी काम इत्यादी कामासाठीचे कार्यकारी अभियंता ठाणे बांधकाम विभाग ठाणे यांनी सुधारित अंदाजपत्रक सादर केलेले असून त्यानुसार प्रशासकिय मान्यतेस्तव प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता.तथापि सदर प्रस्तावात आढळून आलेल्या त्रूटींच्या अनुषंगाने अतिरिक्त माहिती मागविण्यात आलेली आहे.

नांदेड मिनाक्षी महिला मंडळ संचलित सुमन मुलींचे बालगृह नांदेड या संस्थेतील एक मुलगी १ मे, २०१४ पासून हरवली होती. त्याबाबत प्राथमिक अहवाल न नोंदविता पोलिस तक्रार करण्यात आली असे नमूद केले आहे.परंतु सदर मुली बाबत संस्थेने विमानतळ पोलिस स्टेशन नांदेड येथे २४ तासाच्या आत लेखी तक्रार दिलेली आहे. तसेच संबंधित पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक यांनी सरकार तर्फे फिर्यादी होऊन अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करून प्राथमिक अहवाल नोंदविला आहे.तसेच सदर मुलींच्या मिसिंग बाबतची माहिती *www.trackthemissigchild.gov.in* या संकेतस्थळावर नोंदविण्यात आली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील तरतुदींनुसार निरीक्षणगृह/बालगृहे या संस्थांमध्ये बालके फरार झाल्यानंतर त्याचा तात्काळ सर्वत्र शोध घेऊन बालक फरार झाल्याबाबत पोलिस ठाण्यामध्ये तात्काळ तक्रार दाखल करण्याबाबत संबंधीताना/ बाल कल्याण समितीला सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहे.

मनोधैर्य योजनेची अंमलबजावणी :—

महाराष्ट्र शासनाने २ ऑक्टोबर, २०१३ ला किंवा त्यानंतर बलात्कार, लैंगिक छळ आणि ॲसिड हल्ला पिडीत मुलीच्या पुनर्वसनासाठी मनोधैर्य योजनेची सुरूवात केली होती (ऑक्टोबर, २०१३). या योजनेची अंमलबजावणी W&CD द्वारे करावयाची होती. या योजनेंतर्गत प्रत्येक बलात्कार पिडीत आणि लैंगिक छळ झालेल्या मुलीला रूपये दोन लाख (विशेष प्रकरणात रूपये तीन लाख) तर ॲसिड हल्ला झालेल्या मुलीला रू. ५० हजार द्यायचे होते. जिल्हाधिकारी, अध्यक्ष DWCDO (सदस्य सचिव), पोलीस अधिक्षक, जिल्हा शल्य चिकीत्सक आणि जिल्हा सरकारी वकील अशा पाच सदस्य असलेल्या एका जिल्हास्तरीय समितीमार्फत पिडीत मुलीला अर्थसहाय्य मंजूर करावयाचे होते. पिडीत मुलीने प्राथमिक माहिती अहवाल (FIR) दाखल केल्यापासून प्रकरणांच्या मंजुरीकरीता ७ दिवसांच्या आत समितीने पहिली बैठक घ्यावयाची होती आणि मंजुरीपासून १५ दिवसांच्या आत W&CD ने पिडीत मुलीला आर्थिक सहाय्य द्यायचे होते.

वर्ष २०१३-१४ मध्ये W&CD ने या योजनेसाठी रू. ५.१० कोटीची तरतूद केली होती. ऑक्टोबर, २०१३ ते मार्च २०१४ दरम्यान ८७६ FIRsदाखल झाले होते.समितीने ४१० प्रकरणांत (यांत २६० अल्पवयीन मुलींची प्रकरणे संमिलीत आहेत)मंजूरी दिली होती.त्यापैकी २९६

प्रकरणांत रू.५.०४ कोटीचे प्रदान केले गेले आणि उर्वरित ११४ प्रकरणांत अपुऱ्या निधीमुळे प्रदान होऊ शकले नव्हते. निवड केलेल्या जिल्ह्यांमध्ये १८५ मंजूर प्रकरणांपैकी (यात ६४ अल्पवयीन मुलींची प्रकरणे संमिलीत आहेत.),१०० पिडीतांना रू.१.८१ कोटीचे अर्थसहाय्य दिले होते. उर्वरित ८५ प्रकरणे समितीने मंजूर केली होती तरीही अपूरा निधी (४४ प्रकरणे), वैद्यकिय अहवाल उपलब्ध नसणे (६ प्रकरणे) पुन:पडताळणीची प्रकरणे (३ प्रकरणे) आणि बँकेत खाते उघडलेले नसणे (३२ प्रकरणे) या कारणांकरिता १ ते २५७ दिवसांच्या कालावधीकरिता प्रदानासाठी प्रलंबित होती (ाक्टोबर २०१४) .१८५ मंजूर प्रकरणांपैकी १४६ प्रकरणात FIR दाखल केल्यापासून ७ दिवसांच्या आत बैठक घेण्यात समिती अपयशी ठरली होती. हा विलंब १ ते १३२ दिवसांचा होता. वरील १०० प्रकरणांत ज्या ठिकाणी आर्थिक साहाय्य हे W&CD द्वारे वितरित करायचे होते.तो विलंब १ ते २०१ दिवसांचा होता. महिला/बालिकांवरील ॲसिड हल्ले हे अत्यंत निंदनीय असूनही लेखापरीक्षेत असे आढळून आले की २०१० ते २०१३ या वर्षासाठी महाराष्ट्र शासनाच्या गुन्हे अन्वेषण विभागाने तयार केलेल्या महाराष्ट्रातील गुन्हे या वार्षिक अहवालात ते स्वतंत्रपणे वर्गीकत करून दर्शविले नव्हते.

अंतिम बैठकीत प्रधान सचिव,W&CD यांनी अपुऱ्या निधीमुळे या योजनेखाली पिडीतांना अर्थसहाय्य देण्यास विलंब झाल्याचे मान्य केले आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

शासनाने बलात्कार पिडीत महिला लैंगिक अत्याचारास बळी पडलेली बालके ॲसिड हल्यात बळी पडलेल्या महिला व बालके यांच्यासाठी अर्थ सहाय्य देण्याकरिता मनोधैर्य योजना सुरू केली. सदर योजना दिनांक २/१०/२०१३ रोजी व त्यानंतर घडलेल्या घटनांसाठी लागू आहे. योजनेतील निकषांनुसार घटनेबाबत एफ.आय.आर.दाखल झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्षती सहाय्य व पुर्नवसन मंडळाने अर्थ सहाय्याबाबत निर्णय घेऊन पिडीतास १५ दिवसांच्या आत अर्थ सहाय्य अदा करावयाचे आहे.

योजना सुरू झाल्यापासून मार्च २०१४ पर्यंत जे एफ.आय.आर. दाखल झाले आहेत. त्यापैकी काही प्रकरणांत विहीत कालावधीत शासन निर्णयाप्रमाणे निर्णय घेण्यात आला नाही किंवा विहीत कालावधीत अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. सदर प्रकरणी विलंब होण्याची काही सर्वसाधारण कारणे आहेत. त्यामध्ये,—

(१) बैठकीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून कार्यबाहूल्यामुळे दिनांक व वेळ मिळण्यासाठी काही अवधी लागतो . त्यामुळे बैठकीसाठीची विहीत कालमर्यादा पाळणे शक्य होत नाही.

(२) पोलिस विभागाकडून प्राप्त झालेल्या FIR नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्षती सहाय्य मंडळाने निर्णय घेण्यासाठी अधिकचे कागदपत्र मागविले तर ते प्राप्त होईपर्यंत निर्णय लांबतो.

(३) अर्थसहाय्य अदा करण्यासाठी शासन स्तरावरून निधी उपलब्ध होण्यासाठी विलंब झाल्यास अर्थसहाय्य अदा करण्यासाठी विलंब होतो.

(४) अशा प्रकारच्या घटनेमुळे पिडीत व्यक्ती या मानसिक तणावाखाली येऊन त्या जेथे राहतात ते निवास सोडून अन्यत्र किंवा कधी कधी लगतच्या राज्यात रहावयास गेलेल्या असतात.परंतु त्यांचा पत्ता पोलिसांचे सहाय्य घेऊनही मिळत येत नाही. त्यामुळे अर्थसहाय्य अदा करण्यासाठी विलंब होतो.

(५) पिडीत व्यक्तीचे बँक खाते सुरू करण्यासाठी पिडीत व्यक्तीकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकत नाही. पर्यायाने तिचे बँक खाते उघडण्यासाठी विलंब होतो. पर्यायाने अर्थसहाय्य अदा करण्यासाठी विलंब होतो.

सद्य:स्थितीत सदर योजनेसाठी सन २०१३-१४ मध्ये ५.०४ कोटी इतकी तरतूद, तर सन २०१४-१५ मध्ये ३५.११ कोटी तरतूद खर्च झाली आहे. यावरुन मार्च, २०१४ अखेरपर्यंतच्या प्रकरणामध्ये अर्थसहाय्य अदा करण्यासाठी कार्यवाही केली आहे. त्यासाठी सन २०१५-१६ साठी रु. २१ कोटी ८८ लाख ८५ हजार तरतूद प्राप्त असून सन २०१५-१६ मध्येच ३० कोटी ९५ लाख २५ हजार इतक्या रकमेची पुरवणी मागणीही करण्यात आली आहे. यावरुन शासन निर्णयाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी व निधीची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

' बैठका कमी प्रमाणात घेणे ' :-

पीसीपीएनडीटी अंतर्गत, राज्य पर्यवेक्षण मंडळाने (SSB) प्रत्येक वर्षी तीन बैठका तर राज्य सल्लागार समितीने (SSC) सहा बैठका घ्यायच्या होत्या. तथापि २०१२-१४ दरम्यान सहा बैठका ऐवजी फक्त चार बैठका घेतल्या होत्या. तसेच निवडक सहा जिल्ह्यातील जिल्हा सल्लागार समितीने २००९-१२ दरम्यान १३ टक्के (गडचिरोली) आणि ९० टक्के (नंदूरबार) इतक्या कमी बैठका घेतल्या होत्या.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतूदीनुसार मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे अध्यक्षतेखाली राज्यपर्यवेक्षकिय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. मंडळाची सभा चार महिन्यातून एकदा होणे आवश्यक आहे. सन २०१३-१४ मध्ये राज्य पर्यवेक्षकिय मंडळाच्या तीन सभा आणि सन २०१२-१३ मध्ये पर्यवेक्षकिय मंडळाच्या दोन सभा मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आल्या होत्या.

शासन अधिसूचना दिनांक २७ जुलै, २००१ नुसार राज्य समुचित प्राधिकरणास त्यांचे कार्य पार पाडण्यासाठी मदत व सल्ला देण्यासाठी मा.संचालक आरोग्य सेवा मुंबई यांच्या अध्यक्षतेखली राज्य समितीची स्थापना करण्यात आली होती. सन २०११ पर्यंत अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण हे पीसीपीएनडीटी राज्य समुचित प्राधिकारी होते. सन २०११ पासून मा.आयुक्त कु.क. तथा अभियान संचालक राष्ट्रीय अभियान मुंबई (अध्यक्ष), अवर सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राज्य समुचित प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

राज्य सल्लागार समितीच्या रचनेनुसार प्रसिद्धी अधिकारी आणि विधी तज्ज्ञ यांचा समावेश राज्य सल्लागार समितीमध्ये असणे आवश्यक आहे. म्हणून राज्य सल्लागार समितीमध्ये विधीतज्ज्ञ आणि प्रसिद्धी विभागाचा एक अधिकारी यांचा समावेश करून समिती पुर्नस्थापना प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

२. जिल्हा सल्लागार समित्यांकडून प्राप्त झालेले अहवाल आयुक्त महिला व बालकल्याण विभाग यांचेकडून राज्य सल्लागार समितीस पाठविण्यात आले किंवा कसे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उपरोक्त परिच्छेद महिला व बाल कल्याण विभागाशी संबंधित आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कार्यकक्षेतील नाही.

साक्ष :

' महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग '

१.८ उपरोक्त परिच्छदासंदर्भात दिनांक २७ जानेवारी २०१६, ३ मार्च २०१६, २७ एप्रिल, २०१६, ३१ मे २०१६ तसेच १४ जून २०१६ रोजी विभागीय सचिवांची व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली साक्षीच्या वेळी समितीने प्रधान सचिव, डब्ल्यूसीडी यांना अध्यक्ष म्हणून नेमणे नियमाधीन नव्हते असा महालेखापालांचा आक्षेप आहे. या सदंर्भात खुलासा करावा असे समितीने सांगितले असता महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगाचा सन २००५ मधील कायदा आहे. या अंतर्गत सदस्य सचिव व चेअरमनचे प्राविधान आहे. सन २००८ ते २०११ पर्यंत चेअरमन व सदस्य सचिव होते. जोपर्यंत कमिशन होत नाही, तोपर्यंत अध्यक्षांचा अतिरिक्त कार्यभार महिला व बाल विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे देण्यात आला होता. या कायद्याच्या कलम २१(२) मध्ये अशी तरतदू आहे की, शासन सदस्य सचिवांना काही अधिकार देता येतात. त्या आधारावर भारत सरकारने देखील नॅशनल कमिशनच्या चेअरमनचा चार्ज केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या सेक्रेटरीकडे दिलेला होता. मध्यंतरी नेमणुकीची प्रक्रिया सुरू झाली होती. सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल कमिशनच्या दोन सदस्यांची नेमणूक रद्द केली. सुप्रिम कोर्टाने डायरेक्शन दिले होते की, अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक करताना ट्रान्सपरन्ट प्रोसीजर फॉलो करण्यात यावी. या करिता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात द्यावी. अर्ज आल्यानंतर त्यांची छाननी करावी. सन २०१२ मध्ये ही प्रोसीजर सुरू झाली मात्र ती पूर्ण झाली नाही. आता वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिलेली असून दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत अर्ज स्वीकारण्याची तारीख होती व या नंतर छाननी होईल. निवड करण्याकरिता माननीय मंत्री महादेयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे या समितीमध्ये राज्य मंत्री सदस्य असून एक एनजीओ मेंबर आहे. अर्ज आल्यानंतर छाननी करून शिफारस या समितीमध्ये केली जाईल. सन २०१२ मध्ये जाहिरात देण्यात आली होती लोकांचे अर्ज आले, मुलाखत देखील झाली असल्याचा खुलासा महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण आयोगाच्या सचिवांनी केला.

१.९ सन २०१२ मध्ये जाहीरात दिली, अर्ज आले, मुलाखती घेतल्या. सन २०१४ पर्यंत त्यावर का कारवाई केली नाही, त्यांची नेमणूक का केली नाही ? असा प्रश्न समितीने विचारला असता मुलाखती झाल्यानंतर एक वर्ष नेमणूक झाली नाही. २०१३ मध्ये उच्च न्यायालयाने निर्णय दिला व सन २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. नेमणुकीची प्रक्रिया पूर्ण झाली नाही या आधारावर नॅशनल कमिशन मधील दोन सदस्यांची नेमणूक सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली त्यांचे क्वालिफिकेशन क्वाटीफाईड केले नव्हते असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

१.१० सन २०१२ मध्ये प्रोसेस केली. मा.उच्च व मा. सर्वोच्च न्यायालयाने विभागाला असे सांगितले काय की, आपण केलेली प्रोसेस चुकीची असून ती थांबवावी, नेमणूक करु नये ? अशा प्रकारचे निर्देश दिले होते काय ? अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यांच्या खात्याने अशा प्रकारचे निर्देश दिले नसल्याचे समितीस अवगत केले.

१.११ यावर स्युमोटो असा निर्णय विभागाने का घेतला ? कोर्टाने प्रोसेस बाबत हस्तक्षेप घेऊन थांबवण्यास सांगितले नाही तरी देखील मुलाखत झाल्यानंतर नेमणूक का करण्यात आली नाही ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला.

१.१२ तसेच सन २०१२ पर्यंत सचिवांनी कार्यवाही केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले असुन सन २०१५ मध्ये उशिर झाला म्हणून फेब्रुवारीमध्ये माननीय मंत्री महोदयांनी ऑर्डर दिली होती. सद्यःस्थितीत सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्यामुळे नियुक्तीची ऑर्डर निघालेली नाही. या सर्व प्रक्रियेस जाणूनबुजून विलंब केला जात आहे, अशी समितीची धारणा आहे असे समितीने सांगितले. या विषयासंदर्भात शासनाने किंवा माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा विभागाने किंवा सचिवांनी स्थगिती दिली आहे किंवा कसे त्याची माहिती समितीला अपेक्षित असल्याचे समितीने नमूद केले.

१.१३ या विषयाच्या सदंर्भात सन २०१२ मध्ये त्रिस्तरीय समिती होती आणि हा विषय समितीपुढे चर्चेकरिता आलेला होता. त्यानंतर समितीने शिफारस केली होती. तसेच सन २०१२ मध्ये मुलाखती झालेल्या होत्या. परंतु त्यावेळी नेमणुका देण्याबाबत कोणतेही आदेश प्राप्त नव्हते. सदर नियुक्तिच्यासंदर्भात पुन्हा जाहीरात देण्याविषयी आदेश प्राप्त झाल्यामुळे पुन्हा नव्याने जाहीराती देण्यात आल्या होत्या. ३१ डिसेंबर, २०१५ ही शेवटीची तारीख होती. सद्यःस्थितीत विभागाकडे पुन्हा नव्याने १६ अर्ज प्राप्त झालेले आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयात देखील काही अर्ज आलेले आहेत. सर्व अर्ज एकत्रित करण्याची कार्यवाही सुरू आहे. समितीमध्ये माननीय मंत्री हे अध्यक्ष आहेत. त्यांना यासंदर्भातील संपूर्ण माहिती दिली जाणार आहे. त्यानंतर मुलाखतीची तारीख निश्चित करून पुढील कार्यवाही करावी लागणार असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.१४ समितीने पुढे अशी विचारणा केली की, अधिकाऱ्यांनी सन २०१२ मधील संपूर्ण तपशीलवार माहिती दिलेली आहे. या ठिकाणी फक्त सिलेक्ट करून अपॉईंटमेंट द्यावयाची होती. माननीय सुप्रिम कोर्ट हा नंतरचा भाग होता मधल्या काळात कोणत्या कारणास्तव अपॉइर्टमेंट झाली नाही आणि त्याची कारणे काय होती ? अपॉईंटमेंट देऊ नये अशा प्रकारचे आदेश कोणी दिले ? आता अर्ज मागविले आणि पुन्हा नव्याने मुलाखती घेण्याबाबत पुढील प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात येत असून विभागाने ज्ञापनात असे म्हटले आहे की, मंत्री, महिला व बालकल्याण

यांनी नव्याने अर्ज मागविण्याचे निर्देश दिले असुन दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ मध्ये शासनाने तसे आदेश दिले होते. सन २०१२ ते सन २०१५ मध्ये प्रक्रिया कोणत्या कारणास्तव थाबलेली होती ? अशी विचारणा समितीने केली. तसेच समितीने मुलाखतीच्या संदर्भात कोणते निर्णय घेतले ? त्यानंतर ऑर्डर काढण्याची प्रक्रिया प्रलंबित होती. यानंतर पुन्हा मंत्री महोदयांनी मुलाखती घेण्यासंदर्भात आदेश दिले होते. यासंदर्भातील आवश्यक ती माहिती समितीला पुढील बैठकीच्या वेळी देण्यात यावी असे समितीने विभागास सूचित केले तसेच दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी मुलाखती घेण्याबाबत सांगण्यात आले होते. तसेच यासंदर्भातील नेमणुकीची प्रक्रिया ही दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण केली पाहिजे, अशी समितीची सूचना असल्याचेही विभागास अवगत केले.

१.१५ उपरोक्त समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी समितीस पुढील माहिती दिली की, माननीय सुप्रिम कोर्टाने दोन जणांची समिती गठित करण्याबाबत आदेश दिले होते. त्यावेळी पारदर्शीपणे प्रोसिजर पूर्ण झाली नव्हती त्यामुळे नव्याने पारदर्शीपणे प्रोसिजर पूर्ण करण्याबाबत सूचना दिली होती. वर्तमानपत्रात पुन्हा नव्याने जाहीरात द्यावी आणि त्यानंतर क्वॉंटिफाय करण्याबाबत सूचना केली होती. त्यामुळे नव्याने जाहीरात देण्यात आली होती. नव्याने अर्ज आल्यानंतर ते क्वॉंटिफाय केले जाणार आहे. माननीय सुप्रिम कोर्टाने नॅशनल कमिशनमधील श्री. योगेश दुबे, आणि दुसऱ्या संबंधित सदस्यांचे नेमणूक रद्द केले होते. यानंतर केंद्र शासनाने चेअरमनचा चार्ज सचिवांकडे दिलेला होता. यास दीड वर्षाचा काळ लागला होता. आता नॅशनला कमिशनमधील चेअरमनची नेमणूक झालेली आहे. तसेच यामध्ये दोन मेंबर्स आहेत माननीय सुप्रिम कोर्टाने गाईडलाईन्स घालून दिलेल्या आहेत.

१.१६ कायदा सल्लागाराची गेल्या ७ वर्षांपासून नियुक्ती न करण्याची कारण काय आहेत ? अशी पृच्छा समितीने केली असता विधी अधिकाऱ्याचे एक पद असून विभागाने ही पोस्ट अपग्रडे करून डिस्ट्रीक्ट जज्ज दर्जाचे अधिकारी देण्याबाबत पत्रव्यवहार केलेला होता. त्यावेळी माननीय न्यायालयाने दोन ते तीन जणांची नावे सुचविली होती. पण संबंधित अधिकारी काम करण्यास इच्छुक नव्हते. विधी अधिकारी पद हे अवर सचिव दर्जाचे आहे, अशा प्रकारचा पत्रव्यवहार शासनाबरोबर केलेला होता. शासन निर्णयात अवर सचिव असे नमूद केलेले आहे. आयोगाने ही पोस्ट अपग्रडे करून डिस्ट्रीक्ट जज्ज दर्जाची अधिकारी देण्याबाबत माननीय उच्च न्यायालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला असल्याचेही विभागीय प्रतिनिधीनी समितीस अवगत केले.

१.१७ अवर सचिव पदावर विधी अधिकारी यांनी काम करण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे वारंवार पाठपुरावा केलेला असून विधी व न्याय विभागाने अवर सचिव पदावर काम करण्यासाठी अधिकारी दिलेला नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.१८ समितीने विधी व न्याय विभागाच्या सचिवांना उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्या. त्या अनुषंगाने दिनांक ३ मार्च, २०१६ रोजीच्या बैठकीत विधी व न्याय विभागाचे सचिव बैठकीस उपस्थित राहिले असता समितीने अशी विचारण केली की, विधी विभागातील अधिकारी नियुक्त केले जात नाहीत, असे एर्जीचे म्हणणे आहे. विधी विभागातील पद अपग्रेड करण्याबाबत पत्रव्यवहार केलेला होता. त्यावेळी न्यायालयाने दोन-तीन जणांची नावे सूचवली होती मात्र ते लोक काम करण्यास इच्छुक नव्हते. विधि अधिकारी हे पद अवर सचिव दर्जाचे आहे, अशा प्रकारचा पत्रव्यवहार शासनासोबत केला होता. शासन निर्णयात अवर सचिव असे नमूद केले आहे. सदर पद अपग्रेड करून तेथे अधिकारी नियुक्त करण्याबाबत उच्च न्यायालयाने वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. मात्र विधि विभागाने या पदाकरिता अधिकारी नियुक्त केला नाही. या विषयी विधि व न्याय विभागाने भूमिका विषद करावी असे समितीने विभागास सांगितले असता सचिव, विधी व न्याय विभाग यांनी समितीस असे अवगत केले की, पहिली विनंती दिनांक २८ एप्रिल २०११ रोजी आली हाती. अधिकारी उपलब्ध करून द्या असे विधी व न्याय विभागाला सांगण्यात आले होते, त्यावेळी विभागाकडे अधिकारी नव्हते. त्यामुळे त्या पदावर अधिकारी नियुक्त करण्यात आला नाही. या नंतर दिनांक १७ सप्टेंबर २०१२ रोजी अशी विनंती करण्यात आली की, त्या पदावर न्यायिक अधिकारी डेप्युटेशनवर द्यावा. हायकोर्टाने दिनांक ३ नोव्हेंबर २०१२ रोजी न्यायिक अधिकारी श्री. एस.एस. अग्रवाल हे अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी उपलब्ध करून दिले. त्यांचे पद अपग्रेड करावे लागेल असा मुद्दा उपस्थित झाला. मुंबईतील न्यायिक अधिकारी सिनिअर केडर मधील आहेत. येथे ज्युनिअर केडरचा अधिकारी नाही ते पद अपग्रेड करण्याची कार्यवाहीसुरू होती. रु. १५,९००० ते रु. ३६,००० या स्केलमधील अधिकारी द्यावा अशी मागणी करण्यात आली होती. मात्र शेट्टी कमिशनप्रमाणे न्यायिक अधिकाऱ्यांचा स्केल ३९,००० रुपयांपासून सुरू होतो. ते अधिकारी उपलब्ध असल्यामुळे त्या पदावर नियुक्त करण्यात आले. मात्र सदर पदाचे अपग्रेडेशन होऊ शकले नाही, त्यामध्ये काही अडचणी आल्या. मार्च २०१३ मध्ये हायकोर्टाने ते नॉमिनेशन विथड्रॉ केले आहे. पुन्हा विनंती आल्यास विधी व न्याय विभागामार्फत अधिकारी मागवून उपलब्ध करून देऊ.

१.१९ सन २०११ पासून २०१६ पर्यंत अधिकाऱ्याची नेमणूक झाली नाही. ५-६ वर्षे शासनाच्या नियमाची अंमलबजावणी होऊ शकत नाही या विषयी विधी व न्याय विभागाने तोडगा काढला पाहिजे असे समितीने नमूद केले असता विनंती आल्यास एक महिन्यामध्ये आम्ही अधिकारी उपलब्ध करून देऊ असा खुलासा सचिव, विधी व न्याय विभाग यांनी केला.

१.२० वारंवार विनंती करीत आहोत मात्र स्केलची अडचण येत आहे हे स्केल अवर सचिव दर्जाचे आहे. हे पद अपग्रेड करण्यासाठी सदर पद सरेंडर करून नवीन पद तयार करावे लागेल असे विभागीय प्रतिनिधी महिला व बालविकास विभाग यांनी समितीस अवगत केले.

१.२१ पद अपग्रेड करण्यासंदर्भात विभागाला पत्र कधी पाठवले ? अशी विचारणा समितीने केली असता या संबंधी पत्रव्यवहार केलेला आहे. अवर सचिवाचे पद तयार करण्यात आले होते. पद नियुक्तीसाठी वेळ लागणार असल्यामुळे तो पर्यंत अवर सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांनी काम बघावे असे सांगण्यात आले असल्याचे महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.२१अ जोपर्यंत स्केल वाढवला जात नाही तोपर्यंत १५ हजार स्केल असणारे अवर सचिव नियुक्त करता येईल काय ? अशी समितीने विचारणा केली असता सचिव, विधी व न्याय विभाग यांनी सन २०१३ नंतर विभागाकडे कोणतेही कम्युनिकेशन नसल्याचे अवगत केले.

१.२२ यावर महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी विभागाचे कम्युनिकेशन आहे पोस्ट अपग्रेड होत नाही. सन २०१५ पर्यंत विभागाने मागणी केली असल्याचे समितीस अवगत केले.

१.२३ १५ दिवसाच्या आत या संबंधी दोन्ही विभागाच्या सचिवांनी तोडगा काढावा. सदर पदावर अधिकाऱ्याची नेमणूक झाली पाहिजे अशी समितीची विनंती आहे असे समितीने सूचित केले. त्या अनुषंगाने विभागाने उपरोक्त संदर्भात अशी माहिती दिली की, बालहक्क संरक्षण आयोगाकडे विधी सल्लागार नेमणेबाबत मा.प्रधान सचिव (म. व बा. वि.) यांच्या दालनात दिनांक ११.०३.२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीस मा.सचिव, विधी व न्याय हे देखील उपस्थित होते.

१.२४ सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आयोगाकडे विधी सल्लागार नेमणे बाबत आयोगाकडील विधी सल्लागार ह्या पदाची वेतनश्रेणी उन्नत करून विधी व न्याय विभागाकडे उपलब्ध असलेल्या दिवाणी न्यायाधीश या पदाची वेतनश्रेणी देणेबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागामार्फत वित्त विभागास दिनांक १४.०३.२०१६ रोजी सादर करण्यात आला होता. परंतु वित्त विभागाने त्यांच्या दिनांक २८.०३.२०१६ च्या टिप्पणीन्वये पुढीलप्रमाणे अभिप्राय देऊन फेर प्रस्ताव सादर करणेबाबत सुचित केले आहे.

१.२५ सदर प्रकरणी आयोगाच्या आस्थापनेवरील विधी सल्लागार या पदावर नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रथम विहित मार्गाने प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात यावी, तसेच सदर पद किती कालावधीसाठी श्रेणीवाढ करावयाचे आहे त्यासंदर्भात नमूद करावे, तसेच मा.अध्यक्ष, लोकलेखा समिती यांनी विधी सल्लागार या पदावर तात्काळ अधिकारी उपलब्ध करून देण्याबाबत दिलेल्या आदेशाची प्रत उपलब्ध करून द्यावी. तसेच सदर कार्यालय हे शासकीय कार्यालय आहे की, स्वायत संस्था आहे, हे स्पष्ट करावे व त्या कार्यालयात कर्मचाऱ्यांची नियुक्ती कोणत्या प्रकारे होते हे ही स्पष्ट करावे व फेर प्रस्ताव सादर करावा, असे अभिप्राय दिले आहेत.

१.२६ वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने स्पष्टीकरण देऊन पुन्हा फेर प्रस्ताव वित्त विभागास या विभागाच्या दिनांक ०६.०४.१०१६ च्या टिप्पणीन्वये सादर करण्यात आला आहे.

" महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था "

१.२७ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात चर्चा करताना समितीने अशी विचारणा केली की, १७ महिन्यांच्या विलंबानंतर MSCPS ची स्थापना करण्यात आली. MSCPS ची स्थापना करण्यामागे काही उद्दिष्टे होती. परंतु, या उद्दिष्टांची पूर्तता झाली नाही. असे महालेखाकार यांनी आक्षेप काढलेले आहे, यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती द्यावी असे सांगितले असता देशामध्ये एकच MSCPS आहे त्यांच्याकडून ऑर्डर पास केली जाते. सद्यःस्थितीत MSCPS ने १२५८ ऑडर्स पास केलेल्या आहेत. MSCPS ची ऑर्डर माननीय उच्च न्यायालय, माननीय सुप्रिम कोर्टाने कायम केलेली आहे. कोणत्याही माननीय न्यायालयाने MSCPS च्या ऑर्डर्स नापसंत केलेल्या नाहीत. देशात एकच कमिशन आहे त्यांच्याकडे कोणतीही पेन्डन्सी नाही त्यावेळी ६ मेंबर्स आणि एक चेअरमन असून त्यावेळी २२ प्रकरणांचा निपटारा केलेला होता सध्या फक्त ७७ प्रकरणे प्रक्रियेत असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.२८ महालेखाकार यांनी जेव्हा आक्षेप काढले, त्या दिवसाची स्थिती काय होती, त्याची समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता सन सन २०१२-२०१३ मध्ये पूर्ण कमिशन कार्यरत होता. सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११ २०११-१२ मध्ये पूर्ण कमिशन कार्यरत होता. सन २००८-२००९ मध्ये ८ केसेस होत्या सन २००९-१० मध्ये ७ कसेस होत्या फक्त २२ केसेस निकाली काढल्या आहेत म्हणून महालेखाकार यांनी आक्षेप काढले होते. शासनाने मेंबर सेक्रेटरीला आदेश दिले होते. सन २०१२-२०१३ मध्ये ५८५ केसेसचा निपटारा केलेला होता सद्यःस्थितीत एकच केस प्रलंबित आहे. महालेखाकार यांनी त्यावेळी आक्षेप काढले होते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.२९ विभागाने आक्षेपांची पूर्तता केली असती तर हा विषय लोकलेखा समितीकडे चर्चेला आलच नसता असे समितीने नमूद केले असता त्यावेळी मेंबर सेक्रेटरी आणि चेअरमनने केसेसचा निपटारा केलेला नव्हता. ही लिगल ॲथोरिटी आहे त्यावर विभागाला भाष्य करणे शक्य होणार नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. आवश्यक ती माहिती १५ डिसेंबर, २०१५ राज्ञी महालेखाकार कार्यालयास दिलेली असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.३० जिल्हा आणि राज्य स्तरावर एक जागा रिक्त आहे. यामध्ये १/३rd पोस्ट भरलेल्या आहेत आणि २/३rd पोस्ट रिक्त आहेत असे समितीने सांगितले असता जिल्हा स्तरावर ३६ संरक्षण अधिकाऱ्याची नेमणुक करावयाची होती. हे सर्व कंत्राटी पद्धतीवर भरण्यात आले आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.३१ समितीला दिलेल्या विवरणानुसार १५१ पदे भरलेली आहेत आणि २८१ पदे रिक्त असल्याची माहिती आहे ही पदे जिल्हा स्तरावरील आहेत तसेच राज्य स्तरावर देखील अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत विभागाकडून कोणती कार्यवाही केली जात आहे ? अनेक ठिकाणी सामाजिक कायर्कर्त्यांची नियुक्ती करावयाची आहे, अशा ठिकाणी देखील कार्यवाही केली जात नाही असे समितीने सांगितले असता ३ पातळीवर समित्या कार्यरत आहेत ग्राम बालसंरक्षण समिती, ३९ हजार गावांमध्ये १८,५६५ समित्या स्थापन केलेल्या आहेत. तालुका स्तरावर ३५० समित्या स्थापन केलेल्या आहेत. जिल्हा पातळीवर ३६ संरक्षण अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीवर नेमणुका केलेल्या आहेत. तसेच इतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी अवगत केली.

१.३२ सन २०१५ चा एक विवरण समितीकडे आहे यामध्ये अहमदनगर येथे ६ सामाजिक कायर्कत्यांची पदेरिक्त असून अकोलामध्ये ६ पदे रिक्त दाखविलेली आहेत. हिंगोलीमध्ये ७ पदे रिक्त आहेत. बुलडाणामध्ये ९ पैकी ३ पदे भरलेली आहेत. चार्टमध्ये अनेक रिक्त पदे दाखविलेली असून, ती पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत ? विभागाला सामाजिक कायकर्ते मिळत नाहीत काय ? अशी विचारणा समितीने केली असता सामाजिक कार्यकर्ते मिळतात परंतु, विभागाला आरक्षणनुसार कार्यवाही करावी लागते सामाजिक कायर्कर्त्यांची नेमणुक करण्यासाठी विभागाला ३ महिन्यांचा अवधी देण्यात यावा, अशी विनंती विभागीय प्रतिनिधींनी समितीस केली.

१.३३ गाव पातळीवर ३९ हजार समित्या स्थापन करावयाच्या आहेत. यामध्ये १८,५६५ समित्या स्थापन केलेल्या आहेत. उर्वरित ५० टक्के समित्या स्थापन करण्याचे काम सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.३४ Child Protection Plan has not been submitted for the year २०१२-१३ and २०१३-१४ अशी समितीने विचारणा केली असता समित्या स्थापन केल्यानंतर प्लॅन्स तयार होणार आहेत. विभागाला जिल्हा आणि तालुका स्तरावर प्लॅन तयार करावयाचा आहे. आता तालुका आणि जिल्हा स्तरावर काही समित्या स्थापन केलेल्या असून सद्य:स्थितीत प्लॅनचे काम सरु झालेले आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केली.

१.३५ विशेष दत्तक संस्थेची स्थापना केलेली आहे काय ? तसेच महालेखाकार यांनी दिलेल्या माहितीनुसार गडचिरोली, नदूंरबार, सिंधुदुर्ग, यवतमाळ, गोंदिया, हिंगोली, उस्मानाबाद आणि वाशिममध्ये समित्या स्थापन केल्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विशेष दत्तक समितीची स्थापना केली असून सारा अंतर्गत समित्या स्थापन झालेल्या आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

"अर्थसंकल्प तयार करणे"

१.३६ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, महाराष्ट्र शासनाने महिला विषयक धोरणांची अमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय महिला विषयक अर्थसंकल्प समिती, शासन निर्णय २०१३ अन्वये गठित केलेली आहे. समितीचे अध्यक्ष, सदस्य-सचिव, महिला राष्ट्रीय आयोग मुंबई आहेत. सदस्य-सचिव हे आपल्या विभागाचे उप सचिव आहेत. बजेटींग कसे करावयाचे यासंदर्भातील धोरण निश्चित झालेले आहे सद्य:स्थितीत बजेटचे संपूर्ण काम झालेले नसून ते काम सुरू आहे.

१.३७ जेंडर बजेटींग हवे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये महिला आणि मुलींसाठी संबंधित जेवढ्या योजना आहेत, त्या योजनांची जास्तीत जास्त प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे व यासाठी आर्थिक तरतूद करण्याचे उद्दिष्ट आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. त्या अनुषंगाने महिला धोरणाची प्रत समितीस सादर केली. सदर प्रत लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

"बालिकांचे जीवन सातत्ये"

१.३८ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीला आवश्यक ती माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, १९९४ चा PCPNDT ॲक्ट आहे. राज्यामध्ये याची अंमलबजावणी खूप चांगल्या पद्धतीने केली जात आहे. विभागाने २ हजारपेक्षा जास्त ॲप्रोप्रिएट ॲथोरिटीज अपॉइर्ट केलेल्या आहेत. यांच्यामार्फत रेग्युलर आणि क्वार्टरली सोनोग्राफिचे इन्सपेक्शन केले जाते. विभागाने ५५० कोर्ट केसेस दाखल केलेल्या आहेत यामध्ये संबंधित डॉक्टरांवर नियमानुसार कारवाई केली जात आहे. ४८ डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्याबाबत कारवाई केलेली आहे. महाराष्ट्र राज्यात पीसीपीएनडीटीच्या अंमलबजावणीबद्दल माननीय सुप्रिम कोर्टाने चागांले शेरे दिलेले आहेत. याची अंमलबजावणी इतर राज्याने देखील करावी अशी सूचना दिलेली आहे. सेन्ससच्या फिगर्स दहा वर्षांनी येतात सिव्हील रजिस्ट्रेशनच्या सिस्टिममध्ये बर्थ रजिस्ट्रेशन केले जाते. याचा सन २०१० पासून ते २०१४ मधील डेटा पाहिला असता सेक्स रेशो ॲट बर्थ हा खूप इम्प्रूव्ह झालेला आहे. हा सन २०१० मध्ये ८५४ एवढा होता. त्यानंतर सन २०११ मध्ये ८६१ एवढा झालेला आहे. आता सन २०१४

मध्ये ९१९ एवढा असून सन २०११ मध्ये ८९४ एवढा होता. तसेच ही माहिती जनगणनेच्या आधारे दिली असून सन २०११ नंतर जनगणनेची आकडेवारी उपलब्ध होण्यासाठी २०२१ उजाडणार असुन सिव्हील रजिस्ट्रेशनच्या सिस्टिममध्ये बर्थ रजिस्ट्रेशन केले जाते. राज्यात सन २०१४ मध्ये ९१९ एवढी होती.

१.३९ बीड जिल्ह्यातील परिस्थिती काय आहे ? राज्यनिहाय माहिती कोणत्या आधारे दिली जाते ? राज्य स्तरीय कम्पायलेशन जिल्ह्याच्या आकडेवारीच्या आधारे केले जाते किंवा कसे ? अशी विचारणा समितीने केली असता स्टॅटीकली राज्यस्तरीय कम्पायलेशन करतो असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.तसेच जन्मत : मुला-मुलींचे प्रमाण ही आकडेवारी जिल्हा स्तरावरुन आरोग्य माहिती व जिवन विषयक आकडेवारी या विभागामार्फत नागरी नोंदणी पद्धतीव्दारे संचलित केली जाते त्या आधारे जिल्हानिहाय जन्मत: लिंग गुणोत्तर प्रमाण तक्ता पुढील प्रमाणे आहे **(विवरण पत्र १)**

१.४० सदरहू परिच्छेदात असे नमूद केलेले आहे की, मीना-राजूच्या माध्यमातून कार्यवाही केली जाते. मागास भागामधील सेक्स रेशोची परिस्थिती खूप खराब होती यामध्ये किती सुधारणा झालेली आहे त्याची माहिती समितीला देण्याची गरज असल्याचे समितीने नमूद केले असता या सर्व फिगर्स सिटी सर्व्हे सिस्टममधून जनरेट झालेल्या आहेत तसेच, काही फिगर्स स्टेट सुपरवाईजिंग कमिटीच्या माध्यमातून केलेल्या सर्व्हेमधूनही जनरेट झालेल्या आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.४१ मा. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात राज्य शासनास कोणत्या गाईडलाईन्स प्राप्त झालेल्या आहेत का ? सदरहू कायद्याच्या टेक्निकल बाबीसंदर्भातील कठोर अंमलबजावणी संदर्भातील सूचनांबाबत माहिती द्यावी. जालना येथे याबाबत मोठे आंदोलन झाले होते काही डॉक्टरर्स, रेडिऑलॉजिस्ट यांचे मशिन काढले व काही डॉक्टरांची सोनोग्राफी मशिन काढले नाही असे समितीने नमूद केले असता या संदर्भात काही रेडिऑलॉजिस्ट असोसिएशनने विभागाकडे संपर्क साधला होता. या कायद्याच्या तांत्रिक बाबींच्या कठोर अंमलबजावणी संदर्भात शासनास कोणत्याही प्रकारच्या स्पष्ट गाईडलाईन्स प्राप्त झालेल्या नाहीत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.४२ भुसावळ तालुक्यामध्ये तर सोनोलॉजिस्टने शासकीय आवेदनपत्रातील काही माहितीचे रकाने भरले नाहीत, कार्बन कॉपीवर माहिती उमटली नाही या व अशा तत्सम क्लेरिकल रिजन्सकरिता मशिन्स सील करण्यात आलेल्या आहेत. सोनोलॉजिस्ट व रेडिऑलॉजिस्टने आता प्रत्येक सोनोग्राफीच्या मागे शासकीय आवेदनपत्रे भरत बसण्याचे क्लेरिकल काम करणे शासनाला अपेक्षित आहे का ? यामध्ये जर एखाद्या सोनोलॉजिस्टवर संशय असेल तर त्याचे सोनोग्राफी सेंटर आपण लिंक करणे आवश्यक आहे या लिंकच्या माध्यमातून आपण त्यांना सुपरवाईज करु शकतो असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

१.४३ हा कायदा मूळत: केंद्र शासनाचा असून राज्यनिहाय त्यामध्ये मेजर आणि मायनर अशा प्रकारचे बदल करण्यात आलेले आहेत. या स्टेटवाईज मेजर आणि मायनर बदल बायफर्केट करून त्याप्रमाणे अंमलात आणणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली आहे, असा शेरा केंद्र शासनाने दिलेला आहे. पीसीपीएनडीटी सेंटर आणि एमटीपी सेंटर्स हे ऑलरेडी लिंक्ड केलेले असतात अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.४४ मागील काही दिवसांपूर्वी आयएमएच्या बैठकीमध्ये या कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भातील काही बाबी स्पष्ट केल्या गेल्या होत्या त्याबाबत शासनाने दुजोरा दिलेला आहे, ही बाब खरी आहे का ? या बाबत पुढील कारवाई संदर्भातील किती प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. तसेच विधानसभेमध्ये याबाबत चर्चा झालेली असतांना मुलींच्या रेशिओबाबत अनेक सूचना करण्यात आल्या होत्या. ज्यावेळी सर्वप्रथम आई- बाबा गर्भस्थ अर्भकाची सोनोग्राफी करण्याकरिता येतात, त्याचवेळी सक्तीने त्याची लिंगचाचणी करून सदरहू जोडपे पुढील चाचणी करण्याकरिता येतात का ? नसतील येत तर त्यांचे पुढे काय झाले, हे स्थानिक क्षेत्रातून ट्रॅक ठेवून तपासता येईल. एखादे जोडपे मुलगी असल्याचे कळल्यानंतर तपासणीकरिता जर येणे बंद झाले तर त्यांच्या राहत्या ठिकाणी जाऊन त्यांनी पुढे बाळाचे काय केले याचा ट्रॅक ठेवता येतो. या कायद्याच्या माध्यमातून केवळ डॉक्टरावर धाक ठेवण्यात आलेला आहे. मुलींचा रेशिओ वाढविण्याकरिता आई-बाबांकरिताही कायद्याचा धाक निर्माण करणे आवश्यक आहे. डॉक्टर, आई-बाबा व डीएचओ यांना या सोनोग्राफी ट्रॅक प्रक्रियेमध्ये सहभागी केले तर कायद्याचा धाक बसेल. अशा आशयाचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला तर स्त्री-भ्रुण हत्या कमी करण्यास मदत होईल असे समितीने मत व्यक्त केले तसेच मीना राजू मंचाच्या माध्यमातून १००० रुपयांच्या योजनेतून वस्तू वाटप संदर्भात आता काय परिस्थिती आहे ? सदरहू योजना प्रबोधनाकरिता आखण्यात आली होती याबाबत विचारणा केली असता सदरहू योजना सर्वप्रथम युनिसेफने राबविली होती. ती योजना आता बंद पडलेली आहे. या योजनेवरील मॉनिटरींग देखील युनिसेफ स्वत:च करीत होते. त्यामुळे या योजनेबाबतची सविस्तर माहिती राज्य शासनाकडे नव्हती. तरीदेखील संबंधितांकडून या संदर्भातील माहिती संकलित करून समितीसमोर सादर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मुलींची शाळेतील गळती थांबविण्याकरिता सदरहू योजना युनिसेफने राबविली होती असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.४५ संपूर्ण राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात आली होती काय तसेच प्रत्येक शाळेला यासंदर्भातील १००० रुपयांचा निधी नियमाप्रमाणे देण्यात आला होता का ? या योजनेचे मुल्यमापन केले नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता युनिसेफने या योजनेचे इव्हॅल्युएशन इंटरनली केले होते. The departement of WCD was not involved in this evaluation and the report is also not available with WCD असे समितीस अवगत केले.

१.४६ सदरहू योजना चांगांली होती अशा प्रकारची योजना राज्य शासनाने राबविली असती तर बरे झाले असते युनिसेफने शाळांना पैसा विभागाच्या माध्यमातून देण्यात येतो का ? अशी विचारणा समितीने केली असता हा पैसा महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून दिला जात नाही हा युनिसेफच्या माध्यमातून दिलेला आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच मिना राजू मंच यह यशस्वी योजना शालेय शिक्षण विभागके माध्यम सें चलाई गयी थी. This was a very successful scheme असे महालेखाकारांनी समितीस अवगत केले.

१.४७ यावर महिला व बाल विकास विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस अशी माहिती दिली की, इस योजना की टीव्ही पर बहुत ॲडव्हर्टाइजिंग की गयी थी. युनिसेफने यह योजना शालेय शिक्षण विभाग के माध्यम से लाँचकी गयी थी. We did not have a role in either the financial transactions nor did we have a role in giving money to the schools.

१.४८ या अनुषंगाने महालेखाकारांनी असे विदित केले की, However, regarding operational part it must be the responsibility of your Department.

१.४९ उपरोक्त च्या अनुषंगाने महिला व बालविकास विभागाच्या प्रतिनिधींनी No. It was the responsibility of the School Education Department and not of the Women and Child Welfare Department अशी माहिती समितीस दिली. '

"गर्भधारणापूर्व प्रसूतिपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध कायदा, १९९४ ची अंमलबजावणी)"

१.५० उपरोक्त परिच्छेदासंदर्भात चर्चा करताना समितीने अशी विचारणा केली की, ७०३२ सोनोग्राफी सेंटर्सपैकी २३४४ सोनोग्राफी सेंटर्स रजिस्टर्ड आहेत ४०७८ सोनोग्राफी सेंटर्सने ऑनलाईन एफ फॉर्म भरलेला आहे. उर्वरित सोनोग्राफी सेंटर्स एफ फॉर्म का भरत नव्हते ?

१.५१ एफ फॉर्म ऑनलाईन भरणे कायद्याप्रमाणे सक्तीचे नाही तसेच, ऑनलाईन फॉर्म कायद्याप्रमाणे सक्तीचे नाही या फॉर्मबाबत राज्य शासनाने कंपल्सरी केलेले आहे. याबाबत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे जे फॉर्म भरत नाही त्यांना फीडबॅक लेटर्स दिलेली आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. ॲप्रोरोप्रियेट ऑथॉरिटीसह व्हिडिओ कॉन्फरन्सिंग केलेले असुन. सदरहू कायदा व त्याची अंमलबजावणी ही राज्यभरामध्ये प्रशिक्षण ओरियंटेड पद्धतीने होत असून राज्यामध्ये या कायद्याची ९४ टक्के अंमलबजावणी होत असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.५२ सदरहू एफ फॉर्म ऑनलाईन भरावा लागतो हायकोर्टामध्ये तत्सम केससंदर्भात या ऑनलाईन एफ फार्मसंदर्भातील माहिती ठेवावी लागते या ऑनलाईन फॉर्मची प्रिंट काढणे सक्तीचे केलेले आहे. याकरिता डॉक्टरांनी क्लेरिकल काम करणे अपेक्षित नाही. याकरिता काहीतरी योग्य व मधला मार्ग काढणे आवश्यक असल्याचे समितीने नमूद केले असता सदरहू कायदा व त्याची अंमलबजावणी असा हा संपूर्ण प्रोजेक्ट केंद्र शासनाचा आहे या संदर्भात राज्य शासनाच्या कोणत्याही गाईडलाईन्स नाहीत. राज्य शासन केवळ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे काम करीत असते. या संदर्भातील तक्रारींचा आढावा घेऊन त्यामध्ये मेजर व मायनर बदल करता येईल का, याचाही विचार संबंधित प्रस्तावामध्ये केला जात आहे. यामध्ये एक हार्डकॉपी कंपल्सरी आहे, या सूचनेचा समावेश संबंधित प्रस्तावामध्ये केलेला आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.५३ एफ फॉर्म भरणे आवश्यक आहे परंतु या कायद्याच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेमध्ये हॉस्पिटल्स व सोनोग्राफी सेंटर्समध्ये असूचित भेट देण्यात येते की, पूर्व सूचना देण्यात येते ? नंदुरबार येथील सोनाग्राफी सेंटर्सला भेट देण्यात आलेली नाही का ? २०११-२०१४ पर्यंत नदुंरबारमध्ये एकही तपासणी केलेली नाही याबाबत समितीने विचारणा केली असता कायद्यातील तरतुदीप्रमाणे सोनोग्राफी सेंटर्सवर असूचित भेट देणे हेच अपेक्षित आहे. सोनोग्राफी सेंटर्सला भेट देत असतांना कधीही त्यांना सूचित करीत नाही. अशा प्रकारे आतापर्यंत या वर्षी एकूण २८ सोनोग्राफी सेंटर्समध्ये अनुचित प्रकारांविरुद्ध कारवाई केलेली आहे. नंदुरबार येथील २८ सेंटर्सची माहिती विभागाकडे आहे. सन २०११-२०१३ मध्ये भेटी दिलेल्या असून त्याची माहिती विभागाकडे असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. तसेच दर तीन महिन्यांनी अचानक भेट देऊन तपासणी केलेली असून १५ जून ते सप्टेंबर, २०११ पर्यंत २८ सेंटर्सची तपासणी केल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१.५४ कायद्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने क्रॅश इन्स्पेक्शन करून दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. तसे केले तरच या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे, असे समजले जाईल. महालेखापाल यांच्या माहितीमध्ये व आपल्या माहितीमध्ये एवढी कॉन्ट्रव्हर्सी कशी आली ? लेखापरिक्षणाच्या वेळी आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांनी महालेखापाल यांना माहिती दिलेली नाही का ? रेकॉर्ड त्यांना दाखविलेले नाही का ? तसेच सन २०११ मध्ये बीड जिल्ह्यामध्ये इन्स्पेक्शन केले नव्हते का ? सन २०११ मध्ये बीड जिल्ह्यामध्ये स्त्रीभ्रुण हत्येचे अनुचित प्रकार घडले होते,

त्यावेळी विभागाने संबंधितांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली होती का ? एक्झिट कॉन्फरन्स झाली त्यावेळी " Whether the crash inspcetion has been carried out in case of sonography centres and MTP centres? If yes, copy of the crash inspection report may be furnished copy to Audit. " असे विचारले असता You said, " No " . " No " लिहिलेले आहे, यावर सीएस यांची सही आहे. याबाबत आपण दुरुस्ती करावी असे समितीने सूचित केले असता तपासणी झालीच नाही असे होणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.५५ सूचित किंवा असूचित इन्स्पेक्शनचा हा मुद्दा आहे. नंदुरबारमध्ये या चार वर्षांमध्ये इन्स्पेक्शन केलेले नाही, असे एक्झिट कॉन्फरन्समध्ये लिहून दिलेले असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. या अनुषंगाने क्रॅश इन्स्पेक्शन व क्वार्टर्ली इन्स्पेक्शनची ही माहिती उपलब्ध असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१.५६ महालेखाकार यांच्या अहवालामध्ये या संदर्भातील आक्षेप परिच्छेदांचे कम्प्लायन्स केलेले दिसून येत नाही. चुकीच्या माहितीची तपासणी करून त्याची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. विभागाने या संदर्भातील कम्प्लायन्स केला असेल तर ए.जी.यांना या संदर्भातील चुकीची व अपूर्ण माहिती कोणी दिलेली आहे ? तसेच सोनोग्राफी सेंटर्सचे इन्स्पेक्शन न केलेल्या कालावधीत काही अनुचित प्रकार घडले का ? याची तपासणी करण्याची काही यंत्रणा या कायद्याच्या अनुषंगाने उभारलेली आहे का ? जानेवारी, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ यामध्ये सोनोग्राफी सेंटर्सची तपासणी बंधनकारक असतांना केलेली नाही, असा महालेखापाल यांचा रिमार्क आलेला आहे. The reasons for not covering all the sonography centres during inspections conducted during the period January 2015 to September, २०१५ अशी विचारणा समितीने केली.

१.५७ एक्झिट कॉन्फरन्सच्या माध्यमातून इन्स्पेक्शन चालत असले तरीही सर्व सोनोग्राफी सेंटर्समध्ये चालत असलेल्या तपासण्या व त्याची सविस्तर माहिती वेगवेगळया फॉर्म्सच्या आधारे जमवून त्यांची सविस्तर प्रोब्लेम असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१.५८ राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सोनोग्राफी सेंटर्सच्या माध्यमातून कोणकोणत्या प्रकारच्या तपासण्या होतात ? त्याची माहिती ऑनलाईन फार्मच्या माध्यमातून संकलित करण्यात येते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडे इन्स्पेक्शनची जिल्हावार तीनही महिन्यांची माहिती उपलब्ध असुन एप्रिल ते जून, २०१५, जुलै ते सप्टेंबर, २०१५, ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१५ ची माहिती दिली आहे. ७२३१ केंद्रांचे इन्स्पेक्शन करावयाचे होते. पहिल्या तिमाहीत ६८२७, दुसऱ्या तिमाहीत ६८८३, तिसऱ्या तिमाहीत ६८७४ अशा प्रकारे केंद्रांचे इन्स्पेक्शन करायचे होते. ९४-९५ टक्के इन्स्पेक्शन झाले आहे. ज्या केंद्रांची इन्स्पेक्शन झाली नाहीत, त्यांच्या ॲप्रोप्रिएट ऑथोरिटीला नोटीस पाठविण्यात येते. तिमाहीमध्ये नियमित तपासणी झाली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला असता या संदर्भातील रिपोर्ट समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले. या अनुषंगाने विभागाने समितीस माहिती सादर केली आहे. (विवरणपत्र क्र.२)

१.५९ या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, एक तो यह इन्स्पेक्शन मेंडेटरी हैं और दूसरी बात यह है कि आपको ये १०० टक्के करना हैं, whereas you have done only 94-95 per cent inspection. What is the reason for this short-fall ? विभागाची ॲप्रोप्रिएट ऑथोरिटी मेडिकल सुप्रिंटेंडेंट व सीएस या स्तरावरील आहे. काही ठिकाणी अडचणी येतात. रिक्त पदांमुळे कामाच्या ताणामुळे त्या तिमाहीचे त्यांच्याकडून इन्स्पेक्शन राहिले आहे. पहिल्या तिमाहीत राहिले तरी पुढील तिमाहीत तरी पूर्ण होइल असे आम्ही पाहतो. आता हे स्ट्रिक्टली स्टेट लेव्हलवरून नियत्रण करीत आहोत. १०० टक्के इन्स्पेक्शन होइल याची आता खात्री करीत आहोत असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी दिले.

' मुलींचे संरक्षण '

१.६० उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना महिला व बालविकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, It is regarding the promulgation and preparation of guidelines under Section 39 of POSCO Act. त्याचा मसुदा सप्टेंबर २०१४ मध्ये सबमिट करण्यात आला होता आणि त्याचे नोटिफिकेशन डिसेंबर २०१४ मध्ये प्रसिद्ध झाले आहे.

१.६१ सन २०१२ ला पॉस्को हा नवीन कायदा आला. जुन्या कायद्याऐवजी हा नवीन कायदा आणला हा व्हिक्टिम फ्रेंडली कायदा असून या कायद्याचे मॉनिटरिंग करण्याचे काम कमिशनला दिले आहे, कमिशन मॉनिटरिंग करते. नोव्हेंबर, २०१२ ते डिसेंबर, २०१५ पर्यंत ११२१० केसेस कोर्टात आहेत. मा.उच्च न्यायालयाचा अहवाल आहे एकूण २०९३ केसेस उच्च न्यायालयाने डिस्पोज केल्या असून न्यायालयात असणारी एकूण प्रलंबितता ९११७ आहे १०२ प्रकरणे उच्च न्यायलयात प्रलंबित आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या महितीप्रमाणे कन्व्हिक्शन रेट २०-२२ टक्के आहे. काही केसेसमध्ये उच्च न्यायालयाकडून कन्फर्म कन्व्हिक्शन होते, तो रेट २५ टक्के आहे ही सर्व माहिती पॉस्को कायद्याची आहे. मा.उच्च न्यायालय कमिशनला रेग्यलर रिपोर्ट देते. पोलिसांच्या रिपोर्टला बेलमुळे वेळ लागतो. मा.उच्च न्यायालयाचा रिपोर्ट येतो, तो डिसेंबर, २०१५ चा रिपोर्ट आहे. नोव्हेंबर, २०१२ पासून डिसेंबर, २०१५ पर्यतची ही आकडेवारी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

"लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ ची अंमलबजावणी"

१.६२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित कले की, पॉस्को कायद्याच्या कलम ३९ अन्वये गाईडलाईन्स तयार करावयाच्या होत्या. सदर गाईडलाईन्सचे नोटिफिकेशन झाले आहे आणि त्याप्रमाणे सर्व ३५ जिल्ह्यांत प्रशिक्षण देण्यासाठी ३५ ट्रेनरची नेमणूक केली आहे. ते जिल्ह्यांतील पोलीस स्टेशनमध्ये जाऊन रेग्यूलर प्रशिक्षण देतात. एपीआयच्या वर जे अधिकारी आहेत त्या सर्वांना प्रशिक्षण दिले पाहिजे अशी अट आहे. कधी कधी चौकशी अधिकाऱ्यांची बदली हाते. त्यामुळे कमिशनने ठरविले आहे की, सर्वांना प्रशिक्षण दिले पाहिजे. यशदाने ३५ ट्रेनरची नमो्णूक केली होती ते एसपींच्या मागणीनुसार रेग्युलरली जातात, प्रशिक्षण होते. इतर गाईडलाईन्सप्रमाणे ते ट्रेनिंग कमिशन देखील घेतात. आतापर्यंत पोलीस अधिकाऱ्यांचे २४ प्रशिक्षण कमिशनन घेतले आहे. तसेच ते कन्वेशन व वर्कशॉप देखील घेतले जातात. जन चेतना जागृत करतात म्हणून उच्च न्यायालयाच्या महितीप्रमाणे कन्व्हिक्शन रेट २०, २२, २५ असा आहे.

१.६३ लेखापरीक्षणाच्या वेळी संगितले होते की, डीजीपीद्वारे पॉस्को अंतर्गत नोंदणी झालेल्या प्रकरणांचा जिल्हानिहाय तपशील सादर करावा. मात्र तो मुदतीत सादर केलेला नसल्याचे समितीने अवगत केले असता विभागाने पुढील माहिती समितीस सादर केली. (विवरण क्र.३) तसेच यासंदर्भात पोलिसांद्वारे माहिती मिळाली नाही, नंतर मिळाली. न्यायालयाद्वारे माहिती मिळते मा.उच्च न्यायालय रेग्युलरली माहिती देते. पोलिसांकडून व न्यायालयाकडून माहिती घेणे असे दोन प्रकार असून कायद्याच्या इम्प्लीमेन्टेशन ची मॉनिटरिंग करण्याची व माहितीची पावर न्यायालयाच्या प्रक्रियेची मॉनिटरिंग करण्याचे पावरसुद्धा कमिशनकडे आहे ते रेग्यूलर येत असते अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.६४ महाराष्ट्र शासनाने बालकांना साक्षीपूर्व किंवा साक्षीच्या टप्प्यावर सहाय्य करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली नव्हती अशी पृच्छा समितीने केली असता त्यावेळी केली नव्हती. नोव्हेंबरमध्ये २०१२ कायदा आला नंतर भारत सरकारने नियम निर्गमित केले. महाराष्ट्र शासनाने कमिशनच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. कमिशनने सप्टेंबर महिन्यामध्ये मसुदा करून गाईडलाईन्स दिल्या. डिसेंबर २०१४ मध्ये शासनाने गाईडलाईन्स इश्यू केल्या आणि त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे. त्यामुळे कन्व्हिक्शन रेट कमी आहे. सर्वांना माहीत आहे की, सदर मुद्यामध्ये ती अडचण नाही. परंतु एक अडचण नेहमी येत आहे आणि ती म्हणजे चाईल्ड प्रोहिबिशन ॲक्टमध्ये १८ वर्षे वयाखालील मुलगी व २१ वर्षे वयाखालील मुलगा असा वयोगट आहे. आयपीसीमध्ये ३७५ कलम आहे. कलम ३७५ च्या पोट कलम (२) मध्ये असे आहे की, दोघांचे लग्न झाले असेल आणि त्यांचा संबंध आला आणि जर पत्नी १५ वर्षे वयापेक्षा कमी नसेल तर ते ॲग्रॅव्हेटेड सेक्च्युअल ॲसॉल्ट किंवा रेप याच्या व्याख्येमध्ये नवीन कायद्याप्रमाणे येत नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१.६५ विभागीय प्रतिनिधी यांनी पुढे अशी माहिती दिली की, क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्ट, आयपीसीमध्ये सुधारणा झाली. त्यावेळी समितीचे म्हणणे होते की, यामध्ये सुद्धा १८ वर्षे वयोगट करावा. कारण तसे चाईल्ड मॅरेज प्रोहिबिशन ॲक्टमध्ये आहे. चाईल्ड प्रोहिबिशन ॲक्टचे दुसरे वैशिष्ट्य असे आहे की, चाईल्ड मॅरेज होतात, ती इललिगल किंवा व्हॉईड नाहीत तर ती व्हॉइडेबल आहेत. मेजर झाल्यानंतर ते मॅरेज लिगल करू शकतात. आता पॉस्को किंवा आयपीसीमध्ये अडचण अशी येते की, महिला आयोगामध्ये एका दिवशी ३६ केसेसपैकी २५ टक्के केसेस अशाच होतात. मुले कॉलेजमध्ये शिकतात, मॅरेज करतात आणि मग नंतर पॉस्को कायद्याखाली केसेस दाखल होतात, पुन्हा त्या केसेस पोलिसांकडे येतात तेंव्हा मॅरेज आहे असे समजते. दोघांचे लग्न झाले आहे, मात्र पत्नीच्या संमतीशिवाय, इच्छेशिवाय जर सेक्च्यूअल रिलेशन झाले तरी ते देखील रेप किंवा ॲग्रॅव्हेटेड सेक्च्युअल असॉल्टमध्ये येत नाही. ते कलम ३७५ च्या पोट कलम (२) मध्ये आहे. १२ ते १५ वर्षांपर्यंत वय असेल तर फक्त २ वर्षे शिक्षा आहे. त्यामुळे प्रि-ट्रायल स्टेजवर कन्व्हिक्शन रेटमध्ये अडचण येते. ते पंडितचे प्रमाणपत्र आहे असे दाखवितात किंवा माळ आहे किंवा काजीचे प्रमाणपत्र आहे असे सांगतात. मुस्लीम समाजामध्ये शर्रियत कायदा लागू होतो तेथे १५ वर्षांची अट आहे. पॉस्को कायद्यामध्ये १८ वर्षे वयोगटाची अट आहे. वयाच्या १५ वर्षांत लग्न होते, ते म्हणतात की, आम्ही मॅरिड आहोत, आम्ही पती-पत्नी आहोत. सर्व लॉमध्ये युनिफॉर्मिटी म्हणजेच वयोगट १८ वर्षे झाला तर बरे होईल. आयपीसीच्या कलम ३७५ च्या पोट कलम (२) मध्ये १८ वर्षे वय असेल तर कन्व्हिक्शन रेट जास्त वाढेल आणि अशा अडचणी निर्माण होणार नाहीत. सर्व जिल्ह्यांत अशा अडचणी निर्माण होतात.

१.६६ ज्युवेनाईल ॲक्टनुसार वयाची अट काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे अवगत केले की, तेथे १८ वर्षे नाही तर १६ वर्षे वयाची अट आहे. पॉस्को आणि ज्युवेनाईल हे वेगवेगळे ॲक्ट असून तेथे १६ वर्षे अट आहे आणि ती फक्त २ गुन्ह्यांसाठी म्हणजे रेअरेस्ट ऑफेन्समध्ये जसे की, मर्डर किंवा गँग रेप यासाठी ती अट आहे. सीडब्ल्यूसीच्या, जेजेबीच्या ते कंट्रोलमध्ये राहतात. हा कायदा आणून वयोगट १८ वर्षे वरून १६ वर्षे केला आहे, ते बरोबर आहे. परंतु ऑब्झर्व्हेशनमध्ये तो क्रिमिनल राहत नाही, पुन्हा त्याच्यासाठी शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे, रिहॅबिलिटेशनची व्यवस्था केली पाहिजे. नवीन कायद्याप्रमाणे ते जेजेबीकडे २१ वर्षांपर्यंत राहणार आहेत जेजेबी वेगळा आहे. पॉस्को ॲक्ट व्हिक्टिम फ्रेंडली ॲक्ट आहे. कोणी जरी तक्रार केली तर की, संबंधिताने ॲग्रॅव्हेटेड सेक्च्युअल ॲसॉल्ट केला आहे, त्यामध्ये अक्युजला हे प्रुव्ह करावे लागेल की, आम्ही तसे केलेले नाही. एक अपराधी छूट जाय लेकिन एक निरपराध ना फंसे यह ज्युरिसप्रडुन्सका मोटो हैं. पोलिसांचे त्याप्रमाणे माईंड सेट होत नव्हते. मग नंतर कमिशनने प्रशिक्षण देऊन, रेग्यूलर मिटिंग घेऊन, आता ते पॉस्को कायदा लावतात. पॉस्को कायद्यामध्ये चाईल्ड फ्रेंडली कोर्ट पाहिजे, कोर्टमध्ये मेज नसावा, गाऊन नसावा, वकील गाऊन घालून येऊ शकत नाहीत,

बाजूला रूम पाहिजे, केसची प्रोसिजर वन-टू-वन चालली पाहिजे सर्व जिल्ह्यांत चाईल्ड फ्रेंडली कोर्ट झाले आहे आता एक नवीन अडचण निर्माण झाली असून आम्ही उच्च न्यायालयाला लिहिले होते की, या प्रकरणांच्या सुनावणींसाठी एक्सक्लुझिव्ह कोर्ट करावे. सुनावणी करण्याचे काम डिस्ट्रिक्ट जज्जला, ॲडिशनल जज्जला द्यावे, तेथे केवळ चाईल्ड आणि वूमेन संबंधी केसेस राहतील. उच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, काही जिल्ह्यांत केसेस कमी आहेत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक्सक्लुजिव्ह जज्ज देऊ शकत नाही, याप्रमाणे पीपीज असतात. त्यामुळे ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज आहेत, त्यांना चिल्ड्रेन कोर्टचे जज्ज केले आहे, त्यांचा माईंड सेट होत नाही, त्यांचे सुद्धा प्रशिक्षण झाले आहे. मागील वर्षी सर्व डिस्ट्रिक्ट जज्जचे २ दिवस एक वर्कशॉप झाले होते. ते कमिशन व उच्च न्यायालयाने मिळून केले होते. ही प्रोसिजर आहे. कलम ३९ अन्वये ट्रान्सलेटरचे पॅनेल पाहिजे आम्ही हिंदी बोलतो, पोलिसांना मराठी यते. ॲक्टमध्ये असे आहे की, हिंदी ट्रान्सलेटर ठेवावा. प्रत्येक जिल्ह्यात हिंदू, तेलगू ट्रान्सलेटरचे पॅनेल पाहिजे. पोलिसांना त्यांच्या घरी जावे लागेल. आपण त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावू शकत नाही. सध्या ३९ अन्वये कार्यवाही सुरू आहे त्यावेळी हा कायदा नवीन होता गाईडलाईन्स आल्या नव्हत्या. जज्जेसचे सुद्धा त्यावेळी माईंड सेट झाले नव्हते प्रशिक्षण नव्हते सध्या मा.उच्च न्यायालयाच्या रिपोर्टप्रमाणे २५ टक्के कन्व्हिक्शन रेट आहे. शासनाने सुद्धा अपिल केले आहे ते दुसऱ्या अपिलामध्ये आहेत. लोअर कोर्टाने सोडून दिले आहे, त्यामुळे कन्विक्शन प्रमाण १०० टक्के वाढेल.

१.६७ ज्यांचे कन्व्हिक्शन केले आहे ते सुद्धा विड्रॉ होऊ शकतील असे समितीने नमूद केले असता मा.उच्च न्यायालयात ३८५ पैकी १०२ केसेस गेल्या आहेत, २८३ केसेस गेलेल्या नाहीत आणि याचे कारण असे आहे की, त्यांचे कन्व्हिक्शन नाही किंवा ऑलरेडी जेलमध्ये आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.६८ मार्गदर्शक तत्त्वे सन २०१४ पर्यंत निश्चित केली नाहीत. विलंबाची कारणे काय आहेत आणि सद्य:स्थिती काय आहे ? या समितीच्या प्रश्नाला विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विलंब यामुळे झालेला नसून मार्गदर्शक तत्त्वे काढण्याकरिता लोकांचे ऑब्जेक्शन व सजेशन लागते त्यामध्ये वेळ लागत असुन डिसेंबर, २०१४ मध्ये नोटिफिकेशन झाले असल्याचे सांगितले.

१.६९ या कायद्याखाली रजिस्टर्ड झालेल्या केसेसची कन्सॉलिडेटेड इन्फर्मेशन स्पेशल आयजीकडून दर महिन्याला मिळते का ? अशी विचारणा समितीने केली असता पोलिसांकडून माहिती मिळत नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१.७० पोलीस विभाग ही शासकीय यंत्रणा आहे. आपल्याला मा.उच्च न्यायालयाकडून माहिती मिळते. पोलिसांची भूमिका या संदर्भात चांगली नाही असा समितीचा समज झाला आहे. पोलिसांनी देखील ३ महिन्यांमध्ये मॉनिटरिंग केले पाहिजे. परंतु ते करीत नाहीत असे विभागाचे म्हणणे आहे. विभागाला तिमाही माहिती देणे हे पोलिसांना मेंडेटरी आहे मात्र ते तसे पाळत नाहीत. विभागाच्या माध्यमातून मा.उच्च न्यायालयातून किंवा जिल्हा न्यायालयातून माहिती उपलब्ध करून घेता असे विभागाने संगितले आहे. समितीला स्पेसिफिक माहिती पाहिजे यासंदर्भात समिती गृह विभागाला सांगेल बंधनकारक ड्यूटी नियमात आहे आणि त्या अनुषंगाने स्पेशल आयजींनी सुद्धा विभागाला सर्व माहिती दिली पाहिजे. विभागाला ती मिळत नाही का याबद्दल सांगावे असे समितीने सांगितले असता पोलिसांकडून माहिती मिळते मात्र उशिरा मिळते मा.उच्च न्यायालय देते त्या वेळेत त्यांच्याकडून माहिती मिळत नसल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.७१ मा. उच्च न्यायालयाला हे बंधनकारक नाही, ते विभागाला मदत करतात असे समितीने नमूद केले असता त्यांना सुद्धा हे बंधनकारक असून पॉस्को नियमाचे कलम ६ मध्ये मा.उच्च न्यायालयासुद्धा हे करणे बंधनकारक आहे ते केंद्र शासनानेच केले आहे मा.उच्च न्यायालयाला सुद्धा नियम असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.७२ पोलिसांकडून माहिती वेळेवर मिळत नाही. माहिती पोलिसांकडून किती विलंबाने मिळते ? ती माहिती देणे कधी ड्यू होती आणि कधी मिळाली याची माहिती समितीला द्यावी असे समितीने विभागस सांगितले असता माहिती देण्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केले. तथापि माहिती अप्राप्त आहे.

१.७३ लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ ची अंमलबजावणी या परिच्छेदासंदर्भात समितीने अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ३ मार्च २०१६ रोजी पुन्हा साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने कोर्ट आपल्याला रिपोर्ट देते, मात्र आय.जी, सायबर क्राईम, यांच्याकडून माहिती दिली जात नाही असे विभागाचे म्हणणे आहे या संदर्भात खुलासा करावा असे सांगितले असता माहिती देण्यामध्ये कोणतीही अडचण नसल्याचे प्रधान सचिव, गृह विभाग यांनी समितीस अवगत केले.

१.७४ पोलिसांचे सहकार्य वेळेवर मिळत नाही. कोर्टाकडून माहिती मिळते मात्र गृह विभागाकडून माहिती मिळत नाही असे म्हणणे समोर आले असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

१.७५ यावेळी प्रधान सचिव, गृह विभाग यांनी ज्या फॉरमॅटमध्ये त्यांना माहिती हवी आहे, त्या प्रमाणे आय.जी.कडून माहिती देण्यात येईल, यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही असे आश्वासन समितीस दिले. तसेच सन २०१३ पर्यंत माहिती मिळालेली असून प्रोफार्मा उच्च न्यायालय, विधि व न्याय विभाग, गृह विभागाला दिलेला आहे. उच्च न्यायालयाची माहिती सन २०१५ पर्यंत आलेली आहे. पोलीस विभागाकडून

काही जिल्ह्यामधून माहिती मिळते. दिनांक २२ नोव्हेंबर २०१३ पर्यतची कन्सॉलिडेटेड माहिती आली आहे त्या नंतरची माहिती आलेली नसल्याचे महिला व बालविकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१.७६ यावर कन्सॉलिडेटेड माहिती ज्या प्रमाणे हवी आहे, त्या प्रमाणे देण्यात येईल असे आश्वासन प्रधान सचिव, गृह विभाग यांनी दिले.

सन २०१२ पासून २०१६ पर्यंत माहिती वेळेवर आलेली नाही. ३ वर्षापासून रिपोर्ट मिळालेला नाही. याचे कारण काय आहे, अडचण काय होती ? माहिती न देण्याविषयी आपण कोणावर जबाबदारी निश्चित केली आहे तसेच गृह विभागाकडून रिपोर्ट वेळेवर येत नसल्याबाबत समितीने विचारणा केली असता विभागामार्फत जबाबदारी निश्चितकरू या नंतर कोणतीही अडचण येणार नाही असे प्रधान सचिव, गृह विभाग यांनी समितीस अवगत केले. कलम ४४ अंतर्गत पोलिसांकडून माहिती येणे अनिवार्य असुन मा. उच्च न्यायालयाकडून देखील वेळोवेळी माहिती दिली जाते. महिला व बाल विकास विभागाने एक प्रोफॉर्मा दिला होता, त्या नुसार प्रत्येक माहिन्याला माहिती मिळाली पाहिजे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.७७अ सन २०१३ पर्यंत माहिती पुरवलेली आहे. रिपोर्ट प्रत्येक महिन्याला पाठवणे आवश्यक आहे. कोर्टाकडून माहिती वेळेवर येते. महालेखाकारांचा आक्षेप आहे की, आय.जी, पोलीस यांच्याकडून माहिती दिली जात नाही. ज्यांच्या दुर्लक्षामुळे माहिती देण्यात आलेली नाही त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी असे समितीने गृह विभागास सांगितले असता या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

१.७७ सन २०१३ पर्यंत माहिती देण्यात आली त्यावेळी अधिकारी कोण होते तसे सन २०१३ नंतर माहिती दिलेली नसल्याने यासबंधात किती दिवसात जबाबदारी निश्चित करणार व माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यावर किती दिवसात कारवाई करणार आहात या संदर्भात केलेली कारवाई समितीला कळवावी असे समितीने सूचित केले असता प्रधान सचिव, गृह विभाग यांनी एक महिन्याच्या आत संपूर्ण कारवाई करू व त्या बाबतची माहिती समितीला अवगत करु असे आश्वासित केले होते तथापि माहिती अप्राप्त आहे.

"बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ ची अंमलबजावणी"

१.७८ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती देताना महिला व बालविकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी समितीस पुढील माहिती अवगत केली की, शहरी भागामध्ये बालविवाह प्रतिबंधक अधिकारी कोण असावे हा मुद्दा होता. त्या संबंधी प्रस्ताव तयारकरून शासनाला पाठवला असुन वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे. नागरी भागामध्ये बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना घोषित करावे यासंबंधी दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी मसुदा मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तयार करून शासनास सादर केलेला आहे. बाल विवाह प्रतिबंध करण्यासाठी कोण ॲथोरिटी असेल या करिता नोटीफिकेशन काढावयाचे आहे. ग्रामीण भागामध्ये ग्रामसेवकास बालविवाह प्रतिबंधक अधिकार घोषित केले आहे. नागरी भागामध्ये हे काम कोणी करावे या संदर्भात चर्चा, विचारविनिमय करून प्रस्ताव दाखल केलेला आहे. शहरीभागाकरिता सीडीपीओचे पद आहे नोटीफाय करण्यासाठी प्रस्तावित केलेले आहे

१.७९ सन २००७-०८ मधील कायदा असून आता सन २०१६ सूरू आहे नोटीफिकेशन काढण्यास एवढी वर्षे लागली. हा मुद्दा ऑडीट मध्ये आल्यानंतरच विभागाच्या लक्षात आले आहे. या विषयाकडे दुर्लक्ष झालेले असून ऑडीट पॅरा आल्यानंतर हे लक्षात आलेले असल्याचे समितीने सांगितले असता आता नोटीफिकेशन तयार केले असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.८० शहरी भागातील झोपडपट्टयांमध्ये ग्रामीण भागातून आलेले लोक असतात. अंधश्रद्धा असलेले लोक असतात त्यांच्यामध्ये बालविवाह होतात. अशा वेळी बालविवाह रोखण्यासाठी कोणीच ॲथोरीटी नसेल तर ते योग्य नसून शासन निर्णय निर्गमित करून समितीला माहिती अवगत करावी. विभागाच्या रेकॉर्ड नुसार ४५ बालविवाह झालेले आहेत. अतिरिक्त संचालक,राज्य कुटुंब कल्याण यांच्या मार्फत विवाहित मुलींची नोंदणी झालेली आहे. १० ते १४ वर्षे वयोगटातील अनुक्रमे ३७८ व ६२७ मुली विवाहित होत्या. तर १५ ते १९ वयोगटातील ११३८९, ११८३९ मुली विवाहित होत्या. एका बाजूला विभागाकडून केवळ ४५ मुलींचा बालविवाह झाला असल्याबाबत केस रजिस्टर करता आणि दुसरीकडे आरोग्य विभागाचा रिपोर्ट पहिला तर या वयोगटातील मुली मोठ्या प्रमाणात विवाहित असल्याचे दिसून येते. यावरून एवढ्या मोठ्या प्रमाणात बालविवाह झालेले आहेत, हे शासन किंवा प्रशासनाच्या नजरेस आलेले नाही हे स्पष्ट होत आहे याबाबत माहिती देण्याबाबत सांगितले असता या विषयाबाबत दोन्ही विभागांकडून म्हणजे सार्वजनिक आरोग्य आणि महिला व बालविकास विभागाकडून आकडेवारीचे रिकन्सिलेशन झालेले नाही. कारण हा विषय पूर्णपणे दुर्लक्षित राहिला होता असा खुलासा सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी नमूद केला.

१.८१ आता सांगितल्याप्रमाणे विभाग १५ दिवसांत नोटिफिकेशन काढणार आहे. त्याचबरोबर ज्या लोकांनी एवढी दप्तर दिरंगाई केली त्यांच्यावर कारवाई करावी असे समितीने नमूद केले असता महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी यासंदर्भात कारवाई करण्याचे समितीस आश्वासित केले.

१.८२ मेळघाटातील परिस्थितीबाबतचा आरोग्य खात्याचा अहवाल पाहिला तर, तेथील कुपोषणाचे सर्वात मोठे कारण कमी वयात होणारे विवाह हेच आहे. तेथील लहान वयात लग्न झालेल्या मुलींना १४ ते १५ व्या वर्षी मूल होते हे सर्वांना माहीत आहे. मात्र सीडीपीओंना याची माहिती नसते. शहरी भागात सीडीपीओ नोटिफाय केलेले नाहीत. परंतु, ग्रामीण भागात तर ते आहेत ? तरीही ग्रामीण भागात बालविवाह, बालमृत्यू होताना दिसतात. विशेषतः आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे तेथे तुम्ही आरोग्य विभागाशी कोऑर्डिनेशन करून माहिती घेत नाही काय ? घेत असल्यास पूर्ण माहिती मिळते की नाही की, तेथेही दुर्लक्ष होते ? हा अतिशय गंभीर विषय आहे. तेथे महिला व बालविकास विभागाच्यावतीने बालविवाह थांबविण्याचे काम प्रभावीपणे झाले तर, हे कुपोषण थांबू शकते. सीडीपीओंचा आढावा विभाग घेणार काय, तसेच आरोग्य विभागाबरोबर कन्व्हर्जन्स करणार आहात काय ? अशी विचारणा समितीने महिला व बालविकास विभागाकडे केली असता आरोग्य विभागाचा केवळ ई-डेटाच नाही तर आरोग्याशी संबंधित इतरही डेटा जो महिला व बालविकास विभागाच्या संबंधित आहे त्याकरिता एक कॉमन प्लॅटफॉर्म तयार करीत असून अशाप्रकारे डेटा एक्सचेंज करून कॉमन डेटा तयार करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. तो ऑनलाईन मिळावा अशाप्रकारचा प्रयत्न असून त्याकरिता वेळ लागणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.८३ शहरी भागात सीएमपीओ नोटिफाय झालेले नाहीत असे विभागाने सांगितले. शहरीभागात बालविवाहाचे प्रमाण कमी असते अशी समितीची धारणा आहे. मात्र मेळघाटसारख्या ठिकाणी जेथे सीएमपीओ नियुक्त केलेले आहेत, तेथे कारवाई होण्यात अडचण येता कामा नये. बालविवाहांची संख्या मोठ्या प्रमाणात असताना केवळ ४५ केसेस रजिस्टर होतात, याचा अर्थ या विषयाकडे दुर्लक्ष करून काम केलेले आहे हे स्पष्टपणे दिसते असे मत समितीने व्यक्त केले तसेच सचिव महोदयांनी कॉमन डेटा तयार करण्याबाबत सांगितलेले आहे. मात्र अंडर सीओ सीडीपीओ आणि डीएचओ काम करतात. त्यांच्याकडे याची एकत्रित माहिती असते. जिल्हाधिकारी देखील कुपोषण निर्मुलनाकरिता अध्यक्ष असतात त्यांच्याकडेही माहिती असते परंतु, तिचा वापर करीत नाही. ARSH या केंद्र शासनाच्या कार्यक्रमांतर्गत नोंदणी झालेल्या १५ ते १९ वयोगटातील अनुक्रमे ११,३८९ व ११,८३९ मुली विवाहित होत्या. तर महाराष्ट्र शासनाने सन २०१० ते सन २०१३ दरम्यान बालविवाहाची केवळ ४५ प्रकरणे घडल्याचा अहवाल दिला आहे. याकडे सिरिअस कन्र्सन देण्याची आवश्यकता आहे, असे समितीला वाटते असे मत समितीने व्यक्त केले.

१.८४ आकडेवारीमध्ये खूप तफावत दिसत असून विभागाला अंगणवाडी सेविका, लोकल ग्रामसेवक यांच्या माध्यमातून बरोबर माहिती मिळत नाही. ARSH च्या आकडेवारीशी आपली आकडेवारी जुळत नाही. हा समितीला पूर्णपणे दुर्लक्षित भाग दिसत आहे. केवळ शहरी भागामध्ये सीएमपीओंची नेमणूक झाली नाही म्हणून नियमांचे पालन होऊ शकले नाही असे म्हणता येणार नाही या विषयाकडे विभागाचे पुर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे असे समितीने खेदाने विभागास सांगितले.

१.८५ काही विशिष्ट समाजात बालविवाहाची परंपरा आहे. त्यांना कितीही समजावले तरी ते ऐकत नाहीत. १००-१०० सामुदायिक विवाह त्या समाजात होतात. लोकप्रतिनिधी त्या समाजाच्या प्रमुखांना सांगतो परंतु कायद्याचा धाक हा तुमच्या अधिकाऱ्यांकडून असतो. तेथे बऱ्याचदा तुमचे अधिकारीही उपस्थित असतात. त्यामुळे समितीला असे वाटते की, विभागाच्या अधिकाऱ्यांनी किंवा आपण सर्वांनी त्या समाजाचे मत परिवर्तन करणे अत्यंत गरजेचे आहे. बऱ्याचदा अधिकाऱ्यांना अडचणी आल्याचेही पाहिले आहे. बालविवाह डोळयासमोर होत असतानाही त्या समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात असल्याने अधिकारीही काही करू शकत नाहीत. ज्या विशिष्ट समाजांत बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे, त्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी काही योजना आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता कन्व्हर्जन्स ऑफ डेटा आणि त्यांच्याकडे असलेला डेटा आम्ही वापरला पाहिजे हा एन्फोर्समेंटचा विषय झाला. या संदर्भात महिला व बालविकास विभाग नोडल डिपार्टमेंट आहेच. याबाबत आरोग्य विभाग, ग्रामसेवक व महिला व बालविकास विभागाकडे डेटा असतो. परंतु, याबाबत नोटिफाय अधिकारी केस दाखल करतात. समितीने सांगितल्याप्रमाणे त्या लोकांचे मत परिवर्तन करणे महत्त्वाचे आहे. याकरिता ग्रामस्तरावर केवळ अंगणवाडी सेवक व सुपरवायझर्स आहेत. ज्या एनजीओंचे या विषयाबाबत स्पेशलायझेशन आहे, त्यांचा वापर करून आपल्याला मतपरिवर्तन करण्याचे काम करता येईल किंवा कम्युनिटीमध्ये असे काही लोक मिळाले तर त्यांचा वापर करता येईल. दोन महत्त्वाचे विषय आहेत एक तर याचा संबंध " बेटी बचाव, बेटी पढाव " आंदोलनाशीसुद्धा आहे. आपण मुलींना थोडेसे प्रोलॉंग एज्युकेशन दिले तर, त्याचाही फायदा होईल. आज सर्वसाधारणपणे दहावी पास झाल्यानंतर बारावी करण्याकरिता मुलींना थोडेसे लांब जावे लागते. तेथील शाळांमध्ये मुलींच्या पुढील शिक्षणाकरिता फारशी सोय नसते. त्यामुळे उच्च शिक्षणासाठी लांब जावे लागल्याने त्या शिक्षणापासून दूर होतात. दुसरे म्हणजे त्यांना दहावीनंतर बारावीपर्यंत नेले व त्यानंतर स्किलींगकरून काही जॉबमध्ये समाविष्टकरून घेता आले तर आपोआप त्यांचे वयही वाढेल. आज आपण पाहिले तर या सर्व मुली सर्वसाधारणपणे आठवी, दहावीतील ड्रॉप आऊट आहेत. त्यांचे शिक्षण वाढविणे, त्यांना स्किलींग देणे आणि त्यांचे मतपरिवर्तन करणे या महत्त्वाच्या गोष्टी असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.८६ शिक्षण विभागाला महिला व बालविकास विभागातर्फे किंवा समिती मार्फत सूचना निश्चितपणे कळविल्या गेल्या पाहिजेत. खात्यातर्फे हा प्रस्ताव, हा विचार शिक्षण विभागाला कळविला गेला पाहिजे सवर्णांमध्ये बालविवाह होत नाहीत. आदिवासी समाजात, खालच्या स्तरावर, जेथे जात पंचायत आहे, जो बांधला गेलेला समाज आहे तेथे बालविवाह होतात. या विशिष्ट समाजाकरिता काही उद्दीष्ट ठरवून महिला व बालविकास विभागामार्फत बालविवाह थांबविण्याकरिता प्रबोधनात्मक स्पेशल कार्यक्रम राबविणार आहात काय ? अशी विचारणा समितीने केली.

१.८७ असा कार्यक्रम आज विभागाकडे नाही तो फार्म्युलेट करावा लागेल. आज विभागाकडे अशाप्रकारच्या कोणत्याही योजना नाहीत, त्या करायला पाहिजेत. ते विभागातर्फे निश्चितपणे करण्याचा प्रयत्न करु असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. याबाबतचे विभागाचे काय नियोजन आहे, ते समिती समोर एक महिन्यात सादर करावे असे निदेश यावेळी समितीने दिले.

१.८८ विभागामार्फत नियोजन करण्यात येईल परंतु, त्याला फायनान्स आणि कॅबिनेट डिसीजनचा बॅकअप देखील पाहिजे असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले. तसेच नियोजन पुढच्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत करु असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.८९ ARSH या केंद्र शासनाच्या कार्यक्रमांतर्गत नोंदणी झालेल्या १५ ते १९ वयोगटातील अनुक्रमे ११,३८९ व ११,८३९ मुली विवाहित होत्या. तर महाराष्ट्र शासनाने सन २०१० ते सन २०१३ दरम्यान बालविवाहाची केवळ ४५ प्रकरणे घडल्याचा अहवाल दिला आहे यामध्ये विसंगती दिसते. महालेखापालांचा याबाबत आक्षेप आहे. बालविवाह थांबविण्याकरिता जोपर्यंत समाज प्रबोधन करणार नाही, तो पर्यंत हा प्रश्न सुटणार नसल्याचे समितीने विभागास अवगत केले.

१.९० महिला व बालविकास विभागातर्फे नियोजनकरून ते योजनेमध्ये परिवर्तीत होईल का ते माहित नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. हे नियोजन करीत असताना समितीचे इनपुट मिळाले तर बरे होईल. वेगवेगळ्या कम्युनिटीमध्ये कोणत्या पद्धतीची स्ट्रॅटेजी असली पाहिजे, त्याबाबत समितीने सांगावे असे विभागीय सचिवांनी समितीस विनंती केली असता समितीने विभागास अशी सूचना केली की,बालविवाह बंदीबाबत शासनाने गंभीरपणे काही तरी योजना आखून तिची अंमलबजावणी लवकरात लवकर करावी. समितीला रिपोर्टच्या आधारावर असे दिसते की, या विषयी शासन सध्या इफेक्टिव्ह पाऊल उचलत नाही. समितीची अशी अपेक्षा आहे की, शासनाने २ महिन्यांच्या आत या बद्दल काही घोषणा करावी. यासंदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, पुढील आर्थिक वर्गात पहिल्या तिमाहीत करण्यात येईल.

१.९१ या अनुषंगाने समितीने असे सांगितले की, तो पर्यंत अशा एरियामध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा तरी कडक करावा. कारण होळी, रंगपंचमी झाल्यानंतर लग्नाचा सिझन सुरु होत असल्याने सीएमपीओंना कडक कारवाई करण्याबाबत सांगावे.

१.९२ समितीच्या उपरोक्त म्हणण्यावर विभागीय सचिवांनी असे विदित केले की, त्या सूचना आम्ही देतो. एक नोटिफिकेशन काढून सर्वांना पत्र पाठविण्यात येईल. समितीने सांगितल्याप्रमाणे त्यांना टार्गेट देतो की, असे झाले तर त्यांच्यावर केस दाखल करा.या अनुषंगाने महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २२ एप्रिल, २०१६ च्या परिपत्रकान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना सूचना देण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत (विवरण ४) मध्ये समाविष्ट केली आहे.

" अनैतिक तस्करी (प्रतिबंध) कायदा, १९५६ ची अंमलबजावणी "

१.९३ उपरोक्त विषयासंदर्भात चर्चा करताना समितीने अनैतिक तस्करीबाबत कारवाई करण्यात गृह विभागाची मुख्य भूमिका आहे. त्याच बरोबर पुढील प्रबोधनाची कारवाईची जबाबदारी महिला व बालविकास विभागाची आहे. हे प्रमाण कमी करण्याकरिता विभागाचा काय प्लान आहे, सिस्टम काय आहे ? त्याकरिता मागच्या काळात सन २०१४-२०१५ मध्ये गृह विभागाने कोणती पावले उचलली असे समितीने विचारले तसेच समितीकडे सन २०१२-२०१३ पर्यंतची आकडेवारी आहे असे समितीने विदित केले असता १२ ठिकाणी स्पेशल अँटी हयुमन ट्रॅफिकिंग युनिटस उघडण्यात आलेले आहेत. तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आलेले आहे. या इन्व्हिस्टेगेशन्स खूप किचकट असतात. यामध्ये इंटरनॅशनल लिंकेजेससुद्धा असतात याकरिता हा सेन्सेटिव्ह विषय हाताळण्याकरिता महाराष्ट्रात १२ अँटी हयुमन ट्रॅफिकिंग युनिटस उघडण्यात आलेले आहेत. इतर देशांशी तुलना करता आपल्या येथे अँटी हयुमन ट्रॅफिकिंगबाबतचे काम चांगले आहे. केंद्र शासनाकडून या १२ युनिट्सकरिता केवळ २ लाख १० हजार रुपये इतके सहाय्य मिळते. हे सहाय्य देखील केवळ सन २०१२-२०१३ पर्यंत आलेले आहे त्यानंतर पैसे मिळालेले नाहीत. याकरिता केंद्र शासनाच्या योजनेतून आणि राज्य शासनाकडूनही आर्थिक तरतूद मिळाली तर, हे काम उत्तमपणे करण्यात येईल असे गृह विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.९४ समितीकडे सन २०१३ पर्यंतची मानवी तस्करी विरोधी कक्षाच्या कार्याची आकडेवारी आहे. सन २०१३ मध्ये ४४७ धाडी घातल्याचे विभागाने नमूद केलेले आहे. त्यानंतर सन २०१४-२०१५ ची आकडेवारी असल्यास ती समितीला दाखवावी या कालावधीत विभागाने किती धाडी टाकल्या, त्यामध्ये किती महिला व मुलींची सुटका केली, याबाबतची आकडेवारी आपल्याकडे असल्यास ती समितीला सांगावी. विभागाने महालेखाकारांच्या एक्झिट कॉन्फरन्समध्ये सांगितले होते की, बजेट प्रोव्हिजन नाही बजेट प्रोव्हीजन कशासाठी पाहिजे व गृह विभागाने ती का मिळवून दिलेली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता १२ सेंटर्सना प्रती वर्ष २ लाख १० हजार इतकी तरतूद केंद्रिय गृह मंत्रालयाकडून देण्यात येते असा खुलासा प्रधान सचिव, गृह विभाग यांनी केला.

१.९५ याकरिता येणाऱ्या अतिरिक्त खर्चाबाबत आणखी काय तरतुद पाहिजे व ती कशासाठी पाहिजे असे समितीने विचारले असता विभागाने आयर्जीना प्रत्येक युनिटकरिता ॲडिशनल किती पैसे लागतील याबाबत विचारणा केली व त्याबाबतचा प्रस्ताव देण्यास सांगितले

असल्याचे प्रधान सचिव, गृह विभाग यांनी समितीस अवगत केले. तसेच या युनिट्सकडून घेतलेल्या मौखिक माहितीनुसार या १२ सेंटर्सकरिता दरवर्षी प्रत्येकी ३ ते ४ लाख रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार अंदाजे ४८ लाख रुपयांची तरतूद आपल्याला दरवर्षी करावी लागेल ही मदत केंद्र शासनाकडून मिळाली नाही तर ती राज्य शासनाकडून द्यावी लागेल अशी माहितीही समितीस अवगत केली.

१.९६ विभागाच्या प्रत्येक सेंटरला ३ ते ४ लाख रुपये कशासाठी लागतात ? अशी विचारणा समितीने केली असता पिडीत व्यक्तीची सुटका केल्यानंतर त्यांचे भोजन, निवास आणि वाहतूक यासाठी हा निधी आवश्यक असतो अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१.९७ या ठिकाणी राज्य शासनाचे बजेट २ लाख कोटींचे असताना आपल्याला २ लाख रुपयांचा निधी कमी पडत आहे आणि तो निधी केंद्र शासनाकडून आला तरच हे काम चांगले होईल अथवा होऊ शकणार नाही अशा स्वरुपाचे आपण उत्तर महालेखाकारांसमोर देण्यामध्ये काय लॉजिक आहे. समितीची अशी अपेक्षा आहे की, आपल्या गृह विभागाला एका सेंटरसाठी ४ लाख रुपये लागणार आहेत आणि विषयाचे गांभीर्य विचारात घेता ही मागणी काही फार मोठी नाही. यासंबंधी आपण ब्रेक अप देऊन मघाशी जी योग्य कारणे सांगितली आहेत, ती विचारात घेता पुढच्या बजेटमध्ये या निधीची मागणी करावी किंवा हा खर्च नॉनप्लॅनमध्ये स्वीकारण्यात यावेत अशी सूचना समितीने केली.

१.९८ एकूण २ लाख १० हजार रुपये एकूण १२ सेंटरसाठी केंद्र शासनाकडून मिळतात आणि राज्यामध्ये असे एकूण १२ सेंटर्स असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१.९९ या २ लाख १० हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्याचा प्रसंग आल्यास विभागामार्फत काय करण्यात येते ? अशी विचारणा समितीने केली असता मंजूर निधीपेक्षा ज्यावेळी अधिकचा खर्च करावा लागतो त्यावेळी ते ते पोलीस ठाणे स्थानिक एन.जी.ओ.च्या मदतीने पिडीत महिलांना भोजन, निवास व वाहतुकीसाठी खर्च हा प्रश्न सोडवितात असा खुलासा प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी दिली.

१.१०० या प्रकरणी वित्त विभागाच्या सचिवांचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता यासंबंधी गृह विभागाने थोडासा अभ्यास करावा की, हा निधी कोणत्या बाबींसाठी मिळतो. जनरली केंद्र शासन काही ठराविक बाबींसाठी म्हणजे जे स्पेसिफिक वर्क आहे, अन्यथा हे नियमित पोलीसींग वर्क आहे. याबाबत आपल्याला असे वाटत असेल की, केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी कमी आहे आणि राज्य शासनाकडून निधी मिळणे आवश्यक आहे तर ज्याप्रमाणे तंटामुक्ती योजनेसारख्या उपयुक्त योजनांसाठी शासन निधी वाढवून देते आणि त्यासारखीच ही योजना आहे गृह विभागाला गरज असेल तर हे या बजेटमध्येच करून घ्यावे असे सचिव, वित्त विभाग यांनी सांगितले.

१.१०१ राज्य शासनाकडे अशा स्वरुपाची मागणी केली आहे काय की, फक्त आपण केंद्राच्या अनुदानावर अवलंबून आहात अशी विचारणा समितीने केली असता अशा प्रकारची मागणी अद्याप करण्यात आलेली नाही. कारण डी.जी. यांच्याकडून प्रस्ताव न आल्यामुळे वित्त विभागाकडे प्रस्ताव दिलेला नसल्याचे सचिव, गृह विभाग यांनी स्पष्ट केले.

१.१०२ ज्यावेळी समिती व महालेखाकार आय.जी. कार्यालयात गेले होते त्यावेळी त्यांनी त्यांच्या परफॉमन्समध्ये सांगितले की आमच्याकडे एटिकेट फंड नाही. मग त्यांनी शासनाला का सांगितले नाही की, त्यांच्याकडे निधी नाही. त्यामुळे २ लाख रुपये मिळाले म्हणून काही उपयोग होणार नाही. कारण आपल्याला ४८ लाखांची आवश्यकता आहे. गत ३ वर्षापासून हा निधी मिळाला नाही तर विभागाचे म्हणणे असे आहे की, एन.जी.ओ.कडून हा खर्च भागवितो. हा अत्यंत सेन्सीटिव्ह विषय असून कुंटणखान्यातील मुली व महिलांची सुटका झाली पाहिजे आणि हा प्रकार थांबला पाहिजे या दृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक आहे. या महत्त्वाच्या विषयासाठी आय.जी.कडून गृह विभागास मागणी का करण्यात आली नाही आणि गृह विभागाने ही मागणी नॉनप्लॅनमध्ये किंवा योजनोंतर्गत मंजूर का करून घेतली नाही, अशी विचारणा समितीने केली.

१.१०३ या अनुषंगाने प्रधान सचिव, गृह विभाग यांनी या सर्व बाबींचा ब्रेकअपनुसार अभ्यास करून या बजेटमध्ये ५० लाख रुपयांची मागणी प्रस्तावित करून वित्त विभागाकडे सदर प्रस्ताव पाठवून बजेटमध्ये प्रोव्हीजन करण्यात येईल. एक आठवड्याच्या आत मागणी करण्यात येईल असे समितीस अवगत केले.

१.१०४ गृह विभागामार्फत आता योजना तयार करण्यात येणार आणि मग त्यासाठी निधीची मागणी करणार तर तोपर्यंत विधीमंडळाचे अधिवेशन सुरू होते त्यामुळे एकदम अत्यावश्यक असेल तर नवीन योजना तयार करून निधी मागविण्यात यावा. जर आपल्या रेग्युलर बजेट करणे शक्य असेल तर काम सुरू करावे आणि सप्लीमेंटरीमध्ये कमी पडणारा निधी नंतर मिळवून घ्यावा. यामध्ये हाच जास्त सोयीचा मार्ग असेल कारण हा नियमित पोलिसिंगचाही भाग आहे असे मत सचिव, वित्त यांनी व्यक्त केले.

१.१०५ या योजनेसाठी निधी मिळविण्यासाठी Any how आपण वित्त सचिवांशी संपर्क करावा आणि ही मागणी पूर्ण करण्यात यावी आणि या कामाला योग्य न्याय द्यावा असे समितीने गृह विभागास सांगितले यासंबंधी वित्त विभागाचा विरोध नाही की, नवीन योजनेतून हे करु नये, विभागाला ते करता येईल परंतु तोपर्यंत कामाची सुरूवात करावी अशी सूचना सचिव, वित्त विभाग यांनी केली.

१.१०६ महिला व बालविकास विभागाकडे सन २०१४-१५ ची या संदर्भातील आकडेवारी आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१४-१५ मध्ये ॲन्टी ह्युमन ट्राफिक युनिटकडून २१४ धाडी घालण्यात आल्या आहेत. यामध्ये ११ कुंटणखाने बंद करण्यात आले

आहेत. सन २०१५ मध्ये २०० धाडी टाकण्यात आल्या असून ८८५ पिडीतांची सुटका करण्यात आली आहे. एकंदरीत ९५२ धाडी टाकल्या असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी दिली तसेच सन २०१३ मध्ये ४४७ धाडी टाकल्या असून ओव्हर ऑल ४४६ हा आकडा सन २०१४ चा आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.१०७ यामध्ये १ धाड कमीच आहे धाडींचे प्रमाण आपले वाढले पाहिजे. सन २०१०, २०११ आणि २०१२ प्रमाणे पाहिले तर आपल्या धाडींचे प्रमाण वाढलेले आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात धाडींची वाढ निरंतर होणे आवश्यक आहे आणि कुंटणखाने जास्तीत जास्त बंद झाले पाहिजे. या दृष्टीने विभागाची वाटचाल अपेक्षित आहे धाडीनंतरच्या प्रक्रियेचे काय. म्हणजे आपण धाडी टाकल्या महिला वा मुलींना ताब्यात घेतले आणि त्यानंतर त्यांची कशी विल्हेवाट लावायची होती ती विल्हेवाट लावण्यात आलेली नाही असा देखील ऑडीटमध्ये आक्षेप आलेला आहे त्यामुळे यासंबंधी स्पष्टीकरण द्यावे असे समितीने सांगितले असता सन २०१० मध्ये १३२ प्रवेशिका होत्या त्यापैकी ८९ पालकांच्या ताब्यात दिल्या असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.१०८ तसेच सन २०१० मध्ये १३२ प्रवेशिका होत्या. त्यापैकी ८९ पालकांच्या ताब्यात दिल्या आणि ८८ मायदेशी रवाना करण्यात आल्या आहेत. यामध्ये ज्या लहान मुली असतात त्यांना बाल सुधारगृहामध्ये पाठविण्यात येते. त्यानुसार २०१२ मध्ये ५३ मोठ्या महिला होत्या. यापैकी ३१ पालकांच्या ताब्यात दिल्या आणि मागच्या वर्षीच्या धरुन एकूण ५३ मायदेशी गेल्या. यामध्ये बांग्लादेशींचा देखील इश्यू आहे या बाबतीत आपण भारत सरकार आणि प.बंगालच्या सरकारला देखील लेखी कळवून माहिती देतो. परंतु त्यासंबंधी पुरेसा रिस्पॉन्स मिळत नाही अशी एक अलिकडे अडचण निर्माण झाली आहे त्यामुळे आता आपण असे करण्याचे ठरविले आहे की, प. बंगालच्या जवळ असल्यामुळे त्यांच्याकडे एक टास्कफोर्स तयार केला आणि आपल्याकडे एक टास्कफोर्स स्थापन केलेला आहे. आता दिनांक २४ फेब्रुवारीला विभागाने व्हीडीओ कॉन्फरन्शींग केली आहे. ज्या पिडीत महिला शिल्लक आहेत त्या परत पाठविण्यासाठी हे मेकॅनिझम तयार करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. २ आणि ३ फेब्रुवारीला विभागाने कलकत्त्याला एक टीम पाठविली होती. त्यांची टीम आणि आमची टीम एकत्र बसून आम्ही त्याचे नियोजन करीत आहोत. परंतु यामध्ये एक इश्यू आहे की, बांग्लादेशाकडून पाहिजे त्या प्रमाणात सहकार्य मिळत नसल्यामुळे त्यांच्या महिला सुधारगृहामध्ये, वुमेन्सहोममध्ये ठेवाव्या लागतात. कधी कधी या ठिकाणाहून या महिला पळून जातात. कारण २-२ वर्षे रिस्पॉन्स येत नाही आणि मग त्या स्थानिक सिक्युरिटीला ओव्हर पॉवर करून तसेच मारहाण करून पळून जातात अशा प्रकारच्या घटना घडत आहे. ही वस्तुस्थिती असून विभागासमोर आव्हान आहे. यामधून मार्ग काढण्यासाठी टास्कफोर्स तयार करून मार्ग काढण्याचा प्रयत्न आहे. मागील महिन्याच्या २४ तारखेला युनिसेफच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतले होते आणि त्यांना विनंती केली होती की, आपले आशिया खंडामध्ये जाळे असल्यामुळे आम्हाला बांग्लादेशामधील एन.जी.ओ.शी संपर्क करून द्यावा, जेणेकरून त्यांचे पत्ते शोधण्यास मदत होईल. कारण हे लोक बरेच वेळा चुकीचे पत्ते देतात आणि त्या पत्त्यावर पत्र पाठविले तर ते पत्र परत येते. या महिलांना देखील मायदेशी जायचे नसते त्यामुळे आपल्यापुढे पर्याय नसतो त्यांना सोडून दिले तर मग बांग्लादेशी मुंबई, पुणे आणि महाराष्ट्रात राहतात असा आणखी एक इश्यू निर्माण होतो. दोन राष्ट्रामधील हा इश्यू असून यासाठी आम्हाला फार स्ट्रगल करावे लागते. बाहेरच्या राज्यातील प्रश्न असेल तर आम्हाला तो सोडविता येतो. इतर राज्यांचा प्रश्न असेल तर आम्ही त्यांच्याशी काऊन्शीलींग करून त्यांचे पत्ते शोधून त्यांना हस्तांतरीत करतो आणि यामध्ये आपल्याला खूप चांगले यश मिळालेले आहे. पण ज्या बांग्लादेशी आहेत त्यांच्या बाबतीत अडचणी असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले.

१.१०९ यामध्ये एक मेजर इश्यू असा झाला की, आपण ह्युमन ट्राफिकिंगचे एक मॅपिंग केले होते. त्यामध्ये असे निदर्शनास आले की, प.बंगाल आणि बांग्लादेश या दोन सेंटरहून मोठ्या प्रमाणात असा प्रकार होत आहे. त्यामुळे युनिसेफ, प.बंगाल आणि महाराष्ट्र शासन यांनी मिळून एक स्टॅन्डर्ड ऑपरेशन प्रक्रिया सुरू केलेली आहे. आपसात एक एम.ओ.यू. केलेला आहे आणि त्यानुसार आमच्या वेळोवेळी बैठका होत असतात की, तेथील काही एन.जी.ओ. असतील तर त्यांची मदत घेऊन जर कोणी ह्युमन ट्राफिकिंग करीत असेल तर त्याला मध्येच कसे थांबविता येईल किंवा येथे आल्यानंतर त्यांना कसे ट्रेसआऊट करता येईल. येथे पकडल्यानंतर त्यांना मायदेशामध्ये परत पाठवावयाचे असेल तर तेथील सरकारमधील सचिवांशी संपर्क साधून त्यांचे सहकार्य कसे घेता येईल. कारण हा मेजर प्रॉब्लेम जो आहे तो बांगलादेशीयांचा रिपॅट्रिएशनचा प्रॉब्लेम आहे आणि तो दोन देशांचा असल्यामुळे आम्ही नेहमी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी नेहमी संपर्क करीत असतो. अपेक्षा अशी आहे की, त्यांनी बांगलादेशच्या काऊंटर पार्टशी संपर्क साधावा. या संदर्भात आम्ही त्यांना बरीचशी पत्रे लिहिली आहेत. पण या संदर्भात ओव्हर ऑल रिस्पॉन्स पाहिजे तसा नाही असा खुलासा सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी केला.

१.११० देवनार, महिला सुधारगृहाला लोकलेखा समितीने भेट दिली होती त्यावेळी बऱ्याचशा महिलांना त्या ठिकाणी पकडून आणले होते. त्या ठिकाणच्या रुम्स आणि महिलांची संख्या पाहिली तर एका रुममध्ये २० ते २५ महिलांना ठेवण्यात आले होते. त्या पाहणीच्या वेळी सर्व महिला समितीच्या आंगावर आल्या आणि म्हणाल्या की आम्हाला येथे जनावरांसारखे ठेवलेले आहे. म्हणजे जरी त्यांना पकडून आणून ठेवले असले तरी त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेचे काय. लोकलेखा समितीच्या दौऱ्यानंतर त्या ठिकाणी काही सुधारणा करण्यात आली आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता देवनार येथील इमारतीचे वरच्या मजल्याचे बांधकाम सुरू झाले असून त्या रस्त्यालगत काही अतिक्रमण झालेले आहे

आणि ते हटविण्यासाठी त्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत की, महापालिकेची मदत घेऊन ते अतिक्रमण हटविण्यात यावे. कारण त्यामध्ये प्रॉब्लेमम्स निर्माण करणारे घटक असू शकतात. गेटच्या अगदी बाहेरच ते अतिक्रमण आहे ज्या दिवशी पाहणी केली त्या दिवशीच्या मध्यरात्री सुमारे १ वाजता जवळपास २० महिलांना या ठिकाणी दाखल करण्यात आले आहे परंतु यासंबंधी आम्हाला आगाऊ सूचना नसते असा खुलासा महिला व बालविकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१.१११ एखाद्या दिवशी २० ते २५ महिला आणल्या तर व्यवस्थेवर प्रेशर येते. तथापि, थोडीशी आधी पूर्वकल्पना मिळाली तर तो प्रश्न सॉर्टआऊट करतो त्या दिवशीची परिस्थिती क्वॉईट नॉर्मल होती. काही वेळेस असे घडते की, प्रचंड संख्या असते. समितीच्या भेटीच्या वेळी तसे घडले होते असेही विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

१.११२ समितीने भेट दिली त्यावेळी एक अधिकाऱ्याने रेड टाकून जवळपास ७०-७५ महिलांना त्या ठिकाणी आणले होते. एक एका खोलीमध्ये २०-२५ महिला होत्या. तेथील कर्मचारी समितीला सांगत होते की, या महिला आम्हालाच मारायला आंगावर येतात. याबाबत समितीने विचारणा केली असता यामध्ये जे बांग्लादेशी आहेत ते परत जात नाहीत आणि त्यांना मोकळे सोडू शकत नाही. त्यामुळे त्या ओव्हर पॉवर करून सिक्युरिटीला देखील मारतात असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

१.११३ समितीने सरकारला काही मार्गदर्शक सूचना करणे आवश्यक आहेत असे समितीने नमूद करत महिला सुधारगृहामध्ये अशा महिलांची संख्या वाढली तर त्यांची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे जेलसारखे जे एखादे प्रिझनर असते तसे या महिलांसाठी एखादे प्रिझनर टाईप सुधारगृह बांधण्यात आले तर त्यामध्ये गृहउद्योग शिकवून तेथे ठेवून त्यांचे रिसेटलमेंट केले तर बरे होईल अशी सूचना विभागास केली असता अशा प्रकारचे रिहॅबिलीटेशन सेंटर्स स्प्रेड आहेत. परंतु मुंबईमध्ये त्यांची आणखी कॅपॅसिटी वाढविण्याची गरज असून यामध्ये सर्वसाधारणपणे केंद्र शासनाची योजना आहे. काही एन.जी.ओ.ला सांगण्यात आले असून त्यानुसार अशा प्रकारची कॅपॅसिटी जनरेट करून ते परहेड कॉस्टींग इन्फ्रास्ट्रक्चर केले जाते असा खुलासा महिला व बालविकास विभागाच्या विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

१.११४ देवनारच्या संदर्भात लोकलेखा समिती जाऊन आली त्यानंतरही तेथे विशेष काही सुधारणा दिसत नाही. तसेच त्या ठिकाणी अशा महिला राहण्यासाठीची कॅपॅसिटी वाढविली पाहिजे. कुंटणखान्यात रेड टाकून पोलीसांनी महिला पकडल्या आणि त्यापैकी एखाद्या महिलेला जबरदस्तीने या व्यवसायाकडे वळविले असेल तर तिच्यामध्ये परिवर्तन घडविणे सहज शक्य असते. परंतु बाकीच्या ज्या इतर महिला आहेत त्यांचे मन परिवर्तन करण्यासाठी आपण काही उपाययोजना करतो काय. म्हणजे त्यांना पर्यायी व्यवसाय किंवा व्यवसायाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी मन वळविण्याकरिता काय करतो. अशा महिलांचे मन परिवर्तन करण्यासाठी आपण एखादी योजना पॅकेज रुपाने राबविली आहे किंवा राबविणार आहात काय किंवा काही एन.जी.ओ. असे करीत आहेत काय. तसेच मुंबईमध्ये किती कुंटणखाने आहेत ? कुंटण खान्यातून पकडून आणलेल्या महिलांकरिता कौन्सिलिंग व व्यवसायिक प्रशिक्षण देणारी एखादी प्रभावी योजना विभागामार्फत व महामंडळामार्फत राबविली जाते का ? अशी विचारणा समितीने केली असता महिला सुधारगृहांची कपॅसिटी वाढविण्याबाबतची माहिती समितीला देण्यात येईल तसेच मुंबईमध्ये ३ कुंटणखाणे असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले आणि कुंटणखान्यातून पकडून आणलेल्या महिलांकरिता ऊज्ज्वला ही केंद्र शासनाची एक योजना असून या योजनेंतर्गत अशा पीडित महिलांचे कौन्सिलिंग केले जाते. तसेच, त्यांच्या भविष्यातील उदरनिर्वाहाकरिता त्यांना व्यवसायिक प्रशिक्षणही दिले जाते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.११५ चेंबुर येथील महिलांच्या सुधारगृहाची पाहणी करीत असतांना काही अधिकाऱ्यांशी समितीचे बोलणे झाले होते. त्यावेळी काही अधिकाऱ्यांनी असे मत व्यक्त केले होते की, या अशा महिलांना व्यवसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्यापैकी काही महिलांची मेहनती जीवन जगण्याची मानसिकता नसल्याचे आढळून येते. अशा महिलांची लाईफस्टाईल कमी मेहनतीत जास्त पैसा कमवून चैन करण्याची झालेली असते. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता ज्या महिलांना जबदरदस्तीने किंवा फसवून देहविक्रय व्यवसायात आणलेले असते, त्यांची सुटका केल्यानंतर त्यांना चांगले जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली तर तसा कंपोनंट या ऊज्ज्वला योजनेमध्ये असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.११६ वाईटातून चांगल्याकडे वळून आता प्रतिष्ठेने जगणाऱ्या महिला आहेत का ? अशी कोणती उदाहरणे आहेत का ? तसेच ऊज्ज्वला या योजनेच्या आधारे अंधाराकडून प्रकाशाकडे ज्या महिलांचे आयुष्य गेलेले आहे, अशा काही यशोगाथांचे सादरीकरण या महिलांसमोर केल्यास त्यांच्या मानसिकतेत बदल घडविता येऊ शकतो असे समितीने सूचविले असता अशा महिलांची अनेक उदाहरणे असून समितीच्या सूचनेचा विचार केला जाईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

१.११७ महाराष्ट्र शासनाच्या मानवी तस्करी विरोधी कक्षाने सन २०१०-२०१३ दरम्यान १५३३ धाडी घातल्या होत्या. यामध्ये ५९९ मुलींची सुटका केली होती. एएचटीसी ने ५९९ पैकी ५३७ मुलींना विविध बाल गृहांमध्ये दाखल केले होते. परंतु पुणे येथील उप आयुक्तांनी असे कळविले की, त्यांच्याकडे या मुलीच्या पुनर्वसनाविषयी किंवा या मुलींना त्यांच्या कुटुंबाकडे सुपूर्द केले असल्याविषयीचा कोणताही तपशील

उपलब्ध नसून सुटका करण्यात आलेल्या मुलींच्या पुनर्वसनावर सनियंत्रण व पाठपुरावा करण्यासाठीचे कार्यतंत्र सदोष/त्रुटीपूर्ण होते असे समितीने मत व्यक्त केले असता यापैकी २१९ मुली त्यांच्या पालकांच्या हाती सुपूर्द करण्यात आलेल्या असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१.११८ उर्वरित मुलींचे पुढे काय झाले, याची सविस्तर माहिती आश्रमाच्या रेकॉर्डला असणे आवश्यक होते. ही माहिती यापूर्वीच जर एजी यांना दिली असती तर हा पॅराच आला नसता. अधिकारी कोणत्याही छोटयातील छोटया माहितीचा रेकॉर्ड ठेवण्याकरिता किंवा पाठपुरावा करण्याकरिता हलगर्जीपणा करीत आहेत, असे दिसून येत असल्याचे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता याबाबतची माहिती लेखी. स्वरूपात समितीसमोर सादर करण्याचे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी दिले.

१.११९ ' बाल मजूरी (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६ ची अंमलबजावणी ' :—

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना कामगार विभागाच्या सचिवांनी असे विदित केले की, यशदा मार्फत बाल कामगार प्रकल्प (एलसीएलपी) नॉन डिस्ट्रिक्टच्या ठिकाणी जेथे राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प लागू नाहीत तेथे सर्वेक्षण करण्यात आले होते. सन २०१० मध्ये शासनाने त्यांना सूचना केली होती. सन २०१२ मध्ये यशदाने जिल्हानिहाय सर्वेक्षण रिपोर्ट जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिला. आता विषय उपस्थित झाला आहे की, सर्वेक्षणानंतर सापडलेल्या मुलांचे पुनर्वसन व त्यांना मूळ प्रवाहात आणण्याची काय कार्यवाही करण्यात आली ? यशदाने सर्वेक्षण केले आहे, त्यात काही मूलभूत दोष आढळले. धोकादायक व्यवसाय व प्रक्रिया चाईल्ड लेबर पर्यवेक्षण व रेग्यूलेशन ॲक्टप्रमाणे स्पष्ट केले पाहिजे. बाल कामगार ॲक्टखाली स्पष्ट कारवाई करता येत होती. आता यामध्ये यशदाची समनस्ती झालेली दिसते. बाल कामगार आणि शाळाबाहय मुले यांचा एकत्र सर्व्हे केला असल्याचे दिसत आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून त्यांना या संदर्भातील माहिती विचारण्यात आली, व्यवसायनिहाय पत्ते उपलब्ध करून दिले तर कारवाई करून असे सांगण्यात आले. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्तरावर बैठक बोलावून यशदाच्या अधिकाऱ्यांना माहिती विचारली असता ते ती माहिती देऊ शकले नाहीत. त्यामुळे सर्वेक्षणाच्या संदर्भात जी पुढची कारवाई झाली पाहिजे ती झाली नाही. टास्कफोर्स जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तयार केलेला असून त्या आधारे कार्यवाही सूरू आहे. एनसीएलपी ही केंद्र शासनाची योजना आहे. या योजनेमध्ये १०० टक्के अनुदान केंद्र शासन जिल्ह्याला देते यामध्ये राज्य शासनाचा रोल मर्यादित आहे.

१.१२० जे मालक अफेंडर ठरले त्या मालकाकडून २० हजार रुपये वसूल करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होता. सन २००६ मध्ये सुप्रिम कोर्टने निर्णय दिला. सन २००७ मध्ये गुजरात हायकोर्टने अफेंडर कोण आहे हे डिफाईन केले. A person would be offender if he held guilty by Competent Authority. अफेंडर म्हणजे जे गिल्टी आहेत, कन्व्हिक्टेड आहेत. सदर प्रकरण कोर्टात असल्यामुळे वसुली थांबली व त्यामुळे आपल्याला थकबाकी दिसून येत आहे. कोर्टाचा निर्णय होत नाही, तो पर्यंत २० हजार रुपयांची वसुली करता येत नाही.

१.१२१ बाल कामगारांच्या सुटके संबंधी काय कार्यवाही केली जाते ? त्यांचे शिक्षण होत नाही, आर्थिक अडचणी असल्यामुळे त्यांचे पालक मुलांना कामावर पाठवतात. मुलांच्या सुटकेपेक्षा त्यांचे पुनर्वसन कसे करता येईल, याचा विचार झाला पाहिजे. तसेच केवळ बाल कामगारांना वरूनु काढून टाकण्यामुळे बेकारीच नव्हे तर गुन्हेगारी देखील वाढते आणि हॉटेलमध्ये काम करणारी मुले आहेत. हॉटेलमध्ये काम करणे धोकादायक आहे काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता धोकादायक कामाची व्याख्या केलेली आहे. या व्याख्येनुसार लहान मुलांच्या अंगावर काही परिणाम होईल असे नाही तर मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१२२ ही व्याख्या मर्यादित करावी. त्यामध्ये वर्गीकरण करावे, मुलांचे पुनर्वसन, शिक्षण याकरिता पैशाची गरज लागणार आहे. दारूच्या दुकानात, फटाक्यांच्या फॅक्टरीमध्ये काम करणे हे धोकादायक असू शकते मात्र हॉटेलमध्ये काम करणे धोकादायक कसे काय आहे ? आज कित्येक मुले काम करून त्यांचे शिक्षण पूर्ण करतात असे समितीने विभागास अवगत केले.

१.१२३ केंद्र शासनाचा कायदा असून त्यामध्ये नोटीफाय केलेले आहे. समितीची सूचना विभागामार्फत केंद्र शासनापर्यंत पोहचविण्यात येईल. ज्यामुळे शरीरावर कोणताही परिणाम होत नाही किंवा केमिकलचा दुष्परिणाम होत नाही असे व्यवसाय धोकादायक ठरवताना विचार करावा असे विभागीय सचिवांनी नमूद केले.

१.१२४ या मुलांच्या आर्थिक बाजूसंबंधी शासनाकडून काही मदत करू शकत नाही अशा वेळी त्यांचे पालन पोषण कसे काय होणार आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता जिल्हा प्रशासनामार्फत टास्क फोर्स तयार केलेला असल्याचे समितीस अवगत केले.

१.१२५ या संदर्भात केवळ बैठका होतात मात्र कोणतीही अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता एनसीएलपी अंतर्गत १५ जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत बरेच कार्यक्रम घेतले जातात. तसेच हॉटेलमध्ये काम करणाऱ्या बाल कामगारांच्या शिक्षणाची जबाबदारी तेथील मालकावर सोपवता येईल का या संदर्भात यशदामध्ये चर्चासत्र ठेवण्यात येईल. या विषयावर चर्चा करून काय करता येईल तसेच कायद्यामध्ये काय सुधारणा करता येईल याचा एक प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवण्याबाबत विचार करु असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

१.१२६ बाल कामगार हॉटेलमध्ये काम करतात त्यावेळी त्यांना ठरलेल्या दराने पगार मिळत नाही. तसेच १२-१३ वर्षाच्या काम करणाऱ्या मुलांना मारहाण केली जाते. यामुळे हॉटेलमध्ये बाल कामगार नसावेत असे समितीने सूचित केले असता त्यांनी असे इंटरप्रिटेशन असे केले की, " A person would be offender if he held guilty by Competent Authority. " असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रायमाफेसी अफेंडर असून त्यांच्या कडून मुलांची सुटका केली आहे. त्यांच्यावरील वसुलीची कारवाई जलद केली पाहिजे.

१.१२७ गुजरात कोर्टाने सांगितले तरी देखील असे अनेक कारखाने आहेत की, जेथे बाल कामगारांना मोठया प्रमाणात वापरले जाते. त्यांच्याकडून वसुली करावयाची नसेल तर इतर कोणती प्रोसीजर आहे ?

१.१२८ सन २००६ मध्ये सुप्रिम कोर्टाच्या निर्णयात स्पष्ट केले होते की, अफेंडर कडून २० हजार रुपये वसुली करावी. सन २००७ मध्ये गुजरात कोर्टने अफेंडर म्हणजे कोण हे विषद केले. ज्या वेळी दोषी ठरतो त्या वेळी तो अफेंडर ठरतो. त्याचे कन्व्हिक्शन झाल्यांनंतर वसुली करावी, त्या आधीकरूनये अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली. तसेच समितीच्या भावना लक्षात घेऊन यशदामध्ये वर्कशॉप घेऊ. सूचना व ॲक्शन प्लान तयारकरून केंद्र शासनाला कायद्यामध्ये बदल सुचवू असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

१.१२९ १४ वर्षांखालील मुलांनी कामकरू नये असे सांगितले जाते. दुसऱ्या बाजूला सिग्नलला लहान मुलांकडून भीक मागवली जाते. त्यांची तस्करी केली जाते परराज्यातून मुले उचलून आणतात भीक मागणारी मुले कोण असतात याची तपासणी केली जाते काय ? लहान मुलांना भीक मागण्यासाठी भुकेले ठेवले जाते. त्यांचे हात, पाय तोडून जबरदस्तीने भीक मागितली जाते. लहान मुलांना भीक मागायला लावणाऱ्या अनेक टोळ्या आहेत, अनेकदा लहान मुलांना अप्पू घातलेली असते यासंबंधी काहीही केले जात नाही.

१.१३० एजींनी निकृष्ठ सनियंत्रण संबंधी ऑब्जेक्शन घेतले आहे. बाल कामगारांच्या समस्यांसंदर्भात आपले कामगार आयुक्त, इतर अधिकारी काही करत नाहीत. प्रत्येक गोष्ट जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना योजना राबवताना पुरेसा वेळ मिळत नाही. बाल कामगारांचा विषय कामगार आयुक्तांनी सोडवला पाहिजे, अशी समितीची सूचना राहणार असल्याचे समितीने विभागास अवगत केले.

१.१३१ एनसीएलपी प्रोजेक्ट केंद्र शासनाचा असून जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतर्गत सोसायटी असते. ही सोसायटी केंद्र शासनाला अहवाल पाठवते व केंद्र शासन त्यांना निधी पाठवते. यामध्ये आमचा रोल लिमिटेड आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे. जिल्हाधिकारी या कमिटीचे अध्यक्ष आहेत. या कमिटीमध्ये कामगार सहाय्यक आयुक्त सदस्य आहेत ही कमिटी जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतर्गत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१३२ माहे डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार, बाल कामगारांची शाळेच्या मुख्य प्रवाहात नाव नोंदणी होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी कामगार आयुक्तांची होती असे समितीने विभागास अवगत केले असता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्कफोर्स आहे. कामगार विभागाची जबाबदारी मर्यादित आहे. बाल कामगार दिसून आल्यानंतर त्यांना शाळेमध्ये ॲडमिट करण्याचे काम टास्कफोर्स करत असतो. या टास्कफोर्सवर शिक्षणाधिकारी सदस्य आहे राईट टू एज्युकेशन आल्यापासून मुलांना त्यांच्या वयानुसार शाळेत ॲडमिट केले जाते. शाळा बाह्य मुलांचा सर्व्हे देखील शिक्षण विभागाकडून केला जातो. ऑडीट आयुक्त कार्यालयाला आले त्यावेळी त्यांनी सांगितले की, तुमच्या स्तरावरून हे मॉनीटर केले पाहिजे. आमच्या स्तरावरून कोऑर्डीनेशन होऊ शकते एनसीएलपीमध्ये स्पेशल ट्रेनिंग सेंटर्स असून या मुलांना एसटीपी मध्ये ॲडमिट केले जात होते. अशी माहिती आयुक्त, कामगार यांनी दिली.

१.१३३ सन २०११ च्या शासन निर्णयानुसार या कामाची जबाबदारी कामगार विभागाकडे आहे. ही माहिती आपण पाठवली नाही. टास्कफोर्सवर सर्व काही काम सोपवले आहे, असे दिसत आहे. समितीच्या या प्रश्नाला टास्क फोर्स जे काम करते त्याचे कोऑर्डीनेशन कामगार विभागकडून केले जाते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.१३४ १६ जिल्ह्याचे एनसीएलपी कामगार उप आयुक्त नियंत्रण करीत नव्हते. आपले म्हणणे आहे काय की, त्यांच्याकडे ही जबाबदारीच नाही? अशी पृच्छा समितीने केली असता एनसीएलपी प्रोजेक्ट जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आहे. त्यावर जिल्हाधिकारी प्रोजेक्ट डायरेक्टर अपॉईंट करतात. त्याचा सर्व कॉरस्पॉन्डन्स जिल्हाधिकारी केंद्र शासनाकडे करीत असतात.

१.१३५ ॲडिशनल कलेक्टर किंवा प्रोजेक्ट डायरेक्टर हे त्याचे मेंबर सेक्रेटरी असतात. तसेच बाल मजुरांसंबंधीच्या कायद्याची अंमलबजावणीची जबाबदारी कामगार आयुक्तांकडे असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१.१३६ जिल्हाधिकाऱ्यांवर सर्व सोपवून चालणार नाही बाल मजुरांची नोंदणी व इतर काम केल्यानंतर जिल्हाधिकारी मदत करीत असतात. मात्र विभागाची भूमिका मुख्य आहे नियमानुसार कारवाई दिसत नसल्याचे समितीने मत व्यक्त केले.

१.१३७ या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, दिनांक २ मार्च, २००९ रोजी जी.आर. काढलेला आहे. कोणत्या विभागाची काय जबाबदारी आहे, हे त्यामध्ये विषद केले असून त्या नुसार काम करतो.

' एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंमलबजावणी '

१.१३८ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागाने कृपया खुलासा करावा असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, the current status of Anganwadi centres not having toilet facilities is out of the total number of Anganwadis. एकूण ९७४७५ आंगणवाड्यापैकी ९७१९४ आंगणवाडी सध्या कार्यरत आहेत. त्यापैकी ६८४९० आंगणवाड्यांमध्ये शौचालयाची सुविधा असून उर्वरित आंगणवाड्यांमध्ये सुविधा नाही. शासनाच्या स्वत:च्या मालकीच्या ६८ हजार आंगणवाड्या आहेत. त्यामध्ये जुन्या पॅटर्नप्रमाणे प्रसाधन गृहाची व्यवस्था नाही. सन २०११ नंतर ज्या आंगणवाड्याच्या इमारती बांधण्यात आल्या आहेत त्यामध्ये शौचालयाची व्यवस्था बंधनकारक असल्यामुळे शौचालयाची व्यवस्था केलेली आहे. काही आंगणवाड्या शासकीय इमारतीमध्ये आहेत तर काही समाज मंदिरामध्ये आहेत. तेथे त्यांची स्वत:ची शौचालयाची व्यवस्था असेल तर ती सुविधा आंगणवाडीला मिळते अन्यथा मिळत नाही. मुंबई शहरात काही आंगणवाड्या भाडेतत्त्वावर आहेत तेथे शौचालयाची व्यवस्था नाही. मागील आर्थिक वर्षात ३९३ आंगणवाड्याच्या अपग्रेडेशनसाठी निधी प्राप्त झाला होता. सदरचा निधी आंगणवाडीमध्ये शौचालये बांधण्यासाठी देण्यात आला असून ते कामसुरू आहे, परंतु त्याचा अहवाल आलेला नाही.

१.१३९ ६० हजार आंगणवाड्यांमध्ये शौचालयाची व्यवस्था आहे यापैकी काही आंगणवाड्या या भाडेतत्त्वावर असतील स्वत: च्या मालकीच्या ६८ हजार आंगणवाडी आहेत यापैकी किती आंगणवाड्यांमध्ये प्रसाधन गृहाची व्यवस्था आहे ? अशी विचारणा समितीने केली तसेच या योजनेचा मूळ उद्देश असा आहे की, या बालकांसाठी तसेच महिलांसाठी चांगली उपाययोजना व्हायला पाहिजे. आता विभागाने ९७ हजार आणि ६८ हजार आंगणवाड्यांमध्ये शौचालय आहे असे सांगितले, परंतु तरी देखील ३० हजार आंगणवाड्यांना शौचालयाची व्यवस्था अजूनही नाही असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी ९८५ आंगणवाड्यांमध्ये शौचालयाची व्यवस्था नसल्याची माहिती समितीस दिली.

१.१४० ९७ हजार आंगणवाड्यांपैकी ६० हजार आंगणवाड्यांना शौचालयाची व्यवस्था आहे. मुंबईमधील एकाही आंगणवाडीमध्ये शौचालयाची व्यवस्था नाही. मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक वार्डामध्ये कमीत कमी महानगरपालिकेच्या दोन, तीन शाळांमधील वर्गखोल्या खाजगी संस्थांना भाड्याने दिलेल्या आहेत. या शाळांतील खोल्या खाजगी संस्थांना भाडयाने दिल्या जातात, तर मग शासनाने या खोल्या आंगणवाडीसाठी का घेऊ नये? त्या खोल्या महानगरपालिकेला रिकाम्या करायला सांगा तेथे शौचालयाची व्यवस्था आहे अशी माहिती समितीने दिली असता मुंबईमध्ये ही फार मोठी अडचण आहे दोन दिवसापूर्वी एसआरए प्राधिकरणाला विभागाने विनंती केली होती एसआरए प्राधिकरणासमवेत बैठक झाली त्या बैठकीला एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्त आणि विभागाचे सर्वजण उपस्थित होते. एसआरए प्राधिकरणाने १३०० आंगणवाड्यासाठी शौचालयासह खोल्या उपलब्धकरून देण्याची तयारी दाखविली असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले आहे.

१.१४१ मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील खोल्या आंगणवाड्यांसाठी दिल्या पाहिजेत, अशी शिफारस समितीतर्फे शासनालाकरू आजही २८ हजार आंगणवाड्यांमध्ये शौचालयाची व्यवस्था नाही. याची जबाबदारी ज्यांच्यावर असेल त्यांनी या समितीला आश्वासित केले पाहिजे की, अमूक इतक्या कालावधीपर्यंत आंगणवाड्या १०० टक्के शौचालयमूक्तकरून देऊ.

१.१४२ २८ हजार आंगणवाड्यांमध्ये शौचालयाची व्यवस्था नाही याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता आंगणवाडी बांधकामासाठी जो निधी उपलब्ध होतो, तो अत्यल्प आहे. बऱ्याच वेळेला आपल्याला निधी उपलब्ध होत नाही. मागील वर्षी निधी उपलब्ध झाला होता, त्याचे वाटप झालेले असून यावर्षी आंगणवाड्यांचे बांधकामसुरू असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.१४३ विभागाच्या स्वत:च्या मालकीच्या ज्या आंगणवाड्या आहेत, त्यांचे अपग्रेडेशन करणे हे नवीन बांधकामापेक्षा जास्त आवश्यक आहे. ६८ हजार आंगणवाड्या विभागाच्या स्वत:च्या मालकीच्या आहेत. त्या पूर्णपणे प्रसाधन गृहासह अद्ययावत करण्यासाठी लागणारा निधी आपण प्रथम खर्च करावा त्यानंतर नवीन बांधकामाकडे लक्ष द्यावे. आजच्या अवस्थेप्रमाणे ज्या आहेत, त्या अर्धवट स्थितीत आहेत. आंगणवाड्यांमध्ये प्रसाधनगृहाची व्यवस्था नाही, त्यासाठी किती खर्च लागेल, त्यानुसार विभागाने किती रुपयांची व कधी शासनाकडे मागणी केलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली.

१.१४४ विभागाकडून याकरिता नियोजन करण्यात येते परंतु निधी मिळाला पाहिजे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले व जवळपास ४० ते ५० हजार अंगणवाड्यांना इमारत नसल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले तसेच ९७४७५ अंगणवाड्या मंजूर आहेत, त्यापैकी ९७१९४ अंगणवाड्या कार्यरत आहेत. त्यानंतर ६८४९० आंगणवाड्यांमध्ये शौचालयाची व्यवस्था असून २८६०४ अंगणवाड्यामध्ये शौचालयाची व्यवस्था नाही. भाड्याची इमारत आणि स्वत:च्या मालकीची इमारत दोन्ही मिळून ६८ हजार आंगणवाड्या आहेत. आपल्याकडे ६० हजार अंगणवाड्या स्वत:च्या आहेत. त्यामध्ये २८ हजार अंगणवाड्यांमधील काहींचा समावेश असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस पुन्हा अवगत केली.

१.१४५ विभागाच्या स्वत:च्या मालकीच्या जेथे अंगणवाड्या आहेत तेथील शौचालयाची व्यवस्था प्रथम पूर्ण करावी. ग्रामीण भागामध्ये गावकऱ्यांनी शौचालये बांधावीत म्हणून शासनामार्फत पैसे देण्यात येतात. १२२ कोटी रुपये या वर्षी बांधकामासाठी दिले. या १२२ कोटी रुपयांपैकी ३४९ अंगणवाड्याना किती रक्कम दिली ? विभाग एका बाजूला इतक्या मोठ्या प्रमाणात बांधकामाला पैसे देतो, परंतु दुसऱ्या बाजूला मालकीच्या

अंगणवाड्या असतांना त्या अद्ययावत का करता येत नाहीत ? अशी पृच्छा समितीने केली असता ज्या स्वत:च्या मालकीच्या अंगणवाड्यांच्या इमारती आहेत, त्याचा संपूर्ण आढावा घेऊन ती किती संख्या आहे, त्यासाठी किती निधी लागणार आहे, त्या सर्व निधीची मागणी येत्या दोन महिन्यांत शासनाकडे केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

१.१४६ ज्या अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत, त्यांना शौचालये बांधून देण्याची विनंती करावी आणि त्यांना भाडे वाढवून द्यावे, अशा प्रकारची नोटीस त्यांना देण्यात यावी. ते शौचालय बांधून देत नसतील तर आपण पैसे खचकरून तेथे शौचालये बांधावी आणि तेवढे पैसे भाड्यातून कमी करावे. यासाठी ज्या काही अटी आणि शर्ती ठरवायच्या असतील त्या ठरवा असे मत समितीने व्यक्त केले तसेच जेथे भाडेतत्त्वावर अंगणवाड्या चालतात त्यांची भाड्याची रक्कम दिली जाते काय? किती रुपये भाड्यापोटी थकित आहेत, किती रपपये अंगणवाड्यांच्या भाड्यापोटी दिले, याबाबतचा स्पष्ट खुलासा करावा असे ही समितीने विभागास सांगितले असता अंगणवाड्यांचे भाड्याची बऱ्याच वेळेला खूप थकबाकी असते. मार्च महिन्यात जेवढी तरतूद झाली होती, तेवढी विभागाने वाटप केली, परंतु ती पुरेसी नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१४७ एका बाजुला विभागाकडून ३७ हजार अंगणवाड्या भाडेतत्त्वावरसुरू आहेत, असे सांगितले जात आहे आणि ६० हजार अंगणवाड्या या स्वत:च्या जागेतसुरू आहेत. ३७ हजार अंगणवाड्यांसाठी किती भाडे दिले जाते ? तसेच विभागाने ९७ हजार ४७५ अंगणवाड्यांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे आणि ९७ हजार १९४ अंगणवाड्यासुरू आहेत असे उत्तर दिलेले आहे. यापैकी २८० अंगणवाड्यांना मान्यता दिलेली असताना त्या सद्य:स्थितीतसुरू न होण्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता अव्हेलेबिलिटी ऑफ स्पेस हे याचे प्रमुख कारण आहे. भाड्यावर घेणे आणि सुरू करणे हाच महत्त्वाचा मुद्दा आहे याशिवाय दुसरे कोणतेही कारण नाही. मागणी आल्यानंतर सर्व्हे केला जातो आणि त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाते. केंद्र शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर अंगणवाडी सेविकांची निवड आणि जागा निश्चित करून पुढील कार्यवाही केली जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१.१४८ सीएसआरमधून अंगणवाडीसाठी प्रयत्न केला तर निधी उपलब्ध होऊ शकतो. विभागाने ५ ते १० सीएसआरमधून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करावा आणि अंगणवाडीसाठी त्यांचे नाव दिले जाईल, असे सांगण्याची गरज असल्याचे समितीने नमूद केले तसेच एमआरईजीएसमध्ये देखील अशीच कार्यवाही करणे शक्य असल्याचे विभागास अवगत केले व एमआरईजीएसमधून प्रायोरिटीवर प्रसाधनगृहे बांधण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी अशी सूचनाही समितीने केली असता एमआरईजीएसमध्ये अशी कार्यवाही करता येणार नाही. एमआरईजीएसमध्ये अकुशल कामासाठी ५ लाख रुपयांची तरतुद केलेली असते. प्रसाधनगृहासाठी ७० टक्के मटेरिअल लागते अकुशल भाग आहे कुशल कामासाठी व्यवस्था करावी लागणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

१.१४९ गोंदिया तालुक्यात अकुशल कामासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद केलेली होती. संबंधित अधिकाऱ्यांनी तालुक्यातील अकुशल आणि कुशल कामे घेता येतील असे सांगितले होते. याच धर्तीवर प्रसाधगृहाचे बांधकाम करणे शक्य होईल असे समितीला वाटत आहे. त्यामुळे सदर योजनेंतर्गत प्रसाधानगृहाची कामे एकाच वेळी करून घ्यावीत, अशी सूचना समितीने केली. विभागाला आणखी निधी मागण्याची गरज पडणार नाही. आता नवीन शासन निर्णय निघालेला आहे. सदर शासन निर्णयामध्ये तालुक्यातील कुशल कामामध्ये अंगणवाडीतील प्रसाधनगृहाचे काम घेता येईल असे म्हटलेले आहे. तालुक्याचा कुशल आणि अकुशल असा ६०-४० रेश्यो असणे अपेक्षित आहे हे एका गावापुरते मर्यादित नसावे. असा शासन निर्णय निर्गमित झालेला आहे अशी माहिती समितीने विभागास दिली असता केंद्र शासनाने १६ एप्रिल, २०१६ रोजी सर्व राज्यांना डायरेक्शन दिलेल्या आहेत. केंद्र शासनाने सर्व राज्यांना दिलेल्या डायरेक्शनमध्ये अंगणवाड्यातील काम एमआरईजीएसमध्ये इन्क्लुड करता येईल आणि कन्व्हेजन अंतर्गत जास्तीत जास्त ५ लाख रुपये एमआरईजीएस फंड आणि डब्ल्यूसीएटी डिर्पाटमेंटमध्ये करता येईल. अंगणवाडीसाठी ६०-४० असा रेशो असून तो मेंटन करावा लागणार आहे. हे काम जिल्ह्यातील ॲक्शन प्लॅनमध्ये अंतभूर्त करावे लागणार आहे आणि ६०-४० असा रेशो फ्लॉक लेव्हलवर केंद्र शासनाने मान्य केलेला आहे. ब्लॉक लेव्हलवर ६०-४० असा रेशो व्हायलेट करता येत नाही. यासंदर्भात रोजगार हमी योजना विभागाशी चर्चा करण्यात येईल तसेच माननीय समिती प्रमुखांनी दिलेल्या निर्देशानुसार We will come with type plan in consonance with our EGS department. त्यांनी जशी मान्यता दिली व फ्रेमवर्क करून दिल्यानुसार कार्यवाही केली जाणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

१.१५० जो सर्व्हे झालेला आहे, त्यासंदर्भातील आकडेवारी दिलेली आहे. ज्या ठिकाणी सर्व्हे झालेला नाही, ती आकडेवारी दिलेली नाही. खेडी, वस्ती, तांडे आणि आदिवासी भागातील गरीब लोक आपल्या सेंटरपर्यंत किंवा आरोग्य केंद्रापर्यंत पोहचत नाही हा आकडा दर्शविला तर आकडेवारी दुप्पटीने वाढू शकते. तसेच विभागाने सन २०१०-२०११ मध्ये ३.८१ अशी टक्केवारी दर्शविलेली आहे. त्यानंतर सन २०१४ पर्यंत २.२६ टक्के अशी आकडेवारी आलेली आहे. विभागाने जे टेबल दिलेले आहे, ते फार प्रोग्रेसिव्ह आहे असे समितीला वाटत नाही. कुपोषण आणि बालमृत्यूमध्ये कायम गडबड असते. कुपोषणामुळे बालके दगावली अशा अनेक वेळा वर्तमानपत्रातून बातम्या छापून येत असतात. त्यावेळी

आरोग्य विभागाकडून निरनिराळ्या आजारामुळे बालमृत्यू झालेला आहे, असा खुलासा केला जातो. अशा प्रकारे पळवाट काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. आदिवासी भागामध्ये कुपोषणामुळे बालमृत्यू झालेला नाही, असे एक प्रकारे आपण आपले समाधान करण्याचा प्रयत्न करीत असतो, तर त्याचे परिमाण काय आहे ? कुपोषण मुक्त करावयाचे असेल तर ठोस उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आहे. कुपोषणाच्या संदर्भात जी आकडेवारी दर्शविण्यात आलेली आहे, ती आकडेवारी आपल्याला दिलासादेण्यासारखी नाही. पाडे आणि आदिवासी भागात देखील कुपोषीत बालके आहेत कुपोषणाचे प्रमाण फार कमी झालेले नाही.

१.१५१ समितीने यासंदर्भात अहवालात शिफारस करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये वेगवेगळी मेडीकल ब्रदरहुडस, मेडीकल असोसिएशन्स आणि मेडिकलचे फेडरेशन आहेत. वरिष्ठ डॉक्टरांच्या इन्स्ट्यीट्युशन्स आणि असोसिएशनच्या स्वरूपात काम करणाऱ्या संस्था आहेत. त्यामध्ये एमडी, एमएस अशा पद्धतीने पोस्ट ग्रॅज्युएट डॉक्टरांच्या संस्था आहेत. समितीने अहवालात शिफारस करण्याची आवश्यकता असल्याचेही समितीने नमूद केले तसेच शासन आरोग्य व्यवस्थेवर हजारो कोटी रुपये खर्च करीत असुन केंद्र शासन अर्थसंकल्पात साडेचार ते पाच हजार कोटी रुपयांची तरतूदकरून आरोग्य विभागासाठी खर्च करीत असते. कुपोषणाची कारणे काय आहेत ते शोधून काढून त्यावर कोणत्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे हे जाणून घेण्यासाठी थर्डपार्टी ऑडिट करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने मत व्यक्त केले तसेच शासनाने अभय बंग समितीचा रिपोर्ट घेतलेला आहे. समितीने दिलेल्या अहवालानुसार कार्यवाही केली जात आहे काय की आपल्या विभागानुसार कार्यवाही करीत आहे ? अशी विचारणाही केली असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, आतापर्यंत सर्व जिल्ह्यामध्ये म्हणजेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जे वर्गीकरण केलेले आहे, ते दोन गोष्टींमध्ये केलले आहे. त्याकरिता एक वर्किंग ग्रुप तयार करण्यात आला होता. कमिशनर आयसीडीएस, डायरेक्टर, एनएचएम, प्रधान सचिव श्रीमती सुजाता सौनिक आणि प्रधान सचिव श्रीमती वंदना कृष्णा आणि मिशन डायरेक्टर या सर्वांनी मिळून त्यावर अभ्यास केला. सायन हॉस्पिटलमध्ये जो पायलट प्रोजेक्ट घेण्यात आला होता, त्याच्या रिझल्टकरिता नंदुरबार येथे गेलो होतो. राजस्थान आणि भुवनेश्वरमध्ये देखील स्पेशल फुड कंपोनंट देऊन कुपोषणावर मात करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, तो देखील विभागाने अभ्यास केला. त्याच्याबाबत एक ड्राफट सर्व डॉक्टरांशी चर्चाकरून तयार केलेला आहे. त्यामध्ये सॅम आणि मॅम या दोन कॅटेगरीजमध्ये कुपोषित मुलांना डिव्हाईड करण्यात आले होते. त्यांच्यावर नॉन मेडिकल केसेस जितक्या आहेत, त्यांना कसे ट्रीट करायचे, त्याकरिता पॉलिसी फ्रेमवर्क करण्याकरिता हेल्थ आणि टेक्निकल कमिटीज तयार केलेल्या आहेत. हेल्थ कमिटीच्या माध्यमातून एक ड्राफ्ट आणि पॉलिसी फ्रेमवर्क तयार केले गेलेले आहे. त्याचे कॉमेंट्स आल्यावर त्याला कार्यान्वित करण्याचे जे प्रयोजन आहे, ते विभाग आता करीत आहे. लोकलेखा समितीने समितीबाबत वगैरेचा विषय उपस्थित केला होता, त्याबाबत देखील बेसिक फ्रेमवर्क तयार केलेले आहे. आता त्याला योग्य दिशेने मान्यता देऊन कार्यान्वित करणार आहोत.

१.१५२ निरोगी बाळ जन्माला येणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने कारवाई सुरू आहे. याबाबत सन २०१३-१४ ची जी फिगर होती, त्यामध्ये आता सुधारणा झालेली आहे का ? विशेषकरून मुंबई, बुलढाणा ऐवजी नंदुरबार आणि गडचिरोलीतील कुपोषणाच्या प्रमाणामध्ये काहीतरी सुधारणा झालेली आहे का ? तीच परिस्थिती आहे, त्याची समितीला माहिती देण्यात यावी ठाणे, नंदुरबार हे कुपोषणाच्या बाबत डीग्रेड आणि सर्वात जास्त बाधित आहेत अशी समितीने विचारणा केली असता नंदुरबार व गडचिरोली हे भाग कुपोषणासंदर्भात मेजर डीग्रेड बाधित असून सहा महिन्यांपासून तीन वर्षापर्यंतच्या मुलांना शासन टीएचआर देते. या टीएचआरअंतर्गत लहान मुलांना मिल्कशेक व इतर पौष्टिक जिन्नस पुरविले जातात असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.१५३ ठाणे जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण २.५० इतके आहे. नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण ३.७० इतके आहे. गडचिरोली येथे जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण ५.५९ इतके आहे. त्यामध्ये शेवटचा जो अहवाल आलेला आहे,त्यामध्ये काय पर्सेंटेज आलेले आहेत, त्याची माहिती समितीला द्यावी या आकडेवारीमध्ये सुधारणा आहे का ? आकडेवारी कमी झालेली आहे की वाढलेली आहे, याची माहिती समितीला द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता एसयूडब्ल्यू जी मुले आहेत, त्याच्यामध्ये मार्जिनल डिक्रीज आहे, चारही जिल्ह्याची तसेच पालघर जिल्ह्याची देखील नेमकी आकडेवारी समितीला उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.१५४ आठ जिल्ह्यांची आकडेवारी देण्यात यावी यामध्ये मार्जिनल डिक्रीज आहे. सबस्टॅन्शियल डिक्रीज यामध्ये नाही. मार्जिनल डिक्रीज आहे, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे यामध्ये मेजर डिक्रीज नाही. इतके वर्ष शासन प्रयत्न करीत आहे, तरीही यामध्ये मेजर डिक्रीज नाही असे समितीने अवगत केले असता ज्यावेळी ही आयसीडीएस स्कीम सुरू केली होती, त्यावेळी राज्य कुपोषणाच्या ६० टक्के वर होते. येथे मेडिकली फार डिफीकल्ट आहे. या फिगरमधून खाली यायला विभागाच्या मिशनला फार प्रयत्न करावे लागतील. कुपोषण पारंपारिक पद्धतीने कमी होणार नाही त्याच्याकरिता तांत्रिक प्रश्न हाताळून ते सॉल्व्ह करून नवीन पद्धतीने कुपोषणाचा प्रश्न हाताळावा लागणार आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच याकरिता विभाग नवीन योजना घेऊन येत असून कुपोषणाची काळजी वेगळया मार्गाने घेण्यात येणार आहे. साध्या पद्धतीने

कुपोषणची परिस्थिती हाताळता येणार नाही. इतर कारणांमुळे होणाऱ्या कुपोषणाचा सामनाही आदिवासी भागाला करावा लागत आहे, त्यावर मात करण्याकरिता विभागाला इतर अनेक मार्गांचा वापर करावा लागणार असल्याचा खुलासा केला.

१.१५५ कुपोषित मुलांना महिला बालकल्याण विभागाच्या माध्यमातून पोषण मूल्ये किंवा प्रोटिन्सयुक्त औषधे देण्यात येतात या संबंधीचे सर्व प्रस्ताव सप्लायर्स तयार करतात. सप्लायर्सच आदिवासी विभागात जातात, तेच विभागाकरिता पैसे आणतात महिनाभर मार्चमध्ये कुठून किती पैसे मिळतात, ते पाहण्यात येते. आणि त्यातून काय वाटप करावयाचे आहे, हेही खाजगी सप्लायर डिसाईड करतो. या सर्व गोष्टी आपल्याला माहिती असतील, त्यांची कोणाचीही नावे सांगायची गरज नाही. हे खाजगी सप्लायर्स विभागाकडे जातात आणि प्रस्ताव क्लियरकरून आाणतात. त्यांना विभाग मान्यता देतो ही वस्तुस्थिती आहे. हे बदलण्यात आले नाही तर कुपोषणाची स्थिती राज्यामध्ये कधीच बदलणार नाही. ठेकेदारांना व सप्लायर्स यांनी ठरवून कुपोषण दूर होणार नाही. जर विभागाने थोडीशी सुधारणा केली तर भविष्यात विभागाने टीएचआरची क्वालिटी जर अश्योर केली तर बरे होईल.

१.१५६ टीएचआर हा इश्यू सेन्सेटिव्ह आहे. सहा महिन्यांच्या मुलाला टीएचआर देतात, गरोदर मातांना टीएचआर देतात इतर काही आदिवासी उप योजनांतर्गत टीएचआर दिला जातो असे समितीने विभागास अवगत केले असता एका बाजूला अब्दूल कलाम योजना सुरू करीत आहोत, असे विभाग सांगत आहे. टीएचआरचा दर्जा काय आहे, त्यामध्ये हायजिनिटी आहे की नाही ? विभागाकडून कोणती टेंडर्स काढण्यात येतात ? टेंडरमध्ये कट लावला जातो. ज्यांच्या टेंडरमध्ये कमी त्रुटी असतील त्यांना ठेका दिला जातो. शासन यामध्ये शिथिलता कशाकरिता यामध्ये आणत आहे ? टेंडर बोलाविले तर पूर्ण टेंडर बोलाविण्यात यावे, सर्व अटी काढून नवीन लोक येतील. यामध्ये काहीतरी घोळ झालेला आहे. यास कोण जबाबदार आहे ? याच्यामुळे देखील कुपोषण वाढलेले असेल, मोकळया जागी अस्वच्छ टीएचआर देत असाल तर ते योग्य नाही. जनावर देखील खाण्यास नकार देतात असे जिन्नस शासन लहान मुलांना दिल्यानंतर कुपोषण वाढणार नाही तर आणखी काय होणार आहे ? ७००-८०० कोटी रुपयांचीृ योजना याकरिता निश्चित करण्यात येते. त्यामध्ये घोळ झालेला आहे, हे विभागाला मान्य आहे की नाही ? कारण काय आहे याचे ? ते समितीला सांगण्यात यावे असे समितीने सांगितले असता एकदा टेंडर काढले की, त्यामध्ये ज्या अटी व शर्ती आहेत, त्या नंतर बदलता येत नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१५७ सन २०१३ मध्ये काम करीत असलेल्या संबंधित अधिकाऱ्यावर या संबंधी कारवाई का होऊ नये, याबाबत समितीने विचारणा केली असता यासंदर्भातील माहिती तपासून समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

१.१५८ दिनांक ४/१०/२०१३ रोजी सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी जो आदेश काढलेला आहे, तो आदेश काढण्याचे कारण कोणाला कमी अधिक त्रुटींना ठेका देऊन टाकला असून त्रुटींना पाठीशी घालण्याकरिता हे केलले आहे. टीएचआर फुड सहा महिन्याच्या मुलांना देण्यात येतो. गरोदर व स्तनदा मातांना जर टीएचआर फुड योग्य पद्धतीने मिळणार नाही तर निरोगी बाळ कसे जन्माला येईल. जन्माला येणारे बाळ जर मुळातच कुपोषित असेल तर राज्यातील कुपोषण कशा पद्धतीने कमी होईल ? अशी विचारणा समितीने केली तसेच टीएचआर योजना शासन काही विशिष्ट लोक पोसायला चालवित आहे की, लहान मुलांचे पोषण होण्याकरिता चालवित आहे असा समितीसमोर प्रश्न उपस्थित झाल्याचे खेदाने समितीने नमूद केले.

१.१५९ विशिष्ट लोकांना मजबुत करण्याकरिता टीएचआर योजना चालविण्यात येत आहे का ? टेंडरमध्ये अटी शर्तीमध्ये रिलॅक्सेशन देण्याचा आदेश काढणे हे चुकीचे आहे. अटी व शर्ती बदलता येत नाहीत, हे मान्य आहे का ? टेंडरमधील आरोग्य व हायजिनिटीसंबंधीच्या अटी व शर्ती वेळेवर बदलून टीएचआरचा दर्जा घसरला याची जबाबदारी कोण घेणार आहे ? यामध्ये अनियमितता झाली असून हे जे काही झाले ते नियमाला धरून नव्हते, हे विभागाला मान्य आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी लागेल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.१६० जेथे अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यानंतर देखील त्यांना विभागाने रिलॅक्सेशन देऊ केले, ते योग्य होते का हे तपासणे समितीसाठी अधिक महत्त्वाचे आहे. टेंडर कंडिशन्समध्ये रिलॅक्सेशन देणे अयोग्य होते, असे समितीचे मत असल्याचे समितीने व्यक्त केले असता पुढील काही कालावधीमध्ये त्याच्याबद्दल एक टिप्पणी पाठवून माहिती संकलित करून एक घटनाक्रम बनवून समितीसमोर सादर करण्याचे समितीस आश्वासित केले.

१.१६१ समितीने अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ३१ मे २०१६ रोजी पुन्हा साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २०१३ मध्ये टीएचआरसंदर्भातील निविदा प्रक्रियेसंबंधी संपूर्ण व सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी. या संबंधी विभागाचे काय म्हणणे आहे, यामध्ये घडलेल्या चुकीच्या गोष्टी विरुद्ध विभागाने कारवाई केली का ? असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती सादर करण्यात यावी असे सांगितले तसेच सन २०१३ मध्ये टीएचआर निविदा प्रक्रियेसंदर्भात काम केलेल्या तत्कालीन अधिकाऱ्यांचे याबाबत काय म्हणणे आहे ? या निविदा प्रक्रियेनंतर त्यामधील अटी व शर्तींमध्ये काय बदल केला होता ? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१३ मध्ये सुप्रिम कोर्टाच्या

गाईडलाईन्सप्रमाणे महिला बचत गट व महिला मंडळ यांना काम देण्यासाठी एक्सप्रेस ऑफ इंटरेस्ट बोलाविण्यात आले होते. जास्तीत जास्त महिला बचत गटांना या माध्यमातून काम मिळावे याकरिता रेट एक्स्प्लोर केले नव्हते. एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्टच्या माध्यमातून महिला बचत गटांना काम देण्याचा हा विषय होता आणि याकरिता केंद्र शासनाच्या सविस्तर गाईडलाईन्स आहेत. एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्टंतर्गत काही अटी व शर्ती टाकल्या होत्या. त्याप्रमाणे काही ठराविक जागांवर जे पात्र होते त्यांना जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून काम देण्यात आले होते. काही जागावंर महिला बचत गटांना सामावून घेण्यासाठी काही अटी व शर्ती शिथिल करण्यात आल्या होत्या अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.१६२ एकदा टेंडर फ्लो झाल्यानंतर त्यामधील अटी व शर्ती बदलता येत नाही. असे असतानाही ज्या लोकांनी जेथे या अटी व शर्ती सोयीप्रमाणे बदलल्या किंवा त्यामध्ये रिलॅक्सेशन दिले, त्यांच्या विरुद्ध नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यासंबंधी समितीने मागील बैठकीमध्ये विभागाला निर्देश दिले होते. मागील बैठक एक महिन्यापूर्वी झाली होती. एका महिन्याच्या कालावधीमध्ये विभागाने या संबंधी चौकशी करून कोणत्याही प्रकारच्या कारवाईस सुरुवात केलेली नाही, हे योग्य नसल्याचे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

१.१६३ टीएचआर योजनेसंदर्भात ज्या भागामध्ये टेंडरच्या कंडिशन्समध्ये रिलॅक्सेशन देऊन काम देण्यात आले होते, त्यासंबंधीची संपूर्ण सविस्तर माहिती संकलित करणे, त्यानंतर त्याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर निश्चित करून त्यानुसार कारवाईस विलंब लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१६४ यासंबंधीची मागील बैठक एक महिन्यापूर्वी झाली होती तरी देखील सन २०१३ च्या टीएचआर योजना निविदा प्रक्रियेसंबंधी संपूर्ण माहिती विभागाने संकलित केलेली नाही हे योग्य नाही. या संदर्भातील सविस्तर माहिती संकलित करून त्यासंदर्भातील अधिकाऱ्यांवरील जबाबदारी निश्चित करणे गरजेचे होते. टीएचआर योजना निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून राबवित असताना त्यामधील अटी व शर्तींमध्ये बदल करण्यात आला ? हा बदल करणे अपेक्षित होते का याबाबतही सांगितले होते तरी देखील विभागाने संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चितकरून त्यांच्या विरूद्ध नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई केलेली नसल्याची समितीने विभागाकडे विचारणा केली असता मागील बैठकीमध्ये टीएचआर योजनेच्या अंमलबजावणीमधील चुकासंदर्भात व अटी व शर्तींमध्ये बदल अपेक्षित नव्हता असे विभागाने सांगितले होते. या सर्व प्रकरणाची सर्वप्रथम सविस्तर चौकशी करणे गरजेचे आहे, असेही विभागाने स्पष्ट केले होते. या संदर्भातील प्राथमिक अहवाल आयुक्तांकडून मागविलेला आहे. जिल्हानिहाय कोणकोणत्या भागामध्ये निविदेमधील अटी व शर्ती कोणत्या प्रकारे शिथिल करण्यात आलेल्या आहेत, त्याचा संपूर्ण अहवाल मागविलेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१६५ ज्या जिल्ह्यामध्ये या योजनेसंबंधीच्या निविदा प्रक्रियेसंदर्भात अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यानंतर रिलॅक्सेशन दिले गेले होते ते योग्य व अपेक्षित नव्हते, असे म्हटले होते. या संदर्भातील चौकशी त्त्वरित एका महिन्याच्या आत करून कारवाईस सुरूवात करण्यात यावी, असे समितीने निर्देश दिले होते. तरी अद्यापहि या संदर्भातील कोणत्याही कारवाईस समितीने सुरूवात केलेली नाही असे समितीने पुन्हा नमूद केले.

१.१६६ सन २०१३ मध्ये प्रकल्पनिहाय टेंडर्स निघाले होते अशा प्रकारे ५०५३ प्रकल्प होते. प्रत्येक जिल्ह्यामध्ये हे प्रकल्पनिहाय टेंडर्स एकूण २-३ वेळा काढण्यात आले होते जिल्हास्तरावरून या योजनानिहाय टेंडर्स प्रोसेससंबंधीची व शिथिल केलेल्या अटीस व शर्तीसंबंधीची माहिती संकलित करणे आवश्यक आहे. याकरिता अवधीची आवश्यकता आहे. या संदर्भातील चौकशी दोन भागांमध्ये विभाजित करावी लागेल. आज एकूण ३१० बचत गटांच्या निविदासंबंधीची माहिती आलेली आहे. बचत गटांना वर्क ऑर्डर दिल्यानंतर त्यांच्याकडून जे को-ऑपरेशन अपेक्षित होते, त्यांनी ते केलेले नाही. दोन्ही गोष्टीसंदर्भात जिल्हानिहाय माहिती संकलित करण्याचे काम सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले असता राज्यस्तरावरच निविदेमधील अटी व शर्ती शिथिल करण्यासंबंधीचे चुकीचे निर्देश देण्यात आलेले आहेत, त्यासंदर्भात सर्वप्रथम प्राथमिक स्तरावर कोण दोषी आहे, त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी. याबाबतची जबाबदारी जिल्हा स्तरावर, आयुक्त स्तरावर,मंत्रालय स्तरावर, राज्य स्तरावरावर या संबंधीची त्त्वरित कारवाई होणे समितीस अपेक्षित होते असा खुलासा समितीने विभागास केला.

१.१६७ या निविदेतील अटी व शर्तीसंदर्भात जिल्हानिहाय काय परिस्थिती आहे कुठे कुठे काय काय घडलेले आहे ? याचा सविस्तर मुद्देनिहाय आढावा घेऊन त्यासंदर्भात नियमानुसार कोणावर कोणती कारवाई अपेक्षित आहे, याचा विचार करून कारवाईस सुरुवात करावी लागेल अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस केली.

१.१६८ या संदर्भात ज्या स्तरावरून चुकीचे निर्देश देऊन चूकीचे काम झाले असेल त्या स्तरावर त्त्वरित कारवाई होणे अपेक्षित आहे. दिनांक ३० जून, २०१६ रोजीपर्यंत या संदर्भातील संपूर्ण चौकशीकरून कारवाईस सुरूवात होणे समितीस विभागाकडून अपेक्षित आहे. दिनांक ३० जून, २०१६ रोजी समितीला या संदर्भातील अपेक्षित माहिती व कारवाईसंबंधीचा अहवाल सादर करण्यात यावा. तसेच सन २०१३ मधील टीएचआर योजनेसंबंधीच्या निविदा प्रक्रियेसंदर्भातील संपूर्ण चौकशी करून कारवाईसंबंधीचे निर्णय विभागाने घेणे आवश्यक आहे. याबाबत दोषी अधिकाऱ्यांच्या डी.ई.संबंधीचा निर्णय व त्याप्रमाणे पुढील कारवाईसंबंधीचा निर्णयही त्त्वरित घेणे आवश्यक अहे. या संदर्भातील पॅराबाबत समितीने

विभागाला पत्र पाठविले होते. या पॅरावर समितीमध्ये चर्चा होणे अपेक्षित आहे. विधानसभेमध्ये या संबंधीचा अहवाल सन २०१४-२०१५ मध्ये सादर करण्यात आला होता. विभागाने या संदर्भातील चौकशी व कारवाईसंबंधीचा अहवाल समितीला सादर करण्यासंबंधी गांभीर्य बाळगावे, असे निर्देशही समितीने दिले.

१.१६९ महिला व बालविकास विभागांनी घेतलेल्या इमारतींमध्ये शौचालय व तत्सम सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत निर्माण केलेल्या आहेत का ? अशी ही विचारणा समितीने केली असता अंगणवाडयांमध्ये शौचालय व तत्सम सुविधा असणे आवश्यक आहे. राज्यामध्ये एकूण २८००० अंगणवाडया आहेत. या अंगणवाडयांमध्ये शौचालय व तत्सम सुविधा निर्माण करण्याकरिता केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्रस्ताव परिपूर्णरित्या तयार करण्यात आलेला आहे. यासंबंधीचा काही भाग ग्रामविकास विभागाकडेही सुपूर्द करण्यात येणार आहे. विभागांतर्गत योजनांच्या माध्यमातून ७००० रुपये प्रती शौचालय अशी लाभार्थी रक्कमही मिळणार आहे. ७००० रुपये प्रती शौचालय हा ठरलेला दर आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.१७० ७००० रुपयांमध्ये शौचालय बांधण्यासंबंधीचा हा रेट लाभार्थींपुरती मर्यादित आहे. हे शौचालय बांधण्याकरिता ७००० रुपयांचे रकमेसमवेत व्यक्तिगत लाभार्थीही हा पदरमोडही करीत असतो. कारण शौचालय बांधण्याकरिता ७००० रुपयांपेक्षा जास्त खर्च लागतो असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता राज्यभरामध्ये आवश्यक ठिकाणी ५०,००० शौचालय प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. या संदर्भात काही अटी व शर्ती देखील शिथिल करण्यात आलेल्या आहेत. ज्या जुन्या इमारतींमध्ये अंगणवाडया आहेत, त्यांच्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे शौचालय व तत्सम सुविधा अपडेट करण्यात येणार आहेत. नवीन इमारतींमध्ये शौचालय व तत्सम सुविधा प्रस्तावित योजनांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येतील. तसेच राज्यभरामध्ये काही अंगणवाडयांमध्ये चाईल्ड फ्रेंडली टॉयलेट्सही बांधण्याचाही प्रस्ताव प्रस्तावित असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.१७१ १२,००० रुपयांमध्ये शौचालय बांधण्याची जी योजना आहे, त्यामध्येही स्वत:चे घर असलेला लाभार्थीही पाच-सहा हजार रुपयांची भर शौचालयाच्या बांधकामामध्ये टाकतो. असे असताना या ७००० रुपये आणि १२००० रुपय शौचालय देणगी लाभार्थी योजनेंतर्गत शौचालय बांधणे शक्य नसून रुपये ७ हजार कोणत्या निकषानुसार निश्चित केले आहेत ? अंगणवाडीमध्ये रुपये ७ हजार मध्ये शौचालय उभारणे शक्य नसल्याचे मत समितीने व्यक्त केले असता ७ हजार रुपये रक्कम निश्चित करण्याचे केंद्र शासनाचे निकष असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले तसेच इतक्या रकमेत शौचालय उभारणे शक्य नसल्याचेही समितीस अवगत केले. तसेच ज्या ज्या जून्या अंगणवाडीमध्ये शौचालय नाही तेथे योग्य प्रकारचे शौचालय उभारण्यासाठी प्लॅन आणि एस्टीमेटसह योजना तयारकरून समितीकडे सादर करण्याबाबत आश्वासित केले.

१.१७२ अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची किती पदे रिक्त आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता अंगणवाडी मदतनिसांची मंजूर पदे ९७,४७५ असून त्यापैकी ९२,३५५ पदे कार्यरत आहेत. अंगणवाडी सेविकांची १८०० पदे शिल्लक राहिली आहेत. एप्रिल महिन्यात सूचना देण्यात आली होती त्यानुसार अनेक ठिकाणची पदे भरली आहेत. पदे भरण्याची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. पदे भरण्याची प्रक्रिया सतत होत असल्यामुळे अंगणवाडी सेविकांची पदे भरण्यामध्ये अडचण नाही. अंगणवाडी मदतनिसांची ५००० पदे रिक्त असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली. तसेच अंगणवाडी सेविकांची जास्तीत जास्त रिक्त पदे मुंबई शहरातील आहेत. शहरातील सेविकांचे मानधन कमी असल्यामुळे त्यांना काम करणे परवडत नाही त्यामुळे ही अडचण येत आहे. ५००० पैकी ३००० पदे मुंबई शहरातील व उर्वरित पदे इतर ठिकाणची असल्याचा खुलासा करत ही पदे तातडीने भरण्याचा प्रयत्न करणार असल्याचे समितीस अवगत केले.

१.१७३ मदतनिसांचे मानधन वाढविण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे का ? या प्रश्नाला मागील वर्षी मानधन वाढविलेले असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली. तसेच या विषयाबद्दल मंत्री महोदयांनी एक समिती स्थापन करण्याची कमिटमेंट केली आहे. केंद्र सरकारकडून ३५०० रुपये दिले जातात, राज्य शासनाकडून त्यांना दरमहा ५००० रुपये दिले जात असून मदतनिसांच्या वाढीव मानधनाचा भार राज्य शासनावर येणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.१७४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक २७ एप्रिल, व ३१ मे, २०१६ रोजी समितीने साक्ष घेतली. तथापि, अधिक माहिती जाणून घेण्याकरिता समितीने दिनांक १४ जून, २०१६ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने ९६९ बालगृह संस्थासाठी बायोमेट्रीक सयंत्र बसविण्यासाठीचे आदेश एप्रिल २०११ मध्ये देण्यात आले. ती प्रणाली बसविल्यानंतर ९० टक्के पेमेंटची अट असतांना ते अर्धवट बसविण्यात आले, याबाबतीत दिरंगाई झालेली आहे, त्याबद्दल विभागास काही सांगावयाचे असेल तर कृपया समितीच्या निदर्शनास आणून द्यावे असे समितीने सांगितले असता सन २०११ मध्ये विभागाने बायोमेट्रिक हजेरी प्रणालीसाठी समाजकल्याण विभाग व महिला बालकल्याण विभागाने मशिन्स घेतलेल्या आहेत. बायोमेट्रिकमध्ये सीम कार्ड टाकून तो डेटा सेंट्रल सर्व्हरवर टाकावयाचा होता जेणेकरुन त्यांचे उपस्थितींवर आपल्याला मॉनिटरिंग करता येईल. बायोमेट्रिकसाठी सीम कार्ड समाजकल्याण विभागाने स्वत: खरेदी केले होते. महिला व बालकल्याण विभागासाठी त्यांना सीम कार्ड खरेदी करायचे होते. यामध्ये सीम कार्ड खरदी करण्यात आले नाही ज्यांनी मालाचा पुरवठा

केला त्यांचेशी चर्चा केली आहे. सेंट्रल सर्व्हरवर डेटा टाकला की नाही, यासंदर्भात त्यांचे म्हणणे असे आहे की डेटा टाकलेला आहे. परंतु यांच्याकडे सीम कार्ड नसल्यामुळे डेटा ट्रॉन्सफर करता आला नाही असा खुलासा सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी केला.

१.१७५ ९० टक्के पेमेंट विभागाकडून कधी करावयाचे होते तसेच विभागाने लगेचच पैसे देऊन टाकले. ८ तारखेपर्यंत ९६९ मशिन्स बसविल्या नाहीत. आतापर्यंत ८१६ बसविल्या आहेत आणि १३६ बसविण्याचे बाकी आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता जेव्हा डेटा सर्व्हरवर अपडेट होईल तेव्हा पैसे द्यायचे होते आणि ८१६ मशिन्ससाठी १.९६ कोटी रुपये दिलेले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

तसेच आता ९६९ पूर्ण सयंत्र मशिन्स बसविली असून त्याचा ऑफ लाईन पद्धतीने वापर करीत असल्याचेही समितीस सांगितले.

१.१७६ ऑन लाईन पद्धतीने करण्याचे ठरले होते याचे कारण असे की, गळतीचे प्रमाण खूप होते. लोक फक्त अनुदान लाटण्याचे काम करतात याला कोठेतरी वचक बसला पाहिजे म्हणून सर्व्हरवर डेटा अपडेट झाला पाहिजे. कमीत कमी २४ दिवस निरीक्षण झाल्यानंतर पैसे द्यायला पाहिजे होते, परंतु असे न करता ९० टक्के पैसे विभागाने घाईघाईने दिले. याला खूप उशीर झाल्यामुळे संस्थेला जुन्याच रेटने अनुदान मिळाले यामध्ये मुलांचे नुकसान झाले ही सामाजिक व न्याय विभागाची चूक आहे, ती विभागाने मान्य करावी असे समितीने विभागास सांगितले असता समितीचे म्हणणे बरोबर असून सर्व्हरवर डेटा न जाता पैसे दिले गेलेले आहेत. आता कंपनीचे लोक आले होते त्यांनी डेटा कलेक्ट केलेला असून ते डेटा प्रोव्हाईड करणार आहेत. ही बाब पंधरा दिवसात व्हेरिफॉय करता येईल आजच्या तारखेला सेंटर सर्व्हरवर डेटा उपलब्ध नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.१७७ अद्यापपर्यंत सर्व्हर पद्धत सुरूच केलेली नाही ऑफ लाईन पद्धतीने काही ठिकाणी काम सुरू आहे. सर्व्हरवर डेटा गेल्यावर ९० टक्के पेमेंट करायचे होते, विभागाने आधीच पेमेंट केले आहे. सीम कार्डची कोणतीही व्यवस्था नव्हती तर पेमेंट लवकर करण्याचे कारण काय आहे? अशी पृच्छा समितीने केली. तसेच शासनाने अनुदानाची रक्कम ६३५ रुपयावरुन ९०० रुपये प्रति बालक देण्याचा निर्णय घेतला सन २०१० पर्यंत हा निर्णय घेतला गेला तथापि, सिस्टीप्रमाणे अंमलबजावणी केलेली नसल्याचे समितीने अवगत केले असता ऑफ लाईन पद्धतीने ९०० रुपयेप्रमाणे पेमेंट देण्याची कार्यवाही केलेली आहे ही कार्यवाही सन २०१४-२०१५ पासून सुरू केलेली असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.१७८ विभागाने फेब्रुवारी-मार्च २०१५ पासून ही कार्यवाही केलेली आहे. सन २०१० मध्ये निर्णय घेण्यात आला होता. तथापि, सिस्टिम अपलोड झाली नाही. सर्व्हरमध्ये कोणतीही इन्ट्री झालेली नसून आवश्यक ठिकाणी मशिन बसविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना ६३५ रुपये पेमेंट केलेले आहे. शासनाने सप्टेंबर, २०१३ मध्ये शासन निर्णय निर्गमित केलेला होता त्यानंतर विभागाने फेब्रुवारी, २०१५ मध्ये ९०० रुपये पेमेंट देण्याबाबतची कार्यवाही सुरू केलेली होती. २८ अटी होत्या त्यामध्ये बायोमॅट्रिक्स ही एक अट होती ती अट शिथिल करुन ते पेमेंट केलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता संस्थेने तीन अटींची पुर्तता केल्यानंतर त्यांना पेमेंट देण्याची कार्यवाही सुरू केलेली होती असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.१७९ सद्यःस्थितीमध्ये अटी पूर्ण न केल्यामुळे अजून किती संस्थांमध्ये ६३५ रुपयांप्रमाणे पेमेंट देण्याची कार्यवाही सुरू आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, जास्तीत जास्त जिल्ह्यांमध्ये ९०० रुपयांप्रमाणे पेमेंट देण्याची कार्यवाही सुरू आहे. ज्यांनी अटींची पूर्तता पूर्ण करणे आवश्यक होते, त्यांनी त्या पूर्ण केल्या पाहिजेत. दोन ते तीन जिल्ह्यांमधून माहिती मिळाली नसून उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये ९०० रुपयांप्रमाणे पेमेंट देण्याची कार्यवाही सुरू आहे.

१.१८० संबंधित दोन ते जिल्ह्यांमधून माहिती न आल्यामुळे विभागाने त्या ठिकाणची वस्तुस्थितीदर्शक माहिती घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्याची आवश्यकता आहे. संबंधित विद्यार्थ्यांना ६३५ रुपये पेमेंट केलेले असल्यामुळे ते विद्यार्थी त्या ठिकाणी आहेत किंवा कसे याची संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती घेण्याची आवश्यकता आहे असे मत समितीने नमूद केले असता हजेरीनुसारच पेमेंट देण्याची कार्यवाही केली जाणार असल्यामुळे ऑफ लाईन देखील चालु ठेवलेली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.१८१ ऑफ लाईन प्रणालीमुळे सीमकार्डला रि-ऑडिट करता येणार आहे. तसेच त्याला मॅनीप्युलेशन देखील करता येणार आहे. सर्व्हर बसविल्यामुळे ऑब्जर्व्हेशन व्यवस्थित होणार आहे. परंतु, २ कोटी ५० लाख रुपये खर्च करुन देखील आपला हेतू साध्य झालेला नाही. चुकीच्या पद्धतीने मशिन खरेदी केलेली आहे परंतु, सीमकार्ड खरेदी केलेला नाही सीमकार्डची ऑर्डर मशिन आल्यानंतर दिलेली आहे. याचा लाभ सन २०१४ मध्ये झालेला आहे. त्यानंतर देखील ऑफ लाईन आणि ऑन लाईनमध्ये खूप फरक आहे. ऑफ लाईनमध्ये काही तरी ॲडजस्टमेंट करता येते एका बाजूला सामाजिक न्याय विभागाने कोणतीही अट पूर्ण न करता ९० टक्के पेमेंट केलेले आहे आणि दुसऱ्या बाजूला सीमकार्डची कोणतीही व्यवस्था न करता सिस्टिमबाबत करार केलेला आहे. तसेच या कराराबाबत सामाजिक न्याय विभागाने आपल्याला विश्वासात घेतलेले नाही असे समितीच्या निदर्शनास येत आहे. याबाबत सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीला माहिती द्यावी. मशिनची ऑर्डर दिलेली आहे. परंतु, त्याच वेळी सीमकार्डची ऑर्डर देण्याबाबत कोणत्या विभागाची जबाबदारी होती ? अशी पृच्छा समितीने केली असता सेंट्रल सर्व्हर असणे आवश्यक असून महिला व बाल कल्याण विभागाने सीमकार्ड खरेदी करायला हवे होते. जीआरमध्ये सीमकार्ड घेण्याबाबतचा स्पष्ट उल्लेख केलेला असून सीमकार्ड खरेदी न केल्यामुळे डेटा अपलोडचा इश्यु निर्माण झालेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१८२ ७ लाख रुपयांचे सीमकार्ड त्यांनी खरेदी करावे आणि सामाजिक न्याय विभागाने अडीच कोटी रुपयांची मशिन विकत घ्यायची अशी अट कशी टाकता येईल. अशा प्रकारची कार्यवाही केल्यामुळे पूर्ण सिस्टिम कशी वापरात येणार आहे ? असा प्रश्न समितीने विचारला तसेच चुकीच्या पद्धतीने नियोजन केलेले आहे, असे सामाजिक न्याय विभागाला वाटत नाही काय ? चुकीचे नियोजन झाल्यामुळे त्यांनी सीमकार्ड खरेदी केले नाही, परंतु, सामाजिक न्याय विभागाने ९० टक्के पेमेंट केलेले आहे, हे बरोबर आहे काय ? यामधून अपेक्षित हेतू साध्य झालेला नाही. यामध्ये निधीचा मुद्दा उपस्थित होत नाही ज्या उद्देशाकरिता मशिन बसविण्यात आली होती, तो उद्देश सेंट्रल सर्व्हर न बसविल्यामुळे साध्य झालेला नाही. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता सामाजिक न्याय विभाग हे मान्य करते. तथापि, महिला व बालविकास विभागाकडून सीमकार्ड खरेदी न केल्यामुळे सेंट्रल सर्व्हमध्ये डाटा गेलेला नाही त्यामुळे हेतू साध्य झाला नाही असे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.१८३ सेंट्रल सर्व्हर कार्यान्वित करण्याबाबत आपल्या विभागाकडून कोणती कार्यवाही केली जाणार आहे ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, आयटीमधील संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करीत आहोत. सर्व्हर काही दिवस चालू होता नंतर व्हायरस आल्यामुळे सर्व्हर बंद केला होता. सद्य:स्थितीत सर्व्हर अव्हेलेबल आहे सर्व्हर उपलब्ध करुन देणे ही काही मोठी बाब नाही. एसडीसीकडे सर्व्हर उपलब्ध नसेल तर बाहेरुन देखील तो उपलब्ध केला जाऊ शकतो. सिस्टिम चालू करण्यासाठी सीमकार्ड आणि मशिन अपडेट करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचा आवश्यक तो डेटा उपलब्ध असण्याची आवश्यकता आहे. यासाठी युनिक आयडी नंबर दिलेला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच आवश्यक तो डेटा मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे. बायोमॅट्रीक व्हॅलिडेशन थ्रू आधार अशी पहिली स्टेप असणार आहे. एसटीसीकडून सेंट्रल सर्व्हर घेऊन पुढील कार्यवाही केली जाणार आहे. हे सामाजिक न्याय विभागासाठी देखील कार्यान्वित केले जाणार आहे असेही समितीस अवगत केले.

१.१८४ पुण्यातील एका कंपनीने सर्व्हर दिलेला असून पासवर्ड कमांडींग त्यांच्याकडे आहे. मशिन बसवून तीन वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे या दरम्यान व्हायरस आला किंवा मशिन बंद पडली किंवा डेटा व्यवस्थित फिड झाला नाही कारण सीमकार्ड त्यामध्ये बसविले नव्हते. कमांडींग पासवर्ड त्यांच्याकडे असेल. तो विभागाकडे नसणार आहे त्या काळात १ कोटी ७९ लाख रुपये दिलेले असून उर्वरित पेमेंट केलेले आहे काय ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, उर्वरित पेमेंट केलेले नाही त्यांचा पासवर्ड सेंट्रल सर्व्हरशी लिंक केल्यानंतर ते आपल्या पिक्चरमध्ये येणार नाहीत त्यावेळी त्यांच्याशी कोणताही संबंध येणार नाही.

१.१८५ रेव्हेन्यु झोनवाईज प्रायोरिटीने संबंधित विभागांमध्ये किती दिवसांच्या आत सर्व्हरवर सर्व डाटा अपग्रेड करुन ऑफ लाईन सिस्टिम बंद करणार आणि ऑन लाईनच सुरू करणार, अशा प्रकारची कार्यवाही किती दिवसांमध्ये पूर्ण केली जाणार आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता अशा प्रकारची कार्यवाही अंदाजित तीन महिन्याच्या आत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.१८६ संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन समितीला अचूक माहिती देण्यात येईल तसेच यासंदर्भातील कार्यक्रम देखील पाठविला जाणार आहे. या प्रक्रियेसाठी विलंब होणार असेल तर तशी माहिती समितीला लगेचच अवगत केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

म्हणजे १०० टक्के ऑफ लाईन सिस्टिम बंद करणार आणि ऑन लाईन सिस्टिमने पेमेंट दिले जाणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाचा असाच हेतू असून ३० सप्टेंबरपर्यंत ही कार्यवाही पूर्ण होईल असा विभागाचा देखील प्रयत्न असणार आहे तसेच आधार देखील व्हॅलिडेट केले जाणार आहे यामध्ये नाव व्यवस्थित असणे आवश्यक असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.१८७ ऑफ लाईनमध्ये कोणताही उपयोग नाही. विभागाने त्त्वरित पुढाकार घेऊन जो खर्च येणार आहे तो केला पाहिजे पूर्णपणे ऑनलाईन केले पाहिजे. तसेच सांगितल्यानुसार रेव्हेन्यू सर्कलवाईज सर्व्हरबाबत अंमलबजावणी करावी, अशी समितीची सूचना असून याबाबतची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत अवगत करावी आणि त्यानंतर उर्वरित पेमेंट करावे. ऑन लाईन झाल्यानंतर ९०० रुपयांप्रमाणे पेमेंट देण्याची कार्यवाही करावी बोगस लोकांना पैसे देता कामा नये. ही सर्व प्रणाली सुरळीतपणे सुरू करावी, अशी समितीची सूचना आहे. विभागाकडून जी कार्यवाही केली जाणार आहे, त्याबाबतची माहिती समितीला अवगत करावी, अशी सूचना समितीने केली असता समितीने दिलेल्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

" किशोरवयीन मुलींच्या सबलीकरणासाठी असलेल्या राजीव गांधी योजनेची अंमलबजावणी " :-

१.१८८ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, महाराष्ट्राच्या एकूण ११ जिल्ह्यांमध्ये ही पुरवठा योजना लागू करण्यात आलेली आहे. किशोरवयीन मुलींशी संबंधित ही योजना आहे. अंगणवाडीमध्ये पुरवठा योजना कार्यान्वित झाली नव्हती. ४४,८८१ अंगणवाडयांपैकी ४०,७८३ एवढया अंगणवाडीमध्ये सदर योजना कार्यान्वित असून ४४,८८१ अंगणवाडीमध्ये ही योजना चालू होणे अपेक्षित आहे. मागील आर्थिक वर्षामध्ये ही योजना सर्व अंगणवाडयांमध्ये चालू करण्यत आलेली आहे.

१.१८९ त्यावेळी या योजना का चालू नव्हत्या ? या संदर्भात विभागाने चूका व दुरुस्त्या केल्या त्यावर समिती समर्थन करेल परंतु त्यावेळी का चूका केल्या याची कारणे व खुलासा समितीला अपेक्षित असल्याचे समितीने नमूद केले असता अंगणवाडीमध्ये सेविका उपलब्ध नसल्यामुळे त्यावेळी ही योजना तेथे सुरू करण्यात आली नव्हती पण आता यामध्ये सुधारणा केलेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.१९० याकरिता शासनाची मान्यता होती, तरीही अशी परिस्थिती का निर्माण झालेली आहे ? शासनाची पूर्णपणे मान्यता होती तरीही ही योजना का लागू झाली नाही या महालेखाकारांच्या मुद्दांवर विभागाने खुलासा करावा असे समितीने मत व्यक्त केले तसेच ४९०० अंगणवाडयांमध्ये शासनाची मान्यता असूनही ही योजना मागील आर्थिक वर्षामध्ये का लागू होऊ शकली नाही ? व जून, २०११-नोव्हेंबर-२०१४ पर्यंत किशोरवयीन मुलींना कोणतेही व्यवसायभिमुख प्रशिक्षण दिले नव्हते, असा परिच्छेद आलेला आहे. विभागाचे एवढे मोठे इन्फ्रास्ट्रक्चर असतांनाही या योजना विहित मुदतीमध्ये कार्यान्वित का होऊ शकल्या नाहीत. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती समितीस अवगत केली, त्यावेळी व्यवसायिक प्रशिक्षणाचा कंपानेंट हाती घेण्यात आला नव्हता किशोरवयीन मुलींना लाईट स्किल ट्रेनिंग कोर्स देण्यात आला होता. परंतु तो प्रत्यक्ष हाती घेण्यात आला नाही. हा कंपोनंट हाती घेण्यात आला नव्हता हे विभाग मान्य करीत आहे परंतु तो का हाती का घेतला नाही ? हाच महालेखाकारांचा आक्षेप आहे. ज्यावेळेस तो कंपोनंट घेणे आवश्यक होते, त्याकरिता तरतूद होती. त्याकरिता शासकीय मान्यता होती तरीही तो हाती का घेण्यात आला नाही ? हाच प्रश्न आहे. हा कंपोनंट हाती घेण्यासाठी काय असमर्थतता होती, ज्यामुळे आपण हे ू ष शकला नाहीत ते समितीला सांगावे. महालेखाकार यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, त्यावरील विभागाचे मत समितीला अपेक्षित आहे असे समितीने सांगितले असता विभागाने सर्व फाईल्स बघितलेल्या आहेत, त्यामध्ये काही कारण दिसत नाही. त्याबद्दल नियोजन झालेच नव्हते या संदर्भातील एकूण आठ कंपोनंट होते आठ कंपोनंटमध्ये सर्वसाधारणपणे महत्त्वाचा कौशल्य विकासाचा जो कार्यक्रम आहे, तो हाती घेण्यात आलाच नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१९१ कौशल्य विकासाकरिता असे काही करण्याची गरज आहे असे शासनाचे असे धोरण आहे याबाबत तत्कालीन सचिवांनी मंत्री महोदयांकडे टिप्पणी पाठविली होती का, असा प्रस्ताव सचिवांनी पाठविला की नाही, मंत्री महोदयांनी महोदयांनी मान्यता दिली की नाही, याला कोण जबाबदार आहे ? याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता याकरिता स्कीम, शासन निर्णय, निधी इत्यादी सर्व खालच्या स्तरावर उपलब्ध करण्यात आले होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१९२ निधी दिला, शासन निर्णय काढला पण अंमलबजावणी झाली नाही. सिस्टीम चालविणारे कोणीतरी याला जबाबदार असतील असे मत समितीने व्यक्त केले असता खालच्या स्तरावर तेव्हा संबंधित सीडीपीओ होते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.१९३ यामध्ये कोणकोण सीडीपीओ होते. शासन निर्णय काढल्यानंतर निधी दिल्यानंतरही त्यांनी त्याची अंमलबजावणी केली नाही. त्यांच्यावर कारवाई करून समितीला १५ दिवसात समितीला द्यावी असे समितीने विभागास सांगितले. यावर तत्कालीन सीडीपीओ यांच्यावर याची जबाबदारी निश्तिच करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.१९४ आयुक्त, महिला व बालविकास यांनी ११ जिल्ह्यात प्रचलित पुरवठादाराची टी.एच.आर. ची खरेदी बंद करून महिला बचत गटांना काम देण्याबाबत आदेश काढण्यात आला, यामध्ये ९ महिन्यांचा खंड पडलेला आहे अशा प्रकारचा लेखा आक्षेप आहे. याबाबत विभागाने दिलेल्या उत्तरात म्हटले आहे की, खंड पडला नाही. टी.एच.आर. दिलेला आहे यामध्ये किती सत्यता आहे ? कारण समितीच्या माहितीप्रमाणे ९ महिने कोणताही पुरवठा करण्यात आलेला नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

१.१९५ या योजनेंअंतर्गत जितक्या जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या मुली होत्या, त्यांना टी.एच.आर. पुरवठा सुरू होता. टी.एच.आर. पुरवठयाबाबत २०१३ मध्ये टेंडर काढण्यात आले, कोर्टाचा स्टे असल्यामुळे टी.एच.आर.ची एजन्सी फिक्स होऊ शकली नाही. तेव्हा तत्कालीन आयुक्तांनी असे आदेश काढले होते की, हया सर्व मुलींना हॉट मील मध्ये अंतर्भूत करावे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१.१९६ यापूर्वी कोणीतरी सप्लाय करीत असेल, कोर्टाच्या आदेशानुसार विभागाने त्यांना थांबविले की टेंडर प्रक्रिया झाली नाही म्हणून थांबविले ? जोपर्यत दुसऱ्या पुरवठादाराची पर्यायी व्यवस्था होत नाही, यामुळे ५ लाख ७२ हजार मुलींना ९ महिने या आहाराशिवाय रहावे लागले.

१.१९७ हा आहार एकाच ठिकाणी देणे अपेक्षीत नव्हते, विशिष्ट वयोगटातील मुलींना वेगवेगळया ठिकाणी आहार द्यायचा होता. महिला बचत गटानी व संस्थांनी कशा प्रकारे तो शिजवला, त्यांनी या व्यवस्था कशा उभ्या केल्या, हा आहार कोठे तयार केला व कसा पुरवला, त्या गावामध्ये कशा गेल्या ? २ गावातील किमान अंतर ३ कि.मी. आहे. तांडयातील अंतरही दीड-दोन कि.मी. असते. तेथे आहार पोहचविण्याकरिता त्यांच्याकडे काय व्यवस्था होती ? याबाबत समितीने विचारणा केली असता यामध्ये मुळात टी.एच.आर. द्यावयाचा होता हॉटमिल द्यायचे असा विषय नव्हता. विभागाकडून अंगणवाडीमध्ये हॉटमील देण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.१९८ समितीचे असे म्हणणे आहे की, विभागाने टी.एच.आर. थांबविला व ९ महिने कोणताही पुरवठा झाला नाही. याकरिता कोणतीही पर्यायी व्यवस्था केली नाही. महिला बचत गटांना काम देण्याचे धोरण ठरविणे, पुरवठादारास बंद करणे याकरिता हेतूपुरस्सर कारवाई केली, पण यामुळे ५ लाख ७२ हजार मुलींना आहाराचा पुरवठा होऊ शकला नाही. ही वस्तुस्थिती आहे विभागाने सांगितले की, शिजवलेला आहार दिला आहे, शिजवलेला आहार कसा दिला ? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१३ मध्ये महिला बचत गटांना हे काम देण्यात आले. असे काही प्रोजेक्ट होते की, जेथे महिला बचत गट आले नाही तेथे जुन्या पद्धतीने सुरू ठेवले पाहिजे होते असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

१.१९९ महालेखाकारांचेही आक्षेप आहेत यामध्ये दोषी असणाऱ्या व्यक्तींवर विभागाने जबाबदारी निश्चित केली का, किंवा करणार आहे का, त्यांच्यावर योग्य ती कारवाई होणार का ? अशी पृच्छा समितीने केली असता पर्यायी व्यवस्था न करता पुरवठादाचा पुरवठा बंद पडला, त्यामुळे गॅप पडला आहे हे खरे आहे, त्यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करू असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. यावर समितीने असे निदेश दिले की, एक महिन्याच्या आत याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला देण्यात यावा.

१.२०० सदर परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता समितीने पुन्हा दिनांक ३१ मे, २०१६ रोजी बैठक घेतली. मागील बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली होती त्यावेळी एका महिन्यात कारवाई करण्याचे आदेश दिले जातील असे विभागाने आश्वासित केले होते. त्या संदर्भातील कार्यवाही केली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता सबला योजनेंतर्गत एक विषय होता कौशल्य विकास प्रशिक्षण सन २०१२ ते २०१४ या तीन वर्षाच्या काळात मिळालेले नाही याबद्दल सीडीपीओ आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस पाठविली आहे. त्यांनी असे स्पष्टीकरण दिले की, त्यांनी जीवन कौशल्य प्रशिक्षण घेतले आहे, टेक्नीकल प्रशिक्षण घेतलेले नाही त्या बाबतचा अहवाल सादर करीत आहोत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.२०१ तसेच ११ पैकी फक्त २ जिल्ह्यात प्रशिक्षण देण्यात आले हे खरे आहे का? सन २०११ चा कार्यक्रम असताना २०१२ पर्यंत फक्त २ जिल्ह्यात राबविण्यात आला, उर्वरित ९ जिल्ह्यांमध्ये या योजनेपासून लाभार्थी वंचित राहिले. या योजनेसाठी संपूर्ण अनुदान केंद्र सरकारकडून मिळणार होते. किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण मिळणार होते, त्यापासून त्या मुली वंचित राहिल्या. याबाबत समितीने विचारणा केली असता डेप्युटी सीईओ आणि सीडीपीओ वर्ग १ व २ ची पदे आहेत. त्यांचे उत्तर आल्यानंतर पुढील कारवाई करणार असून समितीने मार्गदर्शक सूचना केली होती की, या आर्थिक वर्षात काय कारवाई करणार याचा आराखडा देण्यात यावा. स्थानिक परिस्थिती, स्थानिक लोकांची मागणी व स्थानिक उपलब्ध संस्था यांचा मास्टर प्लॅन तयार केला आहे तो समितीला सादर केला जाईल. सबला योजनेला केंद्र सरकारकडून फक्त ११ जिल्ह्यांसाठी मान्यता आलेली आहे विभागाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये योजना लागू केली पाहिजे अशी मागणी केली आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.२०२ सीडीपीओची मोठया प्रमाणात रिक्त असलेल्या पदांबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, सीडीपीओ प्रत्येक प्रकल्पासाठी १ याप्रमाणे ५५३ पदे अपेक्षित आहेत. मात्र आजमितीस फक्त १६४ पदे कार्यरत आहेत.

१.२०३ सीडीपीओची सर्व पदे ग्रामविकास विभागाकडे होती. मध्यंतरी असा निर्णय झाला की, टप्प्याटप्प्याने ही पदे महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यात यावीत. ही पदे महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करीत असताना फक्त पदे वर्ग केली गेली, त्या पदावर कार्यरत असणारी माणसे त्याच विभागात ठेवून घेण्यात आली. सीडीपीओ संवर्गात वर्ग १ आणि वर्ग २ असे दोन भाग आहेत. वर्ग २ च्या पदाबाबत मुख्य अडचण येत आहे. सीडीपीओ आणि बीडीओ ही पदे इंटरचेंजेबल होती. ग्रामविकास विभागाने त्या पदावरील माणसे त्याच विभागात ठेवून घेतली आणि केवळ पदे वर्ग केली. विभागाने एमपीएससीकडे मागणी केली असून त्या पदाकरिता मुलाखतीचे काम पूर्ण झाले आहे. पुढील २ महिन्याच्या काळात १४७ पदे उपलब्ध करून दिली जाणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२०४ सीडीपीओची ५५३ पैकी १६४ पदे कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली आहे. मार्च २०१२ मध्ये या संवर्गात १९ टक्के पदे रिक्त होती, मार्च २०१४ मध्ये ४५ टक्के पदे रिक्त होती. आता ही स्थिती ७० टक्क्यावर आली आहे असे समितीने नमूद केले असता पूर्वी ही पदे ग्रामविकास विभागाच्या आस्थापनेवर होती. आता ही पदे महिला व बालकल्याण विभागाकडे वर्ग झाल्यानंतर विभागाने तातडीने कार्यवाही करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविले असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच शहरी भागातील वर्ग १ च्या १०४ पदांपैकी ५४ पदे कार्यरत असून ग्रामीण भागातील ४५३ पदांपैकी ११० पदे कार्यरत आहेत. मुख्य अडचण ग्रामीण भागामध्ये काम करणाऱ्या वर्ग २ च्या पदांबाबत आहे. एमपीएससीकडून १४७ पदे भरण्याबाबत ३० मे, २०१६ रोजी मुलाखती झालेल्या आहेत. पुढील दोन महिन्याच्या काळात फाऊंडेशन कोर्स होऊन ही पदे उपलब्ध झाल्यानंतर काही प्रमाणात अडचण कमी होईल असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.२०५ ११ जिल्ह्यांमध्ये योजना लागू करण्याबाबत अंगणवाडी सेविकांबद्दल तफावत होती. ४ हजार लोकांना फायदा मिळाला नसल्याचे समितीने निदर्शनास आणले असता ९९२ लोकांना फायदा मिळाला नव्हता महालेखापाल आणि विभागाच्या आकडेवारीमध्ये तफावत होती. ' सबला ' योजनेंतर्गत ९०० च्या आसपास लोकांना लाभ मिळाला नाही. त्यावेळच्या अंगणवाडी सेविकांनी अंगणवाडीमध्ये योजना कार्यान्वित केली नाही अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.२०६ माहे डिसेंबर २०१२ ते जानेवारी २०१४ या काळात टीएचआर पुरवठ्यामध्ये खंड पडला होता. त्याबाबत विभागाने ठेकेदार नसल्यामुळे अंमलबजावणी होऊ शकली नसल्याचे सांगितले होते. पुरवठादार आणि बचत गटाच्या वादामध्ये ९ ते १० महिने टीएचआरचा पुरवठा झाला नाही. ५० टक्के निधी केंद्र सरकारकडून मिळणार होता ११ ते १६ वयोगटाच्या मुलींना टीएचआर पुरवायचा होता. महालेखापालांचा आक्षेप होता की, १३ महिन्यांचा खंड पडला, त्यासाठी पर्यायी व्यवस्था न करता पूर्णपणे पुरवठा बंद केला म्हणून लाभार्थी लाभापासून वंचित राहिले यासंदर्भात समितीने विचारणा केली असता टीएचआर पुरवठयाची ऑर्डर तीन लोकांना दिली गेली, त्याबाबत कोणतीही निविदा मागविण्यात आली

नव्हती. सचिवांनी त्यांच्या पातळीवर ऑर्डर दिली होती, त्यामध्ये कोणतीही कार्यपद्धती अवलंबिली गेली नाही ही गोष्ट महालेखापालांनी बघितली नाही, ही माहिती फाईलमध्ये नमूद आहे. कोणतीही कार्यपद्धती अवलंब न करता ऑर्डर दिली गेली. याबाबत सुप्रीम कोर्टाचा अहवाल आल्यानंतर ही बाब समोर आली. तीन लोकांनी बचत गटांच्या नावाखाली महाराष्ट्रामध्ये घोटाळा केला होता म्हणून ते काम ताबडतोब थांबविले होते. कोणतीही निविदा न मागविता किंवा प्रोसीजर फॉलो न करता काम दिले होते हे सकृतदर्शनी दिसत होते असा खुलासा तत्कालीन प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी केला.

१.२०७ चुकीचा निर्णय झाल्यामुळे सुप्रीम कोर्टाने काम थांबविले हे मान्य आहे. चुकीचे काम झाले असे विभागाचे म्हणणे असेल तर ज्यांनी काम दिले त्यांना जबाबदार धरावे लागेल. सुप्रीम कोर्टाने आदेश रद्द केले त्याबद्दल समितीचा आक्षेप नाही. मुद्दा हा आहे की, पर्यायी व्यवस्था न करता महालेखापालांच्या अहवालाप्रमाणे १३ महिने टीएचआर पुरवठयाचे काम बंद का पडले? तत्कालीन सचिवांनी सांगितले की, कोणतीही निविदा न मागविता आणि प्रोसीजर फॉलो न करता काम दिले गेले. ही बाब अतिशय गंभीर असून या संदर्भात समितीला विभागाकडून उत्तर अपेक्षित आहे असे समितीने नमूद केले. या अनुषंगाने आजही बऱ्याच जिल्ह्यामध्ये निविदांना प्रतिसाद मिळाला नाही तर पर्यायी व्यवस्था म्हणून दुसऱ्याला पुरवठा करण्यासाठी परवानगी देत होतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२०८ तत्कालीन प्रधान सचिवांनी महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने समितीसमोर उत्तर दिले आहे. तत्कालीन सचिवांनी दिलेल्या माहितीबाबत विभागाने काय कारवाई केली, चुकीचा निर्णय घेण्याबाबत विभागाचे कोणते अधिकारी जबाबदार होते? टीएचआर पुरवठ्याबाबत पर्यायी व्यवस्था न केल्याने खंड पडला असे दोन विषय आहेत याबद्दल माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता समितीला अहवाल सादर करण्याचे विभगाने आश्वासित केले.

" लोह आणि फॉलिक ॲसिड पूरक पोषण कार्यक्रमाची साप्ताहिक अंमलबजावणी "

१.२०९ उपरोक्त योजनेसंदर्भात समितीने माहिती देण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, ही योजना आपल्या राज्यामध्ये सन २०१३ पासूनसुरू आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार प्रशिक्षण देण्यात आले होते. दिनांक १७ ऑगस्ट रोजी दोन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले.

१.२१० डिसेंबर २०१२ पर्यंत लोह व फॉलिक ॲसिडच्या गोळयांचा पुरवठा केला गेला नाही. जानेवारी, २०१३ मध्ये निविदा अंतिम करण्यास विलंब झाला. त्यानंतर गोळयांचा पुरवठा करण्यात आला वेळेवर कार्यवाही न केल्यामुळे मुलांना या गोळया मिळू शकल्या नाहीत. या संबंधी जबाबदारी कोणाची आहे ? या संदर्भात खुलासा करावा असे समितीने विभागास सांगितले.

१.२११ ऑगस्ट, २०१२ रोजी केंद्र शासनाकडून सूचना आल्या. जसा निधी उपलब्ध झाला, त्या नुसार आम्ही खरेदीची प्रक्रिया सुरू केली. जोपर्यंत बजेट हेडमध्ये निधी प्राप्त होत नाही तोपर्यंत खरेदीची प्रक्रियासुरु होत नाही. सूचना उशिरा मिळाल्यामुळे प्रक्रियासुरू करण्यास ३-४ महिने उशीर झालेला आहे. दिनांक ३ जानेवारी, २०१३ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली. अंमलबजावणी संदर्भातील गाईडलाईन्स मार्च महिन्यामध्ये देण्यात आल्या होत्या. सदर कार्यक्रमांतर्गत आयएफए गोळया प्राप्त झाल्यानंतर त्यांचे वितरण करण्यात आले असल्याचा खुलासा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी केला.

१.२१२ जवळजवळ ५ महिने उशीर झालेला आहे. केंद्र शासनाकडून ऑगस्ट महिन्यामध्ये सूचना आल्या व आपण जानेवारी महिन्यात तो सुरु केला. विभागाला निधी कधी प्राप्त झाला ? अशी पृच्छा समितीने केली. माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये निधी प्राप्त झाला असून त्या नंतर टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली प्रत्यक्षात खरेदी सन २०१३ मध्ये करण्यात आली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.२१३ सन २०१२-१३ मधील हा कार्यक्रम होता. काही जिल्ह्यांमध्ये ४.६६ टक्के मुलांना आयएफए गोळया मिळाल्या. या गोळयांचे वितरण कमी प्रमाणात होण्याचे कारण काय आहे ? या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला. आरोग्य विभागामार्फत या गोळया खरेदी करण्याचे काम वर्षभरसुरु असते. आर्थिक वर्षसुरु झाल्यानंतर खरेदी प्रक्रियासुरु करावी व त्या नंतर निधी मिळेल अशा प्रकारे काम केले तर यापुढे उशीर होणार नाही. मात्र सध्या निधी प्राप्त झाल्यानंतर प्रक्रिया सुरू केली जाते. दर वर्षी अशीच परिस्थिती आहे. महत्त्वाच्या औषध खरेदी करिता वित्त विभागाने आम्हाला क्लिअरन्स द्यावा जेणेकरून औषध खरेदीचे काम लवकरात लवकरसुरु करता येईल.

१.२१४ गोळयांचे वाटप करण्यास उशीर झाल्यामुळे आपले लक्ष्य प्राप्त होऊ शकले नाही. तसेच ही योजना केंद्र शासनाची आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१३ पासून हा नवीन कार्यक्रमसुरु करण्यात आला. त्या कार्यक्रमाच्या गाईडलाईन्स समजून त्याची अंमलबजावणी करण्यामध्येसुरवातीला परफॉर्मन्स कमी झाला. जून, २०१३ मध्ये टक्केवारी कमी होती. सप्टेंबर ते नोव्हेंबर २०१३ मध्ये ती टक्केवारी वाढत गेली आहे. मार्च २०१४ पर्यंत ९२ टक्के काम पूर्ण झाले ही महत्त्वाकांक्षी योजना असून माता व बालमृत्यू दर कमी करण्यास या योजनेमुळे मदत होत आहे. तसेच एनएचएम अंतर्गत केंद्र शासनाकडून ही योजना राबवण्यासाठी निधी दिला जातो. एनएचएम मध्ये पूर्वी ७५:२५ असे प्रमाण होते आता ते ६०:४० झालेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१.२१५ यावर समितीने केंद्र शासनाच्या निधीची वाट न पाहता ही योजना राबवली तर उशीर होणार नाही पीआयपी फायनल झाल्यानंतर आपल्याला निधी मिळणारच आहे असे सांगितले असता पीआयपी फायनल होण्यास देखील विलंब होतो. १०० टक्के आम्ही निश्चित पूर्णकरू निधी वेळेवर न मिळाल्यामुळे साधारणपणे दर वर्षी औषध खरेदीमध्ये विलंब होतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२१६ आरोग्य विभागाचा पीआयपी निश्चित झाल्यानंतर ४० टक्के निधीची मागणी वित्त विभागाकडे केली तर ? अशी विचारणा समितीने केली असता केंद्र शासनाकडून निधी वेळेवर न मिळाल्यामुळे योजनेचे काम थांबून राहते. या संदर्भात दोन उपाययोजना आहे. प्रत्येक सप्लाय ऑर्डरसाठी वेगळी निविदा काढली जात नाही. कालावधी व शेड्युल्ड ठरवले तर नवीन निविदा होईपर्यंत मुदतवाढ देण्याची तरतूद करता येईल. आता जशी सुधारित योजना मंजूर करून घेतली जात आहे. तशा प्रकारे तरतूद करावी की, आरोग्य विभागाची अतिआवश्यक योजना असल्यामुळे केंद्र शासनाच्या निधीची वाट न बघता राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामधील निधी वापरण्याची परवानगी मिळावी. तशी परवानगी मिळाली तर कोणताही प्रश्न राहणार नाही योजनेची रचनाच तशी करून घ्यावी असा खुलासा सचिव, वित्त विभाग यांनी केला.

१.२१७ ' शिक्षणाचा अधिकार ' :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना अशी विचारणा केली की, महिला व बालविकास विभागाने शालाबाह्य मुलींची संख्या २ लाख ३० हजार असल्याचे सांगितले आहे. शालेय शिक्षण विभाग सांगत आहे की, ही आकडेवारी ८६८५६ इतकी आहे. या दोन विभागांच्या आकडेवारीत तफावत आहे. ॲन्युअल वर्किंग प्लान व बजेट तयार करताना १०० टक्के मुलांना पटावर आणण्याकरिता आपण प्रयत्न करता. या दोन विभागांच्या आकडेवारींमध्ये फरक असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित झाला होता. शालेय शिक्षण विभाग वारंवार स्क्रुटिनी व स्क्रिनिंग करता त्यामुळे महिला व बालविकास विभागाने दर्शविलेली आकडेवारी चुकीची आहे असे आपल्याला वाटते काय ?

१.२१८ उपरोक्त संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, ढोबळमानाने सांगावयाचे झाले तर, आता दहावीची परीक्षा सुरू आहे. १७ लाख ३० हजार मुले दहावीच्या परीक्षेला बसलेली आहेत. राज्यात दरवर्षी २० लाख मुले शाळेत दाखल होतात. तीच संख्या गृहित धरली तर आता २ लाख ७० हजार मुले दहावीच्या परीक्षेला बसलेली नाहीत, याचा अर्थ तेवढी गळती आहे. ही आकडेवारी मुला-मुलींची आहे नववी इयत्तेत नापास होणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याने दहावीत गळती होते हे विश्लेषणही आम्ही करून पाहिलेले आहे. मागील वर्षी २ लक्ष ५९ हजार मुले नववीत नापास झाली. या वर्षी २ लाख ४५ हजार मुले नापास झाली. ही आकडेवारी मुला-मुलींची आहे. त्यामुळे तेथे असे दिसत नाही की, २ लाख ३० हजार इतक्या फक्त मुलीच शाळाबाहेरील आहेत. सहावी ते आठवी इयत्तेपर्यंतच्या ३ वर्षांची धरून जर २ लाख ३० हजार ही आकडेवारी काढली असेल तर तसे विश्लेषण होऊ शकते.

१.२१९ महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून त्या २ लाख ३० हजार मुलांना पोषण आहारही दिला जात असेल. २ लाख ३० हजार मुले शाळाबाह्य असल्याचे त्यांनी त्यांच्या ऑब्जर्व्हेशन नुसार नमूद केले आहे. हा आकडा त्यांनी कसा काय काढला ? आयुक्त W&CD, पुणे यांचेकडील ICDS च्या ऑनलाईन माहितीची छाननी केली असता, असे आढळून आले की, मार्च, २०१४ ला राज्यात ११ ते १४ या वयोगटातील २ लाख ३० हजार इतक्या शाळाबाह्य मुली होत्या. ही आकडेवारी ३ किंवा ६ वर्षांची आहे असे नाही तर ११ ते १४ या वयोगटातील या मुली आहेत. असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिव यांनी याकरिताच ३ वर्षे असे म्हणत आहे असे असेल तर दरवर्षी ८० हजार शाळाबाह्य मुली असतील असा खुलासा केला.

१.२२० त्यानुसार ११ ते १४ या वयोगटातील २ लाख ३० हजार इतक्या शाळाबाह्य मुली होत्या आणि शालेय शिक्षण विभाग सांगत आहे की, ही संख्या ८६ हजार इतकी आहे. याबाबत विभागीय सचिव यांनी यामध्ये तफावत आहेच असा खुलासा केला.

त्या मुलींना महिला व बालविकास विभागाकडून THR फूड सप्लाय केला जातो. त्या आधारावर त्यांनी २ लाख ३० हजार मुली शाळाबाह्य असल्याचे सांगितलेले आहे. ही आकडेवारी मॅच झाली पाहिजे. एका राज्यातील दोन विभागांच्या आकडेवारीमध्ये अशाप्रकारे विसंगती असता कामा नये. वेगवेगळया एजन्सी आणि एनजीओंच्या माध्यमातून, वारंवार स्क्रिनिंग करणे, फ्लॉक लेव्हलवरील कमिटी, जिल्हा लेव्हलवरील कमिटी अशाप्रकारे पाहणी करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाची आकडेवारी ८६ हजार इतकी आहे. महिला व बाल विकास विभाग आयुक्त W&CD, पुणे यांचेकडील ICDS च्या ऑनलाईन माहितीच्या आधारे २ लाख ३० हजार मुलींना फूड सप्लाय करीत आहे. शालेय शिक्षण विभागाची आकडेवारी बरोबर असेल तर महिला व बाल विकास विभागाने आपली आकडेवारी दुरूस्त करावी व पोषण आहारचा सप्लाय कमी करावा. काही तरी निश्चित ठरविले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता आऊट ऑफ स्कुल विद्यार्थ्यांची ऑथेंटिक माहिती शालेय शिक्षण विभागच देऊ शकते. ही आकडेवारी कशी नमूद केली, याचा शोध घेतलेला नाही ती आकडेवारी लाभार्थ्यांची म्हणून नमूद केलेली असल्याचा खुलासा महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी केला.

१.२२१ आयुक्त W&CD, पुणे यांचेकडील ICDS च्या ऑनलाईन माहितीची छाननी करून एर्जीनी हा परिच्छेद काढलेला आहे. त्या आधारावरच समिती चर्चा करीत आहे. समितीच्या माहितीनुसार आयुक्त आयसीडीस म्हणजे विभाग त्यांच्या म्हणण्यानुसार ही आकडेवारी २ लाख

३० हजार इतकी आहे. ही आकडेवारी चुकीची असल्यास आयुक्तांनी त्याबाबत सांगावे. आपण २ लाख ३० हजार मुलींना फूड सप्लाय करीत आहात मात्र शालेय शिक्षण विभागाची आकडेवारी ८६ हजार इतकी आहे. शालेय शिक्षण विभागाचे असे म्हणणे आहे की, आम्ही १०० टक्के पट पडताळणी करतो. असे असताना दोन्ही विभागांच्या आकडेवारीमध्ये जवळपास दीड लाख इतकी तफावत आहे. २ लाख ३० हजार मुलींना टीएचआर फूड सप्लाय केले जाते. हे त्यांना ३०० दिवस दिले तर ते लोक एका दिवसाचे ५ रुपये घेतात. मग रोजचा साडेसात लाख रुपयांचा घोटाळा सुरू आहे काय ? अशी विचारणा समितीने केली तसेच या फिगर्स वाढीवच दिसत आहेत शिक्षण विभागाची आकडेवारी थोडी फार तरी बरोबर आहे १ ते २ टक्के फरक समजता येईल. मात्र सप्लाय जास्तीचा करण्याच्या दृष्टीने वाढविलेल्या या फिगर्स दिसत आहेत महिला व बालविकास विभागाने शालेय शिक्षण विभागासमवेत याबाबत चर्चा केली पाहिजे.

१.२२२ या विषयी डिसेंबर, २०१४ मध्ये एक्झिट कॉन्फरन्समध्ये पूर्वीच्या प्रधान सचिवांनी जे सांगितले आहे त्याबाबत एजींनी सांगावे असे समितीने सुचित केले असता महालेखाकारांनी असे विदित केले की, There is a big variations of figures between Education and Women and Child Development Department. Previously, the Principal Secretary said in the exit confenerce that, we will verify this with other school children, UNICEF and NGOs. We will carry out the survey to find out that where the differences are and how this diferences is come about. Therefore my question is, has any survey is being done by your Department?

१.२२३ महालेखाकारांनी केलेल्या मतानुषंगाने महिला व बालविकास विभाग यांनी विभागाचा स्वतंत्र सर्व्हे झालेला नाही शालेय शिक्षण विभागाचा सर्व्हे झालेला आहे. We will have to adopt their survey and figures असा खुलासा केला.

१.२२४ यावर महालेखाकारांनी It means, you are not planning to do the survey with UNICEF, NGOs which you have said earlier असे मत व्यक्त केले.

याचे कारण असे आहे की, it will be duplication of efforts.

शालेय शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांचा सर्व्हे होतोच असा खुलासा महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी केला.

शालेय शिक्षण विभागाकडून कसा सर्व्हे केला जातो ? अशी पृच्छा समितीने केली असता दरवर्षी सर्व्हे केला जातो या वर्षीही खूप मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण करतो आहे असा खुलासा शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी केला.

१.२२५ यावर महालेखाकारांनी असे विदित केले की, In this case, you are providing supplementary nutritions to near about 2.3 lakh children at the cost. The huge expenditure is incurred under this scheme. Therefore, you must have to see that whether those children are exists are not?

१.२२६ शालेय शिक्षण विभागाच्या म्हणण्यानुसार शाळाबाह्य मुलामुलींची संख्या ८६ हजार आहे. त्यातून मुलींची संख्या बाजूला काढली तर ही संख्या अजून कमी होईल. मग महिला व बालविकास विभागाने २ लाख ३० हजार इतकी शाळाबाह्य मुलींची आकडेवारी कशी काय नमूद केली ? अशी विचारणा केली असता शालेय शिक्षण विभागासमवेत चर्चा करून त्यांचे रेफरन्स इयर कोणते आहे ते पाहतो असे महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले.

१.२२७ ती आकडेवारी लेटेस्ट इयरची आहे. समितीचा मुद्दा तो नाही. शालेय शिक्षण विभागाची किंवा महिला व बालविकास विभागाची आकडेवारी दुरूस्त करावी. मात्र शासनाच्या दोन विभागांच्या आकडेवारीमध्ये अशाप्रकारचा फरक असता कामा नये. याचा परिणाम असा होतो की, मोठ्या प्रमाणात पोषक आहाराचा अपहार सुरू आहे. समिती या विषयाच्या खोलात या करिता जात आहे कारण, अस्तित्त्वातच नसलेल्या मुलींच्या नावाने टीएचआर फूड सप्लाय होत आहे. या मुली अस्तित्त्वात असतील तर त्या शालेय शिक्षण विभागाच्या रेकॉर्डवर का येत नाहीत ? शिक्षणाच्या अधिकाराच्या धोरणाचीही अंमलबजावणी झाली पाहिजे. दोन्ही विभागांच्या आकडेवारीमध्ये फरक असता कामा नये.

१.२२८ शालेय शिक्षण विभागाने नमूद केलेली ८६ हजार ही संख्या मुलामुलींची आहे. दोन विभागांत सामंजस्य असले पाहिजे. एक्झिट कॉन्फरन्स नंतर दीड वर्षांचा कालावधी होऊनही महिला व बालविकास विभागाकडून याबाबत कोणतीही कारवाई झालेली नाही. दोन्ही विभागांची सामंजस्य बैठक घेऊन, याबाबत कारवाई करून डिस्ट्रिक्ट लेव्हलवर इन्क्वायरी करून समितीला १ महिन्याच्या आत आकडेवारी सांगावी असे समितीने विभागास सांगितले.

१.२२९ " सुकन्या योजनेची अंमलबजावणी "

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, सुकन्या योजनेमध्ये एलआयसी बरोबर टायअप केले आहे. दारिद्रय रेषेखालील कुटूंबामध्ये ज्या मुली जन्माला येतात त्यांच्याकरिता ही योजना आहे. यामध्ये मुलींचा इन्शुरन्स आहे व

मुलगी वरच्या वर्गात गेल्यास शिष्यवृत्तीसुद्धा आहे. यामध्ये ऑडीट पॅरा आहे की, साधारणपणे २०१४ मे महिना अखेर शासन व एलआयसीचा सामंजस्य करार झाला पण नोव्हेंबरपर्यत प्रमाणपत्र जारी केले नव्हते. शासनाने त्याची रक्कम एलआयसीला भरली होती हे काम लवकर होणे अवघड होते कारण गाव पातळीवर जाऊन कुटूंबाचे आयडेंटीफिकेशन करून त्यांचे फॉर्म भरुन घ्यायचे होते. तेथून ते जिल्हा पातळीवर आणायचे, जिल्ह्याहून विभागाला व तेथून मुंबईला आणावयाचे होते. एलआयसीकडे जिल्हा पातळीवर ही माहिती घेण्याची व्यवस्था नव्हती त्यामुळे यामध्ये वेळ झाला. पण बैठका घेऊन एलआयसीने जेष्ठ अधिकाऱ्यांना बोलावून हे काम आता रिकन्साईल केलेले आहे. दिलेल्या निधीचे युटीलायझेशन झालेले आहे आणि त्याच्या लाभधारकांना आपण इन्शुरन्स कव्हरेजमध्ये आणलेले आहे. त्यांना प्रमाणपत्र देण्याची तयारी आता पूर्ण झालेली आहे. त्यांनी सॉफ्ट डाटा विभागाला पाठविला व त्यांनी सांगितले की, तुम्ही गाव पातळीवर जाऊन पुन्हा एकदा तपासणी करावी. प्रमाणपत्रात चूक झाल्यास लाभार्थ्यांना भविष्यात काही अडचण होऊ नये. आता याचा सर्व डाटा मिळालेला असुन सर्व विभागीय अधिकाऱ्यांकडे डाटा पोहचला आहे व्हेरीफिकेशन होऊन आले की, त्यांचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल.

१.२१० लेखापरीक्षणाचा आक्षेप आहे की, नोव्हेंबर २०१४ मध्ये महिला व बालविकास यांनी एलआयसीला लाभार्थी मुलींचा तपशील विहीतप्रमाणे सादर केलेला नाही. म्हणून हा प्रश्न निर्माण झालेला आहे. ऑडीट पॅरा वेगळा आहे त्याचे उत्तर द्यावे. ऑडीट पॅराप्रमाणे विभागाने माहिती एलआयसीला सादर केली नाही म्हणून ही परिस्थिती उद्‌भवली आहे. यावर काय म्हणणे आहे ते सांगावे असे समितीने विभागास सांगितले असता योजना सुरू होऊन ३-४ महिने झाले होते यानंतर त्यांचे ऑब्जेक्शन आहे. यामध्ये दोन विभाग काम करतात एलआयसी काम करते व गावपातळीवरील अंगणवाडी येथून आयसीडीएसकडून ते अर्ज भरुन येत होते काही प्रपत्रे राहिली होती त्यांनी सूचना दिल्याप्रमाणे ती परत पाठवून त्याची पूर्तता करून घेतली आहे. योजना सुरू झाल्यापासून चार महिन्याचाच कालावधी आहे. सुरूवातीस थोडा वेळ लागतो ही बाब पहावी नंतर विभागाने ते पूर्ण करून घेऊन समाधानकारक रित्या केले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१.२११ एलआयसीचा फॉर्म भरण्यासाठी फार माहिती लागत नाही. त्यामध्ये पाच मुद्‌दे आहेत. अशी कोणती माहिती आहे की, ती विभाग चार महिन्यात कंप्लायंस करु शकला नाहीत. विभाग आता समर्थन करीत आहे की याला वेळ लागतो. बऱ्याच राज्यांनी ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत या योजनेच्या कामास सुरूवात केली होती जानेवारी ते मे असे एकूण ५ महिने झाले आहेत असे विभागाचे म्हणणे आहे. तथापि एका अंगणवाडी सेविकेने ठरविले तर एका दिवसात सर्व मुलींची माहिती घेऊन पाठवू शकते. याकरिता चार महिने का लागतात गावात कोणाचे काही ॲफेडेव्हीट पाहिजे असे काही नाही. असे कोणते मुद्‌दे होते की ते चार महिन्यात कंपायन्स करु शकला नाहीत असा कोणता मुद्दा अडचणीचा होता म्हणून विभाग कंप्लायन्स करु शकला नाही अशी पृच्छा समितीने केली.

१.२१२ उपरोक्तच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, दिनांक ३१ मे २०१४ रोजी शासन व एलआयसीमध्ये एम.ओ.यु. झाला. तत्पूर्वी योजनेचा शासन निर्णय दिनांक १३/२/२०१४ रोजी निघाला व काम सुरू झाले. त्यामध्ये अटी व शर्ती निश्चित करण्यासाठी तो वेळ गेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच यामध्ये सबसिक्वींवेंटली आपण निधी दिला आहे, त्याचे लाभधारक निवडले आहेत. गावपातळीवरुन लाभार्थ्यांच्या जन्मतारखेचा दाखला लागतो बी.पी.एल.चे प्रमाणपत्र लागते ही सर्व कामे करण्यास काही वेळ लागतो. यामध्ये वैयक्तिक इंडीव्हीज्युअल कागद लागतात सर्व लाभार्थी त्यात बसत नाहीत तसेच सर्व मुलींसाठी ही योजना नसल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

१.२१३ मध्यप्रदेशमध्ये ही योजना एप्रिल २००७ पासून आहे. दिल्ली येथे जानेवारी २००८ पासून आहे. हिमाचल प्रदेशमध्ये २००७ पासून ही योजना सुरू आहे. समितीचे असे मत आहे की, एखादा सप्लायर किंवा एजन्सी यांना येऊन भेटलेला नाही. २००७ मध्ये कोणी भेटले असते तर तेव्हा या कामास सुरूवात झाली असती असे समितीने सुचित केले असता हा विषय धोरणात्मक होता, मंत्रिमंडळाच्या परवानगीने करावयाचा होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२१४ शिजवून अन्नपुरवठा केलेला आहे त्याचा निधी दिलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून ५ लाख ७२ हजार मुलींना शिजविलेला आहार दिल्याचा आधार काय आहे, दिला नसेल तर त्याची बिले काढली आहेत काय ? याबाबत माहिती घेऊन एक महिन्यात समितीला सांगावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी माहिती देण्याचे मान्य केले त्याची माहिती अप्राप्त आहे.

१.२१५ केंद्र सरकारकडून २००७ पासून इतर राज्यांनी २००-२०० कोटी रुपये याकरिता उचलले आहेत. महाराष्ट्र राज्य हा निधी उचलू शकलेला नाही याचा पूर्ण रिपोर्ट तयार झाला पाहिजे. विभागाच्या अहवालात आले पाहिजे की, विभागाच्या व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे राज्याचे एवढे नुकसान झालेले आहे. याचा पूर्ण अहवाल तयार करून विभाग एक समिती बसवावी. सचिवांनी याबाबत समितीला एक महिन्यात अहवाल द्यावा. अशी काय स्थिती होती की, जे इतर राज्य करु शकले पण आपण करु शकलो नाही. हे समितीला कळवावे यावर समिती आपला रिपोर्ट तयार करेल असे समितीने सांगितले. ११ व्या पंचवार्षिक योजनेतील हा भाग असून आपण ती २०१४ मध्ये राबवत होतो. फेब्रुवारी २०१४ मध्ये विभागामार्फत शासन निर्णय काढण्यात येतो परंतु या योजनेचा लाभ आपल्या राज्याने घेतला नाही याकरिता कोण जबाबदार आहे हे विभागाने

जाणून घेतले पाहिजे. तसेच या संस्थांची निवड कोणत्या आधारावर करण्यात आली. मुंबई शहरात अशा १०० संस्था आहेत. ज्या मुलींची निवड होऊ शकली नाही याबाबत आपण त्या संस्थांना रक्कम अदा केली होती का, केली असल्यास किती रक्कम अदा केली होती ? समितीची अशी माहिती आहे की, त्यांनी सीटस रिझर्व्ह केलेल्या आहेत विभागाने त्यांना तेवढया सीटचे पैसे आगाऊ दिलेले आहेत पण विभाग तिकडे मुली पाठवू शकलो नाही. त्यामुळे त्यांना किती रक्कम अदा केली, या संस्थांची निवड कोणत्या निकषावर करण्यात आली होती याबाबत माहिती देण्यास सांगितले असता या योजनेच्या अंमलबजावणीकरिता जो विलंब झालेला आहे कारण निधीच्या तरतूदीचा तो विषय होता सुरूवातीच्या दोन वर्षात विलंब झाला हा मुद्दा होता. यामध्ये आपण निधी दिला व त्यांनी मुलींना प्रवेश दिला नाही असे काही झालेले नाही. २०१३-२०१४ मध्ये उशिराने अभ्यासक्रम सुरू केलेला आहे. २०१४-२०१५ मध्ये आपण पहिली तुकडी घेतली आहे. ५० जागांकरिता मुलींच्या स्पर्धात्मक परिक्षा घेऊन ज्या मुलींना जास्त गुण मिळाले त्यांची निवड केलेली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी

१.२१६ हे आपण २०१३-२०१४ मध्ये केलेले आहे हे आक्षेप आहेत. पण २०११-२०१२ मध्ये ू ष शकला असता विभाग ते का करू शकला नाही हा विषय असल्याचे समितीने नमूद केले असता याकरिता तरतुद उपलब्ध होण्यासाठी नियोजन विभाग, वित्त विभाग यांच्याकडे जावे लागते. हा निधी राज्य शासनाचा होता व सदर निधी १ कोटी असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.२१७ नियोजन व वित्त विभागाने त्यावर जे काही मुद्दे व त्रुटी काढल्या असतील, त्याचा पाठपुरावा झालेला आहे का ? तसेच प्रशिक्षण देण्याकरिता ज्या संस्थांची निवड केली, त्यांचे निकष काय होते, आयआयटी किंवा जेईई च्या प्रवेश परीक्षेकरिता आपण ही संस्था निवडली होती. विद्यार्थी व मुलींना मार्गदर्शन व शिक्षण देण्यासाठी ही संस्था होती. ही संस्था निवडताना कोणते निकष होते ? विभागाने सांगितले की, याकरिता स्वयंस्फूर्तीने प्रस्ताव प्राप्त झाला आहे. यासंदर्भात खुलासा करताना विभागीय प्रतिनिधी यांनी फाईल प्रोसेस झाल्याप्रमाणे तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव गेलेला असल्याचा खुलासा केला.

१.२१८ संस्थेची निवड करताना आपण काही निकष लावले होते का, सर्वांना खुल्या बाजारात आवाहन केले का ? कोटयावधी रुपयांच्या या कामासाठी निविदा काढली होती का ? सन २०१३-१४ मध्ये जेईई आणि आयआयटीच्या एन्ट्रंस परीक्षेकरिता पाठविलेल्या मुलींपैकी किती मुलींना जेईई आणि आयआयटीमध्ये मेरिटवर प्रवेश मिळाला त्याची समितीला माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता त्यांचे दोन वर्षांचे कोचिंग संपणार असुन यावर्षी ज्या परीक्षा होतील त्यात आयआयटी एन्ट्रंस किंवा नॅशनल इन्स्टिटयूटमध्ये किती ॲडमिशन होतील त्याचे मूल्यमापन ठरेल. आता पुढील २ ते ३ महिन्यांमध्ये ही माहिती समजू शकेल. तसेच त्या कोचिंग क्लासचा इफेक्ट होत नाही असे निदर्शनास आल्यास सदर योजनेचा रिव्ह्यू घेता येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.२१९ ही मोडस ऑपरेंडी आहे शासनाकडून पैसे घेतले दहावी परीक्षा पास असलेल्या विद्यार्थ्यांना बारावीचे प्रशिक्षण आणि जेईई आणि आयआयटीच्या एन्ट्रंस परिक्षेची तयारी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे शिकविण्यासाठी शासनाकडून पैसे घेतले. संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात अशा जाहिराती केल्या की, पेस इन्स्टिट्यूशन महाराष्ट्र शासन पुरस्कृत आहे. तसेच ज्या विद्यार्थ्याने कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आहे त्याने पेसमध्ये ॲडमिशन घेतले असल्यास त्याच विद्यार्थ्याला कॉलेजमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. अशा प्रकारे मागील ३ वर्षांपासून सुरू आहे. याबाबत विधानसभेत वारंवार उल्लेख झाला आहे या पाठीमागे कोण आहे याचा शोध घेणे अत्यावश्यक असून त्यांचे संचालक कोण आहेत, त्यांना बोलवून याबाबत विचारणा करणे गरजेचे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता पेस इन्स्टिट्यूटला अशा पद्धतीने परवानगी देता येत नाही परंतु त्यांना परवानगी दिलेली आहे. तसेच त्यांना कॅबिनेटची मंजुरी सुद्धा मिळाली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.२२० एक कोटी रुपयांचा विषय कॅबिनेटमध्ये गेला होता का ? कॅबिनेटने धोरणाला मंजुरी दिली. धोरण राबविण्याकरिता एजन्सीची निवड कशी करायची याकरिता प्रशासकीय यंत्रणा आहे ही बाब कॅबिनेटने ठरविली नाही हे सर्व ठरविण्याची जबाबदारी विभागाची होती. मूळ प्रस्ताव काय होता व त्यावर कॅबिनेटचा निर्णय काय झाला होता का ? विभागाने कॅबिनेटकडे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत विभागाचे काय म्हणणे होते आणि त्यासंबंधी कॅबिनेटने मान्यता दिली त्यावर कॅबिनेटचे काय म्हणणे होते याची नस्ती समितीला उपलब्ध करून द्यावी. तसेच या संदर्भात आता विभागाचे काय म्हणणे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता ही स्कीम होती आणि मूळ प्रस्तावात पेसचा उल्लेख होता. स्कीमची अंमलबजावणी झाल्यामुळे त्याचा काय रिझल्ट आहे हे आता पहावयास मिळेल असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

१.२२१ याविषयी विधानसभेत वारंवार चर्चा झाली होती. या संस्थेची निवड ज्या हेतूने केली आहे त्याकरिता दरवर्षी होणाऱ्या कार्यक्रमासाठी एक कोटी रुपये खर्च केला जातो अशी विचारणा समितीने केली असता त्यात राहण्याकरिता बोर्डिंग आणि लॉजिंगचा खर्च असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.२२२ लॉजिंग आणि बोर्डिंग मुंबइच्या बाहेर नेण्यात आले त्यानंतर विद्यार्थ्यांना ज्या ठिकाणी शिक्षण द्यावयाचे होते तेथे व्हेईकलची व्यवस्था करणे अत्यावश्यक होते परंतु तशी व्यवस्था करण्यात आली नाही. तसेच या कॉलेजमध्ये इंटर कनेक्टड शिकवले जात होते तेथे जे विद्यार्थी शिकत होते त्यांनाच तेथे आणण्यात आले बाहेरील कोणत्या गरीब विद्यार्थ्याला तेथे आणण्यात आले नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. तसेच विद्यार्थ्यांची निवड कशी, कोणत्या आधारावर व कोणी केली ? अशी विचारणा ही समितीने केली.

१.२२३ या संदर्भात पेसच्या सहाय्याने एन्ट्रंस परीक्षा घेण्यात आली याकरिता जाहिरात देत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. पहिल्या वेळी ४९ मुलींचे सिलेक्शन करण्यात आले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. त्यांचे पत्ते तपासले आहेत का ? २० ते ३० मुलांचे राहण्याचे एकच कॉमन ॲड्रेस असून राज्याच्या बाहेरील मुली आहेत का ? अशी विचारणा समितीने केली.

१.२२४ नवी मुंबईच्या इन्स्टिटयूटला भेट दिली होती व तेथील विद्यार्थीनीकडे विचारणा केली असता तेथे कंडक्टर, ड्रायव्हर, रिक्षा चालक, शॉप तसेच एक एकर जमीन असलेल्या व्यक्तींच्या मुली आहेत. अत्यंत गरीब कुटुंबातील मुली तेथे असून राज्यातील मुली असल्याची महिती विभागीय सचिवांनी दिली.

१.२२५ तेथील मुली कोणत्या शाळेत शिकत होत्या आणि त्या कोणत्या गावच्या आहेत ? याबाबत समितीने माहिती विचारली असता सदर मुली कोणत्या गावांतील आहेत आणि त्यांनी कोठे शिक्षण घेतले आहे याची माहिती समितीला सादर करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासनाच्या विभागाने जाहिरात करून परीक्षा घेतलेली आहे. आपण परीक्षा घेत असल्यामुळे त्यांचे तांत्रिक सहकार्य घेतलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२२६ पेसच्या लोकांनी एन्ट्रंस परीक्षा घेतली, पेपर तपासले तसेच प्रवेश देण्याचे अधिकार त्यांनीच ठरविले अशा पद्धतीने कार्यवाही करण्यात आली. अशा प्रकारे कांदिवली आणि मीरा रोड येथे दोन इन्स्टिटयूट सुरू करण्यात आल्या असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता सरकारने यासंबंधी जो निर्णय घेतला आहे त्याचे २-३ महिन्यात मूल्यमापन होईल विभागामार्फत परीक्षा घेण्यासाठी जाहिरात देणार होतो. परंतु समितीने निर्णय घेतल्यास जाहिरात देण्यात येणार नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२२७ विभागाने जाहिराती देवून पेसला डिस्कंटिन्यू करायला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. यासंबंधी मूळ निर्णय झालेला असून समितीच्या शिफारशीच्या आधारावर त्यांना रद्द करण्यासाठी विभागामार्फत प्रस्ताव पाठवू असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

१.२२८ सन २०१३-१४ मध्ये शैक्षणिक वर्षाची सुरूवात झाल्यामुळे या योजनेला प्रतिसाद मिळाला नाही असे महालेखाकारांकडून आक्षेप घेण्यात आले होते. याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता पहिल्या वर्षी उशीर झाला. यामुळे २-३ महिन्यांनी उशिरा परीक्षा घेण्यात आली. मंजुरी घेण्याकरिता वेळ लागला तोपर्यंत अकरावीचे प्रवेश होऊन गेले होते. याच गोष्टीमुळे प्रतिसाद मिळाला नव्हता. ही बाब बरोबर असून पहिल्या बॅचमध्ये ४९ मुलींना प्रवेश दिला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.२२९ कोटा ४९ चा आहे परंतु जाहिरात दिली असती तर जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज केले असते किती विद्यार्थ्यांनी आपल्या एट्रंस परीक्षेत भाग घेतला होता ? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भातील माहिती लेखी स्वरुपात देण्याचे सचिवांनी समितीस आश्वासित केले. तसेच परिक्षेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यापैकी ज्या विद्यार्थ्यांना जास्त गुण मिळाले त्यांची निवड करण्यात आली असल्याचेही समितीस अवगत केले.

१.२१० योजना चांगली असल्यामुळे समिती त्याचे समर्थन करीत आहे. परंतु पेस ही संस्था स्वयंस्फूर्तपणे तेथे येते यामुळे सर्व मॅनेज व मॅन्युकलेटेड झाले आहे. विभागाला ही योजना सुरू करायची असल्यास सदर संस्थेचे एज्युकेशनल इव्हॅल्युएशन होणे अत्यावश्यक आहे विभागाने निविदा मागवून यासंबंधी कार्यवाही करावी असे मत समितीने व्यक्त केले.

१.२११ समितीची अशी भूमिका आहे की, पेस व्यतिरिक्त इतर संस्था असल्यास त्यांना संधी दिली पाहिजे. समितीचे सदर योजनेला संपूर्ण समर्थन आहे. अशा प्रकारे प्रशिक्षण दिले पाहिजे. समिती सदर योजनेचे स्वागत करते. परंतु त्याकरिता संस्थेची निवड करीत असताना पेस संस्थेला संधी देण्याकरिता कोणता आधार घेण्यात आला होता ? इतर संस्थांना संधी दिली होती का ? अशा पद्धतीने काम करणाऱ्या मोठमोठ्या १० संस्था आहेत. विभागाने कॉम्पेटेटिव्ह करावे व त्यांचा दर्जा चांगला असला पाहिजे अशी समितीची भावना असल्याचे समितीने नमूद केले असता योजनेत बदल करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

१.२१२ प्लॅनिंग फायनान्सने दोन वर्षे क्लिअर केले नाही याचे कारण असे होते की, कोणतीही निविदा न मागविता डायरेक्ट पेस संस्थेला काम दिले होते. विभागाने सदर फाईल तपासून घ्यावी समितीची अशी धारणा आहे की, कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करता थेट एखाद्या संस्थेला काम दिले जात असल्यास निश्चितपणे फायनान्स प्लॅनिंगमध्ये अडचणी येत असतात यामुळे दोन वर्षे थांबले. परंतु कोणाच्या तरी अधिपत्याखाली यासंबंधी निर्णय झाला आहे यामुळे यासंबंधी सखोल माहिती घेऊन पुढील बैठकीच्या वेळी समितीला द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी यास मान्यता दिली.

१.२१३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता समितीने दिनांक ३१ मे, २०१६ रोजी पुन्हा बैठक घेतली. बैठकीच्या वेळी समितीने महिला व बालविकास विभागाने नोव्हेंबर, २०१४ मध्ये लाभार्थी मुलींचा तपशील एलआयसीला विहित प्रपत्रात का सादर केला नाही ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, या प्रकरणामध्ये लाभार्थ्यांचे अर्ज भरून घ्यावयाचे होते. दारिद्रय रेषेखालील ज्या महिलांना एक किंवा दोन कन्यारत्न होतात त्यांच्याकरिता सुकन्या योजना होती. विभागाला विचारणा करण्यात आली होती की

यामध्ये चार महिन्यांचा विलंब का झाला शासन निर्णयामध्ये ज्या अटी घातलेल्या होत्या, त्यानुसार आवश्यक त्या कागदपत्रासाठी तो वेळ गेलेला आहे. त्यात डोमेसाईल सर्टीफिकेट, दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र, कुटूंबकल्याण शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे देणे आवश्यक होते त्यामुळे हा वेळ लागत होता. शासन निर्णयामध्ये एक वर्षाची मुदत आहे त्यामुळे मुदत उलटून गेली होती अशी बाब नव्हतीच त्यामध्ये इतका काळ सहाजिकपणे लागतो ही नवीन योजना आहे. सेक्टरल मिटींग घेणाऱ्या मुख्य सेविकांना देखील समक्ष कार्यालयात बोलावले होते. यामध्ये चार महिने लागण्यास कोणती अडचण होती ते विचारले असता सेविकांनी सांगितले की, बाई बाळंतपणाला माहेरी जाते बाळाचा जन्म झाल्याची नोंद बाईच्या माहेरी होते. सासरी आल्यानंतर तिला माहेरी जाऊन बाळाचे जन्म प्रमाणपत्र आणावे लागते. तसेच रेशनकार्डवरील नोंदीबाबत दुसरी अडचण आहे. जुने रेशन कार्ड असतात. मुलीचे सासू, सासरे, मुलगा यांची नावे असतात. पण नवविवाहीत सुनेचे नाव नसते ते जोडुन घेण्यासाठी पुन्हा अज करून त्यासाठी वेळ जातो. याचप्रमाणे डोमीसाईल सर्टीफिकेटमध्येही याच अडचणी येतात. बाईचे नाव त्या घरामध्ये रेकॉर्डवर नसते मागील १० वर्षाचे लाईट बील मागितले जाते. कधीकधी त्या महिलेस आणणे शक्य नसलेला पुरावा मागितला जातो.

१.२१४ केंद्र सरकारकडून देशातील २६ राज्यामध्ये ही योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेत सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्रात जानेवारी २०१४ पासून अंमलबजावणी केली आहे. महाराष्ट्रातील लाभार्थ्यांना यामुळे वंचित रहावे लागले आहे अशी विचारणा समितीने केली असता सदर योजना केंद्र सरकारच्या अनुदानातून नव्हती यामध्ये केंद्राचे अनुदान नसुन हा त्या त्या राज्याचा एनिसिएटीव्ह आहे केंद्र सरकारने विशिष्ट तालुक्यात फक्त पायलट प्रोजेक्ट घेतले होते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. राज्यामध्ये पायलट प्रोजेक्ट नव्हता बाकीच्या राज्याने त्यांचे त्यांचे एनिशिएटीव्ह म्हणून ही योजना सुरू केलेली आहे प्रत्येक ठिकाणी नाव वेगळे होते. केंद्र शासनाच्या योजनेतील धनलक्ष्मी योजना, कर्नाटकामधील भाग्यलक्ष्मी योजना, मध्यप्रदेशात लाडली लक्ष्मी योजना, दिल्ली व हरियानामधील लाडली स्कीम, गुजरात व हिमाचल प्रदेशमधील बालिका समृद्धी योजना अशा योजना आहेत याशिवाय बिहार व पंजाबमध्येसुद्धा ही योजना आहे. पण सर्व राज्यामध्ये ही योजना नव्हती यामध्ये केंद्राचे अनुदान नव्हते. राज्यात कॅबिनेट डिसीजन होऊन सन २०१४ मध्ये विभागाने ही योजना राज्यात सुरू केलेली आहे अशी माहितीही विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.२१५ मुलींसाठी PACE-IIT योजनेच्या अंमलबजावणीबाबतचा प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाने दोन वर्षे विलंबाने मंजूर करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत आलेला प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाने तपासला. नंतर तो मंत्रिमंडळासमोर येणे अपेक्षीत होते यामध्ये विलंब झालेला आहे. मागील वेळी आक्षेप नोंदविला होता की, संस्थेतर्फे त्या मुलींकडून आणखी काही फी घेतली जाते या मुलींना महाविद्यालयांना ॲटॅच केले जाते. याबाबत माहिती घेऊन खात्री केली की, त्या मुलींना महाविद्यालयांकडून कोणतीही फी आकारली जात नाही याचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो. तसेच मुलींना फ्री कोचिंग केलेले आहे. आता आय.आय.टी.करिता यामधील ८ मुली पात्र ठरलेल्या आहेत. उर्वरित मुली रिजनल इंजिनियरींग कॉलेज व स्टेट इंजिनियरींग कॉलेजमध्ये मोठया प्रमाणावर सिलेक्ट होण्याचे चान्सेस आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.२१६ सन २०१२-१३ व २०१३-२०१४ दोन वर्षांत वित्त व नियोजन विभागाची मान्यता वेळेवर मिळाली नसुन ८ मुली आय.आय.टी. करिता पात्र ठरल्या आहेत. आता काही रिजनल कॉलेजमध्ये पात्र होणार आहेत पण या दोन वर्षांत अधिक मुली पात्र ठरल्या असत्या. दोन वर्षांत विभागाने याकरिता काय काय पाठपुरावा केला वित्त व नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांची त्यामध्ये काही चूक आहे की नाही. तुमच्या स्तरावरून विहीत वेळेत प्रस्ताव सादर केला नाही जेणेकरून या योजनेचा लाभ राज्यामध्ये दोन वर्षे या विद्यार्थ्यांना मिळू शकला नसल्याबाबत समितीने विचारणा केली असता ही योजना स्वीकारताना विविध विभागांची मते विचारात घेतलेली आहेत. समाजकल्याण विभाग, शालेय शिक्षण विभागांचे मत घेतले आहे यानंतर नस्ती नियोजन विभागाकडे गेलेली आहे. यानंतर तरतुद उपलब्ध करून देण्याकरिता वित्त विभागाकडे नस्ती गेलेली असुन यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झालेला आहे. एवढा कालावधी लागणे हा निर्णय प्रक्रीयेचा भाग आहे. यामध्ये आपल्या राज्याचा स्वतःचा इनिशिएटीव्ह आहे यामध्ये शालेय शिक्षण विभाग, समाजकल्याण विभाग इत्यादी संबंधित विभागांची मते आल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतलेला असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केली.

१.२१७ या निर्णय प्रक्रीयेपर्यंत पोहचण्यास विभागास दोन वर्षे लागली असल्याचे समितीने नमूद केले असता यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, ही वस्तुस्थिती आहे ही योजना राज्यस्तरीय होती अशा प्रकारच्या बऱ्याच योजना विभाग प्रस्तावित करतो. काही योजना लवकर तयार होतात पण बऱ्याच योजना अंतिम होण्यास वेळ लागतो. त्याची कारणे वेगवेगळी आहेत वित्त व नियोजन विभागाच्या बऱ्याचशा क्वेरीज असतात. त्यांच्या आऊटलेमध्ये आम्ही बसू शकतो की नाही याची विचारणा करतात. त्याकरिता खर्च मंजूरी आहे की नाही अर्थसंकल्पीय तरतुद आहे की नाही याचा विचार करतात. ही राज्याची योजना असल्यामुळे मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन दिनांक ९/७/२०१३ रोजी याबाबतचा शासन निर्णय जारी केलेला आहे. विभागाने निर्णय प्रक्रीयेमध्ये पुढाकार घेतला तरी एवढा वेळ लागतोच.

१.२१८ निर्णय प्रक्रीयेला वेळ लागला आहे समितीला असे वाटते की, निर्णय प्रक्रिया लवकर केली असती तर त्यामागील दोन वर्षे याचा फायदा विद्यार्थ्यांना मिळाला असता. या प्रक्रियेमध्ये विभागास काही अडचणी आल्या किंवा पाठपुराव्यामध्ये काही कमी पडले असेल पण याला

वेळ लागला आहे असे विभागाचे म्हणणे असल्याची बाब समितीने नमूद केली. असता विभागाने कोणत्याही फाईलमध्ये एनिशिएटीव्ह घेतला तरी त्यामध्ये एवढा वेळ लागतो कधी कधी त्या योजना होत सुद्धा नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२१९ बालगृहाकरिता बायोमेट्रीक यंत्रांची ऑर्डर दिली, ५० टक्के पेमेंट दिले पण मालच पोहचला नाही. बाकीची सिस्टम पूर्ण केली पाहिजे होती, ती अजूनपर्यंत पूर्ण झाली नाही. आता सध्या किती ठिकाणी फिटींग झालेली आहे ? अशी समितीने विचारणा केली असता विभागाकडील सर्व ठिकाणी ही सिस्टीम फिटींग केलेली आहे व त्याचा वापर सुरू केलेला आहे पण सर्व्हर नसल्यामुळे ऑफलाईन पद्धतीने हजेरी घेण्यात येते तसेच पूर्ण ९६९ सिस्टीम फिटींग असून विभागाच्या खर्चातून त्यामध्ये सिमकार्डसुद्धा बसविले असुन ऑफलाईन पद्धतीने बायोमॅट्रीक अटेन्डन्स घेण्यात येते व त्या आधारावरच त्यांना पेमेंट केले जात असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२२० विभागाने सांगितले आहे की, ९६९ सिस्टीममध्ये सीमकार्ड बसविण्याची ऑर्डर दिनांक ३० मार्च २०१३ रोजी काढण्यात आलेली आहे. वर्क ऑर्डर विभागाने काढली आहे का ? कारण त्यांच्या अनुदानातून रक्कम विभागाने वजा केली आहे अशी विचारणा समितीने केली असता त्यावेळी विभागाला अनुदान मिळाले नव्हते, जे मिळाले ते विथड्रॉ झाले नव्हते. विभाग ज्या संस्थांना अनुदान देतो, त्या संस्थांकडून सबसीक्वीवेंटली घेतलेले असून आता त्याचा वापर करीत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. तसेच वर्क ऑर्डर विभागाने काढली आहे. तथापि, त्यासाठी त्यांना वेगळे अनुदान देत असून आम्ही ऑफलाईन पद्धतीने सिस्टम वापरत असुन ऑनलाईन होऊ शकले नाही कारण समाजकल्याण विभागाचे सर्व्हर असले पाहिजे होते ते इनप्लेस सध्या नाही म्हणून विभागाने सुद्धा यामध्ये संपूर्ण सिस्टीम वापरली आहे असा खुलासाही विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.२२१ विभागाचा मुख्य उद्देश असा होता की, गळती, चुकीची पटसंख्या यावर कोठे तरी अंकुश लागला पाहिजे. त्या दृष्टीने सर्व्हर आवश्यकच आहे. सेंट्रलाईज केले नाही तर स्थानिक स्तरावर काही बाबी बालगृहामध्ये मॅनेज होऊ शकतात म्हणून ते सर्व्हर लावणे अतिशय अनिवार्य आहे. बायोमॅट्रीक पद्धतीमध्ये आपण जे सीमकार्ड लावले होते त्याचा उपयोग कोठे झाला ? या समितीच्या प्रश्नाला याचा उपयोग झाला, पण ऑनलाईन व एकात्मिक पद्धतीने होण्यासाठी हे सर्व्हर आवश्यक असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

१.२२२ हे बसविण्याचा उद्देश काय होता, बालगृहातील मुलांची नोंदणी व हजेरी एका सर्व्हरवर आली पाहिजे नंतर त्यात काही हस्तक्षेप होऊ नये यादृष्टीने केलेला हा सर्व खर्च निष्फळ झाला आहे असे वाटत नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाच्या मर्यादेपर्यंत त्याचा बेनिफीट घेतलेला असून काही जिल्ह्यांचे हजेरीपट आणून अभ्यास केला याचा फायदा असा आहे की, मुलगा गैरहजर असताना आता हजर असल्याचे लिहू शकत नाही अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.२२३ ही बाब आता त्या बालगृहापुरती झालेली आहे विभागाने सेंट्रलाईज सिस्टीम व्यवस्थित ठेवली पाहिजे. त्याला आपण ऑफलाईन व सर्व्हरची सिस्टीम सांगत आहात ते न बसविल्यास कंट्रोल कुठे आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता ऑनलाईन रियल टाईमचा उपयोग होता म्हणून सुरूवातीस याचे प्रावधान केले होते. ज्याप्रमाणे फायदा मिळाला पाहिजे होता तो मिळाला नाही ही वस्तुस्थिती आहे. पूर्णपणे वाया गेला असे म्हणता येणार नाही. अजूनही विभाग त्या डाटाचा वापर करतो पण प्रभावीपणे वापर करू शकत नाही अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१.२२४ बायोमॅट्रीक सिस्टीमनुसार तुम्ही प्रत्येक मुलास ९०० रूपये मदत विभाग देणार होता पण त्यामध्ये उशीर झाला. त्यामुळे तुम्ही आता ६३५ रुपया प्रमाणे देत आहात. ज्या दिवशी बायोमॅट्रीक मशीनचे ऑपरशेन सुरू केले आहे तेव्हापासून ९०० रुपये देता आले असते. मधल्या कालखंडात मुलांना हे पैसे मिळू शकले नाहीत हा महालेखाकारांच्या परिच्छेदाचा मुख्य उद्देश होता. याकरिता विभागाने जबाबदारी निश्चित केली आहे का ? या समितीच्या प्रश्नाला मशीन बसवून देण्यापासून ती चालू करण्याबाबत सर्व बाबींची जबाबदारी सामाजिक न्याय विभागाची होती असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.२२५ समितीला असे वाटते की, या कार्यवाहीचा मुळ उद्देश होता की, ऑनलाईन सर्व्हर बसवून त्यावर पूर्णपणे कंट्रोल विभागाच्या सेंट्रल ऑफीसमधून झाला पाहिजे होता पण तो झालेला नाही. सध्या जी सिस्टीम आहे त्याचा उपयोग करीत आहात जे आहे त्यालाच बेस मानून त्या मुलांचे अनुदान वाढवून दिलेले आहे असे दिसते पण हे किती ऑथेंटीक आहे. ऑनलाईन सर्व्हर ठेवला तर त्या कामाला पूर्णपणे प्रमाणिकता मिळेल असे समितीला वाटते. त्याच बरोबर उशीर झाला त्या लाभार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. आपण ऑर्डर दिली व त्यांना ९० टक्के पेमेंटही दिलेले आहे हे देखील चुकीचे आहे. हे बसविण्याकरिताही विलंब झाला आहे. सीम कार्डची ऑर्डरही आपण लगेच दिली नाही. ४-६ महिन्यानंतर ऑर्डर दिलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. या विषयाचा पूर्णपणे फायदा घेण्यासाठी याला ऑनलाईन सर्व्हर बसवावा अशी समितीची सूचना राहणार आहे. विभागाने सांगितले की यामध्ये विलंब झाला आहे. टेंडर अटी व शर्तीप्रमाणे त्यांना विहीत वेळी रक्कम देण्याऐवजी ॲडव्हान्स रक्कम देऊन टाकली. या सर्व चुका यामध्ये झालेल्या आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता समितीने अशी शिफारस करावी की जर याला युआयडीशी लिंक केले तर आणखी फुलप्रुफ ऑनलाईन रिअलटाइम आणि आधार लिंक होईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.२२६ ' मुलीसांठी स्वसंरक्षण प्रशिक्षण '

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस असे विदित केले की, सन २०१२ मध्ये दिल्ली येथे

निर्भयाकांड झाल्यानंतर राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाचे नियोजन केले गेले तेव्हा मुलींचे सेल्फ डिफेन्स प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याचे ठरले. परंतु त्या वर्षी तो कार्यक्रम राबविता आला नाही. मग सरकारला विनंती करण्यात आली की, पुढच्या वर्षी हा कार्यक्रम मंजूर करण्यात यावा. जुलै, २०१३ मध्ये भारत सरकारने त्याला मंजूरी दिली. यामध्ये एकूण ९६ हजार मुलींच्या प्रशिक्षणाचे नियोजन केले गेले. मुख्य ऑब्जेक्शन आहे ते प्रत्यक्षात ४६ हजार मुलींचे प्रशिक्षण होऊ शकले आणि बाकीच्या मुलींना प्रशिक्षण देता आले नाही, ते मुख्य ऑब्जेक्शन आहे बाकीच्या काही मुद्यांचा चा प्रॉब्लेम नाही. विभागाचे म्हणणे आहे की, इलेक्शन झाले. अर्थात ऑडीट पॅरामध्ये या विषयावरही ऑब्जेक्शन आहे की, इलेक्शन तर सप्टेंबर महिन्यामध्ये झाले आणि हे मार्च, २०१४ पूर्वी करायचे होते ते का नाही होऊ शकले तर विभागाचे म्हणणे आहे की, इतर जिल्हा परिषदेचे वगैरे इलेक्शन झाले. फक्त लोकसभा आणि विधानसभेच्या इलेक्शनशी याचा संबंध नाही.

१.२२७ आणखी एक मुद्दा आहे तो या ठिकाणी दिलेला नाही. जिल्हा पातळीवर जिल्हाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली एखादी समिती केली, महानगरपालिकांमध्ये आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एखादी समिती केली. हे पहिलेच वर्ष असल्यामुळे सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष यामध्ये गेले नाही. त्यामुळे हे काम झाले नसून फक्त ५० टक्के काम झालेले आहे.

१.२२८ यामध्ये जिल्हावार सध्याची टार्गेटची स्थिती काय? अशी विचारणा समितीने केली असता पहिले वर्ष होते तेव्हा ४५० रुपये प्रत्येक मुलीमागे बजेट मंजूर करून घेतले होते. जर ३१ मार्चपर्यंत काम झाले नाही तर ते पैसे परत घ्यावे लागतात. त्यामुळे शासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडून पैसे परत घेतले. पुढच्या वर्षी जेव्हा भारत सरकारकडे हा मुद्दा घेऊन गेलो तेव्हा भारत सरकारने मुलीमागे पैसे देण्याऐवजी शाळा मागे दिली आणि प्रत्येक शाळेला २ हजार रुपये प्रमाणे दिले. त्यामुळे हे फार वेगळे झाले. प्रत्येक शाळेत २ हजार रुपये म्हणजे ४ मुलीमागे असे देण्यात आल्यामुळे ते बजेट फार कमी झाले. शाळांना निधी दिला पण त्यामुळे किती प्रशिक्षण होऊ शकेल यावर विभागाचा विश्वास राहिला नाही. यावर्षी पुन्हा आता ९ हजार रुपये प्रति शाळेला दिलेले असून सन २०१५-१६ साठी देण्यात आले आहेत असा खुलासा शालेय शिक्षण विभाग यांनी केला.

१.२२९ दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ ला राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियानांतर्गत ३४ जिल्ह्यांना निधीचे वाटप झाले. सर्व जिल्ह्यांनी हा कार्यक्रम राबविण्याचे ठरविले होते. तरी सुद्धा बीड, जालना, नाशिक, परभणी, सोलापूर, वाशिम या सहा जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम राबविला नाही याची कारणे काय आहेत ? अशी पृच्छा समितीने केली असता जिल्हाधिकाऱ्यांना सभा घ्यायला वेळ मिळाला नाही. निवडणुकीनंतरचे ते पहिले वर्ष होते बाकीच्या जिल्ह्यांना ते जमले असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२३० बाकीच्या जिल्ह्यांना सुद्धा इलेक्शनचे काम होते कारण इलेक्शन संपूर्ण राज्यामध्ये आणि पूर्ण देशामध्ये होते. सहा जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ही मिटींग का घेतली नाही याबाबत त्या जिल्हाधिकाऱ्यांकडून तुम्ही खुलासा मागवून घ्यावा. कारण बाकीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तत्परतेने मिटींग घेतलेली आहे. निवडणूका आहेत म्हणून मिटींग घेऊ शकत नाही हे कारण होऊ शकत नाही. या सहा जिल्ह्यांनी एकाही पैशाचा निधी वापरला नाही. जालना, नाशिक, बीड, परभणी, सोलापूर आणि वाशिम या जिल्ह्यांना आपण एकूण किती निधी दिला होता ? अशी विचारणा समितीने केली असता प्रत्येक मुलीमागे ४५० रुपये दिले गेले आहेत. त्या जिल्ह्यातील मुलींची संख्या आता उपलब्ध नाही त्याप्रमाणे गुणिले ४५० प्रमाणे दिले गेले असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२३१ लोकसभेच्या निवडणुकीची कोड ऑफ कन्डक्ट ३ किंवा ४ मार्च, २०१४ ला आलेले आहे आणि आपण २९ नोव्हेंबर, २०१३ अन्वये सर्वांना निधी वितरीत केला. हा निधी वितरीत करण्यासंबंधी या सहा जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले आहे. त्यांना शो कॉज नोटीस काढून त्यांचा खुलासा मागविण्यात यावा आणि आवश्यकता भासल्यास कारवाई करण्यात यावी. यासंबंधी महालेखाकारांनीही ऑब्झरवेशन नोंदविलेले आहे. विभागाने आचारसंहितेचे जे कारण दिलेले आहे त्याचा ए.जी.ने अस्वीकार केलेला आहे. कारण प्रशिक्षणाचे वेळापत्रक डिसेंबर, २०१३ ते जानेवारी, २०१४ असे तयार केलेले होते. त्यामुळे आचारसंहितेचा यामध्ये काही प्रश्न येत नव्हता. विभागाने जिल्हाधिकारी यांच्याकडून एक्सप्लेनेशन मागवून घ्यावे असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी तसे समितीस आश्वासित केले.

१.२३२ ' मुलींच्या माध्यमिक शिक्षणासाठी प्रोत्साहन योजनेच्या अंमलबजावणीस विलंब '

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, मुलींच्या माध्यमिक शिक्षणासाठी प्रोत्साहन योजनेची अंमलबजावणी या स्कीममध्ये ज्या मुलीने ९ व्या वर्गामध्ये ॲडमिशन घेतली असेल तिचे नाव केंद्र सरकारला पाठवायचे. आधी ती मुलगी दोन वर्षे थांबली आणि १० वी पास झाल्यानंतर लग्न न करता थांबली असेल तर भारत सरकार तिला ३ हजार रुपये देणार अशी ही योजना आहे.

१.२३३ सन २००८-२००९ पासून ही योजना सुरू झालेली आहे. सन २००८-२००९, २००९-२०१० आणि २०१०-२०११ सुद्धा व्यपगत झाला. तीन वर्षांचे सर्व लाभार्थ्यांचे पैसे व्यपगत झाले. कारण वेळेवर आपण पूर्ण माहिती पुरवू शकलो नाही अशी स्थिती असल्याचे समितीने नमूद केले असता यामध्ये केंद्र सरकारने कळविले की, अर्थसंकल्पातील तरतुदीच्या अडचणींमुळे या तीन वर्षांतील पैसे त्यांनी दिलेच नाहीत त्याच्या पुढच्या वर्षाचे त्यांनी थोडे पैसे दिलेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच केंद्र शासनाचा बजेटचा प्रॉब्लेम होता. पैसे द्यायचे

असते तर आताही देता येतात. परंतु केंद्र शासनाचे म्हणणे आहे की, अर्थसंकल्पीय अडचणीमुळे या तीन वर्षांचा देण्यात येणार नाही. दोन्ही वर्षाच्या बाबतीत वेगवेगळ्या पत्रान्वये त्यांनी सांगितले की निधी देता येणार नाही. दोन पत्रांच्या आधारावर विभागाने केंद्र शासनास सन २०११-२०१२ ची ३७,७९४ मुलींची माहिती दिलेली आहे. सन २०११-२०१२ मध्ये काही मुलींना पैसे मिळालेले आहेत. किती मुलींना पैसे मिळाले हे या पातळीवर सांगणे शक्य नाही. कारण भारत सरकार संबंधित मुलींच्या खात्यामध्ये डायरेक्ट पैसे जमा करते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

१.२३४ अल्टीमेटली या सर्व मुलींचे अकाऊंट नंबर देणे विभागाला बंधनकारक आहे आणि हे सर्व अकाऊंट नंबर आपल्याकडे प्राप्त झाले आहेत काय? कारण विभागाने सांगितले की, अकाऊंट नंबर देण्यासाठी खूप उशिर लागतो. The State Government has to prepare a a consolidated proposal with bank details of the beneficiary within three months of the commencement of the academic year. हे विभागानेच सांगितलेले आहे त्यामुळे या सर्व अकाऊंट सिस्टीमची फॉरमॅलिटी आपण पूर्ण केलेली आहे काय ? या समितीच्या प्रश्नाला जेवढ्या मुलींबद्दल येथे सांगितले गेले त्याचा प्रत्येक वर्षनिहाय रिपोर्ट दिलेला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.२३५ सन २०११-२०१२ मध्ये ३७ हजार ६९४ मुलींची माहिती पूर्ण केलेली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये ५० हजार ९३५ मुलींची माहिती पूर्ण केलेली आहे. सन २०१३-२०१४ मध्ये ५१ हजार ६४४ मुलींची माहिती दिलेली आहे. सन २०१४-२०१५ मध्ये सर्व ऑनलाईन झाले. त्यामुळे एका अर्थाने सोल्युशन काढले आणि मला वाटते पूर्ण देश पातळीवर सर्व राज्यांना हा प्राब्लेम येत असणार म्हणून भारत सरकारने ऑनलाईन केले. सन २०१५-२०१६ मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांनी ऑनलाईन माहिती भरलेली आहे.

१.२३६ या योजनेनुसार मुली जेव्हा ९ व्या वर्गामध्ये ॲडमिशन घेतात त्यापैकी ज्या एससी, एसटी प्रवर्गातील मुली आहेत आणि ज्यांनी लग्न केलेले नाही अशा राज्यातील संपूर्ण मुलींची माहिती बँक अकाऊंटसह भारत सरकारला पाठवायची असते अशी विस्तृत माहिती विभागीय सचिवांनी दिली. कस्तुरबा गांधी विद्यालयामध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना अपार्ट फॉर्म एससी, एसटी सर्वजण पात्र आहेत असे विभागाच्या रिप्लायमध्ये आहे. आता या लोकांना जे ३ हजार रुपये देणार आहात तर त्यामध्ये मॅच्युरिटीनंतर किती मिळणार आहेत. After completion of term त्या मुलींना किती रक्कम मिळणार आहे. अशी विचारणा समितीने केली असता ३ हजार रुपयेच दिले जातात दोन वर्षांचे शिक्षण झाल्यानंतर म्हणजे ९ वी मध्ये प्रवेश घेतल्यानंतर त्यांची माहिती व बँक अकाऊंट नंबर भारत सरकारला पाठविण्यात येते. १० वी पास झाल्यानंतर एकदा कळविण्यात येते आणि अद्याप लग्न केलेले नाही असे दोन वेळा कळविण्यात येते. यामध्ये वयाची मर्यादा नसून आम्ही ९ वी आणि १० वी पास झाल्याचे कळवितो. यासाठी वयाची मर्यादा असायलाच पाहिजे. इयत्ता ९ वीमध्ये असलेली मुलगी लग्न झालेली कशी असणार !

१.२३७ यामध्ये आपला कायदा असा आहे की, मुलगी १८ वर्षांची झाल्याशिवाय तिचे लग्न करु शकत नाही. विभागाने यावर रिप्लाय दिलेला आहे, "would be entitle to withdraw it on reaching 18 years." जोपर्यंत ती १८ वर्षांची होत नाही. इयत्ता ९ वी मध्ये असतानाचा जो दाखला दिला जातो त्यावेळी तिचे वय १६ वर्षांच्या आतील पाहिजे आणि तिला पैसे १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच मिळतील. पण तिने आपले एज्यूकेशन इयत्ता १० वी पास झाल्यानंतरच त्याचे पैसे मिळतील आणि ती अविवाहित पण असली पाहिजे अशा यामध्ये तीन कंडीशन आहेत. इयत्ता ९ वी मध्ये १६ वर्षांच्या खाली असायला पाहिजे, पैसे १८ वर्षांची झाल्यानंतर मिळतील आणि ती १० वी पास झाल्यानंतरच पैसे मिळतील. अशा दोन-तीन अटी आहेत. हे सर्व काटेकोरपणे होते काय किंवा नाही याची माहिती देण्यात यावी. This is applicable to aided, non aided schools अशा सर्वांसाठी हे लागू आहे. शासकीय अनुदानित, विना अनुदानित किंवा खाजगी अशा सर्व शाळांना हे लागू आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता ९ वी च्या वर्गात असणाऱ्या मुली लग्न करतात म्हणून ही योजना असून पूर्वीच्या काळात ६५ टक्के मुली लग्न करीत होत्या असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. तसेच अटींची काटेकोरपणे पालन होते की नाही याची माहिती प्रत्येक शाळेमधून घेऊन समितीला कळविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. तसेच सर्व शाळेतील मुलींसाठी ही योजना लागू असल्याचेही सांगितले. सन २०११-२०१२ पासून पैशासाठी फॉरमॅलिटी केलेली आहे बजेट केलेले आहे त्याचे पैसे त्या मुलींना मिळतात की नाही याची काही तपासणी केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली. याची तपासणी केलेली असून एक्झॅट संख्या माहिती नाही पण मुलींना हा निधी मिळायला सुरूवात झालेली आहे. केंद्र सरकार थेट त्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे जमा करते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२३८ ' बायोमेट्रीक हजेरी प्रणालीची अंमलबजावणी न केल्यामुळे बालगृहांना वाढीव दराने देखभाल अनुदानाचे प्रदान झाले नाही '

उपरोक्त मुद्यांसंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, मूळ निविदेत बायोमॅट्रिक्स बसविण्याकरिता सिमकार्ड नव्हते त्याच्याकरिता सिमकार्ड जोडणे या दोन बाबी मूळ टेंडरमध्ये समाविष्ट नव्हत्या. बायामेट्रिकसंबंधीच्या बाबी टाटा सेंटरशी लिंक करणे महत्त्वाचे आहे. सिमकार्ड नसल्यामुळे टाटा सेंटर्सचे यामध्ये लिंकेज होऊ शकले नाही.

१.२३९ यामध्ये आता शासनाने लिंक जोडण्याचे ठरवून बायोमॅट्रिक मशिन घेण्याचे ठरवले आणि सिमकार्ड नसेल तर त्या मशिनचा काय उपयोग ? दोन वर्षानंतर या मशिन्स सुरू झाल्या. त्यामुळे मुलांना अनुदान कमी मिळाले कारण त्यामध्ये बायोमॅट्रिक नाही. दोन वर्षे निष्फळ खर्च केल्यामुळे मुलांना ९०० रुपये भत्ता मिळणार होता त्याऐवजी केवळ ६५० रुपये एवढाच भत्ता मिळाला. त्यामुळे मुलांवर अन्याय झाला. यास जबाबदार कोण आहे ? या विसंगतीस व विलंबास कोण जबाबदार आहे ? हे समितीला अवगत करणे आवश्यक असल्याचे समितीने विभागास सांगितले.

१.२४० ' बाल/निरीक्षण गृहांची संयुक्त प्रत्यक्ष तपासणी '

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, निरीक्षण गृहामध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. उदा. नंदुरबार येथील इंदिरा महिला सेवा संस्था येथील मुलींचे बालगृह यात स्नानगृह, शौचालय यांचे दरवाजे मोडकळीस आले होते अशा प्रकारच्या काही त्रुटी होत्या. त्यानंतर संस्थेला सूचना दिल्यानंतर त्यांनी सदर दुरुस्ती करून त्रुटींची पूर्तता केली आहे. ठाण्यात देखील अशाच पद्धतीच्या त्रुटी होत्या त्या त्रुटींची पूर्तता करण्यात आली असून तेथे ३ पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली होती. ठाण्यात उल्हासनगर येथील एका निरीक्षण गृहात काही दुरुस्त्या होत्या.

१.२४१ यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखी स्पष्टीकरणात असा उल्लेख आहे की, एप्रिल, २००३ पासून निरीक्षण गृह रिकामे आहे. निरीक्षण गृहात आता कोणी राहत नाही का ? तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला २००९ पर्यंत ६१ लक्ष रुपयांची मंजुरी दिली आहे.

१.२४२ महालेखाकारांची टिम गेली असता तेथील निरीक्षण गृह रिकामे होते असे समितीने विचारले असता त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुरुस्त्या आवश्यक असून दुरुस्तीकरिता रक्कम मंजूर केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२४३ ६१ लक्ष रुपये खर्च करून सुद्धा ते राहण्यास योग्य का नाही ? २००३ पासून निरीक्षण गृह रिकामे आहे. याचा अर्थ सदर ६१ लाख रूपयांचा खर्च निष्फळ झालेला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता त्यांनी आणखी ११ लाख रुपयांच्या जवळपास अंदाजपत्रक दिलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच यासंबंधी पत्रव्यवहार केलेला असून एकाच वेळी असलेल्या त्रुटींचे समाधान करण्याऐवजी त्यांनी टप्प्याटप्प्यात दुरुस्ती करण्याचा वेगवेगळा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी सुरूवातीलाच सर्वंकष प्रस्ताव दिला असता तर ते निरीक्षण गृह दुरुस्त करून ऑपरेशनल करता आले असते. त्यांच्याकडून शेवटचा प्रस्ताव ११ लाख रुपयांचा देण्यात आला आहे. व्हिजिट झाल्यानंतर नवीन आयटमचा समावेश करण्यात आला होता. आता अशी अपेक्षा आहे की, ११ लाख रुपयांचे काम झाल्यानंतर ते पूर्णपणे ऑपरेशनल होऊ शकेल असा खुलासाही केला.

१.२४३ १३ वर्षांनंतर ६१ लाख रुपये खर्च करून ते व्यवस्थित होणार आहे असे विभागाकडून सांगण्यात येत आहे. ६१ लाख रुपये खर्च केल्यासंबंधी काही सविस्तर माहिती आहे का ? सदर इमारतीचा पूर्ण वापर न करता त्यावर फक्त खर्च केला जात आहे व याबाबत कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता ६१ लाख रुपये हा दुरुस्तीवरील खर्च असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२४४ निरीक्षण गृहाची आवश्यकता नसल्यास त्याकरिता ११ लाख रुपये खर्च करण्याची गरज नाही असे समितीने मत व्यक्त केले. यावर विभागीय सचिवांनी असे विदित केले की, सदर निरीक्षण गृहाची गरज असल्याने आपण पाठपुरावा करीत आहोत. निरीक्षण गृहाची संख्या कमी आहे सदर निरीक्षण गृह ऑपरेशनल नसल्यामुळे मुलांना दुसऱ्या ठिकाणी पाठविले आहे. मुलींचे चेंबूर येथे निरीक्षण गृह आहे तेथे दोन निरीक्षण गृह आहेत. चेंबूर येथील निरीक्षण गृहाकरिता दुरुस्तीची गरज असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२४५ ठाणे येथील निरीक्षण गृहाकरिता ६१ लाख रुपये खर्च करून ते उपयोगात आणले नाही. आता ७ वर्षानंतर ११ लाख रुपये आणखी मागत आहात. सन २००९ मध्ये दुरुस्तीचे काम झाले असते तर त्याकरिता ११ लाख रुपयांऐवजी फक्त ५ लाख रुपये लागले असते. १३ वर्षांच्या कालावधीत लहान लहान गोष्टींची पुर्तता न केल्यामुळे आजपर्यंत ६१ लाख रुपयांचा केलेला खर्च निष्फळ झाला आहे असे समितीचे मत आहे. ही बाब विचारात घेता या संदर्भात कोणावर तरी जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे. तसेच ११ लाख रुपये खर्च करून किती कालावधीत निरीक्षण गृहाचे काम पूर्ण करणार आहात ? याबाबत समितीने पृच्छा केली असता सार्वजनिक बांधकाम विभाग एक्सक्युटिंग एजन्सी आहे. मागणीनुसार पीडब्ल्युडी अंदाजपत्रक तयार करीत असते. तसेच त्यांनी ३ टप्प्यांमध्ये वेगवेगळे काम घेतल्याचे दिसून येत आहे. आयुक्त साहेबांना विभागामार्फत सांगणार आहोत की, ११ लाख रुपये खर्च केल्यानंतर सदर निरीक्षण गृह कमीत कमी ऑपरेशनल होणे अत्यावश्यक आहे. समितीच्या मतानुसार ७ वर्षांपूर्वी सदर काम एकत्रितपणे घ्यावयास पाहिजे होते. परंतु ते का घेण्यात आले नाही याची नस्ती पाहून समितीला कारणमिमांसा अवगत करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.२४६ मुलांचे व मुलींचे निरीक्षण गृह तसेच मुले आणि मुलींचे बालगृह आहेत. या ठिकाणी मागील दीड वर्षांच्या कालावधीत आतापर्यंत सचिवांनी तेथे किती वेळा भेटी दिल्या आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता भेटी देण्याचे प्रमाण अतिशय कमी असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.२४७ कोणत्या मुला व मुलींच्या बाल सुधारगृह व निरीक्षण गृहाला विभागाने भेटी दिल्या आहेत, त्यासंदर्भातील अहवाल समितीला देणे आवश्यक असून याबाबत एक कार्यक्रम ठरवून महिन्यातून कमीत कमी एक किंवा दोन भेटी ग्रामीण भागात आपण दिल्याच पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, तीन महिन्यापूर्वी या विभागात आलो असून पुण्यातील निरीक्षण गृह व महिला गृहांची पाहणी केलेली आहे.

१.२४८ नांदेड येथे ज्या मुली अंडर ट्रायल होत्या त्यांना इतर मुलींबरोबर ठेवण्यात आले. विधी संर्घषातील मुलीही या मुलींबरोबर राहत होत्या, त्यांना कोणी परवानगी दिली आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता त्या ठिकाणी जितक्या मुलींची आवश्यकता आहे तेवढ्या संख्येने तेथे मुली नाहीत. म्हणून हे सर्व प्रकार उद्‌भवतात व सीडब्ल्यूसीला असा निर्णय घ्यावा लागतो. खरे तर दोन्ही सेक्रीगेशन केले पाहिजे, आपणाकडे इन्फ्रास्ट्रक्चर नसल्यामुळे संपूर्णपणे सेक्रीगेशन झाले नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले. तसेच पुढे टप्प्या टप्प्यात आपण सेक्रीगेशन करीत आहोत, नागपूर येथे देखील सेक्रीगेशन करीत आहोत, उपलब्ध निधी आणि मागणी याचा मेळ बसविण्यात येत आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२४९ त्यांना निरीक्षण गृहात ठेवावेच लागणार, त्यासाठी सेप्रेशन असायला पाहिजे. त्यांचा प्रभाव त्या मुलींवर पडणार, त्यामुळे क्लासिफिकेशन प्रमाणे निरीक्षण गृहात त्यांना वेगवेगळे ठेवले पाहिजे. याकरिता इन्फ्रास्ट्रक्चरची आवश्यकता आहे काय ? असल्यास समितीच्या अहवालात समिती शिफारस करेल असे समितीने सांगितले. असता मुलींसाठी निरीक्षण गृहे वेगळी पाहिजेत तथापि मोठ्याप्रमाणात ती कमी असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.२५० " मनोर्धेय योजनेची अंमलबजावणी "

मनोर्धेय योजनेसंदर्भात चर्चा करताना समितीने नियमाप्रमाणे या योजनेअंतर्गत पीडित महिलेला सात दिवसांच्य आत पैसे मिळणे आवश्यक असते. त्याप्रमाणे संबंधित महिलेला सात दिवसांच्या आत पैसे मिळतात का ? अशी विचारणा केली असता मनोधैर्य योजनेंतर्गत एफआयआर दाखल झाल्यानंतर संबंधित महिलेला सात दिवसांच्या आत पैसे मिळणे नियमाप्रमाणे आवश्यक आहे. परंतु या योजनेंतर्गत द्यावयाचा निधी संपलेला असून पुरवणी मागण्यांतर्गत या निधीची मागणी केलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२५१ निगेटिव्ह बॅलेन्सअंतर्गत या महिलांना हा मदत निधी देण्याचा विभागाने प्रयत्न का केला नाही ? या पीडित महिलांना आपण त्यांच्या बिकट परिस्थितीत पैशाकरिता ताटकळवितो त्यामध्ये या योजनेचा मूळ उद्‌देशच लोप पावतो हे योग्य नसून विभागाने व महामंडळाने किंवा आयोगाने अशा प्रकारच्या महिलांकरिता केंद्र शासनाच्या व शासनाच्या योजनांच्या माध्यमातून तातडीने मदतीची तजवीज करून त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यास प्रयत्नांची पराकष्ठा करणे आवश्यक आहे.

१.२५२ येथे विलंबाची जी कारणे दिलेली आहेत, ती विभागाने रेक्टिफाय करणे आवश्यक होते. बैठकीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून कार्यबाहुल्यामुळे दिनांक व वेळ मिळण्यासाठी काही अवधी लागतो. त्यामुळे बेठकीसाठी विहित कालमर्यादा पाळणे शक्य होत नाही. ही व अशी सर्व कारणे रेक्टिफाय करणे आवश्यक आहे. सर्वात जास्त डिप्राईव्हड क्लासच्या मदतीकरिता असलेला निधी मागण्याकरिता किंवा त्याच्याशी संबंधित कार्यवाही करण्याकरिता विभागाकडे वेळ नाही, ही योग्य बाब नसून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात एका आठवडयामध्ये नियमाप्रमाणे बैठक घेऊन निधीचे वितरण करण्यासंबंधीचा विभागाचा निर्णय किंवा सूचना लवकरात लवकर कळविण्यात यावी. तसेच, हे सर्व जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सक्तीचे करणे आवश्यक आहे. या संदर्भात मूळ प्रश्न हा केवळ निधीचा नसून निगेटिव्ह बॅलन्स किंवा कन्सोलिडेटेड फंडमधून देखील याकरिता पैसे घेता येऊ शकतात. समाजातील शोषित घटकांना न्याय मिळण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी प्राधान्य दिले गेले पाहिजे. यानंतर या संदर्भात असा विलंब होता कामा नये असे समितीने मत व्यक्त केले.

१.२५३ यासंबंधीच्या सूचना जिल्हा पातळीवर देण्यात येतील. मनोर्धेय योजने अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या संदर्भातील तीन वर्षांची आकडेवारी समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. त्याअनुषंगाने आकडेवारीची माहिती विभागाकडून प्राप्त झाली असून (विवरण क्र.५) मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

" बालगृहाच्या निरीक्षणावरील त्रैमासिक अहवाल सादर न करणे "

१.२५४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक जाणून घेण्याकरिता समितीने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, स्टेट ॲडव्हाझरी बोर्डला राष्ट्रीय सल्लागार मंडळाकडून जे रिपोर्ट आले ते सादर केले किंवा नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता १६७ रिपोर्ट सादर केले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

हे अहवाल केव्हा मिळाले, ते आपण केव्हा सादर केले, ते अहवाल किती दिवसात देण्याचे बंधन आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सन २००९ ते २०१४ या कालावधीतील अहवाल असून यामध्ये मुद्दा असा आहे की, उपायुक्त पद रिक्त असल्यामुळे तपासण्या कमी झाल्या होत्या, कलम ३५ नुसार जिल्हा सल्लागार मंडळ गठीत केलेले आहे, जिल्हा सल्लागार मंडळाने जिल्ह्यातील संस्थांना भेटी देऊन अहवाल

आयुक्तांना सादर केले होते. सदरचे १६७ अहवाल आयुक्त कार्यालयाचे पत्र क्रमांक-१२२३, दिनांक २ मार्च २०१६ अन्वये शासनास सादर केले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२५५ काही जिल्ह्यांमध्ये जिल्हा सल्लागार मंडळाच्या बैठकाच होत नाहीत, गडचिरोली जिल्ह्यात फक्त १३ टक्के बैठका झाल्या आहेत असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

१.२५६ जिल्हा सल्लागार मंडळात सर्व सदस्य नॉन ऑफिशिअल असतात यामध्ये जिल्हा महिला बाल विकास अधिकारी आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.२५७ विभाग जे करणार ते बरोबर आहे परंतु जी कामे झाली नाहीत त्याबाबत जबाबदारी निश्चित करावयाची आहे. हा अहवाल महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राज्य शासनाला कधी पाठविला आहे याबाबत समितीने विचारणा केली असता हा अहवाल २ मार्च २०१६ रोजी पाठविण्यात आला असून सदर अहवाल सन २००९ ते २०१४ या दरम्यानचे आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.२५८ त्रैमासिक अहवाल पाठविले पाहिजेत, पाच वर्षानी ही कार्यवाही झाली असून २०१४ पर्यंतचे अहवाल पाठविण्यात आले आहेत, त्यामुळे पुढील सन २०१४ ते २०१६ पर्यंतचे अहवाल केव्हा पाठविण्यात येणार आहेत या समितीच्या प्रश्नाला सन २०१५ मध्ये नवीन कायदा झाला आहे, त्याचे नियम तयार करून जी कार्यपद्धती निश्चित होईल त्यानुसार पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. जानेवारी पासून तो कायदा लागू होणार आहे. त्यांचे नियम तयार करण्याचे काम अद्याप पूर्ण झाले नाही. नियम पूर्ण झाल्यावर जी कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल त्या कार्यपद्धतीनुसार येथून पुढे कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.२५९ मार्च २०१६ पर्यंतचे अहवाल विभाग केव्हा सादर करणार आहे ? सन २०१६ पर्यंतचे अहवाल संबंधित विभागांना दिले आहेत काय ? यासंदर्भात उत्तर देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, अहवाल सादर केले असून त्यासंदर्भातील बैठक मंत्रालय पातळीवर घ्यावी लागणार आहे. तसेच १६७ अहवाल दिले असून २०१४ पर्यंतचे म्हटले आहेत. पुढील अहवालाच्या संदर्भात बैठक घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीस अवगत केले.

१.२६० निष्कर्ष व शिफारशी :-

महालेखापरिक्षकांच्या अहवालातील शिफारशीनुसार शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी असे समितीने सांगितले असता बाल कल्याण आणि संरक्षणाच्या संदर्भामध्ये आराखडा तयार करणे यामध्ये सर्व राज्यातील बाल संरक्षणाचे आराखडे तयार केलेले आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींनी कुपोषणाबाबत असा खुलासा केला की, महाराष्ट्रामध्ये एकूण ९१ हजार बालके कुपोषित बाधितमध्ये येतात. यापैकी १.३ टक्के मुले अति तीव्र कुपाषितमध्ये आहेत आणि ३ टक्के मुले मध्यम कुपोषणाच्या श्रेणीमध्ये येतात. यामध्ये नंदूरबार, मेळघाट आणि पालघरच्या काही भागांकडे विशेष लक्ष देण्याबाबत सूचना करण्यात आली होती. माननीय मंत्री महोदयांकडे न्युट्रिशन पॉलिसी सादर केलेली असुन आतापर्यंत आयसीडीएसमध्ये एसयूडब्ल्यू आणि एमयूडब्ल्यू म्हणजे अती तीव्र कुपोषित आणि मध्यम कुपोषित याबाबत चर्चा करीत होतो. आरोग्य विभागाकडे सॅम आणि मॅम याच्या मागे जी संकल्पना आहे तीचा अवलंब केलेला आहे. यामध्ये नुसते वजन नसून उंची, वजन आणि वय या निकषामध्ये कुपोषण ठरविणार आहोत. यामध्ये नुसते कुपोषण, स्टंटिंग आणि वेस्टिंग हे तिन्ही त्यामध्ये ॲड होणार आहेत. यासाठी विशेष व्ही.सी.डी.सी. च्या माध्यमातून ॲडॉप्ट करण्यात येणार आहे. आयसीडीएस स्वत:च्या निधीतून व्हीसी संपूर्ण महाराष्ट्रात सुरू करीत आहे आणि त्यात सॅम आणि मॅम या मुलांना विशेष आहार देण्यात येणार आहे. म्हणजे अंगणवाडीमधील मुलांना जो आहार दिला जात आहे तो आहार आणि त्याशिवाय END (Energy Dence Nutritional Food) या नावाचा एक प्रकार सुरू करीत आहोत. मेडीकल सुपरविजन अंतर्गत जे नॉन मेडिकल कुपोषित मुले आहेत त्यांच्यावर हा उपचार पद्धतीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. Now, it is for consideration of Honble Minister. सबला योजनेबाबत विषय होता की, काही मुलींना त्याचा फायदा मिळालेला नाही. दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी टीएचआर चा टेंडर काढला त्यामध्ये विशेष रेसिपीज आणि विशेष कॉन्टीटी आहे. कारण मागच्या टेंडरमध्ये जो आहार होता ६ महिन्यांच्या बालकांपासून ते ॲडॉल्सेंट मुले आणि मुलींना एकाच प्रकारची दोन रेसिपी केली होती. या टीएचआरच्या टेंडरमध्ये इनफंट फुड ६ महिन्यांच्या मुलांपासून २ वर्षांपर्यंत आणि त्यानंतर चिल्ड्रन फुड २ ते ३ वर्षांपर्यंत आणि त्यानंतर ॲडल्ट फुड जे गरोदर महिलांना देण्यात येते आणि सबलामध्ये ॲडोलसंट गर्ल्स आहे त्यामध्ये वेगवेगळे सेक्शनस करून त्याची क्वांटीटी, न्युट्रीशन व्हॅल्यू आणि त्याचे रिसिपीज वेगवेगळे केलेले आहेत. सचिवांसोबत चचा करून आम्ही असे ठरविलेले आहे की, We are going in for pre-mix products and basket of foods for supplementary hot meal.

१.२६१ या अनुषंगाने महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी असे विदित केले की, हॉट मिलमध्ये जी प्रक्रिया करण्यात येते ती थोडीसी किचकट आहे काही मटेरियल लोकल स्तरावर विकत घ्यायला लावतो. त्यामुळे प्रत्येक मटेरियल मिल तयार करत असताना उपलब्ध असतो असे नाही तर काही मिसिंग लिंक असतो. आज सर्व मिक्स रेडी टू कुक मिळतात त्यामध्ये फक्त उकळते पाणी टाकले तर पाच मिनिटात

फूड तयार होते यामध्ये आपण व्हेरायटीकरू शकतो यामध्ये मायक्रोन्युट्रीयंटस्, भाजीपाला टाकलेला आहे. याच्या जवळपास ३० ते ४० रेसिपीज तयार केलेल्या असुन यात मुख्य उद्देश असा आहे की, सप्लीमेंटरी न्युट्रीशन हॉट मिलमुळे कुपोषण कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मदत होईल अशी विभागाची अपेक्षा आहे. नंदूरबारमध्ये आरयूटीएफचे एक पायलट प्रकल्प घेतलेले असुन टाटा ट्रस्टने त्याठिकाणी पायलट घेतलेले आहे. त्याला रॅम्पअप करून सर्वसाधारणपणे संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येणार आहे. यामध्ये जी अति कुपोषित मुले आहेत त्यांना साधारणपणे ६० ते ७० दिवस एनर्जी फूड दिले जाते हे थोडे महाग आहे. यासाठी साधारणपणे २० ते ३० रूपये लागतात पण याचा रिझल्ट चांगला असल्याने ७० ते ८० टक्के मुले सर्वसाधारण कॅटॅगरीमध्ये येतात. याच्या सक्सेसच्या आधारावर युनिसेफने सुद्धा मागणी केलेली आहे. याबाबत स्कीम तयार करण्यात येत असून याची परवानगी घेण्यासाठी केंद्र सरकारकडे मागणी केलेली आहे. यानंतर मोठ्या प्रमाणावर सीएसआरमध्ये काही जिल्ह्यात ३६५ दिवस मुलांना ताजी फळे आणि भाजी मिळावी यासाठी घरामागील अंगणात भाजीचे मळे आणि कुक्कुट पालन संकल्पना सुद्धा राबविलेली आहे. यामध्ये दोन पातळीवर कार्यवाही अपेक्षित आहे की, Universally double fortification of salt and fortification of Aata. याबाबत हेल्थ डिपार्टमेंटला सूचना देण्यात आलेल्या आहेत की, त्यांनी सदरचा प्रस्ताव हा लेजिसलेटीव्ह मेझर साठी सादर करावा. महिला व बाल विकास अंतर्गत जो काही कार्यक्रम आहे यात जर डबल फोर्टी फाईड सॉल्टचा वापर केला आणि त्यामध्ये आयर्न चे फोर्टीफिकेशन झाले तर आज मुलांमध्ये आणि गरोदर बायकांमध्ये आयर्न डिफिसिन्सीचा प्रॉब्लेम दुर करणे शक्य होईल.

१.२६२ यावर वित्त विभागाच्या सचिवांनी अशी विचारणा केली की, रेडी टू मिक्स आहार द्यायची योजना सुरू झाली असल्याचे विभागाने सांगितले. जर रेडी टू मिक्स ची अंमलबजावणी केली तर किमतीचे सध्याचे मानांक आहे त्याच्या तुलनेत किती फरक पडेल ? या प्रश्नाला उत्तर देताना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींनी यात अजिबात फरक पडणार नाही आज ६ रुपये प्रत्येक मुलामागे रेट आहे त्याच रेटने देणार असल्याचा खुलासा केला.

१.२६३ मुलाला पोषक आहार देण्यासाठी अशी समज आहे की, प्रत्येक क्षेत्रामध्ये जे न्युट्रिशिअल फूड उपलब्ध असतात जसे आदिवासी भागामध्ये नाचणी असते, वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे मानक असतात. एकच रेसिपी स्टँडजाराईज करून जिल्ह्यामध्ये पुरवठा केला तर आपण त्यामधील काही पोषक घटक नष्ट होऊ शकतात. याबाबत वित्त विभागाच्या सचिवांनी विचारणा केली असता महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी असे विदित केले की, यामध्ये दोन गोष्टी आहेत एक म्हणजे सप्लीमेंटरी न्युट्रिशन प्रोग्राम आणि दुसरे न्युट्रिशन एज्युकेशन आहे. आपण सप्लीमेंटरी न्युट्रिशन प्रोग्राम म्हणून ६ रुपयामध्ये डील करीत आहोत. यामध्ये १३० ग्रॅमचे भोजन मुलांना देण्यात येते. यात ब्रेकफास्ट आणि लंच असे दोन भाग केलेले आहेत. यामध्ये तांदूळ आणि गहू फेअर प्राईज शॉपच्या माध्यमातून मिळतो. Therefore whatever is to be given to the child is basically rice based and wheat based. यामध्ये फिडबॅक घेतल्यानंतर ४० रेसिपी तयार केलेल्या असुन. यामध्ये लोकल रेसिपीजचा सुद्धा समावेश केलेला आहे. न्युट्रिशन एज्युकेशनमध्ये लोकल मटेरिअल उपलब्ध आहे. बाजरी आणि नाचणीचा वापर करून आणखी काय तयार करता येईल यासाठीही प्रयत्न चालू आहेत. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात न्युट्रिशियन्सचे नियोजन करीत आहोत. सध्या केंद्र शासनाकडून गहू आणि तांदूळ मिळत असल्याने यामध्येच सर्व रेसिपी राईस आणि व्हिट बेसच कराव्या लागतात. यामध्ये विविधता आणण्यासाठी सर्वसाधारणपणे ४० रेसिपी तयार केलेल्या आहेत. आम्ही असे सॉप्टवेअर तयार करीत आहोत की, प्रत्येक महिन्यात अभिप्राय घेणार आहोत. ज्या ४० रेसिपी तयार केलेल्या आहेत त्याची टेस्ट घेणार आहोत. एक महिन्यात टेंडर काढण्यापूर्वी लाभार्थ्यांचा काय अभिप्राय आहे त्याची पाहणी करणार आहोत. जर २० गोष्टींबद्दल जास्त मागणी असेल तर आम्ही या २० गोष्टीच पुरविणार आहोत. नंदुरबारमध्ये जर १० गोष्टींबद्दलच मुलांना आवड असेल तर १० गोष्टीच पुरविणार आहोत. अशाप्रकारच्या लवचिकता यामध्ये प्रदान केलेल्या आहेत.

१.२६४ मनोधैर्य योजनेसाठी पर्याप्त प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करणे गरजेचे आहे असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले आहे. मनोधैर्य योजनेमधून बलात्कार, लैंगिक अत्याचार अशाप्रकारच्या पिडीत लोकांना निधीच्या कमतरतेमुळे अर्थसहाय्य देता येत नाही. पिडीतांच्या पुनर्वसनासाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रतिकूल परिणाम होतो आणि झालेला आहे याबद्दल विभागाने माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता प्रत्येक वर्षी मागणी होती त्याच्या पेक्षा कमी निधी मिळालेला आहे. मनोधैर्य योजनेबाबत केंद्र शासनाचे काही निकष आहेत आणि विभागाने जी योजना तयार केली त्याचेही काही निकष आहेत. साधारणपणे ही योजना २-३ वर्षे राबविल्यानंतर अभिप्राय आलेला होता यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे ही सुधारणा करण्यासाठी एक प्रस्ताव तयार केलेला असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी दिली.

१.२६५ महालेखाकारांनी जो रिमार्क दिलेला आहे की, जे काही पिडीत लोक आहेत त्यांना पुनर्वसन असो किंवा मदतीचा लाभ मिळत नाही याला सुद्धा प्राधान्य देण्यात यावे. निधी कमी मिळाला तर सरकारकडे पुन्हा मागणी करण्यात यावी असे समितीने सांगितले असता विभागामार्फत पुरवणी मागणी करणार आहोत आणि या आधीसुद्धा मागणी केलेली आहे. मनोधैर्य योजनेमध्ये काही सुधारणा करण्याची गरज आहे. आज अशी परिस्थिती आहे की, त्यांना पैसा दिला पाहिजे यामध्ये सुधारणा करण्याची गरज असुन तसे प्रस्तावित केलेले आहे. पुरवणी मागणीतुन अतिरिक्त निधी मिळत राहावा यासाठी विभाग प्रयत्न करीत राहणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अभिप्राय व शिफारशी

१.२६६ महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग :—

विविध कायद्यांतर्गत बालकांना मिळणाऱ्या हक्काचे संरक्षण व त्यासंबंधी तपासणी करण्याकरिता तसेच त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारस करणे, बालसंरक्षणाचे उल्लंघन होत असल्यास त्याची चौकशी करणे व कायदेशीर कारवाईकरिता शिफारस करणे यासाठी M.S.C.P.C.R. ची स्थापना जुलै, २००७ मध्ये झाली. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासनाने केवळ डिसेंबर, २००८ व जानेवारी, २००९ मध्ये ३ वर्षासाठी अनुक्रमे अध्यक्ष व सहा सदस्य यांना नामनिर्देशित केले. तीन सत्रांच्या अखेरीस डिसेंबर, २०११ मध्ये प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांना आयोगाच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त भार देण्यात आला होता. परंतु एकाही नवीन सदस्यास नामनिर्देशित करण्यात आले नव्हते. राज्य शासनाने गठीत करावयाच्या त्रीसदस्यीय निवड समितीद्वारे M.S.C.P.C.R. च्या अध्यक्षांची निवड करणे आवश्यक होते. तथापि, सदर पद्धत अवलंबिण्यात आली नाही, ज्यांच्याकडे पालकांच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी होती तेच प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कायद्याचे संनियंत्रण करणे, कायद्यांतर्गत आदेश जारी करणे किंवा शिफारस करणे. या त्यांच्या भुमिकेला न्याय देऊ शकले नसते. त्यामुळे प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक करणे नियमानुसार नव्हते. तसेच आयोग गठीत झाल्यापासून नोव्हेंबर, २०१४ पर्यंत विधी सल्लागारांची सेवा पुरविण्यात आली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले आहेत. यासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २०१२ मध्ये त्रिसदस्यीय समितीने मुलाखती घेतल्या होत्या. परंतु त्यावेळी नेमणूक देण्याबाबत कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत व सदर नियुक्ती संदर्भात पुन्हा जाहिरात देण्याविषयी आदेश प्राप्त झाल्यामुळे पुन्हा नव्याने जाहिरात देण्यात आल्या होत्या. सद्य:स्थितीत विभागाकडे अर्ज प्राप्त झालेले आहे. अर्ज छाननीची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर मा.मंत्री तथा अध्यक्ष यांना संपूर्ण माहिती देण्यात येईल व पुढील कार्यवाही करण्यात येईल. कायदा सल्लागाराची गेल्या ७ वर्षांपासून नियुक्ती न करण्याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, मा.न्यायालयाने २ ते ३ अधिकाऱ्यांची नावे सुचविली होती. परंतु संबंधित अधिकारी काम करण्यास इच्छुक नव्हते. तसेच विधी अधिकारी हे अवर सचिव दर्जाचे पद होते. परंतु आयोगाने ही पोस्ट upgrade करून District Judge दर्जाचे अधिकारी देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. यासंदर्भात विधी व न्याय विभागाच्या सचिवांनाही साक्षीस बोलविण्यात आले व त्यांची भुमिका विशद करणेबाबत सुचित केले असता विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी स्पष्ट केले की, महिला व बालविकास विभागाकडून दिनांक २८ एप्रिल २०११ रोजी विनंती करण्यात आली होती. परंतु विभागाकडे अधिकारी उपलब्ध नव्हते. तद्नंतर दिनांक १७ सप्टेंबर २०१२ रोजी विनंती करण्यात आली होती की त्या पदावर न्यायीक अधिकारी प्रतिनियुक्तीवर द्यावा. त्यानुसार उच्च न्यायालयाने दिनांक ३ नोव्हेंबर २०१२ रोजी न्यायिक अधिकारी श्री. एस.एस.अग्रवाल, अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली. परंतु श्री. अग्रवाल यांची वेतनश्रेणी उच्च असल्याने मूळ पदाचे अपग्रेडेशन करावे लागत होते. ते होऊ शकले नाही. **यासंदर्भात समितीने निर्देश दिले की, सन २०११ पासून २०१६ पर्यंत केवळ अधिकाऱ्यांची नियुक्ती न झाल्यामुळे कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी होऊ शकली नाही ही गंभीर बाब आहे. बालकांना मिळणाऱ्या हक्कांचे संरक्षण, त्यासंबंधी तपासणी व सदर कायदा अंमलबजावणीसाठी आवश्यक शिफारशी तसेच बालसंरक्षणाचे उल्लंघन होत असल्यास त्याची चौकशी व कायदेशीर कार्यवाही या बाबी गेल्या ५-६ वर्षे होऊ शकल्या नाहीत, ही बाब शासनाच्या दृष्टीने निश्चीतच भूषणावह नाही. महिला व बालविकास विभाग व विधी विभागाने सदर नेमणूकीबाबत योग्य समन्वय साधून व आवश्यक तो पाठपुरावा करून महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग गठीत करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही हे खेदाने नमूद करण्यात येत आहे. महिला व बालविकास विभाग व विधी व न्याय विभाग यांनी सदर समिती गठीत करणेबाबत आवश्यक सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची समाधानकारक माहिती वित्त विभागास सादर करून एक महिन्यात महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे परिपूर्ण गठण करून सदर आयोगाचे कामकाज परिणामकारकरित्या सुरू करण्यात यावे तसेच ज्या अधिकाऱ्यांची (कितीही वरिष्ठ अधिकारी असले तरीही) ही पदे भरण्याची व अपग्रेड करण्याची जबाबदारी होती ती पार पाडण्यास ते अपयशी ठरले आहेत अशा सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. व तसा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२६७ महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था :—

सर्व लहान मुलांपर्यंत विशेषत: हलाखीच्या परिस्थितीत मुलांपर्यंत योजनेचे फायदे पोहचावेत यासाठी केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाने सन २००९ मध्ये एकात्मिक बालविकास संरक्षण योजना (I.C.P.S.) नावाच्या एका केंद्र शासन पुरस्कृत योजनेखाली त्यांच्या विद्यमान सर्व बालसंरक्षण योजना एकत्रित केल्या. केंद्र शासनाबरोबर माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये केलेल्या MOU. नुसार राज्य शासनाने तीन महिन्यात राज्य बाल हक्क संस्था, राज्य दत्तक स्रोत संस्था (S.A.R.A.) आणि जिल्ह्यांमध्ये विशेष बाल गुन्हेगार पोलीस दल (S.T.P.U.) गठीत करावयाचे होते. तसेच ६ महिन्यात म्हणजेच फेब्रुवारी, २०११ पर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्ष (D.C.P.U.) आणि विशेष दत्तक संस्था (S.S.A.) स्थापन करावयाचे होते. तथापि, लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, राज्य जिल्हा व क्षेत्रिय पातळीवरील संस्थांची

स्थापना करण्यास विलंब झालेला होता. त्यामुळे संस्था स्थापण्याचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. यासंदर्भात लोकलेखा समितीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, गाव पातळीवर एकूण ३९,००० समित्या स्थापन करावयाच्या आहेत. यामध्ये १८,५६५ समित्या स्थापन केलेल्या आहेत. उर्वरीत ५०% पेक्षा जास्त समित्या स्थापन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. गाव पातळीवरील समित्या स्थापन केल्यानंतर प्लान्स तयार होणार आहेत. जिल्हा आणि तालुका स्तरावरील काही समित्या स्थापन झालेल्या असून सद्यःस्थितीमध्ये प्लानचे काम प्रगतीपथावर आहे. याबाबत समिती शिफारस करीत आहे की, **राज्य शासनाने केंद्र शासनासोबत केलेल्या MOU नुसार विभागाने गाव, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील उर्वरीत समित्या तातडीने गठीत कराव्यात व कायद्यातील तरतूदीनुसार अपेक्षित कार्यवाही करून राज्यातील विशेषतः हलाखीच्या परिस्थितीत मुलांपर्यंत योजनेचा लाभ पोहचवावा. सर्व स्तरावरील समिती गठीत करणेबाबतची कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करावी. तसेच राज्य शासनाने केंद्र शासनासोबत केलेल्या MOU ची अंमलबजावणी करण्याची ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती त्यांनी ती जबाबदारी पार पाडली नाही असे महत्वाचे विषय हाताळण्याबाबत अधिकारी गंभीर नाहीत याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सदर अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

बालकांचे जीवन सातत्य :-

१.२६८ जन्म घेणे व जीवंत राहणे हा प्रत्येक बालकाचा अनन्य संक्राम्य अधिकार आहे. सन २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत लेखा परीक्षकांना २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील बालकांमध्ये लिंग गुणोत्तर (C.S.R.) घट झाल्याचे आढळून आले याशिवाय राज्यातील १७% शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविला जात नव्हता, योग्य दस्तऐवज बाळगले जात नव्हते, शाळा स्तरावर संनियंत्रण केले जात नव्हते त्यामुळे समाजातील बालकांविषयी असलेल्या लिंगभेदास दूर करण्यासाठी उपाययोजनांना चालना देण्यासाठी तोडगा काढणे आवश्यक असल्याचे महालेखापालांनी आक्षेपात नमूद केले. या संदर्भात विभागीय सचिवांनी सादर केले की PCPNDT हा कायदा सन १९९४ पासून राज्यामध्ये चांगल्या पद्धतीने राबविला जात आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने २००० पेक्षा जास्त सक्षम प्राधिकाऱ्यांच्या नियुक्त्या (approproate authority) केल्या आहेत. त्यांच्यामार्फत नियमीत व त्रैमासिक सोनोग्राफी केंद्राची तपासणी केली जाते. विभागाने ५५० कोर्ट केसेस दाखल केल्या आहेत. ४८ डॉक्टरांच्या नोंदणी रद्द केलेल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्यात घ्घ्घ्क्र च्या अंमलबजावणी बद्दल चांगले अभिप्राय दिले असून अन्य राज्यांनी महाराष्ट्र प्रमाणे कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत सन २०१० मध्ये लींगोत्तर प्रमाण ८५४ एवढा होता सन २०११ मध्ये ८६१ तर सन २०१४ मध्ये ९१९ अशी वाढ लींगोत्तर प्रमाणात झाल्याचे दिसून येते. यासंदर्भात समितीमध्ये चर्चा करताना मीना राजू या योजनेच्या माध्यमेतून लिंग गुणेत्तर प्रमाणात मोठे आंदोलन केले होते. काही डॉक्टर्स, रेडिओलॉजिस्ट यांचे मशीन जप्त करण्यात आले होते तर काही डॉक्टरांचे सोनोग्राफी मशीन जप्त केले नव्हते त्यामुळे डॉक्टरांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, त्या कायद्यांच्या तांत्रिक बाबींच्या कठोर अंमलबजावणी संदर्भात शासनास कोणत्याही प्रकारच्या स्पष्ट गाईड लाइन्स प्राप्त झालेल्या नाहीत. हा कायदा मूळतः केंद्र शासनाचा असून त्यामध्ये राज्य शासनाने काही अंशी बदल केलेला आहे. यासंदर्भात समितीने सूचीत केले की मूला मुलींचे गुणोत्तर प्रमाण हा समाजातील अत्यंत गंभीर प्रश्न असून विभागाने सादर केलेल्या आकडेवाडीनुसार गुणोत्तर प्रमाणामध्ये वाढ झालेली असली तरी कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात अनेक त्रुटी आहेत. यासंदर्भात विधानसभेमध्ये चर्चा झालेली असून सन्माननीय सदस्यांनी अनेक सूचना केलेल्या आहेत. ज्यावेळी आई वडिल अशा प्रकारची सोनोग्राफी करण्याकरिता येतात त्याचवेळीस त्यांची सक्तीने लिंग चाचणी करून सदरहू जोडपे पूढील चाचणीकरीता येतील त्याबाबत स्थानिक क्षेत्रातून मागोवा ठेवणे, एखाद्या जोडप्यांच्या तपासणीमध्ये मुलगी असल्याचे कळल्यानंतर तपासणीकरीता येणे बंद झाल्यास सदर जोडप्यांच्या घरी जाऊन मागोवा घेणे आवश्यक आहे. **सदर कायद्यानुसार केवळ डॉक्टरांवर कारवाईची तरतूद असल्याने आई वडीलांवर धाक ठेवण्यात आलेला नाही. परंतू मुलींचा रेशो वाढविण्याकरीता आई वडिलांकरिताही कायद्याचा धाक निर्माण करणे आवश्यक आहे. डॉक्टर, आईवडिल व जिल्हा आरोग्य अधिकारी (DHO) तसेच NGO यांना सोनोग्राफी ट्रॅक प्रक्रियेमध्ये सहभागी केले तर कायद्याचा धाक बसेल अशा आशयाचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला तर स्त्रीभूण हत्या कमी होण्यास मदत होईल. अशी समितीची शिफारस आहे. विभागाने या संदर्भात योग्य व व्यावहारिक प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२६९ लैगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ ची अंमलबजावणी :-

केंद्र शासनाने लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण व अश्लिल वर्तन यापासून १८ वर्षाखालील बालकांचे रक्षण करण्यासाठी तसेच अशा गुन्ह्यासंबंधी आणि गुन्ह्याशी निगडीत बाबींवर सुनावणी होण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ (POCSO) जून, २०१२ मध्ये अंमलात आणला. कायद्यातील तरतूदीनुसार राज्याने प्रत्येक जिल्ह्यात विशेष न्यायालयाची स्थापना करणे व विशेष सरकारी अभियोक्ता निवडणे आवश्यक होते. राज्यात सन २०१० मध्ये बलात्काराच्या १६१० घटना घडल्या होत्या ज्यामध्ये वाढ होऊन २०१३ मध्ये ३०६३ घटनांची नोंद झाली होती. परंतू या कालावधीत नोंदी झालेल्या घटनांपैकी सिद्ध झालेल्या गुन्ह्याचे प्रमाण १३.९ ते २०.३% होते POCSO हा कायदा सन २०१२ मध्ये लागू होऊनही विशेष न्यायालयात प्रकरणांची सुनावणी होण्यासाठी सर्व

सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांना विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून घोषित करणारा आदेश शासनाने मार्च, २०१३ मध्ये निर्गमित केला. परंतु महाराष्ट्र शासनाने विशेष न्यायालयाचे कामकाज करण्यासाठी सर्व सत्र न्यायाधीश अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्या नेमणूक करण्याचे आदेश ऑगस्ट, २०१४ मध्ये निर्गमित केल्यामुळे सदर कायद्याच्या अंमलबजावणी करीता लक्षणीय विलंब झाला होता. तसेच लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, POCSO अंतर्गत नोंदविलेल्या प्रकरणांचा जिल्हानिहाय तपशील नोव्हेंबर, २०१४ पर्यंत DGPO नी एकत्र करून सादर केले नव्हते. तसेच नोव्हेंबर, २०१४ पर्यंत महाराष्ट्र शासनाने बालकाला साक्षीपूर्व व साक्षीच्या टप्प्यावर सहाय्य करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली नव्हती असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सद्यःस्थितीत POCSO कायद्याचे कलम ३९ अन्वये आवश्यक गाइड लाइन्सचे नोटीफिकेशन निर्गमित करण्यात आले आहे. सर्व ३५ जिल्ह्यात प्रशिक्षण देण्यासाठी ३५ ट्रेनरची नेमणूक करण्यात आली आहे. POCSO कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या प्रकरणांचा जिल्हानिहाय तपशील क्रक्रप्र ने सादर केलेला आहे. याशिवाय मा.उच्च न्यायालयाकडूनही माहिती कमिशनला प्राप्त होत आहे. महाराष्ट्र शासनाने कमीशनच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली असून समितीने तयार केलेल्या गाईडलाइन्सच्या मसूद्यास शासनाने मान्यता दिलेली आहे व त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे. परंतू एक अडचण नेहमी येते की Child Prohibition Act मध्ये १८ वर्ष वयाखालील मुलगी व २१ वर्ष वयाखालील मूलगा असा वयोगट आहे. तर IPC चे कलम ३७५ (२) मध्ये दोघांचे लग्न झाले असेल आणि पत्नीचे वय १५ वर्षा पेक्षा कमी नसेल तर ते aggrivated sexual agort किंवा बलात्काराच्या व्याख्येमध्ये येत नाही. लग्न झाल्याचे प्रमाण दाखवण्यासाठी पंडीतचे प्रमाणपत्र किंवा लग्नाचे फोटो किंवा मुस्लीम धर्मातील जातींचे प्रमाणपत्र आहे असा पूरावा सादर करतात. मूस्लीम धर्मामध्ये शरयत कायदा लागू होत असल्याने वयाची अट १५ वर्ष आहे तर POCSO कायद्यामध्ये १८ वयाची अट आहे. याशिवाय जुवेनाइल कायद्यामध्ये १६ वर्ष वयाची अट आहे. अशा अडचणीमुळे Conviction rate कमी आहे. अशा प्रकरणांच्या सूनावणीसाठी स्वतंत्र न्यायालय असणे आवश्यक असताना सर्व जिल्ह्यामध्ये अशी व्यवस्था नाही. ज्या जिल्ह्यामध्ये केसेस कमी आहेत त्या जिल्ह्यामध्ये स्वतंत्र न्यायाधीश दिला जात नाही. Translator चे पॅनेल नसल्यामुळे भाषेची अडचण येते. याशिवाय या कायद्याखाली रजिस्टर झालेल्या केसेसची एकत्रित माहिती स्पेशल IG कडून विलंबाने मिळते. या संदर्भात प्रधान सचिव, गृह विभाग यांना विचारणा केली असता माहिती देण्यामध्ये कोणतीही अडचण नाही असे स्पष्ट केले. याबाबत समितीने निर्देश दिले की, महालेखापाल यांनी नमूद केलेला आक्षेप व महिला व बालकल्याण विभागाने सादर केलेला खुलासा विचारात घेता IG पोलीस यांच्याकडून माहिती नियमित दिल्या जात नाहीत ही बाब स्पष्ट होते. ज्यांच्या दुर्लक्षामुळे माहिती देण्यात आली नाही त्यांच्यावर जबाबदारी निश्चीत करून एक महिन्याच्या आत कारवाई करावी असे निर्देश समितीने बैठकीदरम्यान दिले होते. त्यास प्रधान सचिव, गृह विभाग यांनी कारवाईबाबत समितीस आश्वासीत केले. तथापी, अद्यापही केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर केलेला नाही. **विभागाने संबंधितांवर तातडीने कार्यवाही करावी तसेच समितीने निर्देश देऊनही व प्रधान सचिवांनी आश्वासीत करूनही कारवाईचा अहवाल अद्याप सादर न करण्याच्या विलंबास, जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करून तसा अहवाल १ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच ज्या जिल्ह्यामध्ये स्वतंत्र न्यायालय नाहीत त्या सर्व जिल्ह्याचा पुनश्च आढावा घ्यावा व आवश्यक त्या ठिकाणी न्यायालय स्थापित करावे व कार्यरत सर्व न्यायालयात न्यायाधिश व Translater च्या पॅनलची नेमणूक करावी अशी समितीची शिफारस आहे. समितीने केलेल्या उपरोक्त शिफारशीनुसार कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा.**

१.२७० बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६ ची अंमलबजावणी :-

विधीपूर्वक बालविवाह करण्यावर आणि त्याच्याशी निगडीत किंवा परिणामस्वरुप घडणाऱ्या घडामोडीवर प्रतिबंध घालण्यासाठी केंद्र शासनाने बाल विवाह प्रतिबंधक कायदा, २००६ अंमलात आणला. कायद्याच्या कलम १६ नुसार महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी एक किंवा अधिक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी (CMPOS) नेमावयाचे होते. ज्यांनी बालविवाह रोखणे, जनजागृती करणे, समुपदेशन करणे, सल्ला देणे, लोकांना सचेत करणे, खटल्यासंबंधी मदत करणे आणि राज्य शासनाने निर्देशित केलेली नियतकालीक विवरणे व आकडेवारी सादर करणे इत्यादी कामे करावयाची होती. तथापि, विभागाने सदर कायद्याअंतर्गत आवश्यक नियम सप्टेंबर, २००८ मध्ये विलंबाने अधिसूचीत करणे, ग्रामीण भागाकरिता CMPOS च्या नियुक्तीसाठी ६ वर्षापेक्षा जास्त विलंब लावला, जून, २०१३ मध्ये अधिसूचना जारी केली. राज्यातील लोकसंख्येच्या ४५.२० टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करीत असताना नोव्हेंबर, २०१४ पर्यंत शहरी भागांसाठी एकही CMPOS ची नेमणूक करण्यात आली नव्हती. कायद्यातील कलम १६ अन्वये CMPOS ना पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार देण्याची अधिसूचनाही सप्टेंबर, २०१४ पर्यंत निर्गमित करण्यात आली नव्हती. महिला व बालकल्याण विभागाने CMPOS करीता नियतकालीक अहवाल किंवा विवरणे विहित केलेली नसल्याने कायद्याच्या तरतूदीप्रमाणे नियतकालीक व विवरणे सादर केली जात नव्हती असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला. यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस सादर केले की, ग्रामीण भागामध्ये ग्रामसेवकास बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले असून नागरी भागामध्ये बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी घोषित करण्यासंबंधी प्रस्तावीत आहेत. अद्याप अधिसूचना निर्गमित केलेली नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त करताना स्पष्ट केले की, सन २००७-०८ मध्ये कायद्याच्या अंमलबजावणीकरिता सन २०१६ पर्यंत

अधिसूचना न काढणे ही बाब भूषणावह नाही. विभागाने याकडे त्वरीत लक्ष दिले असते तर महालेखापालांनी आक्षेप नोंदविला नसता. शहरी भागातील झोपड्यांमध्ये ग्रामीण भागातून आलेले लोक असतात व त्यांच्यामध्ये अंधश्रद्धेपोटी वाद-विवाद होतात. **बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी घोषित करणे आवश्यक आहे. विभागाने यासंदर्भात १५ दिवसात कार्यवाही करावी व तसेच ज्या अधिकाऱ्यांनी या कामी दिरंगाई केली त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे निर्देश समितीने साक्षीदरम्यान दिले होते. तथापि, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्यापही अप्राप्त आहे. विभागाने अधिसूचना निर्गमित केल्याबाबत व कार्यवाही अहवालाच्या दिरंगाईस जबाबदार अधिकाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

महिला व बालकल्याण विभागाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार बालविवाहाची संख्या केवळ ४५ एवढी असून ARSH (किशोरवयीन प्रजनन व लैगिंक आरोग्य) या केंद्र शासनाच्या कार्यक्रमाअंतर्गत झालेल्या नोंदीनुसार १५ ते १९ वयोगटातील अनुक्रमे ११३८९ व ११८३९ मूली विवाहीत होत्या. परंतु विभागाने सन २०१० ते २०१३ दरम्यान बाल विवाहाची केवळ ४५ प्रकरणे घडल्याचा अहवाल दिला आहे. याबाबतही समितीने खेदाने नमूद केले की, दोन विभागाच्या आकडेवारीत फार मोठी तफावत असून विभागाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. विशिष्ट समाजात बालविवाह परंपरा आहे. अशा परंपरा थांबविणे आवश्यक आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या समाजाचे मत परिवर्तन करणे अत्यंत गरजेचे आहे. यासंदर्भात महिला व बालविकास विभाग नोडल विभाग आहेत. ज्या NGO चे याबाबत स्पेशलायझेशन आहे त्यांचा वापर करून त्यांचे मत परिवर्तन करण्यात यावे किंवा समाजातील काही व्यक्तींची मदत देता येईल, बेटी बचाओ, बेटी पढाओ अशा योजना प्रभावीपणे राबवून मुलींना परिपूर्ण शिक्षण दिल्यास बालविवाहाची परंपरा थांबविण्यास मदत होईल. **मुलींना शिक्षणाच्या पुरेशा सोई उपलब्ध झाल्यासही बालविवाह थांबविता येईल याकरिता महिला व बालकल्याण विभागामार्फत शिक्षण विभागासही कळविले पाहिजे. विभागाने बालविवाह थांबविण्यासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रमसुद्धा विशिष्ट समाजाकरिता राबविणे आवश्यक आहे. असे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक निधीकरीता वित्त व नियोजन विभागाशी समन्वय साधून योजना राबविण्याबाबतच्या उपाययोजना कराव्यात व उपरोक्त सर्व शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

अनैतिक तस्करी (प्रतिबंध) कायदा, १९५६ ची अंमलबजावणी :-

१.२७१ अनैतिक तस्करी (प्रतिबंध) कायदा, १९५६ (ITPA) हा बालिकांसह महिलांच्या बाबतीत घडणाऱ्या अघोरी गुन्ह्यांशी संबधित आहे. ज्यामुळे महिलांचे जीवन उध्वस्त होते त्यामुळे त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येते आणि सामाजिक प्रतिष्ठा नष्ट होते. महाराष्ट्रात व्यापारी प्रेरणांसाठी १३ ते १८ वर्षे वयोगटातील महिला व मुलांची लैगिंक शोषणासाठी आंतरजिल्हा, आंतरराज्य आणि देशाबाहेर तस्करी होत असल्याचे दिसून येते. ITPA अंतर्गत नोंद झालेल्या गुन्ह्यांपैकी सिद्ध झालेल्या गुन्ह्यांची राष्ट्रीय सरासरीशी तुलना करता राज्याची सरासरी खूपच कमी आहे. यासंदर्भात गृह विभागाच्या सचिवांनी साक्षीमध्ये सादर केले की, केंद्र शासनाकडून राज्यातील १२ युनिटकरिता केवळ २ लाख १० हजार एवढे सहाय्य केवळ सन २०१२-१३ पर्यंत प्राप्त झाले. त्यानंतर निधी प्राप्त झाला नाही. **केंद्र व राज्य शासनाकडून आर्थिक तरतूद प्राप्त झाल्यास हे काम उत्तमपणे करता येईल. प्रति युनिट ३ ते ४ लक्ष याप्रमाणे वार्षिक अंदाजे ४८ लाखांची तरतूद आवश्यक आहे. यासंदर्भात समितीने निर्देश दिले की, गृह विभागाने रु. ५० लक्ष एवढ्या रकमेची मागणी सविस्तर तपशीलासह वित्त विभागाकडे करावी. त्याकरिता आवश्यक पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून घ्यावा. तसेच वित्त विभागाने देखील हा निधी विषयाचे गांभिर्य लक्षात घेता तातडीने उपलब्ध करून द्यावा व योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी अशी समितीची शिफारस आहे.**

यापूर्वीच्या लोकलेखा समितीने (बारावी विधानसभा) दिनांक ६ नोव्हेंबर २०१२ रोजी अन्य परिच्छेदासंदर्भात देवनार महिला सुधारगृहाला भेट दिली असता असे निदर्शनास आले की, एक रुममध्ये २० ते २५ महिलांना ठेवण्यात आले होते. त्यांची राहण्याची व्यवस्था योग्य नव्हती, कुंटण खाण्यात धाड टाकून पोलिसांनी महिला पकडल्या. **त्यापैकी एखाद्या महिलेला जबरदस्तीने या व्यवसायाकडे वळविले असेल तर त्याच्यामध्ये मत परिवर्तन घडविणे सहज शक्य असते. विभागाने त्यांचे मत परिवर्तन करणेबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदर महिलांचे Councilling करून त्यांना व्यवसायीक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी. केंद्र शासनाच्या अस्तित्वात असलेल्या योजनांचा अशा प्रकारच्या महिलांसाठी प्रभावीपणे वापर करावा. महिलांसाठी असलेल्या rehabilitation center ची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. महिलांच्या यशोगाथांचे सादरीकरण करणे आवश्यक आहे. ज्या महिलांची मानवी तस्करी विरोधी कक्षाच्या धाडीमध्ये पकडल्या नंतर सुटका करण्यात आली अशा महिलांकडे लक्ष न दिल्यामुळे त्याच महिला पुन:श्च अशा व्यवसायांकडे वळू शकतात, ही बाब टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. विभागाने उपरोक्त सर्व शिफारशींबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२७५ बालमजूरी (प्रतिबंध व नियमन) कायदा, १९८६ ची अंमलबजावणी :—

सदर परिच्छेदाबाबत कामगार विभागाच्या सचिवांनी सादर केलेल्या माहितीनंतर समितीने सूचीत केले की, बाल कामगारांच्या सूटकेपेक्षा त्यांच्या पुनर्वसनावर विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे. बाल कामगारांना कामावरुन काढून टाकल्यामुळे बेकारीच नव्हेतर गुन्हेगारी देखील वाढते. यास्तव ज्या कामांमुळे मुलांच्या शरीरावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही किंवा केमीकलचा दुष्परिणाम

होत नाही अशा प्रकारचे व्यवसाय धोकादायक ठरविताना त्याबाबत पुनर्विचार करणे आवश्यक आहे. बाल कामगारांनी दारूच्या दुकानात किंवा फटाक्याच्या फॅक्टरीत काम करणे निश्चित धोकादायक आहे. परंतु हॉटेलसारख्या अन्य काही व्यवसायात काम करणे धोकादायक नाही. बालकांकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्यामुळे ते अशाप्रकारची कामे करतात व काम करीत असल्यामुळे त्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. अशा परिस्थितीत शिक्षण सोबतच अशा बालकांना उदरनिर्वाहाचे थोडेफार साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विभागाने केंद्र शासनाशी विचार विनिमय करून धोकादायक व्यवसायाच्या व्याख्येत बदल करता येईल काय याबाबत तांत्रिक बाब तपासून केंद्र शासनास योग्य तो प्रस्ताव सादर करावा अशी समितीची शिफारस आहे. बाल कामागारांच्या समस्येसंदर्भात कामगार आयुक्तांकडून ठोस उपाययोजना केली जात नाही. प्रत्येक गोष्ट जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविली जाते. एकीकडे १४ वर्षांखालील मुलांनी काम करू नये असे सांगितले जाते तर दुसरीकडे रस्त्याच्या बाजूला सिग्नलला लहान मुलांकडून भीक मागविली जाते. परराज्यातून आणलेली मुले भीक मागतात त्याची तपासणी केली जात नाही. लहान मुलांना भीक मागण्यासाठी भुकेली ठेवली जाते, त्यांचे हात पाय तोडून जबरदस्तीने भीक मागविली जाते, लहान मुलांना भीक मागायला लावणाऱ्या अनेक टोळ्या आहेत. लहान मुलांना अफु घातली जाते. अशा सर्व गैरप्रकाराबाबत विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही. शासनाने यासंदर्भात ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. याशिवाय माहे डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार बाल कामगारांची शाळेच्या मुख्य प्रवाहात नाव नोंदणी होईपर्यंत पाठपुरावा करण्याची जबाबदारी कामगार आयुक्तांची आहे. एकंदरीत बाल मजुरीसंबंधीच्या कायद्याची अंमलबजावणीची जबाबदारी कामगार आयुक्तांनी पार पाडणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने नियम व अधिनियमातील तरतुदीनुसार तंतोतंत व परिणामकारक अंमलबजावणी संदर्भात आवश्यक त्या सूचना कामगार आयुक्तांना द्याव्यात व त्याचा त्रैमासिक आढावा शासन स्तरावरून घेण्यात यावा व समितीच्या उपरोक्त शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.२७३ एकात्मिक बालविकास सेवा योजनेची अंमलबजावणी :-

एकात्मिक बालविकास सेवा योजना ही महिला व बालविकास विभागाकडून ०-६ वर्ष वयोगटातील मुलांचे पोषण आणि आरोग्य सुधारणा, मृत्यू दर, अनारोग्य, कुपोषण आणि शाळामधील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी अंमलबजावणी करीत असलेली एक वैशिष्ट्यपूर्ण योजना आहे. ICDS ची उद्दीष्टे, पूरक पोषण, लसीकरण, आरोग्य तपासणी इ. सेवा देऊन साध्य करावयाची होती. सन २००९ ते २०१४ दरम्यान राज्यात ICDS च्या अंमलबजावणीसाठी रु. २३,६३१ कोटी खर्च झाले होते. मार्च, २०१४ मध्ये सदर योजनेतील ९७,१५५ अंगणवाड्यात ८२.०१ लाख मुले होती. ज्यामध्ये ३९.१० लाख मुलींचा समावेश होता. राज्यातील कुपोषीत बालकांची आकडेवारीचे अवलोकन केले असता मध्यम/अतिकमी वजनांच्या मुलींची लक्षणीय संख्या आणि नंदुरबार जिल्ह्यातील मृत पावलेल्या सर्वाधीक मुली असल्याचे निदर्शनास येते. कार्यरत अंगणवाडी केंद्रातील सुविधांचे अवलोकन केले असता ९७,१५५ अंगणवाडी केंद्रापैकी ५१,८५३/- अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती. ८२,०५५ (८४%) अंगणवाडी केंद्रांना विजेचा पुरवठा नव्हता. तसेच मार्च, २०१४ मध्ये बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची ४५% व पर्यवेक्षकांची १३% पदे रिक्त होती. अशा बाबी लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आल्या. यासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये खुलासा करण्यात आला की, एकूण ९७,४७५ मंजूर अंगणवाड्यापैकी ९२,३५५ अंगणवाड्या कार्यरत आहेत व त्यापैकी ६८,०४९ अंगणवाड्यांमध्ये शौचालयाची सुविधा आहे. शासनाच्या स्वत:च्या मालकीच्या ६८,००० अंगणवाडी इमारती आहेत. परंतु जुन्या पॅटर्ननुसार बांधकाम झालेल्या अंगणवाडी इमारतीमध्ये प्रसाधनगृहाची व्यवस्था नाही. ज्या इमारती अंगणवाडींकरिता भाडेतत्वावर घेतलेली आहेत त्या सर्व ठिकाणी प्रसाधनगृहाची व्यवस्था नाही. याबाबत समितीने सुचित केले की, **विभागाच्या मालकीच्या ६८,००० अंगणवाड्यापैकी ज्या ठिकाणी प्रसाधनगृह नाही तेथे प्राधान्याने प्रसाधनगृहाची बांधकामे करावी त्यासाठी प्राधान्याने निधी खर्च करावा. तद्नंतरच नवीन अंगणवाडीचे बांधकाम हाती घ्यावे. प्रसाधनगृह उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी कार्यरत अंगणवाडीच्या इमारतीच्या प्रसाधनगृहासाठी व नविन अंगणवाडीच्या इमारतीकरिता आवश्यक निधीची मागणी येत्या २ महिन्यात शासनाकडे करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले होते. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा. भाड्याच्या इमारतीचे मालक प्रसाधनगृहे बांधून देत नसतील तर अशा ठिकाणी शासनाने प्रसाधनगृहाचे बांधकाम करावे त्याबाबतच्या अटी व शर्ती मालकासोबत निश्चित कराव्यात व शौचालय बांधकामापोटी शासनाने केलेला खर्च त्याच्या देय भाड्यामधून वसूल करण्यात यावा. ज्या इमारतींचे भाडे थकीत आहे त्यांचे भाडे अदा करण्यासाठी आवश्यक निधीची मागणी करावी व त्यानुसार भाडे अदायगीची कार्यवाही करण्यात यावी. याशिवाय MREGS मधून कुशल व अकुशल कामे घेतली जातात. त्यापैकी कुशल कामांमध्ये अंगणवाडी इमारत व प्रसाधनगृहाचे काम घेता येईल काय याबाबत विभागाने तपासणी करून आवश्यक कार्यवाही करावी. जेणेकरून विभागास निधीची अडचण कमी करणे शक्य होईल. कुपोषणाच्या आकडेवारीबाबत समितीने गंभीर चिंता व्यक्त करत महिला व बालविकास विभाग व आरोग्य विभागाने एकत्रित कार्यवाही करून कुपोषणाची नेमकी कारणे शोधून त्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. कुपोषित मुलांना महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून पोषणमूल्य व प्रोटीनयुक्त औषधे देण्यात येतात. यासंबंधीचे सर्व प्रस्ताव पुरवठादार ठरवितात. निधी उपलब्धतेसाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करतात, प्रस्ताव मंजुरीबाबतही**

पाठपुरावा करतात ही परिस्थिती विभागाने बदलणे आवश्यक आहे. व त्याशिवाय कुपोषणाच्या स्थितीत सुधारणा होणार नाही असे समितीचे मत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत पुरवठादार ठरविण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या निविदा पद्धतीत अनेक त्रुटी निदर्शनास येतात. परिणामी निविदा प्रक्रिया न्यायप्रविष्ठ होते व अंगणवाडीतील मुलांना वेळीच पोषण आहार/THR उपलब्ध होऊ शकत नाही. ते पूरक पोषण आहारापासून वंचीत राहतात परिणामी कुपोषणाच्या परिस्थितीमध्ये सुधार होत नाही. **विभागाने राबविण्यात येत असलेल्या निविदा पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. लेखापरीक्षणात आढळून आलेली दुसरी बाब म्हणजे निविदा उघडल्यानंतर निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणेही अतिशय गंभीर बाब आहे. अशा बाबी टाळणे आवश्यक आहे. वास्तविक पाहता सचिवांनी साक्षीच्या बैठकीकरिता येतानाच या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करून समितीसमोर येणे आवश्यक होते. अतः लेखापरीक्षणात नमूद केल्यानुसार निविदा उघडल्यानंतर निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करण्यास जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कार्यवाही करावी व तसा अहवाल एक महिन्यात समितीस सादर करणेबाबत समितीने निर्देश देऊनही त्यानुसार कार्यवाहीचा अहवाल विभागाने अद्याप सादर केलेला नाही. ही सुद्धा अतिशय गंभीर बाब आहे. अशा प्रकारच्या अक्षम्य चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करणे क्रमप्राप्त आहे व त्या अनुषंगाने विभागाने चौकशीचा अहवाल व विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२७४ किशोरवयीन मुली यांच्या सबलीकरणासाठी असलेल्या राजीव गांधी योजनेची अंमलबजावणी :-

किशोरवयीन मुलीच्या सबलीकरणासाठी केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाने सप्टेंबर, २०१० मध्ये किशोरवयीन मुलींच्यासबलीकरणासाठी राजीव गांधी सबला (SABLA) केंद्र पुरस्कृत योजना सुरू केली होती. ११ ते १८ वर्षांच्या किशोरवयीन मुलींचे पोषण आणि आरोग्याचा स्तर सुधारून गृह आणि व्यावसायिक कुशलतांचा दर्जा वाढवून अशा मुलींना सबल करण्याचा हेतू होता. अंगणवाडी केंद्रे सेवा देण्याचा केंद्रबिंदू होता. या योजनेचे पोषण आणि पोषणेत्तर घटक असे दोन घटक होते. केंद्र शासनाने पोषण या घटकाव्यतिरिक्त पोषणेत्तर घटकांसाठी राज्यांना १००% आर्थिक सहाय्य द्यावयाचे होते. तसेच पोषणासाठीचा खर्च केंद्र व राज्य शासनाने ५०:५० या प्रमाणात करावयाचा होता. महिला व बालविकास विभागाकडून जून, २०११ पासून मुंबई उपनगरे, नांदेड, बीड, बुलढाणा, गडचिरोली, कोल्हापूर, सातारा, नाशिक, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या ११ जिल्ह्यांत अंमलबजावणी करण्यात आली होती. महिला व बालविकास विभागाने पोषण घटकांतर्गत प्रत्येक किशोरवयीन मुलींना प्रती दिवशी ६०० कॅलरीज, १९ ते २० ग्रॅम प्रथीने आणि सूक्ष्म पोषणे असलेला पूरक पोषण आहार १ वर्षात ३०० दिवस लगेच वापरण्यास योग्य असा घरपोच शिधा (THR) स्वरुपात द्यावयाचा होता. महिला व बालविकास विभागाने डिसेंबर, २०१० मध्ये अंगणवाडी कार्यकर्त्याद्वारे केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणानुसार ११ जिल्ह्यांमध्ये ९.५० लाख किशोरवयीन मुली होत्या. तथापि, आयुक्त, महिला व बालविकास विभाग, पुणे यांनी केंद्र शासनास सादर केलेल्या सन २०११ ते २०१४ च्या खर्चाच्या वार्षिक विवरणपत्रावरून असे आढळून आले की, या योजनेचा लाभ मार्च, २०१२ पर्यंत ७.९३ लाख, मार्च, २०१३ पर्यंत ७.५३ लाख आणि मार्च, २०१४ पर्यंत ७.७१ लाख लाभार्थ्यापर्यंत पोहोचला होता. प्रत्यक्षात सदर लाभ ९.५० लाख मुलींपर्यंत पोहचणे आवश्यक होते. याशिवाय या ११ जिल्ह्यांतील अंगणवाडी केंद्राच्या संख्येतही विसंगती दिसून आली, ११ जिल्ह्यांपैकी अमरावती, बीड, बुलढाणा, गडचिरोली, कोल्हापूर, नागपूर, नांदेड आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये जानेवारी, २०१४ पर्यंत THR किंवा गरम शिजवलेले अन्न कंत्राटदाराने किंवा महिला मंडळ/महिला बचत गटानेही पुरवले नाही. त्यामुळे या जिल्ह्यातील ५.७२ लाख किशोरवयीन मुली योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या. किशोरवयीन मुलींच्या प्रशिक्षणाकरिता मंजूर निधी रु. १७.४९ कोटींपैकी फक्त रु. १४.७० कोटी खर्च केले. त्यामुळे किशोरवयीन मुली प्रशिक्षणापासून वंचित राहिल्या. सदर आक्षेपाबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, प्रशिक्षणाचे एकूण ८ घटक होते. ज्यामध्ये कौशल्य विकास हा एक घटक होता. परंतु याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आलेले नाही, ही बाब सचिवांनी मान्य केली. **याकरिता आवश्यक निधी क्षेत्रीय कार्यालयांना वितरीत करण्यात आला होता. याबाबत समितीने निर्देश दिले की, शासन आदेशानुसार प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविणे आवश्यक असताना व निधी वितरित केला असतानाही ज्या बालविकास प्रकल्प अधिकारी अथवा संबंधित अधिकारी यांनी किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण दिलेले नाही. अशा सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून १५ दिवसांत कार्यवाही करावी असे निर्देश समितीने दिलेले होते. तथापि, सदर कार्यवाहीचा अहवाल विभागाने अद्याप समितीस सादर केलेला नाही ही अत्यंत गंभीर व समितीचा अवमान करणारी बाब आहे. याचाच अर्थ विभागाने अद्यापही संबंधितांवर कारवाई केली नाही असे समितीला वाटते. विभागाने या प्रकरणीसुद्धा समितीच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा व सदर कार्यवाहीच्या विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करून तसा अहवाल १ महिन्याच्या आत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

आयुक्त, महिला व बालविकास विभाग यांनी ११ जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींकरिता प्रचलित पुरवठादारांकडून आहार पुरवठा बंद करून महिला बचत गटांना पुरवठ्याचे काम देणेबाबत आदेश विलंबाने काढल्यामुळे ९ महिने कोणताही आहार पुरवठा अंगणवाड्यांना झाला नाही. त्यामुळे सदर अंगणवाडीतील ५ लाख ७२ हजार किशोरवयीन मुली पोषण आहारापासून वंचित राहिल्या. पोषण आहार पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध न करता प्रचलित पुरवठादाराना आहार पुरवठा बंद करण्याचे आदेश दिल्यामुळे सदरचा खंड पडला आहे व किशोरवयीन मुली पोषण आहारापासून वंचित राहिल्या आहेत. याबाबतही समितीने निर्देश दिले होते की, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून १ महिन्याच्या आत कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा. तथापि, असा अहवाल

अद्यापही समितीस सादर करण्यात आलेला नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. विभागाने या प्रकरणीसुद्धा समितीच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.२७५ " लोह आणि फॉलिक ॲसीड पुरक कार्यक्रमाची साप्ताहिक अंमलबजावणी " :-

शाळेत जाणाऱ्या किशोरवयीन मुली आणि मुलांकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने साप्ताहिक लोह आणि फॉलिक ॲसिड पूरक पोषण कार्यक्रम (WIFS) सुरू केला होता. सदर योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करावयाची होती. राज्यातील शासकीय, अनुदानित, नगरपरिषदेच्या शाळा आणि अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून ग्रामिण आणि शहरी भागातील किशोरवयीन मुलांसाठी WIFS देण्याचे उद्दिष्ट होते. सन २०१२-१३ दरम्यान राज्यात WIFS अंतर्गत एकूण ८९.८२% किशोरवयीन मुले असल्याचे आढळून आले. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, IFA गोळ्यांच्या खरेदीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून निविदा अंतिम करण्यास उशीर झाल्यामुळे डिसेंबर, २०१२ पर्यंत ८९.३२ लाख लाभार्थीपैंकी कुणालाही IFA पुरविले जाऊ शकले नाही. याशिवाय लेखापरिक्षणात निवडलेल्या ५ पैकी ४ जिल्ह्यांत फक्त ४.६६% ते ८७.५३ % किशोरवयीन मुलींना IFA गोळ्या दिल्या गेल्या होत्या. याबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, या कार्यक्रमाच्या सूचना केंद्र शासनाकडून ऑगस्ट, २०१२ मध्ये प्राप्त झाल्या. त्यानंतर निधी प्राप्त करून जानेवारी, २०१३ मध्ये निविदा प्रसिद्ध करून खरेदी करण्यात आल्या. **सदर कार्यक्रम नविन असल्यामुळे त्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींमुळे सुरूवातीच्या काळात गोळ्या वितरणाचे प्रमाण (टक्केवारी) कमी दिसून येते. मार्च, २०१४ पर्यंत ९२% काम पूर्ण झालेले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडील योजनांची अंमलबजावणी वेळेवर व १००% प्रमाणात होणे आवश्यक आहे. या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागाने केंद्र शासन व राज्य शासनाचे वित्त विभाग यांच्याशी योग्य समन्वय साधून निधी उपलब्ध करावा व भविष्यात कोणत्याही योजनेच्या लाभापासून लाभार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. फॉलिक ॲसिड गोळ्याच्या वेळीच वाटपामुळे माता व बालमृत्यू दर कमी होण्यास मदत होते. ही बाब विचारात घेता विभागाने भविष्यात या योजनेसह अन्य सर्व योजना सक्षमपणे राबविल्या जातील याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२७६ मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण :-

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने (MPSO) केंद्र शासनाकडे सन २०१२-१३ दरम्यान ९ वी व १० वी च्या वर्गातील शासकीय आणि स्थानिक संस्थांच्या शाळातील ९९०३६ मुलींसाठी एकूण रुपये ४.९५ कोटी खर्चाचा स्वसंरक्षण प्रशिक्षणाचाही प्रस्ताव सादर केला होता. केंद्र शासनाकडे जुलै, २०१३ मध्ये प्रस्तावास मंजुरी देऊन केंद्र शासनाच्या हिश्श्याची ७५% रक्कम रु. ३.७१ कोटी मंजूर केले होते. MPSO ने २०१३-१४ दरम्यान या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ३५ जिल्ह्यांपैकी ३४ जिल्ह्यांतील ९६०८१ मुलींना प्रशिक्षित करण्यासाठी रु. ४.३२ कोटी एवढी रक्कम केंद्र शासनाच्या हिश्श्यासह नोव्हेंबर, २०१३ मध्ये वितरित केली व रुपये ०.६३ कोटी रक्कम कार्यक्रमाच्या मूल्यमापनासाठी राखून ठेवली. सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखापरीक्षणात असे आढळून आले की, ९६०८१ मुलींपैकी मार्च, २०१४ पर्यंत २४ जिल्ह्यांतील फक्त ४४३९७ (४६%) मुलींना प्रशिक्षण दिले गेले होते तर उर्वरीत १० जिल्ह्यांत प्रशिक्षण न दिल्यामुळे ३५२६८ मुली या कार्यक्रमाच्या लाभापासून वंचित राहिल्या. यासंदर्भात विभागीय सचिवांनी साक्षी दरम्यान खुलासा केला की, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ रोजी राज्य माध्यमिक शिक्षण अभियानांतर्गत ३४ जिल्ह्यांना निधीचे वाटप करण्यात आले. परंतु या ३४ जिल्ह्यांपैकी बीड, जालना, नाशिक, परभणी, सोलापूर, वाशिम या सहा जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना निवडणुकीच्या कामामुळे सभा घ्यायला वेळ मिळाला नाही. विभागाच्या सदर खुलाशाने समितीचे समाधान झाले नाही. समितीने सुचित केले की, सन २०१३-१४ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता दिनांक ५ मार्च २०१४ रोजी लागू झाली. विभागाने निधी २९ नोव्हेंबर, २०१३ रोजीच वितरित केला. त्यामुळे निवडणुकीच्या कामामुळे जिल्हाधिकाऱ्यांना वेळ मिळाला नाही हे कारण संयुक्तीक वाटत नाही. सदर कारण समितीस स्वीकारता येणार नाही. प्रशिक्षणाचे वेळापत्रक डिसेंबर, २०१३ ते जानेवारी, २०१४ असताना आचारसंहितेचा प्रश्न उद्‌भवत नाही. या सहा जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या कामकाजातील हलगर्जीपणामुळे लाभार्थी मुलींना स्वरक्षणाच्या प्रशिक्षणापासून वंचित रहावे लागले ही वस्तुस्थिती समितीच्या निदर्शनास येते. **सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी आचारसंहितेची कुठलीही अडचण नसताना सदर योजनेची अंमलबजावणी करण्यास विलंब झालेला आहे. तसेच केवळ या सहा जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारचा विलंब झालेला आहे. इतर सर्व जिल्ह्यांमध्ये ही कामे झालेली असताना केवळ या सहा जिल्ह्यांमध्ये काम न होण्याचे कोणतेही कारण नाही. याबाबत समितीची शिफारस आहे की, जालना, बीड, नाशिक, परभणी, सोलापूर व वाशिम या सहा जिल्ह्यांतील तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचा खुलासा मागविण्यात यावा व सदर खुलाशाचा विभागाने गांभिर्याने विचार करून दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी तसेच राज्याच्या मुख्य सचिवांनी याची गंभीर नोंद घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. व भविष्यात अन्य जिल्ह्यात अशा बाबींची पुनरावृत्ती होणार नाही व लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाहीत याबाबत विभागाने आवश्यक उपाययोजना करावी व समितीच्या उपरोक्त शिफारशीनुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस ३ महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

मुलींसाठी PACE-IIT योजनेच्या अंमलबजावणीबाबत :-

१.२७७ महाराष्ट्र शासनाने IITN PACE या खाजगी प्रशिक्षण संस्थेकडून IIT ची परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत मुलींसाठी प्रशिक्षण देण्यासाठी स्वयंस्फुर्त प्रस्ताव जुलै, २०११ मध्ये प्राप्त झाला. प्रत्येक मुलींकरिता २ वर्षांकरिता रु. ७५०० प्रतीमाह या दराने PACE-IITN या संस्थेला प्रदान करायचे होते व संस्थेने या मुलींना दोन वर्षांसाठी मोफत उच्च माध्यमिक शिक्षण द्यावयाचे होते. त्याशिवाय IIT प्रवेश प्रक्रियेकरिता प्रशिक्षण द्यावयाचे होते. सदर योजना मंजुरीचा प्रस्ताव वित्त व नियोजन विभागास जुलै, २०११ मध्ये सादर केल्यानंतर जुलै, २०१३ मध्ये मान्यता देण्यात आली व शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून पहिल्या तुकडीची सुरूवात झाल्यामुळे गरीब कुटुंबातील १०० गुणवंत गरीब मुलींना योजना २ वर्ष विलंबाने मंजूर झाल्यामुळे योजनेचा फायदा मिळू शकला नाही. असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला. याबाबत आक्षेपाची छाननी करताना समितीने विचारणा केली की, विभागाच्या व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांना २ वर्षे मिळू शकला नाही. **मुंबईमध्ये अनेक संस्था उपलब्ध असताना PACE-IIT ची निवड कोणतीही निविदा प्रक्रिया न मागविता करणे योग्य नाही, सदर संस्था निवडीच्या प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाची मान्यता असली तरी विभागाने संस्था निवडीबाबत सादर केलेल्या प्रस्तावात विहित पद्धतीचा वापर केलेला नाही. त्यामुळे विभागाने निविदा मागवून पात्र संस्थेची निवड करावी जेणेकरून PACE शिवाय अन्य संस्थांनाही संधी मिळेल.अशाप्रकारे कुठलीही कार्यपद्धती न पाळता व कुठलीही निविदा न मागविता अशा प्रकारे केलेली कार्यवाही समर्थनीय नाही. याबाबत विभागाने कार्यवाही करावी तसेच सदर योजना दोन वर्षांने विलंबाने सुरू होण्याच्या निश्चित कारणांचा शोध घेऊन त्यामध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीची अंमलबजावणी न केल्यामुळे बालगृहांना वाढीव दराने देखभाल अनुदानाचे प्रदान झाले नाही :-

१.२७८ महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने ' (SJSA), मे.एसब्रेन सिस्टीम (पुरवठादार), पुणे यांच्याकडे NGOs आणि महिला व बालकल्याण विभागाकडून चालविल्या जाणाऱ्या ९६९ बालगृहांसाठी रु. २.५९ कोटी किंमतीच्या ९६९ बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीचा (BMAS) पुरवठा करण्याचे आदेश एप्रिल, २०११ मध्ये दिले. BMAS ने मुलांची बोगस आकडेवारी सादर होण्यास आळा घालून प्रत्यक्ष हजर असलेल्या मुलांच्या संख्येची नोंद घेणे अपेक्षित होते आणि त्याद्वारे बालगृहांकडून अनुदानाची खरी मागणी केली जाईल याची खात्री करणे आवश्यक होते. पुरवठादाराने कर्मचारी/मुलांची माहिती बोटांच्या ठश्याद्वारे घेऊन ती माहिती सीमकार्डमध्ये साठवून घेण्याच्या कामाचा करारामध्ये अंतर्भाव होता. सदर सीमकार्डवरील माहिती नंतर मध्यवर्ती सर्व्हरवर अपलोड करणे आवश्यक होते. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने पुरवठादाराला दिलेल्या पुरवठा आदेशात BMAS कार्यरत होण्यासाठी सीमकार्डचा पुरवठा करण्याची तरतूद नव्हती. निर्धारित जुलै, २०११ ऐवजी ऑगस्ट, २०१४ पर्यंत ९६९ BMAS पैकी फक्त ८१६ BMAS चा पुरवठा केला गेला होता. तथापि, सीमकार्ड उपलब्ध नसल्यामुळे ८१६ BMAS पैकी एकही BMAS कार्यरत होऊ शकली नव्हती. मध्यवर्ती सर्व्हरला माहिती अपलोड झालेली नसताना माहे नोव्हेंबर, २०११ आणि जून, २०१३ दरम्यान सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने ८१६ BMAS च्या पुरवठा रकमेपैकी ९०% रक्कम रुपये १.९७ कोटी पुरवठादाराला प्रदान केले होते. शासनाच्या सचिव स्तरीय समितीने बालगृहातील मुलांच्या अन्न आणि वस्त्रांच्या खर्चापोटी प्रतिमहा रुपये ६३५ वरून प्रतिमाह रुपये ९०० एवढी वाढ करताना ज्या बालगृहांमध्ये BMAS कार्यरत आहे आणि ट्रॅक चाईल्ड संकेतस्थळावर सर्व माहिती अपलोड केली आहे. तीच बालगृहे वाढीव दराने देखभाल अनुदानास पात्र राहतील अशी अट निश्चित केली होती. ९६९ बालगृहांमध्ये BMAS ची अंमलबजावणी न झाल्यामुळे वाढीव देखभाल अनुदानापासून ही बालगृहे वंचित राहिली असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. यासंदर्भात महिला व बालकल्याण विभागाने खुलासा केला की, सर्व ठिकाणी बायोमॅट्रीक मशिनचा पुरवठा होऊन ते बसविण्यात आले आहे. परंतु सर्व्हर नसल्यामुळे offline पद्धतीने हजेरी घेण्यात येते व त्या आधारे प्रति लाभार्थी दरमहा रुपये ६३५ अदा करण्यात येते. **यासंदर्भात समितीने स्पष्ट केले की, विभागाने ज्या हेतूने बायोमॅट्रीक मशिनची खरेदी केली त्याकरिता ९०% रक्कम अदा केली तो उद्देश सफल झालेला नाही, लाभार्थ्यांना रु. ९०० ऐवजी केवळ प्रतिमहा रु. ६३५ अदा केल्यामुळे लाभार्थ्यांचे नुकसान झाले आहे. यामध्ये महिला व बालकल्याण विभाग तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्यामध्ये योग्य समन्वय नसल्याचेही निदर्शनास आले. विभागाने तातडीने उर्वरीत BMAS चा पुरवठा होईल, सर्व मशिन्सना सीमकार्ड बसवून लाभार्थ्यांची माहिती Online पद्धतीने भरून प्रतिमहा रु. ६३५ ऐवजी प्रतिमहा रु. ९०० एवढी देखभाल अनुदान राशी संबंधित संस्थांना अदा करावी तसेच ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे प्रति बालक देखभाल अनुदान कमी वितरीत करण्यात आले त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेल्या पुरवठा आदेशात सिमकार्डची देखील तरतूद करणे अपेक्षित होते. त्यामुळे निविदेमध्ये व पुरवठा आदेशात सिमकार्डची व्यवस्था न करणाऱ्या व त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व्हरची देखील व्यवस्था न करणाऱ्या अशा सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

१.२७९ मनोधैर्य योजनेची अंमलबजावणी :—

महाराष्ट्र शासनाने दिनांक २ ऑक्टोबर,२०१३ किंवा त्यानंतर बलात्कार, लैंगिक छळ आणि ॲसिड हल्ला पिडित मुलींच्या पुनर्वसनासाठी मनोधैर्य योजनेची सुरूवात केली होती. सदर योजनेअंतर्गत प्रत्येक बलात्कार पिडित आणि लैंगिक छळ झालेल्या मुलीला रुपये २ लाख व विशेष प्रकरणात रुपये ३ लाख तसेच ॲसिड हल्ला झालेल्या मुलीला रुपये ५०,००० एवढी रक्कम द्यावयाची होती. जिल्हाधिकारी, अध्यक्ष DWCDO (सदस्य सचिव) पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा सरकारी वकिल अशा ५ सदस्य असलेल्या एका जिल्हास्तरीय समितीमार्फत पिडित मुलीला अर्थसहाय्य मंजूर करावयाचे होते. पिडित मुलीने FIR दाखल केल्यापासून प्रकरणाच्या मंजूरीकरिता ७ दिवसाच्या आत समितीने बैठक घेऊन मंजूरी पासून १५ दिवसांच्या आत महिला व बालकल्याण विभागाने पिडित मुलीला अर्थसहाय्य द्यावयाचे होते. महिला व बालकल्याण विभागाने सन २०१३ मध्ये या योजनेसाठी रुपये ५.१० कोटी एवढी तरतूद केली होती. ऑक्टोबर, २०१३ ते मार्च, २०१४ दरम्यान राज्यात ८७६ FIR दाखल झाले होते. समितीने त्यापैकी ४१० प्रकरणांस मंजूरी दिली होती. त्यापैकी २९६ प्रकरणात रुपये ५.०४ कोटींचे प्रदान केले गेले व उर्वरित ११४ प्रकरणांत निधी अभावी प्रदान होऊ शकले नाही. निधी अभावी रक्कम अदा न केलेल्या व लेखापरिक्षणास निदर्शनास आलेल्या ८५ प्रकरणांमध्ये अपुरा निधी, वैद्यकिय अहवाल उपलब्ध नसणे, पुनर्पडताळणीसाठीची प्रकरणे आणि बँक खाती उघडलेली नसणे या कारणांमुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. परिणामी विभाग FIR दाखल झाल्यापासून ७ दिवसांच्या आत बैठक घेण्यास व लाभ देण्यास अपयशी ठरल्याचे दिसून येते. त्याबाबत विभागीय सचिवांनी लोकलेखा समितीच्या बैठकीत खुलासा केला की, सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद खर्च झाल्यामुळे व पुरवणी मागणी मंजूर होऊ न शकल्यामुळे मनोधैर्य योजनेअंतर्गत निधी वाटप करता आला नाही. विभागाने केलेल्या खुलाशाबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. पिडित महिलांना शासन बिकट परिस्थितीत पैशाकरिता ताटकळत ठेवत असेल तर योजनेचा मुळ उद्देशच लोप पावतो. अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध करताना वेतनाकरिता निगेटीव्ह बॅलन्स ची BDS स्लीप द्वारे अदायगी केली जाते तसाच प्रयत्न याठिकाणी पिडित महिलांकरिता विभागाने का केला नाही? ही बाब स्पष्ट होत नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीकरिता वेळ न मिळणे व त्यामुळे विहित कालावधीत बैठक घेता न येणे हे विभागाने ज्ञापनात सादर केलेले कारण अत्यंत गंभीर स्वरुपाचे व बेजबाबदारपणाचे असल्याचे समितीचे मत आहे. **भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती होऊन मनोधैर्य योजनेतील पिडित महिला लाभापासून वंचित राहू नये याकरिता विभागाने पुरेसा निधी अर्थसंकल्पीत करावा व योजनेच्या निर्धारित कालावधीत पिडित महिलांना लाभ मिळण्यासाठी सर्व जिल्हास्तरीय समित्यांना सक्तीच्या सूचना पुनश्चः देण्यात याव्यात. सदर योजनेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. जे अधिकारी सदर योजनेच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा करतील त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत पिडित महिला लाभापासून वंचित राहणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी. तसेच अशा योजना साठी निगेटीव्ह बॅलन्स असताना BDS स्लीप काढण्याच्या पर्यायाचा देखील विचार करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. समितीच्या उपरोक्त शिफारशीनुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने चर्चेसाठी निवडलेल्या उपरोक्त अत्यंत महत्वाच्या परिच्छेदासंदर्भात समितीच्या वेळोवेळी निदर्शनास आले आहे की, अशा संवेदनशिल व महत्वाच्या विषयाबाबत विभाग गंभीर नाही. निधी प्राप्त असूनही योजनांची अंमलबजावणी अधिकारी स्तरावरुन गंभीरपणे होत नाही व त्याचा थेट परिणाम हा लाभार्थ्यांना मिळणे शक्य होत नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. साक्षी दरम्यान समितीने अनेक बाबीसंदर्भात प्रश्न उपस्थित केले असता केवळ वेळ मारुन नेण्यासाठी माहिती समितीला लेखी स्वरुपात देण्यात येईल तसेच संबंधितांवर कारवाई करून अहवाल समितीस सादर करण्यात येईल अशा प्रकारची आश्वासने समितीला देऊनसुद्धा आजतागायत अशी आश्वासित माहिती समितीला सादर न करणे ही बाब खचितच गंभीर स्वरुपाची असून समितीचा अवमान करणारी ठरते. उपरोक्त अनेक परिच्छेदासंदर्भात आश्वासित केलेल्या एकाही गोष्टीची पुर्तता विभागाकडून करण्यात आलेली नाही. अशा सर्व बाबींची मुख्य सचिवांनी चौकशी करावी व एक महिन्याच्या आत जबाबदारी निश्चित करून समितीस अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.

शालेय शिक्षण विभाग

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या सामान्य व सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी ' यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :—

वर्ष २०००-०१ मध्ये सर्व शिक्षा अभियान (SSA) राबविण्यास सुरूवात झाली, ज्याचे प्राथमिक उद्दिष्ट हे वर्ष २०१० पर्यंत ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना दिल्या जाणाऱ्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे हे होते. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा, २००९ (RTE कायदा) १ एप्रिल २०१० पासून अंमलात आणला गेला, ज्या अन्वये ६ ते १० वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला, त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याच्या वास्तव्या शेजारील शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण प्राप्त करण्याचा हक्क असतो.

वर्ष २०१०-१४ या कालावधीतील महाराष्ट्र राज्यातील SSA च्या अंमलबजावणीची संपादणूक लेखापरीक्षा केली असता असे निदर्शनास आले की RTE अधिनियमाच्या अंतर्गत नियम अधिसूचित करण्यात विलंब झाला होता आणि त्या अनुषंगाने राज्यातील बऱ्याच शासकीय शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी मान्यता मिळण्यात विलंब झाला होता. डिसेंबर, २०११ नंतर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षांची व सदस्यांची फेरनिवड करण्यात आली नव्हती. वार्षिक कृती आराखडे आणि अर्थसंकल्प तयार करण्यात त्रुटी होत्या आणि बऱ्याचा शाळांनी शाळा विकास आराखडे तयार केले नव्हते. राज्य शासनाकडून विलंबाने व कमी प्रमाणात निधी मुक्त केला जात होता आणि प्रत्येक वर्ष अखेरीस निधीचा लक्षणीय भाग अखर्चित शिल्लक राहत होता. खासगी विना अनुदानित शाळांमध्ये दुर्बल घटकातील आणि दुर्लक्षित गटातील मुलांसाठी जागा राखीव ठेवण्यात विलंब होत होता आणि बऱ्याच शाळांमध्ये विद्यार्थी- शिक्षण गुणोत्तर प्रतिकूल होते. जे विद्यार्थी शाळेत अनुपस्थित रहात होते किंवा ज्यांची शाळेतून गळती होत होती त्यांच्यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी कोणतीही बालक मागोवा यंत्रणा नव्हती. बऱ्याच शाळांमधील पायाभूत सुविधा अपर्याप्त होत्या. शाळा व्यवस्थापन समित्यांच्या बैठका घेण्यात आणि वेगवेगळ्या स्तरावर अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात तूट असल्याने SSA-RTE कायद्याचे संनियंत्रण करण्यावर प्रतिकूल परिणाम झाला. काही महत्वपूर्ण निष्पत्ती खाली ठळकपणे दर्शविल्या आहेत :—

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

ठळक वैशिष्ट्ये :—

जरी RTE कायदा एप्रिल, २०१० पासून अस्तित्त्वात आला होता तरी RTE नियम व अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये दुर्बल घटकातील व दुर्लक्षित गटातील बालकांसाठी जागा राखीव ठेवण्याची पद्धत विनिर्दीष्ट करणारे नियम राज्य शासनाने अखेर अनुक्रमे ऑक्टोबर, २०११ व मे, २०१२ मध्ये सुधारित केले होते. डिसेंबर, २०११ नंतर महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष व इतर सदस्यांची फेरनिवड करण्यात आली नव्हती. (परिच्छेद २.२.६)

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोग, महिला व बालकल्याण विभागाच्या नियंत्रणाखाली येत असल्याने अध्यक्ष व सदस्यांची फेर निवड त्या विभागामार्फत होते.

वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये राज्यातील अनुक्रमे १०,१५८ (१२ टक्के) व १२,९७० (१५ टक्के) शाळांनी शाळा विकास आराखडे तयार न केल्यामुळे SSA चे अंदाजपत्रक त्रुटीपूर्ण होते. २०१०-१४ दरम्यान राज्य शासनाने त्याचा रु. १३९.५३ कोटींचा हिस्सा मुक्त केला नव्हता आणि प्रत्येक वर्षाच्या अखेरीस मोठया प्रमाणात अखर्चित रक्कमा शिल्लक होत्या. (परिच्छेद २.२.७.१ व २.२.८)

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बालकांचा सक्तीचा व मोफत शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम ३८(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांन्वये महाराष्ट्र बालकांचा मोफत शिक्षणाचा हक्क नियम, २०११ शासनाने पारित केला. अधिनियमातील कलम २१ च्या प्रयोजनार्थ उक्त शासन नियमातील नियम १३ अन्वये, विनाअनुदानित शाळा वगळता राज्यातील इतर सर्व शाळांनी शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. शाळा व्यवस्थापन समितीमार्फत शाळा विकास आराखडा तयार करण्यात येतो. ज्या शाळांनी शाळा विकास आराखडा तयार केलेला नाही अशा शाळांचे खुलासे या कार्यालयामार्फत मागविण्यात आलेले आहेत. सन २०१३-१४ मध्ये सर्व शिक्षा अभियानासाठी एकूण अंदाजपत्रकीय तरतूद १२९९२३.६४(लक्ष) होती. त्यापैंकी राज्याचा ३५% हिस्सा रु. ४५४७३.२७(लक्ष). सर्व शिक्षा अभियानासाठी White Book मध्ये तरतूद ३००८०.०० लक्ष करण्यात आली होती. शासनाने २०१३-१४ मध्ये २५३४०.७६ लक्ष तरतूद वितरित केली. White Book मध्ये ३००८०.०० लक्ष तरतूद असल्याने, शासनाने १३९.५३ कोटीचा हिस्सा मुक्त केला नाही. सदर निधी पुढील आर्थिक वर्षात वितरित केला आहे. राज्यात सप्टेंबर २०१३ रोजी असलेल्या ६६.४४४ सरकारी शाळांपैकी ३६,७९४ (इयत्ता IV पर्यंत) आणि ५,६२१ (इयत्ता VII पर्यंत) शाळांमध्ये इयत्ता साठी सहा कि. मी. च्या परिघात वास्तव्या शेजारील नव्हत्या. या ४२,४१५ शाळांमध्ये शिकणाऱ्या २४.८७ लाख मुलांना मोफत वाहतूक व्यवस्था देखील पुरविण्यात येत नव्हती. (परिच्छेद २.२.९.१)

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

- RTE नियमांना अधिसूचित करण्यात विलंब झाल्याने दुर्बल घटकातील व दुर्लक्षित गटातील मुलांसाठी खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये जागा राखीव ठेवण्यात विलंब झाला होता. त्याचवेळी राखीव जागांवर अत्यल्प प्रमाणात शाळा प्रवेश झाले होते. RTE नियमांचे उल्लघन करून सामान्य प्रवर्गातील मुलांना राखीव जागांवर प्रवेश देऊन राखीव जागांचे अपवाहन करण्यात आले होते. जी मुले शाळेत अनुपस्थित राहत होती किंवा ज्यांची शाळेतून गळती होत होती त्यांचा माग घेण्याची प्रणाली अस्तित्वात नव्हती.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ मध्ये RTE कायद्यानुसार सर्व संबंधित शाळांना २५% आरक्षणातंर्गत मागासवर्गीय दुर्बल घटकातील मुलांना प्रवेश देणे बंधनकारक असूनही राज्यातील बऱ्याच शाळांनी प्रवेश दिलेले नव्हते. सदर २५% च्या जागांवर सर्व सामान्य मुलांना प्रवेश देण्यात आलेले होते. RTE कायद्याची अंमलबजावणी पहिल्याच वर्षी होत असल्याने शाळांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. तसेच गळती रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असून आता सरल संगणक प्रणालीच्या माध्यमातून मुलांचे माग घेण्यात येणार आहे.

- शाळेतील पायाभूत सुविधा अपर्याप्त होत्या. ६६,४४४ सरकारी शाळांपैकी ७५६ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नव्हती, ५१,३७५ शाळांमध्ये स्वच्छतागृहे नव्हती, मुलांच्या व मुलींच्या ४१,२९१ स्वच्छतागृहांमध्ये पाण्याची सोय नव्हती, ५८६ शाळांमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नव्हते आणि १,८०९ शाळांमध्ये संगणक असूनही १२,१८३ शाळांना वीजपुरवठा केला जात नव्हता. (परिच्छेद २.२.९.५)

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

UDISE Data २०१४-१५ नुसार राज्यात शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ६७६९१ शाळा आहेत. यापैकी ६७०२७ शाळांमध्ये मुलांकरिता स्वच्छतागृह उपलब्ध होती व ६६४ शाळांमध्ये सदरील सुविधा उपलब्ध नव्हती, तसेच मुलींकरिता ६७१०२ शाळांमध्ये उपलब्ध असून ५८९ शाळांमध्ये सदरील सुविधा उपलब्ध नव्हती.

जिल्ह्याकडून दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजीपुर्वी प्राप्त झालेल्या अहवालानुसार शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व शाळांमध्ये मुलामुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध आहे. U-DISE Data २०१४-१५ नुसार शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ६७६९१ शाळांपैकी ६७३२३ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असून ३६८ शाळांमध्ये सदरील सुविधा उपलब्ध नाही. जिल्ह्याकडून प्राप्त अहवालानुसार या ३६८ शाळांपैकी १८४ शाळांमध्ये कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून १८४ शाळांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

प्रस्तावना :-

वय वर्षे ६ ते १४ दरम्यानच्या सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचे सन २०१० पर्यंत सार्वत्रिकीकरण (UEE) करण्याच्या मूलभूत उद्दीष्टानुसार वर्ष २०००-०१ मध्ये सर्व शिक्षा अभियान (SSA) हा वैशिष्ठयपूर्ण (Flagship) कार्यक्रम भारत सरकारने (GOI), ने सुरू केला. वय वर्षे ६ ते १४ मधील सर्व मुलांचा प्रवेश, नोंदणी आणि टिकाव हे UEE चे प्रमुख तीन पैलू आहेत. संविधानीक कायदा (८६ वी सुधारणा) २००२ अन्वये वय वर्षे ६ ते १४ मधील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क आहे असे नमूद करून UEE चे ध्येय सुकर केले. मुलांचे मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क कायदा २००९ (RTE कायदा) १ एप्रिल २०१० मध्ये लागू झाला, ज्या अंतर्गत वय वर्षे ६ ते १४ मधील प्रत्येक मुलाला त्याचे प्राथमिक शिक्षण ३० संपेपर्यंत वास्तव्या शेजारील शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

ऑक्टोबर, २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण हक्क नियम २०११ (RTE नियम) लागू केले. GOI नी बालहक्क संरक्षण कायदा, २००५ च्या आयोगांना मुलांच्या शिक्षणांच्या हक्कांचे राज्यात संनियंत्रण करण्याविषयी अधिसूचित केले.

ज्ञापन :–

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

संघटनात्मक-संरचना

महाराष्ट्रात, SSA ची जानेवारी २००२ मध्ये सुरवात झाली आणि त्याची अंमलबजावणी व संनियंत्रण शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (MPSP), मुंबई तर्फे केले जाते. MPSPचे नियामक मंडळ (GB) आणि कार्यकारी समिती (EC) यांचे अनुक्रमे मुख्यमंत्री व मुख्य सचिव अध्यक्ष आहेत. राज्य प्रकल्प संचालक (SPD) हे MPSP चे सदस्य सचिव आहेत. जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (ZP) हयांच्या नियंत्रणाखालील राज्य प्रकल्प कार्यालय, जिल्ह्यामध्ये जिल्हा शिक्षणाधिकारी (DEO) गटांमध्ये गटशिक्षण अधिकारी (BEO), गट साधन केंद्रे व समूहसाधन केंद्रामध्ये आधारे गट व ग्रामस्तरावर हा कार्यक्रमाची अंमलबजावणी करते. महानगरपालिका क्षेत्रांमध्ये SSA ची अंमलबाजवणी महानगरपालिका शिक्षण अधिकारी यांच्यामार्फत केली जाते. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी राज्य सल्लागार परिषद (SAC) याची स्थापना करणे RTE कायदयानुसार अपेक्षित आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस म्हणजेच २०११ पर्यत SAC पूर्णपणे सल्लागाराचे काम हाती घेत नाही तोपर्यंत GB आणि EC यांच्या बरोबरीने SAC अस्तित्वात राहणे अपेक्षित होते. बालहक्क संरक्षण कायदाए २००५ च्या आयोगा अतंर्गत तरतूदी नुसार महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग (MSCPCR) जुलै २००७ मध्ये गठीत झाला.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

लेखापरीक्षण उदिद्ष्टे

खालील बाबींचे निर्धारण करणे ही लेखा परीक्षेची उदिद्ष्टे होती :

- SSA साठी नियोजन प्रभावशाली होते आणि निधीचा व्यय काटकसरीने, कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे करण्यात आला ;
- SSA-RTE कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने उपयुक्त वातावरण निर्माण केले आहेत ;
- SSA अंतर्गत अपेक्षित असलेले फायदे हे सरकारने प्रभावीपणे मुली, कमकुवत घटक आणि इतर उपेक्षित गट यांपर्यंत पोहचविले आहेत :
- SSA अंतर्गत अपेक्षित असलेली मुलभूत सुविधांची आणि इतर गुणवत्ता परिगणकाची प्रमाणके यांची सरकारने पूर्तता केली आहे ;
- आणि SSA-RTE कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण कार्यपद्धती पर्याप्त आहेत.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

लेखापरीक्षा निकष

SSA च्या संपादणूकीची निर्धारण करण्यासाठी लेखापरीक्षा निकष असे होते :

- मोफत आणि सक्तीचे शिक्षण यावरील मुलांचे हक्क कायदा, २००९ ;
- श्महाराष्ट्र मोफत आणि सक्तीचे शिक्षण यावरील मुलांचे हक्क नियम, २०११ ;
- एप्रिल २०१० मधील SSA ची कार्यचौकट ;
- MPSP चे संस्थापन समयलेख आणि नियम (मार्च, १९९४) ;
- वार्षिक कृती आराखडा व अर्थसंकल्प कागदपत्रे तसेच GOI च्या प्रकल्प संमती मंडळ यांचे इतिवृत्त ; आणि
- GOI /GOM यांनी वेळोवेळी पारीत केलेले आदेश.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

लेखापरीक्षा व्याप्ति आणि कार्यपद्धती

सन २०१०-११ ते २०१३-१४ ह्या कालावधीसाठीची संपादणुक लेखापरीक्षा एप्रिल आणि जुलै, २०१४ दरम्यान करण्यात आली. प्रधान सचिव, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग (विभाग); MPSP ; शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे ; MSCPCR, मुंबई ; राज्य शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (MSCERT), पुणे आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांच्या अभिलेखांचे चाचणी परिक्षण करण्यात आले.

राज्यात शिक्षणाचे आठ ३१ प्रभाग आहेत. प्रत्येक शैक्षणिक प्रभागातील एका जिल्ह्याची निवड होईल ह्याची खात्री करून Proportional to size without Replacement ही नमूना पद्धत वापरुन ३५ पैकी नऊ ३२ जिल्ह्यांची निवड करण्यात आली. निवड केलेल्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हापरिषदस्तरावर DEO आणि महानगरपालिकास्तरावर शिक्षण अधिकारी (EO) यांच्या अभिलेख्यांची तपासणी करण्यात आली. तसेच मुक्त केलेला निधी व शैक्षणिक मागसपणा विचारात घेऊन १०३ पैकी २९ गट, आठ नमुना जिल्ह्यातील तपासणीसाठी निवडण्यात आले त्याशिवाय, निवडलेल्या गटांतील १४३ शाळांची (ठाणे आणि परभणी जिल्ह्यातील पाच, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासह) विभागातील कर्मचाऱ्यांसोबत संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली.

सचिव, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग ह्यांच्यासोबत आरंभीची बैठक ६ जून, २०१४ रोजी घेण्यात आली ज्यामध्ये, लेखापरिक्षेची उदिद्ष्टे आणि निकष यावर चर्चा करण्यात आली. दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी सचिव, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांचेबरोबर अंतिम बैठक घेण्यात आली.

सहसंचालक (वित्त व लेखा)ए MPSP यांचेकडील प्राप्त झालेले (नोव्हेंबर, २०१४) उत्तर आणि सर्व शिक्षा अभियानाची संपादणूक लेखापरीक्षा यावरील राज्य लोक लेखा समितीकडून (एप्रिल, २०१२ चा ८वा अहवाल) प्राप्त शिफारशी भारताचे नियंत्रक आणि महालेखाकार यांच्या वर्ष २००५-०६ च्या अहवालातील परिच्छेद ३.१ मध्ये योग्य ठिकाणी अंतभूर्व केले आहेत.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

लेखापरीक्षा निष्कर्ष

संस्थात्मक संरचना

राज्य सरकारला RTE कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सल्ला देण्याकरीता राज्य सल्लागार मंडळ (SAC) स्थापन करणे हे RTE कायद्याच्या कलम ३४ अन्वये अपेक्षित होते. RTE कायद्यात असेही नमूद केले होते की, प्राथमिक शिक्षण आणि बालविकास या क्षेत्राचे ज्ञान असलेल्या तसेच कार्यानुभव असलेल्या श्रेष्ठ लोकांमधून SAC चे सदस्य राज्य सरकारकडून नियुक्त केले जातील. RTE कायद्यायाच्या कलम ३८ अनुसार राज्यशासनाने अधिसूचनेद्वारे ह्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियम बनविणे अभिप्रेत होते. RTE कायद्यातंर्गत दिलेल्या हक्कांच्या संरक्षणाचे परीक्षण तथा आढावा घेण्यासाठी MSCPCR जबाबदार होते. तसेच त्यांनी कायद्यायाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे आवश्यक होते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

- १६ सदस्यांना नामनिर्देशित करून SAC स्थापन केल्याच्या शासनाच्या मार्च २०१३ रोजीच्या अधिसूचने व्यतिरिक्त GOM यांनी नोव्हेंबर, २०१४ पर्यंत SAC गठीत केली नव्हती. SAC च्या गैरहजेरीत MPSP च्या GB आणि EC यांनी राज्यात SSA ची अंमलबजावणी सुरू ठेवली तसेच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील GB जी SSA च्या अंमलबजावणीच्या आढाव्यासाठी तसेच एकुणच धोरणात्मक मार्गदर्शन आणि निर्देशनासाठी जबाबदार होती त्यांनी MPSP च्या नियमांत नमूद केल्याप्रमाणे आठ सभा घेणे अपेक्षित होते. परंतु २०१०-१४ दरम्यान एकही सभा घेण्यात आली नाही. SAC वर सदस्यांच्या नामनिर्देशनाचा प्रस्ताव मार्च, २०१३ च्या अधिसुचनेप्रमाणे शासनाकडे सादर केला आहे असे सहसंचालक MPSP यांनी सांगितले.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

SAC वर अशासकीय सदस्यांच्या नामनिर्देशनाचा प्रस्तावास मान्यता मिळाली असून शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

नियामक मंडळ :-

मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या नियामक मंडळाच्या बैठका होतात. मा. मंत्री (शालेय शिक्षण) हे या मंडळाचे उपाध्यक्ष आहेत. सदर मंडळामध्ये शासकीय तसेच अशासकीय सदस्य समाविष्ठ असून अशासकीय सदस्याची शिफारस केंद्र शासन तसेच राज्य शासनामार्फत केली जाते. या कार्यालयामार्फत अशासकीय सदस्याची निवड करण्याबाबतची नस्ती राज्य शासनाला सादर केली असून सदर बाब प्रलंबित आहे. तरी देखील जून, २००९ मध्ये उपलब्ध असलेल्या सदस्यासोबत नियामक मंडळाची बैठक घेण्याबाबतची नस्ती या कार्यालयामार्फत सादर करण्यात आली होती. परंतु मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या व्यस्त कामामुळे बैठकीसाठी सोईची तारीख व वेळ मिळू शकली नाही. सन २००८ ते २०११ या वर्षात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या व्यस्त कामाकाजामुळे बैठकीची वेळ मिळु शकली नाही. बैठक घेण्याबाबत मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून स्वतंत्रपणे कळविण्यात येईल असे सांगितले गेले.

अशासकीय सदस्यांची मुदत २ वर्षांसाठीच असल्यामुळे नवीन अशासकीय सदस्य निवडण्याबाबतची प्रक्रिया या कार्यालयामार्फत सुरू आहे. सदर सदस्याची निवड झाल्यानंतर मा. मुख्यमंत्री महोदयांकडुन बैठकीची वेळ मिळण्याबाबत प्रयत्न केले जातील.

RTE कायदा जरी एप्रिल, २०१० पासून अस्तित्वात आला तरी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील कमकुवत प्रवर्गातील तसेच उपेक्षित गटामधील मुलांसाठी जागा आरक्षित ठेवण्यासाठीचे नियम तसेच RTE नियम हे GOM यांनी अनुक्रमे ऑक्टोबर, २०११ व मे, २०१२ मध्ये अधिसूचित केले, पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्याप्रमाणे नियम अधिसूचित करण्यातील विलंबामुळे वास्तव्या शेजारील शाळांच्या आस्थापनेसाठी GOI यांनी अर्थसंकल्प मंजूर केला नाही तसेच गणवेश वाटप झाले नाही, RTE कायद्या अंतर्गत आवश्यक असलेले खासगी शाळांमधील जागा आरक्षण होऊ शकले नाही.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासनस्तरावर शैक्षणिक वर्षातील प्रतिपुर्ती करण्यात येते. गणवेश वाटपाबाबत सर्व शाळांना सूचना देण्यात येईल.

सन २०११-१२ मध्ये RTE नुसार २५% जागांवर प्रवेश देण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी संबधित शाळांना सूचना दिलेल्या होत्या. तथापि, काही २५% जागांवर मुलांना प्रवेश दिले नाहीत. सर्वसाधारण मुलांना प्रवेश दिले. त्यामुळे खाजगी शाळातील जागा भरल्या गेल्या नाहीत.

- मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराचे संनियंत्रण करण्यासाठी जुलै, २००७ मध्ये MSCPCR ची स्थापना करण्यात आली. RTE कायद्यांतर्गत असलेल्या हक्कांचे संरक्षण तपासण्यास व त्याचा आढावा घेण्यास ते बांधिल होते. आयोगाचे अध्यक्ष आणि सहा सदस्य यांची नेमणूक डिसेंबर, २००८ मध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली. परंतु आयोगाचा हा कालावधी डिसेंबर, २०११ मध्ये समाप्त झाल्यावर GOM ने अध्यक्ष व इतर सदस्य यांची नोव्हेंबर, २०१४ पर्यंत पुनःश्च नेमणूक केली नाही. MPSP यांच्या सह संचालकांनी असे नमूद केले की, अध्यक्ष व सदस्यांचा ठराविक कालावधी समाप्त झाल्यावर अध्यक्ष पदाचा भार महिला व बाल विकास विभागाच्या (W&CD) प्रधान सचिवांकडे सोपविण्यात आला होता. W&CD च्या प्रधान सचिवांकडे MSCPCR च्या अध्यक्ष पदाचा कार्यभार सोपविणे अयोग्य होते जे या अहवालाच्या परिच्छेद २.१.६.१ मध्ये दर्शविले आहे.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्रशासनाने बालहक्क संरक्षण आयोग, अधिनियम, २००५ दिनांक २० जानेवारी २००६ रोजी प्रकाशित केला. त्यानुसार बालकांचे हक्कांचे संरक्षण याकरीता सामाजिक जागृती करण्यासाठी शासनाच्या निर्णयान्वये राज्यात बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना, महिला व बाल विकास विभागाच्या क्र. बाहआ-२००६/प्र.क्र.१३८/का-३ दिनांक २४ जुलै २००७ या शासन निर्णयान्वये करण्यात आली. आयोगाची जबाबदारी सदर कायद्याच्या अनुषंगाने बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, बाल हक्काचे राज्यात प्रचार व प्रसिद्धी करणे ही आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेमार्फत सर्व शिक्षा अभियानांतर्गत बालहक्क संरक्षण आयोगास उक्त अधिनियमाच्या अधीन राहून बालकांचे हक्क संरक्षणाच्या अनुषंगाने करावयाच्या प्रचार व प्रसिद्धीकरिता व अनुषंगिक इतर कार्यवाहीबाबत तरतूद उपलब्ध केली जाते. सद्यःस्थितीत आयोगाचे प्रशासकीय अधिकारी व सदस्य पदे रिक्त आहेत.

नियोजन

नियोजनासाठी SSA च्या कार्यचौकटीत सर्व समावेशक दृष्टीकोन अभिप्रेत आहे. प्रत्येक शाळेने शाळा विकास आराखडा (SDP) तयार करणे आणि डेटा कॅप्चरींग फॉरमॅट मध्ये माहिती देणे आवश्यक आहे, ज्याचे संकलन गट साधन केंद्रात होते. संकलित माहिती तद्नंतर जिल्हा

वार्षिक कार्यनियोजन व अर्थसंकल्प (AWP & B) तयार करण्यासाठी जिल्ह्यांना पाठविली जाते. जिल्ह्यांच्या AWP&Bs च्या आधारे राज्याची AWP & Bs महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद संकलित करते आणि ती संमतीसाठी व निधी मुक्ततेसाठी केंद्र शासनास पाठविली जाते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

शाळा विकास आराखडे तयार न करणे

RTE कायद्याच्या कलम २१ व २२ अन्वये प्रत्येक शासकीय व अनुदानित शाळांनी शाळा व्यवस्थापन समिती (SMC) स्थापन करणे आवश्यक आहे. SDP बनविण्यासाठी SMC जबाबदार असते जी अनुदान मुक्ततेची मूलभूत गरज असते. SDP हा विस्तृत स्वरुपाचा लघु-नियोजनाचा अभ्यास आहे. ज्यात सर्व आवश्यकता अंतर्भूत होतात, जसे पायाभूत सुविधा, पुस्तके, गणवेश, वाहतूक, निधी इत्यादी हयामध्ये, शाळा-बाहय मुलांच्या शोधासाठी कौटुंबिक सर्वेक्षण, त्यांचा शाळेतील सहभाग असहभाग, शैक्षणिक सुविधांच्या वाढीसाठीचे प्रस्ताव ह्यांचा देखील अंतर्भाव असतो. RTE नियमांच्या नियम १४ अन्वये SDPs या त्रैवार्षिक योजना असावयाच्या होत्या ज्यात तीन वार्षिक उप-योजनांचा समावेश असणे आवश्यक होते, ज्यामधून प्रत्येक वर्षाकरिता इयत्ता-निहाय नावनोंदणी, अतिरिक्त शिक्षकांसाठी निधीची आवश्यकता, मुलभूत सुविधा व सामग्री, शाळा-बाह्य मुलांसाठी विशेष प्रशिक्षण, अपंगत्व असलेल्या मुलांचे शैक्षणिक पुनर्वसन इत्यादी दर्शविले जाते.

सन २०१२-१३ मध्ये ८८,२९४ शासकीय व अनुदानित शाळांपैकी १०,१५८ शाळांनी (११.५०टक्के) SDP बनविले नव्हते असे लेखापरिक्षेत आढळून आहे. सन २०१३-१४ मध्ये ८८,५८४ शासकीय व अनुदानित शाळांपैकी १२,९७० शाळांनी (१४.६४ टक्के) SDPs बनविले नव्हते. निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये २०१२-१३ मध्ये २७,४३६ शाळांपैकी ३,१९४ शाळांनी आणि २०१३-१४ मध्ये २७,७३१ शाळांपैकी ४,६८६ शाळांनी SDPs बनविले नव्हते. त्यायोगे, २०१२-१३ मध्ये ११.५० टक्के शाळांचे तसेच २०१३-१४ मध्ये १४.६४ शाळांचे SDPs हे त्या वर्षाकरीताच्या AWP & Bs मध्ये समाविष्ट झाले नाहीत आणि त्यामुळे SSA चा अर्थसंकल्प खासकरून शाळाबाहय तसेच विशेष काळजीची आवश्यकता असलेल्या मुलांसाठी त्याप्रमाणात तुटीचा राहीला.

MPSP च्या सहसंचालकांनी असे सांगितले (नोव्हेंबर २०१४) की च्क्द तयार करणे सर्व शासकीय आणि स्थानिक संस्थांच्या शाळांना बंधनकारक आहे आणि RTE कायदा २०१२ च्या दुरुस्ती नुसार अनुदानित शाळांना SDPs बनविणे बंधनकारक नाही. सन २०१५-१६ चा AWP & B तयार करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक MPSP, यांनी नोव्हेंबर, २०१४ मध्ये सर्व महानगरपालिका आयुक्तांना आणि ZPs च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यांना अधिनस्त असलेल्या अनुदानित शाळांकडून माहिती गोळा करण्यास सांगितले असल्यामुळे उत्तर स्वीकारण्यायोग्य नाही. यावरुन हे स्पष्ट होते की अनुदानित शाळांनी SDP तयार न केल्यास होणाऱ्या परिणामांबाबत MPSP सजग होते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार विनाअनुदानित शाळा वगळता अन्य शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे व त्या समितीने शाळा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. या अधिनियमात केंद्र शासनाने दुरुस्ती करून अनुदानित शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती केवळ सल्लागार स्वरुपाची (Advisory) राहील अशी तरतूद केली आहे. याप्रमाणे राज्य शासनाच्या २०११ च्या नियमामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे. अनुदानित शाळांना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळाप्रमाणे मूलभूत सुविधासाठी निधी देण्यात येत नाही. त्यामुळे U-DISE डाटानुसार अनुदानित शाळांना मूलभूत सुविधा देण्याचा व त्यासाठी शाळा विकास आराखडा बनविण्याचा प्रश्न येत नाही. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शाळा व्यवस्थापन समितीने शाळा विकास आराखडा तयार करणे आवश्यक असून त्याबाबत MPSP कडून निदेश देण्यात आले आहेत.

वार्षिक कार्य आराखडा आणि अर्थसंकल्पातील त्रुटी

RTE कायद्यान्वये UEE साठी AWP & B हा विस्तृत अभ्यास असून तो केवळ SSA पुरताच मर्यादीत नाही तर तो इतर केंद्रीय योजनांसाठी आवश्यक आहे जसे, पूर्ण स्वच्छता अभियान, पेय-जल अभियान, पोषण आहार इत्यादी. AWP & B मध्ये उपलब्धता, समन्याय, धारणशक्ती व गुणवत्ता यांच्याशी संबंधीत विविध कार्ये, जी येणाऱ्या वर्षामध्ये हाती घ्यायची आहेत तसेच अर्थसंकल्पीय उद्दीष्ट पूर्तीसाठी निधीची आवश्यकता अंतर्भूत आहे. AWP & Bs ची सन २०१०-१४ या वर्षासाठी तपासणी केली असता खालील त्रुटी आढळून आल्या :—

शासकीय शाळेतील सर्व मुलांसाठी AWP & Bs अतंर्गत शालेय गणवेषाची तरतूद केली नव्हती. ते फक्त अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), आणि दारिद्रय रेषेखालील प्रवर्गातील सर्व मुला-मुलींसाठी पुरवण्यात आले होते. तसेच, शासकीय शाळांसाठी लेखन साहित्याची कोणतीही तरतूद AWP & Bs मध्ये करण्यात आली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्राची निर्मिती ही सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निकष (norms) च्या आधारे केली जाते. सदर निकषामध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत गणवेश योजना शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या सर्व मुली, अनुसूचित जातीचे मुले, अनुसूचित जामाती मुले व दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले यांनाच अनुज्ञेय आहे. यामुळे उपरोक्त प्रवर्ग वगळता इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना अनुज्ञेय नाही. यामुळे उर्वरित प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी गणवेशाची तरतूद केली जात नाही.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत गणवेश योजनेखाली लेखन, साहित्य देण्याबाबत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निकषामध्ये नमूद नाही. यामुळे लेखन साहित्याबाबत तरतूद केली जात नाही.

- नवीन शाळा स्थापण्यासाठी अंतर तालिका तयार करणे आणि नाव नोंदणीचा कल लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच त्या परिसरातील लोकसंख्या आणि अस्तित्वात असणाऱ्या जवळील शाळा विचारात घेणे आवश्यक आहे. परंतु सन २०१२-२०१३ साठी २८ जिल्ह्यांतील ४९० नवीन प्राथमिक शाळा स्थापन करण्याचा समावेश असलेला MPSP चा AWP & Bs केंद्र शासनाने नाकारला कारण समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांमधील नामांकन क्षमतेची माहिती, खाजगी अनुदानित/विना अनुदानित शाळांची माहिती शाळा स्थापण्यासाठी नियोजनावेळी विचारात घेतली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३च्या अंदाजपत्रकात राज्यातील २८ जिल्ह्यातील ४९० प्राथमिक शाळाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावातील शाळा नाकारण्याचे मुख्यत: कारण कमी झालेली पटसंख्या हे ही होते. त्याचप्रमाणे समाज कल्याण विभागाच्या शाळांमध्ये बहुतांशी प्रवेश ही मागासवर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येतो. त्यामुळे सर्व मुलांच्या प्रवेशाच्या दृष्टीने समाज कल्याण विभागाच्या शाळांचा विचार करण्यात आलेला नाही. शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट २०१२ नुसार मराठी माध्यमांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा सुरू करण्याबाबत शासनाने बृहत आराखडा तयार केला असून त्यानुसार राज्यात ग्रामीण भागात प्राथमिक अथवा उच्च प्राथमिक शाळांची सोय नसलेल्या ठिकाणी मराठी माध्यमाच्या नवीन प्राथमिक अथवा उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करणेबाबत सूचना असून त्यानुसार सदरच्या शाळा सुरू करण्यापूर्वी त्याठिकाणी मराठी माध्यमाची अन्य उच्च प्राथमिक शाळा सुरू नाही वा अशा शाळांची निकड असल्याची खात्री करावी. तसेच शाळा सुरू केल्याचा अहवाल शिक्षण संचालक (प्राथमिक) मार्फत शासनास सादर करण्याबाबत स्पष्ट सूचना आहेत.

सदर शासन निर्णयाची नोंद पुढील वर्षीच्या अंदाजपत्रकात सन २०१३-१४ मध्ये घेण्यात आली असून सन २०१३-१४ पासून केंद्र शासनाकडे सर्व शिक्षा अभियान अतंर्गत नविन प्राथमिक शाळा सुरू करण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही.

- राज्याचा २०१०-१४ चा AWP & B तयार करताना MPSP ने फक्त SSA चा निधी पुरवठा विचारात घेतला आणि संपूर्ण स्वच्छता अभियान, पेयजल अभियान, पोषण आहार, माध्यान्ह आहार इत्यादी केंद्रीय योजना, ज्या शाळांमध्ये मुलभूत सुविधा पुरवित होत्या (प्रसाधनगृह, पेयजल, स्वयंपाकगृहे इ.) या विचारात घेतल्या नव्हत्या. परिणामत: राज्याचा AWP & Bs तेवढ्या प्रमाणात तर्कसंगत नव्हता.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात येतात. दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी शाळांमध्ये उपलब्ध, सुविधांबाबतच्या माहितीच्या आधारे सर्वेक्षण करून U-DISE Data प्रणालीमध्ये माहिती भरण्यात येते. त्यानुसार सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये U-DISE Data नुसार बांधकामे प्रस्तावित करण्यात येतात.

केंद्र शासनाकडून प्राधान्याने नवीन प्राथमिक शाळा इमारत, वर्गखोली बांधकामे, शहरी व ग्रामीण भागांमध्ये मुलांकरिता व मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, आवार भिंत, विद्युतीकरण, शाळांची मोठी दुरुस्ती इ.बांधकामे प्राधान्य क्रमाने एकूण वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये ३३% मर्यादेत मंजूर करण्यात येतात. यानुसार सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निकषानुसार सन २०१०-१४ चा

AWP & B तयार करताना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांना मुलभूत सुविधा प्रस्तावित केल्या आहेत.

संपूर्ण स्वच्छता अभियान, पेयजल अभियान, पोषण आहार, माध्यान्ह आहार इत्यादी योजना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत अंतर्भूत करण्यात येत नसल्याने या योजनाचा अंतर्भाव सर्व शिक्षा अभियान अंतर्गत करण्यात आलेला नाही. तथापि सर्व शिक्षा अभियान अंतर्गत नविन प्राथमिक शाळा बांधकामांमध्ये स्वयंपाकगृह बांधकामाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

वित्तीय व्यवस्थापन

सचिव, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प मान्यता मंडळ AWP&ए ला मान्यता देते. मान्यता प्राप्त होताच निधी दोन हप्त्यांमध्ये MPSP ला परस्पर मुक्त केला जातो. ज्याचा पहिला हप्ता एप्रिल व दुसरा सप्टेंबर मध्ये असतो. निधी पुरविण्याच्या व्यवस्थेनुसार केंद्र व राज्य शासन यांचा हिस्सा ६५:३५ प्रमाणात असतो. . १३ व्या वित्त आयोगाने राज्याला प्राथमिक शिक्षणासाठी बहाल केलेले सहाय्यक अनुदान GOI यांनी AWP&ए अंतर्गत नियत व्ययामधून कमी केले. वर्षारंभी उपलब्ध असलेल्या निधी आणि इतर जमा या देखील ६५:३५ प्रमाणात निधी वितरीत करण्यापूर्वीच मंजूर नियत व्ययामधून GOI/GOM यांनी कमी केल्या. आलेख क्ष मध्ये निधीचा ओघ चित्रित केला आहे.

आलेख । : SSA अंतर्गत निधीचा ओघ



अखर्चित शिल्लक

MPSP मधील उपलब्ध निधी, झालेला खर्च आणि प्रत्येक वर्ष अखेर अखर्चित शिल्लक यांची सविस्तर वर्षनिहाय माहिती तक्ता २.२.१ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता २.२.१: उपलब्ध निधी, झालेला खर्च आणि अखर्चित शिल्लक

(रु. कोटीत)

वर्ष	एकूण उपलब्ध निधी	झालेला खर्च	अखर्चित शिल्लक (टक्केवारी)
(१)	(२)	(३)	(४)
२०१०-११	१५६१.३२	१३४८.९०	२१२.४२(१४)
२०११-१२	२०९०.६२	१७३१.३०	३५९.३२(१७)
२०१२-१३	२०२५.६६	१४८८.८२	५३६.८४(२६)
२०१३-१४	१२१०.४१	१०३८.००	१७२.४१(१४)

स्त्रोत : MPSP नी दिलेली माहिती.

तक्ता २.२.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वर्ष अखेरीस लक्षणीय प्रमाणात अखर्चित शिल्लक होती. खर्चातील कमतरता ही मुख्यत: शाळांची मुलभूत सुविधांची अपूर्ण बांधकामे, शाळाबाह्य मुलांना तसेच SMCs पंचायत राज संस्थांच्या सदस्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणातील कमतरता, मौसमी वसतीगृहातील निवासी मुलांच्या राहण्या-जेवणावरचा झालेला कमी खर्च, शिक्षकांच्या नियुक्त्या न झाल्यामुळे झाली होती.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून वर्षनिहाय प्राप्त झालेला निधीचा तक्ता

(रु. कोटीत)

वर्ष	एकूण उपलब्ध निधी	झालेला खर्च	अखर्चित शिल्लक	अंतिम हप्ता प्रत्यक्षात प्राप्त झालेला महिना
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२०१०-११	१५६१.३२	१३४८.९०	२१२.४२	मार्च, २०११ (केंद्र व राज्य शासन)
२०११-१२	२०९०.६२	१७३१.३०	३५९.३२	फेब्रुवारी, २०१२ - केंद्र मार्च, २०१२ - राज्य
२०१२-१३	२०२५.६६	१४८८.८२	५३६.८४	एप्रिल, २०१३ - केंद्र मार्च, २०१३ -राज्य
२०१३-१४	१३२२.३१	९९१.४८	३३०.८२	फेब्रुवारी, २०१४ - केंद्र एप्रिल, २०१४- राज्य

उपरोक्त तक्त्यामध्ये उपलब्ध निधी, झालेला खर्च आणि अखर्चित शिल्लक दर्शविण्यात आलेली आहे. अखर्चित रकमेमध्ये शिल्लक असलेल्या अग्रिमाची रक्कम अंतर्भूत असल्यामुळे तसेच केंद्र / राज्य यांचेकडून मिळणारा त्या-त्या वित्तीय वर्षातील अंतिम हप्ता हा उशिराने प्राप्त झाल्याने उपक्रमावर, विशेष करून बांधकामे, प्रशिक्षणे, शिक्षकांच्या नियुक्त्या न झाल्यामुळे खर्च विहित कालावधीत करता येणे शक्य होत नाही. त्यामुळे अखेरीची शिल्लक जास्त असल्याचे दिसून येते.

• GOM कडून कमी प्रमाणात निधीचे वितरण.

सन २०१०-१४ दरम्यान GOI ने त्यांच्या ६५ टक्के हिश्याचे रु. ४,५६७.७९ कोटी वितरित केले होते. GOM त्यांच्या ३५ टक्के हिश्याचे रु. २,४५९.५७ कोटी वितरित करावयाचे होते. पंरतु GOM फक्त रु. २३२०.०४ कोटी वितरित केले. ज्यामुळे राज्य हिस्सा रु. १३९.५३ कोटींनी कमी वितरीत झाला. MPSP चे सहसंचालक यांनी सांगितले (नोंव्हेंबर २०१४) की, GOM २०१४-१५ दरम्यान, रू.१३९.५३ कोटी वितरित करील.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१३-१४ मध्ये सर्व शिक्षा अभियानासाठी एकूण अंदाजपत्रकीय तरतूद १२,९९,२३.६४(लक्ष) होती. त्यापैकी राज्याचा ३५% हिस्सा रु. ४,५४,७३.२७(लक्ष). सर्व शिक्षा अभियानासाठी White Book मध्ये तरतूद ३,००,८०.०० लक्ष करण्यात आली होती. शासनाने २०१३-१४ मध्ये २,५३,४०.७६ लक्ष तरतूद वितरित केली. White Book मध्ये ३,००,८०.०० लक्ष तरतूद असल्याने, शासनाने १३९.५३ कोटीचा हिस्सा मुक्त केला नाही. सदर निधी पुढील आर्थिक वर्षात वितरित केला आहे.

GOM कडून थकित असलेला निधी हा पुढील आर्थिक वर्षात वितरित केल्याने सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापर्यंत राज्य शासनाकडून कोणाताही थकित निधी येणे शिल्लक नाही.

• GOM कडून निधी वितरणात विलंब.

GOI कडून निधी प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत GOM ने त्यांचा हिस्सा वितरित करावयाचा होता. सन २०१०-१४ दरम्यान GOM कडून रु. १६,१५.९० कोटींचा निधी वितरित करण्यात एक ते पाच महिन्यांचा विलंब झाला होता. ह्या विलंबामुळे २०१०-१४ दरम्यान निधीचा वापर होऊ शकला नाही, ज्यामुळे पुढील वर्षी MPSP कडे उपलब्ध असलेल्या अखर्चित रकमेच्या प्रमाणात GOI यांनी कमी निधी वितरित केला. GOM कडून निधी वितरणात झालेला विलंब हा राज्य लोक लेखा समितीच्या शिफारशींच्या (एप्रिल, २०१२ चा ८वा अहवाल) विरोधात होता. ज्यानुसार राज्याला हिस्सा आगाऊ वितरित करणे बंधनकारक होते. सहसंचालक, MPSP यांनी हा प्रक्रियात्मक विलंब असल्याचे सांगितले (नोव्हेंबर, २०१४).

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

राज्य शासनाच्या निधी वितरणाबाबतची कार्यपद्धती पूर्वी पुढील प्रमाणे अंमलात होती. केंद्र शासनाचा हिस्सा मंजूर झाल्यानंतर प्रकल्प कार्यालयाकडून शासनास राज्य हिस्सा तसेच केंद्र हिस्सा मागणीसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर होणे अपेक्षित असे. याप्रमाणे प्रस्ताव सादर केल्यानंतर सदर विषयाची नस्ती शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत वित्त विभागाच्या अर्थसंकल्प तसेच नियोजन व व्यय विभागांकडे मान्यतेसाठी पाठविली जाते. सदर नस्तीवर वित्त विभागांकडून अर्थसंकल्प अधिनियमानुसार काही आक्षेप घेतले जात. त्याची पूर्तता करणे, फेर नस्ती मंजूरीसाठी सादर करणे यामध्ये किमान १ महिन्याचा कालावधी जात असे व अजूनही तशीच परिस्थिती आहे. त्यानंतर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीचे आदेश शालेय शिक्षण विभागाकडून निर्गमित झाल्यानंतर पुढील प्रमाणे कार्यवाही होत असे.

मंत्रालयीन विभागाकडून आदेशांच्या शाईच्या सहीच्या प्रतींसह BDS प्रणालीवर नियंत्रक अधिकारी, शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना निधी वितरणासाठी उपलब्ध करून देण्यामध्ये किमान ३ ते ५ दिवसांचा कालावधी जात असे. व त्यांचेकडून आदेश निर्गमित करून सदरचा निधी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांना BDS प्रणालीवर उपलब्ध करून दिला जात असे. यासाठी ८ ते १० दिवसांचा कालावधी लागत असे.

शिक्षण संचालक, प्राथमिक, पूणे यांचेकडून BDS प्रणालीवर निधी उपलब्ध झाल्यावर त्या आधारे शिक्षण उपसंचालक, मुंबई हे मंजुरी आदेश निर्गमित करत व आहरण व संवितरण अधिकारी, सहाय्यक शिक्षण उपसंचालक त्यांचेकडून नंतर देयक तयार होई व आहरणासाठी अधिदान व लेखा कार्यालयास सादर केले जाई. यामध्ये पुन्हा ५ ते ६ दिवसांचा कालावधी जात असे.

अधिदान व लेखा कार्यालयाकडून कोणतेही आक्षेप न घेतले गेल्यास ३ दिवसांत अन्यथा ५ ते ६ दिवसांत देयक पारित होऊन ECS द्वारे निधी आहरण अधिकारी यांचे खात्यात जमा केला जाई.

आहरण अधिकारी यांचे खात्यात निधी जमा झाल्यानंतर RTGS द्वारे निधी सर्व शिक्षा अभियानाच्या बँकेच्या बचत खात्यात वर्ग केला जात असे या करिता किमान २ ते ३ दिवसांचा कालावधी जात असे.

उपरोक्त नमूद प्रक्रियेमध्ये राज्य शासनाकडून निधी मंजुरी हाऊन प्रत्यक्ष प्रकल्प कार्यालयास निधी प्राप्त होईपर्यंत जवळ जवळ दोन महिन्यांचा कालावधी व्यतीत होत असे.

आता सन २०१५-१६ पासून शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फतच निधी आहरीत करून प्रकल्प कार्यालयास वितरित केला जात आहे. त्यामुळे वरील प्रमाणे प्रदिर्घ कालावधी लागत नाही.

• निधीचे अपवाहन

कार्यकारी समितीच्या ऑक्टोबर, २०१२ मधील ५५ व्या बैठकीत MPSP ने, सुरू न झालेल्या १.८१६ बांधकामांवरील (२०१०-११ पर्यंत मंजूर झालेली) रु. ५४.९२ कोटी प्रत्यार्पित करण्यासाठी GOI ला प्रस्ताव पाठविण्याचे ठरविले. त्यानुसार MPSP ने ज्या ठिकाणी बांधकामांची सुरुवात झाली नव्हती. त्या २८ जिल्ह्यांना बांधकामांवरील निधी प्रत्यार्पित करण्याचे निर्देश दिले. नोव्हेंबर, २०१३ मध्ये झालेल्या चर्चेदरम्यान GOI यांनी फक्त नवीन प्राथमिक शाळा, गट साधन केंद्रे (BRC), नागरी साधन केंद्र (CRC) यांच्या बांधकामांवरील निधी प्रत्यार्पित करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे MPSP ने रु. ३१.९४ कोटीची ४७४ कामे प्रत्यार्पित करण्याचे पुन:निर्धारित केले. तथापि, लेखापरीक्षणामध्ये असे निदर्शनास आले की, MPSP ने रु. १७.१८ कोटीची २६७ बांधकामांच्या प्रत्यार्पणाचा प्रस्ताव GOI कडे सादर केला होता. (नोव्हेंबर, २०१३) कारण उर्वरित २१७ कामांचे रु. १४.७६ कोटी २१ जिल्ह्यांकडे उपलब्ध नव्हते, जे निधीचे अपवाहन झाल्याचे निदर्शक होते. सह संचालक, MPSP यांनी कोणतेही यथायोग्य उत्तर दिले नाही.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

१६ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये बांधकाम प्रगतीबाबत आढावा घेण्यात आला. या बैठकीमध्ये सन २०१०-११ पर्यंत सुरू न झालेली सर्व बांधकामे तात्काळ रद्द करून निधी तीन महिन्यांच्या आत परत घेण्याच्या तसेच बांधकामाची आवश्यकता असल्यास ती पुढील वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावित करून कार्यकारी समितीची मान्यता घेण्याच्या सूचना कार्यकारी समितीने दिल्या होत्या. त्यानुसार सन २०१०-११ पर्यंत सुरू न झालेली १८१६ बांधकामे व त्याकरिताचा निधी रु. ५४.९२ कोटी समर्पित करणेबाबतचा प्रस्ताव भारत सरकारकडे सादर करण्यात आला होता.

सदरहू १८१६ बांधकामे समर्पित करण्यासंदर्भात सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली येथे केलेल्या चर्चेमध्ये केवळ गट साधन केंद्र, समूह साधन केंद्र तसेच नविन प्राथमिक शाळा बांधकामे समर्पित करावी व मुलांचे, मुलींचे स्वच्छतागृह,

विद्युतिकरण, आवार भिंत ही कामे आवश्यकतेनुसार पूर्ण करावयाची असल्याने सदर बांधकामे समर्पित करू नये अशा चर्चेदरम्यान सूचना देण्यात आल्या. त्यामुळे १८१६ ऐवजी ४७४ बांधकामे व रु. ५४.९२ कोटी ऐवजी रु. ३१.९४ कोटी इतकी रक्कम समर्पित करण्याबाबत सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला. ज्या जिल्ह्यांमध्ये बांधकामे समर्पित करण्याकरिता निधी उपलब्ध आहे अशा जिल्ह्यांची बांधकामे रद्द करून रक्कम समर्पित करण्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत केंद्र शासनाने नवी दिल्ली येथे झालेल्या चर्चेदरम्यान सूचना दिल्या होत्या. यानुसार ४७४ बांधकामांऐवजी २५७ बांधकामे व रु. ३१.९४ ऐवजी रु. १७.१८ कोटी रक्कम समर्पित करण्याचा सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला.

केंद्र शासनाच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या (Project Approval Board) दिनांक ६ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या बैठकीमध्ये सदर २५७ बांधकामे व रक्कम रु. १७.१८ कोटी समर्पित करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. तसेच सदरील बांधकामे अविकसित क्षेत्रातील वंचित बालकांकरिता असून ती राज्याने पूर्ण करावीत व या बांधकामाकरिता अतिरिक्त लागणारा निधी राज्य शासनाने उपलब्ध करावा अशा सूचना दिल्या.

वरिल तपशिलात नमूद केलेली २५७ बांधकामे ही सन २०१०-११ पर्यंत सुरू न झालेल्या १८१६ बांधकामांपैकीच असून त्यावरील रु. १७.१८ कोटी इतकी रक्कम रु. ५४.९२ कोटी इतक्या रकमेपैकीच आहे.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर असलेल्या निधीपैकी जिल्हा स्तरावर गट / शाळा स्तरावर वितरित न झालेला निधी पुढील वर्षी Spill over मध्ये मंजूर करण्यात येतो. यानुसार मंजूर करण्यात आलेला निधी राज्य स्तरावरुन जिल्हा स्तरावर मंजूर कामाच्या व निधीच्या अधिन राहून वितरीत करण्यात येतो व सदरहू निधी जिल्हा स्तरावरुन क्षेत्रीय स्तरावर पुढील कार्यवाहीकरिता वितरित करण्यात येतो. त्यामुळे ही रक्कम जिल्हा स्तरावर दिसून येत नाही.

सदर १८१६ बांधकामे व त्यावरील रक्कम समर्पित करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाने अमान्य केला असल्याने सदर १८१६ बांधकामे पूर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरू असून या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगरपालिका यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रवेश

शाळा प्रवेश हा UIEE चा महत्त्वाचा घटक आहे. वास्तविक अंतर, प्रादेशिक रचना, मूलभूत सुविधा इ. व्यतिरिक्त सामाजिक, आर्थिक आणि भाषिक अटकाव झुगारून मुलांच्या शिकण्यातील सहभाग प्रवेशात अंतर्भूत होता. SSA च्या प्रवेश या घटकामध्ये वास्तव्याशेजारील शाळांची स्थापना, वयानुसार प्रवेश मिळण्यासाठी शाळाबाह्य मुलांचे प्रशिक्षण, वाहतूक सुविधा इ. अंतर्भूत होत्या.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. होय.

वास्तव्या शेजारील शाळांची स्थापना न करणे

RTE नियमांच्या नियम ४ प्रमाणे वास्तव्यापासून शक्यतो एक कि.मी. अंतरात प्राथमिक शाळा बांधणे आवश्यक होते. (उच्च प्राथमिक शाळेसाठी तीन कि.मी.) ज्या शाळेमध्ये ६ ते ११ वर्षे वयोगटातील किमान २० मुले उपलब्ध असून, ती त्या शाळेत नाव दाखल करण्यास इच्छूक आहेत. SSA च्या कार्यचौकटीत वास्तव्याशेजारील शाळांची स्थापना करण्यासाठी शेजार जागांचे किंवा वस्त्यांचे रेखांकन (mapping) केले जाते. लेखापरीक्षणात खालील बाबी आढळल्या :–

- वास्तव्या शेजारील शाळांच्या स्थापनेसाठी आवश्यक क्षेत्रफळ किंवा मर्यादा स्पष्ट करणारे RTE नियम अधिसूचित करण्यास GOM ने केलेल्या विलंबामुळे ९०४ प्राथमिक शाळा स्थापण्याचा आणि १,५७९ प्राथमिक शाळांची डच प्राथमिक शाळेत श्रेणी वाढ करण्याचा GOM नी २०११-१२ मध्ये सादर केलेला प्रस्ताव GOI च्या प्रकल्प संमति मंडळाने नामंजूर केला.
- महाराष्ट्र रीमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर यांनी उपग्रहाद्वारे केलेल्या रेखांकनानुसार ६५१ प्राथमिक आणि १,५७९ उच्च प्राथमिक शाळा स्थापण्याची गरज लक्षात घेऊन GOM ने जून, २०१२ मध्ये बृहत् आराखडा तयार केला होता. स्थापन करण्याच्या ६५१ प्राथमिक आणि १,५७९ उच्च प्राथमिक शाळांपैकी मार्च २०१४ पर्यंत २८२ प्राथमिक आणि २७४ उच्च प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. निवडलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये स्थापित करावयाच्या १९१ प्राथमिक आणि ५५५ उच्च प्राथमिक शाळांपैकी केवळ ४८ प्राथमिक आणि ७२

उच्च प्राथमिक शाळा स्थापित केल्या गेल्या. सह संचालक MPSP यांनी असे सांगितले की, आवश्यक असलेली किमान २० इतकी मुलांची संख्या उपलब्ध नसल्यामुळे शाळा स्थापित करण्यात आल्या नव्हत्या. हे उत्तर RTE नियमात नमूद केलेल्या एकूण नामांकनांचे प्रमाणक विचारात न घेता बृहद् आराखडा बनविण्यात आल्याचे दर्शविते.

- RTE नी आखून दिलेल्या SSA कार्यचौकटीप्रमाणे राज्य सरकारने तीन वर्षाच्या कालावधीत म्हणजेच ३१ मार्च २०१३ पर्यंत वास्तव्या शेजारील शाळा स्थापन करणे आवश्यक होते. परंतु GoM ने २७,६१६ शासकीय शाळांची ३७ (२०,६५७ प्राथमिक आणि ६,९५९ उच्च प्राथमिक) इयत्ता IV ते V आणि इयत्ता VII ते VIII श्रेणीवाढ करण्यास अखेर मे २०१४ मध्ये मंजुरी दिली. याशिवाय एकत्रित जिल्हा माहिती प्रणाली शिक्षण (U-DISE)३८ २०१३-१४ ची लेखापरीक्षा केली असता असे आढळून आले की, सप्टेंबर २०१३ रोजी राज्यातील ६६,४४४ शासकीय शाळांपैकी ३६,७९४ शाळांना (इयत्ता IV पर्यंत) आणि ५,६२१ शाळांना (इयत्ता VII पर्यत) सहा किमी अंतरावर देखील इयत्ता V आणि VIII करीता वास्तव्या शेजारील शाळा उपलब्ध नव्हत्या. या ४२,४१५ शाळेतील २४.८७ लाख मुलांना मोफत प्रवास सवलत देखील न देण्यात आल्याने RTE नियमांचे उल्लंघन झाले होते. निवडलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये १२,०५२ शाळांमध्ये शिकणाऱ्या ७.८२ लाख मुलांना मोफत प्रवास सवलत देण्यात आली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या अधिनियमातील ३८ ची पोटकलमे १ व २ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने दिनांक ११ ऑक्टोबर २०११ रोजीची अधिसूचना पारित केली असून त्यातील भाग ३ मधील १(क) नुसार प्राथमिक शाळा स्थापनेबाबत वस्तीपासून किमान १ किमी परिसराच्या आत व २० बालके असतील, तसेच उच्च प्राथमिकसाठी वस्तीपासून किमान ३ किमी परिसराच्या आत व २० बालके असलेल्या ठिकाणी शाळा स्थापन केली जाईल.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१५-२०१६ पर्यंत ८,३२१ प्राथमिक शाळा मंजूर असून पैकी ७,७१८ इतक्या शाळा सुरू झाल्या आहेत. उर्वरित ६०३ शाळा भारत सरकारकडे समर्पित (Surrender) करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे ७०८ उच्च प्राथमिक शाळा मंजूर असून पैकी ५७५ शाळा सुरू झाल्या आहेत. उर्वरित १०७ शाळा भारत सरकारकडे समर्पित झाल्या असून सदर ७०८ शाळांपैकी २४ उच्च प्राथमिक शाळा स्थापन करण्यासंदर्भात संबंधित जिल्हे धुळे, बीड, नंदूरबार यांच्याशी संपर्क सुरू असून धुळे जिल्ह्याने सन २०१५-२०१६ मध्ये त्यापैकी २ शाळा सुरू केल्या आहेत.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

क्र.	जिल्हा	मंजूर वर्ष	स्थापित न झालेल्या उच्च प्राथमिक शाळा संख्या	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	नंदूरबार		१४	
२	बीड	२०१२-२०१३	५	
३	धुळे		५	७ पैकी २ शाळा २०१५-२०१६ मध्ये सुरू झाल्या आहेत.
		एकूण	२४	

शासकीय शाळेतील प्रवेशाच्या उतरता कल

U-DISE वरील प्रवेशासंबंधी माहितीचे पृथ:करण केले असता असे निदर्शनास आले की, शासकीय व अनुदानित शाळांमधील प्रवेशाचे

प्रमाण २०११-१२ शी तुलना करता २०१३-१४ मध्ये अनुक्रमे ७.६ टक्के आणि तीन टक्के घसरले तसेच ते या कालावधीत खासगी विनाअनुदानित शाळासंबंधात २२ टक्क्यांनी वाढले जे तक्ता २.२.२ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता २.२.२. : प्रवेशातील घट

शाळेचा प्रकार	प्रवेश		घट (-)/वाढ (+)	वाढ/घट यांची टक्केवारी
	२०११-१२	२०१३-१४		
(१)	(२)	(३)	(४)	(५)
शासकीय आणि स्थानिक संस्थांच्या शाळा	६८६०७६०	६३३४७३०	(-)५२६०३०	(-)७.६७
शासकीय अनुदानित शाळा	६४९६०३५	६३००५२०	(-)१९५५१५	(-)३.००
खाजगी विनाअनुदानित शाळा	२८२९०९६	३४४५८१५	(+)६१६७१९	(+)२१.८०

स्त्रोत :- २०११-१२ आणि २०१३-१४ ची U-DISE माहिती २०१०-११ ची माहिती उपलब्ध नव्हती.

विहित अभ्यासक्रम आणि शासकीय शाळांमध्ये वापरल्या जाणाऱ्या पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त काही अधिक पाठ्यपुस्तके खाजगी शाळांकडून वापरली जात होती असे लेखापरीक्षेत आढळून आले. शासनाने, शासकीय शाळांमध्ये कमी प्रमाणात भरती होत असल्याची कारणे तपासून त्यावर योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

शासन परिपत्रक दिनांक ११ डिसेंबर २०१५ नुसार सन २०१६-१७ या वर्षासाठीच्या सर्व शिक्षा अभियान AWP&एB संदर्भात नियोजन करण्यात येणार असून सदर नियोजनानुसार

(१) १०० टक्के मुले पटावर आणणे.

(२) १०० टक्के मुलांची नियमित हजेरी टिकविणे.

(३) १०० टक्के मुलांची ठराविक संपादणूक क्षमता प्राप्त करून घेणे.

या अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे. म्हणजेच सन २०१६-१७ पासून सर्व प्रकारची ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुले नियमित शाळेत दाखल होणार आहेत. त्याचप्रमाणे स्थलांतरित पालकांच्या मुलांना शिक्षण हमी कार्ड देऊन रितसर नोंद केली जाणार आहे. सोबत परिपत्रक व शिक्षण हमी कार्डाची प्रत जोडली आहे.

वयानुरूप समकक्ष वर्गात ३० दिवसांपेक्षा सतत गैरहजर असणाऱ्या मुलांसाठी ३ महिन्यांचे व कधीही शाळेत न गेलेल्या मुलांसाठी ६ महिन्यांचे विशेष प्रशिक्षण देण्यात येते.

विनाअनुदानित शाळांमधील अपर्याप्त आरक्षित जागा

RTE कायद्याच्या कलम १२ नुसार, सरकार अथवा स्थानिक संस्थाकडून ज्या विनाअनुदानित शाळांना कोणत्याही प्रकारची मदत व अनुदान मिळत नाही त्यांनी त्यांच्या वर्ग संख्येच्या कमकुवत वर्गातील आणि विशिष्ट दुर्लक्षित गटातील कमीत कमी २५ टक्के मुलांना इयत्ता १ किंवा शालेय पूर्व वर्गात प्रवेश दिला पाहिजे व त्यांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण पूर्णत्वापर्यंत दिले पाहिजे. त्याचप्रमाणे विनाअनुदानित शाळांनी या मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणावर केलेला खर्च, प्रति-विद्यार्थी सरकारने केलेल्या खर्चाच्या प्रमाणात किंवा वास्तविक प्रति विद्यार्थी खर्च यापैकी जो कमी असेल त्या खर्चाची राज्य शासन प्रतिपूर्ती करेल. लेखा परीक्षेत खालील बाबी निदर्शनास आल्या :-

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

दिनांक १ एप्रिल २०१० पासून राज्यात बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची अंमलबजावणी सुरू झाली. महाराष्ट्र शासनाने माहे ऑक्टोबर २०११ मध्ये महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, २०११ प्रसिद्ध केला. त्याअनुषांगाने महाराष्ट्रात अमंलबजावणी करण्यात आली आहे. या कायाद्याची अमंलबजावणी करतानां व तो समजून घेत असताना त्यामुळे वंचित व दुर्बल गटातील मुलांच्या जागा आरक्षणाची अंमलबजावणी राज्यात सन २०१२ ची अधिसुचना काढण्यात विलंब झाला आहे. या

अधिसुचनाची अंमलबजावणी तसेच या अधिनियमाचा कलम १२ १ (क) समजून घेण्यात वेळ लागला त्यामुळे सन २०१२-१४ मध्ये या प्रवेशास आवश्यकते पेक्षा प्रसिद्धी मिळाली नाही त्यामुळे प्रवेशास विलंब झाला. प्रवेशास विलंब झाला असला तरीही सन २०१२ ते १४ मधील प्रवेशात वाढ होत आहे. तसेच प्रत्येक मूल शिक्षणापासुन वंचित राहू नये यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. महाराष्ट्र एकमेव राज्य यात अग्रेसर आहे. यावर्षी ऑनलाईन प्रवेश प्रकिया ही संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अवलंब करण्यात येणार आहे.

- RTE कायदा जरी एप्रिल २०१० मध्ये अस्तित्वात आला होता तरी विनाअनुदानित शाळांनी आरक्षित जागांसाठी पालन करावयाची पद्धती/प्रकार GOM यांनी मे २०१२ मध्ये अधिसूचित केले ज्यात मार्च २०१३ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यामुळे कमकुवत वर्गातील आणि दुर्लक्षित गटातील मुलांच्या जागा आरक्षणाची अंमलबजावणी राज्यात २०१०-११ आणि २०११-१२ मध्ये होऊ शकली नाही. सन २०१२-१३ आणि २०१३-१४ दरम्यान आरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या एकूण जागांपैकी फक्त ३९ टक्के आणि ४४ टक्के जागाच भरण्यात आल्या. निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची साध्य टक्केवारी २०१२-१४ दरम्यान आणखीनच कमी होती (२५ टक्के आणि ३७ टक्के). सह संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी सांगितले (नोव्हेंबर २०१४) की, अधिक पारदर्शकतेसाठी आरक्षित जागांच्या प्रवेशाची ऑन लाइन पद्धती पथदर्शक स्वरुपात मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि हवेली व पनवेल तालुक्यात अंमलात आणली होती.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ हा कायदा पारित केला असून या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ याप्रमाणे नियम अधिसूचित केले आहेत. सदरचा अधिनियम दिनांक १ एप्रिल २०१० पासून अंमलात आणला आहे.
- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये वंचित व दुर्बल घटकातील बालकांना कलम २ च्या खंड (घ) व (ड) आणि कलम ८ च्या खंड (च) आणि कलम ३८ च्या कलम १ व २ अन्वये प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याकरिता २५% कोट्याअंतर्गत दिनांक २४ मे २०१२ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १५ मार्च २०१३ च्या अधिसूचनेमध्ये परिच्छेद क्र. १ मधील १.१ नुसार २५ टक्के प्रवेशासंबंधी तरतुदी वर्ष २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात विना अनुदानित अल्पसंख्याक शाळा, मदरसा वैदिक पाठशाळा व अल्पसंख्याक व्यवस्थापनाच्या शाळा यांना लागू राहणार नाहीत असे निर्देश आहेत.
- २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया ही बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये, दिनांक १५ मार्च २०१३ च्या अधिसूचनेनुसार, वंचित घटक (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच अपंग बालके) आणि दुर्बल घटकातील एक लाख रुपये पेक्षा कमी कुटुंबांचे उत्पन्न असलेल्या गटातील बालकांसाठी शाळेच्या प्रवेश क्षमतेच्या २५% प्रवेश आरक्षित करण्यात आले आहेत.

सन २०१४-१५ करिता २५% प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन स्वरूपात पालकांना सुलभ व पारदर्शक पद्धतीने प्रवेश घेण्यासाठी पुणे मनपा., पिंपरी चिंचवड मनपा. व हवेली तालुका, मुंबई मनपा., पनवेल पंचायत समिती या कार्यक्षेत्रामध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे.

- GOM ने खर्चाच्या प्रतिपूर्तीचे दर जुलै २०१४ मध्ये अधिसूचित केल्यामुळे १.२६ लाख मुलांना २५ टक्के आरक्षित जागांवर प्रवेश देणाऱ्या २०१२-१३ मधील ८,४८७ विनाअनुदानित शाळांना व २०१३-१४ मधील ९,५०५ शाळांना प्रतिपूर्ती देण्यास विलंब झाला.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

सन २०१२ मध्ये वंचित व दुर्बल गटांना प्रवेश राखून ठेवण्याबाबत अधिसूचना पारित करण्यात आली होती. सन २०११ मध्ये महाराष्ट्र राज्याने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनयिम, २०११ अन्वये अमंलात आणला होता. त्यामुळे सदरच्या प्रवेश प्रक्रियेतील फी प्रतिपुर्ती दर निश्चित करण्याची प्रकिया ही राज्यासाठी नविन असून तिचा अभ्यास करून प्रति विद्यार्थी दर निश्चित करण्याची रीत समजून घेऊन प्रतिपूर्ती दर निश्चित करण्यासाठी विलंब झाला आहे. परंतु सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ मधील दर निश्चित करण्यास विलंब झाला असला तरी सन २०१२-१५ मधील फी प्रतिपूर्ती देण्यास शासन बांधिल आहे. सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये प्रवेश दिलेल्या

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा सन २०१४-१५ मध्ये रु. १९.५ कोटी व सन २०१४-१५ मध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा सन २०१५-१६ मध्ये रु. १४.७० कोटी करण्यात आलेला आहे.

- महाराष्ट्र मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (उपेक्षित गट आणि कमकुवत वर्गातील किमान २५ टक्के मुलांना सुरूवातीला इयत्ता १ किंवा शाळा-पूर्व वर्गात प्रवेश देण्याची पद्धती) नियम २०१३ अनुसार विनाअनुदानीत शाळांमधील कमकुवत वर्ग आणि उपेक्षित गटातील मुलांसाठी आरक्षित जागांवर सामान्य-प्रवर्गातील मुलांना प्रवेश दिला जाता कामा नये. चाचणी तपासणी केलेल्या ठाणे, मुंबई, नागपूर यवतमाळ आणि लातूर जिल्ह्यातील ३० विनाअनुदानित शाळांच्या आरक्षणाबाबतच्या अभिलेख्यांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, या नियमांचे उल्लंघन करीत १४ शाळांमधील १९२ जागांवर २०१३-१४ मध्ये सामान्य प्रवर्गातील मुलांना प्रवेश देण्यात आला होता. राखीव जागांच्या या अपवाहनातून या नियमांचे पालन करण्यावर DEO च्या संनियत्रणातील अपुरेपणा दिसून येतो. विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के आरक्षित जागांवर सामान्य प्रवर्गातील मुलांना प्रवेश न देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्याचे सह संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी सांगितले (नोव्हेंबर २०१४).

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

महाराष्ट्र बालाकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०१३ नुसार दिनांक १५ मार्च २०१३ शासनाच्या अधिसूचनामध्ये नियम ३.३ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे. विनाअनुदानातील शाळांमध्ये २५ टक्के आरक्षित जागांवर सामान्य प्रवर्गातील मुलांना प्रवेश न देण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

- अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांचा राष्ट्रीय आयोग कायदा, २००४ च्या कलम १२ क (ब) अनुसार, जर अभिलेख तपासणीतून, निरीक्षणातून अथवा तपासामधून असे निदर्शनास आले की अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था, अल्पसंख्याक समाजाच्या (भाषिक/धार्मिक) विद्यार्थ्यांना नियमानुसार कोणत्याही शैक्षणिक वर्षात विहित टक्केवारीत प्रवेश देण्यास अपयशी ठरली तर त्या संस्थेला मिळालेला अल्पसंख्याक दर्जा रद्द केला जाऊ शकतो.

चाचणी तपासणी करण्यात आलेल्या तीन विनाअनुदानित शैक्षणिक संस्था ४२, ज्यांना मार्च २०१० आणि एप्रिल २०१३ दरम्यान अल्पसंख्याक दर्जा दिला होता, अभिलेख तपासणीत असे दिसून आले की, २००९-१२ दरम्यान अल्पसंख्यंक जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याची टक्केवारी २.५५ आणि २६ टक्के या दरम्यान होती. अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या शाळांतील अल्पसंख्याकांच्या प्रवेशाची आवश्यक टक्केवारी दर्शविणारे नियम अधिसूचित केले नसल्यामुळे ह्या संस्थांना दिलेला अल्पसंख्याक दर्जा अनियमित असल्याचे दिसते. याशिवाय ह्या अल्पसंख्याक संस्था RTE कायद्याच्या कक्षेबाहेर असल्याने त्यांच्यावर दुर्लक्षित गटातील आणि कमकुवत वर्गातील मुलांना प्रवेश देण्याची बांधिलकी नाही. सप्टेंबर २०१३ पर्यंत राज्यातील ३,९३७ अल्पसंख्याक शाळा विचारात घेता दुर्लक्षित गटातील व कमकुवत वर्गातील लक्षणीय संख्येने मुले RTE कायद्याच्या लाभांपासून वंचित राहिली असतील.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था, अल्पसंख्याक समाजाच्या विदयार्थ्यांना नियमानुसार कोणत्याही शैक्षणिक वर्षात विहित टक्केवारीत प्रवेश देण्यात अपयशी ठरली तर त्या संस्थेला मिळालेला अल्पसंख्याक दर्जा रद्द करण्याबाबत हा विषय अल्पसंख्याक विभागाशी संबंधित आहे.

शाळाबाह्य मुलांची ओळख न पटविणे

RTE कायदा २००९ च्या कलम ४ अंतर्गत जर एखादा सहा वर्षांवरील मुलगा/मुलगी कोणत्याही शाळेत दाखल झाले नसेल किंवा दाखल झाल्यास प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकला नसेल तर त्याला/तिला त्याच्या वयानुरूप इयत्तेत प्रवेश देण्यात येईल. तसेच जेव्हा मुलगा थेट वयानुरूप इयत्तेत दाखल केला जातो, तेव्हा इतरांबरोबरचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी विशेष प्रशिक्षण मिळवण्याचा त्याला हक्क असतो.

लेखा परीक्षेत असे निदर्शनास आले की, (नागपूर वगळता) एकाही जिल्ह्यांत भटक्या तथा दुर्लक्षित मुलांचा शाळेत दाखल करण्यासाठी शोध घेण्यात आला नव्हता. माहे मार्च, २०११ मध्ये राज्याच्या AWP&B चे मूल्यांकन करताना प्रकल्प मान्यता मंडळ, GOI यांच्या असे निदर्शनास आले की, शाळाबाह्य मुलांच्या शोध मोहिमेत विशेषत: नागरी भागात राज्याने पुरेसे प्रयत्न केलेले नव्हते. तसेच त्यांनी बाहेरील राज्यांतून होणाऱ्या स्थलांतरावरही प्रकाश टाकला नाही. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने इतर अशासकीय संस्थांसह मुंबईतील २४ प्रभागांचे सर्वेक्षण केले (नोव्हेंबर २०१२ ते फेब्रुवारी २०१३) आणि ३७,०५९ मुले पदपथावर/रेल्वे फलाटांवर राहत असलेली आढळून आली, हे येथे नमूद करायला हवे.

तसेच २.५३ लाख शाळाबाह्य मुलांना (६१.५५%), नियोजित असूनही सन२०१०-२०१४ दरम्यान विशेष प्रशिक्षण देण्यात आले नाही तर स्थलांतरित कुटुंबातील १.१३ लाख मुलांना (५०.८७%) मोसमी स्वरूपाची वसतीगृह सुविधा सन २०१०-२०१४ दरम्यान देण्यात आली नाही. निवड केलेल्या नऊपैकी सहा जिल्ह्यांमध्ये सन २०१०-२०१४ दरम्यान अर्थसंकल्पित केलेल्या रू.२२.५५ कोटींपैकी रू.५.५७ कोटी खर्चून ओळख पटविण्यात आलेल्या शाळाबाह्य मुलांपैकी केवळ ५१.८३% मुलांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. तद्नंतर डाटा कॅपचरिंग फॉरमॅटमधून गोळा केलेल्या चार जिल्ह्यांच्या माहितीच्या बाबतीत लेखा परीक्षेत असे आढळले की, सन २०१३-२०१४ दरम्यान विशेष प्रशिक्षण दिल्यानंतरही ८,०२४ मुलांना वयानुरूप इयत्तेत प्रवेश दिला गेला नव्हता.

लेखापरीक्षेत असेही निदर्शनास आले की, ११ ते १४ वर्षे वयोगटातील २.३० लाख शाळाबाह्य मुलींना मार्च २०१४ पर्यंत W&CD च्या एकात्मिक बालविकास सेवाकार्यक्रमांतर्गत पूरक पोषण आहार देण्यात आला होता. परंतु शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने २०१४-१५ च्या SSA अंतर्गत AWP&B मध्ये प्रशिक्षणासाठी फक्त १९,७१३ शाळा बाहय मुलींची ओळख पटविली होती. दोन विभागातील (W&CD व SESD) शाळा-बाह्य मुलींची ओळख पटवण्याच्या आकडेवारीतील मोठया तफावतीचा ताळमेळ घालणे आणि योग्य ओळख पटविणे गरजेचे आहे ज्या योगे RTE कायद्यायातंर्गत मुलांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकाराचे रक्षण होईल.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळांच्या दिनांक २ मार्च २०१० रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार डिसेंबर २००६ मध्ये शाळाबाह्य मुलांचे मुंबई वगळता सर्वेक्षण करण्यात आले होते. तद्नंतर पुढील वर्षी करण्यात आलेल्या शाळा बाह्य मुलांच्या सर्वेक्षणात राज्यातील शाळाबाह्य मुलांची संख्या २८००० पेक्षा जास्त नसून मुंबई जिल्ह्यातील एकही शाळाबाह्य मूल नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रकल्प मान्यता मंडळाची बैठक इतिवृत्त सन २०११-१२ मुद्दा क्र. C. सर्वेक्षणातील आकडेवारीमधील तफावत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सन २०१५-१६ पासून पुढील प्रमाणे शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी व्यापक स्वरूपात आराखडा तयार करण्यात आला आहे.

शाळाबाह्य बालकांमध्ये कधीही शाळेत न आलेल्या, मध्येच शाळा सोडलेल्या स्थलांतरित पालकांची बालके, शहरी भागातील वंचित बालके, तसेच विशेष गरजाधिष्ठित बालकांचा समावेश होतो. या सर्व बालकांचा अचूक शोध घेऊन त्यांना नियमित शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याकरिता राज्य शासनाने दिनांक २० मे २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करून राज्यात दिनांक ०४ जुलै २०१५ रोजी एकाच दिवशी शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण करण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार राज्यामध्ये सर्वेक्षण करण्यात आले. तद्नंतर पुन:श्च दिनांक २७ जुलै २०१५ ते ३१ जुलै २०१५ या दरम्यान सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाद्वारा आढळून आलेल्या शाळाबाह्य बालकांना नजिकच्या शाळेत प्रवेश देण्यात येत आहेत. तद्नंतर शासन, स्थानिक प्राधिकरण व स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे काम करून शाळाबाहेरील बालकांना शाळेत आणणे व शाळेत टिकवून ठेवणे या दृष्टीने कार्यवाही करण्यासाठी व्यापक स्वरूपात योजना / आराखडा आयुक्त शिक्षण, शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांच्या स्तरावर आखण्यात आला असून त्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्राचार्य डाएट, शिक्षणाधिकारी (निरंतर), स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी, जिल्हा स्तरावरील NSS Co-ordinator तसेच जिल्ह्यातील इतर अधिकारी व अशासकीय संस्था यांचा समावेश असलेली समिती त्याचप्रमाणे तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विस्तार अधिकारी, अन्य तालुक्यातील अधिकारी, NSS चे प्रतिनिधी व अशासकीय संस्था (ज्या स्वेच्छेने येऊ इच्छितात व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी) यांचा समावेश असलेली समिती शासन पत्र दिनांक ७ डिसेंबर २०१५ अन्वये गठित करण्यात आली असून शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याचे नियोजन विविध बैठका घेऊन करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक २९ डिसेंबर, २०१५ च्या पत्रानुसार सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), सर्व प्रशासन अधिकारी (मनपा/नपा.), शिक्षण निरिक्षक मुंबई (दक्षिण, उत्तर, पश्चिम) यांना जिल्हा व तालुकास्तरावर बैठका घेऊन सर्वेक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या मदतीने रुपरेषा आखण्यासाठी पुढील नियोजन करण्यात आलेले आहे. अशाप्रकारे वर्षभरात वारंवार सर्वेक्षण करण्यात येणार असून त्यामध्ये आढळलेल्या शाळाबाह्य बालकास नियमित शाळेत प्रवेश देण्यात येणार असून त्यांचा उल्लेख सरल प्रपत्रात करण्यात येणार असून त्यांना त्यातील नंबर ही प्रदान केला जाणार आहे.

शासन परिपत्रक दिनांक ११ डिसेंबर २०१५ नुसार सन २०१६-१७ या वर्षासाठीच्या सर्व शिक्षा अभियान AWP&B संदर्भात नियोजन करण्यात येणार असून सदर नियोजनानुसार

(१) १०० टक्के मुले पटावर आणणे.

(२) १०० टक्के मुलांची नियमित हजेरी टिकविणे.

(३) १०० टक्के मुलांची ठराविक संपादणूक क्षमता प्राप्त करून घेणे. या अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे. म्हणजेच सन २०१६-१७ पासून सर्व प्रकारची ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुले नियमित शाळेत दाखल होणार आहेत. त्याचप्रमाणे स्थलांतरित पालकांच्या मुलांना शिक्षण हमी कार्ड देऊन रितसर नोंद केली जाणार आहे. सोबत परिपत्रक व शिक्षण हमी कार्डाची प्रत जोडली आहे. वयानुरूप समकक्ष वर्गात ३० दिवसांपेक्षा सतत गैरहजर असणाऱ्या मुलांसाठी ३ महिन्यांचे व कधीही शाळेत न गेलेल्या मुलांसाठी ६ महिन्यांचे विशेष प्रशिक्षण देण्यात येते.

शाळांमधील मूलभूत सुविधांचा विकास :–

SSA अंतर्गतच्या मुलभूत सुविधांच्या विकासामध्ये नवीन शाळांचे बांधकाम, अतिरिक्त वर्ग, प्रसाधनगृहे, संरक्षण भिंती, विद्युतीकरण आणि BRCs, CRCs इ. चे बांधकाम यांचा समावेश होतो. बांधकामांसाठीचा निधी ZPs आणि महानगरपालिकांकडून थेट SMSs ना वितरीत करण्यात येतो.

सन २०१०-११ ते २०१२-१३ दरम्यान AWP&B प्रमाणे राज्यातील मंजूर झालेली बांधकामे, पूर्ण झालेली कामे, प्रगतिपथावरील कामे आणि महानगरपालिकाकडून थेट SMCs ना वितरित करण्यात येतो.

कालावधी	मंजूर झालेलेली कामे		पूर्ण झालेली कामे		प्रगतीपथावरील कामे		सुरू न झालेली कामे	
	भौतिक	आर्थिक रु. कोटीत	भौतिक	आर्थिक रु. कोटीत	भौतिक	आर्थिक रु. कोटीत	भौतिक	आर्थिक रु. कोटीत
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)
२०१०-२०११	२२,७१९	५४९.८४	२०,७५३	४९५.४७	८६९	२९.२६	१,०९७	२५.११
२०११-२०१२	२०,४९६	७४९.८९	१७,५१५	६३१.९५	२३०२	९३.६४	६७९	२४.३०
२०१२-२०१३	४३,६५६	५९५.४१	२८,२४९	४०४.००	७,७४७	११८.९७	७,६६०	७२.४४
एकूण . .	८६,८७१	१,८९५.१४	६६,५१७	१,५३१.४२	१०,९१८	२४१.८७	९,४३६	१२१.८५

स्त्रोत :- MPSP यांनी दिलेली माहिती.

टीप.— सन २०१३-१४ दरम्यान कोणतेही काम मंजूर झालेले नव्हते.

तक्ता २.२.३ वरून असे दिसून आले की, GOI यांनी २०१०-१३ दरम्यान मंजूर केलेल्या एकूण ८६,८७१ कामांपैकी केवळ ६६,५१७ कामे पूर्ण झाली होती. (७६ टक्के) १०,९१८ कामे प्रगतीपथावर होती (१३ टक्के) आणि ९,४३६ कामे सुरू झाली नव्हती (११ टक्के).

सहसंचालक, MPSP यांनी असे सांगितले की, मंजूर झालेल्या एकूण ८६,८७१ कामांपैकी ७१,८९० कामे (८३ टक्के) आणि सप्टेंबर, २०१४ पर्यंत पूर्ण झाली आहेत आणि उर्वरीत कामे (प्रगतीपथावरील व सुरू न झालेली) मार्च, २०१५ पूर्वी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१०-११ ते २०१२-१३ पर्यंत विविध मुलभूत सुविधांचे ८६८७१ भौतिक लक्ष्य मंजूर होते. केंद्र शासनाने स्वच्छतागृह बांधकाम भौतिक लक्ष्याचे पुनर्विनियोजन केल्यामुळे सन २०१० ते २०१३ पर्यंत एकूण मंजूर भौतिक लक्ष्य ८५,२९१ यानुसार आहे.

सदरहू बांधकामे जागेची अनुपलब्धता (वन जमीन/ गायरान जमीन / आरक्षित जमिन), अतिदुर्गम भाग, पाण्याची टंचाई इत्यादी कारणास्तव त्या त्या वर्षी भौतिक लक्ष्याच्या प्रमाणात पूर्ण करता आलेली नाहीत.

तथापि, सदर ८५,२९१ बांधकामांपैकी सद्यःस्थितीत ८२,५९० बांधकामे पूर्ण झालेली असून १,३५९ बांधकामे प्रगतीपथावर आहे व १,२६८ सुरू झालेली नाहीत. प्रगती पथावरील व सुरू न झालेली सर्व बांधकामे ३१ मार्च २०१६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व सर्व आयुक्त, महानगरपालिका यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

• **SSA प्रमाणकांचे उल्लंघन करून केलेली कामे -**

एखादया कामासाठी विशेष संकल्प चित्राची आणि तांत्रिक कौशल्याची आवश्यकता असल्याखेरीज बांधकामासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात येऊ नये अशी SSA च्या कार्यचौकटीत तरतूद आहे. लोकसमुहानी SMCs च्या माध्यमातून कामे करावयाची असतात. त्याचप्रमाणे, बांधकामांच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी विविध स्तरावर ४५ त्रयस्थ मूल्यमापनाद्वारे (TPE) तांत्रिक गुणवत्तेचे स्वतंत्र निर्धारण करणे बंधनकारक होते, SSA प्रमाणकांचे उल्लंघन केल्याचे लेखापरीक्षेत खालीलप्रमाणे निदर्शनास आले :-
–

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भारत सरकारच्या निर्देशानुसार सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधकामे शाळा व्यवस्थापन समिती मार्फत करण्यात येतात. सदरील बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर संबंधित शाळा व्यवस्थापन समितीशी करार करून निधी वितरीत करण्यात येतो. सदरील करारामध्ये बांधकामाचे कंत्राट न देण्याची अट आहे.

शाळा व्यवस्थापन समितीला वितरीत करण्यात आलेल्या अग्रिमाचे समायोजन प्रत्यक्ष बांधकाम साहित्य खरेदी, मजुरीकरिताचा खर्च, इ. अनुषंगिक खर्चानुसार करण्यात येते. अपवादात्मक परिस्थितीमध्ये कंत्राटदार नेमणूकीस पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. पूर्व परवानगीशिवाय कंत्राटदाराची शाळा व्यवस्थापन समितीने नेमणूक करता येऊ शकत नाही.

• दोन जिल्ह्यात १३८ पैकी सात चाचणी तपासणी केलेल्या शाळांमध्ये रु. १.३९ कोटीचे २९ अतिरिक्त वर्गखोल्यांचे आणि १६ प्रसाधनगृहांचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली होती

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१०-११ मधील बांधकाम गुणवत्ता तपासणीकरिता विभागनिहाय सल्लागार अभिकरणाची नेमणूक करण्यात आलेली आहे. सल्लागार अभिकरण यांच्यासोबत १२ महिन्यांकरिता गुणवत्ता तपासणीकरिता करार करण्यात आलेला आहे. सदर करार कालावधीमध्ये पूर्ण झालेल्या बांधकामांची व प्रगतीपथावरील बांधकामाची गुणवत्ता तपासणी करण्यात आलेली आहे. तथापि करार कालावधीमध्ये सुरू न झालेल्या बांधकामाची गुणवत्ता तपासणी करण्यात आलेली नाही. करार कालावधीनंतर सुरू झालेल्या बांधकामाची जिल्हास्तरावरून आकस्मिक खर्चामधून बांधकाम साहित्य चाचणी करण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार बांधकाम गुणवत्ता तपासणी करता येऊ शकते.

• २०१०-११ दरम्यान TPE साठी दिल्या गेलेल्या राज्यातील १६,२५२ बांधकामांपैकी १०,२१९ कामांच्या बाबतीत (६३ टक्के) TPE त्या कामांच्या पूर्णत्वानंतर करण्यात आले होते. त्याचप्रमाणे ५०,२६५ कामांच्या TPE चे काम शासकीय तंत्रनिकेतन आणि शासकीय अभियांत्रिकी विद्यालयांना MPSP तर्फे ही कामे पूर्ण झाल्यावरच (२०११-१३) देण्यात आले होते. (सप्टेंबर, २०१३)

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मा. कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ रोजीच्या ५५ व्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार सन २०११-१२ व २०१२-१३ अंतर्गत मंजूर असलेल्या बांधकामाचे गुणवत्ता तपासणी करण्यासाठी शासकीय / अनुदानित तंत्र निकेतन व शासकीय / अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय यांची नेमणूक करण्याचे आदेश शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर २०१३ अन्वये दिले आहेत. सदरील बांधकाम गुणवत्ता तपासणीकरिता जिल्हास्तरावर अधिकार देण्यात आले असून त्याप्रमाणे जिल्ह्याने संबंधित शासकीय तंत्र निकेतन / अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संमतीनुसार करार केलेला आहे. त्याप्रमाणे संबंधित शासकीय तंत्रनिकेतन / अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यामार्फत बांधकाम गुणवत्ता तपासणी करण्यात आली आहे.

मूलभूत सुविधा तयार करण्यातील त्रुटी -

सन २०१३-१४ साठी ६६,४४४ शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या U-DISE मध्ये संकलित केलेल्या सप्टेंबर २०१३ च्या माहितीचे लेखापरीक्षेत विश्लेषण केले असता पुढील बाबी आढळल्या :—

• ८४ शाळांमध्ये मुले/ मुली/ शिक्षक यांच्यासाठी प्रसाधनगृहे उपलब्ध नव्हती. चाचणी तपासणी केलेल्या १३८ पैकी चार शाळांमध्ये प्रसाधनगृहे उपलब्ध नव्हती.

• ७५६ शाळांमध्ये मुलींकरिता स्वतंत्र प्रसाधनगृह उपलब्ध नव्हते. चाचणी तपासणी करण्यात आलेल्या आठ शाळांमध्ये मुलींकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहे उपलब्ध नव्हती.

• एकूण ६६,४४४ शाळांतील ३,६२,६०१ प्रसाधनगृहांपैकी ५१,३७५ शाळांमधील ८१,३९७ प्रसाधन गृहे (२२ टक्के) वापरात नव्हती.

- २०,८७८ मुलांच्या प्रसाधनगृहात (१७,९७३ शाळा) आणि २०,४१३ मुलींच्या प्रसाधनगृहात (१७,६५५ शाळा) पाण्याची उपलब्धता नव्हती.
- ६८६ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. चाचणी तपासणी केलेल्या शाळांपैकी चार शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती.
- १८,२१८ शाळांमध्ये संरक्षक भिंती बांधल्या नव्हत्या. चाचणी तपासणी केलेल्या शाळांपैकी ४८ शाळांमध्ये संरक्षक भिंती बांधल्या नव्हत्या.
- १४,६२४ शाळांमध्ये खेळाची मैदाने नव्हती. चाचणी तपासणी केलेल्या शाळांपैकी १९ शाळांमध्ये खेळाची मैदाने नव्हती.
- जरी १२,१८३ शाळांपैकी १,८०९ शाळांमध्ये संगणकाची सोय होती, तरी या १२.१८३ शाळांमध्ये विजेचा पुरवठा करण्यात आला नव्हता. चाचणी तपासणी केलेल्या शाळांमधील १४ शाळांमध्ये विजेचा पुरवठा करण्यात आला नव्हता, ज्यापैकी चार शाळांत संगणक दिले होते. त्यामुळे संगणक प्रशिक्षणास प्रतिबंध झाला होता.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

शाळामध्ये उपलब्ध सुविधांबाबतच्या माहितीच्या आधारे सर्वेक्षण करून U-DISE Data प्रणालीमध्ये माहिती भरण्यात येते. त्यानुसार सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये U-DISE Data नुसार बांधकामे प्रस्तावित करण्यात येतात.

केंद्र शासनाकडून प्राधान्याने नवीन प्राथमिक शाळा इमारत, वर्गखोली बांधकामे, शहरी व ग्रामीण भागांमध्ये मुलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, आवार भिंत, विद्युतीकरण, शाळांची मोठी दुरुस्ती इ. बांधकामे प्राधान्यक्रमाने एकूण वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये ३३% मर्यादेत मंजूर करण्यात येतात. सदर बांधकामाकरिता केंद्र शासनाकडून मंजूर निधी व राज्य शासनाचा हिस्सा याप्रमाणे प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेत त्या त्या वर्षी शाळांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

शाळांमध्ये मुलभूत भौतिक सुविधांचे निकष शासन निर्णय दिनांक २९ जून २०१३ अन्वये निश्चित केले आहेत. त्यानुसार शाळांना पक्की संरक्षण भिंत बांधणे शक्य नसल्यास तारेचे / वनस्पतीचे कुंपण करावे तसेच क्रिडांगण नसल्यास नगरपालिका / ग्राम पंचायत/ खाजगी जागा तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करावी असे आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे या भौतिक सुविधांची पुर्तता करता येते.

U-DISE Data सन २०१४-१५ नुसार शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधा पुढीलप्रमाणे आहेत :–

अ. क्र.	मूलभूत सुविधा	शाळांची संख्या	उपलब्ध असलेले	उपलब्ध नसलेले
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	मुलींचे स्वच्छतागृह	६७,६९१	६७,१०२	५८९
२.	मुलींची स्वच्छतागृह	६७,६९१	६७,०२७	६६४
३.	पिण्याच्या पाण्याची सुविधा	६७,६९१	६७,३२३	३६८
४.	संरक्षण भिंत	६७,६९१	५३,४०२	१४,२८९
५.	खेळाचे मैदान	६७,६९१	५७,१०६	१०,५८५
६.	विद्युतीकरण	६७,६९१	५५,५२०	१२,१७१

जिल्ह्याकडून दिनांक १५ ऑगस्ट २०१५ पर्यंतच्या प्राप्त झालेल्या अहवालानुसार शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळेत मुलांकरिता व मुलींकरिता स्वच्छतागृह उपलब्ध असून ३६८ शाळांपैकी १८४ शाळांमध्ये कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची सुविधा व १८४ शाळांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

- एकूण २,५२९ शाळांमध्ये ग्रंथालय नव्हते. विभागातील कर्मचाऱ्यांसोबत लेखापरीक्षेने केलेल्या १३८ शाळांच्या एकत्रित वास्तविक पडताळणीत असे निदर्शनास आले की, जरी ह्या शाळांमध्ये पुस्तके उपलब्ध होती तरी स्वतंत्र ग्रंथालयीन खोल्या उपलब्ध नव्हत्या.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शाळांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय खोली बाबत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तरतूद करण्यात येत नाही.

* सहसचिव, MPSP यांनी सांगितले की, जून २०१३ मध्ये स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे शासकीय आणि अनुदानीत शाळांमध्ये आवश्यक असणा-या मुलभूत संविधांविषयी मानके निश्चित केली आहेत.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

दिनांक २९/०६/२०१३ च्या शासन निर्णयान्वये शाळेमध्ये मुलभूत सुविधा राबवायचे निकष निश्चित केले आहेत.

मुलांची गळती रोखणे

आर्थिक, शैक्षणिक किंवा सामाजिक कारणांमुळे मुलांची शाळांमधून गळती होत असते. गळती थांबविण्यासाठी असलेल्या विविध उपायांमध्ये शालेय गणवेषाची सोय, वाहतूक, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य (TLE) इ.चा समावेश होतो. GOI ने सन २०१०-२०१४ दरम्यान या घटकाखाली रू.१,६१८.१५ कोटींचा नियतव्यय मंजूर केला होता. त्यापैकी रू.१,३६९.१८ कोटी खर्च झाले.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

यु-डाईस माहितीनुसार सन २०१४-१५ मध्ये मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी झाले असून सदर प्रमाण प्राथमिक स्तरावर ०.६४ व उच्च प्राथमिक स्तरावर १.३ टक्के इतके आहे.

EXP OF FTB (Rs in lakh)

SR. No.	YEAR	APPROVED BUDGET	EXPENDITURE	PERCENTAGE
1	2010-11	25706.76	17193.11	66.88
2	2011-12	29445	27174.18	92.29
3	2012-13	25055.12	22748.58	90.79
4	2013-14	24225.31	21993.74	90.79
5	2014-15	23713.76	20628.01	86.99
	TOTAL	128145.95	109737.62	85.63

EXP OF UNIFORM (Rs in lakh)

SR. No.	YEAR	APPROVED BUDGET	EXPENDITURE	PERCENTAGE
1	2010-11	18605.56	10430.53	56.1
2	2011-12	Budget not sanctioned		
3	2012-13	20301.09	15322.8	75.5
4	2013-14	18096.27	14645.75	80.9
5	2014-15	16386.53	15856.12	96.8
	TOTAL	73389.45	56255.2	76.7

पुस्तके आणि गणवेषांचे मोफत वाटप :-

RTE नियमांमधील नियम ५ आर्थिक अडचणी दूर करून मुलांना शाळेत प्रवेश घेता यावा व त्या मुलांनी शाळेत टिकून रहावे यासाठी

शासकीय, अनुदानीत व विना अनुदानित शाळेत जाणाऱ्या मुलांना (फक्त आरक्षित जागांसाठी) मोफत पुस्तके, लिखाण साहित्य आणि गणवेषाचा पुरवठा करण्याची अट नमूद करतो. तसेच, नियम ५ अंतर्गतचे स्पष्टीकरण असे सांगते की, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांना मोफत अनुज्ञेयता पुरविण्याची जबाबदारी शाळांची राहील. SSA च्या कार्ययौकटी प्रमाणे अनुसूचित जाती, अनसुचित जमाती किंवा BPL कुटुंबातील सर्व मुलांना व मुलींना जी शासकीय शाळेत शिक्षण घेत आहेत, शालेय गणवेषाचे दोन जोड देखील पुरवायचे आहेत. लेखापरीक्षेत पुढील गोष्टी आढळल्या.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत -

१) मोफत पाठ्यपुस्तके योजना शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व शासन अनुदानित शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलामुलींसाठी अनुज्ञेय आहे.

२) गणवेश योजना शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या सर्व मुली, अनुसूचित जातीचे मुले, अनुसूचित जामाती मुले व दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांनाच अनुज्ञेय आहे.

३) लेखन साहित्याकरिता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तरतूद मंजूर नाही. उपरोक्त योजना कोणत्याही विनाअनुदानित शाळांसाठी अनुज्ञेय नाही.

*निवडलेल्या चार जिल्ह्यामधील ४७ चाचणी केलेल्या सर्व २६ विनाअनुदानित शाळांनी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात २५ टक्के आरक्षणानुसार प्रवेश घेतलेल्या ४८६ मुलांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशाचे वाटप केले नव्हते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

२५% प्रवेशाबाबत आरक्षण हे विनाअनुदानित शाळांमध्ये दिले जाते. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश योजना कोणत्याही विनाअनुदानित शाळांसाठी अनुज्ञेय नसल्यामुळे सदर शाळांमधील २५% प्रवेशित विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाचा दिलेला नाही.

*MPSP, इयत्ता VIII पर्यंत शिक्षण घेणाऱ्या शासकीय आणि अनुदानित शाळांमधील मुलांसाठी पाठ्यपुस्तके व व्यवसाय-पुस्तिका यांचे मोफत वाटप करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (MSBTB&CR), यांना छपाईचे आदेश देते. सन २०१०-१४ दरम्यान MSBTB&CR यांनी ५७.८१ कोटीपैकी १७.०९ कोटी पुस्तके (२९.५६ टक्के) शालेय वर्ष ४८ सुरू झाल्यानंतर पाठविली. हा विलंब एक ते सहा महिने एवढा होता. परीणामस्वरुप पुस्तकांचे विद्यार्थ्यांना वेळेत वाटप करता आले नाही. सहसंचालक, MPSP यांनी MSBTB&CR यांचेकडून दंड वसूल केल्याचे सांगितले.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

संचालक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ,बालभारती,पुणे यांचेकडून सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीत जिल्ह्यांना विलंबाने केलेल्या पुस्तके पुरवठयाबाबत पुढीलप्रमाणे विलंब शुल्काची आकारणी केलेली असून सदर शुल्क त्यांच्या देयकामधून कपात केलेला आहे.

अ.क्र.	सन	विलंब शुल्क (रु.)
१	२०१०-११	७०,७०,६६०
२	२०११-१२	७८,१६,९९३
३	२०१२-१३	३,६२,३७,७४४
४	२०१३-१४	२,७९,४४,६१८
५	२०१४-१५	७२,१८,९२५

*एप्रिल, २०१० मध्ये RTE कायदा लागू झाल्यावर MPSP यांनी २०१०-११ चा पूरक AWP & B सादर केला. इतर बाबींबरोबर AWP & B मध्ये ४६.५१ लाख मुलांसाठी १८६.०५ कोटीचे शालेय गणवेष घेण्याचे नमूद केले होते. पूरक AWP&B मंजूर करताना

(ऑक्टोबर, २०१०), GOI यांनी राज्यातील RTE नियमात गणवेषासाठी तरतूद करण्यास Gom ला सांगितले. परंतु, GOI ने राज्याचे RTE नियम ऑक्टोबर, २०११ मध्ये बनविले. परीणामस्वरुप AWP & B मध्ये २०११-१२ साठी ५७.२६ लाख मुलांसाठी रु. २०४.५८ कोटी प्रक्षेपित किंमतीची गणवेषांची आवश्यकता GOI ने मंजूरकेली नाही (मार्च २०११). सहसंचालक, MPSP यांनी सांगितले की, २०१०-११ च्या पूरक AWP&B मध्ये GOI ने केलेली तरतूद (मार्च २०११ मध्ये प्राप्त) पात्र मुलांना गणवेष वाटपासाठी वापरण्यात आल्यामुळे कोणताही पात्र विद्यार्थी गणवेषाच्या लाभापासून वंचित राहीला नाही. हे उत्तर स्पष्टपणे दर्शविते की, २०११-१२ मध्ये गणवेषासाठी पात्र असलेले १०.७५ लाख विद्यार्थी (५७.२६ लाख - ४६.५१ लाख) ज्यांना गणवेष पुरवठा करावयाचा होता ते या लाभापासून वंचित राहिले होते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

GoI यांनी राज्यातील RTE नियमात गणवेषासाठी तरतूद करण्यास GoM ला सांगितले. परंतु, GoM ने राज्याचे RTE नियम ऑक्टोबर, २०११ मध्ये बनविले. परीणामस्वरुप AWP&B मध्ये २०११-१२ साठी ५७.२६ लाख मुलांसाठी ४ २०४.५८ कोटी प्रस्तावित किंमतीची गणवेषांची आवश्यकता GoI ने मंजूर केली नाही. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत गणवेश योजना सन २०१०-११ ही सन २०१०-११ च्या पुरवणी अंदाजपत्रकामध्ये मंजूर करण्यात आली. मात्र सदर योजनेकरिता निधी मार्च, २०११ अखेर प्राप्त झाला असून मार्च, २०११ अखेर सदर निधी जिल्हा स्तरावर वर्ग केलेला होता.

एप्रिल, २०११ पासून नविन आर्थिक वर्ष (२०११-१२) सुरू झाल्यानंतर सदर आर्थिक वर्षात सन २०१०-११ च्या गणवेशाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सन २०११-१२ मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कोणताही निकष पात्र विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिलेला नाही.

*GOM ने २०१२-१३ आणि २०१३-१४ या वर्षाच्या AWPBs मध्ये लेखन साहित्याची तरतूद केली नव्हती. परिणामी, २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये शासकीय शाळेत प्रवेश घेतलेली अनुक्रमे ६६.०४ लाख आणि ६३.३४ लाख मुले लेखन साहित्याच्या लाभापासून वंचित राहिली होती. सहसंचालक, MPSP यांनी सांगितले की, लेखन साहित्यासाठी SSA अंतर्गत कोणतीही अर्थसंकल्पीय तरतूद केली नव्हती. हे उत्तर स्विकारण्यायोग्य नाही कारण SSA अंमलबजावणीची कार्य चौकट (परिच्छेद २.६.१) स्पष्टपणे नमूद करते की, राज्याच्या RTE नियमांत नमूद केलेल्या सर्व अनुज्ञेयता शालेय प्रवेशातील आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी पुरविण्यात याव्यात.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

मुलांचा माग घेणाऱ्या पद्धतीची कमतरता :-

RTE कायद्याच्या अटीप्रमाणे प्रत्येक मुलाच्या प्राथमिक शिक्षणातील प्रवेशाचे हजेरीचे आणि पूर्णत्वांचे संनियंत्रण व खात्री करणे, समुचित सरकारवर बंधनकारक आहे. तसेच RTE नियमांच्या नियम ६(५)(अ) प्रमाणे शाळेतून गळती होणाऱ्या किंवा एक महिन्यापेक्षा जास्त गैरहजर राहिलेल्या मुलांचा माग घेणाऱ्या योग्य पद्धतीचा विकास करण्यात यावा. लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासनाकडे शाळेत गैरहजर राहणाऱ्या किंवा गळती होणाऱ्या मुलांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी मुलांचा माग घेणारी यंत्रणा उपलब्ध नव्हती. GOM ने माहे मार्च, २०१३ मध्ये शासन निर्णय जारी करून शाळाबाह्य व गळती झालेल्या मुलांचा माग घेण्यासाठी संगणकीय सॉफ्टवेअर प्रोग्राम बनविण्याविषयी शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना सूचना दिल्या. सह संचालक, मप्राशिप यांनी असे सांगितले की, मुलांचा ऑनलाईन माग घेण्याची पद्धत महाऑनलाईन विकसित करीत आहे,ज्याचे संनियंत्रण शिक्षण संचालक (प्राथमिक),पुणे यांच्याकडे आहे.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मुलांच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून NIC मार्फत प्रत्येक विद्यार्थ्यांची मुलभूत माहिती (आधार क्रमांक, नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, वर्ग, जात इ.) ऑनलाईन पद्धतीने संकलित करण्यात येत आहे. सदरची माहिती *www.education.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे SARAL प्रणालीद्वारे शाळेतील प्रत्येक मुलाची नोंद घेण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे. त्यानुषंगाने दिनांक ०३/०७/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

गळतीचे प्रमाण

राज्याचे सन २०११-२०१२ आणि सन २०१३-२०१४ मधील वार्षिक सरासरी गळतीचे प्रमाण तक्ता २.२.४ मध्ये दर्शविले आहे.
तक्ता २.२.४ : सन २०११-१२ आणि २०१३-१४ मधील वार्षिक सरासरी गळतीचे प्रमाण (गळतीचे प्रमाण टक्केवारीत)

शाळेचा प्रकार			२०११-१२	२०१३-१४
प्राथमिक शाळा		मुले	२.२	०.९६
		मुली	२.२	१.१०
	राज्याची सरासरी		२.२	१.०३
उच्च प्राथमिक शाळा		मुले	२.३	१.४३
		मुली	२.९	२.२९
	राज्याची सरासरी		२.६	१.८३
प्राथमिक शाळा	SC	मुले	२.७	१.४१
		मुली	२.६	१.३९
	ST	मुले	४.९	४.०७
		मुली	५.२	४.४७
	मुस्लिम समाज	मुले	-०.१	२.२०
		मुली	-१.३	१.६१
उच्च प्राथमिक शाळा	SC	मुले	२.४	२.०८
		मुली	३.०	२.७८
	ST	मुले	४.७	४.५३
		मुली	५.७	५.९८
		मुले	१.५	३.८२
		मुली	२.६	५.६८

स्त्रोत: सन २०११-१२ आणि २०१३-१४ चे U-DISE

तक्ता २.२.४ वरुन असे दिसून येते की, राज्यातील प्राथमिक शाळेतील मुलांचे गळतीचे प्रमाण २०११-१२ मधील २.२ टक्क्यांवरुन २०१३-१४ मध्ये १.०३ टक्के असे सुधारले तर, उच्च प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण २०११-१२ मधील २.६ टक्क्यांवरुन २०१३-१४ मध्ये १.८३ टक्के इतके सुधारले. परंतु, मुस्लिम समाजातील गळतीचे प्रमाण प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळेच्या बाबतीत २०११-१२ शी तुलना करता २०१३-१४ मध्ये वाढले. सहा निवड केलेल्या जिल्ह्यातील ५० प्राथमिक शाळेतील २०१३-१४ मधील सरासरी गळतीचे प्रमाण हे राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त होते. उच्च प्राथमिक शाळेतील तीन निवड केलेल्या जिल्ह्यातील २०१३-१४ मधील सरासरी गळतीचे प्रमाण हे राज्याच्या सरासरी पेक्षा जास्त होते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

यु-डाईस माहितीनुसार सन २०१४-१५ मध्ये मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी झाले असून सदर प्रमाण प्राथमिक स्तरावर ०.६४ व उच्च प्राथमिक स्तरावर १.३ टक्के इतके आहे. मुलांचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी सन २०१६-१७ पासून एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही यासाठी स्थलांतरीत पालकांच्या सोबत मुलाचे स्थलांतर झाल्यास अशा मुलास शिक्षण हमी पत्र देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे हंगामी निवासी वसतीगृह योजना सहा महिन्यांसाठी माहे ऑक्टोबर ते मार्च या स्थलांतराच्या कालावधीत राबविली जाते. शैक्षणिकदृष्ट्या मागास गट (EBB), १० जिल्ह्यांमध्ये ४३ ठिकाणी मुलांच्या शिक्षणासाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना सुरू आहे. त्याचप्रमाणे सन २०१५-१६ मध्ये दिनांक ३ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये SARAL (-Systematic Administrative Reforms for Achieving Learning By Students) या संगणक प्रणालीच्या माध्यमातून शाळांमध्ये येणाऱ्या प्रत्येक मुलाला SARAL CODE देण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे प्रत्येक मुलाची शैक्षणिक माहिती प्राप्त करून मुलाचे Tracking होणार आहे. यामुळे गळती रोखण्यास मदत होईल.

समन्याय

SSA अंतर्गत समन्याय या घटकामध्ये कमकुवत क्षेत्रातील तसेच दुर्लक्षित गटातील मुली आणि मुले विशेष काळजीची आवश्यकता असलेली मुले (CWSN) इ. ना वगळणे यावर तोडगा काढून लैंगिक व सामाजिक दरी कमी करणे समाविष्ट होते. यासाठी SSA हे प्रशिक्षण, सजगता आणि मुले व मुलींच्या समाजिक सहभागासाठी इतर नाविन्यपूर्ण कार्यक्रम, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्याक समाज यांसाठी उच्च प्राथमिक निवासी शाळांच्या स्थापनेसाठी या सर्वांना वित्तिय सहाय्य देते. GOI ने २०१०-१४ दरम्यान ह्या घटकाखाली रु. ६३५.४७ कोटीचा नियतव्यय मंजूर केला. त्यापैकी रु. ४४१.५५ कोटी खर्च झाले. राज्यात लिंगभेदावर सचेतना जागृत करण्यासाठी ' मीना राजू मंच ' ही एक उत्कृष्ट पद्धत राबविली जात आहे. जिची माहिती या अहवालाच्या परिच्छेद २.१.८ मध्ये दिली आहे.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शालेय वर्ष २०१२-१३ पासून मीना राजू मंच कार्यक्रमाला सुरुवात झालेली आहे. वर्ग, शाळा या सोबतच गाव, वस्ती, पाडा, तांडा या सर्वच स्तरावर मुलां मुलीमध्ये समानता निकोप नाते संबंध दोघांना संधीची समानता या बाबतीत स्वतः शिक्षक महत्त्वाचा दुवा आहे.

शालेय पातळीवरील मीना राजू मंच साठी शाळेतील एका शिक्षकेची किंवा शिक्षकाची सुगम कर्ता म्हणून निवड करण्यात येते. मुख्याध्यापक व सुगम कर्ता यांच्या मदतीने मीना राजू मंच सदस्यांची निवड केल्या जाते. या मंच्यात इ.५ वी ते इ.८ वी चे विद्यार्थी प्रतिनिधी असतात. मीना राजू मंच सदस्य शाळेच्या वर्गाच्या पातळीवर विविध कार्यक्रम, खेळ, चर्चा, स्पर्धा यांच्या माध्यमातून समानतेचा लिंग समभावाचा मुद्दा चर्चेत व्यवहारात आणण्याचा प्रयत्न करतात. या कामी त्यांना मुख्याध्यापक व सुगम कर्ता यांचे सहकार्य मिळते.

शालेय स्तरावर विविध उपक्रमांव्दारे लिंग समभाव निर्माण करणे. शैक्षणिक समान संधी सर्वांना उपलब्ध करून देणे. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व, आरोग्य, बालहक्क, बालस्नेही शाळा, व्यक्तिविकास, शाळास्तरीय स्वच्छता मोहीम इ. उपक्रम राबविले जातात.

मीना - राजू मंच राबविण्यात आलेले उपक्रम

मार्गदर्शक पुस्तिका छपाई.

राज्य, जिल्हा व गट स्तरावर MRM तसेच अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकातून लिंग समभाव रुजवणूक बाबत ३ दिवशीय प्रशिक्षण.

मीना - राजू मंच, मीनाची दुनिया कार्यक्रमातून मुलांचे अधिकार, स्वच्छता, आरोग्य, बालस्नेही शाळा इत्यादीबाबत जाणीव जागृती.

किशोरवयीन मुलांना शारीरिक बदलांबाबत जाणीव.

विविध स्पर्धामध्ये विद्यार्थीनींच्या सहभागात वाढ.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण सभाधीटपणा वाढला.

SMC, शिक्षक यांच्या सहकार्याने विविध उपक्रमाव्दारे लिंग समभाव वाढीस लागला.

विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी हस्तक्षेप

CWSN यांना औपचारिक प्राथमिक शिक्षणाच्या बांधणीतील मूळ प्रवाहात आणणे किंवा समावेश करणे हा SSA या मुख्य हेतू आहे. CWSN चा भौतिक उपलब्धता, सामाजिक उपलब्धता आणि उपलब्धतेची गुणवत्ता आदी मार्फत समावेश हे SSA चे ध्येय होते. GoM यांनी शोध घेतलेल्या सर्व २०१०-१४ दरम्यान एकतर शाळांमध्ये दाखल करून किंवा घरगुती शिक्षण देऊन शिक्षण पुरविले आहे.जे तक्ता २.२.५ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता २.२.५ : राज्यातील CWSN ची व्याप्ति (६ ते १८ वर्षे)

वर्ष	शोध घेतलेले एकूण CWSN	शाळांत दाखल केलेले CWSN	घरगुती शिक्षण दिलेले CWSN	CWSN ची एकूण व्याप्ती (टक्केवारी)
२०१०-११	४१०३७७	११८८७०	२९१५०७	४१०३७७ (१००)
२०११-१२	३८६०१९	१८७१२४	१९८८९५	३८६०१९ (१००)
२०१२-१३	३२५७८३	२४००२३	८५७६०	३२५७८३ (१००)
२०१३-१४	३४२०९८	३०८०३४	३४०६४	३४२०९८ (१००)

परंतु, सप्टेंबर २०१३ पर्यंत राज्यातील एकूण ६६,४४४ शाळांपैकी ४,६६९ आणि १५,९४७ शाळांमध्ये CWSN ना अनुक्रमे विना अडथळा प्रवेश (ramps) आणि प्रसाधन सुविधा पुरविण्यात कमतरता होत्या. त्याचप्रमाणे, विभागीय कर्मचाऱ्यांसोबत लेखापरीक्षेने एकत्रितपणे केलेल्या प्रत्यक्ष तपासणी दरम्यान १३८ शाळांपैकी ५७ शाळांमध्ये सहज मार्ग असलेली प्रसाधनगृहे नव्हती आणि ५ शाळांमध्ये ramps नव्हते. सह संचालक, MPSP यांनी सांगितले की उर्वरित CWSN साठी प्रसाधनगृहे आणि ramps च्या बांधकामाचा प्रस्ताव २०१५-१६ च्या AWP&B मध्ये सादर केला जाईल.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सद्यस्थिती :

	Target	Complete	In Pro.	Not Started
ramps	४१५८	२०६३	१४६४	६३१
प्रसाधन सुविधा	०	०	०	०

सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात येतात. दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी शाळांमध्ये उपलब्ध, सुविधांबाबतच्या माहितीच्या आधारे सर्वेक्षण करून U-DISE Data प्रणालीमध्ये माहिती भरण्यात येते. त्यानुसार सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये U-DISE Data नुसार बांधकामे प्रस्तावित करण्यात येतात.

सदर बांधकामाकरिता केंद्र शासनाकडून मंजूर निधी व राज्य शासनाचा हिस्सा याप्रमाणे प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेत त्या त्या वर्षी शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच ज्या शाळांमध्ये विशेष गरजा असलेल्या मुलांना (CWSN) प्रवेश दिला आहे अशा शाळांमध्ये विनाअडथळा Ramp चे व प्रसाधनगृहाचे बांधकाम प्राधान्याने करावयाचे आहे. उर्वरित शाळांना टप्प्या-टप्प्याने ramp ची व प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध करण्यात येते.

मुलींकरिता उच्च प्राथमिक निवासी शाळा बांधणे

GOI ने ऑगस्ट २००४ मध्ये मुख्यत्वेकरून अनसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्याक मुलींसाठी उच्च प्राथमिक निवासी शाळांची कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV) ही विशेष योजना सुरू केली. हया योजनेसाठी SSA मार्फत निधी पुरविला जातो. मे २०१४ रोजी राज्यात अस्तित्वात असलेल्या ४३ KGBVs पैकी २८ KGBVs ची बांधकामे सुरू व्हायची होती. उर्वरित सर्व १५ KGBVs (ज्यांची बांधकामे प्रगतिपथावर आहेत किंवा सुरूच झाली नाहीत) इतर शासकीय इमारतीत किंवा भाड्याच्या जागेमध्ये कार्यरत होती.

हया १५ KGBVs चे लेखापरीक्षा विश्लेषण केले असता खालील बाबी आढळून आल्या :

- जमिनीचा ताबा मिळण्यास विलंब झाल्यामुळे २००६-०७ आणि २०११-१२ दरम्यान मंजूर झालेल्या रु. ३.७५ कोटीच्या आठ KGBVs ची बांधकामे मे २०१४ पर्यंत अपूर्ण होती. भाववाढीमुळे हया आठ KGBVs च्या पूर्णत्वासाठी रु. ३.२६ कोटीच्या अतिरिक्त निधीची गरज वर्तविण्यात आली होती.

- जमीन उपलब्ध नसल्यामुळे / जमिनीचा ताबा मिळवण्यातील विलंबामुळे २००६-०७ आणि २०११-१२ दरम्यान मंजूर झालेल्या रु. ४.३४ कोटीच्या सात KGBV ची बांधकामे मे, २०१४ पर्यंत सुरू झाली नव्हती. भाववाढीमुळे या सात KGBV च्या पूर्णत्वासाठी रु. ३.३२ कोटीच्या अतिरिक्त निधीची गरज वर्तविण्यात आली होती.

तसेच रु. ६.५८ कोटीच्या (रु. ३.२६ कोटी + रु. ३.३२ कोटी) अतिरीक्त निधीच्या आवश्यकतेपैकी रु. १.४२ कोटी हे कालांतराने १३ व्या वित्त आयोगाकडून आणि इतर स्त्रोतातून (MP स्थानिक प्रदेश विकास निधी) प्राप्त झाले आणि उर्वरित रु. ५.१५ कोटीची GOM ने तरतूदच केली नाही (मे २०१४).

सह संचालक MPSP यांनी सांगितले की, रु. ५.१५ कोटीच्या अतिरिक्त निधीचा प्रस्ताव GOM ला सादर केलेला आहे.

ठाणे जिल्ह्यातील दोन गटातील KGBVs ची संयुक्त प्रत्यक्ष तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

- डहाणू गटामध्ये, NGO तर्फे चालविण्यात येणारे KGBV, जून २०१३ पासून प्लास्टर नसलेल्या भाडेतत्वावरील इमारतीत चालविण्यात येत होते, तर विक्रमगड गटामध्ये KGBV ही मे २०१० पासून शासकीय कुटीर रुग्णालयाच्या इमारतीमध्ये चालविण्यात येत होते. सहसंचालक MPSP यांनी सांगितले की, KGBV डहाणू येथील प्लास्टरचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

प्रमाणकाप्रमाणे आवश्यक असलेल्या प्रति विद्यार्थी ६० चौ फूट (१०० मुलांचे वसतिगृह) ऐवजी KGBV, डहाणू येथे केवळ २,७४० चौ फुट जागेत १४६ मुली राहत होत्या ज्यासाठी आवश्यक जागा ८,७६० चौ.फुट होती. त्याचप्रमाणे KGBVs विक्रमगड मध्ये १५६ मुलींना आवश्यक असलेल्या ९,३६० चौ.फुट जागे ऐवजी फक्त १,५२० चौ. फुट जागाच उपलब्ध होती. सह संचालक MPSP यांनी सांगितले की, दोन्ही KGBVs आदिवासी भागात चालू असल्यामुळे प्रमाणकानुसार भाडेतत्वावर जागा मिळणे कठीण आहे. KGBVs च्या बांधकामासाठी भू-संपादन करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

KGBVs डहाणू मध्ये १४६ मुलींसाठी फक्त चार प्रसाधनगृहे आणि दोन स्नानगृहे होती तसेच संरक्षक भिंत नव्हती. दोन अतिरिक्त स्नानगृहे मोकळया जागेवर तात्पुरती उभारली होती त्याला पत्र्याचे आवरण होते. संगणक कक्ष नसल्यामुळे पाच संगणक व्हरांडयात ठेवले होते. सहसंचालक, MPSP यांनी सांगितले की दोन अतिरिक्त प्रसाधनगृहे उभारण्यास NGO नी संमती दर्शविली आहे आणि संगणक उपलब्ध खोलीमध्ये हलविण्यात आले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील पाच KGBVs मध्ये रु. १३.२३ लाख किमतीचे पाणी गरम करण्याचे पाच सौरसंच प्राप्त झाले होते (मार्च २०१२). डहाणू आणि विक्रमगड KGBVs ची प्रत्यक्ष तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, पाणी गरम करण्याचे सौरसंच पुरवठादाराने जानेवारी २०१४ पर्यत बसविलेलेच नव्हते. जरी कंत्राटाच्या अटीप्रमाणे पुरवठा, स्थापना आणि सुरूवात यानंतर ९० टक्के प्रदान तसेच KGBVs कडून कार्यसफलता अहवाल प्राप्त झाल्यावर १० टक्के प्रदान करावयाचे होते, तरीदेखील पुरवठादाराला रु. ५.२८ लाखाचे प्रदान करण्यात आले होते. सहसंचालक, MPSP यांनी सांगितले की, पाणी गरम करण्याचे सौरसंच लवकरात लवकर बसविण्यात येतील आणि हयातील विलंबाबाबत चौकशी करण्यात येईल.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १० जिल्ह्यांतील ४३ गटांकरिता शाळाबाह्य मुलींकरिता कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये मंजूर करण्यात आलेली आहेत.

सदर कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय बांधकामांचा माहे ३१ जानेवारी २०१६ पर्यंतचा प्रगती अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय बांधकामाकरिता जागा उपलब्ध नसल्यामुळे बांधकाम सुरू करण्यात आलेले नाही.

अ.क्र.	व्यवस्थापन	मंजूर वर्ष	मंजूर भौतिक लक्ष्य	पूर्ण	प्रगती पथावर	सुरू न झालेली
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	शासकीय	२००६-०७	२२	१७	४	०
२	स्वयंसेवी संस्था	२००६-०७	१४	११	३	०
३	शासकीय	२०१०-११	७	३	४	१
		एकूण	**४३**	**३१**	**११**	**१**

कार्यकारी समितीच्या दिनांक २५ मे २०१२ रोजीच्या ५४ व्या बैठकीमध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय बांधकामाकरिता अतिरिक्त निधीबाबत राज्य शासनाकडे मागणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. सदरील सूचनेनुसार राज्य शासनाकडे जागा उपलब्ध असलेल्या ८ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय बांधकामाकरिता ५१५.८० लक्ष निधीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक २ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ८ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय बांधकामासाठी रु. ५१५.८० लक्ष अतिरिक्त निधी मंजूर केला आहे.

सदरील अतिरिक्त मंजूर निधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(रु . लाखात)

अ. क्र.	गटाचे नाव	व्यवस्थापन	अंदाजित /कार्यारंभ आदेशानुसार रक्कम	यापुर्वी मंजूर रक्कम	अति. लागणारी रक्कम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१.	विक्रमगड	शासकीय	११४.३४	६५.००	४९.३४
२.	इगतपूरी	शासकीय	६९.९९	५२.००	१७.९९
३.	उमरी	शासकीय	९६.१६	५८.७५	३७.४१
४.	डहाणू	अशासकीय	९६.६९	३८.७५	५७.९४
५.	तलासरी	अशासकीय	११७.४९	३८.७५	७८.७४
६.	सुरगाणा	अशासकीय	१२८.००	३८.७५	८९.२५
७.	त्र्यंबकेश्वर	अशासकीय	१२७.९९	३८.७५	८९.२४
८.	पेठ	शासकीय	१३४.६४	३८.७५	९५.८९
		एकूण	**८८५.३०**	**३६९.५०**	**५१५.८०**

उपरोक्त मंजूर अतिरिक्त निधी रु. ५१५.८० लक्ष निधीपैकी रु. ११.१० लक्ष इतका खर्च झाला असून उर्वरित रक्कम मार्च, २०१६ पर्यंत खर्च होईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

समन्यायी गुणवत्ता

SSA च्या कार्यचौकटीत प्राथमिक शिक्षणातील समन्यायी गुणवत्तेच्या आवश्यकतेवर भर दिला आहे आणि ही कार्यपद्धती विशेषत: दुर्लक्षित पार्श्वभूमी असलेल्या व ज्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, तसेच उत्तम शैक्षणिक आधार द्यायची गरज आहे अशांसाठी समन्यायी गुणवत्तेला बढती/प्रोत्साहन देणे अशा कार्यपद्धतीचे समर्थन करते. GOI यांनी ह्या घटकाखाली २०१०-१४ दरम्यान रु. २,७८४.३० कोटीचा नियत व्यय मंजूर केला. त्यापैकी रु. १,२२५.३६ कोटी खर्च झाले होते. कमी खर्चासाठी (रु. १,५५८.९४) मुख्यत: शिक्षंकाच्या न झालेल्या नेमणुका (रु. ९७३.२२ कोटी) कारणीभूत होत्या.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

शिक्षकांचा तुटवडा

मार्च २०१४ अखेरीची शिक्षकांच्या मंजूर पदांची, भरलेल्या पदांची आणि रिक्त पदांची स्थिती तक्ता २.२.६ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

तक्ता २.२.६: मार्च २०१४ रोजी शिक्षकांची मंजूर पदे आणि रिक्त पदे

शाळेचा प्रकार	GOM यांनी मंजूर केलेली पदे			भरलेली पदे			रिक्त पदे		
	SSA व्यतिरिक्त	SSA अंतर्गत	एकूण	SSA व्यतिरिक्त	SSA अंतर्गत	एकूण	SSA व्यतिरिक्त	SSA अंतर्गत	एकूण
प्राथमिक	१९१११५	३९४१८	२३०५३३	१८८१९८	१४९४०	२०३१३८	२९१७	२४४७८	२७३९५
उच्च प्राथमिक	७५३२८	२६४३	७७९७१	७४३१३	४४७	७४७६०	१०१५	२१९६	३२११
एकूण	२६६४४३	४२०६१	३०८५०४	२६२५११	१५३८७	२७७८९८	३९३२	२६६७४	३०६०६

स्त्रोत :- सन २०१४-१५ चे AWP &B

तक्ता २.२.६ वरून असे दिसून येते की, मार्च, २०१४ अखेरचा शिक्षकांचा एकूण तुटवडा हा ३०,६०६ (९.९१ टक्के) होता तर SSA अंतर्गत तुटवडा २६,६७४ (६३.४२ टक्के) होता.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

प्रत्येक शाळेतील विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर

RTE कायद्यात अशी अट आहे की, ह्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या सुरूवातीनंतर सहा महिन्याच्या आत समुचित सरकार व स्थानिक संस्था, विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तर (PTR) योग्य राखल्याबद्दल खात्री देतील. RTE कायद्यातील अटीप्रमाणे प्राथमिक शाळेत ३० विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक आणि उच्च प्राथमिक शाळेत ३५ विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक असणे आवश्यक होते. राज्यातील २०११-१२, २०१२-१३ आणि २०१३-१४ मधील एकूण PTR५५ अनुक्रमे १:३०, १:३२ आणि १:३१ होते, जे RTE कायद्यांतर्गत असलेल्या प्रमाणांएवढेच होते. परंतु तक्ता २.२.७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनेक प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमध्ये २०११-१४ दरम्यान PTR प्रतिकूल होता.

तक्ता २.२.७ सन २०११-१४ दरम्यान प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमधील प्रतिकूल विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर (PTR)

वर्ष	शाळेचा प्रकार	शासकीय शाळांची एकूण संख्या	प्रतिकूल PTR असलेल्या शासकीय शाळांची संख्या (एकूण संख्येशी टक्केवारी)	अनुदानीत शाळांची एकूण संख्या	प्रतिकूल PTR असलेल्या शासकीय शाळांची संख्या (एकूण संख्येशी टक्केवारी)	विना अनुदानीत शाळांची एकूण संख्या	प्रतिकूल PTR असलेल्या विना अनुदानीत शाळांची संख्या (एकूण संख्येशी टक्केवारी)
२०११-१२	प्राथमिक	६६५९७	८३०२ (१२.४६)	६६५२	२३०५ (३४.६५)	७७०२	१७६१ (२२.८६)
	उच्च प्राथमिक	२४०१५	५४९१ (२२.८६)	१४३०७	७३४८ (५१.३५)	५७७७	२८६६(४९.६१)
२०१२-१३	प्राथमिक	६६६१२	६६३२ (०९.९५)	६९००	२००० (२८.९८)	८६०६	१७१७ (१९.९५)
	उच्च प्राथमिक	२४७८७	१४८४ (५.९८)	१७६७९	४५१२ (२५.५२)	९२६५	११६६ (१२.५८)
२०१३-१४	प्राथमिक	६६५०१	६११४ (९.१९)	७०६९	२०३३ (२८.७५)	९१३२	१६८७ (१८.४७)
	उच्च प्राथमिक	२२४३९	१५५६ (६.९३)	१४३७४	४८३८ (३३.६५)	६२१४	१२४२ (१९.९८)

स्त्रोत: सन २०११-१२, २०१२-१३ आणि २०१३-१४ वर्षासाठीचे U-DISE २०१०-११ ची माहिती उपलब्ध नव्हती.

तक्ता २.२.७ वरुन असे दिसून येते की, २०११-१४ दरम्यान प्रतिकूल PTR असलेल्या शासकीय, अनुदानित आणि विना-अनुदानित प्राथमिक शाळांची टक्केवारी अनुक्रमे ९.१९ टक्के आणि १२.४६ टक्के ; २८.७५ टक्के आणि ३४.६५ टक्के तसेच १८.४७ टक्के आणि २२.८६ टक्के ह्या दरम्यान होती. त्याचप्रमाणे याच कालावधीत प्रतिकूल PTR असलेल्या शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित उच्च प्राथमिक शाळा अनुक्रमे ५.९८ टक्के आणि २२.८६ टक्के, २५.५२ टक्के आणि ५१.३५ टक्के व १२.५८ टक्के आणि ४९.६१ टक्के ह्या दरम्यान होत्या.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महाराष्ट्र राज्यामध्ये RTE कायद्यातील अटीप्रमाणे प्राथमिक शाळेत ३० विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक आणि उच्च प्राथमिक शाळेत ३५ विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक असणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१४-१५ यू-डायस माहितीनुसार शासनाच्या प्राथमिक शाळांची एकूण संख्या ५०१४ व उच्च प्राथमिक शाळांची एकूण संख्या २३०९ इतकी आहे.

दिनांक १ मार्च २०१४ च्या शासन निर्णयानुसार शिक्षकांनी प्राथमिक शिक्षणात दोन वर्षाची पदविका प्राप्त केली होती परंतु TET उत्तीर्ण केली नव्हती अशांना विभागांनी समाविष्ट करून घेतलेले आहेत.

- सहसंचालक MPSP यांनी असे सांगितले की, राज्यानी शाळानिहाय शिक्षकांचे सुसूत्रीकरण करण्याची मोहीम सुरू केली असून सुसूत्रीकरणाच्या अभ्यासातून आणि RTE कायद्यांनी विहित केलेल्या प्रमाणकांनुसार किती शिक्षकांची वास्तविक गरज आहे हे ठरविले जाईल. सहसंचालकांनी असेही सांगितले की, राज्याने प्रवेश संख्या १०० पेक्षा जास्त असलेल्या शासकीय उच्च प्राथमिक शाळांमध्ये, अर्धवेळ निदेशकाची आवश्यकता ठरविली असून त्यासंदर्भात ऑगस्ट, २०१४ मध्ये GR पारित केला आहे.

RTE नियमांतील नियम १५ नुसार प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नेमणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या किमान अर्हता, GOI कडून अधिसूचीत केलेल्या शैक्षणिक प्राधिकाऱ्यांकडून ठरविण्यात येतील. GOI ने शिक्षकांच्या शिक्षणाची राष्ट्रीय परिषद (NCTE) यांना शैक्षणिक प्राधिकारी म्हणून अधिसूचीत केले (मार्च, २०१०) ज्यांनी शिक्षकांसाठीची किमान गुणवत्ता/अर्हता निर्धारित केली.

वरिष्ठ माध्यमिक शिक्षण व प्राथमिक शिक्षणाचा दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम तसेच शिक्षक अर्हता चाचणी (TET) उत्तीर्ण होणे ही प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी किमान अर्हता/गुणवत्ता NCTE यांनी ठरविली होती. लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, ज्या ५,०७० निम शिक्षकांनी प्राथमिक शिक्षणात दोन वर्षाची पदविका प्राप्त केली होती. परंतु TET उत्तीर्ण केली नव्हती अशांना विभागांनी समाविष्ट करून घेतले होते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक

संनियंत्रण आणि तक्रार निवारण

SSA कार्य चौकटी अंतर्गत शाळा स्तरावर (SMCS कडून), गटस्तरावर (BRCs/URCs), जिल्हास्तरावर (EO कडून) आणि राज्य स्तरावर (MPSP आणि MSCPCR कडून) संनियंत्रण होणे आवश्यक आहे. RTE कायद्याप्रमाणे स्थानिक संस्थानी तक्रार निवारण अभिकरण म्हणून आणि बालहक्क संरक्षण करणाऱ्या राज्य आयोगाने अपिल प्राधिकारी म्हणून कार्य करणे बंधनकारक आहे.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

निरंक

शाळा स्तरांवर संनियंत्रण

RTE नियमांच्या नियम १३(१०) अनुसार SMC यांनी महिन्यातून कमीत कमी एकदा बैठक घेऊन त्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांचे कार्यवृत्त नोंद करणे व लोकांना उपलब्ध करून देणे आवश्यक होते.सन २०११-१२ आणि २०१२-१३ मध्ये SMCs यांनी राज्यात तसेच निवड केलेल्या नऊ जिल्ह्यात घेतलेल्या बैठकांची स्थिती तक्ता २.२.८ मध्ये दिली आहेत.

तक्ता २.२.८१ सन २०११-१३ दरम्यान SMCS यांनी घेतलेल्या बैठकांची स्थिती

तपशील	वर्ष	शासकीय व स्थानिक संस्थांच्या शाळांची एकूण संख्या	SMCs ची स्थापना झालेल्या शाळांची संख्या	वर्षामध्ये आवश्यक १० बैठका न घेतलेल्या SMC ची संख्या (टक्केवारी)	एकही बैठक न घेतलेल्या SMCs ची संख्या (टक्केवारी)
पूर्ण	२०११-१२	६६८०३	६६५७५	३९७३२ (६०)	१२९२८ (१९)
	२०१२-१३	६६४४४	६६३४६	४०८०० (६२)	४१८५ (६)
निवड केलेले नऊ जिल्हे	२०११-१२	१९४३१	१९३३८	१२३९६ (६४)	३५७६ (१८)
	२०१२-१३	१९२११	१९१८३	१२२११ (६४)	१०३८ (५)

तक्ता २.२.८ वरून असे दिसून येते की, २०११-१२ आणि २०१२-१३, दरम्यान राज्यातील आणि निवड केलेल्या नऊ जिल्ह्यातील ६० ते ६४ टक्के शाळांमध्ये आवश्यक अशा १० बैठका SMCs नी घेतलेल्या नव्हत्या. त्याचप्रमाणे याच कालावधीत राज्यातील आणि निवडलेल्या नऊ जिल्ह्यातील अनुक्रमे सहा ते १९ टक्के व पाच ते १८ टक्के शाळांच्या SMCs नी एकही बैठक घेतली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९, दिनांक १ एप्रिल २०१० पासून लागू झाला आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार विनाअनुदानीत शाळा वगळता अन्य प्राथमिक शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करावयाची आहे. या समितीची रचना व कार्य याबाबत २०११ च्या नियमात तरतूद आहे. मात्र यानुषंगाने त्यांना काही अडचणी / संभ्रम असल्यास अथवा काही समित्यांकडून याबाबत आवश्यकतेप्रमाणे कार्यवाही होत नसल्यास शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सक्षमीकरण करणे आवश्यक वाटले. याकरिता शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्याची कार्यवाही झाली आहे. त्यांचे सन २०१३-१४, २०१४-१५ मध्ये प्रशिक्षण घेऊन त्यांना समिती सदस्यांच्या जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप इ. बाबींची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार त्यांच्याकडून आता अधिक जबाबदारीने बैठका घेऊन पार पाडण्याची अपेक्षा आहे.

- SSA कार्यचौकटीनुसार SMCs नी शिक्षकांची उपस्थिती आणि वक्तशीरपणा, मुलांची भरती आणि उपस्थिती, मुलांचा मानसिक व शारीरिक छळ इत्यादीवर संनियंत्रण ठेवायचे होते. परभणी जिल्ह्यातील SMC नी घेतलेल्या एका बैठकीव्यतिरिक्त निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी लातूर, नागपूर, परभणी आणि यवतमाळ या चार जिल्ह्यातील ३६ शाळांच्या SMCs बैठकांच्या ३०५ कार्यवृत्तांची छाननी करताना असे आढळून आले की शिक्षकांच्या उपस्थितीचा आणि नियमितपणाचा मुद्दा एकाही बैठकीत चर्चिला गेला नव्हता. त्याचप्रमाणे, शिक्षकांची खासगी शिकवणीतील व्यस्तता आणि मुलांचा मानसिक आणि शारीरिक छळ हे मुद्देदेखील ३०५ पैकी एकाही बैठकीत चर्चिले गेले नव्हते. मुलांचा शाळेतील प्रवेश आणि हजेरी हे मुद्दे ३०५ पैकी फक्त ६६ बैठकांमध्ये चर्चिले गेले होते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सन २०१३-१४, २०१४-१५ मध्ये प्रशिक्षण घेण्यात आले. त्यात त्यांच्यावरील जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप इ. गोष्टी तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांमध्ये जाणीव जागृती व्हावी, समितीचे काम परिणामकारक होण्यासाठी विविध माध्यमांच्या आधारे सक्षम करण्याचा प्रयत्न करत आहे.

त्यात प्रत्येक महिन्याला एक बैठक याप्रमाणे १० बैठका घेणे, सभेचे इतिवृत्त ठेवणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात शिक्षकांचा सहभाग, SDP तयार करणे, शाळेचे कामकाज सुरळीतपणे चालविणे, इ. ची माहिती दिली जाते. तसेच RTE २००९ नुसार कार्यवाही करणेबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना सूचना दिल्या जातात. प्रत्येक महिन्यात एक याप्रमाणे १० बैठका होतील व वर दिलेल्या शिफारसीनुसार कार्यवाही होईल हे पाहिले जाईल. (सोबत U-DISE Data जोडला आहे).

गट स्तरावर नियंत्रण

- SSA च्या कार्य चौकटीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे RTE कायद्यातील तरतुदीचे पालन होत आहे याची खात्री करण्यासाठी EO अथवा अन्य नेमलेल्या गटस्तरावरील अधिकाऱ्याने प्रत्येक शाळेला किमान दोन भेटी देणे आवश्यक आहे. BRC कर्मचाऱ्यांनी शिक्षकांना शैक्षणिक सहाय्य देण्याखेरीज SMCs यांच्याशी, समाजातील सदस्यांशी आणि संस्थांशी SDPs बनविण्यासाठी सल्ला मसलत करणे अपेक्षित होते. शाळेच्या प्रगतीसाठी, SDPs बनविण्यासाठी तसेच शाळा-बाह्य मुलांसाठी पर्याप्त प्रमाणात विशेष प्रशिक्षण कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी झाली आहे याची खात्री करून, त्यायोगे वयानुरुप इयत्तांमध्ये त्या मुलांची भरती होण्यासाठी CRC कर्मचाऱ्यांनी शाळांना नियमित भेटी देऊन (प्रत्येक दोन महिन्यातून एकदा) SMCs च्या सदस्यांबरोबर तसेच इतर स्थानिक संस्थांबरोबर बैठका घेणे आवश्यक होते. सन २०११-१२ आणि २०१२-१३ दरम्यान गटशिक्षण अधिकारी / BRC आणि CRC कर्मचाऱ्यांनी राज्यात दिलेल्या भेटीचा तपशील तक्ता २.२.९ मध्ये दिला आहे.

तक्ता २.२.९ : सन २०११-१३ दरम्यान BEOs/BRC आणि CRC कर्मचाऱ्यांनी शाळेला दिलेल्या भेटीतील सूट

तपशील	सरकारी आणि स्थानिक संस्थांच्या शाळांची संख्या	
	२०११-१२	२०१२-१३
शासकीय आणि स्थानिक संस्थांच्या एकूण शाळा	६६,८०३	६६,४४४
गट शिक्षण अधिकारी आणि BRCs आणि BRCS च्या कर्मचाऱ्यांनी न दिलेल्या भेटी	१,६८८	१,१४९
गट शिक्षण अधिकाऱ्यांनी न दिलेल्या भेटी	४,८२०	३,०७०
BRCs आणि CRCs कर्मचाऱ्यांकडून पाच पेक्षा कमी दिलेल्या भेटी	८,८४१	९,९९८

स्त्रोत :- सन २०१२-१३ आणि २०१३-१४ च्या U-DISE वरुन संकलित. सन २०१०-११ ची माहिती उपलब्ध नव्हती तसेच २०१३-१४ ची माहिती (U-DISE) तयार करणे विभागामार्फत सुरू होते.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

निरंक.

राज्यस्तरीय संनियंत्रण

SSA च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आणि धोरणात्मक सल्ला व सूचना देण्यासाठी MPSP चे नियामक मंडळ (GB) जबाबदार आहे. तसेच योजनेची उद्दिष्टे दृढ करण्यासाठी कार्यकारी समिती (EC) वित्तीय व प्रशासकीय अधिकारांचा वापर करते. MPSP यांच्या नियमाप्रमाणे आणि संस्थापन समयलेख्याच्या नियम १५ अनुसार मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील GB ची बैठकी वर्षातून किमान दोनदा घेतली पाहिजे तसेच नियम ३४ अनुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील EC च्या बैठका वर्षातून कमीत कमी प्रत्येक त्रैमासातून एकदा घेण्यात याव्यात. MSCPCR हे अपिल प्राधिकारी असल्यामुळे RTE कायद्याखालील अधिकाराच्या सुरक्षिततेचा आढावा घेण्यासाठी त्याचप्रमाणे त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी जबाबदार होते. त्याचप्रमाणे, या कायद्याखाली MSCPCR कडे केलेली बालहक्कांचे उल्लंघन झाल्याची सर्व अपिले आयोगाने निकाली लावायची असतात.

लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, २०१०-१४ दरम्यान आवश्यक असणाऱ्या आठ बैठकांच्या बदल्यात GB यांनी एकही बैठक घेतली नाही. त्याचप्रमाणे, आवश्यक असणाऱ्या १६ बैठकांच्या ऐवजी EC नी या कालावधीत केवळ सात बैठका घेतल्या.

सहसंचालक, MPSP यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे आवश्यक तेवढ्या बैठका होऊ शकल्या नाहीत. EC ने घ्यावयाच्या आवश्यक बैठकांच्या संख्येत तूट असली तरी कार्यक्रमाचे संनियत्रण करण्यासाठी तसेच आढावा घेण्यासाठी जवळपास सर्व शुक्रवारी अतिरिक्त मुख्य सचिवांनी व EC च्या उपाध्यक्षांनी ZPs च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण अधिकारी यासोबत अनेक आढावा बैठका घेतल्या त्याप्रमाणे दृकसंमेल्लने आयोजित केली होती.

उत्तर स्वीकारण्यायोग्य नाही कारण राज्याच्या २०१०-११ आणि २०११-१२ च्या अनुक्रमे रू.१,६९३.९८ कोटी व रू.३,५२१.२७ कोटीच्या AWP&Bs ना EC यांना कार्योत्तर मंजुरी द्यावी लागली (GOI यांना पाठविल्यानंतर). यावरून असे निदर्शनास येते की, महत्त्वाचे व्यवस्थापकीय निर्णय हे शिखर स्तरावर योग्य बोलणी आणि छाननी केल्याशिवाय घेतले गेले होते.

लेखापरीक्षेच्या असेही निदर्शनास आले की, तक्रार निवारणाचे कार्यतंत्र, तक्रार निवारण्याच्या पद्धती, गट, जिल्हा आणि राज्यस्तरावरील विविध सदस्यांची नामांकने इत्यादी ठरविणारा शासन निर्णय (GR) GOM यांनी एप्रिल, २०१४ मध्ये पारित केला होता. त्यामुळे २०११-१४ दरम्यान ५८ तक्रारी थेट MSCPCR कडे करण्यात आल्या. त्यापैकी केवळ २७ तक्रारींचे निवारण केले गेले आणि उर्वरित ३१ तक्रारी नोव्हेंबर, २०१४ पर्यंत प्रलंबित होत्या.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

निरंक.

निष्कर्ष व शिफारशी

२०१०-१४ या कालावधीसाठीच्या "सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी" यावरील संपादणूक लेखापरीक्षेतून असे आढळून आले की, SSA-RTE कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीची राज्यातील संस्थात्मक व्यवस्था अपर्याप्त होती. RTE कायदा जरी एप्रिल, २०१० पासून अस्तित्वात आला होता तरी RTE नियम व अनुदानित आणि विना अनुदानित शाळांमध्ये दुर्बल घटकातील व दुर्लक्षित गटातील मुलांसाठी जागा राखीव ठेवण्यासाठीची पद्धत विनिर्दिष्ट करणारे नियम राज्य शासनाने अखेर अनुक्रमे ऑक्टोबर, २०११ व मे, २०१२ मध्ये अधिसूचित केले होते. डिसेंबर, २०११ मध्ये बालहक्क संरक्षणासाठीचा महाराष्ट्र राज्याचा आयोग (MSCPCR) मधील अध्यक्ष व सदस्यांची कार्यमुदत संपूनही त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात आलेली नव्हती.

RTE कायद्याच्या अंतर्गत प्रदान केलेले हक्क सुरक्षित राखले जात आहेत याची तपासणी व पुनर्विलोकन करण्यासाठी तसेच राज्यात त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांच्या शिफारशी करण्यासाठी MSCPCR जबाबदार असल्याने शासनाने आयोगाचे कामकाज प्रभावी होण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्या.

वार्षिक कृती आराखडे तयार करण्यात त्रुटी होत्या आणि सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ दरम्यान अनेक शाळांनी अर्थसंकल्प आणि शाळा विकास आराखडे तयार केले नव्हते. RTE कायद्यानुसार जरी माहे मार्च, २०१३ पर्यंत वास्तव्याशेजारील शाळा प्रस्थापित करावयाच्या होत्या, तरी राज्य शासनाने २७,६१६ सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी माहे मार्च, २०१४ मध्ये मान्यता दिली. तसेच वास्तव्याशेजारील शाळेत प्रवेश न मिळालेल्या मुलांना मोफत वाहतूक व्यवस्थाही पुरविली जात नव्हती.

शासनाने कालबद्धरितीने वास्तव्याशेजारील शाळा प्रस्थापित कराव्या आणि अशा शाळा प्रस्थापित होईपर्यंत मुलांना मोफत वाहतूक व्यवस्था पुरविण्याचा विचार करावा.

अनेक शाळांमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता असतानाच प्रत्येक वर्ष अखेरीस मात्र मोठ्या प्रमाणात अखर्चित शिल्लक रकमा होत्या.

वर्ष २०१०-१४ दरम्यान शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेत जाणाऱ्या मुलांना पाठ्यपुस्तके व शाळेच्या गणवेशाचे मोफत वाटप विलंबाने केले होते / वाटपच केले गेले नव्हते.

शाळेत मुलांच्या उपस्थितीचे प्रमाण कायम ठेवण्यासाठी शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके व पर्याप्त पायाभूत सुविधा महत्वपर्णू असल्याने अशा सुविधांविषयीची प्रमाणके काटेकोरपणे पाळली जातील याची शासनाने सुनिश्चिती करावी.

RTE कायद्याअंतर्गत खाजगी विनाअनुदानीत शाळांमध्ये दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील मुलांसाठी जागा राखीव ठेवण्यात विलंब झाला होता आणि या राखीव जागांवरील शाळाप्रवेशही अत्यल्प होता.

कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची सुनिश्चिती करण्यासाठी खाजगी विनाअनुदानीत शाळांमध्ये दुर्बल घटकातील व दुर्लक्षित गटातील मुलांसाठी राखीव जागा ठेवण्याच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेवर शासनाने बारकाईने संनियंत्रण ठेवावे.

महिला व बाल विकास विभागाने निर्धारित केलेल्या (२.३० लाख) व शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने निर्धारित केलेल्या (०.२० लाख) शाळाबाह्य मुलांच्या संख्येत मोठी तफावत होती.

जी मुले शाळेत अनुपस्थित राहात होती किंवा शाळा सोडून देत होती त्यांच्यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाकडे मुलांचा मागोवा घेण्याची कोणतीही यंत्रणा नव्हती.

मार्च २०१४ अखेरीस SSA अंतर्गत मंजूर पदांच्या तूलनेत कार्यरत शिक्षकांच्या संख्येत एकंदर ६३ टक्के तूट होती. २०११-१४ दरम्यान अनेक प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर प्रतिकूल होते.

शासनाने सर्वेक्षणाद्वारे आणि इतर विभाग / यंत्रणाशी समन्व्य ठेवून शाळा बाह्य मुलांची संख्या निर्धारीत करावी आणि जी मुले शाळेत अनुपस्थित राहात होती. अथवा ज्यांनी शाळा सोडून दिली होती त्यांच्यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी मुलांचा मागोवा घेण्याची यंत्रणा प्रस्थापित करावी.

लेखापरीक्षेत असे आढळून आले की, राज्य शासनाने २०१०-१४ दरम्यान सर्वसाधारण शाळांमध्ये प्रवेश घेऊन किंवा घरगुती पातळीवर शिक्षण देऊन त्याद्वारे विशेष गरजा असणाऱ्या मुलांना (CWSN) सर्व समावेशक शिक्षण दिले होते. परंतु, राज्यातील ६६,४४४ शाळांपैकी अनुक्रमे ४,६६९ आणि १५,९४७ शाळांमध्ये CWSN ना विनाअडथळा प्रवेश आणि स्वच्छतागृहांची सुविधा देण्यात आली नव्हती.

शासनाने CWSN ना पर्याप्त प्रमाणात संसाधने उपलब्ध होतील याची सुनिश्चिती करावी जेणेकरून सर्वसमावेशक पद्धत बळकट होईल आणि CWSN ना सर्वसाधारण शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी अधिक अनुकूल वातावरण तयार करावे.

SSA-RTE काद्यायाच्या संनियंत्रणात कमतरता राहिल्या कारण शाळेच्या पातळीवर शाळा व्यवस्थापन समित्यांच्या बैठका कमी प्रमाणात घेतल्या गेल्या होत्या, गट पातळीवर गट शिक्षण अधिकाऱ्यांनी तपासण्या कमी प्रमाणात केल्या होत्या व राज्य पातळीवर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परीषदेच्या नियामक मंडळाने (GB) आणि कार्यकारी समितीने (EC) बैठका कमी प्रमाणात घेतल्या होत्या.

शाळा स्तरावर नियमित बैठका घेऊन, जिल्हा प्रभारी अधिकाऱ्यांनी अधिक कार्यस्थळांना भेटी देऊन आणि एकंदर धोरणात्मक निर्देश देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी GB व EC च्या बैठका घेऊन संनियंत्रण कार्यतंत्र सुधारावे.

ऑगस्ट २०१४ मध्ये ही बाब शासनाकडे निर्दिष्ट करण्यात आली आणि नोव्हेंबर २०१४ मध्ये आयोजित केलेल्या अंतिम बैठकीत त्यावर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली. परंतु शासनाकडून अधिकृत लेखी उत्तर प्राप्त झालेले नाही (डिसेंबर २०१४)

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मूलभूत सुविधांसाठी शाळा व्यवस्थापन समितीने शाळा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे शाळा व्यवस्थापन समितीकडून शाळा विकास आराखडा तयार करण्याबाबत MPSP कडून निदेश देण्यात आले आहेत.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर बांधकामाचे पुनर्विनियोजन करून इतर कामांकरिता वळविण्याची तरतूद नाही. त्यामुळे मंजूर असलेला निधी त्याच कामाकरिता वापरण्यात येतो. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी मंजूर तरतुदीच्या अधिन राहून जिल्ह्याच्या आवश्यकतेनुसार वितरीत करण्यात येतो. बांधकामासाठी मंजूर असलेला निधी काही कारणास्तव मंजूर वर्षात खर्च न झाल्यास, सदर निधी पुढील वर्षात spill over अंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात येतो व त्यामधून बांधकाम पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येते.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश शाळा सुरू होण्याचे दिवशी विद्यार्थ्यांना वाटप करण्याच्या सूचना केलेल्या आहेत.

संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, बालभारती,पुणे यांचेकडून प्राप्त पुस्तके शाळा सुरू होण्याच्या दिवशी विद्यार्थ्यांना वाटप केलेले आहेत. त्याचेकडून विलंबाने पुरवठा केलेली पुस्तके वेळीच विद्यार्थ्यांना वाटप केलेली आहेत. तसेच विलंबाने केलेल्या पुस्तके पुरवठ्याबाबत विलंब शुल्काची आकारणी केलेली असून सदर शुल्क त्यांच्या देयकामधून कपात केलेला आहे.

शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर तात्काळ गणवेशाचे वाटप केलेले आहे. निधी प्राप्त होण्यास विलंब झाल्यामुळे गणवेश वाटपास थोड्याफार प्रमाणात विलंब झालेला आहे.

सर्व शिक्षा अभियानातंर्गत मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश योजना कोणत्याही विनाअनुदानित शाळांसाठी अनुज्ञेय नाही. यामुळे सदर शाळांमधील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप केलेले नाहीत.

शाळेमध्ये मुलांचे उपस्थितीचे प्रमाण कायम ठेवण्यासाठी शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके व पर्याप्त पायाभूत सुविधा वेळीच उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केलेल्या आहेत तथापि, सदर सुविधा विषयीचे प्रमाणके काटेकोरपणे पाळली जातील याबाबत आणखी दक्षता घेतली जाईल.

शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सन २०१३-१४, २०१४-१५ मध्ये प्रशिक्षण घेण्यात आले. त्यात त्यांच्यावरील जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप इत्यादी गोष्टी तसेच शाळा व्यवस्थापन.

नियामक मंडळ

मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या नियामक मंडळाच्या बैठका होतात. मा. मंत्री (शालेय शिक्षण) हे या मंडळाचे उपाध्यक्ष आहेत. सदर मंडळामध्ये शासकीय तसेच अशासकीय सदस्य समाविष्ट असून अशासकीय सदस्याची शिफारस केंद्र शासन तसेच राज्य शासनामार्फत केली जाते. या कार्यालयामार्फत अशासकीय सदस्याची निवड करण्याबाबतची नस्ती राज्य शासनाला सादर केली असून सदर बाब प्रलंबित आहे. तरी देखील जून २००९ मध्ये उपलब्ध असलेल्या सदस्यासोबत नियामक मंडळाची बैठक घेण्याबाबतची नस्ती या कार्यालयामार्फत सादर करण्यात आली होती. परंतु मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या व्यस्त कामामुळे बैठकीसाठी सोईची तारीख व वेळ मिळू शकली नाही. सन २००८ ते २०११ या वर्षात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या व्यस्त कामाकाजामुळे बैठकीची वेळ मिळू शकली नाही. बैठक घेण्याबाबत मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून स्वतंत्रपणे कळविण्यात येईल असे सांगितले गेले.

अशासकीय सदस्यांची मुदत २ वर्षांसाठीच असल्यामुळे नवीन अशासकीय सदस्य निवडण्याबाबतची प्रक्रिया या कार्यालयामार्फत सुरू आहे. सदर सदस्याची निवड झाल्यानंतर मा. मुख्यमंत्री महोदयांकडून बैठकीची वेळ मिळण्याबाबत प्रयत्न केले जातील.

कार्यकारी मंडळाची बैठक

सदर मंडळाचे अध्यक्ष मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन आहेत. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या व्यस्त कामकाजामुळे कार्यकारी समिती बैठका आवश्यकतेनुसार होऊ शकल्या नाहीत. सन २०१५-१६ मध्ये ६०वी कार्यकारी समिती बैठक दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ रोजी घेण्यात आली होती. यापुढे आवश्यकतेनुसार बैठका नियोजित करण्याबाबत प्रयत्न केले जात आहेत.

शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सन २०१३-१४, २०१४-१५ मध्ये प्रशिक्षण घेण्यात आले. त्यात त्यांच्यावरील जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप इ. गोष्टी तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांमध्ये जाणीव जागृती व्हावी, समितीचे काम परिणामकारक होण्यासाठी विविध माध्यमांच्या आधारे सक्षम करण्याचा प्रयत्न करत आहे.

त्यात प्रत्येक महिन्याला एक बैठक याप्रमाणे १० बैठका घेणे, सभेचे इतिवृत्त ठेवणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात शिक्षकांचा सहभाग, SDP तयार करणे, शाळेचे कामकाज सुरळीतपणे चालविणे, इ. ची माहिती दिली जाते. तसेच RTE २००९ नुसार कार्यवाही करणेबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना सूचना दिल्या जातात. प्रत्येक महिन्यात एक याप्रमाणे १० बैठका होतील व वर दिलेल्या शिफारसीनुसार कार्यवाही होईल हे पाहिले जाईल. (सोबत U-DISE Data जोडला आहे)

साक्ष

२.२ सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी शालेय शिक्षण विभागाचे सचिव, विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान सर्व शिक्षा अभियानासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००१-२००२ या वर्षामध्ये सर्व शिक्षा अभियान संपूर्ण देशात राबविण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्र राज्यामध्ये सर्व शिक्षा अभियान २००२ मध्ये राबविण्यास सुरूवात झाली. सर्व शिक्षा अभियान १० वर्षे राबविल्यानंतर २००९ मध्ये शिक्षण हक्क कायदा संमत झाला व दिनांक १ एप्रिल, २०१० पासून तो कायदा अंमलात आला. सध्या सर्व शिक्षा अभियान हे शिक्षण हक्क कायदा राबविण्यासाठी मदत करीत आहे. एकप्रकारे शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान हे स्पेशल पर्पज व्हेईकल सारखे काम करीत आहे. यामध्ये प्रामुख्याने एक्सेस, इक्विटी आणि क्वॉलिटी हे तीन मुद्दे नेहमी शिक्षणाशी निगडित असतात. १०० टक्के मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी सर्वत्र शाळेची व्यवस्था झाली पाहिजे.

२.३ महालेखापरीक्षकांच्या अहवालातील बऱ्याच परिच्छेदांमध्ये नमूद करण्यात आलेले आहे की, राज्य सरकारला बऱ्याच ठिकाणी नेबरहूड स्कूल स्थापन करता आलेल्या नाहीत. पहिला मुद्दा हा एक्सेसचा आहे. त्यानुसार मुलांसाठी १ कि.मी. च्या आत प्राथमिक शाळेची म्हणजे इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतची व्यवस्था असावयास पाहिजे. उच्च प्राथमिक शाळा म्हणजे इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतची व्यवस्था ३ कि.मी. च्या आत असावयास पाहिजे. तसेच दुसरा मुद्दा हा इक्विटीचा आहे. इक्विटीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक, लहान मुली या शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून सुटून जातात. त्यामुळे या प्रवर्गातील मुले शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. शिवाय त्यांचे गळतीचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त असतो. त्यामुळे हे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. ही मुले चिल्ड्रेन विथ स्पेशल नीड स्वरुपाची आहेत. त्यामुळे या सर्व मुलांना शिक्षण देणे हा इक्विटीचा भाग आहे. तिसरा मुद्दा हा क्वॉलिटीचा आहे. National Curriculum Framework-२००५ मध्ये जे सुचविण्यात आले आहे त्यालाच नंतर शिक्षण हक्क कायद्याचा भाग करण्यात आले. या सर्व बाबी करीत असताना मुलांना १०० टक्के गुणवत्ता मिळावयास पाहिजे. अशाप्रकारे शिक्षण हक्क कायद्याची योजना ही सर्व शिक्षा अभियानातून राबवायची आहे.

२.४ या बरोबरच कोठारी कमिशन यांनी 'कॉमन स्कूल' ही संकल्पना मांडली होती. त्यांनी आर्थिकदृष्ट्या गरीब-श्रीमंत हा भेदभाव कमी व्हावा म्हणून नेबरहूड स्कूल आणि कॉमन स्कूलचा एकत्रित विचार केला होता. शिक्षण हक्क कायद्यामध्ये नेबरहूड स्कूलची वेगळी परिभाषा दिली गेली. परंतु कॉमन स्कूलला थोड्याशा प्रमाणात राबविण्याचा प्रयत्न झाला आहे. एकूण प्रवेशित क्षमतेच्या २५ टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना नामवंत खाजगी शाळेत प्रवेश देण्यात येतो. ही बाब शिक्षण हक्क कायद्यात अंतर्भूत करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विचार केला तर सर्व शिक्षा अभियान हे वर नमूद केले त्यानुसार आहे. परंतु शिक्षकांच्या दृष्टीने सर्व शिक्षा अभियान बघितले तर प्रत्येक शाळेमध्ये किमान दोन शिक्षक असावयास पाहिजेत. प्राथमिक शाळांमध्ये ३० मुलांमागे एक शिक्षक या पटीत विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षक नियुक्त करावयाचे आहेत. उच्च प्राथमिक शाळांमध्ये ३५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक या पटीत विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक नियुक्त करावयाचे आहेत. प्राथमिक शाळांमध्ये १२ वी नंतर डी.एड. अभ्यासक्रम पूर्ण केलेले शिक्षक नियुक्त करण्यात येतात. उच्च प्राथमिक शाळांमध्ये डी.एड. अभ्यासक्रम पूर्ण केलेले ग्रॅज्युएट शिक्षक नियुक्त केले जातात. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरू होण्यापूर्वी उच्च प्राथमिक शाळांमध्ये नॉन ग्रॅज्युएट शिक्षक घेण्यात येत होते. परंतु आता ग्रॅज्युएट शिक्षकांचीच नियुक्ती करण्यात येते. शिक्षण हक्क कायद्यानुसार उच्च प्राथमिक शाळांमध्ये ग्रॅज्युएट शिक्षकांची नियुक्ती केली पाहिजे. अशाप्रकारे एकंदरीत ही संपूर्ण व्यवस्था आहे.

२.५ सर्व शिक्षा अभियान हे इयत्ता १ ली ते ८ वी साठी आहे. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना शिक्षण मिळालेच पाहिजे, या दृष्टीने ही व्यवस्था निर्माण केली आहे. एका ठिकाणी असे नमूद आहे की, शिक्षण हक्क कायदा आल्यानंतर जी मुले जन्माला येतील त्यांना तर शिक्षण मिळालेच पाहिजे, परंतु जरी मुलांचे वय १४ वर्षाच्या पुढे गेले तरी त्यांनी इयत्ता ८ वी पास झालेच पाहिजे अशी तरतूद आहे. हा संपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी पुरेशा प्रमाणात शाळा खोल्या असावयास पाहिजेत. त्यामुळे जेवढे शिक्षक तेवढ्या किमान शाळा खोल्या असावयास पाहिजेत. १५० पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये मुख्याध्यापक हे पद असावयास पाहिजे. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये कला, क्रीडा, कार्यानुभव विषयाचे पार्ट-टाईम शिक्षक उपलब्ध करून द्यावयास पाहिजेत. या अभियानांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके विनामूल्य दिली जातात. अनुसूचित जाती-जमातीच्या तसेच दारिद्र्य रेषेखालील मुला-मुलींना विनामूल्य गणवेश दिला जातो. शाळेमध्ये येताना विद्यार्थ्यांचा गणवेश व्यवस्थित असावयास पाहिजे, जेणेकरून त्यांना शाळेत येताना संकोच वाटता कामा नये. त्यामुळेच विनामूल्य गणवेशाची व्यवस्था करण्यात आली आहे. 'मध्यान्ह भोजन' हा कार्यक्रम सर्व शिक्षा अभियानाचा भाग नसला तरी मुले उपाशीपोटी शिकू शकणार नाहीत हे देखील खरे आहे. त्यामुळे मध्यान्ह भोजनची व्यवस्था करण्यात आलेली आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांचे लक्ष भूकेकडे न लागता शिक्षणाकडे केंद्रित होईल. या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना विनामूल्य पाठ्यपुस्तके दिली जात असली तरी विनामूल्य नोटबुक देण्याची मात्र तरतूद नाही. वर्गामध्ये शिक्षण योग्य पद्धतीने व्हावे म्हणून लर्निंग इनहॅन्समेंट प्रोग्राम अंतर्गत शैक्षणिक साहित्य वगैरे दिले जाते. शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला जेव्हा शाळा उघडते तेव्हा किमान साहित्य खरेदी करण्यासाठी पैसे दिले जातात. तसेच दरवर्षी शाळेच्या लहान-सहान दुरुस्तीसाठी स्कूल मेंटेनन्स ग्रँट दिली जाते. याशिवाय स्कूल

ग्रँट सुद्धा देण्यात येते. शाळांमध्ये वर्ग खोल्यांसह किमान इतर शैक्षणिक साहित्य व सोयीसुविधा सुद्धा उपलब्ध असावयास पाहिजेत. या सर्व बाबी करीत असताना शाळेतील विद्यार्थ्यांची काळजी सुद्धा घ्यावयास पाहिजे.

२.६ विभागाच्या प्रधान सचिवांनी सर्व शिक्षा अभियान व त्याची अंमलबजावणी या बाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. या अभियानामध्ये अजूनही अनेक बाबी समाविष्ट आहेत. सर्व शिक्षा अभियानाचा हेतू आणि त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील माहिती विभागाकडे आहे. सर्व शिक्षा अभियान राबविण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे सुद्धा असतील. त्यामुळे या अभियानासंदर्भातील संपूर्ण माहिती समितीला उपलब्ध करुन दिली तर, त्यांच्या मतदारसंघामध्ये या अभियानाची अंमलबजावणी होते किंवा नाही, ती करण्यात काय अडचण आहे व कोणत्या बाबींची अंमलबजावणी होत नाही किंवा त्या संदर्भातील अंमलबजावणी करण्यासाठी लोकांची मदत वा सहभाग घ्यावा किंवा कसे यासाठी संपूर्ण माहिती उपयोगी पडेल. यासाठी सर्व शिक्षा अभियानाची लेखी माहिती तसेच सर्व शिक्षा अभियानाच्या गाईडलाईन्स, शिक्षण हक्क कायदा व त्या कायद्याचे रुल्स यांची प्रत समितीला देण्याबाबत समितीने सुचित केले. विभागीय सचिवांनी त्यास मान्यता दर्शविली.

२.७ एका मुलाच्या मागे शासनाचे वर्षाला ९ ते १० हजार रुपये खर्च होतात, असे साक्षीच्या वेळी सांगण्यात आले होते असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मागच्या वर्षी एका मुलाच्या शिक्षणासाठी १४ हजार रुपये खर्च येत होता.

२.८ जर एका मुलाच्या मागे शासनाचे १४ हजार रुपये खर्च होत असतील तर एखाद्या कॉन्व्हेंट स्कूलमध्ये देखील एवढी रक्कम खर्च होत नाही. शासनाच्या वतीने शिक्षणावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च केला जात असला तरी सरकारी शाळांची परिस्थिती, वातावरण किंवा शैक्षणिक दर्जा कॉन्व्हेंट अथवा खाजगी शाळांसारखा नसतो. मागच्या साक्षीच्या वेळी सुद्धा हा अनुशेष काढण्यात आला होता. जर शासनाकडून शिक्षणावर एवढा मोठा खर्च केला जात असेल आणि तरी सुद्धा शैक्षणिक परिस्थिती सुधारत नसेल तर या बाबतीत काय उपाययोजना केल्या पाहिजेत हे गांभीर्याने बघितले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले तसेच माहिती पुस्तिकेत लोकसंख्या कमी झाल्यामुळे व पालकांचा इंग्रजी शाळांकडे ओढा वाढल्यामुळे शासनाच्या शाळांतील विद्यार्थी संख्या कमी झाल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे ओढा वाढण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा करून पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे ओढा वाढण्याचे कारण म्हणजे त्या शाळांतील वातावरण, तेथील शिस्त, तेथील शिक्षक विद्यार्थ्यांसाठी घेत असलेली मेहनत या बाबी आहेत. परंतु सरकारी शाळांमध्ये एखादा शिक्षक सेवेत लागला की, तो सरकारचा जावई झाल्यासारखे वागतो. तो शाळेत गेला किंवा नाही गेला तरी त्याकडे लक्ष दिले जात नाही. सरकारी शाळेतील शिक्षक शाळेत शिकविण्याकडे दुर्लक्ष करून खाजगी शिकवणी घेणे वगैरे सर्व गोष्टी करतात. परिणामी शाळेतील मुलांकडे लक्ष दिले जात नाही. म्हणून पालकांचा कल इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढतो. समितीसह या ठिकाणी बसलेले अनेक अधिकारी हे मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकून येथपर्यंत पोहचले आहेत. मराठी माध्यमातून शिक्षण घेतले तर पुढे स्कोप राहत नाही असे नाही. शासन शिक्षणावर एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करीत असताना सुद्धा जनता कुठे तरी चुकत आहे असे वाटते. सरकारी शाळांमध्ये आवश्यक त्या व्यवस्था पुरविल्या जात नसतील तर त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे तसेच दुसरी बाब अशी की, कायद्यानुसार जवळच्या शाळेत मुलांना प्रवेश द्यावयास पाहिजे. पंरतु जवळच्या भागात सरकारी शाळा नसेल तर अशा वेळी खाजगी शाळेत प्रवेश घेतल्यानंतर शुल्क भरावे लागेल. अशा शाळांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कापोटी शासन अनुदान देणार आहे काय ? अनेक शाळा अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास नकार देतात. या बाबतीत विभाग काय करणार आहे ? तसेच राज्यात उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या तुलनेत शिक्षक उपलब्ध नाहीत. विद्यार्थी संख्येनुसार उर्दू माध्यमांच्या शाळेत शिक्षकांची भरती केली जात नाही. त्यामुळे दोन-तीन वर्ग मिळून एक शिक्षक असतो. प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळेतील ठराविक विद्यार्थ्यांमागे किती शिक्षक असावेत हे कायद्यानुसार निश्चित केलेले आहे. समितीने निदर्शनास आणून दिले की, इयत्ता पहिली, दुसरी, तिसरीचे वर्ग वेगवेगळे आहेत. परंतु या वर्गांमध्ये विद्यार्थी कमी असल्यामुळे शिक्षकांची संख्या कमी केली जाते. एकच शिक्षक इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकवितो. त्यामुळे या संपूर्ण समस्यांवर काय तोडगा काढता येईल या दृष्टिकोनातून विभागाने गांभीर्याने विचार करावा, असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सपूंर्ण देशात गुणवत्ता हा भेडसावणारा मुद्दा आहे. विशेष करून शिक्षण हक्क कायदा आल्यापासून देशभरामध्ये गुणवत्ता खाली जाऊ लागली. महाराष्ट्रामध्ये गेल्या पाच वर्षांत ती २० टक्क्यांनी खाली गेली आहे. या संदर्भात असर नावाची खाजगी संस्था दरवर्षी आढावा घेते. या वर्षी त्या संस्थेने पूर्ण देशभराचा आढावा घेतला नाही. परंतु त्यांनी पंजाब आणि महाराष्ट्र राज्याचा आढावा घेतलेला आहे. विभागाने मागील तीन वर्षांतील घसरण एका वर्षामध्ये भरुन काढली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्याला देशाच्या तीन टॉप राज्यांमध्ये आणावे असे उद्दिष्ट दिले होते. त्याप्रमाणे विभागाने दिनांक २२ जून, २०१५ रोजी नियोजन करून "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" नावाचा एक कार्यक्रम सुरू केला. त्याची अंमलबजावणी सुरू असून या कार्यक्रमामुळे शाळांमध्ये झालेला थोडाफार बदल झाला आहे. या योजनेस चांगली गती आली आहे. शाळांमध्ये बदल होत आहेत आणि यामध्ये लोक देखील सहभागी झालेले आहेत. शाळांची रंगरंगोटी लोकसहभागातून करण्यात येते. सातारा जिल्ह्यातील कुंठे नावाचा एक भाग आहे. त्या भागात मागील दहा वर्षांपासून ४० शाळांमध्ये १०० टक्के मुले शिकत आहेत आणि त्या सर्व शाळा जिल्हा परिषदेच्या आहेत. त्या ठिकाणी शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न नाही. आम्ही संपूर्ण राज्यामध्ये तीच पद्धत रिप्लीकेट करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ५५२ शाळांनी त्यांच्याकडे १०० टक्के विद्यार्थी शिकत असल्याचे सांगितले. प्रत्येक जिल्ह्यामध्ये

१०० टक्के विद्यार्थी असल्याच्या एक-दोन शाळा असतील, परंतु या एक-दोन शाळांनी शिक्षण हक्क कायदा आणि सर्व शिक्षा अभियान पूर्ण होत नाही. संपूर्ण जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये १०० टक्के विद्यार्थी शिकत आहेत असे सांगता आले पाहिजे. सातारा जिल्ह्यातील कुंठे भागात जे केले आहे तसेच करून दाखवावे. कुंठे भागाप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर तालुका, नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुका, लातूर जिल्ह्यातील लातूर तालुका, पुणे जिल्ह्यातील हवेली आणि इंदापूर हे दोन तालुके, सातारा जिल्ह्यामध्ये वाई तालुका, सांगली जिल्ह्यातील मिरज तालुका, कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज आणि गगनबावडा हे दोन तालुके, बुलडाणा जिल्ह्यातील सव येथील १४ शाळांमध्ये असे सर्व झालेले आहे. आता हे लोण संपूर्ण राज्यामध्ये पसरत आहे. विभागाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' नावाचा कार्यक्रम घेतलेला आहे. त्या कार्यक्रमानुसार दोन वर्षामध्ये राज्यातील शाळांमध्ये १०० टक्के विद्यार्थी शिकत असल्याचे दिसून येईल अशी विभागाने व्यवस्था केलेली आहे आणि त्या दिशेने विभागाचे प्रयत्न सुरू आहेत.

२.९ शिक्षकांची मुले जिल्हापरिषदेच्या शाळेत शिक्षण घेत नाहीत. तेव्हा शिक्षकांच्या मुलांनी जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेतले पाहिजे असे त्यांच्यावर बंधन घालावे. हा नियम सर्व उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपासून खालच्या स्तरापर्यंत सर्वांना लागू करावा. शहर आणि ग्रामीण भागातील परिस्थितीमध्ये फार अंतर आहे. शहरामध्ये इंग्रजी माध्यमाच्या अनुदानित जुन्या शाळा आहेत. आता आरटीई कायद्यानुसार मुलांच्या संख्येवर बंधन आणले आहे. त्यामुळे प्राथमिक शाळांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून आणि माध्यमिक शाळांना शासनाकडून नोटीसा देण्यास सुरूवात झालेली आहे, अशी परिस्थिती आहे. त्यांना सांगण्यात आले आहे की, सन २०१५-२०१६ नंतर पुढील वर्षापासून मुलांच्या संख्येवर जे निर्बंध घालण्यात आले आहे ते निर्बंधित करावे, अन्यथा शाळेचे अनुदान रोखण्यात येईल. ही संख्या ४० सांगण्यात आली. रेकॉर्डवर ३५ संख्या असेल विभाग ५ ग्रेस देत असतील तर ती संख्या ४० होते. आपण मुंबई शहराचा विचार केला तर ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. उर्वरित ५० टक्क्यांमधील ४० टक्के लोक मध्यमवर्गीय आणि निम्न मध्यमवर्गीय आहेत. ज्या उच्चभ्रू शाळा आहेत त्या १० टक्केपेक्षा कमी लोकांसाठी आहेत. झोपडपट्टीतील मुले महानगरपालिकेच्या शाळेत जातात. ४० विद्यार्थ्यांच्या निर्बंधामुळे इन्फ्रास्ट्रक्चर कुठून उभा करायचा, अनुदानित शाळा हे पैसे कोठून उभे करणार ? सद्य:स्थितीत केंद्र आणि राज्य सरकारने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करून शाळांसाठी चार एफएसआय मंजूर केला. परंतु शाळा तीस मीटर उंचीची असावी असे निर्बंध घातलेले आहे. म्हणजे सातपेक्षा जास्त मजले बांधता येत नाहीत. चेन्नईमध्ये एक घटना घडल्यानंतर संपूर्ण राज्यामध्ये हा निर्बंध घालण्यात आला. मुंबईमध्ये चार एफएसआय दिला तरी त्यामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर वाढविण्यासाठी परवानगी नाही. काही संस्था डोनेशनच्या माध्यमातून शाळा उभी करतात, परंतु त्यांचेकडे पैसे असूनही त्यांना शाळा वाढविता येत नाही. वर्गात ४० पेक्षा जास्त विद्यार्थी बसवायचे नाहीत. ४० पेक्षा जास्त विद्यार्थी बसवायचे असतील तर शाळेकडे इन्फ्रास्ट्रक्चरची व्यवस्था नाही. यासंदर्भातील नियम आणि अटी इतक्या कठीण आहेत की, समजा शिक्षकांच्या नियुक्त्या झाल्या नाही अणि तो विषय उपस्थित केला तर तो विषय विभागाच्या अखत्यारित नाही, तो अन्य विभागाशी संबंधित आहे असे सांगण्यात येते. आज अशी परिस्थिती आहे की, शिक्षकांनी जादा वर्ग घेतले तर तो पगार त्यांना कोण देणार ? नॅचरल ग्रोथमध्ये विद्यार्थी वाढत आहेत परंतु त्यांना शिकविण्यासाठी शिक्षकाच्या नियुक्तीसाठी शासन परवानगी देत नाही, अशी शिक्षणाची अवस्था आहे. एका विद्यार्थ्यामागे १४ हजार रुपये खर्च करतो हे पहिल्यांदा समजले. अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्याच्या बँकेमध्ये जमा करण्यात येते त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचा मुलगा जिल्हापरिषदेच्या शाळेत शिकत असल्याचे प्रतिज्ञापत्र दिल्यानंतर विद्यार्थ्याच्या खात्यामध्ये १४ हजार रुपये जमा करावेत. मुलगा किंवा मुलगी शिकली नाही तर त्याच्या आईवडिलांना जबाबदार धरावे असे समितीने सुचविले. ४० विद्यार्थ्यांच्या संदर्भात ज्या अटी व शर्ती आहेत त्याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, शाळेच्या आकृतीबंधाबाबत दिनांक २८ ऑगस्ट २००४ रोजीचा शासन निर्णय आहे. ही संख्या लगेच ३० वर जावी असे नाही. विभागाने कोणतीही वेळ घातलेली नाही. इन्फ्रास्ट्रक्चरबाबत मुंबईची वेगळीच अडचण आहे. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये त्या अडचणी आहेत. विभाग त्या ठिकाणी ३० चे बंधन टाकत नाही. शिक्षण हक्क कायदा राबविण्याची जबाबदारी शासनाची नसून लोकल सेल्फ बॉडीची आहे. हे बृहन्मुंबई महानगरपालिका करीत आहे. शासनाची बृहन्मुंबई महानगरपालिकेसोबत चर्चा सुरू आहे. एखाद्या बाबीसाठी परवानगी नसणे वगैरे बाबी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पहावयाच्या आहेत. एक चांगली गोष्ट अशी आहे की, चांगल्या संस्थेकडे हे काम दिलेले आहे, त्यांनीच हे सर्व रेग्युलेट करावयाचे आहे. त्यांनीच बिल्डींग बांधण्यासाठी परवानगी द्यायची आहे. विभागास खाजगी संस्थांकडून ३० मीटरची मर्यादा उठविण्याबाबत विनंती करण्यात आली होती. विभागाने तो विषय नगरविकास विभागाकडे पाठविलेला आहे. आता त्या गोष्टी होणे आवश्यक आहे.

२.१० शिक्षण हक्क अधिनियम आणि सर्व शिक्षा अभियानाची सांगड घालून विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश देण्यात येतो त्याची अंमलबजावणी होत नाही. ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन केली पाहिजे. कोणत्या शाळांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्याचे नाव, पत्ता व कोणत्या प्रकारामध्ये प्रवेश घेतला यासंबंधीची सर्व माहिती ऑनलाईनवर टाकली पाहिजे तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यात येतात. परंतु बाकीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यात येत नाहीत. त्यामुळे त्यांच्यामध्ये वेगळेपणे दिसून येते. शासन सर्वच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश का देत नाही ? शिक्षण हक्क अधिनियमातील तरतुदीनुसार सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात

येतात. सर्व शिक्षा अभियानांतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यात येतात. जिल्हापरिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देणे आवश्यक आहे. राज्यात अतिरिक्त शिक्षकांची संख्या किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याचा नियम आहे. पण गणवेशाबाबत तसा नियम नाही. प्राथमिक स्तरावर इयत्ता आठवीपर्यंतच्या संच मान्यतेचे काम २० जानेवारी रोजी झाले आणि माध्यमिक स्तरावरील संच मान्यतेचे काम मागील दोन दिवसांपूर्वी झाले. विभागाकडे नवीन संख्या नाही. परंतु, संच मान्यतेच्या निकषाप्रमाणे पाहिले तर लहान शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला नाही तर शिक्षक नेमावे लागतील. विभागाकडे अतिरिक्त शिक्षक नाहीत. काही शिक्षक अगोदरच अतिरिक्त असल्याचे आयडेन्टीफाय करून ठेवले असतील तर त्यांचे समायोजन करण्यात येईल. परंतु, राज्यातील एकूण शाळा विचारात घेतल्या तर नियमाप्रमाणे विभागाला शिक्षक नेमावे लागतील. खाजगी शाळांतील शिक्षक अतिरिक्त झाले असतील तर त्यांचे इतर खाजगी शाळांमध्ये समायोजन केले जाते.

२.११ या संदर्भात कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची गरज आहे असे विभागास वाटत नाही काय ? विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली की शिक्षक अतिरिक्त ठरतात. दुसरे म्हणजे एक विद्यार्थी दोन शाळांमध्ये दाखविण्यात आल्याच्या घटना घडलेल्या आहेत. मागे विद्यार्थ्यांची पटपडताळणी झाली होती असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता बोगस विद्यार्थ्यांचा मुद्दा जवळपास संपविलेला आहे. सन २०११-२०१२ मध्ये पटपडताळणी झाली. त्यावेळी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर पटसंख्या गृहीत धरुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली, त्यानुसार काही पदे कमी झाली. त्यावर शासनातील काही लोक न्यायालयात गेले. न्यायालयाने उपस्थितीच्या आधारावर पटसंख्या निश्चित करु शकत नाही आणि तसे करणे चुकीचे आहे असे सांगून शासनाची बाजू हाणून पाडली. त्यानंतर काही लोकांनी शासन बोगस विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यासाठी काहीच करीत नाही, अशी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यावर न्यायालयाने सांगितले की, याबाबत शासन काय करणार आहे ते त्यांनी सांगावे. त्यानुसार विभागाने ' सरल ' नावाचा कार्यक्रम तयार केला. त्या कार्यक्रमामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचे नाव, तो कोणत्या शाळेत शिकत आहे याची माहिती दिली. त्यामुळे कोणता विद्यार्थी कोणत्या शाळेत शिकत आहे याची माहिती नावानिशी मिळू शकते. दुसरे म्हणजे विद्यार्थी मोजण्याचे काम संगणक करतो, माणूस करीत नाही. त्यामुळे बोगस विद्यार्थ्यांचा विषय संपलेला आहे.

२.१२ इयत्ता आठवी ते दहावी इयत्तासाठी किती अनुदान देण्यात येते. ज्या खाजगी शाळांना शासनाने मान्यता दिलेली आहे, त्या शाळांतील शिक्षकांचा पगार शासन देते काय ? एका विद्यार्थ्यावर १४ हजार रुपये खर्च होतात. त्यामध्ये खाजगी अनुदानित शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आकृतीबंधानुसार जितकी शिक्षकांची पदे मंजूर आहेत त्याप्रमाणे शिक्षकांच्या पगाराचे अनुदान देण्यात येते. जी मुले लोकल बॉडीच्या शाळांतून आणि अनुदानित शाळांतून इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण घेतात त्याचा तो आकडा आहे. इयत्ता नववी आणि दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा खर्च वेगळा आहे, तो जास्तही असू शकेल. कारण शिक्षण हक्क कायदा तेथे लागू होत नाही.

२.१३ यासंदर्भात समितीने विचारणा केली की, राज्यस्तरीय सल्लागार समितीवर आतापर्यंत नियुक्ती का झाली नाही ? मार्च २०१३ मध्ये शासन निर्णय निघाल्यानंतर सुद्धा अशासकीय सदस्यांची नेमणूक झालेली नाही. त्यास जवळपास तीन वर्षे पूर्ण होत आहेत. राज्यस्तरीय सल्लागार समितीवर सदस्यांची नियुक्ती होण्यास वेळ लागण्याची कारणे काय आहेत ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यस्तरीय सल्लागार समितीवरील सदस्यांची नावे मंत्री महोदयांकडून मंजूर होऊन आली आहेत. आता त्यांना त्यांच्या नियुक्तीबाबत विभागाकडून कळविण्यात येणार आहे. या समितीवर अशासकीय सदस्य असतात. या नेमणुका मंत्री महोदय करतात. विभाग फक्त अमुक इतके अशासकीय सदस्य नेमावयाचे आहेत अशी नस्ती मंत्री महोदयांकडे सादर करतो. तसेच मंत्री महोदयांच्या मंजुरीने शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो. मंत्री महोदयांना नावे सुचविण्यास वेळ मिळाला नसेल, परंतु आता त्यांनी सदस्यांची नावे सुचविलेली आहेत.

२.१४ त्या संदर्भातील शासन निर्णय एका आठवड्यात काढणार का ? पूर्वीच्या अशासकीय सदस्यांची मुदत केव्हा संपली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभाग शासन निर्णय काढून सदस्यांना त्यांच्या नियुक्तीबाबत कळविणार आहे. स्टेट ॲडव्हायझरी कॉन्सील नियुक्त करण्याचा शासन निर्णय निर्गमित झाला. पण त्यावेळी अशासकीय सदस्यांची नेमणूक झाली नव्हती, शिक्षण हक्क कायदा आल्यानंतर त्यांची पहिल्यांदा नियुक्ती होणार आहे.

२.१५ यासंदर्भात लेखी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ मिळाला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ मिळत नसेल तर तो अधिकार शिक्षण मंत्र्यांना द्यावा असे मत समितीने व्यक्त केले.

२.१६ शिक्षण हक्क कायद्याचे नियम तयार करण्यास विलंब झाल्यामुळे दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आरक्षणाचा लाभ घेता आला नाही. नियम तयार करण्याच्या विलंबाची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११ मध्ये शिक्षण हक्क अधिनियम प्रसिद्ध झाला. या अधिनियमाला राजस्थानमधील काही संस्थांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्याचा निकाल सन २०१२ मध्ये लागला. तो निकाल लागल्यानंतर २५ टक्के प्रवेश देण्याबाबतचा नियम तयार करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र

राज्यात मुलांना प्रवेश देण्यास सुरूवात झाली. सन २०१२-२०१३ पासून मुलांना प्रवेश देण्यात येतो. शाळांकडे कोणी अर्ज करीत नाही, असे शाळांचे म्हणणे आहे. याबाबत जनजागृती होत नाही असा मुद्दा होता. मागील वर्षापासून राज्याने २५ टक्के जागांसाठी ऑनलाईन प्रवेशाची पद्धत सुरू केली आणि देशभरात असे पहिल्यांदा घडले. विभागाने जनजागृती केली नसतानाही प्रवेशासाठी भरपूर अर्ज आले. नंतर जे मुद्दे उपस्थित झाले त्यावर सध्या विभाग काम करीत आहे.

२.१७ ज्या शाळा शासनाकडून कोणताही लाभ घेत नाहीत त्या शाळांना देखील हा नियम लागू आहे काय ? जी संस्था शासनाची जमीन वापरत नाही, शासनाकडून कोणतीही मदत घेत नाही त्या शाळांना देखील २५ टक्क्याची अट लावण्यात आली आहे हे विभागास विसंगत वाटत नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हे खऱ्या अर्थाने शासनाकडून कोणतेही लाभ घेत नाहीत अशा शाळांसाठी लागू आहे. कॉमन शिक्षण पद्धती आहे. श्रीमंताची आणि गरिबांची मुलांनी सोबत शिक्षण घ्यावे तसेच त्यांना एकमेकांची माहिती मिळाली तरच समाज रचना चांगली राहील. परंतु ज्या शाळा शासनाची कोणतीही मदत घेत नाहीत अशा शाळेत सद्या फक्त श्रीमंतांचीच मुले शिक्षण घेत आहेत. या ठिकाणी शिक्षण खर्चिक असल्यामुळे अशा ठिकाणी केवळ श्रीमंतांचीच मुले शिक्षण घेत असतात. त्यामुळे या शाळेत सुद्धा गरिबांच्या मुलांना शिक्षण घेता आले पाहिजे यासाठी २५ टक्के शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत प्रवेश करण्यात आलेले आहे.

२.१८ या गरीब मुलांचा खर्च शासनाने द्यावा अशी मागणी या संस्थेने केली तर ? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासाठीच विभागाने १४००० रुपये अंदाजित खर्च गृहीत धरला होता व त्याप्रमाणे त्यांना १४००० रुपये दिले जातात. परंतु या शाळांना १४००० रुपये रक्कम फार कमी वाटत असल्यामुळे त्यांचा बाकीचा खर्च कोण देणार अशी तक्रार या संस्था सतत करीत असतात.

२.१९ धीरुभाई अंबानीसारख्या मोठमोठ्या शाळा अशा प्रकारच्या तक्रारी करीत असतात. हा नियम केवळ एचएससी आणि एसएससी बोर्डला लागू होतो की, देशातील सर्व बोर्डला लागू होतो ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व शाळातील सर्व व्यवस्थापनाला हा नियम लागू आहे. शाळा कितीही मोठी असो किंवा त्या ठिकाणी शिक्षण कितीही खर्चिक असले तरी विभागाकडून या शाळांना १४००० रुपये देऊन या शाळेत गरिबांच्या मुलांना शिक्षण देण्यात येते.

२.२० विभागाचे निरीक्षक आणि विभागाचे अधिकारीच शिफारस करून संगनमताने या जागा भरुन टाकत असतात. अशा शाळेत गरिबांची २५ टक्के कोणती मुले शिक्षण घेऊ शकतात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आर्थिकरित्या दुर्बल व मागासवर्गीय मुलांना प्रवेश दिला जातो. यासंदर्भात नियमावली देखील तयार करण्यात आलेली आहे.

२.२१ विभागाकडे शाळांचे झोन किंवा सर्कल असते. या जूनपासून आपले नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. त्यामुळे अशा मोठ्या शाळेत ज्या ज्या गरिबांच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल अशा विद्यार्थ्यांची नावे पत्त्यासह ऑनलाईन उपलब्ध करून दिली जातील काय? २५ टक्क्याच्या नावाने शाळेतील कर्मचारी आणि विभागातील कर्मचारी संगनमताने या जागा भरत असतात असा अनुभव आलेला आहे. खरे म्हणजे सचिवांपर्यंत हा विषय जाऊच शकणार नाही. मोठ्या शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याबाबतचा अहवाल सुद्धा पोहचू शकत नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांची नावे विभागाने ऑनलाईन उपलब्ध करून द्यावी. विभागाने इंजिनिअरींग, मेडिकल शिक्षणाच्या संदर्भात विद्यार्थ्यांची नावे ऑनलाईन केलेली आहेत. परंतु २५ टक्क्यातील पालक गरीब असल्यामुळे ते ऑनलाईनच्या यादीमध्ये जाऊ शकणार नाही. परंतु कमीतकमी ज्यांना २५ टक्क्यामध्ये प्रवेश दिलेला आहे अशा विनाअनुदानित शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना या या वर्गात प्रवेश दिला आहे त्याची माहिती शिक्षण विभागाच्या साईटवर टाकली जाणार आहे काय ? ऑनलाईन पद्धती सुरू केली जाणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने मागच्या वर्षापासून आरटीईच्या प्रवेशासंदर्भात मोठ्या शहरात ऑनलाईन पद्धती सुरू केली आहे. यावर्षी ही पद्धती पूर्ण राज्यात सुरू करण्यात येणार आहे. २५ टक्क्याच्या संदर्भातील माहिती डिसप्लेमध्ये येण्यात काही अडचणी आहेत. विभाग रँडम सिलेक्शन करून या मुलांना ॲडमिशन देण्यात यावी अशी शिफारस करतो. सद्या शाळा सर्व मुलांना प्रवेश देत नाही. यामध्ये शाळा कचरतात. यामध्ये शाळांना देखील काही अडचणी आहेत. एससीपीसीआरकडे काही प्रकरणे गेली असून काही प्रकरणे न्यायालयात देखील आहेत. आरटीईच्या कायद्यामुळे मोठे सामाजिक परिवर्तन होणार आहे. परंतु यामध्ये काही अडचणी आहेत. कोणकोणत्या मुलांना प्रवेश देण्याचे सूचित केले आहे त्यांची नावे विभाग ऑनलाईन घोषित करेल. या मुलांना त्या शाळेत प्रवेश मिळाल्यानंतर त्या शाळांना सुद्धा सदर मुलांची नावे ऑनलाईन टाकण्याची सूचना करण्यात येईल. विभागाकडे ज्या काही तक्रारी येतात त्यावर विभाग ऑनलाईन काम करीत आहे. मुंबईच्या एका व्यक्तीने केंद्र सरकारला पत्र लिहिले होते की, त्याच्या घरात कामवाली बाई होती त्या कामवाल्या बाईच्या मुलाला एका शाळेत प्रवेश मिळाला होता. परंतु शासनाकडून या शाळेला पैसे मिळण्यास उशीर झाल्यामुळे त्या शाळेने सांगितले की, शासन आम्हाला पैसे देत नाही त्यामुळे या विद्यार्थ्याचे पैसे तुम्ही द्या. कामवाली बाई गरीब असल्यामुळे तिच्याकडे पैसे नव्हते. शासनाने त्या शाळेला पैसे दिले आहेत की, नाही याची माहिती त्या कामवाल्या बाईला नव्हती. विभागाने यासंदर्भात सी-डॅक कडून माहिती मिळवली आहे. ज्या मुलांना शाळेत प्रवेश दिला जातो त्या प्रत्येक मुलाच्या पालकाला एसएमएस पाठविला जातो. शाळेला शासनाकडून कोणतेही पैसे मिळाले तरी त्यासंदर्भातील एसएमएस पालकाला जाईल याचीही व्यवस्था विभागाकडून केली जाणार आहे.

२.२२ विना अनुदानित तत्वावरील अनेक शाळेत सन २०११-२०१२ मध्ये आरक्षणाचे नियम शासन पाळू शकले नाही. त्यामुळे यासंदर्भात विभागाने कोणती कार्यवाही केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या विषयाचे प्रकरण अगोदर सर्वोच्च न्यायालयात सुरू होते त्यामुळे या प्रकरणाला स्थगिती होती. परंतु सन २०१२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर शिक्षण हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीला देशामध्ये सुरूवात झाली.

२.२३ महिला व बालविकास विभागाच्या आयोगाच्या अध्यक्षपदी त्याच विभागाच्या प्रधान सचिवांची नियुक्ती करण्यात आली असल्यामुळे यासंदर्भात महालेखापाल यांनी आक्षेप घेतलेला आहे. चोर आणि शिपाई एकत्र आल्यानंतर काय होईल. ज्यांच्याकडून अंमलबजावणी करून घ्यावयाची आहे अशा आयोगाच्या अध्यक्षपदी त्या विभागाचे सचिव राहणार आहेत. सन २०११ ते २०१४ या कालावधीपर्यंत या आयोगाच्या अध्यक्षपदी कोणाचीही नेमणूक न करण्याची कारणे काय आहेत व त्याला जबाबदार कोण आहेत ? ज्या माणसाची समितीला चौकशी करावयाची आहे त्याच माणसाला आयोगाचे अध्यक्ष केलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे काम पूर्णपणे महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून केले जात असते.

२.२४ या संदर्भात २०११ मध्ये मुदत संपल्यानंतर आयोगाच्या अध्यक्ष पदावर त्याच विभागाच्या सचिवांची नेमणूक करणे योग्य होते काय ? त्याच विभागाच्या सचिवांना आयोगाच्या अध्यक्षपदी नेमण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक २८ जानेवारी रोजीचा मुद्दा जेव्हा चर्चेला आला होता त्यासंदर्भात विभागाने सविस्तर माहिती दिली होती. शिक्षण हक्क कायद्यात ३१ व ३२ असे दोन कलम आहेत. कलम ३१ मध्ये राज्य आयोगाला अधिकार आहे की, या प्रकरणाच्या अंमबजावणीच्या मॉनिटरींग करिता आहे व कलम ३२ मध्ये त्यांना अपिल करण्याचा अधिकार आहे. कलम ३१ मध्ये असा उल्लेख आहे की, जर ज्या ठिकाणी राज्य आयोग नसेल किंवा ज्या राज्यात राज्य आयोग नसेल तर राज्य सरकार मंडळ निर्माण करु शकते. बालहक्क आयोगाच्या कायद्यामध्ये सुद्धा यासंदर्भात उल्लेख आहे की, बालहक्क आयोगाची जेव्हा मुदत संपते तेव्हा व्यवस्थेसाठी ते करावे लागते.

२.२५ व्यवस्था करण्यास समितीचा काही विरोध नाही. परंतु त्याच विभागाच्या सचिवांची आयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक का केली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी नमूद केले की, त्या विभागाच्या अंमलबजावणीसाठी एनसीपीसीआरचे आदेश आहेत त्यानुसार अंमलबजावणीचे काम महिला व बालविकासाच्या सचिवांचे आहे. यामध्ये गृह आणि शालेय शिक्षण विभागाचा सुद्धा मुद्दा आहे. हा विषय उच्च न्यायालयापर्यंत गेला होता. जोपर्यंत नियमित आयोगाची व्यवस्था होत नाही तोपर्यंतची ही व्यवस्था उच्च न्यायालयाने मान्य केलेली आहे. भारत सरकारमध्ये एनसीपीसीआरमध्ये अशी व्यवस्था केली गेली होती. हा मुद्दा मागच्या साक्षीच्या वेळी उपस्थित केला होता. त्या आधारावर उच्च न्यायालयाने आयोग जे आदेश देते त्यासंदर्भात बरेच ऐतिहासिक आदेश दिलेले असून त्यासंदर्भातील अंमलबजावणी झालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने खात्री करून ऑर्डर ॲप्रिसीएट केली आहे. विद्यार्थ्यांची शिक्षणाची अडचण होती ती अडचण आयोगाच्या आदेशामुळे संपून गेली आहे. आजच्या परिस्थितीत शिक्षण हक्क कायद्याखाली आयोगाने १०० पेक्षा जास्त आदेश पारित केले असून जे लोक मा.उच्च न्यायालयात गेले होते त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने आयोगाच्या आदेशावर शिक्कामोर्तब केले असून सर्व आदेशाची अंमलबजावणी झाली आहे. दिनांक ६ मे २०१४ मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने खाजगी शाळांविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाच्या वैधानिक खंडपीठाने एक आदेश दिला होता. एप्रिल, २०१२ मध्ये विना अनुदानित खाजगी शाळांविरुद्ध युनियन बँक ऑफ इंडियाचे एक प्रकरण होते. सन २०१२ च्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने असा आदेश दिला होता की, आरटीई कायद्यात अनएडेड मायनॉरिटीज आहेत यामध्ये लिंग्वीस्टीक असू द्या किंवा रिलिजिअस असू द्या त्यांना तो लागू होणार नाही. नंतर २०१२ मध्ये भारत सरकारने या कायद्यात सुधारणा केली की, वैदीक पाठशाळा आणि मदरसे सोडून इतर सर्वांवर हा कायदा लागू होईल. हा विषय मा.सर्वोच्च न्यायालयाने वैधानिक खंडपीठाकडे पाठवून दिला. या खंडपीठाने दिनांक ६ मे २०१४ रोजी असा आदेश दिला की, अल्पसंख्याक अनुदानित असू द्या किंवा विनाअनुदानित असू द्या. कोणावरही शिक्षण हक्क कायदा लागू होणार नाही. आज महाराष्ट्रात १८ प्रकारच्या अल्पसंख्याक आहेत. ६० ते ७० टक्के ज्या चांगल्या शाळा आहेत त्यामध्ये लिंग्वीस्टीक मायनॉरीटीज आणि रिलीजिअस मायनॉरिटी यावर बालहक्क आयोगाने भारत सरकारला पत्र लिहिले आहे की, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करावी, नाही तर शिक्षण हक्क कायद्याच्या संदर्भात कमिशनला आदेश देण्याचे अधिकार आहेत ते सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे अल्पसंख्याकाचे प्रमाणपत्र दाखवून देतात आणि नंतर आयोग काहीही आदेश पारित करु शकत नाही. या अगोदर विभागाने भारत सरकारच्या मंत्रालयाला लिहिले आहे की, या विषयाच्या संदर्भात संसदेमध्ये घटना दुरुस्ती विधेयक आणावे आणि जर असे झाले नाही तर मुंबई आणि महाराष्ट्राला मोठ्या अडचणीला तोंड द्यावे लागेल. असे झाले नाही तर विभाग चांगल्या शाळांमध्ये गरिबांच्या मुलांना प्रवेश देऊ शकणार नाही. यासंदर्भात आयोगाने एक आदेश पारित केलेला आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असताना लिंग्वीस्टीक मायनॉरिटीच्या संदर्भातील २९ व ३०ची व्याख्या काढून, इंटरप्रेट करून यावर लागू होईल. कारण शाळांनी शासनाकडून जमीन घेतलेली आहे, इन्कम टॅक्सवर सूट घेतलेली असते असे असतांना या शाळा लिंग्वीस्टीक मायनॉरिटीचा कन्सेपट फॉलो करीत नाही. यासंदर्भात संविधानाच्या २९ कलमात असा उल्लेख आहे की, To protect the languages and culture and script त्यामुळे गुजराती मुलांना गुजराती माध्यमाच्या शाळेतून शिक्षण दिले गेले तरच संरक्षित होऊ शकतात आणि

त्यामुळेच विभागाकडून जे कलम २९ चे संरक्षण घेण्यात येते ते विभागाला लागू होत नाही. या आधारावर आयोगाने एक आदेश दिला होता. परंतु त्या आदेशाच्या विरुद्ध या संस्था उच्च न्यायालयात गेल्या व सादर केले की, दिनांक ६ मे २०१४ रोजीचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असताना आयोगाने असे कसे इंटरप्रिटेशन केले ? हे प्रकरण अजूनही उच्च न्यायालयात आहे. आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य सचिव दोन्ही आदेश देतात ते आदेश उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय मान्य करतात परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ६ मे २०१४ व दिनांक १२ एप्रिल २०१२ चा आदेश होता. Un aided private schools, Rajasthan v/s Union of India १२ एप्रिल २०१२ त्यामध्ये वैधानिक खंडपीठ नव्हते तर ३ न्यायमूर्तीचे खंडपीठ होते. यासंदर्भात त्यांनी सविस्तर माहिती दिली होती. विनाअनुदानित अल्पसंख्याकाला हे लागू होणार नाही. मायनॉरिटी म्हणजे लिंग्विस्टीक अँड रिलिजिअस. परंतु दिनांक ६ मे २०१४ मध्ये त्या नियमात एकदम बदल केल्यामुळे आयोगाचे हात बांधले गेले आहेत. विभाग सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल करण्यासंदर्भात प्रयत्न करीत आहे. यासंदर्भात भारत सरकारशी विभागाने अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. खरे म्हणजे ही समस्या दिल्ली आणि महाराष्ट्रात जास्त असून दिल्ली पेक्षाही महाराष्ट्रात यासंदर्भात समस्या मोठी आहे. विभागाने लिंग्विस्टीक मायनॉरीटीची शाळानिहाय माहिती दिलेली आहे. शिक्षण हक्क कायद्याचा हेतू या आदेशामुळे पूर्णपणे कोलॅप्स होत आहे असा विभागाने पत्रामध्ये उल्लेख केला आहे. परंतु यासंदर्भात काहीही निर्णय झालेला नाही. त्यामुळे समितीने या प्रश्नाच्या संदर्भात पाठपुरावा केला तर त्यातुन काही तरी मार्ग निघू शकेल.

२.२६ या विषयाच्या संदर्भात समितीकडून अपेक्षा व्यक्त करताना बालहक्क आयोगाच्या सचिवांनी सांगितले की, या विषयाच्या संदर्भात केंद्र सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात एसएलपी गेले पाहिजे. विनाअनुदानित ज्या मायनॉरीटीज आहेत त्यांना हा नियम लागू होईल. दिनांक १२ एप्रिल २०१२ चा आदेश घटना खंडपीठाचा आदेश नव्हता. हा आदेश खंडपीठाचा होता. त्यांनी आदेश दिला होता की, विनाअनुदानित मायनोरिटीचा विषय त्यांनी सोडून दिला होता. हा आदेश १२ एप्रिल २०१२ रोजी आला होता. भारत सरकारने जून, २०१२ मध्ये शिक्षण हक्क अधिनियमाच्याखंड दोनमध्ये सुधारणा केली होती की, मदरसे आणि वैदिक पाठशाळा सोडून हे नियम लागू राहतील. मग अनुदानित किंवा विनाअनुदानित शाळा असली तरी त्यांना हा नियम लागू राहणार आहे. सर्वांना शिक्षण हक्क अधिनियम लागू होईल. हा घटना खंडपीठाचा आदेश नव्हता. संसदेने जी सुधारणा केली ती मान्य झाली परंतु नंतर सर्वोच्च न्यायालयाने पीआयएल प्रकरण घटना खंडपीठाकडे दिले. घटना खंडपीठाने एक च्या बहुमताने निर्णय दिला की, असे करता येणार नाही. त्यामुळे मग रिलिजिअस मायनॉरिटी असू द्या, अनुदानित किंवा विनाअनुदानित मायनॉरिटी असू द्या या कोणावरही शिक्षण हक्क अधिनियम लागू होतच नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या घटना खंडपीठाच्या आदेशाला आव्हान द्यावयाचे असेल तर घटनात्मक सुधारणेच्या कार्यवाहीप्रमाणे सुधारणा करावी लागेल किंवा सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एसएलपी द्यावे लागेल. इतर राज्यात अशी परिस्थिती नाही.

२.२७ आपल्या संसदेने जी सुधारणा केली त्यावर आता घटना खंडपीठाने आदेश दिलेले आहेत. सरकारच्या सुधारणेवर, यामध्ये काही तरी चुका झाल्या असतील किंवा लूप होल असेल त्यामुळे निर्णय देण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाला मिळाले असतील. त्यामुळे कायद्यातून सूटण्यासाठी असलेली पळवाट आणि चुका दुरुस्त करण्याच्या सूचना समितीच्या वतीने दिल्या जातील. विभागाने या या गोष्टी दुरुस्त कराव्यात असे सांगितले तर समिती तशा प्रकारच्या सूचना करेल असे समितीने सूचित केले.

२.२८ लिंग्विस्टीक मायनॉरीटीज ज्या शाळा चालवित आहेत खर तर त्या सरकारचे काम करीत आहेत. लिंग्वीस्टीक मायनॉरीटीजने त्या त्या भाषेमधील शाळा चालवली तरच त्यांना सुट दिली जाते परंतु आपल्या महाराष्ट्राची जी मराठी भाषा आहे त्या मराठी भाषेत मुले आता शिकण्यास तयार नसून आता ते इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शिकण्यास सरसावत आहेत. जर हा नियम बहुभाषिकांसाठी लागू असेल तर हा मायनॉरिटीज लिंगवीस्टीकला सुद्धा लागू होतो. परंतु अशा लिंगवीस्टीक मायनॉरीटजच्या बऱ्याचशा शाळांनी अनुदानित शाळा म्हणून त्या काळी रुपांतरीत करून घेतल्या आहेत. शासनाची यासंदर्भात जी भूमिका आहे तो त्यांनी सकारात्मकतेने बदलण्याची आवश्यकता आहे. ज्यांनी अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले आहे त्यांनी त्या प्रतिज्ञापत्रात तशा प्रकारचे उल्लेख केलेले नाहीत असे मत समितीने व्यक्त केले.

२.२९ या विषयाच्या संदर्भात भारत सरकारला जे पत्र लिहिले आहे त्याची प्रत समितीकडे सादर करून बालहक्क आयोगाच्या सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असताना आयोगाने आदेश पारित केला आहे की, तुमची भाषा गुजराती असताना तुम्ही तुमची भाषा आणि संस्कृतीचे रक्षण करीत नाहीत. तुम्ही इंग्रजी माध्यमातून शिक्षण देत आहात. त्यामुळे तुम्ही मायनॉरीटीजचे जे सर्टीफिकेट घेतले आहे ते बोगस आहे व या कारणामुळेच ही मंडळी हायकोर्टात गेली. They say that the Commission cannot interpret the Order passed by the Supreme Court. या व्यतिरिक्त शिक्षण हक्क अधिनियमाच्या उद्देशिकेमध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले गेले पाहिजे व त्याचा दर्जा सुद्धा चांगला असला पाहिजे असा उल्लेख आहे. आता मराठी माध्यमांच्या शाळा बंद होत आहेत त्यामुळे शिक्षकांचाही प्रश्न निर्माण झालेला आहे. शिक्षण हक्क कायद्याच्या उद्देशिकेमध्ये हे नमूद असताना हे सर्व होत आहे. हे सर्व काम आयोगाचे असताना देखील लोक उच्च न्यायालयात जातात. बालहक्क आयोगाने या विषयाच्या संदर्भात सर्व बाजूने प्रयत्न केलेला आहे. कायद्याच्या चौकटीत जितके बसविता येईल तितके बसवण्याचा विभागाने प्रयत्न केला आहे.

२.३० हा वित्त विभागाचा विषय नसला तरी वित्त विभागाची काही सूचना/सल्ला असेल तर द्यावा अशी यांसदर्भात समितीने वित्त सचिवांना विनंती केली असता वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले की, As we are doing the academic discussion, it is off the record. I am not speaking as a secretary, finance.

Why the constitutional bench was created? Because, when RTE was creatated, there was a nationwide representation by minority run institutions. There was lot of harrassment done to these minority run institutions and there was almost a movement by them. I know the background of this case. I am not talking about your specific problem i.e. Arising in Maharashtra State. But nationwide what happened is, it became a pretext for the Eduction Department and inspectors to go to the minority institutions which are under articles 29 and 30 and give them notice of closure and interferring with their administration. सर्वोच्च न्यायालयापुढे अशी प्रकरणे जेव्हा जेव्हा गेलेली आहेत. The Supreme Court has to balance the right of minorities which is a fundamental right under the constitutional framework of article 29 and 30 to allow them to run their institutions without too much of interference. Such balancing role has to be done every time by honourable Supreme Court and then they had interpreted that this will become a pretext. However, it is infringing on our autonomy i.e. Given to run and administer our institutions. Because the constitution provided rights to run, administer every minority culture, linguistic institution. Now, you are saying your interpretation.

The St. Stephens is the top most College in Delhi University. In case of reservation for Gujrati community they might keep reservation for community children. They might give priority in admission by saying it is a Gujrati run school. They may have majority of Gujrati students, but that doesn u t mean that they should teach in Gujrati language. They might want Gujrati community to learn English or something else. I am just talking about academic issue. This is the background in this case. I would also think that ideally I want RTE facility for children such as toilets, pupil teacher ratio, the quality of teaching etc. All these should be applicable across the institutions. But to dictate beyond that, I think it will become constitutional issue. Because where do you balance RTE with constitutional rights of certain communities.

२.३१ यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, एप्रिल २०१२ चा आदेश आल्यानंतर जून, २०१२ मध्ये भारत सरकारने सुधारणा केली आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये हा मुद्दा पहिल्यांदा आलेला नाही. केरळा एज्युकेशन सोसायटीपासून हा मुद्दा सुरू आहे. दिनांक ६ मे २०१४ च्या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयापुढे मुंबईचा आणि महाराष्ट्रातील लिंग्वीस्टीक मायनॉरिटीच्या बाबीसंबंधातील जो मुद्दा होता तो नव्हता. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने जनरल आदेश दिलेला आहे. त्यांनी स्टेट टू स्टेट, रिजन टु रिजन काहीच निर्णय दिलेला नाही. विभागाने पन्नास पानांचा आदेश दिलेला आहे. त्यात सर्व बाबी समाविष्ट केलेल्या आहेत. विभागाचा आदेश उच्च न्यायालय मान्य करेल अशी पूर्ण आशा आहे. शिक्षण गुजराती, हिंदी माध्यमाचे आहे हे सर्व विभागाने समाविष्ट केले आहे. मायनॉरिटीचा स्टेटस हिंदी आहे. २९ चा फॉलो करतात किंवा कसे हे विभागाने पाहिलेले आहे. यासंदर्भात विभागाचा ५५ पानांचा आदेश आहे. तो उच्च न्यायालयाने अजून मान्य केलेला नाही.

२.३२ हे प्रकरण अजून उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. लिंग्वीस्टीक मायनॉरिटीवर क्वासी ज्युडिशियरी आदेश दिलेला आहे. Then the concerned school went to the High Court stating that, the Commissioner has no power to interpret the order passed by the Honoureble Supreme Court. हा मुद्दा उच्च न्यायालयामध्ये आहे.

२.३३ यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने ज्या मुख्य मुद्यांवर निर्णय दिलेला आहे त्याची प्रत समितीला यावी. त्या निर्णयातील मुद्दे दिले तर त्यासंबंधातील शिफारशी करता येईल असे समितीने सूचविले.

२.३४ महाराष्ट्रात जेथे गुजराथी लोक जास्त आहेत त्यांना वाटले की, येथे गुजराथी माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या पाहिजेत. त्यांचा उद्देश असा असतो की, गुजराथी माध्यमातून त्यांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे. गुजराथी माध्यमाची परवानगी घेतली पण त्या शाळेत गुजराथी भाषेतून शिकविलेच जात नाही. लिंग्वीस्टीक आणि मायनॉरिटी शाळा यांची व्याख्या वेगळी आहे. लिंग्वीस्टीक शाळेला परवानगी असेल तर त्याच भाषेत शिक्षण झाले पाहिजे. मायनॉरिटी असेल तर वेगळा मुद्दा आहे असे मत समितीने व्यक्त केले.

२.३५ याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, The Article 29(1) of the Constitution of India says that, to protect the script, language and culture minorities has right to open the institutions. And the Article 29 (2) of the Constitution says that, the State Government cannot discriminate on the grounds of race, religion, caste and language to give them permission to run the institutions. आर्टिकल ३० मध्ये रिलिजियस लँग्वेज आहे. whether these institutions are protecting culture ? The Culture means their Dressing patterns and traditional Culture. There are two types of culture Inner Culture and Outer Culture. Whether you are protecting both cutlures? You know culture of Hindi and Gujrati communities. मदरसा संदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, In case of protecting the language, culture, script, if you are imparting the education in English then how do you protect the script of Gujrati or Hindi language? Therefore on these grounds I have passed the order. I am also raising these issues with Government of India.

२.३६ यावर समितीने विचारणा केली की, Whether the Government of Maharashtra go to the Honoureble Supreme Court against that order?

यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, The Government of Maharashtra can go into the Supreme Court. But the Government of India is now going to the Honoureble Supreme Court.

२.३७ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, But they are not going to the Supreme Court. यासाठी घटना दुरुस्ती लागेल. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरूद्ध स्पेशल लिव्ह पिटीशन दाखल करावी लागेल किंवा घटना दुरुस्ती करावी लागेल. हे भारत सरकारच करू शकेल.

२.३८ शाळा विकास आराखडे तयार न करणे यासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, शाळा विकास आराखड्यामध्ये खूप उणीवा आहेत. सन २०१२-१३, २०१३-१४ ची आकडेवारी समितीकडे आहे. ही आकडेवारी वाढती आहे. सन २०१२-१३ मध्ये १००१५८ होती, तर सन २०१२-१३ मध्ये १२००६९ आहे. ही योजना तीन वर्षांची झाली पाहिजे.

२.३९ शिक्षण हक्क अधिनियम हा सन २०१० मध्ये अंमलात आला. सन २०१२-१३, २०१३-१४ या वर्षाच्या परिच्छेदामध्ये ८८ हजार शाळांपैकी १० हजार शाळांनी काही केले नाही. सन २०१३-१४ मध्ये ही संख्या आणखी वाढली आहे. त्यामुळे चिंतेची बाब आहे. सुरुवातीला ही संख्या कमी असू शकते. पण अंतिमत: दिवसेनदिवस ही संख्या कमी झाली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते २५ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात काम करीत आहेत.

२.४० शिक्षण हक्क कायदा येण्याच्या अगोदरपासून ते महाराष्ट्रात सर्व शिक्षा अभियान बघत होते. त्यावेळी शाळा विकास आराखडा झाला पाहिजे असा निर्णय विभागाने घेतला होता. सर्व शिक्षा अभियानाचे स्वत:चे निकष आहेत. एवढी मुले असतील तर एवढ्या वर्ग खोल्या पाहिजेत, शिक्षक पाहिजेत, टॉयलेट पाहिजेत. हे सर्व निकष केंद्र सरकारनेच ठरवून दिलेले आहेत. यात फक्त नियोजन करण्याचे काम कम्युनिटीला सांगण्यात येते. कम्युनिटीने एखादी खोली कमी मागितली तर निकषाप्रमाणे देण्यात येते. एखादी जास्त खोली मागितली तर देण्यात येणार नाही अशा प्रकारचे धोरण स्वीकारले जायचे. तेव्हा यामध्ये नियोजन दिसत नव्हते.

२.४१ याबाबत नियोजनाची गरज नाही असे विभागास वाटते काय ? विभागाने शाळा व्यवस्थापन समिती निर्माण केलेली आहे. त्यांना दरवर्षी दहा ते पंधरा हजार रुपये देण्यात येतात. बांधकामाचेदेखील तेच बघतात. शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदीनुसार सर्व काही करावयाचे आहे. त्याप्रमाणे शाळांचा विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शाळा विकास आराखड्याची गरज आहे. परंतु, त्यासंबंधातील विभागाचा दृष्टीकोन काय आहे तो सर्वात महत्त्वाचा आहे. शाळा खोली आणि कुंपण हा एक विषय आहे.

२.४२ बाकी देखील अन्य विषय आहेत. उदा. गणवेश, साहित्य, वाहतूक निधी, पायाभूत सुविधा इत्यादी. शाळा विकास आराखड्यांमध्ये किती वर्ग खोल्या पाहिजेत, किती बाथरूम पाहिजेत, पाण्याची सोय आहे किंवा नाही, यासह सर्व बाबींची आवश्यकता शाळा विकास आराखड्यामध्ये असणे आवश्यक आहे असे शिक्षण हक्क कायद्यामध्ये आहे असे मत समितीने व्यक्त केले.

२.४३ समितीच्या मतास सहमती दर्शवित विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शाळा व्यवस्थापन समितीच्या नियोजनाची गरज विभागाला नसते. अनेक ठिकाणी शाळा व्यवस्थापन समितीने आपली कार्यक्षमता दाखविली आहे. काही ठिकाणी तर शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठका देखील होत नाहीत. विकास आराखड्यामध्ये संस्था रस घेत नसतील तर ती चिंतेची बाब आहे. विभागाकडे डेटा आहे. त्याची

पडताळणी करणे गरजेचे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, त्याबाबत निकष ठरवून दिलेले आहेत. तसे शिक्षण हक्क कायद्यामध्ये युडाईस मध्ये विभागास जो डाटा मिळतो त्याप्रमाणेच पैसे देण्यात येतात. भारत सरकार युडाईस शिवाय कुठलीही पोस्ट मान्य करीत नाही. त्यामुळे शाळेचा विकास आराखडा झाला किंवा नाही तरी सर्व शिक्षा अभियानामध्ये काही फरक पडत नाही. ही अनास्था का निर्माण होत आहे. तेथे नियोजन भरपूर झालेले आहे. पायाभूत सुविधांचा विचार केला तर तेथे नियोजनाला जागा नाही. नुसता गणवेशाचा विचार केला तर तो फक्त एस.सी., एस.टी.साठी दिला तर ते योग्य होणार नाही. शाळा विकास आराखड्यात त्याप्रमाणे सूचविले तर विभागाने द्यायचे असेल तर द्यावे. भारत सरकार देणार नाही असे सांगण्यात येते.

२.४४ वाहतूक निधीसाठी देखील विभागच निधी देणार आहे. सेटेलाईटद्वारे प्रत्येकाचा समन्वय दाखविला तरच विभाग पैसे देणार आहे. मागच्या वर्षी विभागाने १४ हजार मुलांचे नियोजन केले होते. त्यांनी पैसे मागितले. भारत सरकारने सांगितले की, याची अधिसूचना काढावी. त्यानुसार अधिसूचना काढली. त्यानंतर विचारणा केली की, प्रत्येक मुल कुठे राहते, कोणत्या शाळेत जाते त्याचे सॅटेलाईटद्वार को-ऑर्डिनेशन दाखवा. विभाग त्यांच्या नियोजनाला किंमत देतो अशी परिस्थिती आजच्या घटकेला दिसत नाही. त्यामुळे अनास्था निर्माण झाली असावी. शालेय शिक्षण विकास आराखडा केला तर प्रत्येक मुल शिकेल कसे याचा विचार करावा लागेल. यासाठी पैसे लागत नाहीत. विभागाने आधीच शिक्षक दिलेले आहेत, शाळा दिलेल्या आहेत. त्यामुळे गाववाले प्रत्येक मुल शिकले पाहिजे याचे नियोजन करू शकतात. एखादे मुल अनियमित असेल तर ते नियमित शाळेत कसे येईल याचा विचार करण्यात येतो. त्यासाठी भारत सरकारकडून निधी देखील मागावा लागत नाही. यामुळे लोकसहभाग देखील येतो. निधी देखील येतो आणि मग काम होते. त्यासाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते नाही. विभागाने नियोजन केले व तो अंमलात आणले आणि यशस्वी देखील झाले. हा सर्व भाग कायद्याच्या साच्यामध्ये बसविलेला नाही. विभाग हे सर्व प्रत्येक मुलासाठी करीत आहे. सरलमध्ये देखील विभागाने ते घेतले आहे. प्रत्येक शाळेमध्ये किती मुले आहेत किती मुले शिकत आहेत हे आता इंटरनेटद्वारे पाहता येणार आहे. तेथे भरपूर वाव राहील आणि मग विभागाला त्यात सुधारणा करता येईल.

२.४५ विभागाच्या नियमानुसार विनाअनुदानित शाळांना देखील सूट आहे. अशा शाळांनी देखील जिल्हा परिषदेच्या, नगरपालिका, महानगरपालिकेच्या माध्यमातून आराखडा तयार केला पाहिजे. अनुदानित शाळासाठी समित्या आहेत. विनाअनुदानित शाळांसाठी फारशी चर्चा नाही. त्यांचा आराखडा विभागाकडे आला आहे काय ? त्यांच्यामध्ये देखील खूप मोठी तफावत आहे. अनुदानित शाळा देखील त्यांचे आराखडे देत नाहीत. त्यांचा आराखडा देखील स्थानिक स्वराज्य संस्थेला सादर करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अनुदानित शाळांना सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत पायाभूत सुविधांसाठी निधी मिळत नाही. शिक्षकांचा पगार महाराष्ट्र शासन देते. तो पगार देखील सर्व शिक्षा अभियान देत नाही. अनुदानित शाळेच्या इमारतीसाठी सर्व शिक्षा अभियान आणि महाराष्ट्र शासन निधी उपलब्ध करून देत नाही. जेव्हा कायदा आला तेव्हा विभागाने त्यांना सुरुवातीलाच सांगितले की, शाळा व्यवस्थापन समिती घटित करण्यात यावी. त्यांनी सांगितले की, त्यांची स्वतःची संस्था आहे. ती शाळा चालविते. त्यांच्या संस्थेमध्ये अध्यक्ष असतात, विश्वस्त असतात. शाळा व्यवस्थापन समितीमुळे अचानक विभाग सरपंचाला आणून बसविणार हे चुकीचे आहे. त्यास त्यांनी विरोध केला आहे. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती ही या कायद्याप्रमाणे न बनता ती वेगळ्या पद्धतीने बनविण्यात आली.

२.४६ महालेखापालांच्या आक्षेपानुसार वार्षिक आर्थिक आराखड्यामध्ये असलेल्या त्रुटी. यामध्ये अनेक मुद्दे घेण्यात आले आहेत. AWPBS बॅलन्सशिटमध्ये शासकीय शाळांमध्ये लेखन साहित्याची कोणतीही तरतूद नव्हती असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, लेखन साहित्यासाठी तरतूद नाही. विभाग पाठ्यपुस्तके देतो. काही मुलांना गणवेश देण्यात येतात.

२.४७ सन २०१२-१३ मध्ये २८ जिल्ह्यांमधील ४९० नवीन प्राथमिक शाळा स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाने नाकारला. समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांमधील नामांकन क्षमतेची माहिती, शाळेची माहिती, शाळा विस्थापनासाठी नियोजनाच्या वेळी विचारात घेण्यात आली नाही याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एक कि.मी. व तीन कि.मी.च्या निकषाप्रमाणे सगळीकडे नेबरहुड शाळा आहेत. महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिकदृष्ट्या पाचवी पर्यंतच्या शाळा नसून चौथी पर्यंतच्या शाळा जास्त आहेत. तसेच आठवी पर्यंतच्या शाळा नसून सातवी पर्यंतच्या शाळा आहेत. यात एका इयत्तेचा फरक आहे. त्याबद्दलचा हा मुद्दा आहे. जेव्हा देशात १० + २ + ३ अशी शैक्षणिक पद्धत आली त्यावेळी बऱ्याच राज्यांनी स्वतःच्या शैक्षणिक धोरणामध्ये बदल घडवून आणला. पण काही राज्यांनी बदल घडवून आणला नाही. त्यातील महाराष्ट्र हे एक राज्य आहे. आता नवीन कायदा आल्यानंतर हा बदल करायला पाहिजे. आता हळूहळू अशी प्रक्रिया सुरू होती. दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार ते पूर्णत्वास आणले आहे. यापुढे या राज्यात इयत्ता पहिली ते चौथी अशी शाळा दिसणार नाहीत. आता इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतच शाळा राहणार आहेत. तसेच शाळा पहिली ते सातवी नसणार आहे, पहिली ते आठवी किंवा सहावी ते आठवी अशा शाळा राहणार आहेत. ते झाल्यानंतर हा मुद्दा संपणार आहे. २०१२ साली शासनाने निर्णय घेतला, त्यामध्ये स्थानिक संस्थांच्या सर्व शाळा करण्यात याव्यात असे सांगितले. पाचवी आणि आठवीच्या वर्गाचा समावेश करण्याबाबत सांगितले, ते अंमलात आले नाही. आता हे होणार आहे. या शासन निर्णयासंदर्भात साडेतीन दिवस न्यायालयात चर्चा चालली होती.

२.४८ १०+२+३ च्या संदर्भातील हा निर्णय त्या वेळेला विभागाने घेतला नाही त्याचे दूरगामी परिणाम आज दिसत आहेत. शिक्षणाचा दर्जा घसरला आहे, शिक्षणापासून लोक वंचित रहात आहेत, एकाच ठिकाणी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. पैसे १० वी पर्यंत देण्यात येतात. १२ वी पर्यंत देण्यात येतात आणि + ३ ला सुद्धा देण्यात येतात. त्या काळी जे निर्णय केले त्याचे परिणाम आज दिसत आहेत. सकारात्मक विचार करणारा अधिकारी वर्ग आहे. शासनाने ताबडतोब ही सूचना अंमलात आणली पाहिजे. शिक्षणाच्या आवश्यक व्यवस्था लोकांना मोफत उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंत एडब्ल्यूपी अँड बी तयार करताना एमपीएसपीने फक्त सर्व शिक्षा अभियानाच्या निधीचा विचार केला. परंतु संपूर्ण स्वच्छता अभियान, पेयजल अभियान, पोषण आहार, माध्यान्ह आहार इ. केंद्रीय योजना या शाळांमध्ये मूलभूत सुविधा पुरवित होत्या, त्या विचारात घेतल्या नाहीत. म्हणूनच तेवढया प्रमाणात जो लाभ तयार झाला तो तर्कसंगत नव्हता असा महालेखापालांचा आक्षेप आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, २८ ऑगस्ट, २०१५ चा शासन निर्णय आहे तो याचप्रमाणे आहे. यामध्ये ही अडचण आली होती की, अनुदानित शाळांना मुलभूत सुविधा द्यायच्या की नाहीत, स्थानिक संस्थांच्या शाळांना द्यायच्या का यावर भरपूर चर्चा झाली. शेवटी विभागाने सांगितले की, हे सरसकट केले पाहिजे. शेवटी मुले या शाळेतून त्या शाळेत जाणार, ती रिॲडजस्टमेंट दोन-तीन वर्षात होऊन जाईल. त्यामुळे फार काही वित्तीय भार पण येणार नाही. तो निर्णय घेतला, लोकांनी त्याला आव्हान दिले. उच्च न्यायालयात साडेतीन दिवस चर्चा पण झाली. शेवटी हा शासन निर्णय अंमलात आला.

२.४९ नेहमी सर्वसमावेशकच विचार केला पाहिजे यात शंका नाही. यात एक चांगली बाब आहे की, युडाईसचा जो डेटा आहे तो शाळा पातळीवरुन भरुन येतो. जर शाळेने सांगितले की, त्यांच्याकडे टॉयलेट आहे, टॉयलेट असेल तर ते वेगवेगळया योजनांमधून होऊ शकते. शाळा खोली पण वेगवेगळया योजनेच्या माध्यमातून होऊ शकते. युडाईस हे बघणार की, जेवढी मुले आहेत त्यांना पुरेशी पाण्याची व्यवस्था, टॉयलेटची व्यवस्था आहे की नाही? व्यवस्था असेल तर सर्व शिक्षा अभियान देणार नाही, नसेल तर देणार आहे. त्या पातळीवर एका अर्थाने ते बदल होत आहेत. परंतु हेही म्हणणे खरे आहे की, राज्य पातळीवर वेगवेगळया विभागामधून पण सुविधा केली जात नव्हती आणि सध्या पण केली जात नाही. विभाग आराखडा बनवित आहे. विभाग हे पाहतो की, सर्व सुविधा मुलांना मिळाल्या पाहिजेत. कुठून मिळणार आहेत हा मुद्दा नाही.

२.५० मुद्दा क्रमांक २.२.८ मध्ये केंद्र व राज्य शासन यांच्याकडून वर्षनिहाय प्राप्त झालेल्या निधीचा राज्याचा जो तक्ता समितीसमोर आहे त्यामध्ये अखर्चित निधी मोठ्या प्रमाणात दिसतो. २०१३-१४ ची जी परिस्थिती आहे त्याचप्रमाणे २०१४-१५ मध्ये डिसेंबर, २०१५ पर्यंतची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखापालांचे म्हणणे योग्य आहे. याबाबत सचिव समन्वय समितीमध्ये देखील चर्चा झाली. मागील ४-५ वर्षापासून राज्य शासनाचा ३५ टक्के ते ४० टक्के निधी द्यायचा असतो, त्यापैकी शेवटी शेवटी काही निधी द्यायचा राहून जातो. भारत सरकारचा किंवा राज्य सरकारचा निधी फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यामध्ये येतो, हे महालेखापालांनी देखील नमूद केले आहे. फेब्रुवारी-मार्च महिन्यात निधी आल्यानंतर खर्च करण्यास वाव नसतो. बँक खाते वेगळे असल्यामुळे निधी तिथे पडून राहतो आणि पुढील वर्षी तो शिल्लक दिसतो. ती शिल्लक म्हणजे राज्याचा एकप्रकारे तोटा असतो. कारण भारत सरकार म्हणते की, विभागाला १५०० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर केली असेल तर विभागाकडे २०० कोटी आधीचे आहेत त्यामुळे आता १३०० कोटी रुपये देण्यात यावे. असा प्रकार वर्षानुवर्षे सुरू आहे. २०१५ बद्दल जसे १३९ कोटी रुपयांबद्दल सांगितले जात आहे, तसे २०१५ मध्ये विभागाला १३१ कोटी रुपये देणे शक्य झाले नाही. यावर्षी तर योजना आयोगाऐवजी निती आयोग झाल्यामुळे पण बरेचसे संभ्रम निर्माण झाले आहेत. त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतूद बजविण्यास देखील उशीर झाला. अडचण अजून आहे, परंतु भारत सरकारकडून येणारा निधी योजनेमध्ये वेळेवर कसा खर्च होईल याकडे लक्ष देण्यात येत आहे.

२.५१ याबाबत २०१२ मध्ये लोकलेखा समितीने शिफारस केली होती की, महाराष्ट्र सरकारने आगाऊ निधी मुक्त केला पाहिजे. पण याबाबत सरकार गंभीर नाही. समितीने शिफारस करूनही निधी आगाऊ मुक्त करण्यात येत नाही. २०१५ मध्ये पण तेच होत सध्या पण तेच सुरू आहे असे मत समितीने व्यक्त केले व पुढे अशी विचारणा केली की, अखर्चित निधीच्या संदर्भात ३५:६५ हे राज्य व केंद्र सरकारचे प्रमाण आहे. ४०:६० हे निती आयोग झाल्यानंतरचे प्रमाण आहे. केंद्र सरकार या प्रकल्पावर किंवा मिशनसाठी जो निधी पाठवते तो खर्च होऊन राज्य सरकारचा वाटा खर्च करण्याऐवजी अखर्चित राहतो की, केंद्र सरकारने पाठविलेला निधी सुद्धा अखर्चित राहतो?

२.५२ या संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या परिस्थिती तीच आहे. आगाऊ निधी मिळत नाही. या ठिकाणी दोन्ही निधी (राज्य व केंद्र सरकार) एकत्र आल्यानंतर एकच समजला जातो. केंद्र सरकार व राज्य सरकार असे वर्गीकरण केले जात नाही. परंतु केंद्र सरकार निधी देताना राज्य सरकारने स्वत:चा हिस्सा दिला की नाही हे बघते आणि राज्य सरकार नेहमी बघते की, केंद्र सरकारने त्यांचा हिस्सा दिला की नाही? भारत सरकारने यावर्षी तदर्थ तरतूद म्हणून पण निधी दिला. मागच्या वर्षी राज्य सरकारने १३१ कोटी दिलेले नसताना केंद्र सरकारने २५९ कोटी रुपये आगाऊ देऊन टाकले. २०१५-१६ चा निधी त्यांनी लगेच दिला आणि सांगितले की, तदर्थ निधी आहे. पहिला हप्ता म्हणून सांगितले नाही. कारण महाराष्ट्र सरकारने मागच्या वर्षीचा हिस्सा सुद्धा दिला नव्हता.

२.५३ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, राज्य सरकारचा हा कमीपणा आहे, केंद्र सरकारने आगाऊ पैसे दिल्यानंतर सुद्धा मागच्या वर्षीच्या आकडेवारीमध्ये अखर्चित निधी रहात असेल तर या ज्या वर्गासाठी योजना आहेत त्या योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही. एखादे वर्ष असेल तर तपासणी करायला आणखी एक वर्ष लागू शकेल. पण अजूनही तशीच परिस्थिती आहे तर ही फार गंभीर बाब आहे.

२.५४ जोपर्यंत शासनाकडून निधी दिला जात नाही तोपर्यंत केंद्राचा निधी खर्च करता येत नाही का? राज्याने त्याचा हिस्सा दिला नाही. बाकीची आकडेवारी या ठिकाणी दिसत आहे ? इतक्या मोठ्या प्रमाणात अखर्चित निधी कसा दिसतो? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाच्या खात्यामध्ये निधी आल्यानंतर विभाग खर्च करतो. अखर्चित निधी म्हणजे त्यावर्षीचा १ एप्रिल हा दिवस नवीन वर्षाचा असतो. विभागाला फेब्रुवारी-मार्चमध्ये निधी आल्यानंतर खर्च करण्यास पुरेसा वेळ नसतो. म्हणून तो अखर्चित राहतो.

२.५५ ही खात्याची जादुगिरी आहे. जादुगिरी अशी आहे की, पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या मागण्यांमध्ये हे अतिरिक्त निधी मागून घ्यायचा, केंद्र सरकारचे राज्य सरकारकडे निधी आला की नाहीत हे बघण्यासाठी आणि तो निधी तिकडे वर्ग करायचा. राज्याचा निधी खर्च होणार नाही. परंतु केंद्र सरकारचा निधी राज्याला मिळून जातो. म्हणजे राज्य सरकारचा निधी अखर्चित राहील आणि केंद्र सरकारच्या निधीतून काम होणार आहे असे मत समितीने व्यक्त केले व विचारणा केली की, वित्त विभागाचे यासंदर्भात काय मत आहे त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाचा आक्षेप हा आहे की, वर्षाच्या शेवटी शेवटी निधी दिला जातो तो अखर्चित राहतो.

२.५६ ही प्रक्रिया एका वर्षी झाली असेल तर पुढील वर्षी या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा केली पाहिजे किंवा निधी वर्ग करता कामा नये. दोघापैकी एक तरी केले पाहिजे. परंतु त्या वर्षीचा आपला हिस्सा विभाग मार्च अखेर वर्ग करतो की नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नाही. विभागाचा हिस्सा पूर्ण होत नाही. मागील वर्षी सुद्धा १३१ कोटी रुपये शिल्लक राहिले. पुढील वर्षी ते देण्यात येणार आहेत. यावर्षी १३१ कोटी रुपये दिले पण यावर्षी कमतरता आहे.

२.५७ यावर्षी राज्याला केंद्र सरकारकडून पैसे मिळाले नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, संभ्रम निर्माण झाला आहे. योजना आयोगाऐवजी निती आयोग झाला आहे.

२.५८ सर्व शिक्षा अभियानामध्ये बांधकामाला खूप कमी निधी मिळाला आहे? पूर्ण राज्याला फक्त २३ कोटी रुपये मिळाले आहेत. पूर्वी एका-एका जिल्ह्याला २३ कोटी रुपये मिळत होते असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, २०० खोल्यांसाठी निधी मिळाला आहे. विभागाची २४ हजार खोल्यांची मागणी होती. ती अडचण आहेच.

२.५९ हे सर्व राज्यांना लागू झाले आहे की, केवळ महाराष्ट्राला लागू झाले? निधी मिळणे हे परफॉर्मन्स ऑडिटवर अवलंबून आहे. परफॉर्मन्स ऑडिटमुळे कमी निधी मिळाला का? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्यांना निती आयोगाकडून असे सांगण्यात आले होते की, त्यांनी आधीच्या शाळा खोल्या बांधल्या नाहीत म्हणून त्यांना शाळा खोल्या देणार नाही. आता त्यांच्याकडून प्रत्येक शाळेचे मॅपिंग करण्यात येत आहे. असे का घडत आहे? एक तर राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात मुलांची इकडून तिकडे उलाढाल होत आहे. दरवर्षी २ लाख मुले स्थानिक संस्थांच्या शाळामधून निघून इतर ठिकाणच्या शाळांमध्ये जातात. त्यामुळे एखाद्या गावातील शाळेला शाळा खोली मंजूर झाली असली तरी मुले कमी झाली तर त्या गावाला स्वारस्य रहात नसावे.

२.६० अंतिमतः विभागाने स्वतःहून या निधीची पुनर्रचना केली पाहिजे. त्यामुळे जसे एखाद्या जिल्ह्याला शाळा खोली पाहिजे, ३५० खोल्यांचा अनुशेष आहे परंतु विभाग देऊ शकत नाही. विभागाला केंद्र सरकार निधी देत नाही. सर्व शिक्षा अभियान राबविण्यात गोंदिया जिल्हा पूर्ण राज्यामध्ये प्रथम क्रमांकावर आहे. सर्व शिक्षा अभियानमध्ये सर्वात जास्त काम गोंदिया जिल्ह्याने केलेले आहे. त्या जिल्ह्याला निधी मिळत नाही. फक्त १० खोल्या मंजूर झाल्या. मागील वर्षी १५० खोल्या मंजूर झाल्या होत्या. निधी मिळणे हे पूर्ण कार्यदशी लेखापरीक्षणावर (Performance Audit) अवलंबून आहे. याबाबत शाळांचे म्हणणे काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत वित्त सचिवांनी सांगितले की, मुद्दा क्रमांक २.२.१ चा विषय आहे त्यामध्ये विभागाचा जो निधी अखर्चित आहे तो का अखर्चित राहिला आहे? लेखापरीक्षण झाल्यानंतर त्यांनी जे कारण नमूद केले आहे त्यात " Shortfall in expenditure is mainly due to non-completion of school infrastructure works, Shortfall in training to out of school children and members of SMCs, Less expenditure on lodging and boarding of resident children and seasonal hostels, Non-appointment of Teachers, etc." आता निधी अखर्चित राहण्याचे हे जर कारण असेल तर याच्या नियोजनाशी विभागाचा संबंध आहे.

२.६१ दुसरा 'Short release of funds ' हा मुद्दा वित्त विभागाचा आहे. तो आहे राज्याला जो मॅचिंग शेअर द्यायला पाहिजे तो त्यांनी दिला की नाही? नसेल तर what is the reason? मुद्दा क्रमांक २.२ मध्ये जो स्पेसिफिक पॉईंट होता. २०१३-१४ मध्ये एकूण अंदाजपत्रकीय तरतूद १२९९ कोटी रुपयांची आहे. त्यानुसार ३५ टक्के हिस्सा म्हणजे ४५४ कोटी रुपये असायला पाहिजे होता. परंतु त्यांनी त्या वर्षामध्ये जो व्हाईट बुकमध्ये बजेट केलेला आहे ३०० कोटी रुपये. त्यापैकी २५३ कोटी रुपये रिलिज केलेले आहेत. जेवढा राज्याचा हिस्सा आहे

तो बजेट करून घेणे आणि त्याप्रमाणे निधी मुक्त होणार आहे. काही न बघता भाष्य करता येत नाही. But what is the position of Department, त्यानुसार त्यांचे अर्थसंकल्पीय तरतूद कमी झालेली आहे.

२.६२ यासंदर्भात तरतूद कमी केली आणि त्यापैकी ५० कोटी रुपये कमी मुक्त केले. त्यामुळे २०० कोटी रुपयांचा फरक आला असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभाग फार मोठ्या मुद्याकडे लक्ष देत आहे. योजना आयोगाऐवजी निती आयोग झाल्यामुळे असे घडले. पण त्यावर्षी काय घडले? तत्कालीन नियोजन सचिवांनी सांगितले होते की, मागील वर्षीच्या नियतव्ययापेक्षा १० टक्के तरी जास्तीची अर्थसंकल्पीय तरतूद विभागाने करावी. गत वर्षाच्या पूर्वीच्या वर्षी विभागाचा नियतव्यय १५५० कोटी रुपये होता. तो १७०० कोटी रुपयांचा केला पाहिजे होता. निती आयोगाकडून जी कागदपत्रे आली त्यात सर्व शिक्षा अभियानाऐवजी आयोगाने प्रांरभिक शिक्षा कोष असे नाव दिले. असे नाव एरव्ही कुठे दिसले नाही, परंतु त्या कागदपत्रामध्ये होते. यामध्ये भारत सरकार १०० टक्के खर्च करेल असे म्हटले होते. विभागाने त्याचा अर्थ लावला की, सर्व शिक्षा अभियानमध्ये राज्य सरकारने काही द्यायची गरज नाही. भारत सरकारकडून सर्व शिक्षा अभियानासाठी विभागाचे १५४५ कोटी रुपये मंजूर झाले. विभागाने राज्यात अर्थसंकल्पीय तरतूद शून्य केली. नियोजन सचिवांनी सांगितले की, केंद्राकडून निधी आला नाही तर ते निधी देतील असे सांगून विभागाचा १७०० कोटीचा नियतव्यय १००० कोटी रुपये केला.

२.६३ यासंदर्भात निती आयोगाचा विषय या वर्षीचा होऊ शकतो. मागील वर्षीचे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील वर्षी पण नियतव्ययामध्ये असेच काहीतरी झाले असावे. विभागास पैसेच दिले नाही तर अर्थसंकल्पीय तरतूद कुठून करणार? याबाबत वित्त सचिवांनी सांगितले की, मुख्य सचिवांनी या संदर्भात बैठक घेतली. त्यांनी फक्त राज्य शासनाची जेथे कमिटेड लायबिलिटी आहे, स्वत:च्या हिश्श्याची, त्यासाठी त्यांच्याकडून आढावा घेण्यात येणार आहे आणि त्यांनी सांगितले की, We should not loose the central funds because of shortfall of expenditure.

२.६४ याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, Let us hope that next year this problem will be sortout. या परिच्छेदामधील शेवटच्या विषयाबाबत ४७४ कामांचे ३१.९४ कोटी रुपये प्रत्यार्पित करण्याचा विभागाने निर्णय घेतला. पण विभागाने फक्त १७.१८ कोटी रुपयेच पाठविले आणि १४.७६ कोटी निधीपैंकी जर संबंधित २१ जिल्ह्यांसाठी निधी उपलब्ध नव्हता तर हे पैसे गेले कुठे? हा विषय खूप गंभीर आहे. या निधीचा उपयोग झाला का, विभागाला यु.सी.मिळाली का? महालेखापालांचे म्हणणे आहे की, चुकीचे विनियोजन झाले आहे. जेथे जेथे विभागाने बांधकाम करायचे नाही असे म्हटले आहे त्यामध्ये त्यांनी ५४ कोटी रुपयांपासून विभागाला सल्ला दिला की, हे सुद्धा कमी करु नका. ते विभागाने कमी केले नाही. त्यानंतर ३१.९४ कोटी रुपयांची फिगर आली. हा निधी पूर्णपणे प्रत्यार्पित न करता फक्त १७.१८ कोटी रुपये पाठविले. १४.७६ कोटी रुपयांचे काय झाले? २१ जिल्ह्यांनी विभागास रक्कम परत केली नाही. त्याबाबत विभागास यु.सी.मिळाली का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्यार्पणच्या मुद्याबाबत अगोदर पण माहिती देण्यात येत होती. शाळांमधील मुले कमी झाली पण शाळा खोली मंजूर आहे. यावर विस्तृत माहिती घ्यावी लागेल.

२.६५ हा विषय गंभीर आहे. आतापर्यंत सर्व माहितीपर चर्चा सुरू होती. हा विषय २१ जिल्ह्यातून प्रत्यार्पित होणारे १४.७६ कोटी रुपये राज्य शासनाकडून केंद्र सरकारला परत पाठविण्यात आले नाहीत. या संबंधीचा आहे. जर ते बांधकाम झाले असेल, या निधीचा वापर झाला असेल तर काही हरकत नाही. पण त्याचा काही हिशोब नसेल तर ही बाब गंभीर आहे. हा निधी केव्हा, कधी मिळणार आहे, तो निधी कुठे गेला ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, निधी जिल्ह्यामध्ये उपलब्ध आहे मात्र शाळा पातळीवरुन त्याचे प्रत्यार्पण करण्यास तयार नाहीत. विभागाने प्रस्ताव दिला होता. मात्र केंद्र शासनाने तो मंजूर केला नाही.

२.६६ ही बाब नोव्हेंबर, २०१३ मधील असून आता सन २०१६ सुरू आहे. १४ कोटी ७६ लाख एवढ्या निधीचा वापर झाला काय, किंवा त्याचे प्रत्यार्पण झाले काय ? केंद्र शासनाने सांगितले आहे की, हा निधी द्यावा हा निधी केंद्र शासनाने पाठवण्यास सांगितले व विभाग पाठवू शकला नाही तर या निधीचे काय झाले ? तसेच एकूण ५४ कोटी एवढ्या निधीपैकी ३१ कोटी एवढा निधी पाठवण्याचा निर्णय झाला व त्या करिता प्रस्तावाची तयारी केली गेली. विभागाने फरकाची रक्कम थांबवून ठेवली त्याचा वापर झाला आहे काय ? २३ कोटी रुपयांचा उपयोग झाला आहे काय किंवा ते पैसे जिल्हा परिषदेकडे आहेत काय ? त्याचा उपयोग होत नसेल तर तो निधी परत का करण्यात आला नाही, ही माहिती समितीला द्यावी असे समितीने सुचित केले.

२.६७ दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या बैठकीतील मुद्याबाबत समितीला विस्तृत अशी माहिती न मिळाल्याने दिनांक १ मार्च, २०१६ रोजी समितीने पुन्हा शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांची व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, यामध्ये ३१ कोटी आणि १७ कोटीचा घोळ दिसून आला होता. त्यावेळच्या चर्चेबद्दल समर्पक उत्तर येऊ शकले नव्हते. ४७४ कामाचे ३१ कोटी रुपये विभागाला परत करायचे होते. विभागाने २१७ कामांचे १७ कोटी रुपये परत करण्याचा प्रस्ताव पाठविल्या संदर्भात स्पष्टीकरण करावे. यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, हे सगळे प्रकरण अपूर्ण कामाविषयीचे आहे. अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी निधी शाळा पातळीवर

किंवा ब्लॉक पातळीवर उपलब्ध असतात. जिल्हा पातळीवरचे पैसे हे स्पील ओव्हर म्हणून असतात. त्यामुळे भारत सरकार वेळोवेळी मंजूर करीत असते. कामासाठी निधी लागतो तर मिळतात, अन्यथा मिळत नाही अशी स्थिती आहे. एकूण २१७ कामांबद्दलचा हा मुद्दा होता. २१७ पैकी २५ कामे पूर्ण झालेली आहेत. ५० प्रगतीपथावर आहेत.

२.६८ ४७४ कामांचे ३१ कोटी विभागाला परत करायचे होते त्याऐवजी विभागाने २१७ कामांचे १७ कोटी रुपये परत करण्याचा प्रस्ताव पाठविला. यासंदर्भात सचिवांनी खुलासा केला की, कामाचा निधी परत करण्यात येत नाही. काम समर्पित करण्यात येते. कामे समर्पित होतात तेव्हा त्या कामावरील निधी खर्च होत नाही. काम समर्पित झाले म्हणजे ते काम होत नाही. अगोदर महालेखाकार कार्यालयात परिच्छेदनिहाय उत्तर सादर केले होते त्यावर जे अभिप्राय आले आहेत त्याची आता तयारी केली आहे. अभिप्रायामध्ये २१७ कामाच्या १४.७६ कोटी एवढ्या निधी बद्दलचा मुद्दा आहे. त्यावर विभागाने सविस्तर माहिती दिली आहे.

२.६९ कार्यकारी समितीच्या ऑक्टोबर, २०१२ मधील बैठकीत एमपीएसपीने सुरू झालेल्या १८१६ बांधकामावरील ५४ कोटी ९२ लक्ष रुपये प्रत्यार्पित करण्यासाठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविण्याचे ठरविले. त्यानुसार ज्या ठिकाणी बांधकामाची सुरूवात झाली नव्हती अशा २८ जिल्ह्यातील बांधकामावरील तरतूद प्रत्यार्पित करण्याचे निर्देश दिले. २०१३ मध्ये झालेल्या चर्चेदरम्यान केंद्र सरकारने फक्त प्राथमिक शाळा संसाधन केंद्र, नागरी साधन केंद्र यांच्या बांधकामावर निधी प्रत्यार्पित करण्याचा सल्ला दिला, त्याप्रमाणे एमपीएसपीने ३१.९४ कोटी रुपयाची ४७४ कामे प्रत्यार्पित करण्याचे पुनर्निधारित केले. तथापि, लेखापरीक्षणामध्ये असे आढळले की, १७.१८ कोटीच्या २६७ कामांचा प्रत्यार्पणाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केला. उर्वरित कामाचे १४.७६ कोटी रुपये जिल्ह्यांकडे उपलब्ध नव्हते. त्या निधीचा अपहार झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले आहे. विभागाने जे उत्तर दिले आहे त्यात म्हटले आहे की, १७.१८ कोटी या रक्कमेतूनच आहे आणि त्या रक्कमेबाबत सुद्धा नंतरच्या काळात केंद्र सरकारने सांगितले की ती कामे पूर्ण करा. हा १७.१८ कोटीचा मुद्दा समजला. पण ३१ कोटी आणि १७.१८ कोटी रुपये यात फरक का आहे? १४ कोटी रुपयांची कामे झाली होती का? निधी उपलब्ध नव्हता म्हणजे त्यांनी काम करून घेतले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही सगळी आकडेवारी बघितली तर विभाग प्रत्यापर्णासाठी भारत सरकारकडे मागणी करीत होता आणि येथे प्रत्यक्षात काम पण सुरू होते असे दिसते. त्यामुळे तेव्हाच जर प्रत्यार्पित करण्याची मागणी मंजूर झाली असती तर अडचण झाली असती. काम नंतर पण पूर्ण होतच गेले आणि आता विभागाचा अहवाल असा दिसतो की, शाळा पातळीवर २१७ पैकी २५ कामे पूर्ण झाली. आधीचे जे १७.१८ कोटी रुपये दिसत आहेत त्यातील काही कामे पूर्ण झाली. त्यानंतर १४.७६ कोटी रुपये होते त्यातून १.७७ कोटी रुपयांची २५ कामे पूर्ण झाली आणि अजून ५० कामे प्रगतीपथावर आहेत. प्रत्यार्पित करण्याच्या प्रस्तावामध्ये कुठे तरी अडचण जाणवते. अजूनही १४२ कामे सुरू झालेली नाहीत. त्या सगळया गोष्टींचा आता विभागाकडून आढावा घेण्यात येत आहे. खरोखर शाळा बंद झाली असेल, शाळा उघडायची गरज नसेल, तेवढीच कामे विभागाकडून प्रत्यार्पित करण्यात येणार आहेत, बाकीची कामे प्रत्यार्पित करणे बरोबर नाही असे दिसते.

२.७० ही कामे २०१३ पासून मंजूर आहेत. २०१६ मध्ये अजूनही काही कामे सुरू व्हायची बाकी आहेत. ३-३ वर्षे विलंब लागण्याची कारणे काय आहेत ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आता जी चर्चा करण्यात येत आहे ती २०१० पूर्वीच्या कामाबाबत आहे. ६-६ वर्षे, ८-८ वर्षे उशीर झालेला आहे.

२.७१ उशीर झाला हे मान्य आहे. २०१० च्या पूर्वीची कामे मंजूर आहेत. २०१६ मध्ये त्या कामांची चर्चा करण्यात येत आहे. अजूनही काही कामे सुरू झालेली नाहीत. एखाद्या योजनेतून एखाद्या कामावर निधी मंजूर झाल्यानंतर ते काम ६ वर्षे मार्गी न लागणे याचे विभाग समर्थन करते का? अशा कोणत्या अडचणी आहेत, ज्या अडचणीमुळे ६-६ वर्षे काम पूर्ण होत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अडचण तर आहे. सर्व शिक्षा अभियान सुरू झाले तेव्हा बऱ्याचशा नवीन शाळा उघडण्याचे प्रस्ताव आले. काही वेळा असे दिसते की, शाळेची गरज नसताना पण प्रस्ताव आले. आता याच्या पुढे एका ठिकाणी असा मुद्दा आहे की, जी ४८२ कामे सुरू झाली नाहीत त्याच्या कारणांचा शोध घेत असताना ३७४ नवीन प्राथमिक शाळा उघडण्याचे प्रस्ताव होते, त्यातील १०० शाळा बंद पण झाल्या, पण काम मंजूर झाले. शाळा बंद झाल्या म्हणून इमारत बांधणे संयुक्तिक नाही. अशा प्रकारची कामे आहेत, जो प्रत्यार्पित करण्याचा मुद्दा आहे. भारत सरकारने मान्य पण केलेले नाही. आधी प्रत्यार्पित करण्यासाठी प्रयत्न केला. या बाबतीत विभागाला राज्य पातळीवर जाणीवपूर्वक निर्णय घेऊन काम करावे लागेल.

२.७२ विभागाच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, शाळा शोधून द्याव्यात. शाळा उघडायच्या होत्या, तेथे गरज नव्हती म्हणून इतकी कामे विभाग सुरू करु शकला नाही. अशा कोणकोणत्या कारणामुळे मागील ६ वर्षे हा विषय प्रलंबित राहिला. शाळा सुरू करायच्या नव्हत्या हा मुद्दा १०० टक्के कामांना लागू होता का? ३७४ प्रकरणातील विषय हे नक्की शाळा सुरू न करण्याचे विषय आहेत का? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, पुढील मुद्दा त्यामध्ये आहे. पृष्ठ क्रमांक ७ वर त्याचा तपशिल दिलेला आहे.

२.७३ एका बाजूला केंद्र सरकार, राज्य सरकार प्रचार करते. अंमलबजावणी हा जो विषय आहे, ६-६ वर्षे अंमलबजावणी होत नसेल तर काय साध्य होणार आहे ? यामध्ये ३७४ कामे अजून सुरू झालेली नाहीत. ३७४ कामे सुरू होऊ शकत नाहीत, शाळा बंद झाली असेल तर नवीन काही तरी नियोजन करणे आवश्यक आहे. विभागाकडे इतर ठिकाणी खूप काही मागण्या आहेत. विभागास २०१५-१६ मध्ये खूप कमी निधी

मिळाला आहे. तो निधी इकडे तिकडे वळता करून किंवा त्याच जिल्ह्यात दुसऱ्या ठिकाणी देऊन ते काम करता आले असते. त्याच्यावर लवकरात लवकर निर्णय घेतला पाहिजे असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या निर्णयामध्ये थोडा उशीर झालेला आहे. समितीचे म्हणणे योग्य आहे. नाशिक जिल्ह्यात शहरी भागामध्ये अशी जी अडचण येत होती त्याबाबत विभागाने ग्रामीण भागामध्ये निधी वळता केला आहे.

२.७४ १०० शाळा बंदच झाल्या. त्याबद्दल पुनर्रचना करण्यात यावी. जेथे नवीन मागणी आहे, जेथे शाळा सुरू झाली आहे तिथे शाळा देण्यात यावी असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी त्यास मान्यता दर्शऊन त्याप्रमाणे नियोजन करण्यात येईल असे सांगितले.

२.७५ विभागाने समायोजन केले पाहिजे. ६-६ वर्षे, ७-७ वर्षे निधी अखर्चित पडला आहे. पूर्वी ३-४ लाख रुपयामध्ये शाळा खोली बांधली जात होती. आता ६ ते ६.५ लाख रुपये लागतात. किंमत वाढत जाते आणि या कामांसाठी विभागाला पुन्हा प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. याचा सर्वांगीण अभ्यास केला तर असे निदर्शनास येईल की, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये एका बाजूला ७.६७ टक्के मुले कमी झाली. खाजगी शाळांमध्ये २१.८० टक्के मुले वाढली. विभागाचा शिक्षणाचा दर्जा, विभागाच्या सोयी-सुविधा यामुळे मुले येत नाहीत, ही मुख्य कारणे आहेत. हीच स्थिती राहिली तर येणाऱ्या १० वर्षात अर्ध्या शाळा बंद कराव्या लागतील. ही जी परिस्थिती निर्माण होते, शासनाने शाळा काढल्यानंतर मुले मिळत नाहीत, दुसऱ्या बाजूला प्रवेशासाठी मुले रांगा लाऊन उभी आहेत. खाजगी शाळांमध्ये प्रवेश सुरू? झाल्यानंतर लोकप्रतिनिधींकडून शिफारसपत्र घेण्यात येते. जर यामध्ये ही सर्व सुधारणा केली नाही तर हा विषय पूर्ण होणार नाही. दरवर्षी शासनास काही प्रमाणात शाळा बंद कराव्या लागतील. याच्याबाबतीत विभागाचे काय धोरण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या मुद्याबाबत मागील बैठकीत सविस्तर चर्चा केली होती. अजून आवश्यकता असेल तर पुन्हा सांगण्यात येईल. यावर महालेखापालांनी असे मत व्यक्त केले की, The amount sanctioned was for capital works. Whereas we have got one or two reports which says that this is being used as a general recurring fund. It is not supposed to be used for this. They have converted it into revenue expenditure. You will have to chECk on that also. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, Actually, it is not a water tight compartment I can give you example of last year. We had proposed 3600 crore budget, we only got 1574 crore. That was also the approved budget but finally we are getting only 700-800 crores. Money gets spend somewhere, but we are not getting the full budget and this is the issue.

२.७६ यासंदर्भात That is one issue but the amount which you get has to be spend properly. This may be the reason that the coNStruction is not happening. They are using it for the revenue expenditure which they are not supposed to use, they are not using it for the capital *i.e.* construction. असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, We have given the details on page No-5, Table-B of the new explanation notes. याप्रकरणी शालेय पातळीवर पैसे not started work, in-progress complete, this money is allocated to the work and this is not being spent. This amount of 5 crore 80 lakh is lying at the block level and it is waiting for the work to be completed. So, this money is there, we have not spent it.

२.७७ केंद्र सरकार व राज्य सरकारकडून जो निधी प्राप्त झाला त्यामधील समर्पित केलेला निधी वगळून उर्वरित निधी तो भांडवली कामामध्ये खर्च करण्यात आला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सर्व शिक्षा अभियानमध्ये सर्व प्रकारचे घटक आहेत. शाळा खोलीसाठी प्राप्त झालेला निधी इतर कामासाठी खर्च करण्यात आला आहे काय, शाळाखोलीचे काम सुरू झाले असेल तर त्याकरिता निधी उपलब्ध आहे, तो आज उपलब्ध नसला तरी उद्या उपलब्ध होणारच आहे. याबाबत नियम आहे. एखाद्या राज्यासाठीच्या मंजूर केलेल्या एकूण बजेटच्या १/३ पेक्षा अधिक निधी भांडवली खर्चासाठी वापरता येत नाही. भांडवली खर्चासाठी कमी निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

२.७८ अहमदनगर, औरंगाबाद, नंदूरबार, नाशिक अशा काही जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कामे सुरू झालेली नाहीत व रत्नागिरी, सातारा, उस्मानाबाद अशा काही जिल्ह्यांमध्ये १०० टक्के प्रमाणात कामे सुरू झालेली आहेत, असे उपलब्ध यादीवरून दिसून येते. ७-८ जिल्ह्यांमध्ये कामे सुरू झालेली नाहीत ही त्या जिल्ह्याची इनइफिशिअन्सी आहे, हे उपलब्ध यादीवरून स्पष्ट होत आहे याबाबत विभागाचे मत काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याप्रकरणी कोणती कामे सुरू झाली नाहीत याबाबत थोडेसे खोलात जाऊन विचार केला तर ती बाब स्पष्ट होते. अहमदनगर जिल्ह्यामध्ये अधिक शाळांची मागणी केली गेली व त्यानंतर त्या शाळांची गरज नव्हती हे लक्षात आले त्यामुळे सदरचे काम सुरू केले नाही, औरंगाबादच्या बाबतही अशीच स्थिती आहे. नंदूरबार जिल्ह्यामध्ये डोंगराळ भागात

दगड, माती घेऊन जाणे शक्य होत नाही त्यामुळे काही शाळा उघडल्या असल्या तरी इमारतीचे बांधकाम करता येत नाही. ४८२ पैकी ३७४ कामे नवीन शाळेची आहेत.

२.७९ शाळा मंजूर नसताना शाळा खोलीची मागणी केली, सदर मागणी संबंधितांनी कशाच्या आधारे केली? सदरहू प्रकरणी संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक आहे. आवश्यकता नसताना व मंजुरी नसताना प्रस्ताव कसा काय पाठविण्यात आला? शाळेस मान्यता नसताना शाळा उघडण्यात आली अशा ठिकाणी शाळा खोलीची आवश्यकता काय? याप्रकरणी दुर्लक्ष करण्याचा मुद्दा सुरू ठेवण्यात येऊ नये. ज्या जिल्ह्यांनी शाळा खोलीच्या बांधकामाचे अनावश्यक प्रस्ताव पाठविले त्यांना जबाबदार धरण्यात येईल काय? विभाग प्रमुख म्हणून आतापर्यंत सदर प्रकरणी कोणती कारवाई केली आहे व कोणती कारवाई करण्यात येणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ज्या जिल्ह्यांनी शाळा खोली बांधकामाचे अनावश्यक प्रस्ताव पाठविले त्यांना जबाबदार धरण्यात येईल. सदरहू विषयाबाबत आताच खोलात विश्लेषण होत असून प्रत्येक कामाकडे पहिल्याच वेळेस पाहण्यात येत आहे. विभागाने शाळानिहाय विश्लेषण केले असून त्यामध्ये असे दिसून येत आहे की, पायाभुत सुविधा असताना शाळा खोलीची मागणी करण्यात आली, मुले कमी असताना शाळेस मंजुरी मागण्यात आली. याविषयाबाबत प्रशासकीय दृष्टीने योग्य त्या पद्धतीने विचार न केल्याने हा प्रकार घडला आहे. काही ठिकाणी शाळेची गरज असताना जागा उपलब्ध करून घेणे शक्य झाले नाही.

२.८० शाळेसाठी जागा उपलब्ध नाही, बांधकाम करण्यासाठी अडचण आहे ही बाब योग्य आहे. परंतु ज्या ठिकाणी शाळेस मंजुरीच नाही तेथे शाळा खोली बांधण्याकरिता मंजुरी मागण्यात आली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, शाळेची मंजुरी करून घेतली आहे. सर्वशिक्षा अभियान अंतर्गत यू-डाईजप्रमाणे आकडेवारी दाखवून एखाद्या गावामध्ये मुले दाखविली व त्या भागात एक किलो मिटरच्या अंतरावर शाळा नाही, असे दाखविले तर भारत सरकारकडून शाळेस मंजुरी मिळते.

२.८१ शाळेला मंजुरी नसताना शाळा खोलीची मागणी करण्यात आली ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, गरज नसताना व मंजुरी नसताना या दोन वेगवेगळया बाबी आहेत. यु-डाईज डेटा प्रत्येक शाळा पातळीवर भरण्यात येतो. त्यामध्ये शिक्षकांनी जी काही माहिती भरली आहे ती भरताना त्यांना विषय समजला नाही, त्यावेळी त्यांच्याकडून काही चूक झाली असली तरी संगणक फिड केलेल्या माहितीनुसार दाखवतो की अमूक विषयाप्रमाणे अमूक ठिकाणी शाळा उघडणे आवश्यक आहे. त्याबाबत राज्य सरकार व भारत सरकार यांचे एकमत होते कारण संगणकावरील आकडेवारी आधारभूत असते. परंतु ज्यावेळी प्रत्यक्ष शाळा उघडावयाची असते त्यावेळी दिसून येते की डेटा एन्ट्रीमध्ये चूक झाली आहे. सदरहू बाबी काही जिल्ह्यांच्याबाबतीत घडलेल्या असल्याने ही गंभीर बाब असून चौकशीची गरज आहे. याप्रकरणी वेगवेगळी कारणे असू शकतात. परंतु ज्या ठिकाणी शाळांची गरज नसताना त्यांची मागणी केली व त्या मंजूर करण्यात आल्या आहेत. सदरहू प्रकरणी जबाबदार असलेल्या संबंधित गट शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे काय, शिक्षकांनी माहिती भरली असली तरी प्रत्येक तालुक्यामध्ये गट शिक्षण अधिकारी कार्यरत असतात, त्यामुळे त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, ज्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय ? या प्रकरणी योग्य माहिती देणे ही गट शिक्षण अधिकारी यांची जबाबदारी आहे. शाळा खोली बांधण्यासंदर्भातील अनावश्यक प्रस्ताव पाठविल्याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करावी व त्याबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी असे समितीने सुचविले. तसेच ' बी ' तक्त्यामधील शेवटच्या परिच्छेदामध्ये " फंडींग नॉट मेड " असे म्हटले आहे, त्याचा अर्थ काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ब्लॉक पातळीपर्यंत पैसे दिल्यानंतर ते पुन्हा परत येत नाहीत. जिल्हा व राज्यस्तरावरील निधी खर्च झाला नाही तर तो पुढील वर्षीच्या सुरूवातीच्या शिल्लकमध्ये दर्शविण्यात येतो. अशावेळी त्यावर्षीचे वाटप शून्य होते व त्यावर्षात ज्या कामांना मंजुरी देण्यात येते त्यास तो निधी देण्यात येतो. त्यामुळे याप्रकरणीच्या कामांना राज्य सरकार व भारत सरकारने मंजुरी न दिल्याने निधी उपलब्ध होत नाही, याप्रकरणी ज्यावेळी कामांची गरज भासेल व त्याकरिता लोकांचा दबाव मोठ्या प्रमाणात असेल त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.८२ ब्लॉकस्तर व शाळास्तरावरील निधी बाबत कोणता निर्णय घेण्यात येणार आहे ? त्याकरिता आणखी निधी लागेल व " फंडींग नॉट मेड " मधील शिल्लक निधीची आवश्यकता भासणार आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ब्लॉकस्तर व शाळास्तरावरील निधी त्या-त्या कामासाठी मंजूर आहे. " फंडींग नॉट मेड " मधील निधी हा जिल्हा पातळीवरील फ्लॉक व शाळास्तरावर जो निधी देता आला नाही, तो निधी आहे. सदर निधीची आवश्यकता भासली तर तो देण्यात येईल. सदरहू निधी जिल्हास्तरावर पडून नाही.

२.८३ महालेखाकार कार्यालयास महाराष्ट्र राज्य प्रकल्प संचालक यांनी पाठविलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे की, महालेखाकार कार्यालाकडून प्राप्त सूचनेद्वारे सन २०१३-१४ मधील सुरूवातीची संपूर्ण शिल्लक ही सर्वसाधारण निधी समजून महसूली खर्चाकरिता वापरण्यात आलेला असल्याने समर्पित करावयाचा बांधकामाचा निधी महालेखाकार कार्यालयास जमा करता येत नाही, याचा अर्थ काय ? विभागाच्या म्हणण्यानुसार सदर निधी उपलब्ध असतानाही जिल्हा पातळीवर खर्च करता येत नाही, तो निधी मान्यता असल्याशिवाय वितरीत करता येत नाही. याप्रकरणी महालेखाकार कार्यालयास देखील काही स्पष्टता आलेली नाही असे मत समितीने व्यक्त केले असता यासंदर्भात अधिक स्पष्टीकरण देताना

विभागीय सचिवांनी सांगितले की, जी कामे मंजूर होतील त्याकरिता तरतूद मंजूर करण्यात येते, प्रत्यक्ष रचनात्मक काम असेल तर भांडवली खर्चामधून मंजुरी देण्यात येते. तसेच इतर २/३ कामांमध्ये शिक्षकांचे वेतन, शाळेचे अनुदान व इतर कामांचा समावेश असतो व त्यासाठी देखील निधी मंजूर करण्यात येतो. राज्याच्या इतिहासामध्ये सर्व शिक्षण अभियानाकरिता १०० टक्के अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झाली व १०० टक्के ती मुक्त करण्यात आली. असे कधीही घडलेले नाही. दरवेळी काही तरी अडचण निर्माण होत असते व त्यामुळे पूर्ण निधी केव्हाच मिळत नाही.

२.८४ समितीने केलेल्या निरीक्षणात असे दिसून आले की, सर्व शिक्षा अभियानाकरिता राज्य शासनाचा हिस्सा मिळत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व खुलासा केला की, केंद्र शासनाकडून काही अडचणी दिसून येत आहेत. समजा २/३ पेक्षा कमी अर्थसंकल्पीय तरतूद झाली व निधी मिळाला नाही तर महसुली खर्चामधून १०० टक्के निधी खर्च करता येतो. भांडवली खर्चाने एकही काम एखाद्या जिल्ह्याने केले नाही. मात्र विभागाकडून निधी समर्पित केला जात असताना जिल्ह्याने केलेल्या कामांना विभाग समर्पित केल्याचे दाखवून विभागाच्या त्या कामांवर २/३ किंवा १/३ खर्च केल्याचे समजणार व सदर निधी विभागाने १०० टक्के खर्च केल्यामुळे खर्च मंजूर होतो. म्हणून जिल्हास्तरावर सांगण्यात आले की, त्यांनी योजनेवर निधी खर्च केला. भांडवली खर्च या शीर्षाखाली निधी खर्च केला नाही व अर्थसंकल्पीय तरतुदही शिल्लक ठेवली नाही. कारण जिल्ह्याची अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर होती म्हणून जिल्हास्तरावर खर्च केला. पुढच्या वेळी निधी समर्पित करण्यात आला तर त्यांना निधी मिळणार नाही. परंतु एखादे काम चुकून सुरू केले तर पुन्हा वेगळ्याने अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करावी लागते. कारण त्याकरिता जिल्हास्तरावर निधी वापरण्यात आला नव्हता. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत असलेले काम आवश्यकता असेल तर पूर्ण करावे लागेल. समजा गरज नसतानाही शाळा उघडली असेल तर तेथील काम पूर्ण करता येणार नाही. तो निधी समर्पित होणार व त्याकरिता भांडवली खर्च या शीर्षाखाली तरतूद करण्याची आवश्यकता भासणार नाही.

२.८५ Delay in issue of school as per the notification of RTE rules वास्तव्याशेजारील शाळांची स्थापना करणे. या मुद्यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, राजस्थानमधील काही शाळांनी माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल केले होते व त्याचा निकाल दिनांक १२ एप्रिल २०१२ रोजी लागला. त्यानंतर जवळपास १ महिन्यात राज्य शासनाने अधिसूचना काढली असल्याने सदरहू प्रकरणी उशीर झाला असे म्हणता येणार नाही.

२.८६ महालेखाकार कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी नंदूरबार, धुळे व बीड या जिल्ह्यात दौरा केला होता. या जिल्ह्यामध्ये २४ शाळांना मंजुरी दिल्यानंतरही त्या सुरू करण्यात आल्या नाहीत, याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू प्रकरणी नंदूरबार व बीड जिल्ह्यामध्ये शाळा सुरू करण्याकरिता आवश्यक विद्यार्थी संख्या पूर्ण नसल्याने त्या शाळा सुरू होणार नाहीत. धुळे जिल्ह्यातील ५ प्रस्तावित शाळांच्या संदर्भात गाव बदली शाळांचा प्रस्ताव पाठविला असून ज्या ठिकाणी त्यांनी शाळा प्रस्तावित केल्या होत्या तेथे त्यांना शाळांची आवश्यकता नाही.

२.८७ याप्रकरणी महालेखाकार कार्यालयाने त्रुटी काढली होती की, २४ लक्ष ८७ हजार मुलांना मोफत प्रवास सवलत देणे अनुज्ञेय व क्रमप्राप्त असताना ती देण्यात आली नाही. याबाबत अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी विदित केले की, मोफत प्रवास सवलत हे भारत सरकारचे धोरण आहे. शिक्षण हक्क कायद्यामध्ये म्हटले आहे की, १ कि.मी.च्या आत प्राथमिक शाळा व ३ कि.मी.च्या आतमध्ये उच्च प्राथमिक शाळा देणे शक्य झाले नाही तर त्या भागातील मुलांना वाहतूक प्रवास भत्ता देण्यात यावा. सदरहू प्रकरणी मागच्या वर्षी १४ हजार मुलांच्या संदर्भात प्रस्ताव पाठवण्यात आला होता. त्यावेळी " राज्य शासन वाहतूक भत्ता देण्यास तयार आहे " अशी अधिसूचना निर्गमित करण्यास भारत सरकारने सांगितले. त्यानुसार राज्य शासनाने अधिसूचना निर्गमित केली. त्यानंतर भारत सरकारने सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्याच्या घराचे अक्षांश, रेखांश व शाळा कोठे देणार हे गुगल मॅपवर दर्शविण्यात यावे व सदरहू अंतर बरोबर असेल तर भारत सरकारकडून सदरहू प्रकरणी निधी देण्यात येईल. याप्रकरणी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या संदर्भातील सदर माहिती तयार करणे शक्य झाले नाही. यावर्षी " सरल " नावाचा संगणकीय कार्यक्रम तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास युनिक आयडेंटिफिकेशन कोड देण्यात येणार असून त्यामध्ये प्रत्येक मुलाच्या घरापासून शाळेचे अंतर दर्शविण्यात येणार आहे. त्यामुळे यावेळी सदरहू प्रकरणी भारत सरकारकडून निधी मिळेल.

२.८८ शिक्षण हक्क नियमाप्रमाणे उच्च माध्यमिक व प्राथमिक शाळेच्या अंतराचे जे बंधन आहे त्यानुसार राज्यात किती शाळांची आवश्यकता आहे ? मुलांचे प्रमाण कमी असल्याने शाळा काढणे शक्य होत नाही. काही ठिकाणी १ व ३ कि.मी.च्या आत खाजगी शाळा मंजूर केल्या त्यामुळे त्या भागातील नगरपरिषद व जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडल्या, असे घडले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मुलांचे प्रमाण कमी असल्याने शाळा काढणे शक्य होत नाही. काही ठिकाणी १ व ३ कि.मी. च्या आत खाजगी शाळा मंजूर केल्यामुळे त्या भागातील नगरपरिषदा व जिल्हापरिषदेच्या शाळा बंद पडू शकतात. १ व ३ कि.मी. अंतराच्या आत शाळा मंजुर करण्यासाठी निकष आहे परंतु सदरील अंतरामध्ये किती शाळा असाव्यात याबाबत निकष नाही.

२.८९ सदरहू अंतराच्या आत शासकीय शाळा असताना त्या ठिकाणी असलेल्या खाजगी शाळा मंजूर केल्यामुळे त्या शाळा बंद पडतात. कारण खाजगी शाळेला जास्त प्राधान्य देतात. शासकीय शाळा बंद होण्यामागे हेही एक प्रमुख कारण आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मुलांना शाळेत प्रवेश घेण्याकरिता जर पर्याय उपलब्ध होत असेल तर तो पर्याय उपलब्ध करून दिला पाहिजे.

२.९० अशा ठिकाणी खाजगी शाळांना मंजुरी दिल्याने शासकीय शाळा बंद पडतात, याबाबतही विचार करणे आवश्यक आहे. सदरहू अंतराच्या नियमानुसार नवीन शाळांना परवानगी नाकारणे शक्य नाही. शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे तो उंचावला तर जनता शासकीय शाळेमध्ये आपल्या मुलांना प्रवेश देतील असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासकीय शाळा व खाजगी शाळांबाबत सांगावयाचे झाले तर मुलांसाठी शाळा, उपलब्ध पर्याय व गुणवत्ता हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

२.९१ शासकीय शाळेतील पट संख्या घटत आहे. काही देशांमध्ये शाळांना मंजुरी देताना ती विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार देण्यात येते. हा प्रयोग जगातील ४-५ देशात राबविण्यात येतो. या देशांच्या निकषांप्रमाणे भविष्यात आपल्या शाळेचा दर्जा टिकविण्याकरिता त्यांच्याप्रमाणे धोरण राबविण्याबाबत शासनाने विचार केला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू विषयाबाबतचा लेख इकॉनॉमिक्स टाईम्समध्ये आला असून ५-६ देशांचा अभ्यास करून हा लेख लिहिला आहे. वेगवेगळ्या देशात वेगवेगळी पद्धत राबविण्यात येते. काही देशात चलन पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. या पद्धतीनुसार पालकांना चलन देण्यात येते व मुलांना कोणत्या शाळेत प्रवेश द्यावयाचा हे त्या मुलांच्या पालकांकडून ठरविण्यात येते. परंतु भारतात शासनाने शिक्षकांना पगार देण्याच्या पद्धतीचा स्वीकार केला आहे. त्यानुसार मग शिक्षकांना ६ वा किंवा ७ वा वेतन आयोग देण्याची बाब समोर येत असते व त्यांना तो धोरणानुसार देण्यात येतो.

२.९२ राज्यात शिक्षणासाठी होत असलेला खर्च हा विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या वार्षिक उत्पन्नानुसार चलन देऊन ते ज्या शाळेत त्यांच्या मुलाचा प्रवेश घेतील त्या शाळांना तो निधी देण्यात येईल, अशी पद्धती वापरण्याची शासनाची मानसिकता आहे का ? सर्व शासकीय शाळेतील शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत. हे सर्व कोठे तरी थांबणे आवश्यक आहे, अनेक शिक्षक पुढील कालावधीत वयोमानानुसार हळूहळू सेवानिवृत्त होत जातील. सदरहू पद्धतीचा अवलंब केला तर शासनावर यामुळे नवीन बोजा वाढणार नाही. ज्या ५-६ देशामध्ये सदरहू पद्धतीचा वापर करण्यात येतो त्यांचा अभ्यास करून विभागाने समितीला अहवाल सादर करावा जेणे करून समितीला शासनास शिफारशी करताना त्याचा विचार करणे शक्य होईल अशी सूचना समितीने केली. सदर सूचना विभागीय सचिवांनी मान्य केली तसेच यासंदर्भात एक सादरीकरण तयार केले आहे असे सांगितले.

२.९३ यामध्ये २७ हजार ६१६ शासकीय शाळांमध्ये, उंचीकरणाबाबत सर्व शाळांना मान्यता दिली होती. सद्यःस्थितीमध्ये किती शाळांच्या उंचीकरणाचा (Upgradation) निर्णय घेण्यात आला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शाळाच्या उंचीकरणाबाबत (Upgradation) आयुक्तांकडून परवानगी देण्यात आलेली आहे. राज्यामध्ये पहिली ते चौथी पर्यंतच्या शाळा आणि सातवी पर्यंतच्या शाळा असतात. शिक्षण हक्क कायदा आल्यानंतर त्यानुसार पाचवी पर्यंतच्या शाळा एक किलोमीटरच्या आत आणि इयत्ता आठवी पर्यंतच्या शाळा तीन किलोमीटरच्या आत असणे आवश्यक आहे असा कायदा आल्यामुळे एक, एक वर्ग वाढविण्यासाठी यास उंचीकरण (Upgradation) असे नाव दिले. आयुक्त यांनी २२ हजार ६५७ शाळांमध्ये पाचवा वर्ग जोडण्याची परवानगी आणि ६ हजार ९८० शाळांमध्ये आठवा वर्ग जोडण्याची परवानगी जिल्हा परिषदांना दिलेली आहे. महालेखापालांच्या लेखापरिक्षणामध्ये मुख्यत्वे जे दिसत होते, त्यापेक्षा २० अधिक शाळांना मंजुरी दिली गेली आहे. यातील प्रत्यक्षात किती जोडले गेले, याबद्दलचा अहवाल सद्या उपलब्ध नाही. परंतु दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजी सरसकट सर्व ठिकाणी वर्ग जोडावे, अशा सूचना आहेत. प्रत्येक ठिकाणी पाचवा आणि आठवा वर्ग जोडला जाईल. इतर शाळांमध्ये काही ठिकाणी वर्ग बंद होतील. त्यामुळे आता याकडे लक्ष देण्यात येत नाही. महत्त्वाची बाब अशी आहे की, विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षण मिळाले पाहीजे.

२.९४ शासकीय शाळेतील प्रवेशात उतरता कल, यासंदर्भात समितीने मत व्यक्त केले की, यामध्ये एकच मुख्य बाब आहे की, इंग्रजी माध्यमांच्या शाळेकडे पालकांचा कल आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा नसतात. त्यामुळेच मोठ्या पायाभूत सुविधांचा पूर्णपणे वापर करता येत नाही, असे आढळून येते. त्याबाबत शासनाचा काही विचार आहे काय ? शासकीय अधिकारी आणि सन्माननीय सदस्यांची मुले शासकीय शाळेत शिक्षण घेत नाहीत, असे देखील आहे. शासकीय शाळेत शिक्षण घेणे सर्वांकरिता बंधनकारक करण्यात यावे. सन्माननीय सदस्य हे कायमस्वरूपी त्या पदावर रहाणार आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या वर्षी विभागाने नियोजन केलेले आहे. हा मुद्दा दोन, तीन वेळेस मांडण्यात आला होता. मागील वर्षी दहा, पंधरा मराठी शाळा अशा आढळून आल्या की तेथे इंग्रजी माध्यमातील वीस पेक्षा अधिक मुलांनी प्रवेश घेतले होते.

२.९५ इंग्रजी येत नसल्यामुळे ती मुले मराठी माध्यमांच्या शाळेत आली असतील. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशी मुले मराठी माध्यमांच्या शाळेमध्ये आली असतील. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत मोठी फी द्यावी लागते. शासकीय शाळेमध्ये मोफत शिक्षण दिले जाते. इंग्रजी शाळेतील वीस मुले मराठी शाळेमध्ये आली असतील, परंतु इंग्रजी शाळांमध्ये किती मुले गेली याचे प्रमाण बघितले तर ते जास्त आढळून

येईल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, दरवर्षी दोन लाख मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये प्रवेश घेतात. ही मुले वर्षानुवर्षे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात आहेत. हा एक प्रघात झाला आहे. त्याला कोणी फारसे काही करू शकले नाही. परंतु आता हा उलट प्रघात सुरू झाला असून ही विभागासाठी चांगली बाब आहे.

२.९६ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, याला उदाहरणदाखल घेणे योग्य नाही. कारण विभागाच्या कोष्टकानुसार दिवसेंदिवस मराठी शाळांमधील संख्या कमी होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. अनुदानित शाळा असो की, विनाअनुदानित शाळा असो त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची संख्या, उपस्थितीची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याकरिता शासनाचा काही विचार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात मागील वर्षी काही बदलते चित्र दिसले तर त्याचे सार्वत्रिकरण (युनिव्हर्सलायझेशन) करता येते काय, असा विचार करण्यास सुरूवात होते. काहीच आढळून आले नाही, तर त्यावर विचार करणे देखील अवघड होते. असे सुरू झाले तेव्हा, सर्वात प्रथम याचे काय कारण असू शकते, यासंदर्भात त्या शाळांचा अभ्यास करण्यात आला. पालकांच्या आर्थिक स्थितीचा विचार केला तर एकाच गावातील २० पालकांचे अचानक आर्थिक उत्पन्न कमी होत नाही. पूर्वी तर त्यांच्या मुलांना ते इंग्रजी माध्यमांच्या शाळेत पाठवितच होते. परंतु त्यांनी याच वर्षी मुलांना मराठी माध्यमांच्या शाळेत का आणले, याचे कारण शोधण्यात आले. तेव्हा असे आढळून आले की, जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेतील गुणवत्तेत फरक दिसून आला. मराठी माध्यमांच्या शाळेत कोणता फरक दिसला, या विषयावर देखील अभ्यास करण्यात आला. मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण द्यायचे अशी पालकांची इच्छा नाही, तर त्यांच्या मुलांना इंग्रजी बोलता आले पाहिजे, असे त्यांना वाटते. तसेच त्यांच्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि इंग्रजी बोलता यावे, या दोन बाबी दिसून आल्या. त्यामुळे मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण मराठी माध्यमाचे शिक्षण आणि स्पोकन इंग्लीश in the name of English subject. या दोन बाबी केल्यास मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते, हे विभागाच्या लक्षात आले. आता त्यानुसारच काम करण्यात येत आहे. अशा प्रकारे पुणे, धुळे व यवतमाळ जिल्ह्यामध्ये आढळून आले. परंतु हे मोठ्या शहरांच्या आजुबाजूच्या गावातच दिसून येते, असे देखील नाही. अशा प्रकारे चांगली बाब दिसत आहे व त्याला सार्वत्रिक (युनिव्हर्सलाईज) करण्याच्या दृष्टीने विभागाकडून नियोजन करण्यात आले आहे.

२.९७ प्रत्येक जिल्हा परिषदेच्या सर्कलमध्ये एक इंग्लीश कॉनव्हेंट सुरू करावी, असा मागच्या आठवड्यामध्ये निर्णय घेतला. सर्व शिक्षा अभियानांतर्गत पायाभुत सुविधा उपलब्ध आहेत. उपलब्ध पायाभुत सुविधांमध्ये प्रत्येक जिल्हा परिषदेच्या सर्कलमध्ये एक इंग्रजी कॉनव्हेंट सुरू करायचे. त्याकरिता पैसे कुठून येणार, हा एक प्रश्न आहे. तसेच त्याकरिता गावकऱ्यांकडून शुल्क म्हणून वर्गणी जमा करायची, शिक्षकांनी काही श्रमदान करायचे, जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षकांनी एक हजार रुपयांची वर्गणी द्यावी, असा जॉईंट व्हेंचरचा प्लॅन केलेला आहे. शासनाच्या शाळेमधील मुलांची संख्या कमी होत आहे. मुलांची संख्या वाढण्याकरिता असे केल्यास फायदा होऊ शकेल असे समितीने निदर्शनास आणून दिले व इयत्ता चौथी, पाचवी, सातवी याकरिता हे फायदेशीर होईल असे सुचविले. अशा प्रकारे करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय, याचा देखील अभ्यास करण्यात यावा. यासंदर्भातील प्रकल्पाची पहाणी करण्यात यावी. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुलांची संख्या वाढली पाहिजे, प्रवेश वाढला पाहीजे, उपस्थिती वाढली पाहीजे, यादृष्टीने काम करण्याच्या मनःस्थितीत शासन आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काही ठराविक पालकांना असे वाटते की, त्यांच्या मुलांना इंग्रजी यायला पाहिजे, अशी परिस्थिती नाही. १०० टक्के पालकांना असे वाटते की, आपल्या मुलास इंग्रजी यावे. याकरिता काही शाळा उघडून चालणार नाही. तर त्याकरिता १०० टक्के शाळांमधील गुणवत्ता वाढविणे महत्त्वाचे आहे. त्याकरिता शासन काम करीत आहे.

२.९८ सचिवांनी दिलेल्या माहितीमध्ये खूप तथ्य आहे. लोकप्रतिनिधी जेव्हा त्यांच्या मतदार संघामध्ये वेळोवेळी फिरत असतात. छोट्या गावांचा म्हणजेच हजार लोकसंख्येच्या आतील गावांचा दर्जा अत्यंत चांगला आहे. पाच हजार लोकसंख्या असलेल्या किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठ्या गावांमधील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा पाहीजे तेवढा चांगला नाही. मराठी माध्यमातून चांगले शिक्षण मिळते, परंतु विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलता आले पाहिजे, हे म्हणणे योग्य आहे. यासाठी शिक्षकांची मानसिकता बदलवण्याची गरज आहे. मोठ्या गावातील पालकच असे म्हणतात की, त्यांच्या गावामध्ये खाजगी शाळा आल्यावर त्या शाळेत त्यांच्या मुलाचे प्रवेश घेण्यात येतात. याचा परिणाम असा होतो की, मराठी शाळा ओस पडतात. ज्या छोट्या गावांमध्ये जेथे पाच, सहा किलोमीटरच्या अंतरावर जवळपास शाळा नाही, तेथील शिक्षक अत्यंत चांगले काम करीत आहेत, असा अनुभव आहे. मतदार संघातील अशा शाळा आहेत जेथे शासनाने सहावा वेतन आयोग दिला, तसेच सातवा वेतन आयोग दिला जाणार आहे. परंतु शिक्षकांची मानसिकता बदलवण्याच्या दृष्टीने शिक्षणाधिकारी काम करीत आहे काय, हे देखील पहाणे महत्त्वाचे आहे.

२.९९ पूर्वी शिक्षण अधिकारी नियमितपणे शाळेला भेट देत होते. प्रत्येक वर्गामध्ये येऊन शिक्षक काय शिकवतात, कसे शिकवतात, हे पहात होते. आज शिक्षणाधिकारी पाच, सहा महिने झाल्यावरही शाळांना भेटी देत नाहीत. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. याकरिता विभागीय स्तरावरुन चांगले प्रयत्न झाले तर नक्कीच फायदा होऊ शकेल. शिक्षणाधिकारी शाळा तपासणीसाठी गेले पाहीजेत. शिक्षकांची मानसिकता बदलवली गेली पाहीजे. असे झाल्यास निश्चितच जिल्हा परिषदेच्या शाळेचा दर्जा चांगला होऊ शकतो. आजही पालकांना असे वाटते की, त्यांचा मुलगा त्यांच्या गावातच शिकला पाहीजे. परंतु त्यांच्या घराशेजारचा मुलगा बाहेर गावी शिक्षण घेण्यासाठी गेल्यास त्यांनाही वाटते की, त्यांचा मुलगा

देखील बाहेरगावी शिक्षणासाठी गेला पाहिजे. प्रत्येक खेडेगावातील पालक पोटाला चिमटा काढून मुलांना बाहेरगावी शिक्षणासाठी पाठवितात. या दृष्टीने शिक्षकांची मानसिकता बदलविण्यासाठी विभागाने प्रयत्न केल्यावरच हे थांबू शकेल. तसे प्रयत्न केले पाहिजेत. शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रत्येक शाळेमध्ये आठवड्याला जाणे गरजेचे नाही. परंतु शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रत्येक महिन्याला नियमितपणे शाळेला भेट दिली पाहीजे. काही शिक्षक अत्यंत चांगले शिकवतात. आदर्श शिक्षक पुरस्कार मिळावा, याकरिता काही शिक्षक लोकप्रतिनिधींकडे शिफारस पत्र मागण्यासाठी येतात. विभागाकडून ती शाळा पाहण्यात येते. खरोखरच त्या शाळेमध्ये चांगले शिक्षण दिले जात असेल तर त्या शाळेतील शिक्षक कोणत्या समाजाचा आहे, हे न पहाता त्याची शिफारस करण्यात येते. शाळेचा दर्जा किंवा शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची जबाबदारी पालकांची नसून ती शिक्षकांचीच जबाबदारी आहे. त्याकरिता शासनाने कठोर राहून त्याकरिता प्रयत्न केले पाहीजे, विभाग त्याकरिता काय करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाने दिनांक २२ जून २०१५ रोजी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम हाती घेतला. विभागाने आता मुल्यमापन करण्यास सुरूवात केलेली आहे. त्याचा परिणाम ८० टक्के शिक्षकांच्या मानसिकतेमध्ये बदल होण्यात झाला आहे. त्यामध्ये २० टक्के शिक्षक बाकी आहेत. हा मुद्दा मोठ्या व लहान गावांचा आहे. विभागाने शैक्षणिक परिषदा घेण्यास सुरूवात केलेली आहे. सर्वप्रथम दिनांक २० आणि २१ नोव्हेंबर २०१५ रोजी सांगली जिल्ह्यामध्ये हा कार्यक्रम केला. त्यावेळी १० विशेष लक्ष केंद्रीत केलेल्या जिल्ह्यांचे (स्पेशल फोकस डिस्ट्रीक्टचे) सर्व शिक्षा अभियान आणि भारत सरकारच्या आकडेवारीनुसार जे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले जिल्हे आहेत, त्या जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना बोलविले. त्यांच्यासोबत तेथे चर्चा करण्यात आली. तेथे देखील हाच मुद्दा आला होता की, लहान शाळांकरिता हे सोपे आहे. ओळख असलेले शिक्षक मोठ्या गावांमध्ये येतात आणि ते विद्यार्थ्यांना शिकवू पहात नाही. त्यांना मिरज तालुक्यातील शाळा दाखविण्यात आली. मिरज तालुक्यात सर्व गावे मोठी आहेत व सर्व शाळा देखील मोठ्या आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळा देखील मोठ्या आहेत. तेथे चांगले विद्यार्थी घडवले जाऊ शकतात, तर आपल्याकडे असे का होऊ शकत नाही, हे विभागाने दाखवले. त्यानंतर त्याचा परिणाम येण्यास सुरूवात झाली. त्यापूर्वी सातारा जिल्ह्यातील कुमठेपीट दाखविले होते. तेथे लहान शाळा आहेत. तरी देखील सातारा शहराला लागून मिरज-सांगली-कुपवाड महानगरपालिका आहे. शहरात रहाणारे शिक्षक चांगले शिकवित आहेत, हे लक्षात आले तेव्हा काही शिक्षकांच्या मनातून हे निघून गेले की, त्यांची मोठी ओळख आहे, त्यांचे कोणी काहीही करू शकत नाही. हे ठीक आहे. परंतु चांगले काम करता येते. आता चांगले काम करण्यास सुरूवात झालेली असून असे बदल घडत आहेत.

२.१०० विभाग केंद्र सरकारसमोर सर्व शिक्षा अभियानाच्या सादरीकरणासाठी जात आहे. १३ हजार ६५२ गावामध्ये १० हजार पेक्षा अधिक शिक्षकांनी लोकवर्गणी मिळविलेली आहे. ती रक्कम ४७ कोटी रुपयांची होते. १ हजार ८८१ शिक्षकांनी स्वत:हून शैक्षणिक व्हिडीओ क्लिप्स बनविलेल्या आहेत. ६०० शिक्षकांनी शैक्षणिक ॲप्स बनविलेले असून ते मोबाईलमध्ये कुठेही डाऊनलोड करता येते. हे ॲप्स मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच ६०० शिक्षक वेबसाईट, ब्लॉग्स डेव्हलप करतात व ते एकमेकांशी शेअर करीत आहेत. तसेच टेक्नोसेव्ही शिक्षकांना प्रशिक्षण देण्यास सुरूवात केलेली आहे. राज्यामध्ये ७ लाख २४ हजार शिक्षक आहेत. शिक्षकांकडून एमएससीआयटीची परीक्षा जेमतेम दिली जाते व त्यातून काही आत्मसात केले जात नाही, असे केवळ वेतनवाढ करण्यासाठी केले जाते, असे सर्वांना वाटते. आज स्थिती अशी आहे की, विभाग हे सार्वत्रिकरण करू पहात आहे. कारण आज किंवा उद्या सर्वांना प्रगत तंत्रज्ञान वापरावेच लागणार आहे. प्रत्येक ब्लॉक मधून चार, चार शिक्षकांनी टेक्नोसॅव्ही व्हावे यासाठी " technosavvyteacher.in " अशी लिंक विकसित करण्यात आली आहे. त्यामध्ये टेक्नॉलॉजी शिकण्यामध्ये रस असलेल्या शिक्षकांनी नोंदणी करायची आहे. आज विभागाला १६०० शिक्षकांची गरज होती. राज्यात ४०८ ब्लॉक आहेत. अजून ६१ ब्लॉकमध्ये चार पेक्षा कमी शिक्षकांनी नोंद केलेली आहे. एकूण राज्यात २६ हजार पेक्षा जास्त शिक्षकांनी नोंद केलेली आहे. परंतु विभागास १६०० शिक्षकांचीच गरज होती. आता शिक्षकांच्या मानसिकतेत बदल होत आहे. आता विधानसभा क्षेत्रामध्ये देखील असे बदल दिसत असतील जेथे असे घडत नसेल तर तेथे अशा बाबी व्हाव्यात, त्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील.

२.१०१ प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या संदर्भातील शासन निर्णयामध्ये मुख्य शिक्षकांच्या दृष्टीकोनानुसार काम करण्याची गरज आहे. परंतु त्या दृष्टीकोनाला शिक्षक एकटाच जबाबदार आहे काय, वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दृष्टीकोन बरोबर आहे काय, याबाबत विभागाने पहाणी केली. विभागीय अधिकारी जाऊन धाकदपटशा करतात. परंतु त्यांनी शिक्षकांना मदत करावी, त्यांची अडचण सोडवावी, अशा त्यांना सूचना करण्यात आल्या आहेत. काम करण्यामध्ये अडचण आली की, अभ्यास करावा लागतो. अभ्यास आला की, माणूस परावृत्त (डिमोटीव्हेटेड) होतो. काम करूच इच्छित नाही. जन्मापासून काम केले नाही, प्रत्येकजण श्वास घेत आहे, प्रत्येक जण जेवण करीत आहे. सांगायचे म्हणजे प्रत्येकजण जन्मापासून परावृत्त (डिमोटीव्हेटेड) नसतो. पद्धतीमध्ये आल्यावर अभ्यास येतो, तेव्हा ते परावृत्त (डिमोटीव्हेटेड) होतात. त्यांना यश येण्यासाठी विभागाच्या वरिष्ठ यंत्रणेची जबाबदारी आहे. आता ८० टक्के शिक्षण डिमोटीव्हेटेड दिसत असून शिक्षकांना आता यश येत आहे. त्यांना कोणते यश आहे. त्याचे अजून शास्त्रीय विश्लेषण केलेले नाही. अगोदर शिक्षक वर्गामध्ये शिकवित होते. आता देखील एनजीओच्या अहवालानुसार या राज्यातील ९० टक्के शिक्षक शाळेमध्ये असतात, असे आढळून आले. ९० टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी शाळेत उपस्थित असतात. हे सर्व शाळेत असताना काय करतात, तर ते शिकण्याचा प्रयत्न करतात. मुले शिक्षित होत नाही, हे देखील " असर " अहवाल सांगतो. परंतु शिक्षक व विद्यार्थी

हे सर्वजण मेहनत करीत आहेत. असे असताना मुले शिक्षित का होत नाहीत, याबाबत तपासणी केली. तेव्हा शिक्षकांच्या शिकवण्याच्या तंत्रामध्ये काहीतरी अडचण असल्याचे जाणवले. हे शिक्षकांना अगोदर जाणवले. सातारा जिल्ह्यातील कुमठेपीट बघितले असता, असे दिसले होते की, १०० टक्के मुले शिक्षण घेत आहेत. परंतु १०० टक्के मुले शिकू शकत नाही, हे शिक्षकांच्या ध्यानात होते. ग्रामीण, डोंगराळ भागातील मुले शिकू शकणार नाही, असे त्यांना वाटत होते. परंतु नवीन पद्धत वापरण्यास सुरूवात केल्यावर शिक्षकांना प्रचीती आली की, आता ही मुले दोन पट गतीने शिकत आहेत. केवळ पद्धत बदलवल्यावर शिकण्याची गती दोनपटीने वाढलेली आहे. काही शिक्षक तर शिकण्याची गती चार पट वाढली असे म्हणत आहेत. त्यामुळे शिक्षक प्रवृत्त (मोटीव्हेट) झाले आणि मुले देखील शिकायला लागली. आज ६ हजार ६१ शाळांमध्ये १०० टक्के मुले प्रगत आहेत. या वर्षी ७ हजार २०० शाळांचे उद्दीष्ट ठेवलेले आहे. जानेवारी महिन्यामध्येच ६ हजार शाळां प्रगत केल्या जाण्याचे उद्दीष्ट आहे. विभाग उद्दिष्टापेक्षा जास्त लक्ष्य पूर्ण करीत आहे. विभाग यशस्वी होत आहे. आता एक, दोन वर्षे वाट पहाण्याची गरज आहे.

२.१०२ काही जिल्ह्यात व सर्वदूर काही निरिक्षण केले असता शैक्षणिक क्षेत्रात पायाभुत सुविधांचा अभाव दिसून आला. एका वर्गात इयत्ता पाचवी व सहावीचा वर्ग भरवला जातो. एका वर्गात इयत्ता पहिली आणि दुसरीचा वर्ग भरवला जातो. सद्या जोराचे वादळ व वारे येतात. मराठवाड्यामध्ये असे घडते. यामध्ये एखादी मोडकळीस आलेली शाळा, काही वर्गातील पत्रे उडाली किंवा वर्गखोल्या पडल्यास जिल्हा परिषदेकडे करा शिवाय दुसरा पर्याय रहात नाही. ती रक्कम नाममात्र असते. शासनाकडून गुणात्मक शिक्षणावर बोलण्यात येते. परंतु दुसरीकडे एका वर्गखोलीत दोन, दोन वर्गातील मुले बसवले जातात. इयत्ता दुसरीचा पाठ शिकवत असताना पहिलीच्या विद्यार्थ्यांना काही समजत नाही. तसेच पहिल्या वर्गाचा पाठ शिकवत असताना दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना काहीच समजत नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे. काही गावांमध्ये तर गॅलरीमध्ये व झाडाखाली देखील मुले बसतात. ही गंभीर परिस्थिती आहे. गुणात्मक शिक्षणासाठी दोन, तीन महत्त्वाच्या बाबी आहेत. त्यामध्ये शिकविण्याची पद्धती (मॅथॉडॉलॉजी ऑफ टिचींग) हा एक विषय आहे. त्यानंतर पायाभुत सुविधा हा महत्त्वाचा विषय आहे आणि शिक्षक असे तीन, चार महत्त्वाचे घटक आवश्यक आहेत. विभाग शिक्षकांच्या प्रशिक्षणावर भर देत आहे किंवा शिक्षण पद्धती (मेथॉडॉलॉजी) नवीन करण्याकरिता प्रयत्न करीत आहेत. परंतु पायाभुत सुविधा फार महत्त्वाच्या आहेत. परंतु त्या आणखी हव्या तेवढ्या लक्षात घेतल्या गेल्या नाहीत असे निरिक्षण आहे. याचे कारण म्हणजे मागील वर्षी झालेल्या वादळ वाऱ्यामुळे जिल्ह्यातील ज्या वर्गखोल्या पडलेल्या होत्या, त्या दुरुस्त करण्याकरिता देखील पैसे नाहीत. त्यामुळे त्या नवीन करण्याचा तर प्रश्नच येत नाही. याकरिता विभागाकडून काय उपाययोजना करण्यात येणार आहेत किंवा केल्या आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मोडकळीस आलेल्या इमारतींसाठी सर्वशिक्षा अभियानातून निधी देता येतो. यावर्षी देखील विभागाने काही प्रस्तावित केलेले आहे. परंतु त्या जिल्ह्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त निधी सर्व शिक्षा अभियानाच्या निकषाप्रमाणे देता येतात. जिल्हा हा युनिट समजला जातो. परंतु मोडकळीस आलेली इमारत असेल व जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी तसे प्रस्तावित केले असेल तर त्याला निधी मिळतो. दरवर्षी प्रत्येक शाळेला शाळा दुरुस्ती अनुदान आणि शालेय अनुदान देखील दिले जाते. मोठ्या दुरुस्तीकरिता त्या शाळेच्या वास्तुचे व्हीडीओ रेकॉर्डींग करून त्याचे वेगळे अंदाजपत्रक पाठवले तर त्याला देखील भारत सरकार मंजुरी देते. परंतु याबाबी कराव्या लागतात. त्याकरिता सर्वशिक्षा अभियानातून पैसे मिळतात. यासंदर्भात ही रक्कम फारच कमी असल्याचे निदर्शनास आणून देणार असल्याचे समितीने नमूद केले.

२.१०३ दिनांक २४ मे २०१२ नंतर विना अनुदानित शाळामध्ये आता आरक्षणाची काही अडचण आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता विभागाने आरक्षणाअंतर्गत विना अनुदानित शाळांना २५ टक्के प्रवेश करायला दिलेला आहे आणि कॉम्प्युटर प्रोग्रामही आहे.

२.१०४ शाळाबाह्य मुलांची ओळख न पटविणे यासंदर्भात समितीने मत व्यक्त केले की, मध्ये शाळाबाह्य मुलांबद्दल खूप उदासिनता असल्याबाबतचा महालेखापालांचा अहवाल आहे, त्याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी विदित केले की, ही खऱ्या अर्थाने सर्वांसाठी दु:खाची बाब आहे की, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अजूनही शाळाबाह्य मुले आहेत. असरचा अहवाल पाहिला तर ९८.७ टक्के मुले शाळेत जात आहेत. त्यानुसार केवळ १.३ टक्के मुलेच शाळाबाह्य आहेत असे दिसते. हे प्रमाण १.३ टक्के इतके असले तरीही ही संख्या लाखाच्यावर जाते. १ लाख मुलांनी शाळेबाहेर रहावे ही न पटणारी गोष्ट आहे.

२.१०५ महालेखापालांच्या अहवालात डाटा कॅपचरींग फॉरमॅटमधून सचिवांनी खुलासा केला की, ४ जिल्ह्यांत ८०२४ अशी आकडेवारी नमूद केलेली आहे, त्याबाबत त्या जिल्ह्यांचा अहवाल आला आहे त्यानुसार सन २०१३-२०१४ मध्ये विशेष प्रशिक्षणाचा लाभ सर्व मुलांना दिलेला आहे. तेथे मुख्य मुद्दा हा आहे की, प्रशिक्षण दिल्यानंतर मुले मुख्य प्रवाहात आली नाहीत.त्यांना त्याच शाळेत सामावून घेऊन ते नियमित करणे हा सर्वात अवघड विषय आहे. शाळाबाह्य मुले शोधली तरी, सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक अशी जी काही अडचण असेल त्यावर मात करून त्या पालकांमध्ये हा आत्मविश्वास निर्माण करणे की, ही मुले शाळेत नियमित येऊ शकतात, हा मोठा मुद्दा असून आता त्यावर कामाला सुरूवात करण्यात येत आहे.

२.१०६ शाळाबाह्य मुलांची संख्या लाखाच्यावर आहे, त्याबाबत विभाग काय उपाययोजना करीत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील वर्षभरात विभागाने या विषयावर खूप काम केले आहे. दिनांक ४ जुलै २०१५ रोजी शासनाच्या सर्व यंत्रणेला विभागाकडून सांगण्यात आले की, एनजीओंना वगैरे सहभागी करून काम करण्यात यावे आणि प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण करण्यात आली. त्या सर्वेक्षणामध्ये ५६८५० मुले आम्हाला सापडली. परंतु, तो अहवाल आल्यावर सगळीकडून जनमत येऊ लागले की, ही संख्या फार कमी आहे. सर्वेक्षण बरोबर झाले नाही. मग पुन्हा सर्वेक्षण केल्यानंतर २ हजार मुले अधिक सापडली. तरीही लोकांना ती पटली नाहीत. मग जानेवारी महिन्यात एनएसएस व ८६० एनजीओंना सहभागी करून विभागाने सर्वेक्षण केले, त्यावेळेस अजून १० हजार मुले सापडली. अशाप्रकारे एकूण ७४ हजार मुले सापडलेली आहेत. त्यातील ४९ हजार मुलांना शाळेत दाखलही केलेले आहे. उर्वरित मुलांना शाळेत दाखल करण्यात येत आहे. हे सर्व करण्यात येत आहे मात्र ही मुले शाळेत दाखल झाल्यानंतर ती तेथे नियमित जातील यासाठी काम करणे आवश्यक आहे.

२.१०७ यासाठी विभागाचा काही प्रशिक्षण कार्यक्रम आहे ना ? विशेष करून मुंबईत महाराष्ट्राच्या बाहेरील राज्यांतून जे मजूर वर्गाचे स्थलांतरीत येतात त्यांच्यामध्ये बांधकाम व्यवसायात काम करणाऱ्या पालकांची मुले आहेत. त्यामध्ये ओरिया भाषा बोलणारी, कानडी भाषा बोलणारी तसेच झारखंड मधील मुले आहेत. सरकारला हे आज ना उद्या स्वीकारावे लागणार आहे. शासनाच्या ७४ हजार मुलांमध्ये ती मुले असतील यावर विश्वास नाही. शहरी भागातील स्थलांतरीत मजूरांच्या मुलांसाठी शासनाने काही तरी पाठ्यक्रम ठरवून त्यांना साक्षर (अक्षरज्ञान) करावे जेणेकरून ती मुले त्यांच्या भाषेत, राष्ट्रभाषेत किंवा त्या राज्यात काम करतो त्या स्थानिक भाषेत कमीत कमी तो स्वतःचे, स्वतःच्या वडिलांचे, देशाचे, शहराचे नाव लिहू शकतील. मुंबई शहरातील बेघर मुलांसाठी असा काही तरी पाठ्यक्रम तयार करावा. अशी बेघर मुले केवळ मुंबईत असतील असे नाही ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर सर्व शहरातही ती मोठ्या प्रमाणात असतील. त्यांच्या कामाचा कालावधी ६ ते १० महिन्यांचा असतो. पावसाळ्यामध्ये ते परत जातात. जिल्हा परिषद, महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या शाळांमध्ये त्यांच्यासाठी विशेष पाठ्यक्रम तयार करून अशा मुलांना शाळेत घेण्यासाठी काही उपाययोजना करण्याबाबत शासन विचार करणार आहे काय, असल्यास त्याबाबतची सूचना शासनास विभागाने द्यावी किंवा समितीमार्फत ही सूचना विभागास करण्यात येईल असे मत समितीने व्यक्त केले. अशी हजारोंच्या संख्येने मुले आहेत. कांदिवली मतदारसंघात अशी १०७ मुले सापडली आहेत. ती १०० टक्के मुले सापडली आहेत असे नाही. यांची संख्या २०० ते २५० इतकी देखील असू शकेल. अशा १०७ मुलांना शिक्षणाकरिता मदत करण्यात येत आहे. महाराष्ट्र, मुंबई व इतर ठिकाणचा विचार केला तर अशी मुले फार मोठ्या संख्येने मिळू शकतील असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही खरी परिस्थिती आहे. ११ डिसेंबर रोजी विभागाने शाळाबाह्य मुले शोधण्याबाबत परिपत्रक काढले त्यामध्ये हा मुद्दा विशेष करून नमूद केलेला आहे. एखाद्या मराठी माध्यमाच्या शाळेजवळ उडिया किंवा कानडी बोलणारी मुले दिसली तर, त्या मुलांना शाळाबाह्य मुले म्हणून नोंदविली जाणार नाही. कारण त्या भाषेत आपण शिकवित नाही, असा शिक्षकांचा समज होऊ शकतो. जगाच्या पातळीवर आज ज्या पद्धतीने लोकांची ये-जा सुरू असते, त्याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, लंडन मधील एका शाळेतील एका वर्गात ६ भाषिक मुले होती. त्यातील ४ मुले भारतीय भाषा बोलणारी होती. २ मुले इंग्रजी भाषा बोलणारी होती. नंदूरबार जिल्ह्यातही एक-एक वर्गात ३ भाषिक मुले बसतात. महाराष्ट्र राज्यात ६० बोली भाषा बोलल्या जातात. त्यातील १६ आदिवासी बोली भाषा आहेत. आजूबाजूच्या १० राज्यातील भाषा. उडिया भाषा जरी महाराष्ट्र राज्याच्या बाजूच्या राज्यांमध्ये बोलली जात नसली तरीही गडचिरोली जिल्ह्यात बांगला बोलणारे भरपूर लोक आहेत. प्रत्येक भाषा शिक्षकांनी शिकलीच पाहिजे असे नाही. अशा ७० बोली भाषांमध्ये कसे काम करता येईल, शिक्षक अशा मुलांना कसे हाताळू शकतात याबाबत विभागाची एक सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे माहे मार्च, २०१६ अखेर पर्यंत तयार होणार आहेत. त्यावर विभागाने काम केलेले आहे. एमएलई मल्टी लिग्युँअल एज्युकेशन असे त्याला म्हणतात. त्यावर या राज्यातही बऱ्याच ठिकाणी शिक्षकांनी प्रयोग केलेले आहेत. अलिबाग जिल्ह्यात भोजपुरी, हिंदी व मराठी बोलणारी मुले एकाच वर्गात शिकतात. या ३ भाषांमध्ये बोलणाऱ्या मुलांसोबत काम करणारे शिक्षक यावर विभागाने एक व्हिडिओही तयार केलेला आहे. या पद्धतीने काम करण्यात येत आहे. येत्या वर्षात या सर्व मुद्यांवर काम करण्यात येत असून अशा विद्यार्थ्यांना केवळ लिहिण्या-वाचण्यापुरता नाही तर पूर्ण शिक्षणाचा हक्क मिळेल, याची व्यवस्था करण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यात छत्तीसगढी बोलणारी मुले येतात. या सर्व गोष्टींवर विचार करण्यात येत आहे.

२.१०८ महिला व बालविकास विभागाच्या सर्वेक्षणामध्ये अंदाजे २ लाख ३० हजार इतकी आकडेवारी आहे. विभागाने २-३ वेळा सर्वेक्षण केल्यानंतर दिनांक ३१ जानेवारी २०१६ रोजीच्या सर्व्हेनुसार शाळाबाह्य मुलांची आकडेवारी ७४ हजार इतकी आल्याचे विभागाने सांगितले. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे, विभागाला ७४ हजार या संख्येच्या अनुषंगाने पुन्हा एकदा सर्वेक्षण करण्याची आवश्यकता वाटते काय ? कारण दोन विभागांच्या आकडेवारीमध्ये खूप तफावत आहे. त्यामुळे याची पुन्हा एकदा चाचणी करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण संपूर्ण राज्यात शाळाबाह्य मुलांची संख्या खूप जास्त आहे, याकडेही लक्ष दिले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

२.१०९ जळगाव जिल्ह्यात गारपिटीमध्ये पावरा समाजाचा एक माणूस मृत्युमुखी पडला. त्याला २ बायका आणि १४ मुले आहेत. त्यापैकी एकही मूल शाळेत जात नव्हते. त्या गावच्या समितीच्या प्रमुखांना तसेच शिक्षकांना बोलावून त्याबाबत विचारणा केली तेव्हा असे आढळून आले की, त्या परिवाराकडे समितीचे सदस्य किंवा शिक्षकही गेले नव्हते. त्यांच्या घराच्या शेजारी शाळा होती. मात्र त्या १४ पैकी एकही मूल शाळेत गेले नव्हते. या संदर्भात आदिवासी पट्ट्यातील माहिती घेतली पाहिजे. जळगाव जिल्ह्यात यावल, चोपडा येथीलही माहिती येणे आवश्यक आहे. तेथेही शाळाबाह्य मुलांची खूप संख्या आढळेल असे मत समितीने नमूद केले.

२.११० महालेखापालांचा १२६८ कामांबाबत आक्षेप होता. परिच्छेद क्रमांक ९.५ मध्ये विभागाने २६ फेब्रुवारीची सद्य:स्थिती सांगितलेली आहे. त्यानुसार विभागाकडून ४२५ कामांपैकी १२६ कामे काही कारणास्तव सुरू करण्यात आलेली नाहीत. उर्वरित कामांच्या सद्य:स्थितीबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एवढी कामे ३० जानेवारी ते २६ फेब्रुवारी अशाप्रकारे एक महिन्याच्या आत सुरू झाल्याचे दिसते. बाकीची कामेही सुरू होतील. विभागाची कनिष्ठ स्तरावरील यंत्रणा जमीन मिळविणे वगैरेंवर काम करीत असेल.

२.१११ वरच्या परिच्छेदामध्ये ७४ शाळा बंद झाल्याचे सांगितलेले आहे, त्याचे पुनर्नियोजन करावे. नाही तर ते प्रलंबित राहील. १ कोटी ३९ लक्ष रुपयांचे काम कंत्राटदाराच्या माध्यमातून करण्यात आले. तसे काही करता येत नाही. शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातूनच ते केले पाहिजे होते. याबाबत विभागाने कोणती कारवाई केलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या जिल्ह्यांचा अहवाल आलेला आहे. तेथे कंत्राटदारामार्फत काम केलेले नाही. महालेखापालांच्या अहवालाबाबत सांगताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, the Education officer of Thane and Ahmadnagar have reported that the work under SSA are carried out by school management Committee, approval for employment of contractor is not given for civil works.

२.११२ ९.५ बाबत महालेखापालांचा परिच्छेद आला तेव्हा विभागाने त्यांचे एक्झिट कॉन्फरन्समध्ये समाधान केले नाही काय ? हा परिच्छेद कसा आला ? त्याच बरोबर गुणवत्ता/दर्जा बद्दलही विभागाने शेवटच्या त्रयस्थ संस्थेकडून मूल्यमापन केले आहे. बांधकामाच्या कामात प्रत्येक टप्प्याच्या वेळी मूल्यमापन केले पाहिजे होते. तसे निर्देश आहेत. परंतु, शेवटचे काम पूर्ण झाल्यावर त्रयस्थ संस्थेकडून मूल्यमापन केले आहे. यावर विभागाने काय कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एक्झिट कॉन्फरन्समध्ये यावर चर्चा झाली नाही असे वाटते. सन २०१०-२०११ पर्यंत महालेखापालांनी सांगितल्याप्रमाणे निकषाप्रमाणेच झाले आहे. त्यावेळी विभाग कंत्राटामध्ये माणसे द्यायचा आणि ती माणसे काम करायची. दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजी कार्यकारी समितीची बैठक झाली होती. त्यामध्ये असे सांगितले होते की, विभागाकडून आता बाहेरची यंत्रणा नेमण्यात येऊ नये. शासकीय तंत्रविद्यानिकेतन, शासकीय अनुदानित महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये यांची तपासणी गर्व्हनमेंट इंजिनिअरिंग कॉलेज मात्र इन्स्पेक्शन प्रत्येक स्तरावर झाले पाहिजे, असा नियम आहे. त्याबाबत ठराव घेतला त्याचा शासन निर्णय काढेपर्यंत वेळ लागला, तोपर्यंत कामे पूर्ण झाली असे कार्यालयाचे म्हणणे आहे.

२.११३ अगोदर त्रयस्थ संस्थेकडून मूल्यमापन करण्यात येऊ नये असे सांगितले आणि शासन निर्णय काढायला वेळ लागला ? पूर्वीची प्रचलित पद्धत लगेच बंद केली आणि नवीन शासन निर्णय काढायला वेळ लागला आणि दरम्यानच्या काळात प्रत्येक स्तरावर त्रयस्थ संस्थेकडून मूल्यमापन न करता शेवटच्या टप्प्यावर त्रयस्थ संस्थेकडून मूल्यमापन झालेले आहे, अशी परिस्थिती दिसत आहे. जोपर्यंत नवीन शासन निर्णय निघत नाही, तोपर्यंत जुनी पद्धत सुरू ठेवली पाहिजे होती. मूल्यमापन केले पाहिजे होते तसे केले नाही. हे योग्य आहे ना ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यास मान्यता दिली व सांगितले की, हे योग्य आहे. परंतु, तसे घडलेले दिसत नाही. यात चूक झालेली असून त्या त्या वेळेस पाहणे आवश्यक होते.

२.११४ ठाणे व अहमदनगरमध्ये महालेखापालांचे जे प्रतिनिधी गेले होते, त्यांना कंत्राटदारला कामाचे वाटप केल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे तेथून विभागाकडे जे उत्तर आलेले आहे की, हे सर्व काम एसएमसीने केलेले आहे. यात विसंगती आहे. या विषयी सखोल चौकशी करून समितीला १ महिन्याच्या आत अहवाल द्यावा असे समितीने सुचविले. महालेखापालांचे प्रतिनिधी ते स्वत: कार्यस्थळ पाहिल्यानंतर सांगत आहेत की, कंत्राटदाराला कामाचे वाटप केल्याचे आढळून आलेले आहे. विभागीय प्रतिनिधी सांगत आहेत की, तेथून अहवाल आला आहे की, एसएमसीने शाळा व्यवस्थापन समितीने काम केले आहे. या दोन अहवालामध्ये विसंगती आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याची चौकशी करण्यात येईल. परंतु, सर्व साहित्य व मजूरीची जुळवाजुळव करण्यासाठी एक कोणी तरी व्यक्ती पाहिजेच असतो. शक्यता आहे की, त्याला कंत्राटदार म्हणून सांगितले गेले असेल. त्यासाठी वेगळी जाहीरात काढून कंत्राटदार नेमले गेले काय, हे पाहण्याची गरज आहे. त्याची चौकशी करण्यात येईल त्यावर समितीने सुचविले की, करारनामा वगैरे झाले होते काय ? महालेखापालांनी जे आक्षेप घेतले आहेत, ते विभागाने एकदा तपासून घ्यावेत असे समितीने सुचविले. त्यास विभागीय सचिवांनी मान्यता दर्शविली.

२.११५ परिच्छेद क्रमांक २.९.५ मध्ये सन २०१३-२०१४ च्या धर्तीवर सप्टेंबर, २०१३ च्या संदर्भात विभागाने उत्तर पाठविले आहे. ८४ शाळांमध्ये मुले-मुली, शिक्षक यांच्यासाठी प्रसाधनगृहे उपलब्ध नव्हती. ही सन २०१३ ची परिस्थिती आहे. त्या संदर्भातील उल्लेख येथे कोठेही दिलेला नाही. केवळ एक संगणकाचा विषय दिलेला आहे. In all 12171 school electrification work completed as per DIC data 2015-16, out of these schools, computers are available in 63 schools but elECtricity is not functional. Then what is the use of Computers? 12171 शाळांपैकी केवळ ६३ शाळांमध्ये संगणक दिले. There are 1590 schools which are not having library as on today. विभागीय सचिव सर्व बाबतीत सकारात्मक उत्तर देत आहे. त्यांची शिक्षणाच्या विषयात रुची आहे व बरीच वर्षे ते या क्षेत्रात काम करीत आहेत. He is doing religiously. असे मत समितीने व्यक्त केले.

पटसंख्येतील गळती थांबवायची असेल तर या सुविधा दिल्या पाहिजेत. सन २००३ मध्ये शाळांमध्ये झोपडपट्टीतील मुलींची शाळेतून फार मोठी गळती होत होती. तपास केल्यानंतर असे कळले की, ३३ टक्के मुली सातवीनंतर शाळेत जात नव्हत्या. त्या वयात संप्रेरकामधील बदलामुळे त्यांच्या शरिरात जे बदल होतात त्यामुळे येणाऱ्या अडचणी त्या घरीही शेअर करु शकत नव्हत्या. कारण झोपडपट्टीमध्ये १०-१० च्या घरात राहणाऱ्यांची संख्या जास्त होती व शाळेत त्यांच्याकरिता स्वतंत्र शौचालय नव्हते. जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीच्या सहकार्याने, महानगरपालिकेतील वैद्यकीय पथकामधील महिला गायनिक डॉक्टरांच्या व खाजगी गायनिक डॉक्टरांच्या सहकार्याने तसेच त्या शाळेतील महिला शिक्षकांच्या सहकार्याने त्या मुलींचे समुपदेशन सुरू करण्यात आले. ३ वर्षे लागली. भरपूर विरोध झाला. खूप काही ऐकावे लागले. परंतु, एकही पुरुष न जाता त्या मुलींचे काऊन्सिलिंग केले गेले, त्यांना त्या विषयाची सर्व माहिती दिली गेली. त्यांना जॉन्सन अँड जॉन्सनच्या माध्यमातून मदत करणे सुरू केले, त्यामुळे आज तेथे मुलींची शाळेतील गळती ३ टक्केही नाही. गावी जाणे, इतर ठिकाणी शिफ्ट होणे या गोष्टी सोडून एकही मुलगी शाळेतून गळती होत नाही. मुलींच्या शाळेतील गळतीचे हे एक फार मोठे कारण आहे. सचिव एवढ्या उमेदीने काम करीत असतील तर हया बाबीमध्ये ते कमीत कमी सुधारणा करु शकतात. यात दुसरे काही करण्याची गरज भासणार नाही. याबाबतचा उल्लेख विभागाच्या उत्तरामध्ये कोठेही नाही. विभाग संगणक देतो, टेक्नोसॅव्ही शिक्षक शोधतो, मग जर या पायाभुत सुविधा पुरविल्या असत्या तर, शाळेतून गळती होणाऱ्या मुलींची संख्या निश्चितच कमी झाली असती असे मत समितीने व्यक्त केले.

२.११६ मुलींची स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय व विद्युतीकरण ही कामे प्रथम प्राधान्याने करणे आवश्यक होते. बाऊंड्री वॉल व खेळाचे मैदान यांना नंतर प्राधान्य देण्यात यावे. परंतु, हे २-४ महत्त्वाचे विषय प्राथ्यम्यक्रमाने केले पाहिजे होते. याच्या सद्यःस्थितीबाबत विभागाने कोठेही उल्लेख केलेला नाही. या संदर्भात सध्या काय परिस्थिती आहे ? पायाभुत सुविधांमध्ये ज्या उणिवा आहेत त्यामध्ये स्वच्छता गृह, त्यामध्ये पाण्याची कमतरता आणि त्याचबरोबर विद्युतीकरण याबाबत विभागाचे काही नियोजन आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, स्वच्छता गृहाबद्दल विभागाने अगोदर अहवाल सादर केला होता, महालेखापालांनी त्यावर अजून भाष्य केलेले नाही. माननीय पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट पर्यंत देशातील प्रत्येक शाळेमध्ये मुलांसाठी किमान एक स्वच्छता गृह व मुलींसाठी किमान एक स्वच्छतागृह करण्याचे उद्दिष्ट दिले. त्यावर संपूर्ण देशाने व महाराष्ट्रानेही काम केले. ते काम पूर्ण झाले असून आता प्रत्येक शाळेत एक-एक स्वच्छता गृह आहे. आता ते नादुरुस्त वगैरे झाले असेल तर दुरुस्त करणे वगैरे काम सुरू असणे तसेच पाण्याची पुरेशी व्यवस्था नाही, त्यावर काम सुरू आहे. परंतु स्वच्छता गृह झालेली आहेत. पिण्याच्या पाण्याबद्दल नळाचा पुरवठा नसलेल्या १८६ शाळा आहेत. त्यावर ई-प्रगती, ई-समिक्षामध्ये वेगाने काम होत आहे. सर्व शिक्षा अभियानातून या सर्व कामाला बांधकामासाठी पुरेसा निधी देण्यात आला आहे. आता त्याच्या देखभाल दुरुस्तीच्या मुद्यावर यावर्षी पुन्हा सर्व शिक्षा अभियानातूनच मागणी करण्यात येत आहे. दिनांक १० मार्च रोजी मंडळाच्या मान्यतेचा कार्यक्रम आहे, त्यामध्ये त्यावर चर्चा होणार आहे.

२.११७ एका बाजूला विभागात संगणकीकरणाचे करण्याचे काम करण्यात येत आहे मात्र दुसऱ्या बाजूला शाळेत विद्युतीकरण करण्यात आलेले नाही. या शाळांच्या विद्युतीकरण्यासाठी काय केले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विद्युतीकरणाबाबत यांनी असा अहवाल दिला आहे की, सर्व शाळांमध्ये विद्युतीकरण केले आहे. मात्र प्रत्यक्षात असे नाही. कालपर्यंत जे विश्लेषण केले त्यामध्ये ५३६० शाळांमध्ये अजून विद्युतीकरण झालेले नाही. विद्युतीकरण असणे व विद्युत असणे या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. विद्युतीकरण नाही म्हणजे वायरींगची फिटिंग नसणे तर, विद्युत नाही म्हणजे विजेची जोडणी (कनेक्शन) नाही किंवा जी जोडणी (कनेक्शन) होती मात्र वेळेत बिल न भरल्यामुळे ते खंडीत करण्यात आली. सर्व मिळून १० ते १२ जिल्ह्यातील ६३ शाळांची शाळानिहाय माहिती विभागाकडे आहे.

२.११८ संपूर्ण राज्याच्या परिस्थितीबाबत सांगताना विभागीय सचिवांनी विदित केले की, राज्यात ५३०० शाळांमध्ये सध्या विद्युत पुरवठा नाही. यावर्षी विभाग सर्व शिक्षा अभियानातून ते काम हाती घेत असून १०० टक्के शाळांचे विद्युतीकरण करण्यात येणार आहे. किमान त्या गावात विजेचे खांब (पोल) वगैरे आवश्यक बाबींची पुर्तता करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

२.११९ शाळांसाठी पुरविण्यात आलेल्या विजेच्या देयकाचा भरणा करण्यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, आता लोकसहभागातून शाळा डिजिटल होत आहेत. मागील वर्षामध्ये ११ हजार शाळा लोकसहभागातून डिजिटल झालेल्या आहेत.विद्युत उपकरणे सोलर बॅटरीवर चालविणे शक्य आहे. नंदुरबार जिल्ह्यात डोंगराळ भागामध्ये सोलर बॅटरीचा उपयोग होत आहे. ता. शहापूर, ठाणे येथे सुद्धा सोलर बॅटरीचा उपयोग होत आहे.शाळांसाठी जो प्रोजेक्टर घेतला जातो तो कमी वीज लागणारा असला पाहिजे.

२.१२० आता १४ व्या वित्त आयोगामध्ये ग्रामपंचायतीला मोठ्या प्रमाणात निधीमिळत आहेत. पूर्वी अर्धा निधी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांना मिळत होता. या विषयाच्या बाबतीतील शासन निर्णय विभागाने दुरुस्त करून घेतला पाहिजे. जिल्हा परिषदेतील शाळेच्या विजेचे देयक १४ व्या वित्त आयोगाने देणे बंधनकारक राहिले पाहिजे व तसेच त्यांना घरगुती (नागरी) दर लावला पाहिजे. काही-काही ठिकाणी व्यावसायिक दर लावण्यात येते. एमईआरसी बरोबर चर्चा करून किंवा शासन निर्णय निर्गमित करून या दोन्ही विषयावर काही तरी विचार करण्यात यावा. शाळांसाठी विशेष दर आहेत. परंतु, काही ठिकाणी व्यावसायिक दर लावण्यात येतात असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शालेय शिक्षण विभागाने ऊर्जा विभागासोबत या विषयावर काम केले. त्यांनीही एमईआरसीचा मुद्दा सांगितला. आता ऊर्जा विभागाने एक अधिसूचना काढली आहे की, हे दर व्यावसायिक राहणार नाहीत. शाळा व हॉस्पिटलसाठी त्यांनी वेगळा स्लॅब केला आहे.

२.१२१ १४ व्या वित्त आयोगानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला भरपूर निधी मिळतो. सर्व शिक्षा अभियानांतर्गत पुण्यासारख्या शहरात जेथे महानगरपालिका आहे, तिथे शिक्षण मंडळाकडून शाळेला निधी उपलब्ध केला जात नाहीत. विभागाने पुण्यामध्ये सीएसआर मधून जवळजवळ बऱ्याच शाळांमध्ये संगणक लॅब तयार केल्या. आता विभागाची अशी अडचण आहेकी, त्या संगणक लॅब धूळ खात पडल्या आहेत. कारण तिथे संगणक शिकविण्यासाठी तांत्रिक ज्ञान असलेले शिक्षक उपलब्ध नाहीत. बऱ्याच ठिकाणी स्वच्छता गृहेही बांधण्याचा प्रयत्न केला. स्वच्छता गृहे बांधली, पाण्याच्या टाक्या बांधल्या पण देखभाल दुरुस्तीसाठी निधी या सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत उपलब्ध होत नाही. त्यामुळे स्वच्छता गृहाची दुर्दशा होते. पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्यासाठी महानगरपालिकांच्या शाळांकडे निधी नसतो. शिपाई आहे पण स्वच्छता कर्मचाऱ्याची वेगळी तरतूद नाही. स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे शाळांमध्ये स्वच्छता कोण करणार, हा सर्व शाळांचा प्रश्न आहे. याविषयी विभागाने काही तरी विचार केला पाहिजे. सर्व शाळा टेक्नोसॅव्ही करायच्या परंतु, विभागाकडे त्यासाठीचे शिक्षकच उपलब्ध नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शाळा टेक्नोसॅव्ही करण्याबद्दल ७ लाख २४ हजार शिक्षक आहेत, प्रत्येकाला आधुनिक तंत्रज्ञान हाताळता येण्यासाठी काम करण्यात येत आहे. स्वच्छतेबद्दल पूर्ण देश सहभागी झाला आहे. अगोदर स्वच्छता गृह बांधले नव्हते, आता स्वच्छता गृह बांधल्यानंतर त्याच्या देखभालीचा/स्वच्छतेचा मुद्दा समोर येत आहे. ग्रामीण भागाकडे विभागाचे खरेच लक्ष जास्त गेलेले आहे. ग्रामीण भागामध्ये बऱ्याच ठिकाणी आता ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी स्वच्छता गृह स्वच्छ ठेवण्यास सुरूवात केली आहे. महापालिकांनी याबाबत काय केले पाहिजे याबाबत महानगरपालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करण्यात येत असून हळुहळू ही व्यवस्था सुधारली पाहिजे, त्यावर काम करण्याची गरज आहे.

२.१२२ सर्व शाळांची अशीच मागणी आहे की, त्यांच्या शिपायांप्रमाणे निदान एक तरी स्वच्छता कर्मचारी नियुक्त करावा. कंत्राटी पद्धतीने स्वच्छता कर्मचारी भरले तर ते सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याची मागणी करतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले असता सेवेत कायमस्वरुपी सामावून घेतले तर, ते काम करीत नाहीत त्यामुळे आऊट सोर्सिंगद्वारे पदे भरली पाहिजेत व ते काम कोणत्या तरी कंपनीला दिले पाहिजे असे समितीने सूचविले असता त्यावर सचिवांनी सांगितले की, महापालिकांनी हे काम केले पाहिजे.

२.१२३ सर्व शिक्षा अभियानातंर्गत ग्रंथालय मिळते का ? केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल असे विभागाने म्हटले आहे. याबाबत विभागाने ज्ञापनात नमूद केले आहे की, " There are 1,596 schools not having library as on date for providing the library facility. The proposal of library has been sent to Government of India ". सर्व शिक्षा अभियानांतर्गत आता पर्यंत कधी ग्रंथालय मंजूर केले आहे काय ? प्रत्येक शाळेला ग्रंथालय इमारत उपलब्ध करून दिली का ? पुस्तके कुठे ठेवणार ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शिक्षण हक्क कायदा २०१० साली अमलात आला, तेव्हा भारत सरकारने प्रत्येक प्राथमिक शाळेला तीन हजार रुपयांची पुस्तके व प्रत्येक उच्च प्राथमिक शाळेला अंदाजे साडेतीन ते पाच हजार रुपयांची पुस्तके अशाप्रकारे ग्रंथालय उपलब्ध करून दिली आहते. ग्रंथालयासाठी पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत.

२.१२४ इमारत उपलब्ध करून दिली नाही. पुस्तके कपाटात ठेवायची आणि मुख्य म्हणजे मुलांचा हात पोहोचेल अशा ठिकाणी ती ठेवली पाहिजेत. याकरिता लहान वर्गांमध्ये इस्ट्रींग लायब्ररी लावली जाते. ३-४ फूट उंचीवर एक दोरी लावली जाते आणि त्यावर पुस्तके लटकवली जातात. मुलांना सवड मिळेल त्यावेळेस त्यांनी पुस्तक घेऊन वाचायचे असे असते. वेगळी लायब्ररी नसते. विभागाने आता युडायस मधून आकडेवारी काढली आहे त्यानुसार, सुमारे २६ हजार शाळांमध्ये २०० पुस्तके देखील नाहीत. भारत सरकारची बेटी बचाओ, बेटी पढाओ ही योजना सुरू आहे. त्या शिवाय वाचनाची गोडी लागावी याकरिता महाराष्ट्र शासनानेही माजी राष्ट्राध्यक्ष श्री. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवशी म्हणजे १५ ऑक्टोबर रोजी ' वाचन प्रेरणा दिवस ' ही सुरू केलेला आहे. मागच्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात विभागाने शासन निर्णय काढला आहे. परंतु, या ऑक्टोबर महिन्यामध्ये विभागाने असे उद्दिष्ट ठरविले आहे की, इयत्ता तिसरी पुढील प्रत्येक विद्यार्थ्याने कमी जाडीची

असली तरी १० पुस्तके तरी वाचावी. जेणेकरून त्या एका दिवसात महाराष्ट्रात २० कोटी पुस्तके वाचली जाऊ शकतील. परंतु शाळांमध्ये पुस्तकेच नसतील तर ती वाचणार कशी, याकरिता विभागाने असे नियोजन केले आहे की, भारत सरकारने पुस्तके दिली नाहीत तरी विभाग लोकसहभागातून पुस्तके मिळवून घेणार आहे. परंतु, शाळेत पुस्तके असली पाहिजेत. एका शाळेला साधारणपणे २०० पुस्तके देण्यात येतील.

२.१२५ मोफत पाठ्यपुस्तक व गणवेश या विषयी सन २०१०-२०११ मध्ये एक तर वेळेवर गणवेश वाटप झाले नाही ते सन २०११-२०१२ मध्ये झाले आहे. त्या १ वर्षात गणवेश वाटप झालेले नाही, याला जबाबदार असणाऱ्यांवर केलेल्या कारवाईबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत नियम तयार करणे आवश्यक होते. दिनांक १ एप्रिल २०१० पासून शिक्षण हक्क कायदा अंमलात आला. त्यानंतर प्रत्येक राज्याने स्वत:चे शिक्षण हक्क नियम तयार केले पाहिजे होते. भारत सरकारने असे सांगितले की, शिक्षण हक्क नियमामध्ये गणवेश एनटायटलमेंट असे लिहिल्याशिवाय शाळेला अर्थसंकल्पीय तरतूद मिळणार नाही. ते नियम तयार करण्यात उशीर झाला म्हणून १ वर्ष या राज्याचा तोटा झालेला आहे.

२.१२६ वाटपामध्ये एक वर्षाचे नुकसान झालेले आहे. त्याच बरोबर ४६ लक्ष ५१ हजार मुलांसाठी विभागाने गणवेषाचे नियोजन केले आणि त्याच रकमेमध्ये ५७ लक्ष २६ हजार लोकांना गणवेश कसा देता आला, याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, भारत सरकारने जेव्हा सर्व शिक्षा अभियान सुरू केले तेव्हा प्रत्येक राज्य शासनासोबत एक लिखित करार केला. त्यामध्ये असे होते की, जी योजना सर्व शिक्षा अभियानामध्ये सुरू होईल, ती योजना त्या राज्यात आधीच सुरू असेल तर, त्या प्रत्येक राज्याला ती योजना तशीच सुरू ठेवावी लागेल, भारत सरकार त्या योजनेकरिता पैसे देणार नाही. सन २०१० पासून गणवेषाची योजना आली. महाराष्ट्र शासनात काही ठराविक इयत्तेच्या मुलामुलींकरिता आधीपासून ही योजना होती. साधारणपणे १० लाख मुलांना तिचा लाभ मिळत होता. त्या १० लाख मुलांची जबाबदारी अजूनही महाराष्ट्र शासनाची आहे. उर्वरित मुलांना भारत सरकारकडून सर्व शिक्षा अभियानांतर्गत लाभ देण्यात येतो. पूर्वीप्रमाणेच आताही एस.सी., एस.टी. प्रवर्गातील मुलांना गणवेश देण्यात येतो. त्यातही बीपीएल वगैरे काही निकष आहेत त्याबाबतचे तपशिल देणे शक्य आहे. यावर्षी सुद्धा ९ लाख ३९ हजार मुलांना महाराष्ट्र सरकारकडून गणवेश मिळाले आहेत. एकूण जे ४६ लाख विद्यार्थी आहेत ते २०१०-११ या वर्षाचे आहेत. दरवर्षी साधारणपणे १० लाख मुलांना राज्य सरकारकडून आणि उर्वरित मुलांना सर्व शिक्षा अभियानातून गणवेश वाटप केले जाते. आता फक्त एस.सी. एस.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाच गणवेश देण्यात असून सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात येत नाही.

२.१२७ महापालिकेच्या शाळेत जाणारा विद्यार्थी हा प्रवर्गातील साधारणपणे गरीब पालकांचा मुलगा असतो. विभागाकडून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच दारिद्र्य रेषेखालील प्रवर्गातील मुलांना गणवेश देण्यात येतो. शाळेतून मुलांची गळती थांबविण्याकरिता सर्वांना गणवेश दिला तर योग्य होईल. कारण एका विद्यार्थ्याला दिला, दुसऱ्याला नाही यामुळे मुलांच्या मनावर खूप प्रभाव पडतो. यासंदर्भात सर्व मुलांना गणवेश दिला पाहिजे. अशी शिफारस करण्याचे एकमताने समितीने ठरविले.

२.१२८ यासंदर्भात विभागीय सचिवांनी विदित केले की, भारत सरकारने त्यावेळेस शिक्षण हक्क नियमामध्ये एनटायटलमेंटमध्ये अशी नोंद करायला लावली की, पाठ्यपुस्तकाप्रमाणे गणवेशही सर्व मुलांना दिले पहिजेत. परंतु, अद्याप ते दिले जात नाहीत. मुख्य मुद्दा निधीचा आहे. केंद्र सरकार निधी देत नाही म्हणूनच त्याची अंमलबजावणी होत नाही, एवढीच अडचण आहे. केंद्र सरकार ठराविक प्रवर्गाकरिता निधी देते.

२.१२९ शिक्षण हक्क नियमामध्ये तसे असतानाही राज्य सरकार सर्व मुलांना गणवेश न देता विशिष्ट प्रवर्गातील मुलांनाच गणवेश देते ही चिंतेची बाब आहे. सर्व मुलांना गणवेश दिले पाहिजेत, अशी समितीची शिफारस राहणार आहे. केंद्र सरकारच्या नियमाची अंमलबजावणी करावी, हीच समितीची मागणी आहे केंद्र सरकारने ठराविक प्रवगाकरिता निधी देणे हे देखील चुकीचे आहे. केंद्र सरकार एका बाजूला असे सांगते की, सर्वांना गणवेश द्या आणि दुसऱ्या बाजूला त्याकरिता पैसे देत नाही. केवळ ठराविक वर्गाकरिता पैसे देते व विभागाकडून त्याचे पालन करण्यात येते. त्यामुळे नियमांचे पालन केंद्र सरकारही करीत नाहीत व विभागही करीत नाही, या सर्व गोष्टी कोठे तरी थांबल्या पाहिजेत असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

२.१३० त्याच बरोबर विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकेही वेळेवर मिळालेली नाहीत. विद्यार्थ्यांना २०१३-१४ मध्ये पाठ्यपुस्तके मिळण्यास १ महिन्याचा उशीर झाला होता. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता समितीने असे मत व्यक्त केले की, ही दरवर्षीची अडचण आहे. एक तर पाठ्यपुस्तक मंडळाची यंत्रसामुग्री जूनी आहे. एकदम जुन्या पद्धतीने पाठ्यपुस्तक मंडळाचे सर्व काम सुरू आहे. एकदा पाठ्यपुस्तक मंडळाला भेट दिली पाहिजे.

२.१३१ सन २०१४-२०१५ मध्ये विभागाने पाठ्यपुस्तके वितरित केली ती पाठ्यमंडळाला कधी मिळाली ? कारण विभागाने त्यांच्याकडून ७२ लक्ष विलंब शुल्क आकारलेले आहे, ते पैसे त्यांच्या देयकातून कापले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते विभागाने कापले आहेत परंतु २०१३-१४ मध्ये एक महिना उशीर झाला होता. २०१४-१५ मध्ये उशीर झाला नाही.

२.१३२ २०१४-२०१५ मध्ये पाठ्यक्रमात बदल झाला नाही म्हणून उशीर झाला नसेल. ज्यावर्षी पाठ्यक्रमात बदल होतो आणि काही एक परिच्छेदामध्ये बदल झाला की, पुस्तके देण्यास महिना, दीड महिना इतका उशीर होतो. विभाग एवढा जागरुक असताना असे होते. सन २०११-

२०१२ मध्ये ३ कोटी ६२ लक्ष रुपये विलंब शुल्क, सन २०१३-२०१४ मध्ये २ कोटी ७९ लक्ष रुपये विलंब शुल्क व सन २०१४-२०१५ मध्ये ७२ लक्ष रुपये विलंब शुल्क आकारले आहे. सन २०१५-२०१६ मध्ये काय झाले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने मागच्या वर्षी एक बदल केला की, प्रत्येक ठिकाणी कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीच्या वापरास सुरूवात केलेली आहे. मागणी नोंदविताना पाठ्यपुस्तक मंडळाला अगोदर दुताकरवी पाठविली जायची त्यामध्ये वेळ जायचा व मग पत्र व्यवहार पाठविण्यास वेळ जायचा. आता ऑनलाईन मागणीची व्यवस्था केली. मागील वर्षी जेवढी ऑनलाईन मागणी केली, ती सर्व वेळेवर मिळाली. काही शिक्षणाधिकाऱ्यांकडून चूक झाली. परंतु, ती फार कमी प्रमाणात आहे. विभागाकडून आशा करण्यात येते की, यावर्षी अशी चूक होणार नाही अशी आशा आहे. मागील वर्षी इयत्ता पाचवीचे पुस्तक बदलले होते तरीही त्याला उशीर झाला नव्हता. यावर्षी आम्ही इयत्ता सहावीचे पुस्तक बदलण्यात येत आहे. त्याच्या छपाईची मागणी अजून गेलेली नाही. परंतु, बाकीची सर्व पुस्तके विभागाकडे आताच छापून तयार झाली असून ती उपलब्ध आहेत in future delay will be negligible. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यावर It can even become zero. फक्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी योग्य मागणी नोंदविली तर पाठ्यपुस्तके वेळेवर मिळतील. यासंदर्भात संबंधितांनी मागणी नोंदविली नाही, तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे असे समितीने सुचविले. त्यास विभागीय सचिवांनी मान्यता दर्शविली.

२.१३३ मुलांचा माग घेण्याच्या पद्धतीची कमतरता याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, त्याला इंग्रजीमध्ये ट्रॅकिंग म्हणतात. त्याकरिता मराठी शब्द मागोवा असू शकेल. विभागाने ते काम पूर्ण केले असून ते सरल योजनेत आहे. एकदा विभागाच्या कॉम्प्युटर सिस्टममध्ये मूल आले की, मग ते शिकले पाहिजे. ते शिकत नसल्यास एक तर ते स्थलांतरित झाले असेल आणि स्थलांतरित झाले असेल तर ते जेथे गेले असेल तेथील शाळेत शिकत आहे काय हे दिसले पाहिजे. स्थलांतरित झाले नसेल, तर त्याची येथे नियमित उपस्थिती दिसली पाहिजे, यावर काम करण्याची गरज आहे. मुख्यत्वे ही दोन कामे आहेत. त्याकरिता ' माग घेणे ' हा शब्द चांगला आहे. गळतीचे प्रमाण विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मुस्लीम समाजामध्ये खूप जास्त आहे त्याबाबत शाळाबाह्य मुलांची संख्या शून्यावर आणली की, गळतीचे प्रमाणही शून्यावर येईल, त्यावर काम करण्यात येत आहे.

२.१३४ विशेषतः या समाजाच्या मुलांमध्ये गळतीचे प्रमाण जास्त आहे बाकीच्या समाजात नाही. जे सर्वसामान्य प्रमाण आहे त्याच्या पलीकडे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विशेषतः मुस्लीम समाजातील मुलांच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे. याची कारणे काय आहेत ? विशेषतः या समाजातील मुलांबाबत गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याच्या कारणांवर बरीच वर्षे चर्चाही झालेली आहे व बऱ्याच योजनाही केल्या आहेत. मुले कोणत्याही जात, जमात, धर्माची असोत परंतु, विभागाकडून १०० टक्के मुले शिकली पाहिजेत याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत.

२.१३५ विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी हस्तक्षेपाबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, हा प्रश्न शहरी व ग्रामीण दोन्ही भागातील आहे. तसेच जे स्लो लर्नर (मंदशिकाऊ) विद्यार्थी आहेत त्यांच्याकरिता जरी शहरी भागात शासनाची काही योजना असली, तरी तिच्या अंमलबजावणीमध्ये फार मोठ्या अडचणी आहेत. शाळांमध्ये या स्लो लर्नर मुलांसाठी शिक्षक उपलब्ध नसतात. चांगल्या मोठ्या शाळा सोडल्या तर बाकीच्या संस्थांच्या शाळांमध्ये असे शिक्षक उपलब्ध नसतात. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांकरिता शिकण्याची वेगळी व्यवस्था नसते, त्यांच्याकरिता वेगळ्या परीक्षेची पद्धत नसते. त्यांना शिक्षणाचा दाखला देण्याची मोठी अडचण आहे. स्लो लर्नर मुलांना लेखनिक लागतो तो घेण्यासही महानगरपालिकेच्या एखाद्या रुग्णालय सायकियाट्रिस्ट डॉक्टर असतात त्यांनी प्रमाणित केल्यावरच त्यांना एसएससी परीक्षेकरिता लेखनिक घेण्याची परवानगी मिळते.

२.१३६ या विशेष मुलांच्या संदर्भात फार विचार करण्याची आवश्यकता आहे. हा समाजातील फार मोठा प्रश्न आहे. या संदर्भात ग्रामीण भागात काय होत हे माहीत नाही परंतु, शहरी विभागातही फार अडचणी आहेत. याकरिता काही विशेष कार्यक्रम करण्यात येणार आहे काय ? तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, CWSN (Children With Special Need) संदर्भात त्या मुलांना Learning disabled Children म्हणतात. ते आपल्याला बाह्य अंगाने वेगळे दिसत नाहीत. परंतु I.Q. मध्ये प्रमाण ९० टक्क्यापेक्षा कमी आले तर त्या मुलांना शिकण्यामध्ये अडचणी येतात. या विषयावर उच्च न्यायालयात प्रकरण झाले होते. यामध्ये जवळपास दहा-बारा विभागांचा समावेश केला होता. शिक्षण विभागाने बैठक घेऊन यासंदर्भात तीन समित्या निर्माण केल्या आणि त्यापैकी दोन समित्यांचे अहवाल आलेले आहेत. त्याप्रमाणे मागील महिन्यात शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. विभागाने काढलेल्या शासन निर्णयामुळे न्यायालयात गेलेल्या लोकांचे समाधान झालेले आहे. सदरहू शासन निर्णयाची जनजागृती करण्याचे विभागाने ठरविले आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात ४०० पालकांची बैठक घेतली होती. अशा विद्यार्थ्यांना लेखनिक मिळत नाहीत त्या पातळीवर विभागाकडून सध्या काम करण्यात येत आहे.

२.१३७ Slow Learning आणि Dislexic हे वेगवेगळे आहेत का ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शारीरिक अडचणींमुळे शिक्षणाची अडचण येत असते. दुसरी मेंदुची (ग्रहण क्षमतेची) अडचण असते ती आपल्याला डोळ्यांनी दिसत नाही. Dislexic, ए.डी.डी. असे १५ ते २० प्रकार आहेत. त्या सर्वांना Learning Disability या नावाने संबोधले जाते.

२.१३८ या विषयासंबंधी मंत्री महोदयासमवेत चर्चा झाली असेल, तर पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी लेखनिक नेमण्याबाबतचा विभागाने निर्णय घ्यावा. याचा गैरफायदा घेण्यात येईल असा विचार विभागाने करु नये. १५ ते २० टक्के मुले गैरफायदा घेत असतील म्हणून ८५ टक्के मुलांचे नुकसान करण्यात येऊ नये. शासनाची आणि अधिकाऱ्यांची शासन निर्णय काढताना अशी मानसिकता तयार होते की, याचा गैरफायदा होणार का, फायदा किती होणार, यावर जास्त भर देण्यात येतो. जे विद्यार्थी नैसर्गिकरित्या १०० टक्के काम करीत नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी केवळ १५ टक्के विद्यार्थी गैरफायदा घेतील म्हणून परिपत्रक काढण्याचे विभागाने कृपया थांबवू नये. विभागाने पुढील शैक्षणिक वर्षी मागेल त्याला लेखनिक देण्यासंदर्भात निकष ठरवून निर्णय घ्यावा. विभागाने असा शासन निर्णय काढला तर जनतेला फार मदत होईल. ग्रामीण भागातील अशा विद्यार्थ्यांना वेडेवाकडी कामे दिली जात असतील, परंतु शहरातील अशा मुलांना फार नैराश्य येते त्यामुळे कुटूंबामध्ये भयंकर प्रश्न निर्माण होतात.

२.१३९ अशा विद्यार्थ्यांना लेखनिक देण्याबाबत समितीने सूचना केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात समितीच्या सूचनेप्रमाणे विभागाकडून निर्णय घेण्यात येत आहे. राष्ट्रीय मुक्त विद्यालय, शैक्षणिक संस्थांमधील परीक्षांमध्ये पेपर लिहिणारी मुले कमी वयाची असतात जेणेकरून परिक्षार्थींना त्याचा फायदा होणार नाही. म्हणून विभागाकडून कमी वयाची अट घालण्यात आली त्यामुळे न्यायालयात गेलेल्या लोकांना भीती वाटायला लागली की, याबाबत काय होणार, त्यावर चर्चा केल्यामुळे ती अडचण दूर झालेली आहे. लेखनिक लोकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्या मुलांना ज्यावेळी लिहिण्यासंदर्भात सांगितले जाते त्यावेळी ते शब्द बरोबर लिहिले गेले पाहिजेत. त्या मुलांना धैर्य, संयम राखता यावा म्हणून जास्त वयाच्या मुलांना मान्यता देण्यात आली आहे.

२.१४० विशेष काळजीची आवश्यकता असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) ४०८८ रॅम्प लागणार असून यासाठी विभागाला किती निधी लागणार आहे? २९१८६ कमोड शौचालयांसाठी केंद्र सरकारकडून किती निधी प्राप्त होणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, निधीबाबत शासनाने सर्व शिक्षा अभियानात प्रस्तावित केलेले असून तो ३३ टक्क्याच्या मर्यादेत येणार आहे. विना अडथळा शौचालय (RAMP) बांधण्यास अडचण येत नाही. शौचालये बांधून घेण्यात येतात, परंतु बांधताना काळजी घेतली गेली पाहिजे. अशी शौचालये विशेष काळजीची आवश्यकता असणारी मुले (CWSN) वापरु शकतील अशी ती असली पाहिजेत. कमोड शौचालयासंदर्भात भारत सरकार समवेत चर्चा होणार असल्याने त्यामुळे यासाठी निधी मिळू शकेल. विना अनुदानित शौचालयांसाठी (RAMP) ८.१७ कोटी रुपये आणि कमोड शौचालयांसाठी ५८.३७ कोटी एवढ्या निधीची विभागाने मागणी केलेली आहे.

२.१४१ मुलींकरिता उच्च प्राथमिक निवासी शाळा बांधणे यासंदर्भात समितीने विचारणा केली की, कस्तुरबा गांधी हे मुलींचे वसतिगृह आहे. येथे निवासी प्राथमिक विद्यालय आहे. तेथील बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, पालघर जिल्ह्यात पाच वसतिगृहे आहेत. विक्रमगड येथील इमारत पूर्ण झालेली असून तलासरी येथील इमारत १५ मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण होणार आहे. पूर्ण राज्यात ४३ निवासी शाळा असून त्यापैकी पालघर जिल्ह्यात ५ शाळा आहेत.

२.१४२ प्रत्येक जिल्हा पातळीवर शिक्षणासाठी मुलींची वसतिगृहे उभारली पाहिजेत. उच्च शिक्षणासाठी मुली जवळच्या शहरामध्ये जातात. मुस्लीम समाजातील मुलींचे उदाहरण घेतले तर तेथे दहा वर्षापूर्वीचे एसएनडीटी महाविद्यालय आहे. दहा वर्षापूर्वी अगदी कमी प्रमाणातच मुली शिक्षण घेण्यासाठी येत होत्या, परंतु आता मोठ्या प्रमाणावर मुली शिक्षण घेण्यासाठी येत आहेत. म्हणून शासनाने जिल्हास्तरावर उच्च शिक्षणासाठी निवासी विद्यालये वसतिगृहासहित सुरू केली पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शालेय शिक्षण विभागाने वसतिगृहासंबंधी तसेच निवासी शाळेसंबंधी काम केलेले नाही. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत हे काम केलेले आहे. निवासी शाळेसंबंधी आणि वसतिगृहासंबंधीची कामे आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभागाने केलेली आहेत.

२.१४३ विभागाने ज्ञापनाव्दारे दिलेल्या उत्तरात निवासी विद्यालये बांधण्यास विलंब झालेला आहे याबद्दल कोठेही समर्थन केलेले नाही. या प्रकरणी विभागाने काय कारवाई केलेली आहे? सदरहू प्रकरणात विसंगती झालेली आहे हे विभागास मान्य आहे त्यामुळे त्याबाबत विभागाने काय कारवाई केलेली आहे? विक्रमगड येथील इमारत १५ मार्च पर्यंत पूर्ण होणार आहे. विभागाकडून तीन वर्षापूर्वी सोलर वॉटर हिटर खरेदी करण्यात आलेले आहेत. लोकलेखा समितीच्या बैठकीच्या वेळी हे काम दोन तीन महिन्यात पूर्ण होईल असे सांगण्यात येत आहे. विभागाने अटींची पूर्तता केलेली नाही. कालावधी पूर्ण होण्याआधीच १०० टक्के प्रदान केलेले आहे, असे सांगण्यात आले आहे. ठाणे जिल्हा परिषदेने अटींचा भंग केलेला असल्यामुळे संबंधितावर जबाबदारी निश्चित करून विभागाने कारवाई केलेली आहे काय, केली नसेल तर कधी करणार आणि काय कारवाई करणार याबाबत समितीने विभागास खुलासा विचारला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखापालांचा आक्षेप होता की, सोलर वॉटर हिटर खरेदी केले, परंतु ते बसविले नाहीत त्यामुळे तो खर्च निष्फळ ठरला आहे. यासंदर्भात शिक्षणाधिकारी यांना बोलावून घेण्यात आले आणि त्यांना कोणकोणत्या ठिकाणी काय काय अडचणी आहेत, याची विचारणा करण्यात आली. किती वॉटर हिटर वापरले यासंबंधिचा आढावा घेतला तेव्हा असे समजले की, काही ठिकाणी इमारतीच नाहीत. जव्हार सारख्या ठिकाणी भाड्याची इमारत आहे, परंतु त्या इमारतीचा मालक तेथे सोलर वॉटर हिटर लावू देत नाहीत.

२.१४४ जर इमारती नव्हत्याच तर सोलर वॉटर हिटर कशाला खरेदी केले? भाड्याच्या इमारतीमध्ये मालक सोलर वॉटर हिटर लावू देत नसल्यामुळे सदरचे वॉटर हिटर लावता आलेले नाही, परंतु विभागाने चार वर्षापूर्वी हे वॉटर हिटर दर करारानुसार खरेदी केलेले आहेत आणि त्याचे १०० टक्के प्रदान सुद्धा केलेले आहे. यासंदर्भात विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही. हे साहित्य खरेदी केले त्यामुळे या प्रकरणी निष्काळजीपणा झालेला आहे असे दिसते. १३ लाख रुपये निष्फळ खर्च झालेला आहे. ही सर्व परिस्थिती पाहता केवळ टक्केवारीसाठी सोलर वॉटर हिटर खरेदी केलेले निदर्शनास येत आहे म्हणून या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी समितीची अपेक्षा आहे. विभागाला ही सर्व वस्तुस्थिती मान्य आहे. परंतु यासंदर्भात विभाग कोणतीही कारवाई करीत नाहीत याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले. विभागाने स्वत:हून कारवाई करणे अपेक्षित आहे. महालेखापालांनी सन २०१३-२०१४ चा आक्षेप काढला आहे या प्रकरणी विभागाकडून कारवाई प्रस्तावित होत नसेल तर ही अतिशय दुर्दैवी बाब आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले. त्यासंदर्भात संबंधितावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. एखाद्या साध्या नागरिकाने विकत घेतलेल्या वस्तूचा त्याला उपयोग होत नसेल, तर तो ग्राहक पंचायतीकडे जातो. जिल्हा परिषद ठाणे यांनी पुरवठादाराला १०० टक्के प्रदान केलेले आहे. पुरवठादार याला जबाबदार नाही. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी समिती नेमावी. यात ज्यांचे धागेदोर असतील त्यांना अडचण येईल असे समितीने सुचविले. हे समितीसाठी पूर्वोदाहरण ठरेल. विभागाने जर या प्रकरणी काहीच केले नाही, तर अधिकाऱ्यांनाही असे वाटेल की, लोकलेखा समितीमध्ये विषयावर चर्चा होऊन गैरप्रकाराबाबत काही होत नाही आणि विभागाचे अधिकारी सुद्धा काहीच कारवाई करीत नाही. समिती तेथे गेली म्हणून समितीला या अशा चुका लक्षात आल्या. परंतु जेथे समिती गेलीच नाही अशा ठिकाणी सुद्धा चुका झालेल्या असतीलच म्हणून याप्रकरणी येत्या पंधरा दिवसात कारवाई करून समितीला कळवावे असे समितीने सूचित केले त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

२.४४५ सध्याच्या शिक्षणाच्या परिस्थितीत एका बाजूला अतिरिक्त सहायक शिक्षक आहेत, परंतु दुसऱ्या बाजूला हेड मास्टर, शिक्षक फार कमी आहेत. याबाबत विभागाने बरोबर नियोजन केलेले दिसत नाही. जे अतिरिक्त शिक्षक आहेत त्याचा समावेश इतर ठिकाणी करणार का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता संच मान्यता झालेली असून ती कार्यवाही सुरू आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठामार्फत प्रशिक्षण घ्यावे, असा एमओयु केलेला आहे. त्या शिक्षकांना प्रशिक्षण देऊन त्यांचा समावेश करून घेतला जाईल.

२.४४६ प्रत्येक शाळेतील विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर या आक्षेपासंदर्भात काही ठिकाणी विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर योग्य राखण्यात आलेले नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, शासकीय शाळांमध्ये विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर प्रमाण खूपच छान आहे, परंतु खाजगी अनुदानित शाळांमध्ये अडचण आहे. त्यांच्याकडे खोल्यांची कमतरता आहे. याबाबत विभागाने दिनांक २८ ऑगस्टला शासन निर्णय काढलेला आहे. खाजगी अनुदानित शाळांकडे वर्ग भरवायला खोली असेल तर त्या शाळा शिक्षक नेमू शकतात असे शासन निर्णयात नमूद आहे. सरकारी क्षेत्रामध्ये ३० पर्यंत विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर प्रमाण पाहिजे परंतु आपल्याकडे २३ पर्यंत विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर प्रमाण आहे. खाजगी शाळांमध्ये विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर प्रमाण जास्त आहे. खाजगी अनुदानित शाळांना सरकारकडून निधी दिला जातो. तेथे शिक्षक नेमायची परवानगी विभागाने दिली तर त्या संस्थांकडून शिक्षक नेमण्यात येतील. दिनांक २८ ऑगस्टचा विभागाचा शासन निर्णय स्पष्ट आहे. मागील तीन वर्षात संच मान्यता झाली नव्हती म्हणून ही अडचण आहे.

२.४४७ संचालक स्तरावर संच मान्यता करण्यात येत आहे याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आता मुलांच्या संख्येप्रमाणे जास्त शिक्षक असतील तर तेथून अतिरिक्त शिक्षक हटविले जातील आणि इतर ठिकाणी नेमले जातील. त्यामुळे सर्व ठिकाणी संतूलन होईल.

२.४४८ अनेक ठिकाणी एसएमसीची स्थापना झालेली नाही आणि त्यांच्या बैठकाही नियिमत होत नाहीत. काही ठिकाणी वर्षातून एकदाही बैठक झालेली नाही. यासंदर्भात एसएमसीबाबत केलेल्या कारवाईबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ३२५ ठिकाणी एसएमसी नेमले गेलेले नाहीत. त्यांना पत्र पाठविले आहे. याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

२.४४९ शाळा व्यवस्थापन समितीच्या कमीत कमी दहा बैठका झाल्या पाहिजेत. परंतु काही ठिकाणी एकही बैठक घेतली जात नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत संबंधितांना बैठक घ्यायला सांगण्यात येईल. शिक्षकांना प्रशिक्षण तर दिलेच आहे. शिक्षकांनी लोकवर्गणी सुरू केलेली असल्यामुळे त्यांना बैठक घ्यावी लागते. आता दृश्य बदलताना दिसत आहे.

२.४५० गट विकास अधिकारी स्तरावर मॉनिटरींग बरोबर होत नाही. बी.ई.ओ यांनी ठराविक मानकांचे तंतोतंत पालन केले पाहिजे. राज्य सरकारची शिक्षक मॉनिटरिंग समिती तसेच कार्यकारी समितीची बैठक घेतली जाते काय ? कार्यकारी समितीची बैठक तीन महिन्यांच्या आत घेतली पाहिजे, असा नियम आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता परिस्थिती फार वेगळी आहे. आता हे सर्व होत आहे. यावर्षी शिक्षक मॉनिटरींग कमिटी तसेच कार्यकारी समितीच्या बैठका झालेल्या आहेत. मागील वर्षी तर एकच बैठक झाली होती. तीन महिन्यांतून एकदा बैठक झाली पाहिजे. यावर्षी दोन बैठका झालेल्या आहेत. आता हे प्रमाण हळूहळू हे वाढविण्यात येईल.

२.४५१ महालेखापालांच्या शिफारशी या सर्व निरीक्षणामध्ये आहेत. त्या सर्व बाबींवर विभाग काम करीत आहे. संस्थात्मक रचनेमध्ये राज्य सल्लागार परिषदेचा स्टेट ॲडव्हॉईजरी कौन्सिलचा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सरकारी स्तरावर राज्य सल्लागार समितीवर शासनाचे बाहेरचे लोक असतात. राज्य शासनाचा अनुदानाचा हिस्सा यासंदर्भात दरवर्षी अर्थसंकल्पीय तरतुदीवर एक अधिनियम काढण्यात येतो. त्यामध्ये असा उल्लेख केलेला आहे की, केंद्र सरकारचा पैसा आल्यावरच राज्य शासनाचा हिस्सा मुक्त केला जाणार आहे. ' State share may not be released before G.O.I. Share is actually received to the State ' असे अधिनियमामध्येच लिहिले जाते, त्यामुळे ते पैसे मिळू शकत नाहीत. ' State may not be released before G.O.I. Share actually received to the State असे अधिनियमामध्ये लिहिले आहे. त्यामुळे ते पैसे विभागाला मिळू शकत नाहीत. ' State may not be released before G.O.I. Share is actually received to the State ' असे अधिनियमात लिहिले आहे. त्यामुळे ते पैसे विभागाला मिळू शकत नाहीत.

२.४५२ महाराष्ट्र शासनाचा राज्य हिस्सा प्रथम देणार काय. विभागाला केंद्राचा हिस्सा मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते अधिनियमामध्येच लिहिले जाते. वित्त विभागाला या वर्षी अर्थसंकल्प मंजुरीच्या वेळी ते बदलून घ्यावे लागेल. विभागाला केंद्राचा हिस्सा मिळत नाही याला कारण अधिनियमामध्ये असे लिहिले आहे की, भारत सरकारचा निधी आल्याशिवाय राज्य हिस्सा द्यावयाचा नाही.

२.४५३ दरवर्षी विभागाला राज्य सरकारकडून कमी निधी मिळतो आणि दरवर्षी त्यानुसार कमतरता राहते. ही कमतरता पुढच्या वर्षी भरुन काढता येते काय. आपले भारत सरकारचे शेअर्स ॲटोमॅटिकली होईल, ही सुद्धा गंभीर बाब आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही तूट पुढील वर्षी भरुन काढता येत नाही. ती कमी होऊन जाते. यासंदर्भात वित्त विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये दोन भाग असे आहेत की, जेथे केंद्र शासनाचा अपेक्षित निधी मिळण्याची शक्यता अंदाजित आहे. त्या मानाने राज्याच्या हिश्श्याची रक्कम बजेटमध्ये समाविष्ट न करणे. बरेच विभाग राज्य शासनाच्या योजनेनुसार आधीच अंदाजपत्रक तयार करतात नंतर केंद्र पुरस्कृत योजनांवर अंदाजपत्रक तयार करून अतिरिक्त नियतव्ययाची मागणी करतात. हा एक कल झालेला आहे. त्यामुळे विभागाकडे अर्थसंकल्पीय तरतूद नसते त्यामुळे तो निधी मुक्त करण्याची अडचण येते. ही बाब त्या त्या खात्याच्या वतीने घडते आणि वित्त विभागाच्या बाबतीत असते. परंतु यावेळी समितीची मान्यता असेल तर चांगले होईल की, तरतुदी अभावी जर वित्त विभाग कपात लावत असेल तर केंद्राच्या हिश्याच्या मॅचिंग ग्रॅन्टमध्ये कपात करायची नाही. कारण त्याचे दुष्परिणाम केंद्राचा पुढील हिस्सा मिळण्यावर होतो. या वर्षी वित्त विभाग त्यानुसार तरतूद करीत आहे की, केंद्र पुरस्कृत मॅचिंग ग्रॅन्ट असलेल्या योजनांमध्ये कपात करायची नाही.

२.४५४ याचबरोबर विभागाने मुलांचा मागोवा घेण्याची यंत्रणा आणखी सक्षम करण्याची गरज आहे. तसेच सीडब्यूएसएन मुलांसाठी सर्व सोयी-सुविधा सन २०१६-२०१७ मध्ये उपलब्ध झाली पाहिजे. या दृष्टीने शिक्षण विभागाने कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. या चर्चेच्या माध्यमातून जे बांधकाम शिल्लक आहे ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी असत्य प्रकार आहे म्हणजे रद्द झालेली शाळा दुसरीकडे समायोजित करावी. या वर्षी दुर्दैवाने राज्य शासनाला सर्वात कमी म्हणजे २३ कोटी रुपयांचा निधी सर्व शिक्षा अभियानांतर्गत बांधकामासाठी मिळालेला आहे. या तुलनेत मागील वर्षी म्हणजे २०१४-१५ मध्ये १२० कोटी रुपयांचा निधी मिळाला होता आणि २०१५-१६ मध्ये खूप कमी निधी मिळाला आहे. याचबरोबर विशेषत: सर्व शाळांमध्ये कंपाऊंड वॉलची मागणी मोठ्या प्रमाणात असते. परंतु जोपर्यंत शाळा खोल्यांचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत हे काम करता कामा नये. कंपाऊंड वॉलच्या बांधकामास शेवटी प्राधान्य दिले पाहिजे. शाळा खोल्या नसतील तर कंपाऊंड वॉल कशासाठी, त्यामुळे शाळा खोल्यांची बांधकामे एकदा संपवायची आणि नंतर कंपाऊंड वॉलसाठी निधी दिला तर चांगले होईल. मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि शाळेच्या परिसराच्या स्वच्छतेसाठी कंपाऊंड वॉल आवश्यकच आहे. परंतु तिचे बांधकाम हे शेवटचा पर्याय म्हणून केला पाहिजे. या बाबतीत कमीत कमी त्यामध्ये जिल्ह्याची शाळा खोल्यांच्या बांधकामाची मागणी संपलेली असली पाहिजे. त्याचबरोबर अनुदानित शाळांच्या मुलांना सुद्धा गणवेश apart from any reservation SC, ST, BPL तर आहेच अशा सर्व मुलांना दिले पाहिजेत. शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करावयाचे असेल तर पाठ्यपुस्तके आणि गणवेशाचे वाटप समान प्रमाणात करण्यात आले पाहिजे. त्याचप्रमाणे विभागाला ज्या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत ती कार्यवाही देखील पूर्ण करण्यात यावी आणि त्याचा अहवाल समितीला द्यावा असे समितीने सुचविले.

अभिप्राय व शिफारशी :-

२.४५५ 'वित्तीय व्यवस्थापन' :-

शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाअंतर्गत सर्व शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीकरिता केंद्र व राज्य शासनाकडून ६५:३५ या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सचिव, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प मान्यता मंडळाच्या मान्यतेनंतर सदर निधी २ हप्त्यामध्ये (एप्रिल व सप्टेंबर महिन्यात) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (M.P.S.P.) ला वितरित करण्यात येतो. महालेखापालांच्या लेखापरिक्षणात असे आढळून आले की, सन २०१०-११ ते २०१३-१४ या ४ वर्षांत उपलब्ध निधी व झालेला खर्च यांचे अवलोकन केले असता १४ ते २६% निधी अखर्चित शिल्लक होता. सदर अखर्चित निधीबाबत विभागीय सचिवांनी साक्षी दरम्यान स्पष्ट केले की, केंद्र व राज्य यांच्याकडून त्या त्या वित्तीय वर्षातील अंतिम हप्ता उशीराने प्राप्त झाल्याने बांधकामे, प्रशिक्षणे, शिक्षकांच्या नियुक्त्या या बाबीवर कमी खर्च झालेला आहे. याबाबत समितीच्या बैठकीत निदर्शनास आलेला निधी त्या त्या वर्षात व विहित वेळेत वितरित करणेबाबत शिक्षण विभाग व वित्त विभागाने आपसात समन्वय ठेवून सर्व निधी वितरित केला जाईल याची दक्षता घ्यावी. केंद्र शासनाकडून राज्यास त्या त्या वर्षात प्राप्त झालेला निधी खर्च करून निधीची उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर न केल्यास पुढील वित्तीय वर्षात वितरित होणाऱ्या निधीवरही विपरित परिणाम होतो परिणामी केंद्राकडून राज्य शासनास मिळवायचा निधी न मिळाल्यामुळे राज्य शासनाच्या विकास कामावर विपरित परिणाम होतो सदर निधी त्यापुढील वर्षातही प्राप्त न झाल्यामुळे व राज्य शासनाचा हिस्सा त्या प्रमाणात खर्च होत नाही.

वित्त विभागाने राज्य शासनाच्या अनुदानाचा हिस्सा वितरित करताना केंद्र सरकारचा निधी प्राप्त झाल्यानंतरच राज्य शासनाचा हिस्सा मुक्त करण्यात येईल अशी अट अधिनियमात नमूद केलेली आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून गतवर्षीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करून केंद्र शासनाच्या हिश्शाची संपूर्ण रक्कम प्राप्त करण्याबाबत शिक्षण विभागाने पाठपुरावा करावा. याशिवाय शिक्षण विभाग व वित्त विभागाने योग्य समन्वय साधून केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा संपूर्ण निधी त्याच वित्तीय वर्षात प्राप्त करावा व राज्य शासनाच्या हिश्शासह संपूर्ण निधी योजनांच्या कार्यान्वयासाठी शिक्षण विभागास उपलब्ध करून द्यावा. याबाबत शिक्षण विभागाकडूनही आवश्यक तो पाठपुरावा करण्यात यावा. सदरची कार्यवाही विहित वेळेत होऊ शकली नाही तर सदर कार्यवाहीस जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत योग्य नियोजनाअभावी निधी प्राप्त न होऊन राज्याच्या विकासाला बाधा येणार नाही याची वित्त विभाग व शिक्षण विभागाने आवश्यक ती दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.४५६ कार्यकारी समितीच्या माहे ऑक्टोबर, २०१२ मधील ५५ व्या बैठकीत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने (M.P.S.P.) सुरू न झालेल्या १८१६ बांधकामावरील रु. ५४.९२ कोटी रक्कम केंद्र शासनास परत करण्याचा निर्णय घेतला. तद्नंतर नोव्हेंबर, २०१३ मध्ये फक्त नवीन प्राथमिक शाळा, गट साधन केंद्रे (B.R.C.) नागरी साधन केंद्रे (C.R.C.) यांच्या बांधकामावरील निधी प्रत्यार्पित करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार M.P.S.P. ने रु. ३१.९४ कोटीची ४७४ कामे प्रत्यार्पित करण्याचे पुनर्निर्धारण केले. तथापि, लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने (M.P.S.P.) रु. १७.१८ कोटीच्या २६७ बांधकामांना प्रत्यार्पणाचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता. कारण उर्वरीत २१७ कामांचे रु. १४.७६ कोटी २१ जिल्ह्यांकडे उपलब्ध नव्हते. या आक्षेपाबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, शिक्षण विभागाने निधी प्रत्यार्पणासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला कळवित होते. तथापि, सदर कामे प्रगती **पथावर असल्याने निधी प्रत्यार्पित करणे अडचणीचे होते असा खुलासा सादर केला. याबाबत विभागाने सर्व कामांचा आढावा घ्यावा. ज्या शाळा बंद झाल्या असतील, ज्या ठिकाणी शाळा उघडण्याची गरज नसेल तेवढीच कामे व त्यावरील निधी विभागाने प्रत्यार्पित करावा. आवश्यकता नसतानाही ज्या ठिकाणी शाळा इमारतींचे बांधकाम झाले असेल अशा नागरी क्षेत्रातील अतिरिक्त शाळा खोल्यांचे बांधकाम उपयोगात आणण्यासाठी नागरी क्षेत्रामध्ये सकाळच्या सत्रात विनाअनुदानित शाळा व दुपारच्या सत्रात अनुदानित शाळा चालवून बांधकाम झालेल्या खोल्या उपयोगात आणाव्यात. दुपारच्या सत्रातील अनुदानित शाळांमध्ये कौशल्य विकास अभ्यासक्रम अंतर्भूत करून राबविण्यात यावा. आवश्यक नसताना ज्या ठिकाणी शाळा कॉलेजचे बांधकाम झाले असेल त्याबाबत योग्य ती चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी. तसेच शाळा, खोली बांधकामाकरिता मंजूर भांडवली निधी, महसूली खर्चाकरिता वापरण्यात येऊ नये. विभागाने याबाबत निश्चित स्वरुपाची उपाययोजना व कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

२.४५७ ' वास्तव्य शेजारील शाळांची स्थापना न करणे ' :-

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा (R.T.E.) नियम ४ प्रमाणे शक्यतो १ ते ३ कि.मी. अंतराच्या आत प्राथमिक शाळा बांधणे आवश्यक आहे. R.T.E. ने आखून दिलेल्या सर्व शिक्षा अभियान (S.S.A.) कार्य चौकटीप्रमाणे राज्य सरकारने ३ वर्षांच्या कालावधीत म्हणजे ३१ मार्च २०१३ पर्यंत वास्तव्य शेजारील शाळा स्थापन करणे आवश्यक होते. तथापि, सप्टेंबर, २०१३ रोजी राज्यातील ६६,४४४ शासकीय

शाळांपैकी चौथीपर्यंतच्या ३६,७९४ आणि सातवी पर्यंतच्या ५६२१ शाळांना २ कि.मी. अंतरावर देखील इयत्ता ५ वी व ८ वी करिता वास्तव्य शेजारील शाळा उपलब्ध नव्हत्या. या ४२,४१५ शाळेतील २४.८७ लाख मुलांना मोफत प्रवास सवलत देखील देण्यात आलेली नाही. त्यामुळे शिक्षणाच्या हक्क कायद्यातील (R.T.E.) नियमांचे उल्लंघन झालेले होते. महालेखापालांनी निवडलेल्या ९ जिल्ह्यांमध्ये १२,०५२ शाळांमध्ये शिकणाऱ्या ६०.८२ लाख मुलांना मोफत प्रवास सवलत देण्यात आली नव्हती. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सादर केले की, १ ते ३ कि.मी. अंतराच्या आत शाळा मंजूर करण्यासाठी निकष आहेत परंतु सदरील अंतरामध्ये किती शाळा असाव्यात याबाबत निकष नाहीत. सदर अंतराच्या आत शासकीय शाळा असताना त्या ठिकाणी असलेल्या खाजगी शाळा मंजूर केल्याने शासकीय शाळा बंद पडतात. त्यामुळे वास्तव्य शेजारील शाळांची स्थापना करण्यास अडचण येत आहे. **याबाबत विभागाने शासकीय शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचाविणे आवश्यक आहे. शासकीय शाळांचा दर्जा चांगला असल्यास खाजगी शाळांना मंजूरीचे प्रस्ताव येणार नाहीत. तसेच शासकीय शाळा सोडून खाजगी शाळेत प्रवेशाचे प्रमाण कमी होईल, शासकीय शाळेत आवश्यक ती विद्यार्थी संख्या उपलब्ध असल्यास वास्तव्य शाळा व अन्य शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे शक्य होईल. विभागाने याबाबत निश्चित उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

२.४५८ " शासकीय शाळेतील प्रवेशाचा उतरता कल " :- U-DISE वरील प्रवेशासंबंधीचे माहितीचे पृथःकरण महालेखापालांनी केले असता असे निदर्शनास आले की, शासकीय व अनुदानित शाळांमध्ये प्रवेशाचे प्रमाण सन २०११-१२ शी तुलना करता सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये अनुक्रमे ७.६% आहे. ३% घसरले. तसेच या कालावधीत खाजगी, विना अनुदानित शाळा प्रवेशात २२% वाढ झाली. यासंदर्भात समितीने विचारणा केली की, दिवसेंदिवस मराठी शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी होऊन अनुदानित व विना अनुदानित खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या व उपस्थिती मोठ्या प्रमाणावर वाढीचे कारण काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमांच्या शाळेतील गुणवत्तेत फरक दिसून आलेला आहे. मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण द्यायचे अशी पालकांची इच्छा नसते. परंतु मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे व इंग्रजी बोलता यावे अशी त्यांची इच्छा असल्याचे दिसून आले. मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण मराठी माध्यमांचे शिक्षण आणि Spoken English in the name of English Subject या दोन बाबी केल्यास मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते ही बाब विभागाच्या निदर्शनास आली. त्यानुसार नियोजन करण्यात येत आहे. याशिवाय जिल्हा परिषदेच्या प्रत्येक सर्कलमध्ये एक इंग्लिश convent school सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. याबाबत समितीने सूचित केले की, छोट्या गावांचा म्हणजेच हजार लोक संख्येच्या आतील गावांचा दर्जा अत्यंत चांगला आहे. ५००० लोकसंख्या असलेल्या किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांमधील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा पाहिजे तेवढा चांगला नाही. विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलता येत नाही, शिक्षकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. ज्या छोट्या गावांमध्ये ५ ते ६ कि.मी. अंतरावर जवळपास शाळा नाही तेथील शिक्षक चांगले काम करतात असा अनुभव आहे. शिक्षण अधिकारी पूर्वीप्रमाणे नियमित भेटी देत नाहीत. शिक्षण अधिकाऱ्यांनी शाळा तपासणीचे काम योग्य पद्धतीने केल्यास जिल्हा परिषद शाळांचा दर्जा चांगला होऊ शकतो. **गावातील पालकांची आजही अशी मानसिकता आहे की, मुलगा त्यांच्या गावातच शिकला पाहिजे. शिक्षकांच्या मानसिकतेबद्दल, शिक्षणाचा दर्जा व शिक्षण अधिकाऱ्यांच्या भेटी वाढवाव्यात याबाबत विभागाने आवश्यक कार्यवाही करावी व शासकीय शाळेमधील मुलांच्या प्रवेशांचे प्रमाण वाढविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

२.४५९ " शाळाबाह्य मुलांची ओळख न पटविणे " :- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा (RTE) २००९ च्या कलम ४ अंतर्गत जर एखादा ६ वर्षांवरील मुलगा/मुलगी कोणत्याही शाळेत दाखल झाले नसेल किंवा दाखल झाल्यास प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकला नसेल तर त्याला/तीला त्याच्या वयानुरुप इयत्तेत प्रवेश देण्यात येईल. तसेच जेव्हा मुलगा थेट वयानुरुप इयत्तेत दाखल केला जातो तेव्हा इतरांबरोबरचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी विशेष प्रशिक्षण मिळविण्याचा त्याला हक्क असतो, अशी तरतूद असतानाही लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, नागपूर वगळता एकाही जिल्ह्यात भटक्या तथा दुर्लक्षित मुलांचा शाळेत दाखल करण्यासाठी शोध घेण्यात आला नव्हता. मार्च, २०११ मध्ये राज्याच्या A.W.P. & B चे मूल्यांकन करताना प्रकल्प मान्यता मंडळ केंद्र शासनाच्या असे निदर्शनास आले की, शाळा बाह्य मूलांचा शोध मोहिमेत विशेषत: नागरी भागात राज्याने पुरेसे प्रयत्न केलेले नव्हते. तसेच त्यांनी बाहेरील राज्यातून होणाऱ्या स्थलांतरावरही प्रकाश टाकला नाही. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने इतर अशासकीय संस्थांसह मुंबईतील केवळ २४ प्रभागांचे सर्वेक्षण केले असता ३७,०५९ मुले पद पथावर/रेल्वे फलाटवर राहत असलेली आढळून आले. तसेच २.५३ लाख शाळा बाह्य मुलांना नियोजित असूनही सन २०१० ते २०१४ दरम्यान विशेष प्रशिक्षण देण्यात आले नाही व स्थलांतरित कुटुंबातील १.१३ लाख मुलांना वसतिगृह सुविधा देण्यात आली नाही. सन २०१० ते २०१४ या कालावधीत रु. ५.५७ कोटी खर्च होऊनही ओळख पटविण्यात आलेल्या शाळाबाह्य मूलांपैकी ५१.८३% मूलांना प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय महिला व बाल कल्याण आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभाग या २ विभागाकडील शाळाबाह्य मुलांच्या संख्येत मोठी तफावत आढळून आली असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २०१३-१४ मध्ये विशेष प्रशिक्षणाचा लाभ सर्व मुलांना दिलेला आहे. तथापि, प्रशिक्षण दिल्यानंतर मुले मुख्य प्रवाहात आली नाहीत. त्यांना त्या शाळेत सामावून घेऊन ते नियमित करणे हा सर्वात अवघड

विषय आहे. शाळाबाह्य मुले शोधली तरी सामाजिक, कौटुंबिक व आर्थिक अडचणीवर मात करून पालकांमध्ये हा आत्मविश्वास निर्माण करणे की, मुलेही शाळेत येऊ शकतात, हा मोठा मुद्दा आहे. सद्यःस्थितीत ७४ हजार शाळाबाह्य मुले आहेत. यामध्ये स्थलांतरित झालेली ओरीया भाषा बोलणारी, कानडी भाषा बोलणारी तसेच झारखंडमधील सुद्धा मुले आहेत. महाराष्ट्रात जवळपास ७० बोलीभाषा बोलल्या जातात. अशा विद्यार्थ्यांना हाताळणेकरिता एक सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वे (multi langual eductation) तयार करण्यात येत आहे. त्यानुसार अशा विद्यार्थ्यांना लिहिण्या वाचण्यापुरता नाहीतर पूर्ण शिक्षणाचा हक्क मिळेल याची व्यवस्था करण्यात येत आहे. याबाबत समितीने मत व्यक्त केले की, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अजूनही शाळाबाह्य मुले आहेत ही खऱ्या अर्थाने सर्वांसाठी दुःखाची बाब आहे. **महिला व बाल विकास विभाग व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग या विभागांकडील शाळाबाह्य मुलांच्या संख्येत फार मोठी तफावत आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सादर केलेली आकडेवारी कमी असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र व मुंबई व इतर ठिकाणाचा विचार केल्यास अशी मुले फार मोठ्या संख्येने मिळू शकतील यास्तव व दोन विभागातील तफावत दूर करण्यासाठी पुन्हा एकदा शाळाबाह्य मुलांची तपासणी करण्यात यावी व राज्यातील सर्व शाळाबाह्य मुलांची नोंद घेऊन विभाग तयार करत असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा वापर करून सर्व विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येईल असे शिक्षणाचा हक्क (R.T.E.) कायद्यातील तरतूदीनुसार प्रशिक्षण देण्यात यावे व पुढील कालावधीत सर्व विद्यार्थी शाळेत नियमित जातील व शिक्षण घेतील याबाबतची उपाययोजना विभागाने करावी. आगामी एक वर्षात अशा विद्यार्थ्यांचा शोध घेणे, प्रशिक्षण घेणे व त्यांना नियमित शाळेत दाखल करण्याची कार्यवाही करावी नागरी क्षेत्रातील स्थलांतरीत उदा. ऊस तोंडणी, इमारत बांधकाम, धरणाचे बांधकाम व अन्य मोठ्या प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांकरिता School on wheel चा प्रयोग शासनाने करावा. सदर शाळांकरिता महाराष्ट्र इमारत व अन्य कामगार कल्याण मंडळाचा निधी उपयोगात आणणे शक्य होईल असे समितीचे मत आहे. याबाबतही शासनाने उचित कार्यवाही करावी जेणेकरून राज्यात एकही शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही. याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे. विभागाने याबाबत केलेल्या उपाययोजनांचा अहवाल तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

२.४६० **" शाळांमधील मुलभूत सुविधांचा विकास "** :- सर्व शिक्षा अभियान (S.S.A.) अंतर्गत मुलभूत सुविधांच्या विकासामध्ये नवीन शाळांचे बांधकाम, अतिरिक्त वर्ग, प्रसाधनगृहे, संरक्षण भिंती, विद्युतीकरण आणि BRCs, CRCs चे बांधकाम यांचा समावेश होतो. बांधकामासाठी निधी जिल्हा परिषद आणि महानगरपालिकाकडून थेट SMSs ना वितरित करण्यात येतो. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, केंद्र शासनाने (G.O.I.) २०१० ते २०१३ दरम्यान मंजूरी केलेल्या एकूण ८६,८७१ कामांपैकी केवळ ६६,५१७ (७६%) कामे पूर्ण झाली होती, १०,९१८ (१३%) कामे प्रगतीपथावर होती व ९,४१३ (११%) कामे सुरू झाली नव्हती. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सादर केले की, मुलभूत सुविधांचे ८६,८७१ भौतिक लक्ष मंजूर होते. केंद्र शासनाने स्वच्छतागृह बांधकाम भौतिक लक्षाचे पुनर्विनियोजन केल्यामुळे सन २०१० ते २०१३ पर्यंत एकूण ८५,२९१ बांधकामाचे भौतिक लक्ष होते. त्यापैकी ८२,५९० बांधकामे पूर्ण झालेली असून १३५९ बांधकामे प्रगतीपथावर आहेत **व १२६८ बांधकामे अद्याप सुरू झालेली नाहीत. तथापि, प्रगतीपथावरील सुरू न झालेली सर्व बांधकामे दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येतील. विभागाने आश्वासित केल्यानुसार प्रगतीपथावरील व सुरू न झालेली सर्व बांधकामे मार्च, २०१६ अखेर पूर्ण झाल्याचा अहवाल समितीस सादर करावा. ठाणे व अहमदनगर जिल्ह्यांमध्ये महालेखापालांच्या पथकाने केलेल्या निरिक्षणानुसार सदरची कामे कंत्राटदारामार्फत करण्यात आली आहेत. तथापि, विभागाने सदर कामे शाळा व्यवस्थापन समिती (SMC) ने केली असल्याचे साक्षीदरम्यान सांगितले. या विषयी सखोल चौकशी करण्यात यावी. क्षेत्रिय पातळीवर जाहिरात काढून कंत्राटदाराची नेमणूक केली आहे त्यानुसार करारनामा झाला आहे का ? कार्यादेश देण्यात आले आहे का ? कंत्राटदारास अदायगी झाली आहे काय ? या सर्व बाबींची चौकशी करून एक महिन्यात अहवाल समितीस सादर करणेबाबत साक्षीदरम्यान समितीने निर्देश देऊनही अद्याप चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर चौकशी अहवाल व त्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.** याशिवाय राज्यातील ५,३०० शाळांमध्ये विद्युतीकरण झालेले नाही. त्यामध्ये वायरिंग व फिटींग नसणे, विद्युत पुरवठा नसणे अथवा जोडणी नसणे अशा बाबी समितीच्या निदर्शनास आलेली आहेत. **विभागाने याबाबत विशेष मोहिम राबवून बांधकाम झालेल्या सर्व शाळांमध्ये विद्युत पुरवठा उपलब्ध करून द्यावा व १००% शाळांची विद्युतीकरणाचे काम आगामी ३ महिन्यांत पूर्ण करून तसा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे. ज्या शाळांमध्ये विद्युत देयकाकरिता व्यावसायिक दर लावण्यात येतात त्याबाबत MERC सोबत चर्चा करून रुग्णालयांच्या धर्तीवर शाळासाठी विशेष दर मंजूरीबाबत विभागाने कार्यवाही करावी. ज्या शाळांमध्ये प्रसाधनगृहे, पाण्याची उपलब्धता, खेळांची मैदाने व संरक्षण भिंती नाहीत त्या ठिकाणी तातडीने कार्यवाही करून सर्व सुविधा शाळांकरिता उपलब्ध करून द्याव्यात अशीही समितीची शिफारस आहे. तसेच ज्या ठिकाणी संरक्षण भिंतीची आवश्यकता आहे परंतु सर्व शिक्षा अभियानांतर्गत निधी उपलब्ध नाही अशा ठिकाणी केंद्र शासनाकडून विशेष बाब स्वरुपात सर्व शिक्षा अभियानांतर्गत निधीची मागणी करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे. सदर शिफारशींबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

२.४६१ " पुस्तके आणि गणवेश यांचे मोफत वाटप " :-

शिक्षण हक्क नियमामधील नियम ५ नुसार अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांना मोफत अनुज्ञेयता पुरविण्याची जबाबदारी शाळांची आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या (SSA) कार्यचौकटीप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा बीपीएल कुटुंबातील सर्व मुलांना व मुलींना जी शासकीय शाळेत शिक्षण घेत आहेत त्यांना शालेय गणवेशाचे दोन जोड देखील पुरवावयाचे आहेत. तथापि, लेखा परिक्षणाने निवडलेल्या ४ जिल्ह्यांतील ४७ चाचणी केलेल्या सर्व २६ विनाअनुदानित शाळांनी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात २५% आरक्षणानुसार प्रवेश घेतलेल्या ४८६ मुलांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेश वाटप केलेले नव्हते. याशिवाय एप्रिल, २०१० मध्ये शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यानंतर राज्याने शिक्षण हक्क नियम तयार करून त्यामध्ये गणवेशासाठी तरतूद करावी असे निर्देश केंद्र शासनाने दिले होते. तथापि, राज्य शासनाने शिक्षण हक्क नियम उशीरा बनविल्यामुळे विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिले. तसेच केंद्र शासनाने सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षाच्या AWPBS मध्ये लेखन साहित्याची तरतूद न केल्याने शासकीय शाळेत प्रवेश घेतलेली अनुक्रमे ६६.०४ लक्ष आणि ६३.३४ लक्ष मुले लेखन साहित्याच्या लाभापासून वंचित राहिली होती. लेखापरिक्षणात असेही निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासनाकडे शाळेत गैरहजर राहणाऱ्या किंवा गळती होणाऱ्या मुलांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी मुलांचा माग घेणारी यंत्रणा उपस्थित नव्हती. यासंदर्भात खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, शिक्षण हक्क नियम तयार केल्याशिवाय केंद्र शासनाकडून तरतूद मिळणार नव्हती. राज्य शासनास सदर नियम तयार करण्यास उशीर झाल्यामुळे एक वर्ष गणवेश वाटप झालेले नाही. तद्नंतर गणवेश वाटप करण्यात येत आहे. दरवर्षी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती प्रवर्गातील ४६ लाख विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात येते. यापैकी साधारणपणे १० लाख मुलांना राज्य सरकारकडून आणि उर्वरीत मुलांना सर्व शिक्षा अभियानातून गणवेश वाटप केले जाते. याबाबत समितीने सूचित केले की, शाळेतील मुलांची गळती थांबण्याकरिता सर्व प्रवर्गातील मुलांना गणवेश देणे योग्य होईल. **ज्या प्रवर्गातील मुलांना गणवेश दिला जात नाही त्या मुलांच्या मनावर विपरित परिणाम होतो ही बाब विचारात घेता राज्य शासन व केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानात पाठ्यपुस्तकाप्रमाणे गणवेशही सर्व मुलांना देण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे.** पाठ्यपुस्तके मंडळाची यंत्रसामग्री जूनी आहे. तसेच विभागाकडून मागणीही वेळीच नोंदविल्या जात नाहीत. त्यामुळे दरवर्षी पुस्तक वितरणामध्ये विलंब होतो. सन २०११-१२, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये शिक्षण विभागाने पाठ्यपुस्तक मंडळाला विलंब शुल्क आकारला असला तरी पाठ्यपुस्तक विलंबाने मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरुन निघत नाही. त्यामुळे विभागाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पाठ्यपुस्तकांची ऑनलाईन मागणी नोंदवावी. **अभ्यासक्रमात बदलाबाबत घ्यावयाचा निर्णय ठराविक कालमर्यादेतच घ्यावा. जेणेकरून त्या कारणास्तव पुस्तक छापायची मागणी करण्यास विलंब होणार नाही. परिणामी पाठ्यपुस्तकांची छपाई करून वितरणास विलंब होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण जास्त आहे. याबाबतही विभागाने तातडीने उपाययोजना करावी. मुले कोणत्याही जात, जमात, धर्माचे असो त्यांना १००% शिक्षण मिळाले पाहिजे याबाबत तातडीने उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे. प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांमध्ये प्रत्येक मुलाला संगणकाचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे याकरिता सदर शाळेतील शिक्षकांना आवश्यक ते प्रशिक्षण द्यावे याशिवाय अशा अतिरिक्त कामांकरिता त्यांना वेतनाशिवाय अधिकचा भत्ता देणेबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करून विभागाने त्वरीत निर्णय घ्यावा अशीही समितीची शिफारस आहे. समितीच्या उपरोक्त शिफारशींबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

२.४६२ " विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी हस्तक्षेप " :-

माहे सप्टेंबर, २०१३ पर्यंत राज्यातील ६६,४४४ शाळांपैकी ४,६६९ आणि १५९४७ शाळांमध्ये CWSN (children with special need) ना अनुक्रमे विनाअडथळा प्रवेश (RAMPS) आणि प्रसाधन सुविधा पुरविण्यात कमतरता होत्या. यासंदर्भात चर्चा करताना विभागीय सचिवांनी खुलासा सादर केला की, विनाअडथळा प्रवेश (RAMPS) करीता रु. ८.१७ कोटी व कमोड शौचालयासाठी रु. ५८.३७ कोटी एवढ्या निधीची मागणी केंद्र शासनाकडे केली आहे. **याबाबत समितीने सुचित केले की, विभागाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून निधी प्राप्त करावा व विद्यार्थ्यांना विनाअडथळा प्रवेश, प्रसाधन सुविधांची व्यवस्था करावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच CWSN (children with special need) संदर्भात ज्या मुलांना learning disabled childrens म्हणतात त्या आपल्या बाह्य अंगाने वेगळे दिसत नाहीत. परंतु त्यांचा आयक्यू ९०% पेक्षा कमी असेल तर त्या मुलांना शिकण्यामध्ये अडचणी येतात. यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयास जास्तीत जास्त प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच learning disability असलेल्या विद्यार्थ्यांना सहाय्यासाठी लेखनिक नेमण्याबाबत विभागाने पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी निर्णय घ्यावा. सदर लेखनिक नेमल्यास विद्यार्थी गैरफायदा घेतील अशी शंका घेऊन परिपत्रक निर्गमित करण्यास दिरंगाई करू नये. पुढील वर्षी मागेल त्याला लेखनिक देण्यासंदर्भात निकष ठरवून निर्णय घेतल्यास गरजू विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात मदत होईल. याबाबत विभागाने तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

२.४६३ " मुलींकरिता उच्च प्राथमिक निवासी शाळा बांधणे " :-

केंद्र शासनाने ऑगस्ट, २००४ मध्ये मुख्यत्वेकरून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्याक मुलींसाठी उच्च प्राथमिक निवासी शाळांची कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय (KGBV) ही विषेश योजना सुरू केली. या योजनेसाठी सर्व शिक्षा अभियान (SSA) मार्फत निधी पुरविला जातो मे, २०१४ दरम्यान राज्यात अस्तित्वात असलेल्या ४३ KGBVs पैकी २८ KGBVs ची बांधकामे सुरू व्हायची होती. उर्वरित १५ KGBVs ज्यांची बांधकामे प्रगती पथावर आहेत किंवा सुरू झाली नाहीत ते इतर शासकीय इमारतीत किंवा भाड्याच्या जागेत कार्यरत होती. यापैकी महालेखापालांनी लेखापरिक्षण केलेल्या १५ KGBVs मध्ये असे निदर्शनास आले की, जमिनीचा ताबा मिळण्यास विलंब झाल्यामुळे बांधकाम अपूर्ण होते व सदर कामे पूर्ण करण्यास अतिरिक्त निधी खर्च करावा लागला, जमीन उपलब्ध नसल्यामुळे/जमिनीचा ताबा मिळण्याच्या विलंबामुळे झालेल्या भाववाढीवर अतिरिक्त निधीची गरज वर्तविण्यात आली, ठाणे जिल्यातील ५३ KGBVs च्या संयुक्त तपासणीत असे निदर्शनास आले की, डहाणू गटामध्ये एनजीओ मार्फत चालविण्यात येणारे KGBVs जून, २०१३ पासून प्लास्टर नसलेल्या भाडेतत्त्वावरील इमारतीत चालविण्यात येत होते, विक्रमगड गटामध्ये KGBV ही १ मे, २०१० पासून शासकीय कुटीर रुग्णालयाच्या इमारतीत चालविण्यात येत होते, KGBVs च्या निकषानुसार जागा उपलब्ध नसतानाही कमी जागेत KGBVs चालविण्यात येत असल्याचे डहाणू गटातील तपासणीत निदर्शनास आले. काही KGBVs मध्ये प्रसाधनगृह आणि स्नानगृहे कमी होती, संरक्षण भिंत नव्हती, स्नानगृहे मोकळ्या जागेवर तात्पुरती उभारली होती, संगणक कक्ष नसल्याने ५ संगणक वऱ्हाड्यांत ठेवले होते. ठाणे जिल्ह्यातील KGBVs मध्ये १३.२३ लाख किंमतीचे पाणी गरम करण्याचे ५ सौरसंच प्राप्त झाले होते. तथापि, बसविलेले नव्हते, विनावापर पडून होते, तरीदेखील पुरवठादाराला रु. ५.२८ लाखांचे प्रदान करण्यात आले होते. अशा आक्षेपार्ह बाबी लेखापरिक्षणात व संयुक्त तपासणीत निदर्शनास आल्या. याबाबत विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान समितीस केलेला खुलासा समाधानकारक नव्हता. बांधकाम विलंबाने पूर्ण झाल्यामुळे विलंबास जबाबदार अधिकारी किंवा ठेकेदार यांच्यावर कारवाई केली नव्हती. सौरसंच खरेदीनंतर निविदा अटी शर्तीनुसार सौरसंच बसविण्याची कार्यवाही झाली नसतानाही अदायगी करण्यात आली. यामध्ये निविदा अटीचा भंग केलेला असतानाही संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात आली नाही. सदर खरेदीमध्ये १३ लाख रुपये निष्फळ खर्च झालेला आहे. सदर परिस्थिती पाहता सौरसंचाची खरेदी केवळ टक्केवारीसाठी झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागाने निविदा अटी शर्तीचा भंग झाल्याची वस्तुस्थिती मान्य केल्याने स्वत:हून कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु अशी कोणतीही कारवाई केलेली नाही. याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले व अशा प्रकरणी विभाग कारवाई करत नसेल तर ही अतिशय दुर्देवी बाब आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले. लेखापरिक्षण तपासणी पद्धत ज्या ठिकाणी पथक गेले त्या ठिकाणी उपरोक्त बाबी निदर्शनास आल्या. तथापि, अन्य ठिकाणीही अशा चूका/अनियमितता झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. **उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेता विभागाने KGBVs अंतर्गत बांधकाम झालेल्या सर्व इमारतींचा आढावा घ्यावा व अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत. बांधकामच्या विलंबास जबाबदार अधिकारी/ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी. शाळेच्या परिसराच्या स्वच्छतेसाठी संरक्षण भिंतीची आवश्यकता आहे, परंतु ज्या शाळांचे बांधकाम पूर्ण झालेले नाही अशा ठिकाणी संरक्षण भिंतीच्या बांधकामास प्राधान्य देऊ नये. शाळा/खोल्यांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात यावे. ज्या इमारतींकरिता जागा उपलब्ध नाही त्याबाबत महसूल व अन्य संबंधित विभागाशी संपर्क साधून पर्यायी जागा उपलब्ध करून इमारतीचे बांधकाम करण्यात यावे. ज्या KGBV मध्ये मुलींकरिता अत्यावश्यक सोई सुविधा उपलब्ध नाहीत त्या त्वरीत उपलब्ध करून देण्यात याव्यात. ठाणे जिल्ह्यातील (डहाणू आणि विक्रमगड) येथील सौरसंच खरेदीत निविदेतील अटींचा भंग करून देयकाची अदायगी करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची त्वरीत चौकशी करून दोषी कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. याशिवाय राज्यातील अन्य जिल्ह्यातही करण्यात आलेल्या खरेदीचा आढावा घ्यावा व साहित्य खरेदीमध्ये अनियमितता किंवा गैरव्यवहार निदर्शनास आल्यास संबंधित दोषी कर्मचारी/अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. विभागाने उपरोक्त शिफारशीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

नगरविकास विभाग

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या सामन्य आणि समाजिक क्षेत्र (नगरी) अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.१. ' मुंबईतील मोनोरेल प्रकल्पाचे कार्यान्वयन ' संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

प्रस्तावना :-

मुंबईत फेब्रुवारी, २०१४ मध्ये मोनोरेल प्रकल्प सार्वजनिक वापरासाठी खुला करण्यात आला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) हे या प्रकल्पाचे प्रणाली प्रशासक आहेत. गर्दीच्या आणि अरुंद, रहदारीने गजबजलेल्या क्षेत्रातून, रहदारी कौशल्याने वळविण्यासाठी आणि वाढत्या रहदारीची कोंडी सुकर करण्यासाठी तसेच विविध रहदारीच्या यंत्रणांना मदत करण्याच्या दृष्टीने सप्टेंबर, २००७ मध्ये मोनोरेलची सुरूवात करण्यात आली. मोनोरेल उंचावर बांधलेल्या संधानक सांगाड्यावर धावते.

१९.५४ कि.मी. लांबीचा हा प्रकल्प, लार्सन एण्ड टुब्रो ऑफ इंडिया आणि स्कोमी इंजिनियरींग ऑफ मलेशिया (LTSE) या समव्यावसायीक कंपन्यांना एकूण रु. २,७१६ कोटीला करासह आरेखन, बांधणी, वापर आणि देखभाल या तत्वावर देण्यात आला (नोव्हेबर, २००८). हा प्रकल्प दोन टप्प्यात पहिला टप्पा: वडाळा ते चेंबूर (८.९४ कि.मी.), दुसरा टप्पा : संत गाडगे महाराज चौक ते वडाळा (१०.६० कि.मी.) कार्यान्वित करायचा होता आणि मे, २०११ पर्यंत ३० महिन्यात पहिला टप्पा : २४ महिने नोव्हेंबर, २०१० पर्यंत, दुसरा टप्पा : पुढील सहा महिने मे २०११ पर्यंत (एकूण ३० महिने)) पूर्ण करायचा होता. सप्टेंबर, २०१४ पर्यंत या प्रकल्पावर रु. १,९२३ .१९ कोटी खर्च झाला आहे.

मार्च, २०१४ आणि ऑगस्ट, २०१४ दरम्यान MMRDA च्या मोनोरेल प्रकल्पाची लेखापरीक्षेने तपासणी केली. लेखापरीक्षेच्या निष्पत्तींवर MMRDA ने सादर केलेली उत्तरे योग्य ठिकाणी समाविष्ट केलेली आहेत. लेखापरीक्षेच्या निष्पत्तींची पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केली आहे.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

वस्तूस्थितीदर्शक असल्यामुळे अभिप्राय नाहीत.

लेखापरिक्षणातील निष्पत्ती :-

मोनोरेल अधिसूचित करण्यासाठी अपर्याप्त वैधानिक चौकट :- मोनोरेलच्या उभारणीकरिता कुठलाही विशिष्ठ अधिनियम नसल्याने भारतीय ट्राम्सवे अधिनियम, १८८६ (ITA) मध्ये सार्वजनिक वाहतूक उन्नत मार्ग बांधून वापरण्याची तरतूद नसतांनाही, महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर, २००८ मध्ये मुंबई मोनोरेल प्रकल्प ITA अंतर्गत अधिसूचीत केला होता. ITA च्या भाग १२ अंतर्गत राज्य शासनाकडून नियुक्त केलेल्या स्वतंत्र अभियंत्याकडून सुरक्षा प्रमाणन करण्याचे निर्धारित केले आहे. ट्राम्सवेचा वेग धीमा असल्यामुळे, भारतीय रेल्वेत प्रचलित असलेल्या सविस्तर सुरक्षा प्रमाणनांची ट्राम्सवेला आवश्यकता नसते. महत्त्वाचे म्हणजे, अनपेक्षित करणांमुळे एखाद्या व्यक्तिचा मृत्यू किंवा शारिरीक इजा झाल्यास त्याची जबाबदारी आणि आर्थिक जोखीम याबाबी ITA मध्ये संदर्भित केलेल्या नव्हत्या.

महानगर आयुक्त (MC) यांनी सांगितले (डिसेंबर, २०१४) की, मोनोरेल योजनेचे बांधकाम आणि कार्यचालन ITA च्या अनुषंगाने करावयाचे होते व ते राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्रात होते. MC नी पुढे असेही सांगितले की, महाराष्ट्र शासनाने आता ITA त मोनोरेलचा समावेश करण्याच्या दृष्टीने उचित सुधारणा करण्याची शिफारस केली आहे.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

उन्नत पातळीवर ट्रामवेज बांधकामास बंदी घालण्याबाबत भारतीय ट्रामवे अधिनियम, १८८६ (ITA) मध्ये कोणतीही ठोस तरतूद नाही. भाग ७ (२) डी मध्ये असे नमूद केले आहे की, ट्रामवे चे बांधकाम पूल व रेल्वे ओलांडून जाऊ शकते. कलम ७ (२) एफ मध्ये असे देखिल नमूद केले आहे की, ट्रामवेचे गेज, वापरात येणारे रुळ, बांधकामाची पद्धत आणि त्यांचा स्तर, ते टाकावयाचे आणि कोणत्या उपसंरचनेवर ते ठेवावयाचे, त्याच्या स्थितीबाबत शासनाने वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार असतील.

कलम १२ राज्य शासनामार्फत " स्वतंत्र अभियंता " यांची नियुक्ती करणे संदर्भात आहे. त्याप्रमाणे निवृत्त मुख्य आयुक्त रेल्वे सुरक्षा (CCRS), यांची दिनांक ०९.०४.२०१३ रोजी शासन अधिसुचनेद्वारे नियुक्त करण्यात आली. मोनोरेल एक अधिक गुंतागुंतीची प्रणाली असल्यामुळे सुरक्षा तपासणी प्रवासी वाहतुकीकरीता मोनोरेल सुरू करणे या नियमनुसार चालते. राज्य शासनाने त्यात योग्य तपासणीकरीता आणि सार्वजनिक प्रवासी सुरक्षीतता सुनिश्चित होण्यासाठी आवश्यक प्रणाली, ठळक बाबी नमुद केल्या आहेत. यासंदर्भात भारतीय ट्रामवे कायद्यामध्ये कोणत्याही तरतूदीचा उल्लेख नाही.

अनपेक्षित कारणांमुळे एखाद्या व्यक्तिचा मृत्यू किंवा शारिरीक इजा झाल्यास त्याची जबाबदारी आणि आर्थिक जोखीम याबाबी ITA मध्ये संदर्भित केलेल्या नव्हत्या, हे खरे आहे. तथापि याबाबत कलम ४२ मध्ये पुरवणी तरतूदी अंतर्गत पुढील प्रमाणे तरतुद समाविष्ट आहे, "Promoters, lessees and licensees to be responsible for all injuries. A promoter, lessee or licensee shall be answerable for all injuries happening THRough his act or default, or through the act or default of any person in his employment, by reason or in consequence of any of his carriages or works, and shall save harmless all authorities and persons collectively and individually, and their officers and servants, from all damages and costs in respect of injuries so happening."

" प्रकल्पाची सुसाध्यता आणि कंत्राटाला अंतिम रुप देणे " :-

प्रकल्पाची सुसाध्यता आणि कंत्राटदाराच्या निवडीसंबंधीच्या दस्तऐवजांच्या तपासणीत खालील गोष्टी आढळून आल्या:

प्रकल्पाचा तंत्र-आर्थिक आणि वित्तीय सुसाध्यता अभ्यास आणि निविदा प्रक्रिया व्यवस्थापनाचे काम मे. रेल इंडिया टेक्निकल ॲण्ड इकोनॉमिक सर्विसला (RITES) जागतिक निविदा न मागवता देण्यात आले होते (जानेवारी, २००८).

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

वस्तूस्थिती दर्शक आहे.

सल्लागार यांची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुलभ व गतीमान करण्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदा प्रकिया ऐवजी मे. राईट्स यांची दिल्ली आणि चंदीगड प्रकल्पासाठी त्या त्या रांज्यानी घातलेल्या अटी व शर्तीच्या आधारीत एमएमआरडीएकडून नियुक्ती करण्यात आली. मे. राईट्स (RITES) ही कंपनी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाचा सार्वजनिक उपक्रम असून भारतीय नवरत्न कंपनी आहे. त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील रेल्वेशी निगडीत कामे, मेट्रो प्रणाली व रस्ते बांधणी सदंर्भातील सल्लागार कामाचा व्यापक अनुभव आहे. मे. राईस्ट यांची दिल्ली मेट्रोमध्ये सामान्य सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तसेच मे. राईट्स यांनी दिल्ली मोनोरेल प्रणालीच्या ४८ कि.मी. लांबी असलेल्या व चंदीगड येथील ३६ कि.मी. लांबीच्या मोनोरेल प्रणालीचा सविस्तर सुसाध्यता प्रकल्प अहवाल तयार केलेला होता. सल्लागार नेमणेबाबत दिल्ली व चंदीगड प्रकल्पासाठी जागतीक निविदा न मागवता संबंधीत राज्यशासनाने सल्लागारांचा असलेला व्यापक अनुभव पाहता संबंधीत सल्लागाराची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी विविध मोनोरेल प्रणालीचा अभ्यास करून प्रमुख मोनोरेल उत्पादकांशी सल्लामसलत केली होती.

RITES ने मार्च, २००८ मध्ये रु. १,५३९ कोटीचे (करासहित) प्रारंभिक अंदाज दिले होते ज्या आधारे मोनोरेल प्रकल्पांसाठी मे, २००८ मध्ये निविदा बोलाविण्यात आल्या होत्या. ११ ऑगस्ट, २००८ ला LTSE (तीन पूर्व पात्र निविदाकार, ज्यांना प्रस्तावासाठीचे विनंती पत्र जारी केले होते त्यांपैकी फक्त दोन (LTSE) आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रकचर - हिताची) निविदाकारांनी त्यांच्या तांत्रिक आणि आर्थिक निविदेसह प्रतिसाद दिले होते. तिसरे निविदाकार मे. बॉम्बॉर्डीयर ट्रान्सपोर्टेशन (होल्डींग), युएसए यांनी प्रस्तावाच्या विनंतीला प्रतिसाद दिला नव्हता.) ची (तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असलेले एकमेव निविदाकार) आर्थिक निविदा उघडल्यावर, LTSE चे रु. २,९७० कोटी (करासहित) दर, RITES ने सुरूवातीला दिलेल्या अंदाजापेक्षा ९३ टक्के जास्त असल्याचे आढळून आले. अशावेळी, निविदा प्रक्रिया रद्द करण्याऐवजी, MMRDA ने RITES ला मार्च २००८ ते जून २००८ दरम्यानच्या दरांनुसार सुधारीत अंदाज तयार करण्याची विनंती केली (२६ ऑगस्ट, २००८). तद्नुसार, RITES ने रु. १,७७७ कोटी (करांसहीत) सुधारीत अंदाज सादर केले (१० सप्टेंबर, २००८) आणि असे मत व्यक्त केले की, LTSE ने उद्धृत केलेले दर अवाजवी होते आणि रु. १,२१० कोटीने जास्त होते. म्हणून RITES ने LTSE बरोबर दरांबाबत वाटाघाटी करण्याची शिफारस केली.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

वस्तूस्थिती दर्शक आहे.

RITES ने रु. १,७७७ कोटीचा सुधारीत अंदाज देताना प्रकल्पांशी साधर्म्य असलेल्या इतर बांधकामांचे मुंबईच्या परिस्थितीमधील प्रचलित दर विचारात घेतले नाहीत या युक्तिवादावर प्रकल्पांच्या अंदाज किंमतीचे पुन:मुल्यांकन करण्यासाठी MMRDA ने दिनांक १२ सप्टेंबर, २००८ रोजी दुसऱ्या सल्लागाराची (मुंबई मेट्रो लाईन-१ साठी नियुक्त केलेले) (ल्युइस बर्जर ग्रुप इंक) (LBG) नेमणूक केली. LTSE बरोबर दरांबद्दल वाटाघाटी करणे कामी LBG ने दिलेला रु. २,३२९ कोटी (करांसहित) रक्कमेचा अंदाज प्रस्ताव MMRDA च्या मुल्यमापन समितीने

प्रमाण मानला. रु. २,७१६ कोटी रक्कमेचा LTSE चा अंतिम देकार (करांसहित) दरांच्या वाटाघाटीनंतर (ऑक्टोबर, २००८) MMRDA ने स्विकारला.

मुल्य निविदा उघडल्यानंतर, दुसऱ्या सल्लागारांचा सल्ला घेणे हे अत्यंत नियमबाह्य होते कारण, सल्लागारांना LTSE ने देऊ केलेले मुल्य माहित होते आणि त्या टप्प्यावर सल्लागाराने निर्धारित केलेले प्रकल्पाचे मुल्यांकन हे पूर्वग्रहदूषित असण्याची शक्यता होती. तसेच, LBG ने प्रस्तावित जागेला भेट दिली नाही किंवा प्रकल्प मुल्याचा अंदाज बांधण्यासाठी विशिष्ट जागेच्या परिस्थितीचे मुल्यमापनही केले नाही. दुसऱ्या सल्लागारांनी अंदाजपत्रक दोन आठवड्यात तयार केले (RITES ने प्राथमिक अंदाज सादर करताना घेतलेल्या चार महिन्यांच्या (नोव्हेंबर २००७ (डिसेंबर २००७ ते मार्च २००८) मध्ये RITES ला स्वारस्यपत्र जारी केले होते) वेळेशी तुलना करता) जे, एका सहभागी निविदाकाराच्या (LTSE आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर-हिताची) तांत्रिकी प्रस्तावाच्या पुनर्विलोकनाच्या गृहितकांवर आधारित होते. RITES ने अंदाज वाढविल्यानंतरही कंत्राटाची अंतिम रक्कम रु. ९३९ कोटीने (रु. २,७१६ कोटी - रु. १,७७७ कोटी रू. ९३९ कोटी) जास्त होती आणि दुसऱ्या सल्लागाराने प्रगणित केलेल्या रक्कमेच्या तुलनेत ती रु. ३८७ कोटीने (रु. २,७१६ कोटी - रु. २,३२९ कोटी उ ३८७ कोटी) जास्त होती. MMRDA ने असे नमूद केले की, भारतात मोनोरेलचे बांधकाम पहिल्यांदाच होत असल्यामुळे त्याच्या मुल्याबाबत कुठलेही निकष उपलब्ध नव्हते. केवळ त्यातील गोष्टींची योग्यता पडताळून पाहण्यासाठी, दुसऱ्या प्रतिष्ठीत सल्लागारांकडून मत आजमावण्यात आले होते. दुसऱ्या सल्लागारांच्या मुल्याशी तुलना करता, LTSE बरोबर केलेल्या वाटाघाटीतून रु. २०० कोटीपेक्षा जास्त किंमत कमी झाली होती.

MMRDA ने पुढे असेही सांगितले की, निविदा मुल्यमापन समितीने पुनःर्निविदेसकट सगळ्या विकल्पांचा विचार केला होता पण पुनःनिविदा मागवून स्पर्धात्मक दर मिळण्याची खात्री नव्हती. तसेच, प्रकल्पाच्या अंमलबजावणीत विलंब होण्याचा धोकाही होता.

MMRDA चे, पुनःनिविदा मागविल्यानंतर स्पर्धात्मक दर मिळणे साध्य होणार नाही असे म्हणणे ही फक्त कयास होता. घटनाक्रम स्पष्टपणे असे निर्देशित करतो की, सल्लागारांच्या नियुक्तित पारदर्शकता नव्हती आणि मुल्य निविदा उघडल्यावर प्रमाणे किंमत परिगणित करणे हे निश्चित अशा पूर्वग्रहांवर आधारित होते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

वस्तूस्थिती दर्शक आहे.

निविदा उघडल्यानंतर सल्लागार समान तर्कशास्त्रावर स्वतंत्र मुल्याकन करून मे. राईट्स यांनी दिलेल्या अवास्तव अंदाजपत्रकाबाबत शहानिशा करणेसाठी सल्लागाराचे स्वतंत्र मत अजमावणे हे अनियमितता होत नाही कारण मोनोरेल प्रकल्प हा भारत देशामध्ये प्रथमच कार्यान्वित होत असलेने त्याबाबतचे मत आजमावून त्या दिशेने पूढे वाटचाल करणे हे एक पहिले पाऊल आहे. कलाची खात्री करणे अनुमानीत होते आणि जे एल.बी.जी. च्या अहवालावरुन अधोरेखित झाले नाही, तेथे मानले नाही आणि खर्च खरोखर अवास्तव नसल्याचे दिसून आले. भारत देशामध्ये मागविण्यात आलेल्या बोली उदा. केरळ यांच्या बरोबर तुलना केली असता मुंबई मोनोरेलची किंमत वाजवी असल्याचे दिसून येते.

" प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड " :-

निवड झालेल्या कंत्राटदाराने तयार केलेल्या प्रकल्पाच्या आरेखनाचे पुनर्विलोकन करणे आणि या क्षेत्रातील सर्वोत्तम औद्योगिक पद्धतीनुसार प्रकल्प कार्यान्वयाचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) होती. सोविल (इंडिया) या समव्यावसायिक (चायना रेल्वे इरुयुआन इंजिनिअरींग ग्रुप कं. लि. (चायना), सोविल लिमिटेड (इंडिया), चॉगकींग मोनोरेल ट्राल्सीट इंजिनिअरिंग कं. लि. (चायना) आणि टीप वन आर्किटेक्ट (इंडिया)) गट व्यवस्थापन सल्लागारांना रु. ३५.५२ कोटी शुल्कावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम देण्यात आले (नोव्हेंबर, २००८). यातील न्यूनतम क्रमांक दोनचा निविदाकार LBG प्रणित समव्यावसायिक गट होता. PMC कंत्राट हे ३९ महिन्यांसाठी (फेब्रुवारी, २०१२) वैध असणार होते.

लेखापरिक्षणात असे आढळून आले की, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने PMC ला काळ्या यादीत टाकल्याची (सप्टेंबर २००८) माहिती त्यांनी दडविल्याबद्दल तसेच त्यांच्याकडील महत्वाच्या पदांवर कार्यरत असलेल्या विदेशी जाणकांराचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्याचा त्यांचा दावाही खोटा असल्याच्या कारणांवरुन MMRDA ने PMC चे कंत्राट सहा माहिन्यांच्या आंत रद्द केले होते (एप्रिल, २००९). अशी दिशाभूल केली असतानाही MMRDA ने PMC ला कुठल्याही दंडात्मक कारवाईशिवाय सोडून जाण्याची परवानगी दिली. अशा स्थितीमध्ये नवीन निविदा मागविण्याऐवजी त्याच LBG (तिने प्रकल्प अंदाजांचे निर्धारण केले होते) कंपनीस मूळ निविदेत सोविल प्रणित समव्यावसायिक गटासह दुसऱ्या क्रमांकाचे न्यूनतम निविदाकार असल्यामुळे MMRDA ने त्यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त केले (मे, २००९). हे येथे

नमूद करणे यथोचित ठरेल की, येथे LBG हा नवीन PMC, मूळ निविदा प्रक्रियेतील समव्यावसायिक गट नव्हे तर स्वतंत्र घटक होता. LBG ने सल्ला कार्यासाठी नव्याने प्रस्तावित केलेल्या जाणकारांच्या तांत्रिक क्षमतेचे MMRDA ने नव्याने मुल्यांकनही केलेले नव्हते.

LBG ला रु. ३५.१२ कोटी शुल्कांवर नवीन PMC कंत्राट दिले (जून २००९) गेले होते, जे फेब्रुवारी, २०१२ पर्यंत वैध होते आणि ज्याला डिसेंबर, २०१५ पर्यंत वेळोवेळी मुदतवाढ दिली गेली होती.

LBG ला रु. ३५.१२ कोटी शुल्कांवर नवीन PMC, कंत्राट दिले (जून २००९) गेले होते, जे फेब्रुवारी, २०१२ पर्यंत वैध होते आणि ज्याला डिसेंबर, २०१५ पर्यंत वेळोवेळी मुदतवाढ दिली गेली होती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

मोनोरेल प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) नियुक्ती करण्यासाठी एप्रिल, २००८ मध्ये जागतिक बोली आमंत्रित केल्या होत्या.त्यानुसार जून, २००८ मध्ये दोन बोलीधारक (१) M/s. Sowil/Chaina Railway Eryuan Engineering Group Ltd. (२) M/s. Louis Berger Group, INC & Artitech यांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. M/s. Sowil यांच्या प्रस्तावाची किंमत रु. ३५.५२ कोटी होती. M/s. LBG यांच्या प्रस्तावाची किंमत रु. ३५.११ कोटी होता. M/s. Sowil / Chaina Railway Eryuan Engineering Group Ltd. यांची एकत्रित तांत्रिक व आर्थिक गणना ९४.८० व मे. लुईस बर्जर ग्रुप यांची एकत्रित तांत्रिक व आर्थिक गणना ८९.८६ होती. डब्ल्यू च्या प्रक्रियेद्वारे M/s. Sowil आणि CREEGC यांच्या सोबत नोव्हेंबर, २००८ रोजी कंत्राट करार करण्यात आला. ८ डिसेंबर, २००८ रोजी RFP मधील निवड निकषानुसार करार पत्रावर स्वाक्षरी करण्यात आली होती. एप्रिल, २००९ मध्ये सदर करार विखंडीत करण्यात आला. कंत्राटदार चमुने प्रमुख तांत्रिक विदेशी अधिकाऱ्याच्या इंग्रजीवरील प्रभुत्वाबद्दल चुकीची माहिती नोंदविल्याचे लक्षात आले, तसेच M/s. Sowil/Vanct यांचे नाव एनएचएआय यांच्या काळ्या यादीत होते. या बाबी बोली प्रक्रिया दरम्यान अयोग्य फायदा घेण्यासाठी बीड प्रोसेसच्या दरम्यान प्रस्तुत कंपनीने उघड केल्या नव्हत्या. विदेशी अधिकाऱ्याच्या उच्च इंग्रजीमधील ज्ञान/प्रभुत्व चांगले योग्य असल्याचे बोलीमध्ये नमूद केले होते.

संबंधित अधिकारी हे कंत्राट दिल्यानंतर नियुक्त केल्या असल्याने त्यांचे इंग्रजीवरील प्रभूत्व प्रकल्पाच्या तांत्रिक बाबीवरील चर्चे दरम्यान निवासी अभियंता तसेच प्रकल्प संचालकासह बहुतांश प्रमुख व्यक्तीकडे इंग्रजीचे ज्ञान नसल्याची बाब उघडकीस आली. प्रकल्पाच्या RFP च्या शर्तीमध्ये परिच्छेद क्र. ३.३ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, ' संबंधीत संघातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना इंग्रजी बोलता आले पाहिजे प्रामुख्याने प्रकल्प संचालक व कार्यान्वयन प्रमुख यांच्याकडे इंग्रजीच्या उत्तम ज्ञानासह चांगल्या प्रकाराचे संभाषण कौशल्य आवश्यक आहे. ' महत्वाच्या ३० पैकी २३ व्यक्ती या विदेशी व्यावसायिक तज्ञ होत्या. ही बाब हा गुंतागुंतीचा प्रकल्प राबविण्यात अडचणीचे ठरणारी होती. अर्थात चांगले संभाषण कौशल्य हे दीर्घ काळाच्या प्रकल्पासाठी व्यवस्थापकीय व तांत्रिक सुसंवाद साधण्यासाठी महत्वाचे आहे. ही बाब दुभाषाद्वारे परिणामकारकरित्या साध्य करण्यासारखी नव्हती. आणि त्यामुळे याबाबतीत गंभीर गैर संवाद झाला असता महत्वाच्या व्यवसायिक तज्ञांना त्यांच्या इंग्रजीच्या ज्ञानाचा दर्जा सिद्ध करण्यासाठी महानगर आयुक्त आणि अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी सादरीकरणाची संधी दिली. CREEGC च्या संचालक यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना हजर केले नाही व त्यांना इंग्रजी लिहता व बोलता येत नसल्याचे मान्य केले. स्थानिक भागरीदार M/s. Sowil यांनी काही प्रकल्प पूर्ण करण्यास असमर्थ ठरल्याचे व NHAI ने त्यांना काळ्या यादी टाकल्याबाबतची कार्यवाहीची माहिती लपवल्याने त्यांचे अभिलेख देखील असमाधनकारक ठरले. प्रकल्प हा प्राथमिक अवस्थेत होता आणि प्रकल्पासाठी नियुक्त केलेले कर्मचारी पुरेसे नव्हते. प्रक्रियेमध्ये असमाधानकारक असल्याचे आढळून आले. पुढे करार म्हणून तो व्यवस्थापनास कठीण झाले असते. हा नवीन तत्रज्ञानावर आधारित असलेला अतिशय गुंतागुंतीचा व क्लिष्ट प्रकल्प हाताळण्यास अवघड ठरण्याची शक्यता असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे कंत्राट एप्रिल २००९ मध्ये बंद करण्यात आले. अशा परिस्थितीत प्रकल्पाचे हित लक्षात घेऊन ही कार्यवाही करण्यात आली. M/s. Sowil यांच्यापासून एलबीजी यांना प्रकल्पाचे हस्तांतरण लवकर आणि सुलभ झाल्याने हा प्रकल्प M/s. Sowil यांच्याकडून काढल्याच्या कारणास्तव प्रकल्पास काही फरक पडला नाही. त्यामुळे दंडात्मक कार्यवाहीची आवश्यकता वाटली नाही. ज्याची परिणीती आनावाश्यक वादामध्ये झाली असती. प्रकल्पाच काम सर्व बाजूने सुरू झाले होते आणि हा प्रकल्प सुनिश्चित आणि सविस्तर संकल्पनाच्या स्तरावर आला होता आणि बांधकामास सुरूवात होणार होती. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारासाठी फेरनिविदा मागविणे व्यवहार्य ठरले नसते आणि त्यामुळे एमएमआरडीएकडील या प्रकल्पाकरीता विलंब करणारे ठरले असते परिणामी प्रकल्प कार्यान्वीत करणाऱ्या LTSE कडून भरमसाठ भरपाईची मागणी झाली असती. त्यामुळे या संदर्भातील दुसऱ्या पात्र बोलीदार मे. LBG आणि AEIB यांचा विचार करण्यात आला. त्यांचा देकार मूळ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या देकारापेक्षा ४० लाखाने कमी होता. AEIB हे SCOMI यांच्याबरोबर सलग्न असल्याने हित संबंध टाळण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारासाठी LBG यांची

नेमणूक करण्यात आली. AEIB चे महत्वाचे व्यवसायीक तज्ञ कमी संख्येने होते आणि बदलेल्या महत्वाच्या व्यवसायीक तज्ञाची तांत्रिक क्षमता तपासण्यात आली ती RFT च्या कलम ४.४ (व्यक्ती काढणे आणि/किंवा बदलणे) नुसार ती स्वीकारण्या योग्य ठरली. म्हणून त्यांचा प्रस्ताव स्वीकारला गेला. त्यांचा प्रस्ताव कार्यकारी समितीने मे २००९ मध्ये स्विकृत करून मंजूर केला. प्रकल्पाचे काम जानेवारी २००९ मध्ये सुरू झाले आणि मे LBG यांनी मूळ कंत्राटामध्ये विहीत केलेला ३३ महिन्याचा कालावधी कायम ठेवून २८ मे २००९ पासून रु. ३५.११ कोटी रक्कमेवर (पुर्वीच्या सल्लगारापेक्षा ४० लाखाने कमी) सेवा देण्यास सुरू केले. मे SOWIL यांच्या मूळ कंत्राटामध्ये सविस्तर संकल्पाची पुरावा तपासणीचा Proof checking समावेश नव्हता आणि त्यांनी Proof checking साठी अतिरिक्त रक्कमेची मागणी केली होती. TOR मधील परिच्छेद २.४.२.२ नुसार कंत्राटदाराकडून सविस्तर संकल्पचित्र तयार केले जाईल आणि ते एमएमआरडीएकडून नियुक्त केलेल्या स्वतंत्र पुरावा तपासणी सल्लागाराकडून तपासले जाईल. प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार आवश्यकता वाटल्यास आढवा घेऊन अभिप्राय नोदवू शकतील. त्यामुळे Proof checking कन्सल्टंटसाठी जागतिक स्तरावर जानेवारी २००९ मध्ये निविदा मागविल्या गेल्या. त्यामध्ये मे. MOTT McDonalds यांच्याकडून सर्वात कमी रक्कमेचे म्हणजे ७.५ कोटी चा देकार प्राप्त झाला. मे. LBG यांच्या बरोबर करार करताना सर्व संकल्पाचे Proof checking चे काम मे LBG यांच्या मूळ देकार रक्कमेत वाढ न करता अर्तभूत करण्यात आले. LBG बरोबर केलेल्या कंत्राट करार नाम्यात कलम २.४.४ मध्ये LBG ने Proof checking करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे की, all the designs will be reviewed, Proof checked and provided by PMC in consultation with employer. Accordingly M/s. LBG have reviewed and Proof checked the designs and drawings of all the systems of the project. अशाप्रकारे प्रकल्प सल्लागार बदलण्याचा प्रक्रियेमध्ये रु. ७.५ कोटीची बचत साध्य करण्यात आली. सदर प्रकल्पास विविध करणामुळे विलंब झाल्याने त्यांचे कंत्राट मूळ ३३ महिन्याच्या कालावधीच्या पलीकडे म्हणजेच फेब्रुवारी, २०१२ नंतर ते ३१ डिसेंबर २०१५ पर्यत वाढविण्यात आले.

" संकल्पचित्रातील अडचणी " :-

LTSE च्या कंत्राटामधील दस्तऐवज / तांत्रिक प्रस्तावातील स्थापत्य कामांची मानके / संकल्प तपशिल आणि MMRDA व PMC ने मंजूर केलेले संकल्पीय दस्तऐवज यांची तुलनात्मक पडताळणी लेखापरीक्षणामध्ये करण्यात आली. या तुलनेद्वारे अनेक त्रुटी आढळून आल्या, ज्याची चर्चा पुढे केली आहे.

चलसंच वाहनाच्या आस भाराशी मार्गदर्शी पथाचे सुसंगत नसणे (Guideway design not conforming to exle load of the rolling stock car).

रस्त्यांच्या आणि लोहमार्गाच्या स्थापत्य अभियांत्रिकीत आस भाराचे संकल्पचित्र विचारात घेणे महत्वाचे असते. उदाहरणार्थ, दोन आस असलेल्या ३० टन वजनाच्या वाहनाचा आस भार कशा प्रकारे तो विभागला आहे त्यानुसार अंदाजे १५ टन असावा. कमाल मार्यादेबाहेरील आस भाराने रस्त्यांना अथवा लोहमार्गाला हानी पोहचू शकते.

मोनोरेलच्या कंत्राटात असे विहित केले होते की, मार्गदर्शी पथाचे संकल्प चित्र हे चलसंच वाहनाचा (चलसंच वाहन म्हणजे मोनोरेलचा एक डबा किंवा वाहतुक प्रणालीद्वारे प्रवाशांची वाहतुक करणारी डब्यांची गाडी) (RSC) कमाल आसभार पेलू शकेल असे असावे. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, LTSE ने त्यांच्या तांत्रिक प्रस्तावात नमूद केलेल्या १२.३५ टनाऐवजी ११.७२ टन आस भार असलेल्या मार्गदर्शी पथाचे संकल्प चित्रण आणि बांधणी केली. तर LTSE ने प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या चलसंच वाहनाचा आसभार हा १३.२७ टन इतका होता. संकल्प चित्र पुनवैधतेसाठी, MMRDA ने ज्या मार्गदर्शी पथाचे संकल्पचित्रण आधीच मंजूर झाले होते त्यास तपासण्यासाठी जून, २०११ मध्ये एका जर्मन सल्लागाराची (K+S इंजेन्युअर कन्सल्ट GmBH & Co) नियुक्ती केली होती. योगायोगाने, सल्लागाराची नियुक्ती करण्याआधीच मार्गदर्शी पथाच्या स्थापत्याच्या (पथदर्शी पथाच्या स्थापत्य कामात पाइल्स, पाइल कॅप्स, पियर्स, पथदर्शी पथाच्या तुळया तयार करणे आणि त्या बसविणे या गोष्टींचा समावेश होतो.) पहिल्या टप्प्यातील २५ ते ९७ टक्के काम आणि दुसऱ्या टप्प्यातील ११ ते २८ टक्के काम पूर्ण झाले होते.

सल्लागाराने आपल्या अहवालात (डिसेंबर, २०११) असा अभिप्राय दिला की, चलसंच वाहनाच्या वाढत्या वजनामुळे मार्गदर्शी पथाच्या बांधकामावर अतिरिक्त ताण पडू शकेल. मार्गदर्शी पथाच्या बांधकामाचा संभाव्य धोका टाळण्यासाठी, मार्गदर्शी पथांची लक्षपूर्वक देखभाल, नियोजन आणि त्यांचे कालबद्ध निरिक्षण आणि भविष्यातील प्रकल्प टप्प्यांच्या आरेखन निकषांचे पुनर्विलोकन करण्याची सल्लागारांनी शिफारस केली. तथापि, MMRDA/PMC ने असे कुठलेही पुनर्विलोकन केले नव्हते.

MMRDA ने असे नमूद केले की, भविष्यात बांधकामाच्या नियमित संनियंत्रणाची खात्री केली जाईल. अंतिम बैठकीत महानगर आयुक्तांनी सांगितले की, वाहनांमध्ये अतिरिक्त सोयींची तरतुद केल्यामुळे चलसंच वाहनांचे वजन वाढले आहे.

चलसंच वाहन आणि मार्गदर्शी पथांतील गंभीर बदल हे MMRDA आणि PMC चे अपुरे संनियंत्रण दर्शविते, तसेच, मार्गदर्शी पथाच्या संरचनेच्या स्थिरतेबाबत आणि सार्वजनिक सुरक्षिततेबाबत प्रश्चचिन्ह उभे करते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

चलसंच वाहनाच्या आस भाराशी मार्गदर्शी पथाचे सुसंगत नसणे :–

बाह्य रचनेची प्रमाणके अशी विहित करण्यात आली होती की, AW3 भाराकरीता म्हणजेच ७ प्रवासी प्रति चौ.मी. प्रमाणे एका आसाच्या डब्याचा कमाल अनुज्ञेय भार १५ टन असावा.

वेगवेगळया उत्पादकांकडील वेगवेगळया प्रकारचे डबे आणि आस भाराचे असल्याने, वेगवेगळया डब्यांच्या संचनेकरीता कमाल आस भार १५ टन विहीत करण्यात आला. यशस्वी निविदाकारास लागू असलेल्या आसभारानुसार गाईडवेचे संकल्पन करण्यात आले. एलटीएसईच्या चलडब्यांचा आसभार १५ टनांपेक्षा कमी असल्याने गाईइडवे चे संकल्पन १५ टनाचे करण्याचा प्रश्न न उदभवल्याने एलटीएसई च्या भविष्यातील ६ डब्यांचे करण्यात आले ६ डब्यांच्या गाडी करीता ११.७२ टन आसभार विचारात घेऊन गाईडवे चे संकल्पन करण्यात आले. १५ टन आसभाराच्या मर्यादेत वेगळया आसभाराच्या चलडब्यांचे (उदा. हिताची गाड्याचा आसभार १५ टन) अन्य उत्पादकास कंत्राट दिले असते तर त्यासाठी गाईडवे चे संकल्पन केले असते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध उत्पादकांना स्पर्धेत उतरवण्याकरिता १५ टनांची मर्यादा विहित करण्यात आली होती. यास्तव कंत्राट शर्तीचा भंग झालेला नाही.

तद्नंतर उत्पादन केलेल्या सुधारित नमुना गाडीच्या शेवटच्या डब्यांच्या आसभार १३.२७ टन व मधल्या डब्यांच्या आसभार १२.९५ टन होता.

बांधकाम पूर्ण केलेल्या गाईडवेच्या संकल्पनांची शेवटच्या डब्यांच्या आसभार १३.२७ टन व मधल्या डब्यांचा आसभार १२.९५ टन ऐवजी ६ डफ्र्यांच्या गाडीसाठी सर्व डब्यांच्या १३.२७ टन आसभारास चाचणी घेण्यात आली. अशा पद्धतीने जास्तीच्या भारासाठी चाचणी घेतल्यानंतर बांधकाम पूर्ण झालेल्या संचनेवरील ताण अनुज्ञेय मर्यादेत आढळून आला.

एलटीएसईने German consultant K + S Consult GmbH & Co (K+S) मार्फत देखील वाढीव आसभारासाठी संरचनेची चाचणी करून घेतली व त्यामध्ये ताण अनुज्ञेय मर्यादेत असल्याचे आढळून आले. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने स्वतंत्र रित्या वाढीव आसभारासाठी संरचनेची चाचणी केली आणि त्यामध्ये ताण अनुज्ञेय मर्यादेत असल्याची पुष्टी केली. या चाचणीमध्ये वेगवेगळया ८७ नमुन्यांपैकी सर्वात वाईट परिस्थितीकरिता वेगवेगळया १३ फ्रेमचे नमुने (१४ %) IS २५०० - Part II, १९६५ कोड प्रमाणे निवड करण्यात आली.

याशिवाय आयआयटी मुंबई मार्फत शास्त्रीय साधना (Instrumentation) व्दारे चाचणी करण्यात आली असता त्यामध्ये चलनशक्ती विषयक भार, ताण आणि विचलन हे अनुज्ञेय मर्यादेत असल्याचे आढळून आले.

या व्यतिरिक्त गाईडवे बिमची तपासणी वेळोवेळी करण्याबाबत वेळापत्रक निश्चित करण्यात आली आहे.

डेपो इमारत भुकंपरोधक संकल्प चित्रांशी सुसंगत नसणे :-

वडाळा येथील मोनोरेल डेपोमध्ये कार्यचालन आणि नियंत्रण केंद्र, कार्यशाळा, चलसंच वाहनांसाठीचे प्रांगण, प्रशासकीय इमारत, चलसंचवाहन स्वच्छतेसाठी जलवाहिनी आदिंची व्यवस्था आहे. मोनोरेल कंत्राटाच्या दस्तऐवजात सन १८९३ च्या भारतीय मानकांप्रमाणे नागरी बांधकामांचे भूकंप रोधक संकल्प चित्रांचे निकष नमूद केले होते. या मानकांप्रमाणे सर्व महत्वांच्या सेवा आणि समुह इमारती आणि आपत्कालीन सिद्धतेसंबंधीच्या इमारती १.५ इतका महत्व गुणक (संरचनेच्या कार्यकारी वापरावर आधारित भूकंपबल निर्धारीत करण्यासाठी वापरण्यात येणारा हा एक गुणक आहे ज्याचे कार्य बंद पडल्यास होणारे धोकादायक परिणाम, भूकंपानंतरंची कार्यरत गरज, कालातील मुल्य किंवा आर्थिक महत्व या लक्षाणांद्वारे तो दर्शविला जातो.) (IF) घेऊन संकल्पित करावयास पाहिजेत.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, LTSE ने सुरूवातीला १.० चे IF वापरुन डेपोच्या इमारतीचे बांधकाम केले जे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिल्यानंतर सुधारून १.५ केले गेले. परंतु, या वेळेपर्यंत डेपो इमारतीच्या पाईल्सचे ७० टक्के काम पूर्ण झाले होते. तक्ता ३.१.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे LTSE ने डेपो इमारतीच्या संकल्पचित्रांतील सुधारणेद्वारे डेपो इमारतीचा भार विविध पद्धतीने कमी करून १ चा महत्व गुणक १.५ असा दुरुस्त केला.

तक्ता ३.१.१ डेपो इमारतीमधील कमी केलेला भार

अंतर्गत भिंतीची जाडी २३० मी.मी. वरुन १५० मीमी कमी केली.

भूकंप विश्लेषण करतांना पूर्ण भरलेल्या गाडी ऐवजी फक्त रिकाम्या गाडीचे वजन विचारात घेतले.

मार्गदर्शक पथाच्या तुळईचा आकार ८०० मीमी × २२०० मीमी वरून कमी करून ८०० मीमी × १६०० मीमी एवढा केला.

प्रसाधनगृहाचे भरण हे विटांच्या तुकड्यांऐवजी राखेचे / फुफाट्याचे (हलक्या फुफाट्याचा / राखेचा उपयोग हा इमारतीमधील रिकाम्या जागा, व्हरांडा, प्रसाधनगृहांचे डेक, छपरावरचे बगीचे आणि इतर भरणा करावयाच्या जागांमध्ये केला जातो.) केले.

वाहनतळ क्षेत्राचा प्रत्यक्ष भार प्रति चौरस मीटर १००० किलो वरुन ५०० किलो इतका कमी केला.

या अगोदर संपूर्ण चलमार्गावर जडवाहन भारयुक्त असता भूकंप घडताना निर्माण होणारी भूकंपीय वस्तुमानाची निर्मिती विचारात घेतली होती जी नंतर कमी केली.

जेव्हा गाडीचे वजन विचारात घेतले तेव्हा पदछापाच्या प्रत्यक्ष भारात वजावट केली.

अशारितीने, भूकंपीय भार कमी करून डेपो इमारतीत इच्छित IF साध्य केला गेला.

MMRDA ने असे नमूद केले की, डेपो इमारतीचे संकल्पचित्रण करताना झोन चारचा (जास्त हानी होणारा झोन) भूकंपीय भार विचारात घेतला होता तर, मुंबईचा समावेश झोन ३ मध्ये होतो. महत्व गुणक १.० असलेल्या झोन चारच्या बांधकामाचे संकल्पचित्रण हे महत्व गुणक १.५ असलेल्या झोन तीनच्या बांधकामाच्या संकल्प चित्राच्या समतुल्य असते.

हे उत्तर स्विकारार्ह नाही कारण कंत्राटातील तरतुदीनुसार डेपो इमारतीचे संकल्पचित्रण हे झोन चारच्या तीव्रतेचे पाहिजे जेणेकरून बांधकामाच्या टिकाऊपणासाठी आवश्यक संकल्पचित्रण (संरचनेचे संकल्प चित्रण म्हणजे असा कालावधी ज्यामध्ये, संरचनेची तपासणी आणि देखरेख ही विहित पद्धतीनुसार केल्यास कार्याचा हेतू पूर्ण होईल.) साध्य होईल म्हणून प्रारंभापासूनच झोन चारच्या भाराकरता महत्त्वाचा गुणक म्हणून १.५ विचारात घ्यावयास पाहिजे होता.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागने दिलेल्या सष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मसुदा परिच्छेदास या अगोदर दिलेल्या उत्तरास अनुसरुन, आयआयटी मुंबई कडून तांत्रिक मत मागविण्यात आले. त्यांचे तांत्रिक मत जोडपत्र -१ म्हणून सोबत जोडले आहे. आयआयटी मुंबई यांनी असे निश्चित केले आहे की, झोन ४ मधील महत्व घटक १.०० (IF) समजून केलेली संरचना ही झोन ३ मध्ये महत्वघटक १.५ (IF) समजून केलेली संरचना समतुल्य आहे. येथे असेही नमुद करण्यात येते की, झोन ३ मध्ये महत्वघटक १.५ समजून डेपोची इमारत व सुविधा यांची केलेली संरचना भुकंपाचा विचार करता खुप संरक्षित आहे. मोनोरेल डेपो इमारत, गृह निर्माण ऑपरेशन, नियंत्रन केंद्र, इमारतीचा आवार आणि प्रशासकीय इमारत हे झोन ३ मध्ये जरी येत असले तरी प्रत्यक्षात सदर गोष्टींची संरचना ही, झोन ४ मध्ये महत्व घटक १.५ समजून केलेली असून ती करारनाम्यातील कत्रांतटदारातील तरतुदीनुसार आहे.

यावरून असे निर्देशनास येते की, अपेक्षित समतुल्य भूकंप बलाकरिता मोनोरेल कार डेपो तसेच सुविधा इमारतींचे संकल्पनेत भूकंप प्रवाह झोन ४ अति महत्व घटक १.५ आणि भूकंप प्रवाह भर वापरुन भूकंप प्रवाह संरचनेकरिता नमुद करण्यात आलेली पातळी ही, कार डेपोकरिता IS : १८९३ Part १ (२००२) च्या अनुसारच्या शिफारशींची पूर्तता करणारी आहे.

"मार्गदर्शी पथाच्या तुळईजोडांचे काम मानांकनाप्रमाणे नसणे"

कोणत्याही भागातील सुरूवातीपासून शेवटापर्यंत जोडणाऱ्या संपूर्ण पथदर्शी मार्गाची तुळई भारतीय लोहमार्ग मानांकन संधानक सेतू संहिता (IRS CBC), १९९७ प्रमाणे असण्याबाबत कंत्राट दस्तऐवजात नमूद केले होते. IRS CBC प्रमाणे, तुळयांमधील ५० टक्क्यांपेक्षा अधिक बळकट आणणारे कांब (एक सामायिक स्टीलची कांब जी कॉंक्रीटला संकोचन अवस्थेत धरुन ठेवते) हे जोडखिळयांनी सांधायचे नाहीत. लेखापरिक्षणात असे आढळून आले की, LTSE ने प्रकल्पांतील वडाळा आणि भक्तीपार्क दरम्यान प्रथम टप्प्यात ११ तुळयांमधील अधिक बळकटी असलेले कांब जोडणी काम १०० टक्के जोड खिळयांनी केले. भूकंप प्रवण क्षेत्र ४ साठी आवश्यक लवचिकता अशा व्यवस्थेमुळे, जोड कडक झाल्याने कमी होऊ शकेल या पार्श्वभूमीवर सर्व ११ तुळया प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी प्रारंभी फेटाळल्या (मार्च, २०१०). परंतु PMC च्या शिफारशीवरुन (जून, २०१०), MMRDA ने अपवाद म्हणून बदल मान्य केला आणि LTSE वर दंड आकारला नाही.

MMRDA ने असे नमूद केले की, या प्रकरणांत IRS CBC संहिता लागू नसल्यामुळे त्याच्या तरतुदीचे उल्लंघन झाले नव्हते आणि असेही सांगितले की, स्वीकृत केलेल्या तुळया सुरारात आढळून आल्या होत्या, म्हणून LTSE वर दंड आकारला गेला नव्हता.

हे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण, जर तुळयांमध्ये फरक राहिला नसता तर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी पहिल्याच वेळी तुळया नाकारल्या नसत्या.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या सष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

कॉंक्रिट ब्रीजच्या IRS कोड मधील तरतूद ही केवळ Splicing मधील सळया जेव्हा bending movement ताण घेतात त्यासाठी

लागू आहे. पूर्व ताण घेत असणारे कॉंक्रिटचे भाग हे HTS असतात व त्यामुळे ही तरतूद लागू होत नाही. पूर्व भार असणाऱ्या हया तुळया या खांबावर जोडलेल्या असतात. पूर्व भारित मुख्य HTS सळया यामध्ये असलेल्या जोडासह सर्व भार घेतात. भार रहीत लोंखडी सळया या अशा सांध्यासाठी भेगा नियंत्रण ठेवण्याचे दुय्यम काम करीत असतात. भेगा नियंत्रणाचे कार्य हे कॉंक्रिट चे आकारमाण कमी होणे तसेच तापमानामधील बदल यासाठी असते व म्हणून वरील कलम येथे लागू हेात नाही म्हणून स्वीकृत केलेल्या तुळया, कोडल तरतुदींचे उल्लंघन करीत नाहीत. सुरूवातीला जरी सल्लागारांनी या तुळया नापंसत केल्या होत्या तरी नंतर तुळयांच्या सुरक्षिततेमध्ये काही अंतर पडत नाही असे निदर्शेनास आल्याने या तुळया वापरायोग्य आहेत असे त्यांनी सांगितले. परंतु, एक चांगली अभियांत्रिकी जरुरी म्हणून स्टॅगर्ड फॉर्ममध्ये कपलर्स लावण्याचे सुचिवले व त्या जोडांना भुकंपामध्ये एकत्र ठेवण्यासाठी विनामुल्य Strriup लावण्याचे सांगितले. या तुळयामधील ताण योग्य असल्याने व त्या पूर्णतः योग्य असल्याने त्या स्वीकारल्या गेल्या. या संदर्भात IIT मुंबईचे मत मागिवले होते ते परिशिष्ट - १ म्हणून जोडले आहे.

त्यांच्या निषकर्षानुसार कपलर्सची लांबी मुख्य सळयांच्या तुलनेने नगन्य असल्याने त्यांच्या वापरामुळे Ductility मध्ये काहीही फरक पडत नाही. यावरुन असे दिसून येते की, IRS कोडचे उल्लंघन झालेले नाही. तसेच या तुळया पूर्णतः योग्य आहेत त्यामुळे कोणताही दंड आकारणे जरुर नाही.

पथदर्शी मार्गाचे विस्तारजोड कंत्राटात विनिर्दिष्ट केलेल्या संकल्पचित्राच्या विपरीत असणे

पथदर्शी मार्गामध्ये तापमानातील बदलामुळे होणाऱ्या औष्णिक प्रसरणासाठी प्रसरणजोडांची (EJs) तरतूद केलेली असते. चलसंच वाहन प्रसरण जोडांवरुन ओलांडून जाताना पडणारा चिक्रीय भार आणि पट्टयांचा संकल्पिय कालावधी यावर पट्टयांची जाडी अवलंबून असते. हर्क्युलस इंजिनियरींग ऑफ मलेशिया यांनी मोनोरेलच्या EJs चे संकल्पचित्र तयार केले होते.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, LTSE ने दोन्ही टप्प्यांत हर्क्युलसने दिलेल्या संकल्पचित्राशी तुलना करता ५१४ कमी जाडीच्या (वरच्या पट्टीसाठी ७५ मीमी पासून ते ६० मीमीपर्यंत, बाजुच्या पट्टीसाठी ६० मीमी पासून ४५ मीमी पर्यंत) EJs बसविल्या होत्या ज्याकरिता PMC/MMRDA कडून पूर्व स्वीकृत प्राप्त केली होती. या ५१४ कमी जाडीच्या EJs चा सेवा कालावधी हा कंत्राटात नमूद केलेल्या ५० वर्षांऐवजी २० वर्षांचाच होता. या बदलासाठी PMC/MMRDA कडून मंजुरी प्राप्त करतांना LTSE ने असे मत व्यक्त केले की तीन मिनिटांऐवजी चार मिनिटांचा अवकाश (एकाच दिशेने जाणाऱ्या दोन चलसंच वाहनांमधील वाहतुकीचा वेळ) केल्यास प्रतिदिन ओलांडून जाणाऱ्या चलसंच वाहनांची संख्या ४०० वरुन ३०० इतकी कमी होती. हे मत अखेर PMC/MMRDA ने स्वीकारले. परंतु, या कृतीमुळे संकल्पचित्रात दाखविल्याप्रमाणे मोनोरेल प्रणालीमध्ये तीन मिनिटांचा अवकाश आणि ४०० ओलांडून जाणारी चलसंच वाहने जाणार होती हा आधार घेऊन प्रसरण जोड संकल्प चित्र करून बसविण्याच्या कंत्राट शर्तीचे उल्लंघन झाले.

MMRDA ने असे नमूद केले की EJs ची कमी केलेली जाडी तीन मिनिटांच्या अवकाशाकरता पर्याप्त आहे कारण प्रत्यया चलसंच वाहनाचा असाभार १३.२७ टन असताना हर्क्युलस यांनी पट्टयांचे संकल्पचित्र १६.५ टन आस भाराकरता बनविले होते.

हे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण, हर्क्युलसने EJs च्या संकल्पचित्रासाठी ब्रिटीश परिमाणे ५४०० चा अवलंब केला होता जेथे परिमाणांच्या २५ टक्के अधिक गुणक विचारात घेतला होता. त्यानुसार हर्क्युलसने, फक्त १३.२७ टन आस भारारीता EJs चे संकल्पचित्रण केले होते आणि परिमाणांच्या २५ टक्के अधिक गुणक विचारात घेतल्यानंतर १६.५८ टन (१३.२७ टन अ २५ टक्के) आसभार निश्चित करण्यात आला होता. यास्तव तीन मिनिटांच्या अवकाश कालावधीला मदत होईल असे अंदाजे ७५ मीमी /६० मीमी जाडीचे EJs आणि ५० वर्षे सेवा कालावधी याची सुनिश्चिती PMC/MMRDA ने करायला हवी होती.

अशाप्रकारे, पट्टयांची जाडी कमी करण्यातील दिलेल्या तांत्रिक सवलतीमुळे LTSE ला अवाजवी आर्थिक लाभ झाला, जो अजून निर्धारित करायचा होता आणि परिणामतः MMRDA ला, कंत्राटात जे ठरविले होते ते मिळाले नव्हते. EJs च्या कमी केलेल्या सेवा-कालावधी बरोबर तीन मिनिटे अवकाशाने दररोज ४०० चलसंचांच्या वाहतुकीमुळे क्कऽ ची लवकर झीज होईल आणि भविष्यात MMRDA ला अधिक आर्थिक भार सहन करावा लागेल.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

RFP प्रमाणे यातायात ३ मिनिटांच्या हेडवेने बनविने अपेक्षित होते. या प्रकल्पांमध्ये वापरलेली जी साधने पूर्णतः बदलली जाऊ शकतात त्यांचे आयुष्य २० वर्ष इतके असणे अपेक्षित आहे. वरीची पट्टी ज्यावेळी वाहतूक बंद असते तेव्हा तो पूर्ण सांधा न काढता बदलता येऊ शकते. ३ मिनिटांचा हेडवे हा गर्दीच्या वेळी असतो अशा ३ मिनिटांच्या हेडवेने १९ तास गाडया चालत नाहीत. ३ मिनिटांच्या अंतराने चालणाऱ्या गाडया गर्दी नसते त्यावेळी आणखी जास्त अंतराने चालतात व अशा जास्त अंतराने चालणारा अवधी जवळ जवळ १० तास आहे. तरी सुद्धा गाडया

३ मिनिटांच्या अंतराने १९ तास चालतात असे गृहीत धरले आहे. वरच्या प्लेटची संरचना ही सर्व प्लेटपेक्षा जास्त महत्वाची आहेत आणि म्हणून या प्लेटचे डिझाईन अतिशय काळजीपूर्वक तपासलेले आहेत. असे operation वास्तवात येणारे नसले तरी (अ) ३ मिनिटांच्या अंतराने ६ डब्यांची गाडी १९ तास व (ब) या पट्टीचे आयुष्य २० वर्ष समजले आहे.

३ मिनिटांच्या अंतराने जर १९ तास गाडया चालत असल्यास २० वर्षात ६ डब्यांच्या गाडीचा ३३ दशलक्ष सायकल्स होतील. पूर्वीचे व नवीन डिझाईन कंत्राटदाराने दिलेले आहेत वर सांगितल्याप्रमाणे ६० एम.एम. ची वरीची पट्टी ३ मिनिटांनी चालणाऱ्या ६ डब्यांच्या गाडीसाठी १९ तास सेवा दिली तर ३३ दशलक्ष सायकल्ससाठी योग्य ठरते. त्यामुळे कत्रांटदाराकडून काहीही देणे लागत नाही.

अपुरी संकर्षण प्रणाली

चलसंच वाहन धावण्यासाठी विद्युत संकर्षण यंत्रणा वीजेचा पुरवठा करते. कंत्राटातील अटींनुसार तीन मिनीटांच्या अवकशाने धावेल असे संकर्षण प्रणालीसह मोनोरेल यंत्रणेचे संकल्पन असावे. तसेच, सामान्य विद्युत भाराशिवाय, असाधारण परिस्थितीमध्ये जेव्हा विद्युतभार १५० टक्के, ३०० टक्के आणि ४५० टक्के अधिक होतो तेव्हा अनुक्रमे दोन तास, एक मिनीट आणि १५ सेकंद एवढी संच क्षमता असलेला संकर्षण दिष्टकारी उपकरण संच बसवायला हवा.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, कंत्राटातील तरतूदींच्या उलट, मोनोरेलची संकर्षण यंत्रणा (ट्रॅक्शन सिस्टीम) ही ४.५ मिनीटांच्या अवकाशनंतर धावण्यासाठी संकल्पित केली होती. परिणामी, जेव्हा तीन मिनीटांच्या अंतराने सेवा देण्यात येईल त्यावेळी संकर्षण यंत्रणा तो भार सहन करु शकणार नाही . तसेच संकर्षण दिष्टकारी उपकरण संचाची, तो १५ सेकंदात ४५० टक्क्यांपर्यत कठीण स्थितीतील अतिरिक्त चक्रभार सहन करेल अथवा नाही याची चाचणी केली नव्हती, परिणामी, MMRDA अधिक विद्युतभाराच्या गर्भित परिणामांबद्दल अनभिज्ञ होते. तसेच, या बदलामुळे LTSE ला होणारा संचित बचतीचा वाटा MMRDA ने निर्धारित केला नव्हता.

MMRDA ने वास्तविकता मान्य करत असे सांगितले की, तीन मिनिटाच्या अंतराने गाड्या धावण्यासाठी आवश्यक असलेल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी संकर्षण यंत्रणेची भविष्यात श्रेणीवाढ केली जाईल. MMRDA ने पुढे असेही नमूद केले की आंतरराष्ट्रीय मानांकनात १५ सेकंदांसाठी ४५० टक्क्यांपर्यंतचा अतिरिक्त चक्रभार अनुसरला जात नाही.

हे उत्तर स्विकारार्ह नाही कारण (अ) कंत्राटातील अटींनुसार, तीन मिनिटांच्या अवकाशाने धावण्यासाठी संकर्षण यंत्रणा तयार केली नव्हती. तसेच, प्रणालीच्या श्रेणीवाढीमुळे MMRDA ला अधिक आर्थिक भार सहन करणे भाग पडेल आणि (ब) कंत्राट बहाल करण्याआधी झालेल्या बैठकीत निविदाकाराने उपस्थित केलेल्या शेऱ्यांच्या स्पष्टीकरणांत, MMRDA ने नि:संदिग्धपणे असे सांगितले होते की, ४५० टक्के अतिरिक्त भार क्षमता ही वास्तविक आवश्यकता असून ती बदलू शकत नाही आणि ती अट निविदेमध्ये कायम राहील.

ज्ञापन

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

ही योजना सन २०२१ पर्यंत ४.५ मिनिटांच्या हेडवेसाठी बनविलेली आहे. कत्रांटदार सन २०२१ पर्यंतच्या मागणीसाठी बांधिल आहे. ही प्रणाली २०४१ ला उपयुक्त ठरेल अशी बनविण्यासाठी योग्यवेळ हवी. त्यानुसार, २०२१ ला योग्य ठरेल अशी प्रणाली कंत्राटदाराने बनविलेली आहे. ही प्रणाली नंतरच्या काळात ३ मिनिटांच्या अंतरांने गाडया चालण्यासाठी योग्य होईल अशी बनविलेली आहे. बनविलेली प्रणाली RFP याच्याशी सुसंगत अशी आहे.

ही प्रणाली ३ मिनिटांसाठी योग्य बनविण्याची कंत्राटदाराची जबाबदारी नव्हती. त्यामुळे ही प्रणाली ३ मिनिटांच्या हेडवे साठी योग्य बनिविण्यासाठी या प्रणालीमध्ये भर टाकावी लागेल.

ही प्रणाली भविष्यात ३ मिनिटांचा हेडवे योग्य बनविणे व तशी ती भविष्यात करणे योग्य असणे ही RFP मध्ये लिहील्याप्रमाणे जरुरी आहे. परंतु, सन २०२१ साठी ही प्रणाली ४.५ मिनिटांच्या हेडवे साठी बनविणे पुरेशे होते.

३ मिनिटांच्या हेववेसाठी प्रणालीमध्ये आणखी बरेच बदल करावे लागतील व त्याचबरोबर आणखी गाडया ही घ्याव्या लागतील. ही गोष्ट लक्षात घेता प्रणाली योग्य प्रकारे बनविली गेली आहे असे दिसून येईल.

(ब) विद्युत उपकरणाची क्षमता त्यामध्ये निर्माण होणाऱ्या क्षमतेवरुन ठरविली जाते पुढे दिलेल्या आकडेवारीने असे दिसून येईल की, १५ सेकंदामध्ये ४५० % लोड असल्यास जी उष्णता निर्माण होईल ती १५०% लोड २ तास ठेवल्यास त्यापेक्षा कमी होईल. ट्रॉन्स्फॉर्मरवर १५० % भार २ तास दिला होता. त्यामुळे हे डिझाईन योग्य आहे असा निष्कर्ष काढता येतो.

उष्णता निर्माण होणारे सूत्र I*I *R*T असे आहे.

या मध्ये I म्हणजे विजेचा प्रवाह, R म्हणजे विद्युत विरोध व T म्हणजे सेकंदामध्ये वेळ होय.

१५०% प्रवाह म्हणजे नेहमीच्या पेक्षा दीडपट प्रवाह होय त्याचप्रमाणे ३००% प्रवाह म्हणजे तिप्पट व ४५०% म्हणजे साडेचार पट होय. खाली उष्णता किती निर्माण होऊ शकेल ते दर्शविलेली आहे.

१. १५०% अधिभार दोन तासांसाठी निर्माण होणारी उष्णता (१.५)*(१.५) *I*I*r*T* 3600= 16200 *I*I*r

२. (३)*(३)* I*I*r* 60= 540 *I*I*r*

३०० % एक मिनिटासाठी

(३) ४५०% १५ सेकंदासाठी = (४.५)*(४.५) *I*I*r = 303.75 *I*I*r

या वरुन असे दिसून येते की, दोन तास १५० % अधिभार असणाऱ्यांवर निर्माण होणारी उष्णता ही १५ सेकंदात निर्माण होणाऱ्या उष्णतेपेक्षा किती तरी कमी आहे. म्हणून, तांत्रिकदृष्टया या दोन्ही गोष्टी योग्य आहेत.

प्री-बीड मिटींग मधिल संदर्भ हा बऱ्याच बाबतीत एकत्रित करून केलेला आहे फक्त ४५०% भारासंदर्भात नाहीत.

टिकाऊपणातील अडचणी

मोनोरेलच्या कंत्राटानुसार, सर्व स्थापत्य बांधकामे ही १२० वर्ष टिकतील अशी संकल्पित करायची होती. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, कंत्राटातील अटींनुसार, स्थापत्य बांधकामाच्या टिकाऊपणाशी संबंधीत कामे LTSE ने पार पाडली नव्हती, त्याबद्दल खालील परिच्छेदांमध्ये चर्चा केली आहे.

काजळी प्रतिबंधक रंग लावला गेला नाही :-

कंत्राटात अति प्रतिकुल हवामानाच्या स्थितीत संधानक बांधकामाकरता संरराक रंगाचा थर लावण्याची तरतूद होती. मुंबईत ही प्रतिकुलता अधिकच तीव्र आहे कारण, प्रदुषणामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डाय-ऑक्साइडचे उत्सर्जन होत असल्यामुळे बळकटी आणणाऱ्या कांबांची गंजून झिज होते. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, जरी पहिल्या टप्प्याची सुरूवात ही फेब्रुवारी, २०१४ पासून झाली होती तरी, LTSE ने संरराक थर (काजळी प्रतिबंधक करणारा रंग) लावला नव्हता (नोव्हेबर, २०१४).

MMRDA ने असे नमूद केले की, LTSE ने काजळी प्रतिबंधक रंग न लावल्याने सुरूवातीला पैशाचे प्रदान रोखून ठेवले होते, परंतु, LTSE ने काजळी प्रतिबंधक रंग लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर ते मुक्त केले. MMRDA ने पुढे असेही सांगितले की, संधानकाच्या पृष्ठभागावर संरक्षक थर लवकरच लावला जाईल.

ज्ञापन

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

टिकाऊपणातील अडचणी

गाईडवे बीम structure च्या वर प्रतीबंधक लेप लावण्याचे काम केले जाईल. हा लेप योग्य रंगाचा व योग्य दर्जाचा असेल एमएमआरडीएने या संदर्भात योग्य कारवाई करण्याचा हक्क राखून ठेवला आहे.

गंज प्रतिबंधक उपाययोजना अयोग्य रितीने करणे :-

LTSE ने कंत्राटात तरतूद असतांनाही मार्च, २०११ पर्यंत, बळकटी आणणाऱ्या कांबातील स्टील, सैंड ब्लास्टींगने स्वच्छ न करता गंज प्रतिबंधक उपाययोजनांचे (ACT) काम केले होते. परिणामी, MMRDA ने मे, २०११ पर्यंत LTSE ला दिलेल्या चालू देयकातून रु. ६.४२ कोटी कापून घेतले होते. तथापि, १,०४६ पाईल्स, २८६ पियर कॅप्स आणि २७१ खांबांचे बांधकाम योग्य गंजप्रतिबंधक उपाय न करताच करण्यात आले होते, ज्याचा काहीही उपाय होऊ शकत नाही.

ज्ञापन

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

काही बांधकाम गंज प्रतिबंधक उपाय योजनेनुसार करण्यात आले नव्हते, हे खरे आहे यासाठी कत्रांटदाराच्या देयकामधून दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आली आहे. परंतु, इतर कारणांमुळे काँक्रीटी क्षमता अधिक चांगली असून विहित प्रमाणापेक्षा पाणी कमी प्रमाणात जिरवते. शिवाय यासदंर्भात RCPT चाचण्या देखील घेण्यात आल्या असून त्यांच्या अहवालानुसार क्लोराईड आयर्नची आकलनक्षमता कमी आहे आणि इमारतीचा ढाचा मजबूत असून समाधानकारक आहे.

पथदर्शी मार्गाच्या बांधकामास मानांकित पद्धती वापरली नाही

मोनोरेलचा पथदर्शी मार्गाचा सांगाडा हा पूर्व ओतीव पूर्व दाबयुक्त अशा सलग बांधकामाने संकल्पित करायचा होता. कंत्राटातील प्राथमिक तपशीलात साधे, प्रबलित आणि पूर्व दाबयुक्त संधानक वापर पद्धत IPS, CBC १९९७ अनुसार समाविष्ट केली होती जी सर्वसामान्य पुलांच्या बांधकामात वापरली जाते. प्रबलित आणि पूर्व दाबयुक्त संधानकाच्या कामासाठी IPS, CBC १९९७ अनुसार, पोर्टलंड पोझोलेन सिमेंट (PPC) वापरु नये. ज्या ठिकाणी सांगाड्याच्या बळकटीकरणासाठी प्रबलित संधानक वापरलेले नसते किंवा केवळ तापमानामुळे होणाऱ्या बदलासाठी वापरले असते अशा ठिकाणी दमटपणा जाऊन संधानक कोरडे होण्यासाठी किमान १४ दिवस दिले आहेत, त्याचबरोबर किमान ७५ टक्के संकल्पिय बळकटी येण्याकरता तात्पुरता सांगाडा (तात्पुरत्या स्वरुपाच्या संरचनेची अशी पूर्ण प्रणाली जी नवीन संधानकांना आवश्यक त्या आकारात आणि मोजमापात संरचना घडविले आणि संधानक पुरेसे कडक होईपर्यंत आधार देते) काढण्यात आला नाही याची खात्री करावी लागते. तसेच, पूर्व दाबयुक्त संधानक स्थिती, तात्पुरता सांगाडा आणि संधानक कोरडे होण्याकरता आवश्यक काळ हा गरजेनुसार वाढवता येतो.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, नोव्हेंबर, २००८ मध्ये कंत्राट प्रदान केल्यानंतर, LTSE ने पथदर्शी मार्गाच्या बांधकामासाठी आरेखन सादर केले (मार्च २००९) ज्यामध्ये पथदर्शी मार्गाच्या तुळयांसाठी M-६० दर्जाचे काँक्रीट वापरण्याचा निकष होता ज्यास PMC ने मान्यता दिली होती (नोव्हेंबर, २००९). पोर्टलंड पोझोलेन सिमेंट (PPC) म्हणून साधारण पोर्टलंड सिमेंटमध्ये (OPC) फ्लाय ॲश मिसळून पथदर्शी मार्गावरील रचलेल्या बांधकामास संधानक वापरुन सदर काँक्रीट दर्जा आणला गेला ज्यामुळे १९९७ च्या IRS CBC चा भंग झाला. मध्ये रेल्वेच्या प्राधिकाऱ्यांनी फ्लाय ॲश मिश्रित संधानक वापरण्यास परवानगी न दिल्याने LTSE ने M-६० दर्जाचे फ्लाय ॲश नसलेले संधानक मोनोरेल कामातील लोहमार्गाच्या विभागात वापरले होते याची नोंद घेणे समयोचित ठरेल.

LTSE च्या बांधकामाच्या वेळापत्रकानुसार पुढे असेही आढळून आले की, एकापूर्व ओतीव पूर्व प्रबलित पथदर्शी मार्गाच्या सांगाड्याच्या बांधकामाचा चक्रीय कालावधी, जो त्याच्या संधानकीकरण, क्यूरींग आणि पूर्व ओतीव तुळईच्या स्तरावरील प्राथमिक दाबासाठी ६० दिवसांचा होतो तो सात दिवसांचा करण्यात आला होता. जर बांधकामासाठी PPC चा वापर केला असता तर संधानकाच्या क्यूरींगसाठीच हा विहीत कालावधी १४ दिवसांचा होता. तथापि, MMRDA/PMC ने पथदर्शी मार्गाच्या बांधकामात PPC चा वापर करणे व संधानकाचा आणि क्यूरींगचा कालावधी कमी केल्यामुळे होणाऱ्या दीर्घकालीन परिणामांची निर्धारणा केली नव्हती. अशाप्रकारे, पथदर्शी पथाच्या सांगाड्याचा टिकाऊपणा आणि स्थिरता ही चिंतेची बाब आहे.

फेब्रुवारी, २०१५ मध्ये संचालक (मोनोरेल) यांनी सांगितले की, मोनोरेलच्या कंत्राटाच्या आराखड्याच्या विनिर्देशाचे उपवाक्य ३.१.१ म्हणजे कोणत्याही पूर्ववर्तित्त्वाच्या ठराविक क्रमाशिवाय, कंत्राटदाराच्या सर्वसाधारण संदर्भ व मार्गदर्शनासाठी केलेली उपायोजन संहितांची एक निदर्शी सूची होती. पूलांसाठी साधे, प्रतिबलीत व PSC साठी IRS-संहितेचा समावेश सूचीमध्ये नव्हता. लेखापरीक्षण आपोआप आरेखन व लोडींग आवश्यकतांपेक्षा वेगळा व बांधकामाच्या कार्यपद्धतीशी संबंधित होता. संचालक (मोनोरेल) यांनी पुढे सांगितले की, मोनोरेल बांधकामातील रेल्वेच्या भागात फ्लाय श शिवाय OPC चा वापर करण्याची LTSE ला सूचना देण्यात आली होती कारण रेल्वेच्या पद्धतीप्रमाणे मध्य रेल्वेच्या प्राधिकाऱ्यांनी ही पद्धत अनुसरण्याचा आग्रह धरला होता. पथदर्शी तूळयांचे प्रमाण आणि कालमर्यादा लक्षात घेता ६० दिवसांचा चक्रीय कालावधी कमी करून सात दिवसांचा करण्यात आला होता असे संचालक (मोनोरेल) यांनी पुढे सांगितले.

खालील कारणांमुळे संचालक (मोनोरेल) यांनी दिलेले उत्तर खात्रीलायक वाटत नाही.

आराखड्याच्या विनिर्देशामध्ये संदर्भित केलेल्या इतर संहीतांपैकी (IRC, IS, BS) आणि AASHTO) सामान्य पूलांच्या बांधकामासाठी साधे, प्रबलीत व PSC साठी IRC संहीता ही क्रमवारीत अग्रस्थानी होती, आणि म्हणूनच तिचा अवलंब करावयास हवा होता. त्याचप्रमाणे, जर ठराविक संहीतेची निवड व वापर जर ऐच्छीक होता तर आराखड्याच्या विनिर्देशामध्ये प्राधान्याने IRS संहीतेचा समावेश समर्थनीय ठरत नव्हता. तसेच, आरेखन व लोडींग आवश्यकता या बांधकाम कार्यपद्धतीचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्यांचा अलिप्तपणे विचार करता येत नाही.

कामाचा व्याप व काटेकोर कालमर्यादा यांची सांगड घालण्यासाठी बांधकाम कालावधीत ६० दिवसांवरुन सात दिवस इतकी ललाणीय घट केल्यामुळे IRS संहितेचेच उल्लंघन झाले असे नाही तर पथदर्शीमार्गाच्या सांगाड्याच्या बांधकामामध्ये नियोजनात त्रुटी असल्याचेही उघड झाले.

ज्ञापन

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मालक व मालकाचा प्रतिनिधी यांना कोणता कोड वापरायचा हे ठरविण्याची मूभा देण्यात आलेली आहे. हे ठरविताना जर काही बदल होत असेल तर तो फायदेशीर व योग्य असावा. अशा प्रकारची मुभा देणे ही साधारण बाब आहे. OPC च्या तुलनेत PPC क्षमतेमध्ये कमी नाही.

PPC ची क्षमता, न दिसून येणारी क्षमता व टिकाऊपणा हा OPC पेक्षा चांगला आहे. तसेच PPC पर्यावरणाला साधक आहे IS व BS मानके PPC वापरण्यास सहमती दर्शवितात. फ्लायॲश पासून बनविलेल्या PPC साठी IS १४८९ भाग १ हे मानक आहे. या मानकाप्रमाणे परिक्षणासाठी बनविलेल्या कॉक्रिटीच्या चौकोणी ठोकळ्यांची ७ दिवसांमध्ये तयार होणारी क्षमता २८ दिवसात तयार होणाऱ्या क्षमतेच्या ३ ते ५ या प्रमाणात असावी ते प्रमाण दोन्ही प्रकारच्या सिमेंटसाठी सारखेच आहे. IS कोड प्रमाणे Shuttering ७५% क्षमता आल्यावर काढता येऊ शेकते. मोनोरेल मध्ये प्रथमच पूर्व ताण देतानाच २८ दिवसांत ८० % क्षमता मिळत होती. घ्व्क चा दुसरा फायदा म्हणजे, परमीयाबीलीटी मध्ये वाढ, टिकाऊपणामध्ये वाढ, हैड्रोजनची उष्णता कमी करणे की ज्यामुळे पडणाऱ्या फटी कमी पडतात.

रेल्वे मध्ये पोलादी रुळ व पोलादी चाके असतात. या विरुद्ध मोनोरेलची चाके रबरी असतात व ती कॉंक्रीटच्या तुळ्यावर धावतात. IRS कोड रेल्वे साठी लागू आहे. मोनो आणि रेल्वे मध्ये हा मुलभूत फरक असल्याने हा कोड मोनोसाठी लागू होत नाही. परंतु, रेल्वे OPC सिमेंट वापरते. त्यामुळे मध्य रेल्वेने रेल्वे ओलांडण्याच्या ठिकाणी मानोरेल साठी OPC वापरण्याचा आग्रह धरला. दोन स्पॅन OPC ५३ वापरण्याचे सांगितले. OPC ५३ पेक्षा PPC जास्त मजबूत व टिकाऊ आहे असे रेल्वेने अद्यापि मान्य केलेले नाही. त्यामुळे रेल्वे ओलांडताना OPC ५३ चा वापर करावा लागला. प्रि-कास्टींक ची सायकल ठरविताना बऱ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो जसे की बांधकामाची वेळापत्रके, क्युरिंगची पद्धत, पहिल्या स्तरावर प्रिस्ट्रेसींगची असलेली आवश्यकता क्षमता व अखडल्यामुळे, क्रिपमुळे, स्थिती स्थापकत्वामुळे इत्यादिमुळे होणारी क्षमतेमधील होणारी घट. इत्यादि या सर्व गोष्टी विचारात घेतल्या जातात. तेव्हा तांत्रिक दृष्ट्या डिझाइन स्विकारण्यायोग्य असते. सायकलचा अवधि साधारणपणे ७ दिवसापासून १४ दिवस पर्यंत ठेवला जातो. त्यामुळे साचा व इतर उपकरणाचा योग्य प्रकारे उपयोग होऊ शकतो. ७ दिवसांचा अवधी कामाचे वेळापत्रक व एकूण असलेले काम याचा विचार करून ठरविले गेले होते. परंतु, हे करताना क्षमतेमध्ये कमतरता पडून न देण्याची काळजी घेतली होती. कराराच्या दृष्टीने सायकलच्या अवधिपेक्षा कॉंक्रिटची योग्यता महत्वाची होती. कॉंक्रिट च्या गुणवत्तेमध्ये व त्याच्या टिकाऊपणाच्या दृष्टीने कोठेही तडजोड केलेली नाही.

खालच्या स्तरावरील मातीत क्लोराईडचे प्रमाण जास्त असणे :—

मातीत असलेल्या क्लोराइडमुळे कॉंक्रीट बांधकामातील बळकटी आणणाऱ्या कांबांना गंज चढतो. बांधकामाच्या कार्यकाळात बळकटी आणणाऱ्या कांबांपर्यंत क्लोराईडचा प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलायला हवीत. ' अहवाल क्र. BS-१४, जानेवारी, २००१ - कॉंक्रीट बांधकामाचा टिकाऊपण ' हे या संबंधातील भारत सरकार, रेल्वे मंत्रालयाचे प्रकाशन असून ते समुद्र किनाऱ्यापासून एक कि.मी. च्या आत असलेल्या स्थापत्य बांधकामाच्या विविध आच्छादनाच्या (मजबुती आणणाऱ्या कांबावर आच्छादलेली संधानकाची जाडी (मी.मी मध्ये)) आणि संकल्पचित्राच्या कालावधीसाठी वापरण्याच्या संधानक बळकटीची शिफारस करते ते या कंत्राटात संदर्भित केले आहे. १२० वर्षांसाठीचे स्थापत्य बांधकाम आणि ७५ मीमी आच्छादनासाठी हा अहवाल न्यूनतम M-५० ही संधानक मजबुती विहित (अहवालात चित्रीत केलेल्या क्लोराईड पेनिट्रेशन कर्व्हजनुसार) करतो.

LTSE ने MMRDA ला सादर केलेल्या (जानेवारी, २०११) मृद सर्वेक्षण अहवालात मोनोरेलच्या ३१ पैकी २२ ठिकाणातील एका भागात (पहिल्या टप्प्यातील वडाळा डेपो ते भक्ती पार्क पर्यंत) जो भाग माहूल खाडी आणि लगतच्या वडाळा मिठागाराच्या एक किलोमीटरच्या परिसरात आहे तेथे २०,०५० ते ८९,००० भाग प्रति दशलला (PPM) इतक्या मात्रेत क्लोराईड असल्याचे निर्देशीत केले होते. या ठिकाणी सापडलेली क्लोराईडची मात्रा समुद्राच्या पाण्यातील १९,४०० PPM क्लोराईडपेक्षा ललाणीयरित्या जास्त होती. तथापि, लेखापरीक्षणात असे आढळून आले की, वडाळा डेपो ते भक्ती पार्क स्टेशन (१.७७३ कि.मी. लांबीचे) ह्या अंतरातील पथदर्शी मार्गाच्या सांगाड्यांच्या पायामधील खांबांचे बांधकाम, ७५ मीमी आच्छादनाच्या M-५० कॉंक्रीट बलाऐवजी ७५ मिमी आच्छादनाच्या M-३५ कॉंक्रीट बलाने केले होते.

MMRDA ने असे सांगितले की, हा प्रकल्प सुरू करतांना, १२० वर्षांच्या संकल्पन आणि बांधकामाच्या टिकाऊपणासाठी IRS, IRC, IS किंवा राष्ट्रीय इमारत संहितेसह इतर कोणत्याही संहितेते / मानकात परिमाणांची कोणती मानके स्विकारावीत याबद्दल कोणतीही तरतूद नव्हती. तसेच, संदर्भित कंत्राटात, ' अहवाल क्र. BS-१४, जानेवारी, २००१ - कॉंक्रीट बांधकामाचा टिकाऊपणा ' यामधील तरतूदी बंधनकारक नव्हत्या. MMRDA ने पुढे असेही सांगितले की, सगळ्या पाईल्स आणि पाईल कॅप्स चे बांधकाम OPC बरोबर फ्लाय ॲश मिसळून केल्यामुळे ते PPC सारखे झाल्यामुळे व M-३५ द्वारे संकल्पिय सांगाड्याच्या गरजा पूर्ण होत असल्याने M-५० वापरणे गरजेचे नाही.

हे उत्तर पटणारे नाही कारण अहवाल क्र. BS-१४ जो सदर कंत्राटात संदर्भित केला होता त्यात १२० वर्षांसाठी करायच्या स्थापत्य बांधकामासाठी M-५० दर्जाचे संधानक वापरण्याची स्पष्ट शिफारस केली होती. तसेच, PPC चा वापर करून देखील पाईल्स आणि पाईल्स कॅपचे बांधकाम M-३५ बळाच्या संधानकाने केले होते.

कमी बलाच्या संधानक वापरामुळे, या पट्टयात स्थापत्य बांधकामात वापरलेल्या बळकटी आणणाऱ्या खांबांना गंज चढून परिणामी लवकर झीज होईल.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

RDSO चा ब्रीज आणि स्ट्रक्चर वरचा काँक्रिटच्या टिकाऊ पणावरचा अहवाल या करारासाठी लागू नाही. IRC ११२ (२०११) मध्ये कलम १४ मध्ये काँक्रिटच्या टिकाऊपणा संबंधात उल्लेख आहे. काँक्रिट १०० वर्ष टिकाऊ म्हणून करावी लागणारी उपाययोजना या कलमामध्ये आहे. अतिशय जास्त परिणाम होऊ शकणाऱ्या स्ट्रक्चरर्स साठीची उपाययोजना अशी आहे.

जास्तीत जास्त पाणी सिमेंट प्रमाण- ०.३५

कमीत कमी सिमेंट -४०० किलो / प्रति घन मीटर

काँक्रिटची न्यूनतम क्षमता - M ४५

न्युनतम आवरण - ७५ मी.मी.

१. OPC ५३ च्या ऐवजी PPC चा वापर केला गेल्याने ३५ ग्रेड ही टिकाऊ पणाच्या दृष्टीने योग्य आहे. PPC ची योग्यता OPC पेक्षा जास्त आहे हे वर नमूद केले आहे. त्याच बरोबर खालील बाजूचा विचार करणे जरुरी आहे. या प्रकल्पामध्ये वापरले गेलेले काँक्रिट permability and RCPT च्या गुणवत्तेनुसार योग्य आहे.

२. ताणाच्या सळयांना गंज लागू नये म्हणून CECRI ने बनविलेली CPCC प्रणाली वापरुन ट्रीट केलेले आहेत.

काँक्रिटचे अच्छादन ७५ मी.मी. होते, permability ११-१४ मी.मी. होती Ca (OH) २ चे रिॲक्टी व सिलिकांच्या सहाय्याने दिर्घकाळायोग्य कॉबोरेशन केले व त्यामुळे ३५ ग्रेड चे काँक्रिट PPC वापरून केल्याने १२० वर्ष टिकेल. अशा प्रकारे IRC ११२-२०११ मधील तत्व कार्य करताना अंमलात आणले गेले होते व काँक्रिटच्या टिकाऊपणा वर काहीही प्रतिकूल परिणाम होणार नाही.

कंत्राटातील अटींचे उल्लंघन :-

कंत्राटाच्या अटींची LTSE कडून झालेली महत्त्वाची उल्लंघने खाली दिलेली आहेत :–

पथदर्शी मार्गाच्या पायाभरणीच्या कामासाठी कमी प्रतीचे काँक्रीट वापरण्यात आले.

LTSE ने त्यांच्या तांत्रिक सूचनांमध्ये पाईल्स आणि पाईल कॅप्सच्या बांधकामासाठी M-४० प्रतिचे कॉंक्रीट वापरण्याचे नमूद केले होते. PMC ने पथदर्शी मार्गाच्या पायाभरणीसाठी M-३५ प्रतिच्या कॉंक्रीटच्या वापराच्या निकषांवर मंजूरी (नोव्हेंबर, २००९) दिली होती. एप्रिल, २०१४ च्या प्रगती अहवालानुसार, LTSE ने एकूण २,५८० पाईल्स आणि ६३७ पाईल कॅप्स M-३५ प्रतिचे कॉंक्रीट वापरून बांधले होते.

MMRDA ने असेही सांगितले की, याला मुल्य अभियांत्रिकी (कंत्राटदाराचा कुठलाही प्रस्ताव जो काम पूर्ण करण्याचा वेग वाढवेल, नियोक्त्याचा खर्च कमी करेल, कार्यक्षमता किंवा नियोक्ताचा फायदा वाढवेल तो प्रस्ताव मुल्य अभियांत्रिकी म्हणून गणला जाईल आणि तो कंत्राटातील बदल समजण्यात येईल. मुल्य अभियांत्रिकीमुळे उत्पन्न झालेली बचत ही पुढे नियोक्त्याला दिली जाते.) असे समजण्यात येत होते आणि या फरकातून झालेली बचत LTSE कडून वसूल करण्यात येणार होती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

कंत्राटदाराने त्यांच्या निविदेच्या तांत्रिक भागात M-४० ग्रेडच्या काँक्रिटचा उल्लेख केलेला आहे. परंतु, या तांत्रिक भागात केलेला ऊल्लेख DDR बनविण्याअगोदरचा आहे. DDR कंत्राट दिल्यानंतर बनविले जाते. कंत्राटदाराला जे मानक दिलेले आहेत त्यानुसार काँक्रिट बनविणे जरुरी आहे व ही गुणवत्ता येण्यासाठी ज्या गुणवत्तेचे घटक जरुरी आहे. त्यांची गुणवत्ता ठेवणे कत्रांटदारावर बंधनकारक आहे. M-३५ बनविताना काँक्रिटची जी क्षमता मिळाली त्यानुसार कत्रांटदाराने जमिनीची क्षमता व काँक्रिटची क्षमता लक्षात घेऊन पाया बनविला आहे. कंत्राटदाराला कमी प्रतिची काँक्रिट वापरल्या बदल विचारणा करण्यात आली होती. कंत्राटदाराने विपूल प्रमाणात काँक्रिट गोळ्यांचे पुरावे दिले आणि M-३५ ची क्षमता M-४० पेक्षा जास्त आढळून आली होती. M-३५ वापराने ढाच्याची क्षमतेवर काहीही परिणाम झालेला नाही. ढाच्याच्या सुरक्षिततेवर व स्थिरतेवर काहीही परिणाम झालेला नाही. टिकाऊपणा संबंधी बोलायचे झाल्यास पाईल कॅपमध्ये प्रती घनमीटरला ४५० किलो सिमेंट वापरले आहे. पाण्याची permability व उर्वरीत क्लोराईडची आत जाण्याची क्षमता मर्यादेमध्ये आहे व त्यामुळे टिकाऊपणावर काहीही परिणाम झालेला नाही.

तरीसुद्धा, करारानुसार हे व्हॅल्यु इंजिनियरींग समजले गेले आहे व त्यानुसारचा फायदा मालकाला होईल. हे कंत्राटदाराच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

डेपोच्या कामांमध्ये उल्लंघन

कंत्राटाच्या कलम २.४.३.१२ नुसार, LTSE ने प्रचलित नियम / मार्गदर्शक सुचनांनुसार, गाड्या, बेअरिंग्ज, ट्रॅक्शन मोटर्स, फिल्टर्स इत्यादी धुतल्यानंतर निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी डेपोमध्ये सांडपाणी प्रक्रिया संयंत्राची तरतूद करावयास हवी होती जेणेकरून कचरा सीमित राहील आणि पर्यावरण प्रदुषणमुक्त होईल. परंतु नोव्हेंबर, २०१४ पर्यंत LTSE कडून ही सुविधा प्रस्थापित केली गेली नव्हती. हे दूषित पाणी MMRDA कडून लगतच्या महापालिकेच्या मलप्रवाह वाहिनीत प्रक्रिया न करता प्रवाहित करण्यात येत आहे.

*आभासी वास्तविकतेत प्रशिक्षित करणेसाठी चलसंच वाहन चालकांना यथार्थ ज्ञान देण्याची तरतूद जरी कंत्राटात होती तरी LTSE ने अशी सेवा पुरविली नाही. कंत्राटातील अटीचे अनुपालन न केल्यामुळे MMRDA ने LTSE च्या चालू देयकांतून रु. दोन कोटी रोखून ठेवले होते.

*जरी कंत्राटात आवश्यक कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत (स्टेशन मास्तर, देखभाल कर्मचारी, ट्रेन कॅप्टन आणि डेपोमधील इतर कार्यचालन कर्मचारी) तरतूद होती आणि फेब्रुवारी, २०१४ पासून पहिल्या टप्प्याच्या कार्याची सुरूवात झाली होती, तरीही, LTSE ने आवश्यक कर्मचारी नियुक्त केले नव्हते. कंत्राटातील अटींचे अनुपालन न केल्यामुळे MMRDA ने LTSE च्या चालू देयकांतून रु. दोन कोटी रोखून ठेवले होते.

*स्टेबलिंग यार्डातील चार मार्गांमध्ये LTSE ने तीन फलाटांच्या ऐवजी दोनच फलाटांची तरतूद केली होती. MMRDA ने LTSE च्या चालू देयकांतून रु. ५० लाख रोखून ठेवले होते.

डेपोमध्ये आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या सुविधा प्रस्थापित न केल्यामुळे, प्रदुषणाशी निगडीत विनियामक अडचणींव्यतिरिक्त, प्रशिक्षण, कार्यचालन आणि रखरखाव कार्यांवर याचा प्रतिकुल परिणाम होईल, ज्याचा MMRDA ला पाठपुरावा करावा लागेल.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

आऊटलाईन प्रमाणकानुसार कलम २.४.३.१२, प्रमाणे गाडी धुतल्यावर होणारे खराब पाण्याचे शुद्धिकरण हे यंत्रसंचाराद्वारे शुद्ध करून त्याचा पुर्नवापर करणे आणि बाह्यरेखा वैशिष्ट्ये कलम, २.४.३३ नुसार खराब पाणी हे महापालिकेच्या सांडपाणी प्रणालीमध्ये सोडण्यात येईल, असा उल्लेख आहे याचे पालन होत आहे.

प्रकल्पाचा टप्पा-२ पूर्ण होण्याआधी कंत्राटदाराद्वारे simulator लावण्यात येईल.

याचा ऑपरेशनमध्ये कोणताही प्रतिकुल परिणाम होत नाही. मात्र करारापमाणे निधी निश्चीत करून तेवढा निधी कंत्राटदाराकडून वसूल केला जाईल.

स्टेबलिंग लाईनचा खर्च व्हॅल्यु इंजिनियरींग प्रमाणे कंत्राटदाराकडून वसूल केला जाईल.

कार्यपूर्णत्वाची बँक हमी पुनःजिवित न करणे :-

कंत्राटातील अटीनुसार, LTSE ने कंत्राट मुल्याच्या (कंत्राटी मुल्य रु. २,४६० कोटी (करापोटी रु. २५६ कोटी वगळून)) (रु. २४६ कोटी) १० टक्के कार्यपूर्णत्वाच्या प्रतिभूती बँक हमीच्या (BG) स्वरुपात सादर करावयाच्या होत्या. लेखापरीक्षणात आढळून आले की, LTSE ने रु. २४६ कोटी रकमेच्या भारतीय स्टेट बँकेच्या सहा बँक हमी सादर केल्या होत्या त्यातील रु. १९६.८० कोटीच्या चार BGS चे LTSE ने एक ते २४ महिन्यांच्या कालावधीपर्यंत नूतनीकरण केले नव्हते. अशारितीने, MMRDA ने केवळ नजरचुकीमुळे आपल्याच आर्थिक हिताची जपणूक केली नव्हती.

कंत्राटातील अटींमध्ये पुढे अशीही अट होती की, LTSE ने कंत्राटी मुल्यात यथाप्रमाण वाढ झाल्यास त्यासाठी अधिक बँक हमी सादर करावी. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, नोव्हेंबर, २०१४ पर्यंत कंत्राटी मुल्यात जरी रु. १४५.२६ कोटीचा बदल होता तरी LTSE कडून रु. १४.५३ कोटीची बँक हमी प्राप्त झाली नव्हती.

MMRDA ने असे सांगितले की, व्यपगत झालेल्या सर्व बँक हमी पुनःजिवित केल्या असून LTSE ला रु. १४.५३ कोटीची अधिक बँक हमी सादर करण्याची विनंती केली आहे.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

बँकेची हमी रु. २४६ कोटींसाठी निविदाकारांनी नूतनीकरण केले गेले आहेत. कंत्राटदारांना असे स्मरण केले की अतिरिक्त कामासाठी अतिरिक्त बँक हमी देण्यात यावी, तथापि टप्पा १ मधील अतिरिक्त कामे ही पूर्ण झालेली असून कार्यान्वित झालेली आहेत. टप्पा-२ चे काम प्रगतीपथावर आहे.

LTSE ने RITES ला केलेल्या प्रदानाची वसुली केली नाही :-

कंत्राटाप्रमाणे LTSE ला, सगळ्या मालाचा (कर आणि शुल्कांसहीत) पुरवठा, चाचणी, निरिक्षण इत्यादी करण्यासाठी तपासणी प्रधिकाऱ्यांना देय असलेल्या शुल्कासह, सर्वसमावेशक अशी किंमत नमूद करायची होती. MMRDA ने रेल्वे प्राधिकरणाबरोबर एक करार केला (जानेवारी, २०१२) ज्यामध्ये विविध रेल्वे क्रॉसिंगवर मोनोरेलच्या कामाच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती कशी असावी हे नमूद केले होते. करारानुयार, रेल्वे क्रॉसिंगवर बसविण्यात येणाऱ्या सर्व स्टील गर्डर्सची RITES कडून चाचणी व्हायला हवी होती ज्याच्या चाचणी आणि पर्यवेक्षणाचा खर्च MMRDA ने करावयाचा होता.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, MMRDA ने रु. १.८१ कोटी दोन रेल्वे क्रॉसींगच्या कामासाठी स्टील गर्डर्सच्या (LTSE ने प्राप्त केलेल्या) चाचणीसाठी, निरिक्षणासाठी व त्यावरील पर्यवेक्षणाच्या खर्चासह ऑक्टोबर, २०१४ मध्ये RITES ला प्रदान केले होते. तथापि, MMRDA ने RITES ला केलेल्या प्रदानाची वसुली LTSE कडून केली गेली नव्हती, जे कंत्राटांमधील अटींच्या विरोधी होते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मे. RITES ची रेल्वे ओलांडणारे स्पॅन चे काम तपासणे व देखभाल करणे यासाठी नेमणूक केली गेली होती. हे काम मध्य रेल्वेच्या सांगण्यानुसार देण्यात आले. मे. RITES ची नेमणूक करणे हे करारनाम्यामध्ये लिहलेले नाही. कंत्राटदाराने हा स्पॅन ओलांडण्यासाठी Girder बनविणे, खांबावर ठेवणे याचे सुपरव्हिजन करण्याची जबाबदारी आहे. हे काम मालकाने निरीक्षण करण्याचे आहे. रेल्वे हे काम स्वतः करते व त्यासाठी नियमानुसार सरकारी विभागाकडून शुल्क घेते. या ऐवजी RITES किंवा IRCON यांची ही नियुकती यासाठी होऊ शकते. या कामाकरीता रेल्वेने RITES ची नेमणूक केली व त्याचे शुल्क एमएमआरडीएला देणे जरूरी होते. अशा प्रकारचे काम RITES वा IRCग्र ला देणे ही नित्याची बाब आहे. RITES व IRCON या दोन्हीही रेल्वेच्या कंपन्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत या कामाचे आरेखन, निर्मिती, उभारणी व हे काम LTSE चे असून त्यावर देखरेख करण्याचे काम हे मालकाचे आहे येथे नमुद करण्यात येते आहे की, आवश्यक त्या चाचण्यांचा खर्च LTSE ने केलेला आहे. या कामाच्या खर्चाची जबाबदारी कंत्राटदाराची नाही. RITES ची जबाबदारी जोडकामाचे उभारणीचे निरिक्षण करणे इतकेच आहे. निरीक्षण गुणवत्ता व सुरक्षिततेचा असावी या साठी होते. इतर कामे जशी कराराप्रमाणे काम करणे LTSE शी समन्वय, रेल्वे व एमएमआरडीएशी समन्वय, ब्लॉक घेणे ही कामे RITES च्या अखत्यारीत नाहीत ही कामे PMC ची आहेत. त्यामुळे RITES नेमणूकीव्दारे समन्वय बिघडला नाही व दुहेरी खर्च ही झाला नाही. RITES चा खर्च देण्याची जबाबदारी LTSE ची नाही. एमएमआरडीए ने अशा प्रकारचा खर्च अगोदर सुद्धा उचललेला आहे.

मोनोरेल प्रणालीच्या कार्यचालन आणि देखभालीचा खर्च.—

कंत्राटानुसार, मोनोरेल प्रणाली सुरू झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षापर्यंत कार्यचालन आणि देखभाल हे LTSE ने प्रति फेरी (पहिल्या टप्प्यातील वडाळा डेपो ते चेंबूर असा शेवट ते शेवट एका गाडीने केलेला प्रवास म्हणजे एक यात्रा फेरी) अनुक्रमे रु. २५४६, रु. ३१३१ आणि रु. ३७९० या दराने कार्यचालनाच्या (दोन्ही टप्प्यांकरिता) अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी, किमान रु. १७९.२१ कोटी प्रदान करण्याच्या अटीवर करावयाचे होते. हा कार्यचालन आणि देखभालीचा खर्च मुख्य मोनोरेल कंत्राटाच्या रु. २७१६ कोटी व्यतिरिक्त होता.

सप्टेंबर, २००८ च्या निविदा मुल्यमापन अहवालात, RITES ने असे निर्देशित केले की, O&M खर्च निर्धारीत करतांना दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने (DMRC) विचारात घेतलेले घटक जसे, मागणी शुल्कावर १०० टक्के अधिक तरतूद, ऊर्जा शुल्कावर ३५ टक्क्यांची ज्यदा तरतूद तांत्रिक कर्मचारी आणि सर्वसाधारण कर्मचाऱ्यांच्या वेतनावर अनुक्रमे ७५ टक्के आणि २५ टक्क्यांची जादा तरतूद, मुंबईच्या उच्च राहणीमानापोटी १०-१५ टक्के अधिक आणि प्रशिक्षण / परिचय /परदेश भेटी इत्यादीसाठी १५ टक्के असे, LTSE ने स्पष्टीकरण न दिलेले घटक सम्मिलित केले होते. RITES ने यावरून असा निष्कर्ष काढला होता की, LTSE चा O&M चा प्रस्ताव वाढीव खर्चाकडे झुकणारा होता. तथापि, ऑक्टोबर, २००८ मध्ये MMRDA बरोबर वाटाघाटी करताना LTSE ने कार्यचालन आणि देखभालीच्या खर्चात कपात करण्याचा प्रस्ताव दिला नव्हता.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, LTSE ने प्रस्तावित केलेल्या १३ गाड्या रोज अंदाजे ५१४८ कि.मी. धावतील असे अपेक्षीत होते, ज्याचा कार्यचालन देखभालीचा खर्च रु. २५८ प्रति गाडी कि.मी. / दिवस, रु. ३१५ प्रति गाडी कि.मी. / दिवस आणि रु. ३८१ प्रति गाडी कि.मी. / दिवस अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षीच्या कार्यचालनासाठी प्रमाणित केला होता. याउलट DMRC चा २००७-०८ चा O&M चा खर्च फक्त रु. १५२ प्रति गाडी कि.मी. / दिवस होता.

लेखापरीक्षणात पुढे असे आढळून आले की, पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्याच्या व्यापारी तत्त्वावर वापर सुरू होण्यामधे सहा महिन्यांचे संभाव्य अंतर असेल आणि मनुष्यबळ, साहित्य, विद्युत डेपो इत्यादी निश्चित स्वरुपाचा खर्च जो दोन्ही टप्प्यांवर विभागला गेला असता तो LTSE ला पूर्णपणे सोसावा लागेल या युक्तीवादावर LTSE च्या प्रस्तावावर (जून २०१२ आणि मार्च, २०१३) प्रतिफेरी किंमतीत पहिल्या वर्षापासून रु. २,५६४ ते रु. ३,४९८ रुपये वाढ करण्यास MMRDA ने मान्यता दिली (ऑक्टोबर, २०१३).

पहिल्या वर्षात कार्यचालनात प्रतिफेरी रु. ९३४ दर वाढ मंजूर करण्याची MMRDA ची कृती अनियमीत होती, ज्यामुळे LTSE ला रु. १.५८ कोटी (पहिल्या टप्प्यातील रु. ९३४, १६,८९८ फेऱ्या) कार्यचालनाच्या (फेब्रुवारी ते जुलै, २०१४) पहिल्या सहा महिन्याच्या अवधीत प्रत्यया झालेल्या १६,८९८ फेऱ्यांवर आधारीत) रुपयांचा गैरवाजवी फायदा झाला कारण अंमलबजावणीचे वेळापत्रक आणि कंत्राटातील " क " विभागाच्या परिशिष्ट - २ मध्ये दर्शविलेल्या महत्त्वाच्या तारखांवरुन स्पष्टपणे दिसून येत होते की दोन्ही टप्प्यांची सुरूवात अडखळत सहा महिन्यांच्या कालावधीत झाली होती, जे करारावर स्वाक्षरी करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस माहिती होते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

करारामधील सूची (ब) प्रमाणे टप्पा १ व टप्पा २ हे दोन्ही एकत्रितपणे चालू असणे असे गृहीत धरले होते. त्यामुळे या टप्पा १ व टप्पा२ च्या पूर्णत्वाच्या हिशोबाने सुचित बदल करणे जरुरी ठरते. यामुळे टप्पा २ मध्ये दिलेल्या ९३४४० इतक्या फेऱ्या या पहिल्या वर्षी ४६७२० इतक्या करण्यात आल्या. हा बदल टप्पा १ कार्यान्वीत झाल्यापासून सहा महिन्यात करणे होते. त्यायोगे टप्पा १ मध्ये टप्पा २ सहीत ५९८६० इतक्या फेऱ्या समाविष्ट करण्यात आल्या. देयकाच्या अटी नुसार फेऱ्यांमध्ये १५ % इतका बदल झाल्यास कंत्राटदाराशी वाटाघाटी करणे शक्य होते . या ठिकाणी टप्पा २ मधील फेऱ्या ५० % नी कमी होत होत्या त्यामुळे वाटाघाटी केल्या गेल्या. २ रा टप्पा पूर्णत्वास जाण्यामध्ये सहा महिन्यांचा अवधी अपेक्षित होता.

टप्पा १ जेंव्हा पूर्ण झाला तेव्हा चाचणी साठी टप्पा २ तयार असणे अपेक्षित होते. जर टप्पा २ च्या चाचण्या टप्पा १ कार्यान्वित झाल्याबरोबर सुरू झाल्या असल्या तर कंत्राटदाराला O&M चे कर्मचाऱ्याची सेवा घेता आली असती. त्यायोगे O&M खर्च अंशतः टप्पा २ च्या खर्चात समाविष्ट करता आला असता. हे शक्य न झाल्याने टप्पा १ चा O&M चा खर्च वाढला गेला व त्यामुळे टप्पा १ साठी फेऱ्यांच्या दरात वाढ करणे जरुरी ठरले. त्यामुळे सहा महिन्यांच्या फेऱ्या कमी झाल्या असल्यातरी कंत्राटदाराना पायाभूत जरुरीसाठी व वाढीव मनुष्य बळापोटी जास्त खर्च करावा लागला. या Staggerd operaton मुळे झालेल्या वाढीव खर्चापोटी कराराप्रमाणे सहा महिन्यांकरीता करारामध्ये बदल केला गेला. या बदलामुळे देयकाचे परिशिष्ट नवीन बनविलेल्या सहा महिन्यांत स्टॅगर्ड असलेल्या वेळापत्रकायोग्य असे झाले. त्यामुळे फेऱ्यांचा वाढीव दर योग्य आहे व कंत्राटदाराला कुठलाही जास्तीचा फायदा झालेला नाही करारानुसारच हा बदल केला गेला.

इतर मुद्दे, निविदेशिवाय चलसोपानांची / सरकत्या जिन्यांची प्राप्ती

मोनोरेल प्रकल्पाच्या कंत्राटात सरकत्या जिन्याची तरतूद नव्हती, जे नंतर स्वतंत्रपणे हाती घ्यायचे होते. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, ऑगस्ट, २०१२ मध्ये LTSE ने प्राप्त केलेल्या तीन दरपत्रकावर आधारित MMRDA ने १७ स्टेशन्ससाठी रु. २०० कोटी किंमतीचे ६६ सरकते जिने प्राप्त करण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली (सप्टेंबर, २०१२), ज्यामध्ये या जिन्यांची मांडणी, कार्यान्वयन, स्थापत्य कामे, कार्यचालन आणि देखरेख इत्यादी सम्मिलित होते. हे ६६ सरकते जिने प्राप्त करण्यासाठी रु. १४०.०४ कोटी किंमतीचे पुरवठा आदेश, स्पर्धात्मक बोली बोलविल्याशिवाय LTSE कडे जानेवारी, २०१३ आणि जून, २०१४ मध्ये नोंदविले गेले होते.

MMRDA ने थेट खरेदीचे असे समर्थन केले की, निविदा मागविल्यामुळे, मोनोरेल प्रकल्पाच्या क्षेत्रात स्टेशनचे काम प्रगतीपथावर असतांना LTSE व्यतिरिक्त नवीन एजन्सी कार्ययोत्रात येण्याची शक्यता होती. अशा परिस्थितीत, निविदेसाठी स्पर्धात्मक दर मिळण्याची शक्यता नव्हती.

हे उत्तर स्विकारार्ह नाही कारण दराची संभाव्यता निविदा उघडल्यानंतरच निर्धारित करता आला असता ज्यामुळे प्रापणात सक्षम तपासणी आणि पारदर्शकतेची सुनिश्चिती झाली असती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागााने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

करारामधील GCC कलम (१३) प्रमाणे करारात बदल करण्याची तरतुद आहे. या तरतूदीप्रमाणे LTSE ला बदल करण्यास सांगण्यात आले. या कामासाठी नविन निविदा प्रक्रिया राबविली असती तर LTSE चे स्थानकावर काम चालू असतानाचे आणखीन एक नवीन कंत्राटदार तेथे कामासाठी आला असता. करारामध्ये जिन्यांच्या उपलबधतेनुसार सरकते जिने लावण्याची तरतूद आहे. जिन्यांचे काम LTSE कडे आहे व त्यामुळे सरकता जिन्याची खरेदी व उभारणीचे काम LTSE योग्य प्रकारे करु शकते काही जिन्याचे काम ROW मुळे रखडले होते. दुसरा कंत्राटदार LTSE वर अवलंबून राहिला असता व त्यामुळे कराराच्या दृष्टीने ते त्रास दायक असते व दोन्ही कंत्राटदारांकडून वाढीव क्लेम मागणी होऊ शकली असती त्यामुळे हा निर्णय व्यवहाराच्या दृष्टीने योग्य होता. या सरकत्या जिन्याचा दर बाजारभावाप्रमाणे काळजीपूर्वक ठरविला गेला आहे.

निष्फळ खर्च :-

MMRDA च्या पूर्व मुक्त मार्ग प्रकल्पाचा एक भाग असलेल्या आणिक पांजरपोळ जोड रस्त्याचे (APLR) पर्यवेक्षण करणाऱ्या कार्यकारी अभियंत्याने मोनोरेल प्राधिकाऱ्यांना जानेवारी, २००९ मध्ये असे कळविले की, मोनोरेलचे संरेखन करतांना मोनोरेल प्राधिकाऱ्यांनी अस्तित्त्वात असलेल्या APLR संरेखनाची दखल घेतली नसल्याचे जाणवते कारण, मोनोरेलचे संरेखन हे APLR संरेखनाच्या रस्त्याच्या उजव्या बाजुला येत होते. तथापि, मोनोरेल प्राधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंत्याकडून उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेतले नव्हते.

पहिल्या टप्प्यांतर्गत म्हैसुर कॉलनी आणि भारत पेट्रोलियम स्टेशन दरम्यानच्या मार्गाच्या प्रत्यक कामाच्या कार्यान्वयनाच्या वेळी, APLR संरेखनाशिवाय, टाटाच्या विद्युत वाहिन्या आणि म्हैसुर कॉलनीतील बरीच घरे ही सुद्धा मोनोरेलच्या मार्गाच्या उजव्या बाजुला आली होती ज्यामुळे मोनोरेल मार्गाचे ज्यादा ७०० मीटर इतके पुन:संरेखन करणे आवश्यक झाले होते. परंतु तोपर्यंत LTSE ने पायामध्ये १२ पाईल्स बांधल्या होत्या. परिणामी, त्यातील नऊ पाईल्सवरील खर्च रु. ४.८९ कोटी निष्फळ ठरला होता. या मार्गाच्या पुन:संरेखनामुळे कामातही ५३५ दिवसांचा विलंब झाला होता.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

नाल्याच्या जागेतील बदल व APLR ची व्हर्टिकल प्राफाईल मुळे मोनोरेलच्या मार्गिकेमध्ये बदल झाला यामुळे काही पाईल्स सोडून द्याव्या लागल्या. हा बदल ऑडीटने दर्शविलेल्या ROW मुळे झालेला नाही. RITES ने त्यांच्या अहवालात ROW बदल पूर्ण माहिती दिली होती. काही विशिष्ठ ROW चे प्रश्न इतर ठिकाणी होते. सुविधा सोई जशी टाटाची विज वाहीनी, म्हैसूर कॉलनीतील रहाण्याची घरे ज्यामुळे २०० मीटरचा भाग बाधीत होत होता, रेल्वेचे ट्रॉम्बे येथील यार्ड अशा सर्व ठिकाणची माहिती राईटस् ने दिली होती. टाटाच्या वाहिन्यां अडथळा निर्माण करीत होत्या. त्या R.C मार्गावर उंचावर नेण्यात आल्या. बगंले ताब्यात घेणे व रेल्वे यार्ड ओलांडणे यासाठी विलंब झाला असता व खर्च ही झाला असता. मार्गात बदल केल्याने काम लवकर सुरू करता आले. APLR चे काम प्रगतीपथावर होत. APLR च्या मध्यावर पाईल्स बनविणे हे दोन्ही कामात अडथळा ठरु शकले असते. त्यामुळे झालेल्या पाईलस या नालाच्या जागेच्या बदलामुळे व APLR च्या व्हर्टिकल प्रोफाइलच्या बदलामुळे सोडून द्याव्या लागल्या. हा बदल म्हैसूर कॉलनी च्या ROW चा प्रश्न निर्माण होण्या अगोदरचा आहे. मानोरेलच्या मार्गाच्या बदलामुळे पाईल्स वाया गेल्या नाहीत. मार्गात बदल करण्याचे निश्चित केल्यानंतर पाईल्स बनविल्या गेल्या होत्या.

नुकसान भरपाई वसूल न करणे

टप्पा १ आणि टप्पा २ पूर्ण करण्याची तारीख अनुक्रमे नोव्हेंबर, २०१० आणि मे, २०११ होती. पहिला टप्पा ३८ महिन्यांच्या प्रलंबितेनंतर डिसेंबर, २०१३ मध्ये पूर्ण झाला होता तर दुसरा टप्पा सप्टेंबर, २०१५ पर्यंत लांबविला गेल्याने ५२ महिन्यांच्या विलंब झाला. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, विहित तारखेत महत्त्वाच्या कामांची उद्दीष्टे गाठण्यात LTSE अपयशी ठरल्यामुळे PMC नी ऑगस्ट २०११ पर्यंत फक्त LTSE शी संबंधित रु. १५३.१५ कोटीची नुकसान भरपाई परिगणित केली होती. तथापि, नोव्हेंबर, २०१४ पर्यंत LTSE कडून नुकसान भरपाईची आकारणी केली नव्हती.

MMRDA ने असे सांगितले की, LTSE ने त्यांचे स्पष्टीकरण / समर्थन सादर केले असून ते तपासून योग्य वेळी निर्णय घेतला जाईल. याबाबत निर्णय झाल्यानंतर आणि दंडाची नक्की रक्कम परिगणित केल्यावर, LTSE ला देय असलेल्या रक्कमेतून त्याची आकाराणी केली जाईल.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

मालकांनी कंत्राटदारावर वेळोवेळी LD आकारलेली आहे. जून २०११ ते नोव्हेंबर २०१२ पर्यंत ही रक्कम ४४४.९३ कोटी इतकी होती.

परंतु, दैनंदिन कामाची देखभाल करताना असे दिसून आले की कामाची गती वित्ताच्या अभावापोटी कमी झालेली होती. या साठी कंत्राटदार पूर्णतः जबाबदार असला तरी मालक ही बाब प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने नजर आड करु शकत नव्हता.

त्यामुळे मालकाकडे दोन पर्याय उपलब्ध होणे.

१. नुकसानी बद्दल LD वसूल करणे ज्यामुळे प्रकल्पांचे काम थांबू शकले असते.

२. LD पोटी जी रक्कम वसून केली होती ती परत करून कंत्राटदाराला वित्त संकटात मदत करणे व ही LD भविष्यात वसूल करण्याचा हक्क अबाधित ठेवणे.

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने प्रकल्प पूर्ण करणे जरुरीचे होते. त्यामुळे मालाकाने दुसऱ्या पर्यायाचा अवलंब केला व LD भविष्यामध्ये वसूल करण्याचा हक्क राखून ठेवला.

गुणवत्ता निरिक्षण अहवालाचे अनुपालन न करणे :-

कंत्राटाच्या अटीनुसार, LTSE ने केलेल्या कामाचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी, PMC ची होती. कंत्राटातील अटींच्या संदर्भात, कामातील बदल किंवा कमतरतेबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी LTSE ला विसंगती अहवाल (नॉन-कॉन्फॉरमन्स रिपोर्ट) जारी करायचे होते. लेखापरीक्षला असे आढळून आले की, ऑक्टोबर, २०१४ पर्यंत PMC ने ४२६ NCR जारी केले होते त्यातील २१ NCR मे, २०१० ते जानेवारी, २०१४ दरम्यान जारी केले होते ज्याचे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत LTSE कडून अनुपालन प्रलंबित होते. PMC ने निर्देशित केलेल्या विसंगती (i) बऱ्याच पथदर्शी मार्गाच्या तुळइच्या चक्र स्थानी किड्यांनी छिद्रे केली होती; (ii) विविध स्टेशनांच्या फलाटांच्या स्लॅबच्या खालच्या भागात मोठ्या भेगा तयार झाल्या होत्या; (iii) स्टेशनच्या ट्रॅकच्या समपातळीच्या स्लॅबला खूप भेगा गेल्या होत्या आणि त्यातून गळती होत होती; (iv) कार्यचालन आणि संदेशवाहन केंद्र आणि डेपो इमारतीच्या दिव्यांच्या देखभालीच्या क्षेत्रातील भिंतीमधे गळती होती; (v) डेपोच्या आवारातील पुरलेली २२ kv केबल ही संकल्पना नुसार नव्हती किंवा मार्गाची चांगली देखभाल करण्यासाठी नव्हती; (vi) थर न दिलेले रोधक, एक थर दिलेले रोधक, दोन थर दिलेले रोधक, वाहतुकीसाठी सज्ज असलेले रोधक इत्यादी ओळखण्यासाठी कोणतीही व्यवस्था केली नव्हती, या संबंधातील होत्या.

LTSE कडून वेळीच प्रतिबंधात्मक उपायात विलंब झाल्यामुळे NCR मध्ये ठळकपणे नोंदलेल्या त्रुटी आणि कमतरता वाढू शकतात.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

NCR पूर्तता आणि बंद केला आहे.

निष्कर्ष आणि शिफारसी :-

भारतीय ट्राम्सवे कायदा, १८८६ अंतर्गत सार्वजनिक वाहतुकीचे मार्ग उन्नत पातळीवर बांधण्याची आणि वाहतुकीची तरतूद नव्हती तरीही मोनोरेल प्रकल्प हा या कायद्या अंतर्गत अधिसूचित केला होता. प्रकल्प सल्लागारांची निवड आणि प्रकल्पाच्या प्रगणित करण्यात आलेल्या बेंचमार्क किंमतीत पारदर्शकता नव्हती. मोनोरेलच्या विविध प्रणालीचे संकल्पचित्र हे स्वीकृत तांत्रिक / कंत्राटातील अटींच्या अनुरुप नव्हते. पथदर्शी मार्गाच्या संकल्पचित्रात मोठ्या प्रमाणत बदल आढळून आले जे, चल संच वाहनांच्या आसभाराशी अनुरुप नव्हते आणि पथदर्शी मार्गाच्या विस्तार जोडांच्या पट्टीची जाडी आणि सेवा कालावधी कमी केला होता, तीन मिनिटांच्या अवकाशाने करावयाच्या वाहतुकीसाठी संकर्षण प्रणाली आरेखीत केली नव्हती, कंत्राटात नमूद केलेल्या प्रमाणकांनुसार पथदर्शी मार्गाच्या बांधकामाची पद्धत अनुसरली नव्हती, स्थापत्य संरचनेत गंज प्रतिबंधात्मक उपाय अयोग्य रितीने वापरले, इत्यादी होते. तथापि, या तांत्रिक बदलांमुळे कंत्राटदाराला देऊ केलेल्या फायद्यांची निर्धारणा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार किंवा MMRDA ने ही केली नव्हती. डेपो इमारतीत कंत्राटदाराने पुरवायच्या विविध व्यवस्था आणि उपकरणे पुरविली नव्हती ज्यामुळे कंत्राटाचे उल्लघन झाले होते. कार्यसिद्धी बॅक हमीच्या नूतनीकरणात लक्षणीय विलंब झाला होता आणि कंत्राट मुल्यात वाढ होऊनही आधिक्य हमी प्राप्त केली नव्हती. विहित तारखांमध्ये महत्त्वाचे टप्पे गाठण्यात कंत्राटदाराला अपयश येऊनही, कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई आकारली नव्हती.

शासनाने प्रकल्प हाती घेण्यापूर्वी कायद्याची चौकट प्रस्थापित करूनच प्रकल्प हाती घेतल्याची खात्री करावी. कंत्राटातील झालेले बदल ज्याचा प्रत्यया परिणाम बांधकामाची स्थैर्यता, बांधकामाचे आयुष्य आणि सार्वजनिक सुरक्षा यांचेशी आहे. हे लक्षात घेता शासनाने संकल्पचित्र अडचणींचा आढावा घ्यावा, कडक तपासणी मसुदा तयार करावा आणि सर्वसमावेशक देखभालीसाठी पाऊले उचलावीत.

हे प्रकरण शासनाला सप्टेंबर, २०१४ मध्ये संदर्भित करण्यात आले; त्याचे उत्तर डिसेंबर, २०१४ पर्यंत प्रतिक्षीत होते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उपरोक्त सर्व स्पष्टीकरणे मान्य करण्यात येऊन लेखापरिक्षण मुद्दे (परिच्छेद) बंद करण्याची विनंती करण्यात येत आहे.

साक्ष :-

३.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १ जून व १० व २४ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग व आयुक्त, एमएमआरडीए यांची साक्ष घेतली.

३.३ परिच्छेद क्र.३.१ ' मुंबईतील मोनोरेल प्रकल्पाचे कार्यान्वयन ' यासंदर्भात समितीने यापूर्वी दिनांक ७ जून, २०१६ रोजी बैठक आयोजित केली होती. तथापि विभागाकडून सदर मुद्यांसंदर्भातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या मराठी ऐवजी इंग्रजी प्रती समितीस प्राप्त झाल्यामुळे सदर साक्ष पुढे ढकलण्यात आली. तद्नंतर सदर साक्ष दिनांक १५ जून, २०१६ रोजी आयोजित केली असता स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती विभागाकडून बैठकीच्याच दिवशी सकाळी प्राप्त झाल्यापासून सदर मुद्यासंदर्भात समिती सदस्यांना अभ्यास करण्यासाठी विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती देता आल्या नाहीत. यासंदर्भात समितीने नाराजी व्यक्त केली व यापुढे समितीस स्पष्टीकरणात्मक ज्ञापने समितीच्या बैठकीपूर्वी समितीस प्राप्त करून द्यावेत असे निदेश दिले.

३.४ मुंबईतील मोनोरेल प्रकल्पाचे कार्यान्वयन यासंदर्भात विस्तृत माहिती विभागास विचारली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, मोनो रेलचा प्रकल्प मुंबईत घेण्याचा निर्णय सन २००८ च्या सुमारास झाला. सार्वजनिक वाहतूकीचे मेन मॉडेल मेट्रो रेल्वेचे आहे. परंतु जे गजबजलेले विभाग आहेत, जेथे रस्ते फार अरुंद आहेत, वाहतूक जास्त आहे, तेथे मेट्रोचे स्ट्रक्चर हेवी असते, ते बांधणे देखील खूप कठीण असते, तेथे मोनो रेल जी नॅरो स्ट्रक्चरची असते, कमी क्षमतेची असते, तिचा चांगल्या प्रकारे वापर होऊ शकतो, असे ॲझम्पशन होते आणि त्या आधारे हा मोनो रेलचा एक प्रकल्प तयार केला. तो सुमारे २० कि.मी. लांबीचा प्रकल्प होता. संत गाडगे महाराज चौकापासून वडाळा आणि वडाळा ते चेंबूर असा तो प्रकल्प होता. त्यासाठी पूर्वी राईट्स कंपनीच्या मदतीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आणि जागतिक निविदा मागविण्यात आल्या. हा देशातील पहिलाच प्रकल्प होता. त्यामुळे एमएमआरडीए किंवा इतर कोणत्याही शासकीय संस्थेला यापूर्वीचा अनुभव यामध्ये नव्हता. विभागाला सल्लागाराच्या अहवालावर निर्णय घ्यावे लागले. सुरूवातीला जेव्हा त्यांनी प्रकल्पाचा आराखडा तयार केला, त्यावेळी त्याची किंमत जवळपास १५३९ कोटी रूपये होईल अशी अपेक्षा होती. परंतु जेव्हा निविदा बोलाविण्यात आली, तेव्हा त्याची किंमत कोट झाली, ती यापेक्षा फार जास्त होती. त्यामुळे नवीन किंमती तपास कराव्या लागल्या. शेवटी एजन्सी नेमण्यात आली, त्यावेळी त्यांच्याकडून असे अपेक्षित होते की, किमान २-३ वर्षांत त्याचा पहिला टप्पा पूर्ण होईल आणि नंतरच्या ६ महिन्यांत दुसरा टप्पा देखील पूर्ण होईल. पहिल्या टप्प्यात जवळपास साडे आठ कि.मी.चे अंतर आहे आणि दुसऱ्या टप्प्यात जवळपास साडे अकरा कि.मी. चे अंतर आहे. पण प्रत्यक्षात त्याला फार वेळ लागला, त्यासाठी अनेक कारणे होती. पण २ वर्षांपूर्वी फेब्रुवारी, २०१४ मध्ये पहिला टप्पा पूर्ण झाला, व पहिल्या टप्प्यात मोनोरेल बहारदार सुरू आहे. दररोज जवळपास १५ ते १६ हजार प्रवासी प्रवास करतात. वडाळा ते चेंबूरपर्यंतचा हा टप्पा सध्या कार्यान्वित आहे. दुसरा टप्पा संत गाडगे महाराज चौक ते वडाळा पर्यंतचा आहे. त्याचे स्थापत्या बांधकामाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. भौतिक काम येत्या डिसेंबरपर्यंत संपेल अशी अपेक्षा आहे. हा प्रकल्प पूर्ण झाला तर याचा फायदा या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या लोकांना होईल. आता फक्त ठराविक लोकांनाच त्याचा फायदा मिळतो. कारण एकच टप्पा पूर्ण झाला आहे.

३.५ पहिला टप्पा वडाळा ते चेंबूर आहे व दुसरा टप्पा वडाळा ते संत गाडगे महाराज चौकापर्यंत आहे. हे काम डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण होईल.

३.६ त्यानंतर त्याचे चाचणी होईल. तसेच ॲक्टमध्ये कमिशनर रेल्वे सेफ्टी म्हणून एका इंजिनिअरची नेमणूक करावी अशी प्रोव्हिजन आहे. इंजिनिअरकडून सर्व तपासण्या होतात, त्यांच्याकडून जेव्हा ग्रीन सिग्नल मिळेल तेव्हा त्याचे ऑपरेशन सुरू करण्यात येईल.

३.७ मोनोरेलचा पहिल्या टप्पा कार्यान्वित होण्यास किती वेळ लागेल ? असे समितीने विभागास विचारले असता पहिला टप्पा कार्यान्वित होण्यासाठी जवळपास साडे पाच-सहा वर्षे लागले. पूर्ण झाल्यापासून कमिशनिंगला जवळपास १ वर्ष लागले अशी विभागीय प्रतिनिधींनी समितीस माहिती दिली.

३.८ विभागाने पहिल्यांदा यासाठी अंदाजपत्रक तयार केले, आराखडा तयार केला, त्यावेळी पहिल्या टप्प्याची अंदाजित किंमत किती होती आणि मोनोरेल कार्यान्वित होण्याच्या वेळी ती किती झाली ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, टप्पेनिहाय किंमत नव्हती. पूर्ण प्रकल्पाची किंमत होती. संपूर्ण प्रकल्पाची मंजूरी झाली, त्याची किंमत २,७१६ कोटी रुपये होती. ही एकत्रितच किंमत होती. मात्र मोनोरेलचे काम टप्प्याने करायचे ठरले होते. आतापर्यंत या प्रकल्पाकरिता २,२०० कोटी रुपये खर्च झाला आहे.

३.९ या परिच्छेदासंदर्भात समितीने विचारणा केली की, काय कार्यवाही केली ? जर अपघात घडला तर त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी कोणती व्यवस्था आहे, भारतीय ट्राम वे कायद्यामध्ये काही इन्शूअर केले आहे का ? यावर आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस सांगितले की, ट्राम वे ॲक्टमध्ये तरतूद आहे की, मृत्यू किंवा शरीराला इजा झाली असेल तर त्यामध्ये जबाबदारी देण्यात आली आहे. पण किती नुकसान भरपाई द्यायची आहे याची काही आकडेवारी नाही. मृत्यू झाला तर किती पैसे द्यावेत किंवा इजा झाली तर किती पैसे द्यावेत याची तरतूद त्यामध्ये नाही. पण नुकसान भरपाई देण्याची आहे. अंमलबजावणी करणारी संस्था, त्यांच्यामार्फत जे कोणी कंत्राटदार आहेत, त्यांच्यावर ही जबाबदारी निश्चित करण्यात येते. मागच्या काळात १-२ अपघात झाले होते, त्यावेळी संबंधितांच्या नातेवाईकांना शासकीय नियमाप्रमाणे नुकसान भरपाई अदा केली होती.

३.१० महालेखाकारांच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, मेट्रो ॲक्टची प्रोव्हिजन मोनो रेलला लागू करू? इच्छितो अशी तरतूद आहे. But Metro Act is applicable only to Delhi. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, पूर्वी असे होते. परंतु आता मेट्रो ॲक्ट हा सर्व शहरांना लागू झाला आहे. आपली देखील मेट्रो ॲक्ट अंतर्गतच येते. परंतु अजुनपर्यंत मेट्रो ॲक्ट मोनो रेलला लागू झालेला नाही. मोनो रेलसाठी असा ठराविक ॲक्ट सद्या उपलब्ध नाही. इंडियन ट्राम वे ॲक्ट अन्वये हे सुरू? केले होते आणि सध्याही त्या अंतर्गतच आहे.

३.११ मोनोरेल हा प्रकल्प इंडियन ट्राम-वे ॲक्ट अंतर्गत समाविष्ट केला होता. मात्र आता तो प्रकल्प मेट्रो प्रोव्हिजनमध्ये इनकॉर्पोरेट करणार का ? असे समितीने विभागास विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने त्यासाठी शिफारस केली आहे. परंतु हा केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे केंद्र शासन जे निर्णय घेतील त्याप्रमाणे होईल.

३.१२ पंरतु, आता असा रिपिल करू नये असे केंद्र सरकारला म्हटले आहे, त्याबद्दल विभागाने स्पष्टीकरण द्यावे असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, विभागाने केंद्र सरकारला असे कळविले, त्यांच्याकडे ज्याप्रमाणे जो निर्णय होईल त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही होईल. दरम्यानच्या काळात ट्राम-वे ॲक्ट रिपिल करायचा या संबंधीचे राज्य शासनाचे मत केंद्र सरकारने मागविले होते, त्यांना विभागाने असे कळविले आहे की, तिकडे निर्णय होत नाही तोपर्यंत हे रिपिल करून चालणार नाही.

३.१३ जोपर्यंत ट्राम-वे ॲक्ट इन्फोर्स होत नाही किंवा त्यामध्ये सुधारणा होत नाहीत तोपर्यंत मेट्रो ॲक्ट लागू करणार आहात का ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जोपर्यंत मेट्रो ॲक्टमध्ये मोनो रेलचा समावेश होत नाही, तोपर्यंत ट्राम वे ॲक्ट रिपिल करू? नये असे विभागाने कळविले आहे.

३.१४ परंतु मधल्या काळात काही झाले तर त्यासाठी काय व्यवस्था आहे ? अशी विचारणा समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, केंद्र सरकारला ही वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिल्यानंतर, याचा विचार केल्याशिवाय, त्यांच्या बाजूने सरळ रिपिल करतील असे काही होणार नाही.

३.१५ यावर समितीने सुचित केले की, अपघातासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. नगरविकास खात्याची प्राईम बॉडी म्हणून एमएमआरडीएने काही सर्क्यूलर काढून ती व्यवस्था होत नाही तोपर्यंत तात्पुरती काही व्यवस्था लागू होईल असे काही तरी करावे लागेल. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, तोपर्यंत ट्राम वे ॲक्टमधील तरतुदी लागू आहेत.

३.१६ तथापि, ट्राम व ॲक्टमध्ये सिक्युरिटी नाही ही बाब समितीने विभागास निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तरतूद आहे, त्या प्रोव्हिजनची ती जबाबदारी आहे. फक्त अमाऊंट किती द्यायची एवढा विषय असू शकतो.

३.१७ रक्कम किती द्यायची हे स्पष्ट झाले पाहिजे. कारण नंतर आर्बिट्रेटर, कोर्ट कचेरी होऊ शकते यासाठी शासनाचे धोरण निश्चित झाले पाहिजे. याबाबत यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पहावे.

३.१८ मोनो रेलच्या प्रवाशांना इन्शुरन्स सिक्युरिटी द्यावी, विभागाने ती दिली नाही तर त्यांना काय मोबदला देणार आहात ? कारण काही अघटित घडले तर कायदा नाही म्हणून त्यासाठी कोर्ट कचेरी होईल असे मत समितीने व्यक्त केले.

३.१९ यावर विभागीय सचिवांनी अवगत केले की, पूर्वीही १-२ घटना घडल्या आहेत, त्यामध्ये देखील दुर्घटनाग्रस्तांना जो मोबदला आहे तो देण्यात आला आहे.

३.२० या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, कोणत्या आधारे, कोणत्या नियमाने दुर्घटनाग्रस्तांना मोबदला दिला ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात कायद्यातील प्रोव्हिजन आणि मोबदला किती द्यायचा याबाबत शासनाचे जे इतर नियम आहेत त्या अनुषंगाने मोबदला दिला आहे.

३.२१ घटना कधी घडल्या आणि काय मोबदला दिला ? तसेच मेट्रोची अमाऊंट आणि राज्य शासनाचे सध्याचे धोरण यामध्ये तफावत आहे का मागच्या वेळची नुकसान भरपाई किती होती अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी माहिती दिली की, एक मृत्यू झाला होता, त्यावेळी नुकसानभरपाई म्हणून ९ लाख रूपये देण्यात आले होते.

३.२२ या संदर्भात शासनाचे प्रचलित निकष काय आहेत असे समितीने विभागास विचाले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस सांगितले की, शासनाच्या निकषांप्रमाणे इतर योजनांमध्ये जे आहे किंवा इतर कायदे आहेत त्याप्रमाणे केले आहे.

३.२३ शासनाच्या निकषात कॅज्युअल्टिला ९ लाख नसावेत. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, शासनाचे निकष कदाचित वेगवेगळ्या कायद्यांमध्ये वेगवेगळे असू शकतात.

३.२४ महाराष्ट्रातील हा पहिला प्रकल्प आहे की, जो ट्राम वे ॲक्टप्रमाणे होणार आहे. त्यामुळे यासंदर्भात एक कायद्यात मसुदा तयार करून केंद्र सरकारकडे पाठविला पाहिजे व त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. केंद्र सरकार यासंदर्भात त्यांची टिम पाठवेल आणि त्याची शक्यता तपासेल. याकरिता नगरविकास विभाग किंवा एमएमआरडीए अधिकाऱ्यांनी कायद्याच्या बाबी, मुंबई शहराच्या कल्चरल, जिओग्राफीक्स, ॲक्सिडेंटल चान्सेस या बाबींची माहिती घेऊन ती माहिती केंद्र सरकारच्या टीमला द्यावी असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासाठी कायद्याचा वेगळा मसुदा करण्याची गरज नसून मोनो रेलला मेट्रो ॲक्टच्या तरतुदी लागू कराव्यात.

३.२५ " The Metro provisions will be incorporated in Tramsway Act. " असा विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केला आहे. याबाबत समितीने माहिती विचारली असता विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, जर केंद्र सरकारने अशी भूमिका घेतली की, मेट्रोच्या कायद्यामध्ये मोनो रेल सबमिट करायची नाही तर मग अल्टरनेटिव्ह काय असावे याचा विचार केला आहे. आता त्यांचा निर्णय बाकी आहे. विभागाचा त्या संदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. तो निर्णय झाला की, त्या अनुषंगाने पुढच्या स्टेप्स घेण्यात येतील. परंतु यासंदर्भात खात्री करून समितीस माहिती देण्यात येईल असे आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितस आश्वासित केले.

३.२६ भविष्यात जर असे काही घडले तर वेगळेपणा येणार. शासनाच्या निकषामध्ये तफावत राहणार असे मत समितीने मांडले असता आयुक्त एमएमआरडीए यांनी सांगितले की, लवकरात लवकर कायद्यात बदल व्हावा. दोन गोष्टी आहेत की, केंद्र सरकारने मेट्रो ॲक्टमध्येच ही तरतूद करावी की, Metro includes Mono rail also. हे एक वाक्य आले की ते आपोआप लागू होईल आणि जर त्यांनी राज्य शासनाला सांगितले की, तुम्ही मेट्रो रेल्वेची प्रोव्हिजन ट्राम वे ॲक्टमध्ये करावी तर सारखेच नियम येथे इनकॉर्पोरेट करता येतील.

३.२७ जोपर्यंत केंद्र सरकारकडून काही निर्णय होत नाही तोपर्यंतची योजना तयार करून ठेवली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, बहुतेक केंद्र सरकारमध्ये या सुधारणा होत आहेत, या संदर्भात बरीचशी चर्चा झाली आहे. बाकी शहरांबरोबरही केंद्र सरकारने चर्चा केली आहे. या सुधारणा लवकर होण्याची शक्यता आहे.

३.२८ विभागाने नमूद केल्याप्रमाणे रोजच्या रोज १५ ते १६ हजार प्रवासी मोनोरलने प्रवास करीत आहेत. त्यामुळे भारतीय ट्राम वे अधिनियमात मोनोरेलचा समावेश करण्याबाबतचा निर्णय जोपर्यंत होत नाही तोपर्यंत काही करता येईल का हे पाहिले पाहिजे. कदाचित हा निर्णय एक महिन्यात देखील होईल. पण जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत काही तरी विचार केला पाहजे. या संदर्भात आधी निकष ठरवून घ्यावेत. बाकी ठिकाणी मेट्रो आहेत, त्या संबंधी विचार करावा असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, यासंबंधी राज्य शासनाला काही करणे शक्य आहे का किंवा काही गाईडलाईन्स देणे शक्य आहे का या संदर्भात विचार करण्यात येईल.

३.२९ हा विषय थोडा संवेदनशील आहे. आजपर्यंत काही घडले नाही पण काही घडले तर काय करणार. त्यामुळे यासंदर्भात १ महिन्याच्या आत निर्णय घ्यावा अशी इच्छा समितीने व्यक्त केली.

" प्रकल्पाची सुसाध्यता आणि कंत्राटाला अंतिम रुपये देणे " :–

३.३० उपरोक्त परिच्छेदासंदर्भात आयुक्त, एमएमआरडीए यांनी माहिती देताना सांगितले की, सदरहू परिच्छेदामध्ये पहिला मुद्दा असा होता की, निविदा न मागविता RITES या संस्थेचा सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली. मे.रेल इंडिया टेक्निकल ॲण्ड इकोनॉमिक सर्व्हिस म्हणजेच RITES ही संस्था शासनाची अंगिकृत संस्था असल्यामुळे त्या संस्थेची निविदा न मागविता नेमणूक करण्यात आली.

३.३१ दुसरा महालेखाकारांचा मुद्दा असा होता की, ' RITES was appointed without inviting tenders on the ground of exteNSive experience of consultancies in India and internationally. Under the circumstances the reasons for appointing Louis Berger Group as an consultant to reassess the cost estimates may be included in the reply to PAC. ' म्हणजेच एकदा RITES या संस्थेची कन्सलटंट म्हणून नेमणूक केल्यानंतर पुन्हा LBG (ल्युइस बर्जर ग्रुप इंक) या संस्थेची नेमणूक का करण्यात आली. याबाबत खुलासा करताना आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, RITES या संस्थेने सुरूवातीला १५३९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले होते. परंतु प्रत्यक्षात ज्या निविदा आल्या त्यामध्ये कामाची किंमत २९७० कोटी रुपये नमूद केली होती. या दोन्ही किंमतीमध्ये फार मोठी तफावत असल्यामुळे या विषयी फेरविचार करण्याची गरज होती. त्यामुळे RITES यांना सांगितले की, त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकाच्या किंमतीमध्ये आणि निविदेच्या किंमतीमध्ये मोठी तफावत असल्यामुळे त्यांच्या अंदाजपत्रकात काही चुकले काय हे तपासून पहावे. त्यांनी पुन्हा तपासून करुन कामाची किंमत १५३९ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट १७७७ कोटी रुपये येईल असा अहवाल दिला. परंतु त्या किंमतीमध्ये सुद्धा जास्त फरक वाटला. त्यामुळे ज्या कन्स्ट्रक्शन कंपन्या होत्या त्यांच्या मार्फत या कामाची अंदाजित किंमत किती असावी याची चौकशी करण्यात आली.

३.३२ या कामासाठी २९७० कोटी रुपयांची निविदा आली होती. दरातील तफावतीमुळे RITES संस्थेला नव्याने फेरविचार करण्यास सांगितल्यानंतर त्यांनी १५३९ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट १७७७ कोटी रुपये अंदाजित खर्च येईल असे नमूद केले. तरी सुद्धा निविदेच्या किंमतीत आणि RITES संस्थेने नव्याने नमूद केलेल्या किंमतीमध्ये १२०० कोटी रुपयांची तफावत होती. त्यांनी LTSE बरोबर वाटाघाटी करण्याबाबत सुचविले होते. त्यामुळे विभागाने LTSE बरोबर कोणत्या वाटाघाटी केल्या. अशी विचारणा समितीने केली. यावर आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस अवगत केले की, वाटाघाटीमध्ये २९७० कोटी रुपयांच्या अगेन्स्ट २७१६ कोटी रुपये अंदाजित किंमत दर्शविली. म्हणजे या ठिकाणी जवळपास २५० कोटी रुपये कमी झाले. परंतु अगोदर या किंमतीमध्ये मोठा फरक का होता हे समजून घेण्यासाठी ज्यांना मोनो रेलच्या कामांची माहिती आहे अशा स्वतंत्र कन्सल्टंटकडून माहिती घ्यावी, असे ठरले. त्यामुळे त्यावेळी LBG कंपनीची नेमणूक करण्यात आली. LBG कंपनीने न्यूयॉर्क, युएसए मध्ये मोनो रेलचे काम हाताळले होते.

३.३३ अशी समितीने विचारणा करून टेंडर कॉल केल्यानंतर तीन-चार कंपन्यांनी टेंडर भरले. परंतु त्यातील एका निविदाकाराला इंग्रजी भाषा येत नसल्यामुळे त्यांना अपात्र ठरविले. LBG कंपनी कशी आली ? याबाबत समितीने विचारले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यासाठी सुद्धा विभागाने टेंडर मागविले होते. त्यामध्ये Sowil नावाच्या चायनीज कंपनीचे आणि LBG या दोन कंपनीचे टेंडर आले होते. Sowil कंपनीचा पहिला आणि LBG कंपनीचा दुसरा क्रमांक होता. परंतु Sowil या चायनीज कंपनीमध्ये केवळ चायनीज भाषा समजणारे लोक होते. त्या कंपनीमध्ये इंग्रजी भाषा समजणारे लोक नव्हते. त्यांना इंग्रजी समजत नसल्यामुळे तीन-चार महिन्यानंतर हे काम पुढे चालू शकणार नाही असे निदर्शनास आल्यानंतर त्यांचा कॉन्ट्रॅक्ट रद्द केला. तद्नंतर विभागाने LBG कंपनीला प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) म्हणून नेमले. प्रकल्पाची अंदाजित किंमत किती आहे याची तपासणी करण्यासाठी LBG कंपनीची नेमणूक करण्यात आली. त्यानुसार त्यांनी या सर्व कामाची अंदाजित किंमत २३२९ कोटी रुपये असावयास पाहिजे, अशा प्रकारचा अहवाल दिला. विभागाकडे या किंमतीबाबतचा ब्रेक-अप सुद्धा आहे. पूर्वीच्या RITES कंपनीच्या आणि LBG कंपनीच्या किंमतीमध्ये बाबनिहाय कुठे कुठे फरक होता त्या बाबतचा तपशील समितीस सादर करण्यात येईल असे विभागाने समितीस आश्वस्त केले.

३.३४ याचाच अर्थ LBG कंपनीने प्रकल्पाची किंमत १७७७ कोटी रुपयांवरुन २३२९ कोटी रुपयांपर्यंत पोहचविली. RITES कंपनीने सुरूवातीला या कामासाठी ६ महिन्यांचा कालावधी घेतला. परंतु LBG कंपनीने मात्र १५ दिवसांत आपल्याकडे सविस्तर अहवाल सादर केला. इतक्या कमी कालावधीत अहवाल सादर करण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी विशद केले की, RITES संस्थेकडे बेसिकली टेक्निकली इकॉनॉमिक फिजिबिलिटीचे काम होते. त्यांच्याकडे सर्व फिजिबिलिटी तयार करण्याचे काम होते. परंतु LBG कडे केवळ प्रकल्पांची अंदाजित किंमत किती येईल हे तपासण्याचे काम होते. यामध्ये दोन गोष्टी प्राथमिक स्वरुपाच्या असतात. त्यातील एक म्हणजे प्रत्येक कंपोनंटसाठी किती रक्कम गृहीत धरलेली आहे, ती योग्य आहे की नाही किंवा दुसरे म्हणजे एखाद्या कंपोनंटची किंमत अंदाजपत्रकात नमूद करायचे विसरलो आहोत काय हा एक भाग असतो. या बाबी तपासण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. त्यामुळे LBG कंपनीने किंमत ठराविक वेळेमध्ये निश्चित करुन दिलेली आहे. RITES कंपनीचा स्कोप वर्क फार मोठा होता. वास्तविक पाहता डीपीआर प्रिपेअर करायला चार-सहा महिन्यांचा कालावधी लागतो. परंतु या तुलनेत कॉस्ट एस्टीमेट अपडेट करायला किंवा चेक करायला, तेवढा वेळ लागत नाही.

३.३५ LBG कंपनीने प्रकल्पाची किंमत २३२९ कोटी रुपये नमूद केली होती. परंतु त्यांना २७१६ कोटी रुपयांचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, ही रक्कम अंदाजित किंमतीच्या जवळपास १६ टक्के जास्त आहे. साधारणत: कोणतेही टेंडर देताना तेथील वस्तुस्थिती पाहून १५ ते २० टक्के पर्यंत जादा रकमेने टेंडर देऊ शकतो. १६ टक्के ही काही जास्त तफावत नाही की, ज्यामुळे कॉन्ट्रॅक्ट रद्द करु शकतो.

३.३६ सुरूवातीला RITES कंपनीने मूळ अंदाजपत्रक १७७७ कोटी रुपयांचे सादर केले होते. ते अंदाजपत्रक खूप कमी होते आणि त्याला काही आधार नव्हता. परंतु या कामी किती खर्च अपेक्षित आहे या बाबत पुन्हा तपासणी करण्यास सांगितल्यानंतर ती किंमत २३२९ कोटी रुपयांवर पोहचविण्यात आली. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, कामाची किंमत कमी होती म्हणूनच नव्याने कॉस्ट व्हेरिफिकेशन करण्यास सांगितले गेले.

३.३७ RITES ही केंद्र सरकारची अंगिकृत कंपनी आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या अंगिकृत कंपनीला विना निविदा काम दिले तर काही अडचण नाही असे विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले. परंतु एका बाजूला या कंपनीने सुरूवातीला कामाची किंमत १७७७ कोटी रुपये नमूद केली. परंतु त्या किंमतीत वाढ करुन LBG कंपनीने ती किंमत ताबडतोब २३२९ कोटी रुपये केली. परंतु प्रत्यक्षात २७१६ कोटी रुपयांत काम दिले. २३२९ कोटी रुपये किंमत गृहीत धरल्यास ही रक्कम १६ टक्के जास्त आहे आणि सुरूवातीची १७७७ कोटी रुपये किंमत गृहीत धरल्यास ही रक्कम ९६ टक्के जास्त आहे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की, १७७७ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक बरोबर नव्हते म्हणूनच पूर्वीचे अंदाजपत्रक रिव्हाईज करण्यात आले. या अनुषंगाने आयुक्त, एमएमआरडीए यांनी उदाहरणदाखल माहिती दिली की,

केरळ राज्यातील कोची येथे सुद्धा अशाच प्रकारचे टेंडर बोलविले होते. त्या ठिकाणी डीएमआरसीने त्यांचा डीपीआर तयार केला होता. त्यांच्या डीपीआरमध्ये प्रती किलोमीटर अंदाजित किंमत १५५ कोटी रुपये होती. परंतु त्या ठिकाणी जे टेंडर आले होते त्यामध्ये ती किंमत प्रती किलोमीटर २८५ कोटी रुपये होती. ज्यावेळी टेंडर अवॉर्ड केले त्यावेळची अंतिम किंमत ही प्रती किलोमीटर १४० कोटी रुपये होती. कोची येथील किंमतीची आपल्या किंमतीशी तुलना केल्यास त्यांच्या अंदाजित किंमतीपेक्षा सुद्धा आपली अंतिम किंमत कमी आलेली आहे.

३.३८ RITES संस्थेने सुरूवातीला १७७७ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले होते. परंतु LBG कंपनीने प्रकल्पाच्या कॉस्टचे व्हेरिफिकेशन केल्यानंतर या कामाची किंमत २३२९ कोटी रुपये नमूद केली. LBG कंपनीने या वाढीव किंमती बाबतचा काही आधार विभागाकडे सादर केला काय ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी असे सांगितले की, त्यांनी पूर्वीच्या किंमतीमध्ये कुठे कुठे फरक आहे याचा तुलनात्मक तक्ता दिला. RITES संस्थेने पूर्वी कोणत्या कंपोनंटला किती रक्कम धरली आणि विभागाने किती रक्कम धरली या बाबतचा तुलनात्मक तक्ता LBG कंपनीने सादर केला. **(विवरणपत्र क्र. ६)**

३.३९ RITES संस्थेच्या मार्फत जे अंदाजपत्रक देण्यात आले होते ते अपुरे होते आणि त्यामध्ये बरेचसे कॉस्ट सेंटर पकडण्यात आले नव्हते, असे नमूद करण्यात आलेले आहे. देशभरात प्रख्यात असलेल्या RITES संस्थेवर विभाग अवलंबून राहिला. जर LBG कंपनीकडून सुधारित अंदाजपत्रक बनविले नसते तर आज जेवढा वेळ लागला आहे त्यापेक्षा जास्त वेळ आणि पैसा या प्रकल्पासाठी लागला असता. त्यामुळे चुकीचे अंदाजपत्रक बनविणाऱ्या RITES संस्थेच्या विरोधात कारवाई केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली यावर आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, RITES ही शासकीय संस्था होती. कोणत्याही कन्सल्टंटने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने त्या कन्सल्टंटवर कारवाई करु शकत नाही. परंतु पुढे काम देताना हे लक्षात घेण्यात येईल की, RITES संस्थेचे काम या प्रकल्पासाठी व्यवस्थित नव्हते.

३.४० सदरहू कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करताना LBG कंपनीने साईट व्हिजीट केली नाही व इतरही विषयांवर लक्ष दिले नाही. तसेच LTSE या कंपनीची २७२९ कोटी रुपयांची ऑफर आली होती. ही बाब लक्षात घेऊन LBG कंपनीने फक्त दोन आठवड्यात २३२९ कोटी रुपये किंमत ठरवून दिली आहे काय ? तसेच उक्त रकमेत १६ टक्के वाढ करुन २७१६ कोटी रुपये किंमत निश्चित केली. इतक्या घाईघाईने ही कार्यवाही करण्याचे कारण काय होते ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, कॉस्ट अपडेट करण्यासाठी साईट व्हिजीट करण्याची आवश्यकता नसते. साईट व्हीजीट करणे गरजेचे नसताना सुद्धा LBG कंपनीने एकदा साईट व्हिजीट केलेली आहे. कारण कॉस्ट डिटरमाईन करीत असताना सिमीलर वर्क्समध्ये अशा कामाची किती किंमत असते हे बघितले जाते.

३.४१ सुधारित अंदाजपत्रक करण्यासाठी साईट व्हिजीटची आवश्यकता नसेल तर ते योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले व विचारणा केली की, एका कन्सल्टंटने प्रती किलोमिटर १५५ कोटी रुपयांचा दर दिला आणि दुसऱ्याने २८५ कोटी रुपयाचा दर दिला. पहिल्या कन्सल्टंटचा दर विभागाला कमी वाटला त्यामुळे कन्सल्टंटने प्रति किलोमिटर १५५ कोटी रुपये ही किंमत कोणत्या आधारावर स्विकारली ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस खुलासा केला की, १५५ कोटी व २८५ कोटींचा आकडा यासाठी दिला की, केरळ राज्यातील कोचीमध्ये सिमीलर कामाचे टेंडर मागविले होते. त्या ठिकाणी दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने तयार केलेले इस्टीमेट प्रती किलोमीटर १५५ कोटी रुपयांचे होते. परंतु त्यांच्याकडे जे टेंडर आले होते ते प्रती किलोमीटर २८५ कोटी रुपयांचे होते.

३.४२ आपल्याला प्रती किलोमीटर किती किंमत आली ? असे समितीने विभागास विचारले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी उत्तरीत केले की, प्रति किलोमिटर १४० कोटी रुपये ही किंमत आली असून ही किंमत कोची येथील प्रकल्पाच्या किंमतीपेक्षा कमी आहे.

३.४३ एमएमआरडीए, एमएसआरडीसीच्या माध्यमातून मुंबईत सी-लिंकचे ब्रीज बांधले, इतर उड्डाणपूल बांधले. त्यावर दुसरे काहीही इन्फ्रास्ट्रक्चर उभे केलेले नाही. विभागाकडे अशी कोणती यंत्रणा होती की, कॉस्ट कम्पॅरिझनसाठी साईट व्हिजीट करण्याची सुद्धा आवश्यकता पडली नाही. पुढे कोणत्या अडचणी निर्माण होतील, त्याचे निराकरण कसे होईल याची किंमत अंतर्भूत न करता, केवळ एक व्हीजीट करून सर्व कागदपत्रे बनविण्यात आली आहेत. याचा अर्थ असा होतो की, LBG कंपनीने जे सांगितले ते विभागाने मान्य केले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की, अंदाजपत्रकातील कॉस्ट अपडेट करण्यासाठी साईट व्हिजीट करण्याची किंवा इतर टेक्नीकल गोष्टींची पुनर्तपासणी करण्याची गरज नसते. डीपीआर तयार करण्यासाठी सुरूवातीला फिजिबली रिपोर्ट तयार करावा लागतो. त्यावेळी प्रत्येक कंपोनंटला किती कॉस्ट लागते याचा अंदाज येण्यासाठी साईट बघावी लागते. एवढेच नव्हे तर प्रत्येक बाबीमध्ये अतिशय डिटेलमध्ये जावे लागते. या कामी वेळ सुद्धा जास्त लागतो. अंदाजपत्रकात कोणता कंपोनट समाविष्ट करावयाचा राहिला आहे किंवा कोणत्या कंपोनंटची कॉस्ट कमी घेतली आहे यासाठी साईट व्हिजीट करण्याची आवश्यकता नसते.

३.४४ विभागाने उदाहरणदाखल कोची येथील टेंडरबाबत सांगितले. परंतु समितीच्या माहितीनुसार कोचीची टेंडर प्रक्रिया मुंबईतील टेंडरच्या खूप कालावधीनंतर झालेली आहे. मग मुंबईतील कामाच्या टेंडरसाठी कोचीच्या टेंडर प्रक्रियेचा आधार कसा घेऊ शकता ? कोचीचे रेट हे मुंबईच्या

रेटला जस्टीफाई करू शकत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कोचीचे रेट घेऊन मुंबईच्या कामाचे रेट जस्टीफाई करणे हा हेतू विभागाचा नाही.

३.४५ जर कोचीचे रेट सन २००८ पूर्वीचे असते तर ते रेट मुंबईच्या बाबतीत विभाग रेफर करू शकले असते. परंतु सन २००८ नंतरच्या रेटला २००८ पूर्वीच्या टेंडरच्या रेटशी विभागाने जस्टीफाई केले असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता

३.४६ विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, कोचीच्या रेटनुसार मुंबईतील कामाचे रेट दिलेले आहेत असे नाही. त्या वेळच्या दराचे पृथःकरण करुन हे दर योग्य आहेत आणि त्याला १६ टक्के अबव्हमध्ये देणे शक्य आहे असा निर्णय तत्कालीन कार्यकारी समितीने घेतला होता. आज समिती अशी शंका व्यक्त करतो की, हा दर जास्त आहे का विभागाने LBG कंपनीने केलेल्या कामासोबत डीएमआरसीने केलेले काम समितीसमोर सांगितले आहे. एक-दोन वर्षाच्या फरकाने दोन स्वतंत्र यंत्रणांनी तयार केलेल्या टेंडरमधील एस्टीमेटचे दर हे साधारणपणे या रेंजमध्ये येत आहेत, कोचीचे दर बघून विभागाने मुंबईचे टेंडर मान्य केले असे विभागाचे देखील म्हणणे नाही.

३.४७ विभागाने सादर केलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, केरळ यांच्या बरोबर तुलना केली असता, मुंबई मोनो रेलची किंमत वाजवी असल्याचे दिसून येते. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मुंबईच्या दराची केरळशी तुलना केली असता काय निदर्शनास येते, असा स्पेसिफिक प्रश्न होता. त्यानुसार विभागाने अशा प्रकारचे उत्तर दिले.

३.४८ या अनुषंगाने आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस सांगितले की, "The detailed calculation of how the price of Mumbai monorail was reasonable as compared to the price of Kerala monorail along with the supporting documents in this regard may be furnished to PAC." असा मुद्दा महालेखाकारांनी उपस्थित केल्याच्या अनुषंगाने विभागाने सदरहू माहिती दिली आहे. त्यावेळी उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारावर निर्णय घेतला. आता पूर्वलक्षीप्रभावाने जरी विचार केला तरी तो निर्णय चुकीचा होता असे वाटत नाही. एवढाच उद्देश केरळ राज्याचे दर नमूद करण्यामागे होता.

३.४९ यावर समितीने असे मत मांडले की, केरळ राज्यातील दराला रेफर करणे योग्य नव्हते. दुसरा मुद्दा असा आहे की, जेव्हा LBG कंपनीची नियुक्ती केली तेव्हा त्यांना माहीत होते की, LTSE ने ऑफर केलेले आहे. त्यामुळे ही बाब लक्षात घेऊन त्या कंपनीने २३२९ कोटी रुपयांची किंमत दिली असेल. टेंडर आल्यानंतर त्याचे इव्हॅल्युएशन केले जाते व त्यानंतर काय करता येईल ते बघतो, असे होत नाही. या सर्व प्रक्रियेमध्ये कुठे तरी चूक झाली आहे काय, असा संशय महालेखाकारांच्या मनामध्ये आलेला आहे. परंतु या दराच्या बाबतीत विभाग जे जस्टीफाई करीत आहात ते योग्य नाही.

३.५० यावर आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की, त्यावेळी परिस्थिती वेगळी होती व योग्य कॉस्ट काढण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता. निविदा मुल्य मापन समितीमधील पदसिद्ध अधिकाऱ्यांची नावे समितीस देण्यास विभागाला सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुख्य सचिव हे निविदा मुल्य मापन समितीचे अध्यक्ष असून वेगवेगळ्या विभागाच्या सचिवांचाही समितीमध्ये समावेश आहे.

(विवरणपत्र क्र. ७)

३.५१ निविदा मुल्य मापन समितीने पुनर्निविदेचा व सर्व विकल्पांचा विचार केला होता परंतु पुनर्निविदा मागवून स्पर्धात्मक दर मिळण्याची खात्री नव्हती, हे खरे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाने त्यास सहमती दर्शविली.

३.५२ एखादा १००-२०० कोटी रुपयांचा प्रकल्प असेल तर त्याबाबत निविदा मुल्य मापन समितीने अशा प्रकारे निर्णय घेतला असता तर ते योग्य ठरले असते का ? दुसरी निविदा मागविली तर स्पर्धात्मक दर मिळण्याची खात्री नव्हती हे म्हणणे योग्य नाही. अंदाजापेक्षा अधिक दराची निविदा आल्यानंतर स्पर्धात्मक निविदेचा निर्णय घेऊन एमएमआरडीए, महानगरपालिका, शासनाने एकदा नव्हे तर तीन-तीन वेळा पुनर्निविदा मागविल्याची शेकडो उदाहरणे आहेत. याप्रकरणी निविदा मुल्य मापन समितीला पुनर्निविदा मागवून स्पर्धात्मक दर मिळणार नाही, अशी खात्री कशावरुन झाली ? सदरहू समितीमध्ये ॲडमिनिस्ट्रेटीव्ह पर्सन होते ते एक्सपर्ट नव्हते. त्यामुळे समितीने सदरहू समितीमधील पदसिद्ध अधिकाऱ्यांच्या नावाची मागणी केली आहे. सदरहू प्रकरणी कन्सलटंट निवडतानाही काही लोकांना अपात्र केले आहे. काही निविदा अशा आहेत की त्यामध्ये कन्फरमेशन ऑफ वर्क्स किंवा कमेन्समेंट ऑफ वर्क्सची डेट मागे पुढे झाली. तसेच, अटेस्टेट कॉपी नसतील, कन्सर्न ॲथॉरिटीचे कन्फर्मेशन नसेल तरी या कारणास्तव निविदा रद्द झाल्या आहेत. अशा सबबी करिता निविदा रद्द करण्यात येत असतील तर सदरहू प्रकरणी पुनर्निविदा मागवून स्पर्धात्मक दर मिळण्याची खात्री नसण्याची कारणे काय ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की, नियमित करण्यात येणारी रस्त्यांची कामे, उड्डाण पुल, पुल यांच्या कामासंदर्भात त्रुटी असल्याने निविदा रद्द केल्या जातात. सदरहू कामांसाठी एका वेळी टेंडर अधिक किंमतीचे आले म्हणून पुनर्निविदा मागविली तर हजारो कंत्राटदार टेंडर भरण्याकरिता इच्छुकता दर्शवितात. परंतु मोनोरेल सिस्टम प्रोव्हाईड करणाऱ्या जगभरामध्ये केवळ ४-५ कंपनी आहेत. सदरहू प्रकल्पाच्या निविदा प्रकरणी केवळ दोन कंपन्यांनी निविदा सादर केल्या होत्या. त्यामधील एक कंपनी पात्र ठरली नाही. सदरहू प्रकल्पास कमी दराची निविदा मिळेल असे त्यावेळी वाटले नाही त्यामुळे पुनर्निविदा न काढण्याचा निर्णय तत्कालीन प्रशासनाने घेतला होता.

३.५३ मे. राईट्स कंपनीकडे सदरहू केस रेफर केले असल्याचे पत्र लिहिले होते, अशी माहिती विभागाने समितीला दिली असून पण सदरहू पत्राची प्रत समितीस सादर कण्यात आली नाही. राईट्स या कंपनीने पत्राच्या संदर्भात काही उत्तर दिले आहे काय ? याबाबत समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी राईट्स या कंपनीने सदर पत्रासंदर्भात काही उत्तर दिले नसल्याचे सांगितले.

३.५४ मे. राईट्स या कंपनीची नियुक्ती करून त्यांना पत्र पाठविल्यानंतर त्यांच्या उत्तराची वाट न पाहता इतका महत्वपूर्ण निर्णय कसा घेतला ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी विदित केले की, पहिल्या वेळी करण्यात आलेले अंदाजपत्रक योग्य न वाटल्यामुळे मे.राईट्स कंपनीला पत्र देण्यात आले होते, त्यानंतर सदरहू अंदाजपत्रकामध्ये संबंधितानी सुधारणा केली होती परंतु ते ही योग्य वाटले नसल्याने दुसऱ्या कंपनीस नियुक्त करण्यात आले होते.

३.५५ मे.राईट्स ने पहिले अंदाजपत्रक १,५३९ कोटी रुपयांचे दिले होते, LTSE कंपनीने २,९७० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले होते ते ९३ टक्के अधिक असल्याने सुधारित अंदाजपत्रक करण्यास सांगण्यात आले होते. त्यानंतर अंदाजपत्रकात सुधारणा करून १,७७७ कोटी रुपयांचे दिले. मे.राईट्स या कंपनीस कोणत्या कारणास्तव नियुक्त करण्यात आले होते ? LTSE च्या दरानुसार विभागाने एलबीजी कंपनीशी वाटाघाटी सुरू केल्या ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस याप्रकरणी मार्केटमध्ये चौकशी करण्यात आली होती. या प्रकल्पामध्ये रेट, सिग्नलींग सिस्टम, सिव्हील वर्क या २-३ कंपोनंटचा समावेश आहे.

३.५६ १,७०० कोटी रुपयांचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर २,३०० कोटी रुपयांचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. २३०० कोटी रुपयांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने येणाऱ्या तफावतीबाबत मे.राईट्स कंपनीस विचारणा करण्यात आली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी मे.राईट्स कंपनीस विचारणा केली नसल्याचे सांगितले.

३.५७ याचा अर्थ लुईस बर्जर या सल्लागाराची नियुक्ती LTSE कंपनीला काम देण्यासाठीच करण्यात आली होती. मे.राईट्स कंपनीने १,५३९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले होते ते रिवाईज करून त्यांनी १,७७७ कोटी रुपये केले, त्याकरिता त्यांनी जवळपास ४ महिने अभ्यास केला होता. मे.राईट्सच्या म्हणण्याप्रमाणे काम द्यावयाचे नसल्याने लुईस बर्जर ग्रुपला सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले. याप्रकरणी कन्सल्टंट बदलण्याची आवश्यकता नव्हती. मे.राईट्स या कंपनीस दिल्ली मेट्रोचा अनुभव होता, ती केंद्र सरकारची कंपनी आहे. सदरहू कंपनीने मुंबईच्या परिस्थितीनुसार अंदाजपत्रक तयार केले नाही, असे आता सांगण्यात येत आहे. लुईस बर्जर या ग्रुपने प्रत्यक्ष प्रकल्प स्थळास भेट न देता २ आठवड्यात अंदाजपत्रक प्रस्ताव केला. परंतु मे.राईट्स या कंपनीने अंदाज प्रस्ताव सादर करण्यासाठी ४ महिने मेहनत घेतली आणि त्यांना मुंबईच्या कामाचा अंदाज नाही असे सांगण्यात येते. मुंबईमध्ये कामाची माहिती नसल्याने त्यांनी अवास्तव अंदाज प्रस्ताव तयार केला होता व त्यानंतर तो त्यांनी रिवाईज केला होता, तोही अवास्तव झाला, असे एमएमआरडीएकडून सांगण्यात येते. १,५३९ कोटी रुपयांचा अंदाज प्रस्ताव अधिक झाल्याने त्यांना सुधारित प्रस्ताव सादर करण्यास सांगितले होते. त्यानंतर १,७७७ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला. परंतु एलटीएसई कंपनी काम देण्यासाठी कन्सल्टंट बदलण्यात आला व त्यानंतर नियुक्त केलेल्या लुईस बर्जर ग्रुप या कन्सल्टंसीने २,३०० कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला त्यास १६ टक्के निकषाचे कारण देऊन तो मान्य करण्यात आला. ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली. व विचारणा केली की, निविदा उघडल्यानंतर लुईस बर्जर ग्रुपला नियुक्त करण्यात आले काय ? यावर आयुक्त, एमएमआरडीए यांनी होकारार्थी उत्तर दिले.

३.५८ १,७७७ कोटी रुपयांचे टेंडर उघडल्यानंतर लुईस बर्जर ग्रुपला अपॉईंट करण्यात आले याचा अर्थ ज्यांना काम द्यावयाचे त्यांच्याकरिताच हे सर्व करण्यात आले. टेंडर ओपन झाल्यानंतर कन्सल्टंट बदलून प्रकल्पाची किंमत वाढवून देण्यात आली. सद्यःस्थितीत एमएमआरडीए कोणत्याही टेंडरसाठी कन्सल्टंट किंवा कन्सल्टंसीच्या किंवा डीपीआर मध्ये ठरविल्यानुसार टेंडर ओपन केल्यानंतर कन्सल्टंट बदलेल का, त्यावेळी कन्सल्टंट बदलण्याची आवश्यकता का भासली अशी पृच्छा समितीने विभागास केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की, सर्वसाधारण कामांसाठी समितीने सुचविलेल्या पद्धती अवलंबिण्यात येत नाही. परंतु मोनो रेलचे काम वेगळ्या प्रकारचे काम होते.

३.५९ मोनो रेलचे काम वेगळ्या प्रकारचे असेल तर ते मे. राईट्स कंपनीला का देण्यात आले, त्यावेळी इंटरनॅशनल कन्सल्टंसीचा विचार का करण्यात आला नाही ? मे. राईट्स ही भारत सरकारच्या नवरत्न कंपनीच्या उप कंपनी पैकी एक कंपनी असून ती सरकारची कंपनी असल्याने तिला काम दिले असते तर काही हरकत नव्हती. मोनो रेलचे काम जगभरामध्ये ३-४ कंपन्या करीत आहेत असे एमएमआरडीएला वाटत आहे. सदरहू प्रकल्पासाठी कन्सल्टंसी करणारे लोक कमी होते ही माहिती असताना मे.राईट्स कंपनीला अपॉईंट करण्याचे कारण काय, त्यावेळी जागतिकस्तरावर टेंडर का काढण्यात आले नाही ? एका कंपनीला त्यांच्या कॉस्टनुसार काम द्यावयाचे असल्याने लुईस बर्जर कंपनीला कन्सल्टंट म्हणून नियुक्त केले आहे. त्यामुळे यावेळी कोण अधिकारी होते त्यांची ननावे काय ? अशी विचारणा समितीने केली असता सदरहू समितीवर आलेल्या अधिकाऱ्यांची नावे **(विवरणपत्र क्र. ९)** सादर करण्यात आली आहे.

३.६० निविदा उघडल्यानंतर सुधारित दर १,७७७ कोटी रुपयांवरुन २,३०० कोटी रुपयांवर गेले त्यानंतर ते आता २,७०० कोटी रुपयांवर गेले आहे व पुढे ते किती रुपयांवर जाईल हे देखील सांगता येणार नाही. तसेच " दुसरा सल्लागार नियुक्त करणे नियमबाह्य होते. कारण सल्लागारांना एलटीएसईने देऊ केलेले मुल्य माहीत होते आणि त्या टप्प्यावर सल्लागाराने निर्धारित केलेले प्रकल्पाचे मुल्यांकन हे पूर्वग्रहदूषित असण्याची

शक्यता होती. " महालेखाकारांच्या या आक्षेपाबाबत एमएमआरडीएने दुसऱ्या कन्सल्टंटची केलेली नियुक्ती नियमबाह्य होती . मे.राईट्स कंपनीने चार महिन्यांच्या कालावधीमध्ये तयार केलेले १,७७७ कोटी रुपयांचे सुधारीत अंदाजपत्रक दिल्यानंतर एमएमआरडीएने युक्तीवाद केला की, प्रकल्पांशी साधर्म्य असलेल्या इतर बांधकामांचे मुंबईच्या परिस्थितीमधील प्रचलित दर विचारात घेतले नाहीत. दुसऱ्या सल्लागारांनी मुंबईचे सर्व दर कार्यालयामध्ये बसून लक्षात घेतल्यामुळे त्यांच्या अंदाजपत्रकामध्ये १,१०० कोटी रुपये वाढ झाली व ती एमएमआरडीएला मान्य आहे. तसेच मे.राईट्स या सल्लागाराची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, मे. राईट्स या कंपनीने त्यांचा अहवाल दिल्यामुळे त्यांचे काम संपले होते.

३.६१ मे. राईट्स या कंपनीची नियुक्ती केवळ अहवाल देण्यासाठी करण्यात आली होती का ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी अवगत केले की, अहवाल देण्यासाठी मे.राईट्स कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती.

३.६२ मे. राईट्सने तयार केलेले अंदाजपत्रक कमी किंमतीचे का होते याबाबत चर्चा करावी असे एमएमआरडीएला वाटले नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, मे.राईट्सला दोन्ही अंदाजपत्रकामध्ये तफावत का येत आहे हे तपासण्याकरिता सांगता येणे त्यावेळी शक्य होते. परंतु उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, याप्रकरणी मे.राईट्सकडून काही खुलासा घेण्यात आला नाही.

३.६३ प्रकल्पाची किंमत १,७७७ कोटी रुपयांवरुन २,३२९ कोटी रुपयांवर गेल्यानंतर एमएमआरडीएने सदरहू तफावतीबाबत मे.राईट्स कंपनीशी सल्लामसलत केली होती का, नसेल तर का करण्यात आली नाही ? मे.राईट्स ही भारतीय कंपनी आहे. २,३२९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मे.राईट्स मान्य करणार नाही यामुळेच एमएमआरडीएने कन्सल्टंट बदलून लुईस बर्जर कंपनीची नियुक्ती केली. लुईस बर्जर कंपनीला नियुक्त करण्याबाबत संबंधित कंपनीनेच सुचविले असणार आहे असे मत समितीने व्यक्त केले.

" प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड " :-

३.६४ ' The Second qualified bidder was the consortium of LBG land AEIB and not LBG as a single entity. The Executive Committee had also approved the same consortium of LBG and AEIB. " for the consultancy work after exit of SOWIL and not LBG as a single entity. However, the consultancy work was awarded to LBG as a single entity violating executive committees dECision. Thus, award of consultancy work to an entity which was no longer the second quallfied bidder was irregular. सदरहू प्रकरणी स्पष्टीकरणामध्ये सांगण्यात आले आहे की, चायनीज प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीच्या अधिकाऱ्यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नव्हते. आपल्या देशातील फॉरेन सर्व्हीस मधील अनेक लोक परदेशी जात असतात व काही देशात ते त्यांच्या भाषेत बोलत असतात. अत्यंत उच्च पातळीवरील लोक ज्यावेळी परदेशी जातात त्यावेळी दोन्ही भाषा समजणाऱ्या दुभाषकाची नियुक्ती करण्यात येते. सदरहू प्रकरणीच्या कंत्राटामध्ये इंग्रजी भाषा अवगत असण्याबाबतची अट होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी होकारार्थी उत्तर दिले व सांगितले की, सदरहू कंपनीने इंग्रजी संभाषण कौशल्य असणारे अधिकारी उपलब्ध करून देऊ, असे त्यावेळी सांगितले होते परंतु त्यानुसार त्यांनी ते उपलब्ध करून दिले नाही.

३.६५ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) त्यांच्याकडून ड्राफ्ट अप्रुव्हलचे काम करून घेण्यात आले होते काय ? अशी विचारणा केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी नकाराथी उत्तर दिले.

३.६६ डिझाईन व ड्रॉईंग प्रुफ चेर्कीगसाठी ७.५ कोटी रुपये लागणार होते त्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या नियुक्तीबद्दल वेगळा निर्णय घेणे गरजेचे होते, पण सदरहू कंत्राटामध्ये इंग्रजीचे आवश्यक ज्ञान व संभाषण कौशल्याची अट असताना सदरहू कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे ते कौशल्य नव्हते. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी विशद केले की, सदरहू कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे इंग्रजी संभाषण कौशल्य नव्हते त्यामुळे त्यांचेशी संवाद साधणे शक्य नव्हते.

३.६७ सदरहू कंत्राट दिलेल्या कंपनीच्या अधिकाऱ्यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना बाजूला करण्यात आले. त्यानंतर सदरहू काम कोणामार्फत करण्यात आले अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, एलबीजी कंपनीची एईआयबी कंपनी भागीदार होती. परंतु त्यानंतर एईआयबी कंपनी एलटीएसई कंपनीमध्ये विलिन झाली. निविदेसाठी आवश्यक मुख्य पात्रता एलबीजीकडे होती. टेंडर दोघांच्या नावे होते व त्यामध्ये एलबीजी मुख्य कंपनी होती आणि तिची पार्टनर एईआयबी कंपनी होती. जॉईंट व्हेंचरमध्ये एखादी कंपनी बदलून दुसरे तज्ज्ञ आणता येतात.

३.६८ कंत्राटाच्या अटीमध्ये सदरहू बाब नमूद होती का ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी अवगत केले की, कंत्राटामध्ये कोणाच्या आधारावर पात्रता ठरली ही बाब महत्त्वाची असते. दोघांच्या आधारावर क्वालिफिकेशन झाले असेल तर कंपनी बदलता

येत नाही. याप्रकरणी एलबीजी कंपनी त्यांच्याकडे असलेल्या एक्स्पर्टीजमुळे क्वालिफाय ठरली आहे, त्यामुळे त्यांची पार्टनर असलेली दुसरी कंपनी निघून गेली तरी एलबीजीला कंत्राट देता येते.

३.६९ लुईस बर्जर कंपनीस प्रकल्पाची टेंडर प्रक्रिया, टेक्निकॅलिटी, आर्थिक विषय या बाबींच्या आधारे मे.राईट्स कंपनीस नंतर नेमणूक करण्यात आली होती. एलबीजी कंपनीस प्रकल्पावर सूचना द्यावयाच्या असल्याने त्यासाठी लागणाऱ्या कौशल्याच्या अनुषंगाने त्यांनी पार्टनर कंपनी घेतली. प्रत्येक निविदेमध्ये जॉईंट व्हेंचर करण्याची मुभा असते. त्यामुळे जॉईंट व्हेंचर कंपनीला वैद्यानिक तज्ज्ञ घेण्याचा अधिकार आहे. असे मत मांडून समितीने विचारणा केली की, कंत्राटामध्ये सदरहू अटीचा समावेश करण्यात आला होता का ? यावर विभागीय सचिवांनी सदरहू अटींचा समावेश करण्यात आल्याचे सांगितले.

३.७० सोवेल कंपनीला एमएमआरडीएने पूर्वी ऑर्डर दिली आहे. " M/s Sowil company did not have experience of Mono Rail. " Then how did it qualify in the tendering process to be appointed as PMC अशी समितीने विचारणा केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी अवगत केले की, मे.सोवेल कंपनी सोबत दुसरी एक कंपनी भागीदार होती व अनुभव ग्राह्य धरताना दोघांचा अनुभव ग्राह्य धरण्यात येतो.

३.७१ एमएमआरडीएने सांगितल्याप्रमाणे मे.सोवेल कंपनीला प्रत्यक्षात अनुभव नाही, त्यांच्या भागीदारांना अनुभव आहे. इंग्रजी संभाषण कौशल्य त्यांच्या अधिकाऱ्यांकडे आहे असे सांगून त्यांनी एमएमआरडीएची फसवणूक केली, असे ही सांगितले आहे. मे.सोवेल कंपनीचे नाव एनएचएआय यांच्या काळ्या यादीत होते, ही बाब विभागास माहिती नव्हती का ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, सदरहू बाब त्यावेळी एमएमआरडीएला माहिती नव्हती व त्याबाबतची माहिती सदरहू कंपनीने दिली नव्हती.

३.७२ मग सदरहू कंपनीने फसवणूक केल्या प्रकरणी तिच्या विरुद्ध कोणती कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की, त्यांनी काम सोडले, त्यावेळी त्यांनी जवळपास ८ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची देयके सादर केली होती, ती विभागाने दिलेली नाहीत. त्यांना एक पैसाही दिलेला नाही.

३.७३ अशा कंपन्यांना फक्त काळ्या यादीत टाकणे एवढीच कारवाई करायची का, अशा कंपन्यांच्या संदर्भात विभागाकडे काय तरतूद आहे. त्यांनी जर फसवणूक केली असेल तर ब्लॅक लिस्ट करण्याव्यतिरिक्त काय तरतूद आहे ? कारण विभागाने फक्त ब्लॅक लिस्ट करण्याची कारवाई केल्यास अशा कंपन्या सहज सुटून जातात असे मत समितीने व्यक्त केले व विचारणा केली की, ही आंतरराष्ट्रीय कंपनी असताना सुद्धा विभागाने त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही का ? यासंदर्भात आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की, विभागाने त्यांच्यावर आर्थिक कारवाई केली आहे. त्यांचे साडे आठ कोटी रूपयांचे पेमेंट केलेले नाही. यालाच दंड किंवा आर्थिक कारवाई केली असे देखील म्हणता येईल.

३.७४ सदर कंपनीने आठ कोटी रुपयांचा फ्रॉड (लबाडी) केली तर त्या कंपनीवर निर्बंध घालण्याचे आदेश विभागाने जारी केले का ? असा प्रश्न समितीने विचारला असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, याला फ्रॉड म्हणता येत नाही. त्यांनी माहिती लपविली.

३.७५ कंपनीने लपविली म्हणून हे केले असे आदेश जारी केले का जेणेकरून त्यांनी पुढे विभागाकडून कशाचीही मागणी करू नये. अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी विशद केले की, विभागाला ही माहिती दिली नव्हती. त्यामुळेच विभागाने पैसे दिले नाहीत.

३.७६ परंतु हा निर्णय ऑनपेपर घेतला आहे का ? कारण त्यांची थकबाकी विभागाकडे असल्यामुळे कंपनी पुढेमागे सदर पैशांची मागणी करतील त्यामुळे कंपनीने माहिती दिली नाही म्हणून पैसे दिले नाहीत असा निर्णय घेतला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी ऑर्डरमध्ये काय लिहिले होते ते बघून समितीस माहिती सादर करण्यात येईल.

३.७७ विभागाने पैसे घ्यावे आणि ते पैसे सरकार जमा करावेत. मे. राईटस् कंपनीने कमी अंदाजपत्रक दिले. राईट्स कंपनीबाबत नंतर निर्णय घेण्यात येईल असे ठरले. आता सेविल कंपनीचा मुद्दा उपस्थित झाला. अशाप्रकारे किती कंपन्यांना फसविण्याची परवानगी विभाग देणार आहे ? या संदर्भात तरतूद नसेल तर तरतूद करावी लागेल. अशाप्रकारे प्रत्येक कन्सल्टंट शासनाची फसवणूक करणार असेल तर यांना कुठे जबाबदार धरुन आणि त्यांना कशा पद्धतीने कायद्याची जरब बसवू शकू हे विभागाने पडताळले पाहिजे असे अभिप्राय समितीने व्यक्त केले असता समितीच्या या अभिप्रायावर विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, येथून पुढच्या कामकाजामध्ये याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. कन्सल्टंटच्या अपॉईंटबद्दल, त्यांच्यावर टाकणाऱ्या शर्तीबद्दल आणि जर ते त्यांना नेमून दिलेले काम करू? शकले नाहीत तर त्यांच्यावर कोणती कारवाई करावी लागेल याबद्दल विचार करण्यात येईल.

३.७८ समितीच्या माहितीप्रमाणे एलबीजीला कन्झॉरशियम किंवा जॉईंट वेंचरमध्ये टेक्निकल एक्सपर्ट आले होते, त्यांना आणि सेविला कंपनीला मोनो रेलचा अनुभव नव्हता. याबाबत समितीने विचारले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी नमूद केले की, दुसऱ्या पार्टनरला अनुभव होता. जॉईंट वेंचरमध्ये भागीदार असतात.

३.७९ म्हणजे आता त्यांनी तिसरे पार्टनर घेतले, त्यांना तो अनुभव होता. ते प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार होते. प्रकल्प सक्तीचा होणार तेव्हा त्यांचे व्यवस्थापन बघण्यासाठी सल्लागार नेमण्याच्या शिफारशीही एलबीजी देणार होती. कारण ते प्रकल्प सल्लागार होते. सुरू असलेले प्रकल्प करण्यासाठी जे सल्लगार नेमले होते, त्यांच्या नेमणुकीमध्ये एलबीजीची काय भूमिका होती, त्यांचे मत देण्यासाठीचे किंवा आढावा घेण्यासाठीचे किंवा अभिप्राय देण्यासाठीचे पक्षकार होते का ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी खुलासा केला की,

३.८० एलबीजीचा रोल हा प्रकल्प व्यवस्थापन समिती म्हणून सुपरव्हिजन ऑफ वर्क एवढाच होता.एलबीजीचे कार्य प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणून फक्त पर्यवेक्षण करणे एवढेच होते

३.८१ लयुस वजीर ग्रुपची नियुक्ती कोणत्या तारखेला केली ? असे समितीने विभागास विचारले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, L.B.G. ची नियुक्ती मे, २००९ मध्ये केली.

३.८२ तथापि, महालेखाकार यांच्याकडे असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, मार्च, २०१० ला LBG ने सोविलला प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नियुक्त केले आहे असे करारात आहे. व सेविला LBG ने ४ कोटी रुपये दिले असा देखील करार आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता सदर बाबत विभागाच्या नजरेत आली नाही असे आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस सांगितले.

३.८३ एखाद्या कंपनीच्या काम करण्याच्या बाबतीत त्या कंपनीचा अगोदरचा कामाचा अनुभव काय आहे याचा विचार केला जातो. तो त्या कंपनीच्या नावावर केलेला कामांचा कार्यानुभव असला पाहिजे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या बाबतीत अशा पद्धतीची काय तरतूद आहे की, प्रत्यक्ष त्या कंपनीच्या नावाने अनुभव नसला पण काही सल्लागार त्यांनी हायर केले, ज्यांना अनुभव आहे तर त्यांना ग्राह्य धरण्यात यावे. याबाबत विभागाकडे काही तरतूद आहे का ? अशी विचारणा समितीने विभागास केली असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, जॉईंट वेंचर केलेल्या कंपन्या असतात, त्यामध्ये २-३ भागीदार असतात, त्यामधील कोणालाही जर अनुभव असेल तर तो पात्र ठरु शकतो. प्रत्येक कंत्राटदाराच्या संदर्भात ठराविक नियम असतात. एखाद्यामध्ये असेही असू शकते की, सर्वांना एकत्र करून अनुभव किंवा एक्सपर्टिज ग्राह्य धरण्यात येतात किंवा फक्त लिड पार्टनरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येतो. ते वेगवेगळ्या करारामध्ये वेगवेगळे असते. प्रकल्पामध्ये जे एकूण भागीदार आहेत, त्यातील कोणालाही अनुभव लागतो, गुणवत्ता लागते. तो अनुभव त्यांच्याकडे असला तर त्यांना गाह्य धरतो. एकाला अनुभव असेल तरी तो सर्वांचा आहे असेही ग्राह्य धरले जाते.

३.८४ काळ्या यादीत गेलेल्या कंपन्या जर निविदेमध्ये असतील तर त्या निविदाही काळ्या यादीत जातात. सोविल कंपनी जर काळ्या यादीत असेल आणि त्यांनी कोणासोबत करार केले असेल तर ते जीव्ही फ्लॅककलिस्ट होते असे मत समितीने मांडले असता समितीच्या मताशी विभागाने सहमती दर्शवून पुढे सांगितले की, सोविलचा जो काही पार्टनर असेल तो देखील काळ्या यादीत जातो.

३.८५ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, असे असेल तर त्यांच्या निविदा ह्या काळ्या यादीत जायला पाहिजे होत्या तर फ्लॅक लिस्टमध्ये एनएचआय सारखी एक नावाजलेली एजन्सी आहे, जी हजारो कोटी रूपयांची कामे करीत आहे. भारतातील फ्लॅक लिस्ट करण्यासाठीची यंत्रणा युनिफॉर्म आहे का, एका ठिकाणी ब्लॅक लिस्ट केले की दुसऱ्या ठिकाणी काम करता येते किंवा येत नाही, अशा प्रकारची काही यंत्रणा आहे का ? मे. सोवेल कंपलीने फसवणूक केली. विभागाने त्यांचे ८ कोटी रूपये दिले नाहीत. मे.सोवेल कंपनीने नंतर एलबीजीकडून ४ कोटी रुपयाचा करार करून त्याला परत केले. विभागाने नमूद केल्याप्रमाणे गुणवत्ता चांगला असावी, अंदाजपत्रक चांगले असावे, सर्व काही योग्य असल्यामुळे विभागाने लुईस ॲन्ड बर्गर ग्रुपला नियुक्त केले. परंतु सदर नियुक्ती ही हेतुपरस्पर असल्याने समितीला संभ्रम निर्माण झाला आहे.

३.८६ विभागाने ज्या भूमिकेतून एलबीजीची नियुक्ती केली, पुढची गुणवत्ता, काही तडजोड, खूप मोठ्या प्रमाणात रचनेमध्ये बदल, ५० वर्षांची कल्पना आता २० वर्षांवर आली आहे, अशा प्रकारची पूर्ण एलबीजीच्या नियुक्तीमध्ये झालेली प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती ही मुलतः चुकीची आहे. त्यामुळे विभाग एलबीजीच्या नियुक्तीचे योग्य ते समर्थन विभाग करून शकल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. जस्टिफाय केले नाही तर समितीला असा व्ह्यू घ्यावा लागणार आहे की, आपण सोविलला बाजूला काढले. विभागाकडून सांगण्यात आले की, ८ कोटी रूपये थांबविले आहेत. पण त्यांनी सोविलबरोबर अंडरस्टँडिंग करून त्यांना बाहेर काढले असे ॲग्रीमेंटमध्ये दिसत आहे. यावर खुलासा करताना आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस सांगितले की, त्यानी काही पैसे पूर्वी दिले हे पूर्वी विभागाच्या लक्षात आले नाही.

३.८७ यासंदर्भात महालेखाकारांनी खुलासा केला की, महालेखाकार कार्यालयास यासंदर्भातील सर्व कागदपत्रे आयुक्त, एमएमआरडीए यांच्याकडून प्राप्त झाली आहेत.

३.८८ या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, जर ही गोष्ट विभागास पूर्वी माहित नव्हती तर त्याबाबतचा खुलासा विभाग मागविणार आहे का ? कारण समितीचे असे स्पष्ट मत आहे की, सदर कंपनीस तुमच्या म्युच्यअर अडरस्टँडीगप्रमाणे या बीडमधून बाहेर काढण्यासाठी ही कॉम्पनसेशन अमांडर आहे. त्यामुळे यासंदर्भात विभागाने स्पष्ट उत्तर मागवावे. कारण सदर कंपनीस जर कोर्टात घेऊन जायचे असेल तर या सर्व गोष्टींची आवश्यकता आहे. यावर आयुक्त, एमएमआरडीए यांनी समितीस आश्वासित केले की, ते सर्व कागदपत्र तपासून घेतील आणि जर खरे असेल तर जरुर त्यांच्याकडून खुलासा घेण्यात येईल.

३.८९ एलबीजीला नियुक्त करण्याच्या शासनाच्या भूमिकेला यश आलेले नाही. पुढील परिच्छेदामध्ये प्रत्येक ठिकाणी फेऱ्या कमी कराव्या लागणार, age of the structure देखील कमी झाले आहे, अशा खूप त्रुटी काढलेल्या आहेत. याबाबत विभागास खुलासा करण्यास सांगितले असता आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले की, आता त्याचे स्पष्टीकरण देणे शक्य होणार नाही. कारण जोपर्यंत विभाग त्यांच्याकडून खुलासा मागवत नाही, त्यांचे काय उत्तर आहे, त्यांनी असा करार का केला हे समजत नाही, तोपर्यंत उत्तर देणे शक्य होणार नाही.

३.९० चार कोटी रूपयांचा व्यवहार का झाला तो वेगळा मुद्दा आहे. विभागाने एलबीजीला नियुक्त केले. एलबीजीला ज्या भूमिकेतून व ज्या उद्देशाने नियुक्ती केली, ती भूमिका व उद्देश पूर्णपणे, १०० टक्के योग्य दिसत नाही. प्रत्येक ठिकाणी रिलॅक्सेशन देण्याचे काम केले आहे. जेव्हा विभागाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनी म्हणून राईटस्ला काढून एलबीजीला आणले, तेव्हा हे ठरले होते की, कंपनीला काम द्यायचे आहे, त्यासाठी एलबीजी आणली तरच हे काम होणार, नाही तर होणार नाही आणि यानंतर या कंपनीला २३०० कोटी रुपयांमध्ये काम दिले होते, त्या कामाची किंमत २७०० कोटी रूपयांपर्यंत वाढली. सर्व कामांच्या डिझाईनमध्ये कन्सेशन करून घेतले. एलबीजी आहे तरच होणार असे झाले. एलबीजीला हेतूपुरस्सर पीएमसी म्हणून अपॉईंट केले आणि कन्सल्टंट म्हणून चालू ठेवले. हे सगळे स्पष्ट आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जाहीर निविदा पद्धतीने २ कंपन्या पीएमसी म्हणून आल्या. तांत्रिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या दोन्हींच्या वेटेजप्रमाणे बिड आले, त्याप्रमाणे सोविलला देण्यात आले, ते काम करू? शकले नाहीत, त्यांच्या त्रुटी आढळल्या म्हणून त्यांना बाजूला करून, आर्थिक नुकसान होणार नाही हे लक्षात ठेवून, एल-२ होता, जो दोन नंबरचा सल्लागार होता, त्याला सल्लागार म्हणून नियुक्त केले. आपण ही वस्तुस्थिती फक्त लक्षात ध्यावी. जाहीर निविदा पद्धतीने हे सर्व झाले आहे.

३.९१ परंतु विभागाने एलबीजीची नियुक्ती ६ महिन्यांनंतर केली ना ? असा प्रश्न समितीने उपस्थित करून पुढे अशी सूचना केली की, हे प्लॅन्ड मॅनिप्युलेशन आहे. त्यामुळे त्या समितीच्या सर्व सदस्यांची नावे विभागाने समितीस सादर करावीत. कोणत्या पद्धतीने सल्लागार नेमले, पहिल्यांदा कंपनीचे कसे वेगळे केले, नंतर सल्लागार म्हणून एलबीजी कशाला आणली, याकरिता एमएमआरडीएच्या बैठकीत जे काही ठरले असेल तसेच यासाठी बैठकीचे कार्यवृत्त एमएमआरडीए कार्यालयातून मागवावीत. सदर माहिती विभागाकडून प्राप्त झाली आहे. (विवरण पत्र क्र. ८)

' संकल्पचित्रातील अडचणी '

३.९२ या परिच्छेदासंदर्भात दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी पुन्हा साक्ष घेण्यात आली. यापूर्वी दिनांक १५ जून, २०१६ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी महालेखाकार कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी मोनोरेल संदर्भात पॉवर पाईट प्रेझेंटेशन बघून घेण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगाने दिनांक १० ऑगस्ट २०१६ रोजी साक्षीमध्ये पॉवर पॉईट प्रेझेंटेशन महालेखाकार कार्यालयाकडून देण्यात आले.

३.९३ सदर प्रेझेंटेशनमध्ये महालेखाकारांनी अवगत केले की, ३.१.२.४ ' संकल्पचित्रातील अडचणी ' संदर्भात यापूर्वी चर्चा झाली होती. त्यामधील काही मुद्यांसंदर्भात सादरीकरणाच्या वेळी महालेखाकारांनी माहिती दिली की, डिजाईन के जो इश्यूज थें, Guideway design not conforming to axle load of the rolling stock car. कॉन्ट्रॉक्ट कंडीशन के अनुसार ऐसा मुद्दा था कि जो गाइडवे स्ट्रक्चर बननी थी वह मॅग्जीमम एक्सेल लोड ऑफ रोलींग स्टॉक कार को बीअर कर सके. लेकिन महालेखाकार कार्यालयाने ऐसा पाया कि गाइडवे का जो सिव्हील स्ट्रक्चर बनाया गया उसकी बीअरिंग कपॅसिटी है वह ११.७२ टन की है. लेकिन कार जिस पर चलने वाली है उसका एक्सेल लोड १३.२७ टन था जो एक्ससेपटेड है. हमारे रिमार्क ये ही थे कि लार्सन अँन्ड टुब्रो ऑफ इंडिया आणि स्कोमी इंजिनियरींग ऑफ मलेशिया(एलटीएसई) या कॉन्ट्रॉक्टर पर पेनल्टी नहीं लगायी गई है. उन्होंने जो रोलींग स्टॉक लाया वह गाइडवे स्ट्रक्चर के एक्सेल लोड बीअर करने की कॅपॅसिटी थी उसमें अंतर था.

३.९४ दूसरा इश्यू यह है कि एमएमआडीए पर जिम्मेदारी आ जाएगी कि जो गाइडवे स्ट्रक्चर अब बना हुआ है उसका मेन्टेनन्स और दूसरा जो भी खर्चा होगा वह एमएमआरडीए को भविष्य में बेअर करना होगा. जो जिम्मेदारी है वह फिक्स होनी चाहिए. गाइडवे स्ट्रक्चर रोलींग स्टॉक कार का उतना लोड बेअर नहीं कर पा रहा है जो कि एक्सेस है. यदि कोई दुर्घटना होती है तो उसके लिए कौन जिम्मेदार रहेगा ? एक इश्यू ऐसा है कि जो प्रोजेक्ट मैनेजमेंट कन्सल्टंट हैं उनके काम के स्कोप में यह शामिल था कि उसमें जो कार रन करने वाली है उसका स्पेसिफिकेशन और बाकी सारी बातें व्हेरिफाय करना था. इस इश्यू की तरफ पहले ध्यान क्यों नहीं दिया गया ? जो स्ट्रक्चर बनाया गया उसका बेअरींग कॅपॅसिटी कम है और ऊपर जो काम रन करेगी उसकी कपॅसिटी ज्यादा है.

३.९५ विभागाच्या मागच्या साक्षीमध्ये विभागाने सांगितले होते की, मोनोरेल कारचे वजन विभागाच्या नंतर लक्षात आले आहे. कारण It was only estimated आणि एक्सेल लोडची कॉस्टींग आपल्याला सांगता येत नव्हती. कारण It was estimated only. जे दीड टन वाढले आहे त्याला काही फरक पडणार नाही, असे विभागाने नमूद केले होते. यावर महालेखाकारांनी " No penalty is levied for violation of contract. " . Therefore, whether violation is there or not? असा आक्षेप घेतला. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या संदर्भात कराराचे उल्ल्घन झालेले नाही. परंतु फरक आहे. पण महालेखाकार कार्यालयांचे

अधिकारी परिगणना करतात ते जास्तीत जास्त भाराच्या संदर्भात असून पहिल्या आणि शेवटच्या डब्यामध्ये जास्त भार आहे. मधल्या डफ्र्यांचा भार कमी आहे. सरासरी भार ११.७२ असल्याने जुळते आणि म्हणून त्यामध्ये उल्लंघन झालेले नाही.

३.९६ सदर खुलाशावर समितीने असा मुद्दा उपस्थित केला की, " MMRDA would be saddled with the continuous maintenance of the structure. " . एमएमआरडीएने नमूद केल्यानुसार उल्लंघन झालेले नाही. हे मान्य आहे तथापि, यामध्ये देखभाल व दुरुस्तीमुळेसुद्धा खर्च वाढणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

३.९७ पहिला डब्बा आणि शेवटचा डब्बा यासंबंधी प्रत्येक निविदेमध्ये तपशिल होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या आणि शेवटच्या डब्याचे एक्सेल लोड जास्त असते आणि मधल्या डब्यांचे एक्सेल लोड कमी असते.हा समजूतीचा मुद्दा आहे. महालेखापालांचा समजूतीचा मुद्दा वेगळा आहे आणि विभागाचा समजूतीचा मुद्दा वेगळा आहे. महालेखापालांनी जो मुद्दा काढला तो जास्तीत जास्त कार्यभाराच्या प्रमाणे काढला आहे आणि विभागाने तो सरासरी कार्याभाराप्रमाणे काढला आहे. चारही डब्यांचा सरासरी कार्यभार बीमच्या कार्यभाराशी जुळतो. तसेच यामुळे काही विपरीत परिणाम होऊ शकतात काय, यासंदर्भात जर्मनीच्या एजन्सीकडून सर्वेक्षण करून घेतले होते. त्यांनी असे म्हटले की, याचे विपरीत परिणाम होणार नाहीत, केवळ देखभालीसाठी काही वेळापत्रक बनवावे लागेल.

३.९८ नियमित देखभालीसंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, रोलींग स्टॉक लोड वाढला तरी काही फरक पडत नाही. परंतु आता विभागाने सल्लागाराकडून ते तपासले की, इतर भाराला ते सहन करेल. परंतु विभागास नियमित देखभाल करावी लागेल, जर्मनच्या एजन्सीनेसुद्धा तोच प्रश्न उपस्थित केला की, या देखभालीचा खर्च वाढणार आहे व तो खर्च कोण उचलणार अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, त्यामध्ये नियमितपणे देखरेख ठेवावी लागते. त्यावर जास्त खर्च होईल. ही बाब नाही परंतु विभागास यामध्ये देखरेख ठेवावी लागेल आणि कुठेही काही नजरेस आले तर तत्काळ त्याला दुरुस्त करावे लागेल यामुळे किती खर्च वाढेल किंवा खर्च वाढेल की, नाही हे सध्या सांगता येत नाही, परंतु हा प्लॅग केलेला इश्यु आहे, यामध्ये सतत देखरेख ठेवावी लागेल.

३.९९ आता निव्वळ भार वाढल्यामुळे हे होत असून त्यामुळे सतर्क रहावे लागणार आहे व दक्षता घ्यावी लागणार आहे. जर ते डीझाईन प्रमाणेच आले असते, तर हा प्रश्नच उद्भवला नसता. तसेच ' The PMC was also responsible as its scope of work included visit to manufacturer us Rolling stock site and verifying its quality. ' . म्हणजेच प्रकल्प व्यवस्थापन (PMC) सल्लागारांनी हे केले नाही. विभागाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) कशासाठी ठेवले आहेत. विभागाने त्यांना कोट्यावधी रुपये दिले असून त्यांना याच कामासाठी मोबदला दिलेला आहे. प्रदान करूनही ते तिकडे गेले नाही आणि तो भार त्यामुळे वाढला. पुढील देखभाल व्यक्तीशः (मॅन्युअली) करु द्या किंवा खर्चिक करु द्या, अखर्चिक असुद्या परंतु हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लगारांचे काम होते व त्यांनी ते केलेले नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून विचारणा केली की, त्यामुळे सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारावर काही दंडात्मक कारवाई करणार काय ?

३.१०० यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस खुलासा केला की, भार वाढला म्हणजे पीएमसीमुळे भार वाढला असे नाही. पुरवठादाराने ट्रेन्स तयार करून दिल्या. त्यांना पूर्वी केलेल्या आराखडामध्ये काही भार बदलावे लागले व त्यामुळे भार वाढला. त्यामध्ये पीएमसीचा दोष धरता येणार नाही. परंतु त्यांनी त्याकडे लक्ष वेधले की, हा भार वाढलेला आहे. त्यामुळे भार वाढल्यानंतर काय करता येईल, याबाबत त्रयस्थ संस्थेकडून (Third Party) तपासणी केली व त्यांनी म्हटले की, असे विभागाने देखभालीबाबत अनुसूची (मेन्टेनन्स शेडयुल) तयार करावे व त्यामुळे विपरीत परिणाम होणार नाही.

३.१०१ विभागाने मान्य केलेले आहे की, पुरवठा करताना काही कारणांमुळे त्याचा भार वाढला. म्हणजे सरासरी भार काढण्याची पद्धत त्यावेळी ठरविण्यात आली नव्हती. या बाबींचे समर्थन करण्यासाठी अशाप्रकारचे स्पष्टीकरण विभाग समितीस करत असल्याने समितीने खेद व्यक्त केला. त्या गाडीचा भार काही पार्ट बदलल्यामुळे किंवा काही फेरबदल केल्यामुळे त्यांचा भार वाढला. तसेच त्या स्ट्रक्चरची क्षमता ११.७२ टन आहे आणि ज्यावेळी त्यांचा भार १३.२७ टन येतो व तो भार विभागण्यात येतो असे विभागीय प्रतिनिधी सांगत आहेत. भाराच्या विभागणीबाबत विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, विभागाने संपूर्ण ट्रेनचा भार ग्राह्य धरला. १३.७२, ११.०७, ११.०७ अशा प्रकारे चार डब्ब्यांच्या भाराची बेरीज केली आणि त्याला चारने विभागून सरासरी कार्यभाराची परिगणना केली

३.१०२ विभागाने दिलेल्या माहितीवरून समितीने विभागाच्या ट्रेनच्या भाराची विभागणी करण्याच्या पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली व असे मत समितीने व्यक्त केले की, पुरवठादाराकडून चुका झाल्यामुळे ट्रेनचे वजन वाढले म्हणून विभाग ते स्पष्टीकरण करण्याचे प्रयत्न करीत आहे. परंतु तांत्रिकदृष्टया ट्रेन ही नेहमी मुव्हींग नसतेच. ट्रेन कुठेही थांबू शकते व कुठेही काही होऊ शकते. त्यामुळे तांत्रिकदृष्टया नेहमी मुव्हींगचे समर्थन विभाग करु शकत नाही. त्यामुळे सदर बाब पुन्हा सल्लागाराकडून पडताळून घ्यावी असे समितीने सुचविले.

३.१०३ जर्मनी येथील कंपनीने पूर्ण युएल करून दिलेले आहे. परंतु जर्मनीमध्ये एवढा फरक झाला असता किंवा असे झाले असते तर त्यांनी मान्य केले असते काय, असे महालेखाकारांनी त्याच कंपनीला विचारल्यावर कंपनीने नाही, असे म्हटले होते. ही माहिती समितीला महालेखाकार

यांच्याकडून मिळालेली आहे. भारतात मनुष्याच्या प्राणाची किंमत नाही असे विभागाचे मत आहे का? अशी विचारणा समितीने केली कारण इव्हेल्युट केलेल्या जर्मनीच्याच कंपनीने नाही, असे सांगितलेले आहे. असेही समितीने नमूद केले.

३.१०४ यावर विभागीय प्रतिनिधींनी स्पष्टीकरण दिले की, महालेखाकार यांच्या अहवालामध्ये अशी चर्चा झाली असल्याचे कुठेही दिसून येत नाही. त्यांनी अहवालामध्ये ही बाब मांडली पाहिजे होती. त्यांनी वेगळी माहिती घेतली असेल तर ती अहवालामध्ये यायला पाहिजे होती व त्यावरुन विभागाला स्प्ष्टीकरण करता आले असते.

३.१०५ हा भार वाढल्यामुळे जर कोणते दुष्परीणाम झाले किंवा भविष्यात दुष्परिणाम होणारच नाही, अशी समितीला खात्री देण्यात येणार आहे काय? अशी समितीने विभागास विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सल्यानुसार किंवा त्यांच्या अहवालाच्या आधारावर विभाग खात्री देऊ शकेल. जर्मनीच्या कंपनीने दिलेल्या अहवालानुसार किंवा त्यांच्या म्हणण्यानुसार तशा प्रकारचा कोणताही धोका नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

३.१०६ भविष्यात एखादी विपरित घटना घडली, तर त्या जर्मनीच्या कंपनीवर विभागाला दावा करण्याचा किंवा क्लेम करण्याचा अधिकार राहील काय? याचे कारण म्हणजे विभाग त्यांच्याकडून सल्ला घेतो व त्या सल्याच्या भरवशावर विभाग समितीला हे स्पष्टीकरण देतो. परंतु एखाद्या वेळेस अशी दुर्घटना घडली तर विभाग असा खुलासा करेल की, त्यांनी सल्लामसलत केली, ती कंपनी जर्मनीची असून भारत देशाचा कायदा वेगळा आहे, त्यांचा कायदा वेगळा आहे, त्यामुळे विभाग त्यांच्याविरुद्ध आज काही करु शकत नाही. तेव्हा विभाग असे स्पष्टीकरण देईल की, भविष्यात दुर्दैवाने अशी घटना घडली तर विभाग त्या कपंनीवर कारवाई करु शकेल काय? किंवा त्या कंपनीला जबाबदार धरु शकेल का? अशी विचारणा करून समितीने मत व्यक्त केले की, भविष्यात घटना घडली तर ती तांत्रिक बाबीमुळे होणार आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, घटना घडण्यामागे कोणते कारण होते, म्हणजेच वजनाचा भार जास्त असल्यामुळे घटना घडली की, स्ट्रक्चरमध्ये अडचण होती म्हणून घडली किंवा इतर दुसऱ्या कारणामुळे घडली याबाबत तपासणी होत नाही, तोपर्यंत कोणालाही दोषी ठरविणे योग्य होणार नाही.

३.१०७ समजा घटनेची चौकशी झाली व भार जास्त असल्यामुळे प्रश्न निर्माण झाला, असे निश्चित झाले तर त्याबाबत विभागाकडे कायदेशीर तरतूद आहे काय? की, ज्यामुळे विभाग त्यांच्यावर कारवाई करु शकेल? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, विभागाला ज्या कंपनीने पुरवठा केलेला आहे, तीच कंपनी घडलेल्या घटनेस जबाबदार रहाणार आहे. कारण सदरहू कंपनीने विभागाला एक सिस्टम तयार करून द्यायची होती, जी दोषरहीत असणे अपेक्षित होते, त्याचे स्ट्रक्चर १२० वर्षे चालले पाहिजे होते. परंतु, त्यामध्ये काही कमतरता राहिली आणि त्यामुळे काही घटना घडली तर त्याला कंपनी जबाबदार रहाणार आहे.

३.१०८ हे स्ट्रक्चर वेगळ्या कंपनीने बनवलेले आहे व कार वेगळ्या कंपनीने सप्लाय केलेल्या आहेत. त्यामुळे तसे होणार नाही. असे काही घडल्यास कंपनी म्हणेल की, त्यामध्ये स्ट्रक्चरचा दोष आहे असे समितीने मत व्यक्त केले व विचारणा केली की देखभालीचा खर्च किती वर्षाकरिता दिला जाणार आहे? तीन वर्षानंतर मेंटनन्स विभागाला भरावा लागणार आहे का ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ऑपरेशन आणि मेंटेनन्स तीन वर्षासाठी आहे. त्यानंतर पुन्हा टेंडर मागवून आऊटसोर्स केले जाणार आहे.

३.१०९ यासाठी विभागाला विशेष लक्ष द्यावे लागेल व उर्वरीत निधी मोजावा लागणार आहे, हे सत्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, किती पैसे जास्त लागतील हे सांगता येत नाही. परंतु देखरेख ठेवावी लागणार आहे, हे खरे आहे. विभाग त्यासंदर्भात अंदाजे परिगणना करु शकतो. परंतु आतापर्यंत असा अंदाज काढलेला नाही.

३.११० यामध्ये दोन बाबी आहेत. एक म्हणजे वाढलेल्या भाराने काही अडचण येणार नाही, असे विभागाचे म्हणणे आहे. येणाऱ्या काळात तांत्रिक चुकीमुळे काही घडले तर टेक्नीकल डीझाइन मान्य करणाऱ्या सल्लागाराने म्हणजेच पीएमसी त्यातील टेक्नीकल सल्ला देत आहेत. त्याप्रमाणे विभागाचे म्हणणे आहे की, यामध्ये काही धोका नाही. परंतु भविष्यात घडलेल्या बाबीकरिता अशा पद्धतीचा सल्ला देणारी एजन्सी जबाबदार असली पाहिजे. तसेच दुसरी बाब म्हणजे यामध्ये जी ॲडीशनल सुपरव्हीजन कॉस्ट असेल किंवा उद्याच्या वाढणाऱ्या मेंटेनन्स कॉस्टकरिता त्या कंपनीला जबाबदार धरणे आवश्यक आहे. कारण सद्यःस्थितीत ती बाब विभागाच्या निदर्शनास आलेली आहे. जर ती बाब निदर्शनास आली नसती किंवा नंतर निदर्शनास आली असती तर त्यावेळी मत व्यक्त करणे शक्य झाले असते. परंतु साक्षीमध्ये ही बाब लक्षात आलेली आहे. त्यामुळे विभाग आता याबाबतची दक्षता घेऊ शकतो असे मत व्यक्त करून समितीने विचारणा केली की, ती दक्षता विभाग घेणार आहे काय?

३.१११ याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली ही वस्तुस्थिती आहे. काहीतरी कमतरता राहिली, अकारण भार वाढला, त्यामुळे काही प्रमाणात कदाचित जास्त खर्च येण्याची शक्यता आहे, असे महालेखाकार यांचे देखील म्हणणे आहे. तसेच विभाग ते नाकारु शकत नाही. याचे कारण म्हणजे ते शक्य आहे. आता एवढेच शक्य आहे की, यामध्ये जास्त खर्च झाला तर पुरवठा केलेली

कंपनी म्हणजे एलटीएसई या कंपनीची जबाबदारी राहील. त्या कंपनीला खर्चाचा अंदाज देऊन या सर्व खर्चाची जबाबदारी त्या कंपनीची राहील असे सांगितले जाईल.

३.११२ यामुळे ओव्हरऑल लाईफ वर काही फरक पडणार आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तांत्रिकदृष्टया तयार केलेला अहवाल पीएमसीच्या समोर ठेवला आहे व त्यात हेच ठरले आहे की, लाईफ मध्ये कुठलाही फरक पडत नाही.

३.११३ जर यापेक्षा वर रिस्क गेली तर ती किती पर्यंत गेली पाहिजे, असा सेफ्टी फॅक्टर पकडलेला असतो. मग ते डीझाईनमध्ये असो की, कुठेही असो. इंजिनिअरींगमध्ये सेफ्टी फॅक्टर असतोच. त्यामुळे सेफ्टी फॅक्टर किती पकडलेला होता व वाढलेला लोढ त्याच्या कुठपर्यंत पोहचतो याबाबत समितीने विचारणा केली असता विभागाकडे यासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध नसल्याचे विभागीय प्रतिनिधीं विशद केले.

३.११४ तीन डब्ब्यांचे डीव्हाईड करून लोड बघितला तर अशा प्रकारचा लोड कमी येतो. म्हणजे येणाऱ्या काळात लोड डीव्हाईड करून ट्रेनची साईज विभागाने निश्चित केलेली आहे. म्हणजे यापेक्षा कमी डब्ब्याांची गाडी चालवणारच नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, ही रेल कमीत कमी चार डब्ब्यांची असते. यातील डब्ब्यांची संख्या सहा होऊ शकते. परंतु कमीत कमी चार डब्बेच असतात.

३.११५ वास्तविक कुठेही लोड फॅक्टर धरत असताना, आता विभाग तांत्रिक दृष्टीने स्पष्टीकरण देत आहे. परंतु ही रेल्वे सद्यःस्थितीत पाच डब्ब्यांची आहे आणि भविष्यात पंचवीस डब्ब्यांची झाली म्हणून २५ डब्ब्यांचा व्हरेज लोड काढून ट्रॅकची क्षमता आहे किंवा त्या पुलाची क्षमता आहे, अशा प्रकारचे समर्थन करणे योग्य होणार नाही. भविष्यात अशा प्रकारची घटना घडल्यास संबंधित कंपनीला जबाबदार धरता येईल, असे कायदेशीर केले पाहिजे. त्याकरिता कायदेशीर सल्लागार लावण्यात यावा व त्यांचे ग्रीमेंट करावे. आपण १२० वर्षापर्यंतची गॅरंटी घेऊन हा पूल तयार करण्यात येत आहे. या काळात काही घटना घडल्यास किंवा काहीही झाले तरी संबंधित कंपनी जबाबदार राहील, अशा प्रकारचा लेखी करार करून घेण्यात यावा मौखिकरित्या काहीही शक्य होणार नाही.असे समितीने सूचविले.

३.११६ समितीच्या उपरोक्त मतावर विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, समितीने सूचना दिल्याप्रमाणे याबाबत कायदेशीर सल्ला घेण्यात येईल. तसेच कॉन्ट्रॅक्ट टर्म्स प्रमाणे यासंदर्भात कंपनीची जबाबदारी निश्चित करून तसा करार करण्यात येईल.

३.११७ विभागाने वारंवार उल्लेख केला की, त्यांनी चार डब्ब्यांचा भार वितरित केला. परंतु असाही तो पॉईंट लोड पडणारच नव्हता. लोड हा डीस्ट्रीफ्र्युटेड लोडच येणार आहे. तो लोड डीस्ट्रीफ्र्युट केला तरी एकूणच लोड स्पॅनवर तेवढाच पडणार आहे. पॉईंटवर पडण्याऐवजी तो तेवढ्याच स्पॅनवर डीस्ट्रीफ्र्युट होणार आहे. म्हणजे लोड वाढणारच आहे. एवढेच होईल की, पॉईंट लोड वाढण्याऐवजी डीस्ट्रीफ्र्युटेड लोड वाढणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, डीस्ट्रीफ्र्युट लोड बीमच्या लोडपेक्षा जास्त वाढत नाही. एका डब्ब्याचा पॉईंट लोड वाढत आहे.

३.११८ एका डब्ब्यावरील लोड त्या भागावर पडणार आणि चार डब्ब्यांवरील लोड तेवढ्या भागावर भडणार आहे. परंतु लोड तर वाढणारच आहे. त्या बीमवर लोड वाढणार आहे की, नाही अशी विचारणा समितीने केली असता यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, एकूण लोडचा ॲव्हरेज केल्यावर ती फीगर वाढत नाही.

३.११९ ॲव्हरेज काढले तरी ओव्हरऑल जेवढा लोड येणार आहे, तो येणारच आहे. विभागीय प्रतिनिधींच्या माहितीनुसार पॉईंट लोड न पकडता त्याचा ॲव्हरेज काढलेला आहे. ॲव्हरेज काढला असला तरी तो लोड लहान स्पॅनवर पडण्याऐवजी मोठ्या स्पॅनवर पडणारच आहे. तसेच सेंट्रर सुटल्यावर ते अनलोडेडच होणार आहे. त्यामुळे विभागाने चार कंपार्टमेंटचे रोलिंग स्टॉकचे ॲव्हरेज काढणे टेक्नीकली ज्यांनी हे केलेले आहे, त्यांना मान्य असेल. परंतु याबाबत इतर दुसऱ्या एक्सपर्टकडून ते मान्य करून घेतले पाहिजे. रोलिंग स्टॉक उचलून नेऊन ते वजन कमी करून देणार आहे, असे होणार नाही. त्यांचा मेंटेनन्स कॉन्ट्रक्ट केवळ तीन वर्षाचा आहे. परंतु स्ट्रक्चर १२० वर्षे चालविण्यात येणार आहे असे मत व्यक्त करून समितीने विचारणा केली की, त्यांच्याकडून मेंटेनन्स कॉन्ट्रक्टमध्ये, समितीने सुचविल्यानंतर ॲग्रीमेंट करणार किंवा लीगल बाजू तपासून घेणार आणि होणारा खर्च त्यांच्याकडून वसूल करणार, असे म्हटले असेल तर उर्वरित ११७ वर्षांचा खर्च कोण करणार आहे? यावर विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, सीव्हील स्ट्रक्चर १२० वर्षांचे असते. इतर सिस्टीमचे वेगवेगळे आहे. ही सिस्टीम व्यवस्थित चालली पाहिजे, याकरिताचा एकूण कालावधी ३० वर्षांचा आहे. सीव्हील स्ट्रक्चरचे लाईफ १२० वर्षांचे आहे. त्यानंतर रोलिंग स्टॉक देखील बदलावे लागतात.

३.१२० विभागाला सिव्हील स्ट्रक्चरचे डीशनल मेंटेनन्स १२० वर्षांचे बघावे लागणार आहे. म्हणजे स्ट्रक्चरची क्षमता ११.७२ टन आणि १३.२७ टन लोड हे पहाता त्या वेटचा ॲडीफरन्स २ टनचा आहे. म्हणजेच जे १२ टन किंवा ११ टनच्या वर वजन घेणार असेल, तर त्याची स्पॅर कॅपेसिटी १० ते १५, २० टक्के जनरली अशी डीशनल डीझाईन करूनच करतात असे मत समितीने मांडले असता विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, विभागीय प्रतिनिधींच्या माहितीप्रमाणे सेफ्टी मार्जिन २५ टक्क्यांपर्यंत असतो. परंतु वेगवेगळ्या कोडची वेगवेगळी टक्केवारी असते. परंतु हे २५ टक्क्यापर्यंत असते.

३.१२१ जर्मनीच्या संबंधित कंपनीचे असे म्हणणे आहे की, ' Six cars train is more safer than four cars train. ' असा त्यांचा अभिप्राय महालेखाकारांकडे आहे. यासंदर्भात विभागाची काय भूमिका आहे व कोणते प्लॅनिंग आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, जर्मनीत किती कार रन केल्या पाहिजे, म्हणजेच चार किंवा सहा या प्रमाणावर किंवा या बेसिसवर ते ठरत नाही. तेथे रायडरशिप किती आहे, आपल्याला किती प्रवासी मिळणार आहे, त्याप्रमाणे हे ठरवले जाते.

३.१२२ समितीने विभागाच्या असे निदर्शनास आणून दिले की, जर्मनीच्या संबंधीत कंपनीने महालेखाकारांकडे दिलेल्या अभिप्रायामध्ये असे लिहिले आहे की, ' The fact that four cars may cause higher internal forces and mid stress for the system with Three or more spans, whereas based on the documents provided by the Scomi only six cars trains were considered for the design. Calculation for the maximum stress in the spans at the intermediate support design using six cars train are on safer side. '

३.१२३ यास विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली व सांगितले की, सहा कारचा लोड डीव्हाईड होतो, त्यामुळे सेफर आहे. चार कारमधील टोटल कॅपेसिटी १६५ सीट्सची आहे, तर चार ऐवजी सहा होतील.

३.१२४ ४ डिब्बे की जगह ६ डिब्बे की मोनोरेल, इंटरनल फोर्सेस कम होता है. असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, रायडरशीप वाढली तर आपल्याला चार ऐवजी सहा कार कराव्या लागतील. केवळ या कारणामुळे गाडी रिकामी चालवणे, योग्य होणार नाही.

' **डेपो इमारत भुकंपरोधक संकल्प चित्राशी सुसंगत नसणे** '

३.१२५ या परिच्छेदासंदर्भात महालेखाकारांनी नमूद केले की, जो डेपो की बिल्डिंग बनायी गई वह अर्थक्वेक रेजिस्टेंट डिजाईन से कन्फर्मींग नहीं थी. कॉन्ट्राक्ट में ऐसी प्रोविजन थी की इंडियन स्टण्डर्ड १८९३ के अनुसार सिव्हील स्ट्रक्चर को डिजाईन करना था. इसमें इम्पॉर्टेंस फॅक्टर was supposed to be १.५. समझ लीजिए कि १.५ इम्पॉर्टेंस फॅक्टर से डिजाईन करना था लेकिन वॉयोलेशन यह हुआ कि एलटीएसई ने जब शुरु में कन्स्ट्रक्शन शुरु किया, डेपो की बिल्डिंग का जब डिजाईन हो रहा था तब यह डिजाईन १.५ की बजाय १.० फॅक्टर से किया गया. जब इस डिवीएशन को पीएमसी द्वारा पॉईंट आऊट किया गया तब एलटीएसई ने इसे १.० से १.५ में by reduction of various loads इसे बदल दिया. बिल्डिंग की जो डिजाईन थी वॉल की जो थिकनेस होनी चाहिए उसको रिड्यूस कर दिया गया. इस तरह से डजस्ट किया गया. इनिशियली विभागने १.५ लिया था और फिर कन्स्ट्रक्शन कर दिया गया. डिजाईन को रिचेंज कर दिया. The reasons why the earlier loads were included in the first place needs clarification. डिपार्टमेंट की तरफ से जो रिस्पॉन्स आया था, a report by the IIT Professor was put-up. एमएमआरडीए ने टेक्निकल ओपिनियन क्यों नहीं सॉट की थी ? जो टेक्निकल ओपिनियनह आयी है that is addressed to LTSE. एक और इश्यू था कि जो रिपोर्ट है कि whether the Professor was briefed about the conditions? इनिशियल क्या था ? हमको उस रिपोर्ट के टर्म्स ऑफ रेफरन्स पता नहीं है.

३.१२६ कन्सल्टंटला (P.M.C.) दोन्हीही अहवालातील वस्तुस्थिती सांगण्यात आली होती का, त्याबाबत त्यांचे मत घेण्यात आले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, कन्सल्टंटने दिलेले डिझाईन स्पेसिफिकेशननुसार आहे किंवा नाही, याबाबत कन्सल्टंटने व विभागाने आयआयटीला विचारणा केली होती. त्यासंदर्भातील सर्व रिपोर्ट आयआयटीने तपासून अहवाल दिलेला आहे की, It is in order. आयआयटी वर ही विश्वास ठेवायचा नाही, असे महालेखाकार यांचे म्हणणे असेल तर ती वेगळी बाब आहे.

३.१२७ विभागीय प्रतिनिधींच्या खुलाशावर समितीने निदर्शनास आणले की, आयआयटीकडे तपासण्यासाठी विभागाने रिवाईज डिझाईन दिले होते. परंतु पूर्वीचे डिझाईन होते, It has to be prepared according to the Importance Factor of १.५. But it has not been prepared according to the said Importance factor. विभागाने नंतर प्लॅन चेंज केला आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, वेगवेगळ्या मार्गाने सेम रिझल्ट करता येतो. म्हणजे १.५ आणि सिस्मिक झोन - १ आणि सिस्मिक झोन कोणता, हे वेगवेगळे फॅक्टर्स आहेत. कोणतेही कॉम्बीनेशन करून फायनल रिझल्ट मिळाला, जो आपल्याला न्टीसिपेटेड आहे, त्यामध्ये चूक नाही. कंपनीने पूर्वी दिलेल्या डिझाईन बदलून दिल्यानंतर तो विभागाच्या स्पेसिफिकेशननुसार योग्य ठरतो की नाही, हे आयआयटीने व्हेरीफाय करून दिले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी काही गैरप्रकार झाला आहे, असे विभागाला वाटत नाही. विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या स्पष्टीकरणास समितीने सहमती दर्शविली.

३.१२८ डेपोमध्ये कार रिकामी जात असताना त्यामध्ये प्रवासी भाराची परिगणना करण्यात आला नाही. १.५ ची प्रोव्हिजन आपत्कालीन स्थितीसाठी ठेवली असती तर समजा भूकंप झाला तर लोडेड कार डेपो मध्ये घेऊन जाता आली असती. त्याकरिता एक्स्ट्रा ऑर्डिनरी सिच्युअेशनमध्ये १.५ ची प्रोव्हिजन करण्यात आली होती ती १.० वर आणण्यात आली आहे. एक्स्ट्रा ऑर्डिनरी सिच्युअेशनमध्ये एक्स्ट्रा फॅक्टर उपयोगी ठरु शकला असता तो विभागाने अगोदरच युटिलाईज करून घेतला आहे, असा आक्षेप त्यावेळी महालेखाकार कार्यालयाचा होता. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, डेपोमध्ये गाडी दुरुस्ती व देखभालीसाठी पाठविण्यात येते इतर कोणत्याही परिस्थितीमध्ये लोडेड गाडी डेपोमध्ये जाणे अपेक्षित नाही. तसेच, प्रवाशासह गाडी डेपोमध्ये घेऊन जाणे अपेक्षित नाही. रिकाम्या गाडीचा वर्कलोड व कॅपॅसिटी याबाबत आयआयटीने अहवालात सविस्तर माहिती दिली आहे.

३.१२९ एलटीएसईने आयआयटीचे मत जाणून घेतले. परंतु एमएमआरडीएने आयआयटीचे मत का घेतले नाही, एमएमआरडीएने एलटीएसईला आयआयटीकडून अहवाल घेण्यास सांगितले होते काय ? कॉन्ट्रॅक्टरने थर्ड पार्टी ऑडीट करावे अशी पद्धत शासनामध्ये पडली आहे. मॅन्युप्युलेशन किंवा पोटेंशिअल असतात त्यामुळे थर्ड पार्टी ऑडीट करण्यात येत असते. समिती आयआयटीवर शंका घेत नाही परंतु सदरहू ऑडीट एमएमआरडीएने करून घेतले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतीनिधींनी खुलासा केला की, न्यूट्रील थर्डपार्टीकडून तपासून सिद्ध करण्यास एमएमआरडीएकडून सांगण्यात येते. एमएमआरडीएने थर्ड पार्टीकडून ऑडीट केले तर अगोदर पैसे खर्च करावे लागतात व नंतर ते कॉन्ट्रक्टरकडून वसूल करावे लागतात. त्यामुळे सदरहू ऑडीट कॉन्ट्रॅक्टरला करण्यास सांगण्यात येते.

३.१३० एमएमआरडीएला सुरक्षितता हवी असेल तर थर्ड पार्टी ऑडीट हे एमएमआरडीएने करून घ्यावे व कंत्राटदाराकडून त्याचे पैसे वसूल करण्यात यावे. तसेच कंत्राटदार थर्ड पार्टी ऑडीटरकडून त्याला हवा तसा रिपोर्ट तयार करून घेऊ शकतो व त्याबाबतची शेकडो उदाहरणे प्रशासनाकडे व समितीकडे आहेत. थर्ड पार्टी ऑडीटचा परिणाम मुंबई येथील रोडच्या संदर्भात पाहिलेले आहेत. त्यामुळे पुढील कालावधीमध्ये शासनाने या पद्धतीमध्ये बदल करावा. कारण लोकांचा शासनावर व प्रशासनावर विश्वास आहे. थर्ड पार्टी ऑडीट शासनाने किंवा संबंधित यंत्रणांनी करावे व त्याबाबतचा खर्च संबंधित कंत्राटदाराकडून करावा, अशी समितीने सूचना केली.

३.१३१ रिकामी गाडी डेपोमध्ये घेऊन जाण्याची व्यवस्था केलेली असल्याने भूकंप किंवा इतर कारणास्तव डेपोमध्ये आणण्याची वेळ आली तर ते धोकादायक ठरु शकेल, मग अशा परिस्थितीत विभागाकडून काय उपाययोजना करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, भूकंप आल्यामुळे लोडेड गाडी डेपोमध्ये घेऊन जाण्याचे काही कारण नाही. परंतु काही कारणास्तव जर लोडेड गाडी डेपोमध्ये घेऊन जाण्यात आली तर तेथील व्यवस्था कोसळेल किंवा गाडी खाली पडेल असे होणार नाही.

३.१३२ भूकंपासारखी स्थिती निर्माण झाली तर कोणती अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे ? महालेखाकार कार्यालयाचा हा आक्षेप समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिला असता. विभागीय प्रतिनिधींनी विभागाने भूकंपदर्शक स्थितीवर केलेल्या व्यवस्थेमध्ये काही चुक नसल्याचे सांगितले.

३.१३३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी आक्षेपाबाबत माहिती देताना महालेखाकारांनी विदित केले की, मुद्दा बीम के बारे में है. आईआरएस स्टॅण्डर्ड के अनुसार जो बीम्स हैं, उनका जो ज्वाईंट्स होना चाहिए वह स्क्रू कपलर यूज किए जा रहे है तो ५० प्रतिशत से ज्यादा स्क्रू कपलर ज्वाईंट नहीं किए जाने चाहिए. क्योंकि वह फ्लेग्जिबिलिटी को रिड्यूस करता है. अर्थक्विक के लिए स्ट्रक्चर फ्लेग्जिबल होना चाहिए. अगर हम ५० प्रतिशत से ज्यादा स्क्रू कलपर ज्वाईंटस यूज करेंगे तो वह ज्वाईंट स्ट्राँग हो जाएगा. Then it won u t be flexible. The LTSE had joined reinforcement bars in 11 beams in phase I of the project between Wadala and Bhakti Park with 100 percent Screwed couplers. यह बात पॉईंट आऊट की गई थी. The MMRDA acceted the deviation as an exception. इस बारे कोड प्रोव्हिजन को व्हॉयलेट करने के बाद भी कोई पेनल्टी नहीं लगायी गई.

३.१३४ महालेखाकार कार्यालयाकडे तांत्रिक माहिती कशी आहे ? तसेच महालेखाकारांनी काढलेल्या तांत्रिक मुद्द्याबाबत एमएमआरडीएचे मत काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरहू मुद्द्याचे यापूर्वी स्पष्टीकरण दिलेले आहे. सदरहू प्रकरणी आयआयटीने अहवाल दिला आहे.

३.१३५ ज्यांनी कोड मधील तरतूदीचे उल्लंघन (व्हायलेशन) केले आहे त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, त्यांना दंड करण्यात आला आहे काय ? जॉईंट संदर्भात एमएमआरडीएने आयआयटीचे मत घेतले होते व ते बरोबर आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. अशी पद्धत असेल तर मग निविदेमध्ये अटींचा समावेश कारण्याचे काही कारण नाही. प्रथम सर्व गोष्टी कंत्राटदारास करण्यास सांगावयाच्या व त्यावर आयआयटीचे मत घेऊन त्यांचे प्रमाणपत्र आणले तर विभागाने मान्य करायचे अशी पद्धत अयोग्य असल्याचे समितीने मत मांडले. ज्यावेळी टेंडर काढण्यात येते त्यामध्ये कोणत्या बाबींची आवश्यकता आहे याचे स्पेसिफिकेशन देण्यात येत असते. त्यामुळे सदरहू प्रकरणी कंत्राटदाराने

व्हायलेशन करताना त्याबाबत विचारणा केली होती का ? त्यांनी केलेले व्हायलेशन एमएमआरडीएच्या निदर्शनास आल्यानंतर त्याबाबत कंत्राटदारास आयआयटीचे प्रमाणपत्र आणण्यास सांगण्यात आले. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, सदरहू प्रकरणी व्हायलेशन झाले नाही. कंत्राटदारांनी जी सिस्टम डिझाईन केली आहे ती दुसऱ्याकडून पडताळण्यात येते व त्यामध्ये चूक असेल तर दंड लावण्यात येतो. कंत्राटदारांच्या डिझाईननुसार जॉईंट पेव्हवरती येत असल्याने त्याचा काही विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे त्यांना दंड करण्याचे काही कारण नाही. टेंडरमध्ये दोन प्रकार असतात. एका प्रकारामध्ये विभागाकडून डिझाईन देण्यात येते व त्यानुसार बांधकाम करण्याच्या सूचना देण्यात येतात. त्यामध्ये कंत्राटदाराने काही चूक केली तर त्याकरिता दंड लावता येतो. दुसऱ्या प्रकारामध्ये कंत्राटदार डिझाईन देतात व एमएमआरडीए त्यास मान्यता देतो त्यानुसार कंत्राटदार काम करून देत असतात. सदरहू प्रकरणात कंत्राटदाराने डिझाईन केलेली असल्याने ती मंजूर केल्यानंतर ती डिझाईन त्यापद्धतीने का करण्यात आली, असे एमएमआरडीएला विचारु शकत नाही. सदरहू निविदेच्या अटीमध्ये भारतीय रेल्वेचा एमएमआरडीएने काँक्रीट ब्रीज कोड घेतला आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, सदरहू प्रकरणी ५ ते ६ कोड असून त्यापैकी कोणताही कोड वापरता येतो. आयआरएसनुसार कोड लीस्ट करण्यात आली आहे.

३.१३६ एमएमआरडीए आणि आयआयटी यांनी कोड प्रोव्हीजनचा सपोर्ट घेतला नाही. सदरहू प्रकरणी जो काही टेक्निकल आधार घेतला त्यासंदर्भात आयआयटीकडे पुर्नतपासणी करायला पाठवावे लागले. जे ठरविण्यात आले होते त्यापेक्षा वेगळे काही तरी केल्यामुळे पुर्नतपासणीसाठी पाठवावे लागले. टेंडरमधील स्पेसिफिकेशन होते त्यानुसार काम केले असेल ते सुरक्षित आहे किंवा नाही, ही बाब वेगळी आहे. यापूर्वीच्या एका प्रकरणी देखील आयआयटीकडून तपासून घेण्यात आले होते. दुसऱ्या एका प्रकरणी जर्मन कंपनीस दिलेल्या कंत्राटाच्या कामाची तपासणी करण्यात आली होती व आता सदरहू तिसऱ्या प्रकरणी देखील तपासणी करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, टेंडरमधील अटीमध्ये टेक्निकल स्पेसिफिकेशन नमूद होते त्यापेक्षा वेगळे काम झाले असल्याने प्रत्येक वेळी आयआयटीकडून तपासून घ्यावे लागले आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, थर्ड पार्टी ऑडीट दोन कारणामुळे करण्यात येते. त्यापैकी एक कारण म्हणजे कंत्राटदाराने दिलेल्या डिझाईनमध्ये बदल केल्यानंतर ते योग्य आहे किंवा नाही, याकरिता तपासून घेण्यात येते आणि दुसरे कारण असे की, कंत्राटदाराने डिझाईननुसार काम केले परंतु त्याबात विभागाला शंका आली तर तिचे निरसन करण्यासाठी तपासणी करून घेण्यात येते. त्यामुळे संबंधित कामामध्ये काही चूक नाही, याबाबत विभागाची खात्री होते. सदरहू प्रकरणी काही ठिकाणी बदल झालेले आहेत व काही ठिकाणच्या बदलासंदर्भात पीएमसीने (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) तपासण्यास सांगितले म्हणून तपासून घेण्यात आले आहे.

३.१३७ If you are violating the Code then you have to take the permission of basic designer. जिसने डिजाईन किया था, क्या बेसिक डिजायनर की परमिशन ली गई थी ? उस कोड को लेकर जिसने बेसिक डिजाईन की थी उसका ही ॲप्रूवल लगता है. थर्ड पार्टी का कोई संबंध नहीं आता. बाकी के दो केस अलग थें, वॉयोलेशन किया है. यदि कोड का वॉयोलेशन करते है तो जिसने बेसिक डिजाईन किया है उसका ही ॲप्रूवल चाहिए कि कोड का वॉयोलेशन अलावू है असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कॉन्ट्रॅक्ट डॉक्यूमेंटमध्ये ५ प्रकारच्या ' कोड ' ची लीस्ट देण्यात आली आहे. त्यामध्ये आयआरएस, आयआरसी, आयएस, बीएस व आस-२ आहे. त्यामध्ये पुढे म्हटले आहे की, However, the decision of the employer or Employers Representatives regarding use provisions of the particular code will be final binding on the Contractor. म्हणजे ते कोणत्या ' कोड ' मध्ये बसू शकते, अशी त्यामध्ये तरतूद आहे. सदर तरतूदीमध्ये " dECision of the employers " असे नमूद केले आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये ' Employer ' म्हणजे एमएमआरडीए. विभागाच्या एका ' कोड ' नुसार डिझाईन योग्य आहे असे सिद्ध झाले तर त्यामध्ये काही चूक नाही.

३.१३८ कंत्राटामधील बाब कोणत्याही एकाच ' कोड ' नुसार डिझाईन करण्यात येते. डिजाईन एक ही स्टॅण्डर्ड से होती है. ४-५ कोड मिलकर डिजाईन नहीं होती है. जो बीम डिजाईन हुआ है वह एक ही स्टॅण्डर्ड से हुआ होगा. उसमें दस स्टॅण्डर्ड नहीं लगते है वह पुरू प्रोजेक्ट के लिए होगा. सिंगल बोम के लिए नही होगा असे मत समितीने मांडले.

३.१३९ याबाबत महालेखाकरांनी असे मत व्यक्त केले की, कॉन्ट्रॉक्ट में लिखा है कि there is a precedence of Code बहुत सारे कोड के बारे में बताया जा रहा है. प्रेसिडेंस ऑफ कोड है. इसमें १ नंबर पर IRS कोड है. The MMRADA had also accepted this as an exception later. This is the main point we are dealing with. इसलिए यहां टेंडर कंडीशन के तहत IRS Code ही लागू है.

३.१४० याबाबतविभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, सदरहू कंत्राटामध्ये प्रथम प्राधान्य आयआरसीला आहे याबद्दल दुमत नाही परंतु त्यामध्ये एकूण ५ ' कोड ' असून त्यापैकी कोणताही एक कोड वापरता येऊ शकतो. Splicing provision of IRS Concrete Bride code under discussion is applicable here. हे splicing steel reinforcing बारसाठी वापर होतो आणि विभागाची सिस्टम

tension is primarily carried out by steel reinforcing bar. There are two different type of procedures. पहिली प्रोसिजर आयआरएस कोडमध्ये आहे. सदरहू कामामध्ये टेंशनकरिता Steel reinforcing bar च्या टेंशनचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे सदरहू ठिकाणच्या कामासाठी आयआरएस कोड लागू होत नाही परंतु ते काम दुसऱ्या कोड मध्ये बसते.

३.१४१ विभागीय प्रतिनिधींनी केलेल्या खुलाशावर समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, सदरहू प्रकरणी कोडचे उल्लंघन झाले आहे, स्क्रू जॉईंटस् ५० टक्के अधिक झाले आहेत. त्यासंदर्भात थर्ड पार्टीचे मान्यता एमएमआरडीएने घेतली आहे परंतु तसे करता येत नाही. कोडचे उल्लघन होत असेल तर बेसिक डिझाईन करणाऱ्यांनाच त्याचा वापर करता येऊ शकतो, अशी मान्यता द्यावी लागते.

३.१४२ यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, सदरहू प्रकरणी कोडचे उल्लंघन झालेले नाही. आयआरएस कोड प्रमाणे सर्व काम करण्यात आले आहे, असे जर शासनाने सांगितले असते तर ते कोडचे व्हायलेशन झाले असते. परंतु सदरहू प्रकरणी अतिशय सविस्तर उत्तर शासनाने मागील साक्षीच्या वेळी तोंडी व लेखी स्वरुपात सादर केले आहे. त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, सदरहू पर्टीक्यूलर आयटमसाठी कोडचे उल्लंघन झालेले नाही त्यामुळे सदरहू प्रकरणी प्रश्न उद्‌भवत नाही.

३.१४३ कोडनुसार ५० टक्के जे जॉईंट वापरावयास पाहिजे होते त्याऐवजी वेगळ्या प्रकारचे जॉईंट वापरण्यात आले. महालेखाकारांच्या या आक्षेपाबाबत विभागीय सचिवांनी नमूद केले की, सदरहू प्रकरणी शासनाने अतिशय सविस्तर उत्तर दिले आहे.

३.१४४ विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशाशी महालेखाकार समाधानी आहेत का? अशी विचारणा करून याप्रकरणी सरळ सरळ कोडचे व्हायलेशन झाल्याचे दिसून येते असे मत समितीने व्यक्त केले.

३.१४५ लुईस बर्जर कंपनीने माहे जून, २०१० मध्ये एमएमआरडीएला एक पत्र दिले आहे ते समितीकडे आहे व महालेखाकार कार्यालयाकडे आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, With reference to the letter dated above we can recommend that exception be made by provision of 100 % couplers. अपवादात्मक स्थितीत त्यांनी मान्यता दिली आहे, रेग्यूलरसाठी ती मान्य करता येणार नाही. तसेच सदरहू प्रकरणी स्पेसिफिकेशनचे व्हायलेशन केलेले आहे, असा याचा स्पष्ट अर्थ होतो. असे विभागाच्या निदर्शनास आणून देऊन पुढे विचारणा केली की, सदरहू व्हायलेशन करण्याची आवश्यकता का भासली ? सदरहू प्रकरणी कंत्राटदारास पेनल्टी करावयास पाहिजे होती, असे मत समितीने व्यक्त केले.

३.१४६ As per IRS CBC, not more than 50 per cent of the reinforced bars of the beams should be connected by screwed couplers हे ५० टक्क्यापर्यंत करावयाचे होते ते १०० टक्के करण्याची आवश्यकता का निर्माण झाली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरहू मुद्दे अतिशय तांत्रिक असल्याने त्याबाबत तत्काळ उत्तर देणे शक्य नाही.

३.१४७ या चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्‌द्यांच्या संदर्भात लेखी उत्तर समितीस सादर करण्यात यावे. असे समितीने सूचित केले. (अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

३.१४८ एक्सेसमेंटमध्ये ११ पिलरसाठी परवानगी देण्यात आली होती परंतु त्याचा वापर सर्व ठिकाणच्या कामांसाठी करण्यात आला आहे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, एक्सेसमेंटचा वापर बाकीच्या ठिकाणी झालेला नाही. फक्त ज्या ११ ठिकाणी परवानगी दिली तेथे झालेला आहे.

३.१४९ ' मार्गदर्शी पदाच्या तुळईजोडांचे काम मानांकनाप्रमाणे नसणे ' याबाबत तांत्रिक विषय असतात अशा ठिकाणी त्याबाबत माहिती देण्याचे अंतिम अधिकार कोणास आहेत ? अशी विचारणा समितीने केली. आक्षेपांचा विभागाने समाधानकारक खुलासा करावा तसेच काही तांत्रिक गोष्टी आहेत, त्यांचे उत्तर विभागीय प्रतिनिधी देऊ शकत नाहीत. अशा टेक्नीकल गोष्टींचे अंतिम निष्कर्ष काय असणार आहे ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कंत्राटदाराने ११ साठी वेगळे डिझाईन का वापरले ? हा नवीन मुद्दा साक्षीदरम्यान उपस्थित करण्यात आला. फक्त सदर मुद्द्यांचेच निरसन करण्यास विभागाने असमर्थता दर्शविली आहे. अन्यथा सर्व तांत्रिक मुद्दयांची सविस्तर कारणे विभागाने दिलेली आहेत. कंत्राटदाराने त्याचे डिझाईन त्या प्रमाणे का केले, हा नवीन मुद्दा उपस्थित करण्यात आला, याची माहिती विभागाकडे उपलब्ध नसल्याने सदर माहिती उपलब्ध करून देऊ असे विभागाने समितीस आश्वासित केले. (तथापि माहिती अद्याप अप्राप्त आहे.)

३.१५० महालेखाकारांकडे प्राप्त झालेल्या लुईस अँड बर्गर यांच्या पत्रात असे नमूद केलेले आहे की, लुईस अँड बर्गर हे एक्सेप्शनल म्हणून मान्य करत आहे. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. अशा काही तांत्रिक गोष्टी असतील की, ज्याबाबत समितीस खात्री पटत नाही त्यावर उपाय काय असणार आहे ? विभागाने हे डिझाईन कोणाकडून तयार करून घेतले अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे डिझाईन बिल्ड आहे त्या कॉन्ट्राक्टरने डिझाईन तयार करायचे, त्यानेच बाधायाचे व विभागाच्या कन्सल्टंटने ते तपासायचे होते.

३.१५१ कंत्राटदाराने डिझाईन द्यायचे होते, ते तपासण्याचे काम पीएमसीने करावयाचे होते. पीएमसीने ते तपासल्यानंतर त्यामध्ये आणखी बदल झाले व ११ पिलर्सचा प्रश्न नव्याने उपस्थित झालेला आहे. पीएमसीने नंतरच्या काळात एक्सेप्शनल म्हणून ते मान्य केले. परंतु, एक्सेप्शनल करण्याची गरज काय होती ? तसेच Whether the PMC had an authority to allow this deviation? असे अधिकार पीएमसीला आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी विशद केले की, जर विभागाचे डिझाईन असते आणि त्यामध्ये तफावत झाली असती तर हा प्रश्न निश्चितपणे लागू होता. परंतु, या ठिकाणी डिझाईन विभागाचे नाही. डिझाईन कंत्राटदाराने द्यायचे आहे, ते योग्य आहे की नाही हे तपासण्याचे काम फक्त पीएमसीचे होते. त्यांनी ते तपासले, त्यांना एक्सेप्शन वाटले त्यांनी ते विभागाला कळविले. त्यामध्ये त्यांनी अपवादात्मक मान्यता देण्याचे ठरविले.

३.१५२ ' पथदर्शी मार्गाचे विस्तारजोड कंत्राटदारास विनिर्दिष्ट केलेल्या संकल्पचित्राच्या विपरित असणे ' याबाबत महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, अगला मुद्दा यह है कि जो एक्सपॉन्सन ज्वाईंटस थे. उसमे २ प्लेटस होती है एक ऊपर और एक साईड मे. एक्सपॉन्सन ज्वाईंट के जो प्लेट्स है उसकी लाईफ थिकनेस पर डिपेन्ड करती है कि कार उसके ऊपर कितनी चलेगी. उतना वेअर ॲण्ड टीयर होगा. Herculus Engineering, Malaysia के द्वारा इनिशियल डिजाईन हुआ था. तीन मीनट का हेडवे रहेगा. तीन मीनट का अंतर रहेगा. उस स्थिति में टॉप लीड का थिकनेस ७५ एमएम का होना चाहिए. साईड प्लेट का थिकनेस ६० एमएम का होना चाहिए. डिजाईन के अनुसार ये ५० साल तक चलेगा. अब ऐसा हुआ कि जो थिकनेस है वह ऊपर वाली प्लेट ७५ एमएम की है तो उसको रिडयुस करके ६० एमएम किया गया है. साईड की प्लेट को रिड्युस करके ६० एमएम से ४५ एमएम किया गया है. ऑपरेशन प्लान के अनुसार तीन मिनट की हेड वे के बजाय चार मिनट कंसिडर किया गया है. पहले इसका सर्विस लाइफ ५० साल का टारगेट था वह २० साल का हो जाएगा. महालेखाकार कार्यालयका रिमार्क इतना ही है कि इस बारे में पेनल्टी हुई है क्या ? इस चीज के लिए कोई कम्पेनसेशन लिया गया है ? इसमें लाईबिलिटी किसकी रहेगी ? Whether it will be on MMRDA? असा महालेखाकारांनी आक्षेप घेतला. तसेच समितीने विचारणा केली की, साईड प्लेट ७० एमएम से ६० एमएम और बाद में ४५ एमएम करने का कारण क्या है ? कॉस्ट सेविग हुआ है वह एमएमआरडीए को क्यों नहीं दिया गया ? ट्रान्सफर क्यों नहीं किया गया ? Who is benefitted by this cost saving? याबाबत खुलासा कराना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पथदर्शी मार्गामधील प्रसरण जोडीचा संपूर्ण सेवा कालावधी काढताना अशी पद्धत अवलंबिली जाते की, किती क्रॉसिंग प्रत्येक दिवशी होणार, गर्दीच्या कालावधीमध्ये ३ मिनिटांचा हेड वे आणि पीक अवरमध्ये नियमितपणे २० तास चालले तर ४०० येते. पर डे पिक अवर कन्सिडर करून देखील ३०० पेक्षा जास्त क्रॉसिंग शक्य नाही. त्याप्रमाणे ३०० चेच डिझाईन आहे आणि ३०० प्रमाणे ते डिझाईन परिपूर्ण होत आहे. ४०० चे डिझाईन म्हणजे टोटल २४ तासांपैकी १९ तास चालणे डिझाईनमध्ये अपेक्षित केले आहे. ४०० चा हिशोब काढला तर ३ मिनिटांचा हेड वे जर दिवसात २० तास चालला तर, ४०० ट्रिप्स होतात. तसे अपेक्षितच नाही.

३.१५३ यावर समितीने मत व्यक्त केले की, विभागानेच कंत्राटदाराला काम करण्याची परवानगी दिलेली आहे. या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, ३०० प्रमाणे बसत होता म्हणून कंत्राटदारास मान्यता दिलेली आहे.

३.१५४ प्रसरण जोडांचा सेवा कालावधी ५० वर्षांवरुन २० वर्षे केले आहे, त्याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, मेजर व मायनर असे दोन प्रकारचे पार्टस आहेत. मायनर पार्टची लाईफ २० वर्षे व मेजर पार्टची लाईफ ५० वर्षे आहे. हे प्लेट्स मायनर पार्टस मध्ये बसतात.त मायनर पार्ट म्हटले तरी नुकसान नाही काय ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, प्रत्येक पार्टची एक लाईफ असते. जसे की, एका टायरची लाईफ १ वर्षाची असू शकते. एका स्ट्रक्चरची लाईफ १२० वर्षे असू शकते.

" **टिकाऊपणातील अडचणी** "

३.१५५ " **काजळी प्रतिबंधक रंग लावला गेला नाही** या परिच्छेदासंदर्भात " Durability Issues- Non-application of anti-carbonation paint ' या बद्दल खुलासा विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, " Details of action taking to provide protective coating on guideway structure was not done " गाईड वे स्ट्रक्चरवर प्रोटेक्टिव्ह कोटिंग केले पाहिजे होते, ते झाले नाही असा महालेखाकारांचा मुद्दा आहे. एक प्रोटेक्टिव्ह कोटिंग संपूर्ण झाले पाहिजे असे अपेक्षित नव्हते. कॉंट्रॅक्ट टर्म मधील ३.५.२.१३ मध्ये प्रोटेक्टिव्ह कोटिंगबाबत असे नमूद केले आहे की, " External protECting to concrete structure whereever required shall be of .... " जेथे जेथे गरज पडेल तेथे प्रोटेक्टिव्ह कोटिंग केले पाहिजे असे कॉंट्रॅक्ट टर्म मध्ये नमूद केले आहे. सर्व ठिकाणी ते करणे गरजेचे नाही, असे यातून दिसून येते. काही ठिकाणी साईट इन्स्पेक्शन केले आहे. कोठे गरज आहे, हे देखील तपासले गेले. काही ठिकाणी असे दिसले की, जेथे कंत्राटातील अटीप्रमाणे त्याची गरज आहे. फर्टिलायझर कॉलनी जवळ काही एरिया आहे त्या ठिकाणी पाहिले व तेथे काय करता येईल हेही पाहिले. काही ठिकाणी रेल्वेच्या वरच्या एरियात एजन्सीने ३ स्पॅन करेक्ट केले आहेत. एजन्सीने प्रोटेक्टिव्ह कोटिंग करून दिलेली आहे. अजूनही काही ठिकाणे अशी आहेत की, जेथे ते झालेले नाही. ते विभाग एजन्सी कडून करून घेणार आहे. त्यांनी ते केले नाही तर त्यांच्या रिस्क अँड कॉस्टवर विभाग करणार आहे.

३.१५६ यामध्ये महालेखाकारांनी असा अभिप्राय दिला आहे की, " No penalty was levied for contractual violation " असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, काजळी प्रतिबंधक रंग लावण्याचे काम एजन्सीकडून करून घेणार. त्यांनी ते काम करून दिले तर दंडाचा प्रश्न येत नाही. नाही केले तर, त्यांच्याकडून दंड वसुली करणार.

३.१५७ महालेखाकारांनी सन २०११-२०१२ मध्ये हा आक्षेप काढला आहे. सन २०१५-२०१६ पर्यंत त्याबाबत काहीही झालेले दिसत नाही. तसेच काजळी प्रतिबंधक रंग लावण्याचे काम एजन्सीकडून विभागाने आतापर्यंत का करून घेतले नाही ? अशी विचारणा समितीने केली, यावर विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये जे जे आक्षेप आलेले आहेत, त्या सर्वांची पूर्तता करणे, हे विभागाचे कर्तव्य असून हे अभिप्राय सन २०१४-२०१५ मध्ये आलेले आहेत.

३.१५८ जे प्रोटेक्टिव्ह कोटिंग करायचे होते त्याबाबत अमुक ठिकाणी ते करणे आवश्यक आहे अशी काही ठिकाणे निश्चित केली होती का? तसेच निश्चित करण्यात आलेल्या सर्व ठिकाणी कंत्राटदाराने प्रोटेक्टिव्ह कोटिंग केले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, तेथे प्रोटेक्टिव्ह कोटींग झालेली नाही. काही अशा साईट्स पाहिल्या आहेत की, जेथे ते करण्याची गरज आहे. परंतु, अजून तेथे ते झालेले नाही आणि एमएमआरडीएने संबंधित एजन्सीला (एलटीएसई) कळविले आहे की, त्यांना प्रोटेक्टीव्ह कोटींगचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे.

३.१५९ काजळी प्रतिबंधक रंग न लावल्याने एमएमआरडीएने एलटीएसई या एजन्सीचे ८० टक्के प्रदान म्हणजे ४३ कोटी रुपये राखून ठेवले होते. सप्टेंबर, २०१३ च्या विभागाच्या पत्रात असे नमूद केलेले आहे की, They will do this work. u 3 वर्षांनंतरसुद्धा प्रोटेक्टिव्ह कोटींगचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले असे विभागीय प्रतिनिधींनी ठामपणे सांगू शकतात का ? अशी विचारणा करून समितीने असे असतानाही एमएमआरडीएने एलटीएसईला निधी प्रदान केला याबाबत अश्चर्य व्यक्त केले. याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे मान्य केले की, ते अजून पर्यंत झालेले नाही. जे पैसे प्रदान केले होते, त्याचे कारण असे आहे की, हा प्रकल्प अतिशय अडचणीच्या परिस्थितीमधून जात आहे. हा प्रकल्प पूर्ण करायचा की, फक्त कंत्राटातील अर्टीमधील वाद वाढवायचे हा मुद्दा विभागासमोर होता. तसेच, हा एकच मुद्दा नाही तर अनेक मुद्दे आहेत. There are various issues on which we have to rECover money from the Contractor. आता ती वसूली केली तर ती कदाचित होईल परंतु, प्रकल्प येथेच थांबेल तो पुढे जाणार नाही.

३.१६० सदर प्रकल्पाचे काम थांबेल म्हणून विभागाला अशाप्रकारे अयोग्य पद्धतीने काम करता येणार नाही. अशाने तो कंत्राटदार निघून जाईल असे मत समितीने व्यक्त केले. समितीच्या मतावर विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, अंतिम देयकामधून ही सर्व वसुली झाल्याशिवाय कंत्राटदारांना जाऊ देणार नाही. याबाबत प्रश्नच नाही. त्यांची बँक गॅरंटी विभागाकडे आहे व इतरही सर्व बाबी आहेत.

३.१६१ उपरोक्त सर्व बाबी करणे आवश्यक आहे असे विभाग मान्य करत आहे. विभागाच्या डट्युरॅबिलिटीवर ज्याचा परिणाम होणार आहे, प्रकल्प फार अडचणीतून जात आहे. समिती मान्य करते की हा प्रकल्प करायलाच नको होता. या प्रकल्पाची व्हायाबिलिटी, फिजिबिलीटी ही कोणाही मुंबईकराचा सल्ला न घेता केलेली आहे. हा प्रकल्प जनतेला भविष्यात उपयोगी ठरणार आहे. ते पैसे वाया गेलेले नाहीत. सदर प्रकल्पाच्या ठिकाणची लोकसंख्या वाढत आहे. या प्रकल्पामुळे तेथे प्रगती होण्यास सुरूवात झालेली कारण तेथे मोनो रेल आहे. त्यामुळे हे ५-१० वर्षांनी उपयोगात येणार आहे. कमीत कमी डट्युरॅबिलिटी जेथे कन्र्सन आहे, त्या ठिकाणी अशाप्रकारे ५-५ वर्षे विभागाने त्यांना बायस साईडवर ठेवून डिफेन्स साईडमध्ये आर्ग्युमेंट केले तर, कंत्राटदार काही करणार नाहीत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागाने यास प्राधान्य दिले आहे की, हा प्रकल्प संपला पाहिजे. इतकी वर्षे तो लांबलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाला तर, फेज २ मधील लाखो प्रवाशांना त्याचा फायदा होईल. कारण आता झालेल्या पोर्शनमध्ये अतिशय कमी लोकांचा वापर होतो. प्रकल्पाची मेन रायडरशिप दुसऱ्या पार्टमध्ये आहे. आता ते काम संपत आलेले आहे. ते काम लवकरात लवकर संपवायचे आणि हे जे सर्व मुद्दे आहेत की, विभागाचे काही पैसे कंत्राटदाराकडून वेगवगळ्या माध्यमातून वसूल करायचे आहेत. त्यांनीही विभागाकडे काही क्लेम्स केलेले आहेत.

३.१६२ Life of the structure will reduce या समितीच्या मताबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागाकडून तसे होणार नाही. तो काही फार मोठा वादाचा विषय नाही. काही ठिकाणी या अडचणी दिसलेल्या आहेत. त्या ठिकाणचे काम कंत्राटदाराकडून करून घेण्यात येईल आणि त्यांनी नाही केले तर त्यांच्या रिस्क व कॉस्टवर एमएमआरडीए करेल. असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

३.१६३ प्रकल्प पूर्ण करणे ही विभागाची जबाबदारी आहे, प्रायॉरिटी आहे. हे पैसे भविष्यात वसूल झाले नाहीत तर विभागाकडे काय उपाययोजना आहे की, ज्या माध्यमातून कंत्राटदाराकडून पैसे वसूल करणे शक्य आहे? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कंत्राटदारांना प्रदान करावयाची देयके शिल्लक आहेत.

३.१६४ कोणताही कंत्राटदार असू दे, परंतु, ज्याने ते कामच केलेले नाही तरी त्याचे देयक अदा करणे आणि त्याचे समर्थन करणे कितपत योग्य आहे ? अशी पृच्छा समितीने विभागास केली व सूचविले की, कंत्राटदाराने जर कामच केले नाही तर त्याची रक्कम अदा करू नये. यावर

विभागीय प्रतिनिधींनी कंत्राटदाराचे ते समर्थन करत असल्याचे नाकारले. विभागाने कंत्राटदाराला पेमेंट केलेले नाही. कंत्राटदाराने काजळी प्रतिबंधक रंग लावला नाही व विभागाने पैसे दिले असे झालेले नाही. कंत्राटदाराने त्यांच्या खर्चातून हे काम केले पाहिजे हे विभागाने मान्य केले आहे.

" गंज प्रतिबंधक उपाययोजना अयोग्य रीतीने करणे "

३.१६५ ' या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, जेथे प्रोटेक्टिव्ह पेंट लावला तेथे तो सँड ब्लास्टिंग करून लावला पाहिजे होता. मात्र सँड ब्लास्टिंग केलेलेच नाही. याचा अर्थ जो प्रोटेक्टिव्ह पेंट (काजळी प्रतिबंधक रंग) लावला आहे तो देखील उपयोगाचा नाही. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अँटी कोरोसिव्ह ट्रिटमेंट करताना पूर्वी बार साफ करताना ते सँड ब्लास्टिंगच्या माध्यमातून साफ केले पाहिजे असे अपेक्षित होते. सुरूवातीच्या काळात कंत्राटदाराने सँड ब्लास्टिंग वापरले नाही. त्यांनी सँड ब्लास्टिंग शिवाय साफ करून केले, ते चुकीचे होते. आता पीएमसी एलबीजी आहे. त्याच्या पूर्वीच्या काळात हे सुरू झाले होते. एक हजारच्या सुमारास पीअर्स होते, ते त्या काळात सुरू झाले. करंट पीएमसीच्या नजरेस आल्यानंतर त्यांनी हे लक्षात आणून दिले की, हे चुकीचे होते. त्यानंतर त्यांनी दुरूस्त केले. आता त्यानंतर जे सगळे काम झालेले आहे, ते व्यवस्थित सँड ब्लास्टिंगच्या माध्यमातूनच झालेले आहे. जे काम पूर्वी झाले, त्यामध्ये ही सिस्टम वापरली गेली नाही, त्यामुळे काही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे काय ? महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची देखील विभागाने तपासणी केली. यातील मुळ मुद्दा पर्मिएबिलीटी टेस्ट असते. जे बार आहेत, तेथपर्यंत पाणी पोहोचले तर, धोका असतो. बार पर्यंत पाणी पोहोचले की, रस्ट होण्याची शक्यता असते. या परिस्थितीत प्रत्येक सेगमेंटची टेस्ट केलेली आहे. त्याला क्युब स्ट्रेंथ टेस्ट म्हणतात. त्यामध्ये कोठेही प्रॉब्लेम आलेला नाही. जी मॅक्झिमम पर्मिएबिलीटी आहे ती १७ एम.एम. पर्यंत दिसलेली आहे. एमएमआरडीएची जे तांत्रिक नियम आहेत त्यानुसार २५ एम.एम. पर्यंतची लिमिट आहे. २५ एम.एम.पेक्षा कमी राहिली तर स्ट्रक्चरला कोणताही धोका होत नाही.

३.१६६ विभागीय प्रतिनिधींनी केलेल्या खुलाशाशी समितीने असहमती दर्शविली व असे मत व्यक्त केले की, असे जर असेल तर प्रत्येक ठिकाणी अशी दिलगिरी व्यक्त केली जाईल कंत्राटदाराने केले ते बरोबर असेल तर मग स्पेसिफिकेशनला, कोडला काहीच अर्थ नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असतापूर्वी काही ठिकाणी सँड ब्लास्टिंगने साफ झालेले नाही ही वस्तुस्थिती असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

३.१६७ कोणत्याही स्टीलला सँड ब्लास्टिंग करून नंतर प्रोटेक्टिव्ह पेंट वापरण्यापूर्वी प्रायमर वापरावा लागतो नंतर पेंट वापरावा लागतो तरच त्याचे लाईफ वाढते. विभागाने सँड ब्लास्टिंग न करता कोणताही पेंट लावला तर कोरोजन होणारच आहे असे मत समितीने व्यक्त केले. व विचारणा केली की, पाणी आत जाणार नाही याची खात्री काय आहे ? याबाबत विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, पाणी आत गेले तर कोरोजन होते. परंतु, पाणी आत गेले नाही तर कोरोजन होत नाही. यासाठी पर्मिएबिलीटी टेस्ट ही तांत्रिक टेस्ट आहे. त्यामध्ये २५ एम.एम. पेक्षा कमी पर्मिएबिलीटी असेल तर धोका होत नाही. यामध्ये जास्तीत जास्त १७ एम.एम. पर्मिएबिलीटी आहे.

३.१६८ सँड ब्लास्टिंग करण्याचे का टाळले आहे ? तसेच काम करीत असताना त्याकडे लक्षच दिलेले नाही. विभागाने उत्तरात असे नमूद केले आहे की, PMC did point out these deficiencies. सोवील या कंपनीच्या पीएमसीला विभागाने काढून टाकले. काम सुरू केल्यानंतर विभागाची एकच पीएमसी आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता हे त्यावेळेस झालेले आहे. यामध्ये दुर्लक्ष झाले आहे. सध्याच्या पीएमसीने (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) हे लक्षात आणून दिले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.१६९ विभागीय प्रतिनिधींनी सध्याची पीएमसी असे सांगितले. परंतु, सुरूवाती पासून विभागाची एकच पीएमसी आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, पूर्वी पीएमसी सोवील या कंपनीची होती. त्यांच्या काळात सुरू झाले होते, त्यावेळी हे बघितले गेले नाही. आताच्या पीएमसीनेच आपल्या नजरेस आणून दिले की, हे चुकीचे झालेले आहे, हे बंद केले पाहिजे. हे नजरेस आल्यानंतर तात्काळ दुरुस्त करण्यात आले. परंतु, पूर्वी झालेल्या कामाबाबत काही धोका होत आहे किंवा नाही याबाबत तपासल्यानंतर १७ एम.एम पेक्षा कमी पर्मिएबिलीटी असल्याने धोका वाटत नाही असे तांत्रिक मत आहे.

३.१७० ओपीसी सिमेंट आणि पीपीसी सिमेंट यांच्या स्ट्रेन्थमध्ये, क्युरिंगमध्ये आणि भावामध्ये काय फरक आहे? असे समितीने विचारले असता, पीपीसी मध्ये २० टक्के फ्लॉय ॲशचा कन्टेट असतो. नवीन नियमाप्रमाणे याला जास्त प्राधान्य दिले जाते. त्याची किंमतही कमी आहे. हे इको फ्रेंडली आणि एन्व्हॉयरमेंट फ्रेंडलीसुद्धा आहे. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

३.१७१ विभागाकडून जो करारनामा केलेला असतो त्यामध्ये मानांकन ठरलेले असते. बॅगमागे ५ ते १० रुपयांचा फरक आहे म्हणून पीपीसी सिमेंट वापरले जाते हा त्यातील तांत्रिक ढाचा आहे ओपीसीला लवकर सेटिंग होते, पीपीसीला सेटींगसाठी जास्त वेळ लागतो. हे यासाठी वापरले जाते की, पर बॅगमागे दहा रुपयांचा फरक आहे का? अशी विचारणा केली असता.

३.१७२ यामध्ये दोन भाग असून पीपीसी वापरले म्हणून नुकसान झाले असे नाही दुसरे म्हणजे ही एकॉनॉमिकली बाब आहे त्यामुळे पैशाची बचत होते. पीपीसी सिमेंटही मजबूत आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

३.१७३ पीपीसीला क्युरिंग पिरेड जास्त असून ओपीसीला कमी आहे, याशिवाय दुसरा काही फरक नाही. पीपीसी जास्त मजबूत आहे आणि ओपीसी पाहिजे तेवढे स्ट्राँग नाही, असेही नाही तसेच पीपीसी सिमेंटचा वापर केला तर त्याला क्युरिंग पिरेड २५ दिवस पाहिजे. ठेकेदार किती चांगल्या पद्धतीने क्युरिंग करतो हे तुम्ही आपण सर्वजण बघतो. ओपीसीला क्युरिंग पिरेड कमी आहे. ठेकेदाराने पाणी कमी जास्त वापरले तरी चालते म्हणून आपण ओपीसी वापरतो. एखाद्या वेळेस ठेकेदाराच्या लोकांनी कमी जास्त पाणी टाकले तरी सेटींग चांगले झाले पाहिजे, असा त्या पाठीमागचा उद्देश असतो. म्हणून सार्वजनिक बांधकाम खाते ओपीसी सिमेंटला प्राधान्य देते. असे मत समितीने नोंदविले यावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, पीपीसी एम ३५ वापरले असेल तर ते एम ४० च्या बरोबरीने होते. यामध्ये १४.७१ कोटी रुपयांची बचत झालेली असून विभागाने त्यांचेकडे दावा दाखल केलेला आहे.

३.१७४ आयआरएस ४.१.१. मध्ये " Portland Pozzolana Cement shall not be used for PSC work. स्पेसिफिकली यांचे नॉर्म्स आहेत. IRS Concrete bridge Code 1997 does not permit use of PPC in RCC. असे समितीने नमूद केले असता पीपीसी वापरले तरही कोठेही स्ट्रेंथ कमी पडत नाही. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

३.१७५ रेल्वे खाते कोठल्याही राज्य सरकारवर अवलंबून रहात नाही. राज्य सरकार कितीही प्रगत असले तरी रेल्वेचा ब्रिज बांधत असताना त्या ब्रिजचे पैसे रेल्वेकडे वर्ग करावे लागतात. रेल्वेकडे ठेकेदार कमी असल्यामुळे पाच पाच वर्षे कामे रखडलेली असतात. रेल्वेचा पूल बांधताना त्यांचा ठेकेदार अजिबात कॉम्प्रमाईज करीत नाही. आपण नवीन पूल बांधतो, परंतु ते लगेच पडतात, अशी शेकडो उदाहरणे आहेत. कोणत्याही बांधकामाच्या जो क्युरिंग पिरेड असतो त्यावर आपले कोणतेही नियंत्रण नसते. एमएमआरडीए असो किंवा पीएमसी असो त्यांचे कोणतेही नियंत्रण नसते. Subject to quering सिमेंटचे सेंटलमेंट झाले पाहिजे. त्यामध्ये फ्लॉय श टाकली तर त्याला किती दिवसाचा क्युरिंग लागतो. नॉन फ्लॉय ॲश असेल आणि त्यामध्ये ग्रीट असेल तर त्याला किती दिवसाचा क्युरिंग लागतो यासाठी काही कालावधी आहे. तो कालावधी कोणीही पाळत नाही कारण ते घाईगर्दीत असतात. एवढे टक्के काम झाले की, एवढे पेमेंट रिलीज करायाचे असते. आपल्याला तो दिवस सुद्धा स्लॅबसाठी ठेवावा लागतो. जो क्युरिंग पिरेड असतो तेवढ्या दिवसाचे त्याला कम्लिशन सर्टिफिकेट मिळत नाही. या सर्व बाबी तांत्रिक आहेत. अशा छोट्या छोट्या गोष्टी एकत्रित येऊन या सर्व घटना घडतात. त्यामुळे मोनो रेलची फिजिबिलीटी कधीच होणार नाही. जोपर्यंत M.M.R.D.A. हे सर्व लोकप्रतिनिधींना बोलावून त्याची कनेक्टिव्हिटी कशी वाढविता येईल यादृष्टीने विचार करीत नाही तोपर्यंत हे फिजिबल होणार नाही. एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना ठेकेदार, डेव्हलपर येऊन भेटतात. परंतु मोनोरेलची उपयोगिता किती आहे हे M.M.R.D.A. ने सर्व लोकप्रतिनिधींना विचारावे. आपण जे काही करणार ते शासनाच्या भल्यासाठीच करणार, याबद्दल समितीचे दुमत नसल्याचे समितीने स्पष्ट केले तसेच रेल्वेने लेखी दिलेले आहे की, पीपीसी सिमेंट हे अलाऊ नाही. अशी विचारणाही समितीने केली. यावर विभागीय प्रतिनिधींनी आयआरएस कोडमध्ये नसून इतर कोडमध्ये आहे असा खुलासा केला.

३.१७५ यामध्ये ४३ ग्रेड, ५३ ग्रेड सिमेंट असतो यामध्ये फक्त फरक सेटिंगचा असतो. पिलर उभा करायचा असेल तर त्याचा सेटिंग पिरेड २५ दिवसाचा असतो आणि २५ दिवसानंतर पुढचे काम करावे लागते. आपण हे बघत नाही की २५ दिवस झाल्यानंतरच त्यांनी पुढचे काम सुरू केले का? या गोष्टी तुम्ही बघत नाही की तुमचा सल्लागार बघत नाही याच्या मागचे कारण असे की, सिस्टीम फास्ट झाली पाहिजे. असे समितीने नमूद केले तसेच " Durability and stability of the guideway structure remained a matter of concern " या बाबतीत विभागाने खुलासा करावा असे सांगितले असता तांत्रिकदृष्ट्या अभ्यास केलेला आहे असा काही कन्सर्न नाही. जी सिस्टीम वापरलेली आहे त्यामध्ये कोठलीही स्ट्रेंथ कमी झालेली आहे असे सांगता येत नाही. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

३.१७६ समितीने १४ कोटी रुपये आपण वसूल करणार आहात का? अशी विचारणा केली असता कंपनीला जी देय रक्कम आहे त्यातून वळते करण्यात येतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

३.१७७ पुढे समितीने " High chloride content in sub-soil " विचारले असताया संदर्भात महालेखाकारांना कॉन्ट्राक्ट में रिपोर्ट को रेफर करके लिया गया था. concrete strucutres अगर १ किलोमीटर कोस्ट लाईन एरिया के भितर High chloride content एरिया में है, तो सिव्हील स्ट्रक्चरस को १२० साल के लिए लाइफ चाहिए. उस हिसाब से डिजाईन में ७५ एमएम का कवर होना चाहिए और कॉन्क्रीट स्ट्रेन्थ एम ५० की होनी चाहिए. हमने वायोलेशन यह देखा कि जो पाईल्स बनाए है उसमें वडाला डेपो से भक्ति पार्क का जो स्ट्रेच है उसमें जो कन्सट्रक्शन हुआ है वहां पर, The Strength of concrete used as M-35 with 75 MM coverage instead of M-50 with 75 MM coverage. एम ५० की जगह पर एम ३५ यूज किया गया है अशी माहिती महालेखाकारांनी समिती समोर सादर केली.

३.१७८ यावर विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, यामध्ये एम ५० पाहिजे होते की एम ४० पाहिजे होता, हा पहिला मुद्दा आहे. कोड ऑफ कॉन्ट्रॅक्टमध्ये एम ४० अपेक्षित होते, एम ५० नाही. परिच्छेद सी १.५.६ " Material specinication " पाईल्स कॅपस् आणि पाईल्स साठी Concrete Grade M-40 आहे त्याऐवजी आम्ही एम ३५ पीपीसी इन्क्ल्यूड करून वापरलेले आहे यामध्ये स्ट्रेंथचा इश्यु येत नाही. त्याची पण

तपासणी करून घेतली असुन येथे खाली जे क्लोरिन आहे त्याचा काय परिणाम होऊ शकतो म्हणून त्याची आम्ही तपासणी करून घेतली आहे. श्री. गणपुळे, माजी प्राध्यापक, व्हीजेटीआय यांचेकडून एक स्ट्रक्चरल ऑडिटचा रिपोर्ट करून घेतला आहे त्यांनी अतिशय सविस्तर अहवाल दिलेला आहे. श्री. गणपुळे हे खाजगी स्ट्रक्चरल इंजिनिअर आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

३.१७९ ठेकेदाराने एम ५० ऐवजी एम ३५ लोअर ग्रेडचे सिमेंट वापरले आहे. पीएमसीचे कन्सेंट घेऊन केले की त्यांनी केले आणि त्यानंतर पीएमसीने ओके केले. आता आपण जो खुलासा करीत आहात तो पीएमसीने ओके केला आहे का? की त्यासाठी आपण आयआयटीकडून मार्गदर्शन मागवित आहात.अशी विचारणा समितीने केली असता कंपनीने अल्टरनेटिव्ह सजेस्ट केलेले आहे की, एम ४० ऐवजी एम ३५५ वापरणार आहे. त्यानंतर पीएमसीने तपासणी करून ते ओके करून दिलेले असल्यांचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला तसेच यासंबंधी थर्ड पार्टी अभ्यास करून घेतला असल्याचे नमुद करत कॉस्ट सेव्हिंग त्यांचेकडून रिकव्हर करायची असल्याचे समितीस अवगत केले.

३.१८० व्हिजेटीआयचे निवृत्त प्राध्यापक यांनी स्वत:ची खाजगी कन्सलटन्सी सुरू केली आणि त्यांच्याकडून स्ट्रक्चरल ऑडिटचा रिपोर्ट घेतला. ती खाजगी कंपनी आहे, आपल्याला असे किती अहवाल पाहिजे. आपण आयआयटीकडून करून घेणे आवश्यक होते. उद्या आपण कोणत्याही खाजगी माणसाकडून सर्टिफिकेट आणून अशी कामे सुरू करायची आहेत का? याबाबत समितीने विचारणा केली असता. कोठलीही शासकीय संस्था असेल तर त्यांची लायबिलिटी जास्त असते, त्याबद्दल दुमत नाही. कोठल्याही बिल्डिंगचे स्ट्रक्चरल इलिजिबिलिटी बघताना मार्केटमधून स्ट्रक्चलर ऑडिट करून घेणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे ॲथोराईज्ड जे स्ट्रक्चरलर इंजिनिअर आहेत, त्यांचेकडूनही विभाग तपासून घेत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

३.१८१ कॅपचे एम ५० चे मानांकन ठरविले होते याबाबत विभागाने केलेला खुलासा समितीला मान्य नसून मोनो रेल चालविण्याची जबाबदारी विभागाची आहे. मोनो रेलच्या टेक्निकल डेटावर उद्या कोर्ट देखील सुरक्षेच्या दृष्टीने मोनो रेल बंद करण्याचे आदेश देईल. एवढे कॉम्परमाईज येथे केलेले आहे. येथे एम ५० ऐवजी एम ३५ वापरले हे कोण समितीला समजावून सांगणार आहे अशी विचारणा समितीने केली असता कंपनीचा अहवाल आहे त्यामध्ये या कॉन्ट्रॅक्ट करारनाम्यामध्ये एम४० मटेरियलचे स्पेसिफिक आहे. The specified minimum 28 days compressive strength of concrete use for various structures is as follows, Pile Caps and Piles चा Concrete Grade is 40 अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

३.१८२ एम ५० कोठून आले? याबाबत समितीने महालेखाकार यांना विचारणा केली असता महालेखाकार यांनी समितीस असे विदित केले की, कॉन्ट्राक्ट एग्रीमेंट में ऐसा मेन्शन किया गया है कि कौनसा स्टॅण्डर्ड फालो किया जाएगा. Contracts refer about Report BS-14 January, 2001, durability of Concrete Structure from Ministry of Railways, Government of India अब इस रिपोर्ट में यह मेन्शन है कि अगर सिव्हिल स्ट्रक्चर को ?विद इन एक किलोमीटर में कोस्ट लाइन बनाना है " The Civil Structure for having a design life of 120 years should have 75 MM coverage with a concrete strength of M-50. We are mentioning the report of Ministry of Railways ".

३.१८३ उपरोक्तच्या अनुषंगाने समितीने अशी पृच्छा केली की, This is the basic rule. But the figure mentioned in Contract is M-40. एम ४० से एम ३५ कन्वर्ट करने का क्या कारण है ? ऐसा क्यों करने दिया गया ? जब हमने एम ४० किया है तो अब हम एम ३५ को जस्टीफाय करेंगे. एम ३५ से कॅप को प्रॉब्लम नहीं होगा. पाईल्स को प्रॉब्लम नहीं होगा यह सारी सॉल्ट लॅण्ड थी. बाद में मॅन्ग्रोज कटते कटते, ५०-६० साल तक लोगों ने इसे काटने के बाद अब ऐसी स्थिती आयी है. ३१ पैकी २२ स्टेशनपचे डेपो आहेत. त्यातील काही भाग हा मिठागरांमध्ये येतो मातीमध्ये सतत क्लोराईड मिसळून राहते, त्यामुळे जे स्पेसिफिकेशन ठरले असेल त्याप्रमाणे करायला पाहिजे. यासाठी खाजगी सल्लागारांकडून करणार असाल तर ते योग्य नाही. या समितीचा अहवाल १२० वर्षे संगणकाच्या हॉर्ड डिस्करवर राहणार आहे, तोपर्यंत आपण कदाचित राहणार सुद्धा नाही. परंतु उद्या असे होता कामा नये की, आपण सर्वजण मिळून हे मंजूर केले. आता विभागाला लोकांच्या सुरक्षिततेसाठी अतिरिक्त खबरदारी घ्यावी लागेल यासाठी एमएमआरडीए काही करणार आहे का? या कामासाठी एम ५० ठरले असेल तर तेथे एम ३५ करता कामा नये यामध्ये बदल करण्याचा अधिकारच नव्हता. आपण रेल्वे म्हणून घेतो त्यामुळे आपण रेल्वेचे स्टॅण्डर्ड घ्यायला पाहिजे त्याला बिल्डिंगचे स्टॅण्डर्ड घेता येणार नाही. डिफेंसच्या बाजुने एखादा रस्ता जात असेल किंवा एखादा ब्रिज असेल तर लोकांना आतमधील काही दिसता कामा नये म्हणून त्यांचे वेगळे मानांकन असतात. त्यांचे आरसीसीचे मानांकन वेगळे असते. हे जे झालेले आहे ते योग्य नाही. याला कोठल्याही सर्टिफिकेशनने योग्य ठरविता येणार नाही. एमएमआरडीए लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नवीन कन्स्लटंट नेमून नव्याने ऑडिट करून घेणार आहे का? अशी पृच्छा समितीने केली असता सुरूवातील डिझाईन निश्चित केले होते त्यावेळी आम्ही आयआरएसशिवाय दुसरा कोणताही कोट स्वीकारणार नाही, असे ठरले होते. यामध्ये आपण आयआरएसबरोबर दुसरे चार ऑप्शन दिलेले आहेत. काही ठिकाणी M-४०

तर काही ठिकाणी दुसरे ऑप्शन देण्यात आले होते. आता कॉन्ट्रॅक्चुअल ऑप्शन असल्यामुळे त्यांना प्रत्येक ठिकाणी जबाबदार धरू शकत नाही. विभागामार्फत स्टक्चरला काही भिती आहे किंवा कसे याची तपासणी केली जाणार आहे. सदरहू काम प्रोसिजरनुसार खाजगी व्यक्तीकडून करून घेतलेले आहे. आता पुन्हा हवे असल्यास आयआयटीमार्फत टेस्ट किंवा इन्सपेक्शन करून घेण्याची कार्यवाही केली जाईल. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

३.१८४ सदरहू काम चांगल्या एक्सपर्ट किंवा इंटरनॅशनल कन्सल्टंटमार्फत करून घ्यावयाचे असल्यामुळे त्यांचा पॅनलमध्ये समावेश करावा अशी समितीची सूचना असल्याचे समितीने नमूद केले असता खाजगी व्यक्तीला पॅनलमध्ये घेतले तर पुन्हा कोणीही शंका घेऊ शकेल असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

३.१८५ जगात अशाही कंपन्या आहेत की, त्या कोणत्याही तत्त्वाशी तडतोड करीत नाहीत. त्यांची जगात क्रेडिबिलीटी आहे. जगात अनेक कन्सल्टंट आहेत ते वेगवेगळ्या गोष्टींवर सल्ला देण्याचे काम करीत असतात म्हणून अशा कन्सल्टंटना एमएमआरडीएच्या पॅनलवर घेण्याबाबत विभागाने विचार करावा तसेच त्यांच्याकडूनच आपल्याला रिपोर्ट आणावा लागणार आहे. करारामध्ये बीएस-४०नुसार सर्व गोष्टी कोट केल्या जाव्यात, असा उल्लेख केलेला होता असाही खुलासा समितीने केला. यावर बीएस-४० नुसार वापरले पाहिजे असे नाही. शेवटी रिफरेन्समध्ये बीएस-४०चा उल्लेख केलेला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

३.१८६ विभागाने ५ कोड मान्य केले त्यातील जो स्वस्त आहे, तो त्यांनी वापरावा असा प्रकार असुन प्रत्येक ठिकाणी व्हेरिएशन झालेले आहे, त्याला मान्यता दिली यासाठी काही तरी सेफ्टी मेजर असला पाहिजे. यामध्ये १२० वर्षांची अट टाकलेली आहे. बीएस-४० शिवाय कोणत्याही कोडमध्ये १२० वर्षांची अट टाकता येत नाही, याची विभागाला माहिती आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी याबाबत तपासणी करून समितीला माहिती अवगत केली जाईल असे सांगितले.

३.१८७ विभागाने करारामध्ये काय नमूद केलेले आहे, ते तपासून घेण्याची आवश्यकता आहे. १२० वर्षांचा संबंध येत असल्यामुळे विभागाला बीएस-४० च्या बाहेर जाऊन कोणतीही कार्यवाही करता येत नाही. बीएस-४० मध्ये १२० वर्षांचा उल्लेख केलेला आहे. इतर कोणत्याही कोडमध्ये उल्लेख नाही म्हणून विभागाला बीएस-४० वापरावा लागणार आहे. असे समितीने नमूद केले असता यापूर्वी सांगितल्यानुसार कोणीही तांत्रिक संस्था स्थापन करू शकतो. त्यांनी रिकमंड केल्यानुसार ते १२० वर्षे राहू शकणार आहेत. तसेच व्हेरिएशन झालेले आहे व्हेरिएशन झाल्यानंतर त्यांचे आयुष्यमान १२० वर्षे राहिल किंवा कसे ते तपासून घेतले जाईल. आतापर्यत हे खाजगी व्यक्तीकडून तपासून घेण्यात आलेले आहे. आता सुचविल्यानुसार शासकीय संस्थेमार्फत किंवा आयआयटीकडून त्याची तपासणी करून घेतली जाणार असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अश्वासीत केले.

३.१८८ विभागाने आयआयटीला अशा प्रकारची कार्यवाही अवलंबिण्याबाबत सांगावे. तसेच विभागाने कंटाटदाराला अशा प्रकारची कार्यवाही करू नये असे देखील सांगण्याची आवश्यकता असुन त्यासंदर्भातील इत्यंभूत माहिती समितीला अवगत करावी, अशी सूचना समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी यास सहमती दर्शविली.

परिच्छेद क्र. ३.१.२.७ ' मोनोरेल ' प्रणालीच्या कार्यचालन आणि देखभालीचा खर्च

३.१८९ ' उपरोक्त परिच्छेदा संदर्भात माहिती देताना महालेखाकार यांनी असे विदित केले की, The Audit Para 3.1.2.7 is regarding " Operation and maintenance cost of monorail system. As per contract, the monorail project was to be operated and maintained by LTSE for a period of Three years from the date of commissioning at per trip cost of Rs. 2546, Rs. 3131 and Rs. 3790 for the first, sECond and third year of operations (for both the phases), subjECt to fixed lump sum cost of Rs. 179.21 crore towards Operation and Maintenance (O & M) cost. The violation in this is " MMRDA agreed (October 2013) to increase the per trip cost of first year from Rs. 2564 to Rs. 3498 on the promise that there was likely to be a gap of six months between starting of commercial operations under Phase I and Phase II and therefore, LTSE would incur the entire fixed cost on manpower, material, electricity, depot expenses etc. in Phase I of operations. " The A.G. remarks on this are " The grant of higher trip rates for the first year of operations by Rs. 934 was irregular and rendered an undue financial benefit of Rs. 1.58 crore to LTSE because the project implementation schedule and contract key dates as indicated under Section C; Appendix-2 of the contract clearly indicated a staggered commissioning of both the phases by six months which was known to all the signatories to the contract. ".

३.१९० ' उपरोक्त च्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली असता रिव्हाईज रेट हा वर्षासाठीनसून तो ६ महिन्यांसाठी आहे. करारामध्ये इम्प्लीमेंटेशन आणि पेमेंट अशा प्रकारे दोन शेड्युल होते. इम्प्लीमेंटेशन शेड्युलमध्ये ६ महिन्यांचा स्ट्रॅगरिंग अपेक्षित होता. पेमेंट शेड्युलमध्ये स्ट्रॅगरिंग काही कारणामुळे येऊ शकली नाही. फेज-१ आणि फेज-२ चे पेमेंट पहिल्यादिवसापासून आले होते. हा दोन्ही शेड्युलमधील कॉनफ्लिक्ट होता. यामध्ये समानता आणण्यासाठी प्रस्ताव एक्झिक्युटीव्ह कौन्सिलपुढे सादर केला होता. त्यांनी ६ महिन्यापर्यंतचा कॉमनखर्च झालेला आहे. यामध्ये प्रोजेक्टमधील डेपो आणि मॅनपॉवर खर्च झालेला आहे. आता त्यांना फेज-१ प्रमाणे दर मिळत आहे. तसेच काही कॉमन खर्चाबाबतची प्रतिपूर्ती होत नाही. ६ महिन्यांकरिता मुदत वाढवून दिलेली असल्यामुळे इम्प्लीमेंटेशन आणि पेमेंट शेड्युलमध्ये समानता येण्यासाठी मदत होणार आहे. यासंदर्भात त्यांनी क्लेम केलेला आहे. फेज-२ सुरू होत नसल्यामुळे त्यांना डेपो आणि मॅनपॉवर खर्च करावा लागत आहे. त्यांना फक्त फेज-१ साठी पैसे मिळत आहेत. ६ महिन्यानंतर त्यांची सर्वस्वी जबाबदारी असणार आहे. जर त्यांनी उशिर केला तर त्यासाठी विभाग जबाबदार नसणार आहे त्यांना नंतर मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

३.१९१ करारामध्ये त्यांना ६ महिन्यापर्यंत मुदतवाढ दिल्याचे नमूद केले होते काय? या प्रश्नाला विभागीय प्रतिनिधींनी पेमेंट शेडयुल मध्ये नव्हती अशी माहिती दिली.

३.१९२ फेज-२ ची तसेच कमर्शियल ऑपरेशनची काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता फेज-२ चे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असुन कमर्शिअल ऑपरेशनच्या संदर्भात टेस्ट घ्यावी लागणार असल्यामुळे त्यासाठी अजून तीन ते चार महिने लागण्याची शक्यता नाकारता येत नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. '

" कंत्राटातील अटींचे उल्लंघन "

३.१९३ ' उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी विभागीय सचिव आणि विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी गाड्या, बेअरिंग्ज, ट्रॅक्शन मोटर्स, फिल्टर्स इत्यादी धुतल्यानंतर निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते पाणी महापालिकेच्या मलप्रवाह वाहिनीत प्रवाहित करण्यात येते या महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत विभागाने खराब पाणी हे महापालिकेच्या सांडपाणी प्राणलीमध्ये सोडण्यात येईल असा खुलासा केलेला आहे. सदर खुलाशासंदर्भात समितीने विभागास अधिक माहिती देण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी असे अवगत केले की, कचरा प्रक्रिया सयंत्र आणि रिसायकल प्लान्ट केव्हा स्थापित करण्यात आला याची माहिती दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ रोजी कचरा प्रक्रिया सयंत्र सुरू झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे की, त्याचे ऑपरेशन काही महिन्यांपूर्वी सुरू झाले. सद्यः स्थितीत तो प्लान्ट सुरू आहे.

३.१९४ बँक हमीचे नुतनीकरण न करण्याची कारणे काय आहेत? तसेच सिम्युलेटर पुरविण्याबाबत विलंब झाला व याबाबत विभागास खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, अजूनपर्यंत तेथे सीम्युलेटर बांधण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती असून सीम्युलेटर बांधण्याची जबाबदारी ठेकेदाराची होती विभागाने त्याचे पेमेंट केलेले नाही

३.१९५ ठेकेदाराने अजूनपर्यंत सीम्युटलेटरचा वेंडर फायनल केलेला नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागाने सदर वस्तुस्थिती मान्य करून पुढे असे विदित केले की, मोनोरेल पायलटना प्रथम सीम्युलेटरवर प्रशिक्षण द्यायचे नंतर मोनोरेल चालविण्यास द्यायची अशी पद्धत आहे. परंतु आर्थिक परिस्थितीमुळे कंपनी सीम्युलेटर बसवू शकले नाहीत. सीम्युलेटर न बसविल्यामुळे विभागाने त्याचे पेमेंट केलेले नाही. सीम्युलेटर नसले तरी मोनोरेले पायलटसना प्रत्यक्ष मोनोरेलमध्ये प्रशिक्षण दिलेले आहे. सीम्युलेटर नसल्यामुळे कामामध्ये किंवा ऑपरेशनमध्ये काही फरक पडलेला नाही. परंतु सीम्युलेटर बसविणे ही कंपनीची जबाबदारी होती ती त्यांनी पार पाडली नाही ही बाब विभागाने मान्य केली.

३.१९६ या अनुषंगाने समितीने सीम्युलेटर म्हणजे काय? असा प्रश्न उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी उत्तरीत केले की, सीम्युलेटर म्हणजे मोनोरेलसारखे प्रत्यक्ष मॉडेल तयार करण्यात येते त्यामध्ये मोनोरेल पायलटसना प्रशिक्षण दिले जाते.विभागाने पुढे अशीही माहिती दिली की, कंपनीने लवकरात लवकर सीम्युलेटर बसवावेत असा पाठपुरावा विभागांकडून करण्यात येत आहे. कंपनीकडून लवकरात लवकर सीम्युलेटर बसवून घेण्याबाबत विभागाने समितीस आश्वासित केले.

३.१९७ कर्मचाऱ्यांच्या क्वॉटर्सचे पैसे वसूल केलेले आहेत असे विभागाने नमूद केलेले आहे. विभागाने किती रक्कम वसूल केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे अवगत केले की, अजून ती रक्कम वसूल झालेली नसुन त्याची किंमत रु ६.९३ कोटी आहे. अटी व शर्तीप्रमाणे कंपनीने २४ क्वॉटर्स बांधून द्यायच्या होत्या परंतु अजून त्यांनी क्वॉटर्स बांधलेल्या नाहीत. कंपनीने क्वॉटर्स बांधल्या नाहीत तर त्या विभागाकडून बांधण्यात येतील आणि त्याचे पैसे कंपनीच्या देयकामधून वजा करण्यात येतील, असे विभागाने कंपनीस सांगितले आहे. आपत्कालीन परिस्थितीत कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी डेपोच्या येथे सहा ट्रान्झीटची व्यवस्था करण्यात आलेली आहे. परंतु अटी व शर्तीप्रमाणे २४ खोल्या बांधणे आवश्यक होते त्या बांधलेल्या नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

३.१९८ कंपनीने खोल्या बांधून दिलेल्या नाहीत आणि पैसेही दिलेले नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, कंपनीच्या आर्थिक स्थितीमुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. कंपनीची आर्थिक स्थिती बिकट झाल्यामुळे अटी व शर्तीप्रमाणे ज्या काही गोष्टी करून द्यावयाच्या होत्या त्या वेळेवर झालेल्या नाहीत, ही खरी वस्तुस्थिती आहे. विभागास प्रोजेक्टचे काम पुढे न्यायचे असल्यामुळे कंपनीला थोडा अवधी देत असल्याचे विभागाने सांगितले. परंतु या सर्व गोष्टी कॅशफ्लोमुळे झालेल्या असल्याचे नमूद केले.

३.१९९ कंपनीचा निधी कमी झाला यास शासन जबाबदार आहे काय ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यास शासन जबाबदार नसून ती कंपनीची स्वतःची जबाबदारी होती कंपनीच्या अंतर्गत अडचणीमुळे ते जबाबदारी पार पाडू शकले नाहीत.

३.२०० कंपनीने सीम्युलेटरची व्यवस्था केली नाही, ती नंतर करणार आहे. क्वॉटर्सचे पैसे दिले नाहीत. विभागाने त्यांना क्वॉटर्स बांधा किंवा पैसे जमा करा असे सांगितले परंतु कंपनी काही करीत नाही. कंपनीची आर्थिक परिस्थिती चांगली नाही असे मत विभागाचेच असल्याचे समितीने नमूद केले. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभाग या बाबतीत चालढकल करत नसून काही कामे करणे अत्यंत आवश्यक आहेत व अशी कामे केली नाहीत तर ऑपरेशनला धोका होऊ शकतो अशा कामांमध्ये विभाग कोणत्याही प्रकारची तडजोड करीत नाही. परंतु काही कामे अशी असतात की, ज्यासाठी काही काळ प्रतिक्षा करावी लागते अशा कामांमध्ये कंपनीस वेळ दिलेला आहे. ती कामे त्वरीत करा अन्यथा कंपनीकडून वसूली करण्यात येईल या निर्णयाप्रत विभाग पोहचलेला नाही. सीम्युलेटर आणि क्वॉटर्स या अशा गोष्टी होत्या की, ज्यासाठी विभाग थोडावेळ वाट पाहू शकतो आणि त्याचा ऑपरेटींगवर विपरित परिणाम होत नाही म्हणून विभागाने कंपनीस अवधी दिलेला असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीत अवगत केले.

३.२०१ विभागाने सदर काम करून घेतले पाहिजे असे आदेश देऊन प्लॅटफॉर्मबाबत तीच परिस्थिती असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता प्लॅटफॉर्मचा विषय थोडा वेगळा असून कंपनीने त्यांच्या डिझाईननुसार तीन प्लॅटफॉर्म दिले होते. त्यानंतर त्यांनी डिझाईन बदलून दोन प्लॅटफॉर्म केले. दोन प्लॅटफॉर्ममध्ये देखभाल करता येईल असा प्रस्ताव कंपनीने दिला आणि तो प्रस्ताव विभागाने मान्य केला. तिसऱ्या प्लॅटफॉर्मचे १.४ कोटी रुपये निगेटीव्ह व्हेरिएशनमध्ये आणले आहेत. त्यामुळे कोणताही विपरित परिणाम झालेला नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस विहित केले.

३.२०२ विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान १४ कोटी रुपयांचा उल्लेख केला तथापि, हा उल्लेख स्पष्टीकरणामध्ये आलेला नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता हा उल्लेख स्पष्टीकरणामध्ये आलेला नसून विभागाने नमूद केले की, ' Cost will be recovered ' असे म्हटले असल्याचे विभागीय प्रतिनिधीनी नमूद केले. प्रत्यक्ष किंमत १४ कोटी रुपये असून विभागाने कंपनीस निगेटीव्ह व्हेरिएशनबाबत पत्र दिलेले आहे आणि विभागाकडून सदर रक्कम वसूल करण्यात येणार आहे असे विभागीय प्रतिनिधी यांनी सांगितले.

३.२०३ बँक हमी नूतनीकरण न करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता कंपनीकडे निधी उपलब्ध नव्हता असा खुलासा विभागीय प्रतिनिधीनी केला. याबाबत समितीने पुढे अशी विचारणा केली की, बँक हमी हे एक असे साधन आहे की, त्यावर प्रोजेक्ट चालवितो. जर बँक हमीचा भंग होत असेल तर आपल्याकडे शिल्लक काय राहते? एखादे काम केले नाही तर समजू शकतो. तथापि विभागाकडून बँक हमी कशी वगळली जाते?

३.२०४ यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, निवेदेतील अटी व शर्तीनुसार कोणत्याही क्षणापर्यंत बँक गॅरेन्टी पूर्ण रकमेची असली पाहिजे यामध्ये दुमत नाही. २४६ कोटी रुपयांची बँक हमी राहणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी एकच बँक हमी नसून सात-आठ बँक गॅरेन्टी होत्या यातील काही बँक गॅरेन्टी काही दिवस नव्हत्या हे खरे आहे. परंतु विभागाकडे बँक हमी नव्हती अशी परिस्थिती नव्हती.

३.२०५ बँक हमीच्या आधारावर प्रोजेक्टचे एक्झीबिशन होते. बँक गॅरेन्टी हा एक पाया आहे. जर कंपनी बँक गॅरेन्टी ठेवत नसेल किंवा अवैध होत असेल तर भविष्यात प्रोजेक्टचे उल्लंघन झाले तर विभागाकडे काय सेक्युरिटी आहे? विभाग वसूलीसाठी काय करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, त्या काळात कंपनीची काही प्रदान न केलेली देयके असल्यामुळे विभागाकडे बँक गॅरेन्टीचा पर्याय उपलब्ध आहे. जर कोणत्याही कारणामुळे प्रोजेक्ट बंद करावा लागला तर विभाग सदर देयकातून वसूली करू शकतो.

३.२०६ विभागाकडे जे काही आहे ते सर्वोतपरी करण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे. परंतु बँक गॅरेन्टी हे एक इन्स्ट्रुमेंट आहे, ते विभाग कसे टाळू शकता ? जर बँक गॅरेन्टी नसेल आणि एखादी गोष्ट झाली तर ठेकेदाराच्या शर्तीनुसार विभागास काम करावे लागेल. कंपनीची आर्थिक परिस्थिती खराब आहे असे विभागाकडून अगदी सहजपणे सांगण्यात येत आहे असे समितीने सांगितले असता समितीच्या या मतावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले असून मधल्याकाळात कंपनीने काही बँक गॅरेन्टी रिन्यू केल्या नाहीत त्याबाबत विभागाने बँकेला निधी प्राप्त करून देण्याबाबत पत्र लिहिले. परंतु कंपनीने काही दिवसांत पैसे भरले किंवा बँक गॅरेन्टी रिन्यू केली त्यामुळे ही बाब विभागाने गंभीरतेने घेतली नाही. असे प्रकार अधूनमधून बऱ्याच वेळा झाल्याचे विभागाने मान्य केले.

३.२०७ बँक हमी नुतनीकरणाची तारीख जवळ येते त्यापूर्वी नवीन बँक हमी नुतनीकरण करून घेणे महत्त्वाचे आहे. बँकेला सांगून त्या तारखेला बँक गॅरेन्टी फॉरफीट केली पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी होती त्यांनी ती पार पाडली काय ? निश्चित करून दिलेल्या तारखेपर्यंत काम पूर्ण केले नाही तर ती बँक गॅरेन्टी कॅश करण्यात येते, असा बँक गॅरेन्टीचा अर्थ आहे त्याप्रमाणे विभागाने कारवाई केली काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? याबाबत खुलासा करण्यास समितीने विभागास सांगितले असता बँक हमी व्यपगत झाली तर त्याला दोन पर्याय विभागाकडे असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

३.२०८ बँक गॅरेन्टी व्यपगत होतेच कशी ? जर दिनांक ३१ जानेवारीपर्यंत बँक गॅरेन्टी असेल आणि कंपनीने ती रिन्यू केली नसेल तर विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ३० जानेवारी रोजी बँक गॅरेन्टी कॅश करण्यासाठी बँकेला पत्र दिले पाहिजे. ज्या अधिकाऱ्यावर ही जबाबदारी होती ती त्यांनी जाणीवपूर्वक पार पाडली नाही की, त्यांच्या लक्षात ही बाब आली नाही, अशा प्रकारे कंपनीला रिलिफ देण्याची कारणे काय आहेत? अशी समितीने पृच्छा केली असता यामध्ये वाईट हेतू किंवा मालाफाईड इन्टेन्शन नव्हते. बँक गॅरेन्टीची मुदत संपत आली असेल आणि विभागाने बँकेकडे ती पाठविली नाही तर विभागाकडे पर्याय आहेत.

३.२०९ विभागाकडे पर्याय आहेत म्हणून नाही तर बँक गॅरेन्टीची मुदत संपली म्हणून विभागाने ती एन्कॅश करण्यासाठी बँकेकडे पाठविली पाहिजे. अन्यथा बँक गॅरेन्टी घेण्याचे कारण काय ? पर्याय म्हणून नव्हे तर बँक गॅरन्टी रिन्यू केली नाही तर बँक गॅरेन्टी कॅश करून घेणे ही विभागाची जबाबदारी आणि कर्तव्य असल्याचे समितीने नमूद केले.

३.२१० यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली तसेच काही वेळा प्रोजेक्टच्या भवितव्यासाठी असे निर्णय घ्यावे लागतात असा खुलासाही केला. जर प्रोजेक्टच्या इंटरेस्टसाठी अशाप्रकारे बँक गॅरेन्टीचे रिलॅक्सेशन विभागाकडून देण्यात येत असेल तर ती गंभीर बाब असल्याचे सांगून समितीने खेद व्यक्त करत पुढे विचारणा केली की, एखादे सीम्युलेटर लावले नाही, ते नंतर लावले हे मान्य आहे परंतु बँक गॅरेन्टीसारखे इन्स्ट्रुमेंट विभाग कॅश करीत नाही आणि ती व्यपगत होते तर मग बॅक गॅरेन्टी कशाला घेता ? असा प्रश्न उपस्थित केला. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, कंपनीने नंतर वेळोवेळी बँक गॅरेन्टी आणून दिलेली आहे.

३.२११ बँक गॅरेन्टी कॅश करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांची होती त्यांनी बँक गॅरेन्टी कॅश का केली नाही ? अशी विचारणा पुनः समितीने विभागास केली तसेच नाराजी व्यक्त करून विभागाने २४० कोटी रूपयांची बँक गॅरंटी कॅश करावी असे समितीचे मत नाही. परंतु, बँक गॅरंटी ज्या तारखेला लॅप्स होणार आहे त्या तारखेच्या अगोदर ती रिन्यू करणार नसाल तर मग बँक गॅरंटीला अर्थ काय आहे ? अशी विचारणा केली. तसेच समितीने असे मत व्यक्त केले की, बँक गॅरंटी लॅप्स होण्याच्या आधी रिन्यू करण्याची सिस्टीम विभागाकडे असणे आवश्यक आहे. तसे नसेल तर मग कारवाई करणे आवश्यक होते. बँकेला निधी उपलब्ध करून देण्यास कळविले असता बँक निधी उपलब्ध करून देत नाही. बँक गॅरंटीच्या पद्धतीमध्ये काही तरी बदल केला पाहिजे. किमान दोन किंवा सहा महिने तरी आधी बँक गॅरंटी रिन्यू करून घेतली पाहिजे अशी सूचनाही समितीने केली.

३.२१२ समितीने या अनुषंगाने पुढे विचारणा केली की, बँक हमी नुतनीकरणासंबंधी विभाग मॉनेटरींग करण्यासाठी प्रयत्न करणार आहे काय तसेच बँक गॅरंटीची सद्यःस्थिती काय आहे? यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सध्या कोणतीही बँक गॅरंटी कालबाह्य झालेली नाही. आजमितीस विभागाकडे २४६ कोटी रूपयांची बँक गॅरंटी उपलब्ध आहे.

३.२१३ बँक हमी कॅश करण्याची जबाबदारी लेखा अधिकाऱ्याची असते. जर विभागाचा लेखा अधिकारी बँक गॅरंटी कॅश करण्याची जबाबदारी पार पाडत नसेल तर मग बँक गॅरंटीची अट काढून टाकावी. विभाग त्याच्या विरूद्ध कोणतीही कारवाई करीत नाही ही बाब गंभीरतेने घेत नाही. एखाद्या कंत्राटदार कंत्राट सोडून गेला तर अशा वेळी काय पर्याय आहे? त्यामुळे बँक गॅरंटी कॅश झाली पाहिजे तसे न केल्यास बँक गॅरंटीला काहीही अर्थ राहणार नाही. असे समितीने खेद व्यक्त करत विभागास सांगितले. विभागाने समितीच्या सदर मतावर सहमती दर्शविली.

३.२१४ बँक गॅरंटी रिन्यू करण्यासंबंधी प्रोसिजर तयार केली पाहिजे या समितीच्या सूचनेच्या अनुषंगाने बँक गॅरंटी कालबाह्य होण्याच्या आधी बँकेकडे एन्कॅश करण्यासाठी पाठविण्यात येईल यात पूर्णपणे लक्ष घालण्याचे आश्वासन विभागाने समितीस दिले.

३.२१५ मूळ डिझाईनमध्ये तीन प्लॅटफॉर्मची तरतूद असताना तीन प्लॅटफॉर्मच्या ऐवजी दोन प्लॅटफॉर्ममध्ये काम चालेल असे विभागाने नमूद केले आहे. मूळ डिझाईनमध्ये तीन प्लॅटफॉर्म बांधण्याची तरतूद होती. साक्षीच्या वेळी विभागाने कंपनीकडून १.४ करोड रूपये वसूल करू असे सांगितले. ती रक्कम प्रोजेक्ट कॉस्ट मधून कमी करण्यात येईल असे विभागाचे म्हणणे आहे. तीनच्या ऐवजी दोन प्लॅटाफॉर्म चालेल हे विभागाने कोणत्या आधारे मान्य केले आहे? अशी विचारणा समितीने केली. यावर विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, हे डिझाईन बिल्ड कंत्राट होते यात डिझाईन त्यांचे असते. कॉन्ट्रॅक्ट प्रोव्हीजन आहे की, डिझाईनमध्ये बदल करावयाचा असेल तर त्यात बदल करण्याचीही परवानगी देण्यात येते.

३.२१६ समितीने विभागाच्या खुलाशावर नाराजी दर्शविली आणि जर असे असते तर अजून स्पर्धात्मक बोली लावण्यात आली असती विभागाने जर असे केले असेल तर मग स्पर्धेला काहीच अर्थ उरत नसल्याचे समितीने मत व्यक्त केले.

३.२१७ समितीच्या उक्त मतावर विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, तीन प्लॅटफॉर्म बांधावे अशी विभागाची मागणी नव्हती आणि स्पेसिफिकेशन देखील नव्हते तसे निविदा स्पेसिफिकेशनमध्ये देखील नव्हते त्यांनी स्वत:हून तीन प्लॅटफॉर्म बांधण्याचे डिझाईन तयार केले होते ते विभागाने मान्य केले. नंतर कंपनीने म्हटले की, तीनच्या ऐवजी दोन प्लॅटफॉर्म बांधल्यास कामावर कोणताही परिणाम होत नाही.

३.२१८ हा प्रकल्प बीओटीवर आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता हा प्रकल्प बीओटीवरील नसून हे इपीसी कंत्राट असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

३.२१९ विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या उत्तरास सहमती दर्शवून कामानुसार निविदा निघाले असणार यात स्पर्धात्मक बोली लागली असणार यासंदर्भात समितीने विचारणा केली यावर विभागीय प्रतिनिधींनी कामानुसार निविदा निघून यात स्पर्धात्मक बोली लागल्याचे मान्य केले. तसेच सदर लार्सन ॲण्ड टुब्रो आणि एलटीएसई यांना असल्याचा विभागीय प्रतिनिधींनी केला.

३.२२० या निविदाच्या वेळी रिलायन्स किंवा अन्य पार्टी आली असेल. डिझाईनमध्ये बदल केला तरी चालतो असे त्यांना समजले असते तर त्यांनी देखील त्याप्रमाणे निविदा भरले असते असे मत समितीने व्यक्त केले. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागाने ?निविदामध्ये तीन प्लॅटफॉर्म हवे आहेत अशा प्रकारचे स्पेसिफिकेशन दिले असते आणि त्यांना दोन प्लॅटफॉर्म करण्यास सांगितले असते तर मग समितीचे म्हणणे मान्य करता आले असते.

३.२२१ या कंपनीने तीन ऐवजी दोन प्लॅटफॉर्म कसे काय केले आहेत ? तसेच एवढा मोठा प्रकल्प करताना किती प्लॅटफॉर्म बांधावे याचे काही डिझाईन नसते काय ? अशी विचारणा समितीने केली असता यात कंपनी स्वत: डिझाईन करते आणि त्याप्रमाणे बांधकाम करते कारण देखभाल ही कंपनीलाच करावयाची आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

३.२२२ यात कॉस्ट कमी झाली तर ती वजा करण्यात येणार आहे व मूळात हे निविदाच चुकीचे असल्याचे मत समितीने व्यक्त केले तसेच काय काय गोष्टी अपेक्षित आहेत हे निविदामध्ये नमूद करण्यात येत असल्याचेही समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता डिझाईन बीडमध्ये विभाग सर्व गोष्टी नमूद करू शकत नाही व तसे करणे शक्य होत नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केली.

३.२२३ मूळ डिझाईन हे तीन प्लॅटफॉर्मचे असताना दोनच प्लॅटफॉर्म करण्याचे कारण काय आहे ? दोन प्लॅटफॉर्म मुळे कॉस्ट कमी होऊन १.४ कोटी रूपये कमी लागतील हे समिती मान्य करते. तथापि प्लॅटफॉर्मची संख्या विभागाने कशाच्या आधारे निश्चित केली आहे ? या महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, कुठल्याही नॉर्मल डेपोमध्ये दोन प्लॅटफॉर्मवर दुरूस्तीचे काम होऊ शकते. त्या कंपनीने कोणत्या कारणामुळे तीन प्लॅटफॉर्म बांधण्याचे प्रस्तावित केले होते हे विभागास माहीत नव्हते. ते विभागाला स्वत:हून तीन प्लॅटफॉर्म बांधून देणार होते त्यामुळे त्यात विभागाला कोणतीही अडचण नव्हती. पण नंतरच्या कालावधीत त्यांनी तीन ऐवजी दोन प्लॅटफॉर्म बांधण्याचा निर्णय घेतला. यात विभागाचे पैसे वाचत होते त्यामुळे ते विभागाने मान्य केले. अशा प्रकारे विभागाचे १.४ कोटी रूपये वाचत होते.

३.२२४ यामुळे ऑपरेशनमध्ये काही अडचण येणार नसून सदर प्लॅटफॉर्म डेपोच्या ठिकाणी असल्याचेही विभागीय सभासदांनी नमूद केले.

' कंत्राटातील त्रुटींचे उल्लंघन '

३.२२५ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात साक्षीच्या वेळी समितीने RITES या कंपनीचे पेमेंट (प्रदान) विभागालाच करण्याचे असताना मे. RITES या कंपनीचे पैसे का क्लेम केले नाही ? महालेखाकारांच्या या आक्षेपाबाबत विभागाने असा खुलासा केला की, हे पैसे विभागालाच भरावयाचे होते. याबाबत समितीने विचारणा केली. विभागीय प्रतिनिधींनी असे अवगत केले की, रेल्वेच्या क्रॉसिंगवरून मार्ग जात होता त्यामुळे RITES च्या अटीबाबत रेल्वेने आग्रह धरला होता. विभागाने देखरेखीसाठी एजन्सी नेमली आहे त्याचा खर्च विभाग देत आहे. थर्डपार्टी पीएमसी रेल्वे मान्य करणार नाही असे रेल्वेने सांगितले. फक्त RITES चे सुपरविजन झाले पाहिजे. रेल्वेमुळे विभागाला RITES ही तिसरी एजन्सी नेमावी लागली आहे. निविदेतील अटीप्रमाणे ही जबाबदारी त्या कंपनीची नव्हती. हा अतिरिक्त खर्च झाला आहे त्यामुळे विभागाला तो खर्च व्हेरिएशन म्हणून द्यावा लागला आहे, अशीही माहिती विभागाने समितीस दिली.

३.२२६ कॉन्ट्रॅक्ट कंडिशन्समध्ये २.५.१८ येथे असे नमूद आहे की, " The quoted lumpsum price by the bidder shall cover supply of all material, handling of material .... testing inspection by statutory bodies including fees payable to them. " या महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, It is not a Statutory body. रेल्वेला फी द्यावी लागते. ती त्यांची जबाबदारी होती. पण रेल्वेने विभागाला आग्रह केला की, देखरेखीसाठी एजन्सी नेमावी ती विभागाने नेमलेली आहे. वस्तुत: ते विभागाला अपेक्षित नव्हते.

३.२२७ नेमलेल्या एजन्सीकरिता फार मोठी रक्कम खर्च झालेली आहे असे मत समितीने व्यक्त केले. समितीच्या या मतावर विभागाने सहमती दर्शवून सांगितले की, हा खर्च विभागाला देखील अनपेक्षित होता.

३.२२८ हा खर्च अनपेक्षित नव्हता. रेल्वेच्या मार्गावरून एखादे बांधकाम करण्यात येते त्यावेळी त्यांना शुल्क द्यावे लागतेच. त्यासाठी विभागाने तरतूद केली नव्हती ही बाब विभागाने मान्य करावी, असे समितीने सांगितले असता यासाठी अतिरिक्त खर्च येईल हे कॉन्ट्रॅक्ट करताना अपेक्षित नव्हते विभागाने पीएमसी नेमली होती. या पीएमसीचा वापर सगळ्या कामासाठी होईल असे विभागाला अपेक्षित असल्याचे विभागीय प्रतिनिधी समितीस अवगत केले.

३.२२९ विभागीय प्रतिनिधीच्या उक्त खुलाशावर समितीने तीव्र नाराजी दर्शवन सूचित केले की, रेल्वे कोणत्याही पीएमसीला त्यांच्या जागेवर काम करण्यास अनुमती देत नाही. यासंबंधी रेल्वेची फार स्पष्ट मार्गदर्शक तत्वे आहेत असे समितीने नमूद केले असता समितीच्या मतावर सहमती दर्शवून विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, ज्यावेळी निविदा तयार करण्यात आले त्यावेळी निविदा कंडिशनमध्ये हे स्पष्ट आलेले नाही त्यामुळे अतिरिक्त खर्च करावा लागलेला आहे.

३.२३० यावर महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, MMRDA ने रु. १.८१ अटीचे प्रदान चाचणीसाठी पर्यवेक्षणासाठी मे.RITES ला केले होते जे वास्तविक त्यांच्याकडून वसूल करण्यास हवे होते. महालेखाकारांच्या उपरोक्त मतास अनुसरून विभागीय प्रमिनिधींनी असा खुलासा केला की, रेल्वेकडून परवानगी घ्यायची होती. रेल्वेला पैसे देण्याची जबाबदारी मे. RITES ची होती. त्याप्रमाणे त्यांनी रेल्वेला पैसे दिलेले आहे. रेल्वे मार्गावरून काम करावयाचे असेल तर रेल्वेला कोट्यवधी रूपये शुल्काच्या स्वरूपात द्यावे लागतात. विभागाला रेल्वेने सांगितले की,थर्ड पार्टीकडून सुपरव्हिजन करून घ्यावे ती त्यांची जबाबदारी नव्हती असे विभागाचे मत आहे. कॉन्ट्रॅक्टनुसार PMC अपॉईंटमेंट करण्यात आली होती PMC रेल्वेला मान्य नव्हती. रेल्वेचे शुल्क कंत्राटदाराने भरले आहे असे विभागाचे म्हणणे आहे. रेल्वेने RITES चे पर्यवेक्षण करायला सांगितले. ते पर्यवेक्षण त्या कॉन्ट्रॅक्टमध्ये इन्कॉर्पोरेट केले नव्हते असे विभागाचे म्हणणे आहे. त्यामुळे हे पैसे द्यावे लागले आहे असे मत समितीने व्यक्त करून विचारणा केली की, PMC चे चार्जेस कोणी भरले होते ? यावर विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, PMC ही संपूर्ण प्रकल्पासाठी असून त्याचे चार्जेस MMRDA भरलेले आहेत.

' निविदेशिवाय चलसोपानांची (Escalator) सरकत्या जिन्यांची प्राप्ती '

३.२३१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, निविदा न काढता रूपये ४०.०० कोटींचे सरकत्या जिन्याचे काम का दिलेले आहे ?

३.२३२ यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, निविदा काढताना सरकत्या जिन्याचे (Escalator) काम समाविष्ट करण्यात आले नव्हते. प्रत्यक्ष कामाला सुरूवात होण्यापूर्वी एस्कलेटरची मागणी करण्यात आली. त्यावेळी मेट्रो रेल्वेचे काम जवळपास पूर्ण होत आले होते. मेट्रो रेल्वे स्थानकावर एस्कलेटर बसविण्यात आले असून मोनो रेल्वेची उंची पाहता सन २०१३ मध्ये एस्कलेटर बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार कार्यकारी समितीची मान्यता घेऊन एस्कलेटर बसविण्यात आले आहे. सदर एजन्सीकडून मोनो रेलचे काम झाले होते. दुसऱ्या एजन्सीला एस्कलेटर बसविण्यासाठी आणले असते तर काम करण्यामध्ये अडचण निर्माण झाली असती. तेव्हा ज्या एजन्सीला मोनो रेल्वेचे काम देण्यात आले आहे त्याच एजन्सीकडून एस्कलेटर बसविण्याचे काम देण्यात यावे, असा निर्णय कार्यकारी समितीच्या मान्यतेने घेण्यात आला अशीही माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

३.२३३ विभागाने कार्यकारी समितीच्या मान्यतेने निर्णय घेऊन प्रोसिजर पूर्ण केले हे समितीस मान्य आहे. कमी दराची असे सांगून समितीने पुढे असे सुचविले की, निविदा काढून त्या दरामध्ये काम करण्यास तयार आहात काय अशी विचारणा करून त्या एजन्सीला काम देता आले असते. पैसे वाचविणे हा विभागाचा उद्देश असता तर विभाग असे करू शकला असता पण विभागाने तसे न करता सरसकट विना निविदा त्या एजन्सीला काम दिले, असे समितीने नमूद केले.

३.२३४ समितीच्या उपरोक्त मतावर विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की शिंडलर, ओटीस, जॉन्सन या सारख्या ठराविक कंपन्याच अग्रेसर आहेत. जरी काही चांगल्या कंपन्या असल्या तरी निविदा काढण्याची पद्धत आहे ठराविक काही कंपन्या आहेत असे सांगून विभाग त्याचे समर्थन करत असल्याने समितीने खेद व्यक्त केला. यावर विभागाने त्या एजन्सीला काम असा होते त्यामुळे विभागाला दुसरी निविदा काढण्यासाठी पर्याय नव्हता असा विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला.

३.२३५ महालेखाकारांच्या या आक्षेपाला उत्तर देताना विभागाने असे नमूद केले आहे की, हा निर्णय व्यवहार्यदृष्ट्या योग्य होता. सरकत्या जिन्याचा दर बाजारभावाप्रमाणे काळजीपूर्वक ठरविलेला आहे. हे विभागाने कशाच्या आधारे सांगितले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता इतर ठिकाणी सरकते जीने बसविण्यात आले आहे त्याचा आधार येथे घेण्यात आला असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधीनी केला.

३.२३६ शिंडलर, ओटीस, जॉन्सन यासारख्या चार-पाच कंपनीचा उल्लेख विभागाने केला. प्रत्येक कंपनीच्या दरामध्ये खूप फरक आहे. मोठ्या कंपनीचे मोठे दर विभागाने लावले तर काय होईल ? विभागाने दरांची तपासणी करून घेतलेली असल्याचे यापूर्वी विभागाने सांगितले. तथापि, ते कोणत्या आधारावर केले आहे तसेच सर्व कंपन्यांचे दर काढले होते काय, या दरांमध्ये काय फरक होता ? याचे स्पष्टीकरण करण्यास समितीने विभागास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या एजन्सीने चार विविध कंपन्यांकडून कोटेशन मागवून घेतले होते यात दोन भाग आहेत. एक म्हणजे एमएमआरडीएने थेट खरेदी करायचे विभागाने खरेदी करावयाचे म्हटले तर विभागाला निविदा काढावी लागते. दुसरे म्हणजे जी एजन्सी काम करीत आहे त्यांच्याकडून ॲड ऑन व्हेरिएशन म्हणून काम करून घ्यायचे त्यांनी ती प्रक्रिया करायची आहे. अशा वेळी विभाग निविदा प्रक्रिया करत नाही ही सर्व प्रक्रिया त्या एजन्सीने केलेली आहे. त्या एजन्सीनेच विविध कंपन्यांकडून कोटेशन मागवून सर्वात कमी दर ज्या कंपनीचे होते त्या कंपनीकडून काम करून घेतले आहे.

३.२३७ विभागाने केलेल्या सदर स्पष्टीकरणावर समितीने तीव्र नाराजी दर्शवून विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, शिंडलर कंपनीने चार लाख रूपये कमी केले आहेत. निविदा न काढता कोणत्याही प्रकारचे कम्पॅरिझम स्टेटमेंट न बनविता समोरच्या एजन्सीला एस्कलेटर बसविण्यास सांगणे चुकीचे आहे, असे मत ही समितीने व्यक्त केले.

३.२३८ समितीच्या या मतावर विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, मूल्यमापन करताना विभागाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ला समाविष्ट करून घेतले होते त्यानुसार मूल्यमापन झाले आहे त्यानुसार ज्याची बोली कमी होती त्यांनाच हे काम दिलेले आहे.

३.२३९ PMC ला काम दिले याबाबत समितीचे दुमत नाही. परंतु समितीचा आक्षेप खरेदीच्या किमतीला आहे. विभागाने पारदर्शकपणे ?निविदा काढले असते तर अधिक चांगले झाले असते असे समितीने मत व्यक्त केले. यावर विभागाने खुलासा केला की, एस्कलेटर बसविण्याचा निर्णय आधीच झाला असता तर विभागाने संपूर्ण पद्धतीचे पालन केले असते. पण एस्कलेटर बसविण्याचा निर्णय नंतर घेण्यात आला त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली, शॉर्टकट म्हणून असे करण्यात आले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

३.२४० समितीने यावेळी विभागाच्या काही मुद्यांसंदर्भात स्पष्टीकरण करण्यास सांगितले. या कामासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबविली असती तर आणखी एक नवीन कंत्राटदार आला असता. सरकता जिना हा LTSE ने स्वत: उभा केला आहे की, त्यांनी याचे काम दुसऱ्याकडून करून घेतले आहे काय, तसेच दुसरा कंत्राटदार आणावा लागला असता असे विभागाचे म्हणणे आहे. हे काम मूळ एजन्सीने केले आहे की, त्यांनी दुसऱ्या बाहेरच्या एजन्सीकडून काम करून घेतले आहे? ती एजन्सी स्वत: उत्पादक आहे काय ? जे एस्कलेटर किंवा लिफ्ट बसवतात ते कधीच सिव्हील वर्क करीत नाही. ते डिझाईन देतात आणि त्याप्रमाणे कंत्राटदाराने बांधकाम करावयाचे असते. त्यानंतर मग तेथे युनिट आणून ते जोडले जाते आणि मग एस्कलेटर उभे केले जाते. त्यामुळे येथे दुसरा कंत्राटदार विभागाला किंवा त्या एजन्सीला आणावाच लागला असता. हे काम त्या एजन्सीने एस्कलेटर न बसविता दुसरा कंत्राटदार आणून त्यांच्या मार्फत एस्कलेटर बसविलेले असल्याचे मत ही समितीने व्यक्त केले तसेच करारानुसार सरकता जिना लावण्याची तरतूद होती तर ती निविदा मध्ये का समाविष्ट करण्यात आलेली नाही ? मोनोरेलचा प्रवास करण्यासाठी लोक जिन्याने जाणार नाहीत. त्यामुळे सरकते जिने लावणे आवश्यक आहे, असे विभागाच्या नंतर लक्षात आले आहे. एमएमआरडीएने मुंबईमध्ये स्काय वॉक बांधले आहे त्यांना देखील सरकते जिने लावण्याची व्यवस्था केली आहे. या स्कॉय वॉक पेक्षा मोनो रेलची उंची जास्त आहे करारानुसार जिन्यांच्या उपलब्धतेनुसार सरकते जिने लावण्याची तरतूद होती तर ते का लावण्यात आले नाही ? जिन्याचे काम LTSE कडे आहे त्यामुळे सरकता जिन्याची खरेदी व उभारणीचे काम LTSE योग्य प्रकारे करू शकते असे आपण नमूद केले आहे. LTSE फक्त खरेदी करू शकते मात्र, एस्कलेटर उभारणीचे काम हा दुसरा बाहेरचा कंत्राटदारच करू शकतो. कारण एस्कलेटर उभे करणे हे LTSE चे काम नाही. तेव्हा LTSE हे काम योग्य प्रकारे करू शकते हे विभाग कोणत्या आधारे सांगत आहे ? त्यांना सरकते जिने उभे करण्याचा अनुभव होता काय ? त्यांचे काम मोनो रेल बांधण्याचे होते ते काम सब-कॉन्ट्रॅक्टमध्येच देण्यात येते. समितीच्या माहिती प्रमाणे जवळ जवळ १३ सब कॉन्ट्रॅक्ट मोनो रेलच्या कामासाठी नेमले होते. १३ सब कॉन्ट्रॅक्ट बरोबर आणखी एक कॉन्ट्रॅक्टर आला असता विभाग १४० कोटी रूपयांचे काम देत आहे. शिंडलर कंपनीचे येथे उदाहरण देण्यात आले आहे. या कंपनीने ३० टक्के सूट दिलेली आहे. डिलर आणि डिस्ट्रीब्युटर डिस्काऊंटमध्ये ३० टक्यांचा फरक आहे. सरकारने थेट खरेदी केली असती तर शासनाचे कित्येक कोटी रूपये वाचले असते. निविदामध्ये तरतूद होती हे स्पष्टपणे दिसत आहे असे मत समितीने व्यक्त केले.

३.२४१ या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी यावर असा खुलासा केला की, भविष्यात याची गरज भासेल असे अपेक्षित होते तसेच अगोदरचा कॉन्ट्रॅक्टर एलटीएसई आहे, त्यानंतर आणखी एक वेगळा कॉन्ट्रॅक्टर लावावा लागला असता.

३.२४२ समितीने विभागीय प्रतिनिधीच्या स्पष्टीकणाचे असमर्थन करत पुढे असे नमूद केले की, असे कित्येक प्रकल्प आहेत, त्या ठिकाणची कामे दोन-दोन कॉन्ट्रॅक्टरकडून करून घेतली आहेत. दुसरा कॉन्ट्रॅक्टर आल्यामुळे कामाला उशीर होईल असे म्हणण्यापेक्षा एकाच कॉन्ट्रॅक्टरकडून काम केल्यामुळे ते वेळेवर पूर्ण झाले का? एकच कॉन्ट्रॅक्टर होता म्हणून मोनोरेलचे काम वेळेत दिले असे कोणते काम आहे. विथीन कॉस्ट काम वेळेत

करून दिले असे झालेले आहे का? अशी पृच्छा समितीने केली. तसेच समितीने विभागाचे स्पष्टीकरण अमान्य करून असे मत व्यक्त केले की, एकाच कॉन्ट्रॅक्टरला काम द्यायचे म्हणून विना निविदा द्या असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

३.२४३ मोनोरेलमध्ये सरकते जिने रद्द करावयाचे असतील तर डिझाईनमध्ये विभागाने व्हेरिफिकेशन करून घेतले होते का ? तसेच सर्व स्टेशन्स उंचावर असल्याचेही समितीने नमूद केले असता महालेखाकारांनी असे सांगितले की, डिझाईन क्रायटेरियामध्ये एक क्लॉज आहे. " The provision for installation of escalator in future shall be made for passenger transportation from footpath level to platform at least 1 from each pavement. " It means, it was there in the design criteria. Therefore this is a case of improper planning. Why MMRDA did not included this in the contract?

३.२४४ महालेखाकारांच्या मतास अनुसरून विभागीय प्रतिनिधींनी असे निविदा केले की, सुरूवातीच्या काळात एस्कलेटर (सरकते जीने) ची गरज नव्हती. करायची गरज नव्हती. भविष्यकाळात ते काम करायचे होते असे कंत्राटदारांचे म्हणणे होते.

३.२४५ विभागाने जर निविदा मागविल्या असत्या तर कोणतीच अडचण नव्हती. निविदा न काढता १४५ कोटी रुपयांचे काम एमएमआरडीए स्वतः करते. याबद्दल विभागीय सचिवांनी खुलासा करावा असे समितीने विभागास सांगितले. यामध्ये जर अनियमितता झाली असेल तर कोणाला पाठीशी घालू नये, असेही समितीने विभागास अवगत केले.

३.२४६ यावर नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी विदित केले की, त्या त्या वेळच्या कामाच्या गरजेनुसार तत्कालीन कार्यकारी समितीने त्यावेळी निर्णय घेत. काम लवकर व्हावे म्हणून त्यांनी त्यावेळी तो निर्णय घेतला. कोणत्याही गोष्टीची खरेदी करीत असताना निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक आहे, हा जो मुद्दा मांडण्यात आला तो मान्यच आहे, त्याबद्दल कोणाचेही दुमत असू शकत नाही. परंतु त्यावेळी कामाचा जो काही वेग होता, काम करण्याची निकड होती, अचानकपणे त्या कामामध्ये बदल जो करावा लागला त्यामुळे त्यावेळी तो निर्णय घेतलेला आहे. अगोदर प्लॅन का केला नाही हा मुद्दा महालेखापालांनी मांडला आहे. २०१३ मध्ये घेतलेला हा निर्णय आहे. निर्णय घेण्यामागची कारणे समितीसमोर नमूद केली आहेत.

३.२४७ या सर्व लिफ्टना मोठ्या प्रमाणात सूट असते. डिलरशीप, डिस्ट्रिब्यूशन डिस्काऊंट ३० टक्क्यापासून सुरू होते काही कंपन्या ५५ टक्क्यापर्यंत देत असतात. हे १४० कोटी रुपयांचे काम हलगर्जीपणाने, काळजी न घेता निविदेविना दिले आहे. त्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे. यामध्ये तत्कालीन अधिकाऱ्यांची नियोजनशून्यता दिसून येत आहे. सरकते जिने लावण्यामध्ये शासनाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. योग्य ती प्रोसीजर फॉलो केलेली नाही. यापुढे एमएमआरडीएने कोणताही निर्णय अशा प्रकारे घेऊ नये असे समितीने विभागास सांगितले.

३.२४८ समितीने पुढे नमूद केले की, काम लवकर व्हावे, कामाची निकड याकरिता शॉर्ट ?निविदा नोटीस हा पर्याय होता. कार्यकारी समितीला ते अधिकार होते. कोटेशन मागविले, परंतु निविदा कॉल केल्याने किती फरक पडला असता? या बाबी समितीस स्पष्ट करायला हव्यात. तसेच विभागाने दिलेले स्पष्टीकरण समर्थनीय नसून समितीचे समाधान झालेले नसल्याचेही समितीने सांगितले.

३.२४९ एमएमआरडीएने ऑगस्ट, २०१२ मध्ये तीन दरपत्रक प्राप्त केले. मोनो रेल्वेची १७ स्टेशन्स आहेत, त्या ठिकाणी ६६ सरकते जिने प्राप्त करण्यासाठी रु. २०० कोटी रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली. ६६ सरकत्या जिन्यांसाठी २०० कोटी रुपये आणि १४० कोटी रुपयांचे जिने उभारण्याचे काम निविदेविना देणार आहात आणि समर्थन करणार की ६० कोटी रुपये वाचले. ६६ जिन्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद केली त्यावेळी मार्केट रेट काढण्याची आवश्यकता होती. १२० कोटीचा अंदाज होता आणि १४० कोटी लागले तर स्पर्धात्मक बोलीला आपण मुकलो असे म्हणता आले असते, असे मत समितीने व्यक्त केले.

३.२५० २०० कोटी रुपयांमध्ये किती जिने होते व १४० कोटी रुपये खर्चून किती जिने लावले? अशी विचारणा समितीने विभागास केली असता सगळ्या स्टेशन्समध्ये जिने लावले आहेत जिन्यांच्या संख्येमध्ये फरक नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.२५१ प्रशासकीय मान्यता ढोबळमानाने दिली त्यामुळे ६० कोटी रुपयांचा फरक आला आहे. विभागाने तीन कोटेशन मागविले ते १४० कोटी रुपयांचे झाले निविदा मागविल्या असल्या तर हा खर्च आणखी कमी झाला असता. वाया गेलेल्या खर्चाबाबत विभागाने सांगितले आहे की, रस्त्यामध्ये नंतर बदल झाले, त्यासंदर्भात विभागाने स्पष्टीकरण द्यावे असे समितीने आदेश दिले असता सन २००४ मध्ये ॲवॉर्ड झाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली. महालेखापालांचे म्हणणे आहे की, रस्ता आधीच झालेला आहे सन २०१३ मध्ये रस्ता पूर्ण झाला नंतरच्या काळात जो भाग बदलावा लागला. त्यांनी काही बदल केल्यामुळे ८ ते ९ पाईल्स करावे लागले त्यामुळे ११ लाख रुपये वाया गेले हे खरे आहे.

३.२५२ नुकसान वसूल न करण्यामध्ये विभागाने खूप सूट दिली असल्याचे विभागाने मान्य केले आणि प्रकल्प सुरू ठेवायचा आहे हा अधिकार विभागाने राखून ठेवला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.२५३ प्रकल्प पूर्ण करायचा आहे परंतु करारनाम्यात ज्या अटी नमूद केल्या आहेत त्यानुसार त्यांनी ३ वर्ष मेन्टेनन्स देऊ असे कबूल केलेले असताना ते ४ वर्षे करणार आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, कॉन्ट्रॅक्ट प्रोव्हीजनमध्ये ही त्यांची जबाबदारी आहे.

३.२५४ The Contractor will work according to his conditions and we will give relaxation on every point. How it is possible? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, जे काही निर्णय घेण्यात आलेले आहेत, लिक्विडीटी डॅमेजेस लावलेले नाहीत, त्याचे कारण हेच आहे की प्रकल्प थांबतो प्रकल्प सुरू ठेवण्यासाठी विभागाने निर्णय घेतला विभागाचे अधिकार अबाधित ठेवले आहेत.

३.२५५ प्रकल्प थांबेल त्यामुळे विभागाने एल.डी.वसूल केले नाही असे विभागाचे मत आहे का ? अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय प्रतिनिधींनी प्रकल्प थांबेल म्हणून LD वसूल केली नाही असे मान्य केले.

३.२५६ प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे म्हणून प्रत्येक ठिकाणी विभागाने दक्षता घेतली. त्यामुळे काही गोष्टीकडे विभागाचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे आर्थिक वसूलीचा मुद्दा गौण ठरला असे मत समितीने व्यक्त केले.

३.२५७ यावर विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, ही वसुली सोडलेली नाही. ही वसुली कंत्राटदाराकडून कोण करणार आहे? एल.डी.देखील वसूल करण्यात येणार आहे. त्यात लवादाच्या विषय आहे. त्यांनी लवाद सुरू केले आहे. त्या ठिकाणी जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे अंतिम कार्यवाही करु असे विभागाने आश्वासित करून सांगितले की, विभागाचा अधिकार राखून ठेवला आहे.

३.२५८ यावेळी समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, एल.डी.न लावणे, कॉन्ट्रॅक्टर तोच ठेवणे हे जेव्हा अडचणीत असतो त्यावेळच्या परिस्थितीत त्याच कॉन्ट्रॅक्टरकडून काम करून घेणे आवश्यक आहे अशा वेळेला केले पाहिजे. परंतु पर्याय असताना एल.डी.न लावणे समर्थनीय नाही पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करावयाचे आहे असेही नाही आता पर्याय नाही असे म्हणणे बरोबर नाही.

३.२५९ यावर विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, काम पूर्ण करणे हे ध्येय असून ते पूर्ण करण्यासाठी एल.डी.लावली नाही. पैसे मोठया प्रमाणात रिकव्हर केले की काम पुढे चालणार नाही. कारण LTSE कडे निधी उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. काम पूर्ण होईल त्यावेळी विभाग संपूर्ण एल.डी. LTSE वर लावून वसूल करणार आहे.

३.२६० परंतु तशी परिस्थिती राहिली पाहिजे LTSE कडून आकारणी केली जाणार आहे ही बाब योग्य आहे.

३.२६१ बँक हमी आहे, बिले असून त्यांच्याकडून काही क्लेम्स केले गेले आहेत. लवादामध्ये वेगळा मुद्दा सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी विशद केले.

३.२६२ २०११-१२ मध्ये लावलेली एल.डी.अद्यापपर्यंत वसूल केलेली नाही, ती केव्हा वसूल होणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, प्रकल्प पूर्ण केल्याशिवाय एल.डी. प्रकल्प पूर्ण झाल्याशिवाय लावणे शक्य नाही. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वसूली करता येईल. डिसेंबरपर्यंत सिव्हील वर्क पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यानंतर चाचणीकरिता दोन ते तीन महिने लागतात.

३.२६३ यावेळी समितीने असे मत व्यक्त केले की, विभागाच्या दृष्टीने लवादापुढे विभागाची बाजू ठामपणे मांडली जाण्याची आवश्यकता आहे. ही रक्कम परिगणना करून कंत्राटदार आणि विभागाचे प्रतिनिधी यांनी एकत्र बसून निश्चित केली पाहिजे. लवादापुढे ते त्यांची रक्कम मांडतील. विभागाने मालक या नात्याने त्यांच्याकडून करारनाम्याप्रमाणे ठरविलेल्या गोष्टींना विलंब केल्यामुळे विभागाने परतावा ते कोणत्या पद्धतीने करणार, मल्टिपल आणि रिकरिंग इंटरेस्टने रक्कम निश्चित केली तर ती रक्कम मोठी होईल. आर्बिट्रेटरच्या मनामध्ये नेहमी कंत्राटदाराबद्दल सहानभुती असते. रिकरिंग इंटरेस्ट गणना करून त्या रक्कमेची खात्री करून मागणी करणार का, केव्हापर्यंत ही रक्कम निश्चित करणार असून अटी आणि शर्तीप्रमाणे ती रक्कम कशाप्रकारे त्याच्याकडून मिळणार आहे, त्यांच्याकडून स्क्रो मेकॅनिझमने पैसे आले पाहिजेत, ती पद्धत तुम्ही कशी ठरविणार आहात ? अशीही विचारणा समितीने विभागास केली.

३.२६४ यावर विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, LTSE कडून जी रक्कम वसूल करावयाची आहे ती डिपेंड करते किती आहे. बँक गॅरंटीमधून ती वसूल करता येण्यासारखी असेल तर त्यामधून करता येईल. LTSE ने लवादापुढे क्लेम ठेवले आहेत. त्यांना लवादाने काही रक्कम पास केली आणि त्यांना काही देय असेल तर त्याच्या ऐवजी ते समायोजीत करता येईल.सद्य:स्थितीत रक्कम किती असेल हे सांगता येत नाही.

३.२६५ फेज १ चे काम केव्हा पूर्ण झाले ? असा प्रश्न समितीने विचारला असता विभागीय प्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये पूर्ण झाले असल्याचे सांगितले.

३.२६६ समितीने या अनुषंगाने पुढे विचारणा केली की, फेब्रुवारी, २०१४ पर्यंतचे क्लेम्स विभागाने दोन वर्षात वसूल करून घेतले पाहिजे होते प्रकल्प पूर्ण करावयाचा आहे तो पूर्ण होईल. किती रक्कम LTSE कडून विभागाला घ्यायची आहे त्या रक्कमेचा निश्चित आकडा समितीस कळणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

३.२६७ प्रकल्प दोन नसून सोयीसाठी एकाच प्रकल्पाचे फेज १ आणि २ टप्पे केले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विशद केले.

३.२६८ लवाद प्रोसेस सुरू झाली का, त्यामध्ये कोणकोणते क्लेम्स उपस्थित केले आहेत ? अशी विचारणा समितीने विभागास केली असता त्यांनी काही डिलेसाठी तसेच उशिरा पेमेंटमुळे क्लेम केला आहे, आणखी काही क्लेम्स येत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीत अवगत केले.

३.२६९ विभागाने काही क्लेम्स सादर केलेले आहेत का ? समितीने पृच्छा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, LTSE कडून लवादामध्ये जे क्लेम आलेले आहेत त्यात " delay in payments आणि delay in time " बाबत क्लेम आहे. त्यांचे म्हणणे आहे की, विभागामुळे हे झाले आहे. जवळपास ३५० कोटी रुपयांचे क्लेम्स केले आहेत. कंत्राटदाराने क्लेम केले ते अजून फायनल नाही, विभागाने केले तेही फायनल नाही. जे क्लेम करतात त्यावर विभाग काऊंटर क्लेम करते ती प्रक्रिया सुरू आहे.

३.२७० कंत्राटदाराकडून किती रकमेचे क्लेम विभागाने केले आहे ? अशी विचारणा समितीने केली. यावर महालेखाकारांनी नमूद केले की, एकूण १५३.१५ Crore as on १०-०८-२०११ एवढ्या रकमेची पेनल्टी क्लेम केली आहे.

३.२७१ या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, दुसऱ्या पार्टीने क्लेम पूर्ण केलेले नाहीत. सविस्तरपणे लवादापुढे विभागाकडून क्लेम्स देण्यात येणार आहे. तेथे जो निर्णय होईल त्याप्रमाणे विभाग कार्यवाही करणार आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

३.२७२ लवादामध्ये (arbitration) नेहमी खाजगी विकासक किंवा कंत्राटदार यांच्या बाबतीत सहानुभूतीने विचार होतो. एमएमआरडीएच्या कोट्यवधी रुपयांचा प्रश्न आहे. केवळ लवादाच्या मॅटरबाबत आर्थिक सल्लागार नेमला पाहिजे. त्यांच्याकडून जे क्लेम केले जातात त्याप्रमाणे काऊंटर क्लेम देतात. विभागाची पेनल्टीची अमाऊंट आहे काम उशिरा झाल्यामुळे जे प्रवाशांचे नुकसान झाले आहे ते विभागाने आर्थिक सल्लागार नेमून त्यांच्या सल्ल्यानुसार लवादाकडे क्लेम दाखल करा अशी सूचना समितीने केली.

३.२७३ या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी सूचना केली की, जेव्हा वाद निर्माण होतो त्यावेळेस लवादा पुढे मुद्दा जातो. विभागाने अजून एल.डी. लावलेली नाही. एल.डी. लावली आणि कंत्राटदारांनी वाद केला तर ते लवादा पुढे जाईल. आता ती परिस्थिती आलेली नाही ज्यावर आधीच वाद निर्माण झालेला आहे, असे मुद्दे आता लवादा पुढे आले आहेत. विभागाने एल.डी. लावण्याची नोटिस कंत्राटदारांना दिल्यानंतर ते डिस्प्युट करतील मग ते लवादा पुढे जाईल.

३.२७४ महालेखाकारांनी यावेळी असे सांगितले की, पीएमसी लुईस बर्जर यांनी सन २०११ मध्ये प्रोजेक्ट डायरेक्टर एलटीएसई यांना लिहलेल्या पत्रात असे नमूद केले आहे की, You are using the word.. we proposed to recommend to the employer the levy of penalty. Therefore this proposed to recommend is not actually a levy. विभागाच्याच पीएमसीने त्यांना असे म्हटले आहे की, " This entire episode brings out the fact that your organisation does not have the concept as to the complexity of the project." He has clearly indicated on your behalf म्हणजे शासनाच्या वतीने की, आमचे तुमच्यावर १५३ कोटी रुपयांची पेनल्टी लावण्याचे प्रपोजल आहे. He is saying with a very heavy heart.

३.२७५ महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, : Why is there a heavy heart. There is no heavy heart in this case we have accepted. The PMC is doing nothing wrong they are saying right. विभागाने ते मान्यच केलेले आहे.

३.२७६ एमएमआरडीएने लवादासाठी एक आर्थिक सल्लागार नेमावा कारण यामध्ये मोठ्या रक्कमेचा समावेश आहे. अशी सूचना पुन:समितीने विभागास केली. तसेच हे लुईस बर्गरचे काम नसून लुईस बर्गर सल्ला देत असेल तर ते त्यांचे काम नसून आर्थिक प्रकरणांमध्ये अशा पद्धतीने एकाच बाजूने पत्रव्यवहार करणे किंवा या बाबतीत एमएमआरडीएने त्यांना त्या प्रकारच्या सूचना लेखी/मौखिक किंवा व्हर्बली दिल्या असतील तर त्याची माहिती समितीस नाही त्यामुळे याकरिता आर्थिक तज्ञ पाहिजेत असे मत समितीने यावेळी व्यक्त केले.

३.२७७ समितीच्या सदर मतावर विभागीय सचिवांनी विशद केले की, हे दोन स्वतंत्र विषय आहेत. एक विषय असा आहे की, कामावर देखरेख ठेवून त्याची पेनल्टी वगैरे वर्कआऊट करणे, हे विभागाच्या पीएमसीचे काम आहे व ते ती करत आहे. त्यानुसार सर्व क्लेम्स रेकॉर्डवर घेतले आहेत व उत्तरातही सांगितले आहे. दुसरा विषय असा आहे की, जेव्हा लवादापुढे हे प्रकरण जाईल आणि तेथे जे क्लेम्स किंवा काऊंटर क्लेम्स करायचे आहेत, त्या ठिकाणी कदाचित आणखी एका वेगळ्या तज्ञांची आवश्यकता लागेल. या संदर्भात समितीने जी सूचना केली, त्याची नोंद विभागाकडून घेण्यात आली आहे.

३.२७८ या अनुषंगाने महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, विभागाने LTSE कडून १५३.१५ कोटी रुपयांची दंडाची आकारणी केलेली आहे की नाही ? विभागाने नमूद केले आहे की, " We propose to recommend.. " त्यामुळे विभागाने हा क्लेम केलेला आहे की नाही ? यावर विभागीय प्रतिनिधींनी अद्याप क्लेम केलेला नसल्याचा खुलासा केला.

३.२७९ अद्याप क्लेम केलेला नाही याचा अर्थ विभागाने जी १५३ कोटी रुपयांचा दंड बारकाईने तपासणी करून तयार केलेला आहे, ती रक्कम वादातील नाही, त्यांना ती मंजूर आहे हे खरे आहे काय ? कारण आपण असे म्हटले की, डिस्प्युटेड असेल तर लवादाकडे जाणार, याचा अर्थ त्यांना हे कबूल आहे काय ? अशी विचारणा समितीने करून पुढे असे मत व्यक्त केले की, लुईस बर्गरने १५३ कोटी रुपयांची पेनल्टी लागू करा असे लिहिले असेल.

३.२८० यावर विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, लुईस बर्गरला दंड करा असे नाही. विभागाला क्लायंटला लेटर द्यावे लागते की, आम्ही तुमच्यावर एवढी पेनल्टी लावलेली आहे. आतापर्यंतची आकडेवारी १५३ कोटी रुपये आहे. ही आकडेवारी नंतर बदलत राहील. ही काही कायमची आकडेवारी नाही असेही विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. विभागाला ज्या ज्या गोष्टी अयोग्य वाटतात, त्या विभागाने लुईस बर्गरला मुदतीत कळविल्या नाहीत आणि ८-१० वर्षांनी सांगितले की, ते विभागाच्या एवढ्या गोष्टी देणे बाकी आहेत, याबाबत कोर्टात गेल्यास कोर्ट कसे मान्य करेल ? क्लेम विहित कालावधीतच करणे आवश्यक होते याबाबत विभागीय सचिवांनी स्पष्टीकरण करावे अशी समितीने सूचना केली.

३.२८१ उपरोक्ताच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लुईस बर्गरने प्रोजेक्ट डायरेक्टर एलटीएसई यांना लिहिलेल्या पत्रानुसार विभागाच्या पीएमसीने हा क्लेम एलटीएसईपर्यंत पोहोचविलेला आहेच. यावर समितीने विभागाने लवादापुढे हा क्लेम दाखल केला पाहिजे असे मत व्यक्त केले.

३.२८२ विभागीय सचिवांनी यावेळी वस्तुस्थिती विशद केली की, हे दोन स्वतंत्र मुद्दे आहेत. विभाग त्यांच्यावर ज्या पेनल्टी किंवा लिक्विडेटेड डॅमेजेस लावणार आहोत किंवा आणखी बऱ्याच गोष्टी आहेत जसे की, त्यांचे खर्च कमी करणार आहोत, या सर्व गोष्टी विभागाने नोंद करून ठेवलेल्या आहेत. त्यातील काही पीएमसीने त्यांना कम्युनिकेट देखील केलेल्या आहेत. उदाहरणार्थ तिसऱ्या प्लॅटफॉर्मचा जो खर्च आहे, या सर्व गोष्टींची नोंद झालेली असून, त्यांना कम्युनिकेट केलेल्या आहेत. जो लवादाचा प्रश्न राहिलेला आहे, त्याबाबत सांगावयाचे झाले तर लवादामध्ये आपले जे क्लेम आहेत, काऊंटर क्लेम आहेत ते सर्वच्या सर्व केलेले नाहीत. अजून लवादाची मुदत संपलेली नाही. त्या मुदतीत विभागाला आवश्यक ते सर्व क्लेम करणार आहोत. ते करण्याआधी म्हणजे लवादा हा विभागासमोरील पहिला पर्याय नाही, तो शेवटचा पर्याय आहे. सर्वप्रथम पहिला पर्याय असा आहे की, त्यांना नोटिस देऊन त्यांच्याकडून वसूली करणे, त्यांच्या बँक गॅरंटी मधून वसूल करणे, त्यांच्या थकित बिलातून वळती करून घेणे. We will follow that as the first option. त्यामध्ये जर काही झाले नाही तर लवादामध्ये जावे लागेल. हे सर्व मुद्दे विभागाच्या नोंदणीत आहेत आणि ते मुद्दे विभागाने गांभीर्याने घेतले आहेत.

३.२८३ विभागीय सचिवांनी विशद केलेल्या वस्तुस्थितीशी समितीने सहमती दर्शवून पुढे असे मत मांडले की, सुरूवातीला लवादामध्ये जावे लागत नाही कारण आपल्या कंत्राट देण्याच्या पद्धतीमध्ये प्रदानाचे अधिकार ज्याच्याकडे आहेत तो, सर्वस्वी असतो, त्यामुळे पेमेंटचे अधिकार आहेत त्या पेमेंट मधून डिडक्ट करायचे. अशा पद्धतीचा एखादा मोठा प्रकल्प असेल, ज्यामध्ये फिजिकल प्रोग्रेसवर कंत्राटदार फिजिकल बार चार्ट सबमिट करतो. कामाच्या वेगवेगळ्या स्टेजेसप्रमाणे त्याने जर वेळेत काम केले नाही तर, त्याला लिक्विडेटेड डॅमेजेस लावले जातात. तशा पद्धतीचे हे लिक्विडेटेड डॅमेजेस आहेत आणि त्याची कल्पना त्याला विभागाने दिलेली असणारच आहे. हे जे १५३.१५ कोटी रुपये आहेत ते त्यांनी ज्या फेजेसमध्ये काम वेळेत पूर्ण केले पाहिजे होते, ते केले नाही म्हणून लावलेले लिक्विडेटेड डॅमेजेस आहेत. पुढच्या काळात त्याने पुढचे टप्पे त्याने वेळेत पूर्ण केले नाहीत तर, आपण पुढचे चार्जेस लावणारच आहोत. असे मत मांडून पुढे विचारणा केली की, विभागाने हे कंत्राटदाराला यापूर्वी कळविलेले आहे की नाही ? तसेच त्यांना हे क्लेम कळविलेले आहेत की नाहीत ?

३.२८४ यावर विभागीय समितीने खुलासा केला की, विभागाच्या पीएमसीने (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) कंत्राटदाराला कळविलेले आहे त्याची नोंद आहे.

३.२८५ विभागाच्या मते जेवढा क्लेम होतो, तो एलटीएसईकडून घ्यायचा असेल त्याबाबत विभागाने त्यांना नोटिस दिली पाहिजे होती असे मत समितीने व्यक्त करून पुढे असे नमूद केले की, विभागामुळे उशीर झाल्याबाबतची जवळपास साडेतिनशे कोटी रुपये इतकी रक्कम एलटीएसईने लवादाकडे सबमिट केलेली आहे. विभागाने अजूनपर्यंत त्याच्या विरुद्ध आर्बिट्रेटरकडे एकही क्लेम सबमिट केलेला नाही. यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, डिसेंबर पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होणार आहे.

३.२८६ विभाग एलटीएसईकडे क्लेमची मागणी का करीत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले की, सद्यःस्थितीत जर एलटीएसईकडे क्लेम केला आणि त्यांनी नाकारले तर एमएमआरडीएला एलटीएसईला देय असलेल्या रक्कमेतून वसूल करावे लागतील. प्रकल्प पूर्ण होण्यास थोडाच कालावधी उरला असल्याने प्रकल्प पूर्ण झाल्यावर एलटीएसईकडे जी संपूर्ण एल.डी. होते ती एकत्रित वसुलीची नोटिस त्यांना देण्यात येणार आहे असे विभागाने आश्वासित केले.

३.२८७ तथापि, यामध्ये क्लेम करण्याची मुदत संपून जाईल असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, विभागाने अधिकार अबाधित ठेवल्याने मुदत संपणार नाही.

३.२८८ जून, २०१६ पर्यंतची एमएमआरडीएची जी काही डॅमेज लायाबिलिटी आहे ती समितीला कळवावी. तसेच समितीला याबाबत विभागाकडून अशी खात्री हवी की, These damage liabilities will not lapse due to delay. यावर विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली, तथापि, विभागाकडून अद्यापही माहिती अप्राप्त आहे.

३.२८९ सद्यःस्थितीत विभागाने जरी एलटीएसईकडे क्लेम केला आणि जर एलटीएसईने असमर्थता दर्शविली तर विभागाला त्यांच्या देय रकमेतून क्लेमची वसूली करावी लागेल. या विभागाच्या मुद्यांसंदर्भात समितीने समाधान व्यक्त केले. तथापि, विभाग या निर्णयाशी ठाम राहिला पाहिजे तसेच क्लेम करण्याची मुदत संपू नये याबाबतही विभागाने दक्ष रहावे अशी सूचना यावेळी समितीने विभागास दिली.

३.२९० वित्तीय लवादाबाबतही (financial arbitrator) विचार करण्याबाबत विभागाने त्वरीत निर्णय घ्यावा अशीही सूचना समितीने विभागास केली. यावर विभागाने होकारार्थी उत्तर दिले.

गुणवत्ता निरीक्षण अहवालाचे अनुपालन न करणे :–

३.२९१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात साक्षीच्या वेळी समितीने विभागास माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी असे अवगत केले की, छोटे-मोठे मिळून वेगवेगळ्या प्रकारचे ४१६ मुद्दे होते त्यापैकी ४१५ पूर्ण झालेले असून फक्त एक मुद्दा सद्यःस्थितीत शिल्लक असून तो देखील लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न विभागाकडून होत आहेत.

३.२९२ दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी वृत्तपत्रात अशी एक बातमी आली होती की, ' मोनो राणीचाही खोळंबा ' ' तांत्रिक बिघाडामुळे ६ तास सेवा बंद ' ' दुरुस्तीसाठी गेलेली दुसरी गाडी देखील अडकली ' याबाबत समितीने विभागास माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, तांत्रिक अडचणीमुळे तेथे १ गाडी बंद झाली होती. तिला आणण्यासाठी दुसरी गाडी पाठविली होती. ती दुसरी गाडीही बंद झाली असे नव्हते तर पहिल्या गाडीचे टायर जाम झाले होते त्यामुळे थोडा वेळ सर्व्हिस थांबवावी लागली होती. त्या गाडीला डेपोमध्ये आणल्यानंतर सर्व्हिसेस सुरू करण्यात आल्या त्यावेळी अडचणी आल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले.

३.२९३ मोनो रेलने किती प्रवासी प्रवास करतील असा सुरूवातीला अंदाज व्यक्त केला होता, सद्यःस्थितीत मोनो रेलने किती प्रवासी प्रवास करतात, मोनो रेलची प्रवासी संख्या वाढण्यासाठीचे विभागाचे काय नियोजन आहे ? अशी विचारणा समितीने केली असता यावर विभागीय सचिवांनी विशद केले की, फेज-१ मध्ये सध्या दररोज १५ ते १८ हजार पर्यंत प्रवासी प्रवास करतात. अपेक्षा अशी होती की हा प्रकल्प पूर्ण होईल तेव्हा ही संख्या फार मोठी होईल. दीड लाखाच्या सुमारास प्रवासी अपेक्षित होते. जो फेज-१ भाग सुरू करण्यात आलेला आहे, त्यामध्ये दुर्दैवाने रायडरशिप फार कमी आहे त्यामुळे फक्त १५ ते १८ हजार पर्यंत प्रवासी प्रवास करतात.

३.२९४ यामध्ये नुकसान असल्याचे दिसत असून फेज-१ मधील मोनो रेलमध्ये प्रवासी दिसत नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

समितीच्या मताशी सहमती दर्शवित विभागीय प्रतिनिधींनी विशद केले की, सद्यःस्थितीत विभागाला मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, फेज-२ सुरू झाल्यानंतर याची प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल व हे नुकसान कदाचित राहणार नाही. तसेच, एमएमआरडीएने सुरूवातीला भाड्याचे दर फार कमी ठरविले होते. ही पद्धत लोकप्रिय करण्याच्या दृष्टीने ५ रुपयांपासून सुरूवात केली होती. ३ वर्ष झाल्याने त्याचाही फेरविचार करण्याची गरज आहे.

३.२९५ पहिल्या फेज मध्ये किती प्रवासी येणे अपेक्षित होते ? अशी विचारणा समितीने विभागास केली असता विभागीय प्रतिनिधींनी उत्तरीत केले की, फेजवाईज किती प्रवासी येतील असे अपेक्षित नव्हते. विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या उत्तराने समितीचे समाधान झाले नसल्याने समितीने खेद व्यक्त केला.

३.२९६ समितीने यावेळी काही सूचना विभागास केल्या. या प्रोजेक्टची फायनान्शिएल फिजिबिलीटी व उपयुक्तता तेव्हाच वाढेल जेव्हा त्याची कनेक्टिव्हीटी वाढेल. मोनो रेलची कनेक्टिव्हीटी रेल्वे व बसशी जोडलेली नाही. त्या काळी केलेले सर्वेक्षण चुकीचे होते असे मत व्यक्त करून सांगितले की, महापालिका आयुक्त किंवा मुंबईतील डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर पासून ते वेस्टर्न रेल्वेचे अधिकारी व बेस्ट या दोघांबरोबर बसून मोनो रेलची प्रवासी संख्या कशी वाढेल, याबाबत एक संयुक्त समिती केली पाहिजे. त्या रुटला बेस्टला अजूनही मोठ्या प्रमाणात फायदा आहे. याबाबतचा प्रायव्हेट सर्व्हे करावा, आवश्यकता वाटल्यास त्या विषयातील मुंबईतील एक्सपर्ट्सना घ्यावे, लोकप्रतिनिधींना देखील सहभागी करून घ्यावे. कनेक्टिव्हीटी वाढली नाही तर पुढच्या १५ वर्षांपर्यंत मोनोरेल फायद्यात येणार नाही. त्यामुळे विभागाने याची कनेक्टिव्हीटी वाढविण्यासाठी बेस्ट व हार्बर व सेंट्रल रेल्वे यांच्या समवेत एक संयुक्त समिती तयार करावी अशी सूचना समितीने विभागास केली. त्या विषयातील तंत्रज्ञांना घेऊन त्यांच्याकडून सूचना मागवून त्यावर विचार करावा. सदर पद्धती विभाग अवलंबिणार आहे का ? अशी विचारणा समितीने विभागास केली.

३.२९७ समितीने केलेली सूचना विभागाने मान्य केरुन पुढे अवगत केले की, मोनोरेलची कनेक्टिव्हीटी वाढण्यासाठी एमएमआरडीएने बेस्टशी मोठ्या प्रमाणात चर्चा केलेली आहे. कनेक्टिव्ही आपसात कशी जुळवता येईल म्हणजे त्यांचे रुटस एमएमआरडीएच्या रुट्सला कसे जोडता येतील, याबाबत चर्चा सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

३.२९८ महालेखाकारांनी दोन विषय उपस्थित केले आहेत. पहिल्या मुद्याच्या संदर्भात विभागाने नमूद केले की, क्लेम उपस्थित केला तर विभागाला बिलातून वसूली करावी लागेल. त्या संदर्भातील विभागाची अडचण ऐकून समितीने सदर कार्यपद्धती नंतर वापरावी असे सुचविले. परंतु महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, विभागाने एकदा क्लेम केल्यानंतर लगेच बिलातून पैसे वसूली करण्याची गरज नसते. त्यावर सुनावणी व्हावी लागते त्यास विलंब होतो. मग विभाग त्या प्रोसिजरचा अवलंब का करीत नाही ? अशी विचारणा समितीने विभागास केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, क्लेम केल्यानंतर LTSE कडून वसूली केली नाही तर, पुन्हा विभागाने एवढा क्लेम करून तो वसूल का केला नाही यावर हरकत घेतली जाईल.

३.२९९ महालेखाकारांनी असे नमूद केले की, हे अर्धन्यायिक प्रोसिडिंग आहे. हा एक्स्ट्रा पेमेंटचा नाही तर पेनल्टीचा मुद्दा आहे. विभागाने कायदेशीर नोटिस दिलेली नाही सन २०११ पासून हे प्रकरण प्रलंबित आहे. एलटीएसईने आर्बिट्रेटर लावलेला असताना विभागाचा क्लेम त्याच्या समोर गेला पाहिजे . असा आक्षेप घेऊन सूचना केली की, क्लेम केल्यानंतर लगेच वसूली करणे ही बाब कायदेशीररित्या योग्य नाही.

३.३०० समितीने सूचना केल्याप्रमाणे संपूर्ण क्लेम काढून घेण्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

३.३०१ समितीने विभागाचे क्लेम सांगण्याबाबतची सूचना केली होती. परंतु, महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, क्लेम करायला काही अडचण नाही. विभागाला लगेच पैशाची वसूली करण्याची आवश्यकता नाही. त्यावर सुनावणी घ्यावी लागेल, त्यांनी मान्य केले नाही तर ते लवादामध्ये जातील. त्यावर निर्णय होईल. परंतु, विभागाने एक कार्यपद्धती सुरू करावी. कार्यपद्धती सुरू न केल्याने समितीच्या मनात संभ्रम निर्माण होतो, तो विभागाने दूर करावा. असे आदेश समितीने विभागास दिले यावेळी विभागाने होकारार्थी उत्तर दिले.

३.३०२ विभागानेच विभागाच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्टल्ंटटला (P.M.C.) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास) सांगितले म्हणून त्यांनी ते पत्र एलटीएसईला दिले. सद्यःस्थितीत त्यास खूप विलंब झाला आहे. जर आता आर्बिट्रेटर असेल तर विभागाने नोटीस द्यावी असे महालेखाकारांनी सुचविले. महालेखाकारांची सदर सूचना विभागाने मान्य केली.

३.३०३ सन २०१४ मध्ये महालेखाकारांनी ४१५ गुणवत्तेबद्दल ४१५ आक्षेप घेतले आहेत, ते विभागाने कसे काय दूर केले, त्याची माहिती समितीने विभागास देण्यास सांगितले असता या सर्व मुद्यांची माहिती समितीला नंतर देण्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. तथापि, माहिती अप्राप्त आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

" मोनोरेल अधिसुचित करण्यासाठी अपर्याप्त वैधानिक चौकट "

३.३०४ मोनोरेलच्या उभारणीकरिता कुठलाही विशिष्ट अधिनियम नसल्याने भारतीय ट्राम्सवे अधिनियम १८८६ (ITA) मध्ये सार्वजनिक वाहतुक उन्नतमार्ग बांधून वापरण्याची तरतुद नसतानाही महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर, २००८ मध्ये मुंबई मोनोरेल प्रकल्प ITA अंतर्गत अधिसुचित केला होता. ITA च्या भाग १२ अंतर्गत राज्यशासनाकडुन नियुक्त केलेल्या स्वतंत्र अभियंत्याकडुन सुरक्षा प्रमाणन करण्याचे निर्धारित केले आहे. ट्राम्सवेचा वेग धीमा असल्याने भारतीय रेल्वेत प्रचलित असलेल्या सविस्तर सुरक्षा प्रमाणनाची ट्राम्सवेला आवश्यकता नसते अनपेक्षित कारणामुळे एखाद्या व्यक्तीचा मृत्यु किंवा शारिरीक इजा झाल्यास त्यांची जबाबदारी आणि आर्थिक जोखीम या बाबी ITA मध्ये संदर्भित केलेल्या नव्हत्या असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

३.३०५ यासंदर्भात साक्षी दरम्यान समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली की, जर अपघात घडला तर त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती व्यवस्था आहे, ट्राम्सवे कायद्यामध्ये अपघात ग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात, विमा किंवा संरक्षक उपाययोजनेबाबत तरतूद केली आहे काय? सदरचा प्रकल्प मेट्रो ॲक्टमध्ये समावेश करण्यात येणार आहे काय ? मोनोरेल कार्यरत झाल्यानंतरच्या काळात १-२ अपघात झाले त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय?

३.३०६ या संदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ट्राम्सवे ॲक्टमधील तरतुदीनुसार मृत्यू किंवा शरीराला इजा झाली असल्यास नुकसान भरपाई द्यावयाची आहे. परंतु नुकसान भरपाई किती द्यावी याची या अधिनियमात तरतुद नाही. यापुर्वी झालेल्या एका मृत्युप्रकरणी रू.९ लक्ष एवढी नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. परंतु यापुढील कालावधीकरिता केंद्र शासनाने मेट्रो ॲक्टप्रमाणे नुकसान भरपाई मोनोरेलला सुद्धा लागु करण्याबाबतची सुधारणा करण्याची बाब विचाराधीन आहे व अशी सुधारणा लवकरच होण्याची शक्यता आहे. **सदर खुलाशाअंती समितीने सुचित केले की, जो पर्यंत कायदा दुरूस्त होत नाही तोपर्यंत नुकसान भरपाईची रक्कम निश्चित होऊ शकणार नाही व देण्यात येत असलेल्या नुकसान भरपाईच्या निकषात समानता असणार नाही. यास्तव विभागाने केंद्र शासनाकडे प्रस्तावित सुधारणांबाबत पाठपुरावा करावा व सदर विषय अतिशय संवेदनशील व महत्त्वाचा असल्यामुळे सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन कायद्यातील दुरुस्ती होईपर्यंतच्या अथवा अन्य कायद्याच्या तरतूदी लागू करेपर्यंतच्या कालावधीकरिता पर्यायी व्यवस्था करावी. नुकसान भरपाईचे निकष ठरवावे व त्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा व केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून अधिनियमात केलेल्या दुरुस्तीबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीस सादर करावा तसेच रेल्वेच्या धर्तीवर मोनोरेलच्या तिकिटांवर काही अधिभार लावून विमा सुरक्षा योजना लागू करता येईल का, याबाबत देखील आवश्यक ती कार्यवाही करावी. अशी समितीची शिफारस आहे.**

" प्रकल्पाची सुसाध्यता आणि कंत्राटाला अंतिम रुप देणे "

३.३०७ प्रकल्पाच्या तंत्र-आर्थिक आणि वित्तीय सुसाध्यता अभ्यास आणि निविदा प्रक्रिया व्यवस्थापनाचे काम मे.रेल इंडिया टेक्निकल अँड इकोनॉमिक सर्व्हीसला (RITES) जागतिक निविदा न मागविता देण्यात आले, RITES ने मार्च, २००८ मध्ये दिलेले प्रारंभिक अंदाज रु. १५३९ कोटीनुसार (करासहीत) निविदा मागविण्यात आल्या होत्या. ज्या संस्थांना प्रस्तावासाठीचे विनंतीपत्र देण्यात आले, त्यापैकी फक्त २ निविदाकारांनी प्रतिसाद दिला. आर्थिक निविदा उघडल्यानंतर LTSE ची निविदा रु. २९७० कोटी (करासहित) म्हणजे RITES ने सुरूवातीला दिलेल्या अंदाजापेक्षा ९३% जास्त असल्याचे आढळून आले. अशावेळी निविदा प्रक्रिया रद्द करण्याऐवजी MMRDA ने RITES या संस्थेस सुधारित अंदाज सादर करण्याबाबत कळविल्यानुसार RITES ने रु. १७७७ कोटीचे (करासहीत) सुधारित अंदाज सादर केले व असे मत व्यक्त केले की, LTSE ने उद्धृत केलेले दर अवाजवी आहेत व जवळजवळ रु. १२०० कोटीने जास्त आहे. यास्तव RITES ने LTSE सोबत दराबाबत वाटाघाटी करण्याची शिफारस केली होती. तथापि, RITES ने सुधारित अंदाज देताना प्रकल्पांशी साधर्म्य असलेल्या इतर बांधकामाचे मुंबईच्या परिस्थितीमधील प्रचलित दर विचारात घेतलेले नाहीत. या युक्तिवादावर प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी MMRDA ने सप्टेंबर, २००८ मध्ये मे.लुईस बर्जर ग्रुप इंक (LBG) या संस्थेची नेमणूक केली. सदर संस्थेने सादर केलेले रु. २३२९ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकावर LTSE सोबत वाटाघाटी करून LTSE च्या रु. २९७० कोटीचा देकार कमी करून रु. २७१६ कोटी रकमेचा अंतिम देकार स्वीकारला. मूल्यनिविदा उघडल्यानंतर दुसऱ्या सल्लागाराचा सल्ला घेणे अत्यंत नियमबाह्य होते. कारण सल्लागारांना LTSE ने देऊ केलेले मुल्य माहित होते आणि त्या टप्प्यावर सल्लागाराने निर्धारीत केलेले प्रकल्पाचे मुल्यांकन हे पूर्वाग्रहित असल्याची शक्यता होती. तसेच LBG ने प्रस्तावित जागेला भेट न देता जागेच्या परिस्थितीचे मूल्यमापन न करता केवळ २ आठवड्यात तयार केलेला सुधारित अंदाज जे एका सहभागी निविदाकाराच्या (LTSE : Reliance Infrastructure - हिताची) तांत्रिक प्रस्तावाच्या पुनर्विलोकनाच्या गृहीतकावर आधारीत होते, जे MMRDA ने स्वीकारणे योग्य नव्हते. अंतिमतः स्विकारलेले दर RITES ने सादर केलेल्या सुधारित दरापेक्षा रु. ९३९ कोटीने जास्त होते. तर LBG ने सादर केलेल्या दरापेक्षा रू. ३८७ कोटीने जास्त होते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. याबाबत लोकलेखा समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली यामध्ये विभागीय सचिवांनी खुलासा सादर केला की, RITES ही केंद्र शासनाची अंगीकृत संस्था

असल्याने त्या संस्थेची निविदा न मागविता नेमणूक करण्यात आली होती. प्राप्त निविदापैकी मे.LTSE यांनी सादर केलेले दर रु. २९७० कोटी व RITES या संस्थेचे सुरूवातीचे अंदाज रु. १५३९ कोटी यात फार मोठी तफावत असल्यामुळे सदर अंदाजपत्रकाबाबत फेरविचार करण्यासाठी अंदाजपत्रकामध्ये काही चुकीचे आहे काय ही बाब तपासण्यासाठी RITES या संस्थेस विनंती करण्यात आली होती. परंतु RITES या संस्थेने सादर केलेले सुधारित दर रु. १७७७ कोटी व निविदाकाराने सादर केलेल्या दरात सुद्धा मोठी तफावत असल्याचे दिसून आले. त्यानंतर LBG या कंपनीची नेमणूक करण्यात आली. LBG कंपनीने न्युयार्क (USA) मध्ये मोनोरेलचे काम हाताळले होते. सदर कंपनीने सादर केलेल्या रु. २३२९ कोटी या रकमेचा आधार घेऊन केलेल्या वाटाघाटीअंती निविदाकाराने सादर केलेले मूळ दर रु. २९७० वरुन कमी करून रु. २७१६ कोटी एवढ्या रकमेत काम देण्याचे निश्चित करण्यात आले होते. सदर वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर रु. २३२९ कोटीपेक्षा १६% जास्त होते असा खुलासा समितीस सादर केला. तसेच केरळ राज्यातील कोची येथे सुद्धा अशा प्रकारच्या निविदा बोलविण्यात आल्या होत्या. त्यांच्या DPR मध्ये प्रतिकिमी अंदाजित किंमत रु. १५५ कोटी एवढी होती. परंतु निविदा स्वीकृती वेळी प्रति कि.मी. रु. २८५ कोटी होती. तर आपल्या राज्यात निविदा स्वीकृत केली त्यावेळी प्रति कि.मी. रु. १४० कोटी एवढी किंमत आली होती व ती स्वीकृत करण्यात आली. विभागीय सचिवांनी सादर केलेल्या सदर खुलाशाने समितीचे समाधान झाले नाही. RITES या संस्थेची निवड केंद्र शासनाची अंगीकृत संस्था असल्याने केली ही बाब मान्य केली तरी RITES या संस्थेने सादर केलेले अंदाजपत्रक स्वीकृत करून निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९३% जास्त असताना सदर निविदा फेटाळून फेरनिविदा मागविणे आवश्यक असतानाही त्यानुसार कारवाई केलेली नाही ही बाब गंभीर आहे. दुसरी निविदा मागविली तर स्पर्धात्मक दर मिळण्याची खात्री नव्हती हे विभागाचे म्हणणे योग्य नाही. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा आल्यास फेरनिविदा मागविण्याबाबत MMRDA, महानगरपालिका किंवा शासनाने ३-३ वेळा पुनर्निविदा मागविल्याची अनेक पूर्वोदाहरणे असताना काही निविदा confirmation of work, commencement of work, attested copy नसणे अशा लहान-लहान कारणास्तव निविदा रद्द करण्यात येतात. असे असतानाही प्रस्तुत प्रकरणी विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार जगभरामध्ये ४-५ कंपन्या मोनोरेलच्या कामाचा अनुभव असताना केवळ प्राप्त २ निविदांवर निर्णय घेणे संयुक्तिक नव्हते. विभागाने फेरनिविदा मागवून अन्य संस्थांना स्पर्धेत भाग घेण्याची संधी देणे आवश्यक होते. याशिवाय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून प्रथम नेमणूक झालेले Sowil या कंपनीमध्ये केवळ इंग्रजी भाषा समजणारे लोक नव्हते, इंग्रजी समजत नसल्यामुळे ते काम करु शकणार नाहीत त्यामुळे त्यांचे काम रद्द करून LBG या संस्थेच्या केलेल्या निवडीबाबतही महालेखापालांनी आक्षेप नोंदविलेला आहे. LBG या कंपनीला LTSE ने सादर केलेले दर माहित असताना, निविदा प्रक्रिया अंतिम झालेली नसताना, दरम्यानच्या कालावधीतच LBG ला अंदाजपत्रक सुधारित करण्याचे निर्देश देणे नियमास अनुसरुन नव्हते.

३.३०८ राज्यातील मोनोरेल निविदा स्विकृतीला पुष्टी सादर करताना विभागीय सचिवांनी केरळ मधील कोच्ची येथील मोनोरेलच्या टेंडर प्रक्रियेचा उल्लेख केला व तुलनात्मकदृष्ट्या राज्याचा दर कमी असल्याचे विशद केले. वास्तविक मुंबई येथील मोनोरेलकरीता प्राप्त दर हे कोच्ची येथील मोनोरेलच्या प्राप्त दराच्या कालावधी पेक्षा फार पूर्वीचे असून दोन्ही शहरांमध्ये हे प्रकल्प राबविण्यासाठी येणाऱ्या अडचणी व भौगोलिक परिस्थिती या भिन्न असताना त्याची तुलना करणे योग्य नाही. LTSE ने त्यांचा देकार सादर केल्यानंतर LBG या कंपनीकडून प्राप्त दराबाबत सल्ला घेणे चुकीचे होते. निविदा उघडल्यानंतर अंदाजित रक्कम बदलणे चुकीचे आहे. LBG कंपनीस नियुक्त करण्याबाबत LTSE कंपनीने त्यांच्या आर्थिक लाभासाठी MMRDA ला सुचविले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. वास्तविक पाहता मूल्यनिविदा उघडल्यानंतर दुसऱ्या सल्लागाराचा सल्ला घेणे हे निश्चितच योग्य व नियमाला अनुसरुन नाही. अशाप्रकारच्या मोठ्या प्रकल्पांसाठी सल्लागार नेमायचे परंतु त्यांनी दिलेले सल्ले न स्वीकारणे ही बाब देखील समर्थनीय नाही. त्यातच LBG ने प्रस्तावित जागेला भेट न देता जागेच्या परिस्थितीचे मुल्यमापन न करता केवळ २ आठवड्यात तयार केलेल्या सुधारित अंदाजपत्रकाच्या गुणवत्तेबाबत शंका घेण्यास पूर्ण वाव आहे. तसेच MMRDA द्वारे LBG कंपनीची PMC म्हणून नेमणूक करण्यात आली. ज्याची भागीदार EIB कंपनी होती. नंतर EIB कंपनीचे विलीनीकरण LTSE कंपनीमध्ये झाले आणि म्हणून प्रकल्पाचे पुनर्मूल्यांकन LBG कडून करून घेण्याच्या MMRDA च्या निर्णयामुळे LTSE (EIB कंपनीसह) आणि LBG मध्ये संगनमत होऊ शकते अशी शंका उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. **या सर्व बाबी विचारात घेता मोनोरेलकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करताना अनेक चुका व नियमबाह्य बाबी झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. LTSE कंपनीने त्याच्या कामकाजात केलेल्या चुकांकडे MMRDA च्या अधिकाऱ्यांनी जाणिवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे समितीच्या निदर्शनास आले. MMRDA सारख्या संस्थेकडून अशा अनियमितता होणे निश्चितच योग्य नव्हते. प्रस्तुत प्रकरणी विभागाने या संपूर्ण टप्पा - १ ची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी ज्यामध्ये आर्थिक, तांत्रिक, व कायदेशिर बाबी संदर्भातील तज्ञ व्यक्तींचा समावेश करावा.तसेच या उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा व चौकशीचा कालावधी निश्चित करावा. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१ ' मुंबईतील मोनोरेल प्रकल्पाचे कार्यान्वयन ' मध्ये नोंदविलेल्या सर्व आक्षेपांचा त्या कार्यकक्षेमध्ये समावेश करावा व त्यानुषगांने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच विभागाने भविष्यात अशा गंभीर बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत MMRDA व अन्य संबंधित संस्थांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड : "

३.३०९ निवड झालेल्या कंत्राटदाराने तयार केलेल्या प्रकल्पाच्या आरेखनाचे पुनर्विलोकन करणे आणि या क्षेत्रातील सर्वोत्तम औद्योगिक पद्धतीनुसार प्रकल्प कार्यान्वयनाचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) होती. मे.सोव्हील (इंडिया) या समव्यावसायिक (चायना रेल्वे इरुयुआन इंजीनिअरींग ग्रुप कंपनी लि.(चायना), मे.सोव्हील लिमिटेड (इंडिया) चॉगकींग मोनोरेल ट्राल्सीट इंजीनिअरींग कंपनी लि. (चायना) आणि टीप वन आर्किटेक्ट (इंडिया) गट व्यवस्थापन सल्लागारांना रु. ३५.५२ कोटी शुल्कावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून माहे नोव्हेंबर,२००८ मध्ये काम देण्यात आले होते. यातील न्युनतम क्रमांक दोनचा निविदाकार LBG प्रणित समव्यावसायिक गट होता. PMC चे कंत्राट ३९ महिन्यांसाठी वैध होते. लेखा परिक्षणात असे आढळून आले की, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने PMC ला काळ्या यादीत टाकल्याची माहिती दडविल्याबद्दल तसेच त्यांच्याकडील महत्वाच्या पदावर कार्यरत असलेल्या विदेशी जाणकारांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्याचा त्यांचा दावाही खोटा असल्याच्या कारणावरुन MMRDA ने PMC चे कंत्राट ०६ महिन्याचे आत रद्द केले. तथापि, MMRDA ने या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारावर कोणतीही दंडात्मक कारवाई न करता त्यांना सोडून जाण्याची परवानगी दिली. अशा स्थितीमध्ये नविन निविदा मागविण्याऐवजी त्याच मे. LBG कंपनीस (जीने प्रकल्प अंदाजाचे निर्धारण केले होते) मूळ निविदेत सोव्हीलप्रणित समव्यावसायिक गटासह दुसऱ्या क्रमांकाचे न्युनत्तम निविदाकार असल्यामुळे माहे मे,२००९ मध्ये त्यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त केले. LBG हा नवीन PMC मूळ निविदा प्रक्रियेतील समव्यावसायिक गट नव्हे तर स्वतंत्र घटक होता. त्यामुळे LBG ने सल्ला कार्यासाठी नविन प्रस्तावित केलेल्या जाणकारांच्या तांत्रिक क्षमतेची MMRDA ने नव्याने मुल्यांकनही केले नव्हते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे. याबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी नमूद केले की, मे. सोव्हील चायनीज प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीच्या अधिकाऱ्यांना इंग्रजी भाषेवर प्रभुत्व नसल्यामुळे काम करताना अनेक अडचणी येत होत्या, सदर कंपनीने इंग्रजी संभाषण कौशल्य असणारे अधिकारी उपलब्ध करून देवू असे त्यावेळी सांगितले होते. परंतु त्यानुसार उपलब्ध करून दिलेले नाहीत. त्यामुळे त्यांचेशी संवाद साधणे शक्य नव्हते. याशिवाय मे.सोव्हील कंपनीचे नाव NAHI यांच्या काळ्या यादीत होते व सदरहू बाब निविदा अंतिम करताना MMRDA ला माहिती नव्हती. त्यामुळे सदर काम त्यानंतर मे.सोव्हील ऐवजी LBG या भागीदारी कंपनीस देण्यात आले. ज्यामध्ये EIB कंपनी भागीदार होती. निविदेसाठी आवश्यक पात्रता LBG कडे होती. त्यामुळे joint venture मध्ये एखादी सहयोगी कंपनी बदलून दुसरी कंपनी अथवा तज्ञ आणू शकते. निविदांची तपासणी करताना त्यांच्या सोबत सहयोगी कंपनी EIB सह पात्र ठरली. EIB कंपनीचे LTSE या कंपनीमध्ये विलिनीकरण झाले असले तरी LBG कंपनी त्यांच्याकडे असलेल्या expertise मुळे पात्र ठरली. त्यामुळे LBG कंपनीची निवड करण्यात आली. सदर बाब कंत्राटातील अटी नुसार असल्याचेही विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. मूळ कंपनी मे.सोव्हील (इंडिया) या कंपनीवर दंडात्मक कारवाई केली नसली तरी मे.सोव्हेल यांनी सादर केलेले रु. ८.० कोटीच्या देयकाचे पेमेंट MMRDA ने केलेले नाही. विभागाच्या सदर खुलाशावर समितीचे समाधान झाले नाही. LBG च्या नियुक्तीचे योग्य समर्थन विभाग करु शकले नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. मे.सोव्हील (इंडिया) या कंपनीने इंग्रजी संभाषण कौशल्य असलेले अधिकारी उपलब्ध करून दिलेले नाहीत तसेच मे.सोव्हील (इंडिया) कंपनीचे नाव NAHI यांच्या काळ्या यादीत होते. ही बाब MMRDA पासून लपविली व MMRDA ची फसवणूक केली. यामुळे मे.सोव्हील यांचेविरुद्ध MMRDA ने कठोर कारवाई करणे आवश्यक होते परंतु तशी कारवाई MMRDA ने केलेली नाही. मे.सोव्हील (इंडिया) कंपनीस कोणतीही रक्कम MMRDA ने अदा केली नाही असे विभागाने सादर केले असले तरी मे.सोव्हील (इंडिया) कंपनीस LBG ने रु. ४.०० कोटी करार करून अदा केल्याचेही लेखापरिक्षणात दिसून आले. ही तर आणखीनच गंभीर बाब आहे. परंतु आयुक्त, MMRDA यांना याबाबत माहिती नाही याबद्दल समितीने आश्चर्य व्यक्त केले. एवढे मोठे प्रकल्प राबविताना अशा महत्वाच्या गोष्टींची माहिती ही आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना नसणे ही बाब योग्य व शासनाच्या कार्यपद्धतीला भुषणावह नाही. अशा प्रकारची सर्व माहिती आयुक्त स्तरावरुन ठेवणे हे आवश्यकच होते. एकंदरीत घटनाक्रम पाहता मे. LBG यांची नियुक्ती ही MMRDA, मे. सोव्हील (इंडिया) व LBG यांच्यातील परस्पर सहमतीने झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. LBG ज्या भूमिकेतून व ज्या उद्देशाने नियुक्त केली ती भूमिका व उद्देश सकृतदर्शनी योग्य दिसत नाही. प्रत्येक ठिकाणी सदर कंपनीस सवलत देण्याची भूमिका MMRDA ने घेतली आहे. जेव्हा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनी म्हणून RITES ला काढून LBG ला आणले त्याचवेळी MMRDA ची अशी मानसिकता होती की, सदर काम LBG ला द्यावयाचे आहे व LBG शिवाय अन्य संस्था हे काम करु शकणार नाहीत. नेमणूकीनंतर LBG कंपनीची वागणूकही या बाबीस पुष्टी देते. LBG ला हेतूपुरस्सर PMC म्हणून नेमणूक करून आणि पुढे सल्लागार म्हणून नेमणूक देणे हे सगळे पूर्व नियोजित आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले. मे. सोव्हील (इंडिया) ने प्रथम ६ महिने काम केल्यानंतर त्यांच्या ऐवजी मे. LBG कंपनीची नियुक्ती करणे, मे. सोव्हील (इंडिया) यांच्या नेमणूकीनंतर ६ महिन्यांनी ते पात्र नसल्याचा निर्णय घेणे ही बाब निश्चितच शासनाच्या अस्तित्वात असलेल्या कार्यपद्धतीस अनुसरुन नाही. **मे. सोव्हील (इंडिया) यांची निवड करताना पात्रतेचे निकष योग्यरित्या तपासले असते तर अशी परिस्थिती नक्कीच उद्‌भवली नसती. पात्रतेच्या अटी तपासणीत कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर विभागाने कार्यवाही करावी. तसेच मे. सोव्हील (इंडिया) यांना अपात्र ठरविल्यानंतर फेरनिविदा न मागविता मूळ निविदेतील दुसऱ्या क्रमांकाच्या निविदेचा विचार करणे हे सुद्धा निविदा प्रक्रियेच्या नियमावलीस अनुसरुन नाही. पात्र निविदाकाराची निवड झाल्यानंतर अन्य सर्व निविदाकारांकडून प्राप्त इसारा रक्कम परत करावी लागते व सदर निविदाकारांचे**

दस्तऐवज दप्तरदाखल केले जातात. असे असताना पात्र निविदाकाराच्या नेमणूकीच्या ६ महिन्याच्या कालावधीनंतर फेरनिविदा न मागविता मूळ निविदेबाबत पुनर्विचार करणे ही बाब अत्यंत चुकीची व आक्षेपार्ह असून प्रशासकीय व आर्थिक शिस्तीला अनुसरुन नाही. याबाबतही विभागाने दोषींवर कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

" संकल्पचित्रातील अडचणी "

३.३१० कंत्राटातील दस्तऐवज/तांत्रिक प्रस्तावातील स्थापत्य कामाची मानके/संकल्प तपशिल आणि MMRDA व PMC ने मंजूर केलेले संकल्पिय दस्तऐवजाचे लेखापरिक्षण केले असता चलसंच वाहनाच्या आसभाराशी मार्गदर्शीपथाचे सुसंगत नसणे या शिर्षाखाली महालेखापालांनी असे नमूद केले की,

चलसंच वाहनाच्या आसभाराशी मागदर्शी पथाचे सुसंगत नसणे

३.३११ रस्त्याच्या आणि लोहमार्गाच्या स्थापत्य अभियांत्रिकीय आसभाराचे संकल्पचित्र विचारात घेणे महत्वाचे असते. उदा. २ आस असलेले ३० टन वजनाच्या वाहनाचा आसभार कशाप्रकारे तो विभागला आहे त्यानुसार अंदाजे १५ टन असावा. कमाल मर्यादेबाहेरील आसभाराने रस्त्यांना अथवा लोहमार्गाना हानी पोहचू शकते. मोनोरेलच्या कंत्राटात असे विहित केले होते की, मार्गदर्शीपथाचे संकल्पचित्र हे चल संच वाहनाचा कमाल आसभार पेलू शकेल असे असावे. लेखापरिक्षणात असे आढळून आले की, LTSE ने त्यांचे तांत्रिक प्रस्तावात नमूद केलेल्या १२.३५ टना ऐवजी ११.७२ टन आसभार असलेल्या मार्गदर्शीपथाचे संकल्पचित्रण आणि बांधणी केली तर LTSE ने प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या चलसंच वाहनाचा आसभार १३.२७ टन इतका होता. संकल्पचित्र पुनवैधतेसाठी MMRDA ने जे मार्गदर्शीपथाचे संकल्पचित्र आधीच मंजूर झाले होते त्यास तपासणीसाठी माहे जून,२०११ मध्ये एका जर्मन सल्लागाराची नियुक्ती केली होती. सल्लागाराची नियुक्ती करण्याआधीच दरम्यानच्या काळात मार्गदर्शीपथाच्या स्थापत्याच्या पहिल्या टप्प्यातील २५% ते ९७% काम आणि दुसऱ्या टप्प्यातील ११% ते २८% काम पूर्ण झाले होते. सल्लागाराने माहे डिसेंबर,२०११ मध्ये दिलेल्या अभिप्रायात चलसंच वाहनाच्या वाढत्या वजनामुळे मार्गदर्शी पथाचे बांधकामावर अतिरिक्त ताण पडू शकेल, मार्गदर्शी पथाच्या बांधकामाचा संभाव्य धोका टाळण्यासाठी मार्गदर्शी पथाची लक्षपूर्वक देखभाल, नियोजन आणि त्याचे कालबद्ध निरिक्षण आणि भविष्यातील प्रकल्प टप्प्याच्या आरेखन निकषाचे पुनर्विलोकन करण्याची शिफारस केली होती. तथापि, MMRDA किंवा PMC ने असे कुठलेही पुनर्विलोकन केले नव्हते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. सदर आक्षेपाबाबत समितीने विचारणा केली की ज्यांनी कोड मधील तरतूदीचे उल्लंघन केले आहे त्यांचेवर कारवाई करण्यात आली आहे काय ?, त्यांना दंड आकारण्यात आला आहे काय ? याठिकाणी टेंडर मधील अटीमध्ये नमूद तांत्रिक निकषापेक्षा वेगळे काम झालेले आहे ही बाब स्पष्ट दिसून येते. यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा सादर केला की, सदर प्रकरणी आयआयटी कडून तपासणी करून त्यांचा अहवाल प्राप्त करण्यात आलेला आहे. सदर खुलाशाने समितीचे समाधान झाले नाही. निविदेमध्ये नमूद अटी स्पष्ट व बंधनकारक असताना त्यानुसारच कार्यवाही होणे आवश्यक व अपेक्षित असताना सदर अटींचे उल्लंघन झाल्यानंतर व MMRDA च्या निदर्शनास आल्यानंतर कंत्राटदारास आयआयटीचे प्रमाणपत्र आणण्यास सांगितल्याचे दिसून येते. ही बाब अत्यंत गंभीर आहे. वास्तविक निविदेतील अटी व शर्तींमध्ये अशाप्रकारे शिथीलता द्यायची होती किंवा अटी, शर्तींमध्ये नमूद प्रमाणकांपेक्षा कमी असलेले काम MMRDA ला मान्य होते तर अशा अटी निश्चितच का करण्यात आल्या? MMRDA आणि आयआयटी यांनी कोड प्रोव्हीजनचा आधार घेतलेला नाही. सदर प्रकरणी जो काही टेक्निकल आधार घेतला त्यासंदर्भात आयआयटीकडे पुनर्तपासणी करायला पाठवावे लागेल. जर्मनीच्या कंपनीने केलेल्या तपासणीमध्ये चलसंच वाहनाच्या वाढत्या वजनाचा मार्गदर्शी पथावर होणारे परिणाम स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहेत. सबब मुळ डिझाईनमध्ये तफावत असल्याचे स्पष्ट झालेले आहे. महालेखापालांनी स्पष्ट केले की, ज्यावेळी मुळ डिझाईनमध्ये तफावत असते तेव्हा सदर डिझाईन बनविणाऱ्यांचे मत घेणे आवश्यक आहे. अशावेळी थर्ड पार्टीचे मत घेण्याचा संबंध नाही. महालेखापालांच्या या मताशी समिती सहमती दर्शविते व अशा परिस्थतीत आयआयटीचा नंतर घेतलेला सल्ला येथे लागू पडणार नाही. जर आयआयटीचा सल्लाच घ्यायचा होता तर तो अटी व शर्ती निश्चित करतानाच्या स्तरावरच घेणे अपेक्षित होते. अटी व शर्तींचा भंग झाल्यानंतर केवळ कामाच्या समर्थनासाठी आयआयटीचा सल्ला घेणे निश्चितच समर्थनीय नव्हते. विभागाने ज्यावेळी जर्मन कन्सल्टंटची नेमणूक केली तेव्हा बिमचे काम पूर्ण झाले होते. पहिल्या टप्प्याचे काम २५% ते ९७% आणि दुसऱ्या टप्प्याचे काम ११% ते २८% पूर्ण झाले होते. **त्यामुळेच जर्मन कंन्सल्टंटनी आता बांधणीमध्ये बदल करता येणार नाही. त्यामुळे भविष्यात मेंटेनन्सच्याबाबत काळजी घ्यावी असा सल्ला दिला होता. अटी व शर्तींचा भंग झालेला असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून त्याचे आयआयटीकडून समर्थन केल्यामुळे यापुढे MMRDA ला मेंटेनन्सवर अधिक लक्ष ठेवून येणारा अतिरिक्त खर्चही सोसावा लागेल. जर हे काम डिझाईनप्रमाणे झाले असते तर हा प्रश्न उद्‌भवला नसता. विभागाने PMC ची नेमणूक करूनही व त्यांना कोट्यवधी रुपये देऊनही त्यांच्या दुर्लक्षामुळे हा भार वाढला आहे असे स्पष्ट होते. त्यामुळे सल्लागारांवर त्यांच्या कामातील दुर्लक्षाबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.** तसेच विभागाच्या मोनोरेलच्या भाराच्या विभागणीबाबत सादर केलेले स्पष्टीकरण सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य नाही. याबाबतही समितीने नाराजी व्यक्त केली. पुरवठादाराकडून चूक

झाल्यामुळे ट्रेनचे वजन वाढलेले असताना पुरवठारावर कार्यवाही करण्याऐवजी विभाग स्पष्टीकरण देत आहे ही बाब योग्य नाही. त्यामुळे सदर तांत्रिक बाब पुन्हा एकदा तपासण्यात यावी. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडणार नाही किंवा भार वाढल्यामुळे याचा सुरक्षिततेवर कोणताही परिणाम होणार नाहीत याची विभागाने दक्षता घ्यावी. सदर स्ट्रक्चरचा कालावधी १२० वर्षाचा आहे. त्यामुळे याबाबत अधिक दक्षता घेणे आवश्यक आहे. **वास्तविक करारातील अटी व शर्तींचा भंग झालेला असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. व त्या स्तरावर स्ट्रक्चरमध्ये सुधारणा करण्याची शक्यता नव्हती तरीही MMRDA कडून कोणतीही दंडात्मक कारवाई कंपनीवर केल्याचे दिसून येत नाही. प्रथम ३ वर्षाकरिता ऑपरेशन व मेंटेनन्सचा मुळ करारात समावेश आहे. तथापि, त्यानंतरच्या कालावधीकरिता तातडीने निविदा मागवून देखभाल व दुरुस्तीकरिता तज्ज्ञ संस्थेची नेमणूक करावी अशी समितीची शिफारस आहे. पुरवठादार व पीएमसीच्या हलगर्जीपणामुळे भविष्यात देखभाल व दुरुस्तीकरीता होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचा अंदाज घेऊन त्याची वसुली पुरवठादार व सल्लागार संस्थेकडून करण्यात यावी. याशिवाय प्रस्तुत प्रकरण MMRDA चे अधिकाऱ्यांचे तांत्रिक बाबींची तपासणी करण्याकडे झालेल्या दुर्लक्षाबाबत जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" डेपो इमारत भुकंप विरोधक संकल्पचित्रास सुसंगत नसणे "

३.३१२ वडाळा येथील मोनोरेल डेपोमध्ये कार्यचालन आणि नियंत्रण केंद्र, कार्यशाळा, चलसंच वाहनासाठी प्रांगण, प्रशासकीय इमारत, चलसंच वाहन स्वच्छतेसाठी जलवाहिनी आदींची व्यवस्था आहे. मोनोरेल कंत्राटाच्या दस्तऐवजात सन १९८३ च्या भारतीय मानकांप्रमाणे नागरी बांधकामाचे भुकंप रोधक संकल्पचित्रांचे निकष नमूद केलेले होते. या मानकांप्रमाणे सर्व महत्वाच्या सेवा आणि समूह इमारती आणि आपत्कालिन सिद्धतेसंबंधीच्या इमारती १.५ इतका महत्तम गुणक (IF) घेऊन संकल्पचित्र करावयास पाहिजे. तथापि, लेखापरिक्षणात असे आढळून आले की, LTSE ने सुरूवातीला १.० चा IF वापरून डेपोच्या इमारतीचे बांधकाम केले जे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिल्यानंतर सुधारून १.५ केले गेले. परंतु तोपर्यंत डेपो इमारतीच्या पाईल्सचे ७०% काम पूर्ण झालेले होते. LTSE ने डेपो इमारतीचे संकल्पचित्रातील सुधारणेद्वारे डेपो इमारतीचा भार विविध पद्धतीने कमी करून १.० IF चा महत्तम गुणक १.५ असा दुरुस्त केला. करारातील अटी व शर्तीनुसार डेपो इमारतीचे संकल्पचित्रण हे झोन ०४ च्या तीव्रतेचे पाहिजे. जेणेकरून बांधकामाच्या टिकाऊपणासाठी आवश्यक संकल्पचित्रण साध्य होईल. म्हणून प्रारंभापासूनच झोन ०४ च्या भाराकरिता महत्वाचे गुणक १.५ विचारात घ्यावयास पाहिजे होते. याबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, कन्सल्टंटने दिलेले डिझाईन स्पेसीफीकेशननुसार आहे की नाही याबाबत कन्सल्टंटने व विभागाने आयआयटीला विचारणा केली होती. या संदर्भात सर्व रिपोर्ट आयआयटीने तपासून अहवाल दिला आहे की, " It is in order " . सदर अहवालाबाबत भाष्य करताना समितीने स्पष्ट केले की, LTSE ने आयआयटीचे मत घेतलेले आहे. वास्तविक LTSE ऐवजी MMRDA ने आयआयटीस संपर्क साधून त्याबाबतचा सल्ला घेणे आवश्यक होते. **तसेच करारातील अटी व शर्तीनुसार प्रकल्पाचे काम सुरू आहे किंवा कसे याची देखरेख ठेवण्याचे काम हे पुर्णपणे MMRDA चे असताना ६०% काम होईपर्यंत या महत्वाच्या बाबीकडे MMRDA च्या अधिकाऱ्यांनीही दुर्लक्ष करणे हे अक्षम्य आहे. अतः या अधिकाऱ्यांवर देखील कारवाही करण्यात यावी तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने MMRDA ने सदर कामाचे थर्डपार्टी ऑडीट तातडीने करून घ्यावे व कंत्राटदाराकडून ऑडीटचा खर्च वसुल करण्यात यावा. थर्डपार्टी ऑडीटमध्ये सुचविलेली सर्व प्रकारची दुरुस्ती / बदल तातडीने करण्यात यावा, यावर होणारा खर्च सुद्धा कंत्राटदाराकडून वसुल करावा आणि अटी व शर्तीच्या उल्लंघनाबाबत संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत डेपो इमारत भुकंपरोधक राहिल तसेच भविष्यात भुकंपामुळे कोणत्याही हानीची शक्यता राहणार नाही याबाबत विभागाने आवश्यकती सर्व दक्षता घ्यावी. भविष्यकाळातील हानी टाळण्यासाठी आवश्यकत्या सर्व उपाययोजना कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" टिकाऊपणातील अडचणी "

" काजळी प्रतिबंधक रंग लावला गेला नाही "

३.३१३ " कंत्राटात अति प्रतिकुल हवामानाच्या स्थितीत संधानक (Concrete) बांधकामाकरिता संररक रंगाचा थर (Protective Coating) लावण्याची तरतूद होती. मुंबईत ही प्रतिकुलता अधिकच तीव्र आहे. कारण प्रदुषणामुळे मोठ्या प्रमाणात कार्बनडाय ऑक्साईडचे उत्सर्जन होत असल्यामुळे बळकटी आणणाऱ्या खांबांची गंजून झीज होते. पहिल्या टप्प्याची सुरूवात माहे फेब्रुवारी, २०१४ पासून झालेली असतानाही LTSE ने काजळी प्रतिबंधक रंग लावला नव्हता असा आक्षेप महालेखापालांनी नमूद केला आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सादर केले की, जेथे जेथे गरज असेल तेथे तेथे प्रोटेक्टीव कोटींग केले पाहिजे असे कराराच्या अटीमध्ये नमूद आहे. सर्व ठिकाणी ते करण्याची गरज नाही. अजूनही काही ठिकाणी काजळी प्रतिबंधक रंग लावलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु एजन्सीकडून सदर

काम करवून घेण्यात येईल व जर एजन्सीने ते काम केले नाही तर त्यांच्या रिस्क ॲण्ड कॉस्टवर MMRDA ते काम करवून घेईल. **याबाबत समितीने सूचित केले की, MMRDA ने करारातील अटीनुसार ज्या ज्या ठिकाणी काजळी प्रतिबंधक रंग लावणे आवश्यक आहे अशा सर्व जागांचा आढावा घ्यावा व अशा सर्व ठिकाणी काजळी प्रतिबंधक रंग लावण्याची कामे कंत्राटदाराकडून करवून घ्यावीत. कंत्राटदाराने अशा कार्यवाहीत दिरंगाई केल्या प्रकरणी त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

" खालच्या स्तरावरील मातीत क्लोराईडचे प्रमाण जास्त असणे "

३.३१४ मातीत असलेल्या क्लोराईडमुळे काँक्रीट बांधकामातील बळकटी आणणाऱ्या खांबांना गंज चढतो. बांधकामाच्या कार्यकाळात बळकटी आणणाऱ्या खांबांपर्यंत क्लोराईडचा प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक ती पाऊले उचलायला हवीत. केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार समुद्र किनाऱ्यापासून १ कि.मी.च्या आत असलेल्या स्थापत्य बांधकामाच्या विविध आच्छादनाच्या आणि संकल्पचित्राच्या कालावधीसाठी वापरण्याच्या संधानक बळकटीची शिफारस करते असे या करारात नमूद आहे. १२० वर्षासाठीचे स्थापत्य बांधकाम आणि ७५ मी.मी. आच्छादनासाठी या अहवालानुसार न्युनत्तम M-५० हे संधानक मजबुती विहित करण्यात आलेले आहे. LTSE ने MMRDA ला माहे जानेवारी,२०११ मध्ये सादर केलेल्या मृद सर्वेक्षण अहवालात मोनोरेलच्या ३१ पैकी २२ ठिकाणातील एका भागात जो भाग माहुल खाडी आणि लगतच्या वडाळा मिठागाराच्या १ कि.मी. परिसरात आहे तेथे २०,०५० ते ८९,००० भाग प्रति दशलक्ष (PPM) इतक्या मात्रेत क्लोराईड असल्याचे निर्देशित केले होते. त्या ठिकाणी सापडलेल्या क्लोराईडची मात्रा समुद्राच्या पाण्यातील १९,४०० PPM क्लोराईडपेक्षा लक्षणीयरित्या जास्त होती असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. याबाबत विभागाने खुलासा केला की, प्रस्तुत अटी व शर्तीनुसार कॉन्ट्रक्टमध्ये M-५० अशी तरतूद नसून M-४० ची तरतूद आहे. M-४० ऐवजी आम्ही ३५ पीपीसी वापरलेले आहे व पीएमसीने याबाबत सहमती दर्शविली आहे असा खुलासा करून जी खर्चातील बचत झाली आहे ती ठेकेदाराकडून वसुल करण्यात येईल तसेच कुठल्याही इमारतीची structural eligibility structural Audit करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे तपासणी करून घेण्यात येत आहे. सदरहू खुलासा अस्विकृत करीत समितीने निर्देश दिले की, मोनोरेल चालविण्याची जबाबदारी विभागाची आहे. याचे कामासाठी M-५० ठरले असताना त्यामध्ये बदल करून ग-३५ चा वापर करणे योग्य नाही. यामध्ये बदल करण्याचे अधिकार आपणास नाहीत. सदरहु काम चांगल्या Expert किवा International सल्लागाराकडून तपासून घेण्यात यावे. विभागाने करारात काय नमूद केले आहे हे तपासून घेण्याची आवश्यकता आहे व त्यातील specifications नुसारच काम करून घेणे आवश्यक आहे. **प्रस्तुत प्रकरणी प्रकल्पाचा १२० वर्षाचा कालावधी असल्याने विभागाला BS ४० च्या बाहेर जावून कोणतीही कार्यवाही करता येत नाही. प्रस्तुत प्रकरणी झालेल्या बदलामुळे इमारतीच्या आयुष्यमानावर काय परिणाम होईल ही बाब देखील तपासण्याची आवश्यकता असल्यामुळे शासकीय संस्थेमार्फत किंवा आयआयटीकडून या संदर्भातील तपासणी करून घ्यावी. तपासणीअंती प्राप्त अहवालानुसार सर्व उपाययोजना करण्यात याव्यात व सदर उपाययोजनांवर होणारा खर्च कंत्राटदाराकडून वसुल करावा, कंत्राटदारास सुरक्षिततेची पर्वा न करता अशा तांत्रिक बाबींमध्ये अनावश्यक सवलत देणाऱ्या MMRDA च्या अधिकाऱ्यांवरही कार्यवाही करावी व समितीच्या शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" कंत्राटातील अटींचे उल्लंघन "

" पथदर्शी मार्गाचे पायाभरणीचे कामासाठी कमी प्रतीचे काँक्रीट वापरण्यात आले "

३.३१५ LTSE ने त्यांच्या तांत्रिक सूचनांमध्ये पाईल्स आणि पाईल्स कॅपच्या बांधकामासाठी M-४० प्रतीचे काँक्रीट वापरण्याचे नमूद केले होते. पीएमसी ने पथदर्शी मार्गाच्या पायाभरणीसाठी M-३५ प्रतीच्या काँक्रीट वापराच्या निकषावर माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये मान्यता दिली. माहे एप्रिल, २०१४ च्या प्रगती अहवालानुसार LTSE ने एकूण २५८० पाईल्स आणि ६३७ पाईल्स कॅपस् M-३५ प्रतीच्या काँक्रीट वापरुन बांधले होते. MMRDA ने याला मुल्यअभियांत्रिकी असे समजण्यात येवून फरकातून झालेली बचत LTSE कडून वसुल करण्यात येईल असे नमूद केले होते. याबाबत समितीच्या बैठकीत चर्चा झाली व चर्चेअंती समिती अशी शिफारस करीत आहे की, **विभागाने केलेले बदल सुरक्षिततेच्या दृष्टीने निश्चितच योग्य नाहीत. विभागाने हे काम करारामध्ये नमूद अटी व शर्तीनुसारच व specification नुसारच करणे आवश्यक होते. प्रस्तुत प्रकरणी स्थापत्य कामाची कालमर्यादा १२० वर्ष असल्याने करारानुसार specification वापरणे आवश्यक आहे. विभागाने कंत्राटदाराला यापुढे अशा बाबींची पुनरावृत्ती न करण्याची सक्त ताकीद द्यावी व झालेल्या कामाची सविस्तर तपासणी आयआयटीमार्फत करून घेण्यात यावी व आयआयटीने सुचविल्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी व सचिवांनी समिती आश्वासित केल्यानुसार M-४० ऐवजी M-३५ प्रतीचा कॉक्रीट वापरल्यामुळे बचत झालेली आहे. सदर बचतीच्या फरकाची रक्कम LTSE कडून तात्काळ वसूल करण्यात यावी. समितीच्या शिफारशी नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा. अशी समितीची शिफारस आहे.**

" कार्यपूर्णत्वाची बॅंक हमी पुन:जिवीत न करणे "

३.३१६ कंत्राटातील अटीनुसार LTSE ने कंत्राट मुल्यांच्या (कंत्राटी मुल्य रु. २४६० कोटी) (करापोटी रु. २५६ कोटी वगळून) १०% (रक्कम रु. २४६ कोटीचे) कार्यपूर्णत्वाच्या प्रतिभूती बॅंक हमीच्या (BG) स्वरुपाच्या सादर करावयाच्या होत्या. लेखापरिक्षणात असे आढळून आले की, LTSE ने रु. २४६ कोटी रकमेच्या एसबीआय च्या ६ बॅंक हमी सादर केल्या होत्या. त्यातील रु. १९६.८० कोटीच्या ४ बॅंक हमींचे LTSE ने १ ते २४ महिन्याच्या कालावधीपर्यंत नुतनीकरण केलेले नव्हते. अशाप्रकारे MMRDA ने केवळ नजरचुकीने आपल्याच आर्थिक हिताची जपवणूक केलेली नव्हती असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, निविदेतील अटी व शर्तीनुसार कोणत्याही क्षणापर्यंत बॅंक हमी पूर्ण रकमेची असली पाहिजे यामध्ये दुमत नाही. प्रस्तुत प्रकरणी एकूण ७-८ बॅंक हमी होत्या. त्यापैकी काही बॅंक हमीची मुदत काही दिवस संपलेली होती. याबाबत विभागाने बॅंकेला निधी प्राप्त करून देण्याबाबत पत्र पाठविले होते. परंतु बॅंकेने बॅंक हमीचे नुतनीकरण करून दिल्यामुळे रोखीकरणाची आवश्यकता भासली नाही. परंतु अशा बाबी बऱ्याचवेळा घडल्याचे विभागाने मान्य केले. याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, **विभागाने बॅंक हमीची बाब गांभीर्याने हाताळलेली नाही. प्रकल्प कालावधीत जर कंपनी बॅंक हमी ठेवत नसेल किंवा मुदत संपलेली असेल व प्रकल्प कार्यान्वयामध्ये काही अटींचे उल्लंघन झाले असल्यास विभागाकडे कोणतीही सिक्युरीटी राहात नाही. जर बॅंक मुदत संपण्यापूर्वी बॅंक हमीचे नुतनीकरण करीत नसेल तर सदर बॅंक हमी बॅंकेत जमा करून त्याचे रोखीकरण करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही ही बाब गंभीर व बेजबाबदारपणाची आहे. ज्या अधिकाऱ्यांनी सोपविण्यात आलेल्या कामात हलगर्जीपणा केला, विभागाचे हित न जोपासता कंपनीला सवलत देण्याचा प्रयत्न केला अशा अधिकाऱ्यांवर विभागाने कठोर कार्यवाही करावी व जमा असलेल्या सर्व रु. २४६ कोटीच्या बॅंक हमीचा आढावा घेऊन कोणत्याही बॅंक हमीची मुदत संपलेली नाही याची खात्री करावी. भविष्यात प्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत बॅंक हमी MMRDA कडे उपलब्ध असेल याची दक्षता घ्यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस २ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" निविदेशिवाय चलसोपानांची / सरकत्या जिन्यांची प्राप्ती "

३.३१७ मोनोरेल प्रकल्पाच्या कंत्राटात सरकत्या जिन्याची तरतूद नव्हती. जे नंतर स्वतंत्रपणे हाती घ्यावयाचे होते. लेखापरिक्षणात असे आढळून आले की, माहे ऑगस्ट,२०१२ मध्ये LTSE ने प्राप्त केलेल्या ३ दरपत्रकावर आधारीत MMRDA ने १७ स्टेशनसाठी रु. २०० कोटी किंमतीचे ६६ सरकते जिने प्राप्त करण्यासाठी माहे सप्टेंबर,२०१२ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली. त्यामध्ये या जिन्यांची मांडणी/कार्यान्वयन/ स्थापत्य कामे/कार्यचालन आणि देखरेख या बाबींचा समावेश होता. ६६ सरकते जिने प्राप्त करण्यासाठी रु. १४०.०४ कोटी किंमतीचे पुरवठा आदेश स्पर्धात्मक बोली न मागविता LTSE कडे माहे जानेवारी, २०१३ आणि माहे जून,२०१४ मध्ये देण्यात आले होते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. याबाबत समितीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, निविदा काढताना सरकत्या जिन्याचे काम अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेले नव्हते. ज्यावेळी मोनोरेलचे काम जवळपास पूर्ण होत आले त्यावेळी मोनोरेलची उंची पाहता सरकते जिने बसविण्याचा निर्णय सन २०१३ मध्ये घेण्यात आला. सदर निर्णयास कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात आली. अन्य एजन्सीकडून सरकते जीने बसवून घेतले असते तर अडचण निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन कार्यकारी समितीने या प्रस्तावास मान्यता दिली. सरकते जीने पुरवठयासाठी शिंडलर, ओटीस, जॉनसन अशा ठराविक कंपन्याच अग्रेसर आहेत. LTSE ने ४ विविध कंपन्यांकडून दरपत्रक मागवून कमी दराच्या कंपनीकडून काम करवून घेतले आहे. याबाबत समितीने मत व्यक्त केले की, जर ठराविक कंपन्या पुरवठादार असतील तर निवड पद्धतीनेच पुरवठादार संस्थेची निवड करणे आवश्यक असतानाही विभागाने अशा पद्धतीचा अवलंब न करता केलेल्या कार्यवाहीचे समर्थन करीत आहे असे खेदाने नमूद करण्यात येत आहे. समितीने तीव्र नाराजी दर्शवून विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, शिंडलर कंपनीने रु. ४ लाख कमी केलेले आहेत. विभागाने या कामासाठी निवड प्रक्रिया राबविली असती तर आणखी नविन कंत्राटदार आले असते व खर्चात बचत झाली असती. जी एजन्सी सरकत्या जिन्यांचे उत्पादन करते ती एजन्सी सिव्हील वर्क करीत नाही. कंपनीकडून डिझाईन देण्यात येते व बांधकाम अन्य कंत्राटदाराकडून करावयाचे असते. त्यामुळे दुसरा कंत्राटदार विभागाला किंवा त्या एजन्सीला नेमावाच लागतो. त्यामुळे MMRDA ने पारदर्शक पद्धतीने निविदा काढून अन्य संस्थेची निवड करणे आवश्यक होते. LTSE हे काम करू शकत नाही, त्यांना अशा कामाचा अनुभव असण्याचाही प्रश्न उद्‌भवत नाही. मोनोरेलच्या कामामध्ये यापूर्वी १३ कंत्राटदार नेमण्यात आलेले आहेत. सरकत्या जिन्यासाठी सुद्धा स्वतंत्र कंत्राटदार नेमण्यास कोणतीही हरकत नव्हती. सरकत्या जिन्याची उत्पादक कंपनी २५% ते ३०% पर्यंत Discount Dealer & Distributor ना देतात. ते Discount विभागाला मिळाले असते व रु. १४० कोटी पैकी २५% ते ३०% रक्कमेची बचत होवू शकली असती. सदर काम हलगर्जीपणाने व काळजी न घेता दिल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. यामध्ये तत्कालिन अधिकाऱ्यांची नियोजन शुन्यता दिसून येते. या कार्यपद्धतीमुळे Central Vigilence Commission च्या मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन झालेले आहे. **ही अतिशय गंभीर बाब असून विभागाने यापुढे विनानिविदा खरेदीचा निर्णय घेवू नये. सदर प्रक्रियेमध्ये नियोजन न करता विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करता हलगर्जीपणे खरेदी करण्यास जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

३.३१८ मोनोरेलच्या दुसऱ्या टप्प्याचे काम देखील प्रगतीपथावर असून तसेच मोनोरेल संदर्भात झालेले अपघात व निदर्शनास आलेल्या त्रुटी लक्षात घेता उपरोक्त नमूद सर्व बाबींची पुनरावृत्ती दुसऱ्या टप्प्यात टाळावी व शासनाने विहीत निविदा अटी व शर्तीमध्ये कोणतीही शिथिलता कंपनीला देऊ नये व LTSE कडून निविदा अटी व शर्ती मध्ये उल्लंघन होणार नाही याबाबत MMRDA ने आवश्यक ती दक्षता घ्यावी. अशी समितीची शिफारस आहे.

३.३१९ मोनोरेलच्या टप्पा-१ च्या कामात अनेक अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले. असे असतानाही अशा कंपनीवर कोणतीही दंडात्मक कारवाई MMRDA कडून झाल्याचे दिसून येत नाही. याउलट त्या कंत्राटदार कंपन्यांनी MMRDA कडे काही रकमांचे दावे केलेले आहेत. परंतु MMRDA ने मात्र कंत्राटदाराकडून घ्यावयाच्या कोणत्याही रकमेचे दावे अद्यापपर्यंत कंत्राटदाराला लेखी स्वरुपात कळविलेले नाही ही तर अधिकच गंभीर बाब आहे. MMRDA ला कंत्राटदार कंपनीकडून घ्यावयाच्या सर्व रकमांचा दावा तात्काळ करावा व त्यानंतरच रकमेच्या समायोजनाची कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

गृह विभाग

४. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र (नागरी) अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.२. ' सागरी तट सुरक्षा योजनेची अंमजबजावणी ' या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

प्रस्तावना

४.१. महाराष्ट्राला, बृहन्मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग आणि ठाणे या पाच जिल्ह्यांमध्ये पसरलेला एकूण ७२० कि.मी. एवढा विस्तीर्ण सागरी तट लाभला आहे. सागरी तट सुरक्षा ही एक त्रिस्तरीय व्यवस्था आहे, म्हणजेच, ०-१२ नॉटीकल मैल क्षेत्राचे राज्याच्या तट पोलीस दलातर्फे संरक्षण केले जाते व १२ नॉटीकल मैल ते हाय सी क्षेत्रापर्यंतची सुरक्षा भारतीय तटरक्षक दल व नौदलाकडून केली जाते.

अवैधरित्या होणारी घुसखोरी व गुन्हेगारी स्वरुपाच्या कारवायांपासून सागरी किना-याचे संरक्षण करण्यासाठी राज्य पोलीस दलाची क्षमता बळकट करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने (GOI) सागरी तट सुरक्षा योजना आखली (फेब्रुवारी २००५), जिची अंमलबजावणी राज्य शासनांनी करायची होती. या योजनेत भांडवली मत्तांच्या उभारणीवरील अनावर्ती खर्चासाठी १०० टक्के अर्थसहाय्य तसेच इंधन, देखभाल व दुरुस्ती आणि कर्मचारी प्रशिक्षण यावर केल्या जाणा-या आवर्ती खर्चाची संपूर्ण प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून होणार होती. योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेला मनुष्यबळावरील खर्च राज्य शासनांनी करावयाचा होता.

महाराष्ट्र शासनाने (GOM) सागरी तट सुरक्षेसाठी रुपये ३९.२९ कोटी खर्चाचा (फक्त अनावर्ती खर्च) एक पथदर्शी आराखडा केंद्र शासनास सादर केला (जून २००५), जो ऑक्टोबर २०१० मध्ये रु. ४५.५५ कोटी पर्यंत अद्ययावत करण्यात आला. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने दोन टप्प्यांमध्ये एकूण रु. १०४.०५ कोटी खर्चास (फक्त अनावर्ती खर्च) मान्यता दिली. (डिसेंबर २००५ व नोव्हेंबर २०१०). तक्ता ३.२.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सागरी तट पोलीस स्थानके (CPS), तपासणी नाके, जेट्टी, कार्यकारी बराकी इत्यादीच्या बांधकामासाठी व वाहने, गस्ती नौका यांच्या खरेदीसाठी केंद्र शासनाने मंजूरी दिली.

तक्ता ३.२.१ टप्पा I व II अंतर्गत सागरी तट सुरक्षा योजनेखाली केंद्र शासनाने मंजूर केलेल्या बाबी.

(रक्कम कोटीमध्ये)

अ.क्र.	केंद्र शासनाने मंजूर केलेल्या बाबी	टप्पा-I		टप्पा-II		एकूण संख्या	
१	सागरी तट पोलिस स्थानके	१२	२.९६	७	३.३६	१९	६.३२
२	नौका	२८	३४.००	१४	५६.००	४२	९०.००
३	जीप	२५	१.००	७	०.४९	३२	१.४९
४	मोटार सायकल	५७	०.३४	१४	०.०८	७१	०.४२
५	पोलिस स्थानकांसाठी एक रक्कमी सहाय्य	१२	१.२०	७	१.०५	१९	२.२५
६	तपासणी नाके	३२	०.६४	००	००	३२	०.६४
७	बराकी	२४	०.७८	००	००	२४	०.७८
८	जेट्टी	०	००	३	१.५०	३	१.५०
९	जेट्टीसाठी संचालन/ कार्यकारी कक्ष	०	०	१४	०.६५	१४	०.६५
	एकूण		४०.९२		६३.१३		१०४.०५

योजनेच्या अंमलबजावणीची सर्वसाधारण जबाबदारी राज्याच्या पोलीस महासंचालकावर सोपविण्यात आलेली आहे. राज्य अन्वेषण विभागाचे पोलीस आयुक्त हे राज्यांमध्ये योजनेची अंमलबजावणी करण्यासाठीची नोडल एजन्सी आहे.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

परिच्छेदामधील माहिती वस्तुस्थितीवर आधारित असल्याने त्यावर भाष्य नाही.

सागरी तट सुरक्षा योजनेच्या नियोजनातील कमतरता.—

डिसेंबर २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या सागरी तट सुरक्षा योजनेस मंजूरी देताना केंद्र शासनाने विद्यमान २४ सागरी तट पोलीस स्थानकांची सुधारणा, ७२ निरीक्षण मनाऱ्यांची स्थापना व २४ नवीन सागरी तट बाहय नाके आणि अन्वेषण सामुग्री यासारखे महत्वपूर्ण घटक विचारात घेतले नव्हते. या घटकांवरील अंदाजित खर्च रु. ६.६५ कोटी होता. याशिवाय महाराष्ट्र शासनाने जून-२००५ मध्ये प्रारंभिक आराखड्यात प्रस्तावित केलेल्या एका टेहळणी हेलीकॉप्टरच्या खरेदीला (महाराष्ट्र शासनाने अंदाजित किंमत निर्धारित केली नव्हती) केंद्र शासनाने देखिल मान्यता दिलेली नव्हती असे आढळून आले की, राज्य शासनाने देखिल स्वत:च्या अर्थसंकल्पीय साधन संपत्तीमधून तुट भरुन काढण्याचा प्रयत्न केला नव्हता, जे सागरी तट सुरक्षेच्या नियोजनातील कमरता दर्शविते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे .

दिनांक १४/१०/२००५ रोजी मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना सुधारित आराखडा मंजूर न झालेल्या बाबी मंजूर होणेकरिता सादर केलेला होता. सदर सुधारित अहवाल हा दिनांक ३०/९/२००५ रोजी पडताळणी समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सादर करण्यात आलेला होता. विशेष सचिव, गृह मंत्रालय, केंद्र शासन हे देखिल सदर बैठकीस हजर होते. दिनांक ३०/९/२००५ रोजी पडताळणी समितीने दिलेल्या निर्देश व निर्णयास अधिन राहून दिनांक ३०/१०/२००५ रोजी अपर मुख्य सचिव, गृह महाराष्ट्र शासन यांनी सचिव, सीमा व्यवस्थापन, गृह मंत्रालय यांना मान्यता न दिलेल्या बाबींना मान्यता देण्याबाबत सुधारित आराखडा सादर केला आहे.

सुधारित आराखडयानुसार मागणी करण्यात आलेल्या सेल्युअर ईटसेप्टर सिस्टीम खेरीज सर्व बाबी मंजूर करण्यात आल्या. सुधारित आराखड्यानुसार मंजूर करण्यात आलेल्या सर्व बाबी राज्य शासनाकडून प्राप्त करण्यात आलेल्या आहेत . महाराष्ट्र शासनाने सुधरित आराखड्याच्या अंमलबजावणी संदर्भात आवश्यक ती पावले उचललेली आहेत.

सुधारित आराखड्यात टेहळणी हेलीकॉप्टर, विद्यमान २४ सागरी तट पोलीस स्थानकांची सुधारणा, ७२ निरीक्षण मनोऱ्यांची स्थापना व २४ नविन सागरी तट बाह्य नाके आणि अन्वेषण सामुग्री इत्यादीची मागणी केलेली नव्हती.

नियोजनाचे स्तरावर सुरक्षेविषयक दृष्टीकोन विचारात घेवून दिनांक ३०.०९.२००९ रोजी सागरी सुरक्षेविषयक घेण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून त्यानुसार त्यावेळी प्राधान्य क्रमानुसार अत्यावश्यक बाबींकरीता सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर समिती त्याकरिता नियुक्त करण्यात आलेली होती व अशा प्रकारचे निर्णय घेण्याचे त्यांना स्वातंत्र्य होते.

निधीचा वापर न होणे.—

केंद्र शासनाने मंजूर केलेला निधी, महाराष्ट्र शासनाने केलेला खर्च व नोव्हेंबर, २०१४ अखेरीस राहिलेली अखर्चित शिल्लक तक्ता ३.२.२ मध्ये दर्शविली आहे. तक्ता ३.२.२ नोव्हेंबर २०१४ ची अखर्चित शिल्लक.

(रु. कोटीत)

घटक	टप्पा-१	टप्पा-२	एकूण
केंद्र शासनाने मंजूर केलेली रक्कम	४०.९२	६३.१३	१०४.०५
वजा: केंद्र शासनाने पुरविलेल्या नौकांची किंमत	३४.००	५६.००	९०.००
इतर घटकांसाठी महाराष्ट्र शासनाकडे उपलब्ध असलेला निधी	६.९२	७.१३	१४.०५
झालेला एकूण खर्च	६.५४	०.४६	७.००
अखर्चित शिल्लक	०.३८	६.६७	७.०५

स्त्रोत गृह विभागाने सादर केलेली माहिती.

महाराष्ट्र शासनाने टप्पा-I खालील रु. ०.३८ कोटी अखर्चित रक्कम बरेकीचे बांधकाम (जानेवारी २००६) व CPS करिता साधनसामग्री व फर्निचरची खरेदी (ऑक्टोबर २००७) याकरिता राखीव ठेवली होती टप्पा-I अंतर्गत मार्च-२०१२ (रु. २.४३ कोटी) व मार्च २०१४ (रु. ४.२४ कोटी) पासून सात CPS चे व जेट्टींवरील कार्यकारी कक्षांचे बांधकाम, CPS साठी साधनसामुग्री व फर्निचरची खरेदी यासाठी महाराष्ट्र शासनाने रु. ६.६७ कोटी राखीव ठेवली होती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सागरी सुरक्षा योजना फेज १ व २ अंतर्गत प्राप्त झालेल्या रू.६२९.६० लाख व रू.७२.९६ लाख निधीपैकी सागरी सुरक्षा योजना फेज १ चे रू. ६५३ लाख व फेज २ चे ३३४.५५१६ लाख उपयोगिता प्रमाणपत्र भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक, मुंबई यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी पाठविले आहे. बांधकाम व खरेदी प्रक्रिया प्रगती पथावर आहे. उर्वरित निधी हा बांधकामे/खरेदी पुर्ण झाल्यावरच खर्च होईल व ते संयुक्तिक आहे.

विहित कालावधीत/वेळेत अखर्चित निधी खर्च करण्याबाबत सर्व सबंधितांना सुचना/निर्देश देण्यात आलेले आहेत. सागरी सुरक्षा योजना फेज १ अंतर्गत मंजूर झालेली २ सागरी पोलीस ठाणे व ५ तपासणी नाक्यांचे विविध परवानग्या व जागेच्या अडचणीस्तव बांधकाम अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे अखर्चित निधी रू ३८.८२ लाख एकतर बांधकाम प्रलंबित असलेल्या पोलीस ठाणी/तपासणी नाक्यांच्या बांधकामावर खर्च करण्यात येईल अथवा सदर पोलीस ठाणी/तपासणी नाके तात्पुरत्या जागेमध्ये चालविले जात असल्याने त्यांना आवश्यक ती साधनसामग्री खरेदी करण्याकरिता वापरण्यात येईल.

सागरी सुरक्षा योजना फेज २ अंतर्गत मंजूर ७ पोलीस ठाणे पैकी ३ पोलीस ठाण्यांचे काम प्रगतीपथावर आहे व जागेच्या अडचणीस्तव ४ पोलीस ठाण्यांचे बांधकाम सुरू करण्यात आलेले नाही. तसेच १४ ऑपरेशनल रूमपैकी ५ ऑपरेशनल रूमचे बांधकाम पूर्ण झालेले आहे ४ ऑपरेशनल रूमचे बांधकाम प्रगती पथावर आहे. जागेच्या अडचणीस्तव ५ ऑपरेशनल रूमचे बांधकाम सुरू करण्यात आलेले नाही. ७ सागरी पोलीस ठाण्याकरिता संबंधित सागरी पोलीस घटक, प्रमुखांकडून व पोलीस महासंचालक यांचेकडून सर्व साधनसामुग्री खरेदी करण्यात आलेली असून त्यापैकी काही वितरीत करण्यात आली आहे व काही वितरणाच्या मार्गावर आहे. सागरी सुरक्षा योजना फेज २ अंतर्गत सागरी पोलीस ठाण्याच्या बांधकामाकरिता मंजूर झालेल्या रू २४३ लाख निधी महाराष्ट्र राज्य गृह निर्माण व कल्याण महामंडळ यांना वर्ग करण्यात आलेला असून त्यापैकी ३ सागरी पोलीस ठाण्यांचे बांधकाम सुरू करण्याकरिता महाराष्ट्र राज्य गृह निर्माण व कल्याण महामंडळ यांनी निविदेनुसार पात्र कंत्राटदारास दिनांक ३१.०३.२०१६ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

रु. २०९.३७ लाख निधी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डास १४ ऑपरेशनल रूम बांधण्याकरिता वर्ग करण्यात आलेला आहे आणि महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने रु. ५३.६७.९२३ इतका निधी खर्च केलेला आहे व शिल्लक निधी उर्वरित बांधकाम पूर्ण झाल्यावर खर्च करण्यात येणार आहे.

बांधकाम उचित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबात व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत संबंधितांना योग्य ते निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपयोगिता प्रमाणपत्र सादर न करणे

फेब्रुवारी २००५ मध्ये केंद्र शासनाने आखलेल्या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार,गस्ती नौकांसाठीचे पेट्रोल, तेल आणि वंगण (POL), गस्ती नौकांची देखभाल व दुरुस्ती आणि कर्मचारी प्रशिक्षण यावरील खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाने योजना सुरू झाल्यावर पाच वर्षे करायची होती.

केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनाला इंधन खर्चासाठी रु. १.४५ कोटी आगाऊ मुक्त केले (डिसेंबर २००९), जे मार्च २०१० पर्यंत खर्च करायचे होते. गस्त घातलेले एकूण तास, गस्त ज्या क्षेत्रात घातली गेली त्याचा तारखेसह तपशिल, एकूण मैल अंतर, जप्ती/अटक इत्यादी तपशिलासह उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच केंद्र शासनाकडून पुढील महिन्यांसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार होते. महाराष्ट्र शासनाने रु. १.४५ कोटी रक्कमेसाठीची UC सादर केली नव्हती असे लेखापरिक्षणात आढळून आले. तसेच, २००९-१४ या कालावधीत इंधन (७.१६ कोटी) आणि नौकांची दुरुस्ती व देखभाल (रु. ६०.७०लाख) यावर करण्यात आलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली नव्हती.

केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती प्राप्त करण्यासाठी माहिती एकत्रित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे शासनाने सांगितले.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदरील परिच्छेदातील मुद्दा हा केंद्र शासनाने राज्य शासनास दिलेल्या २८ स्पीड बोटींच्या तेल व वंगणावरील खर्चाबाबत आहे.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून दिनांक ०५.०६.२०१५ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने राज्य शासनास दिलेल्या २८ वेगवान बोटीसाठी सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत इंधन व वंगणावर केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रू ६,५०,०६,२३८/- इतक्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची परतफेड करण्याबाबातचा प्रस्ताव उपयोगिता प्रमाणपत्रासह दिनांक १३.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे.

तसेच, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून दिनांक १५.०९.२०१५ व दिनांक ०१.०२.२०१६ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने राज्य शासनास दिलेल्या २४ वेगवान बोटीसाठी सन २०१४-१५ या कालावधीत इंधन व वंगणावर केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. १,९४,३४,४३ आणि सन २०१५-१६ च्या एप्रिल-२०१५ ते जून-२०१५ या तिमाहीसाठी झालेल्या रु. ४१,०२,६३७ इतक्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची परतफेड करण्याबाबातचा प्रस्ताव उपयोगिता प्रमाणपत्रासह दिनांक १४.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे.

केंद्र शासनाकडून खरेदी करण्यात आलेल्या गोवा शिपयार्ड कंपनीच्या २८ वेगवान बोटींच्या वार्षिक देखभाल व दुरूस्तीचा करार परस्पर गोवा शिपयार्ड कंपनी समवेत केलेला आहे. बोटींच्या दुरूस्ती व देखभालीकरीता करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच यापुढे वेळोवेळी खर्चाच्या प्रतिपूर्तीचे नियतकालिक प्रस्ताव उपयोगिता प्रमाणपत्रासह केंद्र शासनास सादर करण्याबात दखल घेण्यात आली आहे.

पायाभूत सुविधांच्या उभारणीत विलंब

महाराष्ट्र शासनाने सागरी तट रक्षण आराखड्यामध्ये सागरी तट रक्षणासाठी CPS, जेटी, तपासणी नाके इत्यादी बांधकाम करून पर्याप्त प्रमाणात पायाभूत सुविधा उभारण्याचे निर्धारित केलेले उदिष्ट तीन ते नऊ वर्षानंतरही साध्य झाले नव्हते. जे खाली विषद केले आहे.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

परिच्छेदनिहाय शेरे खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

सागरी तट पोलीस स्थानकांच्या बांधकामात विलंब

राज्यात या योजनेची अमलबजावणी होण्यापूर्वी २५ CPS होती. केंद्र शासनाने या योजनेखाली टप्पा I व II अंतर्गत एकुण रु. ६.३२ कोटी खर्चाच्या १९ CPS ना मान्यता दिली. टप्पा I अंतर्गत १२ CPS च्या बांधकामावर नोव्हेंबर २०१४ पर्यंत झालेला विलंब व अतिरिक्त खर्च यांची स्थिती तक्ता ३.२.३. मध्ये दिली आहे.

अ.क्र.	CPS चे नाव	कार्यादेशानुसार काम पूर्ण करण्यासाठी निर्धारित केलेली तारीख	प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक	विलंब महिन्याध्ये	प्रत्यक्ष झालेला खर्च	अतिरिक्त खर्च
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७०
१.	दिघी /रायगड	नोव्हेबर-२०११	मार्च-२०१२	०५	४०९६.	१६२६.
२.	मांडवा/रायगड	डिसेंबर-२०११	डिसेंबर-२०१२	१३	७१२१.	४६५१.
३.	नाटे/रत्नागिरी	जुलै-२०१०	ऑगस्ट-२०११	१३	५११८.	२६४८.
४.	जयगड/रत्नागिरी	फेब्रुवारी-२०१०	जुलै-२०११	१८	५१५६.	२६८६.
५.	विजयदुर्ग/सिंधुदुर्ग	एप्रिल-२०१२	एप्रिल-२०१३	१३	४५७०.	२५००.
६.	निवती/ सिंधुदुर्ग	सप्टेंबर-२०११	मे-२०१३	२१	५९५०.	३४८०.
७.	बाणकोट/रत्नागिरी	जुलै-२००८	ऑगस्ट-२०११	३५	४९७०.	२५००.
८.	सातपाटी/ठाणे	जून-२००८	जून-२०१२	४८	४६१८.	२१४८.
				एकूण	**४१९९९.**	**२२२३९.**
९.	अचरा/सिंधूदुर्ग	सप्टेंबर-२०११	काम सुरू	३८	४९७०.	२५००.
१०.	NRI/नवी मुंबई, ठाणे	डिसेंबर-२०१४	काम सुरू	शहर व औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडून विना मोबदला बांधकाम करण्यात येत आहे.		
११.	सागरी-I/बृहन्मुंबई	जमिनीची उपलब्धता नसल्यामुळे व महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसल्यामुळे काम सुरू झाले.				
१२.	नवी मुंबई/मोरा ठाणे					

स्त्रोतः गृह विभागाने सादर केलेली माहिती

वरील तक्ता ३.२.३ मधून असे दिसून येते की, १२ पैकी आठ CPS च्या बांधकामात पाच ते ४८ महिन्यांचा विलंब झाला होता व त्यावर रु. २.२२ कोटी (अ.क्र. १ते८) अतिरिक्त खर्च झाला होता. उर्वरित चार CPS पैकी, दोन CPS चे बांधकाम प्रगतीपथावर होते (अ.क्र.९ व १०) आणि दोन CPS चे (अ.क्र. ११ व १२) बांधकाम नोव्हेंबर २०१४ पर्यंत सुरू झाले नव्हते. बांधकाम पूर्ण न झालेल्या एका CPS वर आधीच रु. २५ लाख अतिरिक्त खर्च नोंदवला गेला आहे. (अ.क्र.९)

टप्पा-II मधील सात CPS पैकी, चार CPS करिता वास्तूविशारद व आरेखक नियुक्त करण्यात आलेले आहेत; स्थानातील बदलामुळे दोन CPS ना नोव्हेंबर २०१४ मध्ये उशिराने प्रशासकीय मंजूऱ्या देण्यात आल्या आहेत व सागरी तट नियामक मंजुरी प्राप्त न झाल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडून एका CPS चा प्रस्ताव प्रलंबित होता.

शासनाने असे नमूद केले आहे की, संबंधित जिल्हाधिकारी तसेच मीठ आयुक्त यांच्याबरोब वारंवार पाठपुरावा करूनही CPS बांधण्यासाठी निर्धारित केलेल्या जमिनी पोलीस विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्या नव्हत्या. परिणामी, CPS चे बांधकाम वेळेत पूर्ण होवू शकले नाही व पर्यायाने बांधकाम खर्चात वाढ झाली.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सागरी सुरक्षा योजना फेज-१ व फेज-२ अंतर्गत पोलीस ठाण्यांच्या बांधकामांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

फेज-I

(१) आचरा सागरी पोलीस ठाणे, सिंधुदुर्ग :— दिनांक १ डिसेंबर २००९ पासून तात्पुरत्या स्वरूपात नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या पोलीस चौकीत स्थानांतरित करण्यात आलेले आहे.

सदर पोलीस स्टेशनच्या तळमजल्याचे काम झालेले आहे. विद्युत व नळ जोडणी करण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित बांधकाम पूर्ण करण्यात येत आहे.

(२) एनआरआय सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई :— या सदर पोलीस स्टेशनचे बांधकाम पूर्ण झाले असून दिनांक २४. सप्टेंबर २०१५ पासून सदर पोलीस ठाणे नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

(३) मुंबई सागरी पोलीस ठाणे, मुंबई शहर :—

माहीम रेतीबंदर येथील सर्व्हे क्र.२१२५ जागा निवडण्यात आली आहे व ती पोलीस विभागाच्या ताब्यात आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांनी वास्तुविशारद तथा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक केली आहे. द्वितीय निविदा सुचनेनुसार किमान ३ निविदा प्राप्त न झाल्याने तृतीय निविदा सूचना देण्यात येत आहे.

(४) मोरा सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई :— या पोलीस ठाण्याकरिता १३ गुंठे जागा ताब्यात आहे. दिनांक २३ नोव्हेंबर २०१५ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उरण विभाग यांनी मुख्य वस्तुविशारद, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडे साक्षांकित नकाशे व आराखडयास मान्यता मिळण्याकरिता प्रस्ताव पाठविला आहे. त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

फेज-II

(१-३) पालघर जिल्ह्यातील अर्नाळा, केळवा व रत्नागिरीतील दाभोळ सागरी पोलीस ठाणे :— महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून केळवा, अर्नाळा व दाभोळ पोलीस ठाणे बांधकामाच्या प्रकल्पाकरिता दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरचे बांधकाम ३० डिसेंबर २०१६ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) ठाणे ग्रामीण मधील उत्तन पोलीस स्टेशन :— उत्तन, जिल्हा ठाणे या पोलीस स्टेशनकरिता जागा निश्चित करण्यात आली होती. परंतू सदर जागेवर बांधकाम करणे शक्य नसल्याचे दिसून आलेले आहे. यास्तव पर्यायी जागा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) दादर, रायगड जिल्हा :— सदरची जागा हरितवर्ग प्रकारात मोडत असल्याने वर्ग १ मध्ये वर्गीकृत होणे आवश्यक आहे. नैना (New Mumbai influnced notified Area) चे ना हरकत प्रमाणपत्र दिनांक १६ नोव्हेंबर २०१५ ला प्राप्त झाले आहे. जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत नगरविकास विभागाकडे, प्रस्ताव पाठविला आहे.

(६) पुर्णगड, रत्नागिरी जिल्हा :— या पोलीस स्टेशन करिता सद्य: स्थितीत असलेली १२ गुंठे जमीन अपुरी असून बांधकामास योग्य नाही यास्तव मीठ आयुक्त, जयपुर यांना दुसरी ४० गुंठे जागा वितरीत करण्याची मागणी केलेली आहे. याबाबत केंद्रसरकारकडे प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे.

(७) मुंबई सागरी, मुंबई शहर :-

(अ) एरंगल गाव, मालवणी येथील जागा वितरीत होण्याकरिता दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ रोजी भूमापन कार्यालय, गोरेगांव यांनी जागेची मोजणी केली असून याबाबतचा प्रस्ताव मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांनी दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे पाठविलेला आहे.

तपासणी नाक्यांच्या बांधकामास विलंब

सागरी तटीय क्षेत्रामध्ये व क्षेत्रामधून मनुष्य व सामानाच्या होणाऱ्या वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी तपासणी नाके बांधले जातात टप्पा १ अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या ३२ तपासणी नाक्यांपैकी २६ तपासणी नाक्यांची बांधकामे निर्धारीत वेळेत, मंजूर रुपये ५२ लाख खर्चाऐवजी ६७.९० लाख खर्चात पूर्ण झाले आहे. उर्वरीत ६ तपासणी नाक्यांपैकी नोव्हेंबर, २०१४ रोजी पाच नाक्यांचे काम, जमिनीच्या अनुपलब्धतेमुळे (तीन तपासणी नाके) महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मंजुरीसाठी सुधारीत प्रस्ताव मागविल्यामुळे (एक तपासणी नाका) महाराष्ट्र सागरी तटीय व्यवस्थापन प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे (एक तपासणी नाका) अपूर्ण होते, सहावा तपासणी नाका जरी रुपये ७.९८ लाख खर्च करून जून, २०१२ मध्ये बांधण्यात आला होता. तरी पाणी व वीज यासारख्या प्राथमिक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्याचा वापर करण्यात येत नव्हता. त्याचवेळी केंद्र शासनाने प्रत्येक नाक्यासाठी रुपये दोन लाख एवढा बांधकाम खर्च मंजूर केला असूनही २ तपासणी नाक्यावर डिसेंबर, २०१४ पर्यंत अनुक्रमे २२.७० लाख व ३२.३५ लाख एवढा वाढीव खर्च झाला होता.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

तपासणी नाक्यांच्या खर्चात वाढ होण्याचे प्रमुख कारण म्हणजे जागेचे वितरण होण्यास व आवश्यक असलेली ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त होण्यास झालेला विलंब हे आहे. ज्याचा परिणाम साहीत्य व विविध सेवा इत्यादीवरील खर्चावर होऊन निर्धारीत खर्चात वाढ झाली.

फेज-१ मधील तपासणी नाक्याच्या बांधकामाची सद्यःस्थिती

(१) कोळसा बंदर सागरी पोलीस चौकी :— या तपासणी नाक्याचे बांधकाम पूर्ण झाले असून ते प्राथमिक सुविधांसह वापरण्यात येत आहे.

(२) उतन डोंगरी :— या तपासणी नाक्याकरुता डोंगरी गाव, ता. भाईंदर ही जागा निवडण्यात आलेली आहे. सदर जागा मीठ आुयक्त यांच्या मालकीची असल्याने जागा मिळणेकरिता मीठ आयुक्त यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. मीठ आयुक्त, जयपूर यांनी सदरच्या प्रस्तावास अनुसूरन वाणिज्य व उद्योग मंत्रालय, उद्योगभवन,नवी दिल्ली यांना नमूद जागा पोलीस विभागाच्या नावे वर्ग करण्याबाबत विनंती केली आहे.

(३) गीतानगर :— सागरी पोलीस चौकी टॉवरसह बांधण्यासाठी रू ११.०४ लक्ष इतक्या खर्चाच्या अंदाज पत्रकास शासन निर्णय ०८ मार्च २०१० आणि १५ मार्च २०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. दि ६ फेब्रुवारी २०१५ रोजी MCZMA यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारीत अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्यास कळविले आहे.

(४) मढ आयलंड :— तपासणी नाक्याकरिता किल्लेश्वर मंदीराजवळ व तळपसा जेटीच्य पाठीमागे सर्व्हे न.७४ नवीन CTS नं. १२६८ ही जागा निवडण्यात आली आहे. सदर जागा पोलीस विभागास मिळणेकरिता मुंबई पोलीसांकडून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर जागेस रस्ता नसल्याने तेथे तपासणी नाक्याचे बांधकाम करणे योग्य होणार नसल्याचे निदर्शनास आल्याने त्यास अनुसरून पोलीस विभागाने, सदर जागेच्या लगत असलेल्या न.भू.क्र १२०३ मधून रस्त्याचे नियोजन करणे शक्य असल्याने त्यातील १००० चौ.मी. जागा मोजणी करून पोलीस विभागाच्या ताब्यात देणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे सादर केला आहे.

(५) सांताक्रुझ :— जूहू येथील सीटी सर्व्हे क्र. १२१३ ही जागा निवडण्यात आली असून भूमापन कार्यालय, मुंबई यांच्याकडून सदर जागेची मिळकतपत्रिका शासनाच्या नावे काढली असून सदर जागा पोलीस विभागाच्या नावे तातडीने करून देणेकरिता दि ३ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०४ नोव्हेंबर २०१५ रोजी सदर जागा पोलीस विभागास देण्याबाबत महसूल व वन विभाग, यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) ससून डॉक :— पूर्वी निवडण्यात आलेली न्यू ससून डॉक येथील जागा भूमापन क्र.५/६०० चा प्रस्ताव कृषी मंत्रालय, भारत सरकार यांनी नाकरला. यास्तव मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या मालकीची ससून डॉक, कुलाबा येथील CTS क्र ६७ मधील १०० चौ.मी. ही दुसरी जागा निवडली आहे व पाठपुरावा सुरू आहे.

स्वतंत्र जेटी उपलब्ध नसणे

जेटी हा एक असा थांबा किंवा धक्का असतो जेथे नौका थांबविल्या / ठेवल्या जातात. सागरी तट पोलिसांकडे पाचपैकी एकाही जिल्ह्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या जेटी नाहीत. परिणामी, गस्ती नौका या महाराष्ट्र सागरी मंडळ (MMB) किंवा खाजगी चालकांच्या मालकांच्या जेटीमध्ये थांबविल्या जातात. अशाप्रकारे, अशा सामाईक जेटीचा वापर करत असताना पोलिसांच्या हालचालींविषयी गोपनियता राखली न जाणे व तिचा पुढे गैरवापर होण्याचा धोका होता.

तसेच, सागरी तट पोलिसांना निव्वळ त्यांच्या वापरासाठी हक्काच्या जेटी उपलब्ध करून दिल्या गेल्या नव्हत्या, त्याचवेळी MMB च्या मालकीच्या जेटीमध्ये कार्यकारी कक्ष बांधण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाला उशिराने म्हणजे ऑक्टोबर, २०१३ मध्ये सादर करण्यात आला होता, ज्याला केंद्र शासनाने मार्च २०१४ मध्ये रु. २.१५ कोटी खर्चासह मंजुरी दिली. परंतू डिसेंबर, २०१४ पर्यंत कार्यकारी कक्षांच्या बांधकामास सुरूवातही झालेली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

पोलीसांचे वेगवान नौका बहुत करून महाराष्ट्र सागरी मंडळ (MMB) महाराष्ट्र शासन यांचे मालकीच्या व देखरेखीखाली असलेल्या जेट्टीचा वापर बोटी नांगरून ठेवण्याकरिता करण्यात येतो. तसेच महाराष्ट्र शासनाचे मालकीच्या जेट्टींचा वापर सागरी पोलीसांकडून केला जात असून त्यावर पुर्ण वेळ सुरक्षा पुरविण्यात येते. त्यामुळे गोपनीयतेचा भंग होण्याचा प्रश्नच नाही.

तीन नवीन जेट्टीचे बांधकामाकरिता मंजूर करण्यात आलेला निधी अपुरा असल्याने व जेट्टींकरीता योग्य उचित जागा सहजतेने उपलब्ध होणे शक्य नव्हती. त्यामुळे नवीन जेट्टींचे बांधकामाऐवजी भारत सरकारकडून महाराष्ट्र सागरी मंडळाचे सागरी पोलीस बोटी नांगरून ठेवण्याकरीता व चढ उतार करण्याकरीता वापरत असलेल्या १४ जेट्टींवर सागरी पोलिसांकरिता कार्यकारी कक्ष उभारण्याची परवानगी प्राप्त करण्यात आली. भारत सरकारकडून मान्यता प्राप्त झालेनंतर रू २.०९ कोटी निधी महाराष्ट्र सागरी मंडळास १४ कार्यकारी बांधकामाकरीता वर्ग करण्यात आला आहे.

सदर १४ कार्यकारी कक्षांचे बांधकाम महाराष्ट्र सागरी मंडळाकडून सुरू करण्यात आले आहे व त्यापैकी तीन कार्यकारी कक्षांचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. पाच ठिकाणांवरील बांधकाम प्रगती पथावर आहे व सहा ठिकाणांवर जागेच्या परिस्थितीचे कारणास्तव अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र सागरी मंडळाकडून लवकरच जागे संदर्भातील प्रश्न सोडविण्यात येऊन उर्वरित सर्व ठिकाणांवर बांधकाम सुरू करण्यात येईल.

राज्य गुप्तवार्ता विभागाकडून महाराष्ट्राचे सागरी सुरक्षेविषयक समन्वय विभाग या नात्याने सदर बाबीचे अंमलबजावणीकरिता पाठपुरावा सुरू आहे.

सागरी तट पोलिसांचे कामकाज

सागरी तट पोलिसांचे कामकाज कार्यक्षमतेने होण्यात, पर्याप्त संख्येत व प्रशिक्षित कर्मचा-यांची नेमणूक, गस्ती नौका आणि सामग्रीची उपलब्धता या बाबींची महत्त्वपूर्ण भूमिका असते. लेखापरिक्षणामध्ये कर्मचा-यांची कमतरता, तंत्रज्ञेतर कर्मचा-यांना अपर्याप्त प्रशिक्षण आणि सामग्रीची स्थापना न करणे/ कमी पुरवठा होणे या बाबी आढळून आल्या.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

तंत्रज्ञेतर कर्मचाऱ्यांची कमतरता संबंधित सागरी घटक प्रमुख यांचे अधिनस्त सागरी पोलीस ठाण्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांचा वापर करून पो.ठाणे हद्दीत उद्भवलेल्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्याकरिता वापर करण्यात येऊन भरून काढण्यात येते.

दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ रोजी गोवा शिपयार्ड कंपनीने ५ टनाचे २२ बोटींवर इको साऊंडर GPS चा पुरवठा करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. तो केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.

सदर बोटींवर काम करणाऱ्या मनुष्यबळासाठी आवश्यक असणाऱ्या साधन सामग्रीची खरेदी प्रक्रिया चालू आहे.

कर्मचाऱ्यांची कमतरता

तक्ता : मंजूर कर्मचारी संख्या, नियुक्त कर्मचारी आणि रिक्त पदे यांची नोव्हेंबर २०१४ ची स्थिती तक्ता ३.२.४ मध्ये दिली आहे.

जिल्हा	तांत्रिक पदे			तंत्रज्ञेतर पदे			एकूण पदे		
	मंजूर	भरलेली	तूटीची टक्केवारी	मंजूर	भरलेली	तूटीची टक्केवारी	मंजूर	भरलेली	तूटीची टक्केवारी
रत्नागिरी	८८	५४	३८.६४	४५७	३७४	१८.१६	५४५	४२८	२१.४७
बृहन्मुंबई	४६४	१९६	५७.७६	१४५१	४९४	६५.९५	१९१५	६९०	६३.९७
रायगड	१०२	५१	५०.००	३५६	३१९	१०.३९	४५८	३७०	१९.२१
सिंधूदूर्ग	६९	४४	३६.२३	२३०	३०४	निरंक	२९९	३४८	निरंक
ठाणे	१८७	९९	४७.०५	८९४	६४३	२८.०८	१०८१	७४२	३१.३६
एकूण	**९१०**	**४४४**	**५१.२१**	**३३८८**	**२१३४**	**३७.०१**	**४२९८**	**२५७८**	**४०.०२**

स्त्रोत: महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने सादर केलेली माहिती

नौकायानासाठी तंत्रज्ञांच्या तैनातीत ५१.२१ टक्के तूट होती. तसेच तंत्रज्ञेतर कर्मचाऱ्यांच्या तैनातीत ३७.०१ टक्के तूट होती. बृहन्मुंबईमध्ये तंत्रज्ञेतर कर्मचाऱ्यांच्या संख्येतील तूट ६५.९५ टक्के म्हणजेच सर्वाधिक होती.

पाच सागरी तटीय जिल्ह्यांमध्ये १५४ तंत्रज्ञांची नेमणूक करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने घेतला (ऑक्टोबर २००९). परंतु,पर्याप्त संख्येत पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे फेब्रुवारी २०११ ते डिसेंबर २०११ या कालावधीत फक्त १० कुशल/ गुणवत्ताधारक व्यक्तींची नेमणूक होऊ शकली. महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी पात्रता निकषांमध्ये सवलत देऊन उर्वरीत पदे कंत्राटी तत्त्वावर भरण्यास परवानगी दिली (ऑक्टोबर २०११). त्यानुसार, २०१२-१३ ते २०१३-१४ दरम्यान ११६ तंत्रज्ञांची कंत्राट तत्त्वावर नेमणूक करण्यात आली. फेब्रुवारी व एप्रिल २०१३ मध्ये विशेष महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे यांनी पात्रता निकषांमध्ये सवलत देणारे सुधारीत सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र शासनाला मंजूरीसाठी सादर केले, ज्यावर नोव्हेंबर २०१४ पर्यंत महाराष्ट्र शासनाने निर्णय दिला नव्हता. सेवाप्रवेश नियम निश्चित करण्यात विलंब झाल्यामुळे गृह विभागाकडून अजूनही कंत्राट तत्त्वावर तंत्रज्ञांची तात्पुरती नेमणूक केली जात आहे. इतक्या संवेदनक्षम कामासाठी कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी नियुक्त करणे किती संयुक्तिक आहे या विषयी शासनाने पुनर्विचार करावा कारण त्यात काही अंतर्भूत धोके संभवतात.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिले स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडून शासनास सादर करण्यात आलेले सागरी सुरक्षेकरिता आवश्यक पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन ड्रायव्हर) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर्स) या पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्यात आले असून पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक या पदांचे सेवाप्रवेश नियम मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहेत.

गृह विभाग, दिनांक १५ डिसेंबर २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार १८६ तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे (९८ पदे यापूर्वी कार्यरत कंत्राटी मनुष्यबळामधून व ८८ पदे नव्याने विहित पद्धतीचा अवलंब करून भरती घेवून) ११ महिन्याचे करारावर कंत्राटी पद्धतीने भरावयास परवानगी दिली आहे. त्यानुषंगाने एकूण १२७ तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आली आहेत. तसेच, उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबतही कार्यवाही करण्यात येत आहे.

सागरी पोलीस घटक प्रमुखांकडून कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांची त्याचे नियुक्तीनंतर चारित्र्य पडताळणी करण्यात येते. सागरी गस्तीच्या वेळी बोटीवर ५-६ तांत्रिक तसेच कार्यकारी मनुष्यबळ उपस्थित असते. मागील तीन वर्षांपासून पोलीस बोट चालविण्याकरिता कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ नेमण्यात येत आहे. परंतु अद्याप सदर स्टाफबाबत काहीही आक्षेपार्ह अथवा संशयास्पद आढळून आलेले नाही.

संबंधित सागरी घटक पालीस प्रमुखांकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करून तंत्रज्ञेतर मनुष्यबळाची तूट भरून काढण्यात येते.

प्रशिक्षणाची अपर्याप्तता

सागरी तटीय पोलीस स्थानकांमध्ये तैनात केलेल्या २,१३४ कर्मचाऱ्यांपैकी फक्त ९१६ कर्मचाऱ्यांना (४३ टक्के) नोव्हेंबर २०१४ पर्यंत तटरक्षक दलाकडून सागरी व्यवहारांच्या बाबतीत प्रशिक्षित केले गेले होते. तसेच, सागरीतटीय पोलीस स्थानकांमध्ये नियुक्त केलेल्या एकुण २,१३४ तंत्रज्ञेतर कर्मचाऱ्यांपैकी १२२५ (५७ टक्के) कर्मचा-यांना पोहता येत नव्हते.

शासनाने सांगितले की, सागरी तट सुरक्षेसाठी तैनात केलेल्या कर्मचा-यांना पोहता येणे अनिर्वाय करणारे एक परिपत्रक नोव्हेंबर-२०१४ मध्ये जारी करण्यात आले आहे .

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

तटरक्षक दलाकडून तिमाही मध्ये सागरी पोलीस ठाण्यांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. सागरी पोलीस ठाण्यांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. सागरी पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस कर्मचारी हे मूळ/कायम सागरी पोलीस नसतात. त्यांची नियमित सागरी पोलीस ठाण्याचा कालावधी पूर्ण होताच बदली होते. त्यामुळे सागरी पोलीस ठाण्यास नवीन येणाऱ्यांची प्रक्रिया चालूच राहते आणि नवीन आलेल्यांना सागरी प्रशिक्षण दयावे लागते.याद्वारे प्रशिक्षण न केलेल्यांची कमतरता सतत आढळून येते. जी की सतत चालू राहणारी प्रशिक्षण प्रक्रिया आहे.

आजमितीस २६२३ पैकी १५७४ सागरी पोलिसांना ६० बॅचेसमध्ये तटरक्षक दल मुख्यालय, मुंबई यांचेकडून प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

सागरी पोलीस ठाण्यास शक्यतो पोहण्याचे ज्ञान असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येते. तसेच सागरी पोलीस ठाण्याचे कर्मचाऱ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम सतत संबंधित सागरी घटक प्रमखांकडून चालू आहे. अद्यापपर्यंत सागरी पोलीस ठाण्यांचे एकूण १४३३ पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

परिपत्रकाच्या अगोदर पासून पोहण्याचे प्रशिक्षण संबंधितांना देण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्व सागरी घटक प्रमुखांकडून सातत्याने पोहण्याचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. सध्या ५७% हून अधिक सागरी पोलीस कर्मचाऱ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

तसेच परिपत्रकानुसार शक्यतो पोहण्याचे कौशल्य असणाऱ्या कर्मचाऱ्यासच सागरी पोलीस ठाण्यांमध्ये नियुक्त करण्यात येते.

सामग्री न बसविणे/कमी प्रमाणात प्राप्त होणे

एखादया वेळी नौका समुद्रात कोणत्या ठिकाणी आहेत व त्यांच्या प्रवासाचा मार्ग समजण्यासाठी नौकांवरील कर्मचाऱ्यांना जागतिक स्थितीदर्शक यंत्रणेची (GPS) मदत होते. एकूण ६९ कार्यकारी नौकांपैकी ३४ नौकांवर GPS बसविण्यात आले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. त्याचप्रमाणे, पाच सागरी तटीय जिल्ह्यांमध्ये एकूण ४२६ बूलेटप्रूफ जॅकेटस्ची आवश्यकता असताना गृह विभागाने क्S ना फक्त १७० जॅकेटस पुरविली होती.

शासनाने असे सांगितले की, केंद्र शासनाने गोवा नौनिर्मिती स्थानातून (Shipyard) पुरविलेल्या २२ नौकांवर GPS बसविण्यासाठी सप्टेंबर २०१२ मध्ये केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता, जो प्रलंबित होता.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

कार्यरत असलेल्या ६९ बोटींपैकी, ३५ बोटींवर GPS यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. (मरीन फ्रंटीअर्स कंपनीच्या २९ व गोवा शिपयार्ड कंपनीच्या १२ टनाचे ०६ वेगवान बोटींवर). उर्वरीत ३४ बोटींवर सदर यंत्रणा बसविण्यात आलेली नाही. (गोवा शिपयार्ड कंपनीच्या पाच टनी २२ बोटींवर व १२ जुन्या फायबर बोटींवर.)

गोवा शिपयार्ड कंपनीच्या पाच टनी २२ बोटींवर GPS यंत्रणा बसविण्याकरिता आवश्यक त्या अंदाजपत्रकासह दिनांक १७.०९.२०१२ रोजी केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच, त्याबाबत गोवा शिपयार्ड कंपनीकडून सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असून अद्याप सदर प्रस्ताव भारत सरकारकडे प्रलंबित आहे.

सदर बोटींवर काम करणाऱ्या मुनष्यबळासाठी आवश्यक साधनसामुग्रीची खरेदी प्रक्रिया चालू आहे.

कार्यकारी व्यवहार /कामकाज

ढोबळपणे सर्वच गस्ती नौकांचा कमी प्रमाणात वापर करण्यात येत होता व त्यांची पर्याप्त प्रमाणात देखभालही करण्यात येत नव्हती. सागरीतटीय पोलिसांनी इतर सेवा/एजन्सीज बरोबर संयुक्तरित्या गस्त फेऱ्या घेतल्या नव्हत्या ज्यावरुन सागरी किनाऱ्यावरील गस्तीमध्ये गंभीर कमतरता असल्याचे दिसून येते. या बाबीवर खालील चर्चा करण्यात आलेली आहे. :-

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

परिच्छेदातील मुद्यांबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

इष्टतम संख्येने गस्ती न घालणे

सागरी तट सुरक्षा योजना लागू होण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाकडे १५ नौका उपलब्ध होत्या. त्यानंतर टप्पा १ अंतर्गत जून २००९ ते सप्टेंबर २०१० दरम्यान २८ नौका खरेदी करण्यात आल्या. त्या व्यतिरिक्त मे २००९ ते फेब्रुवारी २०१२ दरम्यान महाराष्ट्र शासनाने स्वतःच्या स्त्रोतांमधून २९ वेगवान नौका आणि चार सी लेग्स ॲम्फीबिअन्स सागरी नौका खरेदी केल्या. महाराष्ट्र शासनाकडे २००९-१४ दरम्यान एकंदर ७६ गस्ती नौका होत्या.

नौकांचा पुरेपूर वापर होण्यासाठी केंद्र शासनाने त्यांच्या वार्षिक गस्तींची प्रमाणके विनिर्दीष्ट करण्यासाठी मार्गदर्शक सूचना (सप्टेंबर २००९) जारी केल्या. मार्गदर्शक सूचनांनूसार, सागरी तट पोलिसांनी प्रत्येक नौका प्रत्येक महिन्यात किमान १२० तास व प्रत्येक वर्षी किमान १४०० तास वापरावयाची होती. प्रमाणित केलेल्या गस्ती तासांच्या संख्येत सुधारणा करून ते प्रत्येक महिन्यात किमान १५० तास व प्रत्येक वर्षी किमान १८०० तास इतके वाढविण्यात आले (ऑक्टोंबर २०१०) वार्षिक गस्ती तासांव्यतिरिक्त विशेष कार्यवाही / सराव / प्रशिक्षण याकरिता प्रत्येक वर्षी ४० अधिक तास, वापरावयाचे होते.

लेखापरीक्षण तपासणीत असे आढळून आले की, प्रत्येक वर्षी किमान १,४००/१,८०० तास निर्धारित केलेले असूनही २००९-१४ या कालावधीतील प्रमाणित ४,९१,५२० तासांच्या ऐवजी ७६ नौकांनी फक्त ९०,८१२ तास (१८.४८ टक्के) गस्त घातली होती. २००९-१० मध्ये नौकांचा सरासरी वापर २९.४० टक्के होता. जो कमी होऊन २०१३-१४ मध्ये १७.१२ टक्के झाला होता. नौकांच्या वापराविषयीच्या तपशिलाचे विश्लेषण करता पुढे असेही आढळून आले की, वर्ष २००९-१४ दरम्यान ५० बोटींचा फक्त २० टक्के वापर करण्यात आला होता, जे आलेख १ मध्ये दर्शविले आहे.

आलेख १ : नौकांची उपयोगिता टक्केवारी.

नौकांच्या वापराविषयीच्या माहितीच्या जिल्हानिहाय विश्लेषणात असे आढळून आले की, २००९-१४ दरम्यान सरासरी वापर ८.४७ टक्के (रत्नागिरी) ते २५.५० टक्के (बृहन्मुंबई) या दरम्यान होता. जे आलेख २ मध्ये दर्शविले आहे.

आलेख २ : नौकांची जिल्हानिहाय उपयोगिता.

तसेच सुधारात्मक उपाययोजनेसाठी वेगवेगळया कारणांमुळे कमी प्रमाणात झालेल्या गस्तींविषयी जिल्ह्यांकडून नियतकालिक अहवाल प्राप्त करण्यासाठी गृह विभागाने कोणतीही व्यवस्थापन सूचना प्रणाली विहीत केली नव्हती. याआधी परिच्छेद ३.२.६.१ मध्ये विषद केल्याप्रमाणे मनुष्यबळाची कमतरता व खाली विषद केल्याप्रमाणे नौकांच्या दुरुस्ती व देखभाल करण्यातील विलंब, ही नौकांचा वापर न होण्याची मुख्य कारणे होती.

शासनाने असे सांगितले की, केंद्र शासनाच्या सप्टेंबर २००९ च्या पत्रात देण्यात आलेली प्रमाणके ही प्रत्येक नौकेने गस्त घालावयाच्या तासांशी संबधित नसून इंधन खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी नौका चालविण्यासाठी आवश्यक असणा-या POL वरील खर्चाचा परिणाम निश्चित करण्याशी संबधित आहेत. शासनाने पुढे असेही सांगितले की, अंदाजे २५० ते २७० दिवसांचा खंडीत कालावधी (पावसाळयात ज्या १५० दिवशी गस्त घातली नव्हती त्या दिवसांसह) विचारात घेता वर्षभरात प्रत्येक नौकेला गस्तीसाठी सरासरी ९५ ते ११५ दिवस उपलब्ध होते.

हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण (अ) सागरी तट रक्षणाचे मुख्य उद्दीष्ट साध्य करण्यासाठी इतर संस्थांबरोबर योग्य समन्वय ठेवून नौकांचा पुरेपूर प्रमाणात वापर होण्यासाठी केंद्र शासनाने नौकांसाठी अशाप्रकारे वार्षिक गस्त कालावधी विहीत केला होता आणि (ब) पावसाळा व नादुरुस्तीमुळे वाया गेलेले २५० ते २७० दिवस विचारात घेता शासनाने मान्य केल्याप्रमाणे गस्तीसाठी फक्त २९ टक्के कालावधी राहतो जो अत्यल्प आहे व सागरी तटरक्षणातील गंभीर तूट / कमतरता दर्शवितो.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

दररोज २४ तास सागरी गस्त करण्यात येते. ती सातत्याने किंवा तासांवर करण्यात येत नसून सुरक्षा परिस्थितीनुसार करण्यात येते. सागरी पोलीसांचे सहज सुलभ अस्तित्व /उपस्थिती लक्षात येण्याकरिता आजूबाजूच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याकरिता गस्त ही अत्यंत सुलभतेणे होणे गरजेचे आहे. गस्ती दरम्यान ठराविक वेळ बोट थांबवून बोटींची कागदपत्र तपासणी देखील करण्यात येते.

पावसाळ्यामध्ये समुद्र अत्यंत खवळलेला असतो व पोलीस बोटींची खवळलेल्या समुद्रात सागरी गस्त करण्याची तेवढी क्षमता नाही. त्यामुळे हवामान खात्याचा अहवाल व समुद्राची स्थिती लक्षात घेवूनच पोलीस बोटी व त्यावरील स्टाफ यांच्या सुरक्षिततेचा विचार करूनच मुंबई व आजूबाजूचे परिसरातच सागरी गस्त करण्यात येते. पावसाळ्यामध्ये सागरी किनाऱ्याचे सुरक्षिततेकरिता व अनधिकृत / अनावश्यक व्यक्तींचे सागरी किनाऱ्यालगतच्या हालचालींवर प्रतिबंध घालण्यासाठी संबंधित सागरी घटक प्रमुखांकडून सागरी किनाऱ्यालगत पायी व वाहनाद्वारे करण्यात येणाऱ्या गस्तीत वाढ करण्यात येते.

सर्व बोटींद्वारे गस्त अपेक्षित नाही. काही बोटी विशेष सुरक्षेच्या कारणास्तव अचानक उद्‌भवू शकणाऱ्या सुरक्षा वेळोवेळी उभ्या करून ठेवण्यात येतात. काही बोटी कालबद्ध / नियमित देखभाल/ दुरूस्तीकरिता व तपासणी करता ठेवल्या जातात.

तटरक्षक दल व सागरी पोलीस यांचेमध्ये चांगला समन्वय असतो. सागरी पोलीस, कस्टम व तटरक्षक दल यांचेद्वारे त्यांचे स्वतःचे बोटींची २४ तास पोकळी विरहित गस्त करण्यात येते. तटरक्षक दल व सागरी पोलीस यांचे गस्तीचा नियोजित कार्यक्रमाची देवाणघेवाण केली जाते व आवश्यकतेनुसार स्वरमार्गावरून स्वतंत्रपणे संपर्क साधण्यात येतो. अशा प्रकारचे समन्वयामुळे एकाच भागात पुन्हा होणारी गस्त टाळली जाते. सूचविल्याप्रमाणे पूर्वीपासूनच पोलीस गस्तीवर कडक निगराणी ठेवली जाते.

नौकांच्या दुरुस्ती व देखभालीतील विलंब

२६/११ च्या अतिरेकी हल्ल्याच्या घटनेनंतर, महाराष्ट्र शासनाने मे.सीलेग्स् इंटरनॅशनल लिमिटेड, न्यूझीलँड (पुरवठादार) यांच्याकडून रू.१.९४ कोटी किंमतीस चार सीलेग्स ॲम्फीबीअन्स सागरी नौका खरेदी केल्या (नोव्हेंबर २००९), ज्याचा हमी कालावधी एक वर्षांचा होता. सप्टेंबर २०१० मध्ये हमी कालावधी संपल्यावर, पुरवठादाराने नौकांची देखभाल करणे थांबविले. पुरवठादाराच्या भारतातील मध्यस्थाकडे रू.२५.४२ लाखाचा वार्षिक देखभाल करार (AMC) करण्याविषयी पोलिस आयुक्त, मुंबई यांनी गृह विभागाकडे जरी एक प्रस्ताव सादर केला होता (सप्टेंबर २०१०) तरी, गृह विभागाने त्यास उशिराने, नोव्हेंबर २०१३ मध्ये, मंजूरी दिली. परंतू परकीय चलनाच्या विनिमयाच्या दरात प्रचंड बदल झाल्यामुळे, परदेशातील मुळ पुरवठादाराकडून प्राप्त करावयाच्या सुटया भागांची किंमत वाढली आणि त्यामुळे मध्यस्थाने AMC करण्यास नकार दिला या दरम्यान सीलेग्सच्या दुरुस्तीसाठी भारतीय मध्यस्थाने सादर केलेले (फेब्रुवारी २०११) रू.२८.५० लाखाचे दरपत्रकही गृह विभागाने उशिरा जूलै २०१३ मध्ये मंजूर केले. परंतु तेव्हा परकीय चलनाच्या विनिमय दरात बदल होऊन किंमतीत वाढ झाल्यामुळे मध्यस्थाने दुरुस्तीचे काम हाती घेण्यास असमर्थता दर्शविली. सुट्या भागांची उपलब्धता नसणे व देखभाल सेवांचा अभाव यामुळे तीन सीलेग्सचा जानेवारी २०११ पासून आणि एका सीलेग्स मार्च २०११ पासून वापर बंद झाला. या नौकांचा खर्च आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखा नसल्याने या नौका मोडीत काढण्यासाठी पोलिस उपायुक्तांनी महाराष्ट्र शासनाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांकडे एक प्रस्ताव सादर केला (एप्रिल २०१४). परंतु, या प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली नव्हती (डिसेंबर २०१४).

शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने या प्रस्तावाविषयी काही शंका उपस्थित केल्या आहेत व त्या अनुषंगाने पोलिस उपायुक्तांकडून माहिती मागविण्यात आली आहे.

वेगवान नौकांच्या दुरुस्तीसाठी वेळेवर व योग्य कार्यवाही करण्यातील विलंबाविषयी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील (२००८-०९) परिच्छेद ३.४.३ मध्ये उल्लेख करण्यात आला होता. नौकांच्या दुरुस्तीतील विलंबासाठी जबाबदारी निश्चित करणे व दुरुस्तीसाठी मंजूरी प्राप्त करण्याच्या प्रक्रियमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी पोलिस विभागाला पर्याप्त प्रमाणात वित्तीय अधिकार देखिल देण्याविषयी राज्य लोक लेखा समितीने तिच्या १७ व्या अहवालात (२०१२-१३) शिफारस केली होती (फेब्रुवारी २०१४).

दोष तपासणी करण्यात व नौकांच्या पुरवठादारांकडून दुरुस्तीच्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर होण्यात अवाजवी विलंब, DGP/गृह विभागाकडून मंजूरी देण्यात होणारा विलंब इत्यादीमुळे २००९-१४ या कालावधीत २८ नौकांच्या (विद्यमान व नवीन बोटी एकत्रितपणे) दुरुस्तीसाठी चार ते ४६ महिन्यांचा कालावधी लागला होता असे ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये दस्तऐवजांच्या तपासणीत आढळून आले. DGP/गृह विभागाकडून दुरुस्तीच्या प्रस्तावांस मंजूरी आठ ते ३२ महिन्यापासून प्रलंबित असल्याने रत्नागिरी, बृहन्मुंबई रायगड आणि ठाणे जिल्ह्यात ऑक्टोबर २०१२ ते जुलै २०१३ पर्यंत १५ नौका नादुरुस्त अवस्थेत पडून होत्या.

शासनाने असे सांगितले की नौकांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी पोलिस विभागाला नोव्हेंबर २०१३ मध्ये पर्याप्त प्रमाणात वित्तीय अधिकार सोपविण्यात आले आहेत आणि तेव्हापासून कार्यरत नसलेल्या नौकांची टक्केवारी आणि त्याच्या दुरुस्ती व देखभालीसाठी लागणारा वेळ यात मोठया प्रमाणात घट झाली आहे.

परंतु, पोलिस विभागाला मोठया प्रमाणात वित्तीय अधिकार सोपविल्यानंतरही लेखापरीक्षकांना परिस्थितीत कोणतीही लक्षणीय सुधारणा झाल्याचे आढळून आले नव्हते. नौका नादुरुस्त राहण्याचा कालावधी सातत्याने लक्षणीय प्रमाणात जास्त होता, म्हणूनच, गस्तीच्या कार्यावर त्याचा परिणाम होता होता.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

सन २०१३ मध्ये बोटींच्या देखभाल व दुरूस्तीकरीता पोलीस विभागास टप्याटप्याने पुरेशा प्रमाणात आर्थिक अधिकार बहाल करण्यात आलेले आहेत. बोटींच्या देखभाल व दुरूस्तीकरीता पोलीस विभागास आर्थिक अधिकार बहाल केल्यानंतर परिस्थितीत सुधारणा झालेली आहे.

बोटींचे देखभाल व दुरूस्तीस लागणारे विलंबाचे कारण म्हणजे भारत सरकारकडून सर्वसमावेशक करार गोवा शिपगार्ड कंपनीकडे देण्यात आला असून गोवा शिपगार्ड कंपनीने सदर काम दुसऱ्या उप कंत्राटदारास दिलेले आहे जे वेळखावू आहे. तसेच, उप-कंत्राटदारास मुख्य कंत्राटदाराकडुन वेगवेगळया परवानग्या घ्याव्या लागतात. फक्त स्थानिक कंत्राटदार तात्काळ निर्णय घेवू शकत नाही. कंत्राटदार बोटीच्या सुट्टया भागांचा साठा करून ठेवत नसल्याने बोटींचे भाग आयात करून मागविण्यात बराच कालावधी लागतो. बोटींचे सुटे भागांचा साठा कत्राटदाराकडे असणे गरजेचे आहे, जे बंधनकारक असून तो सुरक्षेचा विचार करता सातत्याने आवश्यक आहे. सदर बाब अत्यंत वेळखावू असल्याने त्याचा परिणाम बोट दुरूस्ती व त्या गस्तीकरीता उपलब्ध करून देण्यावर होतो.

भारत सरकारने अगोदरच बोटींचा सर्वसमावेशक देखभाल व दुरूस्ती करार (AMC) गोवा शिपगार्ड कंपनीसोबत केला असल्याची बाब लक्षात घेवून राज्य शासनाचे बोटींचादेखिल देखभाल व दुरूस्ती करार गोवा शिपगार्ड कंपनीसोबत करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून बोट दुरूस्तीस होणारे विलंबाचे कारणांबाबत आढावा घेतला असता गोवा शिपगार्ड कंपनीने उप-कत्राटदाराची नेमणूक केल्याबाबत केंद्र शासनाने आक्षेप घेतला असून सदर बाब केलेल्या कराराचा भंग आहे व त्यामुळे बोटींचे देखभाल व दुरूस्तीचे कामात वेळ वाढत असून आणखी विलंब केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे गोवा शिपगार्ड कंपनीसोबतच्या करण्यात आलेल्या सर्वसमावेशक करार व उप-कंत्राटदार याबाबत सदर सर्वसमावेशक कराराचा पुर्नविचार होणेकरीता माहिती मागविण्यात आलेली आहे.

वरील कामाचा अनुभव लक्षात घेवून सदर कामात सुधारणा होण्याचे दृष्टीने राज्य गुप्तवार्ता विभागाकडून महाराष्ट्राचे सागरी सुरक्षेविषयीची समन्वय आस्थापना या नात्याने गोवा शिपगार्ड कंपनीसोबत राज्य शासनाच्या वेगवान बोटींबाबत पुनश्च सर्वसमावेशक करार करण्याबाबत पुनर्विचार होणेबाबत पत्रव्यवहाराद्वारे शासनाचे निदर्शसनास आणू देण्यात आले. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक ०४.०२.२०१६ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी उद्योग विभागाच्या धोरणातील नियम क्र. ३.२.७ च्या स्वीस चॅलेंज खरेदी पद्धतीचा अवलंब करून मे.गोवा शिपयार्ड यांच्या कराराच्या रकमेपेक्षा कमी किंमतीत करार करण्यास तयार असलेले मे. गोवा शिपयार्ड यांनी नेमलेल्या आणि राज्य शासनाच्या २९ बोटींच्या देखभाल दुरूस्तीचा अनुभव असलेल्या मुंबईस्थित उप-ठेकेदार कंपनीकडून देकार प्राप्त करण्याची कार्यवाही करण्याबाबत तसेच, हे करताना सदर उप-ठेकेदार कंपनी यांची महाराष्ट्र राज्यातील नोंदणी व कामाचा अनुभव या बाबी प्रामुख्याने विचारात घेण्याबाबत आयुक्त,राज्य गुप्तवार्ता विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले असून त्यांचेमार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

संयुक्त गस्ती

सागरी तटरक्षणासाठी घुसखोरीला प्रतिबंध करणे व चोरटया व्यापारासारख्या बेकायदेशीर कारवायांना आळा घालणे याकरीता सागरी तटावरील गस्ती हा एक अत्यावश्यक भाग आहे. सागरी तटावर, भारतीय तटरक्षक दल, भारतीय नौदल व तटरक्षक पोलीस व सीमाशुल्क विभाग यांच्याकडून संयुक्तरित्या गस्ती घातल्या जातात. अशा संयुक्त गस्तीदरम्यान, या सर्व यंत्रणा, परस्पर व्याप्त कार्यकक्षेमध्ये एकमेकांच्या प्रयत्नांना सहाय्य करतात व परस्परपुरक कार्य करतात.

लेखा परिक्षण तपासणीमध्ये असे आढळून आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या नौकांचा विमा काढण्यात आलेला नव्हता व गस्तीसाठी ज्या व्यक्ती समुद्रात लांबवर जातात त्यांना विम्याचे संरक्षण नसल्यामुळे एप्रिल-२०१२ पासून नौसेना अधिका-याने तटरक्षक सेनेबरोबर संयुक्तरित्या गस्त घालणे बंद केले होते. तसेच पोलीस नौकांच्या अपर्याप्त क्षमतेमुळे एप्रिल-२०१२ पासून तटरक्षक दलानेही तटरक्षक सेनेबाहेर संयुक्त गस्त घालणे थांबविले आहे. पाच पैकी फक्त तीन जिल्ह्यांमध्ये सीमाशुल्क विभागाबरोबर संयुक्त गस्त घालण्यात येत होत्या.

लेखापरीक्षण अभिक्षणाला शासनाने कोणतेही विशिष्ट उत्तर दिलेले नाही.

ज्ञापन

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

पूर्वी संयुक्त सागरी गस्त भाडयाचे मच्छिमार ट्रॉलर्समधून करण्यात येत होती. ज्यामध्ये प्राथमिक आवश्यक सोयी उदा. प्रसाधनगृह, जेवण, पाणी इत्यादी होत्या, ट्रॉलर्सच्या बसण्याची क्षमता आणि लांबीसुद्धा जास्त होती. ती हाउस बोट प्रमाणे होती. ज्यामध्ये प्राथमिक आवश्यक बाबींची काळजी घेण्यात आली होती. पोलीसांच्या वेगवान बोटी प्राप्त झाल्यानंतर भाडेतत्वावर घेण्यात आलेले मच्छिमार ट्रॉलर्स बंद करण्यात आले.

भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या मच्छिमार ट्रॉलर्सची तुलना करता केंद्र व राज्य शासनाच्या बोटींची क्षमता व लांबी कमी असून त्यामध्ये प्राथमिक आवश्यक बाबी उपलब्ध नाहीत. त्यामुळे सर्व कर्मचा-यांना दिवस-रात्र संयुक्तीक सागरी गस्त करणे अत्यंत अवघड होते. सध्या रायगड जिल्ह्यात कस्टम विभाग व सागरी पोलीस यांची संयुक्त सागरी गस्त सुरू आहे.

सध्या सागरी सुरक्षेच्या बळकटीकरणाकरिता सागरी भागाची संवेदनशिलता लक्षात घेऊन विविध प्रकारची संयुक्त अभियाने/ गस्ती/ अचानक तपासण्या नियमितपणे समुद्रात तसेच जमिनीवर राबविण्यात येतात आणि सदर अभियाना दरम्यान कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या बोट मालक/ चालक कर्मचारी यांचेवर भारतीय बोटींचे अधिनियम व इतर स्थानिक कायद्यान्वये कायदेशीर कारवाई घेण्यात येते. सागरी पोलीसांसह महाराष्ट्र राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना अपघात विम्याची सुविधा अगोदरपासून देण्यात आलेली आहे.

मच्छीमारांशी संबंधित सुरक्षेचे मुद्दे

ज्ञापन

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

परिच्छेदातील मुद्दयांबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

मच्छीमारांना बायोमेट्रीक ओळखपत्रे देणे :—

मच्छिमारांना बायोमेट्रीक ओळखपत्रे प्रदान करण्यासाठीची केंद्रीय योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनाला रु. ८८.२५ लाख मंजूर केले (मार्च, २०१०). तटीय क्षेत्रातील सुरक्षा बळकट करण्यासाठी व समुद्रात अपघात/मृत्यू झाल्यास अशा मच्छीमारांची ओळख पटणे शक्य व्हावे किंवा समुद्रातील व्यक्तींना, अवैधपणे प्रवेश केलेल्या व्यक्तींना ओळखणे शक्य व्हावे यासाठी सागरी तटावरील मच्छीमारांना बायोमेट्रीक ओळखपत्र देण्याचे या योजनेचे उद्दीष्ट होते.

माहितीचे डिजीटायजेशन, प्रत्येक मच्छीमाराचे डिजीटल छायाचित्र व बायोमेट्रीक तपशिल नोंदविण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) यांच्या संयुक्त विद्यमाने तीन केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या (CPSU) एका समव्यावसायिकांच्या गटाबरोबर एक करारनामा स्वाक्षांकित केला. (मे, २०१०) करारावर स्वाक्षरी झाल्यावर (मे, २०१०) त्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीत CPSU च्या या समव्यावसायिक गटाने अंदाजे तीन दशलक्ष सागरी तटीय मच्छिमारांना बायोमेट्रीक ओळखपत्रे देऊन त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या संबंधित कार्यान्वयन संस्थांना ओळखपत्र तपासणी यंत्राचा पुरवठा करून योजना पूर्ण करायची होती.

महाराष्ट्रात बायोमेट्रीक शिबीरे आयोजित करणे, प्रत्येक मच्छीमाराचा तपशील माहिती प्रविष्टी प्रपत्रामध्ये कागदपत्रांच्या रुपात संकलीत करणे इत्यादी कार्ये महाराष्ट्र शासनाच्या मत्स्योद्योग विभागावर सोपविण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र व गोवा या राज्यांसाठी भारतीय दूरसंचार उद्योग (ITI) पालक्काड या संस्थेला CPSU म्हणून पदनिर्देशित करण्यात आले होते.

लेखापरीक्षा छाननीत असे आढळून आले की, ऑगस्ट, २०१४ पर्यंत मच्छीमारांकडून प्राप्त झालेल्या १.८७ लाख आवेदनांपैकी १.८३ लाख आवेदने मत्स्योद्योग विभागाने पुढील प्रक्रियेसाठी ITI पालक्काड येथे पाठविली, ज्यापैकी ऑगस्ट, २०१४ पर्यंत १.२८ लाख बायोमेट्रीक ओळखपत्रे देण्यात आली. उर्वरीत ०.५९ लाख ओळखपत्रे, मत्स्योद्योग विभाग (०.०४ लाख) व ITI, पालक्काड (०.५५ लाख) मध्ये संस्करणाच्या वेगवेगळ्या टप्प्यामध्ये होती. ITI पालक्काड ने पुरविलेल्या १.२८ लाख ओळखपत्रांपैकी १.२७ लाख ओळखपत्रे मत्स्योद्योग विभागाने ऑगस्ट, २०१४ पर्यंत मच्छीमारांना जारी केली होती. मत्स्योद्योग विभागाने नोव्हेंबर, २०१४ पर्यंत या योजनेवर रु. ७१.४१ लाख खर्च केले आहेत.

लेखापरीक्षा छाननीत असे आढळून आले की, मत्स्योद्योग विभागाला ऑक्टोबर, २०१४ पर्यंत ITI पालक्काड कडून प्राप्त झालेली १०० ओळखपत्रे तपासणी यंत्रे, सप्टेंबर, २०१४ मध्ये आयोजित केलेल्या प्रात्यक्षिक/प्रशिक्षण सत्रादरम्यान मच्छीमारांच्या बोटांचे ठसे पडताळण्यास असमर्थ ठरली. परिणामी, गृह विभागाने (हा विभाग कार्यान्वयन संस्था असल्याने) ही ओळखपत्र तपासणी यंत्रे स्वीकारण्यास नकार दिला. (सप्टेंबर, २०१४). मच्छीमारांना ऑगस्ट, २०१४ पर्यंत जारी केलेल्या १.२७ लाख बायोमेट्रीक ओळखपत्रांचा नोव्हेंबर, २०१४ पर्यंत परणिामकारक

वापर होऊ शकला नव्हता व समुद्रात मासेमारीसाठी जाणारे अधिकृत मच्छीमार किंवा अपरिचितांना सहजरित्या ओळखता येण्याचे उद्दीष्ट साध्य होऊ शकले नाही.

शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि असे सांगितले की, ओळखपत्र तपासणी यंत्राचा हा मुद्दा उपाययोजनेसाठी ITI पालक्काड यांच्याकडे संदर्भित करण्यात आला आहे.

ज्ञापन

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विकास विभागाने दिलेल्या सष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

मच्छीमारांना बायोमेट्रीक ओळखपत्रे देण्याच्या प्रक्रियेत प्रथम जिल्हास्तरांवर अर्ज भरून घेणे. मासळी उतरविणाऱ्या केंद्रावर मच्छीमारांची बायोमेट्रीक माहिती भरून घेणे. भरलेली माहिती ITI, पलक्कडला सादर करणे, माहितीची तपासणी करणे, कार्डची निर्मिती करणे आणि त्यानंतर बायोमेट्रीक ओळखपत्राचे मच्छीमारांना वाटप करण्यात येते.

महाराष्ट्रात मच्छीमारांची लोकसंख्या (सागरी मत्स्व्यवसाय जनगणना २०१० अहवाल, (CMFRI नुसार) ३,८६,२५९ असून त्यापैकी ७६,३४५ क्रियाशील मच्छीमार आहेत. मच्छीमारांना बायोमेट्रीक ओळखपत्रे देण्याची संख्या २,२९,५४० आहे. आजपावते २,११,८५७ अर्ज विभागाकडे प्राप्त झाले असून ते ITI, पलक्कड, केरळ यांचेकडे बायोमेट्रीक कार्डच्या निर्मितीसाठी पाठविण्यात आले आहेत व त्यापैकी १,४०,७३६ बायोमेट्रीक कार्ड प्राप्त होऊन मच्छीमारांना वाटप करण्यात आले आहेत. एकूण ७१,१२१ अर्ज ज्यांचे डिझीटायझेशन (जुने १८,००० व नवीन ५३,१२१) झाले असून ITI, पलक्कड यांचेकडे बायोमेट्रीक कार्डच्या निर्मितीसाठी प्रलंबित आहेत.

दिनांक २२/०३/२०१६ रोजी नवी दिल्ली येथे सागरी क्षेत्रातील मच्छीमारांना बायोमेट्रीक ओळखपत्र देणेबाबत बैठक घेण्यात आली. यासाठी उर्वरीत मच्छीमारांचा अंतिम अभियानांतर्गत समावेश करण्यात येईल.

विभागास एकूण ३१८ बायोमेट्रीक कार्ड रिडर प्राप्त झाले असुन त्यापैकी २९० कार्ड रिडर सुधारित व त्यापैकी २१५ कार्ड गृह विभागास सागरी सुरक्षा योजना फेज-२ अंतर्गत नवीन ७ सागरी पोलीस स्टेशनसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

नौकांच्या हालचालीसाठीची ओळखचिन्ह यंत्रणा व एकसमान रंग निश्चिचतीच्या पद्धतीचा अवलंब न करणे

संवेदनशिल नौकातळांवरुन समुद्रात मासेमारीसाठी ये-जा करणाऱ्या मासेमारी नौकांवर लक्ष ठेवण्यासाठी नौकांच्या हालचालीसाठी ओळखचिन्ह यंत्रणा हा एक महत्वपूर्ण उपक्रम आहे. या यंत्रणेमुळे सागरी तट प्राधिकाऱ्यांना (सागरी तट पोलीस, तटरक्षक दल व सीमाशुल्क विभाग) नौका तळांवर परत येणारी व्यक्ती म्हणजे त्या नौकातळावरुन मासेमारीसाठी गेलेला अधिकृत मच्छीमारच आहे हे पडताळणे शक्य होते. तसेच हे नौका तळ महत्त्वपूर्ण बांधकामे/पायाभूत सुविधांची साधने व रस्ते/रेल्वे इत्यादीच्या नजीक असल्याने या यंत्रणेमुळे त्यांचे अविरत संनिरिक्षण आणि संरक्षण देखील केले जाते.

गुजरातमध्ये नौकांच्या हालचालीसाठी ओळखचिन्ह यंत्रणा सप्टेंबर, २००९ पासून कार्यरत आहे. लेखापरीक्षेत असे आढळून आले की, मत्स्योद्योग आयुक्तांनी १७३ नौका तळांवर एकूण रु. ४.८७ कोटी खर्चाची नौकांच्या हालचालीची ओळखचिन्ह यंत्रणा प्रस्थापित करण्याविषयीचा एक प्रस्ताव मार्च, २०१३ मध्ये महाराष्ट्र शासनाला सादर केला. या प्रस्तावावर महाराष्ट्र शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे, मत्स्योद्योग आयुक्तांनी एक वर्षानंतर एप्रिल, २०१४मध्ये एकूण ५२५ नौकातळांपैकी ९१ अतिसंवेदनशिल नौकातळांवर (६५ मासेमारी नौकातळ व २६ इतर नौकातळ), रु. २.८३ कोटी खर्चाची नौकांच्या हालचालीची ओळखचिन्ह यंत्रणा प्रस्थापित करण्यास मंजुरी प्राप्त करण्यासाठी एक सुधारित प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर केला. लेखापरीक्षकांच्या निरीक्षणाप्रमाणे मत्स्योद्योग विभागाने सादर केलेला हा सुधारित प्रस्ताव जून, २०१३ मध्ये भारतीय नौसेनेने केलेल्या घातपाताच्या निर्धारणावर आधारित होता. ज्या निर्धारणानुसार ५२५ पैकी ९१ नौकातळ हे अत्यंत संवेदनशील असल्याचे निर्धारीत करण्यात आले होते. परंतु, नोव्हेंबर, २०१४ पर्यंत, महाराष्ट्र शासनाकडे हा सुधारित प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित होता.

अशाप्रकारे २० महिन्यांचा कालावधी उलटूनही संवेदनशील नौका तळांवर घुसखोरी व इतर बेकायदेशीर कारवायांचा धोका कायम होता.

शासनाने, वस्तुस्थिती मान्य केली आणि असे सांगितले की, मच्छीमार नौकांना ओळखचिन्ह देण्याविषयीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाला सादर करण्यात आला होता. वित्त विभागाने काही शंका उपस्थित केल्या होत्या, ज्यांचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

लेखापरीक्षकांना पुढे असे आढळून आले की, सागरी सुरक्षा यंत्रणांना मच्छीमार नौकांची ओळख पटवणे व त्यांचा माग घेणे सहजरित्या शक्य व्हावे म्हणून MMB ने एप्रिल, २०१२ मध्ये महाराष्ट्रात मच्छिमार नौकांना एकसमान रंग देण्याची पद्धत अवलंबिण्याची गरज असल्याचे ओळखले होते, ज्याला मे, २०१० मध्ये तटरक्षक दलाने दुजोरा दिला होता. तदनंतर जुलै, २०१२ मध्ये आयोजित केलेल्या सागरीतट सुरक्षा बैठकीदरम्यान मुख्य सचिवांनी देखील मच्छीमार नौकांसाठी एकसमान रंग निश्चित करण्याची आवश्यकता असल्याचे ठामपणे सांगितले. परंतु नोव्हेंबर, २०१४ पर्यंत ही पद्धत अवलंबिण्यात आली नव्हती.

शासनाने नमूद केले की, पाच सागरी जिल्ह्यातील मच्छीमार नौकांसाठी एकसमान रंग निश्चित करण्यात आलेला आहे. परंतु ही पद्धत साधारण कोणत्या तारखेपासून लागू केली जाईल हे मात्र सांगितले नाही.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

शासन निर्णय दिनांक ३० जुलै २०१५ अन्वये मत्स्यव्यवसाय विभागामार्फत ९१ अतिसंवेदनशील लँडींग पॉईटस् वर ८५६ मासळी उतरविणारी केंद्रे व ३५ मासळी न उतविणारी केंद्रे) जिल्हा सुरक्षा मंडळामार्फत फिशरी वार्डनची नेमणूक करून त्यांच्या मार्फत मासेमारी नौकांच्या अवागमनावर टोकण पद्धतीद्वारे नियंत्रण व नोंदणी ठेवली जाते.

अतिसंवेदशील लँडींग पॉईटस्	फिशरी वार्डन / पर्यवेक्षक	एकूण
९१	फिशरी वार्डन (प्रति लँडींग पॉईट)-३	२७३
	पर्यवेक्षक	२३
		२९६

गृह विभागाने दिनांक २४ डिसेंबर २०१४ अन्वये खालीलप्रमाणे सांकेतीक रंगास मान्यता दिलेली आहे

अ.क्र	जिल्हा	सांकेतिक रंग	सांकेतिक रंग देण्याची ठरवून दिलेली जागा
१	पालघर	फ्लूरोसेन्ट जांभळा	नौकेचे कॅबीन व कडेभोवती
२	ठाणे	फ्लूरोसेन्ट निळा	नौकेचे कॅबीन व कडेभोवती
३	मुंबई उपनगर	फ्लूरोसेन्ट तपकिरी	नौकेचे कॅबीन व कडेभोवती
४	मुंबई शहर	फ्लूरोसेन्ट पिवळा	नौकेचे कॅबीन व कडेभोवती
५	रायगड	फ्लूरोसेन्ट लाल	नौकेचे कॅबीन व कडेभोवती
६	रत्नागिरी	फ्लूरोसेन्ट गुलाबी	नौकेचे कॅबीन व कडेभोवती
७	सिंधुदुर्ग	फ्लूरोसेन्ट नारंगी	नौकेचे कॅबीन व कडेभोवती

दिनांक ३१ मार्च २०१६ अन्वये मासेमारी नौकांना कलर कोडींगची स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

Real Craft णाली अंतर्गत नोदंणीकृत नौकांची संख्या			कार्यरत नौकांची संख्या			सांकेतीक रंग दिलेल्या नौकांची संख्या		
यांत्रिक	बिगरयांत्रिक	एकूण	यांत्रिक	बिगर यांत्रिक	एकूण	यांत्रिक	बिगरयांत्रिक	एकूण
१८५९७	७२८६	२५८८३	९५४५	२६२३	१२१६८	९५४५	११५०	१०६९५
						१००%	४३%	८८%

मच्छीमार सहकारी संस्थांना ज्या नौकांनी कलर कोड केलेले आहे अशाच नौकांना इंधन व डिझेल तेलावरील अनुदान देय राहील अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील अधिकाऱ्यांमार्फत मच्छीमारांची नियमित बैठका घेऊन बिगर यांत्रिक नौकांना देखील कलर कोर्डींग करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

निष्कर्ष व शिफारशी

प्रारंभी नियोजित केलेल्या परंतु केंद्र शासनाने मंजुरी न दिलेल्या सामुग्री व इतर भांडवली मत्तांना महाराष्ट्र शासनाने स्वत:चे स्त्रोत वापरून प्राप्त केले नव्हते किंवा बांधले नव्हते ज्याचा राज्यात सागरी तट सुरक्षा योजनेची अंमलबजावणी करण्यावर प्रतिकूल परिणाम झाला.

प्रारंभी नियोजित केलेल्या सामुग्री व इतर भांडवली मत्ताच्या आवश्यकतेचा शासनाने आढावा घ्यावा व राज्याच्या स्वत:च्या स्त्रोतामधून त्यासाठी निधी उपलब्ध करून गरज पूर्ण करावी.

तीन ते नऊ वर्षाचा कालावधी उलटूनही सागरी तटीय पोलीस स्थानके, तपासणी नाके व जेटी यांचे बांधकाम करून त्याद्वारे पर्याप्त प्रमाणात सुविधा निर्माण करण्याचे उद्दीष्ट साध्य झाले नाही.

सागरी किनारपट्टी जास्त काळ असुरक्षित राहू नये याची सुनिश्चिती करण्यासाठी उर्वरित सागरी तट पोलीस स्थानके व तपासणी नाके त्याचप्रमाणे जेटींमधील कार्यकारी कक्षाचे बांधकाम विनाविलंब पूर्ण करावे.

तंत्रज्ञ व तंत्रज्ञेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीमधील तूट अनुक्रमे ५१.२१ टक्के व ३७.०१ टक्के होती. सेवाप्रवेश नियमावली निश्चित करण्यात विलंब झाल्यामुळे गृह विभागाने तंत्रज्ञांची नेमणूक कंत्राट तत्वावर करणे सुरूच ठेवले होते. सागरी तट पोलीस स्थानकांमध्ये नियुक्त केलेल्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी फक्त ४३ टक्के कर्मचाऱ्यांना तटरक्षक दलाकडून सागरी कामकाजाचे प्रशिक्षण देण्यात आले होते व ५७ टक्के कर्मचाऱ्यांना पोहता येत नव्हते. कर्मचाऱ्यांची कमतरता व नौकांची दुरूस्ती करण्यातील विलंब यामुळे गस्ती नौकांचा मोठ्या प्रमाणात कमी वापर होत होता.

सागरी तट सुरक्षेला निर्माण होणारा संभाव्य धोका दूर करण्यासाठी शासनाने कंत्राट तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्याच्या पद्धतीचे पुनर्विलोकन करावे. गस्ती नौकांचा विनावापर राहण्याचा कालावधी कमी करून शासनाने सागरी तटावरील गस्ती घालण्यात गंभीर तूट असण्याच्या समस्येवर तोडगा काढावा.

बायोमेट्रीक ओळखपत्रे तपास यंत्रामध्ये असणाऱ्या त्रूटींमूळे मच्छिमारांची ओळख पटविणे सुलभ व्हावे यासाठी त्यांना बायोमेट्रीक ओळखपत्रे देण्याच्या योजनेची अंमलबजावणी होऊ शकली नव्हती. नौकांच्या हालचालींचा माग घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ओळखचिन्हांच्या यंत्रणेची अंमलबजावणी न झाल्यामुळे संवेदनक्षम/ कमकुवत नौकातळांवर घुसखोरी व इतर बेकायदेशीर कारवाया होण्याचा धोका कायम होता.

मच्छिमारांसाठी बायोमेट्रीक ओळखपत्रांच्या योजनेची त्वरेने अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने त्यातील ओळखपत्र तपासणी यंत्राच्या अडचणींवर ITI, पालक्काड यांच्या मदतीने तोडगा काढावा. तसेच, घुसखोरी व बेकायदेशीर कारवायांपासून संवनेदनक्षम / कमकुवत नौकातळांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने नौकांच्या हालचालीसाठीच्या ओळखचिन्ह यंत्रणेची विनाविलंब अंमलबजावणी करावी.

ज्ञापन

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

राज्यात सागरी तट सुरक्षा योजनेची अंमलबजावणी करण्यावर प्रतिकुल परिणाम झाला असा काढण्यात आलेला निष्कर्ष चुकीचा व प्रत्यक्ष परि?स्थितीच्या आधारावर नाही. वेगवेगळ्या परिच्छेदांमध्ये नमूद केलेले टिपण्यांमधून हे उघड होते की, महाराष्ट्र शासनाने सागरी तट सुरक्षा योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यासाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना केलेल्या आहेत.

बहुतेक सागरी तटीय पोलीस स्थानके, तपासणी नाके व जेट्टी यांची बांधकामे प्रगती पथावर आहेत. तसेच योग्य जमीन व ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त होताच उर्वरित सागर तटीय पोलीस स्थानके, तपासणी नाके व जेट्टी यांची बांधकामे सुरू करण्यात येईल. सर्व संबंधित आस्थापनांकडे अपूर्ण असलेली बांधकामे पूर्ण करण्याबाबत व इतर कामांची पूर्तता करण्याबाबत पोलीस महानिरिक्षक, सागरी सुरक्षा यांचे स्तरावर तसेच विभागस्तरावरही आढावा घेण्यात येतो.

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडून तांत्रिक कर्मचाऱ्यांचे भरती नियमांमध्ये थोडी शिथिलता देऊन भरती नियमावली मंजूर होणेकरिता शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाचे मदतीने सागरी गस्ती करणे शक्य नाही. त्यामुळे कायमस्वरूपी मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यंत यापूर्वी कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची पुनर्नियुक्ती होणेकरीता अथवा नव्याने कंत्राटी पद्धतीने तांत्रिक कर्मचाऱ्यांची भरती करण्याकरिता गृह विभागाकडे प्रस्ताव प्राप्त झाला होता. शासनाने दिनांक १५.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण १८६ तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे (९८ पदे यापूर्वी कार्यरत कंत्राटी मनुष्यबळामधून व ८८ पदे नव्याने विहित पद्धतीचा अवलंब करून भरती घेऊन) ११ महिन्याचे करारावर कंत्राटी पद्धतीने भरावयास परवानगी दिली आहे. त्यानुसार यापूर्वी कार्यरत असलेल्या ८२ तांत्रिक कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश पारित करण्यात आलेली आहेत व उर्वरित ८८ पदे भरण्याकरिता वर्तमान पत्रात जाहिरात देऊन भरती प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. शासनाकडून भरती नियमास मंजूरी प्राप्त होताच नवीन कायमस्वरूपी तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात येईल आणि तदनंतर कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या मुनष्यबळाची सेवा खंडीत करण्यात येईल. सागरी पोलीस घटक प्रमुखांकडून कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांची त्यांचे नियुक्तीनंतर चारित्र्य पडताळणी करण्यात येते. सागरी गस्तीच्यावेळी बोटीवर ५-६ तांत्रिक तसेच कार्यकारी मुनष्यबळ उपस्थित असते. मागील तीन वर्षापासून पोलीस बोट चालविण्याकरीता कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ नेमण्यात येत आहे. परंतू अद्याप सदर कर्मचाऱ्यांबाबत काहीही आक्षेपार्ह

अथवा संशयास्पद आढळून आलेले नाही. राज्यातील सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांना वितरीत बायोमॅट्रीक कार्डस (ओळख पत्र) तपासणी यंत्राची (कार्ड रिडर्स) एकूण ३१५ युनिटची मागणी पदुम, भारत सरकार यांच्याकडे करण्यात आली होती. त्यापैकी २१५ कार्ड रिडर्स गृह विभागासाठी व १०० कार्ड रिडर्स ची मत्स्यविभागासाठी मागणी होती. सद्यःस्थितीत आय.टी.आय पालक्काड कडून एकुण ३१८ बायोमॅट्रीक कार्ड रिडर्स प्राप्त झाले असुन त्यापैकी २९० सुधारित व अद्यावत (ModiFied and revised version) कार्ड रिडर्स प्राप्त झालेत. व त्यापैकी २१५ कार्ड रिडर्स गृह विभागास सागरी सुरक्षा योजना फेज-२ अंतर्गत नवीन ७ सागरी पोलीस स्टेशनसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. उर्वरीत सुधारित व अद्यावत ७५ मत्स्यविभागासाठी वापरात असुन मागणी नुसार उर्वरीत २५ सुधारित व अद्यायावत कार्ड रिडर्सची मागणी आय.टी.आय पालक्काड यांच्याकडे करण्यात येत आहे.

नौदल विभागाने सर्वेक्षण केलेल्या लॅन्डीग पॉईन्टस पैकी ९१ अतिसंवेदीनशील लॅन्डीग पॉईन्टस व सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून २४ तपास नौकाची अवागमनाची नोंद ठेवण्यासाठी टोकण पद्धत राबविण्याच्या अनुषगाने जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत शासन निर्णय दिनांक ३०/७/२०१५ प्रमाणे सुरक्षा रक्षाकांची (Fishery Warden) ची नेमणूक मत्स्य विभागाद्वारे करण्यातआली आहे.

संवेदनशील लॅर्डींग पॉईट्स	सुरक्षा रक्षक पर्यवेक्षक/संख्या	एकूण संख्या
९१	सुरक्षा रक्षक प्रति कंद्र ३ प्रमाणे	२७३
	पर्यवेक्षक	२३
	एकूण	२९६

साक्ष :-

४.२ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र (नागरी) अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.२ सागरी तट सुरक्षा योजनेची अंमलबजावणी या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ मे, व १ जून २०१६ रोजी, गृह विभागाचे सचिव व इतर प्रतिनिधीची साक्ष घेतली साक्ष सुरू होण्यापूर्वी समितीने विचारणा केली की, समितीने गृह विभागाला दिलेल्या नोटीसमध्ये प्रलंबित असलेल्या परिच्छेदासंबंधी विभागाने समितीला आढावा द्यावा अशी अपेक्षा होती. समितीच्या माहितीप्रमाणे महालेखाकांराच्या एकूण १८ परिच्छेदांबाबत त्यांना ज्ञापन मिळालेले नाही. तसेच लोकलेखा समितीच्या एकूण १६ शिफारशींच्या संदर्भात विभगाने केलेल्या कार्यवाहीचा समितीला आढावा मिळालेला नाही. या संदर्भात प्रलंबित परिच्छेद आणि शिफारशींच्या संदर्भात लक्ष घालावे. असे समितीने विभागीय सचिवांना सूचविले व त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

सागरी तट सुरक्षा योजनेच्या नियोजनातील कमतरता.

४.३ सागरी तट सुरक्षा योजनेची अंमलबजावणी यासाठी केंद्र शासनाकडून १०४ कोटी ५ लक्ष रुपयांचे अनुदान मंजूर झालेले आहे. याबद्दल केलेल्या सर्व कार्यवाहीच्या अहवालासंबंधी माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की २००५-०६ मध्ये केंद्र शासनाने सागरी सुरक्षेच्या संदर्भात २ टप्प्यांमध्ये मदत करण्याचा निर्णय घेतला होता. केंद्र शासनाने पहिल्या टप्प्याचे निधी २ टप्प्यांमध्ये दिला त्यानंतर आता दुसरा टप्पा मंजूर झाला आहे. दुसऱ्या टप्प्यातील निधी येऊ लागला आहे. सागरी सुरक्षेसाठी सागरी तटावर पोलीस स्टेशन बांधणे, बोटी तसेच जीप्स व मोटर-सायकल्स उपलब्ध करून देणे. पोलीस ठाण्याकरिता सहाय्य म्हणून रक्कम देणे, तपासणी नाके उभारणे, बॅरेज व जेटीकरिता आवश्यक कार्य कक्ष निर्माण करणे याकरिता १०४ कोटी रुपयांसाठी फेज-१ आणि फेज-२ असा प्रस्ताव होता. सन २००५-०६ पासून पहिल्या टप्प्याची रक्कम मिळाल्यानंतर सन २०१० मध्ये दुसरा टप्पा दिला. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीच्या भरवशावर गृह विभागाने सेट ऑफ ॲडमिस्ट्रेशन ॲप्रुव्हल दिले. त्यानंतर संबंधित विभागांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, मेरीटाईम बोर्ड व पोलीस हौसिंग कॉर्पोरेशन अशा काही ठिकाणी बांधकामांकरिता सुरूवात केली. केंद्र शासनाने स्वत: (डायरेक्ट) नौका उपलब्ध करून दिल्यामुळे त्याची रक्कम केंद्र शासनाने कापून घेतली. तथापि बांधकामामध्ये ज्या अडचणी निदर्शनास आल्या त्याबद्दल विभागीय सचिवांना विदित केले की, बांधकामाकरिता जागेची आवश्यकता असते. आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या मदतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि स्थानिक पोलीस अधिकारी जागेची निवड करीत असतात. जागेची निवड केल्यानंतर ती बांधकामाकरिता योग्य आहे का किंवा त्यात काही अडचणी आहेत का किंवा त्या जागेवर इतर कोणाचा हक्क आहे का ? याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तपासणी करतात. या सर्व प्रक्रियेकरिता थोडा वेळ लागतो ही बाब मान्य करणे गरजेचे आहे. त्यानंतर जागेच्या हिशेबाने अंदाजपत्रक तयार करणे, अशा विविध प्रक्रिया करीत असताना अंदाजपत्रकाची रक्कम वाढते. सन २००५-०६ नुसार निधी दिला. त्यानंतर जिल्हा दर सूची (डीएसआर) वाढली. सार्वजनिक बांधकाम विभाग जोपर्यंत गृह विभागाकडून कामाबाबत १०० टक्के रक्कमेची मिळत नाही तो पर्यंत काम करण्यास तयार नाही यामुळे तटरक्षक दलाकडून अतिशय सावध भूमिका घेण्यात येते.

४.४ शासनाच्या महसूल विभागाचा शासन निर्णय आहे. विभागाने समितीला जागेसंबंधी माहिती दिली. शासनाचे काम असल्यास एक दिवसाच्या कालावधीत जिल्हाधिकारी जमीन हस्तांतरीत करून देतात. यामुळे विभागीय प्रतिनिधींनी जागेसंबंधी दिलेली माहिती समितीला मान्य झाली नाही. तसेच १०० टक्के पैसे दिल्याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभाग काम करीत नाही. हे योग्य नाही सार्वजनिक बांधकाम विभागास असे करता येत नाही. २५ टक्के पैसे मिळाल्यानंतर कामाची निविदा काढणे त्यांना बंधनकारक आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागामधील कोणता अधिकारी गृह विभागाला सांगत आहे की, १०० टक्के निधी मिळाल्याशिवाय काम करणार नाही. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १० टक्के निधी देऊन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग काम करीत असतो. परंतु ज्यावेळी १०० टक्के रक्कम राज्य शासनाची असते तेव्हा विभागाला शाश्वती असते की, विभाग त्यांना पैसे देऊ शकतो. परंतु केंद्र शासनाचा निधी असल्यास १० टक्के निधी दिल्यानंतर उर्वरित निधी न आल्यास काय करायचे, यामुळे तटरक्षक दल घाबरते. यामुळे त्यांच्याकडून जास्त निधीची मागणी केली जाते. या संदर्भात केंद्र शासनाचा निधी कमी पडल्यास किंवा निधी आला नाही तर राज्य-शासन सदर निधी देईल अशी राज्य शासन किंवा वित्त विभागाने हमी दिल्यास आम्ही काम सुरू करतो असे तटरक्षक दलाकडून सांगितले जाते. परंतु वित्त विभागाचे असे मत असेल की, केंद्र शासनाचा निधी आहे. तटरक्षकदलाने केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमध्ये काम करावे. वित्त विभागाकडून यासाठी निधी मिळणार नाही.

४.५ महिला बालविकास विभागापासून सर्व विभागांमध्ये केंद्र शासनाच्या योजना राबविल्या जातात. परंतु केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाला नाही म्हणून योजनेवर खर्च करणार नाही किंवा योजना पुढे नेणार नाही असे कधी म्हटले जाते का ? जोपर्यंत कागदपत्रांची पूर्तता करीत नाही तोपर्यंत केंद्र शासनाकडून १०० टक्के निधी प्राप्त होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत केंद्र शासनाकडून निधी आलेला नाही म्हणून काम करता येणार नाही असे कसे म्हणता येईल ? हा एक प्रकारे केंद्र शासनावर अविश्वास दाखविल्यासारखे आहे. राज्य सरकार याकरिता कशी हमी देऊ शकेल, या संदर्भात विभागाने पाठपुरावा करणे आवश्यक आहे. अन्यथा एकही काम होऊ शकणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, निधी मुक्त करणे, प्रशासकीय मान्यता देणे, जागेची निवड करणे, सुधारित अंदाजपत्रक तयार करणे या सर्व गोष्टींकरिता २००५ पासून सन २०१०-११ पर्यंत अनावश्यक विलंब झाला आहे.

४.६ ३.२.२ या परिच्छेदात केंद्र शासनाकडून निधी न आल्यामुळे अर्थसंकल्पीय साधन संपत्तीमध्ये जी तूट दिसत आहे यामुळे राज्य शासनाने आपला वाटा उचलून सदर काम पूर्ण करून घेतले पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काही कारणांमुळे रक्कम वाढल्यास शासन तुमच्या बाजूला उभे आहोत अशी हमी विभागास दिल्यास सोयीचे होऊ शकते. यंत्रणेला अशी भीती वाटते की, कंत्राटदारासमवेत करार केल्यानंतर केंद्र शासनाकडून निधी प्राप्त न झाल्यास कॉन्ट्रक्टर डॅमेज क्लेम करणार. यामुळे वित्त विभागाने गृह विभागास निधी उपलब्धतेची हमी दिल्यास ते सोइस्कर होऊ शकते.

४.७ यासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, वित्त विभागाकडे विचारणा करावी की, अशा प्रकारे हमी देता येईल का ? वित्त विभागाने अशी हमी दिल्यास सर्व खात्यांकडून अशी हमी मागितली जाईल. ॲडव्हान्समध्ये कशी हमी देता येईल? काम झाल्यानंतर तूट असल्यामुळे मागणी केल्यास शासनाकडून त्यासंबंधी कार्यवाही होऊ शकेल. केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनाची सुद्धा सागरी तट सुरक्षेची जबाबदारी आहे. परंतु सिस्टिममुळे काम रखडले आहे. यामुळे सर्व परिस्थिती ढासळलेली दिसते. ही सर्व परिस्थिती बदलली पाहिजे.

४.८ सर्व विभागांमध्ये अशा प्रकारे केंद्र शासनाकडून येणारा निधी व राज्य शासनाच्या निधी खर्च करण्याच्या पद्धतीमुळे कामाकरिता बराच कालावधी लागतो. राज्य शासनाने बिल्डर्सच्या संदर्भात असा निर्णय घेतला आहे की, त्यांना सोसायटी करण्याकरिता २ किंवा ३ वर्षांचा ठराविक कालावधी दिल्यानंतर त्यांनी त्याच कालावधीत काम पूर्ण केले पाहिजे असे त्यांच्यावर बंधन घातले आहे. विहित मुदतीत कामे पूर्ण करु असे राज्य शासनाने स्वत:वर बंधने घालून घेतल्यास केंद्र शासनाकडून वेळेवर निधी येऊ शकेल. परंतु राज्य शासनाने कामे रखडवल्यास केंद्र शासनाने आपल्याला निधी का द्यावा ? यामुळे वेळेवर कामे करून घेण्याची राज्य शासनावर जबाबदारी आहे. या संदर्भात राज्य शासनाने सर्व विभागांच्या संदर्भात टाईमबाऊंड कार्यक्रम करावयास पाहिजे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत असल्यामुळे विहित कालावधीत कामे झालीच पाहिजे. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात उदाहरण देताना सांगितले की, केंद्राचा व पोलीस विभागाचा सीसीटीएनएस कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम १०० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. क्राईम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम अशा प्रकारे सॉफ्टवेअर व हॉर्डवेअर करून २००९ मध्ये संपूर्ण राज्यात व देशात ही स्कीम सुरू झाली सन २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी सर्वप्रथम ही यंत्रणा उभारली व त्याचे माननीय राज्यपालांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यानंतर विभागाने केंद्र शासनाला कळविले की, सदर कामाकरिता ५५ कोटी रुपयांचा मिळणे शिल्लक आहे, ती रक्कम केंद्र शासनाने विभागाला द्यावी. परंतु दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ पासून मार्च महिन्यापर्यंत केंद्र शासनाकडून पैसे देण्यात आले नाहीत. विभागाने वित्त विभागाला असे सांगितले की, ५५ कोटी रुपयांचे काम झाले असून ते इनॉग्रेटेड व पब्लिक सर्व्हिसमध्ये आहे. परंतु या संदर्भात केंद्र शासनाकडून निधी मिळणार नसल्यास शासनाने आम्हाला निधी द्यावा. अन्यथा कॉन्ट्रक्टर डॅमेज क्लेम करील. परंतु शासनाच्या वित्त विभागाने ३१ मार्च पर्यंत निधी दिला नाही. तसेच विभागाला असे सांगण्यात आले की, केंद्र शासनाची यासंबंधी कमिटमेंट असल्यामुळे आपण केंद्र शासनाकडून निधी घ्यावा. यानंतर विभाग केंद्र शासनाकडे विचारणा केली असता त्यांनी ३१ मार्च रोजी रात्री असे सांगितले की, महाराष्ट्राने या संदर्भात काम पूर्ण केल्यामुळे त्यांना पैसे देऊन टाकावे इतर राज्यांना देऊ नये. सप्टेंबरपासून मार्च पर्यंत असलेली ब्रीजिंग गॅपच्या संदर्भात वित्त विभागाकडे विनंती करण्यात आली होती.

४.९ विभागाने दिलेल्या माहितीतून असे स्पष्ट होत आहे. ३१ तारखेला केंद्र शासनाकडे गेल्यानंतर केंद्र शासनाने विभागाला निधी मुक्त केला. याचा अर्थ केंद्र शासनाने विभागाला आर्थिक वर्षअखेरीस निधी दिला, अशा समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गृह विभागाने सन २०१५-१६ च्या तरतुदीमधील सीसीटीएनएसकरिता शून्य तरतूद ठेवली होती. तसेच केंद्र शासनाकडून असे सांगण्यात आले की, पूर्ण देशाच्या संदर्भात ही योजना आहे त्याच ठिकाणी बंद करावी. विभागाने केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला व केंद्र शासनास असे सांगितले की, विभाग यात पुढे गेलेला आहे. केंद्र शासनाने विभागास ५५ कोटी रुपये दिल्यास राज्याचे एक काम होईल उर्वरित राज्यासंबंधी केंद्र शासनाने नंतर निर्णय घ्यावा. यानंतर हा विषय मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये गेला. तेथे माननीय मुख्यमंत्र्यांनी सुद्धा पत्र दिले होते. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये असा निर्णय झाला की, महाराष्ट्राने यासंबंधी काम पूर्ण केल्यामुळे इतरांना १७ मार्च पर्यंत मुदत द्यावी. तसेच तरतूद करून महाराष्ट्राला निधी मुक्त करावा. परंतु सदर निधी मुक्त करण्यासाठी ३१ मार्च पर्यंतचा कालावधी लागला.

४.१० विभागाने आपण दिलेल्या उदाहरणात केंद्र शासनाने सदर योजना रद्द करण्यास सांगितल्यामुळे हा घोळ सुरू झाला. केंद्र शासनाकडे सर्व विभागांकरिता भरपूर निधी असतो. परंतु वेळेवर पाठपुरावा केला जात नाही. यामुळे निधी प्राप्त होत नसल्यामुळे कामे रखडली जातात व त्याचे परिणाम भोगावे लागतात. एखाद्या वेळी अशा प्रकारे निधी उपलब्ध करून द्यावयाचा असल्यास ब्रीजिंग ऑफ प्रॉब्लेम्स येतात. याकरिता वित्त विभागाने कार्यवाही करणे गरजेचे आहे. याकरिता राज्य शासनाने अर्थसंकल्पात तरतूद करून ठेवल्यास तो निधी उपलब्ध करून देता येऊ शकेल. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा निधी योजनानिहाय न ठेवता त्याकरिता केंद्र शासनाचा रिव्हॉलव्हिंग फंड ठेवावा. ज्या विभागाने प्रथम काम केले आहे त्यांना त्या फंडमधून निधी देण्यात यावा. अशा प्रकारे रिव्हॉलव्हिंग फंड ठेवल्यास केंद्र शासनाचा निधी त्यात येऊ शकेल. तसेच राज्याच्या कामाकरिता त्या निधीचा वापर करता येणार नाही.

४.११ यासंदर्भात उदाहरणदाखल समितीने असे मत व्यक्त केले की, विभागास ५५ कोटी रुपयांचा निधी मिळाल्यास विभाग केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करणार नाही. निधी प्राप्त झाल्यानंतर विभाग निश्चित होऊ शकतो. अशी व्यवस्था असल्यास त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, रिव्हॉलव्हिंग पूलमध्ये फक्त केंद्र शासनाचा निधी राहणार आहे. तसेच सदर निधीचा वापर केल्यानंतर केंद्र शासनाकडे (उपयोगिता प्रमाणपत्र) पाठविण्यात येणार आहे.

४.१२ नियोजन विभागात अशा प्रकारची कार्यपद्धती मान्य केली असती का ? यात दोन विषय मांडलेले आहेत. केंद्र शासनाच्या निधीसंबंधी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी राज्य शासनाचे केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या पाठपुरावा करण्यासाठी युनिट कार्यरत आहे, तेथे आयुक्त आहेत. त्यांनी सक्रीयतेने काम करून त्यासाठी प्रयत्न करावेत. प्राप्त झालेला निधी वेळेवर खर्च न झाल्यामुळे साक्षीमध्ये चर्चा करण्यात येत आहे. निधी खर्च न होण्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणी विलंब झाल्याची बाब विभागाने मान्य केली होती. समितीच्या सूचनेनुसार विभाग या प्रकरणी कारवाई करण्यास तयार आहे. या प्रकरणी २००५ पासून २०११ पर्यंत विलंब झाला आहे.

४.१३ विभागीय सचिव कारवाई करण्यासंबंधी सांगत आहेत. परंतु समितीसमोर साक्ष देण्यासाठी उपस्थित आहेत. तसेच विलंब झाल्याची बाब देखील मान्य केली आहे. समितीच्या सूचनेनुसार कारवाई करण्यास तयार असल्याची अपेक्षा विभागाने करणे संयुक्तिक वाटत नाही. या प्रकरणी समितीने चौकशी केली असता त्यात अशी विभागीय सचिवांना अमुक बाब आढळली असून विभाग त्यासंबंधी अमुक कारवाई केली आहे अशी विभागीय सचिवांनी समितीला माहिती देणे अत्यावश्यक आहे. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणी विभागाकडून सविस्तर चौकशी करण्यात येईल त्यावेळी त्यात पोलीस किंवा मुंबई महानगरपालिका मधील अधिकारी मोठ्या प्रमाणात असण्याची शक्यता आहे. यामुळे सदर प्रकरणी कारवाई करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती सुद्धा पाहिजे. या प्रकरणी कारवाई सुरू करण्यात येईल परंतु त्यापैकी काही जण अेडीजे किंवा डीजे झाले असतील, काही जण डीजे होऊन सेवानिवृत्त झाले असतील. कारवाई करण्यास हरकत नाही. परंतु कोणती कशाप्रकारे कारवाई करायची व पुढे जायचे याचा विचार करण्यात येतो. मागील विचार करण्यात येत नाही.

४.१४ समितीने विभागीय सचिवांच्या मतास सहमती दर्शवून सांगितले की, यात दोन मुद्दे आहेत. महालेखापालांनी काढलेल्या मुद्यांसंबंधी चर्चा करून त्यावर निर्णय घेण्याकरिता ही समिती आहे. विभागाकडून भविष्याकरिता ज्या सुधारणा करण्यात येत आहेत, त्याचे समिती समर्थन करते, त्याचा निश्चित विचार करण्यात येईल त्याला विरोध नाही. मागील काळातील परिच्छदांचे लेखापरिक्षण करून त्यात विभागाने काही पूर्तता केली असल्यास ती मान्य करावयाची असल्यास ती मान्य करणे अन्यथा त्यावर शिफारशी करण्याचे समितीचे काम आहे. परंतु पुढील विचार केला पाहिजे, मागील सोडून दिले पाहिजे. या विभागाच्या मताप्रमाणे समिती काहीही करणार नाही. असे मत नोंदवून या प्रकरणी जे अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली याची माहिती एक महिन्याच्या आत समितीला द्यावी असे समितीने सूचित केले.

४.१५ या मुद्यासंबंधी अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १ जून, २०१६ रोजी गृह विभागाचे व इतर विभागीय प्रतिनिधीची पुन्हा साक्ष घेतली साक्षीच्यावेळी सागरी तट रक्षणामध्ये असलेल्या कमतरतेबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कोकण परिक्षेत्रामध्ये ३६ सागरी पोलीस स्टेशन्स असून सर्व ठिकाणी मापदंडाप्रमाणे मनुष्यबळ, अधिकारी, अंमलदार पुरविण्यात आलेले आहेत. केंद्र व राज्य शासनाकडून बोटी देण्यात आल्या असून कोकण परिक्षेत्रामध्ये सध्या एकंदर ४२ बोटी आहेत. या बोटींकरिता लागणारे डिझेल, त्यांच्या देखभाल व दुरुस्तीबाबतच्या व्यवस्थेबाबत कोठेही काही अडचण नाही. दुरुस्तीबाबतचे अधिकार पोलीस महानिरिक्षकांना दिलेले आहेत. त्यामुळे दुरुस्तीचे कामही बऱ्यापैकी झालेले आहे. पूर्वी या सर्व गोष्टी डीजींच्या स्तरावर केंद्रित होत्या. आता त्यांचे विकेंद्रीकरण करण्यात येऊन एस.पी., आय.जी. कोस्टल आणि आय.जी. कोकण यांना अधिकार दिलेले आहेत. डिझेलकरिता केंद्र शासनाकडून आगाऊ पैसे देण्याची पद्धत नाही. राज्य शासन त्याबाबतचे अयोगिता प्रमाणपत्र देते, त्याची केंद्र शासनाकडून नंतर प्रतिपूर्ती केली जाते.

४.१६ परिच्छेद क्रमांक ३.२.२ मध्ये असे नमूद केले आहे की, सुधारित आराखड्यानुसार मागणी करण्यात आलेल्या सेल्युअर इंटरसेप्टर सिस्टीम खेरिज सर्व बाबी मंजूर करण्यात आल्या. याचा अर्थ आराखड्यामध्ये सर्व गोष्टी असतील तो केवळ बांधकामाचा आराखडा नसेल. सेल्युअर इंटरसेप्टर सिस्टीम म्हणजे काय, ती कशाकरिता वजा केलेली आहे, ती देण्यात कोणती अडचण होती. ही जर अशाप्रकारे बाजूला काढलेली असेल तर मग बाकीचे इन्स्ट्रुमेंट्स दिले आहेत की नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडे जुन्या काळापासूनची २५ पोलीस स्टेशन्स होती. त्यानंतर पहिल्या फेज मधील १२ व दुसऱ्या फेज मधील ७ अशाप्रकारे १९ पोलीस स्टेशन्स सुरू? झाल्यानंतर त्यासाठी जे काही साहित्य वगैरे लागणार होते त्याकरिता केंद्र शासनाने निधी दिला होता, त्यातून ते साहित्य घेण्यात आले होते. सन २००८ च्या घटनेनंतर केंद्र शासनाने २८ तर राज्य शासनाने २९ बोटी दिल्या. अशाप्रकारे एकूण ५७ नवीन बोटी खरेदी केलेल्या होत्या. प्रत्येक पोलीस स्टेशनला किमान १ बोट याप्रमाणे त्यांचे योग्य ते वाटप झालेले आहे.

४.१७ सेल्युअर इंटरसेप्टर सिस्टीमबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ती बोटींचा शोध घेण्याबाबतची पद्धती आहे. समुद्रात एकाच वेळेस अनेक बोटी असतील तर त्याचा शोध घेण्याच्या पद्धतीला सेल्युअर इंटरसेप्टर सिस्टीम असे म्हणतात. मागील बैठकीमध्ये

या सेल्युलर इंटरसेप्टर सिस्टमबाबत चर्चा झाली होती. परंतु, त्यावेळेस ती घ्यावी असे काही ठरले नव्हते. ती सिस्टम राज्य शासनाने वजा केली की केंद्र शासनाने वजा केली, ती सिस्टम गृह विभागाला आवश्यक नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ती सिस्टम केंद्र शासनाने वगळली आहे. ती सिस्टम त्यावेळेस आवश्यक होती व आताही आहे परंतु, सन २००५ मध्ये तिला मान्यता मिळाली नव्हती.

४.१८ सन २०१६ मध्ये ती सिस्टीम विभागाकडे नाही. परंतु, विभागाच्या बोर्टीवर जीपीएस लावलेले आहे. त्यामुळे त्याला पर्याय उपलब्ध आहे. ज्ञापनात असे नमूद केले आहे की, एकूण १९ पोलीस स्टेशन्स कार्यरत आहेत. त्यातील पहिल्या फेजमधील १२ पोलीस स्टेशन्स पैकी १० पूर्ण झाली आहेत. तर दुसऱ्या फेजमधील ७ पैकी २ पोलीस स्टेशन्स पूर्ण झाली आहेत. ५ पोलीस स्टेशन्सचे काम अद्याप पर्यंत पाईपलाईनमध्येच आहे. हे काम कधी पूर्ण होणार आहे ? त्यातील १-२ पोलीस स्टेशन्स कधी पूर्ण होणार आहेत, त्याबाबतची तारीख विभागाने दिलेली आहे. परंतु, उर्वरित पोलीस स्टेशन्सबाबत काय केले जाणार आहे ? एकीकडे १९ पोलीस स्टेशन्स कार्यरत आहेत असे सांगितले आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बांधकामाअभावी पोलीस स्टेशन सुरू झाली नाहीत असा समज होऊ नये याकरिता सुरूवातीलाच तसे सांगितलेले आहे.

४.१९ पोलीस स्टेशनची स्वतःची इमारत असो की, भाड्याची तेथे साधनसामुग्री लागणारच आहे. त्यादृष्टीने साधनसामुग्री खरेदी करण्यात आलेली आहे. परंतु, बांधकामास मोठ्या प्रमाणावर उशीर झाला हा विषय मागच्या समितीच्या बैठकीतही सर्वांनी गांभीर्याने घेतला होता. त्यानंतर ७ पैकी २ पोलीस स्टेशन्सच्या बाबतीत सांगण्यात आले की, ती दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत पूर्ण होतील उर्वरित ५ पोलीस स्टेशन्सचे काम कधी, कसे व किती दिवसांत पूर्ण होणार याबाबतची कालमर्यादा विभाग ८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही ठरवू शकत नाही, ही वस्तुस्थितीही स्वीकारावी लागणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दादर, रायगड जिल्ह्यामध्ये वर्गीकृत करण्यासाठी पर्यावरण विभागाची मान्यता लागते, असा मुद्दा पर्यावरण विभागाने उपस्थित केला होता.

४.२० मुंबई सागरी पोलीस ठाणे डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण होईल. मोरा सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई हे १ वर्षात पूर्ण करण्यात येईल असे मोघम उत्तर दिले आहे. रत्नागिरीतील दाभोळ सागरी पोलीस ठाणे दिनांक ३१ डिसेंबर २०१६ रोजी पूर्ण होणे अपेक्षित आहे. ठाणे येथील पोलीस ठाण्याबाबत विभागाला एमएमआरडीएचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) पाहिजे आहे. परंतु, त्याकरिता काही कालमर्यादा असली पाहिजे. दादर, रायगडसाठी पर्यावरण विभागाची मान्यता आवश्यक आहे. पूर्णगड, रत्नागिरीसाठी जागेची मान्यता देण्यात आली नाही. मुंबई सागरी, मुंबई शहरसाठी सुद्धा अजून पर्यंत जागा मिळालेली नाही. ७ पोलीस ठाण्यांपैकी केवळ २ मार्गी लागली आहेत. उर्वरित ५ पोलीस ठाणी १ वर्षात पूर्ण करण्याबाबत विभागाकडून समितीला आश्वासन देण्यात येणार आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबतची निविदा प्रक्रिया २ वेळा केल्यानंतरही कोणी मिळाले नव्हते. आता तिसऱ्यांदा मिळालेले आहे. ती निविदा ३१ मे, २०१६ रोजी उघडण्यात आली असून विभाग त्यात यशस्वी झाला आहे. ती ऑर्डर देण्यात येत आहे बाकी ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्याचे काही मुद्दे होते त्याबाबत समितीला आश्वासन दिल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांसहीत सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी व एमएमबीचे वरिष्ठ अधिकारी या सर्वांना बोलविण्यात आले होते. अशाप्रकारे आपापसातील समन्वयाचे जे मुद्दे राहिले होते ते सर्व सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आता १ वर्षात हे सर्व पूर्ण होणे अपेक्षित आहे.

४.२१ सन २००५ मध्ये सुधारित आराखडा विभागाने पाठविला होता. त्यामध्ये त्यावेळेचे जे पोलीस स्टेशन्स व कोस्टल टॉवर्स होते, त्यांच्या उन्नतीकरणाचा (अपग्रेडेशन) प्रस्तावही विभागाने पाठविला होता. तो केंद्र शासनाने अमान्य केला, त्याची कारणे काय होती? ऑक्टोबर, २००५ मध्ये केंद्र शासनाकडे जो उन्नतीकरणाचा प्रस्ताव पाठविला होता ते आता आवश्यक आहे की नाही ? महालेखापालांच्या अभिप्रायात याबाबत नमूद केलेले आहे. २४ सागरी तट पोलीस स्टेशन व ७२ वॉच टॉवर, २४ नवीन कोस्टल आऊटपोस्ट हे आपल्या सुधारित आराखड्यामध्ये मान्य झाले नाहीत. असे समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासाठी समिती होती. त्या समितीने दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे हे प्रस्ताव पाठविले होते. परंतु, केंद्र शासनाने ते कोणत्या कारणाने नाकारले ते माहीत नाही. उन्नतीकरणाची (अपग्रेडशनची) सध्या आवश्यकता नाही. परंतु, विभागाकडून एक नवीन प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. त्यानुसार प्रत्येक सागरी पोलीस स्टेशनच्या ठिकाणी थर्मल कॅमेरा लावण्यात येणार आहे. हा प्रस्ताव विभाग स्तरावर असून तो अद्याप वित्त विभागाकडे पाठविलेला नाही. असा थर्मल कॅमेरा लावल्यास कमीत कमी ५ कि.मी. परिसरातील रात्रीच्या वेळेस फिरणारे ऑब्जेक्ट्सही दिसणार आहेत. आता लावलेले थर्मल कॅमेरे नाहीत. हे थर्मल कॅमेरे हिट सेन्स करुन ५ कि.मी. च्या रेडिअसमध्ये काही ऑब्जेक्ट्स असल्यास त्याबाबत दाखवतील. विभागाकडून हे थर्मल कॅमेरे लावण्याचा प्रस्ताव सध्या तयार करण्यात येत आहे तो वित्त विभागाने मान्य केल्यास ४४ पोलीस स्टेशनमध्ये थर्मल कॅमरे विथ कम्प्लीट कंट्रोल सिस्टम लावण्यात येणार आहे हे टॉवरपेक्षा जास्त चांगले होईल.

४.२२ विभागाने ५ कि.मी. च्या हद्दीमध्ये संपूर्ण ७२० कि.मी. ची रेंज कव्हर होणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सपूर्ण ७२० कि.मी.ची रेंज कॅमेरेच्या क्षमतेखाली येणार नाही. पोलीस स्टेशनच्या दोन्ही बाजूचा ५-५ कि.मी.चा परिसर कॅमेऱ्याच्या क्षेत्राखाली येणार आहे.

४.२३ संरक्षण पोलीस स्टेशनला हवे आहे की तटाला? सागरी संरक्षणाच्या विषयावर चर्चा होत आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की समितीचे मत योग्य आहे. परंतु, ते कॅमेरे मध्ये लावणे शक्य नाही ७२० कि.मी. करिता विभागाला ४४ पोलीस स्टेशन्स देण्यात आली आहेत. यानुसार एक पोलीस स्टेशनच्या अधिपत्याखाली अदांजे १५ ते २० कि.मी. परिसर येईल.

४.२४ महत्त्वाच्या ठिकाणी किंवा जेथे धोका आहे तेथेच कॅमेरे बसविण्यात येणार आहेत का? ते नेमके कोठे बसविण्यात येणार आहेत? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विदीत केले की, विभागाने त्याबाबतचा आरखडा अद्याप केलेला नाही. त्याबाबत विचार करण्यात येत आहे वित्त विभागाने निधी दिला तर सर्व काम करण्यात येईल.

४.२५ विभागाने सागरी तटावरील संरक्षणासंदर्भात संपूर्ण संरक्षण अभिप्रेत धरलेले आहे की, मोक्याची ठिकाणे अभिप्रेत धरलेली आहेत की, फक्त कॅमेरे घ्यायचे आणि ते महत्त्वाच्या ठिकाणी बसवायचे असे ठरविलेले आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या फक्त पोलीस स्टेशन्स घेतली आहेत कारण त्या ठिकाणी पोलीस अधिकारी असतात ते मॉनिटर करु शकतात. इतर ठिकाणी संरक्षणाची बाब विचारात घेतलेली नाही.

४.२६ विभागाकडून कॅमेरा कोठे लावण्यात येणार आहे व त्याची स्क्रीन कोठे असणार आहे या दोन गोष्टींमध्ये फरक आहे. कॅमेरे तटावर लावावे लागतील, त्यांची स्क्रीन पोलीस स्टेशनमध्ये किंवा २ कि.मी. लांबवर कोठेही असू शकेल. असे मत व्यक्त करून असे किती कॅमेरे लावण्यात येणार आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कॅमेरे तटावर लावून ट्रेंचिंग करुन, केबल्स लावून पोलीस स्टेशन्समध्ये कव्हरेज पाहता येईल. टोटल १० कि.मी. परिसराचे कव्हरेज करता येईल अशा प्रकारचे थर्मल कॅमेरा लावावयाचे आहेत. कमीत कमी ४४ कॅमेरे लावण्यात येणार आहेत.

४.२७ कॅमेरे बसविल्यामुळे ७२० कि.मी. पैकी जवळपास ४४० कि.मी. परिसर कव्हर होईल. गृह विभाग ४४ कॅमेरे बसविण्याकरिता वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविणार आहे. मग गृह विभाग पूर्ण ७२० कि.मी. परिसर कव्हर होईल याकरिता ७२ कॅमेऱ्यांबाबतची मागणी का करीत नाही? गृह विभागाने याबाबत प्रस्तावित केलेच पाहिजे. विभागाने याबाबत तडजोड करु नये. गृह विभागाची ४४ पोलीस स्टेशन्स असली तरी विभागाने त्यामध्ये कॅमेरे लावले तर त्या गावातील जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये त्यांची मॉनिटरिंग सिस्टम ठेवणे शक्य आहे. असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की गृह विभागाकडून त्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. जेथे जेटी आहेत व जेटीच्या ऑपरेशनल रुम आहेत तेथेही मॉनेटरींग सिस्टीम ठेवण्याबाबत प्रस्तावित करता येईल. एमएमबीच्या जेटीच्या बाजूला ३२ ऑपरेशनल रुम केले जात आहेत, त्यात असे १४ आहेत. ते १४ व ४४ मिळून ५८ नक्की करणे शक्य आहे. परंतु, ७२ करण्याबाबत आताच सांगता येणार नाही.

४.२८ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, त्याबाबत विभागाने आग्रह धरला पाहिजे. समिती देखील त्याबाबत शिफारस करु शकते. ते पूर्ण करण्यास काही हरकत नाही.

निधीचा वापर न होणे—

४.२९ याबाबत समितीने दिनांक ३ मे २०१६ रोजीच्या बैठकीत विचारणा केली की, सागरी सुरक्षेसंदर्भात केंद्र शासनाकडे सन २००५ पासून आतापर्यंत किती बैठका झाल्या व या बैठकांसाठी राज्य सरकारचे प्रतिनिधीत्व कोणी केले होते? माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी सुद्धा चार-पाच बैठका घेतलेल्या आहेत मेरिटाईम बोर्ड, पोलीस, डी.जी.शिपिंग आणि राज्य सरकार यांचे प्रतिनिधी या बैठकांना उपस्थित असतात. सन २००५ मध्ये केंद्र शासनाने या कामासाठी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. या योजनेत देशातील ११ राज्यांचा समावेश होता. सागरी सुरक्षेच्या बाबतीत देशात महाराष्ट्र राज्य हे अतिशय महत्त्वाचे आहे व त्याची कल्पना केंद्र सरकारला आहे. परंतु, केंद्र सरकारकडून निधी न मिळाल्यामुळे कामास विलंब झाला, हे विभागाचे म्हणणे समितीला पटण्यासारखे नाही. त्याचप्रमाणे कामे पूर्ण करणे, निधी व अन्य बाबींसंदर्भात राज्य शासनाने केंद्र सरकारबरोबर कोणता पत्रव्यवहार केला आहे, याची माहिती देखील विभागाने सादर करावी. कारण, केंद्र सरकार या कामांसाठी राज्याकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे. हा केवळ महाराष्ट्र राज्य किंवा देशाचा प्रश्न नाही तर तो जागतिक स्वरुपाचा प्रश्न आहे. भारत सरकाने युनोला असे लिहून दिलेले आहे की, आम्ही सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्यात येईल व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल परंतु, गृह विभागाने ही बाब गांभीर्याने घेतल्याचे दिसत नाही. कारण, मुंबई किंवा राज्यातील सागरी पट्टा हा दहशतवाद्यांचे लक्ष्य आहे. ही बाब लक्षात आणून देऊन त्यादृष्टीने विभागाने केंद्र सरकारबरोबर काही पत्रव्यवहार केला आहे का? या कामासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली पाहिजे. संरक्षण दलासाठी तरतूद होण्याची वाट बघितली जात नाही. त्याप्रमाणेच देशाच्या आणि राज्याच्या सागरी सुरक्षेसाठी आर्थिक तरतुदीची वाट पाहण्याची आवश्यकता नसावी, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सागरी सुरक्षेसंदर्भात केंद्र शासनाकडे सन २००५ पासून आतापर्यंत किती बैठका झाल्या, या बैठकांसाठी कोणी प्रतिनिधीत्व केले होते, या संदर्भातील तारीखवार माहिती समितीला लेखी सादर केली त्याचप्रमाणे केंद्र सरकारबरोबर करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची माहिती देखील समितीला सादर केली.

४.३० देशाच्या सुरक्षेच्या संदर्भातील हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अन्य योजनांच्या संदर्भात ज्याप्रमाणे निधी व अन्य कारणे सांगण्यात येतात त्याप्रमाणे याबाबत होता कामा नये. सन २००५ व सन २०१० मध्ये केंद्र सरकारने राज्याला निधी दिला आहे. परंतु, राज्य सरकार हा निधी सन २०१४ पर्यंत खर्च करु? शकलेले नाही. त्यामुळे विभागाकडून केंद्र सरकारला का दोष देण्यात येत आहे अशी विचारणा करून, हा काही शिक्षकांचे पगार वाढविण्याचा विषय नाही. हा सुरक्षेसंदर्भातील विषय आहे. त्यामुळे त्यासाठी तरतूद झालीच पाहिजे. राज्य शासनाने यासाठी तरतूद केली म्हणून त्यास सभागृहात विरोध करण्यात येणार नाही. खर्च करीत असताना काही त्रुटी राहिल्या तर प्रश्न विचारण्यात येईल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या कामासाठी २ कोटी, ७३ लक्ष, ५७ हजार, २०६ रुपये किमतीच्या कामांचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याचे काम बऱ्याच काळापासून प्रलंबित होते. पण आता ही प्रमाणपत्र सादर करण्यात आली आहेत. गृह विभागाकडे एकही उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याचे काम प्रलंबित नाही. शेवटचे उपयोगिता प्रमाणपत्र दिनांक ३० एप्रिल २०१५ रोजी सादर करण्यात आले आहे.

४.३१ उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी काही कालमर्यादा निश्चित करुन दिलेली असते. उपयोगिता प्रमाणपत्र ४ वर्षानंतर पाठविली आहेत. नियमानुसार किती कालावधीत ती सादर करण्याची आवश्यकता होती? हे स्पष्ट आहे की, राज्य सरकारने विहित मुदतीत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेली नाहीत. साक्ष आयोजित केल्यानंतर विभागाने प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेली आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, ब्रिजिंग आवश्यक आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत. केंद्र सरकारने निधी मुक्त केल्यानंतरही राज्य सरकारने संबंधित यंत्रणेकडे किंवा विभागाकडे तो वर्ग केलेला नाही. गृह विभागाने अनेक वेळा वित्त विभागाला सादर केलेले आहे की, केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झालेला आहे, विभागाचे कामही पूर्ण झालेले आहे त्यामुळे निधी देण्यात यावा. परंतु, निधी देण्यात आला नाही.

४.३२ केंद्र सरकारकडून निधी मिळाल्यानंतरही जर वित्त विभाग निधी उपलब्ध करून देत नसेल तर ही बाब गंभीर आहे. यासंदर्भात सचिवांनी विशिष्ट उदाहरणे समितीच्या निदर्शनास आणून द्यावीत. जेणेकरुन समिती त्याबाबत योग्य ती शिफारस शासनाला करु? शकेल असे मत व्यक्त करून, समितीने वित्त विभागाच्या सचिवांकडे याबाबत विचारणा केली, असता वित्त सचिवांनी सदर बाब तपासण्यात येईल असे सांगितले.

४.३३ केंद्र सरकारने निधी वितरित केल्यानंतरही वित्त विभागाने निधी न दिल्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करता आलेली नाहीत, अशी परिस्थिती ज्या कामांबाबत चर्चा करण्यात येत आहे. त्याबाबत आहे का? वित्त विभागाकडून गृह विभागास निधी मिळाला नाही म्हणून कामे पूर्ण करता आली नाहीत व त्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्र पाठविता आले नाहीत. अशी बाब आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी हि बाब मान्य केली व सांगितले की, काम अर्धवट असेल, प्लिंथपर्यंत झाले असेल तर उपयोगिता प्रमाणपत्र पाठविता येत नाही. त्याचप्रमाणे किमतीमध्ये देखील वाढ झाली आहे.

४.३४ केंद्र सरकारने कधी निधी मुक्त केला? राज्य सरकारला तो निधी कधी प्राप्त झाला? गृह विभागाने वित्त विभागाकडे निधीची मागणी कधी केली? आणि वित्त विभागाने गृह विभागास निधी कधी वर्ग केला? याबाबतची तपशिलवार माहिती, आवश्यक कागदपत्रांसह समितीला सादर करावी. असे यासंदर्भात समितीने सूचविले (माहिती अप्राप्त आहे).

४.३५ केंद्र शासनाने मंजूर केलेल्या १०४.०५ एवढ्या निधीची सद्यःस्थिती काय आहे ? या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र कधी देण्यात आले आहे? आवर्ती खर्चासाठी विभागाकडून मागणी सादर करण्यात येते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पेट्रोल, डिझेल, ल्युब्रिकंट, ट्रेनिंग आणि रिपेअर ॲण्ड मेंटेनन्ससाठी पैसे मिळतात. त्या संदर्भात लक्षणीय निधी प्रलंबित नाही.

४.३६ ७.०५ लक्ष रूपये नोव्हेंबर, २०१४ पर्यंत खर्च झालेले नाहीत या महालेखापालाच्या आक्षेपा संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, २.०९ कोटी रुपये मेरिटाईम बोर्डाला ऑपरेशनल रुम्स बांधकामासाठी देण्यात आले होते. या संदर्भातील माहिती देताना मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी विदित केले की, एकूण १४ ठिकाणी ऑपरेशनल रुम्स बांधावयाच्या होत्या. ७ ठिकाणी रूम्सचे बांधकाम करण्यात येऊन त्या पोलीस विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. ६ ठिकाणी बांधकाम प्रगतीपथावर आहे. २ ठिकाणी प्रिफॅब्रिकेशन पद्धतीने बांधकाम करावयाचे आहे व एका ठिकाणी जागेच्या अडचणीमुळे बांधकाम होऊ शकलेले नाही. लवकरच उर्वरित कामे पूर्ण होऊन १४ पैकी १३ बांधकामे हस्तांतरीत करण्यात येतील

४.३७ सन २०१० पासून केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे. परंतु, आजही बांधकाम पूर्ण झालेले नाही. गृह विभागाला कधी निधी प्राप्त झाला, या कामांची निविदा कधी काढण्यात आली, निविदा अंतिम कधी करण्यात आली, काम पूर्ण करण्याचा कालावधी किती होता, काम किती कालवधीत पूर्ण झाले, कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, काही ठिकाणी जागेची अडचण होती व काही ठिकाणी पोलीस विभागाला जागा योग्य वाटली नाही.

४.३८ या ऑपरेशनल रुम्स आहेत. या बांधण्यासाठी सन २०१० मध्ये निधी वितरित झाला आहे. परंतु, सन २०१६ पर्यंत काम पूर्ण होऊ शकलेले नाही. काम पूर्ण न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. विभागीय सचिवांची साक्षीच्यावेळी सचिवांनी सर्व माहिती घेऊन उपस्थित राहणे आवश्यक होते. एकूण १४ कामांपैकी ७ कामे अपूर्ण आहेत. त्यांची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, काही ठिकाणी जागेची अडचण होती. जागेची अडचण सोडवून काही कामे मार्गी लावलेली आहेत.

४.३९ विभागाने लेखी स्पष्टीकरणात असे नमूद केले आहे की, ५३ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. उर्वरित निधीचे काय नियोजन केले आहे ? जर १४ कामांपैकी ७ कामे पूर्ण झाली असतील तर निम्मा निधी खर्च व्हावयास हवा होता. २०९.३७ लक्ष एवढ्या निधीमधील फक्त ५३,६७,९२३ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. याबाबत विभागाचे काय स्पष्टीकरण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही कामे फिजिकली पूर्ण करण्यात आली आहेत. अंतिम देयक नंतर अदा केले जाते. या कामांची अंतिम देयके झाली नसावीत. त्यामुळे खर्च कमी दिसत आहे. यामधील ४ कामे प्रगतीपथावर आहेत व २ कामांबाबत पोलीस महासंचालकांनी असे कळविले आहे की, वीट बांधकाम न करता प्रिफॅब्रिकेशनव्दारा काम करण्यात यावे. त्यामुळे कामात बदल झाला असून नवीन आराखडा तयार केला आहे. वसई येथे जागेची अडचण आहे. या कामांसाठी विलंब झाला आहे. सन २०११ मध्ये कामे पूर्ण व्हावयास हवी होती विभागाने दिलेल्या लेखी माहितीनुसार १४ पैकी ५ कामे पूर्ण झाली आहेत, ४ प्रगतीपथावर आहेत व एका ठिकाणी जागेची अडचण असून ५ कामे सुरू करण्यात आलेली नाहीत, परंतु आता तोंडी उत्तर वेगळे देण्यात येत आहे. वास्तविक पाहता, विभागाने ही लेखी माहिती साक्षीच्या दिवशी सकाळी ११-०० वाजता समितीला दिली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एका आठवड्यापूर्वीची स्थिती लेखी माहितीमध्ये दिलेली आहे. अधिकारी कालपर्यंतची सद्यःस्थिती सांगत असल्याने ही तफावत आहे.

४.४० या कामांना १० वर्षाचा विलंब झाला आहे आणि केवळ एका आठवड्यात एवढी प्रगती झाली आहे का ? या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी देखील उपस्थित आहेत. गृह विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी वर्ग केलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने विहित मुदतीत काम केले आहे का, नसल्यास, त्यांना कोणत्या अडचणी आल्या आहेत, याबाबतचा खुलासा त्याच विभागाने करणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, टप्पा क्र.१ अंतर्गत एकूण १२ कामे मंजूर होती. त्यापैकी ११ कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होती. ११ कामांपैकी ९ कामे पूर्ण झालेली आहेत. मार्च, २००९ पासून या कामासाठी निधी प्राप्त होण्यास सुरूवात झालेली आहे.

४.४१ यापूर्वी समितीला ६ कामे पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. परंतु, आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधीकडून ९ कामे पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत आहे. अशी विचारणा समितीने केली असता याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, ती कामे वेगळी आहेत. टप्पा क्र.१ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे एकूण १२ कामे दिलेली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पोलीस स्टेशनचे बांधकाम करण्यात येते.

४.४२ फेज-१ आणि फेज-२ वेगवेगळे आहेत. पोलीस स्टेशन, सागरी पोलीस स्टेशन, तपासणी नाके आणि ऑपरेशनल रुम्स हे वेगवेगळे आहेत. ऑपरेशनल रुमचे काम महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून केले जाते आणि सागरी पोलीस ठाणे, तपासणी नाक्यांचे बांधकाम विभागामार्फत केले जाते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले का, आता ११ कामांपैकी ९ कामे पूर्ण झालेली असून २ कामे जागेअभावी प्रलंबित आहेत.

४.४३ मुंबई शहरात मोठी घटना घडली होती. ही सर्व कामे तीन महिन्यांत पूर्ण व्हावयास पाहिजे होती. त्या घटनेत अनेक लोकांचा बळी गेलेला आहे. सरकार, प्रशासन त्याला इतक्या सहजने घेत असेल तर ही अत्यंत खेदाची बाब आहे. यासाठी जो शब्द वापरावा तो कमी आहे. सरकार, प्रशासन किती दक्ष आहे हे यावरुन सिद्ध होते. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले तसेच समितीने विचारणा केली की, फेज-१ अंतर्गत २ सागरी पोलीस ठाणे, ५ तपासणी नाके यापैकी किती कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच, फेज-२ अंतर्गत ७ पोलीस ठाण्यापैकी ३ पोलीस ठाण्यांसाठी जागा मिळाली असून ती कामे प्रगतीपथावर आहेत. परंतु, ४ पोलीस ठाण्यांसाठी जागाच मिळालेली नाही. ९ पोलीस ठाण्यांपैकी किती पोलीस ठाण्यांचे काम पूर्ण झाले आणि किती कामे प्रगतीपथावर आहेत? त्याचबरोबर, तपासणी नाक्यांसाठी अद्याप जागा मिळालेली नाही, अशी परिस्थिती आहे. यामध्ये काही विसंगती असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याबाबत समितीला माहिती द्यावी. असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, टप्पा-१ मधील ११ कामांपैकी ९ कामे पूर्ण झालेली असून २ कामे जागेअभावी सुरू व्हावयाची आहेत. ती २ कामे म्हणजे सागरी पोलीस ठाणे, बृहन्मुंबई हे काम जमीन उपलब्ध नसल्यामुळे सुरू झालेले नाही. तसेच, मोरा सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे जागा प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे नकाशे तयार करण्यात आले.

४.४४ उत्तरामध्ये खूप विसंगती आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वेगळा निधी आहे आणि मेरिटाईम बोर्डाकडे वेगळा निधी आहे. एकूण १४ कार्यकारी कक्षांसाठी निधी उपलब्ध होता. त्यांनी सांगितले की, एका कक्षासाठी वन विभागाची अडचण आहे. उर्वरित १३ कक्षांपैकी ७ कक्ष पूर्ण झालेले आहेत. जी लेखी माहिती आहे ती वेगळी आहे आणि यांनी दिलेली माहिती वेगळी आहे. यावरुन काही स्पष्ट होत नाही. लेखी माहितीमध्ये असे म्हटलेले आहे की, महाराष्ट्र राज्य गृह निर्माण व कल्याण महामंडळाने निविदा काढलेल्या आहेत. परंतु, दुसऱ्या बाजूला सांगितले जाते की, सार्वजनिक बांधकाम विभाग हे काम करीत आहे. म्हणजे ही कामे नेमकी कोणत्या विभागाची आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात १२ पोलीस स्टेशनची बांधकामे करावयाची होती. त्यापैकी आज रोजी ९ बांधकामे पूर्ण झालेली असून ती वापरात आहेत. उर्वरित ३ कामांपैकी आचरा येथील काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे, मुंबई सागरी पोलीस ठाणे, माहिम

रेतीबंदर पोलीस हाऊसिंग बोर्डाकडे आणि मोरा सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. या ३ पोलीस ठाण्यांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. ही कामे सुरू न होण्याच्या कारणाबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई सागरी पोलीस ठाण्याचे काम पोलीस हाऊसिंग बोर्डाकडे आहे. त्यांनी दोन वेळा निविदा काढल्या होत्या. परंतु, त्याला पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. उद्योग विभागाच्या नियमाप्रमाणे जोपर्यंत तीन निविदा मिळत नाहीत तोपर्यंत मुदतवाढ देऊन नवीन टेंडर काढावे लागते. त्यांनी २ मे २०१६ रोजी तिसरी निविदा काढलेली आहे. ३१ मे २०१६ पर्यंत ती निविदा ओपन करून हे काम सुरू करण्यात येणार आहे.

४.४५ पहिली निविदा, दुसरी निविदा आणि तिसरी निविदा केव्हा काढण्यात आली होती ? हे काम किती वर्षापासून सुरू आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या निविदेला प्रतिसाद मिळाला नव्हता. पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशनमध्ये बांधकामासाठी ४५ दिवसांची मुदत असते पोलीस हाऊसिंगकडे हे काम एका वर्षापूर्वीच दिलेले आहे.

४.४६ पहिली निविदा काढल्यानंतर त्याला प्रतिसाद मिळाला नाही तर दुसऱ्या निविदेसाठी ४५ दिवसांची मुदत देण्याची आवश्यकता नसते. विभागाने ४५ दिवसाची मुदत दिली. समजा १ जानेवारी रोजी पहिली निविदा काढली आणि त्याला १५ फेब्रुवारी पर्यंत प्रतिसाद मिळाला नाही तर दुसरी निविदा केव्हा काढण्यात आली आणि त्यानंतर तिसरी निविदा केव्हा काढण्यात आली ? हे काम एका वर्षापूर्वी पोलीस हाऊसिंगकडे दिलेले आहे. परंतु, हे काम तर पूर्वी पासूनच मंजूर आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे काम झाले नव्हते. म्हणून ते पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशनकडे दिलेले आहे. यामध्ये विलंब झालेला आहे. उद्योग विभागाने ऑक्टोबर महिन्यात प्रोक्युरमेंट पॉलिसी डिक्लेअर केलेली आहे. पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही तर ७ दिवसाची मुदतवाढ द्यावी, असे त्यामध्ये नमूद केलेले आहे. परंतु, त्यामध्ये एक त्रुटी आहे. ती त्रुटी अशी आहे की, किती निविदा आलेल्या आहेत हे जोपर्यंत इलेक्ट्रॉनिकली बघत नाही की, तोपर्यंत मुदतवाढ देणे शक्य नाही. निविदा उघड्या केल्यानंतर ते पात्र आहेत किंवा नाहीत. आता असे इन्टरप्रिटेशन सुरू आहे की, ३ पात्र निविदा तांत्रिक दृष्टया उघडण्यात याव्यात त्यापैकी दोन निविदा बाद झाल्या आणि एकच पात्र निविदा मिळाली. मग त्या सॉफ्टवेअरमध्ये मुदतवाढ देण्याची तरतूद नाही. या सॉफ्टवेअरमध्ये मुदतवाढ देण्याची तरतूदच नाही. याबाबत विभागाला पुन्हा निविदा काढावी लागेल. त्यामुळे उद्योग विभागाच्या धोरणामध्ये आणि सॉफ्टवेअरमध्ये तफावत आहे. ही तफावत निदर्शनास आणून दिलेली आहे की, मुदतवाढीबद्दल सांगण्यात येते, परंतु मुदतवाढ देता येत नाही. कारण, किती निविदा आल्या हे समोर दिसतच नाही, ती उघडावीच लागते.

४.४७ निविदा काढण्यात येतात त्याला चेक लिस्ट देण्यात येते निविदा उघडण्यापूर्वी ती चेक लिस्ट संगणकावर दिसते. त्या पूर्ण असतील तरच निविदा उघडण्यात येतात अन्यथा निविदा उघडत नाही. मग काय अडचण आहे अशी विचारणा समितीने केली असता. विभागीय सचिवांनी सांगितले की, अडचण अशी आहे की, ३ निविदा दिसल्या, त्याचा टेक्निकल भाग उघडण्यात आला त्यापैकी एक निविदा बाद झाली तर दोनच निविदा राहतात. पोलीस स्टेशनचे काम अंदाजे ५ कोटीरूपयांपेक्षा जास्त किमतीचे असल्याचे देखिल निविदा काढणे आवश्यक होते.

४.४८ याबाबत चेक लिस्ट पूर्ण नसेल तर निविदाच उघडत नाही. सॉफ्टवेअरमध्ये प्रॉप्रब्लेम आहे, असे विभागाचे म्हणणे आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.४९ जी निविदा काढली जाते ती पूर्ण कामाची काढली जाते का पार्टली काढली जाते ? लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, ' ७ सागरी पोलीस ठाण्याकरिता संबंधित सागरी पोलीस घटक प्रमुखांकडून व पोलीस महासंचालक यांचेकडून सर्व साधनसामुग्री खरेदी करण्यात आलली आहे. ' मग कशाची निविदा मागविण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सिव्हिल वर्कची निविदा वेगळी असते. पोलीस स्टेशनसाठी वेगळी निविदा काढली जाते आणि इतर साधनसामुग्री डी.जी. विकत देतात.

४.५० विभागाने ३ पोलीस स्टेशनची कामे हाती घेतली. मग ७ पोलीस स्टेशनकरिता लागणारी सामुग्री खरेदी करण्याचे काय कारण होते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक ठिकाणी पोलीस स्टेशन ऑपरेशनल आहे. फक्त काही ठिकाणी गृह विभागाची इमारत नाही, हा मुद्दा आहे. तात्पूरते भाड्याच्या इमारतीमध्ये पोलीस स्टेशन सुरू केलेली आहेत. साधनसामुग्री देखील दिलेली आहे. परंतु, ज्या ठिकाणी गृह विभागाची इमारत नाही, तो मुद्दा आहे.

४.५१ हा सागरी सुरक्षेच्या संदर्भातील विषय आहे. समितीला आणि शासनाला देखील या विषयाचे गांभीर्य आहे. मुंबई शहरात एक दुर्दैवी घटना घडली होती. केंद्र शासनाकडून राज्याला आणि इतर राज्यांना देखील निधी मिळतो. परंतु, इतर राज्यांपेक्षा आपल्या राज्याला त्याची अधिक गरज आहे. कारण, आपल्या राज्यावर यापूर्वी त्याचा परिणाम झालेला आहे. हे काम इतकी वर्षे लांबविणे, बांधकामासाठी आलेला निधी खर्च न करणे, त्यासाठी वेळ लागणे किंवा त्याचे गांभीर्य नसणे हे योग्य नाही. हा विषय गृह विभागाशी संबंधित आहे. बांधकाम विभाग किंवा इतर विभाग जरी संबंधित असले तरी सुरक्षेचा प्रश्न गृह विभागाच्या अखत्यारित येतो. परंतु, गृह विभागाने या संदर्भात बैठका घेऊन तत्काळ बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे, तत्काळ साहित्य प्राप्त झाले पाहिजे यासाठी प्रयत्न केल्याचे दिसत नाही. यामध्ये मुद्दाम विलंब केला जातो किंवा कसे हे कळत नाही. शासनाने सागरी किनाऱ्याच्या संदर्भातील विषय गांभीर्याने घेऊन हे काम विशिष्ट कालावधीत पूर्ण केले पाहिजे. हा लोकांच्या

जीवाशी खेळ आहे. समितीकडून सुरक्षेच्या विषयासंदर्भात गांभीर्याने चर्चा करण्यात येते ज्यावेळी घटना घडते त्यावेळी असे म्हटले जाते की, १५ दिवसात सर्व काम पूर्ण करावे. त्यासाठी मान्यताही मिळते, निधीही मिळतो. म्हणजे कोणताही प्रस्ताव आला तरी त्याला सर्व जनता होकार देते आणि हे काम प्रथम करावे असे सांगते. सन्माननीय सदस्य सभागृहात चर्चा करतात की, शासनाने यासाठी चांगली तरतूद केलेली आहे, हे काम तत्काळ व्हावयास पाहिजे. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत. परंतु, केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर देखील ७-७ वर्षे हे गांभीर्याने घेतले जात नसेल तर कार्यवाही केली पाहिजे. सुरक्षेच्या संदर्भात गांभीर्य दाखविण्यात येणार नसेल मग कोणावर जबाबदारी निश्चित करायची ? उद्या एखादी घटना घडली तर ही उत्तरे देण्यासाठी परिषद घेण्यात येणार आहोत काय की, हे करणे शक्य झाले नाही, ते करणे शक्य झाले नाही यासाठी ७ वर्षे लागली, १० वर्षे लागली, या अधिकाऱ्यांमुळे विलंब झाला, बांधकाम विभागामुळे विलंब झाला, आता हे काम पोलीस हाऊसिंग बोर्डाकडे दिलेले आहे. अशी कारणे विभागाकडून दिली जातात हे काम वेळेत का पूर्ण केले गेले नाही ? यासाठी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी या संदर्भात कोणाची गय करण्याची आवश्यकता नाही, याची गृह विभागाने काळजी घेतली पाहिजे. कारण, यामध्ये वेगवेगळे विभाग आहेत. प्रत्येक विभागाच्या ज्या काही पद्धती असतील त्या पद्धतीने त्यांचे कामकाज सुरू राहील. परंतु, याकामाची गरज आहे आणि एका विशिष्ट कालावधीत काम पूर्ण झाले नाही तर संबंधितांवर कारवाई करण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना दिल्या पाहिजेत आणि संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे. एखादे उदाहरण जरी दिसले तरी पुन्हा असे होणार नाही. याकडे गांभीर्याने बघितले पाहिजे. ही संपूर्ण जबाबदारी गृह विभागाची आहे. असे समितीने व्यक्त केले.

४.५२ या कामासाठी काढण्यात आलेल्या निविदाबाबत माहिती सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की यासाठी पहिली निविदा दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी व दुसरी विविदा १६ एप्रिल २०१६ रोजी काढली यासंदर्भात समितीने विचारणा केली की, ज्या विभागाने निविदा काढल्या त्या विभागाला गृह विभागाने निधी केव्हा उपलब्ध करु दिलेला आहे ? गृह विभागाने हे काम त्यांच्याकडे केव्हा दिले ? त्यांनी जानेवारी पासून एप्रिल पर्यंत तीन टेंडर बरोबर काढलेले आहेत. तिन्ही टेंडरची तारीख बरोबर आहे. परंतु, सुरूवातीला विलंब झालेला असल्याचे कोणत्याही स्तरावर विलंब झालेला असला तरी कारवाई केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी पहिली निविदा काढण्यात आली होती. पोलीस हाऊसिंगकडे निधीची अडचण नाही. दिनांक १८.०१.१३ आणि ११.०६.२०१४ रोजी दोन टप्प्यात निधी दिलेला आहे.

४.५३ गृह विभागाने सन २०१३ आणि २०१४ मध्ये निधी दिला आणि सन २०१६ मध्ये निविदा निघालेल्या आहेत. याबाबत संबंधितांवर कारवाई करून समितीला माहिती सादर करावी. कोणत्याही आरोपीला सोडण्यात येऊ नये किंवा त्याचे समर्थन करू नये. अमूक तारखा आहेत, ही कारणे आहेत. असे सचिवांकडून सांगण्यात येते. विभाग प्रमुखाला स्वाभाविकपणे इतरांना सांभाळून घेण्यासाठी तसे बोलावे लागते. परंतु, यासाठी जो कोणी जबाबदार असेल, अमूक तीन लोकांमुळे विलंब झालेला आहे तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. दोन-तीन ठिकाणी समर्थन करणे शक्य आहे. परंतु, सर्वच ठिकाणी समर्थन करता येण्यासारखे नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत कारवाई करण्यात येईल.

४.५४ या संदर्भात खूप विसंगती असून काही स्पष्टता होत नाही. यामध्ये प्रत्येक गोष्टीसाठी जे जबाबदार आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. विभागाने निधी विलंबाने दिला असेल वित्त विभागाने गृह विभागास विलंबाने निधी मुक्त केला असेल, गृह विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी दिला आणि त्यांनी काम केले नाही अशी कारणे दाखवून निर्णय घेण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व त्याचा अहवाल १५ दिवसांत समितीस द्यावा, जागेची अडचण असलेली जागा जिल्हाधिकाऱ्यांकडून एका दिवसात ती मिळू शकते. परंतु, ही कामे फक्त कागदावर आहेत का प्रत्यक्षात आहेत याची संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी असे समितीने मत व्यक्त केले.

४.५५ विभागाकडून समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे समितीने दिनांक १ जून, २०१६ रोजी विभागीय सचिव व प्रतीनिधींची पुन्हा साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, परिच्छेद क्रमांक ३.२.३ मध्ये असे नमूद केले आहे की, विभागाकडे ५७ लक्ष रु?पये शिल्लक आहेत, त्याबाबत सांगताना विभागीय सचिवांनी नमूद केले की, गेल्या बैठकीच्या वेळेस जी परिस्थिती होती त्याच्या १ कोटी १५ लाख रु?पयांनी विभाग पुढे गेला आहे. त्यामुळे आज ५७ लाख रु?पये शिल्लक आहेत.

४.५६ विभागाने त्यांच्याकडील निधी वळता करु?न उपलब्ध करून दिला. तो निधी विभागाकडे होता की, हाऊसिंग बोर्डाकडे आहे की, मेरिटाईम बोर्डाकडे आहे ? तेथे असला तरी तो निधी योग्य प्रकारे खर्च केला पाहिजे होता. निधी खरेदीसाठी खर्च केला ते मान्य आहे. परंतु, विभागाने निधी वळता केला तो मेरिटाईम बोर्डाकडे जमा आहे किंवा हाऊसिंग बोर्डाकडे देखील बांधकाम सुरू? न झाल्याने निधी पडून आहे. महालेखापालांचा निधीचा वापर न होण्याबाबतचा मुद्दा होता. त्याबाबत आज देखील तीच परिस्थिती आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जोपर्यंत एजन्सी विभागास बांधकामाचे उपयोगिता प्रमाणपत्र देत नाही तोपर्यंत निधी खर्च करता येत नाही काही ठिकाणी काम सुरू? आहे.

४.५७ यावर समितीने विचाराणा केली की, ५ बांधकामांना सुरूवातच झाली नाही, मग हाऊसिंग बोर्डाचे बांधकाम कोठे सुरू आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मार्च महिन्यामध्ये १ ऑर्डर दिलेली आहे त्याचे काम सुरू आहे. हाऊसिंग कार्पोरेशन व सार्वजनिक बांधकाम विभागाची अंतरिम बिल देण्याची पद्धत वेगळी आहे. हाऊसिंग कार्पोरेशन प्लिंथप्रमाणे बरोबर काम झाले आहे की नाही ते पाहून तसेच टप्प्याप्रमाणे निरिक्षण करुन प्रदान करते. ते प्रदान लवकर होते. सार्वजनिक बांधकाम विभाग प्रत्येक ठिकाणी तपशीलामध्ये मोजमाप करतो. त्यांना देयक तयार करायला १५ दिवस तर प्रदान करायला १५ दिवस अशाप्रकारे १ महिना लागतो. गृहनिर्माण प्राधिकरण ७ दिवसांच्या आत प्रदान करते. अमुक इतके प्रदान केले आहे त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र विभागाकडे आल्यानंतर गृह विभागाने निधी मुक्त केला At any point of time some money will always be in the pipeline until the work is fully completed.

४.५८ विभागाकडे ५७ लाख रुपये शिल्लक आहेत, त्यांचे काय नियोजन केले जाणार आहे टप्पा एकची ३८ तर टप्पा दोनची ५७ कामे आहेत त्याबाबत सांगताना विभागीय सचिवांनी विदित केले की, आराखड्या प्रमाणे ५७ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च येईल. कारण एका ठिकाणी सुरूवातीचे अंदाजपत्रक ११ लाख रुपयांचे होते. ते वाढत गेले. गेल्या आठवड्यामध्ये आर्किटेक्टने याबाबत स्पष्ट केलेले आहे. त्यानंतर ते सुधारित केले जात आहे. त्यामुळे ते कमीत कमी ११ लाख रुपयांनी वाढेल. तसेच एखाद्या ठिकाणी आणखी गरजेप्रमाणे प्रमाणे कदाचित वाढेल. हा बोजा केंद्र शासन घेणार नाही तो गृह विभागवरच टाकला जाईल. त्यामुळे गृह विभागास वित्त विभागाकडे जावे लागेल. गृह विभागाच्या नियतव्ययातून ११ ते १२ लाख रुपये मंजूर करावयाचे आहेत. गृह विभाग जास्त नियतव्यय मागत नाही.

४.५९ सूधारित प्रशासकीय मान्यतेचा जो निधी विभागाला लागणार आहे, त्याचा भार मॅचिंग ग्रांट म्हणून राज्य शासनालाच सोसावा लागणार आहे. अशी पद्धतच आहे. केंद्र सरकार काही तो निधी देणार नाही त्यामुळे केंद्र शासनाकडे त्यासाठीचा पाठपुरावा करण्यात वेळ घालविण्यापेक्षा राज्य शासनाने काम सुरू केल्यास ते पूर्ण होऊ शकेल. असे मत समितीने व्यक्त केले. कामाचा खर्च इतका वाढण्याची कारणे काय आहेत ? डीएसआर कोणत्या वर्षाचा होता ? अशी विचारणा वित्त विभागाच्या सचिवांनी केली असता गृह विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, सन २००५ पासून प्रशासकीय मान्यता, जागा शोधणे, डिझाईन करणे वगैरे वेगवेगळ्या कारणांमुळे खर्च वाढत गेला आहे. सन २००६-२००७ पासून पोलीस स्टेशन सुरू केले आहे. परंतु, प्रत्यक्ष बांधकाम करण्यामध्ये सन २०१२ आले. डी.एस.आर. त्या त्या वर्षाचा होता. शेवटी जेव्हा जेव्हा वर्कऑर्डर दिली त्या-त्या वर्षाचा होता.

४.६० सामान्यतः वर्कऑर्डर देण्यास उशीर झाला असल्यास ३ वर्षांच्या जिल्हा दर सूची मध्ये (डी.एस.आर.) फरक पडतो हे मान्य आहे. परंतु, वर्कऑर्डर तेव्हाच दिली असेल तर एवढा फरक येण्याची कारणे काय आहेत? असा फरक पडायला नको होता. असे मत वित्त विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले असता गृह विभागाच्या सचिवांनी सांगितले की, स्कोप वाढला असेल तरच असे होते अन्यथा असे होत नाही.

४.६१ वर्कऑर्डर दिली नाही कारण जागा उपलब्ध नव्हती, ना-हरकत प्रमाणपत्र नव्हते वगैरे अनेक कारणे होती. असे मत समितीने व्यक्त केले.

४.६२ परिच्छेद क्र ३.२.३. मध्ये असे नमूद केले आहे की, २०९.३७ लाख एवढा निधी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डास १४ ऑपरेशनल रुम बांधण्याकरिता वर्ग करण्यात आलेला आहे आणि महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने ५३ लाख रुपयेच खर्च केलेले आहेत. याचा अर्थ २ कोटी ९ लाख रु?पयांतील केवळ ५३ लाख रुपयेच खर्च केले आहेत. उर्वरित काम पूर्ण करण्याची मेरिटाईम बोर्डाची क्षमता आहे काय ? कारण पुढे असे नमूद केले आहे की, द्व बांधकाम उचित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत संबंधितांना योग्य ते निदेश देण्यात आले आहेत. द्व मात्र केवळ एवढे करुन विभागाचे, शासनाचे काम संपत नाही. याबाबतची जबाबदार व्यक्ती निश्चित केली पाहिजे. त्यांच्याकडे कालबद्ध मर्यादेत हे काम देणे आवश्यक आहे. त्या कालमर्यादेमध्ये जर हे काम केले नाही तर त्याला जबाबदार कोण आहे, त्यांच्यावर काय कारवाई करणार याचे निदेश दिले पाहिजेत. कारण हे २ कोटी ९ लाख रुपये कधी दिले आहेत, त्याचा उल्लेख नाही. ५३ लाख रुपये ऑपरेशनल रुम बांधण्याकरिता खर्च केले आहेत. ऑपरेशनल रु?म बांधण्यामध्ये असे काय मोठे आर्किटेक्चरल वर्क आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, २०९.३७ लक्ष रु?पये दिनांक २८.४.२०१४ रोजी मिळाले आहेत. आताचा खर्च ८८ लाख ६१ हजार रुपये इतका आहे. ५३ लाख रुपये कधी खर्च केले आहेत ? सन २०१४ पासून विभागाने काम सुरू केले. गेल्या दोन वर्षात ऑपरेशनल चौकी बांधण्यासाठी ८८ लाख रुपये खर्च केले आणि १.२० कोटी रु?पये तसेच पडून होते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाने मेरीटाईम बोर्डाला दोन ठिकाणच्या जागा दिल्या होत्या, परंतु त्यापैकी एका ठिकाणची जागा मिळालेली नव्हती. ज्या जागेचे लोकेशन गृह विभागाकडून सांगितले जाते. ती जागा राज्य सरकारची आहे, परंतु ती स्मशानभूमीसाठी आरक्षित होती मेरीटाईम बोर्डाकडे एकूण १४ कामे होती त्यापैकी ७ कामे पूर्ण झाली असून ५ कामे हस्तांतरित झालेली आहेत.

४.६३ १.२० कोटी रुपये मेरीटाईम बोर्डाकडे शिल्लक आहेत, त्यापैकी on going work किती आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींची सांगितले की, On going work झालेले आहे. त्यासाठी मेरीटाईम बोर्डाला एवढे पैसे लागणार नाहीत. जून २०१६ पर्यंत ही सर्व कामे पूर्ण होणार आहेत.

४.६४ महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांना दिलेल्या निधीपैकी केळवा, जिल्हा पालघर येथे ३.३६ कोटी रुपये खर्च होणार आहेत. अर्नाळा, जिल्हा पालघर येथे २.१० लाख रुपये खर्च होणार आहेत. उत्तन येथे कामाची अडचण आहे. ४ ठिकाणी बांधकाम सुरू असून एका ठिकाणी एमएमआरडीएची अडचण आहे. त्यांना पत्र दिलेले आहे. उत्तन येथील कामावर ३.३६ कोटी रुपये खर्च होतील. साधारणपणे ५ कोटी रुपयापर्यंत हे काम जाईल.

उपयोगिता प्रमाणपत्र सादर न करणे :

४.६५ विभागास वेळोवेळी निधी मिळतो. परंतु, सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीतील ६ कोटी ५० लाख रुपयांची मागणी दिनांक १३ एप्रिल २०१६ रोजी सादर केलेली आहे. त्याच प्रमाणे, ४१ लाख रुपयांची मागणी दिनांक १४ मार्च २०१६ रोजी केलेली आहे. तसेच, २ कोटी ७३ लाख रुपयांची मागणी दिनांक ३० एप्रिल २०१६ रोजी केलेली आहे. म्हणजे विभागास नियमितपणे पैसे मिळतच नाहीत. विभागास ४-४ वर्षांपासून पैसे मिळत नाहीत. परंतु विभागास सचिवांनी सागितले की, त्यांना नियमितपणे पैसे मिळतात. विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीपेक्षा ही माहिती वेगळी आहे. यामध्ये दोन प्रश्न निर्माण होतात. दरवर्षी निधी मागितला पाहिजेत अशी पद्धत असताना विभागाने निधी मागितला नाही, याकरिता कोणते अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्या विरुद्ध काय कारवाई करण्यात येणार आहे? महालेखापालांनी सन २०१४ मध्ये प्रतिपूर्तीबाबतचा लेखापरिक्षण परिच्छेद काढल्यानंतरही सन २०१४ ते सन २०१६ पर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही ही अजून गंभीर बाब आहे. या दोन्ही विषयांवर स्पष्टीकरण देण्याबाबत समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उपयोगिता प्रमाणपत्र उशिरा पाठविली गेली, ही खरी बाब आहे. परंतु, आता विभागाकडे काही शिल्लक नाही.

४.६६ उपयोगिता प्रमाणपत्र पाठविली गेली नाही आणि महालेखापालांनी लेखापरिक्षण केले नसते तर विभागाने पैसे मागितलेही नसते. उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्याची जबाबदारी विभागाची आहे. त्याबाबत केंद्र सरकारचे आदेश आहेत, केंद्र सरकार प्रतिपूर्ती करणार आहे. उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्याची ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती त्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र पाठविली नाहीत त्याच्या विरोधात विभाग काय कारवाई करणार? सन २०१४ मध्ये महालेखापालांनी हे विभागाच्या निदर्शनास आणल्यानंतरही सन २०१६ पर्यंत पुन्हा विभागाने उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्याचे काम केले नाही. त्याबद्दल विभागीय प्रतिनिधीचे काय म्हणणे आहे ? केंद्र शासनाने १.४५ कोटी रुपये आधीच दिले होते त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र त्यांनी सादर केले पाहिजे होते तेही केलेले नाही, याकरिता कोण जबाबदार आहे ? कारण त्यामुळेच पुढचे खर्चाचे पैसे मिळाले नाहीत. उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्यास, मागणी करण्यास विभागास काय अडचण आहे ? पुरवठादाराची देयके प्रलंबित असतात. उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्यास एवढा ४ वर्षांचा विलंब होण्याची कारणे काय आहेत, याबाबत विभागाने काही कारवाई केली आहे काय ? निधी नाही, पेट्रोल नाही म्हणून बोटी बंद आहेत, यावर सभागृहात चर्चा झालेली आहे. बातम्या होत्या या विषयावर सभागृहात चर्चा होऊनही विभाग दखल घेत नाही या विषयावर प्रश्न विचारण्यात आले होते, त्यावर विभागाने ताबडतोब कारवाई करण्यात येईल असे उत्तर दिले होते. ४-४ वर्षे कारवाई होत नाही, ही गंभीर बाब आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उपयोगिता प्रमाणपत्रबाबत परिस्थितीनुसार गृह विभागामध्ये फक्त सागरी सुरक्षा नव्हे तर इतर प्रत्येक अंगांबाबतची उपयोगिता प्रमाणपत्र सन २००२, २००३, २००४ पासून प्रलंबित होती. हे सर्व अद्ययावत करण्यात येत आहेत.

४.६७ सागरी सुरक्षा हा वेगळा विषय आहे. त्याचे गांर्भीय गृह विभाग विचारात घेत नाही. हा भांडवली खर्च नाही तर हा आवर्ती खर्च आहे. सर्वच बाबतीतील उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित होती मग विभाग कोणता निधी वापरत होता ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उपयोगिता प्रमाणपत्र वेळेवर पाठविली नाही हे विभागास मान्य आहे.

४.६८ हा मुद्दा महालेखापालांनी उपस्थित केल्यानंतरही कोणी त्याकडे लक्ष दिले नाही. लोकलेखा समितीची साक्ष घेण्याचे ठरल्यानंतर दोन दिवसांपूर्वी म्हणजे ३० तारखेला उपयोगिता प्रमाणपत्र पाठविली आहे. त्यामुळे असे दिसून येते की, शासनाला, विभागाला गांभीर्य नाही. आवर्ती खर्च केल्याशिवाय उदाहणार्थ पेट्रोलसाठी पैसे नाहीत, व्यवस्थेसाठी पैसे नाहीत, दुरुस्तीसाठी पैसे नाहीत. परंतु, विभागाने केंद्र शासनाकडे पैसे मागितले नाहीत, विभागाने त्यांची तरतूद करुन घेतली नाही तर सागरी सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होणारच ना ? हा इतका गंभीर विषय आहे की, संबंधितांना तातडीने निलंबित केले पाहिजे आणि त्याबाबत समितीला माहिती दिली पाहिजे. विभागीय प्रतिनिधी यावर काहीच बोलत नाहीत, ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. विभागाने उपयोगिता प्रमाणपत्र पाठविली नाहीत. उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्याची विभागाची जबाबदारी होती, उपयोगिता प्रमाणपत्र न पाठविल्यामुळे निधी मिळाला नाही, त्यामुळे बोटी बंद झाल्या. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी या चुका केल्या त्यांना निलंबित करण्यात येणार काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात जी कार्यवाही करणे आवश्यक असेल ती करण्यात येईल.या संदर्भात कार्यवाही करून त्याबाबत समितीच्या पुढच्या बैठकीत समितीस अवगत करण्यात यावे असे समितीने सूचविले.

४.६९ समितीने विचारणा केली की, या काळात या बोटी बंद होत्या reimburse त्याकरिता पेट्रोल कोठून येत होते याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, या काळात बोटी बंद नव्हत्या त्यांच्या पेट्रोलच्या पैशाची प्रतिपूर्ती करण्यात येत होती.

४.७० यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, उपयोगिता प्रमाणपत्र दिल्यानंतर केंद्र शासन reimburse करणार. परंतु, सन २०१३-२०१४ चे उपयोगिता प्रमाणपत्र सन २०१६ मध्ये दिले. तोपर्यंत जर केंद्र शासनाकडून पैसे मिळाले नाहीत तर कोणता निधी वापरण्यात येत होता यासाठी राज्य शासनाकडून वेगळे पैसे मिळतात काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्य शासनाचे पैसे तेल, वंगणासाठी वापरण्यात येतात. आय.जी. कोस्टलच्या फंड मधून पैसे वापरण्यात येतात त्यानंतर केंद्र शासनाकडे जी उपयोगिता प्रमाणपत्र पाठवायची असतात ती पाठविण्यात येतात मग त्याची प्रतिपूर्ती होते. यांची सर्वसाधारण तरतूद असते.

४.७१ याचा अर्थ केंद्र शासनाच्या बोटी वेगळ्या असतात आणि राज्य शासनाच्या बोटी वेगळ्या असतात काय, राज्य शासनाचा पैसा केंद्र शासनाच्या बोटीसाठीही वापरण्यात येत होता काय ? सरकार फक्त केंद्र सरकारच्या बोटीकरिता पैसे देते काय, राज्य सरकारच्या बोटींकरिता देत नाही काय ? ही उपयोगिता प्रमाणपत्राची मागणी कोणत्या बोटींकरिता पाठविली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधीने सांगितले की, केंद्र सरकार राज्य सरकारच्या बोटीकरिता पैसे देत नाही, राज्य सरकारच्या बोटीवर खर्च गृह विभागामार्फत करण्यात येतो. केंद्र शासनाकडून गृह विभागाला २८ बोटी मिळाल्या होत्या. त्या बोटींसाठी हा खर्च होतो.

४.७२ हा जो खूप विलंब झालेला आहे, तो विभागाकडे बोटी किती तास चालल्या वगैरेबाबत अद्ययावत रेकॉर्ड नव्हते त्यामुळे झालेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये प्रत्यक्षात सर्व बोटींची व्यक्तिगत माहिती गोळा करण्यात जास्त वेळ जातो. कारण ती बोट कधी ऑफड्युटी अनऑपरेशनल असते. वगैरे असते.

४.७३ बोटी किती तास चालल्या वगैरेंचा अहवालही विभागाला पाठवावा लागतो ना, ते सर्व रेकॉर्ड विभागाकडे उपलब्ध नसल्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्र पाठविली नाही, हे कारण आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, असे कारण नाही. उपयोगिता प्रमाणपत्र बरोबर वेळेवर पाठविली आहेत.

४.७४ विभागाने उपयोगिता प्रमाणपत्र पाठविली नाहीत. मग दिलेल्या माहितीमध्ये सन २००९-२०१० ते सन २०१३-२०१४ या कालावधीतील उपयोगिता प्रमाणपत्र सन २०१६ मध्ये दिले आहे, असे का नमूद केले आहे. ? याबाबतची पद्धती अशी असते की, तटरक्षक दलाकडे एक लॉग बुक असते. त्यामध्ये बोट किती तास चालली, किती डिझेल लागले या सर्व गोष्टींची नोंद असते. हे लॉग बुक पाहिले की, रेकॉर्ड पाच मिनिटांत तयार होते, मग काय अडचण आहे ? केंद्र शासनाच्या बोटींकरिता राज्य शासनाचा पैसा कशाकरिता वापरला ? सागरी सुरक्षेच्या संदर्भात एकदम विस्कळीतपणा वाटतो यामध्ये कोठेही सुसुत्रता, समन्वय नाही त्याचा अभाव स्पष्टपणे दिसतो. बांधकामाच्या संदर्भात असो की, बोटीतील पेट्रोलच्या संदर्भात असो या सर्व विषयांचा सुरक्षेशी संबध येतो. त्यामुळे विभागीय सचिवांनी तत्काळ एखादी बैठक बोलवावी. जसे आता पेट्रोलचा प्रश्न आहे तर त्याचे पैसे केंद्र शासनाकडून येईपर्यंत वाट पाहायची काय, त्याकरिता तरतूद करण्याची जबाबदारी गृह विभागाची नाही काय ? पैसे येईपर्यंत या बोटी चालू राहिल्या पाहिजेत याकरिता विभागाची काही तरी वेगळी व्यवस्था असली पाहिजे. केंद्र शासनाने सन २००९ मध्ये १.४५ कोटी रुपये अग्रिम दिलेले होते. ते वापरुन त्याची उपयोगिता प्रमाणपत्र देऊन परत निधी उपलब्ध करून घ्यायचा होता. असे मत समितीने व्यक्त केले.

४.७५ निधीचा वापर केला तर परत निधी मिळेल, नाही तर निधी मिळणार नाही. परंतु, जो निधी वापरला पाहिजे होता तो वापरला गेला नाही हे स्पष्ट झालेले आहे. परंतु, यामध्ये सुसुत्रता नाही. सुरक्षेचा संबंध असल्याने या सर्वामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी राज्य शासनाने वित्त विभागाकडे याकरिता वेगळी तरतूद ठेवावी कारण तशी वेगळी तरतूद नसल्याने बोटी बंद पडतात, त्याचा सुरक्षेवर परिणाम होतो याबाबत पत्र व्यवहार केला पाहिजे व त्या माध्यमातून ही व्यवस्था सुरळीत करु?न घेतली पाहिजे. हा जो विस्कळीतपणा आहे त्याबाबत एका विशिष्ट कालावधीत सर्व विभागांनी काम करावे, जे बांधकाम असेल ते पूर्ण करावे आणि पुढच्या दृष्टिकोनातून त्यामध्ये अशा कोणत्याही त्रुटी राहू नयेत की, ज्यामुळे सुरक्षेला अडचण निर्माण होईल या करिता गृह विभागाच्या सचिवांनी एखादी बैठक घेऊन तत्काळ सर्वच विभागाच्या संदर्भात आढावा घेतला पाहिजे. अशी सूचना समितीने केली त्यास विभागीय सचिवांनी मान्यता दर्शविली.

४.७६ गृह विभागाने याकडे आतापर्यंत तरी गांभीर्याने पाहिलेले नाही. आता समितीच्या माध्यमातून सर्व गोष्टी लक्षात येत आहेत. विभागाचे या सर्व गोष्टींकडे लक्ष असले पाहिजे. तटरक्षक दलांच्या, विभागाच्या अडचणी असतात त्या दूर कशा करायच्या हेही पाहिले पाहिजे. परंतु, यातून काही मार्गच काढायचा नाही व मग बैठकीत काही तरी उत्तर देऊन वेळ निभावून न्यायची हे योग्य नाही. या संदर्भात लक्ष घालणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.७७ या अनुषंगाने एक बाब समितीने निदर्शनास आणून दिले की, युथ फोरमची गिरगाव चौपाटी येथे बैठक होती. तेव्हा रात्रीचे जवळपास ९ ते १० वाजले असताना फोरमचे प्रतिनिधी सहज समुद्रामध्ये बोटी घेऊन गेले असता. अलाऊड नसतानाही ते मुद्दाम तेथे गेले परंतु, समुद्रात गेल्यानंतर खरेच त्यांच्या बोटी अडविण्यात आल्या. याचा अर्थ तेथे सुरक्षा होती. गृह विभागाच्या बोटी अडवून पुढे जाता येणार नाही असे सांगण्यात आले. याचा अर्थ तेथे सुरक्षेच्या दृष्टीने पाळत होती. ही चांगली गोष्ट आहे. परंतु, गृह विभागाला त्याच्या उपयोगासाठी जो निधी मिळणार होता, तो विभागाने वापरला नाही.

४.७८ या मुद्याबाबत समितीने दिनांक १ जून, २०१६ रोजी पुन्हा साक्ष घेतली साक्षीच्या वेळी उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे राज्याचे १३ कोटी रुपये अद्यापपर्यंत मिळाले नाहीत. याला जबाबदार कोण आहे? त्यांचेवर काय कारवाई केली? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००३-२००४ पासूनचे सर्व रेकॉर्ड तपासण्यात आले यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस महासंचालक कार्यालय, तसेच त्यांचे फिल्ड ऑफिसेस, गृह विभाग या सर्वांची गोळा बेरीज करुन यामध्ये जवळपास १७५ व्यक्तींचा समावेश आहे. यामध्ये आयएएस, आयपीएस, इंजिनिअर या सर्वांचा समावेश आहे. ज्यांनी सही करण्यासाठी विलंब केला किंवा अन्य कारणास्तव विलंब झाला अशा एकूण १७५ व्यक्ती आढळून आल्या. झालेल्या विलंबाबत संबंधितांकडून खुलासा मागितला आहे. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यावर मग निर्णय घेण्यात येणार आहे. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे पतन अभियंता, मुख्य अभियंत्याच्या हाताखाली काम करतात. यासंदर्भात विभागाने १७५ लोकांची यादी तयार केली आहे. यामधील अनेक लोक सेवानिवृत्त झाले आहेत.

४.७९ यामधील जे ७५ लोक सेवानिवृत्त झाले आहेत. ते कारवाईस पात्र आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कर्मचारी/अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर चार वर्षापर्यंत त्यांचेवर कारवाई करता येते. याबाबत माननीय मुख्यमंत्री यांची परवानगी मिळत नाही तोपर्यंत काही सांगू शकत नाही.

४.८० महालेखापाल कार्यालयाचा परिच्छेद सन २०१५ मध्ये सादर झाल्यानंतर मार्च, एप्रिल, मे महिन्यात यासंबंधीची कार्यवाही सुरू केली. महालेखापाल कार्यालयाकडून उपयोगिता प्रमाणपत्र दिले नाही असा आक्षेप आल्यानंतरही गृह विभागाने ही बाब गांभीर्याने घेतली नाही. गृह विभागाकडून सांगितले जाते की, त्यांच्याकडे खूप काम असते. हा देशाचा सुरक्षिततेचा विषय असतानाही उपयोगिता प्रमाणपत्र न दिल्यामुळे तो निधी गृह विभागाला मिळाला नाही असे मत व्यक्त करून उपयोगिता प्रमाणपत्राची कार्यवाही किती वर्षात केली पाहिजे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एक बांधकामाचा आणि दुसरा उभारणीचा असे विभागाने दोन भाग केले आहेत. विभागाला जे पैसे दिले, त्याचा खर्चाचा हिशोब द्यावयाचा आहे, त्याच्या व्यतिरिक्त काही खर्च नाही. २.७३ कोटी रुपये सन २०१४ पासून प्रलंबित आहेत. दिनांक ३० एप्रिलला विभागाने पत्र पाठविले आहे.

४.८१ उपयोगिता प्रमाणपत्र आणि प्रतिपुर्ती या दोनच गोष्टी बाकी आहेत. उपयोगिता प्रमाणपत्र आणखी उशिरा पाठविले असते तर काही फरक पडला असता काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, निश्चितच फरक पडला असता. उपयोगिता प्रमाणपत्र दिल्यानंतर अडीच महिन्यात पैसे मिळतात. १२.८७ कोटी रुपयांचे उपयोगिता प्रमाणपत्र आक्षेप आल्यानंतर पाठविलेले आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १४ मार्च, २०१६ ला पाठविले आहे. त्यावेळेस विभागाकडे समितीच्या बैठकीची नोटीस आली नव्हती.

४.८२ शासन केंद्र सरकारच्या कामाला फारसे गांभीर्याने घेत नाही. राज्य शासनाने केंद्र शासनास सविस्तर माहिती द्यावयाला पाहिजे. विभागाकडून एक किलोमीटर गस्त घालण्यात येते इत्यादी, ही सर्व माहिती विभागाकडे तयार असते. केंद्र शासनाचे प्रदान करुन नमुन्यामध्ये ही माहिती पाठविणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पूर्वीची पद्धत काय होती, यासंदर्भात २५ तारखेला आय.जी. (कोस्टल), वरिष्ठ अधिकारी यांचेसमवेत बैठक घेण्यात आली सर्व जिल्ह्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र आल्याशिवाय माहिती पाठविली जात नव्हती. परंतु अशी सूचना केली की, जेवढी माहिती आली असेल तेवढी पाठवून द्यावी. दोन जिल्ह्यांची माहिती आली असेल तर तेवढीच पाठविली जाते.

४.८३ उपयोगिता प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अडीच महिन्यात पैसे मिळतात तोपर्यंत विभागाच्या अंदाजपत्रकामधून खर्च करण्यात येतो काय? विभागाचा निधी संपल्यानंतर अडचण येते यासंदर्भात कॉम्प्यूटर सिस्टिमवर एक महिन्यात विभाग निधीच्या उपयोगाबाबत नमूना (फॉर्म्याट) तयार करणार का? विभागाकडून यासाठी जीपीएस सिस्टिम राबविण्यात येणार आहे. गस्त घातल्यानंतर जीपीएस सिस्टीमवरुन संगणकावर तो डेटा येईल. त्यावरुन प्रिंट काढून ती माहिती पाठविणे शक्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबतची कार्यवाही दोन महिन्याच्या आत करण्यात येईल.

४.८४ केंद्र सरकारकडून महाराष्ट्र राज्याला २८ नौका मिळालेल्या आहेत. डिझेल इत्यादी बाबींसाठी केंद्र सरकारसमवेत पाच वर्षाचा एमओयु झालेला आहे. फक्त पाच वर्षापर्यंत केंद्र सरकार पैसे देणार आहे. त्यानंतर पुढील खर्च राज्य सरकार करणार आहे काय? अशीविचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पाच वर्षानंतर राज्य सरकारला खर्च करायचा आहे.

सागरी तट पोलीस स्थानकांच्या उभारणीत विलंब

४.८५ समितीने विचारणा केली की, १२ सीपीएस पीडब्ल्यूडीच्या माध्यमातून बांधकाम करण्यात येणार होते त्यापैकी केवळ ८ चे बांधकाम पूर्ण झाल्याचे दिसते. उर्वरित २ सीपीएसचे काम सुरू आहे तर २ सीपीएसचे काम बंद आहे, आचरा येथील काम सुरू? आहे असे नमूद

केले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, आचरा येथे तळमजल्याचे काम झाले असून उर्वरित काम अंदाजे १५ दिवसांत पूर्ण होईल. सागरी/बृहन्मुंबई व मोरा येथील जमीन उपलब्धतेबाबतची परिस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मोराच्या संदर्भात मुख्य वास्तू विशारद, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे आराखडा गेलेला आहे. त्यांनी तो तपासून दिल्यानंतर निविदा मागविण्यात येईल.

४.८६ मोराचा विषय वेगळा आहे आणि एनआरआय सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबईचा विषय वेगळा आहे. मोराच्या संदर्भात मुख्य वास्तू विशारद, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे आराखडा गेलेला आहे. परंतु तो दिनांक २३.११.२०१५ रोजी गेलेला आहे. मात्र त्याकरिता किती दिवस लागतात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एनआरआय सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई या पोलीस स्टेशनचे काम पूर्ण झाले असून दिनांक २४.०९.२०१५ पासून सदर पोलीस ठाणे नवीन इमारतीत स्थलांतरित करण्यात आलेले आहे. मोराच्या संदर्भात मुख्य वास्तू विशारद, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दिनांक २३.११.२०१५ रोजी आराखडा गेलेला आहे. त्याला आता ६ महिने झाले आहेत. त्याबाबतची सद्य:स्थिती सांगताना विभागीय सचिवांनी नमूद केले की, सार्वजनिक बांधकाम विभागातील काही आक्षेप काढले होते त्या आक्षेपांचे उत्तर एस.पी. रायगड यांच्याकडून घेऊन त्यांना दिलेले आहे.

४.८७ मोरा येथील काम किती दिवसांचे आहे ? मुंबई सागरी पोलीस ठाणे, मुंबई शहर याबाबत असे नमूद केले आहे की, विभागाने जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. परंतु, शासनाचा ॲडव्हान्स पझेशनचा शासन निर्णय आहे. असे असताना विभागाने ॲडव्हान्स पझेशन मागितले आणि जिल्हाधिकाऱ्यांनी ते नाकारले असे विभागाचे म्हणणे आहे काय, असे कोणते जिल्हाधिकारी आहेत ? कोणत्याही शासकीय जागेवर एखादे शासकीय कार्यालय काढायचे असेल, त्याकरिता शासनाच्या कोणत्याही विभागाला जागा पाहिजे असेल तर ॲडव्हान्स पझेशन देण्याबाबत शासनाचा शासन निर्णय आहे. महसूल विभागाची जागा असेल तर काही गरज नाही. महसूल विभागाची जागा असेल तर त्या जागेची कार्यवाही सुरू राहील परंतु, ज्या दिवशी जागेची मागणी करण्यात येते त्या दिवशी जिल्हाधिकारी आपल्याला ॲडव्हान्स पझेशन देतात व प्रोसिजर होत राहते, अशाप्रकारचा शासन निर्णय शासनाने काढलेला आहे, त्याला फार दिवस झाले आहेत. असे मत समितीने व्यक्त केले.

४.८८ मुंबई सागरी पोलीस ठाणे, मुंबई शहर याबाबत असे नमूद केले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तो आयुक्तांकडे पाठविला, आयुक्त तो मंत्रालयात पाठवतील. परंतु, विभागास त्यासाठी थांबण्याची आवश्यकता नाही. मुंबई सागरी पोलीस ठाणे, मुंबई शहर याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. यामध्ये दोनच विषय प्रलंबित आहेत. बाकी १० सीपीएसचे बांधकाम होऊन हँडओव्हर झालेले आहे. शासन निर्णयाची माहिती सर्वांनाच आहे. शासनाच्या महसूल विभागाच्या ज्या जागा आहेत तेथे केवळ शासकीय नाही तर निमशासकीय कार्यालयाकरिताही ॲडव्हान्स पझेशन देण्याबाबतचा उल्लेख शासन निर्णयामध्ये आहे. महसूल विभागाची जागा शासनाच्या कोणत्याही विभागाला आवश्यक असल्यास त्यांना त्या जागेची ॲडव्हान्स पझेशन घेण्याची तरतूद राज्य सरकारच्या शासन निर्णयामध्ये करण्यात आलेली आहे. निमशासकीय असेल तर काही विशिष्ट कामाकरिता देता येते. जागा देण्यास काही अडचण नसल्याबाबतचा शासन निर्णय शासनाने पूर्वी काढलेला आहे. त्याचा वापर करुन त्या जागेवर लवकर बांधकाम केले पाहिजे होते.असे समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रकरण डीसीपी रायगड कलेक्टरकडे गेले आहे विभागीय सचिव कलेक्टरसमवेत बोलल्यास हा प्रश्न २ दिवसांत सुटेल. असे समितीने सूचविले.

तपासणी नाक्याच्या बांधकामात विलंब

४.८९ तपासणी नाक्याच्या सद्य:स्थितीबाबत सांगताना सचिवांनी सांगितले की, ६ तपासणी नाके प्रलंबित आहेत, त्या ६ पैकी १ तपासणी नाका पूर्ण झाला असून आता ५ तपासणी नाके विविधस्तरावर प्रलंबित आहेत. ५ तपासणी नाक्यांची परिस्थिती सांगताना विभागीय सचिवांनी विदीत केले की, उत्तन डोंगरी, गीतानगर, सांताक्रुझ, मढ आयलंड आणि ससून डॉक असे हे पाच तपासणी नाके आहेत. ससून डॉकच्या संदर्भात बीपीटीचा संबंध येतो विभागाने त्यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र मागितलेले आहे. उत्तन डोंगरीसाठी मिठागर आयुक्तांकडे प्रस्ताव गेला आहे. व त्याचीही मंजूरी अपेक्षित आहे. सांताक्रुझ व मढ बेटांबाबत विभागीय आयुक्ताकडून प्रस्ताव येणार आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून हा प्रश्न ही सोडविता येईल असे समितीने सूचित केले

४.९० महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या ताब्यात गृह विभागाच्या चौक्या आहेत. त्या ठिकाणी विभागाकडून रडार आणि सर्व यंत्रणा बसविणे शक्य आहे यासाठी एवढा कालावधी घालविण्याची गरज नाही. कारण तेथे विभागाचे ४ पोलिस असतात. कुठल्याही बंदराच्या ठिकाणी पोलिस चौकी आहेच. मढ आयलॅण्ड, सांताक्रुझ या ठिकाणी पोलिस चौक्या आहेत. त्याच विकसित केल्या तर जमिनीचा प्रश्न शिल्लक राहत नाही. दुरुस्तीमध्ये त्याचौक्या विकसित करणे शक्य आहे. आणि त्यासाठी पर्यावरण विभागाच्या परवानगीची देखील गरज नाही. ही शासनाची रचना आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.९१ गीतानगरच्या बाबतीत वाढीव निधीची आवश्यकता असल्याने जो वाढीव निधी हवा आहे तो विभागाकडून देण्यात येत आहे. कारण त्याचे इस्टिमेट वाढलेले आहे. गीतानगरच्या वाढीव निधीसाठीचा प्रस्ताव विभागाकडे येणे बाकी आहे. विभागाकडे जागा आहे. जिल्हा दर सुची (डीएसआर) प्रमाणे त्या कामाचे इस्टिमेट वाढलेले आहे. त्याचा प्रस्ताव विभागाकडे येणे शिल्लक आहे. यासाठी अद्याप सुप्रमा मिळालेली नाही. कारण त्यासंबंधीचा प्रस्ताव सबंधितांकडून अद्याप सादर व्हायचा आहे. तो सादर करुन निधीची मागणी करण्यात येते. गितानगरला ११ लाख रुपयांच्या निधीची प्रशासकीय मान्यता आहे तर २१ लाख रुपये कसे काय देण्यात येणार आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दिनांक १२.९.२०१२ ला ११ लाख रूपये इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. ११ लाख रुपये इतका निधी वर्ग केला आहे. मग या कामी आपण ११ लाख निधीच्या बाबतीत निविदा काढून काम करण्यास काही अडचण नव्हती. असे समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधीनी हे तपासण्यात येईल व समितीला सादर करण्यात येईल.

४.९२ या मागणीसाठी ६-६ वर्षे झाली आहेत. या कामांसाठी किती वेळ लावण्यात येणार ? याबाबत कार्यवाही करून काम संपविण्यात यावे. यामध्ये सन २०१२ च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. आता २०१६ आहे आणि या ४ वर्षानंतरही बांधकाम सुरू झालेले नाही. जागा ताब्यात आहे. जेवढी मान्यता मिळाली त्या प्रमाणात काम केले आहे काय ? विभागाला १० लाख निधीची सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) आहे. तर त्यानुसार १० लाखांचे काम झाले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, काम झालेले नाही.

४.९३ हे बांधकाम सुरू केले पाहिजे. यासाठी नियमच आहे. कारण जितकी परवानगी तितके काम आपल्याला करता येते. पुढील खर्चासाठी सुप्रमा घेणे आवश्यक आहे. असे मत व्यक्त करून हे काम का केले नाही, कोणी केले नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यासाठी सुरूवातीला निधी प्राप्त नव्हता.

४.९४ जर प्रशासकीय मान्यतेप्रमाणे निधीच दिला नसेल तर शासन याबाबतीत गंभीर नाही. जर जागा मिळाली असेल तर विभागाने प्रशासकीय मान्यतेप्रमाणे संबंधितांना निधी दिला पाहिजे, सुधारित प्रशासकीय मान्यता नंतर मिळेल. असे मत व्यक्त करून प्रशासकीय मान्यतेप्रमाणे बांधकाम सुरू करता येते की नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रशासकीय मान्यतेप्रमाणे बांधकाम करता येते व नंतर सुधारित प्रशासकीय मान्यता करता येते सुरूवातीला फक्त निधी पाहिजे असतो.

४.९५ वाढीव कामाच्या अंदाजपत्रकासंबंधी मर्यादेमध्ये सुप्रमा करणे शक्य आहे त्याप्रमाणे काम सुरू करता येते. परंतु विभागाकडून सुरूवातीपासूनच सुधारित प्रशासकीय मान्यता मागण्यात येते व निधी दिला नाही म्हणून काम सुरू केले नाही. असे कारण सांगण्यात येते याबाबत प्रथम निधी मंजूर झाला किंवा नाही ते सांगावे त्यानंतर वित्त विभागाला विचारणा करण्यात येईल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये प्रथम २१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. ज्या ठिकाणी चौकी बांधण्यात येणार होती त्याच्या आजुबाजूला भरपूर झोपड्या आहेत. त्यांची उंची २०-२० आणि ३०-३० फूट आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले की, या ठिकाणी नुसते बांधकाम करुन उपयोग नाही तर यावर एक मजला टॉवर उभारावा लागेल. त्यासाठी त्या विभागाने वाढीव निधीची मागणी केली असून त्या स्तरावर प्रकरण प्रलंबित आहे.

४.९६ पुर्वी जी २१ लाख एवढी गृह विभागास मंजूर केली आहे ती रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास पूर्वीच वर्ग केली आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी म्हणतात हा निधी मिळाला नाही. असे समितीने निदर्शनास आणू दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जो संदर्भ उपलब्ध आहे त्यानुसार मे, २०१२ मध्ये निधीची मागणी करण्यात आली होती. पण गृह खात्याकडे निधी उपलब्ध नसेल म्हणून तो निधी सार्वजनिक बांधकाम विभागास मिळालेला नाही.

४.९७ गृह विभाग म्हणतो निधी दिला आणि सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणतो की, निधी मिळाला नाही तर ही विसंगती आहे. असे समितीने व्यक्त केले असता गृह विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, निधी मिळाला किंवा नाही हे तपासून सादर करण्यात येईल.

४.९८ सागरी किनाऱ्यावर दुश्मनांपासून धोका आहे. मढ आयलॅण्डच्या बाबतीत निधी मिळालेला नाही. मड आयलॅण्डला विभागाची पोलीस चौकी आहे की, नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तेथे पोलीस चौकी आहे.

४.९९ मांडव्याला विभागाने सर्व यंत्रणा पोलीस चौकीमध्येच वाढीव बांधकाम करुन ठेवली आहे. विभागाने मांडव्याचे मॉडेल सर्वत्र वापरले तर अडचण येणार नाही. तेथे पर्यावरण विभागाची परवानगी लागली नाही आणि विभागाने ते बांधकाम केले आहे. चांगली चौकी बांधली आहे. प्रत्येक ठिकाणी कस्टम आहे, पोलीस यंत्रणा आहे त्या ठिकाणी मेरीटाईम बोर्डाचे कार्यालय आहे, तेच कार्यालय विकसित करावे. असे समितीने सुचविले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, रोडवर चेक पोस्टसाठी जागेची पाहणी करण्यात येते आणि त्यानंतर ते निश्चित करतात की, कोठे बांधकाम करावे. या मड आयलॅण्डमध्ये त्यांनी निश्चित केले आहे की, किल्लेश्वर मंदिराजवळील जे.टी.च्या पाठीमागे सर्व्हे नंबर ७४ वर आहे. चेक पोस्टची जागा वेगळ्या ठिकाणी ठेवली आहे, कारण त्या ठिकाणी योग्य वाटले नसेल. चेक पोस्ट रोडवर असते कारण तेथे आलेल्या वाहनांची तपासणी करण्यात येते.

४.१०० चेक पोस्टची जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेली जागा अद्याप गृह विभागाच्या ताब्यात मिळालेली नाही आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर केलेला आहे. तात्पुरती चौकी वेगवेगळी असू शकते. असे मत समितीने व्यक्त केले.

४.१०१ समितीने दिनांक १ जून २०१६ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची व प्रतिनिधींची साक्ष घेतली साक्षीच्यावेळी तपासणी नाक्यांच्या बांधकामास विलंब याबाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, ३२ पैकी २८ तपासणी नाके पूर्ण झालेले आहेत. ४ तपासणी नाक्यांच्या बांधकामाची सद्यस्थिती सांगताना विभागीय सचिवांनी विदित केले की, गीता नगरमधील तपासणी नाक्यासंबंधी मुख्य अभियंता सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात येत असून एक आठवड्यात ते विभागाकडे देतील. त्यानंतर त्याला प्रशासकीय मान्यता देऊन सदर काम सुरू करण्यात येईल. मड आयलॅण्डमध्ये जागा मोजणी करून पोलीस विभागाच्या ताब्यात देण्यासंबंधी पोलीस विभागाला कळविण्यात आले आहे. सांताक्रुझमध्ये जागा देण्यासंबंधी महसूल आणि वन विभागाच्या प्रधान सचिव तसेच मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अध्यक्षांना सुद्धा पत्र पाठविलेले आहे. ४ तपासणी नाके एक वर्षांच्या आत पूर्ण करण्यात येणार आहेत.

साक्षीच्यावेळी स्वतंत्र जेटी उपलब्ध नसणे या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर मुद्यासंबंधी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या अधिकाऱ्यांनी समितीला माहिती दिली आहे त्यानुसार ७ जेटी प्रगतीपथावर असून ते पूर्ण करणार आहेत.

४.१०२ विभागाकडे स्वतंत्र जेटी नाहीत का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाने प्रतिनिधींनी सांगितले की, केंद्र शासनाने ९ राज्यांना जेटी दिल्या होत्या. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे अशी भूमिका मांडली होती की, शासनाला जेटींची गरज नाही. महाराष्ट्राकडे मेरीटाईम बोर्ड असून त्यांच्याकडे स्वत:च्या जेटी आहेत. यामुळे २.९ कोटी रुपयांच्या प्राप्त निधीतून १४ ठिकाणी ऑपरेशनल रूम बांधण्यात येतील त्याकरिता केंद्र शासनाची मान्यता मिळाली होती. २.९ कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डकडे वर्ग करण्यात आला होता. त्या अनुषंगाने ७ जेटी पूर्ण झाल्यासंबंधी संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला माहिती दिली.

४.१०३ विभागाकडे ७२० कि.मी.च्या अंतरावर ४४ पोलीस स्टेशन्स आहेत. एमएमबीच्या किती जेटी आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाकडे. ८०० पेक्षा जास्त जेटी आहेत.

४.१०४ मेरीटाईम बोर्डच्या जेटींबाबतची बाब योग्य. परंतु खाजगी मालकांच्या जेटी वापरल्या जात असल्यासंबंधी महालेखापालांच्या लेखापरिक्षणाचा आक्षेप होता. याबाबतची वस्तुस्थिती विदित करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पेट्रोलिंगकरिता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या जेटींचा वापर केला जातो. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डकडून खाजगी लोकांना जेटी चालविण्यासाठी दिलेल्या आहेत. त्या जेटींचा वापर क्वचित प्रसंगी केला जातो. त्यात सुरक्षिततेचा भंग झाल्याची बाब कधीही निदर्शनास आलेली नाही.

४.१०५ महाराष्ट्र राज्यात यासंबंधी घटना घडली आहे. महालेखापालांचा असा आक्षेप आहे की, स्वतंत्र जेटी निर्माण केलेल्या नाहीत. राज्य शासनाची अशी भूमिका होती की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डकडे जेटी उपलब्ध असल्यामुळे जेटी निर्माण करण्याची गरज नाही. त्याऐवजी ऑपरेशनल रूम बांधू द्यावी व त्याकरिता मदत करावी. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली. विभाग मेरीटाईम बोर्डच्या जेटी वापरत आहे. परंतु महालेखपालांच्या लेखापरिक्षण परिच्छेदामध्ये असा आक्षेप आहे की, खाजगी जेटींचा वापर केला जातो. यात गोपनियतेचा भंग होत असतो. आपदकालीन परिस्थितीत त्यांचा कधी कधी वापर केला जातो का? मेरीटाईम बोर्डच्या जेटी कोस्टल पोलीस स्टेशनकरिता स्पेशल नाहीत. मेरीटाईम बोर्डच्या जेटी प्रवाशी तसेच मच्छीमारांची वाहतूक करतात. यामुळे गोपनियतेचा भंग होण्याची शंका महालेखापालांना कशी निर्माण होते ? अशी विचारणा समितीने केली असता उप महालेखापाल यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने यापूर्वी ३ जेटीकरिता प्रस्ताव केला होता. परंतु निधी कमी असल्यामुळे त्याऐवजी ऑपरेशनल रूममध्ये रूपांतर केले. मेरीटाईम बोर्डच्या जेटींचा प्रवाशी किंवा मच्छीमाराच्या वाहतुकीसाठी वापर केला जात असल्याचे काही अंशी निदर्शनास आले आहे. परंतु एखादी सर्व्हिलन्स ॲक्टीव्हिटी असल्यास कदाचित त्याची माहिती सर्व लोकांना होऊ शकेल त्या अनुषंगाने असा विचार करण्यात आला आहे की, शासनाच्या अत्याधुनिक जेटी असाव्यात. परंतु त्या प्रस्तावाचे रूपांतर ऑपरेशनल रूममध्ये करण्यात आले आहे. एमएमबीच्या जेटी ज्या ठिकाणी असतील तेथे जास्तीत जास्त ऑपरेशनल रूम करून त्याचा ॲक्टीव्हिटीसाठी फायदा करून घ्यावा हा एक उद्देश आहे.

४.१०६ खाजगी जेटींच्या ठिकाणी ऑपरेशनल रूम सुद्धा नाहीत. बोट लाँच करून उभी करण्यासाठी किंवा बोटीमधून पोलीस स्टेशनला बाहेर जाण्यासाठी जेटींची आवश्यकता असते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, खाजगी जेटीवर बेकायदेशीर कामे होत असल्यामुळे साधारणत: पोलीस हजर असून त्यांची गस्त सुरू असते. यामुळे पोलिसांची उपस्थिती दर्शविणे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे असते. परंतु एखादी धाड टाकायची असल्यास त्यासंबंधी गोपनियता पाळण्याची आवश्यकता असते. परंतु गस्त सुरू असताना पोलिसांची उपस्थिती दर्शविणे विभागाला अत्यावश्यक असते. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जेटी बांधण्याकरिता मोठ्या प्रमाणात

खर्च लागतो. यामुळे २ कोटी रुपयांमध्ये जेटी बांधणे शक्य नाही. म्हणून महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे त्यावेळी विनंती केली होती. पोलीस विभागाने अत्याधुनिक जेटी बांधायच्या ठरविल्यास ७२० कि.मी. च्या किनाऱ्यासाठी भरपूर जेटी लागतील. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आहे. यामुळे कदाचित त्यावेळी असा विचार झाला असावा. आतापर्यंत आलेल्या अनुभवावरून त्यात कोणतीही अडचण निर्माण झालेली नाही. खाजगी लोकांना बोटी चालविण्यासाठी दिलेल्या आहेत आयएसपीएस सिक्युरिटी कोडनुसार त्यांची सिक्युरिटी आहे. तसेच कमिशनर, स्टेट इंटिलिजन्स डिपार्टमेंट यांच्या नेतृत्वाखाली एक मध्यवर्ती समिती आहे. त्यांच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन आणि खाजगी जेटी बंदरांचे लेखापरिक्षण सुद्धा झाले आहे. त्यावर स्थानिक पोलीस अधिकारी, एस.आय.डी., आय.बी. यांचे सातत्याने लक्ष असते. सागरी किनारा असलेली इतर आठ राज्य आणि ४ केंद्रशासित प्रदेश आहेत त्यांनी आपण ज्या पद्धतीने ऑपरेशनल रूम बांधलेल्या आहेत त्याचा मॉडेल म्हणून विचार करावा असे केंद्र शासनाने सुचविलेले आहे.

४.१०७ सागरी तट पोलिसांचे कामकाज प्रशिक्षणाचा अपर्याप्तता या संदर्भात समितीने विचारणा केली की,गस्त करणे, टेहाळणी करणे, पाहणी करणे या गोष्टी पारंपारिक पद्धतीने केल्या जातात. इतर देशांमध्ये या गोष्टींकरिता प्रगत कार्यपद्धती आहे. अशिया खंडात समुद्र किनारी असलेल्या देशांमध्ये प्रगत तंत्रज्ञान आले आहे. त्याअनुषंगाने विभागाकडून अधिकारी/कर्मचारी यांना तेथे प्रशिक्षणासाठी पाठविले आहे का ? किंवा तेथील तज्ज्ञ व्यक्तींना आपल्या येथील पद्धतींचा पाहणी करण्यासाठी बोलाविण्यात आले आहे का ? काही देशांसमवेत केंद्र स्तरावर करार केलेले आहेत त्या अनुषंगाने संयुक्त पाहणी केली जाते. महाराष्ट्र राज्याने आपल्याकडील कर्मचाऱ्यांना अशा पद्धतीने प्रशिक्षण देण्याची काही व्यवस्था केली आहे का ? केंद्र शासनाकडून प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम ठरविला जातो. प्रत्येक सागरी किनाऱ्याच्या ठिकाणी असलेले भय वेगवेगळे आहे. तामिळनाडूच्या सागरी किनाऱ्यापासून श्रीलंका जवळ आहे. महाराष्ट्राचा सागरी किनारा कराचीच्या जवळ आहे. त्यानुसार गृहविभागाकडे प्रशिक्षणाची कोणती व्यवस्था करण्यात आली आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, तटरक्षक दलाकडून या संदर्भात प्रशिक्षण दिले जाते. आजपर्यंत २६२३ पैकी १५७४ सागरी पोलिसांना तटरक्षक दलाकडून अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच आतापर्यंत १४३३ पोलीस कर्मचाऱ्यांना सागरी प्रशिक्षण दिलेले आहे.

४.१०८ सागरी तटीय पोलीस स्थानकामध्ये तैनात केलेल्या कर्मचाऱ्यांना सुरक्षितेच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे, याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्याप्रमाणे एसआरपीएफ यंत्रणेप्रमाणे कोस्टल पोलिसिंगकरिता वेगळी यंत्रणा आहे. तेथे कर्मचारी येतात आणि जातात. काही नवीन कर्मचारी प्रशिक्षणासाठी आल्यास ते अनट्रेंड असल्यामुळे त्यांना प्रशिक्षण देता देता तेथेच ठेवले जाते. परंतु ३-४ वर्षांनंतर ट्रेंड कर्मचारी बाहेर जातात. त्यांना रेग्युलर पोलीस यंत्रणेत पाठविता येते.

४.१०९ कोस्टल पोलीस यंत्रणा तसेच मरीन पोलीस व त्यांचे आयुक्तालय, आयबी सेक्शन वेगळी करण्यासंबंधी समितीने शिफारस केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले तसेच प्रशिक्षणाकरिता एक वर्षाचा कालावधी उलटून जातो. त्यानंतर तेथून बदली करण्यासाठी मागणी केली जाते. तेथे थांबण्यासाठी कोणीही तयार नसते. प्रशिक्षण करण्यासाठी खूप कालावधी लागू शकतो. ही बाब विचारात घेता मेरीटाईम बोर्डकरिता वेगळी पोलीस यंत्रणा असली पाहिजे व ४० वयानंतर कर्मचाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना विभागात परत पाठविण्याची व्यवस्था असावी. अशी शिफारश करण्याचे समितीने एकमताने ठरविले.

४.११० कर्मचाऱ्यांची कमतरता यासंदर्भात कर्मचाऱ्यांच्या भरतीचा विचार करता तंत्रज्ञेतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेने तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. हि बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ९ जुलै २०१० रोजी सेवा प्रवेश नियम तयार करून प्रसिद्धी दिल्यानंतर त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यानंतर प्रक्रिया करून ते पुन्हा सुधरित करण्यात आले. दिनांक १९ जानेवारी, २०१६ सुधारित सेवा प्रवेश नियम करून त्यानुसार भरती सुरू आहे. त्या अनुषंगाने ५१ टक्के कर्मचाऱ्यांची कमतरता दिसून येत आहे ती बऱ्यापैकी भरुन काढता येईल. तसेच तंत्रज्ञेतर पदाच्या भरती संदर्भात तसेच पोलिसांची पदे भरण्यासंबंधी वित्त विभागाचे बंधन आहे. त्यानुसार फक्त ५० टक्के भरती करता येऊ शकते. विभागाने विशेष प्रयत्न करून पोलिसांच्या संदर्भात ही टक्केवारी ७५ टक्क्यांपर्यंत आणली आहे. वित्त विभागाने ही बाब मान्य केली असून गडचिरोलीकरिता १०० टक्क्यांची अट मान्य केली आहे. आता कोस्टलकरिता १०० टक्के परवानगी मिळणे आवश्यक आहे. तांत्रिक पदांमध्ये इंजिन ड्रायव्हर, मास्टर, क्लिनर व त्यांना सहाय्य करणारे असे ४-५ संवर्ग आहेत. नेव्हीमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सुद्धा विभागाकडून सदर पदांकरिता पात्र करण्यात येत आहे. कोस्टलकरिता १०० टक्के भरती करण्यासाठी परवानगी मिळाली पाहिजे.

४.१११ सागरी सुरेक्षेची दररोजची कामे करीत असताना खूप अडचणी येत येतात. राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे. यामुळे सागरी सुरक्षेकरिता १०० टक्के पदे भरण्याची मान्यता द्यावी अशी समितीने शिफारस केली.

४.११२ कंत्राटी पद्धतीने पदे भरणे धोकादायक असल्याचे विभागास वाटत नाही का ? जुन्या सेवानिवृत्त लोकांना कंत्राटी पद्धतीने घेतल्यास हरकत नाही. परंतु कोणालाही तेथे कंत्राटी पद्धतीने घेतल्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, तटरक्षक दल व नेव्हीचे कर्मचारी असतात. इतर ठिकाणाहून विभागाकडून कर्मचारी घेण्यात येत नाहीत. याबाबत पूर्ण पोलीस तपासणी केल्याशिवाय कंत्राटी पद्धतीने कर्मचारी घेतले जात नाहीत.

४.११३ काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात गृह विभागाकडे महत्त्वाचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता नागपूर, मुंबई आणि औरंगाबाद येथे डिप्लोमा इन फॉरेन्सिक, बीएससी इन फॉरेन्सिक आणि एमएससी इन फॉरेन्सिक असे ३ कोर्सेस शासनाच्या युनिव्हर्सिटीमध्ये सुरू आहेत. त्यांची लिगल फर्म आणि पोलीस विभागाला मोठी गरज आहे. परंतु गृह विभागाच्या पोलीस खात्याचे सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस फॉरेन्सिकची बीएससी किंवा एमएससीची पदवी ग्राहय न करता केवळ बीएसी पदवी ग्राहय धरण्यात येते यामुळे फॉरेन्सिक पदवी धारकाला त्यात मोठा वाव नाही. सदर अभ्यासक्रम जाणीवपूर्वक केले असून आता प्रगत विज्ञान आहे. सेवाप्रवेश नियमामध्ये या गोष्टीचा निश्चितपणे अंतर्भाव करावा व फॉरेन्सिक सायन्सला त्यात मान्यता द्यावी अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने जोपर्यंत सदर कोर्स समतुल्य असल्याबाबतचा आदेश (इक्विव्हॅलंटची ऑर्डर) दिली नाही तोपर्यंत सदर कार्यवाही सुरू होती. यामुळे सदर कोर्सेस उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी सरकारी सेवेत न येता बाहेर जात होते. विभागाने त्याच्या सेवाप्रवेश नियमामध्ये रुल्समध्ये दिलेल्या अटीं याच्याशी समतुल्य असल्याची बाब तत्कालीन प्रधान सचिव यांच्याकडून मान्य करून घेतली. यामुळे सदर कोर्सेस झालेले विद्यार्थी आता विभागाकडे येत आहेत. अशाप्रकारे तिन्ही विद्यापीठाचा फायदा झाला आहे.

४.११४ तांत्रिक कर्मचाऱ्यांची १८६ पदे मंजूर झाली असताना फक्त १२७ पदे भरण्यात आली. उर्वरित पदे कंत्राटी पद्धतीने मिळत नाहीत का ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, १८६ पदांच्या संदर्भात मागील वर्षीची १२८ पदे भरली होती त्यांना सुरू ठेवले कंत्राटी पद्धतीने मंजूर घेण्यासाठी मुलाखतीकरिता ५० ते ५१ उमेदवार आले होते. त्यातून ४५ पदे भरली होती. बाहेर जास्त पगार मिळत असतो. परंतु शासनाकडे २० हजार आणि २५ हजार रुपये पगार दिला जातो. तसेच ही पदे तात्पुरती असल्यामुळे कर्मचारी येथे येण्यास तयार नसतात. तेथे तटरक्षक आणि नेव्हीमधील सेवानिवृत्त लोक येत असतात.

४.११५ कौशल्याप्रमाणे वेतन असते. यामुळे २५ हजार रुपयांमध्ये बोट चालविणारा आणि देखभालदुरुस्तीची कामे करणारा कर्मचारी मिळणे शक्य नाही. ड्रायव्हर पाहिजे असल्यास त्याला २० हजार रुपयांपेक्षा जास्त पगार दिल्याशिवाय तो मिळत नाही. अशा परिस्थितीत बोट चालविण्यासाठी २५ हजार रुपयांमध्ये कर्मचारीवर्ग उपलब्ध होणे शक्य नाही. यामुळे शासनाने याबाबतीत विचार करणे अत्यावश्यक आहे. कंत्राटी कर्मचारी मिळत नाही. तसेच नियमित पगार जास्त असल्यामुळे त्यात समन्वय ठेवणे अत्यावश्यक आहे. अन्यथा सदर पदे कधीही भरली जाणार नाहीत. जोपर्यंत तटरक्षक स्वतंत्र पोलीस कक्ष करणार नाही तोपर्यंत त्यांना इक्विलंट करता येणार नाही. यामुळे यात काही वर्गवारी करता येत असल्यास त्यासंबंधी शासनाने विचार करणे गरजेचे आहे. पगार कमी असल्यामुळे लोक येत नाहीत. पगार कमी आहे या संदर्भात अपल्याला पुनर्विचार केला पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.११६ सामग्री न बसविणे/ कमी प्राप्त होणे यासंदर्भात बुलेटप्रूफ जॅकेटची कमतरता आणि जीपीएस बसविण्यात झालेला विलंब याविषयी थोडक्यात माहिती देताना विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, बुलेटप्रूफ जॅकेट संदर्भात निविदा प्रक्रिया झाली आहे. फक्त त्या संदर्भात २ चाचण्या करणे राहिले आहे, त्या २ चाचण्या १५ दिवसांत होतील. आलेल्या निविदाकराने २ चाचण्या केल्यानंतर त्याप्रमाणे मागणी आदेश देण्यात येतील. विभागाच्या जुन्या बुलेटप्रूफ जॅकेटबद्दल देखील कार्यवाही करण्यात आली आहे.जीपीएस सिस्टिम ६९ बोटींपैकी फक्त ३५ बोंटीवर आहेत. सन २०१२ ला केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो प्रलंबित आहे.

४.११७ राज्य पोलीस दलासाठी खरेदी केली की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत विभागाची दुसरी प्रक्रिया सुरू? आहे. ती नामंजूर केली. अधिकाऱ्यांवर कारवाई सुद्धा केली आहे. त्यांना दुसऱ्या ठिकाणी अकार्यकारी पदावर घेण्याबाबतची कार्यवाही सुद्धा झाली आहे.

४.११८ राज्य पोलीस दलासाठी सुद्धा बुलेटप्रूफ जॅकेट खरेदी करण्यात येत होती. ही वेगळी बुलेटप्रूफ जॅकेट आहेत. ही बुलेटप्रूफ जॅकेट सागरी पोलिसांसाठी आहेत. विभागाने ४२६ बुलेटप्रूफ जॅकेटपैकी १७० बुलेटप्रूफ जॅकेट पुरविली आहेत. बाकीच्या बुलेटप्रूफ जॅकेटबाबत त्यावेळी पुरवठा झालेला नाही. त्यानंतर वेगळी खरेदी झालेली आहे की नाही ? तत्कालीन गृहमंत्री असताना बुलेटप्रूफ जॅकेट खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया झाली होती, त्यानंतर ती रद्द झाली. ही बुलेटप्रूफ जॅकेट सागरी पोलिसांसाठी वेगळी आहेत आणि ती बुलेटप्रूफ जॅकेट वेगळी होती. त्या संदर्भात सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागीय प्रतिनिधीकडे या संदर्भातील माहिती उपलब्ध नाही. ते बॉंबसूटचे प्रकरण होते, ज्यामध्ये कार्यवाही झाली. नवीन सेट प्रोक्युअर करण्याबद्दल यांच्याकडे सध्या विषय आहे. बुलेटप्रुफ जॅकेट संबंधातील दोन चाचण्या बद्दल विभागीय प्रतिनिधिनी विदित केले की, टम्ब्लिंग व फायरिंग चाचणी बाकी आहे. एक चंदिगडला आणि दुसरी गुजरातला होते. दोन्ही चाचण्यासाठी १४ दिवसांचा वेळ मागितला आहे. विक्रेत्याला सांगितले आहे की, चंदिगड व गुजराथ येथील संबंधिनांकडून चाचण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडून टेस्ट करून द्याव्यात. विक्रेत्यांचे म्हणणे आहे की, विभागाने त्यांना पत्र द्यावे. जेणेकरून विभागाने तेथे डिपॉजिट करून चाचण्या करून घेणे शक्य होईल विभागाकडून विक्रेत्याला पत्र देण्यात येत आहे १५-२० दिवसांत ही सर्व प्रक्रिया होणार आहे. आवश्यकता आहे तेवढी सर्व खरेदी करण्यात येणार आहे.

४.११९ जीपीएस सिस्टिमबद्दल सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने जीपीएस सिस्टिम गोवा शिपयार्ड कंपनीला दिली आहे. केंद्र शासनाच्या बोटी प्राप्त झाल्या होत्या, त्या २२ बोटींना जीपीएस सिस्टिम नव्हती. विभागाकडे पूर्वीच्या १२ बोटी आहेत, त्यावरही जीपीएस सिस्टिम नव्हती. या संदर्भात सन २०१२ मध्ये केंद्र शासनाला पत्रव्यवहार केला होता की, त्यांनी त्यावर जीपीएस सिस्टिम बसवून द्यावी. मात्र त्यावर काहीही झाले नाही. ३५ बोटींवर जीपीएस सिस्टिम आहे, बाकीच्या ३४ बोटींवर नाही. त्या ३४ बोटी जीपीएस सिस्टिमशिवाय फिरत आहेत.

४.१२० एका बोटीला जीपीएस सिस्टिम लावण्याचा अंदाजित खर्च किती होतो ? राज्याचा एवढा मोठा डोलारा आहे. ५० हजार रूपयांची जीपीएस सिस्टिम लावण्यासाठी सन २०१२ पासून केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे. विभागाने केंद्र शासनाकडे जीपीएस सिस्टिम मागितली ती लावण्याच्या खर्चाचा अदांज केला असेल. विभागाने एवढे पैसे गुंतवण्याचे आणि मग केंद्र शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती करण्यात येईल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, त्यासाठी जवळपास ५० हजार रूपयांच्या आसपास खर्च दिलेला होता.त्या बोटी केंद्र शासनाने राज्यशासनास दिल्या होत्या.

४.१२१ बोटी राज्य शासनाकडून वापरण्यात येतात त्यामध्ये काम करणारे कर्मचारी राज्य शासनाचे आहेत, त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जीपीएस सिस्टिम आवश्यक नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ३४ बोटींवर जीपीएस सिस्टिम बसविण्यासाठी २० लाख रूपये लागतील. राज्य शासनाच्या निधीमधून ते काम करावे लागेल. स्तरावरची मान्यता झाली आहे. आता वित्त विभागाची मान्यता घेऊन जीपीएस सिस्टीम बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. हे काम १ महिन्याच्या आत होईल का ? २ महिन्यांच्या आत सिस्टिम कार्यान्वित करण्यात येणार आहे जीपीएस सिस्टिमने बोटी कुठे फिरत आहेत ते कळणार आहे. आता पावसाळ्यात ३ महिने सुट्टीच आहे. त्यावेळी बोटी चालणारच नाहीत. असें मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रक्रियेला वेळ लागेल. १० लाख रूपयांच्या वरचा व्यवहार आहे. त्यामुळे यासाठी कमीत कमी २ महिने तरी लागतील.

४.१२२ राज्य शासनाने १२ बोटींबद्दल का दुर्लक्ष केले ? विभागाने केंद्र शासनाकडे ३४ बोटींपैकी २२ बोटींचा प्रस्ताव पाठविला. राज्य शासनाने अजुनपर्यंत १२ बोटींचा विचार का केला नाही ? कारण लोकलेखा समिती प्रॉस्पेक्टिव्ह देखील पाहते आणि मागचे कामकाज देखील पाहते. प्रॉस्पेक्टिव्हबाबत ठीक आहे. पण सन २०१२ पासून पाठपुरावा का करण्यात आला नाही ? केंद्र शासनाच्य बोटी आहेत तर मग केंद्र शासनाचे या संदर्भात काय म्हणणे होते? १२ बोटींबाबत राज्य शासनाची भूमिका काय होती अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्य शासनाच्या १२ बोटी फायबरच्या आहेत, त्यामध्ये फक्त कम्पास सिस्टिम आहे, त्यामध्ये जीपीएस सिस्टिम नव्हती.

४.१२३ महालेखाकारांचा परिच्छेद आल्यानंतर १२ बोटींबाबत सांगण्यात येत आहे एकीकडे केंद्र सरकारकडे प्रस्ताव गेला आहे, त्याबाबत विभागाने कोणताही पाठपुरावा केला नाही. सन २०१२ ला पत्र पाठविले. जीपीएस सिस्टिमशिवाय बोटी सुरू? आहेत. १२ बोटी राज्य शासनाच्या असल्यामुळे त्याबद्दल तरी विभागाने आग्रही भूमिका घेतली पाहिजे होती. याबाबीकडे विभागाचे दुर्लक्ष झाले आहे.सर्व वरिष्ठ अधिकारी आहेत. जीपीएस सिस्टिमशिवाय चालले आहे. मच्छीमारांच्या बोटी पाकिस्तान व श्रीलंका उचलून घेऊन जाते. विभागाच्या बोटी अशाप्रकारे पोलिसांसह घेऊन गेले तर विभागाचे विभागास लोक कुठे गेले हे कळणारच नाही. त्यांचा समुद्रात शोधत राहणार. तटरक्षकदल ठरविलेल्या हद्दीच्या बाहेर जाणार नाही एवढी खात्री आहे. पण तटरक्षकदलाच्या हद्दीत येऊन ते दलाच्या बोटी घेऊन जातात. परिस्थिती तशी आहे. श्रीलंका दक्षिणेकडून बोटी घेऊन जाते आणि पाकिस्तान गुजरात भागाकडून बोटी घेऊन जाते. कधी अशी अवस्था झाली तर विभागाकडे काय पद्धती आहे ? त्या बोटींवर काम करणाऱ्या लोकांचा पगार महिन्याला २-३ लाख रुपये असेल. त्या बोटींना ५० हजार रुपयांचे जीपीएस सिस्टिम लावत नाही. आपण त्यांच्या जीवाच्या सुरक्षिततेला गृहीतच धरीत नाही. असे समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जीपीस सिस्टीमसाठी विभागाच्या निधीमधून केंद्र सरकारची वाट न पाहता निधी उपलब्ध करून देण्यात येईल. यासंदर्भात समितीने सूचना केली की या बोटीवर ३ महिन्यांच्या आत जीपीएस सिस्टिम बसावावी. असे केले नाही तर बोट चालविण्यासाठी धोकदायक परिस्थिती निर्माण झाल्यास या संदर्भात जबाबदारी निश्चित करावी.

इष्टतम संख्येने गस्ती न घालणे :

४.१२४ गस्तीचे कामकाज केंद्र शासनाने तास सांगितले आहेत, त्याप्रमाणे चालते का ? विभागाकडून डिझेल देण्यात येत, तेवढे फेऱ्या होतात की फेऱ्या करण्यासाठी त्यापेक्षा जास्त डिझेल लागते आणि डिझेल नाही म्हणून फेऱ्या राहतात का, नेमके यामध्ये काय होते ? जेवढे डिझेल दिले जाते, तेवढ्याच फेऱ्या मारल्या जातात का ? स्वत:च्या पैशाचे डिझेल टाकून कोणी फेऱ्या मारणार नाही. डिझेल कमी मिळते म्हणून तटरक्षक दलाच्या गस्ती कमी होतात, जेवढ्या गस्ती लागतात, तेवढ्या करण्यात येतात का, डिझेल पाहिजे तेवढे मिळते का, सदर बाबतीत खरी परिस्थिती सांगण्याबाबत समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तटरक्षक दलांकडे जरी ६९ बोटी असल्या तरी दल अंदाजे १/३ बोटी गस्तीसाठी ठेवण्यात येतात. १/३ प्रिव्हेंटिव्ह मेंटेनन्ससाठी बाजूला ठेवण्यात येते. छोटे-मोठी कामे करायचे असेल ते करून त्या तयार ठेवण्यात येतात आणि १/३ खूप तातडीच्या प्रसंगी ठेवतो. कोणत्याही वेळी कमाल ३० ते ४० टक्के गस्ती घालतात. कारण आपल्याला ३ शिफ्ट आहेत. रात्रभर गस्ती घालाव्या लागतात. सर्वसाधारणपणे २३ ते २५ बोटी गस्तीवर असतात, त्यासाठी जे पैसे लागतात, ते कमी पडत नाहीत. एका वर्षात, एका महिन्यात इतके तास झाले पहिजेत, त्या दृष्टीने विभागाचे उत्तर असले पाहिजे. विभागाने असे नमूद केले आहे की, पावसाळ्यात १५० दिवस फिरताही येत नाही. पावसाळ्यात विभागाच्या कोणत्याच बोटी फिरत नाहीत का ?

४.१२५ आता आलेल्या बोटी लहान आहेत. पूर्वी संयुक्त पाहणी करताना मोठे पाडाव घेण्यात येत होते, त्यावेळी सर्वांकडून बोट करून पाहणी करण्यात येत होते करीत होते. आता केंद्र सरकारकडून आलेल्या बोटी लहान आहेत, त्यामुळे ते अंतर लांब आहे.

४.१२६ ज्या ६९ बोटी आहेत, त्यामध्ये पावसाळ्यात फिरणारी एकही बोट नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या बोटी जवळ फिरू? शकतात. मात्र फार लांब जाऊ शकत नाहीत. लाट मोठी झाली की त्यांचे काही काम नाही. ५, ७, १० नॉटिकल माईलपर्यंत बोटी जाऊ शकत असतील. बोटी फार लहान आहेत. त्यामध्ये सर्व बसू शकत नाहीत. उपयोगिता डेटा समितीसमोर आलेला आहे. तो फक्त २० टक्के आहे. समुद्रात तटरक्षकदल हे किती नॉटिकल माईलपर्यंत असते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ५ नॉटिकल माईलपर्यंत विभागाचे तटरक्षकदल असते. ५ ते १२ नॉटिकल माईलपर्यंत केंद्र शासनाचे तटरक्षक दल असते. १२ नॉटिकल माईलनंतर नेव्हीच तटरक्षकदल असते.

४.१२७ १२ नॉटिकल माईलपर्यंत जाण्यासाठीची विभागाकडे एकही बोट नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, १२ नॉटीकल्स माईल्सपर्यंत जाण्यासाठी विभागाकडे बोट नाही. विभागाचे तटरक्षकदल नाही. फक्त ५ नॉटिकल माईलपर्यंतच जातो.

४.१२८ विभागाच्या तटरक्षकदलात प्रतिनिरीक्षक माईल्सपर्यंतच मर्यादा घालून दिली आहे पावसाळ्यात ५ नॉटिकल माईलपर्यंतसुद्धा जाणारी बोट आहे ती फार लहान आहे. मांडवापर्यंत जाताना त्रास होतो.

४.१२९ विभागाचा एकूण डेटा २० टक्क्यांच्या वर नाही. विभागाचा ५० बोटींचा डेटा समितीकडे आलेला आहे. असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाकडे डेटा ३० ते ४० टक्क्यांच्या दरम्यान म्हणजे १/३ असले पाहिजे. तपासणी झाली त्यावेळी थोडे कमी होते. परंतु आता १/३ राखण्याचा करण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येत आहे.

४.१३० पावसाळ्यात ५ नॉटिकल माईलपर्यंत फिरण्यासाठी ज्या बोटींची आवश्यकता आहे त्या बोटी कधी आपण केंद्र सरकारकडे मागितल्या का, राज्य शासनाने या संदर्भात विचार केला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र सरकारनेच त्याचे विनिर्देश ठरविले आणि सर्वांशी सल्लामसलत करूनच ते ठरविले आणि त्यांनी ते पाठविले आहे. कारण फार मोठ्या बोटी पाठविल्या तर त्या बोटींची देखभाल दुरूस्ती मेंटेनन्स आणि त्यांचा डिझेल खर्चही जास्त होईल. त्यामुळे बोटी लहान करून जास्त तुकड्यांमध्ये गस्ती कराव्यात असे केंद्राचे एकंदर धोरण आहे.

४.१३१ विभागाकडून सागरी किनाऱ्यावरही गस्ती घालण्यात येतात त्याबद्दल काही तपशील देणार का ? बाकीच्या वेळी सागरी किनाऱ्यावर सर्व गस्तीची व्यवस्था ठेवण्यात येते. त्यामुळे धोका नाही. विभाग या विषयाच्या संदर्भात तपशील देण्यात यावा किनाऱ्यावरील सुरक्षेबद्दल तुमच्या उत्तरात नमूद आहे की, पावसाळ्यामध्ये समुद्र अत्यंत खवळलेला असतो आणि पोलीस बोटींची खवळलेल्या समुद्रात सागरी गस्त घालण्याची तेवढी क्षमता नाही. त्यामुळे हवामान खात्याचा अहवाल व समुद्राची स्थिती लक्षात घेऊनच, पोलीस बोटी व त्यावरील स्टाफ यांच्या सुरक्षिततेचा विचार करूनच, मुंबई व आजुबाजूच्या परिसरातच सागरी गस्त घालण्यात येते. नियमित गस्त घालण्यात येते. पावसाळ्यात तटरक्षक दलाला सागरात फिरता येत नाही परंतु किनाऱ्यावर सातत्याने गस्त सागरी पोलीस करीत असतात का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सर्व बाबी मान्य केल्या व विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, स्थानिक नागरिकांकडून माहिती मिळत असते, त्यामुळे त्यांच्याशी समन्वय असणे आवश्यक आहे. तटरक्षक दलाच्या कोकण परिक्षेत्राच्या तासाप्रमाणे मुंबई शहर व नवीन मुंबई शहर यांच्या हद्दीमध्ये सागर किनारी जी गावे आहेत तेथे सागर रक्षक दल स्थापन केलेले आहे, त्यांचा आणि स्थानिक पोलिसांचा चांगला समन्वय असतो. वर्षातून दोन वेळा तट रक्षक दलाकडून एक ' ऑपरेशन सागर कवच ' आयोजित केले जाते. त्यावेळी सर्वांची सतर्कता तपासण्यात येते. त्यावेळी या सर्वांची तटरक्षक दलांची मदत मिळते. पोलीस महानिरीक्षक स्तरावर ऑपरेशन किनारा सुरू केले आहे. त्यामध्ये स्थानिक मच्छीमार बांधव, तरुण, विभागाचे कोस्टल पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी सहभागी होतात, त्यांना तास दिले जातात. त्यामुळे सर्वांचा समन्वय चांगला आहे. कुठे काय चालले आहे त्याची माहिती स्थानिक पोलिस स्टेशनला मिळत असते. स्थानिक पोलीस स्टेशनच्या माध्यमातून ४४ कोस्टल पोलीस स्टेशन आहेत. कोकण परिसरात ३६ कोस्टल पोलीस स्टेशन आहेत, त्यांच्याकडून मोटर सायकल व जीप यांच्या माध्यमातून गस्ती करण्यात येतात.

नौकांच्या दुरूस्ती व देखभालीतील विलंब :

४.१३२ नौकाच्या देखभाल दुरुस्तीच्याबाबीतील विलंबासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या असलेल्या व्यवस्थेमध्ये गोवा शीपयार्ड यांना केंद्र सरकारने नोडल म्हणून ठेका दिला आहे की, त्यांनी दुरुस्तीचे काम घ्यावे. आता गोवा शीपयार्डला पाठविणे किंवा त्यांच्या ठराविक एजन्सीकडून दुरुस्तीचे काम घेणे यामध्ये वेळ लागतो आणि पैसाही जास्त लागतो. आता विभागाने स्वीस चॅलेंज पद्धतीने जी आता राज्याने मान्य केली आहे, ४-५ एजन्सीज मुंबईत असतात त्यांच्याकडून देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे. आज १-२ कंपन्यांनी दर दिला आहे, त्या दराप्रमाणे अजून कोणी तयार आहेत का ते पाहण्यात येणार आहे, ते जर झाले तर, ३-४ एजन्सीज मुंबईत करता येतील आणि ते लवकरात लवकर होऊ शकेल.

४.१३३ गोवा शीपयार्ड कपंनीसुद्धा कोणाला तरी सब कॉंट्रॅक्ट देत असते. मग त्याचा उपयोग काय आहे ? विभागाने डायरेक्ट दिले पाहिजे. विभागाची ही प्रक्रिया कधी पूर्ण होणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाकडून गोवा शीपयार्ड कंपनीला काम देण्याऐवजी ते स्वत:च प्रत्यक्ष काम देण्यात येत आहे व ही प्रक्रिया २ महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

४.१३४ बोटी सन २००९ मध्ये घेतल्या, त्यांचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचा करार (एएमसी) झाले नसल्यामुळे, सन २०१४ मध्ये त्या निर्लेखित कराव्यात असा विभागाचा प्रस्ताव आलेला आहे. वार्षिक देखभाल दुरुस्ती करारात उशीर, नंतर विनिमय दरामध्ये झालेली वाढ या सर्व विलंबासाठी दोषी कोण आहेत ? मे. सीलेग्ज् इंटरनॅशनल लिमिटेडच्या ४ नौका होत्या, त्या निर्लेखित कराव्यात असा विभागाने प्रस्ताव केला आहे. म्हणजे हे पूर्ण पैसे वाया गेले आहेत, ते पैसे उपयोगात आलेच नाहीत. मग याला जबाबदार कोण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मे. सीलेग्जच्या ४ बोटी होत्या, त्या एमफीबीएस आहेत, म्हणजे समुद्रात जातात आणि जमिनीवर चाकांवर सुद्धा येतात. त्या न्युझिलँडमधून सन २००८-०९ मध्ये घेतल्या होत्या. सुरूवातीला त्यांचा कालावधी संपल्यानंतर त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन २००९ मध्ये प्रस्ताव पाठविला होता, तो सन २०१३ मध्ये शासनकडून मंजूर झाला. मधल्या काळात डॉलर्सचे दर मोठ्या प्रमाणात वाढले होते. त्यामुळे तेवढ्या पैशात ते होत नव्हते. पूर्वी जे दुरुस्तीचे दर ठरले होते ते ४ वर्षांनंतर करायचे ठरल्यामुळे ते आता व्यवहार्य होईल की नाही, योग्य होईल की नाही याचा विचार केला. आधीच्या ज्या काही बोटी होत्या त्या स्कॅव्हेंज करून म्हणजे एक खराब झाली की, तिचा पार्ट त्यात वापरून त्या बोटी वापरणे सुरू होते. परंतु सन २०१३ नंतर मात्र त्या बोटी वापरता आलेल्या नाहीत. वित्त विभागाने सन २००९ च्या अंदाजपत्रकाप्रमाणे मंजूरी दिली. सन २००९ चे कोटेशन होते. सन २०१३ ला जुन्याप्रमाणे परवानगी आली. त्यामुळे हा फरक झाला, डॉलर्सचे रेट त्या काळात ६५-६६ रुपयांपर्यंत गेले होते. त्या फरकामुळे ते व्यवहार्य होत नव्हते. त्या कारणासाठी ते झालेले नाही.

४.१३५ जर ते व्यवहार्य होत नव्हते तर विभागाने शासनाला सांगून निधी का वाढवून घेतला नाही. यासाठी आकस्मिकता निधी किंवा काही तरी तरतूद करणे शक्य होते असे मत समितीने व्यक्त केले. तसेच या बोटीची खरेदी नोव्हेंबर, २००९ मध्ये केल्याचे निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २००८-०९ मध्ये म्हणजे हल्ल्यानंतर घेतलेल्या या बोटी आहेत आणि त्यांचे लाईफ ८-९ वर्षे आहे. सन २००८ नंतरच्या हल्ल्यानंतर सन २००९ मध्ये घेतलेल्या आहेत आणि त्यांच्या लाईफचा कालावधी आणि किंमत पाहता ती ॲव्हरेज ५० लाख होती. त्यानंतर एमएमबीच्या सर्व्हेअरकडून रिपोर्ट्स घेण्यात आले. त्यांच्या अहवालानुसार त्यांच्या दुरुस्तीची किंमत ७० ते ७५ लाखाच्या घरात जात होती. त्यामुळे रिपेअर कॉस्ट आणि ओरीजिनल कॉस्ट व्हायबल नाही म्हणून त्या निर्लेखित कराव्यात असे ठरविण्यात आले होते.

४.१३६ त्या निर्लेखित का करता हा प्रश्न नाही तर त्यांची दुरुस्ती वेळेवर का करण्यात आली नाही. वेळेवर दुरुस्ती न केल्यामुळे एका बोटीचा पार्ट दुसऱ्या बोटीमध्ये आणि दुसरीचा पहिलीमध्ये असे केले आहे. असे करता करता सर्वांना स्क्रॅप करून टाकले. त्यामुळे आता या बाबीही निर्लेखित करण्याची वेळ आली आहे. ही परिस्थिती एएमसी न झाल्यामुळे निर्माण झाली आहे. आता पीएसीच्या २०१३ च्या अहवलानुसार त्यासंबंधी वित्त विभागाची मान्यता न घेता प्रथम गृह विभागाला अधिकारच देण्यात यावेत अशी शिफारस समितीने १७ व्या अहवालात केलेली आहे. त्यानंतर ते अधिकार देखील गृह विभागाला देण्यात आले आहेत. त्यामुळे गृह विभागाने केवळ वित्त विभागाला दोष देऊन उपयोग होणार नाही. पुढील कोणतीच कार्यवाही न करता या बोटी निर्लेखित करण्याची कार्यवाही केलेली आहे असे मत समितीने व्यक्त केले.

४.१३७ विभागाने सुरूवातीपासून हलगर्जीपणा केलेला आहे. एएमसीमध्ये पाठपुरावा न केल्यामुळे एएमसीची मान्यता ४-४ वर्षे मिळालेली नाही. सन २०१० नंतर एएमसीसाठी आपण वित्त विभागाकडे गेले आणि २-३ वर्षानंतर वित्त विभागाकडून एएमसी मिळाली नाही आणि आता निर्लेखित करण्याची पाळी आली आहे. वित्त विभागाने आपल्याला दुरुस्तीचे अधिकार दिले आहेत त्यांचा योग्य रितीने वापर करण्यात येत आहे काय. पोलिस विभागाला नोव्हेंबर २०१३ मध्ये पर्याप्त प्रमाणात वित्तीय अधिकार सोपविण्यात आले आहेत. या अधिकारांचा योग्य वापर होत आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, इतर बोंटींच्या बाबतीत आय.जी. स्तरावर अधिकाराचे हस्तांतरण केल्यामुळे तात्काळ दुरुस्ती होत आहे. त्याबाबत अधिकारांचा वापर होत आहे. परंतु आता जे निर्लेखित केले आहे त्यांच्याबाबतीत काही सांगता येत नाही.

४.१३८ महालेखापालांचा असा आक्षेप आहे की, अधिकार दिल्यानंतरही दुरुस्ती खर्चामध्ये घट झाली आहे. हे सन २०१२-१३ च्या बाबतीत आहे. त्यानंतर आता त्यांना अधिकारांचे हस्तांतरण केल्यानंतर ते नियमित करीत आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तटरक्षक दलाकडे तीन प्रकारच्या बोटी आहेत. केंद्र शासनाकडून आलेल्या गोवा शिपयार्डच्या २८ बोटी आहेत. २००८ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने मरीन फ्रंटियरकडून घेतलेल्या एकूण २९ बोटी आहेत आणि जुन्या फायबर बोटी आहेत. केंद्र शासनाच्या बोटींचे मेन्टेनन्सचे कंत्राट केंद्र शासनानेच गोवा शिपयार्डला दिलेले होते. मरीन फ्रंटियरकडून घेतलेल्या बोटी सुरूवातीला त्यांच्याकडून मेन्टेन्ड करण्यात येत होत्या. त्यानंतर मागील ३-४ वर्षामध्ये मेन्टेनन्स होत नव्हते म्हणून दिड ते दोन वर्षापूर्वी त्यांचे मेन्टेनन्सचे कंत्राट गोवा शिपयार्डला देण्यात आलेले आहे. सुरूवातीला पोलीस विभागातील अधिकाऱ्यांना पोलीस अधीक्षक किंवा पोलिस महानिरीक्षक यांना दुरुस्तीच्या खर्चाच्या बाबतीत आर्थिक स्वरुपाचे अधिकार पुरेसे नव्हते. त्यामुळे यासंबंधी छोटासा जरी खर्च असला तरी त्याचा प्रस्ताव शासन स्तरापर्यंत जात होता. याबाबत शासनाने दखल घेऊन २३ नोव्हेंबर २०१३ ला एक शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यानुसार आता या दुरुस्ती खर्चाचे अधिकार पोलिस

अधीक्षक आणि पोलीस महानिरीक्षक यांना दिलेले आहेत. संबंधित बोटीच्या किंमतीच्या दुरुस्तीचा खर्च ५ टक्क्यांपर्यंत असेल आणि त्यासंबंधी तट रक्षक दलाचे जे तांत्रिक प्रमुख म्हणून आय.जी.एम.टी. आहेत त्यांनी त्यास प्रमाणित केले की, कंत्राटदाराने केलेला तो खर्च योग्य आहे तर त्यानंतर त्यास एस.पी.आय.जी. त्याला परवानगी देतात आणि त्यानंतर ५ टक्क्याच्या वर आणि १० टक्क्यांच्या आत असेल तर ते अधिकार पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. मागच्या वर्षभरामध्ये याचा पुरेपुर वापर करण्यात आलेला आहे. तटरक्षक दलाकडे प्रस्ताव आल्यानंतर सुरूवातीला ही यंत्रणा बसविण्यास वेळ लागला. आता गेल्या ८-९ महिन्यांचा विचार केला तर प्रस्ताव आल्यानंतर म्हणजे एस.पी. किंवा पोलीस महानिरीक्षकाकडे आल्यानंतर त्यास ८ ते १० दिवसांत मान्यता देण्यात येते.

४.१३९ समितीच्या शिफारशीनंतर पोलीस विभागाला अधिकार दिले आणि त्याचा परिणाम म्हणून आता अंमलबजावणी होत आहे. ज्या निर्णय प्रक्रियेस विलंब होत होता त्यास आता चालना मिळालेली आहे असे मत समितीने व्यक्त केले.

४.१४० सागरी सुरक्षा हा विषय महत्त्वाचा मानून यासंबंधी सागरी आयुक्तालयाच्या प्रस्तावासंबंधी शिफारस करण्याच्यादृष्टीने सागरी आयुक्तालयाची सद्यःस्थिती काय आहे, त्यासंबंधी पूर्वी प्रस्ताव होता याची माहिती समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाने कॉन्शीअस निर्णय घेतला आहे की, आता सागरी आयुक्तालयाची आवश्यकता नाही. ठाणे जिल्ह्यापासून पालघर जिल्हा वेगळा झाला आणि इतर चार जिल्हे राहिले आहेत त्यामुळे आता सागरी आयुक्तालयाची आवश्यकता नाही असा निर्णय शासनाने घेतला आहे. शासनाने हा निर्णय साधारणपणे ७-८ महिन्यांपूर्वी घेतला आहे.

४.१४१ समितीने सन २०१२-१३ मध्ये समितीच्या १७ व्या अहवालात Delay of repair for boat संबंधी जबाबदारी निश्चित करावी अशी शिफारस केली होती. त्याबद्दल काही कार्यवाही आपण केली आहे काय, कारण याबद्दल आपण महालेखापालांना कोणतीही माहिती दिलेली नाही. यासंबंधी विभागाने बैठक सुद्धा घेतलेली नाही. ३.२.७.२ या परिच्छेदामध्ये महालेखापालांनी फेब्रुवारी २०१४ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, समितीच्या १७ व्या अहवालात बोटीच्या दुरुस्तीमध्ये होत असलेल्या विलंबासाठी जबाबदारी निश्चित करावी. याबद्दल विभागाने काही कार्यवाही केली आहे काय? दिनांक २३ नोव्हेंबर २०१३ च्या शासन निर्णयानुसार पुढील कालावधीसाठी सुधारणा केली आहे. परंतु बोटीच्या दुरुस्तीस झालेल्या विलंबाबाबत समितीने केलेल्या शिफारशीनुसार विभागाने कोणावर जबाबदारी निश्चित केली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंबंधीच्या पद्धतीमध्ये बराच कालावधी लागत होता म्हणून विभागाला एखाद्या व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करता येणार नाही, कारण त्यात सर्व केंद्रीत होते. आता ते विकेंद्रीत केल्यामुळे एखाद्या व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करणे योग्य नाही. कारण ती पद्धतच चुकीची होती. त्याबाबत महालेखापाल कार्यालयास स्पष्टीकरण देण्यात येईल.

४.१४२ यासंदर्भात लोकलेखा समितीमध्ये चर्चा करूनच जबाबदारी निश्चित केली पाहिजे असा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे आपण त्यानुसार कार्यवाही करून महालेखापाल कार्यालयास कळविणे अपेक्षित होते असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी महालेखापाल कार्यालयास कळविण्यात येईल असे सांगितले. एकत्रित गस्तीबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्वी मच्छिमारीकरिता ट्रॉलर्स वापरण्यात येत होते त्यांचा आकार मोठा असल्यामुळे त्यामधून एकत्रित गस्ती करणे शक्य होत होते. आता ज्या बोटी आल्या आहेत त्यांचे आकारमान एकदम लहान असल्यामुळे एकत्रित गस्ती करणे आता शक्य होत नाही आणि दुसरी गोष्ट केंद्र शासनाचा असा मानस होता की, जेवढ्या जास्त तुकड्या केल्या तेवढी गस्ती वाढेल.

संयुक्त गस्ती

४.१४३ बायोमॅट्रीक कार्डबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, बायोमेट्रिक कार्डमध्ये एकंदर २,११,८५७ लोकांना अशी कार्डे देणे अभिप्रेत आहे. त्यापैकी १,४०,७३६ लोकांना काड्र्स देण्यात आलेले आहेत. उर्वरित ७१,१२१ बायोमेट्रिक काड्र्स द्यावयाची आहेत त्यापैकी जुनी १८,००० आणि ५३,१२१ नवीन अशी एकूण ७१,१२१ कार्डे असून आयटीआय पल्लकड यांच्याकडे सदरची बायोमेट्रिक कार्डे बनविण्यासाठी विभागाने प्रस्ताव पाठविला असून तो प्रलंबित आहे. आयटीआय पल्लकड हे केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली आहे. त्यांच्याकडे प्रत्येक राज्याकडून प्रस्ताव जातात त्यामुळे त्यांच्या स्तरावर विलंब होतो.

४.१४४ मच्छीमार आणि सागरी पोलिसांचा फार जवळचा संबंध येत असतो. या मासेमारींच्या संस्था असून त्यांचे मोठ मोठे ट्रॉलर्स किंवा बोटी असतात आणि ते ७-८-१० नॉर्टिकल्सच्या पुढे समुद्रात जातात. जॉईन्ट क्लस्टरचा विषय आला होता. ग्रामीण भागात किंवा शहरी भागात पोलिसांना माहिती देण्यासाठी एक खबरी सिस्टीम आहे आणि आपण त्यांना टिप्पर्स म्हणतात. अशा स्वरुपाचा वार्तालाप करण्यासाठी आणि त्या मच्छिमारांशी संपर्क ठेवण्यासाठी वेगळी यंत्रणा ठेवता येण्याबाबत काही चर्चा स्थानिक पातळीवर होते काय? हा काही या ठिकाणचा विषय नाही. तरी देखील याचा फार मोठा उपयोग होतो असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, किनारपट्टीवर राहणाऱ्या मच्छिमारांशी तट रक्षक दलाचा फार जवळचा संबंध आहे. त्यांच्याशी तटरक्षक दलाचे फॉर्मल आणि इनफॉर्मल कम्युनिकेशन्सचे चॉनेल आहेत आणि त्यांच्याकडून तट रक्षक दलाला माहिती मिळत असते. त्यांचा फार मोठा उपयोग होतो आणि त्यांच्या मदतीशिवाय गृह विभागाला तेथे काम करणे अवघड आहे.

४.१४५ तटरक्षक दलाला आता २९० मीटर रिडर्स मिळालेले आहेत आणि तटरक्षक दलाला ३१८ मीटर रिडर्सची आवश्यकता आहे. त्यामुळे इतर मिटर रिडर्सची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ३१८ मीटर रिडर्स प्राप्त झाले आहेत. सागरी सुरक्षिततेसाठी २९० सुधारित व त्यापैकी २१५ कार्ड रिडर्स गृह विभागामध्ये उपलब्ध आहेत.

४.१४६ आता ३१८ जे आहेत ते सध्याच्या स्थितीत कार्यरत आहेत काय? यासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाच्या प्रतिनिधींनी माहिती दिली की, मत्स्यव्यवसाय विकास विभागाने आधी ३१५ ची मागणी केली होती. त्यापैकी ३१८ आलेले आहेत. त्यापैकी काही जे सुधारित आले होते, त्यातील काही सदोष होते. ते २५ परत करण्यात आले आणि त्यापैकी २९० हे चांगल्या प्रतीचे आहेत. इतर सर्व व्यवस्थित सुरू आहेत. गृह विभागाने जे २१५ नंतर दिले आहेत. आता मत्स्यव्यवसाय विभागाला अतिरिक्त २५ पाहिजेत ते त्यांनी नंतर देण्याचे मान्य केले आहे.

४.१४७ यामधील ७१,१२१ कार्डाचे जे डिजिटलायझेशन होणे शिल्लक आहे त्याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंबंधी त्यांचे फोटो आणि फिंगर प्रिंट घेतली जाते, तसेच त्यांचे फॉर्म भरून घेतले जातात यासाठी केंद्र शासनाची पल्लकड नावाची एजन्सी काम करीत असून त्यांच्या स्तरावर हे काम प्रलंबित आहे.

४.१४८ या बायोमॅट्रिकसंबंधी जी कार्यवाही केली जाणार आहे त्यामध्ये विभाग अत्यंत नॉन-कोऑपरेटिव्ह आहे. मच्छिमार हे सामान्य माणसांसारखे जीवन जगत नसतात तर त्यांचे दोन आयुष्ये असतात. समुद्रातील जीवन आणि गावातील जीवन. आपण ते समुद्रामध्ये असताना गावामध्ये कॅम्प लावता आणि त्यावेळी फिंगर प्रिंट घेणारे कर्मचारी गावामध्ये आणता. ज्यावेळी ते गावात येतात त्यावेळी तेथील कर्मचारी केरळला असतात. याबाबत विभागाने समन्वय साधून काम केले असते तर एवढा वेळ लागला नसता. मालाड मतदार संघामध्ये मच्छिमार कॉलनी आहे. केरळ फिशनमॅन्स आहेत. मानोरी, आक्सा, मालवणी अशी गावे आहेत. आत १५ जून नंतर ते पावसाळ्यात समुद्रात जाणार नाहीत हे विचारात घेऊन जून, जुलै आणि नारळी पौर्णिमेच्या अगोदर यासंबंधी या कालावधी परमनंट कॅम्प ठेऊन समन्वयाने काम केले तर या शिल्लक असलेल्या कार्डांचे काम कंत्राट देऊन पूर्ण होऊ शकेल अशी सूचना समितीने केली.

४.१४९ त्या अनुषंगाने केंद्र सरकारची आयटीआयची पल्लकड नावाची जी एजन्सी आहे त्या कंपनीस हे काम देण्यात यावे. कारण शेवटी Goal should be made, Goal should be achieved. अशी सूचना समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, समितीच्या मताप्रमाणे कमीत कमी १ महिना थांबून एकाच वेळी आधारकार्डप्रमाणे त्यांच्याकडून फॉर्म भरुन घेणे आणि फिंगर प्रिंटचे काम करून घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. असे केले तर सर्वांचे एकाच वेळी काम होईल. याबाबत दोन प्रकारची कार्ड दिली तर म्हणजे जे खलाशी असतात आणि दुसरे किनाऱ्यावर जे मासे सुकवितात त्यांच्यासाठी वेगळे कार्य दिले तर बरे होईल. यासंबंधी प्रस्तावित करण्यात आले आहे की, या दोन महिन्यात ते काम करून घेण्यात येईल.

४.१५० सागरी सुरक्षितता महत्वाची आहे. कारण हा राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे केवळ तो राज्यपुरता मर्यादीत नाही. त्यामुळे याकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा असावा. भरती, बाकीच्या सोयीसुविधा, दुरुस्ती निधी, साधनसामग्री याकरिता वेगळा दृष्टीकोन ठेऊन शासनाने विचार करावा. म्हणून आपण अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा जेणेकरुन यातील प्रश्न मार्गी लागतील असा विश्वास समितीने व्यक्त केला.

अभिप्राय व शिफारशी :

" सागरी तट सुरक्षा योजनेच्या नियोजनातील कमतरता "

४.१५१ महाराष्ट्र शासनाने डिसेंबर, २००५ मध्ये केंद्र शासनास सागरी तट सुरक्षा योजनेबाबत प्रस्ताव सादर करताना सागरी तट सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक बाबीमध्ये विद्यमान २४ सागरी तट पोलीस स्थानकाची सुधारणा, ७२ निरिक्षण मनोऱ्यांची स्थापना व २४ नविन सागरी तट बाह्य नाके या बाबींचा समावेश केला होता. तथापि, केंद्र शासनाने प्रस्तावित अन्य बाबी मंजूर केल्या असल्या तरी या ३ प्रमुख बाबीस मंजूरी दिलेली नाही. त्यामुळे अपेक्षित निधीस रु. ६.६५ कोटी प्राप्त होऊ शकला नाही. याशिवाय महाराष्ट्र शासनाने जून, २००५ मध्ये प्रारंभी आराखड्यात प्रस्तावित केलेल्या एका टेहळणी हेलीकॉप्टरच्या खरेदीसही केंद्र शासनाने मान्यता दिलेली नाही. केंद्र शासनाने मान्यता न दिलेली किंवा मंजूरी प्रदान न केलेल्या टेहळणी हेलीकॉप्टर, २४ सागरी तट पोलिस स्थानके, ७२ निरिक्षण मनोरे व २४ नविन सागरी तटबाह्य नाके या बाबीकरिता राज्य शासनाची मंजूरी प्राप्त करून राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करणे आवश्यक असताना विभागाने तशी कारवाई केलेली नाही. त्यामुळे सागरी तट सुरक्षा योजनेच्या नियोजनात कमतरता राहिली असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. सदर आक्षेपासंदर्भात खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी सादर केले की, केंद्र शासनाने सन २००५-०६ मध्ये सागरी सुरक्षेच्या संदर्भात रु. १०४.०५ कोटी एवढे अनुदान दोन टप्प्यात मंजूर केले. सदर अनुदानामधून सागरी तट पोलीस ठाणे, नौका, मोटार सायकली उपलब्ध करून देणे पोलीस ठाण्यासाठी एक रक्कमी सहाय्य, तपासणी नाके उभारणे, बॅरेज व जेटीसाठी आवश्यक कार्यकक्ष निर्माण करणे या बाबींवर खर्च करावयाचा होता. सन २००५-०६ पासून पहिल्या टप्प्याची रक्कम मिळाल्यानंतर सन २०१० मध्ये दुसऱ्या टप्प्याची रक्कम देण्यात आली. महाराष्ट्र शासनास मंजूर रु. १०४.०५ कोटीपैकी ९० कोटी रक्कमेच्या २८ नौकांचा पुरवठा केंद्र शासनाकडून उपलब्ध करून दिल्यामुळे सदर ९० कोटी एवढा निधी राज्य शासनास देण्यात आलेल्या अनुदानातून कपात करण्यात आला. उर्वरीत बाबींवरील खर्चाकरिता गृह विभागाने प्रशासकीय मान्यता देऊन बांधकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, मेरीटाईम बोर्ड व पोलीस हौसिंग कार्पोरेशन यांच्याकडे निधी वर्ग केला. ज्या बाबींकरिता केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही, त्या बाबीवरील खर्चाकरिता राज्य शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यास सदर बाबीवर खर्च करता येईल असा खुलासा सचिवांनी सादर केला असता समितीने सुचित केले की, मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभुमीवर राज्याला सागरी मार्गाने असलेला धोका लक्षात घेता सागरी तट सुरक्षेशी संबंधित कुठल्याही बाबीसंदर्भात तडजोड करणे राज्याला परवडणारे नाही. सन २००५-२००६ पासून केंद्र शासनाकडून टप्प्याटप्याने निधी प्राप्त होत असतानाही आजतागायत ही प्रस्तावित कामे निधीअभावी पूर्ण होऊ शकत नाही, ही बाब राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नक्कीच योग्य नाही. विभागाने या बाबींचे योग्य नियोजन करण्याची आवश्यकता आहे. **तसेच महाराष्ट्र राज्याला असलेला ७२० कि.मी. सागरी किनारा अद्यापही सुरक्षिततेच्या दृष्टीने दुर्लक्षित आहे. केंद्र शासनाने सुरक्षेच्या काही बाबीं करीता निधी उपलब्ध करून दिला असला तरी तो पुरेसा नाही. यास्तव राज्य शासनाने सागरी किनाऱ्यांच्या सुरक्षिततेकरिता प्राधान्याने एक स्वतंत्र लेखा शिर्ष उघडावा व गृह विभागाकरिता मंजूर वार्षिक निधी पैकी ठराविक रक्कम विशेष बाब म्हणून सागरी सुरक्षेसाठी राखून ठेवावी व सुरक्षेच्या बाबींचा प्राधान्य क्रम ठरवून ती रक्कम खर्च करण्यात यावी. तसेच वित्त विभागाने देखील सागरी सुरक्षाबाबतचे प्रस्ताव हाताळताना गृह विभागाच्या मागणी प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भुमिका ठेवावी. अशी समितीची शिफारस आहे.**

" निधीचा वापर न होणे " :—

४.१५२ केंद्र शासनाने माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत दोन टप्प्यांमध्ये उपलब्ध करून दिलेल्या रु. १०४.०५ कोटी पैकी केंद्र शासनाने पुरविलेल्या नौकांची किंमत रु. ९० कोटी वजा जाता राज्य शासनाकडे उपलब्ध असलेल्या रु. १४.०५ कोटीमधून केवळ ७ कोटी एवढा खर्च झाला असून अखर्चित शिल्लक रक्कम रु. ७.०५ कोटी एवढी होती असे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. अखर्चित निधीबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी सादर केले की, रु. २.०९ कोटी एवढा निधी १४ ठिकाणी ऑपरेशनल रुम्स बांधण्याकरिता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे वर्ग करण्यात आला. त्यापैकी ७ ठिकाणी रुमचे बांधकाम करण्यात येऊन गृह विभागाकडे हस्तांतरित केले आहे, ६ ठिकाणी बांधकाम प्रगतीपथावर आहे तर २ ठिकाणी प्रिफॅब्रीकेशन पद्धतीने बांधकाम करावयाचे आहे. १४ कामांपैकी ७ कामे अपूर्ण राहण्याचे मुख्य कारण जागेची अडचण असल्याचे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे ऑपरेशनल रुम्स, सागरी पोलीस ठाणे, तपासणी नाके निधी उपलब्ध असूनही ही प्रस्तावित कामे वेळीच विभागाने पूर्ण केली नाहीत. याबाबत समितीने खेद व्यक्त केला. हा विषय सागरी सुरक्षेशी संबंधित असताना राज्य शासनाने अधिक गांभीर्याने हाताळणे आवश्यक होते. मुंबई शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभुमीवर केंद्र शासनाकडून इतर राज्यांना वितरित निधीपेक्षा आपल्या राज्यास या सुरक्षेसाठी निधीची अधिक गरज आहे. आपल्या राज्याचा सागरी किनारा ७२० कि.मी. एवढा आहे. सदर संपूर्ण किनारा सुरक्षित ठेवण्यासाठी प्रस्तावित सुरक्षेपेक्षाही अधिक सुरक्षा व्यवस्थेची आवश्यकता आहे. सुरक्षेच्या दृष्टीने बसविण्यात येत असलेले थर्मल कॅमेऱ्यांची संख्या कमी आहे. जेट्टीवरील मॉनेटरींग सिस्टीमकरिता ऑपरेशनल रुमच्या संख्येतही वाढ करणे आवश्यक आहे. **एकंदरितच राज्याच्या एकूण किनारपट्टीचा विचार करून परिपूर्ण सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही व त्यानुसार लागणाऱ्या निधीची मागणी विभागाने केलेली नाही. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी ७-७ वर्षे खर्च होत नाही ही सुद्धा गंभीर बाब आहे. प्राप्त निधी खर्च न होण्याची कारणे देखील अत्यंत प्रशासकीय स्वरुपाची असून शासनाच्या स्तरावरच सोडविण्यासारखी असताना केवळ नियोजन व समन्वयाअभावी ही कामे आजतागायत अपुर्णावस्थेत आहे हे देखील समितीला खेदाने नमूद करावे लागत आहे.**

केंद्र शासनाकडून प्राप्त निधी वेळीच खर्च न होण्यास ज्या ज्या विभागातील अधिकारी जबाबदार आहेत, त्या सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व समिती अशीही शिफारस करीत आहे की, भौतिकदृष्ट्या ७ कामे पूर्ण झाली असली तरी रु. २०९.३७ लक्षपैकी प्रत्यक्षात ५३.६८ लक्ष एवढाच खर्च झालेला आहे. सदरचा खर्च अत्यंत कमी आहे. विभागास ज्या ठिकाणी जागेची अडचण आहे, त्याबाबत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून जागा तातडीने उपलब्ध करून घ्यावी व सर्व १४ ठिकाणी ऑपरेशन रुमचे बांधकाम पूर्ण करून मेरीटाईम बोर्डाकडे वर्ग करण्यात आलेला निधी १०० % खर्च करण्यात यावा. सागरी पोलीस ठाणे व तपासणी नाक्याच्या ११ कामांपैकी ९ कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरीत २ कामांकरिता आवश्यक जागा उपलब्ध करून आगामी एक ते दिड महिन्यात बांधकाम पूर्ण करण्यात यावे. याशिवाय अखर्चित निधी योग्य कामांसाठी खर्च करण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

"उपयोगिता प्रमाणपत्र सादर न करणे" :—

४.१५३ केंद्र शासनाने फेब्रुवारी, २००५ मध्ये आखलेल्या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार गस्ती नौकांसाठीचे पेट्रोल, तेल आणि वंगण (POL), गस्ती नौकांची देखभाल व दुरुस्ती आणि कर्मचारी प्रशिक्षण यावरील खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाने योजना सुरू झाल्यावर ५ वर्षे करावयाची होती. केंद्र शासनाने राज्यास इंधन खर्चासाठी आगाऊ स्वरुपात वितरित केलेले रु. १.४५ कोटी माहे मार्च, २०१० पर्यंत खर्च करावयाचे होते व निधी खर्चाच्या सविस्तर तपशीलासह उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच केंद्र शासनाकडून पूढील कालावधीसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार होते. महाराष्ट्र शासनाकडून रू १.४५ कोटी रकमेची उपयोगिता प्रमाणपत्र (UC) केंद्र शासनास सादर करण्यात आलेली नाहीत,असे लेखा परीक्षणात आढळून आले. याबाबत खुलासा करताना उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यास विलंब झाल्याची बाब सचिवांनी मान्य केली. यासंदर्भात समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली की वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र सादर न करण्यास जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली? लेखापरीक्षणात सदर बाब विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही कारवाई करण्यात आलेली नाही ही त्यापेक्षाही गंभीर बाब आहे. रू १.४५ कोटीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे पूढील निधी केंद्र शासनाकडून मिळला नाही. निधी नसल्यामुळे पेट्रोल अभावी बोटी बंद ठेवण्यात आल्या यासंदर्भात विधिमंडळाच्या सभागृहात चर्चा देखील झाली. परंतु, तरीही विभागाने सदर बाब गांभीर्याने हाताळलेली नाही असे दिसून येते. सुरक्षिततेच्या दृष्टीने विभागच इतका उदासीन व बेजबाबदार असल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेसंदर्भातील गंभीर प्रश्न हाताळण्यास विभाग सक्षम नाही असे म्हटले तरीही वावगे ठरणार नाही. **विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्याच्या केवळ २ दिवस अगोदर गृह विभागाने काही उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर केल्याचे साक्षी दरम्यान निदर्शनास आले. विभागाला ही बाब मान्य असूनही संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करून समितीसमोर साक्षीसाठी येणे आवश्यक असतानाही तशी कार्यवाही विभागाने केलेली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व याबाबत शिफारस करण्यात येते की केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्र वेळीच न पाठविण्यास जबाबदार अधिकाऱ्यांना तातडीने निलंबीत करावे व त्वरीत विभागीय चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. व भविष्यात विभागाने सुरक्षिततेसंदर्भातील प्रश्न अधिक प्राधान्याने व गांभिर्याने हाताळावे अशीही समिती शिफारस करते व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशीही समितीची शिफारस आहे.**

"सागरी तट पोलीस स्थानकांच्या उभारणीस विलंब" (C.P.S.) :—

४.१५४ केंद्र शासनाने राज्यातील २५ सागरी तट पोलीस स्थानकांपैकी १९ तट पोलीस स्थानकाकरिता रू ६.३२ कोटी एवढ्या निधीच्या खर्चास २ टप्प्यामध्ये मान्यता दिली. टप्पा १ अंतर्गत १२ सागरी तट पोलीस स्थानकांचे बांधकाम करावयाचे होते. सदर बांधकामांचे व त्यावरील खर्चाचे लेखापरीक्षण केले असता १२ पैकी ८ सागरी पोलीस स्थानकांच्या (C.P.S.) बांधकामास ५ ते ४८ महिन्यांचा विलंब झाला होता व त्यावर रू २.२२ कोटी एवढा अतिरिक्त खर्च झाला होता. उर्वरीत ४ सागरी पोलिस स्थानक (C.P.S) पैकी २ CPS चे बांधकाम प्रगतीपथावर होते आणि २ CPS चे बांधकाम नोव्हेंबर २०१४ पर्यंत सुरू झाले नव्हते. टप्पा २ मधील ७ CPS पैकी ४ CPS करीता वास्तु विशारद व आरेखक नियुक्त करण्यात आले आहेत. स्थानातील बदलामुळे २ CPS ना नोव्हेंबर २०१४ मध्ये उशीराने प्रशासकीय मंजूऱ्या देण्यात आल्या व सागरी तट नियामक मंजूरी प्राप्त न झाल्यामुळे १ CPS चा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित होता असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की पहिल्या टप्प्यातील १२ CPS पैकी ८ CPS चे बांधकाम पूर्ण झालेले आहे. आचरा येथील सागरी पोलिस स्थानकाच्या तळ मजल्याचे काम झाले असून उर्वरीत काम १५ दिवसात पूर्ण होईल. मोरा येथील बांधकामाबाबतचा आराखडा मुख्य वास्तू विशारद सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे सादर केला असता सदर आराखड्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने काढलेल्या आक्षेपांच्या पूर्ततेकरीता जिल्हा पोलिस अधिक्षक, रायगड यांनी माहिती प्राप्त करून सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केली आहे. आराखडा मंजूर होताच तातडीने निविदा प्रक्रीया पूर्ण करून बांधकाम करण्यात येईल. उर्वरीत मुंबई सागरी पोलीस ठाणे व मुंबई शहर या २ CPS च्या बांधकामाकरीता

आवश्यक जागेचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यामार्फत विभागीय आयुक्त व शासनास सादर करण्यात येत आहे. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करण्यात येईल असे विभागाने साक्षी दरम्यान समितीसमोर विदित केले. **यासंदर्भात शासकीय जागेवर एखादे शासकीय कार्यालय बांधावयाचे असल्यास महसूल विभागाकडून Advance Possession देण्याबाबत शासन निर्णय असताना, विभागाने केंद्र शासनाकडून निधी प्राप्त असूनही जागेअभावी २ CPS चे बांधकाम अद्यापही सुरू केलेले नाही ही बाब निश्चितच योग्य नाही. विभागाने सागरी सुरक्षेचा विषय देखील अन्य विभागातील प्रशासकीय कामांसारखाच हाताळला असे खेदाने नमूद करावे लागते. यामुळे सागरी तट सुरक्षेच्याबाबत विभाग गंभीर नाही असे दिसून येते. विभागाने जागा उपलब्धतेबाबतची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. बांधकामाचे आराखडे मंजूर करून निविदा प्रक्रीया तातडीने राबवावी व विहीत वेळेत उर्वरीत CPS चे बांधकाम पूर्ण करावे तसेच दूसऱ्या टप्प्यातील ७ CPS च्या बांधकामाचीही कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, जेणेकरून विलंबामुळे बांधकाम खर्चात होणारी वाढ टाळता येईल. व सुरक्षतेच्या दृष्टीने ही बाब महत्वूपर्ण ठरेल. विभागाने अपूर्ण व प्रलंबित बांधकामाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" तपासणी नाक्यांच्या बांधकामास विलंब " :—

४.१५५ सागरी तटीय क्षेत्रामध्ये व क्षेत्रामधून मनुष्य व सामानाच्या होणाऱ्या वाहतूकीवर लक्ष ठेवण्यासाठी तपासणी नाके बांधले जातात. केंद्र शासनाने टप्पा १ अंतर्गत ३२ तपासणी नाक्यांच्या बांधकामास मंजूरी दिली होती. सदर बांधकामावरील खर्चाचे लेखा परीक्षण केले असता ३२ तपासणी नाक्यापैकी २६ तपासणी नाके निर्धारीत वेळेत पूर्ण केले. परंतू मंजूर तरतूदीपेक्षा जादा खर्च करण्यात आला व उर्वरीत ६ तपासणी नाके प्रशासकीय मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र या कारणास्तव बांधण्यात आलेले नाही. असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला याबाबत विभागीय सचिवांनी साक्षीमध्ये सादर केले की केंद्र शासनाने मंजूर केलेल्या ३२ तपासणी नाक्यांपैकी २८ तपासणी नाक्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत ४ तपासणी नाक्यांपैकी गीतानगर मध्ये तपासणी नाक्याचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे, मढ आयलंड मध्ये जागा मोजणी करून गृह विभागाच्या ताफ्यात देण्यासंबंधी महसूल विभागास कळविले आहे. सांताक्रुज येथील जागेबाबत महसूल व वन विभागाकडे पाठपूरावा करण्यात येत आहे तर ससून डॉक येथील जागेसाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट (BPT) कडे पाठपूरावा करण्यात येत आहे असा खुलासा साक्षी दरम्यान समितीसमोर सादर करण्यात आला. **सदर खुलासा विचारात घेता गीतानगर मधील तपासणी नाक्याच्या बांधकामास सन २०१२ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता असतानाही अद्याप बांधकाम सुरू केले नाही, ते तातडीने सुरू करण्यात यावे. व समांतर पातळीवर सुधारित प्रशासकीय मान्यता घेणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. मढ आयलन्ड येथील जागेची मोजणी करून गृह विभागास उपलब्ध जागेवरील बांधकामसुद्धा तातडीने सुरू करावे, तसेच सांताक्रुज आणि ससून डॉक येथील जागा मिळण्याकरीता संबंधित विभागांकडे तातडीने पाठपूरावा करून जागा प्राप्त करावी व समितीस आश्वासित केल्याप्रमाणे १ वर्षाच्या आत चारही तपासणी नाक्यांचे बांधकाम पूर्ण करून तसा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" सागरी तट पोलीसांचे कामकाज " :—

४.१५६ सागरी तट पोलीसांचे कामकाज कार्यक्षमतेने होण्यास पर्याप्त संख्येत व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक, गस्ती नौका व सामुग्रीची उपलब्धता या बाबीची महत्वपूर्ण भूमिका असते. मंजूर कर्मचाऱ्यांची संख्या, नियुक्त कर्मचारी आणि रिक्त पदे यासंदर्भातील लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की ५१.२१% तांत्रिक पदे, ३७.०१ तंत्रज्ञेत्तर पदे अशी सरासरी ४०.०२% पदे रिक्त होती. सदर पदे रिक्त राहण्याचे कारण सुधारित सेवा प्रवेश नियमास राज्य शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नव्हती. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, १९ जानेवारी, २०१६ रोजी सुधारित सेवा प्रवेश नियम मंजूर झाले असून त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. राज्य शासनाने निर्धारीत केलेल्या मर्यादेपर्यंतची पदे भरणे शक्य होईल. याबाबत समितीने निर्देश दिले की, विभागाने राज्याच्या सुरक्षिततेच्या संदर्भात कंत्राटी पद्धतीने केलेली भरती अत्यंत धोकादायक आहे. विभागाने नियमित पदे भरणेबाबत कार्यवाही करावी. तसेच कर्मचाऱ्यांच्या सद्यःस्थितीतील वेतनात वाढ करणे शक्य आहे काय, ही बाब सुद्धा तपासणे आवश्यक आहे. बोट चालविण्यासाठी सद्यःस्थितीत दिला जात असलेला २०-३० हजार वेतन कमी असल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळेही कर्मचारी भरतीस कमी प्रतिसाद मिळतो व पदे रिक्त राहतात. **याबाबत विभागाने सखोल अभ्यास करून वेतन वाढीबाबत वित्त विभागाच्या सचिवांशी विचार विनिमय करून उचित कार्यवाही करावी तसेच तटरक्षक दलाच्या पोलीस कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र कक्ष उभारणेबाबतही विभागाने विचार करून कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. विभागाने समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करून ३ महिन्यात अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" सामुग्री न बसविणे/कमी प्राप्त होणे " :—

४.१५७ एखाद्या वेळी नौका समुद्रात कोणत्या ठिकाणी आहेत व त्यांचा प्रवासाचा मार्ग समजण्यासाठी नौकांवरील कर्मचाऱ्यांना जागितक स्थितीदर्शक यंत्रणेची (GPS) मदत होते म्हणून ६९ कार्यकारी नौकांपैकी ३४ नौकांवर GPS बसविण्यात आले नसल्याचे लेखापरिक्षणात निदर्शनास आले.

त्याचप्रमाणे ५ सागरी तटीय जिल्ह्यामध्ये एकूण ४२६ बुलेट प्रुफ जॅकेटस्ची आवश्यकता असताना गृह विभागाने किनारा पोलीस स्टेशनला (CPS) फक्त १७० जॅकेटस् पुरविली होती असा आक्षेप महालेखापालांनी नोदविला आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, बुलेट प्रुफ जॅकेट खरेदीसंदर्भात निविदा प्रकिया पूर्ण करण्यात आलेली आहे. बुलेट प्रुफ जॅकेटसंदर्भातील २ चाचण्या (टंबलींग व फायरींग चाचणी) करणे बाकी आहे. १ चाचणी चंदीगडला तर दुसरी गुजरात मध्ये करावी लागणार आहे. आगामी १५ ते २० दिवसात सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन खरेदीची कार्यवाही करण्यात येईल. केंद्र शासनाने पुरवठा केलेल्या ६९ बोटींपैकी ३५ बोटींवर GPS सिस्टीम कार्यरत आहे. ३४ बोटीवर अद्याप GPS सिस्टिम बसवलेली नाही. यामध्ये सदर ३४ बोटींमध्ये २२ बोटी केंद्र शासनाकडून गोवा शीप यार्डमार्फत पुरविण्यात आलेल्या आहेत व १२ बोटी राज्य शासनाच्या मालकीच्या असून त्या फायबरच्या बोटी आहेत. त्यामध्ये फक्त कंपास सिस्टीम आहे. या सर्व ३४ बोटींवर क्रS बसविण्याची कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. **बुलेट प्रुफ जॅकेटची उपयुक्तता विचारात घेता विभागाने ४२६ जॅकेट पैकी फक्त १७० जॅकेट पुरविली. व उर्वरित जॅकेट खरेदी संदर्भात झालेल्या विलंबाबाबत समितीने नाराजी व्यक्त करून विभागीय सचिवांनी आश्वासित केल्यानुसार बुलेटप्रुफ जॅकेट खरेदीसंदर्भात दोन्ही चाचण्या २० दिवसांत पूर्ण करून १ महिन्याच्या आत उर्वरीत बुलेटप्रुफ जॅकेटसचा पुरवठा होईल याची दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच केंद्र शासनाकडील २२ व राज्य शासनाकडील १२ बोटीवर अपेक्षित खर्च रुपये २० लक्ष निधी मागणीचा प्रस्ताव तातडीने वित्त विभागास पाठवून GPS सिस्टीम कार्यरत करणे आवश्यक होते. सदर बोटींना GPS सिस्टीमशिवाय चालू ठेवल्यामुळे बोटींचे स्थळ (Location) कळू शकत नाही. त्यामुळे बरेच धोके निर्माण होतात. तटरक्षक दलाच्या हद्दीतील बोटींचे सुद्धा अपहरण होऊ शकते व GPS अभावी सदर बोटींचा शोध घेणे कठीण होते. या बाबींचा विभागाने गांभिर्याने विचार केला नाही याबाबत समितीने खेद व्यक्त केला. राज्याच्या/विभागाच्या वार्षिक अंदाजपत्रकाच्या तुलनेत GPS सिस्टीम बसविण्यावरील खर्च अत्यल्प असतानाही विभागाने याकडे दुर्लक्ष करणे निश्चितच योग्य व समर्थनीय नाही. विभागाने बोटीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवाच्या सुरक्षिततेला गृहीतच धरले, ही सुद्धा गंभीर बाब आहे असेही समितीचे मत आहे. विभागाने याबाबत तातडीने निधी उपलब्ध करून घ्यावा व ३४ बोटींवर GPS सिस्टीम बसविण्याची कार्यवाही ३ महिन्यात पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" नौकांच्या दुरुस्ती व देखभालीतील विलंब " :—

४.१५८ २६/११ च्या अतिरेकी हल्ल्याच्या घटनेनंतर महाराष्ट्र शासनाने मे. सीलेग्स् इंटरनॅशनल लि. न्युझीलंड (पुरवठादार) यांच्याकडून रु. १.९४ कोटी किंमतीस चार सीलेग्स् ॲम्फीबीअस सागरी नौका नोव्हेंबर, २००९ मध्ये खरेदी केल्या. ज्याचा हमी कालावधी १ वर्षाचा होता. सप्टेंबर, २०१० मध्ये हमी कालावधी संपल्यानंतर पुरवठादाराशी नौकांची देखभाल करार करण्याविषयी पोलीस आयुक्त, मुंबई यांनी सप्टेंबर, २०१० मध्ये गृह विभागास सादर केलेल्या प्रस्तावास नोव्हेंबर, २०१३ मध्ये मंजूरी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत परकीय चलनाच्या विनिमय दरात प्रचंड बदल झाल्यामुळे परदेशातील मुळ पुरवठादाराकडून प्राप्त करावयाच्या सुट्या भागांची किंमत वाढली आणि त्यामुळे भारतातील मध्यस्थाने वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (AMC) करण्यास नकार दिला. सुट्या भागांची उपलब्धता नसणे व देखभाल सेवांचा अभाव यामुळे ३ सीलेगचा जानेवारी, २०११ पासून आणि एका सीलेग्सचा मार्च, २०११ पासून वापर बंद झाला. या नौकांचा खर्च आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारखा नसल्याने या नौका मोडीत काढण्यासाठी पोलीस उपायुक्तांनी अतिरिक्त मुख्य सचिवांकडे एप्रिल, २०१४ मध्ये प्रस्ताव सादर केला. परंतु या प्रस्तावास शासनाची मंजूरी डिसेंबर, २०१४ पर्यंत प्राप्त झाली नाही. सदर आक्षेपाबाबत विभागीय सचिवांनी साक्षी दरम्यान खुलासा केला की, विनिमय दरामध्ये झालेल्या वाढीमुळे सुट्या भागांची किंमत वाढल्यामुळे वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (AMC) करता आला नाही, ही वस्तुस्थिती आहे. आधीच्या ज्या काही बोटी होत्या त्या स्कॅव्हेन्ज करून म्हणजे एक बोट खराब झाल्यावर त्या बोटीचा पार्ट अन्य बोटीत वापरुन त्या बोटी सुरू ठेवण्यात आल्या होत्या. परंतु सन २०१३ नंतर त्या बोटी वापरात आल्या नाहीत. ही सुद्धा वस्तुस्थिती आहे. सन २००९ मध्ये घेतलेल्या बोटी यांचे आजपर्यंतचे आयुष्य साधारणतः ८ ते ९ वर्षे, त्यांची मूळ किंमत सरासरी ५० लक्ष असताना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या (MMB) च्या सर्व्हेयरकडून प्राप्त अहवालानुसार दुरुस्तीची किंमत ७०-७५ लक्ष असल्यामुळे सदर बोटींचे दुरुस्ती करणे हा पर्याय व्यवहार्य नसल्यामुळे सदर बोटी निर्लेखित करण्याचा निर्णय विभागाने घेतला असा खुलासा विभागीय सचिवांनी सादर केला. याबाबत समितीने मत व्यक्त केले की, मूळात दुरुस्तीचे काम वेळेवर झालेले नाही. वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याकरिता विभागाने ३ वर्ष एवढ्या दीर्घ काळाचा विलंब केल्यामुळे व विनिमयाच्या दरातील वाढ परिणामी सुट्या भागाच्या किंमतीतील वाढ झाल्यामुळे देखभाल दुरुस्ती करार होऊ शकला नाही. दरम्यानच्या कालावधीत विभागाने दुरुस्तीसाठी एका बोटीचा पार्ट दुसऱ्या बोटीमध्ये वापरण्याची चुकीची पद्धत अवलंबिलेली आहे, ही सुद्धा अतिशय गंभीर बाब आहे. वास्तविक लोकलेखा समितीने यापूर्वीच सन २०१२-२०१३ च्या १७ व्या अहवालामध्ये बोटींच्या दुरुस्तीचे अधिकार गृह विभागातील वरीष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांना देण्याबाबत शिफारस केली होती. विभागाने सदर शिफारशीनुसारही वेळीच कार्यवाही केली नाही. त्यामुळेही IG ना बोटींची दुरुस्ती किंवा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करता आला नाही. याबाबत समितीने खेद व्यक्त केला. वास्तविक उपरोक्त बोट खरेदीबाबतचा एकंदरीत घटनाक्रम पाहता विभागाने हा निर्णय अत्यंत अव्यवहारिक व अतांत्रिक पद्धतीने हाताळल्याचे दिसून येते. शासनस्तरावरुन

एखाद्या परकिय कंपन्यांशी कोणताही व्यवहार करताना या नियमित अडचणी येत असताना शासनस्तरावरुन हे विषय प्रथमतःच हाताळण्यात येत असल्यासारखी कार्यवाही विभागाकडून झालेली आहे. परकिय कंपन्यांशी अशा प्रकारचा व्यवहार करताना करण्यात येणाऱ्या करारामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर चलनात होणाऱ्या बदलासह या सर्व तांत्रिक, आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर बाबींचा पूर्ण अभ्यास व नियोजन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करूनच याचा समावेश करारामध्ये करणे अपेक्षित असते. एकंदरीतच अशा नियोजनाच्या अभावामुळे या बोटींसाठी केलेला संपूर्ण खर्च वाया गेला. **सदरहू बाब अत्यंत गंभीर असून त्याची शासन स्तरावरुन चौकशी करण्यात यावी व त्यात जबाबदार सर्व अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. तसेच समितीच्या शिफारशीनंतरही विभागाने वित्तीय अधिकार IG ना प्रदान करण्यास केलेल्या विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करावी. तसेच एक बोट स्क्रॅव्हेज करून तीचा पार्ट दुसऱ्या बोटीस अयोग्यरित्या वापरणे परिणामी सन २०१३ पासून सर्व बोटी निकामी राहणे या कार्यवाहीस जबाबदार अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करण्यात यावी. विभागाने समितीच्या उपरोक्त शिफारशीनुसार कार्यवाही करावी तसेच लोकलेखा समितीच्या १७ व्या अहवालातील (सन २०१२-१३) ' डिले ऑफ रीपेअर फॉर बोट ' या शिफारशीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महालेखापालांना सादर करावा. विभागाने उपरोक्त शिफारशीबाबत केलेल्या सर्व कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

४.१५९ उपरोक्त सर्व परिच्छेदासंदर्भात महालेखापालांनी घेतलेले गंभीर स्वरुपाचे आक्षेप पाहता व सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील व महत्वाचे विषय हाताळण्यासंदर्भात शासनस्तरावरुन दिसून आलेला विलंब व उदासिनता पाहता हे सर्व विषय अधिक प्राधान्याने व गांभीर्याने हाताळले गेले असते तर कदाचित मुंबईवर २६/११ ला झालेला दहशतवादी हल्ला टाळता आला असता असे नमूद करणे समितीला आवश्यक वाटते. शासनस्तरावरुन हे विषय हाताळण्यासाठी एखादा स्वतंत्र सक्षम, प्रशिक्षित टेक्निकल वींग स्थापन करता येईल काय या पर्यायाची देखील छाननी करावी व शक्य असल्यास त्याची अंमलबजावणी करावी तसेच राज्याच्या सुरक्षतेच्या दृष्टीने सागरी सुरक्षा ही अत्यावश्यक व महत्त्वाची असल्यामुळे दर तीन महिन्यांनी मा. गृहमंत्री, सचिव, गृह विभाग व सागरी सुरक्षा दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमावेत आढावा बैठक घेण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

टाळता येणारा खर्च :

५ सर जे.जे.समुह रुग्णालये, मुंबई यांना वीज गुणक राखण्यासाठी कपॅसिटर्स बसविण्यात आलेले अपयश, त्यामुळे झालेला रु. ८५.१२ लाख इतका टाळता येणारा खर्च.

५.१ बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या (BEST) विद्युत प्रशुल्काप्रमाणे जेव्हा जेव्हा मासिक बिलात सरासरी वीज गुणक ५४ PF ०.९० पेक्षा कमी असेल तेव्हा BEST ने आपल्या ग्राहकांवर मासिक बिलाच्या दोन ते १० टक्के दराने दंड आकारावा. तसेच वीज गुणक जर ०.९५ पेक्षा जास्त असेल तर ग्राहकांना एक ते सात टक्के दराने सुट देण्यात येते. कपॅसिटर्स ५५ बसवल्यामुळे वीज गुणक ९० टक्क्यांपेक्षा (०.९०) अधिक वाढण्यात/राखण्यास मदत होते.

अधिष्ठाता, सर जे.जे.समूह रुग्णालय, (रुग्णालय) मुंबई यांचे दस्तऐवज तपासले असता (मे, २०१४) असे आढळून आले की, हे रुग्णालय BEST चा लघु दाबाचा (Lower TeNSion) ग्राहक आहे. एक्च्ह्र ने जानेवारी, २०१० ते फेब्रुवारी, २०१४ या कालावधीत तीन विद्युत जोडण्यांमध्ये वीज गुणक ०.६३ आणि ०.८९ या दरम्यान असल्याने रुपये ८५.१२ लाखांचा दंड आकारला. BEST ने चार वर्षापेक्षा जास्त काळ वीज गुणक दंड आकारला असूनही रुग्णालयाने, वीज गुणक दंड टाळण्यासाठी वीज गुणक ०.९० किंवा त्यापेक्षा जास्त राखण्यासाठी कपॅसिटर्स बसविण्याची कार्यवाही केली नव्हती.

अशाप्रकारे वीज गुणक राखण्यासाठी कपॅसिटर्स न बसविल्यामुळे रु. ८५.१२ लाखाचा टाळता येण्याजोगा खर्च झाला.

सदर बाब जुलै, २०१४ मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिली. त्यांचे उत्तर डिसेंबर, २०१४ पर्यंत प्राप्त झाले नव्हते.

ज्ञापन :

५.२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदर बाब महालेखाकार, मुंबई यांच्या लेखापरिक्षक चमु कडून करण्यात आलेल्या लेखापरिक्षणामधील परिच्छेद ११ व १२ दिनांक १२.०५.२०१४ अन्वये निदर्शनास आलेली आहे. आपणास सादर करण्यात येते की, गेल्या ३ ते ४ वर्षापासून रुग्णालयाच्या विविध विभागांमध्ये, शस्त्रक्रियागृहांमध्ये तसेच विविध वॉर्ड मध्ये अनेक प्रकारची अत्याधुनिक यंत्र सामुग्री, विद्युत उपकरणे खरेदी करण्यात आलेली आहेत. सदर मशीन, अत्याधुनिक यंत्रसामुग्री, विद्युत उपकरणे या करिता मोठ्या प्रमाणावर विद्युत भार वाढलेला आहे. सदर भार हा टप्या टप्याने वाढलेला असल्याने एका ठराविक वर्षामध्ये विद्युत भार बेस्ट उपक्रम, मुंबई या विजपुरवठा कंपनीस कळविणे सोईचे होत नव्हते. कालांतरांने अस्तीत्वात असलेला विद्युत भार यापूर्वी विजपुरवठा कंपनीबरोबर झालेल्या करारनाम्यात मंजूर झालेल्या विजभारापेक्षा जास्त आहे. यास्तव अतिरिक्त वापर होत असलेल्या विद्युत भारावर वीजपुरवठा कंपनीकडून दंडाची आकारणी करण्यात येते. तसेच विविध यंत्राच्या इंडक्टीव्ह लोडमुळे पॉवर पेनल्टी देखील विजदेयकांमध्ये आकारली जात आहे. विद्युत विभागाने सदर बाबींचा आढावा घेऊन व आकारण्यात येणाऱ्या दंडाची कारणीमांसा करून आवश्यक कामाचे अंदाजपत्रक तयार केले.

त्या अनुषंगाने पत्र क्र.सवैशिवर्स/जजीरु/बांधकाम प्रस्ताव/प आय/२०१३, दिनांक १८.११.२०१३ अन्वये विद्युत विभागाने तयार केलेली २९० लक्ष रकमेचा प्रस्ताव मा.अधिष्ठाता सर जे.जी.समुह रुग्णालये यांनी मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केला. सदर कामास शासन निर्णय क्र.जेजेएच-२०१४/प्र.क्र.२०/१४/प्रशा-१/मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक १५.११.२०१४ अन्वये शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने दंडाच्या रकमा टाळणेबाबत व रुग्णालय इमारतीमधील संवेदनशील भागास पर्यायी विद्युत पुरवठा उपलब्ध करून देणेबाबत अत्यावश्यक कामे जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात आली. त्यामुळे वार्षिक ३० ते ४० लक्ष इतका विज बिलावरील दंडाचा खर्च टाळता आलेला आहे व बेस्ट उपक्रमाकडून मार्च, २०१५ पासून आजपर्यंत १२.०० लक्ष प्रोत्साहनपर सुटही देण्यात येत आहे (विजदेयकांच्या छायाप्रती सोबत जोडण्यात आल्या आहेत). प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने सदर कामांसाठी निधीची तरतूद करणे करिता मा.अधिष्ठाता यांचेमार्फत पत्रक.जजीरु/पलि/बांधकाम/१८२९४/२०१४, दिनांक १५.११.२०१४ अन्वये शासनास पुरवणी मागणी सादर करण्यात आली. सदर काम जुलै, २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पित करण्यात आले व त्यास डिसेंबर, २०१५ मध्ये प्रत्यक्ष निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर मंजूर कामांची निविदाप्रक्रिया सुरू करण्यात आली असून उर्वरीत कामे सन २०१६ मध्ये पूर्ण होतील. सदरची सर्व कामे पूर्ण झाल्यावर विद्युत यंत्रणा पूर्ण क्षमतेने वापरात येऊन दंडाची आकारणी पूर्णपणे टाळता येईल.

यासंदर्भात शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

महालेखापाल, मुंबई यांच्या लेखापरिक्षक चमुकडून लेखा परिक्षणामध्ये काढलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने सदर दंड टाळण्यासाठी शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १५.११.२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु. २९०.०० लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात

आली होती. सदर कामासाठी पुरवणी मागणीच्या माध्यमातून अनुदान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. प्रस्तुत विषयी जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ या कालावधीत महत्त्वाची विद्युत कामे पूर्ण करण्यात आली असून त्यामुळे वीज बिलावरील दंडाचा खर्च टाळणे शक्य झाले आहे. तसेच मार्च, २०१५ पासून संस्थेस वीज बिलावर प्रोत्साहनपर सूटही देण्यात आली आहे.

साक्ष :

५.३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या दिनांक २८ जानेवारी २०१६ रोजीच्या बैठकीत प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व अधिष्ठाता, सर जे.जे.रुग्णालय यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या बैठकीत समितीने ' टाळता येणारा खर्च ' यासंदर्भात थोडक्यात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखाकार कार्यालयाने ' सर जे.जे.रुग्णालय, मुंबई यांना वीज गुणक राखण्यासाठी कपॅसिटर्स बसविण्यास आलेले अपयश त्यामुळे झालेला खर्च रु. ८५.१२ लाख इतका टाळता येणारा खर्च ' असा आक्षेप घेतल्यामुळे त्यासंदर्भातील लेक्षापरीक्षण झाले आहे. दंड टाळण्यासाठी शासनाने विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता व त्याला दिनांक १५.११.२०१४ अन्वये २९० लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देखील दिलेली आहे. यासंदर्भात पैसे नसल्यामुळे पुरवणी मागणीच्या माध्यमातून अनुदान उपलब्ध करून घेण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. यासंदर्भात त्यांना अधिक पैसे दिल्यामुळे दंडाचे पैसे टाळणे शक्य झाले आहे. मार्च २०१५ पासून संस्थेच्या वीज देयकावर प्रोत्साहनपर सूट देखील देण्यात आलेली आहे.

५.४ सन २०१० ते २०१४ या कालावधीत ८५ लक्ष रुपयांचा दंड आकारला गेला होता. विभागाने दिनांक १८.११.२०१३ रोजी यासंदर्भात प्रस्ताव पाठविला होता. या प्रस्तावाला नंतर मान्यताही दिली गेली. शासनाने सन २०१५ मध्ये निधी सुद्धा उपलब्ध करून दिलेला होता. पण विभागाने सन २०१० ते २०१३ या कालावधीत जर प्रस्ताव पाठविला असता तर या ३ वर्षाच्या काळात हे दंडाचे पैसे वाचविता आले असते. कारण महाराष्ट्र वीज मंडळाकडून सन २०१० पासून दंड आकारण्यात येत होता. म्हणूनच शासनाकडे सन २०१० मध्येच प्रस्ताव पाठवावयास पाहिजे होता. शासनाकडे हा प्रस्ताव सन २०१० साली का पाठविला नाही ? तसेच या ३ वर्षाच्या कालावधीत सुद्धा प्रस्ताव का पाठविला नाही, निधीची मागणी का केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रस्ताव आल्यानंतर सन २०१४ मध्ये मान्यता घेण्यात आली होती. यासंदर्भात अधिक माहिती देताना सर जे.जे.रुग्णालयाचे डीन यांनी समितीस सांगितले की, सन २०१० पासून नवीन मशिनरी घेण्यात येत होती. पीएमएसएसवाय योजनेमधून १०० कोटी रुपये एवढा निधी मिळाला होता व त्यामधून नवीन मशिनरीज विकत घेण्यात आल्या होत्या. परंतु सन २०१० पासून बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST) कडे प्रत्येक वर्षी विद्युत भार (लोड) वाढवून देण्यासंदर्भात अर्ज केलेले आहेत. पण बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST) ने चारही वर्षात रुग्णालयाला विद्युत भार (लोड) वाढवून दिलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. सर जे.जे. रुग्णालयात एमआरआय, सिटी स्कॅन अशा किती तरी मशिनरीज आहेत. तसेच रुग्णालयाला ९० नवीन वातानुकूलित यंत्रे देणगीच्या माध्यमातून मिळालेली आहेत. रुग्णालयाकडे जुनी वातानुकूलित यंत्र देखील पुष्कळ आहे. तसेच जुने एमआरआय मशिन्स १२ वर्षे काम करीत होते. परंतु मॅग्नेटीक रिझॉल्यूशन्समुळे बिल वाढत जाते. खरे म्हणजे हा विद्युत भार कॅपेसिटर कमी करु शकतो. परंतु त्या कालावधीत कॅपेसिटर लावले गेले नाही. निधीच्या अभावी एकदम सर्व मशिनरीज नव्याने बसवणे शक्य नसल्यामुळे जुन्या मशिनरीज एकदम बदलू शकता आल्या नाहीत.

५.५ जुलै, २०१५ मध्ये २९० लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळालेली होती. तसेच पुरवणी मागणी सुद्धा मंजूर झालेली आहे असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. तथापि, हे काम अजून सुरू झालेले नाही. विभागाने आता उणिवा भरुन काढल्या असल्यामुळे सद्या दंड बंद झालेला असून रुपये १२ लाख प्रोत्साहनपर देखील मिळालेले आहे. त्यामुळे हे सर्व कामकाज करण्यासाठी एकंदर किती रुपये खर्च करावे लागतील तसेच महालेखाकार यांनी असा मुद्दा काढला आहे की रु. २.९० करोडमधील एकही पैसा खर्च केलेला नाही (without spending a single paisa out of 2.90 crores). प्रोत्साहन निधी मिळालेला आहे पण विद्युत भार वाढला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्याच बरोबर पॉवर फॅक्टरला मेन्टेन करण्यासाठी कॅपेसिटर लावता आले असते. परंतु कॅपेसिटर लावण्यात आले नाही त्यामुळे ८५ लाखाचे नुकसान झालेले आहे. कॅपेसिटर न लावण्यासाठी जबाबदार अधिकारी कोण आहे ? सर जे.जे. ररुग्णालय हे काही लहान ररुग्णालयनाही. या ठिकाणी एमआरआय, सिटीस्कॅन मशिन्स आहेत, मोठया प्रमाणात रुम्स आहेत. पण तेथे लघुदाबाचे (Lower tension) कनेक्शन आहे. जिल्हा हॉस्पिटलला देखील उच्चदाब (Higher tension) कनेक्शन घेतले जाते असे असताना सर जे. जे. हॉस्पिटलमध्ये उच्चदाब (Higher tension) कनेक्शन्स का घेतले नाही ? हॉस्पिटलमध्ये जी व्यवस्था केली आहे त्यासाठी एकंदर किती खर्च आलेला आहे ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले. परंतु विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि, अधिष्ठाता, सर जे.जे. हॉस्पिटल, मुंबई यांनी सांगितले की, जे.जे. हॉस्पिटलमध्ये अतिरिक्त वापर होत असलेला विद्युत भारावर विजपुरवठा कंपनीकडून दंडाची आकारणी करण्यात येते. तसेच विविध यंत्राच्या इंडक्टीव्ह लोडमुळे पॉवर फॅक्टर पेनल्टी देखील विजदेयकामध्ये आकारली जात आहे. यावर विद्युत विभागाने सदर बाबींचा आढावा घेऊन व याकरिता येणाऱ्या दंडाची कारणीमिमांसा करून आवश्यक अंदाजपत्रक तयार केले व त्या अनुषंगाने सन २०१३ मध्ये अर्ज केला व त्याच वेळेला कामाला सुरूवात केली होती. तथापि, सर जे.जे.रुग्णालयाला सन २०१० पासून दंड लागत होता ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता अधिष्ठाता सर जे.जे.रुग्णालय, मुंबई यांनी सांगितले की, सन २०१० पासून बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST) ला अर्ज करण्यात येत होते. परंतु शासनाकडे रु. २.९० कोटी एवढ्या निधीची मागणी सन २०१३ मध्ये केली होती.

५.६ आता रिबेट मिळण्यास सुरूवात झालेली आहे. सहा ठिकाणच्या इमारतींमध्ये मीटर बसवण्यासाठी ८६ लाख रुपये खर्च केले असून इतर चार ठिकाणच्या इमारतीसाठी रु. २३ लाख एवढा निधी खर्च केलेला आहे. कॅपेसिटर लावण्यासाठी हा खर्च करण्यात आलेला आहे.

५.७ कॅपेसिटर लावण्यामध्ये विलंब केल्यामुळेच सर जे.जे.रुग्णालयाला ८५ लाख रुपयांचा भूर्दंड सहन करावा लागला आहे. जर आपल्या घराचे एका महिन्याचे वीज बिल जास्त आले तर आपण वीज बिल जास्त का आले याची माहिती घेतो. परंतु हे सरकारी काम असल्यामुळे येथे जास्त येणाऱ्या वीज बिलाकडे लक्ष दिले गेले नाही ? कॅपेसिटर लावल्याबरोबर वीज बिल कमी झाले ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे कॅपेसिटर लावण्यामध्ये विलंब करणारे अधिकारी कोण व त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ? कारण वीज बिल बघण्याची जबाबदारी ऑडीटर, कॅफो यांच्यावर असते परंतु या अधिकाऱ्यांनी यासंदर्भात दुर्लक्ष केल्यामुळेच या ठिकाणी महालेखाकारांच्या अहवालात हा परिच्छेद आलेला आहे. तसेच वीज भार लघुदाबावर (एलटीवर) चालवण्यापेक्षा उच्चदाबावर (एचटीवर) का चालवित नाही ? रुग्णालयास वीज पुरवठा उच्चदाब (एचटी) घेतला तर वीज सारख्या दाबाने मिळेल आणि पॉवर फॅक्टरचा प्रश्न सुटेल व उच्चदाब (एचटी) कनेक्शन घेतले तर जास्त कनेक्शन घेण्याची देखील गरज पडणार नाही. खरे म्हणजे जे.जे. रुग्णालय राज्याचे वैभव असून हे रुग्णालय फार मोठे आहे. असे असताना या ठिकाणी एचटीचा सप्लाय का घेतला जात नाही. याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले. जर वेळेत कॅपेसिटर लावले असते किंवा उच्चदाब (एचटी) कनेक्शन्स घेतले असते तर शासनाचा खर्च कमी झाला असता ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे यामध्ये शासनाचा जो काही खर्च झाला आहे त्यामध्ये अधिकाऱ्यांनी दक्षता दाखवली असती तर शासनाचा हा खर्च वाचला असता. अगोदरपेक्षा जास्त मशिनरीज वापरली जाणार असल्यामुळे कनेक्टींग लोड वाढणार आहे याची विभागाला माहिती असते. त्यामुळे तर कनेक्टींग लोड वाढीव द्यावा असा अर्ज करून त्याला मान्यता घेतली असती तर कदाचित रुग्णालयाला दंड बसला नसता. म्हणजे याचा अर्थ असा की, यामध्ये दक्षता घेण्यात आली नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय यांनी सांगितले की, कनेक्टींग लोड वाढवून देण्याची मागणी सन २०१० ते २०१३ या काळात केली असून प्रत्येक वर्षात यासंदर्भात अर्ज देखील केले होते तरी देखील विद्युत भार वाढवून मिळाला नाही. रुग्णालयामध्ये विजेच्या कामाची जाबाबदारी उप अभियंत्याकडे आहे. तसेच सर जे.जे. रुग्णालय विद्युत भार वाढवून देण्यात यावा यासाठी अधिष्ठाता सर जे.जे. रुग्णालय, मुंबई यांनी बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST) अध्यक्षांना स्वत: भेटून मागणी केली होती. परंतु जे.जे.रुग्णालयाचा विद्युत भार वाढवून दिला नाही ही वस्तुस्थिती आहे. पण आता विद्युत भार कमी झालेला आहे. या करिता बेस्ट कडून २ ठिकाणी बायफरकेशन वाढवून घेतले आहे. दिनांक १३ ऑक्टोबर २०१४ व दिनांक २८ सप्टेंबर २०१५ रोजी विद्युत भार वाढवून दिलेला आहे.

५.८ सर्व सरकारी रुग्णालयात विद्युत लेखापरीक्षण (एनर्जी ऑडिट) बंधनकारक करण्याची आवश्यकता आहे. अजूनही जुन्या काळातील फॅन, ट्यूबलाईट वापरले जातात. आता नवीन फॅनमुळे वीज देखील कमी लागते तसेच ट्यूब लाईटच्या ठिकाणी सीएफएल बल्ब,एलईडी बल्ब आले असून त्यांचा वापर केला तर मोठ्या प्रमाणात वीज वाचू शकते. त्यामुळे सर्व सरकारी रुग्णालयात विद्युत लेखापरीक्षण (एनर्जी ऑडीट) बंधनकारक करण्याची आवश्यकता आहे. विद्युत लेखापरीक्षण (एनर्जी ऑडिट) केले तर ३० टक्के विजेची बचत होऊ शकेल. जर सर जे.जे. हॉस्पिटलमध्ये विद्युत लेखापरीक्षण (एनर्जी ऑडिट) झाले असते तर कदाचित या सर्व गोष्टी झाल्याच नसत्या असे मत समितीने व्यक्त केले.

५.९ अतिरिक्त वीज वापरण्यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, जी अतिरिक्त वीज वापरली आहे ती सुद्धा यामध्ये समाविष्ट आहे. रुग्णालयामध्ये जास्त मशिनरीज आहेत तसेच काही वातनुकूलित यंत्र हे देणगी स्वरूपात देखील मिळालेली आहेत. तेवढी कपॅसिटी अगोदर मागितली नव्हती. बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST) बरोबर जो करार असतो तो नीट अँटीसिपेट न झाल्यामुळे ही अडचण निर्माण झालेली आहे, त्यामुळे अतिरिक्त वीज वापरलेली आहे.

५.१० लघुदाबा (एलटी) ऐवजी उच्चदाबाची (एचटी) लाईन घ्यावी अशी सूचना समितीने केली असता अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय यांनी सांगितले की, एचटी लाईन करिता आवश्यक विद्युत भार सध्या नाही. त्यासाठी अतिरिक्त ऊर्जा लागणार आहे. यावर समितीने असे सूचित केले की, हे सल्लागाराला ठरवू द्यावे.

५.११ विद्युत भार न वाढविता केवळ कॅपेसिटर बसविल्यामुळे पॉवर फॅक्टर सेव्ह झालेला असून त्यामुळेच आता रुग्णालयाला रिबेट मिळत आहे. ही वस्तुस्थिती आहे. रुग्णालयाचे वाढीव वीज बील अदा करीत असतांना या विषयाच्या संदर्भात कॅफो तसेच विद्युत विभागाच्या (इलेक्ट्रिक डिपार्टमेंटच्या) जबाबदार अधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष द्यावयास पाहिजे. बेस्टने आतापर्यंत वाढीव विद्युत भार दिलेला नाही. त्यामुळे मुद्दा असा आहे की, यामध्ये विजेचे काम पहाणाऱ्या अधिकाऱ्याला जबाबदार धरणार आहात काय, तसेच त्यांच्यावर कोणती कारवाई प्रस्तावित करणार आहात. तसेच पॉवर फॅक्टर पेनल्टीचा हा विषय असल्याने ही बाब लेखापालने निदर्शनास आणून द्यावसास पाहिजे होती. त्यामध्ये केवळ उप अभियंता दोषी धरणे योग्य राहणार नाही. खरे म्हणजे पेनल्टी बघून विजेचे काम बघणाऱ्या अधिकाऱ्यांनी लागलीच कार्यवाही करावयास पाहिजे होती. परंतु विजेचे काम बघणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांनी यासंदर्भात प्रोसेस केली नाही, ही बाब लक्षातसुद्धा आणून दिली नाही व दंड भरत बसले व त्यामुळेच सर जे.जे.रुग्णालयाला ८५ लाखाचा भूर्दंड सोसावा लागला. शासनाचे ८५ लक्ष रुपयांचे नुकसान ज्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झाले आहे त्याच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात चौकशी करून जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर आम्ही योग्य ती कारवाई करू असे समितीस आश्वासित केले.

५.१२ यासंदर्भातील माहिती समितीला १५ दिवसात कळविण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, १५ दिवसांच्या आत चौकशी करुन प्राथमिक अहवाल सादर करण्यासंदर्भात संपूर्ण चौकशी केली जाईल. तसेच जे जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तथापि सदर चौकशी अहवाल समितीकडे अद्याप प्राप्त नाही.

५.१३ केवळ दोष दाखविणे हा समितीचा हेतू नाही. परंतु निष्काळजीपणामुळे जो खर्च झाला तो विकास कामावर खर्च होऊ शकला असता. या करिता योग्य काळजी घेण्यात घ्यावी अशी समितीची अपेक्षा आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, समितीने बैठकीत ज्या सूचना केल्या आहेत, त्या संबंधी कारवाई करण्यात येईल. तसेच यापुढे असे होणार नाही, याची देखील काळजी घेण्यात येईल.

५.१४ रु. २.९० लाख कशाकरिता खर्च केले ? अशी विचारणा समितीने केली असता अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय यांनी समितीस सांगितले की, रुपये २.९० लाख विद्युत विभागाकडून घेऊन आतापर्यंत १.२५ लाखाचा खर्च झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला हे पैसे द्यावयाचे आहेत. जनरेटरचा वापर केला अथवा नाही केला तरी देखील दर महिन्याला ८ ते १० लाख रुपये भरावे लागतात. म्हणून ६८ लाख रुपयाचे २ जनरेटर सेट आता घेण्यात येत आहे. इतर ठिकाणचे लेखापरीक्षण केलेले असून कपॅसिटर बसविले जात आहेत.

५.१५ वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत जी रुग्णालये आहेत त्या ठिकाणाची जवळजवळ अशीच अवस्था आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय यांनी सर्व ठिकाणी विद्युत लेखापरीक्षण करण्यात येईल असे समितीस आश्वस्त केले.

५.१६ वाणिज्यिक वीजेचा दर रुग्णालयाला लागू होता का ? अशी विचारणा समितीने केली असता अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय यांनी सांगितले की, रुग्णालयाकरिता वाणिज्यिक (कर्मर्शिअल) पेक्षा कमी दर लागू होतो.

५.१७ महालेखाकारांनी वीज बिलाची प्रत मागितली होती. ती अद्यापपर्यंत त्यांना देण्यात आली नाही व अजूनही काही ठिकाणी दंड सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता महालेखाकारांना वीज बिलाची प्रत देण्यात येईल व २ ठिकाणी कपॅसिटर्सची कामे अजून सुरू असल्याने त्या ठिकाणी दंड लागत आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

५.१८ समितीने विचारणा केली की, पेनल्टी बंद झाली असून सन २०१५ पासून संस्थेस वीज बिलावर प्रोत्साहन सूट देण्यात येते. मात्र पेनल्टी सुरू असल्याचे महालेखाकाराचे म्हणणे आहे. यावर ६ कामांची पेनल्टी बंद झाली पण २ ठिकाणी अद्याप पेनल्टी सुरू आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

५.१९ म्हणजेच याचाच अर्थ असा की, समितीला चुकीची माहिती विभागाकडून देण्यात येत आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय यांनी चुकीची माहिती टाईप झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

५.२० जिथे दंड चालू आहे तेथे दंड बंद झाला पाहिजे असे निदेश समितीने दिले असता अधिष्ठाता सर जे.जे.रुग्णालय यांनी सांगितले की, निविदा प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होण्याकरिता कमीतकमी दोन महिने लागणार आहेत. यात ३० लाख रुपयांचा समावेश आहे. कामाचा वेग वाढविला तरी सुद्धा सदर प्रक्रिया पूर्ण होण्यास वेळ लागेल.

५.२१ यासंदर्भात महालेखाकारांनी सांगितले की, विभाग के पास काफी सारे कनेक्शन्स हैं. किसी किसी मे आपने कपॅसिटर लगाया है, किसी को ऐसा ही छोड़ दिया है. अभी भी उसमें पेनल्टी तो लग रही है. आपका अॅप्रूवल आया था, You received the grant of 290 lakhs, वह डिसेंबर २०१५ मे आया था. आपने जनवरी से मार्च में ही कुछ इलेक्ट्रीकल के काम कराए जिसकी वजह से आपका Plant load factor has been corrected partly. I want to say that this was not dependent on that approval. You could have done that much earlier, because you knew that there was a heavy penalty being imposed upon you. Every 4 years the penalty is being imposed. यावर अधिष्ठाता सर जे.जे. रुग्णालय यांनी सांगितले की, We have been doing it since the year 2013. It is not because of the money we are doing it. We have done it in 12 buildings during this one and half year. Now only two buildings are remaining to be done. In those two buildings whatever capacitor has been purchased before, my person is saying that, the capacity of that is not matching. त्यामुळे आणखी दोन कॅपेसिटर घ्यावयाचे आहेत म्हणून टेंडर काढले. याकरिता दोन महिने लागतील.

अभिप्राय व शिफारशी :

टाळता येणारा खर्च :—

५.२२ महालेखापालानी सर जे.जे. रुग्णालय, मुंबई यांना वीज गुणक राखण्यासाठी कपॅसिटर बसविण्यात आलेल्या अपयशामुळे रु. ८५.१२ लक्ष एवढा टाळता येणारा खर्च झालेला आहे. रुग्णालयात लघुदाबाची (Lower tension) जोडणी आहे. रुग्णालयाने कपॅसिटर्स बसविण्याची कार्यवाही न केल्याने BEST ने चार वर्षापेक्षा जास्त काळ वीज गुणक दंड आकारला व रुग्णालयाला सदर दंडापोटी रु. ८५.१२ लक्ष एवढा खर्च करावा लागला असा आक्षेप नोंदविला आहे. याबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये सचिवांनी सादर केले की, गेल्या ३-४ वर्षापासून रुग्णालयाच्या विविध विभागांमध्ये, शस्त्रक्रियागृहांमध्ये तसेच विविध वॉर्डमध्ये अनेक प्रकारचे अत्याधुनिक यंत्रसामुग्री विद्युत उपकरणे खरेदी करण्यात आली व त्याकरिता मोठ्या प्रमाणात विद्युत भार वाढलेला आहे. सदर भार हा टप्याटप्याने वाढलेला असल्याने एका ठराविक वर्षामध्ये विद्युत भार BEST उपक्रम मुंबई या वीज पुरवठा कंपनीस कळविणे सोईचे होत नव्हते. विद्युत विभागाने BEST कडून आकारला जात असलेल्या दंडाची आकारणी विचारात घेऊन सदर दंड टाळण्यासाठी आवश्यक कामाचे रु. २९० लक्ष रकमेचा प्रस्ताव दिनांक १८ नोव्हेंबर, २०१३ रोजी शासनास सादर करण्यात आला व शासन स्तरावरुन दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार आवश्यक ती कामे जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात आली यामुळे वार्षिक ३० ते ४० लक्ष इतका वीज बिलावरील दंडाचा खर्च टाळता आलेला आहे व BEST उपक्रमाकडून मार्च, २०१५ पासून आजपर्यंत रु. १२ लक्ष एवढी प्रोत्साहनपर सूट देण्यात आली आहे. याशिवाय प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने पुरवणी मागणीद्वारे निधी प्राप्त करून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली व डिसेंबर, २०१६ पर्यंत काम पूर्ण होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी सादर केला. याबाबत लोकलेखा समितीच्या छाननीत असे निदर्शनास आले की, सन २०१० ते २०१३ या कालावधीत प्रस्ताव पाठवून वेळीच काम केले असते तर BEST कडून २०१० पासून आकारण्यात येत असलेला दंड टाळता आला असता. BEST कडून दंडाची रक्कम आकारुन ती अदा करताना विद्युत विभागातील अधिकारी व लेखा विभागातील अधिकाऱ्यांनी ही बाब रुग्णालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणली नाही तरीही त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. सर जे.जे. रुग्णालय हे राज्यातील अत्यंत महत्त्वाचे रुग्णालय असून या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या देखील फार मोठी असताना व त्या ठिकाणी विविध प्रकारची अत्याधुनिक यंत्रसामुग्री वापरण्यात येत असताना अद्यापही लघुदाबाचे (Lower tension) कनेक्शन वापरले जाते. विभागाने अद्याप रुग्णालयात विद्युत लेखापरीक्षण (energy audit) केलेले नाही. अद्यापही जुन्या काळातील फॅन, ट्युबलाईट वापरले जातात. रुग्णालयात नवीन फॅन, ट्युबलाईट, C.F.L.बल्ब, L.E.D. बल्ब यांचा वापर न केल्यामुळे साधारणत: ३०% जास्त वीजेचा वापर होतो. व त्या प्रमाणात खर्चही केला जातो, रुग्णालयातील ६ कामावरील दंड आता बंद झालेला असला तरीही २ ठिकाणी दंड अद्यापही सुरू आहे. महालेखापालांच्या आक्षेपानंतरही दंड न भरणेबाबतची परिपूर्ण कार्यवाही केलेली नाही. महालेखापालांनी लेखापरीक्षणाच्या वेळी मागणी केलेली वीज देयकाची प्रत त्यांना अद्यापही उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. अशा आक्षेपार्ह बाबी छाननी दरम्यान समितीच्या निदर्शनास आल्या. याबाबत समिती पुढीलप्रमाणे शिफारस करीत आहे.

५.२३ ज्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शासनाचे रु. ८५.१२ लक्ष एवढे नुकसान झालेले आहे. त्यांची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर १५ दिवसांत कारवाईचे निर्देश समितीने साक्षीदरम्यान देऊनही अद्याप दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून तसा अहवाल समितीस सादर केलेला नाही. ही गंभीर बाब असून समितीच्या निर्देशाचे उल्लंघन व समितीचा अवमान करणारी आहे. **अत: सन २०१०-२०१४ या कालावधीत कार्यरत असलेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांची विभागाने चौकशी करून तात्काळ कारवाई करावी व दोषी आढळल्यास दंडाची रक्कम ८५.१२ लक्ष वसुलीची देखील कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ समितीस सादर करावा तसेच जे अधिकारी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या विलंबास जबाबदार आहेत त्यांच्यावरही कारवाई करून तसा अहवाल त्वरित समितीस सादर करावा, रुग्णालयाकडून प्रशासकीय मान्यतेकरिता दिनांक १८ नोव्हेंबर, २०१३ रोजी सदर प्रस्तावास तब्बल १ वर्षानंतर दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रशासकीय मान्यतेच्या विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात यावी. सर जे.जे. रुग्णालयात अद्यापही २ ठिकाणी BEST कडून दंड आकारण्यात येत आहे तो तातडीने बंद करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, रुग्णालयाचे विद्युत लेखापरीक्षण (energy audit) तातडीने करावे, लघुदाब (lower tension) ऐवजी उच्चदाब (higher tension) जोडणी घेणेबाबत या विषयाशी संबंधित सल्लागार (consultant) यांचा सल्ला घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी, रुग्णालयांचे विद्युत देयक व्यापारी दराने (commercial rate) आकारले जात नाहीत याची विभागाने खात्री करावी व आवश्यकतेनुसार सवलतीच्या दराबाबत ऊर्जा विभागाशी संपर्क साधून सवलतीचे दर प्राप्त करावेत अशी समितीची शिफारस आहे.**

५.२४ तसेच साक्षीदरम्यान असेही समितीसमोर सांगण्यात आले की, ३-४ वर्षापासून BEST ला भार वाढविण्याबाबत सांगितले जात असतानाही तो वाढविला जात नाही यासंदर्भात रुग्णालयाने BEST शी यासंदर्भात केलेला पत्रव्यवहार तपासून यात नेमका विलंब कोणत्या स्तरावर झाला याची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे. विभागाने उपरोक्त शिफारशीनुसार केलेली कार्यवाही व उपाययोजना याबाबतचा अहवाल ३ महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

६ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २०१३-१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.५ ' निविदाशिवाय कंत्राटे बहाल करणे ' या संदर्भात महालेखापालांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

६.१ आठ शासकीय संघटनांनी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत, जी एक अशासकीय संस्था आहे, तिला माहिती तंत्रज्ञान सहाय्यातून सेवांसाठी एकूण रु. १८.४७ कोटीचे काम निविदा न मागविता दिले.

मुंबई वित्तीय नियम, १९५९, च्या नियम १०७ नुसार, जेव्हा जेव्हा व्यावहारिक आणि फायदेशीर असेल तेव्हा फक्त खुल्या निविदा मागवून कंत्राट द्यावे. महाराष्ट्र शासनाच्या (GOM) सामान्य प्रशासन विभागाने (GAD), माहिती तंत्रज्ञानाच्या मार्फत करावयाची कामे नामिका प्रविष्टीत माहिती तंत्रज्ञान सोल्युशन प्रोव्हाडयर कडे (ITSPs) सोपविण्याविषयीच्या विस्तृत मार्गदर्शक सूचना शासनाच्या सर्व विभागांना जारी केल्या (ऑक्टोबर, २००१) मार्गदर्शक सूचनांमध्ये पुढे अशीही तरतूद आहे की, वापरकर्त्याच्या आवश्यकतेच्या दस्तऐवजावर आधारित निविदा ITSPS कडून मागवाव्या.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने (HTED), कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत, महाराष्ट्र राज्यात, IT सहाय्यभूत शैक्षणिक कार्यक्रमांना उत्तेजन देण्याचे प्राथमिक उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेऊन महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) ची स्थापना करून कार्यरत करण्याचे ठरविले (जून २००१). कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत MKCL चे सार्वजनिक मर्यादित कंपनी म्हणून पंजीकरण करण्यात आले होते (ऑगस्ट २००१). ऑगस्ट २०१४ पर्यंत, MKCL चे ८०.८० लाख समभाग (ज्याचे दर्शनी मूल्य प्रत्येकी रू. १० आहे) अंशदानित केले होते त्यापैकी ३० लाख समभाग (३७.१३ टक्के) महाराष्ट्र शासनाकडे होते. GAD खालील माहिती तंत्रज्ञान संचालनालय (DIT) यांनी MKCL ला एप्रिल २००३ मध्ये ITSPs च्या सूचीत नामिका प्रविष्टीत केले होते, जी सूची ३० जून २००६ पर्यंत वैध होती. DIT ने जून २००६ नंतर MKCL सहीत कुठल्याही ITSPs ची नामिकाप्रविष्टी केली नव्हती.

शासनाच्या आठ विभाग/कार्यालये/स्वायत्त संस्थांच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की, जून २००३ ते मे २०१३ दरम्यान या शासकीय विभाग/ कार्यालय/ स्वायत्त संस्थांनी MKCL बरोबर निविदा न बोलविता IT माध्यमाद्वारे करायच्या उपायांसाठी परस्पर १७ सामंजस्य करार (MOU) केले होते जे मुंबई वित्तीय नियम आणि ऑक्टोबर २००१ मध्ये शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारे होते. एप्रिल २००९ ते मार्च २०१४ दरम्यान MKCL ला एकुण रू. १८.४७ कोटींचे प्रदान केले होते. त्याचा तपशील खालील तक्ता ३.४.२.१ मध्ये दिला आहे.

तक्ता ३.४.२.१ : निविदा न मागवता MKCL ला दिलेल्या कामाचा तपशील

अ. क्र.	शासकीय विभाग/ कार्यालय/स्वायत्त संस्थेचे नाव	दिलेले कामाचे स्वरूप (स्वाक्षांकित केलेले एकूण MOUS आणि दिनांक)	MKCL ला केलेले प्रदान (२००९-१४)	शासकीय विभाग/कार्यालय/ स्वायत्त संस्था यांचेकडील कागदपत्रांनुसार MKCLच्या निवडीची कारणे	शासकीय विभाग/ कार्यालय/स्वायत्त संस्था यांनी दिलेले स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	संचालनालय, तंत्र शिक्षण (DTE), महाराष्ट्र शासन	विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी वेब-आधारित उपयोजन कार्यचौकटीची तरतूद (सप्टेंबर २००९ आणि जून २०११ मध्ये दोन MOUS)	रू.५.७३ कोटी	(*i*) सामान्य प्रशासन विभागकडून MKCL ची ITSP म्हणून नामिकाप्रविष्टी झाली होती. (*ii*) MKCL ने अशाच प्रकारची सेवा पुणे विद्यापीठाला (UOP) दिली होती.	DTE ने असे सांगितले (मार्च २०१४) की, महाराष्ट्र शासनाने स्थापन केल्यामुळे आणि DIT ने ITSP म्हणून तिला नामिकाप्रविष्टीत केल्यामुळे MKCL ला काम दिले.
२	महाराष्ट्र कृषि शिक्षण आणि संशोधन परिषद (MCAER) (स्वायत्त संस्था)	महाराष्ट्र राज्यात MCAER ने देऊ केलेल्या विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत सुलभता आणणेसाठी (मार्च २०१३ पर्यंत वैध असलेला जानेवारी २००८ मधील एक MOU)	रू.२.६८ कोटी	(*i*) DIT कडून MKCL ची ITSP म्हणून नमिकाप्रविष्टी झाली होती. (*ii*) पुणे विद्यापीठाला (UOP) MKCL ने अशाच प्रकारची सेवा दिली. (*iii*) MKCL ची संपूर्ण राज्यात ३,५०० पेक्षा जास्त केंद्र आहेत. तसेच तालुका पातळीवरील प्रवेशासाठी सेवा पुरवू शकते.	महानिदेशक MCAER नी असे सांगितले (मार्च २०१४) की, MKCL ही शासकीय संस्था असल्याची समजूत झाल्याने काम दिले गेले होते.

तपशील

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
३	पुणे विद्यापीठ, (स्वायत्त संस्था)	विविध स्नातक आणि स्नातकोत्तर बाह्य उमेदवारांच्या नोंदणी आणि प्रवेशाबाबत वेब आधारित उपयोजनेच्या नियमांची तरतूद आणि UOP मध्ये विविध जागांच्या भरतीसाठी. (प्रवेश प्रक्रियेसाठी तीन MOUs; जून २००३ ज्याला २०१२-१३ पर्यंत वाढ दिली, फेब्रुवारी २०११ आणि एप्रिल २०१२ आणि एक MOU भरती प्रक्रियेसाठी मार्च २०१३ मध्ये)	रू. ६.८५ कोटी	महाराष्ट्र शासनाच्या DTE ना अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी अशीच सेवा पुरविली होती.	निबंधकांनी असे सांगितले (एप्रिल २०१४) की, विविध विभागातील भरतीच्या कामाचा MKCL ला अनुभव असल्यामुळे हे काम त्यांना दिले होते.
४	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ (MLWB), (स्वायत्त संस्था)	आयुक्त, MLWB यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेत सुलभता आणणेसाठी. (एक MOU फेब्रुवारी २०१२ मध्ये)	रू.०.०८ कोटी	(*i*) HTED यांनी MKCL ची स्थापना केली होती. (*ii*) २५ शासकीय विभागातील भरती प्रक्रियेतील काम यशस्वीपणे पार पडले होते.	कल्याण आयुक्त, MLWB यांनी सांगितले (एप्रिल २०१४) की, MKCL ही शासकीय संस्था असल्याची समजूत झाल्याने सदर काम दिले होते.
५	उप संचालक, शालेय शिक्षण (DDSE), महाराष्ट्र शासन	कनिष्ठ महाविद्यालयांत प्रवेशासाठी वेब आधारित उपयोजनांच्या कार्यचौकटीची तरतूद. (चार MOUs एप्रिल २०१०, मे २०११, मे २०१२ आणि मे २०१३ मध्ये)	रू. २.१३ कोटी	शासन निर्णय (GR) दिनांक २८ मे २००९ नुसार, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने माहिती तंत्रज्ञानासंबंधी, कामे MKCL ला देण्याची सूचना केली होती, त्यानुसार हे काम MKCL ला देण्यात आले.	DDSE ने सांगितले (जुलै २०१३) की, मे २००९ च्या शासन निर्णयानुसार काम दिले होते.
६	वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय (DMER), महाराष्ट्र शासन.	DMER मध्ये विविध पदांच्या प्रक्रियेमधील सुलभतेसाठी. (फेब्रुवारी २००९ मधील एक MOU)	रू. ०.३५ कोटी	MKCL हा, महाराष्ट्र शासनाचा इ-शिक्षण, इ-सुशासन, इ-सशक्तीकरण यांचे उपाय व सेवा आरेखित, विकसित व प्रेषण करणार एक उच्च तांत्रिक उपक्रम होता.	संचालक, DMER यांनी सांगितले (फेब्रुवारी २०१४) की, MKCL ही शासकीय संस्था असल्याची समजूत झाल्याने सदर काम बहाल केले होते.
७	सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), नाशिक, महाराष्ट्र शासन.	सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक येथील कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत सुलभता आणणेसाठी (फेब्रुवारी २०१२ मधील एक MOU).	माहिती प्रतिक्षित	MKCL हा, महाराष्ट्र शासनाचा इ-शिक्षण, इ-सुशासन, इ-सशक्तीकरण यांचे उपाय व सेवा आरेखित, विकसीत व प्रेषण करणार एक उच्च तांत्रिक उपक्रम होता.	उत्तर प्रतिक्षित आहे.

तपशील

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
८	जिल्हाधिकारी सोलापूर, महाराष्ट्र शासन	जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयातील भरती प्रक्रियेत सुलभता आणणेसाठी. (सप्टेंबर २०११, एप्रिल २०१२ आणि मे २०१३ मधील तीन MOUs)	रू.०.६५ कोटी	MKCL हा, महाराष्ट्र शासनाचा इ-शिक्षण, इ-सुशासन, इ-सशक्तीकरण यांचे उपाय व सेवा आरेखित, विकसीत व प्रेषण करणार एक उच्च तांत्रिक उपक्रम होता.	जिल्हाधिकारी कार्यालयाने सांगितले (मार्च २०१४) की सदर बाब तपासली जात होती.

तक्ता ३.४.२.१ मधून असे दिसून येते की, UOP ने जून २००३ मध्ये सही केलेल्या एका MOU व्यतिरिक्त, (अनु.क्र.तक्ता ३.४.२.१) जो MKCL च्या नामप्रविष्टीच्या विधी ग्राह्यतेत होता, उर्वरित १६ MOUs वर नामप्रविष्टीची विधिग्राह्यता संपुष्टात आल्यानंतर (जून २००६) निविदा न बोलावता स्वाक्षरी करण्यात आली होती. तसेच, वर नमूद केलेल्या आठपैकी तीन शासकीय संस्था MKCL ही शासकीय संस्था असल्याच्या समजुतीत होत्या. लेखापरीक्षेला खाली दर्शविल्याप्रमाणे MOUs मधील कमतरता व MKCL ने दिलेल्या सेवेत त्रुटी आढळून आल्या.

GAD ने ऑक्टोबर, २००७ मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयानुसार PWD, नाशिक येथील सहाय्यक अभियंत्याच्या पदावर नेमणूक करण्यासाठी २७ उमेदवारांची निवड ही, लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा व त्यानंतर मुलाखत याद्वारे करावयाची होती. परंतु, मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करताना MKCL ने उमेदवारांनी लेखी परीक्षेत प्राप्त केलेले गुणही जाहीर केले होते, जे प्रत्यक्षात गुप्त ठेवणे आवश्यक होते. परिणामी, सरकारी वकीलाच्या सल्ल्यावरून (ऑक्टोबर २०१२) PWD ने मुलाखती न घेता उमेदवारांनी लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर उमेदवार नियुक्त केले (तक्ता ३.४.२.१ चा अनुक्रमांक ७) MKCL कडून देण्यात येणाऱ्या सेवांमधील त्रुटीसाठी शास्ती आकारण्याची अट सामंजस्य करारात नमूद करण्यात आली नव्हती.

MLWB मध्ये लेखा व लेखापरिक्षा अधिकारी या पदावर नेमणूक होण्यासाठी ॲडव्हान्स अकौंटंसी आणि ऑडीटींग विषयातील व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले वाणिज्यिक पदवीधर आवेदन करण्यास पात्र होते. परंतु, एका नियुक्त करण्यात आलेल्या उमेवाराच्या वाणिज्यिक स्नातक (भाग III) च्या गुणपत्रिकेत त्याने ॲडव्हान्स अकौंटन्सी व ऑडीटींग हा विषय अभ्यासला असल्याचे सुचित होत नव्हते. त्याचप्रमाणे, सहाय्यक लेखा अधिकारी या पदासाठी नियुक्त करण्यात आलेले दोन उमेदवार प्रथम श्रेणी प्राप्त वाणिज्यिक पदवीधर नव्हते, जो निकष या पदांसाठी निश्चित करण्यात आला होता. MLWB ने अनियमितता मान्य केल्या (एप्रिल २०१४) आणि सांगितले की योग्य पडताळणीनंतर उचित कारवाई केली जाईल. (तक्ता ३.४.२.१ चा अनुक्रमांक ४). MKCL कडून देण्यात येणाऱ्या सेवांमधील त्रुटींसाठी शास्तीची अट सामंजस्य करारात नमूद करण्यात आली नव्हती.

GAD ने ऑक्टोबर २००१ मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, सेवांची पूर्तता झाल्यावर ITSPs ने शासनाला संगणक प्रणाली सांकेतांक व बौद्धिक मालमत्ता हक्क (IPR) हस्तांतरित करावे १७ पैकी १५ सामजस्य करारामध्ये (DTE अनुक्रमांक १ चा अपवाद वगळता) संगणक प्रणाली सांकेतिक व IPRS शासनाला हस्तांतरित करण्यासंबंधी कोणतीही तरतूद नव्हती.

अधिकाधिक शासन संस्था या MKCL ला नामनिर्देशनावर IT कंत्राटे सोपवित असल्याने, शासनाने MKCL चा दर्जा सुस्पष्ट करण्याच्या सुचना नव्याने सर्व विभागांना जारी कराव्या व सार्वजनिक खर्चात पारदर्शकता व सचोटी राखण्यासाठी सार्वजनिक प्रापणात व सेवादानात स्पर्धात्मक बोलीची विधी ग्राह्यता/महत्व अधोरेखित करावे.

हे प्रकरण शासनाला ऑगस्ट २०१४ ला संदर्भित केले होते. त्यांचे उत्तर डिसेंबर २०१४ पर्यंत प्रतिक्षित होते.

ज्ञापन :

६.२ महालेखापालांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

शासन निर्णय, दिनांक ०६ जून २००१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.मातंत्र-३७००/(१३२/२०००) भाग-ड/तांशि-३ अन्वये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित या नावाची कंपनी, कंपनी कायदा, १९५६ अन्वये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महामंडळासाठी शासनाने निश्चित केलेली उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) या महामंडळाने माहिती तंत्रज्ञानाव्दारे उच्च व तंत्र शिक्षणात आमूलाग्र बदल घडवून नवीन आयाम प्राप्त करून देण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्था यांच्या वर्गखोल्या, विद्यापीठे यांना संगणकाव्दारे जोडून ' महायशनेट ' नावाचे संगणकीय जाळे निर्माण करावे.

(२) या ' महायशनेट ' च्या माध्यमातून विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व यातील विद्यार्थी यांना दृकश्राव्य माध्यमांचा शिक्षण क्षेत्रात उपयोग करून घेण्यासाठी तसेच आधुनिक अभ्यासक्रमांचा अभ्यास करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचे ' हायटेक रिसोर्स सेंटर ' निर्माण करावे.

(३) माहिती तंत्रज्ञानाव्दारे शिक्षणासाठी विविध प्रकारचे साहित्य निर्माण करणे व अशा साहित्याच्या वापरासाठी विद्यार्थी व प्राध्यापकांना उद्युक्त करावे.

(४) या अंतर्गत शैक्षणिक साहित्य Multimedia, संगणकीय प्रणाली, संगणकीय जाळे, Internet Technology, वेबसाईट, Designing, E-commerce, Computer Aided designs (CAD) इ. बाबींचा पुरस्कार प्रचार व आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या सहाय्याने निर्मिती व व्यापार करावा.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने रू. १० कोटीचा निधी उभा करावा, यापैकी रू.५ कोटी इतका निधी शेअर्सव्दारे उभा करावा. त्यामध्ये सुरूवातीस शासनाची रू.२.३ कोटी (४६%) आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कार्यरत उद्योग, शैक्षणिक संस्था, अन्य व्यक्ती यांची रू.२.७ कोटी (५४%) इतकी गुंतवणूक असावी असे ठरविण्यात आले होते. तसेच तीन वर्षांच्या कालावधीत शासनाने गुंतविलेली ५ कोटी रक्कम महामंडळाने परत करावी व महामंडळातील स्वत:ची गुंतवणूक ४६% वरून २६% वर आणावी.

या कंपनीमध्ये सध्या राज्य शासनाचे रू. १० किंमतीचे ३० लाख (एकूण रक्कम रू.३.०० कोटी) समभाग आहेत. सन २०१३-१४ च्या परतावाची २५%प्रमाणे रू.७५ लाख इतकी रक्कम शासनास प्राप्त झालेली आहे.

शासन निर्णय, दिनांक ०३ ऑक्टोबर २०००, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मातंत्र-३७००/(१३२/२०००) तांशि- अन्वये राज्यातील सर्व महाविद्यालये, तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शासनाव्दारे तयार करण्यात येणाऱ्या निवडसूचीतील खाजगी टी.पी.ए. मार्फत विद्यार्थ्यांकरिता Maharashtra State Certificate Course In Information Technology (एम.एस.सी.आय.टी) व शिक्षकांकरिता Maharashtra state Advanced Certificate Course In Information Technology (एम.एस.ए.सी.आय.टी.) हा प्रत्येकी किमान१४४ तासांचा माहिती तंत्रज्ञान विषयक अभ्यासक्रम नेहमीच्या विहित शैक्षणिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त वेगळा व स्वतंत्ररित्या सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

शासन निर्णय, दिनांक ०६ फेब्रुवारी २००२, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मातंत्र-३७००/(२२२/२०००) तांशि-३ अन्वये दिनांक १३ ऑक्टोबर २००० च्या शासन निर्णयाव्दारे MSCIT व MSACIT अभ्यासक्रमाचा कार्यक्रम दिनांक ०१ एप्रिल २००२ पासून महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आला.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च २००३ अन्वये दिनांक १९ मार्च २००३ रोजी किंवा त्यानंतर गट अ, गट ब व गट क मधील (वाहन चालक वगळून) ज्या पदांची निवड प्रक्रिया सुरू होईल अशा नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील अशा प्रकारची अट अशा उमेदवारांच्या नियुक्ती पत्रात घालण्यात यावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.सीओएम१००२/प्र.क्र.१२१/०२/३९, दिनांक २४ एप्रिल २००३ अन्वये MKCL चा वेब डेव्हलपर (Level 2) व ॲप्लीकेशन सर्व्हिस प्रोव्हायडर (Category C2) म्हणून समावेश करण्यात आला.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.डिआयटी/फाईल-०३/२२२/३९, दिनांक २० ऑगस्ट २००३ सदर शासन निर्णयांन्वये MKCL चा ॲप्लीकेशन सर्व्हिस प्रोव्हायडर (Category-F) म्हणून समावेश करण्यात आला. हा समावेश केवळ दिनांक ३० जून २००६ पर्यंतच्या कालावधीसाठी करण्यात आलेला होता. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने कोणतेही आदेश दिल्याचे आढळून येत नाहीत.

विधी व न्याय विभागाने दिनांक ३० जानेवारी २००३ रोजी पुढील अभिप्राय दिलेले आहेत.

Section 617 of the company Act difnes Government Company, which reads as under : For the purpose of (this Act) Government company means any company in which not less than fifty-one per cent. of the (paid-up share capital) is held by the Central Government, or by any State Government, or partly by the Central Government the partly by one or more State Government.

सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्र.मातसं/नस्ती०४/२२४/३९, दिनांक २६ मे २००४ अन्वये संगणक अर्हता परीक्षा व तद्नुषंगिक बाबींविषयी सर्वंकष धोरणाबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

महालेखापाल (लेखापरिक्षा)-एक, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २५ ऑगस्ट २०१४ चे पत्र व त्यासोबतचा Promotion of Maharashtra Knowledge Corporation Ltd. या विषयाबाबतचा सन २०१३-१४ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित केलेला प्रारूप अहवालावर कार्यवाही सुरू असताना महालेखापालांनी याच विषयाबाबत नव्याने प्रारूप परिच्छेद अहवाल त्यांच्या दिनांक ७ जानेवारी २०१५ च्या पत्रान्वये पाठविला असून, त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयासंहित अन्य ८ कार्यालयांनी माहे जून २००३ ते मे २०१३ या कालावधीत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) या कंपनीस काम देताना मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियमांचे (नियम ५८ व १०७) पालन न करता थेट १७ सामंजस्य करार (Memoranda of Undertaking) MKCL बरोबर केले आहेत. यामधून एप्रिल २००९ ते मार्च २०१४ या कालावधीत MKCL ला रू.१८.४७ कोटी रकमेचे प्रदान झाले असल्याचे महालेखापाल कार्यालयाने त्यांचे दिनांक ७ जानेवारी २०१५ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आलेल्या प्रारूप परिच्छेद अहवालान्वये नमूद केले आहे.

महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने त्याबाबतचे परिपत्रक क्र.एमकेसीएल-२०१३/(९४/१३) तांशि-५, दिनांक ४ सप्टेंबर २०१५ अन्वये निर्गमित करण्यात आले असून, त्यान्वये महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या महामंडळाच्या सेवा उपयोगात आणतांना अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. सदरचे परिपत्रक पुढील कार्यवाहीकरीता सर्व प्रशासकीय विभागांना पाठविण्यात आलेले आहे. तसेच सदरचे परिपत्रकाची प्रत महालेखापाल कार्यालयास या कार्यालयाकडील पत्र क्र. MKCL-२०१३/(९४/२०१३)/TE-५, दिनांक ७ सप्टेंबर २०१५ अन्वये पाठविण्यात आलेली आहे.

महालेखापालांनी प्रारूप अहवालामध्ये समाविष्ट केल्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग आणि उद्योग, उर्जा व कामगार विभागास महालेखापालांचे दिनांक ७ जानेवारी २०१५ रोजीचे अहवालाची प्रत पुढील उचित कार्यवाहीकरीता दिनांक ७ सप्टेंबर २०१५ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आलेली आहे.

ज्ञापन :

महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

(1) Action proposed to be taken against the officials for awarding of contract without tendering to MKCL, may be included in the reply to PAC.

(2) Reply of the Public Works Department, Industries, Energy and Labour Dept. and Collector, Solapur may be obtained and furnished for vetting.

महालेखापाल कार्यालयाने दिनांक २ नोव्हेंबर २०१५ रोजीचे टिपण्णीन्वये कळविल्यानुसार आक्षेप क्र.१ चे अनुषंगाने सर्व संबंधित विभागांना त्यांचेशी संबंधित आक्षेपाचे अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत शासनास कळविण्याबाबत दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच आक्षेप क्र. २ चे अनुषंगाने पुन:श्च सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर यांनाही त्यांचेशी संबंधित मुदद्यांचे अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल शासनास कळविण्याबाबत दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ रोजीचे पत्रान्व्ये कळविण्यात आलेले आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.मातंत्र-३७००/(१३२/२०००) भाग-ड/तांशि-३, दिनांक ६ जून २००१ अन्वये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित या नावाची कंपनी, कंपनी कायदा, १९५६ अन्वये स्थापन करण्यात मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर कंपनीला कंत्राट देताना नियमांचे पालन करण्याची जबाबदारी त्या-त्या संबंधित विभागांची आहे. महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने कार्यवाही करण्यास सदर विभाग प्रशासकीय विभाग म्हणून सक्षम असल्याने त्या मुद्दयांचे अनुषंगाने सदर विभागांकडून समितीस कळविण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

साक्ष :

६.३ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्रे अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.५ ' निविदेशिवाय कंत्राटे बहाल करणे ' या परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ११ मे, २०१६ रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीमध्ये महालेखाकारांनी अहवालात नमूद केलेल्या आक्षेपासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, M.K.C.L.संदर्भात जो परिच्छेद आहे त्यामध्ये काही विभागांनी निविदा प्रक्रिया न करता थेट एमकेसीएलला काम दिलेले आहे आणि ही अनियमितता असल्याबाबत महालेखापालांकडून त्या विषयी आक्षेप नोंदविले गेले आहे. त्यामध्ये असेही म्हटलेले आहे की,

M.K.C.L. ही शासकीय कंपनी नाही. त्यामुळे या कंपनीला थेट कामे देणे संयुक्तिक नव्हते आणि जी कामे दिली ती निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून द्यावयास पाहिजे होती. या संदर्भात M.K.C.L.ही तांत्रिक दृष्ट्या शासकीय कंपनी नसली, म्हणजे कंपनी अधिनियमामध्ये एखाद्या कंपनीला शासकीय कंपनी म्हणावयाचे असेल तर त्यामध्ये शासनाचा शेअर होल्डिंग पॅटर्न ५१ टक्क्यांपेक्षा कमी नसावा अशी तरतूद आहे. त्या अर्थाने बघितले तर M.K.C.L.ही शासकीय कंपनी नाही असे म्हणता येईल. या कंपनीच्या शेअर होल्डिंग पॅटर्नची विगतवारी समिती समोर सादर करताना सचिवांनी सांगितले की, या कंपनीचा शेअर होल्डिंग पॅटर्न बघितला तर त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे एकूण ३७.१३ टक्के शेअर्स आहेत.

६.४ दिनांक ११ मे, २०१६ रोजी महाराष्ट्र शासनाचे ३७.१३ टक्के शेअर्स असल्याची माहिती त्यामध्ये दिलेली आहे. कंपनीची आताची जी स्थिती आहे ती विभागाने मिळविलेली आहे. महाराष्ट्र शासनाचे ३७.१३ टक्के शेअर्स आहेत. तसेच, राज्यातील जी वेगवेगळी विद्यापीठे आहेत त्यांचे ३३.९१ टक्के शेअर्स आहेत. उदाहरण द्यावयाचे झाले तर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे २.२९ टक्के, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे २.२९ टक्के शेअर्स आहेत. अशा प्रकारे सर्व विद्यापीठांची इक्विटी बघितली तर ती ३३.९१ टक्के आहे. याशिवाय ॲटोनॉमस बॉडीज पैकी महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एमएसबीटीई) या संस्थेकडे २.२९ टक्के शेअर्स आहेत. साधारणतः ७२ टक्के शेअर होल्डिंग महाराष्ट्र शासन आणि जी कायदेशीर संविधीमान्य (स्टॅच्युटरी) विद्यापीठे स्थापन झालेली आहेत त्यांच्याकडे आणि स्वायत्त संस्था यांच्याकडे असल्यामुळे जरी कंपनी अधिनियमाच्या व्याख्येनुसार ही शासकीय कंपनी नसली तरीही शेअर होल्डिंग पॅटर्न शासन आणि सार्वजनिक प्राधिकरण यांच्याकडे असल्यामुळे विभागांनी मध्यंतरी थेट एमकेसीएलकडे कामे दिली होती. त्यामध्ये चूक झाली असे म्हणता येणार नाही, असे विभागातर्फे स्पष्टीकरण आहे. तथापि, महालेखापालांनी आक्षेप काढला होता की, लोकांमध्ये असा गैरसमज आहे की, ही शासकीय कंपनी आहे. विभागाने दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी परिपत्रक काढून सर्व विभागांना कळविले आहे की, ५१ टक्क्याच्या निकषाप्रमाणे ही शासकीय कंपनी नाही आणि त्या दृष्टीने विचार केला असता M.K.C.L.संदर्भात विभागाने कशा प्रकारे कार्यवाही करावी याचे विवेचन दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिलेले आहे.

६.५ याबाबत समितीने विचारणा केली की, ७२ टक्के शेअर होल्डिंग शासन आणि शासनाच्या संविधीमान्य संस्था यांच्याकडे आहे. मग ७२ टक्के होल्डिंग शासनाकडे असताना शासनाचे किती प्रतिनिधी संचालक मंडळामध्ये होते, अध्यक्ष कोण होते, संचालक कोण होते आणि या कंपनीची मागील १० वर्षांची स्थिती काय होती ? शासनाला किती नफा झाला ? ज्यावेळी कंपनी स्थापन झाली आणि कामे देण्यास सुरूवात झाली त्यावेळी संचालक मंडळावर कोण होते ?

६.८ यासंदर्भात विभागीय सचिवांनी कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर बाबत समितीला माहिती देण्यापूर्वी समितीला अतिरिक्त माहिती दिली की, M.K.C.L.हे सार्वजनिक प्राधिकरण आहे किंवा नाही या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण गणली जावी किंवा नाही या संदर्भातील बाब उच्च न्यायालयापर्यंत गेलेली होती आणि या संदर्भात असा निर्णय देण्यात आला की, एमकेसीएलचा शेअर होल्डिंग पॅटर्न बघून हे एक सार्वजनिक प्राधिकरण आहे. तसेच, संचालक मंडळ संदर्भातील दिनांक ११ मे, २०१६ रोजीची स्थिती अशी आहे की, श्री. अनिल काकोडकर, प्रो.दीपक पाठक हे आयआयटीचे आहेत. श्री. राजाराम देशमुख, माजी उप कुलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, श्री. अनंत सरदेशमुख, डायरेक्टर जनरल ऑफ एमसीसीआयए, पुणे, डॉ. दिलीप बोराळकर, एक्स मेंबर सेक्रेटरी, महाराष्ट्र पोल्युशन कन्ट्रोल बोर्ड, डॉ. निशीगंध देऊळकर या स्वतंत्र संचालक आहेत. डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, उप कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर आणि श्री. विवेक सावंत हे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ आहेत. ज्यावेळी कंपनी स्थापन झाली त्यावेळी तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील हे अध्यक्ष होते. तत्कालिन उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी उपाध्यक्ष होते. डॉ. विजय भटकर, संचालक, प्रो. राम ताकवले, संचालक, तत्कालिन प्रधान सचिव श्री. जे.एस.सहारिया, संचालक, श्री. अशोक कोळसकर, संचालक, श्री. अविनाश पाटील, संचालक होते. त्यावेळी डॉ. राजन वेळूकर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे, कुलगुरु होते, ते देखील संचालक होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु, डॉ. के.बी.पाटील हे संचालक होते आणि श्री. विवेक सावंत व्यवस्थापकीय संचालक होते. ही सन २००५ ची स्थिती आहे. तत्कालिन मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील अध्यक्ष होते.

६.९ हे संचालक मंडळ केव्हा पर्यंत कार्यरत होते ? त्यावेळी ते मंत्री होते काय ? म्हणजे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे मंत्री कंपनीचे अध्यक्ष असतील काय ? सन २००९ ते २०१४ या कालावधीत अध्यक्ष कोण होते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, श्री. दिलीप वळसे-पाटील, माननीय मंत्री असे यामध्ये नमूद केलेले आहे.

सन २००९ ते २०१४ या कालावधीत श्री. राजेश टोपे साहेब अध्यक्ष होते.

६.१० आता संबंधित विभागाचे मंत्री अध्यक्ष नाहीत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या कंपनीचे पदसिद्ध अध्यक्ष नसून शासन त्यांचे तीन संचालक नामनियुक्त करील, अशी तरतूद आहे. त्यामुळे सुरूवातीला विभागाचे तत्कालिन मंत्री महोदय, तत्कालिन राज्यमंत्री महोदय आणि विभागाच्या सचिव श्रीमती कुमुद बन्सल यांचा समावेश होता. याशिवाय विभागाचे जे संचालक होते,

म्हणजे ज्यावेळी ही कंपनी स्थापन केली गेली त्यावेळी तत्कालिन संचालक उच्च व तंत्र शिक्षण विभाग श्री. पठाण साहेब, तत्कालिन तांत्रिक संचालक श्री. पासलकर साहेब हे प्रवर्तक संचालक म्हणून होते. नियमावली (आर्टीकल ऑफ असोशिएशन) आणि एमओयूप्रमाणे शासनाचे तीन प्रतिनिधी म्हणून माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री होते.

६.११ सद्यःस्थितीत शासनाचे तीन प्रतिनिधी कोण आहेत ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाने शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. परंतु, अद्याप त्याला मान्यता मिळालेली नसल्यामुळे शासनाचे प्रतिनिधी नियुक्त करण्यात आलेले नाहीत. दिनांक ६ जून २००१ च्या शासन निर्णयान्वये एमकेसीएलची स्थापना झालेली आहे. त्या तरतुदीमध्ये असे म्हटले आहे की, शासनातर्फे नियुक्त करण्यात येणारे तीन संचालक असावेत.

६.१२ माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांनी M.K.C.L. यांना एप्रिल, २००३ मध्ये आयटीएसपीची सूचित नामिका प्रवर्तीत केली होती आणि दिनांक ३० जून, २००६ पर्यंतच त्या नामिकेची मुदत होती. त्यानंतर मुदत पाळण्यात आलेली नाही. विभागाचे म्हणणे आहे की, शासकीय, निमशासकीय आणि स्वायत्त संस्था अशी एकूण ७२ टक्के शेअर होल्डिंग आहे. परंतु, शासनाचे थेट शेअर होल्डिंग ३७ टक्केच आहे, ५१ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. दिनांक ३० जून, २००६ पर्यंतची वैधता आणि कंपनी अधिनियमाप्रमाणे ५१ टक्के शेअर होल्डिंग नसताना शासन निर्णय काढण्यात आला की, कोणतीही निविदा न काढता एमकेसीएलला पूर्ण काम द्यावे. समितीच्या समोर जे आक्षेप आलेले आहेत त्यामध्ये एकही निविदा मागविण्यात आलेली नाही, असे दिसते. त्यामुळे स्पर्धा झाली नाही, त्यांना सर्व ठिकाणी प्राधान्यक्रम मिळालेला आहे. महालेखाकारांनी काढलेल्या परिच्छेदात नमूद केलेले आहे की, एम.के.सी.एल या अशासकीय संस्थेला माहिती तंत्रज्ञान सहाय्यातून सेवांसाठी एकूण रु. १४.४७ कोटीची कामे खुल्या निविदा न मागविता देणे हे मुंबई वित्तीय नियम आणि ऑक्टोबर, २००१ रोजी शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन करणारे होते. या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या ७-८ विभागानी एमकेसीएल ला कामे दिलेली आहेत त्या विभागांची नावे परिच्छेदामध्ये नमूद केलेली आहेत.

६.१३ विभागाने याला प्राथम्यक्रम आहे असे गृहीत धरुन ते केले. परंतु, हे करणे योग्य होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाचे शेअर होल्डिंग ५१ टक्क्यापेक्षा कमी असले तरी देखील वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाचे शेअर होल्डिंग ७२ टक्क्यापर्यंत जात असल्यामुळे तांत्रिक दृष्ट्या ही जरी शासकीय कंपनी नाही असे म्हटले तरी याला शासकीय कंपनीचे स्वरुप आहे. म्हणून ज्या विभागांनी निविदा न बोलाविता यांना थेट कामे दिली. विभागांनी ज्या समजूतीतून एमकेसीएल ला कामे दिलेली आहेत त्याचा विचार केला असता त्या विभागांकडून मोठी चूक झालेली आहे असे म्हणता येणार नाही.

६.१४ ही बाब समजूतीतून किंवा गैरसमजूतीतून घडली असे म्हणून चालणार नाही. सन २००१ च्या मुंबई वित्तीय नियमाप्रमाणे तसे नाही. केलेली कार्यवाही योग्य आहे हे कोणी ठरविले ? त्याला नियमाचा, मार्गदर्शक तत्वांचा आधार असला पाहिजे. हे होऊ शकते किंवा असू शकेल, असे म्हणून चालणार नाही. सदर कंपनीचे ७२ टक्के शेअर होल्डिंग असल्यामुळे शासकीय कंपनीचे स्वरुप आहे असे विभाग मानतो त्याला कोणता आधार आहे ? अशी विचारणा समितीने केली तसेच या संदर्भातील बाब उच्च न्यायालयापर्यंत गेलेली होती ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत M.K.C.L. ही सार्वजनिक प्राधिकरण आहे किंवा नाही यासाठी उच्च न्यायालयात प्रकरण गेले होते. म्हणजे, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज केल्यानंतर कंपनीने माहिती दिली पाहिजे का ती पूर्णपणे खाजगी कंपनी आहे या संदर्भात त्या कंपनीचे वेगवेगळे होल्डिंग पॅटर्न आणि इतर सर्व गोष्टींचा विचार करून मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे की, हे सार्वजनिक प्राधिकरण आहे. ही पूर्णपणे खाजगी स्वरुपाची कंपनी आहे असे चित्र नाही. त्या कंपनीला माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (एच) साठी हे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून गणले गेलेले आहे.

६.१५ It is not a Private Limited Company. It is a Public Limited Company. यामध्ये शासनाचे ५१ टक्के शेअर होल्डिंग नाही. कोणत्या कलमांतर्गत हे गृहीत धरलेले आहे? त्याला दुर्लक्षित करावयाचे काय, नियम चुकीचा आहे काय.

६.१६ ही शासकीय कंपनी नाही आणि शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या विरोधात जाऊन कंपनीला आदेश दिलेला आहे. ज्यांनी निविदाशिवाय, स्पर्धात्मक दराशिवाय, प्रसिद्धीशिवाय कामे दिलेली आहेत त्या गोष्टी चुकीच्या झालेल्या आहेत किंवा नाही, अनेक त्रुटी असल्याचे देखील महालेखापालांच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, निविदा न मागविता एमकेसीएलला काम दिल्याबाबतचा तपशील महालेखाकारांच्या परिच्छेदात आलेला आहे. यामध्ये केवळ उच्च व तंत्र शिक्षण विभाग नसून महाराष्ट्र कृषी शिक्षण संस्था, पुणे विद्यापीठ आणि काही जिल्हाधिकारी कार्यालयांचा देखील समावेश आहे. कंपनीला काम देण्याबाबतचा जो निर्णय घेतलेला आहे त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी विवेचन करणे जास्त संयुक्तिक राहील. M.K.C.L. ही संस्था उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त आहे. म्हणून तांत्रिकदृष्ट्या ही जरी शासकीय कंपनी नसली तरी त्या कंपनीचा ७२ टक्के शेअर होल्डिंग पॅटर्न सार्वजनिक प्राधिकरणाकडे असल्यामुळे म्हणजे विविध विद्यापीठे आणि शासनाकडे असल्यामुळे एका अर्थाने ही सार्वजनिक प्राधिकरण आहे, सार्वजनिक संस्था आहे.

६.१७ याबाबत उदाहरण देताना समितीने मत व्यक्त केले की, टाटा स्टील कंपनीकडे फक्त १२ टक्के शेअर होल्डिंग आहे. त्या कंपनीला टाटाची कंपनी म्हणतात. शेअर होल्डिंगच्या आधारे असे म्हणता येणार नाही आणि शासनाची मार्गदर्शक तत्वे स्पष्ट आहेत. ५१ टक्के शेअर होल्डिंग असेल तरच ती शासकीय कंपनी होते, हे स्पष्ट आहे. तसेच, संचालक मंडळ कोण आहे. ज्यांच्याकडे १ टक्के शेअर होल्डिंग आहे त्यांना देखील संचालक मंडळात समाविष्ट करणे शक्य आहे. ज्याच्याकडे १ शेअर आहे तो अध्यक्ष, संचालक होऊ शकतात. म्हणून या गोष्टीचे समर्थन करता येणार नाही. ज्या काही गोष्टी झालेल्या आहेत त्या शासनाच्या मार्गदर्शक तत्वांना धरुन आहेत काय आणि निविदा न काढता अशा प्रकारच्या गोष्टी करून घेणे नियमानुसार आहे काय, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, माहिती व तंत्रज्ञानासंबंधीची जी कामे सोपवायची आहेत त्यासाठी सामान्य प्रशासन विभागातर्फे मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली जातात. सन २००६ पर्यंत त्याची नामिका एमकेसीएलकडून तयार करण्यात येत होती. सन २००६ नंतर ती नव्हती. ते शासन निर्णयाप्रमाणे दिले असेल किंवा नसेल याबाबतचा मुद्दा असून या संदर्भात संबंधित विभागाचे प्रतिनिधी अधिक खुलासा करु शकतील.

६.१८ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, You are a parent Department. Ultimately, you are a part of Government. MKCL is not a part of Government. शासनाचे ५१ टक्के शेअर होल्डिंग नाही. त्यादृष्टीने विभागाने माहिती द्यावी. कारण, या संदर्भात परिच्छेद आल्यामुळे हे सर्व विषय आलेले आहेत. विभागाने दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागांना सूचना दिलेल्या आहेत मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहेत.

६.१९ त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दिनांक ४ सप्टेंबर २०१५ रोजी महालेखापरीक्षकांचा परिच्छेद आल्यानंतर आणि त्यामध्ये M.K.C.L. कंपनीचे नेमके स्वरुप लक्षात आल्यानंतर M.K.C.L. ही शासकीय कंपनी नाही, याबाबतचे स्पष्टीकरण विभागाने दिनांक ४ सप्टेंबर २०१५ रोजी दिलेले आहे.

६.२० जर स्पष्टीकरण दिले असेल तर आता एमकेसीएलचे समर्थन का करण्यात येत आहे ? एका बाजूला विभाग सन २०१५ मधील पत्रान्वये विभाग असे म्हणतो की, हा शासनाचा उपक्रम असलेली कंपनी नाही आणि दुसऱ्या बाजूला महालेखापरीक्षकांच्या परिच्छेदाच्या संदर्भात समर्थन करण्यात येत आहे हे योग्य आहे का ? विभाग करीत असलेल्या समर्थनाला कोणत्याही नियमाचा आधार नाही. वित्तीय नियमामध्ये हे बसते, असाही दाखला विभागाने दिलेला नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्तीय नियमाच्या कलम १०७ चे उल्लंघन झाले आहे, असे महालेखापरीक्षकांच्या लेखापरीच्छेदात म्हटलेले आहे. परंतु, कलम १०७ च्या उपकलम ६ मध्ये असे म्हटलेले आहे की, " Whenever practical and advantageous, contracts should be placed only after tenders have been openly invited and in cases where the lower tender is not accepted, reasons should be rECorded.

६.३० ' विभागाने अमूक एका कंपनीला काम द्यावे, असा निर्णय घेतलेला आहे. परंतु विभागाने निविदाच मागविलेल्या नाहीत. आता विभागाने दाखविलेला नियम समितीला मान्यच आहे. कारण, The lowest is not an only criteria. १९५६ च्या कंपनी अधिनियमाखाली कंपनी नोंदणीकृत झाली. या अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेल्या कंपनीला विशेष ओळख असते. ती कोणत्याही व्यक्तीची कंपनी नसते. एखाद्या कंपनीला विशेष ओळख मिळालेली असताना ती शासकीय कंपनी आहे किंवा त्या कंपनीत शासनाचा वाटा आहे किंवा शासनाचे भागभांडवल आहे, असे कसे म्हणता येईल ? विभागाने सुद्धा दिनांक ४/९/२०१५ रोजी मान्य केले आहे की, ही शासनाची कंपनी नाही. त्याप्रमाणे शासनाने मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. त्यानंतर सुद्धा अनेक विभागांनी अद्याप महालेखापरीक्षकांच्या परिच्छेदाला उत्तर दिलेले नाही. सन १९५६ च्या कंपनी अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेल्या कंपनीस विशेष ओळख असते. म्हणजे, त्या कंपनीचे दिवाळे निघाले तर त्याचा दोष राज्य सरकारवर येत नाही. शासनाकडे जरी ९९ टक्के शेअर्स असले तरी ती कंपनी, कंपनी अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेली असल्यामुळे त्या कंपनीसाठी निविदा न बोलाविणे वगैरे बाबी चुकीच्या आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कंपनी अधिनियमाच्या व्याख्येप्रमाणे शासनाकडे या कंपनीचे ५१ टक्के शेअर होल्डिंग नाही. त्यामुळे ही शासकीय कंपनी नाही. यामध्ये कोणताही गोंधळ राहू नये, शंका राहू नये, म्हणून दिनांक ०४/०९/२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, महालेखापरीक्षकांच्या लेखापरीच्छेदाबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे.

६.३१ विभागाने मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. परंतु, मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यापूर्वी या कंपनीला देण्यात आलेल्या कामांबाबतचा हा परिच्छेद आहे. सन २००९ ते सन २०१४ या कालावधीत १६ कामे झालेली आहेत आणि त्याबाबतच महालेखापरीक्षकांनी आक्षेप नोंदविलेला आहे. ही कामे फेअर प्रॅक्टिसने झालेली नाहीत. शासन निर्णय काढून, सर्व अधिकार सुरक्षित ठेवून त्यांना कामे देण्यात आलेली आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ही अनियमितता जरी त्या त्या विभागांकडून झालेली असली तरीही यामध्ये कंपनीचे होल्डिंग पॅटर्न पाहून ७२ टक्के सार्वजनिक प्राधिकरणाचे होल्डिंग आहे, असे समजून कदाचित त्या त्या विभागाने सद्भावनेने या कंपनीकडे कामे सोपविली असावीत. या दृष्टीकोनातून या कामांकडे पाहण्यात यावे अशी विनंतीही विभागीय सचिवांनी केली.

६.३२ त्या विभागांचा हेतू कितीही चांगला असला तरी नियम, कायदे याचे पालन झाले पाहिजे. शासनाच्या कंपनीला वेगळा निकष आणि बाकीच्या कंपन्यांना वेगळे निकष असू शकतात. पण विभागाने निविदा मागविलेल्या नाहीत आणि त्या कंपनीला काम दिले, असा आक्षेप आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या विभागांनी या कंपनीला कामे दिली त्यामागील त्यांचा हेतू आणि एमकेसीएलसंबंधी त्यांची असलेली त्यावेळची समजूत याचा विचार केला तर ही मोठी चूक केलेली आहे, असे म्हणता येणार नाही.

६.३३ समितीने असे मत व्यक्त केले की, अधिकारी वारंवार असे सांगत आहेत की, ही काही फार मोठी चूक समजण्यात येऊ नये. शेवटी कायद्याचे राज्य आहे आणि त्यानुसारच कामे झाली पाहिजेत. तसे झाले नसेल तर कारवाईला आणि शिक्षेला संबंधितांनी सामोरे जायला पाहिजे. जर शासनाचे भागभांडवल ५१ टक्के नसेल तर सरळ-सरळ नियमाचे उल्लंघन झालेले आहे. ७२ टक्के त्यावेळी सार्वजनिक प्राधिकरणांचे भागभांडवल होते. तरी देखील २८ टक्के भागभांडवल इतरांचे होते आणि तसे असेल तर इतर २८ टक्के लोकांना फायदा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलेला आहे का ? तसेच या प्रकरणाचे विभागाने समर्थन केले तर ते पूर्वोदाहरण होईल व त्याचा गैरफायदा घेतला जाईल. ७२ टक्के भागभांडवल असल्याचे विभाग समर्थन करीत आहे. त्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय काय आहेत ? Section 617 of the Companies Act defines 'Government Company' which reads as under. त्यामध्ये स्पष्ट आहे की, "the Central Government, or by any State Government, or partly by the Central Government and partly by State Government and not by any University or Corporation." Only one or partly together, अशी वस्तुस्थिती नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जी तथ्ये लेखापरीक्षकांनी काढलेली आहेत त्याबाबत कोणताही वाद नाही.

६.३४ विभाग या बाबींचे समर्थन करीत असला तरी ही बाब नियमाला धरुन नाही. किंबहुना आशावादी भूमिका घेऊन हे काम योग्य भावनेने झाले आहे, असे म्हणणे कायद्याला धरुन होणार नाही. तसेच एमकेसीएलच्या कार्यपद्धती आणि कामकाजातही अनेक चुका झाल्याचे लेखापरीक्षणातून दिसून येत आहे. एका भरती प्रक्रियेत पात्र उमेदवारांची यादी प्रकाशित करीत असताना त्यांचे बैठक क्रमांक सुद्धा जाहीर करण्यात आले. त्यामुळे विधी सल्लागाराच्या सल्ल्यानुसार नियोजित तोंडी मुलाखती न घेताच लेखी निकालाच्या आधारावर उमेदवारांना नियुक्ती द्यावी लागली. एमकेसीएलच्या अशा कार्यपद्धतीबाबत काही प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत का? सन २००९ ते २०१४ या कालावधीत एमकेसीएलला दिलेल्या कंत्राटाची यादी समितीसमोर आहे. विभागानेही ही बाब मान्य करुन आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत आणि विभागाने हे मान्य केले आहे की, ही शासकीय कंपनी नाही. मग या कंपनीला देण्यात आलेला लाभ किंवा प्राधान्य योग्य नाही का आणि तसे असेल तर संबंधित सर्व दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध विभाग कारवाई प्रस्तावित करणार आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एमकेसीएलकडे विविध विभागांनी कामे सोपविली आहेत. त्या विभागांनी कोणत्या परिस्थितीत तो निर्णय घेतला, याबाबतचे भाष्य करणे योग्य ठरणार नाही. त्या त्या विभागांनी या बाबतचे स्पष्टीकरण किंवा समर्थन करणे योग्य राहील. M.K.C.L. ही उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी निगडित संस्था आहे. या कंपनीचा शेअर होल्डिंग पॅटर्न पाहता अनेक विभागांमध्ये यापूर्वी कदाचित असा गैरसमज होता की, याचे नेमके स्वरुप काय आहे, त्यामुळे त्यांनी काही निर्णय घेतले असतील. परंतु, विभागाने त्याबाबतचा खुलासा केलेला आहे व आता शासनाच्या कोणत्याही विभागामध्ये एमकेसीएलविषयी कोणताही गैरसमज राहिलेला नाही. कारण, विभागाने हे स्पष्ट केले आहे की, ही शासकीय कंपनी नाही.

६.३५ विविध विभागानी एमकेसीएलला कामे सोपविलेली आहेत व ते विभाग याबाबतचा खुलासा करतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले तरी समितीने हे निदर्शनास आणून दिले की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने देखील एमकेसीएलला काम दिले आहे आणि साक्ष देणारे त्या विभागाचे सचिव हे प्रमुख आहेत. त्यामुळे या विभागाने चूक केली आहे की नाही ? अशी विचारणा विभागीय सचिवांकडे समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, परिच्छेदामध्ये एकूण ८ कामे दाखविण्यात आली आहेत, जी वेगवेगळ्या विभागांनी एमकेसीएलकडे सोपविली आहेत. त्यापैकी पहिल्या क्रमांका समोर नमूद केलेले काम संचालक, तंत्रशिक्षण यांनी M.K.C.L. कंपनीला दिलेले आहे. हे एकूण ५.७३ कोटी रुपयांचे काम होते. त्या संदर्भात संचालक, तंत्रशिक्षण यांचा खुलासा असा आहे की, "त्यांनी हे काम परीक्षेच्या कामकाजासंबंधी सोपविले होते. पूर्वीपासून हे काम त्या कंपनीकडून केले जात होते. त्या कंपनीला या विषयीची माहिती होती. परीक्षा घेणे हा विषय संवेदनक्षम असल्यामुळे त्या कंपनीकडे हे काम देण्यात आले होते."

६.३६ यावर समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, विभागाच्या ज्ञापनात नमूद केले आहे की, ही कंपनी शासनाने स्थापन केली असल्यामुळे आणि नामिकेमध्ये समाविष्ट असल्यामुळे काम दिलेले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २००६ पर्यंत ती नामिकेमध्ये समाविष्ट होती त्यामुळे त्याचा विचार केला, असे नमूद केले आहे.

६.३७ समितीने असे मत व्यक्त केले की, संचालकांनी केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही. नामप्रविष्टीकेची मुदत जून २००६ पर्यंतच होती. MKCL was under nomination. This is not correct. उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित संलग्न संस्थेचा हा खुलासा योग्य आहे, असे विभागाला वाटते का ? कोणत्याही कंपनीला काम द्यावयाचे असेल तर निविदा मागविण्यात येतात. मार्केटिंग फेडरेशन ही शासकीय कंपनी आहे. त्यामध्ये ९९ टक्के भागभांडवल शासनाचे आहे. तरी निविदा काढाव्या लागतात. परंतु, या प्रकरणात निविदा प्रक्रियाच केलेली नाही. ही खाजगी कंपनी आहे. वित्त विभागाने या प्रक्रियेस परवानगी दिली होती का ? प्रत्येक प्रकरणात वित्त विभागाकडून त्रुटी काढली जाते, असे सांगण्यात येते. मग या प्रकरणी वित्त विभागाने परवानगी दिली होती का ? आणि दिली असेल तर ती कोणत्या नियमान्वये दिली आहे आणि त्यावर कोणत्या अधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत ? एका विभागापुरता हा विषय मर्यादित न ठेवता ज्या ज्या विभागांनी या कंपनीला काम दिलेले आहे त्या सर्व विभागांची साक्ष घेण्याची आवश्यकता नाही. विभागाकडून चूक झालेली आहे, हे स्पष्ट झाले आहे. परंतु, अन्य विभागांबाबतचा खुलासा त्या त्या विभागांनी करावा, असे सचिवांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे अन्य विभागाची सुद्धा साक्ष घेतली पाहिजे. दोन-तीन विभागांनी असे स्पष्ट केले आहे की, त्यांचा असा समज झाला आहे की, ही शासकीय संस्था आहे. त्यामुळे त्यांनी आणखी चूक केली आहे. या संदर्भातील जबाबदारी निश्चित केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संचालक, तंत्र शिक्षण व महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषद यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेतला असावा, मंत्रालय स्तरावर निर्णय झाला नसावा. त्यामुळे त्या संस्थेचे प्रमुख याबाबत खुलासा करु शकतील. पुणे विद्यापीठानेही त्यांना थेट काम दिलेले आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळानेही थेट काम दिलेले आहे.

६.३८ महालेखापरीक्षक फक्त शासकीय विभागांचे लेखापरीक्षण करतात. त्यामुळे ८ शासकीय विभागांची नावे त्यांनी नमूद केली आहेत. परंतु स्वायत्त संस्था म्हणजेच विधानमंडळासारख्या संस्थांनी सुद्धा या कंपनीला काम दिले असावे. ज्या विभागांनी एमकेसीएलकडून काम करुन घेतलेले आहे त्यांचे लेखी खुलासे समितीने मागवून घ्यावेत. M.K.C.L. ही शासकीय कंपनी आहे ही समजूत खोटी आहे. ती कंपनी शासकीय कंपनी नाही. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. यांना कोणी परवानगी दिली ? अशी विचारणा समितीने केली तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर देत नाही. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे म्हणणे असे आहे की, सदर बाब तपासली जात होती. ते दोन वर्षांपासून बाब तपासतच आहेत. आतापर्यंत उत्तर आलेले नाही. M.K.C.L. या कंपनीला काम देणाऱ्या सर्व शासकीय सदस्यांची चूक झालेली आहे. त्यांनी M.K.C.L. कंपनी शासकीय असल्याचे गृहीत धरूनच सर्व स्पष्टीकरण दिले आहे व शेवटी त्यांनी निर्णय घेतला, निदेश दिले. He has already accepted. त्यांनी दिनांक ०४.०९.२०१५ अन्वये मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत आणि त्या अनुषंगाने त्यांनी स्पष्ट केले आहे की, मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यापूर्वी पूर्वी काम दिले असेल त्याबद्दल त्या सर्व संस्था जबाबदार असतील. पण आता पुढे एमकेसीएलला शासकीय कंपनी असे विभागाने गृहीत धरू नका, असे विभागाने सांगितले आहे. आता एमकेसीएलबद्दल कोणती पद्धत अवलंबिण्यात येते, म्हणजे सामान्य निविदेमध्ये ती येते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या विभागांना काही माहिती तंत्रज्ञान विषयक व तत्सम सेवा घ्यायच्या असतील ते निविदा मागवितात, निविदेमध्ये M.K.C.L. आली आणि त्यांना योग्य वाटली तर ते M.K.C.L. कंपनीकडून सेवा घेतात. याबाबत आक्षेप आल्यानंतर म्हणजे महालेखापालांचा परिच्छेद आल्यानंतर ही सुधारणा झाली आहे. यापूर्वी सर्व गौडबंगालच होते. सन २००९ ते सन २०१५ च्या दरम्यान जे काही व्यवहार झाले आहेत ते सर्व बेकायदेशीर आहेत. यामध्ये जे लोक जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे असे मत समितीने तीव्र नाराजीने व्यक्त केले.

६.३९ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मते ते-ते संबंधित विभाग जबाबदार आहेत. ते स्वतः जबाबदार नाहीत असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सांगण्यात येते. पण त्या विभागामध्ये एमकेसीएलला नियम बाह्यरितीने काम दिले त्याला ते संबंधित जबाबदार आहेत. शासनानेच त्यांना निर्णय दिला. सन २००६ नंतर एमकेसीएलच्या नावासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मुदतवाढीची कार्यवाही केली नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सामान्य प्रशासन विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्याकडून काही एजन्सीज एमपॅनेल होतात, त्यामध्ये त्यांनी एमकेसीएलला एमपॅनेल केले होते. याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २००६ पर्यंतच्या कालावधीमध्ये जर काम दिले असेल तर त्यावेळी ती संस्था नामिकेवर (पॅनलवर) होती. त्यामुळे एमकेसीएलला काम दिले आहे. त्याला काही चुकीचे म्हणता येणार नाही.

६.४० यासंदर्भात नंतरच्या कालावधीबाबत महालेखापालांनी त्यांचे मत व्यक्त करताना सांगितले की, We have discussed at length that whether it is a Government Company or not. Basically GFRs are very clear and there is no flexibility that is available. Competitive rates have to be sought and ultimately Government's financial interest has to be protected. That is why, GFRs are there. You were saying technical it is this; otherwise it would be this, not 51 per cent and all that. There is no flexibility that is available and even if it is a Government Company then also we have to call tenders. It is not that if it is a Government Company then you can simply give them the contract. We have to understand that this cannot be justified at any cost.

६.४१ महालेखापालांनी या व्यतिरिक्त सांगितले आहे की, शासकीय कंपनीला देखील प्राधान्यक्रम देऊ नका. Let them come in competition असे मत समितीने व्यक्त केले.

६.४२ याबाबत महालेखापालांनी असे मत व्यक्त केले की, We should not try to justify this, because if we hold this view then down the line there will be other irregularities. This is a grave irregularity. I think, may be, at your level some instructions and training down the line is necessary. महालेखापालांच्या मतावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्तीय नियम शासनासाठी लागू आहेत. बाकी संस्था ज्यांनी एमकेसीएलकडे काम सोपविले आहे, त्यांचेही काही वित्तीय नियम असू शकतात, यामुळे त्या संस्थांच्या वित्तीय नियमांच्या अनुषंगाने त्यांचा विचार करणे योग्य राहील. यामध्ये विद्यापीठ आहे, महाराष्ट्र कौन्सिलर ऑफ ॲग्रीकल्चर ॲण्ड रिसर्च आहे, कामगार महामंडळ आहे. त्यांना हा नियम लागू आहे. काही संस्था त्यांच्या वेगळ्या स्वतःच्या नियमानुसार चालविल्या जात असतील, त्या अनुषंगाने तेवढा बदल होईल.

६.४३ वित्तीय नियम कशाला म्हणतात, शासनाच्या प्रत्येक विभागाला एकच नियम असेल. त्यांचा स्वतःचा नियम कसा काय होणार ? विद्यापीठालाही शासनच निधी देते. यामध्ये उप संचालक, शालेय शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, जिल्हाधिकारी, सोलापूर आहेत. तसेच संचालनालय, तंत्र शिक्षण या सर्वांना हे नियम लागू आहेत असे मत समितीने व्यक्त केले तसेच समितीने समितीने असेही मत व्यक्त केले की, However, ultimately when they come under the purview of CAG then they will have to abide by whatever Rules that are applicable to Government organisations.

६.४४ याबाबत महालेखापालांनी असे मत व्यक्त केले की, Their own Rules never say that award contracts without tendering. You cannot award a contract without following proper system.

६.४५ त्यावर समितीने सुचविले की, यामध्ये निकोप स्पर्धा असणे आवश्यक आहे. यास महालेखाकारांनी सहमती दर्शवून असे मत व्यक्त केले की, Ultimately the basic fundamental Rule is that interest has to be protected.

अभिप्राय व शिफारशी :

६.४६ महाराष्ट्र शासनाचे उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने (H.T.E.D.), कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात, आयटी सहाय्यभूत शैक्षणिक कार्यक्रमांना उत्तेजन देण्याचे प्राथमिक उद्दिष्ट डोळयापुढे ठेवून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (M.K.C.L.) ची जून, २००१ मध्ये स्थापना केली. कंपनी कायदा १९५६ अंतर्गत M.K.C.L. चे सार्वजनिक मर्यादित कंपनी म्हणून ऑगस्ट, २००१ मध्ये पंजीकरण करण्यात आले होते. ऑगस्ट, २०१४ पर्यंत M.K.C.L. चे रु. ८०.८० लक्ष समभाग (ज्याचे दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १० आहेत.) अंशदानित केले होते. त्यापैकी रु. ३० लाख समभाग (३७.१३ %) महाराष्ट्र शासनाकडे होते. सामान्य प्रशासन विभागांतर्गत माहिती तंत्रज्ञान संचालनालय D.I.T. यांनी M.K.C.L. ला एप्रिल, २००३ मध्ये I.T.S.Ps च्या सूचीमध्ये नामिका प्रविष्टीत केले होते. सदर सूची जून, २००६ पर्यंत वैध होती. D.I.T ने जून, २००६ नंतर M.K.C.L. ला कुठल्याही I.T.S.Ps ची नामिका प्रविष्ट केले नव्हते. असे असताना शासनाच्या आठ विभाग/कार्यालये/स्वायत्त संस्थांच्या दस्तऐवजाच्या तपासणीत जून, २००३ ते मे, २०१३ दरम्यान M.K.C.L. ला निविदा न बोलविता आयटी माध्यमाव्दारे करावयाच्या उपायांसाठी परस्पर सतरा सामंजस्य करार (M.O.U.) केले होते. सदर M.O.U. मुंबई वित्तीय नियम आणि ऑक्टोबर, २००१ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारे होते. सदर ८ कार्यालयांनी एप्रिल, २००९ ते मार्च, २०१४ दरम्यान M.K.C.L. ला एकूण रु. १८.४७ कोटींचे प्रदान केले होते. नामप्रविष्टेचे विधीग्राह्यता जून, २००६ मध्ये संपुष्टात आल्यानंतर निविदा न मागविता M.K.C.L. बरोबर M.O.U. केले होते याशिवाय एमकेसीएलने M.O.U. नुसार काम करतानाच्या अनेक त्रुटी लेखा परिक्षणात दिसून आल्यात. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या ऑक्टोबर, २००१ च्या शासन निर्णयानुसार सेवांची पूर्तता झाल्यानंतर I.T.S.Ps ने शासनाला संगणक प्रणाली संकेतांक व बौद्धिक मालमत्ता हक्क (I.P.R.) हस्तांतरीत करणे आवश्यक असताना १७ पैकी १५ सामंजस्य करारामध्ये संगणक प्रणाली संकेतांक I.P.R.S. शासनाला हस्तांतरित करण्याची तरतूद नव्हती असा गंभीर आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे. सदर आक्षेपाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली. समितीने विचारलेल्या विविध प्रश्नांच्या उत्तरात विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, M.K.C.L.ही शासकीय कंपनी नाही. तथापि, सदर कंपनीच्या समभागापैकी ३७.१३ टक्के समभाग राज्य शासनाच्या व राज्यातील जी वेगवेगळी विद्यापीठे आहेत त्यांचे ३३.९१ टक्के समभाग विचारात घेता साधारणतः ७२ टक्के समभाग सार्वजनिक प्राधिकरणांचे म्हणजे महाराष्ट्र शासन व जी कायदेशिर संविधानीक (Statutory) विद्यापीठे आणि स्वायत्त संस्था यांचे आहेत. विभागाचा सदर खुलासा समितीस मान्य करता येत नाही. कारण शासकीय कामासाठी राज्य शासनाचे ५१ टक्केपेक्षा जास्त समभाग असणे आवश्यक आहे. सदर बाब विभागाने त्यांच्या दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकाव्दारे मान्य केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी निविदा मागवूनच संस्था निश्चित करणे आवश्यक होते. या ठिकाणी मुंबई वित्तीय नियम आणि शासनाच्या २००१ च्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झालेले आहे. विभागाचा हेतू कितीही चांगला असला तरी नियम व कायद्याचे पालन झाले पाहिजे. अशा प्रकरणांचे विभागाने समर्थन केले तर ते पूर्वोदाहरण होईल व त्याचा विभागाकडून अथवा अन्य विभागाकडून गैरफायदा घेतला जाईल. विधि विभागानेही सदर समभागाबाबत ५१ टक्केपेक्षा जास्त समभाग राज्य शासन किंवा केंद्र व राज्य शासन यांचे असणे आवश्यक असल्यास त्यामध्ये विद्यापीठाचा समावेश असू शकत नाही. ही बाब स्पष्ट केली आहे. M.K.C.L. च्या कार्यपद्धतीत व कामकाजातही अनेक चुका झाल्याचे महालेखाकारांनी आक्षेपात नमूद केले आहे. वास्तविक एखादी कंपनी राज्य शासनाची कंपनी असली तरीही त्यांनी निविदेमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे असे मत महालेखापालांनी बैठकीत नोंदविलेले आहे. एकंदरीतच कोणत्याही कामाकरिता संस्थेची निवड करताना निकोप स्पर्धा होणे आवश्यक आहे तथापि, प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यवाही झालेली नाही व काही विभागाने त्यांच्या M.K.C.L. ही शासकीय संस्था असल्याचे समजून त्यांना कामे दिली ही बाब योग्य नाही.

६.४७ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी शासनाच्या एकंदरीतच कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदविलेले आहे. M.K.C.L. ही शासकीय संस्था नसताना, I.T.S.Ps ची नामप्रविष्ट नसताना, निविदा न मागविता एमकेसीएलची थेट निवड करून मुंबई वित्तीय नियम व शासनाच्या ऑक्टोबर, २००१ च्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. M.K.C.L. या कंपनीला शासनस्तरावर विविध विभागाकडून हाताळताना जवळजवळ १५ वर्षे संभ्रमाची परिस्थिती कायम राहणे व त्याच परिस्थितीत शासनाच्या अन्य विभागाकडून M.K.C.L. ला विनानिविदा कामाचे प्रदान करण्यात येणे या सर्व बाबींमुळे या क्षेत्रातील खुली व निकोप स्पर्धा संपुष्टात आली. निविदा न काढल्यामुळे अनेक स्पर्धात्मक व गुणवत्ताधारक कंपन्या या स्पर्धेतून बाहेर

राहिल्या. या सर्वांचा फार मोठ्या प्रमाणावर व फार मोठ्या कालावधीकरिता एकतर्फी लाभ हा केवळ **M.K.C.L.** या कंपनीला मिळाला. शासनाच्या या कार्यपद्धतीबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करत आहे. एवढेच नव्हे तर महालेखापालांनी याबाबत गंभीर आक्षेप नोंदवेपर्यंत शासनाला याबाबतची कुठलीही दखल घेऊन शासनस्तरावरुन कोणतीही कारवाई करण्याची किंवा सुधारित आदेश काढण्याची आवश्यकता वाटली नाही. शासनाने महालेखापालांच्या आक्षेपानंतर दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी सुधारित शासन निर्णय काढून अनेक महत्वाच्या व शासनाच्या धोरणानुसार बंधनकारक असलेल्या बाबींचा त्यात खुलासा करण्यात आला ही तर अधिकच गंभीर बाब आहे. तब्बल १० ते १५ वर्षे शासन धोरणाच्या अंमलबजावणीबाबत शासनस्तरावरच अशी संदिग्धता राहणे अथवा ठेवणे ही बाब शासन कार्यपद्धतीला नक्कीच भुषणावह नाही. व यास पूर्णपणे उच्च व तंत्रशिक्षण विभाग जबाबदार असल्याचे समितीचे स्पष्ट मत असून या सर्व बाबींची शासनस्तरावरुन गंभीर दखल घेण्यात यावी व भविष्यात या व अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४८ महालेखाकारांनी **M.K.C.L.** च्या कार्यपद्धतीवर देखील व त्यांच्या कामकाजात आढळून आलेल्या अनेक उणिवा व त्रुटी बाबतही आक्षेप नोंदविलेले आहेत. महालेखापालांच्या या आक्षेपावर चर्चा करताना शासनस्तरावरील अनेक अनियमितता उणिवा व त्रुटी समितीस आढळून आल्या या विषयी आवश्यक ती कारवाई करून कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

६.४९ उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ च्या मार्गदर्शक तत्वांचे तद्नंतरही उल्लंघन होत नाही याबाबतही आढावा घ्यावा तसेच सामान्य प्रशासन विभागाने राज्य शासनाच्या अन्य विभागातही अशा बाबींची पुनरावृत्ती होत नाही याची खात्री करावी, आवश्यकतेनुसार योग्य त्या सूचना सर्व विभागांना निर्गमित कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशीही समितीची शिफारस आहे.

गृहनिर्माण विभाग

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि विकास प्राधिकरण

७. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-२०१४ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.६ " सेवा शुल्कामध्ये सुधार न केल्यामुळे मोठा आर्थिक भार " यासंदर्भात महालेखापालांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :—

सेवा शुल्कामध्ये सुधार न केल्यामुळे मोठा आर्थिक भार :—

७.१ भाडेकरुंना सामाजिक सेवा पुरविण्यासाठी सेवाशुल्कामध्ये सुधार न केल्यामुळे मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळावर रू २६२.६५ कोटींचा आर्थिक भार पडला.

मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळ (मंडळ) ही स्वायत्त संस्था असून विविध वसाहतीतील त्यांच्या भाडेकरुंना पुरविलेल्या सामाईक सेवांवर, जसे पाणीपुरवठा, वीज, साफसफाई, दुरुस्ती आणि देखभाल यांवर अ-कृषीक निर्धारणा शुल्क, भाडेपट्टा आणि नगरपालिका कराव्यतिरिक्त, सेवा कर आकारते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या, महाराष्ट्र शासनाच्या ३१ मार्च, २०१० साली संपलेल्या वर्षाच्या अहवालातील (नागरी) परिच्छेद क्र.६.१७ मध्ये नमूद केले आहे की, सेवा शुल्कात वाढ न केल्यामुळे १९९४-९५ ते १९९६-९७ या वर्षात रुपये ७.९७ कोटी जास्त खर्च झाला होता. लेखापरीक्षेला असेही आढळून आले की, मंडळ १९९३-९४ ला निश्चित केलेल्या दरानेच (सुधारणा पूर्व दर) सेवा शुल्काचे निर्धारण करत होते आणि दर सुधारित न केल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले होते जे पुढील परिच्छेदात चर्चिले आहे.

मंडळाने सेवा पुरवठादारास १९९७-९८ मध्ये दिलेल्या प्रत्यक्ष प्रदानावर १५ टक्के आस्थापना खर्च अधिक करून त्या आधारावर एप्रिल, १९९८ पासून सेवा शुल्क सुधारित करण्याचे ठरविले (मे, १९९८) लोकप्रतिनिधी आणि भाडेकरुंच्या प्रतिनिधींचा विरोध लक्षात घेऊन शासनाने सुधारित दरांस तीन महिन्यासाठी स्थगिती दिली (डिसेंबर, १९९८) आणि सेवाशुल्काच्या वाढीबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी एका अभ्यास गटाचे गठन केले (फेब्रुवारी, १९९९) होते. अभ्यास गटाने सेवा शुल्क १९९३-९४ च्या जुन्याच दराने घेण्याची परंतु पाणी आणि वीज शुल्क मात्र संबंधित सेवा पुरवठादाराने आकारलेल्या दरानेच आकारावे अशी शिफारस केली होती (नोव्हेंबर, १९९९).

लोकप्रतिनिधी व भाडेकरुंच्या प्रतिनिधींनी सुद्धा या पहिल्या अभ्यास गटाच्या शिफारशींना विरोध दर्शविला होता. परिणामी, ऑगस्ट, २००२ मध्ये झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी, सेवा शुल्काची प्रस्तावित वाढ निर्धारीत करण्यासाठी आणि सेवा शुल्काचे दर अंतिम करण्यासाठी दुसऱ्या अभ्यास गटाचे गठन करण्याची शिफारस केली. त्यानुसार शासनाने दुसऱ्या अभ्यास गटाचे गठन केले (नोव्हेंबर, २००२) ज्या गटाने, केवळ मंडळ पुरवित असलेल्या सेवा जसे, पंप हाऊसची देखभाल, पंप चालकाचे वेतन, टँकर्सची आपत्कालिन दुरुस्ती, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन, स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य इत्यादी, यांवरील सेवा शुल्क जे एप्रिल, १९९८ पासून सुधारण्याचे प्रस्तावित होते ते ५० टक्क्यांनी कमी करण्याची शिफारस केली (डिसेंबर, २००२) होती. जरी मंडळाने यासेवांचा दर ५० टक्क्यांनी कमी केला (फेब्रुवारी, २००३) होता. तरी मुख्यमंत्र्यांनी MCGM कडून जोपर्यंत नगरपालिकेचा कर ५० टक्क्यांनी कमी होत नाही तोपर्यंत सुधारणा पूर्व दराने सेवा शुल्क आकारण्याचे मंडळाला निर्देश दिले. (डिसेंबर, २००३) आणि सेवा शुल्क आणि करांची वाढीव दराने आकारणी करण्यास स्थगिती दिली. तथापि, MCGM ने नगरपालिका कराचे दर कमीही केले नाहीत किंवा मंडळाला होणारे पुनर्वर्ती नुकसान लक्षात घेता, मंडळाने वेळोवेळी विनंती करूनही शासनाने स्थगिती आदेश रद्दही केले नाहीत. परिणामी, मंडळ १९९३-९४ ला निश्चित केलेल्या सुधारणा पूर्व दरानेच १९९७-९८ पासून सेवा शुल्क आकारीत आहे. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, १९९७-९८ ते २०१३-१४ दरम्यान भाडेकरूना सामाईक सेवा पुरविण्यासाठी मंडळाने रुपये ६४६.३७ कोटी खर्च केले होते. तथापि, भाडेकरूना रुपये ३८३.७२ कोटींचीच देयके पाठविली होती ज्यामुळे रुपये २६२.६५ कोटीची तूट आली आहे जी मंडळाला सेवा पुरवठादारांना द्यावी लागेल.

अशा प्रकारे, एप्रिल, १९९८ पासून सेवा शुल्कात सुधार न केल्यामुळे भाडेकरुंना निर्विवाद अर्थसहाय्य मिळाले. परिणामी, मंडळाला रुपये २६२.६५ कोटीचा आर्थिकभार सोसावा लागला.

हे प्रकरण शासनाला जून, २०१४ मध्ये संदर्भित केले होते, त्याचे उत्तर डिसेंबर, २०१४ पर्यंत प्रतिक्षित होते.

ज्ञापन :

७.२ महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

तत्कालिन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ ऑक्टोबर २०१३ रोजी झालेल्या बैठकीत महानगरपालिकांकडून आकारण्यात येत असलेल्या सेवाशुल्कामध्ये ५०% कपात करण्याबाबत महानगरपालिकेने निर्णय घ्यावा व सदर निर्णय होईपर्यंत वाढीव सेवाशुल्क वसुल करण्याची कार्यवाही स्थगित ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. महानगरपालिकेने त्यांच्या दिनांक ९ एप्रिल २०१३ च्या पत्रान्वये मुंबईतील म्हाडा वसाहतीतील अल्प उत्पन्न व अत्यल्प उत्पन्न गटातील गाळ्यांना झोपडपट्टीच्या धर्तीवर पाणी आकार लावणे शक्य नसल्याचे कळविले होते.

मा. मुख्यमंत्री महोदयांसमवेतच्या वरील बैठकीनंतरही बृहन्मुंबई महानगरपालिकेने सेवाशुल्काचे दर कमी केले नाहीत. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४ सप्टेंबर २००४ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत उपरोक्त स्थगिती उठविण्याकरिता मा.मुख्यमंत्री स्तरावर बैठक आयोजित करण्यासाठी वेळ व दिनांक मिळण्याबाबत गृहनिर्माण विभागाकडून पाठपुरावा करण्यात आला. तथापि, बैठक झाल्याची नोंद दिसून येत नाही. दिनांक २१ जून २०१२ रोजी लागलेल्या आगीत याबाबतची नस्ती नष्ट झाल्याने, या अनुषंगाने गृहनिर्माण विभागाने पुन्हा सदर नस्तीची बांधणी करून मा. मुख्यमंत्री महोदयांकडे स्थगिती उठविण्यासाठी सन २०१३ मध्ये नस्ती सादर केली. मात्र स्थगिती आदेशाबाबतची कागदपत्रे नस्तीवर ठेवण्यात यावीत, तसेच स्थगिती उठवण्याचा निर्णय झाला तर सदर सेवाशुल्काची वसूली पूर्वलक्षी प्रभावाने करण्याचे प्रस्तावित आहे किंवा कसे, तसेच वाढीव दर सन २००१ मध्ये प्रस्तावित केले असल्याने या वाढीव दरामध्ये कोणती वाढ प्रस्तावित आहे? या अभिप्रायासह मुख्यमंत्री सचिवालयाकडून पुन्हा नस्ती विभागाकडे पाठविण्यात आली.

नवीन मंत्रीमंडळ अस्तित्वात आल्यानंतर सदर स्थगिती उठविण्याबाबत विभागाने पुन्हा शासन स्तरावर नस्ती सादर केली असता मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी स्थगितीकाळातील सेवा शुल्क, व्याज व दंडव्याज याबाबत धोरण निश्चित करून प्रस्ताव पुन्हा सादर करावा या अभिप्रायासह विभागास नस्ती परत पाठविली. त्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक २३ नोव्हेंबर २०१५ च्या पत्रान्वये स्थगितीकाळातील सेवा शुल्क, व्याज व दंड व्याज याबाबत धोरण निश्चित करून प्रस्ताव सादर करण्यासाठी सविस्तर अहवाल पाठविण्यास उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना कळविण्यात आलेले आहे. या अनुषंगाने म्हाडाच्या दिनांक २८ जानेवारी २०१६ च्या पत्रान्वये याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही त्या कार्यालयाकडून सुरू आहे असे कळविण्यात आले आहे. मात्र अद्याप म्हाडाकडून या संदर्भातील परिपूर्ण अहवाल शासनास सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे स्थगिती उठविण्याबाबत शासन स्तरावर पुन्हा प्रस्ताव सादर करता आलेला नाही.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या दिनांक ३ जून २०१६ च्या अहवालानुसार लेखापरिक्षणामध्ये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापर्यंत रु. २६२.६५ कोटीची तूट दर्शविण्यात आली होती. दरम्यानच्या काळात मंडळाचे काही वसाहतीतील इमारतींची अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्याने व पुनर्विकास प्रस्ताव प्राप्त झाल्याने संबंधित संस्थाकडून नवीन दराने वसुली करण्यात आलेली आहे. सदरच्या तूटीची रक्कम रु. २६९.३९ कोटी इतकी झालेली आहे. अशा वसाहतीतील वसुलीचे थकबाकीची माहिती एकत्रित केली असून सदर वसुलीबाबत यापूर्वी शासनाने दिलेली स्थगिती उठविल्यास मंडळाच्या नियमाप्रमाणे गाळेधारकांना वसुलीबाबत नोटीसा देऊन किंवा वर्तमानपत्रात प्रसिद्धी देऊन सदर वसाहतीतील मंडळाची थकीत रक्कम रु. २६९.३९ कोटी वसूल करण्याबाबतची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल, असे म्हाडाने कळविलेले आहे.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, लेखापरिच्छेदात नमूद केल्यानुसार जुन्या कार्यपद्धतीचे पुनर्विलोकन करून प्राधिकरणाच्या मान्यतेने नवीन कार्यपद्धती खालीलप्रमाणे अंमलात आणण्याचे प्रस्तावित आहे.

(१) वाढीव शुल्क वसुलीस देण्यात आलेल्या स्थगितीमुळे स्थगिती काळात म्हाडावर झालेल्या आर्थिक बोजाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सदर आर्थिक बोजामध्ये अंतर्भूत असलेल्या रकमेपैकी वाढीव दराने करावयाची शुल्क वसुली सुलभ पाच वार्षिक टप्प्याव्दारे समप्रमाणात करणे.

(२) थकबाकीवरील व्याज वसुलीबाबत " अभय योजना (Amnesty Scheme) राबविणे."

(३) मुंबई महानगरपालिकेकडून शुल्काची देयके प्राप्त करून घेण्यामध्ये होणारा कालापव्यय टाळण्यासाठी आता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईट वरुन दुय्यम देयके प्राप्त करून घेण्याची कार्यवाही मिळकत व्यवस्थापक कार्यालयातर्फे राबविली जात आहे. भविष्यात अशा प्रकारचे विलंब प्रकरण उद्‌भवू नये याबाबत विशेष दक्षता घेण्यात येईल.

(४) पाणी कर, पंपहाऊस देखभाल व अनुषांगिक बाबी, सामाईक विद्युत खर्च, सामाईक सेवा सुविधा इ. सामाईक बाबींवरील खर्च संस्थेनिहाय वेगळे करणेबाबत आवश्यक उपाययोजना सदर सेवा संबंधित संस्थेकडे हस्तांतरित करून सदर बाबींवरील खर्च, शुल्क संबंधित यंत्रणांकडे भरणा करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेकडे सोपविणे.

(५) प्राधिकरणाचे मान्यतेने भविष्यात सेवा शुल्काच्या मागणीपोटी सेवा शुल्क दरामध्ये वार्षिक १० टक्के वाढ करण्यात येईल अथवा सेवा पुरविण्यास म्हाडाला येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चावर वाढ करण्यात येईल.

शासनाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाबाबत महालेखापाल कार्यालयाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

(१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी शासनासमवेत केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने दिलेला प्रतिसाद तसेच स्थगिती काळातील सेवाशुल्क, व्याज व दंडव्याज यांच्या संदर्भात प्रस्तावाचे तपशील लोकलेखा समितीस अवगत करण्यात यावेत.

(२) सुचित केलेल्या सवलतीमुळे मंडळावर पडणारा एकूण आर्थिक बोजा कमी करण्यासाठीच्या प्रस्तावित उपाययोजना लोकलेखा समितीस द्यावयाच्या उत्तरात नमूद करण्यात याव्यात.

साक्ष :

७.३ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.६ " सेवाशुल्कात सुधार न केल्यामुळे रु. २६२.६५ कोटींचा मोठा आर्थिक भार " परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीने दिनांक ८ जून २०१६ रोजी प्रधान सचिव, गृहनिर्माण व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यात एक मूळ मुद्दा आहे. मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या वसाहती आहेत. मुंबईतील म्हाडाच्या बऱ्याच वसाहतींमध्ये पाणी पुरवठा, स्ट्रीट लाईट, सॅनिटेशन वगैरे सुविधा म्हाडामार्फत पुरविल्या जातात. यासाठी म्हाडा रहिवाशांकडून सेवाशुल्क आकारते. बऱ्याच वर्षापासून सेवाशुल्कामध्ये वाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे सन १९९८ मध्ये म्हाडाने सेवाशुल्कामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात अभिलेख्यावरून असे दिसते की, तत्कालिन माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर दिनांक २३ ऑक्टोबर २००३ रोजी बैठक झाली. त्या बैठकीमध्ये वाढीव सेवाशुल्क वसूल करण्याची कार्यवाही स्थगित ठेवावी असे निदेश देण्यात आले. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांनी केली. सदर स्थगिती उठविण्यासाठी बऱ्याचदा प्रयत्न करण्यात आलेला आहे. यासंबंधी म्हाडाने वेळोवेळी बैठका देखील घेतलेल्या आहेत. नवीन शासन आल्यानंतर विभागातर्फे पुन्हा नस्ती सादर करण्यात आली. यावेळी मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी स्थगिती काळातील सेवा शुल्क, व्याज व दंडव्याज याबाबत धोरण निश्चित करून प्रस्ताव पुन्हा सादर करावा या अभिप्रायासह विभागास नस्ती परत पाठविली. त्याप्रमाणे म्हाडाला कळविण्यात आलेले आहे. अजून म्हाडाकडून शासनाला निश्चित स्वरूपाचे धोरण अप्राप्त आहे. म्हाडाच्या मुंबई शहर आणि उपनगरामध्ये एकूण १०४ वसाहती आहेत. यात ५४ वसाहती मोठ्या आहेत. त्याला ले-आऊट म्हणतात. येथे एका पेक्षा जास्त गृहनिर्माण संस्था आहेत. बाकीच्या ६० वसाहती या एक-दोन गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या आहेत. सन १९९८ मध्ये तत्कालीन म्हाडा प्रशासनाने पाणी पट्टी, वीज वगैरेवरील सेवा शुल्क वाढविले होते. त्यावेळी सह्याद्री येथे तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी सदर सेवा शुल्क वाढीस स्थगिती दिली. त्यामुळे वाढीव दरानुसार वसुली करण्याचे थांबविण्यात आले. सदर प्रदान म्हाडाने केले आहे ही वस्तुस्थिती आहे. वीज आणि पाणी ही अत्यावश्यक सेवा आहे. अशा अत्यावश्यक सेवांची ही देयके आहेत. सदर देयके भरली नाही तर राजकीय तसेच तेथील स्थानिक नागरिकांचा म्हाडावर दबाव येतो. त्यामुळे ती देयके भरणे म्हाडाला क्रमप्राप्त होते. लेखा आक्षेपामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे विभागाने जेवढी रक्कम वसूल केली आहे त्यापेक्षा विभागाकडून रुपये १६८.०० कोटी जादा भरले गेले आहेत. रूपये २६२.०० कोटी हे महापालिकेला किंवा विद्युत कंपनीला सहा सेवा करापोटी भरलेले आहेत. आता विभाग शासनाला कळविणार आहे की, ही सर्व देयके त्या त्या सोसायटीच्या सभासदांकडून वसूल करून त्या सोसायटीच्या व्यवस्थापनाने भरावीत. यासाठी शासनाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. विभाग फक्त शासनाला माहिती देणार आहे. काही ठिकाणी लोक ही देयके भरत आहेत. जी सोसायटी किंवा जे कॉन्फीडरेशन सेवा करासंबंधातील देयके हस्तांतरीत करीत नाहीत त्यांना ऑक्टोबर ते नाव्हेंबर पर्यंतचा अवधी देऊन, संपूर्ण कल्पना देऊन हे सहा प्रकारचे कर त्यांच्या सभासदांकडून वसूल करून घ्यावेत, विभागास त्यात भाग घ्यावयाचा नाही हे सांगण्यात येणार आहे. यामध्ये समन्वय स्थापित करण्यासाठी निश्चित मदत करण्यात येईल. असे साधारणतः विभागाचे पुढचे धोरण आहे. हे धोरण शासनाकडे पाठविण्यात येत आहे.

७.४ त्या धोरणाला शासनाने मान्यता दिलेली आहे काय ? काही लोकांनी सोसायटी बनविली आहे. त्यांना विभागाने सर्व सुविधा सुरूवातीला दिल्या. पण लोक रहायला आल्यानंतर त्या सर्व सुविधा नादुरुस्त झाल्या. असे प्रकार बऱ्याच ठिकाणी आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाकडे देखभाल विभाग आहे. आज सर्वांना पाणी आणि वीज मिळते ही वस्तुस्थिती आहे. पाणी आणि वीज पुरवठा एक दिवस जरी खंडित झाला तरी दुसऱ्या दिवशी रहिवासी मोर्चा घेऊन येतात. विभाग मोठा खर्च म्हणजे भांडवली खर्च करण्यास तयार आहे.

७.५ सर्व सेवा कर रहिवाशांनी भरावेत असे विभागाकडून सांगण्यात येते तेव्हा रहिवाशांनी त्यांना सर्व व्यवस्थित करून द्यावे अशी मागणी विभागाकडे केली तर अशा वेळी विभाग काय करणार ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ज्यात भांडवली गुंतवणूक असेल तो खर्च करण्यास विभाग तयार आहे. पण दैनंदिन बिले रहिवाशांनी भरणे आवश्यक आहे. यात स्थगिती उठविण्यासंबंधीचा मुद्दा शासनाशी निगडित आहे. म्हाडा त्यांचे धोरण ठरविण्याबाबत सक्षम आहे. उपाध्यक्ष, म्हाडा यांनी उल्लेख केला आहे. त्याप्रमाणे विभाग तीन-चार म्हाडा वसाहतींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नेहरू नगर, कुर्ला या म्हाडाच्या वसाहतीमध्ये एकूण ५२४० सदनिका आहेत. या वसाहतीचा सन २०११-१२ मध्ये रुपये ४.५८ कोटी खर्च होता. त्यापैकी जल देयक आकार हे रुपये ३.५६ कोटी इतके होते. तसेच विद्युत देयक आकार रुपये ५६.०० लाख इतका आहे. हे सर्व पैसे म्हाडाला भरावे लागतात. ज्यांचे हस्तांतरण झालेले नाही त्यांची दोन्ही देयके देखील म्हाडाकडून अजून भरण्यात येत आहेत. स्ट्रीट लाईट, वॉटर सप्लाय हा सेंट्रली घेण्यात येतो. पंपींग करून तेथील इमारतींना पाणी पुरवठा केला जातो. यासाठी येणारा सर्व विद्युत खर्च म्हाडा तर्फे भरण्यात येत आहे. म्हाडा हा दर वसूल करीत आहे. पण वसुलीचा हा दर फार जुना आहे. हा दर वाढविण्याचा निर्णय सन १९९८ मध्ये घेण्यात आला होता. त्यास तत्कालिन माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली आहे.

७.६ डिसेंबर २००३ मध्ये स्थगिती देण्यात आली आहे. त्यानंतर सन २०१२ पर्यंत कोणताही प्रयत्न म्हाडा किंवा राज्य शासनाच्यावतीने झालेला नाही ही वस्तुस्थिती रेकॉर्डवर दिसत आहे. नवीन शासन अस्तित्त्वात आल्यानंतर त्यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला हे रेकॉर्डवर

आलेले आहे. भांडवली खर्च अपडेट करून द्यावे. पण पाणी पुरवठा व विजेचे देयक हे उपभोक्त्याने भरण्यासाठी काही तरी ठोस निर्णय शासनाने घेतला पाहिजे. दरवर्षी सबसिडी देणे हे योग्य होणार नाही. तेव्हा यात शासनाने गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे असे मत व्यक्त करून समितीने विचारणा केली की, म्हाडा जुन्या दराने भाडेकरूंकडून सेवाशुल्क घेत आहे. त्यातील वार्षिक फरक किती आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१२ मध्ये जी प्रकरणे मान्य करण्यात आली आहेत त्यातील रुपये २६८.०० कोटी इतका फरक आहे.

७.७ म्हाडाकडून सदनिका वितरित करण्यात येतात तेव्हा त्या सदनिकांचा मालकी हक्क कोणाकडे असतो. जेव्हा त्यांच्याकडून सेवा कर वसूल करण्यात येईल तेव्हा कायद्यान्वये अडचण उद्‌भवू शकते असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सदनिकाधारकाला किंवा गृहनिर्माण सहकारी संस्थेला जमीन हस्तांतरित करण्यात येत नाही. त्यांना लाँग लिजवर जमीन देण्यात येते. त्यांना फक्त सदनिका हस्तांतरित करण्यात येतात. जमिनीची मालकी म्हाडाकडे लिज होल्डवर राहते. वेगवेगळ्या सेवेपोटी सेवा शुल्क आकारले जाते. त्याचा सदनिका आणि फ्लॅट हस्तांतरणाशी काही संबंध नाही. पाण्याचे बिल म्हाडाला महानगरपालिका पाठविते.

७.८ भाडेकरुला वीज, पाणी वगैरे जोडणी घेण्यासाठी देखील ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. त्यामुळे जो करार झालेला असतो त्या आधारावर मीटरींग होऊ शकते, बिलींग होऊ शकते. त्याचे प्रदान सदनिकाधारकाने किवा गृहनिर्माण संस्थेने केले पाहिजे. मध्यंतरीच्या काळात २०० ते ३०० कोटी रुपयांचा तोटा झालेला आहे. त्यासंबंधी देखील शासनाला कळविणे आवश्यक आहे. लोक म्हाडाकडून सदनिका विकत घेतात. त्यामुळे ९९ वर्षात त्यांच्याकडून ती सदनिका पुन्हा काढून घेता येत नाही. ग्राहकाला मालकी हक्क दिला तर ती कायमची त्याच्यावर जबाबदारी राहील असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता बहुतेक ठिकाणी सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. खाजगी विकासकाने जरी एखादी इमारत बांधली तरी त्या सहकारी संस्थेने त्यांची देयके भरण्याची जबाबदारी घेतली पाहिजे अशी सर्वसाधारणपणे तरतूद आहे. अनेक कारणांमुळे म्हाडा सहकारी संस्थेला देयके हस्तांतरित करू शकलेले नाही. म्हाडा प्रदान करत आलेले आहे. सेवा शुल्कासंबंधीचा निर्णय तत्कालिन मा.मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये झालेला आहे. त्याला १३ वर्ष झालेली असली तरीही याला शासनाने मान्यता दिलेली आहे असे नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये तो निर्णय झालेला आहे. त्यानंतर बरेच प्रयत्न झालेले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांकडे अनेक वेळा बैठकीसाठी वेळ मागण्यात आला होता.

७.९ सन २००४ ते सन २०१२ पर्यंत विभागाने प्रयत्न केल्याचे रेकॉर्डवर काहीच दिसत नाही. त्यामुळे यासंदर्भात निर्णय घेण्याची इच्छाशक्ती शासनाने दाखविलेली नाही असे समजायचे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००४ मध्ये मुख्य सचिवांची बैठक झाली. त्यामध्ये त्यांनी स्थगिती उठविण्याकरिता मा.मुख्यमंत्री स्तरावर बैठक आयोजित करण्यासाठी वेळ व दिनांक मिळण्याबाबत विभागाने पाठपुरावा करावा अशी सूचना केली होती. त्याप्रमाणे विभागाने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे यासाठी विभागाने प्रयत्न केला नाही असे नाही. वेळ व दिनांक मिळविण्यासाठी विभागाने प्रयत्न केलेला आहे.

७.१० विभागाने प्रयत्न केला असेलही. पण सन २०१२ पर्यंत पुन्हा बैठक झालीच नाही. सन २०१३ मध्ये नवीन प्रस्ताव आणला. याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, ज्यांना जी सेवा मिळते त्याचे त्यांनी प्रदान करावे. दर कमी करावा किंवा कसे यासंबंधी त्यांनी महानगरपालिका किंवा वीज कंपनीकडे पाठपुरावा केला पाहिजे. म्हाडाचा सहभाग फक्त भांडवली खर्चापर्यंत मयादित आहे. यासंबंधी काही तरी कडक धोरण निश्चित करून समितीला तीन महिन्याच्या आत यासंबंधातील अहवाल सादर करावा असेही समितीने सुचविले तसेच हे दर सन १९९८ मधील आहेत. म्हाडा सन २००४ मधील सेवा दर अजून किती दिवस सुरू ठेवणार आहे ? एवढे जुने दर असतील तर नवीन दर भाडेकरूंकडून वसूल करून घेण्यात येणार आहेत काय ? म्हाडा बेस्ट कडून वीज आणि महानगरपालिकेकडून पाणी घेत असेल. म्हाडाच्या बाजूला दुसरी वसाहत असेल तर त्यांच्याकडून नवीन दराने वसुली होत असणार. शासनाचा निर्णय झाला नाही म्हणून जुन्या दराने वसुली करणे कितपत योग्य आहे ? राजकीय हस्तक्षेपाला देखील कुठे तरी सीमा असली पाहिजे. यावर लोकलेखा समितीने गंभीरपणाने विचार केलेला आहे. एवढ्या कमी दराने सेवा शुल्क का आकारण्यात येत आहे ? सोसायटीने पुरवठाधारकाला डायरेक्ट बिल अदा करावे असे समितीने सुचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, समिती म्हाडाचीच बाजू मांडत आहे. म्हाडा यात आर्थिकदृष्ट्या तोट्यामध्ये आहे. काही सोसायट्या ह्या स्वतः आर्थिक भार सहन करीत आहेत. Their Management is taking care of their services by paying the bills. समितीच्या मताप्रमाणे विभागाने म्हाडाच्यावतीने शासनाला विनंती केलेली आहे. पण यात बऱ्याच वेळा राजकीय दबावाची अडचण येते. म्हाडाने सेवा हस्तांतरित करण्यात येत आहे अशा आशयाचे एक परिपत्रक काढले तर, त्या भागातील सन्माननीय सदस्य चार दिवसांमध्ये म्हाडा कार्यालयामध्ये मोर्चा घेऊन येतील. यासंबंधी विभागाने वरील वस्तुस्थिती सांगितलेली आहे. बैठक आयोजित करण्यासाठी विभागाने प्रयत्न केलेले आहेत.

७.११ यासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, तीन महिन्यांच्या आत हस्तांतरण करण्याच्या कारवाईबद्दल शासनाचे निदेश प्राप्त करून घ्यावेत. महानगरपालिका, बेस्ट, रिलायन्स हे जे पुरवठादार आहेत त्यांच्या देयकांचे प्रदान त्या सोसायटीने थेट करण्यासंबंधी पाठपुरावा करून पाऊल उचलावे. दरम्यानच्या काळातील जी तूट आहे त्यासंबंधी शासन आणि म्हाडा यांनी स्वतःची भूमिका ठरवून घ्यावी.

७.१२ जे जुन्या राजवटीत झाले तेच आता पण होत आहे काय, तीच पद्धत आता विभागाने सुरू केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी याबाबत सांगितले की, विभागाने यासंदर्भात वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. नवीन मंत्रिमंडळ अस्तित्त्वात आल्यानंतर मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी सन २०१६ मध्ये सेवा शुल्क, व्याज, व दंडव्याज याबाबत धोरण निश्चित करून प्रस्ताव पुन्हा सादर करावा अशा अभिप्रायासह नस्ती पुन्हा गृहनिर्माण विभागाला पाठवून दिलेली आहे. म्हाडा सहा सेवा शुल्का व्यतिरिक्त काही घेत नाही. हायर पर्चेस ॲग्रीमेंटवर जे फ्लॅट दिलेले आहेत त्यासंबंधातील हप्ता व भाडे म्हाडातर्फे वसूल करण्यात येते.

७.१३ भाडेकरुंची मालकी नसल्यामुळे ही गुंतागुंत होत असल्यामुळे यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, अनलिमिटेड हायर अँड पर्चेसच्या ज्या केसेस आहेत त्या पुरते हे मर्यादित आहे. ९९ टक्के सदनिका ह्या सदनिकाधारकाला हस्तांतरित करण्यात येतात. जमिनीची मालकी फक्त म्हाडाकडे राहते. कारण पुनर्विकासामध्ये शक्यता (पोटेंन्शियल) वापरण्यासाठी जमीन मालकाला वाव हा असलाच पाहिजे. यासाठी धोरण आहे. हे धोरण म्हाडापुरते मर्यादित नसून ते सिडको व अन्य शासकीय विभाग, संस्था, उपक्रमांना देखील लागू आहे. यामुळे म्हाडा ते हस्तांतरण करणार आहे. पण यामध्ये राजकीय दबाव देखील खूप असतो. MHADA do not want to make any profit even for a Service Charge. प्रशासकीय शुल्क देखील म्हाडाला नको आहे. Mhada is not dependent on that Administrative Charge.

अभिप्राय व शिफारस :

७.१४ महालेखापालांनी गृहनिर्माण विभागाअंतर्गत मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळ या स्वायत्त संस्थेने विविध वसाहतीतील त्यांच्या भाडेकरुंना पुरविलेल्या सामाईक सेवा जसे पाणीपुरवठा, वीज, साफसफाई, दुरुस्ती आणि देखभाल यावर अकृषिक निर्धारण शुल्क, भाडेपट्टा आणि नगरपालिका कर व्यतिरिक्त सेवा करावरील खर्चाबाबत केलेल्या लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, म्हाडाने माहे एप्रिल,१९९८ पासून सेवा शुल्कात कोणतीही सुधारणा केलेली नाही, परिणामी मंडळाला रु. २६२.५० कोटीची तूट आली. सदर आक्षेपाबाबत समितीसमोर साक्ष देताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, बऱ्याच वर्षांपासून सेवा शुल्कामध्ये वाढ झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. सन १९९८ मध्ये म्हाडाने सेवा शुल्कामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. परंतु तत्कालिन मा.मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर सन २००३ मध्ये झालेल्या बैठकीत वाढीव सेवा शुल्क वसूल करण्याची कार्यवाही स्थगित ठेवावी असे निर्देश मंडळाला देण्यात आले. त्यानंतर सदर स्थगिती उठविण्याबाबत प्रयत्न करण्यात आले. म्हाडाने वेळोवेळी बैठकाही घेतल्या. शासन स्तरावर सादर झालेल्या प्रस्तावावर स्थगिती काळात सेवा शुल्क, वीज दंड व व्याज याबाबत धोरण निश्चित करून प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.राज्यमंत्र्यांनी निर्देश देऊन नस्ती परत करण्यात आली. विभागाने त्यानुसार म्हाडास कळविले. विभागीय सचिवांच्या खुलाशाने समितीचे समाधान झाले नाही. **पाणीपुरवठा, विजेचे देयक हे उपभोगत्याने किंवा विकासकाने भरण्यासाठी ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे, दरवर्षी सबसिडी देणे योग्य होणार नाही, शासनाने यात गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे. आता बहुतेक ठिकाणी सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. पाणीपुरवठा, विजदेयके व अन्य नागरी सुविधांचे दर कमी करावा असे वाटत असेल तर त्या संस्थांनी संबंधित महापालिका, वीज कंपन्यांकडे व संबंधित संस्थांकडे पाठपुरावा केला पाहिजे. या संदर्भात शासनाचे धोरण तातडीने निश्चित करावे. ज्या सेवासंदर्भात इमारतीतील गाळेधारक किंवा विकासक यांच्याकडून महापालिका, वीज कंपन्या व इतर संबंधित संस्थांसाठी सेवा पुरविल्याबाबत जे शुल्क म्हाडाने वसूल केलेले आहे ते म्हाडाने संबंधित संस्थांना वर्ग करावे व थकित शुल्कासंदर्भात जी तूट आहे त्यासंबंधी शासन आणि म्हाडा यांनी एकत्रितपणे निर्णय घ्यावा. तसेच यापुढे संबंधित संस्थांनी सेवा पुरविल्याचे शुल्क हे गाळेधारकांनी/विकासकांनी परस्पर भरावे व कॉमन आकारलेले देयके ही सोसायटीने परस्पर भरावी याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

८ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.८ " पाणीपुरवठा योजनेवर झालेला निष्फळ खर्च " यासंदर्भात महालेखाकारांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

८.१ महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने (विभाग), अहमदनगर जिल्ह्यातील क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेला (योजना) रु. १५.०३ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिली (नोव्हेंबर १९९८). सदर योजना ही प्रवराच्या उजव्या कालव्यातून (प्रवरा RBC) १० गावांमधील १७.५७४ इतक्या लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आखण्यात आली होती. सदर काम मे.व्ही.एम.मातेरे, पुणे (कंत्राटदार) यांना रु. ९.५१ कोटीला (रु. १०.५८ कोटी रकमेच्या अंदाजित किमतीच्या १०.१० टक्के कमी रकमेत) (जानेवारी १९९९) बहाल करण्यात आले. सदर काम ३० महिन्यांत (जुलै २००१ पर्यंत) पुर्ण करायचे होते. सदर कामामध्ये इतर बाबी बरोबरच ३०९ मिलियन लिटर क्षमतेच्या संतुलन टाकी (BT) च्या बांधकामाचा समावेश होता, जिचा वापर प्रवरा RBC मधुन पाणी उचलल्यावर ते शुद्ध करून गावकऱ्यांना पाणी पुरवठा करण्याचे प्राथमिक साठवणूक केंद्र म्हणून केला जाणार होता.

ज्ञापन :

८.२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पानोडी व इतर ९ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना ता. संगमनेर

१. मूळ प्रशासकीय मान्यता :- शासन निर्णय व.वे.का/१०९८/सी.आर.४४५ पा.पु.-१०, दिनांक २६/११/१९९८.

२. मूळ तांत्रिक मान्यता :- मा.मुख्य अभियंता म जी प्रा नाशिक क्र. १५६, दिनांक १४/०१/१९९९.

३. सुधारित प्रशासकीय मान्यता:- ग्रामीण पाणीपुरवठा १०९८/प.क.१२२/पापु-०९ मंत्रालय, मंबई-३२, दिनांक २/८/२००३.

४. सुधारित तांत्रिक मान्यता :- मा. मुख्य अभियंता नाशिक क्र.तांशा/१३९३/६०४, दिनांक १३/०४/२००४.

५. पुर्न सुधारित प्रशासकीय मान्यता :- शासन निर्णय क्र. ग्रापापु-२०१०/प्र.क्र.७७/पा.पु. ०९, दिनांक २०/११/२०१०.

६. पुर्न सुधारित तांत्रिक मान्यता :- मा. मुख्य अभियंता नाशिक जा.क्र.४९/२०११, दिनांक १४/३/२०११.

७. योजनेचा कामाचा मुळ कालावधी :- ३० महिने (२९/१/१९९९ ते २८/७/२००१).

८. अंतिम मुदतवाढ मंजुरी :- मा. मुख्य अभियंता, म जी प्रा ठाणे जा.क्र.तांशा २/९४ (दिनांक ३०/०६/२०१५ पर्यंत)/२०१५, दिनांक ०९/०१/२०१५.

कार्यादेश दिनांक २९/०१/१९९९ प्रमाणे कंत्राटदार श्री. व्ही.एम. मातेरे यांनी योजना कामे निर्धारित मुदत १ जुलै २००१ पर्यंत पुर्ण करणे अपेक्षित होते. मंजूर योजनेप्रमाणे साठवण तलावाच्या बांधकामाची जागा मालुंजे गावाजवळ पाटबंधारे विभागाच्या पाझर तलावाच्या बुडीत क्षेत्रात प्रस्तावित होती. प्रत्यक्ष कामास सुरूवात केली असता पाटबंधारे विभागाचा पाझर तलाव पावसाळा १९९८ पर्जन्यमानामुळे प्रथमतःच पुर्ण क्षमतेने पाण्याने भरला. स्थानिक शेतकऱ्यांचे सिंचन क्षेत्र पुर्णपणे पाझर तलावावर अवलंबून असल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी साठवण तलावाचे बांधकाम पाझर तलावाचे बुडीत क्षेत्रात करणेस विरोध केला. योजना आराखड्यांप्रमाणे साठवण तलावाजवळ जलशुद्धीकरण केंद्र एम.बी.आर. एकत्रितपणे निश्चित केलेले असल्याने व संपूर्ण योजनेतील गावापावेतोचा गुरुत्वप्रवाह पद्धतीचा पाणीपुरवठा जलवाहिन्यांचे नेटवर्क एम बी आर पासून निश्चित असताना सदर योजनेच्या एकूण तांत्रिक/आर्थिक तपशिलात फार फेरबदल होणे अयोग्य ठरेल या विचारांती पाझर तलावालगतच डोंगराच्या पायथ्याशी पर्यायी जागा शेतकऱ्यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे व योजनेच्या हायड्रोलिक डिझाईन मध्ये फारसा बदल होणार नसल्याने सदर पर्यायी जागेवर साठवण तलावाचे काम करण्यात आले जागेचा ताबा घेऊन योजना कामात दिरंगाई होवू नये म्हणून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली.

२. कार्यकारी अभियंता (EE), MJP, नागरी व ग्रामीण योजना विभाग, संगमनेर, जि. अहमदनगर यांचेकडील तपासणीत (एप्रिल २०१४) खालील बाबी आढळून आल्या.

३. योजना जरी जुलै २००१ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित होते तरी नोव्हेंबर २०१४ पर्यंत, मुख्यत्वे करून BT च्या संकल्पचित्रातील समस्या, ग्च्क्ए कडून विदयुत पुरवठ्यास विलंब, चक्रीय पद्धतीप्रमाणे जल संपदा विभागाकडून प्रवरा RBC मधील पाणी दुसरीकडे वळविणे, निधीची पुरवठयास विलंब, BT च्या चाचणीला विलंब इत्यादीमुळे अपुर्ण होती. त्यामुळे सदर कामाच्या खर्चात वाढ होऊन ऑगस्ट २००३ (रु. २२.८६ कोटी) व नोव्हेंबर २०१० (रु. २५.०४) मध्ये दोन वेळा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. शिवाय, MJP ने कंत्राटदारास वेळोवेळी सप्टेंबर २०१२ पर्यंत नऊ वेळा मुदतवाढ दिली होती. सदर योजनेवर जुलै २०१४ पर्यंत रु. २३.५९ कोटी इतका खर्च झाला होता ज्यामध्ये कंत्राटदारास प्रदान केलेले रु. १८.१६ कोटी संम्मिलित आहेत.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

योजना जरी जुलै २००१ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित होते परंतु मूळ मंजूर योजनेप्रमाणे पाटबंधारे खात्याच्या पाझर तलावाचे बुडीत क्षेत्रात प्रस्तावित साठवण तलावाची जागा परिसरातील स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे बदलण्यात आली. कारण स्थानिक शेतकऱ्यांचे सिंचन क्षेत्र पुर्णपणे पाझर तलावावर अवलंबुन होते. पर्यायी जागा उपलब्ध करून घेणे, भू संपादनाची कार्यवाही करणे व जागा ताब्यात घेवून नवीन जागेनुसार संकल्पनात बदल करण्यात आला. भूसंपादनाच्या बाबतीतील सर्व प्रक्रिया म.जी.प्रा.च्या कार्यक्षेत्रापलीकडची (Beyond control of MJP) ठरली.

तसेच अशुद्ध उर्ध्ववाहीनीचे संकल्पन सन २०१५ च्या लोकसंख्येसाठी प्रस्तावित होते. सदर संकल्पन साईट कंडीशन नुसार व मार्गदर्शक सुचनानुसार सन २०३० सालाच्या संकल्पीत लोकसंख्येनुसार करण्यात येवून ४५० मी.मी. व्यासाच्या डी आय पाईप ऐवजी ५५९ मी.मी. व्यासाचे एम एस पाईप टाकण्याचे ठरले. सदरच्या तांत्रिक बदलामुळे व योजनेच्या साठवण तलावाची जागा बदलल्याने निविदेतील अंतर्भूत बाबीच्या परिमाणांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. असा बदल करणे योजनेचे भविष्यातील योग्य कार्यचालन विचारात घेऊनच करण्यात आले.

योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान निधीची कमतरता होती. प्रवाहाच्या दिशेने कामे करताना वितरण व्यवस्था व पंपीग मशिनरीच्या पुरवठ्यास विलंब झाला. साठवण तलावाचे व योजनेची कामे पुर्णत्वावर आली असताना विज जोडणी उपलब्ध होणेसाठी मागणी पत्र दिनांक १५/१०/२००७ रोजी सादर करण्यात आले. परंतु योजनेतील समाविष्ट गावांकडे त्यांच्या अस्तित्वातील योजनांची वीज बिले थकीत असल्याने वीज जोडणी या प्रादेशिक योजनेस उपलब्ध होण्यास उशिर झाला. प्रत्यक्षात योजनेच्या हेडवर्क (शेडगाव) येथे दिनांक २०/१/२००९ व साठवण तलाव/जलशुद्धीकरण केंद्र (मालुंजे) येथे दिनांक २०/७/२००९ रोजी प्रत्यक्ष वीज पुरवठा उपलब्ध झाला. त्यामुळे योजनेची चाचणी घेण्यास विलंब झाला. वीज देयकाची रक्कम थकीत असणे व त्याचा योजनेच्या अंमलबजावणीत व्यत्यय येणे या बाबी स्थानिक स्वराज्य संस्थेशी निगडीत होत्या.

दरम्यान सन २००७ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील म.जी.प्रा. खात्याच्या इतर योजनांखाली बांधलेल्या साठवण तलावाचे बांधकामाचा अनुभव लक्षात घेता दक्षता/सुरक्षिततेच्या दृष्टीने पानोडी प्रादेशिक योजनेच्या साठवण तलावाची चाचणी घेणे आधी संकल्पचित्रे पुन्हा नव्याने तपासणी करून प्रादेशिक योजनेच्या साठवण तलावाची चाचणी घेणे आधी संकल्पचित्रे पुन्हा नव्याने तपासणी करून घेणेचे ठरले. VNIT नागपूर यांचे कडून दिनांक ७/७/२००८ चे अहवालात साठवण तलावाचे स्थिरतेच्या दृष्टीने पाण्याची साठवण उंची संकल्पित ५ मी. ऐवजी १.९० मी असावी अशी शिफारस झाली. त्यानंतर प्रवरा उजव्या कालव्याचे आवर्तन सुरू असतांना जानेवारी २००९ मध्ये साठवण तलाव १.७ मी. उंची पर्यंत पाणी भरण्यात आले. परंतु साठवण तलावातुन गळती होत असल्याचे आढळले.

त्यामुळे साठवण तलावातील गळती रोखण्यासाठी जलसंपदा विभागातून धरणाच्या गळती विरोधात काम करणाऱ्या तज्ज्ञ यंत्रणेचे सहाय्य घेण्यात आले. मे. शांकबरी, ठाणे या नियुक्त तज्ज्ञ यंत्रणेने दिनांक २०.७.२००९ रोजीच्या अहवालानुसार बोअर पॉलिमर लॅटेक्स मिश्रीत ॲडमिक्श्चर सिमेंट स्लरी ग्राऊंटिंगचे काम सुचविले. त्यांचे प्रत्यक्ष देखरेख व परिक्षणाखाली व त्यांचे उपस्थितीत स्विकृत निविदा कंत्राटदारामार्फत अतिरिक्त बाब म्हणुन सदरचे काम करण्यात आले. चाचणीसाठी पुन्हा मार्च २०१३ मध्ये पुन्हा पाणी घेतले असता दुर्दैवाने अत्यंत कमी फरकाने मागे आढळलेल्या ठिकाणामधूनच पुन्हा पाणी गळती होत असल्याचे आढळले. तज्ज्ञ यंत्रणेने सुचविलेले, सुपरवाईज केलेले गळती रोधक काम देखील अयशस्वी झाले. त्यानंतर साठवण तलावात पाणी भरण्यात आलेले नाही.

वरील कारणांमुळे सदर योजनेच्या कामास विलंब झाला. तसेच योजना कामाच्या अंमलबजावणी खर्चात वाढ झाली. ऑगस्ट २००३ (२२.८६ कोटी) व नोव्हेंबर २०१० (२५.०४ कोटी) मध्ये दोन वेळा सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. प्रत्यक्ष कामे करताना झालेल्या विलंबाची उपरोक्त परिच्छेदात मुददेनिहाय विवेचन केलेली कारणे लक्षात घेवून काम पूर्ण करणेसाठी लोकहितार्थ बाबीपोटी कंत्राटदारास वेळोवेळी मुदतवाढ देणेत आली. योजनेवर जुलै २०१४ अखेर २३.५९ कोटी खर्च झालेला असून त्यात कंत्राटदारास प्रदान केलेल्या रु. १८.१४ कोटी रकमेचा समावेश आहे. (संतूलन टाकीचे १०.४९ कोटी व इतर कामांसाठी ७.६५ कोटी) ही वस्तुस्थिती आहे.

४. निविदेप्रमाणे BT चे संकल्प चित्र MJP ने द्यावयाचे होते. परंतु, MJP च्या विनंतीवरुन BT चे संकल्पचित्र कंत्राटदाराने तयार करून सादर केले (ऑक्टोंबर १९९९), जे MJP ने मंजूर केले होते (नोव्हेंबर १९९९), सदर BT चे बांधकाम मार्च २००५ मध्ये पुर्ण झाले होते, तथापि, ग्रामपंचायतीने MSEB ला देय असलेली वीज पुरवठ्याची थकबाकी न भरल्याने MSEB ने वीज पुरवठा न केल्यामुळे BT ची चाचणी घेता आली नव्हती. दरम्यान, अमदनगर जिल्ह्यात इतर योजनांखाली बांधलेल्या BT च्या बांधकामामध्ये अपयश आल्याने, सदस्य सचिव, MJP यांनी MJP विभाग, संगमनेर यांना राष्ट्रीय तंत्रविज्ञान संस्था, नागपूर (VNIT) यांचेकडून विद्यमान BT च्या संकल्पचित्राची तपासणी करून घेण्यास सांगीतले (डिसेंबर २००७), त्याप्रमाणे MJP ने VNIT शी BT च्या स्थिरतेबाबत (stability) RCC संकल्प चित्राची तपासणी करण्याबाबत

सल्लामसलत केली (जुलै २००७), VNIT ने BT ची स्थिरता विचारात घेऊन पाण्याची सुरक्षित खोली संकल्पित पाच मीटर ऐवजी १.९० मीटर असावी अशी शिफारस (जुलै २००८) केली. परंतु, BT च्या चुकीच्या संकल्प चित्रावर कंत्राटदाराविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही, कारण संकल्प चित्रास MJP ने मंजुरी दिली होती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मूळ मंजूर योजनेप्रमाणे साठवण तलावाचे (पाझर तलावात) खोदकाम १.५० मी. खोलीपर्यंत नरम माती/मुरुम व ०.२० मी. खोलीपर्यंत कठीण स्तरात प्रस्तावित होते. परंतु साठवण तलावासाठी उपलब्ध करून दिलेली जागा ही डोंगराच्या पायथ्याशी, उताराची (सुमारे १० मी. उतार) व खडकाळ स्वरुपाची असल्याने नवीन जागेनुसार संकल्पचित्र तयार करणे आवश्यक होते. म.जी.प्रा. प्रचलित कार्यपद्धतीनुसार आर सी सी बांधकामाचे संकल्पन कंत्राटदारामार्फत तज्ज्ञ यंत्रणेकडून तयार करण्यात आल्यावर त्रयस्थ संस्था जसे अभियांत्रिकी महाविद्यालयातून तपासणी करून घेतल्यानंतरच कंत्राटदाराचे जबाबदारीवर मंजूर करण्यात येते. या प्रकरणीही निविदा कंत्राटदाराने मे.क्रियेशन्स, पुणे या तज्ञांकडून संकल्पचित्र तयार करून घेतली. त्यानंतर सदर संकल्पवने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड (त्रयस्थ यंत्रणा) यांचेकडून तपासणी करून घेतल्यावर म. जी.प्रा.खात्यास सादर केले. दिनांक ५/११/१९९९ रोजी म. जी. प्रा. मंडळ कार्यालयाकडून मंजुर झाले. संकल्पन कंत्राटदाराचे असल्याने ते मंजूर करतांना विविध पातळ्यांची अचुकता, बांधकामाचा भक्कमपणा/मजबुती, (soundness) व स्पेसिफिकेशन प्रमाणे कामे करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे स्पष्टपणे नमुद करण्यात आलेले आहे. साठवण तलावाचे आणि योजनेच्या सर्व उपांगाची कामे पुर्णत्वावर आली असतांना दिनांक १५/१०/२००७ रोजी विज जोडणी उपलब्ध होणेसाठी म.रा.वि. मंडळास मागणीपत्र सादर करण्यात आले. परंतु योजनेतील समाविष्ट गावांकडे त्यांच्या अस्तित्त्वातील योजनांची वीज बिले थकित असल्याने योजनेसाठी विज जोडणी उपलब्ध होणेस विलंब झाला. प्रत्यक्षात योजनेच्या हेडवर्क (शेडगाव) येथे दिनांक २०/१/२००९ व साठवण तलाव/जलशुद्धीकरण केंद्र (मालुंजे) येथे दिनांक २०/७/२००९ रोजी प्रत्यक्ष वीज पुरवठा उपलब्ध झाला.

दरम्यान सन २००७ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील म.जी.प्रा. खात्याच्या इतर योजनाखाली बांधलेल्या साठवण तलावाचे बांधकामामध्ये अपयश आल्याने दक्षता/सुरक्षिततेच्या दृष्टीने पानोडी प्रादेशिक योजनेच्या साठवण तलावाची चाचणी घेणे आधी संकल्पचित्रे पुन्हा नव्याने तपासणी करून घेणेचे ठरले. VNIT नागपूर यांचे कडून दिनांक ७/७/२००८ चे अहवालात साठवण तलावाचे स्थिरतेच्या दृष्टीने पाण्याची साठवण उंची संकल्पित ५ मी. ऐवजी १.९० मी. असावी अशी शिफारस झाली. जानेवारी २००९ मध्ये साठवण तलाव १.७ मी. उंची पर्यंत पाणी भरले असता साठवण तलावातून गळती होत असल्याचे आढळले.

सद्य: स्थितीत योजना कामे अर्धवट, अपूर्ण ठेवल्याने तसेच योजना कार्यान्वित होवून यशस्वी चाचणी दिलेली नसल्याने व संकल्पचित्र कंत्राटदाराच्याच जबाबदारीवर मंजूर केल्याने मक्तेदारास दंड आकारला असून सदर दंड निविदा अटी व शर्तीच्या जास्तीत जास्त दंड रकमेचा आकारणी पावेतो (रु. १०७.६० लाख) करण्यात आलेला आहे. मक्तेदारावर निविदा अटी व शर्तीच्या अधिन व कायदेशीर बाबीच्या अधीन उपरोक्त आवश्यक सर्व कारवाई कलम ३ (क) खाली पूर्ण करण्यात येत आहे.

५. जानेवारी २००९ मध्ये MJP ने घेतलेल्या चाचणी मध्ये सदर BT मध्ये फक्त १.७० मीटर उंचीपर्यंत पाण्याची पातळी ठेऊनही दररोज १८ लाख लिटर इतकी जास्त गळती होत होती. तदनंतर, MJP ने नियुक्त (एप्रिल २०१०) केलेल्या तांत्रिक सल्लागाराने सांगितले की, एफ्र च्या लगत असलेल्या जागेवरील खडकाचा प्रकार हा पाणी अडवून ठेवण्यासाठी करावयाच्या बांधकामाच्या संरचनेसाठी उपयोगी नव्हता आणि आधारभूत स्लॅबखाली असलेला खडक सच्छिद्र होता. सल्लागारांनी असेही सांगितले की, BT ची संरचना अस्थिर होती आणि त्यांनी गळती रोखण्यासाठी जलरोधन (water proofing) करण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार, MJP ने रु. १.०८ कोटीचे जलरोधनाचे काम त्याच कंत्राटदारास अतिरिक्त बाब म्हणून दिले (मार्च २०११), मार्च २०१२ मध्ये सदर काम रु. ०.९२ कोटीत पूर्ण झाले, परंतु जलरोधन करून सुद्धा १५ लाख लिटर प्रति दिवस गळती सुरूच होती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

साठवण तलावातील गळती रोखण्यासाठी जलसंपदा विभागातून धरणाच्या गळती विरोधात काम करणाऱ्या तज्ज्ञ यंत्रणेचे सहाय्य घेण्यात आले. मे. शांकबरी, ठाणे या नियुक्त तज्ज्ञ यंत्रणेने बोअर पॉलिमर लॅटेक्स मिश्रीत ॲडमिक्श्चर सिमेंट स्लॅरी ग्राऊंटिंगचे काम सुचविले. तसेच सदर काम झालेनंतर ९० टक्के पावेतो साठवण तलावाची गळती बंद होईल अशी ग्वाही दिली. मे. शाकंबरी, ठाणे यांनी सुचविल्याप्रमाणे १.०८ कोटीचे अंदाजपत्रक करण्यात येवून त्यांचे प्रत्यक्ष देखरेख व परिक्षणाखाली व त्यांचे उपस्थितीत स्विकृत निविदा कंत्राटदारामार्फत अतिरिक्त बाब म्हणून सदरचे काम करण्यात आले. त्यापोटी रु. ०.९२ कोटी एवढा खर्च झाला आहे. चाचणीसाठी पुन्हा मार्च २०१३ मध्ये पुन्हा पाणी घेतले असता

दुर्दैवाने अत्यंत कमी फरकाने मागे आढळलेल्या ठिकाणामधूनच पुन्हा पाणी गळती होत असल्याचे आढळले. तज्ज्ञ यंत्रणेने सुचविलेले, सुपरवाईज केलेले गळती रोधक काम अयशस्वी झाले. त्यानंतर साठवण तलावात पाणी भरण्यात आलेले नाही.

६. अशाप्रकारे रु. १५.०३ कोटी अंदाजित खर्च असलेली पाणीपुरवठा योजना जिची सुरूवात जुलै २०११ ला होणार होती ती १३ वर्षे उलटुन गेल्यावर आणि रु. २५.३९ कोटी खर्चूनही BT च्या सदोष संकल्पचित्रामुळे अपूर्ण राहिली, योजनेच्या अंमलबजावणीस विलंब झाल्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी १० गावांतील लाभार्थी पाईपने मिळणाऱ्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहिले होते आणि त्यांना त्यांच्या पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी विंधण विहिरी, पाण्याचे टँकर्स आणि सद्य:स्थितीतील पाणी पुरवठा योजनेवर अवलंबून राहवे लागत होते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

साठवण तलावातून पाणी गळती होत असलेल्या स्थितीत देखील टंचाई/दुष्काळ ग्रस्त स्थितीमुळे त्याकाळात साठवण तलाव व मालुंजे पाझर तलावात पाणी घेवून लगतच्या परिसरातील गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला गेला. योजनेतील लगतच्या गावांपावेतो गुरुत्ववाहिन्या कार्यान्वित करून पाणी टाक्यांपर्यंत पोहचविण्यात आले. साठवण तलाव वगळता इतर उपांगाची कामे योग्य गुणवत्तेची झालेली असून ग्रामपंचायतींच्या विनंतीवरुन हस्तांतरित केलेल्या गावपातळीवरील पाण्याच्या टाक्या व वितरण व्यवस्थेचा वापर संबधित गावांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे योजनेचा पूर्ण खर्च निष्फळ झालेला नाही. गावपातळीवरील उपांगें काही प्रमाणात उपयोगात/वापरात आहेत. मात्र सदर योजनेतील साठवण तलावाची गळती रोखणे अद्याप शक्य झालेले नसल्याने योजनेत समाविष्ट १० गावातील लाभार्थी योजनेच्या अपेक्षित लाभांपासुन वंचित आहेत ही वस्तुस्थिती असली तरी परिस्थितीजन्य खडकाळ साईट जागेची निवड, खडकाळ भूस्तर जलरोधक असल्याचे नेहमीचे गणित व अनुभव गृहीत धरणे व हा अंदाज चुकणे व त्यावेळी राहून गेलेली तांत्रिक परिक्षणे, तज्ज्ञ यंत्रणेच्या सुचनेनुसार आणि देखरेखीतून केल्यानंतरही गळती रोधक काम यशस्वी न होणे या सर्व बाबींमुळे योजनेचा पूर्ण उपयोग सर्व लाभार्थींना होत नाही. तथापि ही बाबही लक्षात घेणे योग्य ठरेल की योजनेतील पाच गावांमध्ये बांधलेले जलकुंभ आणि अंथरलेली वितरण व्यवस्था पाईपलाईन गाव पातळीवर ग्रामपंचायती मार्फत सध्या वापरात आहे.

७. कार्यकारी अभियंता, MJP, संगमनेर विभाग यांनी सांगितले (सप्टेंबर २०१४) की, सदर BT च्या दुरुस्तीसह योजना पूर्ण करण्यासाठी रु. २.७५ कोटी इतक्या अतिरिक्त रक्कमेची आवश्यकता असुन त्यासाठी सुधारित मंजुरीची आवश्यकता आहे.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

वरीलप्रमाणे सर्व बाबीं लक्षात घेता योजनेतील जलकुंभ व अंथरलेली वितरण व्यवस्था व पाईपलाईन गावपातळीवर ग्रामपंचायती मार्फत वापरात असून ती योजना कार्यान्वित करून आणि यशस्वीरित्या चालवुन म.जी.प्रा. योजनेचा खर्च निष्फळ ठरणार नाही, यासाठी प्रयत्नशील आहे.

त्याचाच एक भाग म्हणुन सदर योजनेतील साठवण तलावाची गळती कायमची बंद करणेसाठी पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मार्गदर्शनानुसार काळी माती, जिओ मेम्बेरेन सीट अंथरणे व आर सी सी बीम इत्यादी अंदाजपत्रकीय कामासाठी रु. २.७५ कोटी इतक्या खर्चाची आवश्यकता आहे. योजनेवर एवढा निधी उपलब्ध नसल्याने वरीष्ठ कार्यालयांच्या मान्यतेनंतर सुधारित योजना प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

८. सदर बाब शासनाला जुलै २०१४ मध्ये निदर्शनास आणून दिली, त्याचे डिसेंबर २०१४ पर्यंत प्राप्त झाले नव्हते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

परिच्छेदातील सर्व मुद्द्यांवरील माहिती अचुकरित्या प्राप्त करून घेणे आवश्यक होते. त्यामुळे डिसेंबर २०१४ पर्यंत अनुपालन सादर करणे शक्य झाले नाही.

साक्ष :

८.३ उपरोक्त परिच्छेदा संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने " पाणीपुरवठा योजनेवर झालेला निष्फळ खर्च " यासंदर्भात महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपा संदर्भात विभागाकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरणात्मक ज्ञापन हे लेखाधिकारी यांच्या सहीने समितीला प्राप्त झाले आहेत. यापूर्वी अशा प्रकारे सर्वसाधारणतः लेखाधिकारी यांच्या सहीने कोणतीही माहितीची कागदपत्रे समितीला सादर केली गेली नाहीत. ही बाब विभागाच्या निदर्शनास आणली व विचारणा केली की, ही बाब विभागीय सचिवांना मान्य आहे का ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदरहू माहिती जरी लेखाधिकारी यांच्या सहीने प्रसृत केली गेली असली तरीही संबंधित नस्ती वरच्या दर्जाच्या अधिका-यांच्या सहीनेच मान्य केलेली असते.

८.४ विभागीय सचिवांनी उक्त परिच्छेदासंदर्भात समितीला अवगत केले की, सदरहू विषय हा अहमदनगर जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनेवरील झालेल्या निष्फळ खर्चासंदर्भातील आहे. महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने अहमदनगर जिल्ह्यातील क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेला १५.०३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली होती. या योजनेमध्ये अहमदनगरमधील पानोडी व इतर ९ गावे यांचा समावेश होता. अहमदनगर-संगमनेर पाणीपुरवठा योजनेवरील खर्च हा निष्फळ आहे, असे म्हटलेले आहे. सदरहू मुद्दयामध्ये या योजनेचे काम पूर्ण झालेले नाही, असा आक्षेप महालेखाकारांनी काढलेला आहे. सद्यःस्थितीत ते काम पूर्ण झालेले नाही. सन १९९९ मध्ये सदरहू पाणीपुरवठा योजनेच्या कामाच्या वर्क ऑर्डर्स दिल्या गेलेल्या होत्या. या योजनेच्या कामाकरिता साईट सिलेक्शन करीत असतांना काही तांत्रिक बाबींचा ऊहापोह करण्यात आला होता. अहमदनगर येथे शाश्वत पाण्याचा स्त्रोत नाही. अहमदनगर जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त पाणीपुरवठा हा दोन कॅनॉलमधून होतो. हे कॅनॉल्स मुळा व मुठा नदीवर आहेत. या योजनेमध्ये बॅलन्स टँकचे बांधकाम करून त्यामध्ये चार महिन्यांच्या कालावधीत बारा महिन्यांच्या पाण्याची साठवणूक केली जाते. योजनेचा ८० टक्के खर्च हा बॅलन्स टँकवर करण्यात येतो. या योजनेच्या कामाकरिता सर्वप्रथम एक पाझर तलावाची साईट निवडण्यात आली होती. सर्वप्रथम गावक-यांनी या साईटकरिता संमती दर्शविली होती. कारण या पाझर तलावामध्ये बांधकामापासून कधीच पाणी साठले नव्हते. परंतु ज्या वर्षी या योजनेचे बांधकाम सुरू होणार होते, त्यावर्षी मात्र सदरहू पाझर तलावामध्ये पाणी साठू लागले. यामुळे गावक-यांनी या साईटला विरोध दर्शविला. गावक-यांनी सदरहू साईटला विरोध दर्शविल्यामुळे या योजनेच्या बांधकामास उशिर झालेला आहे. गावक-यांच्या विरोधामुळे या योजनेची साईट पुन्हा निश्चित करणे क्रमप्राप्त झाले. या प्रकल्पाच्या हायड्रोलिक मॉडलिंग व अन्य डिझाईनमध्ये बदल होऊ नये म्हणून शेजारच्या डोंगराखाली दुसरी साईट निवडण्यात आली होती. डोंगराच्या खाली दुस-या बाजूला या कामाची साईट निश्चित करण्यात आली. नॅचरल ड्राफ्टच्या सहाय्याने या योजनेतील बॅलन्स टँकमधील पाणी पावसाळयाव्यतिरिक्त आसपासच्या नऊ ते दहा गावांमध्ये देण्याची योजना होती. तज्ज्ञांनी सूचना दिल्याप्रमाणे त्या साईटवर बांधकाम केल्यास त्या बॅलन्स टँकला लिकेज होईल, असे सांगण्यात आले. याचे मुख्य कारण असे आहे की, या योजनेचा सोर्स हा परिपूर्ण नाही. या संदर्भात कॉलेज ऑफ इंजिनियरिंगने सल्ला दिलेला आहे की, शीट कापून लावल्या तर यातील लिकेजिंग थांबू शकते. अशुद्ध उर्ध्ववाहिनीचे संकल्पन सन २०१५ च्या लोकसंख्येसाठी प्रस्तावित होते. सदर संकल्पन साईट कंडीशन नुसार मार्गदर्शक सूचनानुसार सन २०३० सालाच्या संकल्पित लोकसंख्येनुसार करण्यात येऊन ४५० मी.मी. व्यासाच्या डीआय पाईप ऐवजी ५५९ मी.मी. व्यासाचे एम एस पाईप टाकण्याचे ठरले.

८.५ या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, कोणत्याही योजनेच्या पाईपलाईनचे काम सर्वात आधी सुरक्षित व निश्चित होणे आवश्यक आहे. या संदर्भातील शासन निर्णयानुसार टँक व सोर्सच्या आधी डिस्ट्रीब्यूशन करणा-या टँक्सचे काम नीट झालेले आहे का ते पाहण्यात येते. योजनेचा स्त्रोतच बरोबर नसतांना योजना कशी सुरू झाली ? स्त्रोत निश्चित व परिपूर्ण नसतांनाही या योजनेकरिता पैसे कसे प्रसृत करण्यात आले ? याची चौकशी होऊन जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. कामाचे अंदाजपत्रक तयार करणा-या अधिका-यावर कारवाई करणे आवश्यक आहे. या योजनेच्या धोरणाप्रमाणे योजनेतील कामांची अंमलबजावणी का करण्यात आली नाही ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००८-२००९ मध्ये या संदर्भातील शासन निर्णय काढून निर्णय घेण्यात आला होता. या योजनेच्या कामाकरिता पाण्याचा स्त्रोत पूर्णपणे विकसित होणे आवश्यक आहे. स्त्रोत विकसित झाल्याशिवाय कामाला सुरूवात होत नाही. नगर जिल्ह्यामध्ये सर्व योजनांच्या कामाकरिता कॅनॉल हा एकच सोर्स आहे. कॅनॉलच्या सोर्समधून बॅलन्स टँक भरुन निघतो. परंतु कॅनॉलमध्ये आसपासच्या सुनियोजित गावांकरिता बारा महिन्यांकरिता, पिण्याकरिता व शेतीकरिता पाण्याचा साठा होत नाही. अवर्षण काळाकरिता केलेली ती एक सोय असते. बॅलन्स टँकमध्ये जास्तीत जास्त पाच महिने प्रभावीपणे पुरेल एवढाच पाण्याचा साठा असतो.

८.६ मुळात या योजनेच्या कामाची साईट निश्चित करण्याकरिता पाझर तलावाच्या बुडित क्षेत्रात परवानगी दिली हीच पहिली चूक आहे. पाझर तलावाच्या बुडित क्षेत्रात या योजनेचे बांधकाम करण्यास गावक-यांनी संमती दर्शविली असे जे म्हटलेले आहे, तेच चुकीचे आहे. गावकरी हे काही कोणी ऑथोराईज्ड बॉडी नाही. साईट सिलेक्शनमध्ये गावक-यांची संमती घेण्यात येते, हे कोणत्या शासन निर्णयामध्ये व कायद्यामध्ये

लिहिलेले आहे. ग्रामपंचायत व पंचायत समितीने मान्यता दिली तर ठीक आहे पण गावकऱ्यांच्या संमतीने साईट निवडून त्यावर बांधकाम करणे योग्य नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

८.७ सन २००९ मध्ये सोर्स सापडल्यानंतर डिस्ट्रीब्यूशन सिस्टम फिजीबल व व्हायेबल असल्याशिवाय योजनेच्या बांधकामाकरिता निधी वितरित करण्यात येणार नाही, परंतु वाशिम नगरपालिका क्षेत्रातील काही पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अडीच महिन्यांपासून एमोयूकरिता प्रलंबित आहेत ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामध्ये केवळ ग्रामीण भागामध्ये पाणीपुरवठा करण्यासंबंधीच्या योजनांच्या कामांचा समावेश होतो. ग्रामीण व शहरी भागातील पाणीपुरवठा या दोन योजना वेगवेगळया विभागातून डिफ्रेन्शिएट व एक्झिक्यूट केल्या जातात. अर्बन वॉटर सप्लाय ही योजना नगरविकास विभागाच्या माध्यमातून चालविली जाते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही एक ऑथॉराईज्ड बॉडी असून नगरविकास विभागाच्या अर्बन वॉटर सप्लाय स्कीम्स ते एक्झिक्यूट करतात.

८.८ वाशिम नगरपालिका क्षेत्रात अनेक पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे एमओयूकरिता प्रलंबित आहेत. या योजनांना मान्यता केव्हा देण्यात येणार आहे. शासकीय योजनांचा सर्वसाधारण जनतेला लाभ होत नसेल तर त्याचा काहीही उपयोग नाही. सर्वसामान्य लोकांची पाणी ही मुलभूत गरज असून ती जर योजनांच्या माध्यमातून पूर्ण होत नसेल तर याला न्याय म्हणता येणार नाही. या संदर्भात निर्णय होणे आवश्यक आहे ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, सदर प्रकरणी लवकरात-लवकर वर्क ऑर्डर मिळेल याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

८.९ महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपामध्ये उल्लेख केलेली पाणी पुरवठा योजना एक उदाहरण दाखल आहे. परंतु राज्यातील अनेक जिल्ह्यांत पाणी पुरवठा योजना कशा फेल गेल्या आहेत हे ही सर्वांना माहीत आहे. पाणी पुरवठा योजना योग्य पद्धतीने राबविल्या जात नाहीत किंवा ठेकेदार कामे करीत नाहीत म्हणून त्या बंद आहेत. त्यामुळे या संदर्भात कोणावर जबाबदारी निश्चित केली आहे का ? कारण या योजनेसाठी अजून ३ कोटी रुपये पाहिजेत असे सांगितले आहे. सदर पाणी पुरवठा योजना लोकांपर्यंत पोहचणार आहे का ? लोक अजून टँकरनेच पाणी घेत आहेत. या योजनेवर ऑलरेडी २३ ते २४ कोटी रुपये खर्च करून झालेला आहे. या योजनेस जवळपास १६ वर्षे झाली आहेत. मात्र अद्यापपर्यंत कोणावरच जबाबदारी निश्चित केलेली नाही किंवा संबंधित जबाबदार व्यक्तींवर काहीही कारवाई केलेली नाही. ट्रायल ॲण्ड एरर म्हणून ही योजना वापरत होते. गळती झाली, अमुक झाले म्हणून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी तरतूद करायची आहे. ही योजना ट्रायल ॲण्ड एरर म्हणून वापरली का आणि संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली का ? तसेच बॅलन्सिंग टँकचा नवीन पॉईंट आहे, त्या संदर्भात देखील सॉईल एक्झामिनेशन केलेले नाही. व तेथे बांधकाम केले आहे. त्या संदर्भातील देखील जबाबदारी कोणावर निश्चित केली आहे का ? तसेच कोणावरही जबाबदारी निश्चित न करता, कोणताही दंड न घेता सर्व काही केले आहे. व १०७ लाख रुपयांचा दंड लावला आहे. मात्र तो सुद्धा वसूल झालेला नाही हे सर्व मुद्दे समितीने उपस्थित केले. मात्र यासंदर्भात विभागाकडून उत्तर प्राप्त झालेले नाही.

८.१० मुख्य मुद्दा सोर्सचा देखील आहे. नाशिकहून पाणी सुटेल त्यावेळी अहमदनगरला येते. अहमदनगरला अडचण आहे. याचा विचार विभागाने केला आहे का, प्रकल्प, कॅनल यांचा विचार केला आहे का व किती महिने पाणी सोडले ? अशी विचारणा समितीने केली असता चक्री पद्धत आहे, रेग्यूलर नाही. It is not assured water supply. क्रमांक लागेल तेव्हा पाणी मिळेल किंवा मिळणारही नाही अशी देखील परिस्थिती आहे असे सांगण्यात आले.

८.११ तथापि ही योजना चुकीची आहे. हे सर्व कायद्याच्या बाहेर झाले आहे. जर अहमदनगरला पाणी दिले असेल तर ते कायद्याच्या बाहेर राहून दिले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, भंडारदरा धरणात रिझर्व्हेशन आहे आणि त्याप्रमाणे इरिगेशन डिपार्टमेंट पाणी पुरवठा विभागास प्रमाणपत्र देते की, पाणी ८ महिने मिळेल किंवा २ महिने मिळेल.

८.१२ परंतु विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, चक्री पद्धतीने पाणी मिळणार होते. चक्री पद्धत म्हणजे दरवर्षी ८ महिनेच मिळणार असे नाही ही बाब निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, इरिगेशन डिपार्टमेंट सांगते की, ४ महिन्यांचा साठा बॅलन्सिंग टँकमध्ये आहे.

८.१३ गावकऱ्यांनी विरोध केला, त्यामुळे नवीन साईटची निवड केली. मात्र ती चुकीची केली. सदर बाबतीतील जबाबदारी कोणावर फिक्स करणार आहात, आपण कोणत्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी फिक्स केली किंवा काय कारवाई केली ? आता जवळपास १६-१७ वर्षे झाले असून, तो इतिहास झाला आहे. सदर प्रकरणी अहवालात कोणतीही स्पष्टता नाही, ही देखील अतिशय चिंतेची बाब आहे.

८.१४ सिंचन विभागाने पाणी पुरवठा विभागास परवानगी दिली आणि यांनी त्याप्रमाणे काम केले. साईट निवडण्यात आली परंतु तेथे सॉईल टेस्टिंगमध्ये चूक झाली असेल तर त्या संदर्भात जबाबदार कोणाला धरायचे हा देखील प्रश्न आहे. त्यामुळे २५ कोटी रुपये फुकट गेले आहेत. तसेच ठेकेदाराला १८ कोटी रुपये आणि ५ कोटी रुपये इतर खर्च असे पूर्ण पेमेंट झाल्याचे दिसत आहे. व अजून ३ कोटी रुपये गळती

बुजविण्यासाठी मागितले आहेत. हा विषय गंभीर स्वरुपाचा आहे. अंदाजपत्रक चुकीचे करायचे, पाणी उपलब्ध आहे की नाही या संदर्भातील जीएसडीएचे दाखले पहायचे नाहीत हे योग्य नाही. साईट फिजिबल नाही असे माहीत असून देखील पुढचे काम करायचे आणि ठेकेदाराची भर करायची असे इथे झाले आहे. काम ही दुसरीकडे केले आहे. पाईपलाईनसह काम झाले आहे. पाण्याचा पत्ता नाही, साईट चुकली आहे हे माहीत असून देखील पुढील डिस्ट्रिब्यूशनचे काम करायचे आणि त्याची बिले काढायची हे योग्य नाही. थोडक्यात ही मिलीभगत आहे. योजना फेल झाली आहे हे मान्य करूनही परत खर्च करायचा हे बरोबर नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, दुसऱ्यांदा साईट बदलली. व्हीएनआयटी, सिंचन विभाग यांनी दिलेला तज्ज्ञांचा रिपोर्ट, डिझाईन घेऊनच वर्क ऑर्डर देण्यात येते. हे सर्व घेऊन बॅलन्सिंग टँकचे काम सुरू केले. नॅचरल साईटमुळे असे झाले. डोंगराच्या खाली साईट होती. प्रथम ब्लास्टिंग करण्यात येते आणि त्याद्वारे कामे करण्यात येतात. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने निष्कर्ष काढला आहे की, खाली झरे किंवा क्रॅक्स असल्यामुळे असे झाले आहे. विभागाचे इंजिनिअर व तज्ज्ञ या संदर्भात अजुनही शुअर नाहीत की त्यातून हे पाणी निघून जाते.

८.१५ वास्तविक पाहता विभागाने सदर योजनेसंदर्भात केलेला अभ्यास हा अंतिम करण्यासाठी केला पाहिजे होता. सदर योजनेचा अभ्यास हा संपूर्ण प्रशासकीय मंजुरी देण्याच्या अगोदर झाला पाहिजे होता. त्या संदर्भातील अहवाल घेतला पाहिजे होता. परंतु तसे न करता हे मान्य कसे केले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले ती, डिझाईन झाले. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड यांचा तांत्रिक सल्ला घेतला होता.

८.१६ मुळात अंदाजपत्रकच चुकीचे आहे. पाण्याच्या स्त्रोताच्या संदर्भात शंका असतानाही मंजुरी कशी दिली ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, तो सोर्स नाही. ते स्टोरेज आहे. कॅनल हा सोर्स आहे.

८.१७ खडकाळ भूस्तर जलरोधक असल्याचे नेहमीचे गणित व अनुभव गृहीत धरणे व हा अंदाज चुकणे व त्यावेळी राहून गेलेली तांत्रिक परिक्षणे, तज्ज्ञ यंत्रणेच्या सुचनेनुसार आणि देखरेखीतून केल्यानंतरही गळती रोधक काम यशस्वी न होणे या सर्व बाबींमुळे योजनेचा पूर्ण उपयोग सर्व लाभार्थींना होत नाही असे विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे.

